
कुंभश्री
दीपावली
विशेषांक
संपादक
संजय राजे
२०२४
वर्ष ३१वे
किंमत ₹ 300/-

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

M/s G.S. KUMBHAR

Class-1(A) Govt. Regd. Contractor

GSK



Mr. Ganeshrao Kumbhar
B.A., L.L.B.



Mr. Parimal Kumbhar
M.E. (Civil, Structure)



Chi. Pratik Kumbhar
B.E. (E & TC)









Office address : Flat No. 201/B "Minakshi Puram" Vadgaon (bk) Pune - 411 041
Mob. No. +91 9850617691, Email ID : kumbhargs1@gmail.com

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

With Best Compliments



Our Inspriation



Late Mahadev B. Kunkalienkar



Late Vishnu B. Kunkalienkar



Late Vassu B. Kunkalienkar



Late Vishnu M. Kunkalienkar
(Padmashree Award)



Late Vaman B. Kunkalienkar



Satish V. Kunkalienkar
National President
Akhil Bharatiya Prajapati Kumbhakar Mahasangh
President
Goa Kumbhar Samaj Mahasangh



Dayanand V. Kunkalienkar



Pravin V. Kunkalienkar



Rajendra M. Kunkalienkar



Sanjay M. Kunkalienkar



Santosh M. Kunkalienkar



Shailesh M. Kunkalienkar



Vinay V. Kunkalienkar

M/s. M. B. Kunkalienkar & Bros.,
General Merchants,
New Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ Shop (0832) 2715233
Office (0832) 2737148

M/s. S. B. Traders,
General Merchants,
"Shanta Chembers",
Near M. G. Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ Shop (0832) 2737149
Office (0832) 2737148

M/s. Shanta Prasad Home Industries, Flour Mills,
Near M. G. Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ Shop (0832) 2737149
Off. 2737148 Res. : 2734450

M/s. Hotel Goa Land,
Lodging Bar & Restaurant,
Near M. G. Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ (0832) 2733265
Res. 2737148
Off. : 2737148, 2734450

M/s. Kunkalienkar Trading Company, General Merchants,
Below Hotel Goa Land,
Near M. G. Market,
P. O. Box No. 312,
Margao (403601) Goa.
☎ Shop : (0832) 2737066

आपकी अपनी Navi South Mumbai
DRONAGIRI
CITY WITH WINGS

PRAJAPATI™

PRAJAPATI® MAGNUM

The Jewel of Dronagiri

DRONAGIRI, SOUTH NAVI MUMBAI

2 & 3 BHK SPACIOUS FLATS | **READY POSSESSION**



FULLY RESIDENTIAL PROJECT WITH 1 ACRE PODIUM HAVING



JOGGING TRACK



PARTY LAWN



KIDS PLAY AREA



SWIMMING POOL

www.prajapatigroup.com

9549 033303

CREDAI-MCHI MEMBER

Project Finance by LIC HFL LIC HOUSING FINANCE LTD

MAHARERA Registration No:
P52000001121
P52000001425
maharera.mahaonline.gov.in

कुंभश्री मासिक मालक, मुद्रक, प्रकाशक सौ.बीना संजय राजे यांचेकरिता संपादक श्री.संजय राजे यांनी
गुरुनाथ प्रिंटर्स व टाईपसेटर्स, ६१, कुणाल प्लाझा, चिंचवड स्टेशन, पुणे ४११०१९ येथे छापून तेथेच प्रकाशित केले.

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

PARALYSIS SPECIALIST

For Appointment Send Hi on Whatsapp No.99162 33726





PANDURANG
KUMBAR HOSPITAL
NAGARMUNOLLI

★ ಲಖ್ವಾತಜ್ಞರು ★ ಸಿದ್ಧ ಮತ್ತು ಆಯುರ್ವೇದ



Dr. Chi. Dnyaneshwar Maharudra Kumbar
M.B.B.S.

Near Pandurang Temple,
NAGARMUNOLLI, Tal.Chikodi, Dist. Belgaum.
09980835141, 09901933726, 09880602676



अकोले तालुक्यातील एक भव्य शैक्षणिक प्रकल्प

अभिनव शिक्षण संस्था, अकोले

मारुतीराव कोते अभिनव पब्लिक स्कूल (निवासी पब्लिक स्कूल)
मातोश्री पार्वतीबाई कोते शिक्षणशास्त्र महाविद्यालय (बी.एड्)
व
अभिनव अध्यापक विद्यालय (डी.टी.एड.)
व्यवस्थापनशास्त्र महाविद्यालय (एम.बी.ए.)
मारुतीराव कोते ज्युनिअर कॉलेज ऑफ सायन्स
वसुंधरा ॲकॅडमी (सी.बी.एस.ई पॅटर्न)
अभिनव सिनिअर कॉलेज ऑफ सायन्स
अभिनव टुरीझम सर्टीफीकेट कोर्स
मुळा व्हॅली इग्लीश मेडियम स्कूल, कोतुळ
सह्याद्री व्हॅली इग्लीश मेडियम स्कूल,राजूर



श्री. मधुकरराव नवले
अध्यक्ष



श्री. सुरेशराव कोते
उपाध्यक्ष

प्राचार्य रमेशचंद्र खांडगे
सेक्रेटरी

श्री. भाऊसाहेब नाईकवाडी
खजिनदार

श्री. रामकृष्ण नवले
सह. सेक्रेटरी

✲ संचालक ✲

विक्रम नवले, उपाध्यक्ष
प्रा. सौ. भक्ती कोते-हिवरकर, सहसेक्रेटरी
रंजना नाईकवाडी, मंदाताई नवले

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



शिवम् हॉस्पिटल व अतिदक्षता विभाग

बालरोग्णालय, मॅटर्निटी व नर्सिग होम



कै.सौ.डॉ.उर्वशी बालासाहेब सेलूकर



डॉ.बालासाहेब सेलूकर
M.B.B.S. D.C.H.(Mumbai)
बालरोग व नवजात अर्भक तज्ञ



सौ.ज्योति बाळासाहेब सेलूकर
B.A. D.Farm
पांडुरंग मेडीकल ॲन्ड जनरल स्टोअर्स

महात्मा ज्योतीराव फुले जन आरोग्य योजना आणि प्रधानमंत्री आयुश्यमान भारत योजना संलग्न हॉस्पिटल

1. Pulmonology
2. Gastroenterology
3. General Medicine
4. Critical Care
5. Pediatrics Medical Management
6. General Surgery
7. Poly Trauma
8. Orthopedic Surgery And Procedures.
9. Genitourinary System

परभणी रोड, विश्रामगृहाच्या बाजूला, गार्डन समोर, वसमत, जि.हिंगोली

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



SINCE 1991

प्रेरणास्थान



Tanaji S. Kumbhar
Mob.: 9765171772
Ex Corporator, Kolhapur



Ajinkya T. Kumbhar
Mob.: 8767388499



Aditya T. Kumbhar
Mob.: 9623467557

KUMBHAR BUILDERS & DEVELOPERS
M/S. KUMBHAR ASSOCIATES

Address : 522/B, E Ward, Kadamwadi Road, Kolhapur

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



B. Ramchandra & Co.
Designing, Offset Printing & Packaging

DEDICATED TO CRAFTING IMPRINTS OF EXCELLENCE,
ONE PROJECT AT A TIME.

Sankalp
Healthcare And Allied Products (P) Ltd.

Dedication to pharmaceutical excellence, we stand as a beacon of trust and reliability in the healthcare industry.

SAMARTH
INDUSTRIES
Your trusted third-party manufacturer specializing in construction cement and tile adhesive.

SAHAR LIFE SCIENCES
Pledged to safeguard and enhance health, one step, one day, and one life at a time.

Bless Med Life Sciences
Dedicated to the cause of providing health, hope, and a brighter future for all.

Shri. Arjun Ramchandra Kumbhar
+91 98203 10782

Shri. Prasad Arjun Kumbhar
+91 98203 10832

Shri. Sanjay Arjun Kumbhar
+91 98208 01813

Shri. Aditya Prasad Kumbhar
+91 99696 89247

Corporate Office:
1st Floor, Shriram Building,
Near Satyam Industrial Estate,
Station Road, Govandi East,
Mumbai - 400 088.

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

DVDC

DR. VIVEK'S DIAGNOSTIC CENTRE

Our Inspriation



Late Kisan Ukirde



Sharda Kisan Ukirde



Dr. Vivek Kisan Ukirde
M.D.(Mumbai) Gold Medal
Consultant Interventional Radiologist
& Endovascular Specialist



Dr. Mrs. Gitanjali Vivek Ukirde
M.B.B.S., D.P.B.
Consultant Pathologist
Mob. 9869188680



Om Vivek Ukirde
S.Y. M.B.B.S.(Mumbai)



VASCULAR
ACCESS CENTER

Dr.Vivek Kisan Ukirde
Professor (Addl.) LTMGH
Consultant, Apollo Hospital, CBD, Navi Mumbai
Medi Cover Hospital, Kharghar
Reliance Hospital, Koparkhairane
Terna Hospital, Nerul, MPCT Hospital, Sanpada

Health care from the heart with professional touch !

Mob.: 98693 35336 / 93260 79909
druvrays@hotmail.com / druvrays@gmail.com

Shop No. 7/9A, 1st Floor, Suyog Arcade, Sector 23, Juinagar,
Navi Mumbai - 400 705 Tel.: 022-32598922 / 27717549

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

Prop :- Sou Rekha Suhas Hivarkar



KRUTIKA ELECTRICALS

Authorised Dealers For Supply Of
Cast Resin LT/HT CT Of



M/S HUPHEN ELECTROMECH PVT LTD NASIK

Supply Of Metering Cubical, LT/HT Meter & LT/HT Net Meter &
CT Operated Meter Box











Shop No 16, P.V. Park, C.T. No 927, Near Bank Of Maharashtra, Yerwada, Pune - 411006
Mob 9970002940 / 7709344111
Email : krutikaelectricals@gmail.com

आमचे प्रेरणास्थान



कै. पांडुरंगशेठ परबते

सतिश पांडुरंग परबते

इंडस्ट्रियल कॉन्टिन कॉन्ट्रॅक्टर

फोन : ९५२७७००७००

संदेश पां. परबते
B.Com.,M.B.A.



सतिशशेठ पां.परबते



शितल रेफ्रिशमेंट
प्युअर – व्हेज रेस्टॉरंट
नेहरूनगर, पिंपरी, पुणे – १८.



न्यु शितल स्वीट
तळेगाव स्टेशन, तळेगांव.



शितल स्वीट होम
७२३, सोमवार पेठ, शाळा चौक,
तळेगांव दाभाडे, पुणे.



शितल कॉर्नर स्वीट
गजानन महाराज मंदिराजवळ,
तळेगांव.

सर्व प्रकारच्या केटरिंगच्या व
स्विटस्च्या ऑर्डस् स्विकारल्या जातील.





- ARCHITECTURE
- INTERIOR DESIGN
- VASTUSHASTRA

SPACECRAFTT ARCHITECTS

Umesh Raje
C.A./96/20417

14 A/1, Plot No.33C, "Mayuraysh",
Near Vakratunda Motors,
Nagala Park, Kolhapur - 416 003.
Ph.:(0231) 266 3275, Mobile : 98224 32022
E-mail : info@archumaeshraje.com,
klp_ura3333@sancharnet.in
Website : www.archumaeshraje.com

- AN ISO 9001-2015 COMPANY

शुभेच्छुक समस्त डाळजकर परिवार



श्री. दत्ता कुंभार

विश्वस्त- कुंभार समाज धर्मशाळा व गोरोबाकाका मंदिर ट्रस्ट, आळंदी
कार्याध्यक्ष - बारामती चेंबर ऑफ कॉमर्स अॅन्ड इंडस्ट्रीज्
राष्ट्रीय अध्यक्ष - मातीकला सेल अ.भा.प्रजापती (कुंभकार) महासंघ
उपाध्यक्ष - शाळा समिती, श्री संत तुकडोजी विद्यालय दौंड



सौ. अरुणा दत्ता कुंभार



श्री.उदय दत्ता कुंभार



डॉ.सौ.कांचन उदय कुंभार



चि.वरुण दत्ता कुंभार
M.S.Engg.

आमची दर्जेदार उत्पादने



फर्म

- अरुणा इंडस्ट्रिज
- आल्फा प्लास्टिक इंडस्ट्रीज
- हॉटेल उदय
- बारामती फुड अँड बिव्हरेजेस
- श्री.दत्ता क्लिनिक
- मातोश्री डेव्हलपर्स
- लक्ष्मी सप्लायर्स्
- आरोग्यसखी आयु. क्लिनिक

निवास - 'तानाई', प्लॉट नं. आर-५९, एम.आय.डी.सी., बारामती, जि. पुणे. मोबाईल-७५८८०३२५९५/९८९०१३३८१०

|| ॐ श्री साईनाथाय नमः||
|| ॐ श्री सद्‌गुरुनाथ दादाय नमः||

कै. बाबुराव भु. साळवी उर्फ आण्णा





संस्थापक

"तव स्मरण सतत स्फुरणदायी ठरो"

कुंभश्री मासिक समाज प्रबोधनास वाहिलेले मासिक (कुंभश्री स्थापना १९९४)
संपादक श्री. संजय पांडुरंग राजे

❋ वर्ष ३१ ❋ अंक १ ❋ पुणे ❋ शालीवाहन शके १९४६ ❋ ऑक्टो.-डिसेंबर २०२४ ❋ किंमत रु. ३०० ❋ रजि. नं. दिल्ली : ६६८७४/९४

◆ Website : www.kumbhashree.com ◆ e-mail : kumbhshree@gmail.com

कार्यालय : वीर एंटरप्रायजेस, प्लॉट नं. ३४४, सेक्टर २४, निगडी प्राधिकरण, पुणे ४११ ०४४.

अनुक्रमणिका

संपादकीय			**१३**
संपादकीय मंडळ			**१४**
कथा विभाग			
पंढरीची वाट	–	अनसूया कुंभार	१५
अमृताचा ठेवा	–	चंद्रकात नवले	१९
अंकुर	–	रत्नाकर वाणी	२३
सावलीतलं रोप	–	अंजली राठोड श्रीवास्तव	३५
एका वळणावर	–	अनुजा कुलकर्णी	४२
मेकअप उतरवताना	–	डॉ. अविनाश भोंडवे	४७
सुखाचा त्रिकोण	–	रश्मी पटवर्धन	५९
लग्न गोंधळ	–	मिलींद गिता रामदास	६४
राहूनचं गेलं	–	जयंत कोपर्डेकर	६९
भरारी	–	धनाजी बुटेरे	७१
धाक	–	दयदीप आफळे	८३
देवदासी	–	डॉ. प्रवीण जोशी	८७
संस्कार	–	श्रीपाद कुलकर्णी	९७
प्रार्थना	–	किरण आचार्य	१०७
अधलं मधलं	–	महेश सोवनी	११०
पादत्राणे	–	जयंत देशपांडे	११४
ती...काळरात्र	–	अपूर्वा शिर्के	११८
झाकोळ	–	संगीता देवकर	१२०
जिच्या हाती पाळण्याची दोरी	–	नितीन वाघोलीकर	१२२
काव्यसंग्रह			**१३१**
लेख संग्रह			
अन्न हे पूर्णब्रम्ह	–	धनाजी बुटेरे	१३५
अवयवांची सभा	–	प्रा. विशाल गरड	१३८
सुख कशात आहे	–	डॉ. सुनिल पाटील	१४०
सुप्रभात	–	मनिषा आवेकर	१५५
आजोबांचे पत्र	–	बाळकृष्ण बाचल	१५७

अंकामधील प्रकाशित विविध लिखाणाच्या बाबतीत संपादक सहमत असतीलच असे नाही. कुंभश्री विषयी सर्व वादविवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत राहतील

लढाई - पराग लोणकर १५९
वळण - श्रीपाद कुलकर्णी १६०
स्त्रियांचे कर्तृत्व - डॉ. निलकुमार शिंदीकर १६३
मुलं - जयदीप आफळे १६५
योग्य निर्णय - अनुजा कुलकर्णी १६७
जादू शब्दांची - अलका कुमठेकर १७०
आई गुगलचे इंजिन - रत्नाकर वाणी १७९
वात्सल्यसिंधू आई - मनिषा आवेकर १८१
पारशी समाजाचे योगदान १८२
स्पेनची वैभवशालीनता - मंदाकिनी डावरे १८५
काश्मीर लेह मोटरसायकल स्वारी - उज्वला राजे १८७
महाराजा सयाजीराव गायकवाड - संभाजी ब्रिगेड १९०
शेतकऱ्यांच्या लेकरांच घर - स्नेहवन - मनोज कापडे १९२
गोष्ट तीन मित्रांची आणि 'रोहित्र'ची - प्रसाद घारे २०३
नोबेल कंपनीच्या संचालिका
कै. विद्या भागवत - निलेश डांगे २०६
शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के - संकलित २०७
बालक-पालक प्रबोधनकार
अनसूया कुंभार - चैताली शिंदे २०८
आदर्श प्राध्यापक प्रभाकर बाभुळगावकर
- प्रा. मारोती पाटील २०९
संत परीक्षक संत गोरोबा काका - सुरेश पाठक २११
विद्यार्थीनिष्ठ विज्ञान प्रसारक डॉ. सुधीर कुंभार - संकलित २१३
श्रम साफल्य - रघुनाथ बोरसे २१४
पब्जी एक जीवघेणा गेम - प्रा. उत्तमराव काळे २१६
उन्हाळ्यातील डोळ्यांची निगा - डॉ. सुधाकर तहाडे २१७
लग्नाआधी विचारा हे पाच प्रश्न - डॉ. संजय मित्तल संकलित २१८
अल्पवयात फुटतात वासनेचे घुमारे - संकलीत २१९

पुस्तक परीचय

बाळूचे तात्या - लेखक अनिल शिंदे २२२
गोष्टी गावा शहरांकडील - लेखक नारायण कुंभार २२४
तु चाल पुढं - लेखक सविता कुंभार २२६
काटेरी वाट - लेखक ल.रा. कुंभार २२८
कुंभकार - लेखक डॉ. डी.डी. कुंभार २२९
डॉ. शिवाजीराव कुंभार उच्चशिक्षित कुटूंब २३१

राष्ट्रीय समाचार (हिंदी विभाग) २३२

हिंदी काव्य संग्रह २४१

महाराष्ट्र आपला

कुंभश्री दीपावली अंक प्रकाशन सोहळा २४३
कुंभश्री मोबाईल ॲप लोकार्पण सोहळा २४५
कुंभश्री शिष्यवृत्ती वितरण यादी २४८
प्रिती जोर्वेकर-कुंभार यांना डॉक्टरेट प्रदान २५०
कुंभश्री वाचकांच्या प्रतिक्रिया २५१
अनिकेत कुंभार याची लेफ्टनंट पदी नियुक्ती २५३
पॉटरी क्लस्टर ममदापूर २५४
पुणे येथे राज्यस्तरीय वधू-वर मेळावा संपंन्न २५५
नाशिक येथे गुणगौरव मेळावा संपंन्न २५६
चंद्रपुर येथे गुणगौरव मेळावा संपंन्न २५८
शिरपूर येथे गुणगौरव मेळावा संपंन्न २६०
नेहरूनगर येथे गुणगौरव मेळावा संपंन्न २६१
सोलापूर येथे गुणगौरव मेळावा संपंन्न २६२
सातारा येथे गुणगौरव मेळावा संपंन्न २६३
संत तुकाराम नगर येथे गुणगौरव मेळावा संपंन्न २६५
पुणे येथे कोकणस्थ गुणगौरव मेळावा संपंन्न २६७
विकास संस्थेच्या प्रदेशाध्यक्ष पदी ज्ञानेश्वर भागवत २६८
तेर येथे गोरोबाकाका वाड्याचा वर्धापन दिन संपंन्न २६९
पैठण येथे शककर्ता राजा शालीवाहन जयंती संपंन्न २७०
लायन्स क्लब भोजापुर गोल्डच्या अध्यक्षपदी जीवन सोमवंशी २७२
टेक मॉर्डन ऑटो इंडस्ट्रीजचे उद्घाटन संपंन्न २७६
प्रयास ॲकॅडमीच्या विद्यार्थ्यांचे सुयश २७७
उद्योजक नितीन भागवत यांचा सातासमुद्रापार व्यवसाय २७९
डॉ. प्रमोद माहुलीकर यांना जीवन गौरव २८०
अभय राजे यांचा सत्कार हस्ते खा. निलेक लंके २८१
के. एन. मोरे यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान २८३
देव माणसं पुस्तकाचे प्रकाशन २८५
नांदेड येथे गोरोबा काका मंदिराचा प्राणप्रतिष्ठा सोहळा संपंन्न २८९
कळंबचे पांडुरंग तात्या आमदारकीच्या तयारीत २९१
वीट भट्टयांचे सौर उर्जेकडे पाऊल २९८
डॉक्टर डे निमित्ताने डॉ. विकास व डॉ. सुषमा यांचा गौरव २९९
डॉक्टर नागोराव कुंभार यांना आंबेडकर साहित्य पुरस्कार ३०२
आदर्श केंद्र प्रमुख महादेव यादव सेवानिवृत्त ३०७
डॉ. मेघा कुंभार यांच्या डेंटल क्लिनिकचे उद्घाटन ३११
जुन्नर तालुका सामुदायिक विवाह सोहळा ३१३
आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवात निंबाजी हिवरकर
लिखित 'पाठवणी' लघुपटाला तीन नामांकने ३१४
अमरावती येथे हुन्नर स्नेह मेळावा संपंन्न ३१८
महिलांना व्यवसायासाठी बिन व्याजी कर्ज योजना ३२१
ओबीसी वृत्त ३३०
शुभमंगल वधु पाहिजे ३३६
वर पाहिजे ३४७
भावपूर्ण श्रद्धांजली ३५४

मुखपृष्ठ : कु. श्रध्दा मिननाथ शिंदे, आळे, ता. जुन्नर (1st Yr. M.com)

* संपादकीय - शतदा प्रेम करावे. *

इंग्रजीमध्ये एक म्हण आहे, ''A will will find a way'' (शोधा म्हणजे सापडेल) परंतु आम्हाला असे वाटते की त्या ऐवजी ही म्हण जरा बदलून पाहिली तर काय हरकत आहे. ''I will will find a answer'' म्हणजे, शोधा उत्तर सापडेल... असो. अहो जगात खूप प्रश्न आहेत. अगदी पावलापावलावर, क्षणाक्षणाला अडवतील असे अब्जावधी प्रश्न सापडतील. गंमत म्हणजे परमेश्वराने, दैवाने अगदी अगोदरच या, प्रश्नांची उत्तरेही शोधून ठेवली आहेत. परंतु गंमत म्हणजे अगोदर आपणास प्रश्न पडले पाहिजेत. हे असे का? ते तसे का? माझ्याच वाट्याला हे असे नशीब का? ज्याला प्रश्न पडला - जो या प्रश्नांमुळे अस्वस्थ झाला - त्याला त्या त्या प्रश्नांची उत्तरे सापडतात नव्हे सापडतातच. बघाना न्यूटनला गुरुत्वाकर्षणाचा शोध लागला. अहो आपोआप लागला का? नाही. अगोदर त्याला प्रश्न पडला की, 'झाडावरचे फळ खाली का पडले? प्रश्न पडल्यावर क्षणभर तो विचारत पडला असणार. त्या प्रश्नाचा त्याने पिच्छा पकडला असणार. त्या प्रश्नाच्या मागे हात धुवून लागल्यावर अर्थातच त्याला प्रश्नाचे उत्तरही अलगद सापडले असणार. आता आम्हाला सांगा न्यूटनने पाहण्या अगोदर फळे झाडावरून पडत नसतील का? पडतच होती की हो- परंतु प्रश्न न्यूटनला पडला... आणि गुरुत्वाकर्षणाचा शोध न्यूटनच्या नावावर गेला.

आपले हे असेच आहे. प्रश्न आपल्याला कधी पडतच नाही. पडले तर आपण हतबल होतो. अस्वस्थ होतो. अत्यवस्थ होतो. गंमत म्हणजे अनेकदा प्रश्नाचा किंवा प्रश्नांचा पिच्छा सोडून देतो. आणि मग आयुष्यभर दु:खी होतो. अगदी आपल्या सुखापुरता विचार केला तरी लक्षात येते की, 'आपल्या नावावर कोणताही शोध (उत्तर) लागलेला नाही.

खरं तर हा शोध लागायचा असेल, हे उत्तर सापडायचे असेल तर आपल्याला आपल्या आयुष्यावर 'शतदा' प्रेम करावे लागेल. कोणत्याही वस्तूवर, व्यक्तीवर, प्रसंगावर मनापासून प्रेम करा. अगदी शतदा प्रेम करा, तोंड देखले करू नका. असे जिवापाड प्रेम केले की मग लाखो प्रश्नांचा तुमच्यावर वर्षाव होईल. आणि प्रश्नांच्या या वर्षावानंतर तुमच्याच लक्षात येईल की अरे या साऱ्या प्रश्नांच्या वर्षावाबरोबर उत्तराच्या लाटाच लाटा तुमच्याकडे धावत आल्या आहेत.

आणि एकदा का हवी ती उत्तरे सापडली की तुमचेही मन अरुण दात्यांच्या त्या गाण्याप्रमाणे गुणगुणू लागेल, 'शतदा प्रेम करावे.'

गंमत अशी आहे की आपण मोठी माणसे कोणावरही आणि कशावरही मनापासून प्रेम करीत नाही. आणि मनापासून प्रेम नसल्या -मुळे प्रश्नही पडत नाहीत. तरीही प्रश्न पडलेच तर उत्तरेही सापडत नाही. उदाहरण म्हणून घरातल्या लहान-तान्ह्या बाळाकडे पहा. घरातील कोणताही माणूस त्याच्या पाळण्याजवळ गेला की ते बाळ लगेच हातपाय हलवून आनंद व्यक्त करते. सारे शरीर हलवून आपल्याकडे धावायचा प्रयत्न करते. कारण ते घरातल्या प्रत्येक व्यक्तीवर 'प्रेम' करते. अनोळखी, अपरीचित व्यक्ती पाहिल्यावर लगेच ते बाळ नजर फिरवते. त्याही व्यक्तीबद्दल विश्वास वाटला, प्रेम वाटले की त्याच्याकडेही ते बिनधास्त जाते. कारण क्षणात त्याला अनेक प्रश्न पडतात आणि त्याचक्षणी त्याला उत्तरेही सापडतात. आणि उत्तर सापडले की अनोळखी असूनही ते बाळ आपल्याकडे झेप घेते.

पुन्हा सांगतो गंमत अशी आहे की, आपण कोणावरही मनापासून प्रेम करीत नाही. खरे सांगू, 'तुमच्या कुटूंबावर, घरातल्या माणसांवर, तुमच्या कामावर, जेथे राहता त्या परिसरावर साऱ्या साऱ्यांवर प्रेम करा.' बघा तुमच्या मनात साचून राहिलेल्या सर्व प्रश्नांची उत्तरे अलगद तुम्हांला सापडतील.

संत शिरोमणी गोरोबाकाकांना ही उत्तरे सापडली, तुकोबारायांना ही उत्तरे सापडली, आर्कीमिडीज, न्यूटन आदी साऱ्यासाऱ्यांनाही उत्तरे सापडली. ज्यांना ज्यांना तुम्ही 'यशस्वी माणसे म्हणताना त्या त्या साऱ्यांना हवी होती ती सारी उत्तरे सापडली.' तुम्हांलाही ती नक्की सापडतील. प्रश्न एव्हढाच आहे की, ज्यामुळे तुम्ही अस्वस्थ होताय त्यासंबंधी तुमच्या मनालाच प्रश्न विचारा- मनच त्याचे अचूक उत्तर देईल. मग या दिवाळीपासूनच 'शतदा प्रेम करण्याचा' निश्चय करा. ही दिवाळी सुखाची जाईलच. परंतु त्यानंतरचा प्रत्येक दिवस तुमच्या आयुष्यात 'दिवाळी'चा जाईल.

असो. ही दीपावली आणि नूतन वर्ष सर्वांना सुखसमृद्धी, भरभराटीचे आनंदाचे आणि आरोग्यमय जावो. आपल्या 'कुंभश्री' वर सुद्धा असेच शतदा प्रेम करा.

***

गडहिंग्लजचा स्वयम कुंभार १०० टक्क्यांचा मानकरी



गडहिंग्लज : येथील वि. दि. शिंदे हाय-स्कूलचा विद्यार्थी स्वयम संदीप कुंभार याने दहावी परिक्षेत शंभर टक्के गुण मिळवून गडहिंग्लजचा झेंडा राज्यात फडकविला.

स्वयमची आई अश्विनी या हसूरवाडी, तर वडील संदीप हे सिरसंगी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षक आहेत. त्याचे पहिली ते सातवी पर्यंतचे शिक्षण छत्रपती शिवाजी विद्यालयात पूर्ण झाले. पाचवी शिष्यवृत्ती परिक्षेत त्याने राज्यात १५ वा येण्याचा मान मिळविला. आठवी ते दहावीपर्यंतचे शिक्षण त्याने वि. दि. शिंदे हायस्कूलमध्ये पूर्ण केले. अभ्यासातील सातत्य व कठोर परिश्रमामुळे त्याने दहावी परिक्षेत हे यश मिळविले. तो रोज आठ तासांहून अधिक कालावधीत अभ्यास करायचा. रोज आठ तास अभ्यास, विषय शिक्षकांचे मार्गदर्शन व शाळेत घेतलेल्या नियमित सरावामुळे हे यश मिळाले असून भविष्यात स्पर्धा परीक्षेद्वारे करिअर करण्याचे स्वप्न असल्याचे स्वयमने सांगितले.

***

'कुंभश्री' संपादकीय मंडळ

संपादक	कार्यकारी संपादक	कायदे विषयक सल्लागार
इंजि. संजय पांडुरंग राजे	**प्रा. विलास जाधव**	**ॲड. बी. के. राजे** (हायकोर्ट मुंबई)
मोबा. : ९८२२८३८१६९		

सल्लागार

सुरेशराव मारुतराव कोते	जी. टी. जाधव	नामदेव श्रीपती कुंभार
मोबा. : ९८२२०३२४२७	**मोबा. : ९०११४६४९४०**	

वधुवर सूचक मंडळ महाराष्ट्र राज्य

अध्यक्ष - आनंदा कुंभार	कार्याध्यक्ष - व्ही. एम. कुंभार	उपाध्यक्ष - रामचंद्र कुंभार
मोबा. : ९५५२५५४४२०		

मुद्रीत शोधन	विद्यार्थी गुणगौरव मंडळ	व्यवस्थापक
सौ. वंदना बाळासाहेब कुंभार	अध्यक्ष - नारायण ना. कुंभार	ज्ञानेश्वर कुंभार

कुंभश्री अधिकृत प्रतिनिधी

गोविंद प्रजापति, मुंबई	मो.: ९९२०६६८८४८	अरविंद राणे कोल्हापूर	मो. : ९८९०३३३६९३
सौ. आर. बी. डेंगळे, बारामती, पुणे	मो.: ९८६०२५८३३४	सुदाम कुंभार बोरीवली मुंबई	मो. : ९८६९७१५६००
सौ. अनिता सुभाष बोर्डे, चिंचवड, पुणे	मो. : ९६२३१५८९३९	सुर्यकांत गोविंद मुचळंबे लातुर	मो. : ९६५७६७९१५३
बाळकृष्ण काळबांडे (सर) दौंड, पुणे	मो. : ९९७५३३९४२५	गुरुनाथ महालिंगप्पा मोहोळकर,	
वैजनाथ पगडे, आळंदी पुणे	मो. : ८६६९११०९३६	निलंगा लातुर	मो. : ८८८८५६१६०८
निलेश पांडुरंग गोरे काष्टी अ. नगर	मो. : ९९६०५९८६३२	बा. की. घटकार डोंगरशेळकी, लातुर	मो. : ९८६०२८१९९३
भगवान श्रीमंदिलकर, पारनेर.	मो. : ९५०३७४७१७८	गंगाधर (आप्पा) जोर्वेकर नाशिक	मो. : ९४२२२५३१६१
गणेश मुरलीधर देवतरसे अ. नगर	मो. : ९८९०२९६६८६	योगेश रोकडे चांदवड-नाशिक	मो. : ९९७०५४८५३४
सुधाकर देवतरसे अ. नगर	मो. : ९७६३८११६७६	तुळशीराम एकनाथ मोरे (सर) नाशिक	मो. : ९४२१५३४८४५
शिवाजी महाशिकारे तरवडी	मो. : ९४०४३८९५१५	शाम जोंधळे निफाड, नाशिक	मो. : ९३७१५२८१५२
बबन मुरलीधर नायकोडे राशीन	मो. : ९४२१३२८७४९	पुरूषोत्तम वाघ मालेगाव, नाशिक	मो. : ९८२३६३३४४३
रामनाथ वाकचौरे गुरुजी, अ. नगर	मो. : ९७६७५५३६८९	ॲड. श्रीधर काळकर नागपूर	मो. : ९८२२५८१४६५
सुरेश नांदुरकर अमरावती	मो. : ९४२३४१३६६२	आर. आर. कुंभार सातारा	मो. : ९४२०४६५१४२
प्रा. दिलीप असुरकर अकोला	मो. : ९८८१५५९०६१	चंद्रकांत कुंभार फलटण, सातारा	मो. : ९४२३३२८७४२
रामकृष्ण सावीकर अकोला	मो. : ९८५०७२०३७८	चंद्रकांत काशिनाथ कुंभार पाचवड, सातारा	मो. : ९९२२४१८८८३
रमेश वनकर अकोट अकोला	मो. : ९७६६८९२४६०	सुभाष कुंभार पाटण, सातारा	मो. : ९८६९१५२६४४
डि. के. सोनवणे औरंगाबाद	मो. : ९४२२२३९११८	बाळासाहेब कुंभार पलुस, सांगली	मो. : ९८९००१६५४८
ना.ना. सौदागर अकोला-बुलढाणा	मो. : ९०११७३९४७२	सदानंद दिनकर कुंभार इस्लामपूर,सांगली	मो. : ९८९००९७७५८
बाळाजी गोरे देऊळगांवराजा, बुलढाणा	मो. : ९६७३८६२३९२	प्रा. महेश कुंभार कापुसखेड वाळवा, सांगली	मो. : ९८५०९१९८५०
गणेश प्रल्हाद सोनुने बुलढाणा	मो. : ९८५०३३१५८१	सौ. रेखा कुंभार ठाणे	मो. : ७२४८९२८९७१
रामदास अंबादास कुंभार केज, बीड	मो. : ९८६०५७२३८३	मनोहर नामदेव जाधव, मुंब्रा, ठाणे	मो. : ९९२३१५७९०१
उत्तमराव काळे सर चाळीसगांव, जळगांव	मो. : ९८५०१९९९१८	श्रीकांत कुंभार ठाणे	मो. : ९८३३५८५०६९
महादेव तुकाराम हरिमकर भुसावळ जळगांव	मो. : ९४२३९३५४४४	डी.डी. चव्हाण देवपुर, धुळे	मो. : ९४२२२१८८७१
के. एन. मोरे यवतमाळ	मो. : ९८५०७२१३३६	शामराव वाघ देवपुर, धुळे	मो. : ९४२०८४९५८०
माधवराव मेहरे आर्वी, यवतमाळ	मो. : ९९२२८५८४०९	सौ. संगिता बबनराव जगदाळे नंदुरबार	मो. : ८६०५८५४५४४
सदानंद वामन कुंभार, उमरगा, उस्मानाबाद	मो. : ९७६३८५२४१५	हृदयेश दगडुभाई चव्हाण शहादा नंदुरबार	मो. : ९४०३८८४४६४
घन:शाम कुंभार इचलकरंजी, कोल्हापुर	मो. : ९४२३८१६१६३	हिरामण बच्छाव, नवसारी (गुजरात)	मो.: ०९०९९४११६०१
विनायक कुंभार जयसिंगपूर, कोल्हापुर	मो. : ०२३२-२२२१३९०	विनोद प्रजापति, झाँसी (उ.प्र.)	मो. : ०९४१५९४३६७७

पंढरीची वाट

– अनसूया कुंभार, डोंबिवली

अशी कशी मी अपेशी ठरले? या प्रश्नाच्या अनगरी विळख्यात मी जखडलेली. समोर लांबलचक सुनसान रस्त्यावरच्या आग ओकणाऱ्या दुपारी. आधाराला घराचा एक अंधारा कोपरा. एका गुडघ्यावर दोन्ही हातांच्या बोटावर मुंडी टेकवून डोक्याचा पार भुगा होईस्तवर बसायचं... असं रोजचंच चाललंय... मध्येच लहानपणाचं एक फुलपाखरू उगीचंच इकडून तिकडे रुंजी घालतंय सभोती....



अशी कशी मी अपेशी ठरले? या प्रश्नाच्या अनगरी विळख्यात मी जखडलेली. समोर लांबलचक सुनसान रस्त्यावरच्या आग ओकणाऱ्या दुपारी. आधाराला घराचा एक अंधारा कोपरा. एका गुडघ्यावर दोन्ही हातांच्या बोटावर मुंडी टेकवून डोक्याचा पार भुगा होईस्तवर बसायचं... असं रोजचंच चाललंय... मध्येच लहानपणाचं एक फुलपाखरू उगीचंच इकडून तिकडे रुंजी घालतंय सभोती....

'जयसिंगा!..' याच लाडक्या नावाने माहेरची सर्वजण मला हाक मारायचीत. सर्व भावंडात लहान मीच, त्यामुळे सर्वांची आवडती आणि

अवखळही. बघता बघता कळीचं फुलात रूपांतर झालं, बालपणाचे रंगीबेरंगी क्षण पाऱ्यासारखे केव्हा निसटून गेले... कळलं सुद्धा नाही. आठवीची परीक्षा संपता संपताच पहिल्यांदाच आलेल्या स्थळावर सर्वांनी शिक्कामोर्तब केलं. लग्नधून घरात घुमू लागली. बी. एस्सी. बी. एड., एकुलते एक आणि गावातल्या हायस्कुलातच शिक्षकाची नोकरी! सगळं कसं ठाकठीक देवानं धाडल्यागत. असा आई-बानं विचार करून मला एका मुहुर्तावर हिरवं पातळ गुंडाळून चक्क साखरपुडाच करून टाकला की! सगळे पाहुणे रावळे जमले तरी माझं हसणं खिदळणं काही कमी होत नव्हतं. वयस्कर बायका मग डोळं मोठ्ठं करून म्हणायच्या, ''जयसिंगा, आता पुरं झालं तुझं खेळणं आन् हुदडणं! लगीन महिन्याभरात हुईल, तुला हाय का त्याचं काय?''

''हं! आमची जयश्री आता नवरी हुनार हाय! ए जये तुझी आत्या काठी घेईल बघ आता आमाला हाकलायला, तवा चाल्ली आमी बरं!'' असं म्हणत मैत्रिणी पांगायच्या. दिवस पाखरासारखे उडाले नि थाटात लग्नाचा बार उडाला काय नव्हच! किंमती साड्या, चकचकीत भांडी, शानदार मंडप, सुगंधी फुले न् हारतुरे, जेवणाच्या पदार्थांचा घमघमाटी वास... पुढल्या आयुष्याच्या सुखस्वप्नांचे भास... सारंच काही विलक्षण... त्यात आमचे गालाचे गुलाब लालभडक झालेले नि पापण्यांच्या तोरणाआडून थेट नजरेला भिडणारे यांचे डोळे... मग काय साऱ्या अंगभर कसल्या झिणझिण्या यायच्या नि काय!

नवलाईचे नऊ दिवस सरले नि मी संसारात चांगलीच रमले. दिवसभर केरवारा, धुणीभांडी, स्वयंपाकपाणी उरकण्यात वेळ जायचा नि सहा वाजले की यांच्या वाटेवर डोळे लागायचे. घरात येता येताच सुवासिक गजरा हातात नि मोहक वाक्यांची बरसात... मी अगदी चिंब चिंब... पण लगेचच ट्यूशनची मुलं आलेली असायची. पुन्हा ते ओसरीवर टांगलेल्या फळ्यासमोर शिकवताना गुंग होऊन जायचे. मी पुन्हा संध्याकाळच्या स्वयंपाक पाण्यात गुंग दंग होऊन जायचे. अधून मधून त्यांच्याभोवती घिरट्या घालत रात्रीच्या उत्सवासाठी पंख फडफडवीत जणू वाट पाहात बसायचे!

सारं सुरळीत... राजाराणीचा मदभरा संसार सुरु असतानाच ट्यूशनला येणाऱ्या सुमनचं आगमन पायात काटा रूतून बसल्यासारखं ठसठसायला लावणारं ठरलं! यांना तो काय गुलाबाचा आणि सुखावह वाटला असेलही पण माझं मन रक्तबंबाळ झालं खरं! पहिले काही दिवस मी दुर्लक्ष केलं पण ही सुमन, सगळी मुले गेल्यावरही यांच्याजवळ या ना त्या शंकांची गाठोडी सोडत बसायची. यांच्या त्या शंका निरसनाच्या पारायणात किती वेळ खल्लास व्हायचा याची दोघांनाही तमा नसे. वर्षभराच्या तिच्या त्या वेळकाढू व गळीपडूपणाचा मला वेगळाच अर्थ समजायला लागला. आतातर गणिताखेरीज अवांतर वाचन, कवी - कवितांवरील, आवडत्या पुस्तकांवरील, विविध गाण्यांवरील यांच्या गप्पा-टप्पा चांगल्याच रंगू लागल्या होत्या. मी काही त्यात पारंगत नहते पण पारंपरिक संसारी स्त्रीची भूमिका इमानेइतबारे चांगली पार पाडत होते.

कसं सांगावं यांना आता...? काही सुचेनासं व्हायचं. मी एकदा सुमनला चिडून म्हटलं, ''अगं, साडेआठ वाजले रात्रीचे, घरची वाट पाहत असतील बरं! तू नीघ आता!'' पण यांनी तिला अजीजीनं फर्मावलं, ''अगं बस गं सुमा! जाशील आता. जयश्री, आपण सगळेच जेवूया बरं!'' यांनी असं म्हणताच मला तिघांची ताटं मांडणं भागच पडलं.

म्हणता म्हणता आमच्या संसाराला ग्रहण लागले नि नीता-नितिनच्या बालजन्मांचे कौतुकही त्याने गिळून टाकले. सुमनवरून रोज रात्री खटके उडू लागले. लहान बच्च्यांसमोर रोजचीच काय ती वादावादी म्हणून आवरते घ्यावे लागे. तुळशीची लग्न लागली नि पाच-सहा दिवस ट्यूशनला न आलेल्या सुमनची लग्नपत्रिका एका भरदुपारी पोष्टमनानं निर्विकारपणं ओसरीवर भिरकावली. कशासाठी तरी पण त्या दिवशी हे मधल्या सुटीत घरी आलेले होते. सहजगता त्यांनी पाकीट फोडलं आणि क्षणात त्यांचा चेहरा पांढरा फटफटीत पडला. पायात चपला सरकवून त्यांनी क्षणात बाहेरचा रस्ता धरला.

एका दृष्टीने बरंच झालं, असं वाटून मनाला खूप हायसं वाटलं. यांच्यासारख्या सुशिक्षिताला जे कळलं नव्हतं ते सुमनच्या आई-वडिलांना कळलं होतं म्हणायचं! कुठेच वाच्यता न करता व वेळ न दवडता त्यांनी योग्य निर्णय घेतला होता. रात्री बऱ्याच उशीराने ते घरी आले, पण मात्र अडखळतच. दारूच्या भपकाऱ्याने शिसारी येवून अंथरुणावर पडल्या पडल्या मी समजुतीच्या स्वरात त्यांना म्हटलं, आपल्याला शोभत नाही हो असं वागणं! आपली नीताच एखाद्या शादीशुद्धा, पोरंवाल्या बापाच्या नादी लागली असती तर आपण काय केलं असतं बरं! तुम्ही सुमनच्या मागे मृगजळासारखे धावायला लागलेत तर उपयोग काय? कोणाचं काही जाणार नाही पण आपला सोन्यासारखा संसार उध्वस्त होईल. बरं का! झालं तेवढं खूप झालं, मी आणि मुलांनी जायचं कुठं?

''असं का?... अ!'' असं म्हणत ते बरळत झोपले. सुमनचा जप अस्पष्टसा सुरूच होता.

दिवसामागून दिवस जात होते आणि माझे उपायही थकत होते. व्यसनाचा वेढा यांच्याभोवती आणखीनच घट्ट होत होता. परोपरीने विनवून पाहिलं, आणाभाका घातल्या, माहेरच्यांनी कानउघाडणी केली, मित्र मंडळींनी उपदेश केला पण पालथ्या घडयावर पाणी! 'तुम्हाला काय करायचंय? मी माझ्या पैशानं पितोय, कुणाला शब्दानं तरी त्रास आहे का माझा? मला... शहाणपणा शिकवण्याचा प्रयत्न करू नये!'' असं म्हणून हे सर्वांना वाटेला लावत असत. ते असे का वागतायत हे फक्त मलाच माहिती. 'एक हुशार शिक्षक अगदी वाया गेला हो!' अशा प्रतिक्रिया ऐकू येवू लागल्या. त्यांचा आत्तापर्यंतचा नम्र, सालस, मेहनती, नेक स्वभाव साऱ्यांना माहीत होता. त्यामुळे काही लोकांना खरंच त्यांच्या या व्यसनाबद्दल खूप वाईट वाटत होते तर काही विघ्नसंतोषींच्या मनात उकळ्या फुटत होत्या.

काही दिवसांनी यांना 'साथ' देणारी मित्रमंडळीही घरी येवून जेवणावळी झोडू लागली. त्यामुळे नाहक खर्चापायी आणि मुलांच्या शिक्षण खर्चाची तोंडमिळवणी करता करता पुरे कंबरडे मोडत होते. साथीदारांच्या त्या वखवखलेल्या नजरा आणि रात्रीचे यांचे बळजबरीचे

शिळपट, किळसवाणे स्पर्श... कित्येक रात्री अशी शृंगाराची थडगी सजत होती. प्रेतवत् झालेल्या मनाने शरीराला ठार बधीरता बहाल केली. किती दिवस... नाही किती युगे चालायचे हे? नीता, नितिनच्या अभ्यासाचे काय? संस्कारांचे काय?... त्यांचे कोडकौतुक तर कधीच हद्दपार झाले होते. रोज आगीत होरपळणाऱ्या मनापुढे प्रश्न आणि प्रश्नच फक्त!

''वैनी, आवं ट्रकात बसली समदी! पुन्यांदा जागा मिळायची न्हाय बरं, चला येताय नव्हं?'' शेजारच्या राधाताई मुलीच्या लग्नाला येण्यासाठी चौकटीतून सादवित होत्या. मनात काय आले कुणास ठावूक. कोपऱ्यातली एक पिशवी घेतली. कोंबली त्यात एक बरी साडी नि गेले ट्रकात बसून लग्नाला!

ट्रकानं वेस ओलांडली नि मोकळ्या वाऱ्यात, मोकळ्या आभाळाखाली, पुष्कळजणींनी मोकळी मनं गप्पागोष्टीत, गाणी गात मोकळी होत होती. साऱ्याजणींच्या चिंता, काळज्यां आज जणू सुट्टीवर गेल्या होत्या.

''हा, जयश्रीवैनी आज कशी कळी खुललीया बगा! अलीकडं लई मानानं पानं खाताया जनु! कुठं कुनी बलावलं त नन्नाचा पाडा! आता ते काय चालायचं न्हाई. नायतर नीताच्या लग्नाला आमीबी येनार न्हाई बरं का!''

राधाताई हसत हसत बोलल्या तेव्हा मीच सावरासावर करीत म्हटलं, 'आवं अडचणी आल्या तर काय करावं माणसानं?' असं म्हणून त्यांना गप्प केलं पण मनानं आता ठरवलं की काही कुढत बिढत घरात मरायचं नाही. दोन्ही मुलांच्या जबाबदाऱ्या पार पाडायचेत. हे तर आता सांगणाऱ्या आणि समजावण्याच्या पलीकडं गेलेले. चारचौघीत मिसळलं तर मन हलकं व्हायचं. दिवाळीचा सिग्नल पडला रे पडला की गावात लगीनघाई घुमायची नि लगीनघरच्या कर्त्या बायका हक्कानं हात धरून धरून मला लग्नाला न्यायच्या. ट्रकातून येता जाता माझा गाता गळा सर्वांचं मनोरंजन करायचा. नवरीबाई लाजून अगदी चूर! तर करवल्यात खसखस पिकायची. कधी लाडू-चिवड्यांच्या पेट्यांवर तर कधी नव्या कोऱ्या कपड्यांच्या गाठुड्यांवर तर कधी रुखवताच्या नाजूक सामानावर नजर ठेवायला सांगून लग्नवाल्या बिंधास्त कामं करत सुटायच्या. दोन-चार दिवस झाले की पुन्हा कुणाचं तरी आवतण असायचंच!

'लग्नाला चला बाई लग्नाला चला, पोरं बांधा खुट्टीला न् कुत्री घ्या काखंला, लग्नाला चला तुम्ही लग्नाला चला!' असा गाण्याचा सूर लावताच आख्खं महिलामंडळ खदखदायला लागायचं.

''वैनी तुमी आमच्या ग्रुपमधी पायजेल बरंका!'' म्हणून पोरींच्यान भांडाभांडी व्हायची. 'आग, गप बसा! तोंड हायत का चिबाडं तुमची, उकलली की लागली पिचपिचायला...' असं म्हणलं की पुन्हा साऱ्याजणी दात काढायच्या.

हे माझं लग्नाच्या किंवा पूजा, बारश्यांच्या निमित्तानं सततचं बाहेर पडताना पाहून नीतानं एके दिवशी मला टोकले. ''अगं आई, आम्हाला सोडून सगळ्याच कार्यक्रमांना जायला हवं का ग! घरात मला तारेवरची कसरत करावी लागते आणि मला सैरभैर वाटते ते वेगळेच! आम्ही वह्या पुस्तकं पुरवून वापरतोय त्याचं काय?... आणि बाबा रस्त्यात चालताना कसे भेलकांडतात, ते पाहून आणि लोकांच्या नजरा पाहून काळजाचं कसं पाणी पाणी होतं ग आमच्या!'' हे सांगता ती हमसून हमसून रडू लागली. नितिन ही डोळे पुशीत बाहेर गेला. कोणत्या शब्दात, कोणत्या आशेवर मी त्यांची समजूत घालणार होते?

''नको ग रडू. माझी छकुली ती. मागच्या जन्मीचे भोग आहेत बरं हे! यातून सुटका नाही!'' मी समजावणीच्या सुरात म्हटले.

''कसले भोग म्हणतेस याला तू? या तर समजून उमजून मागून घेतलेल्या विवंचना आहेत या आई! ही बाबांची नाटकं आयुष्यभर नाचवणारेत आम्हाला बरं! समाजातील प्रतिष्ठा, भविष्यातील उभारी, आमच्या आकांक्षा... पार धुळीत मिळालेय आई! त्यांना असंच जर वागायचं होतं तर आम्हाला जन्म दिला यांनी?''

चुकला घाव ऐरणीच्या माथ्यावर! लहानपणापासून मी मुलांना दहावीत आले खरं, पण आता बरोबरीला आलेल्या मुलांच्या मनातील उद्रेक असा मध्ये मध्ये बाहेर पडायला लागला होता.

''अगं नीता, सांगायची राह्यलीच बघ! उद्या तेलीगल्लीतल्या रामदादांच्या मुलीचा साखरपुडा आहे, अगदी आग्रहानं बोलवलंय त्यांनी. जिवाला थोडा विरंगुळा नि चार पैसे मिळतात तेवढाच हातभार प्रपंचाला होतो!'' माझे वाक्य संपताच नीता नेहमीच्या नाराजीच्या सुरात म्हणाली-

''आई, उद्या पण चाललीस तू? काय ग आई... पण अग.. स्वतःचं दुःख लपवून तू त्या बायकांना कसं काय हसवतेस आणि स्वतःही हसत सुटतेस... काही कळत नाही बुवा?''

''अगं नीता जगात पुष्कळ दुःख सोसणारी खूपजणं असतात. ती पाहिली की वाटतं आपलंच दुःख मोठं मानून किती दिवस कुरवाळत बसायचं? आयुष्यातील उन्हाळे सोसायला आपल्यापुरती आपणच सुखाची छत्री शोधावी माणसानं! नितिन हल्ली सकाळचे पेपर टाकण्याचे काम करतोय... त्यालाही परिस्थितीची जाण आलीय खरं! सुखाचे क्षण माणसाला काही शिकवित नाही पण दुःखाचे क्षण माणसाला आयुष्यात बरेच काही शिकवून जातात बरं!''

मुलांना सारं पटत होतं पण यांच्यापुढं मी आणि परिस्थितीनेही हात टेकले. स्वतः जळत दुसऱ्यांनीही ते जाळत होते. आता तर शरीराचा नुसता सांगाडा राहिला होता. कुणी म्हणायचं, ''बैनी कुठं देवदेवस्कीचं बघा जरा, चांगल्या डाक्टरकडं न्या.'' मी मनात म्हणायची स्वतःच्याच पायावर धोंडा पाडून घेतला तर दैव अन् देवाला दोष देण्यात काय अर्थ? लाखमोलाचं लाभलेलं आयुष्य मातीमोल करायचं की सार्थकी लावायचं हे माणसाच्याच हाती असतं ना? एकूण काय जीवन संपवायचं यांनी ठरवलं होतं. मरणं सोपं आहे पण जगणं कठीण असतं महाराजा! आणि कठीण परिस्थितीतून जगणं सुंदर करता येणं हीच खरी कसोटी अन्य असते!

काळ पुढे सरकत होता... आयुष्याच्या मध्यावरच यांनी मृत्यूला जवळ केले. हं... आता सारं संपलं आहे. महिना झालं या कोपऱ्यानं माझ्या गतायुष्याचा चित्रपट पुन्हा पुन्हा दाखवला. पुढच्या आयुष्याच्या

वाटचालीची सुरवात होत होती. मुलांच्या समाधानासाठी व उभारणीसाठी भूक नसता चार घास पोटात ढकलणं क्रमप्राप्त होतं. कुठं तरी सनया, बेंडबाज्यांचे आवाज येतायत... पण मला आता समारंभाला कुणी बोलवत नाहीये. समाजाच्या दृष्टीनं मी आता विधवा... पांढऱ्या कपाळाची... त्या एका विशिष्ट नजरांची... अवहेलनेची... अपमानांची लिंपणे जीवनाला लगटून जगण्याच्या व्यवस्थेला मला सामोरं जायचंय! पण का म्हणून? माझ्या लहानपणापासून लावलेलं कुंकू... बांगड्या... दागिने का काढायचे? माझ्यासारख्या स्त्रीला 'तसेच' पाहण्याची पारंपरिक हौस असलेल्यांचा मी किती विचार करायचा?

'रूप पाहता लोचनी । सुख झाले वो साजणी' चा अभंग गल्लीच्या त्या... टोकापासून टाळ मृदंगासहीत ऐकायला येतोय केव्हापासून... माझी विचारांची शृंखला तुटली. नीता, नितिन केव्हाच अंगणात पोहोचलेले... सांत्वनांची खरी की खोटी फुले उधळून नातेवाईक पांगलेले! 'आषाढीची दिंडी निघाली वाटतं' मी नीताला म्हटले. दिंडी दाराशी आली तोच सखारामबुवांनी आवाज दिला 'महाराज याचं काय पंढरीला?' आणि त्यांनी बुक्क्याचा टिळा भाळी लावला. माझी चलबिचल झाली. मन मोहरले भक्तीगंगेत न्हाले. मनाची अंधारगुहा उजळणाऱ्या त्या कवडशाला मी घट्ट मुठीत आवळले. टिळा लावून माळकरी बनण्याचा आणि विठ्ठलाच्या चरणी व्यथा सांगून उदय मोकळं करण्याचा विचार मनात पालवू लागला. माझ्या सुखदुःखाची गाऱ्हाणी विठूमाऊली शिवाय मी कोणाला सांगू शकणार होते...?

''आई! ही घे पिशवी! जा वारीला बिंधास्त! घराची काळजी करू नकोस! मी पाहते मावशीसोबत सारं! आणि हो, पिशवीत तुझ्या बांगड्या, मंगळसूत्र सर्व काही आहे... ते घाल बरं का? तू तशी बिलकूल राहू नकोस! अग लोकांचं म्हणशील तर लोकांना त्यांच्या स्वतःच्या दुःखापेक्षा समोरचे कसे सुखी आहेत याचंच दुःख होत असतं!'' नीता केव्हा आत गेली नि माझी पिशवी केव्हा आणली, कळलंच नाही. पण नितिनही तिला काही समजवत होता, हे माझ्या लक्षात आले. तोही काकुळतीच्या स्वरात म्हणाला, ''आई खूप सोसलस आतापर्यंत तू! समाजाचा विचार करशील तर तो काही पोसायला येणार नाही आणि दुःखाच्या छायेत राहून तू विद्रूप राह्यलेली आम्हाला आवडणार नाही तर पूर्वीइतकीच टवटवीत, सुंदर रहा!''

मुलांच्या या समजावणीचा व विचारांचा खूप अभिमान वाटून माझे डोळे वाहायला लागले. ''नाही... नाही आई, पुन्हा रडायचं नाही आणि कुढायचंही नाही! त्या राधा आत्या पण आल्या, दिंडी गेली पुढे... चल, चल खुशाली कळवत रहा. जा...!'' मुलंच माझी आई झालेत असं क्षणभर वाटलं! शिक्षणाचा जीवनात उपयोग होणार नसेल तर काय फायदा? नवविचारांची विठाई मला माझ्या मुलांमध्ये दिसली... आणि माझी पावले दिंडीतून पंढरीची वाट चालू लागली.

***

रजि. नं. ४१३ कार्यक्षेत्र : कोल्हापूर जिल्हा स्थापना : २६/०५/१९४३

कुमावत को. ऑप. क्रेडिट सोसायटी लि. कोल्हापूर

२३०, डी. गंगावेश रोड, कोल्हापूर, फोन नं. ०२३१-२५४१८४६



श्री. विलास सदाशिव कुंभार
(अध्यक्ष)



श्री. शहाजी नानू कुंभार
(उपाध्यक्ष)



श्री. महेश मोहन कुंभार
(व्यवस्थापक)

३१/०३/२०२४ अखेर संस्थेची सांपत्तिक स्थिती

१)	वसुल भाग भांडवल	: १,१६,९६,९१५	२)	राखीव व इतर निधी	: २,६४,४५,७५३
३)	ठेवी	: १९,४३,६१,९३४	४)	कर्जे	: १०,१६,५८,०२०
५)	व्यवहार (उलाढाल)	: ४९,४०,३१,९८७	६)	खेळते भांडवल	: २४,५६,३६,०८५
७)	गुंतवणूक	: १३,४७,२०,३०७	८)	डिव्हीडंड	: १५%
९)	निव्वळ नफा	: ३१,८७,८५४			

ऑडिट वर्ग 'अ'

संचालक मंडळ

श्री. मारुतराव श्रीपतराव कातवरे
श्री. सुभाष सखाराम कुंभार
श्री. दिपराज मनोहर माजगांवकर (कुंभार)
श्री. सतिश सदाशिव कुंभार
श्री. नितीन श्रीकृष्ण ब्रम्हपूरे
श्री. जनार्दन आबाजी कांबळे
श्रीमती मिनाक्षी बाजीराव कुंभार
श्री. मारुती शंकर कुंभार
श्री. सागर आनंदा वडगावकर
सौ. शोभा सुनिल माजगांवकर

अमृताचा ठेवा

– चंद्रकांत नवले

नवरा-बायकोच्या सहजीवनात अनेक सुखदुःखे येतात. हळवे क्षण, निवांत क्षण असतात काही आठवणी नाजूक, काही भावनिक असतात. या सर्व आठवणी स्त्रीच्या उतारवयात जगण्याचा आधार असतात. या आठवणीमध्ये जगण्याचे बळ असते, उर्जा असते. या कथेत सिंधूताईनी आपल्या सहजीवनातील आठवणींचा कप्पा उलगडला आहे. या उतारवयात त्यांच्या आठवणींचा अमृताचा ठेवाच त्यांना जगण्याचे बळ देतात. या कडू, गोड, आठवणीच त्यांचा जगण्याचा आधार आहेत.



सोसायटीच्या क्लब हाऊस मध्ये ज्येष्ठ महिलांची एकच लगबग सुरू होती. सभागृह सजवण्याचे तसेच बैठक व्यवस्थेचे काम सुरू होते. मुख्य मंचावर लांबट आकाराचा टेबल मांडून त्यावर फुलाफुलांची डिझाईन असलेली चादर अंथरली होती. टेबलाच्या मागच्या बाजूस मान्यवरांना बसण्यासाठी खुर्च्या मांडल्या होत्या. टेबलावर छानशी फुलदाणी व बाजूला केक ठेवला होता. समोरच्या बाजूस महिलांना बसण्यासाठी खुर्च्यांची व्यवस्था केली होती. हळू आवाजात भावगीताची सी.डी. लावली होती.

आज श्रीमती सिंधूताई यांचा ऐंशीवा वाढदिवस होता व तो साजरा करण्याचे सोसायटीतील ज्येष्ठ महिलांनी आयोजित केले होते. कार्यक्रमाची वेळ जशी जशी जवळ येत गेली सभागृह ज्येष्ठ महिलांनी, सोसायटीतील इतर महिलांनी तसेच कंपनी मध्ये काम करणाऱ्या कॉर्पोरेट महिलांनी भरून गेले होते.

बरोबर सायंकाळच्या पाचच्या ठोक्याला सिंधूताई सभागृहात उपस्थित झाल्या. सिंधूताई ऐंशी वर्षांच्या झाल्या होत्या तरी आजही प्रसन्न व टवटवीत दिसत होत्या. या वयातही त्यांनी फुला फुलांची गार्डन वरेलीची साडी नेसली होती. छोटासा अंबाडा व त्यावर गजरा माळला होता.

सर्व महिलांनी उभे राहून व टाळ्यांच्या गजरात त्यांचे स्वागत केले. निमंत्रित पाहुणे व सिंधूताई स्थानापन्न झाल्या. सोसायटीच्या अध्यक्षा मिसेस जयंतीबेन यांनी सिंधूताईला शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ देऊन त्यांचा सन्मान केला. नंतर व्यासपीठावरील मान्यवर महिलांचा पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. सिंधूताईंनी वाढदिवसाचा केक कापला तसे उपस्थित सर्व महिलांनी टाळ्यांच्या गजरात 'Happy Birth Day' म्हणत सिंधूताईंना शुभेच्छा दिल्या.

सुमती आजीने सिंधूताईंचा थोडक्यात परिचय करून दिला. सिंधूताई यांनी मराठी भाषेत एम.ए. केले, तसेच मराठी साहित्यात पी.एच.डी. केली. बरेच लेखन ही केले. अनेक विषयांवर व्याख्याने ही दिलीत.

आज त्या आपल्या सोबत 'अमृताचा ठेवा' या विषयावर आपल्या बरोबर हितगुज करणार आहेत. या विषयावर त्यांचे अनुभव व आठवणी सांगणार आहेत. आपण त्यांना काही प्रश्न असल्यास विचारू शकता. मी सिंधूताईंना विनंती करते की त्यांनी त्यांच्या आठवणी आमच्याबरोबर शेअर कराव्यात. श्रीमती सिंधूताई.

सर्वप्रथम मी महिला मंडळाचे तसेच कार्यक्रमास उपस्थित असलेल्या सर्व महिलांचे मनापासून आभार मानते. आपण सर्व महिलांनी माझा 'सहस्त्रचंद्रसोहळा' घडवून आणला तसेच माझे अभिष्टचिंतनही केले. याबद्दल आभारव्यक्त करते. आपण सर्व वयोगटातील महिला येथे मोठ्या संख्येने उपस्थित आहात या बद्दल मनस्वी आनंद होत आहे.

'अमृताचा ठेवा' या विषयाशी संबंधित माझ्या काही आठवणी आपल्या बरोबर शेअर करणार आहे. अमृताचा ठेवा याचा अर्थ अगदी सोपा नि सरळ आहे. नवरा-बायकोच्या सहजीवनात अनेक सुख-दु:खाचे प्रसंग येतात. काही हळवे क्षण असतात, काही निवांतक्षण असतात नाजूक आठवणी असतात, भावनिक क्षण असतात. या सर्व आठवणी स्त्रीच्या उतारवयात जगण्याचा आधार असतात. या आठवणी मध्ये बळ असते. ऊर्जा असते. या आठवणी म्हणजे फार मोठ्या घटना नसतात. त्या साध्या साध्या विषयातल्या व रोजच्या जगण्यातल्या असतात.

माझी अन् माझ्या नवऱ्याची मनं जुळली होती. आम्ही एकमेकांना समजून घेतलं होत. आमच्या त्या आठवणी रम्य व सदाबहार आहेत या सर्व आठवणी मी माझ्या मनाच्या एका कोपऱ्यात सदैव ताज्या ठेवल्या आहेत. ते आमचे क्षण अक्षय क्षण आहेत. हे क्षण व या आठवणी मला आयुष्यभर पुरणार आहेत. तो सुखाचा काळ मी कधीच विसरणार नाही.

स्त्रीचं मन जपणार कोणी नसेल तर त्या स्त्रीच जगणं कठीण होत जात. माझ्या अनेक मैत्रिणी आहेत त्यांना भौतिकसुख भरपूर मिळालं पण त्यांना हळवेक्षण काही जपता आले नाही आज त्या खूप दु:खी आहेत.

आम्ही नवरा बायकोने सुरुवातीलाच काही अलिखित नियम केले होते. माझे कपडे साड्या यांच्या पसंतीने घ्यायच्या यांना गार्डनवरेलीच्या साड्या फार आवडायच्या मग मी ही त्या साड्या आवडीने वापरत होते. त्यांच्या ड्रेसचे कपडे माझ्या आवडीने घ्यायचे आम्ही आमची आवडनिवड जपली होती. आम्हाला कोठे जायचे असल्यास एकत्रच जात होतो. आम्ही ठरवले की एकमेकांच्या नातलगांबद्दल कधीही अपशब्द काढायचा नाही व आम्ही हे पाळले.

माझ्या नवऱ्याला फोटोग्राफीचा छंदच होता. मी त्यांना मजेने 'मिस्टर फोटोग्राफर' म्हणायचे. त्यांनी माझे व आम्हा दोघांचे हजारो फोटो काढलेत. आज माझ्याकडे फोटोचे पाच अलबम आहेत आम्ही श्री गजानन महाराज शेगाव येथे दर्शनाला गेलो होतो. दर्शना नंतर तेथील 'आनंद सागर' बागेत यांनी माझे पन्नास फोटो काढले. पुणे येथील सारसबाग, पु.ल.देशपांडे उद्यान, संभाजी उद्यान, पुष्पप्रदर्शन, पुस्तकप्रदर्शन, पंढरीची वारी, धबधबे असे अनेक ठिकाणचे त्यांनी फोटो काढले. या प्रत्येक फोटो मध्ये आमच्या आठवणी लपल्या आहेत.

विजयाताईंनी मध्येच एक प्रश्न विचारला, ''सिंधूताई आपले कधी भांडण झालेच नाही का?''

असे नाही. प्रत्येकाच्या घरात नवरा बायकोचे वादविवाद होतात भांडणे ही होतात, याला अपवाद आम्ही कसे असणार? आम्ही ही भांडायचो पण 'कचाकचा' कधी भांडलो नाही तसेच 'रात गई बात गई' असे आमचे होते. घरातले प्रश्न आम्ही घरातच सोडवायचो.

आम्ही एक प्रयोग करून पाहिला. आम्ही मतपेटी सारखा पुठ्ठ्याचा एक मध्यम आकाराचा बॉक्स तयार केला होता तो सर्व बाजूने बंद

ठेऊन फक्त एक छोटी फट ठेवली होती. या बॉक्सला आम्ही 'सॅडबॉक्स' असे नाव दिले होते. आमचे काही हेवेदावे असतील काही राग असेल जे काही असेल ते एका चिठ्ठीवर लिहून ती चिठ्ठी सॅडबॉक्स मध्ये टाकायची. तो बॉक्स भरल्यावर गंगेला (नदीत) अर्पण करायचो व म्हणायचो की झाले गेले गंगेला मिळाले.

एकदा काय झाले, माझ्या मनात आले की, यांनी माझ्या बद्दल काय लिहिले असावे? पाहायला काय हरकत आहे ही उत्सुकता होती. सॅडबॉक्स भरल्यावर आम्ही तो बॉक्स मोकळा केला व सर्व चिठ्ठ्या बाहेर काढल्या, पाहतो तर काय? सर्व चिठ्ठ्या कोऱ्या होत्या. आमच्या दोघांच्या डोळ्यात अश्रू दाटले होते. नंतर मात्र आम्ही सॅडबॉक्स परत कधीच ठेवला नाही.

जोशी आजीने मध्येच एक प्रश्न विचारला, ''सिंधूताई तुमच्या संसारात काही भावनिक क्षण आले असतीलच या बद्दल काही आठवणी असल्यास सांगता का?''

''हो जोशी आजी. आमच्या संसारात बरेच भावनिक क्षण आलेत. त्यापैकी तीन क्षण मी सांगते.''

माझ्या दुसऱ्या बाळांतपणांत प्रसुतीनंतर बराच रक्तस्राव झाला व मला खूपच अशक्तपणा आला. डॉक्टर म्हणाले, ''यांना रक्त द्यावे लागेल.'' त्यावेळी म्हणजे पन्नास-साठ वर्षांपूर्वी रक्त मिळण्याची एवढी सोय नव्हती. हे आठवडाभर वणवण फिरले. खूप धावपळ केली व माझ्या रक्तगटाचा रक्तदाता शोधून काढला व मला दोन बाटल्या रक्त देण्यात आले.

एकदा काय झाले मला एकाएकी खूप ताप आला. अंग तापाने फणफणत होते. व याचवेळी यांना ट्रेनिंगला जाण्याची ऑर्डर मिळाली होती. यांनी अर्ज करून ट्रेनिंग जाण्याचे रद्द करून घेतले व माझ्या जवळ थांबले. आठ दिवस मला ताप होता. रोज रात्री ते माझ्या कपाळावर थंड पाण्याच्या पट्ट्या ठेवायचे. रात्री कधीतरी माझा ताप उतरायचा तेव्हा हे झोपायचे. आठ दिवस त्यांनी माझी सेवा केली घरातले सर्व काम केले. मुलांचेही केले. आज या आठवणीने माझे डोळे भरून येतात.

एकदा आम्ही दोघे आमच्या बेडरुममध्ये बसलो होतो. पौर्णिमेचा चंद्र होता. त्यावेळी मी जरा नाराजच होते. त्यावेळी हे म्हणाले, ''का, उदास बसता हसा हसा, तो चंद्र हासतो नभी जसा.'' तरी माझा मुडच नव्हता. यांनी विचारले, ''सिंधू, आज काय झाले तुला? अशी गप्प गप्प का? मनात ठेऊ नकोस, अगदी स्पष्ट सांग.''

''अहो, कधीकधी उगीच माझ्या मनात येते की, आपली दोन्ही मुलं तुमच्यावर गेलीत, त्यांनी तुमचं रूप घेतलं, एकाने तरी माझं रूप घ्यायला हवं होतं.''

त्यावर ते हसले. माझ्या पाठीवरून हात फिरवला व मला म्हणाले, ''सिंधू, आपल्या दोन्ही मुलांनी जरी माझं रूप, तोंडवळा घेतला असला तरी त्यांनी बुद्धी मात्र तुझी घेतली आणि त्यामुळेच ती उच्चशिक्षित झाली व आज ती अमेरिकेला मोठ्या पदावर आहेत व तेथे सेटल झाली आहे.'' त्यांच्या या उत्तराने खुदकण हसू आले व माझा रुसवा कोठच्या कोठे पळून गेला व माझ्या डोळ्यांत आनंदाश्रू आले.

एखादा नवरा असता तर तो म्हणाला असता, ''तुझ्यात काय असे आहे की तुझे रंग, रूप, गुण मुले घेतील व बायकोचा पाणउतारा केला असता.''

माझ्या नवऱ्याने मला कधीच अपमानजनक वागणूक दिली नाही. आज ही मी खिडकीतून पौर्णिमेचा चंद्र पाहताना ही आठवण येते व माझे मलाच हसू येते.

एका तरुण कार्पोरेट महिलेने सिंधूताईस एक प्रश्न विचारला, ''आजी, तुमच्या सहजीवनात कधी काही Tender Movement आले होते का? असेल तर सांगा.''

नवरा बायकोच्या सहजीवनात 'टेंडर मोमेंट' येतच असतात. आमच्याही सहजीवनात टेंडर मोमेंट आले होते. माझं सासर आणि माहेर एकाच गावातलं. यांचं घर एका टोकाला तर माझं घर दुसऱ्या टोकाला. त्यावेळी मोटारी वगैरे फार कमी होत्या. श्रीमंताकडे फटफट्या असायच्या. यांच्याकडे सायकल होती. एकदा मी माहेरी असतांना हे मला न्यायला आले. यांच्या बरोबर मी, आम्ही पायीच निघालो. थोडे अंतर गेल्यावर हे मला म्हणाले, ''मी, सायकल सुरू करतो तू मागच्या कॅरिअरवर बैस.'' त्यांनी सायकल सुरू केली मी उडी मारून कॅरिअरवर बसले तसा माझा झोक गेला व यांचाही झोक गेला. मी एका बाजूला पडले हे दुसऱ्या बाजूला पडले तर सायकल तिसऱ्या बाजूला पडली. त्यावेळी गावात मातीचे साधे रस्ते होते.

आमचे कपडे मातीने माखले होते. मला तर मेल्याहून मेल्यासारखे झाले. आजूबाजूला लोक जमले. यांनी सायकल उभी केली. धूळ झटकली व मला म्हणाले, ''चल, लवकर दांडीवर बैस.'' मी चटकण दांडीवर बसले, मग काय त्यांनी भन्नाट, सायकल दामटली. व गावातून खूप फिरवले. त्यावेळी आमचे पोरवय होते. अल्लडपणा होता. आजही ती आठवण आल्यास हसू येते.

या आठवणीने सभागृहातील महिलांनी हसून-हसून दाद दिली. माझं पहिलं बाळांतपण माहेरी झाले. हे नोकरीच्या गावी होते. आठ-दहा दिवसाला बाळाला पाहावयास येत होते. असेच एकदा दोन दिवसांची सुट्टी काढून आले होते. आल्यानंतर ते बाळाजवळ खाटेवर बसले. त्यांनी बाजे जवळ खाली पाहिले तर, बाजे जवळ समई तेवत होती व बाजूला हळदीची रांगोळी काढली होती. मी चहा घेऊन आल्यावर त्यांनी मला या बाबत विचारले.

मी सांगितले की, ''बाळांत बाईस सव्वा महिना झाल्यावर तिच्या बाजेशेजारी हळदीची रांगोळी काढतात व समई तेवती ठेवतात, याचा अर्थ असा की, सव्वा महिना पूर्ण झाला आता सासरला जाता येते'' त्यावेळी यांना येवढा आनंद झाला की त्यांनी मला अलगद उचलून

घेतले व गोल फिरवले. सगळा चहा त्यांच्या अंगावर सांडला. आजही ती आठवण आल्यास हसू येते.

माझी मावशी मुंबईला होती. मुंबईला येण्याविषयी तिचा नेहमी आग्रह असायचा. मग आम्ही सुट्ट्यांमध्ये मुंबईला जात होतो. तेथे गेल्यावर सायंकाळच्यावेळी गिरगाव चौपाटीवर समुद्रकिनारी फिरायचो. एकमेकांच्या अंगावर पाणी उडवायचो. एकदा आम्ही समुद्राच्या कट्ट्याच्या भिंतीजवळ उभे होतो. आमच्या सारखेच हौसी जोडपे ही आले होते. समुद्राला भरती आली होती. मोठमोठ्या व उंच लाटा येत होत्या. काही लाटा आमच्या डोक्यावरून जात होत्या, मी यांना घट्ट मिठी मारली होती. बराचवेळ आम्ही तो आनंद घेतला. समुद्राचं खारं पाणी आमच्या नाका तोंडात गेले कपडेही चिंब भिजले आजही ते क्षण मला आठवतात. सभागृहात एकच हश्या पिकला.

पुण्याला असताना जुलै-ऑगस्ट महिन्यामध्ये आम्ही दोघे मालशेज घाटावर जात होतो. तेथील ओसंडून वाहणाऱ्या धबधब्याखाली बसून खूप भिजत होतो. तो आनंदही आम्ही घेतला.

असे टेंडर मोमेंट आम्ही उपभोगले ज्या ज्या वयात ज्या गोष्टी करायच्या असतात त्या कराव्यात हा काय म्हणेल, तो काय म्हणेल याचा विचार करायचा नाही तसेच आपला तोल ही जाऊ द्यायचा नाही. तथापि काही क्षण असे असतात की त्यांची वाच्यता करू नये.

जोशी आजीने विनंती केली, ''सिंधूताई धार्मिक कार्याबाबत आपल्या काही आठवणी असल्यास सांगा.''

''हो, आहेत की.'' शेवटी मी याबाबत दोन आठवणी सांगते व थांबते.'' आम्ही धार्मिक कार्य श्रद्धेने करत होतो. एकदा आम्ही श्री गणपतीपुळे गेलो होतो. आम्हाला श्री गणेशाला अभिषेक करायचा होता.

श्री गणपती पुळेला आम्ही सायंकाळी पोहोचलो. लॉजवरील रुमवर बॅगा ठेवल्या फ्रेश झालो. निवांत असे आम्ही श्रीगणेशाचे दर्शन घेतले. नंतर खानावळीत जेवण केले, रुमवर आलो व आराम केला. आठ तासाच्या प्रवासामुळे आम्हाला गाढ झोप लागली. सकाळी सातला जाग आली. स्नान वगैरे आवरून मंदिरात आलो. तेथील एका पुजाऱ्याला सांगितले की, आम्हा उभयतांना श्री गणेशाला अभिषेक करायचा आहे. ते म्हणाले तुम्ही काल नंबर लावला का? आम्ही म्हणालो, ''नाही'' पुजारी म्हणाले, ''मग तुम्हाला आज अभिषेक करता येणार नाही.'' ''आदल्या दिवशी नंबर लावावा लागतो. हे म्हणाले आम्हाला याबाबत माहित नव्हते, कृपया थोडा विचार करा.'' तरी ते नाहीच म्हणाले.

आमची निराशा झाली व आम्ही मंदिराच्या डाव्या बाजूकडे असलेल्या ओट्यावर बसलो. जवळजवळ आर्ध्या तासाने एक पुरोहित आमच्याकडे आले व आम्हाला म्हणाले, ''तुम्हाला अभिषेक करायचा आहे ना?''

''हो, करायचा आहे.''

''चला माझ्याबरोबर'' त्यांनी आम्हाला काऊंटर नेले व तेथील कर्मचाऱ्याला म्हणाले, ''यांची पावती फाड.'' आम्ही पावती फाडली. त्यांनी माझ्या नवऱ्याला सोवळे नेसावयास दिले. सोवळे नेसल्यावर त्यांनी आम्हांला अभिषेकाच्या पहिल्या ग्रुपमध्ये बसवले व आमचा सर्वांत प्रथम श्रीगणेशाला अभिषेक झाला. अभिषेक झाल्यावर आम्ही उभयंता श्री गणेशासमोर उभे राहून म्हणालो-

''श्री गणेशा तुझीच कृपा'' आज तुझ्या कृपेमुळेच आम्हाला अभिषेक करता आला.

एकदा माझ्या मनात आले की, श्री साईबाबांचे दर्शन घ्यावे व यांना तसे सांगितले. यांनी लगेच होकार दिला. दुसऱ्या दिवशी आम्ही सर्व आवरून शिर्डीला जायला निघालो. सकाळी अकरा वाजता तेथे पोहचलो. पहातो तर काय! तोब्बा! गर्दी. ''आता काय करायचं?'' मी यांना विचारलं. हे म्हणाले, ''दर्शनाला चार-पाच तास तरी लागतील'' शेवटी असे ठरले की, कळसदर्शन घ्यायचे व परत जायचे. तसे आम्ही बाहेर जाण्याच्या गेटने आत गेलो. भाविक श्रीसाईबाबांचे दर्शन घेऊन तृप्त होऊन बाहेर येत होते.

आम्ही तेथे उभे राहून कळस दर्शन घेतले व बाहेर पडलो व भोजनगृहाकडे गेलो. भूकही लागली होती. जेवण झाल्यावर परत विचार आला की परत एकदा कळस दर्शन घ्यावे व परत घराकडे जावे. आम्ही बाहेर जाणाऱ्या गेटकडे आलो तर एक ज्येष्ठ नागरिक आमच्या जवळ आले व आम्हाला म्हणाले, ''तुम्हाला साईंचे दर्शन करायचे आहे ना?''

''हो करायचे आहे.'' ते म्हणाले, ''तुमच्याकडे ज्येष्ठ नागरिकचे ओळख पत्र आहे का?'' आम्ही, ''हो, आहे.'' चला माझ्याबरोबर. एका खिडकीजवळ व्हि.आय.पी. ची रांग लागली होती. ते खिडकीजवळ आले व आमचे ओळखपत्र तेथील कर्मचाऱ्यास दिले त्याने लगेच दोन पास करून दिले. आम्ही त्या ज्येष्ठ नागरिकाचे आभार मानले. व्हि.आय.पी. पास मुळे आमचे दर्शन फक्त दहा मिनिटात झाले.

हे म्हणाले, ''पाहिलंस सिंधू, तुझी मनातून इच्छा होती व तुझी श्रद्धाही आहे. श्रद्धाचं महत्व मला पटलं.''

आपल्या हितगुजाच्या शेवटी सिंधूताईने सांगितले की, प्रत्येक स्त्रीने आपल्या सहजीवनातील 'अमृताचा ठेवा' जपून ठेवला पाहिजे.

आज माझ्या फ्लॅटमध्ये मी एकटी आहे. मुले, सुना, नातवंडं अमेरिकेला आहेत. वर्षातून एकदा दिवाळीला येतात. मला तेथे येण्याचा आग्रह करतात. तेथे खूप थंडी असते. मला थंडी सहन होत नाही.

हा 'अमृताचा ठेवा' माझ्याकडे असल्यामुळे मला एक ऊर्जा मिळते. या सर्व आठवणी मला सुखावतात. जगण्याचे बळ देतात. महिला मंडळाने मला येथे बोलावून माझा सन्मान केला व माझ्या आठवणी शांतपणे ऐकून घेतल्या, दाद दिली या बद्दल मी आपल्या सर्वांची ऋणी आहे. 'धन्यवाद!' शेवटी आपटे आजीने आभार व्यक्त केले. सुरुची भोजनाने हितगुज कार्यक्रमाची सांगता झाली.

***

अंकुर

– रत्नाकर वाणी, पुणे

शेतीमध्ये कष्ट फार आणि उत्पन्न कमी अशी परिस्थिती असते. बाजारात मालाला भाव नाही. बी, बियाणे, खते यांचे वाढते भाव बियाणांची कमतरता, अवजारांची कमतरता, कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ, नैसर्गिक आपत्ती, मानवनिर्मित समस्या, वाढती मजुरी, शेतमजुरांची कमी या अशा अनेक कारणांनी शेतकरी गांजलेला असतो. शेतकऱ्याला आर्थिक मदतीची गरज असते. वेळेवर ती न मिळाल्यास शेतीचे नुकसान होते. त्यातून काही शेतकरी बांधव आत्महत्या करतात असे होऊ नये म्हणून त्यांना गरजेच्या वेळी मदत केली गेली पाहिजे. शेतकरी शेतात राबला. त्याने धान्य पिकवले तरच जनतेला अन्न मिळेल. जनता सुखाने जगेल जनतेची भूक भागेल. या कथेत शेतकरी असलेल्या बापूंची पैशाची नड (गरज) कुणी आणि कशी भागवली ते वाचा.



''ए ऽऽ विशू बस्स झाले. उठ की आता. किती वेळ विचार करत बसशील. देशाचे अर्थमंत्री पण अंदाज पत्रक बनविताना एवढा विचार करीत नसतील. उठ बदल कपडे, तोंड धू. मी मस्त पैकी खाण्यासाठी गरमा गरम भजी बनविते सोबत गरमा गरम वाफाळलेला आल्याचा चहा आणते. बाहेर मस्त पावसाळी मंद धुंद आल्हाद दायक वातावरण आहे. पावसाच्या पहिल्या शिडकाव्याने मातीला सुगंध सुटलाय बघ! बापूंचा फोन काय आला अन इतका विचारात पडला. हे घर आपल्या दोघांचे आहे ना! मग आपण दोघे विचार करून प्रश्न सोडवू.'' असे म्हणत श्वेताने विश्वासचा हात धरून उठविले.

विश्वास उठला आणि कॉटवर जाऊन परत विचारात गुंतला. श्वेता त्याच्या शेजारी बसली. विशूने श्वेताचा हात आपल्या हातात घेतला. क्षणभर श्वेता मोहरली. आनंदली. रोमांचित झाली. श्वेताचा हात हळुवार पणे कुरवाळीत विशू बोलता झाला. ''अगं! बापू आर्थिक अडचणीत आहेत. पेरण्या जवळ आल्यात. शेत तयार करायला. बी आणायला पैसा पाहिजे. त्याविना पेरणी होणार नाही. अन्यथा वर्ष कोरडे जाईल. अनेक समस्या निर्माण होतील. आपल्याला काहीतरी करायला पाहिजे. गेले दोन महिने आपणच अडचणीत असल्यामुळे पैसे पाठवू शकलो नाही. अपेक्षा करतायत अपल्या मदतीची. म्हणून फोन केला ग त्यांनी.'' हे ऐकून श्वेता थोडी धीर गंभीर झाली. तिचा रोमान्स मावळला. धीर देत आश्वासित करीत म्हणाली, ''तू म्हणतोस ते सगळं खरंय. मी त्यांच्या अडचणी जाणते. पण असे हतबल होऊन प्रश्न सुटणार आहे का? माझे तुझ्यावर व तुझ्या सर्व कुटुंबियावर प्रेम आहे. त्यात बापूंवर जास्तच. त्यांनीच सर्वांचा विरोध डावलत, आपल्याला समजून घेत आपल्या विवाहास संमती दिली व मला सून म्हणून स्विकारले. हे मी कसे विसरेन बरं. तू उठ बरं. करू आपण काहीतरी. निघेल मार्ग.'' विश्वास व श्वेता एकाच गावातले, एकच शाळा व एकाच कॉलेजातून पदवी संपादन केलेले विद्यार्थी.

विश्वास व श्वेता दोघेही कुटुंबातील एकुलते एक अपत्य. विश्वास शेतकऱ्याचा मुलगा. गावात त्यांना बापू शेतकरी म्हणून ओळखले जाते. बापू मेहनती, प्रामाणिक शेतकरी. त्यांनी उभ्या आयुष्यात कधीही कर्ज घेतले नाही.

भगवानराव सरकारी अधिकारी. श्वेता यांची सुसंस्कृत मुलगी. श्वेता आठवीत असतांना त्यांची बाभूळगावी बदली झाली. गावात बँक. शाळा, कॉलेज, दवाखाना, अशा सर्व आवश्यक प्राथमिक सुविधा उपलब्ध असल्याने त्यांना गाव आवडले व तिथले रहिवासी झाले.

श्वेता व विश्वास दोघे अभ्यासात हुषार होते. नेहमी त्यांचा पहिल्या ३ क्रमांकामध्ये आलटून पालटून नंबर असायचा. वह्या, पुस्तके देणे घेणे वरून मैत्री झाली. दोघेही स्नेहसंमेलन व शाळा, कॉलेजच्या विविध स्पर्धेत हिरीरीने सहभागी होत. त्यांची मैत्री दृढ होत गेली. कळत न कळत मैत्रीचे प्रेमात रूपांतर झाले. कधी कॉलेजच्या व्हरांडयात तर कधी खेळाच्या मैदानावर, झाडाखाली दोघे भेटत. त्यांचे प्रेम प्रकरण फडतरे प्राध्यापिके शिवाय कोणाला माहीत नव्हते. दोघेही पदवी परिक्षेत प्रथम श्रेणीत उत्तीर्ण झाले. कॅम्पस इंटरव्ह्यूत विश्वासची निवड झाली व शहरामध्ये त्याची नियुक्ती झाली. वरचे वर फोनवर भेटी घडत राहिल्या.

वर्ष सहा महिने लोटले तसे श्वेताच्या घरात तिच्या विवाहाचे वारे वाहू लागले. वर संशोधन सुरू झाले. पण तिचे विश्वासवर नितांत प्रेम असल्याने त्याच्याशिवाय अन्य कोणाचा विचारच करू शकत नव्हती. श्वेताला चांगली स्थळे सांगून आली. चांगली स्थळे असून देखील नाकारत गेली. तिने या गोष्टीची विश्वासला देखील कल्पना दिली. तो पंधरा दिवसांनी सुटी घेऊन येणार होता. आपल्या मनातले आई वडिलांना सांगायचे कसे हा मोठा गहन प्रश्न तिच्या समोर होता.

एके दिवशी आईने श्वेताला तिच्या अपेक्षा व अडचणी जाणून घेण्यासाठी मन मोकळे तिच्याशी चर्चा केली तेव्हा श्वेताने आपले प्रेम प्रकरण व विश्वास विषयी सर्व माहिती आईला सांगितली. ऐकून आईच्या पायाखालची वाळू सरकली. भूकंपाचे जोराचे हादरे बसावे असे तिला झाले. ती खूप रागावली. अबोला धरला. तिने हिम्मतीने श्वेताच्या वडिलांकडे ही गोष्ट काढली. वडिलांनी देखील राग राग केला. राग व अबोला यामुळे इनमीन तीन जणांच्या कुटुंबातील वातावरण एकदम बदलले. पण आईचे हृदय ते एक दिवस पाघळले. तिला समजाविण्याचा खूप प्रयत्न केला. पण ती जणू हट्टालाच लागली, विवाह करीन तर विश्वासशीच. विश्वासच्या घरी देखील परिस्थिती काही फारशी वेगळी नव्हती. दोन्ही कुटुंबांकडून या प्रेम विवाहास विरोध होता. विश्वासने पण आपल्या कुटुंबियांना समजाविण्याचा खूप प्रयत्न केला. पण विरोध कमी होत नव्हता.

दरम्यान सुटीवर आलेल्या विश्वासची फडतरे प्राध्यापिकेशी भेट झाली. गप्पांच्या ओघात लग्नाचा विषय निघाला. बोलता बोलता त्याने आपले श्वेतावर व श्वेताचे माझ्यावर प्रेम आहे. आम्ही विवाहबध्द होणार आहोत. पण आमच्या कुटुंबियांचा याला विरोध आहे. त्यांची मने दुखावून विवाह करण्याची आमची इच्छा नाही. आम्ही आमच्या परीने समजाविण्याचा खूप प्रयत्न केला. पण विरोध कायम आहे. दोन्ही कुटुंबियांची भेट घडविण्याचा प्रयत्न पण अयशस्वी झाला. काय व कसा मार्ग काढावा सुचत नाही. दोहोकडचे कौटुंबिक वातावरण बिघडले आहे.

फडतरे मॅडमचे मनात त्याच्या विषयी सहानुभूती जागृत झाली. त्यांनी विश्वास व श्वेता दोघांची एकत्र भेट घेऊन दोघांचे विचार ऐकले. दोघांचे एकमेकांवरील निस्सीम प्रेम व एकमेकांशिवाय राहणार नसल्याचे लक्षात आल्यावर मध्यस्थी करण्याचे ठरविले. फडतरे मॅडम उभय कुटुंबियांच्या परिचयाची. त्यांनी उभय कुटुंबियांना वैयक्तिक भेटून सत्य परिस्थितीची कल्पना दिली.

नंतर विश्वास व श्वेता यांच्यासह उभय कुटुंबियांचे एकत्रित समुपदेशन करीत म्हणाल्या. विश्वास व श्वेता दोघेही माझे विद्यार्थी आहेत. गेली ७/८ वर्षे मी त्यांना ओळखते. सज्ञान आहेत. हुषार आहेत. एकमेकास चांगले ओळखतात. त्यांचे एकमेकांवर प्रेम आहे. त्यांचा विवाह झाल्यास दोघांचा संसार सामंजस्याने सुखी होऊ शकतो. मनाविरूध्द विवाह जमविल्यास सुखी संसाराची निश्चिती नाही. याची मला खात्री वाटते.

हल्लीच्या तरूण पिढीचा जरासा खोलवर जाऊन विचार केल्यास, ही पिढी प्रगल्भ विचाराची, सुशिक्षित, स्वत: निर्णय घेण्यास सक्षम आहेत. दोघे सुशिक्षित व वयाने प्रौढ आहेत. माझी त्यांच्याशी यावर सखोल चर्चा झाली. त्यानंतरच मी आपणाशी संवाद साधत आहे. दोघेही आपला सन्मान करतात. आपल्या इच्छे विरूध्द जाऊन आपला अवमान होइल असे कोणतेही कृत्य करणार नाहीत. सद्यस्थितीला मुला मुलींच्या बदलेल्या मानसिकतेमुळे प्रेम विवाह ही सर्वसामान्य गोष्ट झाली आहे. काही अंशी समाजाने देखील या प्रेम विवाहाच्या प्रथेस कालमाना नुसार काळाची गरज समजून अंगिकारले आहे. अनेक प्रेम विवाह सुखाने संसार करीत असल्याची उदाहरणे आहेत. असा सारासार विचार करता विश्वास व श्वेता यांचा प्रेम विवाह काही अपवाद ठरणार नाही. यामुळे कदाचित आपणास असंतुष्ट नातेवाईक, आप्तेष्टांच्या रोषाला सामोरे जावे लागेल. पण काही काळापुरते. जसजसे दिवस जातील तसा त्यांचा रोष मावळेल, या विवाहास कळत न कळत स्विकारतील व पुन्हा आपल्यात मिसळतील. शिवाय मी विश्वास व श्वेतास चांगली ओळखते. त्यांच्या वर्तणुकीने दोन्ही कुटबांच्या घराण्याच्या इभ्रतीला कदापि तडा जाणार नाही याची उभयता काळजी घेतील असा विश्वास आहे. प्रश्न येतो विवाह प्रसंगी आपआपल्या विधी, परंपरा, चालीरीती व रिवाजाचा. तो आपण सामंजस्याने आपल्या समाजातील प्रथेनुसार देखील पार पाडू शकता. येथे त्यांचा संसार कसा सुखी होऊ शकतो हे पाहणे याला प्राधान्य देणे उचित व महत्वाचे आहे. माझी तुम्हा ज्येष्ठांना एकच विनंती, त्यांच्या भविष्याचा सर्व सारासार विचार करून निर्णय घ्यावा. दोघेही एकुलते एक अपत्य असल्याने विवाहास मान्यता दिली. विश्वास व श्वेताचा विवाह संपन्न झाला. दोघे संसाराला लागली.

अल्प पगारातून देखील विश्वास नित्य नेमाने यथाशक्ती आपल्या कुटुंबियांना अर्थिक मदत करत होता. पण गेली दोन महिने अडचणीत असल्यामुळे मदत करणे शक्य न झाल्याने नियमात खंड पडला. पेरणी करणे आवश्यक होते. न केल्यास संपूर्ण वर्ष कोरडे जाण्याची भीती होती म्हणून नाईलाजास्तव विश्वासला फोन करावा लागला. चार वर्षापूर्वी देखील अशीच परिस्थिती निर्माण झाल्याने बापूने स्वत:ला संपविण्याचा प्रयत्न केला होता. याची विश्वासला तीव्रतेने आठवण आली. त्यावेळी विश्वासची आई व विश्वासने त्यांना खूप समजावले व अनर्थ टळला. त्याची पुनरावृत्ती घडू नये अशी भितीयुक्त शंका विश्वासचे मनात आली. शेतीमध्ये कष्ट फार, उत्पन्न कमी, बाजारात शेतमालाला भाव नाही, खते, बी बियाणे, शेतीची अवजारे यांची कमतरता. कधी कोरडा, तर कधी ओला दुष्काळ, कधी नैसर्गिक आपत्ती, तर मानव निर्मित समस्या. शेतमजुरांची वाणवा. वाढती मजुरी. अशा एक ना अनेक कारणांनी शेतकरी राजा गांजला जातो. शेतकऱ्याचा मुलगा असल्याने अशा अनेकविध समस्यांशी चांगला अवगत होता. श्वेता जे आजपर्यंत केवळ बाहेरून ऐकत होती ते स्वत: अनुभवू लागली. तिला बापूंच्या फोनचे गांभीर्य कळले. पैसा कसा उभा करायचा असा उभयतां पुढे यक्ष प्रश्न उभा ठाकला. मन चिंताग्रस्त झाले.

रात्री श्वेताच्या वडिलांचा फोन आला तिने बापूंच्या अर्थिक अडचणी व समजलेला पूर्वेतिहास सांगितला. मन हेलावले. कोणतीही अप्रिय घटना घडू नये म्हणून यथासंभव मदत करण्याचे ठरविले. ''बाबा तुम्ही काही तरी कराना!'' अशी हक्काची लाडीक विनंती तिने केली.

भगवानरावानी सकाळीच तलाठी ऑफिसमध्ये जाउन तलाठयांची भेट घेतली व सविस्तर माहिती देत मदतीची अपेक्षा केली. तलाठयांनी मदत करण्याचे आश्वासन दिले. आठवडया भरातच बापूंना तलाठी कार्यालयात बोलावून त्यांचे बँक अकाउंट नंबर, आधार कार्ड नंबर व आवश्यक कागदपत्राची पूर्तता करून त्यांच्या अकाउंटला २,५०,०००/ – रूपयांची रक्कम त्वरीत सहाय्य म्हणून जमा करणेत आली.

बापूंची चिंता मिटली. बी, बियाणे व खते वेळेत खरेदी करून पेरणी झाली. पण कोणासही न सांगता किंवा न भेटता हे कसे झाले याचे कोडे पडले. विश्वासकडे चौकशी करता सून, श्वेता व व्याही भगवानराव यांच्या सहयोगाने मदत मिळाल्याचे समजले.

बापूंनी सुनेचे कौतुक करीत आभार मानले. यावर श्वेता अदबिने म्हणाली, ''हे हो काय बापू, आभार कसले मानता. मी या घरची सून आहे. मोडकळीस जाणारे घर सावरणे व कुटुंबातल्या प्रत्येकाची काळजी घेणे हे माझे आद्य कर्तव्य आहे. ते मी केले व करीत राहीन. यासाठी माझ्या बाबांची मदत घेतली एवढेच.''

शेतीची कामे संपवून बापू व विश्वासची आई नर्मदाताई, भगवान रावांचे घरी भेटीसाठी गेले. भगवानराव व श्वेताची आई लता ताईंनी त्यांचे स्वागत केले. चहा पाणी फराळ झाला तसे नर्मदाताई म्हणाल्या. ''तुमचे लई उपकार झाले बघा. न्हाय तर या साली पेरणी झालीच नसती बघा. वरीस फुका वाया गेलं असतं.'' भगवानराव मध्येच त्यांना अडवित म्हणाले, ''अहो, ताई यात उपकार आणि आभार मानण्यासारखे तर काहीच नाही. मी मुलीच्या सांगण्यावरून मजपरीने एक सामाजिक काम केले. मुलीचा संसार सावरणे हे बाप म्हणून माझे कर्तव्य आहे. तिने कल्पना दिली नसती तर मला समजले पण नसते. एकमेकास मदत करणे हा मानवधर्म आहे. तेच मी केले. सीमेवर जवान आणि शेतात शेतकरी यांच्या जोरावरच देशातील सर्व सामान्य जनता सुखाने जगते आहे. शेतकरी सर्वांचा अन्नदाता. तो शेतात राबला व धान्य पिकविले तरच या जनतेस दोन घास मिळतील अन्यथा उपाशीच रहावे लागेल. आम्हाला अभिमान आहे की, तुमच्या सारखे भाविक व कष्टाळू शेतकरी व्याही मिळाले. आमच्या मनात तुमचे बद्दल नितांत आदर व प्रेम आहे. हे आमचे भाग्यच समजतो. असेच आपले प्रेम कायम राहो व नाते दृढ होत जावो ही परमेश्वराजवळ प्रार्थना.

रोवलेली बीजे अंकुरली. मातीच्या कुशीतून डोके बाहेर काढून हिरव्या गार दोन कोवळया पाना समवे हवेच्या मंद झुळुकी सोबत मजेत डोलू लागली. आठवडया भरातच चांगली तरारली. बापूंनी भगवानराव व लता ताईंना हिरवी गार झालेली शेती पाहण्यास बोलाविले. आमंत्रण स्विकारून दोघेही रविवारी सकाळी शेतावर हजर झाले. नजर जाईल तेथपर्यंत निसर्गाने अंथरलेला हिरवीगार गालिचा पाहून मन हरकले. नेत्र

सुखावले.

एवढयात 'फिरत्या चाकावरती देसी मातीला आकार, विठ्ठला तु वेडा कुंभार' गाण्याची धून गात बापूंचा मोबाईल वाजला. बापुंनी 'जय हरी' म्हणत फोन उचलला.

'बापू मी विश्या बोलतोय' तिकडून विश्वास चा आवाज आला.

'हां बोल बाळा, कसे हायती तुमी?' बापूंचा प्रश्न.

'आम्ही चांगले आहोत. तुमची अन् मायची तब्येत कशी आहे?' विश्वासचा प्रश्न.

'आमी बी ठीक हाय. आमी शेतावर हाय. संग तुझे सासू सासरे बी हायती. पेरल्याल समदं बीज अंकुरल हाय. लई झॅक हिरवगार दिसतया.' बापू आनंदाचे भरात मोठयाने ओरडून सांगत होते.

बापू तुम्हाला पण एक खूप आनंदाची बातमी द्यायची आहे. श्वेता कडे फोन देत म्हणाला. 'घे तू सांग'. श्वेता लाजली व म्हणाली 'नाही तू सांग' विश्वास परत म्हणाला, 'नाही तू सांग.' अशाप्रकारे दोघांमध्ये ३/४ वेळा 'तू सांग' चा संवाद बापूंच्या कानावर पडला. 'तु सांग' चे पुढे गाडी जाईना म्हणून बापू लटक्या रागाने म्हणाले, अरे काय चाललंय 'तू सांग' कुणीबी सांगा पण लवकर सांगा की.

शेवटी श्वेताने फोन घेतला अन् लाजत म्हणाली, ''बापू तिकडे शेतात बी रूजलं डोलाया लागलं तसा आमच्या कडे पण आमच्या प्रेमाला प्रेमांकुर फुटलाय.''

''काय म्हटली पोरी मला काय बी उमजना. परत सांग.'' बापू म्हणाले.

श्वेता परत तेच म्हणाली, ''बापू आमच्या प्रेमाला प्रेमांकुर फुटलाय.''

काहीच न कळल्यामुळे ''वाईच थांब जरा'' म्हणत फोन लताताईंकडे देत म्हणाले, ''ताई ही पोरगी काय म्हणतेय बघा जरा. मला काय बी कळत नाहीय. घे पोरी तुझ्या मायशी बोल.''

आईकडे फोन दिल्यावर तिने लाजतच आईला सांगितले. ''आई आमच्या प्रेमाला प्रेमांकुर फुटलाय. लवकरच तुम्ही सगळे आजी आजोबा होणार आहात.'' लता ताईंनी आनंदाच्या भरात फोन बंद न करता सर्वांना ही गोड बातमी दिली. बापू व नर्मदाताईंचे अभिनंदन केले. शेतात बियांना व श्वेताच्या उदरात त्यांच्या प्रेमाला फुटलेला प्रेमांकुर यामुळे सर्वजण सुखावले.

नर्मदाताई सूचना देत म्हणाल्या, ''त्यास्नी म्हणाव आता लई जपाव लागन. कुठ घाई गर्दी करू नग. आराम कराया गावाकड चालली ये. आमी समदे हायती तुझी काळजी घ्याया.'' मोठयाने बोलल्यामुळे नर्मदाताईंचा सल्ला श्वेताला न सांगता ऐकू गेला. तिने ''हो'' म्हणून होकार दिला व फोन बंद केला.

आभाळ झाकाळले. आकाशात काळया ढगांनी गर्दी केली. मेघराजाने कोवळया अंकुरावर प्रेमाची वृष्टी केली. अंकुरे प्रेमात न्हाऊन निघाली. सर्व मंडळी आनंदाने घराकडे परतली.

***

R. S. ENTERPRISES

Reaching out to Serve....

Medical Equipment's & Devices

Following are the Companies & Products we mainly deal with,

- **Drager India Pvt. Ltd. -** ICU Ventilators, Transport Ventilators, Patient Monitors, Gas Lines, Anesthesia Work Stations, Baby Warmers & Many More
- **BBraun Medical India Pvt. Ltd. -** Aesculap (Neuro, Cardiac & General Surgery Instruments), All Transplant Instruments, Dialysis Machines, Syringe & Infusion Pump & Many More
- **Philips India Pvt. Ltd. -** Defibrillators, Monitors, BiPAP Machines & Many More
- **Godrej & Boyce Mfg. Co. Ltd. -** Hospital Furniture, ICU & Ward Beds
- **Johnson & Johnson Pvt. Ltd. -** Sutures, Plasma Sterilizers (ASP), Cautery's, Harmonic Machines, Surgery Equipment's
- **Remi India & Spire Automation -** ALL Lab related equipment's
- **BD/BARD India Pvt. Ltd. -** Onco Ports, Dialysis Permanent Catheters

R. S. ENTERPRISES

Off. No. 10, First Floor, Off. No. 9, Ground Floor, Ruturang Society,
Aranyeshwar Mandir Road, Parvati, Pune - 411009

Mob.: 9371026632 / 9011093989



SANTOSH RAJE



बालरोग तज्ञ

डॉ. विजय एन. कमळे

M.D. (Paed), D.C.H.

मोबा.: ९२२४४७५७१२

Pediatrician & Neonatologist
Head Pediatrics Department
MGM Medical College
Kamothe, Navi Mumbai
Ph.: 022 27423405



स्त्री रोग तज्ञ

डॉ. वृषाली वि. कमळे

M.B.B.S., D.G.O.(Mumbai)

Gynaecologist & Obstetrician
Mob.: 9892458778

महात्माफुले चॅरीटेबल हॉस्पिटल
सानपाडा, नवी मुंबई
फोन (०२२)२७५५००००

क्लाऊड नाईन हॉस्पिटल
सानपाडा, नवी मुंबई
९९७२८९९७२८



चि.डॉ.शार्दुल विजय कमळे
M.B.B.S.

क्लिनिक : सेक्टर नं.२३, प्लॉट नं.२७९, सुयोग आर्केड, जुईनगर, नवी मुंबई. फोन ८९७६००१०६५
क्लिनिक : करंजाडे - दुधे विटेवरी, शॉप नं.७, सेक्टर ३, पनवेल फोन : **8850624313**

डॉ. विकास वि. कुंभार
एम. एस. (पुणे) (नेत्रतज्ञ)



दृष्टी
EYE CARE CENTRE
कॉम्प्युटरव्दारे डोळे तपासणीची सोय उपलब्ध सुविधा



डॉ. सुषमा वि. कुंभार
बी.ए.एम.एस. (पुणे)
फोन : ०२१६६-२२२२३६



थ्री-डी ओसीटी/फंडस् फोटोग्राफी
कृत्रिम भिंगरोपण
लेसर शस्त्रक्रिया
नेत्रपटल तपासणी

बिनटाका मोतीबिंदू शस्त्रक्रिया
तिरणेपणा उपचार
काचबिंदू शस्त्रक्रिया
फेको सर्जरी
कॉन्टक्ट लेन्सेस



फलटणमध्ये प्रथमच आत्याधुनिक अल्ट्रासोनिक फेको मशीनच्या (Optikon Italy) सहाय्याने मोतीबिंदू शस्त्रक्रिया उपलब्ध

पत्ता : प्लॉट नं.४९, बारव बाग, डॉ.सोनवणे हॉस्पिटलमागे, ना.म.जोशी पेट्रोलपंपामागे, फलटण - ४१५५२३, जि.सातारा
वेळ - स.९.३० ते दु. १ व सायं. ५ ते ७ (शनिवार बंद)



With Best Compliments From :

SKS

ISO 9001 : 2008
Certified Company



Prop. : M. R. Kajulkar
Mobile : 9823949416

SAI KRUPA SERVICES

Dealing in Landscape Development & Maintainance, Govt. Regd. Contractor

OFFICE NO. 39, SUKHWANI CHAMBERS, STATION ROAD, PIMPRI, PUNE - 411 018.

SAI NURSERY

A/P PARANDWADI, TAL.MAVAL, DIST. PUNE

MANUFACTURERS OF ALL TYPES OF INDOOR AND OUTDOOR PLANTS.

Tel.: 020 27426964 **Mobile :** 9823311393

Visit us at : http://www.saikrupaservices.in **E-Mail :** sksmrkajulkar@gmail.com

PWD Registration No. : 14741/2005



आव्हाणे येथील सुप्रसिध्द उद्योजक धनलाल शिरसाठ व बंधू यांचा आदर्श परिवार

गीता ब्रिक्स व साईशक्ती ब्रिक्स

अत्याधुनिक मशिनद्वारे व चिमणी विट भट्टीमध्ये उत्पादीत उत्कृष्ट प्रतीच्या विटांचे उत्पादक



सटाणा येथे आदर्श एकत्र कुटुंब पुरस्कार स्विकारताना समाजभूषण सौ.व श्री.धनलालजी शिरसाठ व परिवारातील सदस्य



धनलाल त्र्यंबक शिरसाठ
9823282985



पुंडलिक त्र्यंबक शिरसाठ
9764265321



वासुदेव सदाशिव शिरसाठ
9823282385



पद्माकर धनलाल शिरसाठ
9823181985

कारखाना : मु. पो. आव्हाणे, ता. जि. जळगांव

सेल्स ऑफीस : शामाप्रसाद मुखर्जी उद्यान कॉम्प्लेक्स, संत कंवरराम मार्केट समोर,मु.पो.ता.जि. जळगांव

Our Inspiration



Late Shivajirao P Sonawane



Mangesh S. Sonawane
B.E. (Civil) 1989



Miss Sumedha
B.Arch. 2020

Architects Interior Designer

Sas Inscape Architects

SAS INSCAPE ARCHITECTS

M.S. ASSOCIATES

Proprietor
Mangesh Sonawane

Consulting Civil Engineers & Govt. Regd. Valuer

SUMEDINI ASSOCIATES

P.M.C. & Contractor
Mob.: 77740 32631

4, Himgauri Appts, S.NO. 166, Opp. Ambar Hall, Kothrud 411 029. Phone : 9422001366
E-mail : smangesh009@gmail.com / msassociatespune@gmail.com Website : www.msapune.com



डॉ. लक्ष्मण खंडाळे
९४२३४६८६५१

लक्ष्मी मंगल कार्यालय

सर्व सोयींनी युक्त



नितीन खंडाळे
९८२२०३६५२३





लग्न समारंभ, वाढदिवस, साखरपुडा व विविध मनोरंजन कार्यक्रमासाठी भव्य हॉल, प्रशस्त पार्किंगची सोय.
पावन गणपती समोर, नेवासा, नेवासा फाटा रोड, ता. नेवासा, जि. अहमदनगर फोन : ०२४२७-२४१३०८/२४१५७३

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



सर्व मॉडेल हजर स्टॉक मध्ये उपलब्ध!

श्री मोटर्स यामाहा

प्रोप्रा. अमित बळवंत कुंभार 9527582727
शोरूम -9767596596, मयुर- 7249145004

जय सांगली नाका, इचलकरंजी.

वरद ब्रिक्स

प्रेरणास्थान



कै. उत्तम कोंडीबा कुंभार

प्रोप्रा : विवेक बळवंत कुंभार



मोबा.: 7722090121

प्रेरणास्थान



बळवंत कोंडीबा कुंभार
प्रदेश आध्यक्ष, वीट भट्टी आघाडी
अ.म.कुंभार समाज विकास संस्था
मोबा.: 9423803383/9320203383

* निवास * कारखाना *

मु. बडेखान, पो.काळज, ता.फलटण, जि.सातारा
शाखा : जगदंबा विट कारखाना, मु.पो.कोऱ्हाळे (बीबी), ता.फलटण, जि.सातारा

वरद एंटरप्रायजेस

फॅब्रिकेशन, बॉयलर इन्स्टॉलेशन व कमिशनींग






मिलींद शेटकर 9833805444
बी.३६/३, एम.आय.डी.सी., आनंद नगर, अंबरनाथ ४२१ ५०६
Email : milind.shetkar@gmail.com

प्रेरणास्थान



कै. विठाबाई दत्तात्रय भालेराव

।। संत गोरोबा काका प्रसन्न ।।



श्री. संतोष दत्तात्रय भालेराव
चांदवड तालुकाध्यक्ष अ.म.कु.वि.संस्था
संचालक जय योगेश्वर नागरी सह.
पतसंस्था मर्या. चांदवड, नाशिक
मो.: ९४२३१८०९३२



श्री. अनिल दत्तात्रय भालेराव
मो. : ९४२२२६९०१४



सार्थक भालेराव



अक्षय भालेराव



गणेश भालेराव
Civil Engg.



श्री.सचिन भालेराव



।। विठाई दत्त विट सप्लायर्स ।।

विट, वाळू, खडी, डबर, मुरुम व बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स

।। विठाईदत्त अर्थमुवर्स ।।



आमचेकडे शेतजमीन लेव्हल, पाईपलाईन, रोड साईट पट्टी,
इत्यादी कामे योग्य दरात व उत्कृष्ट दर्जाने केली जातील.



पत्ता - विठाई दत्त निवास, शनिमंदिराजवळ, वरचे गांव, मु. पो. ता. चांदवड, जि. नाशिक ४२३ १०१.

High-class Living @ an Envying Location!!!



Niranjan Sector 27



Gitanjali Sector 24



Varad Sector 26

ULTRA PREMIUM PROJECTS IN NIGDI PRADHIKARAN



Mr.Jeevan Vitthalrao Somwanshi

PRACHI LANDMARKS

ENGINEERS & DEVELOPERS

Plot No.02, Sector No.27, Near Dhanvantri Hospital, Pradhikaran, Nigadi, Pune 411044

FOR BOOKING CONTACT - 9822477246

आमचे प्रेरणास्थान *आशिर्वाद*



कै.माधवराव रुंजाझी सोनवणे



गं.भा.विमलाबाई माधवराव सोनवणे



S.M. Sonawane & Associates

Income Tax & GST Consultant

Prop.: Sanjay Madhavrao Sonavane
M.Com. D.T.L.



सरोज संजय सोनवणे
B.Com



सौ.कोमल सरोज सोनवणे
M.Com



S.M. Financial & Accounting Services

Project-Fianance Consultant & Account Writing

Prop. : Alka Sanjay Sonawane

Off.: Shop No. F-7 & F-9, Jajoo Plaza, Opp. Bank of Baroda
Trimurti-Amabad Link Road, Nashik -08.
Ph.: 0253-2375593 email : smstaxcredit@gmail.com
Mob.: 9370318118 / 9890996670

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



डॉ. प्रमोद आर. भोगावकर
M.D. (Mumbai)
Gynaecologist, Obstetrician,
Lapersocopist & Sonologist
Mob.: 9970134557, 9326615556



सौ. उमा भोगावकर
MAN



चि. डॉ. देवव्रत भोगावकर
MBBS M.D.
M.S.(General Surgery)



डॉ.गौरी देवव्रत भोगावकर
MBBS M.D.
Consulting Anaesthesiologist

अक्षय नर्सिंग होम

Hospital Registration No. : K.B.M.C./H.R./01/8/2007

अनुसया अपार्टमेंट प्लॉट नं ६, गांधी चौक, कुळगांव बदलापुर .पुर्व ४२१५०३



कु.डॉ. मैथिली भोगावकर
B.D.S.
Mob.: 8007073062

अक्षय डेंटल क्लीनिक

अमृत कलश, गांधीचौक, कुळगांव बदलापुर (पुर्व), जि.ठाणे.
अमित कॉम्पलेक्स, यादवनगर, शिरगांव, बदलापूर (पूर्व), जि.ठाणे.

AEROMEN
THE NEXT LEVEL

FOLLOW US ON



AEROMEN CLOTHING LLP

Sales Off. : 301, 3rd Floor, High-Tech Industrial, Centre Caves Road,
Jogeshwari (E), Mumbai-400060 | E-mail : aeromenclth@gmail.com
For Trade & Distribution Enquiry Contact : Mohan Prajapati (M) 9321477780

AEDON culture

FOLLOW US ON



MAX CLOTHING

301, 3rd Floor, High-Tech Industrial, Centre Caves Road, Jogeshwari (East),
Mumbai-400060 | E-mail : aedonshirt@rediffmail.com
For Trade & Distribution Enquiry Contact : Meet Prajapati (M) 7678058166

M.K.Enterprises
Manufacturers of Premium Shirts

C,19-2nd Floor Beliram Ind Est., Opp. Police Chouwki, S.V.Road, Dahisar (E) Mumbai-400068. Tel. No:-022-28965144
For Trade Enquiry Contact Mohan Prajapat : 9321477780 Email : aeromenshirts@gmail.com / mk.enter@rediffmail.com





विघ्नेश कला निवास

आमच्या येथे श्री गणेश व दुर्गा देवीच्या घरगुती तसेच
सार्वजनिक मंडळाच्या विविध सुबक व आकर्षक
अशा प्लास्टर ऑफ पॅरिस मुर्ती मिळतील

प्रो. एच. एन. कुंभार

अमोल कुंभार (मो. ९८३३१००७०९)
नंदकुमार कुंभार (मो. ९८६९७६३१०२)

पत्ता : मु. शहाबाज कुंभार आळी, बेलापुर, सेक्टर १९, बेलापुर स्टेशनजवळ, नवी मुंबई - ४००६१४

Our Commitment Is To Bring You Cosmetics
That Blend Luxury With Efficacy,
Ensuring That Every Time You Get Ready
To Use One Of Our Products,
It Feels A Lot Like An Extension Of
Your Very Own Style And Grace.



ISSH
Embrace your Elegance



CO-FOUNDER:- VIGHNESH NANDKUMAR KUMBHAR
Son Of:- NANDKUMAR MOTIRAM KUMBHAR

www.isshindia.com isshindia

सावलीतलं रोप

– अंजली राठोड श्रीवास्तव, जि. सोलापूर

आजकाल आई-बाबा दोघेही नोकरी करत असतात. काम आणि पैसा मिळवणे यात ते इतके गुरफटतात की मुलांकडे त्यांच फारच कमी लक्ष असतं. लहान मुलांच्या भावनांचा ते विचार करत नाहीत. त्यांच्याशी मनमोकळेपणाने बोलत नाहीत. मुलांना महागड्या वस्तू भेट दिल्या की त्यांना वाटतं आपण जगातले खूप महान आई-बाबा आहोत. मुलांशी संवाद साधणे, हितगुज करणे, बोलणे गरजेचे असते. त्यांच्या मनातील भावनांना, मनातील विचारांना खुलं करण्याचं 'संवाद' हे माध्यम आहे. मुलांबरोबर बोलणं झालंच नाही तर त्यांच्या मनातील भावना तशाच दबून राहतात. मुलांना कुटुंबाची खरी गरज असते. त्यांना भावनिक, मानसिक आधाराची गरज असते, जशी लहान रोपाला सावलीची गरज असते. तसंच घरातल्या मुलांना आई-बाबांच्या प्रेमाच्या सावलीची गरज असते.



पालवीला जाऊन आज पूर्ण दोन महिने झाले होते. घरात भयाण शांतता नांदत होती. बंद खोलीतले उसासे अन् श्वास तेवढे उरले होते. भिंतीला टेकून प्रिया शून्यात कुठंतरी हरवली होती.

पालवीच्या आठवणी तिला स्वस्थ झोपू देत नव्हत्या म्हणण्यापेक्षा जगूच देत नव्हत्या. जगायचं म्हणून ती जगत होती. न तिचं खाण्यात लक्ष न घराकडं न प्रकाश कडं.

अशी कशी पालवी आम्हाला सोडून जाऊ शकते? हा प्रश्न काळजाच्या ठोक्या गणिक तिच्या मनात येत होता. आताही ती त्याच प्रश्नात गुंतून राहिली होती डोळ्यातून वाहणाऱ्या धारांचा वेग अजूनही थांबलेला नव्हता.

''प्रिया जेवून घे'' – प्रकाश म्हणाला.

प्रकाश आता जेवणा पेक्षा मला महत्त्वाचं हे वाटतं की पालवीनं हे असं पाऊल उचलण्याआधी काय विचार केला असेल? तिच्या भावनांना तिनं का दाबून ठेवलं?

का मोकळी झाली नाही ती? एरव्ही किती सैल मनानं वागायची घरात. एक आई म्हणून थोडीशी ही शंका कशी आली नाही मला?

प्रकाश एक विचारू खरं खरं सांगशील? आपणच तिचं जाण्याचं कारण तर नाही आहोत ना?

ती त्या अमेय बरोबर पळून जाऊ शकते. छे ऽऽ पटतच नाही मनाला.

ती पुन्हा रडू लागली. खूप रडली. थोड्यावेळासाठी का होईना ती मोकळी झाली.

दिवसा मागून दिवसाचा आणि भयानक अशा जीवघेण्या रात्रीचा सामना प्रिया तर करतच होती. नाही म्हणायला प्रकाश तेवढा आपल्याच धुंदीत जगत होता.

ती त्याची नेहमीची सवय आज तिला नकोशी वाटत होती.

ऑफिस सुटल्यानंतर तिनं कारचा दरवाजा उघडला. आत बसली. एकवार तिनं आरशात पाहिलं डोळ्याखालील काळी वर्तुळ आणखीन जोमानं वाढत होती.

पण आपण कुठं कमी पडलो तिला कळत नव्हतं. विचाराची ब्रह्मानंदी टाळी लागली होती.

तेवढ्यात घाटे धावतच आला. ''प्रिया मॅम, आज घरी याल का माझ्या? मी तुमच्या ऑफिसचा शिपाई जरी असलो तरी मी अमेयचा बाप आहे आणि पालवीचा सासरा. मला समजून घ्या मला माफ करा. या दोघा पोरांनी अशी पावलं उचलायला नको होती. मी तुमच्या बरोबरीचा कुठंच नाही, पण आता जे झालं ते स्वीकारणं गरजेचं आहे. का झालं? याची उत्तर शोधून सापडतील की नाही माहीत नाही, पण मॅडम पालवीला आशीर्वाद द्यायला घरी या.

आज दोन महिने झाले तुम्ही मायलेकी भेटला नाहीत. ''हात जोडत घाटे प्रियाला घरी यायची विनंती करत होता.''

रस्त्यावर भरधाव वेगात गाडी तर पळतच होती, पण प्रियाचे विचार ही ताशी हजारोंच्या स्पीड नं धावत होते. आपण घाटेच्या घरी जायला हवे होते का? पालवीला भेटता आले असते. का अशी वागलीस? म्हणून विचारता आले असते. पण घाटे सारख्या शिपायाच्या घरी आपण जायचं. हे तिला पटतच नव्हतं.

मनात असंख्य वादळी थैमानानं प्रवेश केला होता. मेंदूचा पार भुगा, चुराडा झाला होता. पै पाहुणे, मित्रमंडळी एकेक करून भेटून सांत्वन करून निघून गेली, पण हे फारसं कुणाला पटलेलं नव्हतं.

कार पार्किंग मध्ये लावून फाईल्स, पर्स, गॉगल घेत ती गेटकडे वळाली. 'पालवी' या आलिशान बंगल्याकडं तिनं एक वार नजर टाकली डोळ्यातून टचकन आलेली आसवं तिनं सावरली.

सगळ्या फाइल्स तिनं टेबलवर भिरकावून दिल्या. जणू तिला या साऱ्या गोष्टीचा आता उब आला होता. या साऱ्या गोष्टी आज तिला नकोशा वाटत होत्या. आपण कुठं चुकलो ही अपराधी भावना तिला सतत बोचत होती.

काळ्याकुट्ट अंधाऱ्या रात्रीत एक काजवा चमकवा तसं तिच्या मनात अचानक आलं की आज आपण पालवीची मैत्रीण आभाला घरी बोलावून विचारूया का? की नेमकं हे पळून जाण्याचं पाऊल तिनं का उचललं? काहीतरी धागेदोरे हाती नक्कीच लागतील म्हणून तिनं आभाला घरी बोलवायचं ठरवलं.

रात्र आपल्याच धुंदीत पुढं पुढं सरकत होती. घड्याळाची टिकटिक तेवढी कानावर पडत होती. खरंतर आपल्या अवतीभवती जेव्हा माणसं असतात तेव्हा आपल्याला त्यांची किंमत कळत नसते जेव्हा ती नसतात तेव्हा मात्र घर खायला उठतं. असंच काहीसं प्रियाच्या बाबतीत झालं होतं. पालवी घरातून निघून गेल्यापासून तिच्यातला अस्वस्थेपणा खूपच वाढला होता. आज तिनं आभाला घरी बोलावलं होतं. आभा आली की तिला सारं कळणार होतं की पालवीनं हे पाऊल का उचललं ते.

भराभर सारं आवरुन ती आभाची वाट पाहत बसली. गेटचा आवाज झाला तशी ती ताडकन उठली. खिडकीतून डोकावत तिनं पाहिलं 'आभा आलीस का? म्हणत तिनं दार उघडलं. आभा बैस! मी पाणी आणते काहीतरी आपण आधी खाऊन घेऊ मग गप्पा मारू.'

'काकू आपण बागेतल्या झोक्यावर बसून गप्पा मारूयात का? माझे ते झोक्याचं आकर्षण आजही टिकून आहे.'

'हो चालेल की! म्हणत प्रिया पुढे म्हणाली इथं सगळं इतकं छान ऐश्वर्य, संपन्नता असताना ती त्या कर्मदरिद्री घाटेंच्या घरात गेली. आभा सांगशील का मला ती अशी का वागली? पालवीच्या काळजात चाललेली उलथापालथ, ती स्थित्यंतरे मी परतावून लावली असती आभा; पण मला ती कधी जाणवलीच नाही गं!'

''एक्झॅक्टली काकू मलाही हेच म्हणायचंय तुम्हाला तिच्यातला बदल जाणवायला पाहिजे होता. पण काकू एक सांगू तुम्हाला तो जाणवला नाही. कारण... कारण तुमच्यातला संवाद हरवला होता. तुमच्यातली जवळीक दुरावली होती. खरं तर संवादानं माणूस आणि नाती जोडली जातात घट्ट बिलगली जातात. पण तुमच्यात संवादच होत नव्हता. कारण कधीतरी आम्ही बुक कॅफेमध्ये भेटायचो तेव्हा ती पुस्तक वाचताना पानं चाळताना माझ्याशी बोलायची की मम्मी पप्पा दोघेही कामात इतकी व्यस्त असतात की मला कधीतरी काहीतरी बोलायचं असलं तरी मम्मी म्हणते की,पालवी बेटा आपण उद्या नक्की या विषयावर बोलू. आज खूप काम पडलं आहे. मनावर खूप ताण आहे.

काकू, तुम्ही तुमचा ताण तिला सांगितला पण तिचा ताण दोन शब्दांच्या त्या संवादानं निवला असता. पण काकू आता तिही वेळ निघून गेली आहे. संवाद एक माध्यम असतं काकू, एक मुक्त असं आभाळ असतं भावनांना आणि विचारांना खुलं करण्याचं पण ते वेळेत नाही झालं तर मग त्या भावना तशाच दाबून ठेवल्या जातात.

आणि काकू अजून एक गोष्ट स्वच्छ आणि स्पष्ट सांगते की घाटे काका तुमच्या ऑफिसमधले शिपाई जरी असले तरी अमेय घाटेने स्पर्धा परीक्षा दिली आहे. आणि त्याचा आता रिझल्ट येणे बाकी आहे. काकू मी खूप बोलते आहे ना! माझ्या बोलण्याचा त्रास तर तुम्हाला होत नाही ना?''

''नाही गं राणी! आणि बोल तू तुझ्या तोंडून जणू पालवी बोलते आहे असे वाटते आहे. पालवीला आम्ही समजून घ्यायला हवं होतं प्रकाश आणि मी आम्ही दोघंही काम आणि पैशाला इतकं महत्त्व देत गेलो की पालवीच्या कोवळ्या मनाचा विचारही आम्ही नाही केला. काम आणि पैशाचं रिंगण घालून तो परीघ आम्ही विस्तारत गेलो.''

त्या परीघा बाहेर दूरवर एक बिंदू उभा आहे एकटाच. प्रचंड उलथापालथ काळजात साठवून ठेवलेला. हे आमच्या लक्षातच नाही आलं गं कधी!

तुझं म्हणणं अगदीच चुकीचं नाही आभा. संवाद हा दोघांच्या मधला साधणारा एक दुवा आहे. बोलल्या शिवाय मनात काय चाललंय ते कसं कळणार?

हितगुज, संवाद, बोलणं या गोष्टी माझ्याच नाही तर अनेक कुटुंबात आज होत नाहीत ही शोकांतिका आहे. आणि याच कारणामुळं घरातली पाखरं आपल्यासमोरुन उडून दूर जातात आणि मग मात्र त्या धायमोकलून पश्चातापाचं रडण्याला ही मग फारसा अर्थ उरत नाही.

आभा तुला एक सांगू का? खरं तर तू काय किंवा पालवी काय तुम्ही दोघीही खूप छोट्या आहात माझ्यासमोर. एका पिढीचं अंतर आहे आपल्यात; पण दोन पिढ्यांमधलं अंतर कापायचं असेल नं तर खरंच संवाद आणि भावभावनाचं दमन व्हायला हवं आणि नेमकं हेच या वास्तूत झालं नाही.

एक मला आठवतंय की ती खूपदा घाटे बरोबर भाजीला जायची. त्यांच्या घरी जायची पण ती एके दिवशी त्यांचीच होईल हे स्वप्नातही मी पहिलं नव्हतं. आभा पालवीला जाऊन आज दोन महिने उलटून गेले जीव कासावीस होतोय माझा.

परवा घाटे भेटले ऑफिसमध्ये म्हणाले या घरी पालवीला भेटायला पण मला नको वाटतं त्यांच्या घरी जाणं; पण पालवीला पण भेटू वाटतंय, तू भेटलीस का तिला एवढ्यात?''

प्रियाचं बोलणं आभा मन लावून ऐकत होती.

म्हणाली, ''काकू मी म्हणाले ना की आम्ही सगळीच मित्र मंडळी बुक कॅफेमध्ये रोज भेटतोय म्हणून!''

आभा पुढं काही बोलणार तेवढ्यात झोका थांबवत प्रिया म्हणाली ''चल! आत जाऊया का, कैरीचं खास पन्हं केलं आहे तुझ्यासाठी.''

''अरे वा! झकास!! माझं आवडतं पेय''- आभा

''आभा घे हवं तेवढं!'' - प्रिया

''हो काकू! हे काय विचारणं झालं का?'' - आभा

सुर्रर्र करत एक छानसा घुटका मारत ती म्हणाली, ''काकू तुम्हाला भेटायचं का पालवीला? तर इथंच घरी बोलवून घ्या की. मी ही येईल आणि काकू भेटायचं म्हणजे नुसती मेजवानी नाही तर जोडीला बोलणं व्हायला हवं. कामाचा ताण थोडा कमी करून तुम्हीही दोघेजण जावा की कुठंतरी बाहेर. काका पण जास्त बोलत नाहीत आणि तुम्ही दोघं काय बोलता घरात मला जाणून घ्यायला नक्की आवडेल! आणि काकू गंमत पण वाटते की तुम्ही कसं काय बुवा न बोलता राहू शकता?''

तिचं वाक्य तोडत प्रिया म्हणाली, ''अगं बाई! प्रकाश तर माझ्या पेक्षा एकदम ढम्म. माझा चार्जर कुठंय? माझं पासबुक पाहिलं का? या व्यतिरिक्त तो घरात काहीच बोलत नाही. संवादच नाही. कामाचा ही ताण आहेच म्हणा. मला ही इतकी ती सवय झाली की मी ही आता खूप कमी बोलते.''

''काकू अजून थोडं बोलू मी! घरातल्या चार भिंतीत संवाद नसेल, संवादाचा ओलावा नसेल तर मनावर काळजावर नकळतपणे चरे पडू लागतात तसेच नात्याच्या भिंती हळूहळू ढासळू लागतात.

खरंतर संवादाच्या माध्यमातून मनातील भावनांना मोकळं व्हायला वाट मिळते. विचारांना प्रेरणा मिळते. हे चूक, हे बरोबर हे चर्चेतून ठरतं आणि आत्मविश्वास ही प्रचंड दुणावतो आणि म्हणून ज्या घरात नाते संवादावरती टिकून आहेत त्यांच्यात ओढ असते त्यांचीच व्यक्तीमत्व अगदी दर्जेदार उठवदार बनलेली दिसतात. यात शंका ती कसली?

पालवी घाटेच्या घरात गेली म्हणजे एका शिपायाच्या घरात गेली तुम्ही वरवर एवढंच पाहत आहात काकू. अहो त्या घरात बघा किती भरभरून बोललं जातं ते. सगळे सणवार प्रचंड उत्साहानं ते साजरे करतात. आजही ते संध्याकाळी सगळी मिळून एकत्र जेवतात. एवढी श्रीमंती तर त्यांच्या कुटुंबात आहेच. यापेक्षा श्रीमंतीची दुसरी व्याख्या आणखीन काय असू शकेल?

पुन्हा भेटायचं आश्वासन देत आभा निघून गेली. मोकळ्या हलणाऱ्या झोक्याकडं पाहत प्रिया घरात आली. आभाशी बोलून ती आज मोकळी तर झाली होती पण आपण किती चुकलो याची सल तिच्या मनात राहून - राहून येत होती.''

ऑफिसमध्ये प्रियाची नजर घाटे बसतात त्या जागेकडं वारंवार जात होती कारण आज घाटे त्या जागेवर दिसत नव्हते. कुठं गेले असतील बरं! अजून कसे आले नाहीत घाटे? घरी काय झाले का त्यांच्या? पालवी बरी असेल ना! अशा कितीतरी प्रश्नांचं काहूर तिच्या मनात माजलं होतं. तिची अस्वस्थता प्रचंड वाढली होती. घसा कोरडा पडला पाणी पिण्यासाठी तिनं बाटली तोंडाला लावली पुन्हा ती बाटली तिनं बंद करून ठेवली आणि टेबल बेल वाजवली.

''एस मॅम म्हणत घाटे पळतच प्रियाच्या केबिनमध्ये पोहोचले.''

''तिनं घाटेला विचारलं कुठं होता इतक्या वेळ?''

''मॅम काही हवंय का?'' - घाटे

''पाणी हवंय''- प्रिया

थंड पाण्याचा ग्लास भरत त्यानं ग्लास प्रिया पुढं केला.

पाणी पिऊन तिनं ग्लास खाली ठेवला. तिरक्या नजरेनं ती घाटे कडं पाहत होती. घाटे तिथंच उभे होते त्यांना काहीतरी बोलायचे आहे हे तिच्या लक्षात आले, पण सुरुवात कोणी करायची? अशी स्थिती उद्भवली होती. तिथली ती शांतता मात्र कमालीची अस्वस्थ करून टाकत होती.

तेवढ्यात फरीन मागून येऊन घाटेला म्हणाली, ''घाटे अभिनंदन हो! चला पेढे द्या!''

प्रियाच्या मनात पुन्हा चलबिचल सुरू झाली. ही फरीन घाटेला कशाचे पेढे मागते? कशासाठी अभिनंदन करते आहे?

आपणच होऊन विचारायचं का? असे विचार तिच्या मनात येत असताना तिची ज्युनिअर असिस्टंट फरीन पुन्हा पुढं म्हणालीच ''मॅम खरंच तुमचंही अभिनंदन बरं!''

''तुमचा जावई - जीभ चावत तिनं तो शब्द फिरवला. म्हणाली म्हणजे घाटेंचा मुलगा अमेय स्पर्धा परीक्षेत अव्वल नंबरनं पास झालाय. मगापासून घाटेवर अभिनंदनाचा वर्षाव होतोय तुम्हाला माहीत नव्हतं का मॅम?'' म्हणत तिनं एक कटाक्ष प्रियाकडं टाकला तेवढ्यात घाटे म्हणाले; मी तेच तर सांगायला आलो होतो; पण कसं सांगू? कळत नव्हतं म्हणून मी शांत उभा होतो.

घाटे पुन्हा बोलले; ''प्रिया मॅम हे घ्या पेढे माझा अमेय पास झालाय माझ्या सुनेचा पायगुण खरंच भारी आहे हो!'' म्हणत त्यांनी पेढ्याचा बॉक्स टेबलवर ठेवला व ते चालू लागले.

घाटेना थांबवत प्रिया म्हणाली ''घाटे अभिनंदन तुमचे आणि अमेयचे ही आणि घाटे पायगुण वगैरे काही नसतं तुमच्या मुलांनं किती कष्ट घेतलेत ते पहा. कारण मेहनतीचं हे फळ आहे. मनापासून तुम्हा परिवाराचं पुन्हा पुन्हा अभिनंदन.''

कधी एकदाची ही अमेयची बातमी प्रकाशला सांगते असं तिला झालं होतं पालवीनं अशी चूक केली हे जरी कोणाला पटत नसलं तरी आज अमेयनं स्पर्धा परीक्षेत यश मिळवलं हे काय कमी आहे? इतक्या दिवसाचा खराब झालेला मूड आज तिचा तिलाच छान वाटू लागला होता. या क्षणी आपण खरंच पालवी सोबत असायला हवं तिच्यासोबत आपणही सुखमय व्हावं असं तिला वाटू लागलं; पण कुठंतरी आपण कमीपणा घेऊ नये असंही तिला वाटत होतं. मनात असे विचार चालू असतानाच प्रकाशला ती म्हणाली; प्रकाश एक बातमी सांगायची आहे बोलू का?''

''हा बोल'' - प्रकाश

''घाटेच्या अमेयनं स्पर्धा परीक्षेत यश मिळवलंय. आज घाटे पेढे घेऊन ऑफिसमध्ये आले होते.'' - प्रिया

''अरे वा छान झालं की चल ताट वाढ मला जाम भूक लागली आहे.'' - प्रकाश

जेवताना शांततेचा भंग करत प्रिया म्हणाली ''प्रकाश आपल्या घरात कुठल्याच विषयावर संवाद होत नाही. कधी कुठली चर्चा नाही म्हणून आजची ही आपली पिढी वाया जाताना दिसते आहे. ज्या त्या वळणावर त्या त्या वेळी आपण बोलायला पाहिजे होतं. वाढत्या वयात मुलांच्या मनातले काय प्रश्न आहेत त्यांच्या काय गरजा आहेत? याची चर्चा व्हायला हवी होती प्रकाश.''

तू तुझ्या कामांना नको तितकं महत्व देत गेलास आणि मी ही वाजवीपेक्षा पैशांला, कामाला केंद्रबिंदू मानून पालवी पासून दूर होत गेले. खरंतर पालवीची निवड चुकली असंच मला आज पर्यंत वाटत होतं. आज अमेय परीक्षा पास झाला नसता तर आपण तिच्या माती खापर फोडून मोकळे झालो असतो की तुझी निवड चुकली म्हणून.

पण खरं सांगू शिपायाच्या मुलांनं ही परीक्षा पास होणं हे माझं मन मान्यच करत नाही अजूनही.

पण खरंच त्या कुटुंबाचं आपण कौतुक करायला हवं प्रकाश! आज आपल्यासारखी उच्चशिक्षित म्हणवून घेणारी पालक मंडळीच मुलांच्या भावनांचा विचार करत नाहीत. त्यांच्याशी मनमोकळेपणानं बोलत नाहीत. महागड्या वस्तू भेट दिल्या की आपल्याला वाटतं की आपण जगातले खूप महान आई बाबा आहोत आणि दुसरीकडं घाटे सारखी छोटी, गरीब कुटुंबं आहेत की जी मुलांच्या भावना जपून त्यांच्या मनाचा विचार करतात. त्यांच्याशी संवाद साधून त्यांच्या भावनिक गरजा पूर्ण करतात. अशीच कुटुंबातील मुलं आज पुढं जाताना दिसत आहेत.

प्रकाश एक सांगशील ''मला की तू शेवटचं पालवीशी केव्हा बोललास?''

''नाही आठवत'' - प्रकाश

''हं आठवणारच नाही कारण आपण बोलतच नाही आपल्यात संवाद नाही. कारण बोलणं किंवा संवाद साधणं हे आपल्या लेखी खूप महत्त्वाचं नाही कारण परवा आभा आली होती ना ती हेच सांगत होती की पालवीला तुम्हाला हे सारं सांगायचं होतं पण तुम्ही तिला ती संधी दिली नाही. तिचे विचार, तिचे प्रश्न तसेच राहिले म्हणून ती मित्र आणि मैत्रिणीबरोबर बऱ्याच गोष्टी शेअर करत राहिली.

प्रकाश आपण पालवीला आज उद्या किंवा तुझ्या सवडीनं घरी बोलवूया का? मला तिच्याशी खूप बोलायचं आहे. आमच्या नात्यातला हरवलेला संवाद पुन्हा नव्यानं घडवायचा आहे. कसं काय कोण जाणे आपण एकमेकांशी इतकी तुटक वागत राहिलो.

याचा आज मी विचार करते तेव्हा मला खूप अपराध्यासारखं वाटतं तुला नाही वाटत प्रकाश की आपण चुकलो आहोत म्हणून!''

थंडगार ताकाचा घोट घेत प्रकाश म्हणाला, ''प्रिया आपण अपराधी आहोत पालवीचे हे मान्यच आहे. पण आता तिच्यासमोर मी उभा नाही राहू शकणार. तिच्या नजरेला नजर नाही भिडवू शकणार. एकुलत्या

एका मुलीला मी खरंच आज हरवून बसलो आहे. पैसा काम, मोबाईल याव्यतिरिक्त मी कुठल्याच गोष्टीचा विचार केला नाही. डबडबलेले डोळे पुसत प्रकाश पुढं म्हणाला, आभाला एक फोन कर आणि पालवीला घरी घेऊन ये म्हणावं!''

संध्याकाळ संथगतीत अंधाऱ्या रात्रीत विलीन होण्यास सज्ज झाली होती. घरट्यातून उडालेली पाखरं पुन्हा घरट्यात परतत होती. झाडावर पक्षांचा एकच किलबिलाट चालू होता. पक्षांच्या किलबिलटानं घरटी गजबजून गेली होती.

पहाटेचा थंड वारा अंगाला झोंबत होता. असंच कितीतरी वेळ पडून राहावं असं प्रियाला वाटत होतं. आभाच्या फोनने प्रियाची झोपमोड झाली. आभा म्हणत होती की, ''काकू दह्याची चटणी आणि खमंग थालीपीठ करा मी आणि पालवी येतोय अगदी थोड्याच वेळात.''

प्रियानं स्वत:भोवती एक मोठी गिरकी घेतली अशी गिरकी गेल्या कित्येक वर्षात तिनं घेतलेली तिला आठवत नव्हती. भराभर आवरून तिनं टेबल सजवला. फोडणी दिलेलं काकडीचं रायतं तिनं अगदी न विसरता केलं. पालवीच्या आवडी तिनं जपल्या होत्या. प्रकाशला उठवत म्हणाली; उठ माझा स्वयंपाक झालाय. तू ही वेळेत आवरून घे, पालवी येतेय घरी आपली पालवी!

किती उत्साहानं भरभरून ती बोलत होती. आज तिचा आनंद गगनात मावेनासा झाला होता.

प्रकाशने ही पटकन उठत आवरायला घेतलं त्यालाही पालवीशी खूप बोलायचं होतं बोलून मन मोकळं करायचं होतं.

''आईस्क्रीम घेऊन येतो गं!'' म्हणून प्रकाश उत्साहानं बाहेर पडला.

प्रिया आणि प्रकाश दोघेही अगदी पालवीच्या स्वागतासाठी सज्ज झाली होती. प्रियानं आभाला फोनही केला; ''येताय ना? या लवकर मी वाट पाहतेय!''

''काकू येतोय आम्ही पोहोचतोच पाच मिनिटात'' - आभा.

आभा गाडी चालवत आपल्याच मस्तीत चालली होती. तेवढ्यात ''आभा एक विचारू?'' पालवी म्हणाली.

''हं बोल की'' - आभा

''अगं मी अशी वागले त्याचं आई-बाबांना काय वाटत असेल? मला त्यांच्यासमोर जायला नको वाटतं. पण खरं सांगू हे जे झालं त्यात दोष कोणाचा? या विषयावर नको नं बोलायला. फक्त आई-बाबांनी हे मोठ्या मनानं स्वीकारावं असं मला वाटतं. कारण मी खूप तणावामध्ये वावरत होते त्यावेळेस पण अमेयनं मला खूप समजावून सांगितलं. त्या कठीण वळणावर अमेय सोबतीला होता म्हणून मी या वादळातून बाहेर पडले आणि नकळत मी अमेयच्या प्रेमात पडले. माझ्या बाबतीत जे काय घडलं, घडत गेलं ते मी आई-बाबांना खूप सांगायचा प्रयत्न केला, पण घरात यावर कधीही बोलणंच व्हायचं नाही. म्हणून कॅफे बुक मध्ये आपण जमल्यावर मी अमेयशी बोलायचे. तुम्ही सर्वांनीही मला खूप समजावून सांगितलं आभा तुमच्या सर्वांचे आभार मी कसे मानू? कळत नाही खरंच गं!''

''आभार प्रदर्शन आपण पुन्हा कधीतरी करूया. उतरा खाली घर आलंय.'' - आभा.

दोघीही खाली उतरल्या. संपूर्ण पालवी बंगल्याकडं, बागेकडं बागेतल्या झोक्याकडं झाडांकडं तिनं नजर फिरवली. पक्षांची घरटी लांबून ही किती छान दिसत होती. हे पाहून तिला खूप गहिवरून आलं. आठवणी जाग्या झाल्या. पाणावलेले डोळे पुसत तिनं घरात प्रवेश केला. आईला समोर पाहताच तिनं मिठी मारली. ''आई तू कशी आहेस! म्हणत तिनं प्रियाचा सारा खांदा ओला केला. किती रडशील गं! तू बरी आहेस ना? जा बाबांना भेटून ये.'' - प्रिया

पालवीनं धावतच प्रकाशच्या गळ्याला मिठी मारली. खाली वाकून पाया पडली. म्हणाली, ''बाबा मला माफ कराल? मी चुकले खूप चुकले. वीस, बावीस वर्ष तुम्ही मला किती छान सांभाळलं आणि मी एका झटक्यात हे सारं विसरून अमेयशी लग्न केलं.''

अश्रूंचा बांध फुटला होता अश्रू अनावर झाले होते.

प्रकाशनं पालवीच्या पाठीवरून हात फिरवला. म्हणाला, ''तू चुकलीस पण अमेयनं असं करायला नको होतं. त्यानेही या पळून जाण्याच्या प्लॅनमध्ये तुझी साथ द्यावी. हे मला पटत नाही. नक्कीच त्याचा काहीतरी वेगळा डाव असेल पालवी!'' प्रकाशच्या या बोलण्यावर ती दोन पावलं मागं सरकली.

तेवढ्यात आभा पुढे आली. तिला हे अपेक्षित होतं की हा मुद्दा उठणार आहे कारण अमेय परिस्थितीनं गरीब आहे. पालवीच्या आई-बाबांना असं वाटणं साहजिकच आहे की पळून जाण्याच्या प्लॅन हा अमेयचा असू शकतो, पण खरी परिस्थिती खरंच फार वेगळी आहे.

प्रत्येक मनुष्य हा धनाने श्रेष्ठ समजला जातो असं काही नसतं. खरंतर दिव्य स्वभाव, उच्च आचरणावर मनुष्याची श्रेष्ठता ठरवायची असते.

आणि अमेयनं तर कृष्ण बनून पालवीला योग्य मार्ग दाखवून एका थांब्यावर आणून ठेवलं होतं नाहीतर पालवी आज डिप्रेशनमध्ये किंवा व्यसनेच्या आहारी गेलेली दिसली असती. तिला सावरणं खरंच फार कठीण गेलं असतं असे विचार करत ती पालवीला म्हणाली; ''पालवी, आज सांगून टाकते मी सारं. कारण जोपर्यंत काका काकूंना अमेय बद्दल सारं कळणार नाही तोपर्यंत त्यांचा त्याच्या बद्दलचा गैरसमज वाढत जाणार आहे. आणि त्यावेळी तू कुठल्या परिस्थितीतून जात होती. हेही नको का त्यांना कळायला? ती पुढं बोलू लागली. म्हणाली, काका-काकू शांतपणे ऐका मी काय सांगते ते! मी जे सांगते ते सारं आमच्या ग्रुपला ही माहिती आहे आणि हे सारं पालवीनं सांगितलेलं आहे. आम्ही अनुभवलं आहे. काका, तुम्ही दोघंही काम, पैसा, प्रतिष्ठा याला महत्व देत गेला. घरात तुमचं फारसं लक्षही नसायचं आणि संवाद, बोलणं अशा गोष्टी तर घरात नव्हत्याच. काकू तुम्हाला दोष देण्यापेक्षा मी मूळ मुद्द्यावर येते. पालवी डिप्रेशनमध्ये चालली होती. एका वाईट ग्रुपच्या नादी ही लागली होती. कॅफे बुक म्हणजे आमचा थांबा होता. कॉलेज सुटलं की आम्ही कॅफे बुक मध्ये आमच्या थांब्यावर येऊन थांबायचो.

कॉफी पिताना आम्ही पुस्तकं वाचायचो, पुस्तकावर बोलायचो, चर्चा करायचो पण या गोष्टीत पालवी फारशी नसायची. ती कुठंतरी दूर शून्यात हरवलेली दिसायची. पानं चाळत राहायची. या गोष्टी अमेयच्या नजरेतून सुटल्या नाहीत. मी आणि अमेयनं एकदा तिला विचारायचा प्रयत्नही केला बोलता-बोलता ती म्हणाली की, 'आई-बाबांच्या कामाच्या पुढं मला किंमत नाही. माझ्या भावनांना किंमत नाही. खूपदा मला मार्क कमी पडतात. गणित विषय कठीण जातोय. मी आई-बाबांशी या विषयावर बोलायचा प्रयत्न केला. पण त्याचं उत्तर असायचं की दुसरा क्लास जॉईन कर. आपण उद्या बोलूया या विषयावर. आणि तो ''उद्या'' कधीच उजाडला नाही आजही. अशा कित्येक समस्या माझ्या आयुष्यात आल्या पण तो आधाराचा खांदा जो हवा असतो ना, तो कधीच मला मिळाला नाही. नकळतपणे मी थोडं वाईट गोष्टीच्या अधीन गेले. काका या अशा साऱ्या गोष्टी अमेयला पालवीनं सांगितल्या. अजूनही एक गोष्ट मी इथं मांडते काकू, हे सारं ऐकून तुम्ही भांबावला आहात घाबरून गेला आहात, हे कळतंय मला पण मन घट्ट करून ऐका. पालवी रात्री अपरात्री घरी यायची दिवस-रात्र झोपून राहायची हेही तुमच्या नजरेतून कसं काय सुटू शकतं? काकू पालवी ड्रगच्या आहारी चालली होती. मी आणि अमेयनं तिला यातून वाचवलं. तिला पुन्हा कॅफे बुकच्या ग्रुप मध्ये ओढून आणलं. तिचे कोणते विषय कच्चे होते याचा अमेयनं अभ्यास करून तिचे ते विषय अगदी व्यवस्थित करून घेतले. या गोष्टी आठ ते दहा दिवसात तर घडलेल्या नाहीत. काकू, या साऱ्या गोष्टीला तब्बल दोन वर्षे लागली. तिच्याशी बोलून तिच्या मनातलं जाणून घेऊन तिला मानसिक स्थैर्य देत ती कशी आनंदी राहील याचा विचार करत आम्ही तिला खूप जपलं काकू आणि या साऱ्या गोष्टी घडताना, पालवीला सावरताना आमचा एकच उद्देश होता की आमची मैत्रीण यातून वाचली पाहिजे. आम्हाला जेवढं शक्य होतं तेवढं आम्ही केलं आणि अशातच पालवी अमेयच्या प्रेमात पडली. काकू आता यापुढं काय आणि कसं घडलं ते तुम्ही सविस्तरपणे पालवीकडूनच ऐका. मी निघते.''

घरात निरव शांतता पसरली होती. वाऱ्यामुळं झाडांच्या पानांचा आवाज कानी पडत होता. पक्ष्यांच्या किलबिलाटानं घरातील शांतता भंग पावत होती. काहीतरी मोठा अपराध आपल्या हातून घडला आहे असे प्रिया आणि प्रकाशला वाटत होते. पालवी आळी पाळीनं दोघांकडं पाहत होती. आभा जे काही सांगून गेली त्यामुळं दोघांच्या चेहऱ्यावर खूप भीतीदायक भावनांचा जाळं पसरलं होतं.

भयाण अशा शांततेचा भंग करत पालवी म्हणाली, ''आई आभा जे काही सांगून गेली त्यातली कुठलीच गोष्ट खोटी नाही. मला त्यावेळेस अमेयनं सावरलं नसतं तरी मी आज तुमच्यात नसले असते आई! तुम्ही दूरवरच्या गोष्टी पाहण्याच्या नादात जवळच्या गोष्टी विसरत गेलात. अमेयनं माझं गणित इतकं पक्क केलं की मी आज कुठलीही गणितं चुटकीसरशी सोडवू शकते. वाईट ग्रुप मधून मला बाहेर काढणं, व्यसनातून मुक्त करणं या गोष्टी सहज नव्हत्या आई! मला वाटायचं की मी एकटी पडले. हे अमेयनं जाणलं. त्यांनं मला समजून घेऊन माझ्या समस्या सोडवल्या. स्वतःही अभ्यास करत गेला. आज त्याला खूप मोठं यश मिळालं. राहता राहिला प्रश्न की आम्ही पळून का गेलो? अमेयच्या घरातून विरोध होता लग्नाला. तुमच्याशी मी खूप बोलायचा प्रयत्न केला पण आपलं यावर बोलणं होत नव्हतं मी अमेयशी बोलले. म्हणाले, मला तुझ्याशीच पुढचं आयुष्य घालवायचं आहे. तुझ्याशिवाय मी आता कोणाचा विचार करणार नाही. खरंतर बाबा, अमेयला पळून वगैरे जाणं हे मान्यच नव्हतं पण माझ्या हट्टापुढं त्यानं ते ऐकलं. त्यानं आपला पैसा, संपत्ती, प्रतिष्ठा पाहून माझ्याशी लग्न केलेलं नाही. हे आधी तुम्ही तुमच्या मनातून काढून टाका. शिपायाच्या घरातली मुलंही संस्काराणं, विचारांनं खूप मोठी असतात बाबा! कारण घरातील मोठी मंडळी त्यांच्या भावनिक गरजांकडं लक्ष देतात. दिलखुलास, मैत्रीपूर्ण वातावरण घरात असलं की पिढी पुढं जाते हे मी अमेयच्या घरच्यांकडून शिकले. आई, अमेय परिस्थितीनं जरी गरीब असला तरी तो स्वाभिमानी आहे. आज मी जी तुमच्या समोर प्रचंड विश्वासानं उभी आहे ती केवळ अमेय मुळेच. हे विसरून चालणारं नाही. आईबाबा तुम्हाला मी एकच मागते की, आम्ही केलेल्या या लग्नाचा तुम्ही स्विकार करावा. पळून जाणं ही चूक आहे, पण तुम्ही ती मोठ्या मनानं पदरात घ्या.''

पालवी खूप रडली. अगदी सैल झाली. तिला आज खूप बरं वाटत होतं. इतक्या दिवसाचं मनावरचं ओझं पार उतरुन गेल्या सारखं वाटत होतं. आता आईबाबा काही का निर्णय घेईनात मी बोलून तर मोकळी झाले. असे विचार तिच्या मनात येत होते.

सोफ्यावर बसलेल्या पालवीच्या दोन्ही बाजूला प्रकाश आणि प्रिया बसली होती. तिला जवळ घेत प्रकाश म्हणाला, ''बेटा, आज तुला मी काळजा जवळ घेऊन बसलोय. हा क्षण ही मी पूर्वी आयुष्यात कधी अनुभवलेला नव्हता. खरंच बेटा, खूप गोष्टी आमच्या हातून निसटून गेल्या होत्या. या गोष्टी परत मिळवून दिल्या म्हणून मी अमेयचे आभार मानेन.''

आज तू व्यसनाच्या बाहेर पडलीस, माणसांत आलीस हे सारं अमेयमुळे साध्य झालं. आणि हो तुमच्या कॅफेबुकचं ही मी खरंच ऋणी आहे की इतकी छान आणि जीवापाड तुम्ही मैत्री जपता. तुमच्या ग्रुपला पाहून मी असंच म्हणेन की आजची ही तरुण पिढी वाया जाणारी नाही तर एकमेकांना सावरणारी आहे.

बेटा, आम्ही चुकलो. आम्हाला क्षमा कर. इथून पुढं आता अशी चूक होणार नाही. ऑफीस नंतर आता आम्ही तुझेच आहोत.

आम्हाला नकळतपणे वळणावर आणण्याचं काम घाटे परिवारानं केलं आहे. आम्ही त्यांचे ही ऋणी आहोत!

प्रियाला ही खूप बोलायचं होतं. पण ती बोलत नव्हती. मनभरुन ती पालवीकडं पहात होती. तिच्या चेहऱ्यावरुन, केसांवरून ती हात फिरवत होती.

तिनं तिला जवळ घेतलं. कित्येक वर्षातून ती आईच्या कुशीत

अशी विसावली होती. ती आणखीन आईला बिलगली. ओढणी सावरत आईला म्हणाली, ''आई, रडू नकोस. नाहीतर मला आज दिवसभर करमायचं नाही. मला फक्त माफ कर आई!''

''अगं, वेडाबाई माफी कसली मागतेस? आम्हीच अपराधी आहोत तुझे. ज्या वयात आईबाबा मित्र मैत्रीण म्हणून सोबत रहायला हवे होते त्या वयात आम्ही तुला एकटे टाकले. तुझ्या गरजा समजून घेतल्या नाहीत. तुझ्याशी कधी मनमोकळेपणानं बोललो नाही. बोललो असतो तर तू अशा वाटा चुकली नसतीस.

पालवी खरं सांगू! तू वाट चुकली आहे. तू काहीतरी वेगळं वागते आहे. हेही कधी आमच्या लक्षात त्यावेळी आलं नाही. संवादानं भरलेलं तुमचं कॅफे बुक नसतं तर तू कुठल्या थराला पोहोचली असती? हा विचारही करवत नाही. तूच आम्हाला माफ कर आणि जावयाला आजच घरी बोलावून घे. मानाचा पाहुणचार करायचा आहे त्यांचा.''

मातीला सुद्धा नांगरटीची गरज असते तेव्हा कुठं जोमानं पीक उभं राहतं. नाही तर नुसती ढेकळं काय ती कामाची?

आज कुटुंबाची मशागत छान झाली होती बोलून मोकळी झाली होती. आज एका नव्या पर्वाला सुरुवात होणार होती. आयुष्यातल्या तारखा तर बदलत राहतात. खरंतर प्रत्येक क्षण आणि वेळ जगण्यासाठी कुटुंबाचं एकत्रित बसणं, संवाद साधणं, आज अत्यंत गरजेचं बनलेलं आहे. कारण आज माणसां जवळ पैसा, संपत्ती, प्रतिष्ठा सारं काही आहे पण कुटुंबांना द्यायला वेळ नाही. दोन मिनिटं बोलायला सुद्धा वेळ नाही. मोठ्यांच्या अनुभवातूनच मागची पिढी घडत असते पण आज अनुभव सांगणारी माणसं आहेत पण त्यांना वेळ नाही. म्हणून नव्या पिढीत हट्टीपणा, दुराग्रहीपणा, चिडचिडेपणा, एक्कलकोंडेपणा व्यसनाधीनता हे असे बदल आपणाला जाणवत आहेत.

संध्याकाळी सारीच मंडळी घाटे परिवार, पालवीच्या माहेरचे, बुक कॅफे ग्रुप अशी सारी मंडळी आज कॅफे बुक मध्ये जमा होणार होती. आज खऱ्या अर्थानं दोन्ही परिवार विषमतेच्या भिंती तोडत एक होणार होती. आज दोन्ही घरात मंगल वाद्य वाजणार होतं.

पालवी प्रिया, प्रकाश, अमेय या साऱ्यांनी आपापल्या नातेवाईक मित्रमंडळींना बोलावलं होतं. घाटे काकाही अगदी जोमानं कामाला लागले होते. आज पालवीच्या घरच्यांकडून अमेयाचा सत्कार होणार होता. कॅफे बुक मध्ये सर्वजण आपापल्या जागी स्थानापन्न झाली. कोल्ड कॉफी, हॉट कॉफी, चॉकलेट कॉफी, मोक्का, लाते, मोहितो असे कितीतरी कॉफीचे प्रकार आणि सोबत महान लेखकांची महान विचारांची पुस्तकं मोठ मोठ्या काचेच्या आलमारीत, टेबलवर शोभून दिसत होती. प्रत्येक टेबलवर कॉफीचे मग आणि पुस्तकं वाचणारी तरुण पिढी हे चित्र खूप आशादायी वाटत होतं. पुस्तकावर भरभरून बोलणारी मुलं आज एकमेकांच्या मदतीला धावून येत आहेत. समस्या सोडवत आहेत. खरंच असे मैत्रीचे ग्रुप समाजामध्ये असायला हवेत.

हे सारं वैचारिकतेचं वैभव पाहून प्रिया तर हरवून गेली होती. पालवी आणि अमेय खूप छान असं आवरून समोर आले. एकमेकांना अंगठी घालून त्यांनी साऱ्यांना वाकून नमस्कार केला. घाटे काका काकूंचाही सत्कार करण्यात आला. प्रिया व प्रकाशने अमेयला शाबासकी दिली आणि सत्कार केला.

अमेयने चार शब्द बोलावेत म्हणून सगळ्यांनी आग्रह केला. पण अमेय म्हणाला; ''मी नंतर बोलेन. आधी माझ्या बाबांना बोलण्याची संधी द्या.'' घाटे काकांना गहिवरून आले म्हणाले, ''मी शिपाई मी काय बोलणार? माझ्यापेक्षा कितीतरी वरचढ मंडळी इथं आहेत त्यांनी त्यांचे विचार मांडावेत असे ते म्हणाले.''

तेवढ्यात प्रकाश म्हणाला, ''घाटे आपण बोला! आज तुमचा मान आहे शिक्षणानं आपण कमी आहात पण अनुभवानं आपण कितीतरी महान आहात आज आपणच बोला.''

सगळ्यांच्या आग्रहास्तव घाटे बोलू लागले टाळ्यांचा प्रचंड कडकडाट सुरू झाला.

''मंडळींनो नमस्कार! आज मी खरंच स्वतःला भाग्यवान समजतो की माझा मुलगा आज स्पर्धा परीक्षा पास होऊन लवकरच मोठा पदभार सांभाळणार आहे. हे शक्य झालं ते यामुळं की आम्ही दोघं नवरा-बायको पोरांकडं लक्ष द्यायचो. लक्ष तर सगळेच आई बाबा देतात पण आम्ही त्यांचं मन जाणलं त्यांचे प्रश्न व त्यांच्या समस्या सोडवल्या. परिस्थितीची जाणीव करून देत त्यांच्या आवडीनिवडी जपल्या. खरं तर आमच्या कुटुंबात बोलणं होतं, गप्पा होतात म्हणून आपली मुलं आपल्याला समजतात. कारण मुलांना कुटुंबाची खरी गरज असते. जशी लहान रोपाला सावलीची गरज असते अगदी तसंच घरातल्या मुलांनाही आई-बाबांच्या सावलीची गरज असते. मग रोपाचं झाड झालं की वादळ, वारा व उन्हाचे तडाके सहजपणे ते सहन करतात. समस्यांना सहजपणे तोंड देतात.'' धन्यवाद म्हणून हात जोडत त्यांनी त्यांच्या वाणीला विराम दिला.

पुन्हा एकदा टाळ्यांचा कडकडाट झाला सारी मंडळी अमेयचे व घाटे काकांचे कौतुक करत होती. कॉफीचा आस्वाद घेत सारी मंडळी एकेक करून आपापल्या घरी गेली.

प्रिया प्रकाशने अमेय व पालवीला जवळ घेतलं शेवटी प्रिया म्हणाली, ''अमेय तुझे खूप आभार मनापासून धन्यवाद. तुम्ही दोघं छान रहा, छान संसार करा. उशीरा का होईना मला हे कळालं की सगळेच आई-बाबा मानसशास्त्रज्ञ नसतात. पण मुलांच्या वर्तनातून त्यांच्या मानसिक गरजा आपल्याला कळतात. पण त्यासाठी कुटुंबात बोलणं व्हायला हवं. बऱ्याच आई-बाबांना वेळ नसतो पण त्यातूनही वेळ द्यायचा असतो हे आज पुरतं कळालं!'' या वाक्यावर सगळीच मंडळी अगदी दिलखुलासपणे हसू लागली.

एक हसरं, बोलकं, संवादानं परिपूर्ण कुटुंब म्हणून आभानं दोन्ही कुटुंबांना एकत्र करून त्यांना कॅमेरात कैद केलं.

रोपांना खरंच सावलीची किती तरी गरज असते. हे आज साऱ्यांनाच मनोमन पटलं होतं.

***

एका वळणावर

– अनुजा कुलकर्णी

नोकरी मिळाल्यावर गौतमी फक्त धावत होती ते फक्त पैसे कमवायला. पैसे मिळाले पण आनंद मात्र कुठेतरी हरवला. सगळी सुखं पैशांनी विकत घेता येत नाहीत हे गौतमीला जाणवलं. तिला जाणवलं की पैशाबरोबर तिने स्वतःसाठी वेळ द्यायला हवा होता. तिने स्वतःसाठी थोडाही वेळ दिला नव्हता. तिला तिची चूक समजली होती. ती आता तिची चूक सुधारणार होती. तिने आयुष्यात आनंद मिळवण्याचा मार्ग शोधला. तो मार्ग कोणता ते वाचा!



बाहेर बर्फ पडत होता. बर्फ काही केल्या थांबत नव्हता. रस्ते ओस पडले होते. रक्तवाहिन्या गोठतील इतकी थंडी पडली होती पण अश्या थंडीत सुद्धा गौतमी एकटीच रस्त्यावरून चालत होती. तिला आजूबाजूला काय होतंय हे कळत नव्हतं. गौतमीला थंडीचं सुद्धा भान नव्हतं. गौतमी तिच्याच विचारात मग्न होऊन चालत होती. तिला आपण कुठे जातोय ह्याचं सुद्धा भान नव्हतं. फक्त रस्त्यावर नाही तर आयुष्यात सुद्धा तिच्या बाबतीत असंच काहीसं होतं होतं. आयुष्य तिला कुठे नेत आहे, ती कुठे जातेय हे तिला कळत नव्हतं. फक्त काम, पैसे, नाव हे सोडून तिच्या आयुष्यात काहीच नव्हतं. आता गौतमीला ह्या सगळ्याचा कंटाळा आला होता. तिच्या आयुष्याची दिशा हरवली होती. पण तिला पुढे काय करावं हे सुचत नव्हतं. भरपूर पैसे, मनासारखं काम सगळंच तिच्या मनाप्रमाणे झालं होतं. पण हे सगळं करता करता खूप वर्ष सरली होती. तिच्या हातातून खूप महत्वाचा वेळ निसटून गेला होता. आईच्या मते तिला तिच्या आयुष्यात एका जोडीदाराची गरज तर होती पण तिचा लग्न संस्थेवर खूप विश्वास सुद्धा नव्हता. त्यामुळे आईच्या म्हणण्याकडे तिने सहज दुर्लक्ष केलं होतं. पण आता गौतमी आयुष्याच्या अश्या टप्प्यावर पोचली होती की पैसे सोडून तिला अजून काहीतरी हवं होतं. तिच्यासाठी पैसा दुय्यम झाला होता. पण आपण काय करावं अश्या विवंचनेत गौतमी होती. आणि आता तिचं वय सुद्धा वाढलं होतं. गौतमीनी तिची पस्तीशी कधीच पार केली होती. तिला कॉलेज संपल्यावर लगेचच जॉब मिळाला आणि त्यानंतर एका मागोमाग एक प्रमोशन्स मिळत गेली. गौतमी अखंड काम करत राहिली. आणि आयुष्याच्या एका टप्प्यावर कामासाठी ती अमेरिकेत राहायला लागली. तिने कधी मागे वळून पाहिलं नाही. अमेरिकेत राहायला लागून ६ वर्ष झाली होती. सुरवातीला गौतमी तिच्या बिझी आयुष्यात रमली होती. ती एकटीच रहायची पण हळू हळू तिला त्यातून आनंद मिळेनासा झाला. आपण जे पैसे कमावतो आहे त्यातही खुश होती का नाही ते तिला माहिती नव्हतं. पण तरी तिने ते आयुष्य स्वीकारले होते. गौतमीला काम आवडायचं आणि कामाच्या व्यापात बाकी काही विचार आले तर ती ते विचार टाळत होती. एकटं जगण्याचा तिला कंटाळा यायचा तरी ती आयुष्य रेटत राहत होती. पण आता गौतमीला एका पठडीतलं आयुष्य नको होतं. त्यासाठी ती काही फर्म स्टेप घेणार होती. तेचतेचपणा तिला आता नको होता. त्याच काळात तिच्या ऑफिसमध्ये तिच्या हाताखाली एक नवीन मुलगा जॉईन झाला. तो मुलगा खूप मोठा नव्हता. २५-२६ वर्षाचा गोंडस चेहरा असणारा मुलगा होता. राजस त्याच नाव होतं. जेव्हा ऑफिस मध्ये रुजू झाला तेव्हा तो अगदीच नवीन होता. बाहेरच्या देशात कशा प्रकारे काम होतं ह्याचा त्याला फार अनुभव सुद्धा नव्हता पण त्याच्या हुशारीच्या जोरावर त्याला अमेरिकेत येण्याची संधी चालून आली होती. त्या संधीच सोनं राजसला करायचं होतं. राजसची स्वप्न खूप मोठी होती आणि स्वप्न पूर्ण करण्यासाठी तो तडजोड करायला सुद्धा तयार होता. राजस ऑफिसमध्ये आला आणि चौफेर नजर फिरवली. ऑफिस मध्ये कोणीही भारतीय नाही ह्या विचारांनी राजस थोडा खट्टू झाला खरा पुढच्या क्षणी त्याला त्याची स्वप्न आठवली आणि तो नॉर्मल झाला. त्यांनी ऑफिस मधल्या सगळ्यांशी ओळखी करून घेतल्या. सगळेच लोकं चांगले होते पण आपल्या मातीचा ओलावा राजस मिस करत होता. तेव्हाच त्याला आपली बॉस भारतीय आहे हे त्याला कळलं आणि तो खुश झाला!! तो गौतमीला भेटायची वाट पाहायला लागला. गौतमी या ऑफिसची बॉस होती. साहजिकच सगळ्यांशी बोलायची तिला गरज वाटायची नाही. गौतमी फक्त तिला वाटेल त्याच लोकांशी भेटायची. राजस त्या ऑफिसमध्ये चांगलाच रुळला आणि एके दिवशी गौतमीला भेटायची संधी त्याच्यासमोर चालून आली. राजसनी कमी वेळात खूप मस्त काम केल होतं आणि त्यामुळेच गौतमीला सुद्धा त्याला भेटायचं होतं. राजस डेस्क वर बसला होता आणि तितक्यात त्याच्या लॅपटॉप वर 'टिंग' असा आवाज आला. त्यानी पाहिलं तर त्याला गौतमीचा मेल आलं होतं आणि त्यात गौतमीनी त्याला भेटायची इच्छा व्यक्त केली होती. मेल मध्ये पण तिचं बोलणं एकदम अदबशीर होतं. अजिबात फापटपसारा नाही आणि गौतमी एकदम मुद्द्यावरच आली होती. राजसनी गौतमीचा मेल पाहिलं आणि तो मनोमन खुश झाला. राजसनी बरेच दिवस वाट पाहिली आणि फायनली, तो गौतमीला भेटणार होता. गौतमीनी त्याला भेटण्यासाठी दुपारी १२ची वेळ दिली होती. गौतमीच ऑफिस वेगळ्या ठिकाणी होतं. त्यामुळे लवकरच निघाला. राजस सुद्धा वेळेचा चोख होता त्यामुळे तो वेळेतच गौतमीनी सांगितलेल्या जागेवर पोचला. त्यानी गौतमीला पाहिलं. गौतमी एकदम साधी होती. पण तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारचं तेज होतं. त्या तेजामुळे तिचं वय लपून राहत होतं. राजसला आपल्या बॉसला पहिल्यांदी भेटून खूप आनंद झाला आणि चेहऱ्यावर एक स्मित हास्य आणत त्यानी शेक हँड करण्यासाठी हात पुढे केला. गौतमी फक्त हसली आणि तिने शेक हँड करणं टाळल. मग राजसनी हात मागे घेतला.

''मॅडम... आय ॲम राजस!'' राजसनी बोलणं चालू केलं.

''हे राजस... हॅव अ सीट! अँड नाईस टू सी यु! यु आर इंडियन? अँड आय थिंक मराठी?'' गौतमीनी प्रश्न केला,

''हो मॅडम... मी मराठी!''

''ओह... नाईस! खूप दिवसांनी मराठीमध्ये बोलतीये... आपली माती, आपली माणसं, आपली भाषा नेहमीच हवीहवीशी वाटते आणि मी ते सगळं मिस करत होते. आज खूप दिवसांनी मराठीत बोलले. छान वाटतंय... नाहीतर इंग्लिशमध्ये बोलणं कोरडं वाटतं... मराठी भाषेची उब काही वेगळीच असते.'' गौतमी हसली. ''तुला इथे जॉईन होऊन किती दिवस झाले? मी कामासाठी वेगळ्या स्टेटमध्ये गेले होते सो कुड नॉट मिट यु बिफोर...''

''२ मंथ्स मॅडम... आणि मी आपल्या कलीग्स कडून ऐकलय, तुम्ही काम खूप चोख करता. तुम्ही इथे किती वर्षापासून आहात?''

''६ वर्ष होतील. आणि मला आवडत काम करायला. म्हणजे माझी खूप स्वप्न होती आणि मी सगळी स्वप्न पूर्ण केली. आणि महत्वाचं राजस... मला मॅडमपेक्षा गौतमी म्हणलास तर बेटर... आपल्या

ऑफिसमध्ये सुद्धा मी सगळ्यांना सांगितलं आहे की मला नावानी हाक मारा. काहीच लोकं म्हणायचे पण त्यांना सांगितलं... उगाच फॉर्मलिटी कशाला हवी... तसंही, इथे फार कोणी फोर्मल बोलत नाही!!''

''मला ऑकवर्ड होईल... तुम्हाला गौतमी म्हणायला. पण मी प्रयत्न नक्की करेन...''

''ग्रेट... बाय द वे, फर्गोट टू टेल यु दॅट यु हॅव डन ॲन एक्सेलेंट वर्क... मी इम्प्रेस झाले तू केलेलं काम पाहून आणि तेही इतक्या कमी वेळात... म्हणूनच तुला भेटायला बोलावलं ऑफिस मध्ये. काही वर्षांपूर्वी मी सुद्धा तुझ्यासारखीच होते. नवीन पण काम करण्याची जिद्द होती माझ्याकडे आणि खूप पैसे कमवायचं स्वप्न पण होतं.''

''थँक्यू गौतमी!! तुमच्याकडून कौतुक ऐकायला छान वाटतंय! आणि वॉव... ६ वर्ष इथे आहात! आता मी सुद्धा तुमचाच आदर्श ठेवणारे. माझा देशाबाहेर येऊन काम करायचा माझा पहिलाच अनुभव आहे. मला काही अडचणी आल्या तर समजून घ्या.''

''राजस... डोंट वरी! आय विल हेल्प यु बाय ऑल मिन्स. किप डुइंग ग्रेट वर्क... ऑल द बेस्ट!! ओह... आय फर्गोट, आय डीड नॉट ऑफर यु एनिथिंग!! सॉरी!!''

''डोंट बी सॉरी मॅडम...'' त्याला मधेच थांबवत गौतमी बोलली,

''अ... मला गौतमी म्हण!!''

''हो हो... गौतमी!! सॉरी, विसरलोच होतो. मी काय सांगत होतो, डोंट फील सॉरी! मला तुम्हाला भेटता आलं ह्यातचं मला आनंद आहे. खाणं पिणं तर होतंच राहील... तुम्हाला भेटून मला खूप मस्त वाटतंय... मला माझी स्वप्न पूर्ण करण्यासाठी नवीन उर्जा मिळाली.''

''माय प्लेजर राजस...'' दोघं बराच वेळ गप्पा मारत होते आणि तेव्हा गौतमीनी पिझ्झा विथ कोक ऑर्डर केला होता. दोघं गप्पा मारत होते आणि वेळ कसा गेला हे दोघांनाही कळलं नव्हतं. दोघांची पहिली भेट राजस साठी अनपेक्षित होती आणि अनपेक्षितपणे त्याला नवीन दिशा मिळाली होती. गप्पा झाल्यावर राजस गेला पण त्याच्या मनातून गौतमी काही जात नव्हती. गौतमीच्या बाबतीत सुद्धा तसचं काहीस झालं होतं. दिवस पुढे सरकत होते आणि दोघांची मैत्री देखील... पाहता पाहता त्यांची ओळख वाढली. गौतमी राजसची बॉस होती तरी त्यांच्या नात्यात ते कधीच आलं नाही. दोघं कामानंतर नियमित भेटायला लागले. आणि त्याचं हे नातं वेगळ्या लेवलला पोचलं. आता त्यांच्या नात्यात खूप मोकळेपणा आला होता.

''गौतमी... दिवस काय पटापट गेले ना?'' राजस बोलायला लागला.

''हो राजस... मला अजूनही आपली पहिली भेट आठवते.''

''मला सुद्धा... मला नव्हतं माहिती की अमेरिकेत मला इतकी चांगली बॉस आणि इतकी चांगली मैत्रीण मिळेल.''

''हो मग आहेच तुझी बॉस... आणि लक्षात ठेव राजस, काही चुका झाल्या तर चुकीला माफी नाही... आय वॉन्ट माय वर्क टू बी परफेक्ट! मला चुका झालेल्या खपत नाहीत. कामाच्या वेळ कामच झालं पाहिजे आणि ते काम चोख असेल ह्याकडे मी स्वतः लक्ष घालते.''

''हो हो गौतमी! आय वोंट डू एनी मिस्टेक. डोंट वरी अबाऊट दॅट...''

''आय होप सो...''

''बाय द वे, गौतमी... एक सांगायचं आहे. पण नाही माहिती सांगू की नको आणि सांगायचं तर कसं सांगू?''

''बोल बोल बिनधास्त...'' गौतमी हसत बोलली.

''बघ हं... चिडायचं नाही...''

''नाही रे... तू बोल तर खरं...''

''विल यु मॅरी मी? मला माहिती आहे तू माझ्यापेक्षा मोठी आहेस. आणि तुला लग्न करायचं नाहीये पण मला इथे सेटल व्हायचं आहे. त्यासाठी ग्रीन कार्ड असलेल्या मुलीशी लग्न करावं असा माझा विचार आहे. तुझ्याशी लग्न करून मला सुद्धा ग्रीन कार्ड मिळेल आणि मी तुला काही बंधन पण घालणार नाही.'' राजस बोलला.

''हे हे राजस... आर यु सिरिअस? आपण चांगले मित्र आहोत पण तुला ग्रीन कार्ड मिळावं म्हणून मी तुझ्याशी लग्न करेन? तुला अस वाटलं? आय लाईक युअर कंपनी पण त्याचा अर्थ...'' गौतमी बोलत होती पण राजसनी तिला मधेच थांबवल...

''हो गौतमी... मी तुला पहिल्यांदा भेटलो तेव्हाच तू मला आवडली होतीस. आणि तुझ्याशी लग्न करून मला इथलं ग्रीन कार्ड सुद्धा मिळेल... मला माझी स्वप्न पूर्ण करायची आहेत आणि त्यासाठी मला इथे राहणं गरजेच आहे. माझी स्वप्न पूर्ण करण्यासाठी तुझी मदत होईल. काय माहीत, आपण एकमेकांसोबत आनंदी असू पण तस झालं नाही, पुढे आपल पटलं नाही तर तुला नातं टिकवण्याची बळजबरी मी करणार नाही. बघ, तुझ्यासाठी 'विन विन' आणि माझ्यासाठी सुद्धा 'विन विन'... सो वॉट से?'' राजस मनातलं बोलून गेला...

''अरे वाह... नाईस थिंकिंग!!! इट्स अ गुड आयडिया... लग्न टिकू शकतं... आणि टिकलं नाही तर कोणी कोणाला अडवणार नाही!! तुझा फायदा आणि माझा सुद्धा! म्हणजे मी पण माझ स्टेटस बदलू शकेन!! माझ्या मनातही लग्नाचा विचार नव्हता पण आता समोरूनच तू विचारतो आहेस मग मी नाही म्हणणार नाही. आणि करेक्ट... माझ्यासाठी आणि तुझ्यासाठी सुद्धा 'विन विन' पण सॉरी! माझ्याकडे ग्रीन कार्ड नाही रे.''

''ओह... तुझ्याकडे ग्रीन कार्ड नाही? इथे इतके वर्ष इथे राहून सुद्धा?'' राजसचा सूर एकदम बदलला.

''हो अरे... मिळत होतं ग्रीन कार्ड पण नाही घेतलं मी ग्रीन कार्ड कारण मला इथे आयुष्यभर राहायचंच नाहीये. मी आत्ताच भारतात जायचा विचार करतीये... मला इथे आयुष्यभर राहायचंच नव्हतं. मी खूप दिवस एकटी राहिले. आणि घरी आई सोबत राहीन. तिच्या जवळ थांबायचं आहे. तिला कधीच वेळ नाही देता आला... आता माझा सगळा वेळ तिच्यासाठी...''

''ओह... मला तू आवडतेस... मला तुझ्याबरोबर आयुष्य

घालवायला आवडलं असतं... आणि मला वाटलं तुझ्याकडे ग्रीन कार्ड असेल... आणि तुला इथेच राहायचं असेल. माझी स्वप्न मोठ्ठी आहेत... ती इथे राहूनच पूर्ण होतील... पण जर तुला इथे राहायचं नसेल तर... असो... तू नाहीतर दुसरं कोणी शोधेन...'' राजस खरी गोष्ट न लपवत बोलला. तेव्हाच त्याच्या फोनची रिंग वाजली आणि त्यानी ''हो येतो'' असं सांगितलं आणि तो फक्त बाय बोलून तिथून निघून गेला.

गौतमीला वाटलं होतं राजस वेगळा आहे पण तिला जाणवलं राजस इतरांसारखाच आहे. तो वेगळा होता पण त्याची स्वप्न आत्ताच्या क्षणाला त्याला जास्त मोठी वाटत होती. त्याची स्वप्न त्याला चूक करण्यास प्रवृत्त करत होती... पण गौतमीला वाईट वाटलं... तिला ह्याचा अंदाज आधीच आला नव्हता आणि ह्या गोष्टीचं तिला वाईट वाटलं... पण ह्या अनुभवानी गौतमी भारतात परतण्या बाबतीत खंबीर झाली. झालेला प्रकार गौतमीसाठी सुखद नव्हता तरी गौतमी मनोमन हसली. गौतमीला अजिबात दुःख झालं नव्हतं कारण तिच्यासाठी ही गोष्ट नवीन नव्हती. ह्या आधी सुद्धा असं झालं होतंच. तिला माहिती होतं तिच्या पैश्यांसाठी आणि अमेरिकेत राहता येईल फक्त ह्याच कारणासाठी तिला २-३ मुलांनी लग्नासाठी विचारलं होतं. तिला राजस वेगळा वाटत होता पण तिचा अंदाज चुकला होता आणि ती मनोमन हसली... तिला ओळखत असलेल्या सगळ्यांना गौतमीला लग्न करायचं नाहीये हे माहिती होतं. गौतमीला सुद्धा माहिती होतं आता कोणी तिच्याशी लग्न केलं तर ते फक्त त्यांच्या फायद्यासाठीच असेल. तिचा खरं प्रेम असत ह्यावरून तर तिचा विश्वास कधीच उडाला होता. गौतमीने बरेच पैसे खूप आधीच मिळवले होते आणि आता फक्त पैसे मिळवण्यात तिचा फार काही रस राहिला नव्हता. काही दिवसातच ती नोकरीचा राजीनामा देऊन भारतात राहायला जाणार होती तिच्या आईसोबत राहायला. कोणत्याच गोष्टीचा आता गौतमीला फरक पडत नव्हता. गौतमीनी आता काही निर्णय घेतले होते. ठरवल्याप्रमाणे तिने नोकरीचा राजीनामा दिला आणि भारतात परतायचा निर्णय घेतला. तिने आईला फोन करून मी भारतात परत येतेय अस कळवलं आणि ती उरलेली कामं उरकायला लागली...

गौतमी भारतात परतायच्या आधी एकटीच विचार करत बसली होती. खूप कमी वयात तिने अमाप पैसे कमावला होता. अर्थात, त्यासाठी तिने खूप कष्ट देखील केले होते. तिच्या पायाशी सगळी सुख लोटांगण घालत होती तरी गौतमीला काहीतरी मिसिंग वाटत होतं. त्यामुळे खूप पैसे असून सुद्धा गौतमी खुश नव्हती. कोणी जोडीदार मिळावा ही इच्छा तर तिने कधीच मागे सोडली होती कारण कोणासोबत राहण्यापेक्षा तिला आयुष्य एकटीनेच जगायचं होतं. आता गौतमी तिच आयुष्य एकटीने जगणार होती आणि त्याबद्दल गौतमीच्या मनात अजिबात दुःख नव्हतं. अगदी कोणी तिच्यासारखाच विचार करणारा कम्पनिअयन मिळाला तर तिला ते आवडणार होतं... खूप खंबीर राहून गौतमीने काही निर्णय घेतले होते पण मनातून नेहमीच उदास रहायची गौतमी! पैसे सगळी सुखं देऊ शकतं नाही ही गोष्ट तिला समजली होती. आता नवीन आयुष्य जगायला लागू अश्या विचारात ती होती पण ते नवीन आयुष्य काय पद्धतीनी जगावं हे मात्र तिला समजत नव्हतं. तिच्या मनात गोंधळ चालू होता. त्या गोंधळापासून पळण्यासाठी शेवटी तिने डोळे मिटून घेतले. आणि जादू झाली. तिच्या मनातून सगळेच विचार दूर गेले. त्या विचारांची जागा आता लहानपणी पाहिलेल्या स्वप्नांनी घेतली होती. तिचं अगदी पहिलं स्वप्न होतं ते रंगांशी खेळण्याचं!! लहानपणी ठरवलेल्या गोष्टी क्वचितच केल्या जातात पण लहानपणी तिला चित्रकलेची खूप आवड होती. ती लहानपणी खूप चित्र काढायची पण जशी मोठी झाली तशी चित्रकला मागे पडली. तिला ज्यातून सगळ्यात जास्त आनंद मिळायचा तेच तिने बंद केलं होतं. पण तो विचार आल्या आल्या तिने डोळे खाडकन उघडले. तिच्या चेहऱ्यावर एक प्रकारच तेज आलं होतं. तिला आलेली सगळी मरगळ मागे पडली होती. आता तिला काय करायचं ते माहिती होतं.

खरंच... नोकरी मिळाली आणि त्यानंतर गौतमी नुसती धावत होती ते फक्त पैसे कमवायला. पैसे मिळाले पण आनंद मात्र कुठेतरी मागेच राहिला होता. सगळीच सुखं पैश्यांनी विकत घेता येत नाहीत ते गौतमीला जाणवलं आणि ती स्वतःवरच हसली. तिच्या लक्षात आलं, पैसे मिळवण्यासोबत तिने स्वतःसाठी वेळ द्यायला हवा होता. पण स्वतःसाठी थोडाही वेळ तिने दिला नव्हता. आता मात्र तिला तिची चूक उमगली होती. आता गौतमी जगणार होती ते पैसे मिळवण्यासाठी नाही तर अर्धवट राहिलेली स्वप्न पूर्ण करण्यासाठी. विचार करता करता तिला जाणवत होतं की तिने फक्त पैसे मिळवण्याच्या नादात काय गमावलं होतं. खूप काही करायचं राहून गेलंय ही गोष्ट गौतमीच्या लक्षात आली आणि आता ती तिची चूक सुधारणार होती. तिने पटापट जाऊन तिचा मोबाईल काढला आणि काय करायचं राहून गेल त्याची गौतमी यादी करायला लागली. १. नवीन मित्र २. आईला वेळ ३. पेंटिंग ४. गिटार शिकणे ५. लेख आणि गोष्टी लिहिणे ६. भरपूर हिंडणे ७. गरजूंना मदत करणे- फक्त पैसे नाही तर वेळ सुद्धा ८. भरपूर कुकिंग करणे ९. निसर्गात रमणे १०. आनंद वाटणे इत्यादी इत्यादी... तिच्या यादीला जणू अंतच नव्हता. आपली यादी तयार करतांना गौतमीला हसू आवरत नव्हतं. आपण काय मिस केल ह्याची जाणीव तिला झाली. आणि तिने कपाळावर हात मारून घेतला. गौतमीनी यादी पुन्हा वाचली. यादीत पहिली गोष्ट होती 'नवीन मित्र...' आणि गौतमीच्या चेहऱ्यावर गोड हसू आल. बऱ्याच दिवसांनी गौतमी मनमोकळी हसत होती. तिचे नवीन मित्र सगळ्यांसारखे नव्हते. तिचे नवीन मित्र कोण असतील तो प्लान आधीच ठरला होता आणि आता गौतमी ते भारतात जाऊन पूर्ण करणार होती. गौतमीच्या चेहऱ्यावर खूप गोड हसू आलं आणि समाधानचं हसू होतं ते! तिच्या डोळ्यासमोर तिची अर्धवट राहिलेली सगळी स्वप्न एक एक करून यायला लागली. गौतमी तिच्या बॉक्समधून बाहेर पडून आयुष्य जगणार होती ते कोणाला दाखवायला नाही तर स्वतःसाठी!! आता गौतमीनी ठरवलं होतं, पैश्यापेक्षा जास्त महत्वाच आयुष्य मनाप्रमाणे जगणं हे आहे. आणि तिला जे जे करायचं होतं आणि राहून गेल होतं ते

ते सगळं गौतमी करणार होती. स्वप्न पूर्ण करायची वेळ कधी जात नसते आणि आता गौतमी तेच करणार होती. पैसे हा आयुष्यातला महत्वाचा भाग होताच आणि हे गौतमी नाकारत नव्हती पण ते करण्यासाठी स्वप्नांची तडजोड आता तिला मान्य नव्हती. मागे केलेल्या चुका आता गौतमी सुधारणार होती. आणि ह्या निर्णयावर गौतमी ठाम होती. ती तडक उठली आणि मॉल मध्ये गेली. तिने रंग आणि खूप सारे ब्रश विकत घेतले. त्याच बरोबर ती कॅनवास घ्यायला विसरली नाही. गौतमीला पाणी आणि निसर्ग नेहमीच भुरळ घालायचा पण आपल्या बिझी लाईफमध्ये तिने कधी निसर्गाकडे पाहिलं पण नाही. भारतात परतण्यापूर्वी ती तिच्या आवडीच्या ठिकाणी गेली. समोर एक निळंशार पाणी असलेला तलाव होता आणि बाजूनी मस्त क्रिसमस ट्री त्या तलावाची शोभा वाढवत होते. गौतमी ते दृश्य पाहून खुश झाली. तिने सगळ दृश्य डोळ्यात साठवून घेतलं आणि डोळे मिटून घेतले. डोळे उघडले आणि कॅनवास वर पेंटिंग काढायला लागली. ब्रशचा प्रत्येक स्ट्रोक गौतमीच्या चेहऱ्यावर समाधान आणत होता. ३ तास तिच्या आणि निसर्गामध्ये कोणीच आलं नव्हतं. तिचं पेंटिंग पूर्ण झालं आणि गौतमी आनंदून गेली. त्यावेळेची गौतमी उदास नव्हती. आणि त्याचं तेज तिच्या चेहऱ्यावर आलं होतं. स्वतःसाठी दिलेल्या वेळेची गौतमीला कित्येक दिवसापासून गरज होती आणि आता ते क्षण मिळाल्यावर तिच्या आनंदाला सीमा राहिली नव्हती. आता गौतमी तिचा प्रत्येक क्षणामधून काही ना काही वेचणार होती. निस्वार्थीपणे डोळे उघडे ठेऊन काहीतरी करण्यातला आनंद कल्पनातीत सुंदर होता. त्या पुढे कश्याचीच किंमत नाही हे गौतमीला जाणवत होतं. आणि ह्यापुढे गौतमी तिच्या स्वप्नांच्यामध्ये कश्यालाच येऊन देणार नव्हती. कॅनवास वर एक सुंदर पेंटिंग कधी तयार झालं हे गौतमीला कळलं पण नव्हतं. पण पेंटिंग पूर्ण झाल्यावर गौतमीला जो आनंद मिळाला होता तो अवर्णनीय होता!! ह्याच क्षणाची गौतमी वाट पाहत होती आणि तो क्षण प्रत्यक्षात आला तेव्हा गौतमी च्या चेहऱ्यावर समाधानचं हसू अवतरल होतं.

गौतमी भारतात परतली. आल्या आल्या तिने आईला घट्ट मिठी मारली तेव्हा आईने तिचे डोळे हेरले... आईला सुद्धा बदललेली गौतमी जाणवली. गौतमीची आई सुद्धा मनोमन सुखावली. आईला अंदाज होता गौतमीनी किती मोठा पल्ला किती कष्ट करून गाठला होता. आईशी बऱ्याच गप्पा मारून गौतमीनी आईला जॉब सोडल्याच सांगितलं. आपली मुलगी आपल्यासोबत आहे ह्यापेक्षा आईला सुद्धा अजून काहीच नको होतं. गौतमीनी आईला ह्यापुढे तिच्यासाठी स्वप्न जगणं महत्वाचं असेल हे सांगितलं आणि गौतमीच्या आईच्या चेहऱ्यावर सुद्धा हसू आलं. तिने लगेच लग्नाचा विषय काढून पाहिला पण गौतमी लग्न करण्याच्या मनस्थितीत अजूनही आली नव्हती. आता गौतमीला लग्न आणि काम सोडून अनेक गोष्टी खुणावत होत्या. ठरल्याप्रमाणे गौतमीने तिच्या आवडीची गिटार शिकण्यासाठी क्लास मध्ये नाव नोंदवलं. गौतमीची एक नाही दोन नाही किती स्वप्न अर्धवट राहिली होती आणि आयुष्य संपायच्या आत जमतील ती स्वप्न पूर्ण करायची होती. आता गौतमीचं वेगळ आयुष्य चालू झालं होतं आणि ते तिच्या मनाप्रमाणे!!! गौतमीला स्वतःचा शोध लागत होता. तिच्यासाठी ही सेकंड इनिंग होती. पहिली इनिंग फक्त कष्ट करण्यात गेली होती. आता तिची सेकंड इनिंग जगतांना गौतमी खुश होती. आपल्या यादीप्रमाणे सगळ्या गोष्टी गौतमी करत होती. तिने ठरवल्या -प्रमाणे भारतात आल्या आल्या तिने दर शनिवार रविवार फक्त अनाथाश्रम आणि वृद्धाश्रमासाठी राखून ठेवला होता. तेच तिचे 'नवीन मित्र' होते. आता तिच्या आयुष्यात तिला कश्याचीही कमी वाटत नव्हती. कामात सुद्धा तिचा अनुभव खूप असल्यामुळे तिने एक छोटीशी कंपनी चालू केली. पाहता पाहता त्याचा पसारा वाढला. पण आता गौतमी साठी फक्त काम महत्वाचे नव्हतेच. आता गौतमी कामाबरोबर तिच्या हॉबीला सुद्धा वेळ देत होती. गौतमीला एक गोष्ट समजली होती की आयुष्य जगण्यासाठी फक्त पैसे नाही तर इतर गोष्टी सुद्धा महत्वाच्या असतात. पाहता पाहता गौतमीने चाळीशी सुद्धा ओलांडली. गौतमी आपल्याला वेळ देते आहे ही गोष्ट गौतमीच्या आईला आनंदायी होती. गौतमीच्या एका निर्णयामुळे तिच्या आयुष्यात खूप काही बदललं होतं. आणि सगळेच बदल सकारात्मक होते. तिने लिखाण सुद्धा चालू केल होतं. गौतमी तशी कामामुळे फेमस होतीच पण लिखाणामुळे ती अजूनच फेमस होतं होती. गौतमी साठी फेमस होण्यापेक्षा लिहिण्यातला आनंद जास्त सुखावत होता.

अचानक एके दिवशी तिला एका पब्लिकेशन हाऊस मधून फोन आला आणि तिच्या अनुभवांचं पुस्तक छापायची इच्छा त्यांनी व्यक्त केली. तो तिच्यासाठी अजूनच सुखद धक्का होता आणि तेव्हा 'गौतमी - द राइटर' चा उगम होतं होता! त्याचबरोबर तिने एनजीओची पण स्थापना केली!! तिने परत काम सुद्धा चालू केलं होतं... गौतमी च आयुष्य आता भरलेलं होतं... त्यात पैसे, सुख, समाधान, आनंद सगळ काही होतं. आता गौतमी फक्त एकाच गोष्टीत अडकली नव्हती. पैसे फक्त हे उद्दिष्ट तिला राहिलेलं नव्हतं. तिच्या आयुष्यात पैश्याबरोबर खूप साऱ्या गोष्टी ॲड झाल्या होत्या. तिला आता कश्याचीच उणीव भासत नव्हती. कधी साथीदाराची उणीव तिला भासायची पण ही भावना जास्त वेळ राहायची नाही... इतर गोष्टीमधून मिळणारं समाधान जास्त होतं. तिच्या चेहऱ्यावरचं समाधानाच तेज आता स्पष्ट दिसत होतं. गौतमीच आयुष्य बदलायला एक कवडसा सुद्धा पुरेसा ठरला... एका संध्याकाळी गौतमी निवांत बसली होती. तिच्या आयुष्यातली रोलर कोस्टर राईड तिच्या डोळ्यासमोरून गेली. एका वळणावर तिचं पूर्ण आयुष्य बदललं होतं... आणि छोटस हसू तिच्या चेहऱ्यावर स्थिरावलं. समाधानानी गौतमी आरामखुर्चीवर पहुडली आणि डोळे मिटून घेतले. तितक्यात तिच्या फोन वर मेसेज आला. ''हॅलो गौतमी... राजस हिअर! आय मिस यु! मी पण भारतात आलोय... सगळं सोडून! आपण भेटायचं?'' गौतमीने तो मेसेज वाचला आणि तिच्या चेहऱ्यावर हसू अवतरले... कदाचित तिचं आयुष्य आता अजून एक वळण घेणार होतं...

***

मेकअप उतरवताना

– डॉ. अविनाश विनायक भोंडवे

प्रसिध्दी ही एक अशी गोष्ट असते ज्यात ग्लॅमर मिळतं, पैसा मिळतो पण प्रसिध्दी तिची किंमत वसूल करते. तुमची शांतता, तुमचं खाजगी जीवन गमावता. तुमच्या प्रत्येक हालचालीवर कुणाचं तरी सतत लक्ष असतं तुमच्या प्रत्येक कृतीचा, वाक्याचा, प्रत्येक शब्दाचा खरा खोटा अर्थ लावला जातो. जेव्हा तुम्ही प्रसिद्धीच्या लाटेवर स्वार होता तेव्हा तुम्ही प्रत्येक क्षणी परिपूर्ण असणं अपेक्षित असतं. एक चुकीची चाल झाली की त्यावरच्या प्रतिक्रिया वाऱ्याच्या वेगाने पसरतात. लोकांना प्रसिद्धी स्वातंत्र्य वाटते. पण तो एक सोनेरी पिंजरा असतो. पिंजऱ्याच्या आतच नाही तर बाहेरही तुम्ही तुमच्या प्रसिद्धीचे गुलाम असता.



टीपॉयवर ठेवलेल्या माझ्या मोबाईलकडं मी पहात होते. सकाळपासून तो एकदाही वाजला नव्हता. एके काळी त्याच्या रिंगटोनचा आवाज ऐकायला मी जीवाचे कान करायचे, पण गेली दोन वर्षं मला नाखूष ठेवण्यातच त्याला बहुमान वाटतो. घनघोर पावसाच्या धारा खिडक्यांवर दिवसरात्र आपटत रहाव्या, तशा माझा फोन गेली अठरा वर्षं, अहोरात्र वाजत राहायचा, अगदी मागच्या दोन वर्षांपर्यंत. त्यावेळी मला फोन घ्यायला सेक्रेटरी ठेवायला लागायची.

ते दिवसच वेगळे होते. मी एक स्टार होते. माझ्या घराबाहेर लोकांची रीघ लागत होती. निर्माते, दिग्दर्शक, लेखक त्यांच्यासोबत काम करावं, म्हणून मला फोनवर फोन करायचे. माझी लायब्ररी पुस्तकांपेक्षा

स्क्रिप्ट्सनंच भरून गेलेली असायची. वाचलेली, अर्धवट वाचलेली, चाळलेली, न उघडलेली, ऐकवलेली... एक ना दोन. माझ्या घरात स्क्रिप्ट्सचा महापूर दुथडी भरून वाहायचा.

माझा प्रत्येक दिवस, निरनिराळ्या भेटीगाठींनी, मिटींग्जनी भरलेले असायचा. या मोहमयी दुनियेत येऊ इच्छिणाऱ्या कलाकारांना ज्यांचं दर्शनही वर्षानुवर्षं व्हायचं नाही, असे एकाहून एक महान निर्माते, दिग्दर्शक, नट माझ्या होकाराची चातकासारखी वाट पहात असायचे. दिवसातले सहा तास स्टुडिओत शूटिंगमध्ये जायचे. शिवाय कधी मिडीयासाठी फोटोशूट, तर कधी प्रीमिअर्सला जायचं असायचं. माझ्या सेक्रेटरीच्या डायरीत माझ्या वर्षभराच्या तारखा आधीच बुक झालेल्या असायच्या. मी इंडस्ट्रीची लाडकी टॉपस्टार होते. माझा प्रत्येक चित्रपट प्रेक्षकांना खेचून आणायचा. प्रत्येक कलाकृती सुपर डुपर हिट व्हायची, सर्व ॲवॉर्ड्समध्ये मी विजेती असायचीच. वर्षानुवर्षं... तब्बल अठरा वर्षं. मी इंडस्ट्रीची गोल्डन गर्ल होते.

दोन वर्षांपूर्वी मला एका नव्या चित्रपटाच्या स्क्रिप्ट वाचनाच्या मिटिंगसाठी फोन आला, मी या आधीही काम केलेल्या दिग्दर्शकाच्या घरी मिटिंग होती. मी तिथं पाऊल ठेवलं आणि मला काहीसं वेगळं जाणवलं. नेहमीची ती अदब मला दिसली नाही. नेहमीप्रमाणे मला बसायला पुढची जागा दिली नव्हती. तरीही मी चेहऱ्यावर आत्मविश्वास दाखवत, त्या कोपऱ्यातल्या खुर्चीवर बसले. गेली पंधरा वर्षं सिनेसृष्टीला भुरळ पाडणारं माझं स्मितहास्य मी फ्लॅश केलं. दिग्दर्शकांशेजारी एक नवा चेहरा दिसला. त्यानं संहितेचं वाचन केलं. नंतर चर्चा झाली.

मी विचारलं, ''मग काय ठरवताय? स्टारकास्ट पक्की करूनच टाकताय ना? मला लीडिंग लेडीची भूमिका मान्य आहे.'' स्क्रिप्टमध्ये घुसवलेलं डोकं वर न उचलता तो नवोदित म्हणाला, ''खरं तर, आम्ही तुझा सपोर्टिंग कॅरेक्टरसाठी विचार करत होतो. या चित्रपटात तू हिरोच्या आईचा रोल करावास.''

थंड बर्फाळ पाण्याची एक उंचच्या उंच लाट माझ्या अंगावर चालून आली. पायाखालची जमीन सरकली...

आई? आणि तेसुद्धा या वयात? अजून मी पस्तीस वर्षांचीही नसताना? सत्तर फिल्म्समध्ये ग्लॅमरस नायिकेची भूमिका करून चित्रपट सृष्टीत खळबळ माजवणारी मी... आता अचानक कुणाच्या तरी आईची भूमिका करायची?

मी डोकं शांत ठेवण्याचा प्रयत्न केला, पण आतून मी किंचाळत होते. माझे डोळे विस्फारले. मी ते मिटूनही घेऊ शकत नव्हते. माझे तळहात ओले झाले होते. तोंडाला कोरड पडली होती. माझ्या जगाचे तुकडे तुकडे होत होते... मी हलूही शकत नव्हते. सर्वांगात मुंग्या पसरत चालल्या होत्या. माझे अंग हलायला नकार देत होतं... स्तब्ध... पुतळ्यासारखी. जणू मला अर्धांगवायू झाला होता. माझ्या अभिनयानं उभे केलेले उंच मनोरे, एकामागून एक ढासळत होते, जमीनदोस्त होत होते... प्रसिद्धीचं वलय विरून चाललं होतं. राजमार्गाने दौडत जाणाऱ्या माझ्या आयुष्याला आडरस्त्याच्या एका नव्या वळणावर रस्त्यावरनं बाजूला ढकललं होतं.

दिग्दर्शक माझ्याकडं रोखून बघत होते. हात हनुवटीवर ठेवून त्यांचं हसू लपवायचा प्रयत्न करत होते अभिनय करताना अशा मुद्रेतून काय सुचवायचं असतं, हे त्यांनीच मला वेळोवेळी सांगितलं होतं. तो लेखक मात्र खदखदा हसत होता. चंदेरी दुनियेचे रितीरिवाज त्याला अजून शिकायचे होते.

प्रयत्न करून ओठांचे कोपरे ताणत मी मी हसण्याचा अभिनय केला. मनात डंख असला, तरी चेहऱ्यावर प्रसन्न हास्य फुलवण्यालाच अभिनय म्हणतात. ''पहाते. हिरोची आई बनायचं, तर मला... मूलीके पराठे आणि गाजरका हलवा बनवायला शिकवायला लागेल तुम्हाला.'' मी डोळे न फिरवता नजरेच्या कोपऱ्यातून पाहिलं, पण माझ्या हजरजबाबी उत्तराला कुणीच दाद दिली नव्हती. कौरवांच्या भरसभेत माझी द्रौपदी झाली होती.

याच ठिकाणी माझी नायिका म्हणून निवड केल्यावर टाळ्या आणि शाबासक्या मिळायच्या. पण मी आज य:कश्चित होते. शूटींगच्या वेळेस माझ्यावर पडणाऱ्या प्रखर प्रकाश झोतांनी मला बाहेर ढकललं होतं.

त्या रात्री मी स्वत:ला आरशात निरखून पाहिलं. माझ्या चेहऱ्याचं रंध्र रंध्र नजरेखालून पडताळलं. मी आई दिसते का? षोडशा मी नक्कीच नव्हते, पण आई? माझं तारुण्य संपलं का? आता मी दुय्यम कामासाठी उरले का? अंतर्मनाचा आवाज डळमळत होता. समोर आरशात दिसतंय ते कोण आहे? माझं प्रतिबिंब? की आत्मा हरवत चाललेलं माझं भूत?

आयुष्याचा प्रवास मोठा गमतीदार असतो. विशीतल्या यौवनातलं यश तिशीमध्ये मावळू लागतं. फार दु:खद असतं ते. फुल स्पीडवर ठेवलेल्या पंख्याच्या पाती शून्याच्या गतीकडं सरकू लागतात. यशाच्या कैफात लक्षातच आलं नाही की मी आता अल्लड वयातली कोवळी किशोरी राहिलेली नाही... पण चंदेरी दुनिया नव्या लुसलुशीत बाहुल्यांच्या शोधात असते.

आकाशात गिरक्या घेत उंचच उंच गिरक्या उडणाऱ्या माझ्या विमानाला आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलने जमिनीवर आणलं. तो दुखरा क्षण होता रेड कार्पेट कार्यक्रमाचा. यापूर्वी कितीतरी ठिकाणी मी अशा क्षणांमध्ये जगावर राज्य केलं होतं. पण त्या दिवशीचा इव्हेंट माझ्यासाठी खास होता. परदेशातल्या माझ्या ड्रेस डिझायनरनं बनवलेल्या एका जबरदस्त काळ्या रंगाच्या गाऊनमध्ये, कॅमेऱ्यांचा लखलखाट अनुभवण्यासाठी, लाल गालिचाचं मैदान मारण्यासाठी मी सज्ज होते. अशा प्रसंगात माझी एक खास शैली असायची. कारमध्ये उजवीकडं बसायचं. कारमधून बाहेर पडण्यापूर्वी एक दीर्घ श्वास घ्यायचा, नटराजाचं स्मरण करायचं. नसानसांमध्ये चैतन्य आणायचं... मग हळूच उजवा पाय कार बाहेर टाकायचा आणि विजयी मुद्रेनं कॅमेऱ्याकडे दृष्टी फेकायची. जमलेल्या पापाराॅझींमध्ये एकच खळबळ उडवून द्यायची.

पण यावेळी मी नेहमीच्या शिरस्त्यात अलगद कारच्या बाहेर आले, पण एकही कॅमेरा माझ्याकडे वळला नाही. एरवी त्यांच्या चमचमाटानं आंधळं करून टाकणाऱ्या फ्लॅशची झगमग दुसऱ्या कोणासाठी तरी

लकाकू लागली. एक टवटवीत चेहऱ्याची नवी मुलगी माझ्या पलीकडून येत होती. पहिल्यांदाच तिनं एक मोठी भूमिका साकारली होती. आजकाल सर्वांच्याच तोंडात तिचं नाव होतं.

मी कार्पेटवरून माझ्या डौलाने पावलं उचलत गेले. या कानापासून त्या कानापर्यंत ओठ पसरवत, सर्वांकडं पहात माझ्या कमावलेल्या स्मितहास्याची उधळण करत गेले. पण एकाही छायाचित्रकाराने माझ्याकडे ढुंकूनही पहिले नाही. अशा रेड कार्पेटवर माझी अनेकदा मुलाखत घेणारी एक ओळखीची रिपोर्टर मला दिसली. मी तिच्यापाशी थांबले.

''हाय.'' मी तिला विश केलं.

''हाय'' तिनं मान वर करत माझ्याकडं पाहिलं आणि फोनवर एक नंबर फिरवत ती म्हणाली, ''सॉरी म्याम, मी आत्ता बोलू शकत नाही. आम्ही त्या उभरत्या तारकेची मुलाखत घ्यायचा प्रयत्न करतो आहोत.''

''ओह, किती छान.'' मी म्हणाले. ''कुणाची घेताय?''

''ती पहा... ती आली. ती नवं सेन्सेशन.''

मी हसत म्हणाले, ''अर्थात. नक्कीच. नवीन तारे जास्त तेजानं चमकतात, बरोबर?''

''हो. पण म्याम वाईट वाटून घेऊ नका'' ती मागं वळून बघत म्हणाली. ''तुम्ही ऑल टाईम क्लासिक आहात.''

घशात आलेला आवंढा मी गिळला. हा क्लासिक शब्द उसन्या कौतुकासारखा वाटला. जशी काही मी शंभर वर्षांपूर्वीची जुनी व्हिंटेज कार आहे आणि जुन्या क्लासिक गाड्यांच्या प्रदर्शनांत मला मांडलं आहे.

खरंच मी एक भूतकाळ बनले आहे? नवे, तरुण, ताजे, अधिक तेजस्वी चेहरे उदय पावतच राहतात. जसजसे ते शिखरांवर चढत जातात, तसतसे तुम्ही हळूहळू क्षीण होऊ लागता. मी अजून ३५ वर्षांचीच आहे, पण माझे कॉल्स थांबले. यापुढे मुलाखती नाहीत, ऑडिशन नाहीत, लीडिंग रोल्स नाहीत. या फिल्मी जगानं जणू पक्कं ठरवलंय की यापुढे त्यांच्यासाठी मी कोणी विशेष नाही, मी एक गुजरा हुवा जमाना आहे.

मागच्या महिन्यात खूप दिवसांनी माझ्या मैत्रिणीचा फोन आला. ती म्हणाली मोकळी असशील तर दुपारी लंचला जाऊ. कुणी बोलावल्यावर आपण फ्री असणं म्हणजे आपल्याला कामं नसण्याची कबुली असते. मी म्हटलं, ''या आठवड्यात खूप डेट्स आहेत, शूटिंगच्या. पुढच्या आठवड्यात जाऊ. आणि लंच नको, कॉफी घ्यायला भेटू.''

अखेर आम्ही दोघी पंचतारांकित हॉटेलच्या कॅफेत एका शांत कोपऱ्यात लॅट्टे कॉफीचे घुटके घेत गप्पा मारत बसलो. चेहरा ओळखू येऊ नये, म्हणून मी मोठ्या आकाराचे सनग्लासेस घातले होते. एका परीने मी लोकांपासून अदृश्य होण्याचा प्रयत्न करत होते.

अचानक एक तरुण पण गलेलठ्ठ मुलगी आमच्या टेबला जवळ आली, तिनं घातलेला तोकडा मिनिस्कर्ट तिच्या गरगरीत आकाराला बिलकुल शोभत नव्हता. वर तिनं खोल गळ्याचा, फुलाफुलांच्या नक्षीदार डिझाईनचा टॉपलेस घातला होता. असे कपडे आम्हाला सिनेमातही घालायची लाज वाटते. मुलीचा ड्रेस कसा हवा? घालणाऱ्याचं नको ते झाकणारा आणि पाहणाऱ्याला हवं त्याची फक्त झलक दाखवणारा.

मला पाहताच त्या मुलीच्या भुवया उंचावल्या, डोळे विस्फारले आणि तोंडाचा चंबू झाला. फिरंगी हेल काढत, चिरक्या आवाजात ती म्हणाली, ''ओह गॉड, ओह नो... मी तुम्हाला ओळखलं. तुम्ही... तुम्ही त्या सिनेमात काम केलं होतं ना...? मला खूप आवडला होता तो. काय बरं नाव त्याचं... अं.. अं... अ ने सुरु होतं... नाही आ ने.'' ती हात उडवत, डोकं खाजवत, लहान मुलांसारखी उभ्या उभ्या पाय आपटत होती. मागच्या वर्षी गाजलेल्या माझ्या पिक्चरचं नाव आठवायसाठी धडपडत होती.

सिनेमाचं नाव आठवण्यासाठी कसकसले चाळे करणाऱ्या मुलीकडं बघताना मला हसू आलं. त्या मतिमंद पोरीची मला कीव आली. शेवटी तिच्या स्मरणशक्तीला आणखी त्रास नको म्हणून मी म्हणाले, ''आकार शून्य, हो ना?''

''हो!'' तिचा चेहरा उजळला. माझ्याकडं कौतुकानं बघत ती उद्गारली, ''मी लहान असताना तो चित्रपट माझ्या आईसोबत पाहिला होता! यू आर सिम्पली ग्रेट! तू एक महान अभिनेत्री आहेस.''

धन्यवाद देत मी हसले खरी, पण मला कुणीतरी पाठीत खंजीर खुपसतंय असं वाटलं. ती म्हणते की लहान असताना? आत्ता ती वीस वर्षांची असेल... मग काय ती डायपर घालण्याइतकी छोटी असताना तिनं माझा सिनेमा पहिला होता? इतकी वर्षं नव्हती झाली काही माझ्या चित्रपटाला. ''ती जेव्हा लहान होती, तेंव्हा मी किती वर्षांची असेन? मी वर्तमानाच्या ऐवजी भूतकाळाचा भाग केव्हा बनले? अचानक, मला खूप जख्ख म्हातारी असल्यासारखं वाटलं.''

पण पुन्हा अभिनयच माझ्या कामी आला. ''ओह, धन्यवाद. तुम्हाला माझा पिक्चर आवडला, माझा अभिनय आवडतो... मला खूप बरं वाटलं ऐकून.'' हळूवार आवाज लावून फॉर्मल शब्द वापरणं मला चांगलं जमतं. माझ्या प्रतिसादावर ती खळाळून हसली आणि निघून गेली. मला कॉफी प्यावीशी वाटेना. का कुणास ठाऊक, पण मी कोणाच्यातरी लहानपणाच्या आठवणीची तसबीर असल्याची विचित्र जाणीव मला अस्वस्थ करून गेली. ब्लॅक अँड व्हाईट जमान्यातल्या थोर नायिकांच्या पंक्तीत जाऊन बसल्यासारखं वाटलं मला.

गेली, दोन वर्षं मी स्वत:ला निरखतेय, पारखतेय, साऱ्या आठवणी चाचपून बघतेय. माझा सारा अभिमान मी बासनात गुंडाळून ठेवलाय. अनपेक्षित धक्के खाऊन डळमळीत झालेली माझी अस्मिता, फुंकर घालून पुन्हा तेवत ठेवतेय.

कळसूत्री बाहुली मी कधीच नव्हते आणि बनणारही नाही. त्या काळात फिल्मी पाट्यांना मला बोलावलं, तर मी जायचे. कचकड्यांनी बनलेल्या आणि खोटा मुखवटा लावलेल्या त्या लोकांमध्ये मिसळायचे. स्वतःच्या यशाची गाणी गाणाऱ्या नटनट्यांचे, सार्वजनिक एकपात्री प्रयोग मी शांतपणे ऐकायचे. मात्र स्वत:बद्दल कधीच बोलायचे नाही. पण मी कोण आहे? मी कशी आहे? हे मला कळण्यासाठी मीच त्यांच्याशी बोलत राहायचे. जग ही एक रंगभूमी नक्कीच असते, नाही आहेच ती;

पण स्वत:शिवाय कोणापुढेही असं केंव्हाही आणि कुठेही परफॉर्म करण्याची गरज नसते.

प्रसिद्धी ही एक उफराटी गोष्ट असते. त्यात ग्लॅमर मिळतं, पैसा मिळतो, पण अपरंपार कष्टही असतात. पण प्रसिद्धी तिची किंमतही वसूल करते. तुमची शांतता, तुमचं खाजगी जीवनही गमावता. तुमची प्रत्येक हालचाल कुणीतरी सतत पाहत असतं, तुमच्या प्रत्येक कृतीचा, प्रत्येक शब्दाचा, प्रत्येक वाक्याचा खरा खोटा अर्थ लावला जातो. जेव्हा मी प्रसिद्धीच्या लाटेवर स्वार होते, फिल्म इंडस्ट्रीमध्ये अग्रस्थानी होते, तेंव्हा माझ्या लक्षात आलं की इथं तुम्हाला प्रत्येक क्षणी तुम्ही परिपूर्ण असणं अपेक्षित असतं. एक चुकीची चाल झाली की त्यावरच्या क्रूर प्रतिक्रिया वाऱ्याच्या वेगानं पसरतात. लोकांना प्रसिद्धी हे स्वातंत्र्य वाटतं, पण तो एक सोनेरी पिंजरा असतो. त्या पिंजऱ्याच्या आतच नाही, पण बाहेरही तुम्ही तुमच्या प्रसिद्धीचे गुलाम असता.

माझा मेकअप मी आता उतरवला आहे. मला फोन येत नाहीत, मला कुणी समारंभांना बोलावत नाहीत, पण मेकअप विना मला आता मुक्त वाटतंय. अशी मुक्त मी कधीच नव्हते. स्वातंत्र्याच्या श्वासाचा सुगंध मी भरभरून अनुभवते. मी माझी कीर्ती गमावली, पण ती गमावताना मी स्वत:ला शोधू शकले. मी आता ती त्या मेकअपच्या आतली ग्लॅमरस छोकरी राहिले नाही, मी आता कुणाच्या इशाऱ्यांवर नाचत नाही. माझं आयुष्य आता पूर्ण माझं आहे. आपुलाची वाद आपल्याशी करत माझ्या मनाचा संवाद चालू राहतो. टीपॉयवरचा मोबाईल वाजूच नये असं वाटतं.

***





राजस्थान स्वीट मार्ट

हमारे यहाँ सभी प्रकारकी बढीयां मिठाईयाँ और नमकीन मिलेगा।

मु. पो. सायखेडा, एस.टी. स्टँड के सामने,
ता. निफाड, जि. नाशिक

प्रोप्रा. भवरलाल
गोकुलराम प्रजापती
Mo. 9423184307
9503571807

मरुधर स्वीट कॉर्नर

सायखेडा, चौफुली, चाटोरी,
ता. निफाड, जि. नाशिक

मुल पता : डोली, राजगुरा, जि. बाडमेर, राजस्थान.



मुक्ताई व्हेज डायनिंग





श्री. रमेश कुंभार
7798484876
9423234810

श्री. ऋषिकेश रमेश कुंभार
96049 41015
Hotel Management Digree

प्रसाद रमेश कुंभार
9970500282
9422987114
ITI Hotel Mg. Cert. Course

उरूळी कांचन, रामंदिराशेजारी, कुंभार आळी, पुणे ४१२ २०२

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!







प्रोप्रा. सोमनाथ पुंजाराम सोनवणे

अध्यक्ष : कुंभार सामाज सामाजिक संस्था नाशिक जिल्हा
अध्यक्ष : नाशिक जिल्हा विकास समिती
अध्यक्ष : अभोणा शहर राष्ट्रवादी काँग्रेस
सचिव : हनुमान मंदिर ट्रस्ट अभोणा
संचालक : अभोणा वाचनालय
मो.: 7741894986, 9422763816

सुधाकर पुं. सोनवणे
9423933450

चिंतामण पुं. सोनवणे
9850464275

सप्तश्रृंगी विट आणि बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स

सप्तश्रृंगी दुध डेअरी

मु.पो.अभोणा, ता. कळवण, जि.नाशिक

आमचे प्रेरणास्थान






श्री. निखिल प्रकाश भालेराव
डायरेक्टर

श्री. निलेश प्रकाश भालेराव
डायरेक्टर

सौ. कल्पना व श्री. प्रकाश शंकरराव भालेराव

car&bike
Mahindra FIRST CHOICE

फर्म

CarstockXchange™
SEVICES

All Type Pre- Owned cars Purchase, Sales & Exchange

Address : S No. 28.20 Near Wada Hotel, Next to Audi Showroom, Behind Tony Dhaba (Baner),
Mumbai banglore Highway,Sutarwadi, Pashan, Pune - 411021

Nikhil - 9766456456 Nilesh - 9921974777 Prakash - 9921546072 Kalpana - 8805253766

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!







डॉ.गंगाधर आगलावे पाटील
M.B.B.S., D.ORTHO
ORTHO SURGEON अस्थिरोग तज्ञ

डॉ.सौ.कविता आगलावे पाटील
FAMILY PHYSICIAN

मोरया हॉस्पिटल

उपलब्ध सुविधा

- जनरल वॉर्डस् / स्पेशल रुम
- सुसज्ज ऑपरेशन थिएटर
- डिजीटल एक्स-रे मशिन (300mA X-RAY MACHINE)
- सर्व उपकरणे चालवू शकणारा शक्तीशाली जनरेटर
- स्वतंत्र फिजिओथेरपी विभाग
- सी-आर्म इमेज इंटेन्सिफायर (Allenger SR 49-9hf C-Arm)
- मल्टीपॅरा मॉनिटर
- इलेक्ट्रीक बोन कटिंग, ड्रिलींग अॅण्ड रिमींग सिस्टिम
- फ्लेक्झिबल रीमर्स
- ऑपरेशन लाईट
- नेब्युलायझर
- फ्रॅक्चरचे ऑपरेशन
- सांधे बदल शस्त्रक्रिया
- दुर्बिणीद्वारे सांध्यांचे ऑपरेशन
- मणक्याचे ऑपरेशन
- कॉम्प्युटराईज्ड पॅथॉलॉजी लॅब
- सहयोगी सुसज्ज मेडीकल स्टोअर

सर्व्हे नं. ४५/७/४, सर्टीफाईड स्कूल शेजारी, (मूक बधिर विद्यालय), नवीन नगरपालिका इमारतीसमोर, शिरुर, ता.शिरुर जिल्हा पुणे
फोन : 02138-225899, 299445, 9766395445



किसन उर्फ बाळासाहेब विठ्ठल जामदार
अध्यक्ष : शिरुर तालुका कुंभार समाज

मयुरेश विट कारखाना

संकल्प, कुंभार आळी, मु.पो.ता.शिरुर, जि.पुणे ४१२२१०
मो.९२२६२४१४१६, ९८२२०९८८५८



आमचे प्रेरणास्थान



कै. सुर्यकांत नारायण राजे



सचिन सुर्यकांत राजे
मो.: 9822636008



संदिप सुर्यकांत राजे
मो.: 9922639339

नर्मदा वीट उत्पादक

आमचेकडे उत्तम प्रकारच्या सर्व साईजच्या वीटा होलसेल भावात मिळतील.
पत्ता : मु.पो.हरपळवाडी (पाल), इमरसन कंपनी शेजारी, निसराळे-तारळे रोड, ता. कराड, जि.सातारा.

नर्मदा गणेश आर्टस्

आमचेकडे होलसेल भावामध्ये कच्च्या व पक्क्या सुबक गणेश मुर्ती मिळतील
(सार्वजनिक मंडळासाठी खास सवलत)
पत्ता : बी.एस.एन.एल. ऑफिसच्या पुढे,एन.एच.४, मु.पो.नागठाणे, ता.जि.सातारा
निवास : नर्मदा निवास, मु.पो.नागठाणे, सासपडे रोड, ता.जि.सातारा ४१५ ५१९

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

Instill
Architecture • Interior

Office :
Instill Architecture & Interiors,
8, Dena Vjay Colony, near CCM,
Untawadi rd., Nashik- 422002.

WE PROVIDE
DESIGN CONSULTANCY FOR,

- Apartment Schemes
- Bungalows
- Farmhouses
- Restaurant & Café Interior
- Retail Interior
- Office Interior


Nashik Infrastructure- Best Design Awar

Ar. Yogesh Kumbhar
E-mail: instillarch@gmail.com
Mobile: 9022 996772

Id. Harshal Kumbhar
E-mail: instillarch@gmail.com
Mobile: 9579316396

Id. Chandrakant Borse
E-mail: instillarch@gmail.com
Mobile: 94222 88735








दिलीप शामराव घोडनदीकर
अध्यक्ष, लायन्स क्लब, पुणे आकांक्षा
प्रोप्रा : दिलीप शामराव घोडनदीकर
मोबा. : 09371012308

प्रोप्रा : दिगंबर दिलीप घोडनदीकर
मोबा. : 9850150415

प्रोप्रा : प्रविण दिलीप घोडनदीकर
मोबा. : 9028530827



Our New Product
For
Builders
and
Contractors
"New Mini Lifter"

डेअरी ईक्विपमेंटस् व अन्नप्रक्रिया, लघु उद्योगासाठीचे फूड प्रोसेसिंग मशिनरीचे उत्पादक

स्टॅन्डर्ड इंडस्ट्रिज
एस ८७, एम.आय.डी.सी. भोसरी, पुणे ४११०२६ फोन : ०२०-४६७६७६९६

स्टॅन प्लॅंट इंडस्ट्रिज
सर्वे नं.४३/९-१६, मानाजी नगर, नऱ्हेगांव पुणे ४११ ०४१ फोन : ०२०-४६९९२२९
Email : response@stanplant.com dilip.ghodnadikar@gmail.com www.stanplant.com

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



प्रोप्रा.संजय तुकाराम गोरे
9822601958



सौ.संगीता संजय गोरे



चि.ओंकार संजय गोरे
B.Com
8554058303

जय तुळजा भवानी वीट कारखाना

सीपोरक्स वीटांचे निर्माते

आमच्याकडे सर्व प्रकारच्या साईजच्या वीटा
होलसेल भावात मिळतील

पत्ता : निळकंठ नगर भाग २, श्रीपाद समर्थ बंगला,हरीपूर रोड, मु.पो.हरीपूर, ता.जि.सांगली



नामदेव रामदास मोरे
९८२२२०१९८३
गव्हर्मेंट कॉंट्रॅक्टर
PWD Pune



सौ. छाया नामदेव मोरे





देवेन नामदेव मोरे
M.E.(Civil)
Jr. Engg.(PWD)Pune

मोरेश्वर
कन्स्ट्रक्शन

रोड आणि बिल्डींग कॉन्ट्रॅक्टर ✻ हॉट मिक्स प्लांट
रोड रोलर, जे.सी.बी. आणि सेन्सर पेव्हर भाड्याने मिळेल.
ऑफीस : ओम अनंत, विशालनगर, जगताप डेअरी, औंध वाकड रोड, पुणे-४११ ०२७.
E-mail : moreshwarcont@gmail.com

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

॥ श्री गणेश प्रसन्न ॥

कुंभार ब्रदर्स

KUMBHAR BROTHERS



श्री.संतोष कुंभार

- जुन्या इमारती व जुन्या इमारतीचे मटेरीयल विकत घेऊ व देऊ
- आर.सी.सी. बिल्डींग, फार्म हाऊस, देवळा करीता व देवघराची सुंदर आकर्षक डिझायनची चौकट व दरवाजे ऑर्डरीप्रमाणे तयार करुन देऊ
- ऑर्डरीप्रमाणे सागवान व जंगली लाकूड साईज प्रमाणे कापून देऊ
- अँटीक वस्तु मिळतील





पत्ता - सांगली रोड, शरद कॉलेज समोर, यड्राव सुत गिरणी जवळ, इचलकरंजी.

Mob.- 9822107599, 9844107599



Ramesh Anant Kumbhar
Mob.: 9137304224



Sou.Vaninta Ramesh Kumbhar



Rahul R. Kumbhar
B.Sc. (Hospitality)
S.Y. M.B.A.



Soham R. Kumbhar
S.Y. M.B.B.S.

RS **Rahul & Soham**
Construction

Prop. Ramesh Anant Kumbhar
Room No. 1, Kamubai Chawl, Raut Galli, R.P. Road,
Nr.Shaibaba Mandir, Dahisar Gaonthan, Dahisar (W),
Mumbai 400068 Mob.: 9330948465 91373 04224

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

since 1993

Tech MODERN AUTO INDUSTRIES PVT. LTD.

Refrigerated, Insulated & Dry Container Manufacturers from LMV,s to HMV,s



राजेश वि. कुंभार सौ. उर्मिला रा. कुंभार



चि.ओंकार रा. कुंभार
BE AUTO / MBA



चि.आदित्य रा. कुंभार
B-TECH AUTO





Unit I - Gat No. 128,Nade(East),Tal-Patan, Dist-Satara
Unit II- D-67, MIDC Tasawade,Tal-Karad, Dist-Satara.

Contact- 9970614119 / 7770086515
www.modernmotorsauto.com



बापुराव म.गोरे
उपाध्यक्ष नाशिक जिल्हा विकास समिती
मा.सरपंच मळगाव(ती)
९९२३६७७७५५/९४२३२२४५९८



चि.सागर बा.गोरे
B.Pharm. M.B.A.



प्रकाश म.गोरे
९९२३७६८५५५



चि. निलेश प्र.गोरे
B.Sc. M.B.A.



शरद म.गोरे
९९२३५७९४४४

सागर वीट सप्लायर्स

आमचेकडे उत्तम प्रतिच्या सर्व आकाराचे वीटा होलसेल भावात मिळतील

मु.पो.मळगाव,(ती) पोस्ट व ता. सटाणा, मातोश्री निवास जि.नाशिक 423301

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था (रजि.)



ज्ञानेश्वर शंकर भागवत
प्रदेश अध्यक्ष
अखिल महाराष्ट्र कुंभार
समाज विकास संस्था



सौ.मंगला ज्ञा.भागवत
संचालिका
तुळजा भवानी ग्रामीण
बिगरशेती सह. पतसंस्था
घोटी



राहुल ज्ञा.भागवत
बी.फार्म.
संपर्क 9822256949



मंजुषा राहुल भागवत
एम.फार्म.
Pharmacology



चि.डॉ.आतिष ज्ञा.भागवत
M.B.B.S.
Medical Officer Nandgaon



कु.पल्लवी ज्ञा.भागवत
M.Pharm.
T.C.S. Hinjawadi, Pune



डॉ.अतुल ज्ञा.भागवत
B.D.S.
9028852324
REG.No. A-36659



डॉ.प्रिती अतुल भागवत
B.D.S.
REG.No. A-49799

न्यु नंदिनी मेडीकल





ज्ञानमंगल दातांचा दवाखाना

वासुदेव चौक, घोटी, ता.इगतपुरी, जि.नाशिक संपर्क 9226704724 /9028811102

Leading in Mechanical Engg. works.....with non-stop fast service.....since 2000 sucessfully

॥ श्री सिध्दनाथाय नमः ॥



Supporting Smart People

25 CELEBRATING 25 YEARS

SIDDHIVINAYAK ENTERPRISES

All kind of industrial Hardware, Electronics,
Electricals & General Supplier
(As per IS, ISO, DIN, ASTM, BS, IBR Standard)

Vilas Dengale
M.B.A.
Managing Director

- Manufacturer : Engg. Project / Components (With Materials / As Per Drg., **Tailer Made Items) MSME Registered**
- Stockist & Suppliers : Nut / Bolts, Tool, Pipe- Fitting , Flanges, Gaskets, Pressure Gauges, Safety Products & General Items.
- Supported Items For : Level, Flow, Temperature, Pressure, Process, Management, Automation Instruments.
- Third Party Inspection : EIL, RITES, LLOYD'S, BVQI, Intertek, Toyo, PDIL etc.
- Reputed Clients : Cummins Inc (Jamshedpur, Kothrud, Phaltan, Pirangut) EMERSUN, Endress + Hausar, Vega India, Yokogawa India (MNC's), HEMRL Defence Dept. Govt of India, More than 60 companies interact.

- Business Partners : In State + Inter State + Global Level **CELEBRATING 25 YEARS...**

Cell : +91 9822194124 (Vilas) ✻ 9922194111 (Lata) ✻ 9822194123 (Harshal) ✻ 7588232788 (Manasi) ✻ 020-25478453 (Landline)
Sister Concern : Moving Forward..... SKYLARK Tradelink, Pune
Email: vilas_dengale@rediffmail.com / vilasdengale@gmail.com
visit us at www.siddhivinayakindia.in
Pune - 411052 INDIA Follow us on

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



डॉ.उषादेवी कुंभार
(MBBS)



डॉ.केदार कुंभार
(MBBS DMRE)
Consultant Radiologist



डॉ.जयश्री केदार कुंभार
(MBBS, D.G.O.)

अल्ट्राव्हिजन
डायग्नोस्टिक सेंटर

- सोनोग्राफी
- डिजीटल एक्सरे
- कलर डॉपलर
- 3D / 4D
- 2D इको
- ईसीजी
- OPG

Sayaji Trade Centre, Gargoti

Timing : 10 am to 6 pm
+91 9890498184,
+91 866898961

डॉ.जी.एस.कुंभार मेमोरियल संचलित

आयुर्वेदिक पंचकर्म - दर बुधवारी

सोनोग्राफी, गरोदर माता तपासणी, सुलभ प्रसुती, सिझेरियन प्रसुती, बालरोग चिकित्सा, गर्भाशय, अपेंडीक्स, हर्णिया शस्त्रक्रिया, जनरल मेडिसीन, गर्भपात व कुटुंबकल्याण शस्त्रक्रिया

मोहर

बाह्यरुग्ण विभाग १०.०० ते २.००
सोनोग्राफी : स.८.०० ते.स.१०.००
संध्या. ६.०० ते रात्री १०.००

डायग्नोस्टीक सेंटर व मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल

फोन : 0231-2356243, 9673258194

इस्पुर्ली, ता.करवीर, जि.कोल्हापूर











Architect Sagar Sanjay Kumbhar 9960575555

OUR SPECIALITY

*Design *Building Permissions

Consultation About Building Permissions For

#Industrial Shed #Institutional Building #Commercial Buildings

Office : City Pride, Office No.01, 1st Floor, Sec. No.25, Near Bhel Chowk, Pradhikaran, Nigdi, Pune 44.

सुखाचा त्रिकोण

– श्रीमती रश्मी रामचंद्र पटवर्धन, पुणे

लहान मुलांना कुटुंबाची गरज असते. आई-वडिलांच्या प्रेमाची गरज असते. मुलांना नुसती महागडी खेळणी आणून दिली आणि कधीतरी हॉटेलात जेवायला नेले म्हणजे आई वडिलांचे कर्तव्य संपत नाही. मुलांना आई-वडिलांचा वेळ हवा असतो, प्रेम हवे असते. आपले विचार, भावना आई - बाबांना सांगावे असे त्याला वाटते. पण आई वडिलांकडे मुलासाठी वेळच नसतो. त्यामुळे मुले एकटी पडतात, एकलकोंडी होतात, वाईट संगतीत पडतात. भरकटतात.



दुपारचे जेवण झाल्यावर रोहिणीताई आरामात पेपर वाचत बसल्या होत्या. तेवढ्यात कर्कश्यपणे दारावरची बेल वाजली. रोहिणीताईंनी जरा वैतागूनच दार उघडलं. दारात घामाघूम झालेले विनायकराव उभ्याउभ्याच विचारू लागले. ''अहो, रोहिणीताई, रोहन आत्ता शाळेत गेला असेल ना?''

''हो. तो शाळेत गेलाय.''

''नाही हो. त्याला पोलिसांनी पकडून नेलंय. मी पाहिलं आत्ता.''

''अहो, विनायकराव, काय बोलताय तुम्ही रोहनला कशाला पोलीस

पकडतील? तो तर शाळेत गेलाय.''

''अहो, मी सावीला शाळेत सोडायला गेलो होतो. तेव्हा घरी परत येताना एका गल्लीच्या तोंडाशी मला पोलिसांची गाडी दिसली. पाच-सहा मुलांना पोलीस गाडीत बसवत होते. पंधरा-सोळा वयाचीच होती सगळी मुलं. सगळ्यात शेवटी शाळेच्या युनिफॉर्ममधील एका मुलाला पोलिसांनी गाडीत ढकललं. मला तो मुलगा रोहनसारखा वाटला म्हणून मी गाडीच्या जवळ जाऊन पाहिलं. तर तो रोहनच होता. दप्तरानं चेहरा लपवायचा प्रयत्न करत होता.''

मी पोलिसांना म्हटलं सुद्धा, ''अहो, मी या मुलाला ओळखतो. त्याला कशाला गाडीत चढवलं? काय केलंय त्यानं?''

''काय केलंय या मुलांनी? अहो, गर्दच्या पुड्या सापडल्यात या सगळ्यांजवळ. ही मुलं दिसतात लहान, पण महाबिलंदर आहेत. काळाचौकी पोलीस चोकीत नेतोय सगळ्यांना. चार फटके दिले की बोलतील घडाघडा सगळे.''

''एवढे बोलून पोलिसांनी गाडी चालू केली. आणि क्षणार्धात ती गाडी दिसेनाशी झाली.''

''कशीबशी रिक्षा पकडून मी तुमच्याकडे आलो.''

विनायकरावांना बोलताना धाप लागली होती. छातीवर हात ठेवून ते थोडावेळ शांतपणे बसले.

रोहिणीताईंनाही गरगरायला लागले होते. दोन्ही हातांनी डोकं गच्च दाबून धरून त्या बसून राहिल्या. शेवटी विनायकरावच घाईघाईने रोहिणीताईंना म्हणाले, ''चला आपण लगेच काळाचौकी पोलीस चौकीत जाऊ. चला उठा पटकन.''

अर्ध्या तासात दोघेजण पोलिसचौकीत पोहोचले. सगळ्या मुलांना एका बाकड्यावर बसवले होते. रोहन दप्तरात डोकं खुपसून रडत होता.

रोहिणीताईंनी मायेनं त्याच्या डोक्यावरून हात फिरवला. ''काय झालं रोहनबाळा. का रडतोयंस? काय झालं?''

रोहनला रडण्याचा आणखीनच उमाळा आला. तो आजीच्या गळ्यात पडून हमसूनहमसून रडू लागला. रोहिणीताईंनी थोपटून त्याला पोटाशी धरले.

एव्हाना पोलिसांनी मुलांना त्यांच्या पालकांचे फोन नंबर विचारून चौकीत बोलवून घेतले होते.

थोड्याच वेळात रुचा आणि विवेक पोलिसचौकीत येऊन पोचले. तिथे आईला बघून रुचाला आश्चर्य वाटले.

''अगं, आई, तू इथं कशी? काय प्रकार आहे हा सगळा?''

''रुचा, मलाही काही माहीत नाही गं. विनायकरावांनी रोहनला पोलीस पकडून नेताना पाहिलं. धावतपळत येऊन मला सांगितलं आणि आम्ही इथे आलो. बस एवढंच.''

दरम्यान विवेक पोलीस इन्स्पेक्टरला भेटला होता. इन्स्पेक्टरनी रोहनकडे गर्द सापडल्याचं ऐकून तो हादरलाच. कसं शक्य आहे हे?

विवेक कळवळून इन्स्पेक्टरला म्हणाला, ''साहेब, तुमचा काहीतरी गैरसमज झालेला दिसतोयं. रोहनकडे गर्द असणं शक्यच नाही. किती लहान आहे तो. तो कुठून आणेल गर्द? आणि ही मुलं कोण आहेत? त्यांच्याबरोबर का बसवलंय तुम्ही रोहनला? त्याचा काय संबंध आहे त्या मुलांशी? ती काही त्याच्या शाळेतली नाहीत. झोपडपट्टीतली वाटतात.''

इन्स्पेक्टर शांतपणे म्हणाले, ''बरोबर आहे तुमचं. तुमचा मुलगा वेगळाच आहे त्या मुलांपेक्षा. शिवाय शाळेच्या युनिफॉर्ममध्ये आहे. म्हणजे शाळेत जात असणार. पण शाळेत जाऊन तो काय उद्योग करतो ते कधी विचारलंत का त्याला?''

''गर्द सापडलंय त्याच्या दप्तरात. शाळेच्या मागच्या बाजूच्या ग्राउंडवर सापडली ही सगळी मुलं. गर्द अजूनही त्याच्या दप्तरातच आहे. आम्ही हातही लावला नाही त्याच्या दप्तराला. तुम्ही हवंतर खात्री करून घ्या.''

विवेकनं इन्स्पेक्टरांच्या टेबलवरच रोहनचं दप्तर ओतलं. त्यातून गर्दची पुडी बाहेर पडली.

विवेकला काय बोलावं तेच सुचेना. पोलिसांनी रोहनला रंगेहात पकडलं होतं. पोलीस आता त्याला काय शिक्षा देणार या विचारात तो होता तेव्हढ्यात इन्स्पेक्टर त्याला म्हणाले, ''रोहन चांगल्या घरातला मुलगा दिसतो. पण त्याला संगत वाईट लागलेली दिसते. वेळीच सावध व्हा.''

''रोहन पहिल्यांदाच सापडलाय. शिवाय वयही कमी आहे म्हणून फक्त वॉर्निंग देऊन सोडून देतोयं पण सांभाळा तुमच्या मुलाला.''

''पुन्हा जर असा गुन्हा करताना सापडला तर आम्ही काही करू शकणार नाही. शिक्षा म्हणून सुधारगृहात पाठवावे लागेल त्याला.''

''या आता तुम्ही. घेऊन जा तुमच्या मुलाला.''

विवेक रोहनला इन्स्पेक्टरच्या केबिनच्या बाहेर घेऊन आला. बाकीची पोरं निर्ढावल्यासारखी इकडेतिकडे बघत बाकड्यावर बसून होती. पोलिसचौकीच्या बाहेर दहा-बारा बायकामाणसांचा आमच्या पोरांना सोडा म्हणून गलका चालला होता. हवालदार कोणालाच आत सोडत नव्हता.

रोहनला घेऊन सगळेजण रोहिणीताईंच्या घरी आले. रोहनला कोणीच काही विचारले नाही. तोही मान खाली घालून गुपचूप बसून होता. झाल्या प्रसंगाने ओशाळला होता.

खरंतर गर्द म्हणजे काय हे त्याला माहीतही नव्हतं. शाळेच्या ग्राउंडवर खेळत असताना त्यानं त्या मुलांना पाहिलं होतं एक दोनदा. बोलला नव्हता कधी त्या मुलांशी. तसाही रोहन शाळेत फारसा कुणाशी बोलत नसे. एकटाएकटाच राहत असे. टिफिनही एकट्यानेच खात असे. अधूनमधून मम्मी-पप्पाचं वागणं आठवून रडत असे.

असेच एकदा तो रडत असताना त्याला त्या मुलांनी पाहिले. खुणेनंच त्याला शाळेच्या कंपाऊंडजवळ बोलावलं. का रडतोस म्हणून विचारलं. पण त्यावेळी रोहननं त्यांना काही सांगितलं नाही.

ती मुलं रोजच रोहनला पाहत होती. त्याच्या रडण्याचं कारण विचारत होती. हळूहळू रोहनची भीड चेपली. ती मुलं त्याला जवळची

वाटायला लागली. तो त्यांना पप्पाचं दारू पिणं, घरात रोज मम्मी-पप्पांची होणारी भांडणं, दोघांचं घरी उशिरा येणं, त्याच्याकडं दुर्लक्ष करणं अशा एकेक गोष्टी सांगू लागला.

ती मुलं त्याला धीर देत. ''अरे, हमरा बाप भी दारू पिके आता है। हमे पिटता है। मगर हम उसकी बाते सुनतेही नहीं। वो घर आया की हम घरसे भाग जाते है।''

''तू डर मत। तेरे पापाभी सुधर जायेंगे।''

एक दिवस ती मुले त्याला म्हणाली, ''रोहन, तेरे दर्दके लिये हमरे पास एक भन्नाट आयडिया है। लेकीन उसके लिये तेरे पास पैसे चाहिये। तू तेरे घरसे पैसे लेके आ, फिर हम तेरेकु वो चीज देंगे। एक बार तुमने वो दवा ली, तो तेरे सब दर्द खतम। एकदम हल्का लगता है। हम हवामे उडने लगते है। सपनोंकी दुनियामे चले जाते है। सोच ले एक बार और पैसे लेके आ।''

दुसऱ्या दिवशी रोहनला ती मुलं भेटली. त्यानं त्यांच्याकडं ते स्वप्नाच्या दुनियेतलं औषध मागितलं. त्याच्याकडं पैसे नव्हते. पण एक महागडी कॅडबरी होती. ती त्याने त्या मुलांना देऊ केली. कॅडबरी पाहून मुलांच्या तोंडाला पाणी सुटलं. कॅडबरीच्या बदल्यात एक पुडी द्यायची का त्याला? त्यांच्यात वाद सुरु झाला. गर्दच्या बदल्यात पैसेच घ्यायचं असं त्यांच्या म्होरक्यानं त्यांना बजावलं होतं. पण कॅडबरीचा मोहही त्यांना सुटत नव्हता.

त्यामुळं दादाचा मार खावा लागला तरी चालेल पण आज कॅडबरी खायचीच म्हणून त्यांनी शाळेच्या कंपाऊंडच्या फटीतून गर्दची एक पुडी हळूच त्याच्याकडे सरकवली होती. पण ती पुडी त्याच्याकडं सरकवत असताना नेमकं गस्तीवरच्या पोलिसानं पाहिलं आणि गुपचूप पोलिसांची गाडी बोलावून घेतली. एकेकाला हंटरने बडवत गाडीत चढवत असतानाच विनायकराव तिथे आले आणि त्यांनी रोहनला पोलिसांच्या गाडीत बसताना पाहिलं.

घरी आल्यावर रोहिणीताईंनी सगळ्यांना सांगितलं की आत्ता रोहनला काहीच विचारू नका. घाबरलाय पोरं. जरा त्याच्या कलानं घेऊ. सांगेल सगळं हळूहळू. आजच्या दिवस राहू दे त्याला इथंच. उद्या इथूनच मी त्याला शाळेत सोडून येईन. शाळेत कळायला नको कुणाला उगीच.

''बरं. ठीक आहे.'' म्हणून रोहनचे मम्मी-पप्पा ऑफिसला निघून गेले.

रोहिणीताईंनी रोहनला बळेबळे जेवायला घातले. त्यानं कसेबसे चार घास खाल्ले आणि बेडरुममध्ये जाऊन पलंगावर पडून राहिला. रोहिणीताई त्याच्याजवळ येऊन बसल्या. त्यांना आलेले पाहताच रोहननं पांघरूण डोक्यापर्यंत घेऊन झोपेचं सोंग घेतलं.

रोहिणीताईंनी थोडावेळ वाट पाहिली. रोहन मुसमुसत होता. त्याला आपली चूक कळली होती. त्याला रोहिणीताईंना सगळं सांगायचं होतं. पण त्याचा धीर होत नव्हता.

थोड्यावेळानं रोहिणीताईंनी हळूच त्याच्या डोक्यावरचं पांघरूण दूर केलं. रोहननं हातांनी तोंड झाकून घेतलं आणि पुन्हा मुसमुसू लागला. रोहिणीताईंनी त्याचं डोकं मांडीवर घेतलं. त्याला थोडावेळ शांत होऊ दिलं. मग रोहनच बोलायला लागला.

''आज्जी, माझं चुकलं गं. मी त्या मुलांचं ऐकून ती पुडी घ्यायला नको होती. पण मला माहीत नव्हतं आणि अजूनही माहीत नाही त्या पुडीत काय होतं ते. त्या मुलांनी मला सांगितलं होतं की, या पुडीतलं औषध घेतलंस की तू तुझं सगळं दुःख विसरून जाशील. तुला एकदम हल्क वाटेल आणि तुला हवेत उडत असल्याचा भास होईल.''

रोहिणीताई समजुतीच्या स्वरात म्हणाल्या, ''पण रोहन, मला एक सांग, तुला असं कोणतं मोठं दुःख आहे, जे तुला विसरायचंय. तुझे मम्मी-पप्पा तुला हव्या त्या सगळ्या वस्तू तू मागितल्याबरोबर आणून देतात. कधीकधी तर तू न मागताच तुला सगळं काही मिळतं. मग तुला आणखी काय हवंय?''

''मला फक्त माझे मम्मी-पप्पा हवेत. त्यांचा वेळ हवाय मला. माझ्याकडं लक्षच देत नाहीत ते. सारखं आपलं ऑफिस, मित्र-मैत्रिणी, पार्टी, शॉपिंग, आऊटिंग, मोबाईलवर चॅटिंग आणि उरलेल्या वेळात भांडणे. त्यांना आऊटिंगला जायचं असलं की मला पाठवतात तुझ्याकडं.''

''मी नकोय त्यांना. आणि ते तरी एकमेकांना कुठे हवे आहेत? सारखे एकमेकांशी भांडत असतात. कोण चुकीचं आणि कोण बरोबर यावरून रोज भांडण असतं. कधीच शांतता नसते घरात. सारखी आपली दोघांची वटवट चालू असते. मला कंटाळा आलाय त्यांचा. मला नकोत माझे मम्मी-पप्पा. मी सोडणार आहे त्यांना.''

''रोज मला वाटतं, मम्मीने मला जवळ घ्यावं. आज शाळेत काय गमतीजमती झाल्या ते विचारावं. मम्मीने स्वतः स्वयंपाक करावा. मग आम्ही तिघांनी मिळून एकत्र जेवायला बसावं. हसत-खेळत जेवण झाले की मम्मीने किंवा पप्पाने जवळ बसून माझा होमवर्क घ्यावा.''

''पण असं कधीच होत नाही. मी शाळेतून आल्यावर फ्रीजमधलं काहीतरी गारढोण अन्न खाऊन खेळायला जातो. खेळून आल्यावर माझ्या खोलीत जाऊन होमवर्क करतो. नंतर रात्रीच्या जेवणात बाहेरून मागवलेलं ते बेचव सूप, नुडल्स किंवा पुलाव, बिर्याणी खाऊन माझ्या खोलीत जाऊन चित्र काढत बसतो किंवा गेम खेळत बसतो.''

''हल्ली मम्मी-पप्पा रोज भांडत असतात. दोघंही उशिरा घरी येतात. मग उशीर का झाला त्यावरून वादावादी. मी घरी एकटाच असतो याचं कोणालाच काही वाटत नाही. पूर्वी मम्मा लवकर घरी यायची. आल्यावर मला जवळ घेऊन बसायची. पण आता मम्मा उशिरा येते. पार्टीहून आली असेल तर ड्रिंकही घेतलेले असते. कधीकधी डायरेक्ट झोपायला निघून जाते. कधीकधी टीव्ही बघत बसते. लहर असेल तर जेवते. नाही तर तशीच झोपते. मी दिवसभर काय करतो, जेवलो की नाही, अभ्यास केला की नाही हे काही विचारत नाही.''

''आणि पप्पा नाही का तुझी चौकशी करत?''

''पप्पाचंही तेच. पूर्वी आठवड्यातून एक-दोनदा बाहेरच ड्रिंक घेत असे. पण आता रोजच ड्रिंक घेतो. मग त्याला माझी आठवणही येत नाही.''

''मी माझ्या खोलीत बराच वेळ जागाच असतो. मला आता अभ्यास करावासा वाटत नाही आणि शाळेतही जावंसं वाटत नाही. माझे अभ्यासात लक्ष लागत नाही. मी कदाचित नापासही होईन.''

''रोहन, अरे, लहान मुलांनी मोठ्या माणसांच्या गोष्टीत लक्ष घालू नये. किती कष्ट करतात ते दोघंजण. दमून जात असतील.''

''त्यांना काय झालंयं दमायला? दिवसभर ऑफिसात बसायचं आणि नंतर पार्ट्या करायच्या.''

''मला काय हवंयं ते नको का समजायला त्यांना?''

''आता बघं हं, दोन दिवसांपूर्वी मम्मा वेळेत घरी आली होती. पप्पाने घरी यायला उशीर होईल म्हणून फोन केला होता. मी आणि मम्मानं जेवण केलं आणि आम्ही दोघं आईस्क्रीम खायला गेलो. आम्ही परत येत असताना पप्पाची गाडी दिसली. मी पप्पाला हाक मारली. पण पप्पा गाडी न थांबवता जोरात पुढे निघून गेला. गाडीत पप्पाबरोबर कोणीतरी बाई होती. कोण होती ते आम्हाला नीट दिसलं नाही. पप्पा घरी पोचला असेल म्हणून आम्ही घाईघाईने घरी आलो. पण पप्पा घरी आलेला नव्हता.''

बराच वेळ आम्ही पप्पाची वाट पाहिली. तो घरी आला नाही म्हणून मम्मानं त्याला फोन केला. पण त्यानं फोन उचलला नाही. शेवटी कंटाळून आम्ही दोघे झोपायला गेलो. खूप दिवसांनी मम्मा बरोबर फिरल्याने मला बरं वाटत होतं. मला लगेच झोप लागली. मध्यरात्री जाग आली तेव्हा मम्मी-पप्पा जोरजोरात भांडत होते. शेवटी मम्मा वैतागून हॉलमध्ये सोफ्यावर येऊन झोपली. नंतर थोड्या वेळाने पप्पा हॉलचे दार जोरात आपटून घराबाहेर निघून गेला. नंतर रात्री परत घरी आलाच नाही.

''अरे बापरे, मग केव्हा घरी परत आला?''

''दुसऱ्या दिवशी रात्री मम्माने त्याला बऱ्याच वेळा फोन केल्यावर घरी आला. त्याने ड्रिंक घेतले होते. मम्माने त्याला तू इतका वेळ कुठे होतास म्हणून विचारले तर वसकन तिच्या अंगावर ओरडला व स्वतःची बॅग भरून घराबाहेर निघाला होता. मम्मीने त्याला खूप वेळा सांगितले की तू घराबाहेर जाऊ नकोस. पण तो ऐकतच नव्हता. मला तुमच्याबरोबर राहायचे नाही. मी तुमच्यापासून लांब निघून जाणार'' असे सारखे म्हणत होता.

''शेवटी मी त्याचे पाय घट्ट धरून ठेवले व मी पण तुझ्याबरोबर येणार म्हणून हट्ट धरला. मग थोड्या वेळाने पप्पा बेडरूममध्ये निघून गेला व दार आतून लावून घेतले. मम्माने बराच वेळ दार वाजवले पण त्याने दार उघडलेच नाही. दाराच्या पीपहोल मधून पहिले तर पप्पा कपडे न बदलता, बूट न काढता तसाच झोपला होता. मग मी व मम्मा माझ्या खोलीत झोपलो.''

''दुसऱ्या दिवशी सकाळी मी उठून शाळेची तयारी केली तरी दोघेही उठले नव्हते. सुमननं मला टिफिन दिला. मी शाळेत गेलो आणि तेव्हाच मला त्या मुलांनी त्या औषधाबद्दल सांगितलं.''

''मग दोन-तीन दिवसांनी मला म्हणाले, तू घरातून पैसे आण, मग तुला आम्ही ते औषध देतो.''

''माझ्याकडे त्यांना देण्याइतके पैसे नव्हते. मग मी एक भारीची कॅडबरी त्यांना दिली व त्यांनी मला ते औषध दिले.''

''पण तू तर शाळेत होतास. मग ती पुडी त्यांनी तुला दिली कशी?''

''शाळेच्या मधल्या सुट्टीत मी शाळेच्या मागच्या बाजूच्या ग्राउंडवर बसलो होतो. सारखे घरातून पळून जाण्याचे विचार मनात येत होते. पण घरातून पळून कसे जाणार याचा विचार करत मी मान खाली घालून बसलो होतो तेवढ्यात त्या मुलांनी मला खुणेनं कंपाऊंडजवळ बोलावलं. पैसे आणलेस का म्हणून विचारलं. मी नाही म्हणताच मग दुसरे काहीतरी दे म्हणाले.''

''मग मी कंपाऊंडवरून उडी मारून बाहेर गेलो. त्यांना एक भारीची कॅडबरी दिली व ती पुडी मागितली. पण नेमकी ती पुडी घेत असताना आम्हाला एका पोलिसाने पाहिले आणि पोलिसांची गाडी बोलावून पोलीसचौकीत नेले.''

''मला त्या पुडीतील औषधाबद्दल काहीच माहीत नव्हते. मी ती पुडी दप्तरात ठेवली होती. पोलीसचौकीत गेल्यावर पोलिसांनी पप्पाला ती पुडी माझ्या दप्तरात आहे म्हणून सांगितले. पप्पाने दप्तर टेबलावर ओतले तेव्हा ती पुडी सापडली. म्हणजे मी रंगेहात पकडला गेलो असं पोलीस म्हणाले.''

''अच्छा, असं झालं तर.''

''बरं. ठीक आहे. तू आत्ता थोडावेळ आराम कर. रात्री तुझे मम्मी-पप्पा आले की बघू.''

आजीच्या कुशीत रोहन शांतपणे झोपून गेला. त्याच्या निरागस चेहऱ्याकडे पाहून आजीला खूप वाईट वाटलं. रात्री ते दोघं आले की चांगलं खडसावयाचं असा विचार करत रोहिणीताई रात्रीच्या स्वयंपाकाची तयारी करायला उठल्या.

रात्रीचा स्वयंपाक करून दोघांची जेवणं झाली तरी रुची-विवेकचा पत्ता नव्हता. रात्री दहानंतर दोघं आले ते तणतणतच. आल्या आल्या त्यांनी रोहनला रागवायला सुरुवात केली.

शांतपणे त्या दोघांकडे वळून रोहिणीताई म्हणाल्या, ''रुची-विवेक तुम्ही रोहनला रागावताय. पण तो असा का वागतोय याचा विचार केलात का कधी? रोहननं मला सगळं सांगितलं आहे. किती गुणी पोरगं आहे ते. पण तुमच्या वागण्याने बिथरलंय.''

''रोहनला तुम्ही दोघेही हवे आहात. त्याला नुसती महागडी खेळणी आणून दिली आणि कधीतरी हॉटेलात जेवायला घेऊन गेलात म्हणजे आई-वडिलांचं कर्तव्य संपत नाही. त्याला तुमचा वेळ हवायं, तुमचं प्रेम हवंय. अडनिडं वय आहे त्याचं. याच वयात मुलांना जपायचं असतं.''

''तुमच्या वागण्याचा परिणाम होतोयं त्याच्या मनावर. शाळेत पहिला-दुसरा नंबर येणारा मुलगा नापास होण्याच्या मार्गावर आहे. बेजबाबदार रोहन नाही तर तुम्ही दोघं वागतायं.''

''तुम्ही दोघंही उशिरा घरी येता. बऱ्याच वेळेला ड्रिंक घेतलेलं असतं. दोघांची भांडणं होतात. आणि रुची तूसुद्धा ड्रिंक घेतेस? केव्हापासून प्यायला लागलीस?''

''अगं आई, 'कॉर्पोरेट कल्चर' जपण्यासाठी आणि या रॅट रेसमध्ये धावण्यासाठी कराव्या लागतात काही मनाविरुद्ध गोष्टी.''

''अगं पण स्वतःचा संसार, मुलगा, नवरा महत्वाचा की ती रॅट-रेस? कशाला महत्व द्यायचं ते आपणच ठरवायचं. तुझं स्वतःकडेही नीट लक्ष नाहीयं. गालाची आणि मानेची हाडं वर आलीतं त्या रॅट रेसमध्ये धावताना. विवेक तुझंही लक्षण काही ठीक दिसत नाही. तुझे तांबारलेले डोळे बघ जरा. ते डोळेच सांगतायंत तू कसा वागतोस ते.'' दोघंही मान खाली घालून बसले होते. आपण गृहीत धरलेला सुखाचा त्रिकोण असा कसा बिघडला? रोहनला सगळी सुखं देऊनही तो बाहेर सुख का शोधतोय?''

नंतर थोडे दिवस रोहन रोहिणीताईंकडेच राहिला. तिथूनच तो शाळेत जात होता. शाळेत त्याने इतर मुलांशी मैत्री केली. आता तो एकटा ग्राउंडवर जातही नव्हता. रोहन सुधारलेला पाहून सगळ्यांनाच बरं वाटलं.

रोहिणीताईंच्या खडसावण्याने रुची-विवेकचे ही डोळे उघडले. त्यांनी आपल्या वागण्यात सुधारणा केली आणि त्यांचा सुखाचा त्रिकोण परत जुळला. पुन्हा कधीच न मोडण्यासाठी.

***

१९४७ पासुनचे पुण्यातील पहिले

पाषाणकर गॅरेज

PROFESSIONAL SPRAY AND BAKE BOOTH

सर्व प्रकारच्या कार स्प्रे पेंटींग स्पेशालिस्ट

ॲक्सिडेंट जॉब व इन्शुरन्स क्लेमची कामे खात्रीशीर व योग्य भावात करून मिळतील.

२५१/१, सदाशिव पेठ, भावे स्कुल समोर, पुणे - ३०.

फोन : ०२०-२४४७५७८८, ४०५८५५५.

* प्रोप्रायटर *

दत्तात्रय नानासाहेब पाषाणकर
मो. ९८२२०००५०३

सुरज सुरेश पाषाणकर
मो. ९८९००५९९९५

कै. बाळासाहेब उर्फ सुरेश नानासाहेब पाषाणकर

खास वैशिष्ट : पेन्टींग रुम



सर्व कुंभार समाज बांधव व कुंभश्री परिवारास गोरे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!



श्री. बाळाजी भिमाजी गोरे
ज्येष्ठ सत्यशोधक व कुंभश्री प्रतिनिधी
Mo. 9673862392



कै. सौ. अन्नपुर्णा बाळाजी गोरे
दे. राजा, जि. बुलढाणा



सुरेश बाळाजी गोरे
दे. राजा, जि. बुलढाणा
Mo. 9673145938



रमेश बाळाजी गोरे (पोलीस)
दे. राजा, जि. बुलढाणा Mo. 9923273071

सर्व कुंभार समाज बांधव व कुंभश्री परिवारास शेवाळे परिवारातर्फे हार्दिक शुभेच्छा!

श्री. पांडुरंग नामदेव शेवाळे
औषधी निर्माण अधिकारी चिखली, जि. बुलडाणा
Mo. 8888854655



सौ. प्रमिला पांडुरंग शेवाळे
Mo. 9764328620



श्री. संदीप पांडुरंग शेवाळे ME Ph. D
(Chemical Engineering) प्राध्यापक
MIT आळंदी Mo. 9823272765



चि. प्रदिप पांडुरंग शेवाळे ME
(Comp. Sci & Engg.) प्राध्यापक
D.Y. Patil College of Engineering, Pimpri) Mo. 9860363240

लग्न गोंधळ

– मिलिंद गीतारामदास

आजकाल मुलांची लग्ने जमवणे कठीण झालंय. लग्नासाठी मुलींच्या मुलांकडून अपेक्षा वाढल्या आहेत. मुला-मुलीच्या वयात कमी अंतर असावे, मुलाला भरपूर पगार असावा, सरकारी नोकरी असावी, स्वतःचे घर असावे, गाडी असावी इत्यादी. अपेक्षा आणि अटींचा खेळ सध्या मुला-मुलींच्या आयुष्यात चालू आहे. त्यामुळे मुला-मुलींची लग्ने रखडली आहेत. मुलामुलींची वये वाढत आहेत. पण लग्न लवकर जुळत नाहीत. 'लग्न गोंधळ' या कथेत अशाच एका लग्नाळू मुलाने वधूवर सुचक मंडळाच्या फॉर्ममध्ये भरलेल्या एका चुकीच्या माहितीमुळे काय गोंधळ उडाला ते वाचा.



माणसाला आयुष्यात काय लागतं. अन्न, वस्त्र, निवारा. यात ॲड करायचं झालं तर लग्न करावं. कारण सध्या ज्या पद्धतीने ऑनलाईन विवाह साईट आणि लग्न जुळवण्याऱ्या ज्या संस्था निघाल्या आहेत त्या वरून लग्न जमणं सध्या किती कठीण झालंय हे दिसतंय. पूर्वीच्या काळी लोकांच्या अपेक्षा माफक होत्या. नात्यातला एखादा चांगला मुलगा, मुलगी असेल तर लग्न पटकन जुळवून टाकायचे. नोकरी, घराच्या बाबतीत फार अपेक्षा नसायच्या. मुलगा, मुलगी चांगले असले. कुटुंब चांगले असेल. तर बाकीच्या गोष्टी दुय्यम असायच्या. आणि लग्न वेळेवर पटकन होत.

काळ बदलला मुली शिकू लागल्या चांगल्या कमवू लागल्या. त्यामुळे शिकण्यासाठी करियर करण्यासाठी त्यांना वेळ लागू लागला. लग्न ही आताशी उशिरा होऊ लागलीत. मुलींच्या त्यांच्या आई वडिलांच्या अपेक्षा वाढल्या त्यामुळे शिक्षण होऊन छोटी मोठी नोकरी असून मुलांना मुलीवाले नापसंत करू लागले आहेत. मुलाची स्वतःची मोठी जागा हवी ही अपेक्षा ही वाढू लागली आहे. व्यवसाय करणारा मुलगा तर मराठी बहुतेक मुलींना आणि त्यांच्या पालकांना नकोसा असतो कारण नोकरीत जी काही थोडी फार सुरक्षितता असते ती व्यवसायात नाही असं त्यांचं ठाम मत. त्यामुळे मराठी माणसात मोठे उद्योजकच निर्माण होत नाही आहेत.

प्रेम करून लग्न करणारे मोजकेच. कारण शाळा कॉलेजात प्रेम प्रकरण करून लग्ना पर्यंत जाणं बहुतेकांना कठीण होतं. कदाचित प्रेम करून कंटाळा ही काही जणांना आलेला असतो. त्यातून मन ही भरलेलं असत. मग फॉर अ चेंज म्हणून म्हणा किंवा आई वडिलांचा विरोध नको म्हणून म्हणा. प्रेम प्रकरण करत असणारे किंवा करून मोकळे झालेले ही या लग्न स्थळांवर आपलं नाव लग्नासाठी रजिस्टर करत असतात.

आता हे इतकं सगळं मी तुम्हाला का सांगतोय? तर नमस्कार माझं नाव सुनील चव्हाण. वय वर्ष २७. उंची : पाच फूट पाच इंच. गहू वर्ण. शिक्षण : मास्टर इन कॉमर्स - मॅनॅजमेण्ट मधून, सध्या लॉ च्या शेवटच्या वर्षाला आहे. कामाला सध्या पाणी खात्याच्या जुन्या इमारतीत लोक विकास पक्षाच्या ऑफिसच्या ऍडमिनिस्ट्रेशन विभागात ऍडमिनि -स्ट्रेशन अँड लीगल असिस्टंट म्हणून काम करतोय. मागील तीन वर्षापासून पगार : २५०००/- महिना. स्वतःची जागा नाही. वडिलांची चाळीत जागा आहे. रिडेव्हलोपमेंट चालू आहे. येत्या एक दोन वर्षाच्या आत वन बेडरूम मिळण्याची आशा आहे. एक मोठी बहीण आहे जिचं लग्न झालेलं आहे. कुठे सुयोग्य मुलगी असेल तर सांगा. हे सगळं लोकांना सांगून सांगून मी खूप कंटाळलोय. मागच्या तीन वर्षा पासून मी हेच करतोय. पण अजून मनासारखी मुलगी मिळाली नाही आहे.

तुम्हाला सांगतो खरं म्हणजे मला लव्ह मॅरेज करायचं होत. पण मुळात दुर्दैवाने मनासारखी मुलगी प्रेम करण्यासाठी कधी सापडलीच नाही. बरं घरची परिस्थिती बेताची असल्यामुळे मुलीला फिरवण्यासाठी ना बाईक होती. ना पैसे. वडिलांनी मी कॉलेजमध्ये असताना बरेच रडल्यानंतर त्यांचा बोनस झाल्यावर एक सायकल घेऊन दिली होती. आणि कॉलेजवाल्या मुलाला काहीतरी पॉकेट मनी द्यायला हवा म्हणून महिन्याला फक्त दोनशे रुपये देत होते, आता अशा परिस्थितीत गर्लफ्रेंडला फिरवणं मला परवडणार नव्हतं. तसेच माझ्या नात्यातल्या जेवढे काका, मामा होते त्यांची सगळ्यांची अरेंज लग्न झालेली होती. आमच्या नात्यात प्रेम करून लग्न केल्याचा इतिहास नव्हता.

वडिलांनी तर मला स्पष्टच सांगितलं होत. ''प्रेम करून लग्न करायचं असेल तर स्वतःच्या जीवावर वेगळं राहून करावं. आमच्या कडून कुठली ही मदतीची अपेक्षा करायची नाही.'' आई ने तर कॉलेज मध्ये मी असताना आमच्या नाटकात काम करण्याऱ्या मुलीचा फोटो कपडे धुताना माझ्या खिशात सापडलेला तेव्हा मला दमच देऊन ठेवला होता ''मुस्काट फोडेन प्रेमाची लफडी वगैरे करशील तर.'' त्यामुळे प्रेम करून लग्न करायची इच्छा मनात दाबून लग्न करून मग प्रेम करावं असं मी ठरवलं. पण अरेंज लग्न जमण्यातल्या अडचणी बघितल्या आणि लग्न करूच नये असं वाटू लागलं.

बहिणीचं लग्न झालं आणि मी निश्वास सोडला. एकदाचं हिचं लग्न झालं आणि मी बोहल्यावर चढण्यासाठी तयार झालो. वडिलांनी मला बरोबर घेऊन जाऊन आमच्या मराठा समाजातील एका फेमस वधू वर सूचक मंडळात माझं नाव नोंदवलं. मला फॉर्म भरून द्यायला सांगितला पण पगार या ऑप्शन वर माझी गाडी अडकली. पगार मोठा नसल्यामुळे मी थोडा घुटमळलो. सरकारी ऑफिसच्या इमारती मध्ये आमच्या पार्टीच ऑफिस असल्यामुळे मी नोकरी रकान्यात सरकारी ऑफिस मध्ये कामाला लिहिले. फॉर्म मध्ये जागा कमी असल्यामुळे बारीक अक्षरात पार्टी ऑफिसच नाव लिहिलं. पण ते क्लिअर दिसत नव्हतं. पण पुढे जाऊन इथे मोठा घोटाळा होणार याची मला कल्पना नव्हती.

वधूवर सूचक मंडळात नाव नोंदवून मी माझ्या लग्नाच्या शोधा-शोधीचा श्री गणेशा केला. मग रोज वेळ मिळेल तेव्हा साईट वर स्थळ शोधायला सुरवात झाली. बऱ्याच शिकलेल्या सुंदर मुली होत्या. पण त्यांचे जास्त पगार, शिक्षण बघून त्यांना लग्नासाठी कॉल करण्याची हिम्मत होईना. एखादी शिक्षणाने नोकरीने दिसायला बरी मुलगी सापडली तर एकतर तिच्याशी माझी पत्रिका जुळायची नाही. पत्रिका जुळली तर मुलींच्या अपेक्षा बघून डोकं गरगरायचं.

अपेक्षा पुढील प्रमाणे असत : ''वयामध्ये फक्त दोन वर्षांचाच फरक हवा.'' मी मनात म्हणे वयाने लहानच मुलगा करा इतका फरक तरी कशाला हवा म्हणून लिहितात. ''पगार किमान ४०-५० हजार हवा. स्वतःची जागा हवी. सरकारी नोकरी असेल तर उत्तम.'' आता अशा अपेक्षा असल्यावर या मुलींना काय कर्म कॉल करून कॉन्टॅक्ट करणार.

माझा प्रोफाइल बघून काही मुलीवाले आम्हाला कॉल करायचे. मला एक मुलगी आली फोटोत ती ठीक वाटली. एका रविवारी सकाळी आम्ही त्यांना भेटायला हॉटेल मध्ये गेलो. मनात धाकधूक समोरून मुली वाले आले. मला वाटले मुलगी छान असेल पण सगळा भ्रम

निरास झाला. मुलगी खूप काळी होती. फोटो मध्ये तिला उजळ केलेलं होतं. मी फारसं काही बोललो नाही. होकार असेल तर कळवतो सांगून आलो. पहिलीच सुरवात अशी झाल्यामुळे मन थोडं नाराज झालं.

वडील मात्र मला बडबडत होते. पोरगी शिकलेली आहे. तब्बेतीने धडधाकट आहे. नोकरीला चांगली आहे. घरातले ही चांगले वाटले. पण याला अप्सरा हवी झालीय. चवळीची शेंग हवीय. हाडाची काडं असलेली मॉडेल नखरेल मुलगी संसार करायला कशी चालेल. आजच्या पोरांना काय समजत नाही वगैरे.'' मी म्हणालो ''घाई कशाला करता आहात? मुली बघायला आताशी सुरवात केली आहे.'' थोड्या अजून मुली बघू. वडील गप्प बसले.

एक एक नमुन्या मुली आणि त्यांचे घरातले आम्हाला भेटायला लागले. त्यामुळे त्यांना बघायला उत्सुक असलेला मी. त्यांना प्रत्यक्ष बघून निराश होऊ लागलो.

काहींचे आई वडील तर डोक्यात जात. एक तर हॉटेल मध्ये माणसांची गर्दी असे आजूबाजूच्यांना माहीत असे मुलगा मुलगी बघण्याचा कार्यक्रम चालू आहे. ते आमच्याकडे टक लावून बघत आणि ऐकत बसत. त्यामुळे मी आधीच नर्व्हस असे. त्यात मुलीचा बाप किंवा एखादा त्याच्या बरोबर आलेला अति शहाणा नातेवाईक डोक्यात जायचा नको ते प्रश्न करून. ''किती पगार आहे? इतका कमी पगार का? नोकरी पर्मनंट आहे का? तुम्ही नक्की काय काम करता? अजून स्वतःची जागा का घेऊ शकला नाहीत? कधी घेणार? आई वडिलांबरोबर राहणार की वेगळं?'' एक ना दोन हैराण करणारे प्रश्न करायचे. त्यात त्यांची मुलगी दिसायला चांगली असेल तर त्यांना चेव चढायचा. मुलीकडे बघून मी बऱ्याचदा मनातला राग दाबून चेहरा हसरा ठेवून शक्यतो बोलण्यात सौजन्य ठेवून उत्तरे द्यायचो, कदाचित होकार देतील असे वाटून. पण मुली वाले प्रश्नांचा किस काढून. मग नंतर काहीच होकार नकार कळवायचे नाहीत.

हॉटेलवाले ही असे लबाड बघण्याच्या कार्यक्रमाला लोक आले की त्यांना वेगळ्या जागेत बसवत. तिथे तुम्हाला नुसता चहा घेऊन बसता येत नसे. तुम्हाला कंपलसरी नाश्ता किंवा जूस घ्यावाच लागे. एका व्यक्ती मागे कमीत कमी २०० रुपये घेत.

मुली येत होत्या मी बघत होतो. पण मनासारखं काही घडत नव्हतं. नंतर नंतर तर मुलगी कशी ही असावी होकार देऊन लग्न करावं असं फ्रस्टेशन येऊन वाटू लागलं. अशीच पटकन दोन वर्ष झाली. लग्न जमत नसल्यामुळे नातेवाईक आणि मित्रांनी हैराण करून सोडलं होत. डोकं खराब झालं होत. त्यात विवाह मंडळाने त्यांचा वधू वर मेळावा भरवला होता. मी त्यात जावं म्हणून वडील आणि बहिणीने जबरदस्ती केली. ''त्या मेळाव्यात बऱ्याच मुली येतात. सामोरा समोर भेटता येते. माहिती मिळते. लग्न पटकन जमतात . तेव्हा तू या मेळाव्यात जा म्हणू लागले.'' मी ही जायचं नक्की केलं.

नाव नोंदणी साठी मंडळाने वेगळे हजार रुपये शुल्क माझ्या कडून घेतलं. या मंडळानी तर लग्न जमवण्याचा मस्त धंदाच करून टाकलाय. प्रत्येक गोष्टीसाठी पैसे लावायचे.

कार्यक्रम सुरु झाला. स्टेज वर मुला मुलींची नाव घेण्यात येऊ लागली. प्रत्येकाने स्टेज वर जाऊन स्वतःची माहिती आणि अपेक्षा सांगायची. ज्या आलेल्या सुंदर सुंदर मुली होत्या त्यांचं शिक्षण, पगार आणि अपेक्षा ऐकूनच मी सर्द झालो. मनात म्हटलं. यांना लांबूनच बघून समाधान मानायचे. हातात काही या येणाऱ्यातल्या नाहीत. मी ही स्टेज वर गेलो. माझी माहिती सांगितली. पण पगार आणि चाळीतील घर यामुळे माहिती सांगताना शरमल्यासारखे झाले.

हॉलमध्ये नजर टाकली. असं वाटलं गुराढोरांचा जसा बाजार भरतो तसाच हा पण एक बाजार वाटू लागला. पशु, पक्षी आपला जोडीदार आपल्या हिमतीवर कला गुणांवर एकमेकांना आकर्षित करून मिळवतात. पण माणूस हा एकमेव असा प्राणी आहे जो आपला जोडीदार जात, दिसणं, शिक्षण, पैसे, जागा, स्टेटस बघून निवडतो. पण चांगला माणूस आपला जोडीदार व्हावा हे कोण बघत नव्हते. मी ही त्यातलाच एक...

मेळाव्यात बाकी काही नाही पण एक मुलगी मला आवडली. स्वप्ना नरसाळे. शिक्षिका होती. शिक्षण नोकरी यामध्ये आमचं जमत होतं. मी तिचा प्रोफाइल नंबर नोट करून ठेवला होता. मी तिला मेसेज करून ठेवला. मी माझ्या रोजच्या कामात बिझी झालो. स्वप्नाला मेसेज करून ८-१० दिवस झाले होते. एके दिवशी तिच्या वडिलांचा मला फोन आला. आम्ही एकमेकांच्या पत्रिका आणि डिटेल्स एकमेकांना पाठवल्या. सुदैवाने तिची आणि माझी कुंडली जमली. तिचे घरातले भेटायला तयार झाले. माझ्या मनात धाकधूक वाढली. मला हवी तशी मुलगी इतक्या वर्षात पहिल्यांदाच भेटायला येत होती. मी वडिलां बरोबर तिला बघायला गेलो. ती छान साडी घालून बऱ्यापैकी मेकअप वगैरे करून आली होती. सुंदर दिसत होती. मी तिला पाहातच राहिलो.

आमचं बोलणं झालं. त्यांना त्यांचा होकार नकार कळवायला सांगितला. दोन दिवसानंतर त्यांचा फोन आला. त्यांचा होकार आला. मी तर उडालोच. इतकी सुंदर मुलगी माझी बायको होणार. मी तर हवेत तरंगू लागलो. मनातल्या मनात देवाचे आभार मानले. म्हटलं देवाने उशिरा ऐकलं. पण मनासारखी मुलगी बायको म्हणून दिली.

पुढे जाण्याआधी मला तिला पर्सनली भेटून आधी तिच्या होकाराची खात्री करायची होती. मी तिला भेटायला बोलावलं एका शनिवारी सकाळी आम्ही हॉटेलात भेटलो. ती छान ड्रेस घालून आली होती. तिला बघतच राहावं असं मला वाटू लागलं. हॉटेलातले वेटर पण तिला बघत होते. आम्ही एकमेकांकडे बघून हसलो. एकमेकांच्या घरातल्यान बद्दल बोललो. आवडी निवडी बद्दल बोललो. ती चाळीत माझ्या आई वडिलां बरोबर राहायला तयार होती. मग एकमेकांच्या नोकरी वरती विषय आला. तिने बी.एड. केलं होत. एका खाजगी शाळेत ती शिक्षिका म्हणून कामाला होती. बोलता बोलता ती म्हणाली तुम्ही गव्हर्मेंट ऑफिस मध्ये कामाला आहात ना?

मी स्वप्ना माझी बायको होणार या आनंदात समोरच्या प्लेट मधलं

सॅन्डविच चवीने खात होतो. मी तिला खाण्याच्या नादात हो म्हणालो मी गव्हर्मेंट ऑफिस मध्ये काम करतो म्हणालो तिचा ताबडतोब पुढचा प्रश्न आला. ''किती वर्ष झाली गव्हर्मेंट सर्विस मध्ये लागून?'' मी सॅन्डविच खात होतो. तिचा प्रश्न ऐकून सॅन्डविच माझ्या घशात अडकले. मला ठसका लागला. ती खुश होऊन पुढे बोलली ''मला कधी वाटलं नव्हतं गव्हर्मेंट सर्विसमध्ये कामाला असलेला मुलगा मला मिळेल.'' आता माझ्या लक्षात आले यांचा गैरसमज झाला आहे की मी सरकारी नोकरीत कामाला आहे. मी तिला हळूच विचारलं. ''तू आणि तुझ्या घरातल्यानी मला पसंत केलं ते फक्त मी सरकारी ऑफिस मध्ये कामाला आहे म्हणून का?'' ती लाजली आणि मान खाली घालून हसत म्हणाली. ''तसंच काही नाही. पण सरकारी नोकरी मुळे आम्ही तुम्हाला पहिलं प्रेफरेन्स दिलं.''

झालं मी मनातल्या मनात माझ्या कपाळावर हात मारून घेतला. सरकारी ऑफिस मध्ये आमच्या पार्टीच ऑफिस असल्यामुळे मोठा गोंधळ झाला होता. देवाने मोठया संकटात मला टाकलं होत. मनासारखी मुलगी बायको होणार होती. स्वप्नाला कसं ही करून हातून जायला द्यायचं नव्हतं. मला ती खूप आवडली होती. पण त्यासाठी मला खोटं बोलावं आणि वागावं लागणार होत. माझ्या समोर मोठा पेच निर्माण झाला होता. खरं सांगायचं तर स्वप्ना हातातून जाणार आणि खोटं बोलायचं तर मोठी रिस्क होती. काय करावं तेच समजेना.

याच टेन्शनमध्ये मी दुसऱ्या दिवशी ऑफिसमध्ये बसलेलो असताना आमच्या पार्टी ऑफिसचा हेड अजित ने मला बघितलं. मी त्याला सगळा प्रॉब्लेम सांगितला. तो म्हणाला हे बघ मनासारखं काही मिळवायचं असेल तर सरळ मार्गाने मिळतेच असे नाही. मी त्याला म्हणालो ''अरे पण हा आमच्या आयुष्याचा प्रश्न आहे. माझ्या आणि माझ्या कुटुंबाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे. उद्या फसवणूक केली म्हणून बदनामी झाली तर? पोलीस केस झाली तर? ''सगळीच वाट लागेल. परत उद्या लग्ना नंतर तिला कळलं तर तिच्या घरातल्यांच्या आणि तिच्या समोर माझी काय इज्जत राहील.''

त्याने शांत पणे ऐकलं. ''काही होत नाही. एकदा लग्न झाल्यानंतर कळलं तर काय होणार? बडबडतील आणि गप बसतील. थोडंसं निर्लज्ज व्हायचं. सॉरी बोलायचं. तू चांगला शिकलेला आहेस. पुढे मागे चांगली पोस्ट पगार मिळेल. मग काही बोलणार नाहीत. तुमची मोठी जागाही आता होईल म्हणजे तो प्रश्न ही मिटेल.''

''अरे पण माझ्या आई वडिलांना कळालं की मी खोटं बोलतोय तर?'' तो म्हणाला ''आई वडिलांना सांगायचं गप बसायला. सांगायचं लवकर नातं, नातू बघायचा आहे ना? इतकं पुरेसं आहे'' तो हसला. मी त्याला म्हणालो ''अरे हे झालं लग्नानंतरच लग्नापूर्वी ते चौकशी करतील. ऑफिस मध्ये येतील मग काय करायचं?'' तो म्हणाला ''नॉट टू वरी. आपलं ऑफिस सरकारी कार्यालयात आहे. तू काम करताना सरकारी ऑफिस मध्येच दिसणार. येणाऱ्याला वाटणार तू सरकारी कर्मचारी आहेस. मी तुला एक डुप्लिकेट ''सरकारी ओळखपत्र'' बनवून देतो. तिच्या कोणी नातेवाईकाने बघायला मागितलं तर दाखवण्यासाठी. काम झालं की फाडून फेकून दे. सेम सॅलरी स्लिपच करून देतो स्टॅम्प वगैरे मारून. बाकी बघायला येतील तेव्हा आधी सांग. आपली पार्टीची माणसं सेटिंग लावून उभी करतो. तू सरकारी कर्मचारी आहेस आणि इथे काम करतो हे त्यांना आपली माणसे पटवून देतील. ''तू तर फक्त मुलीवाल्यांचा गैरसमज थोडे दिवस कायम राहण्यासाठी खोटं बोलणार आहेस. त्यांच्या मुलीचं वाईट थोडी होणार आहे त्यामुळे.''

त्याच्या बोलण्याने मला थोडी हिंमत आली. लग्नाची बोलणी करण्यासाठी दोन्ही कडून आठ दहा माणसे आली. मी आत्मविश्वासाने वावरलो आणि बोललो. माझं ऑफिस सरकारी कार्यालयात असल्यामुळे आणि मी सरकारी कर्मचाऱ्यांच्या शेजारच्याच रूम मध्ये बसत असल्यामुळे कोणाला जास्त संशय आला नाही. तिचे वडील आणि काही नातेवाईक मला काही दिवसांनी माझ्या ऑफिस मध्ये येऊन भेटून गेले. अजितला मी ते कधी येणार हे आधी सांगितल्या मुळे त्याने सगळी सेटिंग करून ठेवली. त्यामुळे तिच्या घरातल्याना कुठला ही संशय आला नाही.

लवकरच आमचा साखरपुडा झाला. आता मी आणि स्वप्ना रोज खरेदीच्या निमित्ताने भेटू लागलो. ती खूप खुश होती. मी ही खुश होतो. पण मनात अपराधाची भावना होती. भीती वाटे. अधे मध्ये तिला आडवळणाने मी खरं सांगायचा प्रयत्न केला. पण मी तिला खरं सांगू शकलो नाही. यामध्ये एक आनंदाची गोष्ट झाली. आमच्या चाळीतल्या जागेवर मोठी इमारत होऊन आम्हाला वन बेड रूमच्या फ्लॅट ची चावी मिळाली. आम्ही खूप खुश झालो. पण सुखाला अचानक दृष्ट लागावी. किंवा खोटं कधी तरी बाहेर येतंच तसं झालं. आणि माझ्या येऊ घातलेल्या सुखाला ग्रहण लागलं.

स्वप्नाचे दोन नंबरचे मामा त्यांच्या कामा निमित्त माझ्या ऑफिस च्या शेजारी आले होते. होणाऱ्या जावयांना भेटावं म्हणून मला भेटण्यासाठी ते आमच्या ऑफिसच्या सरकारी इमारतीत आले, नेमकं त्या वेळी त्यांच्या गावचा एक मुलगा जो आमच्या पार्टीचा कार्यकर्ता होता. तो गावाहून काही कामा निमित्त आमच्या पार्टीच्या ऑफिस मध्ये आला होता. तो त्यांना आमच्या ऑफिसच्या बाहेर भेटला. त्यांचं जुजबी बोलणं झालं आणि ''तू इथे कसा?'' असं मामानी त्याला विचारलं. त्याने पार्टीचं ऑफिस इथे आहे आणि पक्षाच्या कामासाठी आला असल्याबद्दल सांगितलं. मामा बोलले इथे सरकारी ऑफिस आहे. त्याने सांगितलं हो सरकारी ऑफिस आहे. पण सत्ताधारी पार्टीच्या ऑफिसला इथे भाड्याने जागा दिलेली आहे. इथे आमच्या पार्टीचं ऑफिस देखील आहे. नेमका मी आणि अजित तिथे त्या दिवशी नव्हतो.

मामा गोंधळले त्यांनी आपल्या गाववाल्या मुलाच्या मदतीने सगळी

चौकशी सरकारी कार्यालयात आणि पार्टी ऑफिस मध्ये केली. सगळी चौकशी केल्यानंतर त्यांची खात्री झाली की मी सरकारी नोकरीत कामाला नसून सरकारी कार्यालयात सत्ताधारी पार्टीच्या ऑफिसच्या ऍडमिनिस्ट्रेशन डिपार्टमेंट मध्ये काम करतो. मामानी ही बातमी स्वप्नाच्या वडिलांना दिली. आणि मग तिच्या घरातल्यानी आमचं लग्न मोडल्याचं माझ्या घरी ताबडतोब कळवलं. या गोष्टीमुळे आता पुढे काय करायचं मला काही कळेच ना? माझ्या घरी तर आई, वडील, बहिणीने मला बडबडून हैराण करून सोडलं.

मी स्वप्नाला कॉल करत होतो. मेसेज करत होतो. पण ती माझा कॉल ही घेत नव्हती की माझ्या मेसेजला रिप्लाय ही देत नव्हती. शेवटी मी तिच्या घरी फोन केला. तिच्या वडिलांनी उचलला. मी त्यांची माफी मागितली, म्हटलं मला स्वप्नाशी बोलायचंय. तिचे वडील भडकले म्हणाले ''खोटारड्या माणसाशी तिला आणि आम्हाला बोलायचं नाही आहे. आम्ही तुमच्याशी संबंध तोडले आहेत. आता तुमच्याशी तिचं लग्न होणं शक्य नाही. उगाच तिला त्रास देऊ नका. नशीब समजा तुमचं. आम्ही तुमची पोलीस तक्रार केलेली नाही आहे. पण जर तुम्ही तिला कॉल करणे, मेसेज व भेटण्याचा प्रयत्न करणं बंद केलं नाही तर मग आम्हाला तुमची तक्रार पोलिसात करावी लागेल.'' असे बोलून त्यांनी फोन ठेवला .

मी मग पुढचे १५ दिवस स्वप्नाशी कुठल्याही प्रकारे संपर्क करायचा प्रयत्न केला नाही. आमच्या लग्नाला १५ दिवस बाकी होते. काय करायचं कळत नव्हतं. शेवटी माझी बहीण मला बोलली ''जे झालं ते झालं. शेवटचं स्वप्नाशी आणि तिच्या घरातल्यांशी बोल. तयार आहेत का बघ लग्नाला. नसेल तर सर्व नातेवाईकांना लग्न मोडलं म्हणून कळवावे लागेल.'' मी रविवारी सकाळी स्वप्नाच्या घरी निघालो. जाण्यापूर्वी गणपतीच्या मंदिरात जाऊन देवाचं दर्शन घेतलं. देवाला म्हणालो ''तूच काय तो मार्ग दाखव यातून.''

स्वप्नाच्या रूमची बेल दाबली. बऱ्याच वेळाने दरवाजा उघडला गेला. समोर तिचे भावजी होते. मी हसलो म्हणालो ''थोडा वेळेसाठी शेवटचं स्वप्नाशी आणि तुम्हा सर्वांशी बोलायचं आहे.'' त्यांनी दरवाजा उघडला. मी आत गेलो. घरात तिचे आईवडील, बहीण होते. तिचे वडील मला पाहून ओरडले. ''मी तुम्हाला येऊ नका म्हणून सांगितलेलं.'' स्वप्नाचे भावजी म्हणाले ''बाबा त्यांना शेवटचं थोडंसं आपल्या सर्वांशी बोलायचंय. त्यांना बोलू द्या मग ते जातील.''

मी स्वप्ना कुठे आहे विचारलं. तिच्या बहिणीने तिला दोनवेळा हाक मारल्यावर ती बेडरूम मधून रडत बाहेर येऊन दरवाज्या जवळ उभी राहिली. मी तिला बघितलं तिचा चेहरा खूप उतरला होता. तिची अवस्था बघून मला माझाच राग आला. मी तिला आधीच खरं सांगायला पाहिजे होतं. निदान तिची अशी अवस्था तरी झाली नसती.

मी बोलायला सुरवात केली. पण शब्दच तोंडातून निघेना. मी थोडा घाबरतच तिला सॉरी म्हणालो. माझ्याकडे जळजळीत नजरेने बघत ती मला म्हणाली. ''तुम्हाला खरं सांगायला काय झालं होत? खोटं बोलताना, फसवताना काहीच वाटलं नाही का?''

मी थोडा वेळ शांत राहिलो. मग तिला म्हणालो. ''आज २-३ वर्ष मुली बघतोय. लग्न जमत नव्हतं. कमी पगार, चाळीत घर म्हणून.'' ''अचानक तुझं स्थळ आलं आणि ध्यानी मनी नसताना तुमच्याकडून होकार आला. मी फसवलं नाही. माझा विचार ही तसा नव्हता. गैरसमज तुमच्याकडून झाला. मी गव्हर्मेंटमध्ये कामाला आहे असा. तुझ्या सारखी चांगली मुलगी माझी बायको व्हावी ही इच्छा होती. तुला हातातून जायला द्यायचं नव्हतं. म्हणून मी फक्त तुमचा गैरसमज कायम ठेवण्याचा प्रयत्न केला.'' फक्त तुम्हाला खुश ठेवता यावं म्हणून. त्यासाठी मी काही चुका केल्या त्या मला मान्य आहेत. मी तुला सांगायचा प्रयत्न केला. पण नाही सांगू शकलो. सतत भीती वाटायची. तू मला कायमची दुरावशील म्हणून घाबरायचो.

''मी शिकलेला आहे. चांगल्या घरातला आहे. आता मोठं घर ही झालंय. उद्या पुढे मागे चांगला पगार, नोकरी, पोस्ट मिळेल ही मला. पण तुम्हाला जर मी आधीच सांगितलं असतं मी गव्हर्मेंट मध्ये कामाला नाही तर तुम्ही मला नक्कीच नाकारलं असतं. नाकारलं असतंच असं नाही तुम्ही नाकारलंच आहे. सगळं माझ्याकडे असूनही फक्त सरकारी नोकरी नाही म्हणून... माझ्यामुळे तुम्हाला खूप मनस्ताप होतोय त्या बद्दल मला जमलं तर क्षमा करा. मी तुम्हाला कुठला ही त्रास या पुढे देणार नाही.'' मी तिच्या घरातल्याना नमस्कार केला. आणि निघालो.

मागून स्वप्नाचा आवाज आला ''मला एकदा तरी खरं सांगायचं होत. खोटं किती दिवस टिकणार होतं.'' मी तिच्याकडे बघून तिला म्हणालो. ''खरं सांगितल्या वर तू लग्नाला तयार झाली असतीस?'' ती म्हणाली ''एकदा सांगून तर बघायचं होतं? नकारच दिला असता असं कसं समजलात?'' मी शांतपणे तिच्याकडे बघितलं. ''तुला आता सगळं खरं सांगितलंय करणार आहेस माझ्याशी लग्न?'' घरात सगळीकडे शांतता पसरली. तिने माझ्याकडे पाहिलं आणि म्हणाली ''या पुढे असं खोटं पुन्हा बोलणार नसाल तर हो.'' तिच्या घरातले हसले. स्वप्ना पण माझ्या कडे पाहून हसली. सासरे थोडे तळ्यात मळ्यात होते. पण मग तिच्या बहिणीने आणि जावयानी त्यांना समजावल्यावर ते लग्नासाठी तयार झाले.

आमचं लग्न झालं. मित्रानो नशीब चांगलं म्हणून सगळं ठीक झालं. पण ज्या मुलांची लग्न व्हायची आहेत त्यांना माझा प्रेमळ सल्ला त्यांनी असं काही करून लग्न जमवण्याच्या फंद्यात पडू नका. आणि बरं का आताच आपापले प्रोफाइल आणि फॉर्म चेक करा. काही गोंधळ होण्यासारखं लिहिलेलं नाही ना? पुढे जाऊन माझ्या सारखं व्हायला नको. माझं कसंबस झालं तुमचं होईलच असं समजू नका... समजलं ना? नमस्कार.

***

राहूनच गेलं

– जयंत गणपतराव कोपर्डेकर

जगण्याच्या धावपळीत कितीही जोरात धावायचं असेल तर धावा. पण, नेहमी एका गोष्टीचं भान ठेवा, आपल्या जवळच्या माणसांत आणि आपल्यात जास्त अंतर पडता कामा नये. आयुष्यात एखाद्या वळणावर त्यांना तुमची गरज पडली किंवा तुम्हांला त्यांची गरज पडली तर त्यांची हाक तुमच्या कानापर्यंत, तुमच्या हृदयापर्यंत पोचली पाहिजे. माणूस जिवंत असेपर्यंतच एकमेकांना भेटले पाहिजे. नाही तर नंतर त्याचा काहीच उपयोग होत नाही. भेटायचे राहूनचं जाते....



आज रविवार असल्याने संजय व शितलला छान वाटत होते. ते रविवारची आतुरतेने वाट पहात असत. कारण मुलगा अभिजीत व सुनबाई घरी असत. त्यामुळे घर भरल्यासारखे वाटे. आणि गप्पा मारायला त्या दोघांना कंपनी असे. कारण आठवडाभर मुलगा, सून दिवसभर नोकरी निमित्त बाहेरच असत.

संजयचे कॉलेज शिक्षण पूर्ण झाले आणि त्यांना प्राध्यापकाची नोकरी मिळाली. नंतर त्यांचे लग्न शितलशी झाले ते एकत्र कुटुंबात राहात. ती शाळेत शिक्षिका. त्यांना दोन मुलं मोठी मुलगी अंजली व मुलगा अभिजीत पण अंजलीवर बाबांचा जास्त जीव होता. दोघेही हुशार स्कॉलरशिपवरच दोघांची शिक्षणे झाली. दोघेही इंजिनियर झाले. चांगल्या कंपनीत नोकरी मिळाली. यथावकाश अंजलीचे लग्न झाले. जावईपण इंजिनियर मिळाला. लग्नाला जेमतेम वर्ष झाले आणि दोघेही अमेरिकेत स्थायिक झाले.

वर्षभराने तिने गोड बातमी दिली आणि तिला मुलगा झाला. बाळंतपणासाठी हे दोघेही सहा महिने अमेरिकेत जाऊन आले. तिचे तिकडे रुटिन सुरू होते. दोन वर्षांनी पुन्हा तिने आनंदाची बातमी दिली. यावेळी बाळांतपणासाठी जावयाचे आईवडील गेले. कारण शितलला बी.पी., डायबेटीस, तर संजयला दम्याचा त्रास सुरू झाला होता. तिला

दुसरी मुलगी झाली.

दिवस पुढे पुढे सरकत होते. वर्षे निघून चालली होती. अंजली दर दोन वर्षातून एकदा सहकुटुंब भारतात येऊन पंधरा दिवस राहून जात होती. त्यात दोन्ही घरी त्यांना राहावे लागत होते. पण आताशा त्यांचे येणे बंद झाले होते. कारण दोघांची नोकरी, मुलांची शाळा यात वेळच मिळत नव्हता. त्यात सर्वांना एकदम सुट्टी मिळणे जमतच नव्हते.

दिवस वर्षे पुढे पुढे सरकत होती. गेल्या दहा वर्षात अंजली आलीच नाही. इकडे घरी हे चौघेच. अभिजीत अजून बाबा झालाच नव्हता. ती सल सर्वांच्याच मनात होती. आता संजय शितलने सत्तरी पार केली होती. दोघांची तब्येत अगदीच तोळामासा झाली होती.

अभिजीत व त्याची बायको आठवडाभर ऑफिसमध्ये. ते सकाळी आठ वाजता जे जायचे ते येण्याची वेळ कधीच ठरलेली नव्हती. रात्री आठ, नऊ वाजता थकून घरी यायचे. कामवाल्या मावशी सकाळ, संध्याकाळ स्वयंपाक करून जायच्या. त्यामुळे दिवस भर संजय, शितल दोघेच घरी. काय गप्पा मारणार. टि.व्ही., देवपूजा, पेपरवाचन यात थोडा वेळ जायचा. संध्याकाळी सोसायटीत एखादी चक्कर पण बाकी वेळ काय करणार. गप्पा मारायला कुणीच नाही.

त्यात हे दोघेही शिक्षक त्यामुळे अखंड बोलायची सवय. शिवाय इतकी वर्षे एकत्र कुटुंबात, चौपसी वाड्यात सारं आयुष्य गेलेलं. कायमच माणसांचा राबता. सारा दिवस कामात, आनंदात जायचा. सणवार, व्रतवैकल्ये, उपास, देवपूजा, कुलाचार हे सार नियमित व्हायच. मन कायम प्रसन्न राहायचं. आता हे काहीच नाही. आता सार बदललय. पूर्वीसारख काहीच नाही. त्यामुळे आता घर खायला उठायच. मुलगा सुनेला बोलायला वेळ नाही. मग ते दोघेही रविवारी त्यांच्याशी खूप गप्पा मारायचे. संध्याकाळी कारने कुठे तरी लांब चक्कर मारून यायचे. पण सोमवार पुन्हा खायला उठायचा.

मधून अधून अंजलीचा फोन यायचा. तिचा फोन आला की बाबांचे एकच वाक्य असायचे. म्हणायचे,

''अग चार दिवस तरी येऊन जा. घरी आमच्या सोबत राहा. गप्पा मार. आता जीव थकलाय गं. घर खायला उठत. तुझी आणि नातवंडांची आठवण येते. त्यांचे लाड करायचेत. तुझ्याशी खूप बोलायचं. तुझ्या हातच्या पुरणपोळ्या खायच्यात. वेळ काढून ये ना.''

तिकडून मात्र आता आवाज यायचाच नाही. फक्त हुंदके यायचे. प्रत्येकवेळी फोन केला की बाबांची ही वाक्ये ठरलेली असायची.

प्रत्येकवेळी अंजली मे महिन्याच्या सुट्टीत सगळं प्लॅनिंग करायची. पण गाडी कुठेतरी फसायची. मुलांची कारणे वेगळी. नवऱ्याची नोकरी, टुरिंग, मिटिंग, दरवेळी काही ना काही कारणाने ठरलेले जाणे रद्द व्हायचे. अंजली तिच्या संसारात, तिच्या व्यापात पूर्णपणे गुरफटून गेली होती. परिस्थिती पुढे ती हतबल झाली होती. आई बाबांना भेटण्याची ओढ होती. पण संसारीक जबाबदारी पिच्छा सोडत नव्हती.

माया, प्रेम एकीकडे ओढत होते. तर दुसरीकडे कर्तव्य, जबाबदारी पाय खेचत होते. अशा द्विधा अवस्थेत दिवस पुढे पुढे जात होते. फोनवर बोलायला सुद्धा वेळ तिला मिळत नव्हता. आणि फोन केला तर बाबांची वाक्ये ठरलेली, डोळ्यात पाणी काढणारी.

त्यामुळे आई तिला वाईट वाटू नये म्हणून दुसराच विषय काढायची. पण तिचे मन मात्र तिलाच खात असायचे. डोळ्यातली आसव लपवत ती हसून बोलायची. पण त्याचा जास्तच त्रास अंजलीला व्हायचा. त्यामुळे ती फोन करायचे टाळायची. पण तिचे मन मात्र सारखे दु:खी, कष्टी होत असे.

रविवार मात्र वाट बघून बघून अभिजीतच फोन लावायचा आणि मग सगळेच बोलायचे. हा नित्यक्रम अखंडपणे सुरू असायचा. बाकीचे सारे छान छान बोलायचे पण बाबांनी फोन घेतला की हिचे काळीज तुटायचे. बाबांचे सगळेच बोलणे हिच्या जिव्हारी लागायचे. दिवस पुढे पुढे सरकत होते.

एक दिवस अचानक अंजलीचा फोन वाजला अभिजितचा फोन अवेळी आल्याने अंजलीचा काळजाचा ठोका चुकलाच. थरथरत्या हाताने तिने फोन उचलला. पलिकडून अभिजीत बोलला.

''ताई बाबा गेले. एक तास झाला. ॲटॅक आला. तू येणार असशील तर थांबतो. नाहीतर...''

तिकडून ताई म्हणाली,

''मी लगेच निघते. जे प्लाइट मिळेल ते पकडून येते. तोपर्यंत प्लीज थांब.''

अभिजीतने बाबांना हॉस्पिटल मध्येच ठेवले. तिसऱ्या दिवशी अंजली घरी पोचली. सारं घर शांत होते. अभिजीतने जाऊन बाबांची बॉडी घरी आणली. ते शांत झोपले होते. चेहऱ्यावर हास्य आहे असेच वाटत होते. त्यांना बघून मात्र अंजलीचा बांध फुटला, ती ओक्साबोक्शी रडू लागली. आई व अभिजीतने तिला शांत केले. अंजलीने बाबांचा हात हातात घेतला. म्हणाली,

''बाबा डोळे उघडाना. मी आलेय. तुमच्या जवळ राहायला. तुमचे लाड करून घ्यायला. तुमच्याशी खूप गप्पा मारायच्यात. अगदी तुम्हाला कंटाळा येईपर्यंत. पण प्लीज उठा ना.''

खरे तर त्यांच्या हाताचा थंडगार स्पर्श हिला जाणवत होता. आणि तिच्या डोळ्यातले गरम अश्रू तिच्याच हातावर पडत होते. किती विरोधाभास तिचे अश्रू थांबतच नव्हते. ती म्हणाली,

''बाबा माझच चुकलं. मी उशीर केला. मी माझ्याच संसारात गुरफटून गेले होते. खर तर प्रत्येकजणच व्यापलेला आहे. कुणावाचून कुणाचे अडत नाही. पण माया, प्रेम ही वेगळीच जादू आहे. माणूस जीवंत असे पर्यंतच भेटले पाहिजे. नाही तर काहीच उपयोग होत नाही. तुम्हाला भेटायचे मात्र राहूनच गेले.''

आता मात्र आईला जाणवले हिला सावरायला हवे. म्हणून तिने अंजलीला जवळ घेतले. तिच्या पाठीवरून मायेचा हात फिरवला. ती पण आता आईच्या कुशीत शिरली आणि अश्रूंना वाट मोकळी करून दिली.

***

भरारी

– प्रा. श्री. धनाजी जनार्धन बुटेरे

भावंडांना शिकवण्यासाठी गोप्याने आपले पूर्ण बालपण कष्ट करण्यात घालवले. मोठे झाल्यावर भावंडांनी नोकऱ्या मिळवल्या. खूप पैसा कमवला. गोप्या मात्र आहे त्या गरिबीतच जगत राहिला. गोप्याला आधाराची गरज होती तेव्हा त्याचे भाऊ उपयोगाला आले नाहीत. पैशापुढे नाती तकलादू ठरली. गोप्या त्यांच्यासाठी दिवा होऊन जळला होता. नियतीने त्याला विझवण्याचा घाट घातला. तरी तो हिम्मत न हारता पुन्हा गगन भरारी घेण्यासाठी तयार झाला.



लहान असून तो खूप समजदार होता. तिघा भावात गोप्या शेंडेफळ; पण ज्या वयात हातात खेळणी घेऊन खेळावे, मुलात रमावे, झाडावर चढावे, नदीत पोहावे, लगोरी गोट्या, विटी दांडू, खेळावी आईचा पदर धरून मागे मागे फिरावे, त्या वयात या बारा वर्षाच्या गोंडस पोरावर संसाराचा भार सांभाळण्याची वेळ आली होती. त्याला अजून दोन भाऊ होते. मोठा सोळा वर्षाचा जग्गू, त्यानंतर चौदा वर्षाचा किशोर, अर्थात किशा, दोघे शाळेत खूप हुशार होते. ते नेहमी वर्गात पहिले यायचे, मात्र त्या मानण्यात गोप्या अभ्यासात सुमार होता. मास्तरांचा मार खाणारा, अभ्यासात लक्ष न देणारा गोप्या म्हणजे ढ विद्यार्थी होता. तो अभ्यासात तितकासा चांगला नव्हता. त्यामुळे मास्तरांचा नेहमी मार खायचा. एका मास्तराने कानफटात मारून मारून त्याला बहिरा केला होता; पण आपले दोघे भाऊ मात्र अभ्यासात हुशार होते. गोप्याचे उलट होते. तो अभ्यासात कायमच मागे असायचा. त्यात दोन वर्षांपूर्वी वडिलांचे अचानक निधन झाले. आई मोलमजुरी करून संसाराचा गाडा ओढत होती.

खाणारे चार, कमावणारी एकटी आई. त्यामुळे तिची कायमच ससेहोलपट व्हायची; पण लेकरासाठी ती कसत होती. पोटापाण्याचे कसे तरी होऊन जायचे; पण पार्वती काकूला पोरांच्या शाळेचा खर्च पैलवत नव्हता. त्यांच्या दप्तरांने ती वाकून गेली होती. अखेर तिने मनावर दगड ठेवून एक निर्णय घेतला. जग्गूला आणि किशाला शाळेतून काढायचे. आणि कुठेतरी रोजंदारीवर पाठवायचे. पण आईचा हा निर्णय लहानग्या गोप्याला तितकासा रुचला नाही. आपली भावंडे हुशार आहेत. वर्गात नेहमी पहिल्या नंबर काढतात. पुढे ते आपल्या कुटुंबाचा आधार होतील. यावर गोप्याला विश्वास होता. दोघे शिकले. कामधंदा करायला लागले. तर घराचे गोकूळ करून टाकतील, म्हणून तो पोक्त होऊन आईला म्हणाला. त्याच्या आईला तिघे भावंड बये म्हणायचे.

''बये, जग्गू दा किशू दा, अब्यासात हुसार हाईती, त्यांल्ना शिकू दे की, म्या कुठ तरी कामधंदा शोधतू.''

''आरं प्वारा, ते शिकत्याल अन् तू, गावची गुरं राखशील व्हय?''

''मंग त्यांना गुरं राखायला ठिवती व्हयं?''

बये निरुत्तर झाली, त्यावर पुन्हा गोप्या म्हणाला.

''बये, मला काय बी सालंत रस न्हाय, अब्यासात बी जमत न्हाय, तवा कशाला पैकं पाण्यात घाल्ती. किशा, जग्गू हुसार हायती, तुझं नाव काढतील, म्या दर वर्षी नापास होण्या परीस, दोन पैकं येतील, तवा म्याच कामधंदा शोधतू.''

''अरं, तुला रं कुण कामावर ठिवील?''

''शिंप्याचा पद्या हाटीलात हाय नव्हं, त्याला बोललोय म्या, उद्या जाऊन येतू तालुक्याला. अन् रोज रोज मास्तराचं मार खान्या परिस हटीलात बरं, न्हाय तरी कुणाला तरी घरी ऱ्हाचंच हाय, तवा मीच - ऱ्हातो की, एक खाणारं त्वॉड कमी व्हयील, वरून दोन पैकं मिळत्याला, वरून, दोघं साळा बी शिकतील, बये शिकू दे त्यांना, कशाला हातून पाटी हिसकावतीस?''

''बरं, ऱ्हायलं माझं, तुला पटल तसं कर.''

माय लेकराच हितगुज जग्गू आणि किशा शांतपणे ऐकत होते. गोप्या त्याच्या मनातील बोलत होता. त्यांना दोघांनाही शाळा शिकायची होती. गोप्याचा निर्णय ऐकून त्यांच्या मनावरचे दडपण हलके झाले. गोप्या त्यांच्या मनातील बोलला होता. मग गोप्याच्या बोलाला त्यांनीही पाठीमागून दुजोरा दिला.

गोप्या खरोखरच पोक्त माणसासारखा बोलत होता. तो अकाली पोक्त झाला होता. त्याला शेती, माती, गाय, बैल यातच गोडी वाटायची. घरची थोडीफार शेती होती. त्यातून पोटापुरते पिकायचे. राहिला प्रश्न मीठ मिर्चीचा त्यात पार्वती काकू मोलमजुरी करून भागवायची. दारिद्र्य त्यांच्या पाचवीला पुजले होते. पोट मारून लुगड्याला सतरा गाठी मारत ती लेकरांना शिकवत होती; पण पैशाची फारच ओढाताण व्हायची; म्हणून ती आज ''जग्गूला आणि किशाला शाळा सोडा'' म्हणून बोलत होती. तिचाही नाईलाज होता; पण बारा वर्षाच्या गोप्याने तिला या चक्रातून बाहेर काढली होती. तिलाही मुले शिकून मोठी करायची होती. किमान दारिद्र्यातून तरी सुटका होईल. म्हणून तिने लहानग्या गोप्याचे ऐकले होते.

गोप्या अभ्यासात जरा मठ्ठ होता. पण व्यवहारात मात्र तो पोक्त माणसासारखा वागायचा. त्याने शिंप्याच्या पद्याला सांगून हॉटेलवर भांडी धुण्याचे काम मिळवले. पगार कमी होता; पण राहून खाऊन पैसे मिळणार होते. भावांच्या पुस्तक वह्या, कपडे, फी यांचा प्रश्न सुटला होता. त्यांनी हे सारे आनंदाने स्वीकारले होते. कामही काही फार कष्टाचे नव्हते. त्याच्या बाल शरीराला झेपणारे होते. त्यातही त्याला समाधान होते. कारण भावांच्या हातात पाटी राहणार होती. चला, हे ही दैन्य दुःख दारिद्र्य कधीतरी संपून जाणार आहे. याची तो वाट पाहत होता. आलेले सारे पैसे आईच्या हवाली करू तो मोकळा व्हायचा. आणि स्वतः मात्र दिवसभर हॉटेलातील मोरीत घालवायचा. बाहेर काय चालू आहे? कोण येतात? कोण जातात? घरी काय चालू आहे? त्याला काहीही कळत नव्हते. घाण्याला जुंपणाऱ्या बैला सारखी त्याची गत होती. बैलाच्या डोळ्यावर जशी झापडे बांधून तो फिरत असतो. तसा तो मोरीत असायचा. फक्त एकाच आशेवर, ''हे ही दिवस निघून जातील.'' त्याचे दोघे भाऊ मन लावून शिकत होते. त्यांनाही ते आवडत होते. दरवर्षी वर्गात पहिल्या नंबरने पास होत होते. आई काबाडकष्ट करत होती. सारे तारुण्य आईने घामात भिजवले होते.

कॅलेंडरची पाने भराभर उलटत होती. आजचा दिवस क्षणात परवा होत होता. दिवस हालाखीचे सरत होते फक्त जगावे म्हणून खात होते. त्या जीवनात आनंद मात्र नव्हता. आनंदाने त्यांच्याकडे पाठ फिरवली होती; पण पार्वती काकूची मुले फार हुशार होती. नक्कीच पार्वती काकूचे नाव उज्वल करणार होती. दिवस भराभर गेले जग्गू एम.एस.सी. झाला तर किशा एम.कॉम. झाला. आणि दोघेही नोकरीच्या शोधात फिरू लागेल. अशातच जग्गूला एक आशेचे किरण दिसले. त्याच्या ओळखीचा कांतीशेठ त्याला आखाती देशात नोकरीला लावणार होता. तो कांतीशेठ या दलालाकडे नोकरीसाठी चकरा मारू लागला होता. त्याला आखाती देशात नोकरी करायची होती; पण त्यात एक अडचण येऊन उभे राहिली होती. दलाल नोकरी लावण्याचे पाच लाख रुपये मागत होता. तेवढे पैसे त्याच्याकडे नव्हते; पण दलालाने पगार दोन लाख रुपये मिळतील सांगितल्यापासून त्याचे डोळे दिपून गेले होते. पाच लाख दिले की क्षणात त्याला नोकरी मिळणार होती. शिवाय या अगोदरही दलालाने त्याच्या काही मित्रांना आखाती देशात नोकरीला लावले होते. त्यामुळे फसवणूक होण्याची शक्यताही फार कमी होती. म्हणून त्याला तेथे नोकरीला जायचे होते. दोन-तीन पगारात पैसे वसूल होणार होते; पण अडचण फारच होती. कारण पाच लाख त्याच्यासाठी खूप मोठी रक्कम होती. आणि ती रक्कम उभी कशी करायची याच विवंचनेत तो होता; पण त्यातही एक मार्ग त्याला सापडला. त्याच्या घरची थोडी फार जमीन त्याच्या आईच्या नावे होती. ती विकून पाच लाखापेक्षा थोडे जास्त पैसे येणार होते. मग त्याने विचार करून आपले म्हणणे आईला बोलून दाखविले.

''बये एक नोकरी होती... पण... पाच लाख लागल्यात,'' तो अस्पष्ट आणि अडखळत बोलला.

''शिवाय पगार पण अडीच तीन लाख लगेच मिळेल. आणखी नोकरही बाहेर देशात आहे. लाईफ बनून जाईल बये, फक्त अडचण पैशाची होती.''

''इथं इख खायला दिली न्हायी आणि पाच लाख लेकरा सोड त्यो नाद, इथंच कुठंतरी बघ काय तरी करं, जास्त मोह बरा न्हायी.''

''बये, पण... एक उपाय होता.'' तो घाबरत बोलला.

''तो जमिनीचा तुकडा विकला तर...''

''अरं जग्या तुला यॅड लागलं का काय?''

''जीमिन विकायची आणि खायचं काय?''

''अगं नोकरी लागली तर त्या पेक्षा जास्त जमीन घेऊ की. आधीच तीन लाख पगार मिळेल. वर दर वर्षी पगारवाढ, पुढच्या वर्षी तुला एक एकर घेऊन देतो बघ.'' आपली गावाखालची ती जमीन जर विकली तर सात आठ लाख रुपये येतील. म्हणजे नोकरीला लागून पण आपल्याला खर्चायला अजून थोडे पैसे उरतील. थोडी नड पण निघून जाईल. माझ्या नोकरीचे पण होऊन जाईल. तो सारे आकडे वाढवून सांगत होता. कारण पगाराची वाढती रक्कम ऐकून त्याची बये मोहात पडली पाहिजे, याच्यासाठी तो तीन-तीन लाख रुपये पगार असेल असे सांगत होता. तशी बये थोडी नाराज होऊन म्हणाली,

''जग्या अरे किशाला, गोप्याला बोलला का तू?''

''बये अगं त्यात काय विचारायचं? आपण थोडी हौसेखातर मौजमजा करण्यासाठी जागा विकतोय, अगं तीन लाख पगार येईल. दोन महिन्यात जागा परत घेऊ, फक्त आज विकावी लागेल. विकून फक्त आज आपल्याला त्या कांतीशेठला द्यायला पाच लाख रुपये हवे आहेत. एकदा पगार चालू झाला की अशा कितीतरी जमीन आपण घेऊ.''

''पण बघ किशा गोप्याच्या कानावर घाल सारं.''

त्याने बयेला पटविली होती किशाला तो वरवर बोलला कारण उरलेले काही पैसे तो किशाला देणार होता; पण गोप्याला मात्र काहीच बोलला नाही. कारण गोप्या कदापि असे करून देणार नव्हता. शिवाय बये गोप्याचेच जास्त ऐकत होती.

म्हणून गोपीला अंधारात ठेवून त्यांनी जमीन विकण्याचा निर्णय घेतला. कारण कागदावर सही फक्त आईची लागणार होती. दोघांनी एका रात्रीत राबत्या जमिनीचा सौदा केला. गावाच्या सोनारासंगे वाटाघाटी करून आठ लाख रुपयात जमिनीचा सौदा करून बसले. जग्गूने थोडेफार आईला दिले. काही किशाच्या घशात घातले. पाच लाखापेक्षा जास्त उरलेले त्यांनी स्वतःकडे ठेवून घेतले. माणसे शिकली की बुद्धिवादी होतात आणि मग असे आपल्या माय मातीचे सौदे करतात. अती हाव दुसरे काय?

गोप्याच्या अपरोक्ष जमीन दोन भावांनी विकून दोघेही पसार झाले. जग्गू आखाती देशातील दुबईला नोकरीला लागला. पगार काहीतरी लाखभराच्या आसपास होते. किशाही एम.कॉम. झाला होता. त्याने कुठेतरी इंटरनॅशनल कंपनी पैसे भरून नोकरी मिळवली आणि तो बंगलोरला गेला. स्वतःच्या भावाला दोघांनी अंधारात ठेवून स्वार्थ साधला होता. ज्या भावाने आपले बालपण विकून मोठ्या भावांना मोठे केले होते. त्यांनी त्याच्यावर अविश्वास दाखवला होता. ज्या आईने यांच्या शिक्षणासाठी खस्ता खाल्ल्या त्या आईशी ही दोघे खोटे बोलून जमिन विकून मोकळे झाले होते. स्वार्थापुढे नाती किती शुल्लक असतात हे त्यांनी दाखवले होते.

बऱ्याच दिवसांनी गोप्या एकदा आपल्या गावी सहज आईला भेटायला आला. तेव्हा त्याला सख्ख्या भावांचा प्रताप समजला. तो खूप हतबल झाला. हळहळला, त्याच्या बयेवर त्याने राग काढला. पण बयेला ते खोटे बोलले. गोप्याला भेटून आलो म्हणून सांगितले. पण आता रागावून काही फायदा होणार नव्हता. बरेच पाणी पुलाखालून वाहून गेले होते. तो हताश झाला. आपले भाऊ इतके कृतघ्न निघतील याची त्याला तिळमात्र होईल शंका नव्हती. दोघेही इंटरनॅशनल कंपनीत बड्या पगारावर रुजू झाले. गोप्या मात्र अजून कपबशाच विसळत होता. आपले भाऊ मोठे व्हावे; म्हणून हॉटेलच्या मोरीत त्याने अर्धे आयुष्य घालवले होते. सहा सहा वर्ष गुलामगिरी करणारा भाऊ त्यांना आठवला नव्हता आणि जमीन विकून ते नोकरीसाठी बाहेरही गेले होते. तरीसुद्धा त्यांनी आपल्या छोट्या भावाला शब्दातही विचारले नव्हते. याचेच त्याला वाईट वाटत होते. तो खूप चूकचुकला, त्याला पश्चाताप झाला. आपण इतका मोठा त्याग केला आणि भावंडांनी मात्र आपल्या हातावर तुरी दिल्या. याचे त्याला प्रचंड दुःख झाले; पण विचार करून काहीच फायदा नव्हता. पुन्हा तो हताश झाला; आणि तसाच आल्यापावली तो हॉटेलात निघून गेला. आता तो उत्साह त्याच्यात नव्हता. त्याचा उत्साह फार मावळला होता. तो हरला होता. आपण सहा वर्षे हॉटेलातील कैदखान्नयात ज्यांच्यासाठी काढली. ते भाऊ न विचारता जमीनीचा सौदा करून आपल्याला काही न विचारता दूर निघून गेले. याचे त्याला खूप वाईट वाटले. भावाने खूप उंच भरारी घ्यावी म्हणून त्यांने स्वतःचे पंख छाटले होते. कारण आपले भाऊ खूप उंच जावेत आणि आकाशाला गवसणी घालावी. हे त्याचे स्वतःचे स्वप्न होते. पण भाऊ मात्र उंच उडाले पण स्वार्थासाठीच.

झाले गेले गंगेला मिळाले. कोण कुणाचा नसतो. हे त्याने अनुभवले होते. आणि आजपासून पुन्हा तो स्वतःसाठी जगायला तयार झाला होता. त्याने पुन्हा जोमाने कामाला सुरुवात केली. पण त्याने आपल्या भावंडाना कधीच संपर्क साधण्याचा प्रयत्न केला नाही किंवा त्याचे भाऊही त्याला कधी चुकून भेटले नाही की बोलले नाही. जग्गू आखाती देशात जाऊन चांगले कमवत होता. किशाही साहेब झाला होता. लक्ष्मी दोघांच्या घरात पाणी भरत होती. जणू ती प्रसन्न झाली होती; पण म्हणतात लक्ष्मी चंचल असते. तशी चंचलतेने ती या घरात आली होती. दोघा भावांना आता पैशाची धुंदी चढली होती. त्यांना आईचा सुद्धा विसर पडला होता. आई कशी जगते? गोप्या काय करतो? याच्याशी त्यांना देणं घेणं नव्हते. जग्गुच्या डोक्यात पैशाची हवा घुसली होती. तो

आई, गोप्या, इतकच काय किशाला पण विसरला होता. पैशाने त्याची बुद्धी पालटली होती. तो भ्रष्ट झाला होता. त्याला पैशाची धुंदी चढली होती. त्याच्यातील विवेक मारला गेला होता. त्यामुळे कृतज्ञता, उपकार या शब्दांशी जाणीव त्याला नव्हती. माणसा –तील विवेक मेला की मागे उरते ती फक्त कुबुध्दी, याच कुबुध्दीने त्याला धुंदी चढली होती. तीच दारूसारखी धुंदी त्याला चढली होती.

दोघे जण जाऊन दोन वर्ष म्हणता म्हणता सरली होती. गोप्या अठरा वर्षाचा झाला होता. जग्गू आणि किशाने परस्पर लग्न केली होती. हे ऐकून आई ढसाढसा रडली होती. बये खंगत खंगत चालली होती. घरी बये एकटीच असायची. त्यांची बये आता थकली होती. त्यामुळे त्याचे मन आता हॉटेलमध्ये रमत नव्हते. तसे गोप्याकडे आता रमण्यासारखे काहीच नव्हते. हौसला, उम्मीद, आशा, अशा गोष्टी त्याच्याकडे उरल्या नव्हत्या. आता तो फक्त त्याच्या आईसाठी जगत होता. त्याच्या भावंडाच्या कृत्याने तो हतबल झाला होता. गेल्या दोन वर्षापासून तो मनातून खचत चालला होता; पण आईचे काबाडकष्ट आठवताच तो येथे थांबायचा. त्यालाही इथे बरीच वर्ष झाले होते. बऱ्यापैकी पगार मिळायचा. पण तरी तो आनंदी नव्हता. आपले भाऊ पुढे गेले. त्यांनी उंच भरारी घेतली. पण ते कायमचे घरटे सोडून गेले आणि पुन्हा घरट्यात परतलेच नाही. त्याला त्याच्या बयेचे शब्द आठवायचे.

''गोप्या तुझं भाऊ शिकतील, आणि तू असाच ऱ्हाशील? तू तुझं नुकसान करू नगं, कोण कुणाचा नसतो. तुझ्या भावांना भरारण्यासाठी पंख दिलेस, पण तुझं भाव तुला नंतर इच्यारतील का? भावांना पंख फुटलेत, आता पुरे, त्यांची त्यांना भरारी घेऊ दे.''

हे बयेचे कधी काळीचे शब्द त्याला आज पुन्हा आठवू लागले की मन सैरभैर व्हायचे. मग तो उदास व्हायचा. दहा वर्ष तो हॉटेलच्या मोरीत पडलेला असायचा. हिवाळा, उन्हाळा, पावसाळा तो तिन्ही ऋतू मोरीत पाण्यातच भांडी घासत असायचा. त्या पाण्याने त्याचे हात पाय कुजून गेले होते. बोटे झडायची वेळ आली होती. पण भावंडांसाठी तो सारे कष्ट सहन करत होता आणि त्याची भावंडे मात्र कृतघ्न निघाली होती.

संकटे समूहा समूहाने येतात. तशी गोप्याच्या पाठीमागे एक एक संकट येऊन उभे राहत होते. हातची जमीन गेली. त्यांचा सगळ्याचा सहारा हरवला आणि बयेची मोलमजुरी वाढली. म्हातारपणात गप्प पडून खायचे दिवस! पण आताही वणवण करत होती. कारण कमावलेले सारे पोट भरण्यात खर्च व्हायचे. उद्याचे काय हा प्रश्न बयेसमोर रोजच हात जोडून उभा असायचा. त्यामुळे बये खंगत गेली होती. तीन वर्षात तिच्या एकाही लेकाने तीला फोन केला नाही किंवा पत्र पाठवून खुशाली विचारली नाही. किंवा तिची भेट घेतली नव्हती. ती डोळ्यात प्राण आणून लेकरांची वाट पाहायची. लेकरांना या पक्षिणीचा विसर पडला होता. पण आई शेवटी आई असते. तिची मात्र माया पुढे यायची. आणि ती लेकरांच्या आठवणी तिचे डोळे ओले करायची. खरे तर तिच्या दुर्दैवाचे फेरे सुरू झाले होते. दोन मुले भरारी घेऊन उंच उडाली होती. पण घरट्यात परतलीच नव्हती. इकडे गोप्या ही आज हॉस्पिटलमध्ये मृत्यूशी झुंज देत होता. हॉटेलात सिलेंडरचा स्फोट होऊन त्यात गोप्या सापडला होता. आणि तो मृत्यूची झुंज देत होता. इकडे बये त्याचे आकांडतांडव करत होती. तिने नको असताना ही जग्गूला फोन केला. किशाला फोन केला. पण दोन्ही लेकरं येतोय म्हणाली आणि आलीच नाही. तिचे प्रयत्न सारे व्यर्थ गेले. दोघांना तिची कीव आली नाही. जग्गू करारबद्ध होता म्हणून तो येऊ शकत नव्हता. किशा कुठे बंगलोरला होता. जग्गू मात्र येणार नव्हता हे नक्की झाले होते. गोप्या मृत्यूशी झुंज देत होता. पण आईची दया देवाला आली. गोप्याच्या जीवावरच हातावर निभावलं होते. त्याचा एक हात कायमचा तोडावा लागला होता. तो स्फोटाच्या जवळ सापडला होता. नशीब त्याचे दवाखान्याचा सारा खर्च मालकाने केला होता. जग्गूला सारे माहीत झाले. पण त्याने साधी विचारपूसही केली नाही. की आईला धीरही दिला नाही. ती एकटीच या संकटाशी लढत होती. तिच्या आयुष्यात तर कुंती सारखा संघर्ष लिहिला होता. ती न डगवता लढत होती.

गोप्याला दवाखान्यातून डिस्चार्ज मिळाला. पण एक हात गमावला होता. बयेच्या दु:खाला पारावर राहिला नाही. जन्मभर चंदनासारखा झिजणारा गोप्या मात्र संकटाशी एकटाच लढत होता. त्याचे भाव खजील झाले होते. कारण जमीन विकून ते पसार झाले होते. आपण गोप्याला काहीच बोललो नाही याची त्यांना भीती वाटत होती. शिवाय ते एहसान फरामोश होते. ते सारे उपकार विसरले होते.

तो एक हात घेऊन घरी आला होता. आई म्हातारी झाली होती. वीस वर्षाचे कोवळे पोर आज घरी आले होते. सारे बालपण त्यांनी आपल्या भावंडांसाठी खर्च केले होते. तीच भावंडे आज त्याच्या पाठीमागे खंबीर उभे राहायला हवी होती. पण ते उंच भरारी घेऊन आकाशात उंच स्थिरावले होते. खरं तर त्याला आज आधाराची गरज होती. त्याच्या भावांनाही त्याच्या उपकारांची परतफेड करता येणार होती. पण नीतीमत्ता हरवलेले भाऊ काय करणार होते. आता मात्र गोप्याला पुन्हा नव्याने सुरुवात करावी लागणार होती. कारण त्याची बये थकली होती. मोलमजुरी तिला आता होत नव्हती. गोप्याचे वैभव हरपले होते. तो खूप रडला. पण पुन्हा हिम्मत करून तो उभा राहिला. एवढ्या दिवस तो भावंडांसाठी जगत होता. आता त्याला त्याच्या बयेसाठी जगायचं होतं. म्हणून त्यांनेही पुन्हा भरारी घेण्याचे ठरवले. त्यांने आसवे पुसली आणि मोठ्या हिमतीने पुन्हा नव्याने जगण्याचा निर्धार केला. जणू काही घडलेच नाही.

पैशापुढे नात्यांचे डोंगर कसे भराभर कोसळतात हे या भावंडाच्या वागण्यातून दिसत होते. पैशापुढे नाती किती तकलादू असतात आणि पैसा कसा नियती बदलून टाकतो याचा परिपाठ म्हणजे जग्गू आणि किशा होता. गोप्या दिवा होऊन जळला होता. पण नियतीने त्याला विझवण्याचा घाट घातला होता. तरी तो हिम्मत हरला नव्हता. तो पुन्हा तयार झाला गगन भरारी घेण्यासाठी. उंच उंच उडण्यासाठी!

***

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

श्रद्धा
ब्युटी पार्लर

A/C

समाजातील महिलांना खास सवलत

सौ.सविता मिननाथ शिंदे



83294 66520
96578 53811

मेकओव्हर अॅन्ड अॅकेडमी

राजमुद्रा रेसिडेन्सी, १ ला मजला आळे



SHINDE DEVELOPERS

SHOP AND
1 & 2 BHK
LUXURIOUS
FLATS

Meennath Shinde
Contact :
9860418462
9890363171
9822011156

NEAR ATHARVA MANGAL KARYALAY,
ALE, TAL. JUNNAR, DIST-PUNE
Email : rushishinde20033@gmail.com

आमचे प्रेरणास्थान



कै.नामदेव नाथा श्रीमंदीलकर



कै.भारती नामदेव श्रीमंदीलकर

एस.टी.इंजिनीयर्स

सुदान नामदेव श्रीमंदीलकर
9373046395

प्रविण नामदेव श्रीमंदीलकर
9373577562

आमचेकडे लेथ मशीन, सी.एन.सी.मशीन व सर्क्युलर बँड सॉ कटींग इ.कामे खात्रीशीर करुन मिळतील.

गणेशनगर, रस्ता क्र.२, चिखली, पुणे ४११ ०६२

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



Vinod B. Kumbhar
C.E.O.
+91 8007777642



Arvind B. Kumbhar





TRIMURTI FURNACE PVT. LTD.

All Types of Furnace Manufacturer

Plant-I G-81, M.I.D.C.,Ambad Industrial Area, Nashik - 422 010

Plant-II Plot No.11/2/9, Sumit Compound, MIDC, Ambad, Industrial Area, Nashik - 422010, Maharashtra.

Phone : +91 0253-2384656, Email : trimurtifurnace4@gmail.com. Web : www.trimurtifurnace.com

Dengale Automobiles SG Auto

Service | Maintenance | Repair

डेंगळे ऑटोमोबाईल्स | BOSCH Service

CARS OF ALL BRANDS WILL BE REPAIRED / MAINTAINED / SERVICED HERE

CASHLESS / POSTPAID INSURANCE WORK OF ALL COMPANIES WILL BE DONE IN OUR WORKSHOP

- Genuine Spare Parts
- Electronic Engine Tuning & Scanning
- Complete Car Service
- 3D Wheel Alignment & Balancing
- Denting-Painting
- Washing, Polishing & Interior Cleaning
- Battery, Alternator & Starter Service
- Car Accessories

Mob.: 8999 899 759 / 7498 529 255
93097 08700
Email : sgautoecs@gmail.com



DENGALE INSURANCE SERVICES

ICICI Lombard Nibhaye Vaade | TATA AIG WITH YOU ALWAYS | HDFC ERGO | Chola MS GENERAL INSURANCE | Royal Sundaram General Insurance | digit | Oriental Insurance | Liberty General Insurance

सर्व वाहनांचे (2 Wheeler/4Wheeler/Heavy Vehicles) सर्व इन्शुरन्स योग्य दरात मिळतील. इन्शुरन्स संपलेल्या वाहनांचे इन्शुरन्स Renew करुन मिळतील. Zero Depreciation, Comprehensive & 3rd Party इन्शुरन्स उपलब्ध आहेत.

Mobile : 7755919900 / 9529601550

डेंगळे गार्डन मंगल कार्यालय

Mobile : 9960190015 / 9503029006

Address : Nira Road, Sant Gorakumbhar Nagar, Infront of K Mart, Kasba, Baramati Dist. Pune

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



Atharva Rahul Raje
Managing Director



Sapna Rahul Raje
Finance Director

ARGIO
Atharva Raje Group of Industries & Organization

COME & FLY WITH
ARGIO !

Our Products & Services

1. Website Application & Software Development
2. Electric Vehicle Charging Stations-2W, 4W & Bus
3. EV Smart Batteries - 2W, E Rickshaw & Solar
4. Augmentation Services



EV Charging Station



EV Smart Battery

Add.: - "Pratishobha Bunglow" S. No. 28,
Nr. Bharati Hospital, Chaitanya Nagar, Pune - 411043
Email : atharva.argio@gmail.com
info.argio9@gmail.com
7083664971 | 9529935365

Follow us on: @argio.pvt.ltd
@dadasaheb.raje

Website : www.argioprivatelimited.com

परंपरा विश्वासाची आणि चवीची

कुंभार बंधु
9011017494
7709837589
8605320741

तळबीडकर वडेवाले ™

तळबीडकर वडेवाले उद्योग समुह
खाल तर तृप्त व्हाल.....
आमच्या असंख्य ग्राहकांना दिपावलीच्या कोटी कोटी शुभेच्छा

पत्ता : संत गोरोबाकाका मंदीरा शेजारी, मु.पो.तळबीड, ता.कराड, जि.सातारा

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



डॉ.सुखदेव मा.कुंभार
M.D.(Hom.)
होमिओपॅथिक कन्सल्टंट
मोबा : ९४२२४३४१९१

श्री क्लिनिक

मंगळवार ते गुरुवार, शनिवार व रविवार
सोमवार बंद

आरोंदा, ता.सावंतवाडी, जि.सिंधुदूर्ग ४१६ ५१३.
फोन : ०३६३-२६२२११



डॉ.शुभंम सुखदेव कुंभार
M.D.(Hom.)
होमिओपॅथिक कन्सल्टंट
9404777881, 7262827010

श्री होमिओपॅथीक क्लिनिक

तपासणी वेळ : सकाळी १० ते २ संध्या : ४.३० ते ८.००
सोमवार बंद

ग्रिन हिल, शांतादुर्गा मंदिर रोड,दामीयान दि गोवा समोर,
पर्वरी, गोवा.



मयुरेश पेंटस



श्री.रत्नकांत दगडू कुंभार
९८२२९७८४५७



श्री.किशोर रत्नकांत कुंभार
९८८१०३१६२१



श्री.सुनिलकुमार रत्नकांत कुंभार
९०२८९०००५०

अधिकृत विक्रेते : NEROLAC, ESDEE, CAMEL

★ रबर ★ प्लास्टर ★ शाडू ★ केसर ★ सर्व प्रकारचे रंग
★ स्प्रे गन ★ ब्रश इत्यादी साहित्य मिळेल

★ पुट्टी ★ प्रायमर ★ इमल्शन

अमचेकडे प्लास्टर व शाडू मातीच्या गणेशमुर्ती बनवण्यासाठी व रंगविण्यासाठी आवश्यक असणारे सर्व साहित्य व रंग योग्य दरात मिळेल.

इमारत रंगविण्यासाठी आवश्यक सर्व रंग व साहित्य योग्य दरात मिळेल

पत्ता : सुरभी चौक, मु.पो. उंब्रज,ता.कराड, जि.सातारा पिन ४१५११०९



Ganesh Kumbhar

Mob .: 9762322347
9823745257

TERRA
INFORMATIC SERVICES

GIS Work, Auto-CAD Design &
All type of Surveying Work

Office : Plot No. 32, Sai Krupa Housing Society,
Near Ram Mandir, Dhankawdi, Pune 411043.
Email : tera_pune@rediffmail.com

Flat No. 05, Shrenik Residency, Ganraj Colony, Warje, Pune 58



VSK



श्री. किसन शिवाजी कुंभार
मो. 09881872823



श्री. विजय शिवाजी कुंभार
मो. 9881289332
7588945032

चि. मंगेश कि. कुंभार
B.Com.

ज्योतिर्लिंग वीट कारखाना

आमचेकडे उत्तम प्रतीच्या सर्व साईजच्या
विटा होलसेल दरात उपलब्ध

ज्योतिर्लिंग पेट्रोलपंप

मु. पो. गुळूंचे, ता. पुरंदर, जि. पुणे

Our Inspiration



Vishwanath Prajapati



Dhanapriya Auto Udyog

An ISO 9001 : 2000 company

Aluminium & Zinc Pressure Die Castings & CNC Precision Job Works

Works : Gat No.798, Plot No.1, Pawar vasti,
Kudalwadi, Chikhali, Pune-412 114.
Mob : 9823511436, 9823761476
Email : prajapati.chandr



मा.श्री.राजेंद्रशेठ जाधव

वरिष्ठ उपाध्यक्ष- पुणे जिल्हा कुंभार समाजउन्नती मंडळ,
माजी अध्यक्ष - जुन्नर तालुका कुंभार समाजउन्नती मंडळ
समन्वयक- सर्व तालुका अध्यक्ष,पुणे जिल्हा कुंभार समाजउन्नती मंडळ,
डायरेक्टर- श्री गोरोबा पतसंस्था,जुन्नर
संस्थापक अध्यक्ष-आळेफाटा व्यापारी असोसिएशन,
वरिष्ठ उपाध्यक्ष - जुन्नर-आंबेगाव,खेड व्यापारी महासंघ,
संस्थापक अध्यक्ष- रोटरी क्लबआळेफाटा
A गव्हर्नर-रोटरी इंटरनॅशनल डिस्ट्रिक्ट पुणे ३१३१
अध्यक्ष- ग्रामसुरक्षा दल,आळेफाटा
अध्यक्ष- मोफत सामुदायिक विवाह सोहळा समिती,जुन्नर तालुका
डायरेक्टर- ऑक्सियर गॅसेस इंडिया प्राव्हेट लिमीटेड,चाकण एमा-आयडीसी
प्रोप्रा- बालाजी ऑक्सिजन गॅस एजन्सी,आळेफाटा,नारायणगाव,मंचर,भोसरी,पुणे
प्रोप्रा-बालाजी कार आणि बालाजी मेडिक्ल आणि इंडस्ट्रियल एक्विपमेंट
मो.9011908055

आमचे प्रेरणा स्थान



कै. मारुतीराव तातोबा कुंभार (गुरूजी)

डॉ.शशिकांत मा. कुंभार
(एम.डी.मेडीसिन)

डॉ. सुर्यकांत मा. कुंभार
(बी.एच.एम.एस)



श्रेयस हॉस्पिटल
व अतिदक्षता विभाग (I.C.U.)

श्रेयस हॉस्पिटल, चांदणी चौक, मायणी फोन : (०२१६१)२७०२०१/२७०८७२

* क्रिटीकल केअर सेंटर * डायग्नॉस्टीक सेंटर * मल्टी स्पेशॉलिटी सेंटर

: उपलब्ध सोयी :

हृदय विकार चिकीत्सा
कॉम्प्युटराईज्ड इलेक्ट्रोकार्डीयोग्राम (E.C.G.)
सुसज्ज व पेशंट फ्रेन्डली आंतररूग्ण विभाग
अत्याधुनिक मल्टिपॅरा मॉनीटर्स सेंट्रल मॉनीटरिंग सिस्टीम
व्हेंटिलेटर्स - कृत्रिम श्वासोश्वास, डिफीब्रीलेटर, एक्सटर्नल पेसमेकर
फुप्फूस विकार चिकीत्सा - पल्मोनरी फंक्शन टेस्ट (P.F.T.)
हृदय विकार, मधुमेह, लकवा, मुत्रविकार, पोटाचे विकार, दमा, क्षयरोग, चिकीत्सा व उपचार
सुसज्ज लॉबोरेटरी ॲटो ॲनालाझर ॲण्ड कॉम्प्यु. सेल काऊंट
होमियोपथी कन्सल्टींग व ॲक्युपंक्चर उपचार
सुसज्ज ऑपरेशन थिएटर व सर्जिकल विभाग
२ डी - इको ॲण्ड कलर डॉप्लर

२४ तास तातडीची सेवा उपलब्ध



रिसेप्शन व अंतररूग्ण विभाग



कारडीयाक मॉनिटर



व्हेंटिलेटर



अतिदक्षता विभाग



सुसज्ज लॅबोरेटरी



डिफिब्रिलेटर व एक्सटर्नल पेसमेकर



मेडिकल स्टोअर्स

मे.शुभम मेडिकल्स ॲण्ड जनरल स्टोअर्स

देशी व विदेशी औषधे मिळण्याचे एकमेव ठिकाण.

: प्रोप्रा :
सौ. ऊर्मिला कुंभार

श्रेयस हॉस्पिटल, चांदणी चौक, मायणी,
ता. खटाव, जि. सातारा, फोन : (०२१६१) २७०६४७

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



डॉ. दिलीप शं.वाघोलीकर
एम. एस. (सर्जरी)

चिंतामणी हॉस्पिटल, सासवड
(100 Beded Multi Speciality Hospital)
आणि **पुरंदर हॉस्पिटल**

मु. पो. सासवड, ता. पुरंदर, जि.पुणे मो.: 9422351134
फोन : (निवास) - (02115) 222558

सुमंत सोनोग्राफी क्लिनिक
दामोदर सोसायटी, बिबवेवाडी, पुणे
वेळ : सायं. ६.०० ते ८.३०



डॉ. सुमंत दि. वाघोलीकर
- M.B.B.S., DMRE
- Fellowship in Obstetrics Ultra-sound Mediscan Chennai
- M.D. Radiology (USA IM)

चिंतामणी हॉस्पिटल, सासवड - वेळ : सकाळी १०.३० ते २.३०
पुरंदर हॉस्पिटल सासवड- वेळ : सायं. ४.३० ते ५.३०



मा.श्री. पांडुरंग गुणवंतराव कुंभार
मा. नगराध्यक्ष तथा नगरसेवक
न.प. कळंब, जि. उस्मानाबाद
Mob.: 9422655476



सौ. छाया पांडुरंग कुंभार
मा. नगरसेविका
न.प. कळंब, जि. उस्मानाबाद
Mob.: 9075200000



मा.श्री. हरिश्चंद्र गुणवंतराव कुंभार
पंचायत समिती सदस्य
कळंब, जि. उस्मानाबाद
Mob.: 9028056003



सौ. अनुराधा हरिश्चंद्र कुंभार
सरपंच, ग्रामपंचायत, डिसकळ,
ता. कळंब, जि. उस्मानाबाद



ॲड.राहुल पांडुरंग कुंभार
B.S.L.,L.L.B.
Mob.: 8446555999
पुणे न्यायलयात कार्यरत

सुजाता मजुर सह. संस्था, सारोळा, ता. वाशी
शरद पवार विद्या मंदिर, कळंब
यशवंतराव चव्हाण प्राथमिक विद्या मंदिर, कळंब
निवास : चांदवाडी रोड, बाबा नगर, मु.पो.ता. कळंब, जि. उस्मानाबाद

प्रेरणास्थान



कै.मोरेश्वर चिंतामन आचोळकर





सुनिल मोरेश्वर आचोळकर
B.A., LLB
नगरसेवक
सदस्य,स्थायी समिती
सदस्य, प्रभाग समिती-G



सौ.नीता सुनिल आचोळकर



मिखील सुनिल आचोळकर
B.E.(IT)

मुख्य कार्यालय : विरार, विरार(पूर्व), ता.वसई, जि.पालघर, पिन ४०१ ३०५
दूरध्वनी : ०२५०-२५२५११०१/१०२/१०३/१०५/१०६ **फॅक्स :** ०२५०-२५२५११०७
निवास : मु.पो.कामण, हनुमान रोड, ता.वसई, जि.पालघर, पिन ४०१ २०८
वसई निवास : ७ साई सानिध्य, मधुबन बंगलो स्कीम, साई मंदिराजवळ,
भाबोळा, वसई (प), जि.पालघर-४०१२०२ फोन : **९३२२०६७०७७ / ९८९०२३८५०५**

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

#masalā

VEG | NON-VEG

Shop No 1, Laigude Properties, Near Lokmat Press,
Wadgaon Khurd, Sinhgad Road, Pune 411041

TUSHAR PARINCHEKAR
+91 9890 927 430

Associated With | RUBIK HOPITALITY PVT.LTD. | Parinchekar DEVELOPERS



गजानन हार्डवेअर स्टोअर्स



शिवाजी निवृत्ती कुंभार

मा.चेअरमन, गजानन ग्रामीण बिगरशेती सह.
पतसंस्था मर्यादित, पाटण
मो. 9881036296



स्वप्नील शिवाजी कुंभार
9763015296



चि.संकेत शिवाजी कुंभार
बॅचलर इन फाईन आर्टस

* अधिकृत विक्रते *

एशियन कलर वर्ल्ड, नेरोलॅक, बर्जर, प्रिया पेन्टस्
व सर्व हार्डवेअर ठोक व किरकोळ विक्रेते

जुना एस.टी. स्टँड, पाटण, जि. सातारा. फोन : 02372-283096



Sou. Shivkumari H. Prajapati



Hariram R. Prajapati
C.E.O.



Vikas H. Prajapati
B.E. Mech., MBA E&FB

S. K. INDUSTRIES

(An ISO 9001: 2008 Company)

Since 1986

SKI

Manufacturers of
Industrial Fastness for Electronics and Auto Industries

Office : Plot No. RM 43, 1st Floor, M.I.D.C. Residance Zone, Dombivli (E) 421203.
Tel.: (0251) 2456368 Fax : 2449041 **Email :** skindus@email.com
Works : W 233/B, W233/233/1 M.I.D.C. Phase II, Dombivli(E) 421 203 Tel.: (251) 2870595 Cell : 9820291248

धाक

– जयदीप प्रतिभा दत्तात्रय आफळे

प्रविण आणि प्रेरणाला बाबा रिटायर्ड झाल्यावर आपल्या घरी येऊन राहवेत असे वाटत होते. पण बाबा त्यांच्या घरी जाऊन राहायला तयार नव्हते. त्यांच्या घरी जायला लागू नये म्हणून ते वेगवेगळी कारणे देत होते. शेवटी प्रविणने असे काय केले की बाबा त्यांच्या घरी जाऊन राहायला तयार झाले.



बेल वाजली तशी नानांनी समोरील वहीमधील नजर बाजूला करून दरवाज्याकडे बघितले. ते उठणार इतक्यात दरवाजा उघडला व प्रेरणा घरात आली.

''अरे वा, तू इकडे कशी काय आज? बरे झाले, बऱ्याच दिवसांनी आलीस. बस जरा. उन्हाची आली आहेस, तुझ्याकरता छान सरबत करतो,'' असे म्हणून ते स्वयंपाकघरात गेले. पर्स खुर्चीवर ठेवून ती बाथरुममध्ये जाऊन फ्रेश होऊन आली. ती खोलीत आली तेव्हा तिच्याकरता स्टुलवर सरबत ठेवले होते.

''तुम्हाला म्हणाले ना, माझ्या बँकेची एक ब्रँच या घराजवळ आहे म्हणून. तिथे आज सकाळी मिटींग होती. तिथे आले होते. विचार केला

इतक्या जवळ आलेच आहे तर तुम्हाला भेटूनच जावे. तुम्ही काही आपल्या घरी यायला तयार नाही.''

''तू म्हणतेस ते बरोबर आहे. पण तुला माहितीच आहे. माझे लहानपणापासून सगळे आयुष्य इथेच गेले. त्यामुळे या बिल्डींगमधलेच काय तर आजूबाजूचे लोक, इथले दुकानदार, टपरी असलेले लोक सगळे इतक्या ओळखीचे झाले आहेत, कंटाळा फारसा येत नाही. फारच कंटाळा आला की मी आपल्या गॅलरीत जाऊन उभा राहतो. माझ्यासारखे म्हातारे जात असले की त्यातील काहींच लक्ष असतेच. एखाद्याने जरी मला बघितले की त्यांच्या लक्षात येते व ते माझ्याशी गप्पा मारायला येतात. मला जर उत्साह असेल तर मी खाली जाऊन चक्कर मारुन येतो. कोणीना कोणी ओळखीचे भेटतेच. त्याला वेळ असला तर गप्पा मारत बसतो. तेवढाच विरंगुळा. एकदा संध्याकाळ झाली तर आपला टीव्ही, इडियट बॉक्स सुरु झाला का रात्री दहापर्यंत कसा वेळ जातो कळत नाही. आत्ता तिथे तर सगळेच दंगले. तिथे मी जास्त राहिलो नाही, त्यामुळे फारशी ओळखही नाही. तुम्ही दोघे ऑफिसला बाहेर पडला की मी काय करावे हा प्रश्नच आहे. तसा आठ दिवस राहिलो आहे मी. मग लक्षात आले की इथेच दिवस जास्त चांगला जातो. कोणीना कोणी भेटत राहतो. तिथे कोणीच भेटत नाही. सांग आता मी काय करणार?''

''बाबा पण तो प्लॉट तुम्हीच विकत घेतलात. पाच वर्षापूर्वी तुमच्या डिझाईन नुसार तो बांधलात आणि आता तुम्हीच तिथे राहायला येत नाही, हे बरोबर आहे कां? आपल्या सोसायटीमध्ये सुध्दा तुमच्याच वयाची लोक आहेत. तुम्ही जास्त दिवस राहिला नाहीत त्यामुळे तुमची ओळख नाही एवढेच. एकदा तिथे राहायला या. तुमची ओळख होईल, मग इथे तुमचा दिवस जातो तसा तिथेदेखील जाईल. मी तुम्हाला मागे पण म्हणाले होते, की तुम्ही लॅपटॉप वर लिखाण करा, वहीत लिहायच्या ऐवजी. ते शिकायला देखील तुमचा बराच वेळ जाईल. तुम्हाला त्यावर सर्व वर्तमानपत्रे वाचता येतील.''

''इतके सोपे नाही ते. तुमच्या पिढीकरता सोपे असेल. मला मोबाईल जेमतेम वापरता येतो. लॅपटॉप कधी शिकणार?''

''मी शिकवेन तुम्हाला. मला वाटते तुम्ही तिथे राहायला याच, त्याशिवाय सगळे काही सुधारणार नाही.'' तिच्या शेवटच्या वाक्याने नानांनी चमकून तिच्याकडे बघितले. आपण काहीतरी गडबडीने बोलून गेलो हे तिच्याही लक्षात आले.

''काय बिघडले आहे तिथे?'', त्यांनी विचारले पण तिने त्याला लगेच उत्तर दिले नाही. ती आता शब्दांची जुळवाजुळव करत होती. त्यांनीही तिला विचार करायला वेळ दिला. आता त्यांनी समोरील वहीत परत लिहायला सुरवात केली.

''बाबा, आता पंधरा दिवस झाले, प्रविण रोज घरी येताना पिऊन यायला लागला आहे. लग्न झाल्यास त्याला मी कधी दारु पिलेला बघितला नाही. पण गेल्या पंधरा दिवसात हे फार वाढत चालले आहे. मी त्याला प्रेमाने सांगितले, शांतपणे समजावले. रागावून सांगितले, शेवटी घर सोडायची धमकी देखील दिली. पण त्याच्यात काहीच फरक पडत नाही आहे. आता माझ्यापुढे शेवटचा पर्याय उरला ते म्हणजे तुम्ही.'' डोळे पुसत ती म्हणाली. ''तुम्ही घरी आलात की तुम्हाला घाबरुन का होईना पण तो पिणार नाही.''

''तुला तर माहितीच आहे, माझा त्याला धाक कधीच नव्हता. त्याला धाक हिचाच होता. आता ती तर गेली.''

''तुमचा धाक नसेल पण तुमच्यासमोर पिऊन यायची हिम्मत तो करेल असे मला तरी वाटत नाही. तेवढा तरी मान तो तुम्हाला नक्कीच देईल. म्हणूनच म्हणते तुम्ही घरी चला. त्याची फार गरज आहे त्याला सुधारण्याकरता.'' नाना काही उत्तर देणार इतक्यात तिचा फोन वाजायला लागला. ती फोन घेईल म्हणून ते गप्प राहिले, पण ती फोन घेईना.''

''अगं फोन तर घेशील, महत्वाचा असेल.''

''त्याचाच फोन आहे. मी त्याला काल सकाळी म्हणाले होते, घर सोडून जाईन. कालपण त्याने मला फोन केला होता. मी घरी येईन हे कळाल्यावर तो परत काल पिऊन आला.''

''पण फोन न बघताच तुला कसे कळाले की फोन त्याचाच आहे हे?''

''बाबा तशी फोनची रिंगटोन आपल्याला ठेवता येते. त्यावरुनच कळते आपल्याला कोणाचा फोन आहे हे.''

''छानच की. मला असे काही असते हे माहीतच नव्हते. मला कोणाचाही फोन आला तर एकसारखीच रिंग वाजते. एकदा मलाही तसे करुन घ्यायला हवे.''

''मी तुम्हाला सेटिंग करुन देते. आता मी तुमचे कपडे भरायला घेते, नाहीतर तुम्ही तुम्हाला हवे आहेत ते कपडे बाहेर काढा. मी ते बॅगमध्ये भरते.''

''ठिक आहे. मी कपडे बाहेर काढतो'', असे म्हणून नाना आतल्या खोलीत जायला उठले तशी परत तीच रिंगटोन वाजली. मुलाचा फोन हे आता नानांच्यादेखील लक्षात आले. तिने फोन अर्थात घेतलाच नाही.

''तुझ्या बँकेतील कोणाचा फोन नंबर त्याच्याकडे नाही आहे ना?''

''नाही, मी तरी कोणाचा नंवर दिल्याचे मला आठवत नाही. त्यानेही कधी मागितला नाही. पण असे का विचारता?''

''तू फोन घेतला नाहीस की तो तुझ्या बँकेत कोणालातरी फोन करेल आणि विचारेल.''

''पण मी त्याला नंबर दिला नाही, त्यामुळे तसे काही होईल असे मला वाटत नाही.''

नानांनी आत जाऊन आपले चार शर्ट व दोन पँट बाहेर काढल्या. प्रेरणा खोलीत आली.

''हे काय फक्त दोनच पँट? तुम्ही अजून कपडे घ्या. तुमची मोठी बॅग घेऊ आपण. पण इतके कमी कपडे नका घेऊ तुम्हाला दोनच दिवसांकरता राहायचे नाही.''

''अगं बाहेरचे जास्त कपडे नकोतच. मी कुठे बाहेर जाणार आहे तेव्हा? घरातले दोन कपडे घेतले तेवढे पुरेसे आहेत.''

''असे काही नाही. तुम्ही तिथे रोज मॉर्निंग वॉकला जाणार आहात. त्याशिवाय तुमची तिथे इतर लोकांशी ओळख कशी होईल? मी बघते ना रोज सकाळी बरेच जण बाहेर असतात.''

''पण मला मॉर्निंग वॉकला जायची कधीच सवय नव्हती. आता रिटायर्ड होऊन महिना होऊन गेला, तरी सकाळी मी घरीच असतो. माझे काही मित्र म्हणतात, चल म्हणून, पण मीच कंटाळा करतो.''

''तुम्हाला तिथेही मित्र व्हायला हवेत ना? मग दोन दिवस तरी जा सकाळी. कारण नंतर संध्याकाळीच तुमच्या वयाचे लोक बाहेर पडतात. त्यामुळे तुमची ओळख होईपर्यंत तरी सकाळी फिरुन या. मी तर म्हणते तुम्ही टी शर्ट घ्या. सकाळी सगळे तसेच कपडे घालतात.''

''मी आणि टी शर्ट? काहीतरीच काय? या वयात ते शोभूनही दिसणार नाहीत.''

''ठीक आहे. पण बाहेरच कपडे जास्तच घ्या.'' तिने असे म्हटल्यावर त्यांनी कपाटातून अजून कपडे काढले. तिने त्यांच्या घड्या करुन ते बॅगमध्ये भरले व बॅग घेऊन ती खोलीबाहेर पडली. आता त्यांनी आत्ता घालायचे कपडे अंगात घालायला सुरवात केली. तेवढ्यात त्यांचा फोन वाजला. आता त्यांनी पँट काढली असल्याने व फोन बाहेर असल्याने, बाहेर जाणे त्यांना शक्य नव्हते.''

''कोणाचा फोन आहे? तो घेना,'' त्यांनी आतूनच तिला सांगितले.

''त्याचाच आहे. मी नाही घेऊ शकत. त्याला कळता कामा नये तुम्ही आज येणार आहे ते. मी फोन घेतला तर त्याला तेवढे नक्कीच कळेल.''

''ठीक आहे, मी बाहेर आल्यावर त्याला फोन करेन'', असे म्हणून त्यांनी कपडे लगबगीने बदलायला सुरवात केली. कपडे घालून होताच ते बाहेर आले. त्यांनी मुलाला फोन लावला.

''बाबा प्रेरणा तिथे आली आहे का?''

''का? तिला इथे यायची काय गरज? ती तिच्या ऑफिसमध्ये असेल.''

''तिला मी फोन केला, पण तिने तो घेतला नाही. मी तिच्या ऑफिसमध्ये फोन केला, तर कळाले ती सकाळी तासभरच होती, मग तिने सुट्टी घेतली. म्हणून मला शंका आली की ती घरी आली असेल.''

''तू तिला परत फोन कर, मग तुलाच कळेल काय ते. नाहीतर मी तिला फोन करतो. मला कळाले की तुला सांगतो. पण तुझे तिच्याकडे काय काम आहे. तू ऑफिसमध्ये कोणाला फोन केला होतास?''

''काही खास काम नाही. सहजच फोन केला होता. ती फोन घेत नाही म्हटल्यावर काळजी वाटायला लागली. तिच्या ऑफिसचा कोणाचाच नंबर माझ्याकडे नव्हता. मग बँकेच्या ब्रँचचा नंबर गुगलवरुन घेतला आणि केला फोन. तुम्ही घरी कधी येणार आहात? आता तर तुम्ही रिटायर्ड झाला आहात. आता तर तुम्हाला ऑफिस जवळ पडते असे काही नाही'', असे म्हणून त्याने फोन ठेवून दिला.

''तू आज सुट्टी घेतलीस?''

''सॉरी, मी तुमच्याशी खोटे बोलले. बँकेची अशी कोणतीही मिटींग नव्हती. पण आल्याबरोबर मला सगळे काही सांगायचे नव्हते. मला फार प्रेशर आले होते. माहेर जवळ नसल्याने जाऊ शकत नाहीच, पण फोनवर असे सांगू शकत नाही. ते परत काळजी करत बसतील. त्यामुळे माझ्यापुढे जास्त मार्ग नव्हताच. शेवटी इथे आले.''

''ठीक आहे, निघायचे. मी तयार आहे'', असे नानांनी म्हटल्यावर दोघे बाहेर पडले.

''तुम्ही कधी आलात?'' दरवाजा उघडल्यावर नानांना बघताच प्रविणने विचारले.

''मी मघाशीच आलो, तासभर झाला असेल.''

''दुपारी आपण बोललो तेव्हा काही म्हणाला नाहीत इथे येणार म्हणून.''

''तेव्हा असे काही ठरविले नव्हते. तुझा फोन झाल्यावर प्रेरणाला फोन केला. ती म्हणाली कोणतेतरी बिल भरायला तिला उशीर झाला. ते आता ऑनलाईन भरता येत नाही. त्यामुळे तिला प्रत्यक्ष जाऊन भरावे लागले. त्याकरता ती बाहेर गेली होती. ती सुध्दा म्हणाली की मी घरी कधी येणार. शेवटी विचार केला उद्या कशाला, आजच निघावे. मग निघालो. अनायसा घराची किल्ली सुध्दा माझ्याकडे होती.'' असे बोलता बोलता ते वर्तमानपत्र खाली ठेवून उठून प्रविणजवळ येऊन, बोलता बोलता त्याला एक प्रदक्षिणा घालून म्हणाले.

''हो. तिचा माझा नंतर फोन झाला. तिला यायला थोडा उशीर होणार आहे. तुमचा चहा झाला? खायला काही हवे आहे का?''

''नाही, मी घरातून निघताना चहा करुनच बाहेर पडलो. इथे आल्यावर खाणे झाले. तू तुझे आवरुन घे.''

''चालेल. मी आवरुन घेतो,'' असे म्हणत तो आतील खोलीत गेला. बंगल्याची रचना अशी होती की तो थोडा उंचीवर होता. हॉलमध्ये बाहेरुन आल्यानंतर उजवीकडे स्वयंपाकघर होते तर त्याच्या विरुध्द दिशेने खोलीच्या मध्यातून एक पॅसेज गेला होता तो पुढील दोन बेडरुमकडे. त्यातील पहिली बेडरुम होती नानांची तर पुढची होती प्रेरणा प्रविणची. तो त्याच्या बेडरुममध्ये गेला. बंगला थोडा उंचीवर बांधला असल्याने दोन्ही बेडरूमना बंदिस्त बाल्कनीदेखील होती.

थोड्याच वेळात प्रेरणा आली. आल्याबरोबर तिने ठरल्याप्रमाणे विचारले, ''बाबा तुम्ही कधी आलात?''

''मला येऊन झाला असेल दिड तास.''

''तुम्हाला चहा करु का? आणि खायला पण देते. पाच मिनिटे थांबा.'' बोलता बोलता तिने खूण करुन प्रविण पिऊन आला का विचारले. नानांनी लगेचच खुणेने नाही म्हणून सांगितले.

''मी तिथून निघताना चहा करुनच निघालो. तिथे संध्याकाळी खायला चिवडा केला होता, तो इथे घेऊन आलो. इथे आल्यावर तोही खाल्ला. रात्रीचे जेवणही बरोबर आणले आहे. त्यामुळे तू निवांत रहा. गडबड करु नकोस.''

''एवढे करायची काय गरज होती. मी तुमचा स्वंयपाक केला असता की.''

''तू माझ्यासाठी खायला आणि स्वयंपाक केला असतास, पण तिथले अन्न काय करु? त्यामुळे येताना बरोबर घेऊन आलो. आधीच इथे यायचे ठरले असते, तर माझा संध्याकाळचा स्वयंपाक केला नसता. तुम्ही दोघांनी आग्रहच धरला त्यामुळे आलो.''

''बरे झाले त्यामुळे तरी आलात. मी आलेच आवरुन'', असे म्हणून ती आत गेली. ती आत गेली आणि प्रविण फोनवर बोलतच बाहेर आला. ''त्यापेक्षा तूच घरी ये, बाबापण आले आहेत. तुला त्यांनापण भेटता येईल'', असे म्हणून त्याने फोन ठेवला.

''नचिकेचा फोन होता. तो आपल्या घराजवळच आला होता. मला भेटायला बोलवत होता. मी त्यालाच इथे बोलावले आहे. येईलच इतक्यात'', पण नानांना नचिकेत कोण हे लक्षात येईना. त्यांच्या चेहऱ्यावरचे ते भाव ओळखून प्रविणने पुढे सांगितले,

''नचिकेत म्हणजे निरजचा भाऊ. तोच निरज जो शाळेत माझ्याबरोबर होता, आपल्या त्या घरी पण बरेचदा येऊन गेला. मागच्या वर्षी सप्टेंबरला तो गेला अमेरिकेत, त्याआधी जानेवारीत त्याचा हा धाकटा भाऊ इथे नोकरीकरता राहायला आला. आता त्याने जवळच एक दुकान सुरु केले आहे. लग्नातसुध्दा तो आला होता, पण माझे इतके मित्र आले होते की तो तुमच्या लक्षात राहणे अवघड आहे. तसे निरजच्या लग्नात आपण गेलो होतो. पण तुमची नोकरी असल्याने तुम्ही आदल्या दिवशी रात्रीच येऊन गेलात. त्यामुळे त्याला तुम्ही कदाचित बघितले नसेल. त्याची आणि तुमची एरवी कधी गाठ पडली नाही. त्यामुळे तुम्ही त्याला ओळखणार नाही.'' दोघांचे बोलणे सुरु असताना. प्रेरणा हॉलमध्ये येऊन स्वयंपाकघरात गेली.

''त्याचे अजून लग्न व्हायचे आहे का?''

''बाबा तो निरजचा धाकटा भाऊ, निरज इथून जाताना लग्न करुनच गेला. आपण त्याच्या लग्नात गेलो होतो. नचिकेतला लग्नाला अजून अवकाश आहे. तो इतक्यात तरी लग्न करेल असे वाटत नाही.''

तेवढ्यात बेल वाजल्याने त्याने दरवाजा उघडला. नचिकेत आला होता. त्याने बुट काढून नानांना नमस्कार केला.

''छान झाले तुम्ही इथे राहायला आलात ते.''

''बाबा तुम्हाला पुढचे दोन दिवस माझ्याबरोबर मॉर्निंग वॉकला यायचे आहे. मी तुमची इथल्या लोकांशी ओळख करुन देईन. म्हणजे इथे तुमच्या ओळखीचे कोणी नाही असा प्रश्न राहणार नाही. नंतर वाटल्यास तुम्ही नका येऊ पण ओळख करुन घ्या. इथेपण तुमचा दिवस छान जाईल.''

''तुम्हाला कंटाळा आला की मला फोन करा. मी नोकरी करत नाही, माझे जवळच दुकान आहे. त्यामुळे माझ्याकडे दुपारी वेळच वेळ असतो. त्यामुळे मी तुम्हाला कंटाळा येऊन देणार नाही.'' नचिकेत म्हणाला. तेवढ्यात चहा घेऊन प्रेरणा बाहेर आली. तिने तिघांना चहा दिला. पाठोपाठ तिने शिरा आणून दिला.

शिरा खाऊन झाल्यावर नचिकेत काही बोलणार होता, तेवढ्यात त्याला फोन आला. त्यामुळे बोलता बोलता तो आतल्या बेडरुममध्ये गेला. आतूनच त्याने प्रविणला हाक मारली. त्यावर तोपण आत गेला. प्रेरणा स्वयंपाकघरात होती. त्यामुळे नाना उठले व आत त्यांच्या बेडरुममध्ये गेले. ते गॅलरीपाशी जाऊन बाहेर बघत असतानाच्या त्यांच्याच शेजारी असलेल्या दुसऱ्या बेडरुममधील गॅलरीमध्ये उभे असलेल्या नचिकेत व प्रविणचा संवाद त्यांना ऐकू आला. खरंतर त्या दोघांचा संवाद त्यांना काही ऐकायचा नव्हता, पण त्याचे पहिले वाक्य ऐकल्यावर त्यांना दोघांचे बोलणे ऐकायचा मोह आवरला नाही.

''काहीही म्हण. तू सांगितलेली आयडिया कामाला आली. मी घरी आल्यावर पिऊन आल्याचे सोंग केले. आणि प्रेरणाला ते कळालेच नाही. तिने मला शांतपणे सांगितले, रागवून सांगितले, घर सोडायची धमकी देऊन देखील झाली. शेवटी अपेक्षेप्रमाणे ती नानांकडे गेली. मी दारु प्यायला लागलो म्हणल्यावर नाना तिथे थांबणे शक्यच नव्हते. लगेचच ते आले. आता मी त्यांना जाऊ देणार नाही. थँक्स तुझी आयडिया शेवटी चालली. आता प्रेरणा व माझ्यात जरा विसंवाद झाला आहे, पण मी तिला खरे काय ते सांगेन आता. तिलादेखील पटेल माझे नाटक.''

हे ऐकल्यावर नाना भांबावले. आपला मुलगा कधीच दारु पीत नव्हता याचा आनंद बाळगावा की त्याने खोटे बोलून आपल्याला इथे यायला भाग पाडले म्हणून वाईट वाटावे हे त्यांना कळेना.

***

जाधव विट सप्लायर्स


श्री. अण्णासाहेब ना. जाधव
मो. ९८२२८०८०६५


चैतन्य अण्णासो जाधव
मो. ९८२२८०८०६५


श्री. बबनराव ना. जाधव
मो. ९५०३४६६०६५

गोरोबानगर, कोपरगांव.

योगेश जाधव : ९७६७०३३६००

श्री. दिलीप सुदामराव जोर्वेकर



सप्तशृंगी
विट सप्लायर्स

गोरोबानगर, कोपरगांव, जि. अहमदनगर.
मो. : ७३५०४४८३८७, ९८२२८४२२३४, ९९२२३०१६८४.

देवदासी

– प्रा. डॉ. जी. आर. प्रवीण जोशी, बेळगाव

सौंदत्ती यलम्मा हे कर्नाटकातच नव्हे तर अख्ख्या पंचक्रोशीत देवीचं प्रसिद्ध शक्तीपीठ! पुणे, मुंबई, तळकोकण सगळीकडे तिचा महिमा पसरलेला. तिचे भक्त, देवदासी अन् इतर लोक तिला कुलदेवी म्हणून पूजीत. देवदासीचं काम म्हणजे देवीची पूजा, आरती, त्यासोबत येईल त्याच्याशी शय्यासोबत! यलम्मा देवदासी होती तिनं जे भोगलं ते तिची मुलगी मायक्कानं भोगू नये असं तिला वाटतं होतं. मायक्काने बारावीपर्यंत शिक्षण घेतलं होतं. मायक्काला देवदासी होणं मान्य नव्हतं. ती अंधश्रद्धा निमूर्लन, जटा निमूर्लन अन् देवदासी निमूर्लन ह्या शिबिरात काम करीत होती. मायक्काने देवदासी होण्याचा मार्ग न पत्करता स्वत:साठी कोणता नवीन मार्ग निवडला?



हीप्परगी तसं नदी काठचं गाव. कृष्णा नदीच्या आल्याड व्हतं. देवनकट्टी नदीच्या पल्याड. तस बघीतलं तर, दोन्ही गाव बक्कळ शिरमंत! उसाच नगदी पीक! जोडीला हळद अन् मिरची, खपली गहू! शेतीबी सुजलाम अन् सुफलाम! नदी काठच्या पुरामुळं नवीन तांबडी माती येऊन पडत व्हती. इजापूर जिल्ह्यातल, कर्नाटकी गाव. किसना नदीवर धरण बांधून पाणी अडवल्याल. त्यामुळं बारा महिने शेतीला अन् गावाला पाण्याचा सुखाळ व्हता.

हिप्पर्गी नदीच्या आल्याड दहा बारा हजारांचा उंबरा. गाव लै टुमदार गावाच्या येशीत भला मोठा वडाचा पार. गावच्या मावळतीला मिरजेला जाणारी डांबरी सडक. तर उगवतीला अथणी विजापूरला जाणारा डांबरी रस्ता. गावातल्या वडाच्या पाराच्या मागच्या अंगाला मारुतीचं देऊळ. जरा म्होरं आलं की गावची कमान. कमानीतून आत आलं की मोठं पटांगण. पटांगणाच्या कोपऱ्यात पानांची टपरी! अन् लागूनच मगदूमाच हाटील! ह्या होटेल मंदी फकस्त भडंग, भजी अन् चहाची सोय! गावच यष्टी स्टॅन्ड बी ह्येच. ह्या होटेल म्होर उगवतीला बाजारला जाणार रस्ता. तर वरच्या अंगाला समदं गाव पसरलेलं. भर चौकात गावची चावडी. अन् चवडीच्या माग गावची तालीम. ह्या तालमीत सांच्याला गावातलं शिकणार पैलवान येत व्हतं. त्यांचा गुरू बी लांडगे मास्तर जातींनी हजर! गावात दूध दुभत्याला काय बी कमी नव्हतं! कारण बी तसच व्हतं. नदीकाठी कुरणाची रान कायम हिरवीगार! तालमीला लागून मसुदी पण व्हतीच. गाव एकोप्याने राहतं हुता.

गावात आठ ते दहा गल्ल्या. समद्या गावच्या बाहेर वरत्या अंगाला उंच टेकड्या. अन् गावकुसा बाहीर राहणारी वस्ती!

गावकुसा भाईर गावची ग्राम देवता यल्लमा. यल्लमा म्हंजी समद्याची आई! देऊळ भक्कम चिरेबंदी दगडात बांधकाम झाल्यालं! कुरणाच्या लाल भडक दगडी बांधकाम त्यात ऐसपैस ओवऱ्या चारी बाजूला बांधलेल्या. प्रवेशद्वारावर कोरीव कमान. मदोमद देवीचं देऊळ! चार पायऱ्या चडून गेल्याव चारी बाजूंचा चबुतरा. त्यावर भव्यदिव्य मंदिर! मंदिरावरचा कळस सोनेरी रंगाचा! मंदिराच्या चहुबाजूंनी असल्याली झाडी देवळाची शोभा वाढवत व्हतीच. देवळाच्या दोन्ही बाजूला दिवा लावण्यास मोठं दिव्यांची खांब बी व्हती.

देवळातील मुख्य सेवेकरीण ''यल्लव्वा'' ही देवदासी व्हती. आता तिचं वय बी झाल्यालं! अंगाला उतरती कळा अन् अंग भोपल्यावाणी फोफस झाल्यालं. देवदासीचं काम म्हणजे देवीची पूजा आरती. त्यासोबत जो येईल त्याच्याशी शय्यासोबत!

यल्लव्वा सोबत चौंडक वाजवणारा गावातला गंग्या. त्याला समदी जण फलक्या म्हणत व्हती! डोईवर यल्लमाचा जग ठेवून सांच्याला आणखी एक देवदासी धुंडाव्वा अन गंग्या सोबत इतर देवदासी गावतनं गल्लीतनं भिक्षा मागत फिरत असत. देवदासीला रातच्याला जी कमाई व्हईल तिच्यावर व भक्तांनी दिलेल्या पैक्यावर गुजराण व्हत हुती.

गावचा वडाचा पार सांच्याला गजबजलेला! गावातील समद्या बितम बातम्या ह्याठिकाणी मिळत असत. म्हातारे कोतारे, गावातील मूल अन् चांडाळ चौकडी इथंच बसत व्हती!

गावचा इरंगुला मिळत व्हता! आता अलीकडच्या दिवसात, गावच्या वडाच्या पारावर, दबक्या आवाजात यल्लव्वा बद्दल आंबट शौकिनांच्या गप्पा चालत व्हत्याच. यल्लव्वाला आता डबडा गाडी म्हणत! (नाव न घेता) कोण इटल्याला झुणका! कोण भोपळा म्हणत कोण हॉर्न सोडून सगळं वाजणारी गाडी म्हणत. आता कोणीतरी नवीन पूजा करणारी, तरणी ताठी पाहिजे गड्या असं रामा लव्हारन म्हटलं व तोंडातील तंबाखूची पिचकारी दोन बोट व्हॅटवर धरून लांब पिचकारी मारली. तस पारावरची सगळी फिदीफिदी हसली.

बाजूला किवंडा आकाराम बसला व्हता, त्योबी म्हणाला गुडघं करकर करत्यात, आता काठी हातात पाहिजेच की! तसं परत खो खो हश्या पिकला! सगळ्यांनी ओळखलं आकारामला काय म्हणायचं ते! वरल्या अळीतला लगीच खोताचा हणम्या म्हणाला ''अरर मर्दानू यल्लव्वाची मुलगीच हाय की आता तरणी ताठी'' तसं सगळ्या पोरांनी व्हय व्हय असा सूर लावला खरा. पण ही गोष्ट यल्लव्वाला कोण सांगणार! भाकरी परतावी लागल नाहीतर करपल! असा सूर पक्यांन काढला.

पक्यां म्हंजी पाटलाच्या पोराचा लंगोटी दोस्त. समद्यानी पक्यालाच गळ घातली. हे ज्यांगट पक्यां कडूनच व्हाईल! उद्याच उद्या ही गोष्ट पाटलांच्या कानावर घाल! तस पक्यां म्हणाला बघतो. मी पडतो लहान अन् असल्या गोष्टी पाटलांना सांगायच म्हजी लहान तोंडी मोठा घास व्हील. तसं समदी चूप बसले. अक्कल नाही काडीची अन् गाठ सुटना नाडीची! अस कोणीतर म्हटलं, परत समदी हसू लागली. तेवढ्यात येड झम्प्या दुधाची किटली घेऊन डेरीत चालला व्हता. त्याला हणम्यान हाळी मारली. ये झम्प्या ये हकड. तसं हणम्याने चंची काढून त्याला पान सुपारी दिली वर तंबाकू पण दिल्यावर, झम्प्या खुश झाला. समद्यानी त्याला घेरला अन् सगळी कलागत सांगितली. इशय मोठा गंभीर! त्यावर पाटलासनी सांगून बघतो असं म्हटला. त्यावर सगळी खुश झाली. कारण झम्प्या पाटलांची शेती करीत व्हता अन् दोस्ती बी! त्याला त्या गोष्टीच आजाबत भ्या बी वाटलं न्हाय! एवढं झाल्यावर पारावरची मिटिंग बरखास्त झाली अन समदी पांगापांग झाली. पार रिकामा पडला.

प्रत्येकाला वाटत व्हतं हे काम फत्ते झालं! कारण झम्प्या हा अर्धवट पण लै बेरकी अन इरसाल व्हता. त्याचं कारण बी तसंच व्हत झम्प्या कोणतं बी काम मूळ नस पकडून करत व्हता. त्याला ते सहज जमत व्हतंच. आता हे काम पाटलांना सांगायचं म्हंजी मांजराच्या गळ्यात घंटा कोण बांधणार! अस पक्याला वाटत व्हत, म्हणून हे काम झम्प्या वर सोपवलं ते लै झ्याक झालं. सुंठी वाचून खोकला गेला ह्या आनंदात पक्यां व्हता. झम्प्या ह्या कामासाठी कोणती कलागत वापरील ते सांगता यायचं नव्हतंच!

दोन चार दिस गेले झम्प्याच डोकं विचार करीत व्हतंच! कुठं नाक दाबलं तर त्वांड उघडलं हे बघित व्हता. त्याच्या डोक्यात इरसाल कलागत सुचली, अन टोकोटाक फलक्या गंग्याचं घर गाठलं! सोबत

वटीच सामान बी न्ह्यायचं इसरला नाही.

गंग्याच्या घर गाठलं तोपत्तर, गंग्या अंगणात व्हता! लुगड नेसलेला, अंगात मांजरपटाच बदाम उर्फ खोळं घालून, दाढी खरडत व्हता! झम्प्यान हाळी दिली गंगाराम हैसा का! तस गंगाराम – आज हिकडं कुठं स्वारी! दिस काय मावळतीला उगवला वाटतं! तसं झम्प्या म्हणाला, तस न्हाय गा आज मंगळवार वटी भराव म्हणून आलू तो गा अस म्हणत, भैर असलेल्या बाजावर बुड टेकलं. तसं गंग्या बी पत्र्याचा टंब्रेल घेऊन त्यात रांजनांतल पाणी घेऊन त्वांड खळबळ! घरात जाऊन, झम्पर घालून, गडी बाजावर बसला! तस झमप्यांन गोल्ड फ्लेक्स सिगरेट काढली. अन गंग्याच्या ओठावर कोंबली. तस गंग्या बी हरकला! इथंच झमप्यांन निम्मं डाव जिंकला व्हता! डोकीच्या टोपी खाली असलेली काडीपेटी काढली अन काडी पेटवून त्याच्या सिगारेटला लावली!

तसं झमप्यांन बी एक सिगरेट पेटवून नाकातून धूर काढला! काय गंगाराम कुठ हल्ली दिसत न्हाईसा! एकवेळ यल्लम्माच दर्शन व्हाईल पण तुमचं दर्शन लै महाग झालंय बघा! असं म्हटल्याव, गंग्याचं जीव पार इरघळला! लगेच झमप्यांन वटीच सामान काढलं अन सुपात भरून ते दान गंग्याच्या पायावर ठेवलं. तसं गंग्या लाजून चुर झाला!

गंग्या म्हणाला ह्यो मान यल्लव्वाचा हाय, माझा न्हाय! अस म्हटल्यावर झमप्यांन सुपात १०० रुपयांची नोट पण ठेवली! ते बघताच गंगारामला रडू आलं! डोळे वले झाले! ते पदरान पुसून म्हटला. आजवर माजी कोणिबी वटी भरली न्हाय बघ! तूच पहिला! असा मान मला ह्या अदूगार कोणिबी दिला न्हाय बघ!

त्यावर झम्प्यान वळीखल आता घोडं मैदानात आलं! तस लगीच इशयाला हात घालत म्हटलं आव गंगाराम तुम्ही म्हणताय ते बी अक्षी शम्बर टक्के बरोब्बर! त्याच काय हाय गंगाराम यल्लू झाली हाय आता म्हातारी! तिच्या जागी आता कोणीतरी नवीन पुजारीन पाहिजे बघ! अन तसं गावच लोक बी तिला आता कट्टाल्यात! आता पहिल्या वाणी देवीच्या दर्शनासाठी गर्दी बी वसरली बघ! असं म्हणताच गंग्या म्हणाला, व्हय व्हय अगदी बरोबर बोललास बघ! ह्योच धागा पकडत झम्प्या म्हणाला – परवाच पाटलांच्या वाड्यावर गेलो व्हतो. वहिनींनी तसा निरोप बी पाठवलेलं व्हता! म्हणूनश्यान गेलेलो! गंग्या म्हणाला या बय्या! काय विषय व्हता. त्यावर सडकून झम्प्या खुश झाला अन दिली पुडी सोडून. पाटील वैनी म्हणत व्हत्या, पैल्या वाणी यल्लम्मा ची येवस्था व्हाइत न्हायी!

यल्लव्वा बी म्हातारी झाली हाय. तिज्याच्यान देवळाची सेवा नीट व्हत न्हाय! दुसरी कोणीतरी जोगतींन बघा अस, वैनी पटलासनी म्हणत व्हत्या. गंग्या म्हणाला तुझ्याकडे कसलं काम काढलं व्हत. आर गंगाराम मी त्यांचं शेत करतोय म्हटल्याव मला रोज कामाची आखणीसाठी जाया लागतयचं. ते आमचं रोजच काम हैच. पण मी गेल्यावर ह्यो विषय माझ्या नजर समोर झाला. पाटलांनी ह्यात लक्ष्य घातलंय म्हटल्याव ते आता दुसरी जोगतींन हुडकाय बनहट्टी गावाला गेलं व्हतं, माज्या डोळ्या म्होरच फटफटी घेऊन गेल्याल.

गंगाराम हे बघ माज काय म्हणणं, तर भैर हुडकण्या परीस गावातच जोगतींन हाय की अस झम्प्या म्हणला! तस गंग्या म्हणाला कोण रे गावात तशी मुलगी हाय! झमप्यांन सुस्कारा सोडत म्हटलं अरे यल्लव्वा ची मुलगी ''मायक्का'' आता म्होटी झाली की र! दहावी पास हाय बारावीत शिकतेया! बर समद्या कामाची तिला जाण बी हाय! नव्यानं काय बी शिकवाय लागणार न्हाय! ती त्यातलीच हाय की! अस म्हणताच गंग्यान कपाळावर हात मारून घेतला! तर तर व्हय की व्हय की! झम्प्याने आणखी एक बॉम्ब टाकलाच. हे बघ गंगाराम आताच्या आत्ता ही गोष्ट यल्लव्वाच्या कानांवर घालच! नाहीतर पाटील ते बनहट्टीची जोगतींन आणून तुमच्या उरावर बसवतील. की मग तुमचं सगळंच जाईल. देऊळ बी जाईल अन घरदार बी जाईल. ताटात बी न्हाई अन वाटीत बी न्हाय! ताट बी जाईल अन काट बी जाईल! असा बॉम्ब गंग्याच्या अंगावर पडताच, गंग्या साटपटला अन त्याला घामच फुटला! तसं परत एक सिगारेट झम्प्यान त्याच्या ओठावर टेकवली अन दिली पेटवून. झम्प्याचे काम तमाम झालं व्हतं. तसं, रामराम म्हणत झम्प्या त्याच्या अंगणातन पसार बी झाला.

सांच्याला वडाच्या पारावर गर्दी जमलेली! प्रत्येकजण झम्प्याची वाट बघत व्हता! पारावरच्या चंच्या सुटल्या. पान सुपारीची देवाण घेवाण झाली. वर तंबाखूच ठासून बार बी भरत व्हती. कालचा आकारामा आज हातात काठी घेऊन आला व्हता. त्याला बघताच परत सगळीजण फिदीफिदी हसली. काठी टेकत आका राम आईग करत कसाबसा बसला. लगेच लव्हार म्हणाला, ''काका लै बेस केलसा तरणी ताठी हातात अली'' अस म्हणताच परत सगळी हसू लागलं. तेवढ्यात झम्प्या विजयी मुद्रेत येत असताना दिसला.

समदीजन कान टवकारून बसली. झम्प्या न हतोप्यात दडवलेली सिगरेट काढली. हंनम्यान लगेच त्याला खिशातील काडीपेटी काढून काडी पेटवून त्याच्या ओठावरच्या सिगारेट जवळ धरली. गड्यांन लांबलचक झुरके घेतले अन नाकातून धूर सोडत, समदी कालची ष्टोरी तिखट मीठ लावून सांगितली. तस पारावरच्या एक मुलांनी, पळत पळत जाऊन दिवाळीच्या उरलेल्या फटकड्या आणल्या अन पारावर आताश बाजी केली. ही झम्प्याच्या विजयाची नांदी व्हती! एकानं तर सरळ मगदुमच्या हाटीलमध्ये जाऊंश्यांन किटलीभर चहा आणला, अन कागदी कपात घालून वाटू लागला.

मायक्का ही यल्लव्वा ची अनौरस पोर! मुलगी म्हणून तिला तिनं वाढवलं जोपासलं कारण तिला बी कोणीतरी वारस पाहिजे व्हता! पण नेमकी कुणाची पोर हे मातूर तिला सांगता आलं नाही! येणारे बी नाही. पण कुणाचं का बी असेना! मुलगी एकदम झक्कास व्हती! बघता क्षणीच तिच्याकड समद्याच्या नजरा वळत असत. दिसायला रूपवान! नाक सरळ धारदार, डोळे मोठे टप्पोरे मीनाक्षी, उंचपुरी, कुरळे केस, भव्य कपाळ, रंग गव्हाळ, नजर तीक्ष्ण बाण मारल्या वाणी, ओठ नाजूक, खालच्या ओठ महिरपी, नाकाखाली तीळ, चेहरा गोल चंद्रावाणी, छातीवर गोलसर मोठे उभार, ती वयात आल्याची साक्ष देत व्हता. कम्बर लहान,

खाली नितंब फुगीर गोल सिंहकटी! अक्षी लक्ष्मी देवीवणी रुंपड! चालण्यात लचक अन बोलण्यात मर्दवता. कोण्यातरी खानदानी घराण्यातील असावी असं वाटीत व्हत!, नुकतीच ती अकरावी संपवून बारावीला जवळच्याच गावातील कॉलेजात जात व्हती. गावातल्या ले पोरांचा तीइयावर डोळा व्हताच! ती पण ले बेरकी व्हती! तिला समदं म्हैत व्हतं! पण तिला देवदासी व्हनं आवडत नव्हतं तिच्या आईचे धंदे तिला पटत नव्हतं, पण नाईलाजाने ती गप्प व्हती. तिला शिकण्याची हौस व्हतीच. अनं अस गाव कुसबाहेर राहणं बी तिला मंजूर नव्हतं. एकूण तीजं वागणं खानदानी वाटत व्हतंच.

ती रोज सकाळी आठला बाहेर पडायची ते नीट कॉलेज सम्पवून सांच्याला यायची. ती जात असताना तिच्यामागं पोरांची लांबड लागलेली असायची. तसं पोर पण तिला टोमणे मारायचेच. किती सिकल म्हणून काय झालं शेवटी यळ्ळमाच्या देवळात परडी घेऊनच बसणार! अन देवदासी पण व्हनार. ती गप्प मुकाट्याने जात येत व्हतीच. गावातील काही पोरं पण तिच्याच कॉलेजमध्ये शिकायची.

हरुगेरी तालुक्यातील परसिध्द गाव. मोठं व्यापारपेठ. शिक्षणकेंद्र मुरडेश्वर देवस्थानच प्रस्थ. मुरडेश्वर कॉलेज ऑफ आर्टस् मध्ये मायक्का अकरावी प्रथम श्रेणीत पास होऊन, शान बारावीला शिकत व्हती. तस ती समाज विधयेक कार्यक्रमात तिन स्वतःला झोकून दिले व्हत. त्यासाठी तिनं 'एन यस येसच' (NSS) कार्य हाती घेतल्याल. हिप्पर्गीचा शिवानंद पण तिच्याच वर्गात शिकत व्हता आणि त्यानं पण मायक्काच्या बरुबरीन त्यो बी काम करीत व्हता. त्यो बी NSS मध्ये! अडीअडचणीला मदत बी करीत व्हताच! दोघांची बी गट्टी जमल्याली. त्याला देवदासीची मुलगी हाय हे माहीत व्हतं! एकदा कॉलेज मध्ये एन येस येस चा कॅम्प ठेवला व्हता! अंधश्रद्धा निर्मूलन मंचनी आयोजित केल्याला! त्यो बी दस्तुरखुद्द ''रेणुकाच्या दरबारात सुटट्टी'' गावात! अंधश्रद्धा निर्मूलन संस्था मदत करणारी व्हती!

दोघबी मायक्का अन शिवानंद कॅम्पला गेले व्हते. रेणुकाचा दरबार लै परसिद्ध व्हता. पंचक्रोशीतील सगळ्या जोगतिनी ततच असत. त्यांच्या डोक्यावरच्या जटा तेल हळद अन कुंकुनी नीबर झालेल्या! त्या जटा सोडवून त्यांना विमुक्त करायचा घाट, अंधश्रद्धा संस्थेने घेतल्यालं!

दहाबारा मुली अन दहाबारा पोर, गावच सरपंच अन प्रतिष्ठित लोक पण ह्या कामाला जमा झाल्याली. देवळात पाय ठेवायच्या फुरसत सगळ्या जोगतिनी अंगात वार भरल्या सारख घुमू लागल्या. हं हं हं अंहन असं त्वांडानी आवाज काढीत डोस्क गरगर फिरवू लागल्यालं! लगेच एक भगत उठला अन म्हणला. आई माऊली, देवी आई का त्रास करून घेतीयास! झाड सोड! झाड सोड! तशी देवी आई म्हंजी जोगर्तीन म्हणाली - माझी परडी अजुनी रिकामी हाय! आधी परडी भर! देवी आईचा कोप झालाय! मूळच्या गादीवर हे असलं चालायचं न्हाय! जटामध्ये ह्याच देवीचा अंश हाय! हे मूळच्या गादीला समजलं तर, गाववर इपरित संकट येईल! तस भगत म्हणाला देवी आई; शांत व्हो! शांत व्हो! म्हणताच सगळ्या देवदासी अमात भुईवर अलगद पडल्या! अंगाला आलोखे पिळोखे देत, भुईवर झोपल्या! अन थोडया येळात उठून बसल्या. तस त्यांना देवळा बाहेर काढलं गेलं! अन पुरी भाजी नाष्टा दिला वर एकेक कोप चहा पण पाजला! त्यावर त्या समद्या देवदासी खुश पण झाल्या.

गावचं सरपंच अन इतर मान्यवरांच्या भाषणाने त्यांच डोक्यातील इचार काढला. अन त्यांच्या रोजी रोटीची हमी देऊन, गावात पुनर्वसन करण्याची त्यांची मागणी मान्य केली गेली. अंधश्रद्धा संस्थेच्या अधिकाऱ्यांनी त्यांना लागणाऱ्या संसार उपयोगी साहित्य दिल गेलं.

मग मायक्का अन शिवानंद पूड आले अन एकेका देवदासीच्या जटा सोडवू लागले. समदी पोर अन गावची मंडळी, इतर कार्यकर्त्यांनी दोन तासात, सर्व देवदासींच्या जटा सोडवल्या. दुपारी जेवण देण्यात आले. लगोलग डॉक्टर मंडळी येऊन त्यांच्यावर उपचार बी केलीच! समद्यांचे रगात एड्स हाय काय बघण्यास पाठवले गेले.

शिबिर संपन्न झालं. पण हिप्परगीला परत यायला, शेवटची बस निघून गेली. तस मायक्कानं शिवानंदला गाठलं, अन ईचारल आता कसं जायाचं. ते दोघंबी सरांना ईचाराय गेले. तस सरांनी काहीतरी तजवीज करू अस सांगितलं. अन त्यांना राहायला सर्किट हौस वर सोय बी केली. खरं! पन घरच्यांच काय? वाट बघत बसतील. त्यावर सरांनी गावच्या सरपंचला फोन करूनश्यान सांगावा दोघांच्या बी घरी दिला खरा!

पण गावात येक आगळीक झाली. ह्या दोघांचं कायतर नक्कीच भानगड हाय! समदी पोर गावात आली पन ह्येच दोघे का राहिलं. तस गावात कंडी पेटवली गेली!

कॉलेजच्या कागे सरांनी शिवानंद अन मायक्काला सर्किट हाऊस वर आणून ठेवलं. त्यांची सर्व सोयसुविधा करून ते आपल्या घरी परतले. इकडे शिवानंद अन मायक्का दोघेबी आलिशान खोलीत येऊन बसल्यालं. चहा आला. त्यांनी तो घेतला. येक शिपाई आला अन त्यांच्या हातात सिनेमाची दोन तिकीटं देऊन गेला! अंधश्रद्धा निर्मूलन संस्थेन खुशीनं पाठवल्याली तिकीटं! तसं दोघंबी बुचकल्यात पडली. दोघंबी उठलं अन वाशरूमला जाऊन फ्रेश झालं. सांच्याला ६ ते ९ चा सिनेमा जवळच्याच चित्रमंदिरात व्हता. ''हम दिल दे चुके सनम' सिनेमा बघायला दोघंबी आत गेली. सिनेमा चालू झाला. दोघंबी मन लावून बघत व्हती. हिरोईन मागासवर्गीय व्हती पण तिचं उच्च श्रीमंत कुळातील मुला बरुबरीन पेरम जमल्यालं! पुढं दोघंबी बागत फिरत हिंडत गाणं चालू झालं. गाणं झालं तस बागेतल्या जवळच असलेल्या मंदिरात आल्याली. हिरो हिरोईन देवा म्होर लगीन कर्तु असं आणा भाका घेऊन शपथ घेतल्याल जोडपं! लॉजवर येऊन प्रेम आराधना चालू करत्यात तसा सिन बघून; मायक्काला राहवलं न्हाय! तीन चक्क आपला उजवा हात शिवानंदच्या गळ्यात घातला! तस शिवानंद गप्प व्हता त्यानं बी आपला हात तिच्या मांडीवर ठेवला. बराच येळ ते तसच बसून राहिल्याल! इंटरवेल झाली अन दोघबी शनिमा सोडून भैर आली! थेट बाजारात आली. हिकडं कुठं अस

मायक्का म्हणली! तस त्यानं रेडीमेड कापडाच्या दुकानात तिला न्हेल. अन गाऊनची आर्डर दिली! पिवळ्या रंगाचा ओपन गाऊन, फुल पाखर असल्याला त्यानं निवडला अन त्याच्यासाठी लुंगी बी घेतली पैक देऊन दोघबी बाहीर पडली! मायक्का म्हणलीच हे कश्याला आता! त्यावर शिवानंद म्हणाला रातीच्याला घालाय काय नगं का? त्यावर मायक्का खुश झाली. त्याचा इराधा बी कळला.

दोघंबी सर्किट हौसवर शनिमा अर्धवट सोडून आली! सर्किट हौस बाहेरच्या, तिथल्या चांदण्यात दोघंबी भैर खुर्चीत बसली अन त्यांना बघूनशान शिपाई चाट पडला! शनिमला गेला न्हाईसा? न्हाई दिवसभर काम करून अंग दुखतंय! असं म्हटल्याव चहा अनु का असं शिपाई म्हणला. नगं आम्ही नऊ वाजता सरळ जेवणच करू अस मायक्का म्हणली. लगेच तिथल्या असलेल्या बागेत दोघंबी फिरत हिंडत असताना त्यांना बी एक देवीचंच देऊळ घावल! तस दोघंबी आत गेली. घंटा वाजवण्यासाठी दोघांचाबी हात एकदम वर गेला! दोघांच्याबी हातानी एकसाथ घंटा वाजली! तस त्यांना बी कळून चुकल्याल! देवीचंच काहीतरी मनात असावं असं. दोघांबी देवी समोर शनिमात दाखवलं तस आणाभाका घेतल्या! अन दोघंबी एकमेकांना घट्ट मिठी मारली! लै वखुत ती मिठी तशीच व्हती!

हिकडं गावात सरपंचाला कॉलेज मधून फोन आला. दोघांचाबी घरी निरोप द्या. ''कॉलेज कामासाठी येळ झाला त्यांची हीथंच राहण्याची येवस्था केली हाय'' सरपंच बी सटपटलं! ह्यांच काय बा कॉलेज काम असलं अस इचार चालू व्हता, तस झम्प्या आला! झम्प्या तू आलास लै बर झालं गड्या! का हो सरपंच? तस न्हाय रे त्यो शिवानंद न्हाय का पेटी मास्तरांचा मुलगा - त्याच काय? आर जरा ऐक मर्दा ''त्यो अन मायक्का दोघबी हरुगेरीत हाईत त्यांचं कालिजमधी काहीबाही काम हाय तवा त्यांच्या घरात जाऊन सांगावा दे! ते दोघबी उद्या सांच्याला घरी येत्याल त्यांची राहण्याची येवस्था पण कॉलेजच्या सरांनी केली हाय अस सांग!''

हे असं समदं ऐकल्याव झम्प्याच्या डोसक्यात इज पडावी तस झालं! अन त्याच्या पाया खालची भुईबी सरकली! आव सरपंच समदी पोरं गावात आली अन हे दोघंबी ततच हैती! सरपंच-तस न्हाय झम्प्या कालिजच्या पिरन्सीपालचा फोन व्हता! तू समजतूस तस काय बी न्हाई ह्यात! असल कॉलेजचं कायतर काम!

झालं झम्प्याच डोकं गरगरलं! त्यानी प्यायला पाणी मागीतल! तस गडवा भर पानी ढसाढसा पिऊन झम्प्या भैर आला. टोपीखालची शिग्रेट काढली अन ओठात शिलगावली. भसाभस झुरक वढल अन तडक पेटीमास्टरच्या घरी आला. पेटीमास्टर घरी लुंगी अन बनियनवर पाय पेटी वाजवत व्हत. बाजूला वत्सला त्याची बायको गाणं म्हणत व्हती! झम्प्याला बघून त्यानी गाणं थांबवलं. या झम्प्याराव आज हिकडं कुठं पाय वाकड केलसा! गरीब घरी अस कानडी हेल काढत पेटीमास्टर म्हणलं. त्यावर त्यानी शिग्रेट विझवली अन सरपंचाचा निरोप सांगितला. त्यावर पेटीमास्टर काहिबी बोलला न्हाय! अस्सस व्हय, बरं बरं! झम्प्याला त्याच अजब वाटलं स्वतःच पोरगा एक नायकीनीच्या मुली सोबत राह्यला ह्याच काय बी वाटलं न्हायं! अस्सक्स म्हणत झम्प्या देवदासी यळ्ळव्वाच्या घरी पोहचला! अन कायं! आत जावं की न्हाई आत कोणतरी गिर्हाईक असायचं, अन -- अस इचार करत त्यानं कसाबसा पाय टाकला! बघतय तर काय! गंगाराम अन यळ्ळव्वा दोघबी गुलगुलू करीत बसल्याली दिसली! आता झम्प्याच्या डोक्यात प्रकाश पडला. त्याची सकाळची गंगाराम मात्रा लागू पडल्याली व्हती! गंगारामन सकाळी वढलेली सिगरेटचा धूर आता भैर पडत व्हता. व्हय न्हाय, करत झम्प्यान आत पाय टाकला! अन आक्का आक्का अशी हळी मारली. तशी आक्का भैर आली. अगबाई झम्प्या राव तुम्ही! या या आत या की जी अस म्हणली. अज्ज रातच हिकडं कुठं काय येन केलसा! अस म्हनताच, झम्प्याला घामच फुटला, आक्का तस काय बी न्हाय आक्का! सरपंचाचा सांगावं घेऊन आलूया. अस म्हणत अगदी थोडक्यात,

सरपंचाचा निरोप पोहचता केला. पण यळ्ळव्वाच्या थोबाडवरची येक पण सुरकुत्ती हल्ल्याली नव्हती! यळ्ळव्वा अन पेटीमास्टर बसप्पा दोघांचाबी झम्प्या ला अजीब वाटाय लागलं. दोघांला कसली बी काळजी नव्हतीच! मग गावाला ह्या गोष्टीतच नवल का! अस इचार करीत झम्प्या आपल्या घरी पोचला.

सांच्याला परत वडाच्या पारावर गर्दी जमली. ज्याच्या त्याच्या तोंडात शिवानंद अन मायक्काचा इशय! अन खरबी व्हतंच की. इक्ती पोर कालिजमधी जात्यात त्यांचं काय बी न्हाय, अन ह्या दोघांचं कसलं काम असलं ब्वा! समदी जण हेच म्हणीत व्हतीच! बर वर कालिज पिरन्सीपाल चा फोन! ते बी डायरेक्ट सरपंचाला! क्काय असलं कसलं काम ब्वा ह्यांच! बाकीच्या मुलांची काम न्हाईत! अन हे दोघबी राहणार कुठं? खाणार काय? कपड बी तेच! बदलणार कस! झोपणार कुठं? पंगराय काय? अस येक न्हाय तर हजार प्रश्न? समद्यासनी पडलेली.

आता हाय का! पोर दुसर्यांची अन काळजी गावाला! हे जरा इचित्र वाटत व्हतंच. जे ते आपापल्या मनात येईल ते बोलून दाखवत व्हत! समंदी जण गरळ वकित हुती. इतक्यात म्हमद्या येक कमी व्हता त्यो म्हणाला ''अरे पेटीमास्टरच ष्टोरी अशीच हाय की!'' समदी जण व्हय व्हय म्हणाली. झम्प्या गप्प शिग्रेट पेटऊन झुरक मारत व्हता. त्याची ट्यूब लाईट पेटली. व्हय की र पोरानु! पेटीमास्टर लिंगायत! पण कानडी संगीत नाटकात पायपेटी वाजवणारा. कमतनूरच्या प्रसिध्द, कर्नाटक नाट्य कला मंचच्या नाटक कम्पनीत. त्यानं हयात घालवली. त्याच नाटक कम्पनीत वत्सला काम करत व्हती! अन आवाज लै ग्वाड म्हणून गाणं म्हणायची. त्यांच्या दोघांमुल नाटक कम्पनीला भरभराट, मिळवली व्हती! त्याच्या दोघावाणी येकबी कलावंत, अख्ख्या मुलखात सापडणं कठीण! त्ये बी शम्बर टक्के बराबर हाय. पण त्याने काय केलं? शेवटी? - आर वत्सला जरी नायकीन असली तरी तिचा गाण्यात कोण बी हात धरत नव्हता! समदी एकदम म्हणाली व्हय - त्यांचंबी पेरम विवाह की आं! तसच त्याच पोरगा शिवानंद! त्याच अन मायक्काच जर पेरम इवाह झाला तर? गावाला देवदासी कोण? हा गूढ प्रश्न आता

समद्यासनी पडलेला?

म्हमद्या म्हणाला – आर यबड्यानो तिला काय एकलीलाच टिकला लावला की काय? कर्नाटकात मयंदाळ देवदासी भरल्यात. फकस्त हुडकून आणाय पाहिजे.

पक्यां – तस नव्ह ही दिसाय देखणी अन तरणी ताठी महत्वाचं म्हजी ती देवदासीचीच लेक हाय नव्ह!

तिला ह्यातलं समद म्हैत हायकी. व्हय व्हय अस गलका झाला. समजा ती न्हाय घावली तर? पाटील काय तर कर्त्यालच की! तजवीज अन तडजोड करावी लागलं. त्यात काय एवढं मोठं. ह्यो काय इधान सभेचा प्रश्न हाय का? तुम्हाला पूजा करायला मिळाली की संपला हा इशय! असं समद सारासार इचार करून मिटिंग बरखास्त झाली! अन वडाच्या पारानं बी मोठा श्वास सोडला! एक मातूर समद्याना कळलं की पेटी मास्तर कोण व्हता.

हिकडं सर्किट हौस वर शिवानंद अन मायक्का दोघंबी खुषीत व्हते. दोघबी मनमुरादपणे बागेत फिरले. त्यांची शृंगार आराधना बागेत झाली. दोन्ही पक्षी चोचीत चोच घालून गप्पा मारत व्हते. बघता बघता नऊ वाजले, दोघबी सरकीट हाऊसवर आले.

तस शिपाई आला अन त्यांना जेवणाची ताट देऊन गेला. काही कमी पडलतरी बेल वाजवा, मी येतोच. अस सांगून त्यो गेला. दोघबी आनंदानी पोट भर जेवली. एकमेकांना घास भरवला! आता ते दोन नव्हते! त्यांचं मन अन हृदय एक झालं व्हतं.

जेवण झालं तस त्यांनी कपडे बदलले. रूमवर एकांत छान होताच. बाहेर हवेत गारठा होताच, पण दोघे एकाच मऊ उबदार रजईत शिरले! एकमेकांना मनसोक्त बिलगली. मुक्क्यांचा वर्षाव झाला. अन पहिलं वाहिलं मधुचंद्र अस साजरा करून घेतला!

दमून भागून झोपी गेले. दमल्यामुळे लवकर जाग आली नाही. दोघेही उठले. पण त्यांना बिलकुल कसलीच लाज वाटली नाही. दोघांनी एकमेकांना मुके घेत, कपडे काढले अन दोघेही एकदम शॉवरखाली बेधुंद आंघोळ केली. सराईतपणे त्यांनी कपडे बदलले. अन रूमचा दरवाजा उघडला. तस शिपायाने त्यांना चहा अन नाष्टा आणून दिला. त्या स्वादिष्ट नाष्ट्याचा आस्वाद घेतला.

परत कॉलेजला जायचे व्हतंच, पण त्यांनी तस निर्णय घेतला न्हाई. पहिले कॉलेजचे दोन तास बुडवून एकांतात घालवायचे, मग कॉलेजवर जायचे असा विचार करून. त्यानी परत प्रणय आराधना करीत मश्गुल झाले. दुपारचे जेवण सर्किट हाऊसवर झाले. अन मग कॉलेज वर प्रवेश केला! तस कागे सर आले म्हणाले सगळं बर हाय ना? एवढा वेळ का झाला? तस शिवानंद म्हणाला रात्रभर मायक्काचे डोकं दुखत होत्त. तिला गोळी आणून दिली. मग तिला इश्रांती म्हणून मग आम्ही लवकर उठलो न्हाई. बरं बरं आता ठीक आहे की डॉक्टरकडे जाऊया. मायक्का – नको नको, बर हायं आता.

त्यावर कागे सर – तुम्हाला आणखी एक खुशखबर देतोय. येत्या शुक्रवार शनिवार रविवारी परत जटा निर्मूलनाचा कार्यक्रम विजापूरला आहे. त्यासाठी तुम्हाला विजापूरला जावं लागेल. हा कार्यक्रम परत अंधश्रद्धा निर्मूलन संस्थेनीच ठेवला आहे. तेव्हा तुम्ही शुक्रवारच तुम्हाला विजापूरला जावं लागेल, मी पण आहेच. पण त्या तयारीने तुम्ही या. तुम्हाला ज्यास्त कपडे घेऊन यावं लागेल ४ दिवस मुक्काम असणार आहे. तुमचं काम अंधश्रद्धा निर्मूलन समितीला आवडलं आहे. त्यांनी तुम्हा दोघांची निवड केली आहे. तुम्ही दोघे समाज प्रबोधन उत्तम करता. सर अस म्हनताच, दोघांनाही आकाश ठेंगणे झालं व्हत.

हिकडं यल्लव्वा डोस्क धरून बसल्याली. फलक्या गंग्या येऊन श्यान मोठा बॉम्ब टाकून गेलेला. तस यल्लव्वाला पण आपली मुलगी देवदासी व्हावी अस वाटत नव्हतं! व मनास पटत नव्हतं. मायक्का न चांगलं शिकून सवरून सरकारी नोकरीत रुजू व्हावं.

मोठया हुद्द्यावर नोकरी करावी, असच तिला वाटत व्हत. अन ते खरबी व्हत. म्हणूनच तिला कालीजला घातलं व्हत. देवदासीच काय जिणं असताय हे तिला चांगलंच ठाऊक व्हत. माझ्या नशिबी अस जगणं आलं तस माझ्या मायक्काच्या नशिबी नग. ती खस्ता खात इथपर्यंत आली हुती. ती एकटक शून्यात हरवून बसली व्हती. अन तिला तिचा भूतकाळ आठवू लागला व्हता!

सौंदत्ती यल्लमा हे कर्नाटकातच नव्हे तर अख्या पंचक्रोशीतील देवीचं प्रसिद्ध शक्तीपीठ! पुणे मुंबई कोकण, तळ कोकण समदीकडे तिचा महिमा पसरलेला. तिचे भक्त देवदासी अन इतर लोक तिला कुलदेवी म्हणून पूजित आलेले.

यल्लव्वाच जलम ह्याच सौंदत्ती जवळ मुन्नीळी गावात झालेला. एका गरीब कुटुंबात गावकुसाबाहेर असलेल्या वस्तीत जन्मली व्हती. घरी पाचवीला पुजलेल दारिद्र्य, घर तर काय चंद्रमौळी छपरात, गावच्या वैराण माळरानावर! दु:ख दारिद्र्याने गांजलेल्या घरात काय असणार. गावात भिक्षा मागून खाणारी जमात! बाप रोजंदारी कामावर जात व्हता, तर आई कुठं शीळं पाळं तुकडा करायला जाणार! पदरी दोन मुली थोरली यल्लव्वा धाकटी सत्यव्वा! कधी उपाशी पोटी तर कधी घासभर खाऊन झोपावं लागत व्हतं!

मुन्नीळी गावात गावकुसाबाहेर तशी पंचवीस तीस घर! पण दारिद्र्य अन अज्ञान ओतप्रोत भरल्याली वस्ती! सगळेच अंगठे बहाद्दर! गावाचा पाटील काय म्हनल तस वागणारी! स्वत:ची अक्कल कमी! परिस्थितीनं वंचित अन गांजलेल जमात!

दिस जात व्हत रात येत व्हती, जीवनातील चांदण कधी पडलेलं नव्हतंच. पोटाची भ्रांत, त्यासाठी पडेल ते काबाडकष्ट करण्याची तयारी व्हती. अस करता करता, जो कोण देवरूशी भेटल, तस अंगारे धुपरे करत दीवस ढकलत जात व्हते! हे बी दिस जात्याल अश्या आशेचा किरणावर जगत असलेली वंचित समाज!

एके दिवशी सौंदत्ती च्या जोगतिणींच् ताफा, लवाजम्यासह मुन्नीळी गावच्या, माळावर येऊन पडला. जवळपास वीसेक जोगतिनी अन दहाबारा

जोगते पुरुष! हे समदेच देवदासीच व्हत. त्यांचा वावर हा प्रत्येक गावागावांत व्हत हुता. उद्देश फक्त पोटपूजा अन --

त्यांच्या सोबत यल्लमा देवीचा मोठं जग म्हंजी मोठया बुट्टीत सजवलेली चतुर्भुज देवीची मूर्ती! हातात चवऱ्या धरणारे अन चौंडक वाजवणारे तृतीयपंथी पुरुष! रोज संध्याकाळी देवीची एकसुरात भजन म्हणत. सोबत चौंडक अन टाळ अन तुणतुन याची साथ! मग देवीची आरती म्हणतच, आरतीला सुरवात झाली की देवदासीचा अंगात वारा येत, त्या घुमत त्या चित्र विचित्र आवाज काढत!

अळोखेपिळोखे देत डोकं खाली करून, त्या फिरवत हां हां अहं अहं असा ध्वनी निघत असे! जमलेल्या भक्तगण घरगुती अडीअडचणी चे प्रश्न विचारत. त्याच निराकरण देवदासी करत असे, काही तोडगा पण करायला सांगत असे! त्यांच्या फायद्यानुसार तोडगा सांगत! मग आलेल्या सगळ्या भक्तना महाप्रसाद मिळे! त्यात ज्यास्त करून गोर गरीब असत.

महाप्रसाद भंडारा म्हटलं की गावातून त्यांना शिधा धान्य किंवा धन, वाण सामान देत असत. कारण गावातील बहुतेक लोकांची कुलदेवी अन अन्नदान होई.

एक प्रकारे देवीचा धाक दाखवून झुंडशाही पध्दतीने आपली पोटपूजा करून घेत असत! शिवाय आंबट शौकिनांचे मनसुबे पण पुरे होत होते! त्यामुळे ह्या गोष्टीवर आक्षेप कोण घेत नसत! देवीचं काम म्हणून कोणी सढळ हाताने मदत करणार पण होतेच!

यल्लव्वा आता तशी मोठी झालेली, वयात आलेली पोर. अंगानी हाडा पेराण भरल्याली! घरातील समदी जण न चुकता आरतीला येत अन भांडाऱ्याच प्रसाद घेत व्हती. तेवढंच त्यांचं रातीच पोट भैर पडत व्हत! एके दिवशी आरतीला देवदासीच्या अंगात आलं गावातील बाई बापडे पण हजेरी लावू लागले. सर्व वर्गातील समाज होताच. मुळात अज्ञान अन अंधश्रध्दा भावनेतून हे सगळं घडत हुतच! त्यात देवीचा कोप देवीची मर्जी सांभाळणारे काही कमी नव्हतेच! ते सगळं बघून यल्लव्वा च्या आईचा पण धीर सुटला! ती पुढं आली अन प्रश्न विचारती झाली. तिनं गाऱ्हाणी मांडली, तसं त्या जोगतीण न तिला नामी उतारा सांगितला. तुझी मोठी मुलगी देवीला दे, तिला देवीच्या चरणी रुजू कर! मग बघा तुझं कस देवी कोट कल्याण करील! असं म्हणून तिन देवीच्या परडीतील भंडारा घेतला अन यल्लव्वाच्या कपाळी लावला! यल्लव्वाची आई तिथंच दगडासारखी थिजून उभी राहिली! तिला जागेवर जाण्याचा भान उरलं न्हाई!

यल्लव्वा घरी आली खरी, पण तिला रातभर झोप लागली नाही. ती तशीच पडून हुती! तिच्या जीवाची घालमेल तशीच व्हत हुती. समद्याना बी असच झालं व्हत. यल्लव्वा चा बाप म्हनलं हिला आताच परडी देऊन पाठवलं तर पुढं काय? कश्याला गेलो तिथं, गेलो अन झक मारली! असं वाटाय लागलाय, अस बोलणं चालू असताना, दरातील अंगणात रातीला अंगात आलेली जोगतीण आली. हातात परडी अन भंडारा पण व्हता! आक्काचा जोगवा अशी जोरात साद घातली! तस समदीजन भैर आली, तिला बघून समद्याचं काळजाचा पाणी पाणी झालं! ती भिकश्या मागायला आली खरी, पण घरात जोगवा द्यायला घरात काय बी नव्हतं! त्या जोगतीण न समद। वळीखल अन पुढं येऊन समद्याना भंडारा फसला. मला तुझी ही पोरगी भिकश्या म्हणून दे!

यल्लव्याची वाचा बसली. त्या जोगतीणन परडीतील कवड्याची माळ उचलली अन यल्लव्वाच्या गळ्यात घातली! कपाळाला भंडारा लावला अन डोकीवर बी भांडार उधळला. झालं समद चित्र बदललं. फकस्त त्या दारिद्र्याने घर सामसूम झालं! दारिद्र्य अक्राळ विक्राळ दात काढीत हसत व्हत!

परत तीच जोगतीण दुसऱ्या दिवशी तिच्याच अंगणात आली. त्यांना सल्ला वजा धमकी दिली! असच आत्ताच्या आता ''मायक्का चिंचलीला'' गावात जा, तिला देवीच्या पायावर घाला अन तिथल्या वढ्यात आंघोळ घालून तिला लिंब नेसवा. अन परत माझ्याकडे या! यल्लव्वाची हिप्पर्गी वाट बघतीया! तिथल्या देवीच्या गादीला वारस कोणीतरी पाहिजे. अस म्हणून निघून गेली. चिंचलीला जाताना मला सांगून जा. माझी मानस येत्याल अन समदी व्यवस्था बी करत्याल!

पुढं काय झालं ते यल्लव्वाला कळलंच नाही! तिच्या डोळ्या म्होर अंधार दाटला व्हता! समद आयुष्य अंधारात चाचपडत काढायला लागणार व्हतं!

मग मार्गशीर्ष पुनवचा दिस बघून, ती जोगतीण यल्लव्वा अन तिची आई, सोबत इतर जोगतिणीं अन वाजंत्री पण सांगत घेऊन, मायक्का चिंचलीला आलेलं! तिथंच यल्लव्वा ला एका वढ्यात गार पाण्याने आंघुळ घाटली. तिच्या डोक्यावर दूध पण वतलं गेलं! परत गार पाण्याची आंघोळ घालून, कमरेला लिंब नेसवला! डोक्यावर फुलांचा जाळी दांडा पण घातला गेला. डोक्यावर देवीची मूर्ती देऊन; वाजत गाजत, मायक्काला सात फेऱ्या मारल्या! अन देवळात प्रवेश करायचं आधी, लिंबू नारळ यल्लव्वा वरून उतरून टाकलं!

आत देवाच्या पायावर लोटांगण घातल्यावर, तिची खण नारळ हिरव्या बांगड्यानं ओटी भरली. अन वाजत गाजत भैर आणलं. त्यादिवशी तिला उपवास करायला लावला. हीच जंत्री परत हिप्पर्गीला जाणार व्हती, त्याअदुगर गावच्या पाटलांना अन म्होरक्याना आगाऊ पणे कळवलं गेलं! तशी हिप्पर्गीला बी समदीजन वाट बघित व्हतीच! यल्लव्वा आल्यावर पहिला पूजेचा मान कुणाला ह्याचा लिलाव बी ठरला व्हता! बँड वाजंत्री पण सांगून ठेवलं व्हत. तस शुक्रवारी यल्लव्वाच पाय हिप्पर्गीला लागलं. त्यांना वडाच्या पारावर येशीत थांबवलं. अन येशीतच यल्लमाचा जग आणून ठेवला व्हता. समद गाव वडाच्या पारावर गर्दी केलेलं! तिथं परत यल्लव्वा ला आंघोळ घालून नवं करकरीत हिरवागार शालू नेसवला गेला! हिरव्यागार बांगड्या घातल्या, नाकात नथ घातली गेली. डोईवर फुलांचा जाळी दांडा घातला. गाव कुसबाहेरच्या बायका आंबील भरलेल्या कळशी घेऊन उभ्या व्हत्या!

देवदासी येऊन तिला डोईवर जग दिला, अन म्होर वाजंत्री, माग

चौंडक, तुन तुन घेतलेल्या देवदासी अन फलक्या गंग्या पण त्यात व्हता. माग गावातील बायका आंबील कळशी घेऊन माग माग जात व्हत्या! अस ही मिरवणूक गावच्या माळावर देवी मंदिरात आली. तस परत यल्लव्वाची दृष्ट काढून, तिच्यावरन दहीभात लिंबू याचा उतारा केला गेला. आता आत आल्याव तिच्या डोईवरच जग काढून देवीच्या गादीवर ठेवला गेला. अन खीरभाताचा निवद दाखवून आरती केली गेली. मग यल्लम्माची भक्ती गीत भजन झाल्यावर भांडाऱ्याचा महाप्रसाद वाटलं गेला.

हिकडं यल्लव्वाला मनसोक्त जेवण घालून. तिला सजवून उंच बिछान्यावर बसवलं गेलं व जो लिलाव धरला व्हता. त्याच्याकडून, ५१ हजार रुपये, साडी चोळी, सोन्याचा दागिना फुलांचा गजरा समद यल्लव्वाला दिला गेला! तस देवदासी म्हणाली आता तुझं लगीन ह्या गावच्या भक्तांसोबत! जो येईल त्याला न्हाई म्हणायचं नाही! यल्लव्वा ची आई हे समद बघित व्हती, तिच्या काळजाच पाणी पाणी झालं व्हत! कसलं दिवस आलं माझ्या पोरीला. उपाशी व्हतं तेच बेस व्हत! झालं त्यादिवशी समदा खेळ खतम झाला. यल्लव्वान जवळ असल्याला सगळां पैसा आईला दिला अनं म्हणली, ह्याचा कुठंतरी जमीन तुकडा घ्या, अस म्हणताच आईच कालिज गलबलून गेलं, अन ओल्या डोळ्यांनी तिचा निरोप घेऊन ती गावी गेली!

यल्लव्वाचाच पूर्व इतिहास तिला आठवू लागला व्हता. नाही म्हटलं तरी तिला हिप्पर्गीला येऊन चाळीस वर्षे झालेली. म्हातारपण जवळ येऊ लागलं व्हत! लोकांची पहिल्यासारखी गर्दी हुईत नव्हती. वय वाढल तस जवळचीच पुंजी संपत आली हुती! दागदागिने जरा शिल्लक व्हता! तिन जे भोंगल ते मायक्कान भोगू नये अस वाटत व्हतं! असल्या नरकात ढकलीन तिला नको व्हत! म्हातारपणात तीच एक तिला आधार काठी व्हती. यल्लव्वाच आई बाप तवाच देवाघरी गेलं व्हत! सत्त्यवाच लगीन होऊन तिला पोरबाल झाल्याली. पण ती कुठं असती हे बी तिला माहीत नव्हतंच! असं विचार चक्कर चालू असताना ये आक्का ये आक्का अशी हाळी मारित गंगाराम आला! तशी ती भानावर आली! हे बेन परत का आलं? अस प्रश्न पण पडला. तस यल्लव्वान त्याला आत बोलवून चहा करून दिला. गंगाराम थोडा धीर धर, मीच पाटलांच्या वाड्यावर जाऊन त्यांना माझा समदा इचार सांगते. अस म्हणून गंग्याची पाठवणी केली. अन यल्लव्वा दमल्यामुळे एकांगावर जरा वेळ निजून राहिली. त्यादिवशी तिनं जेवण पण केलं नाही. उपाशीच व्हती.

तस गंगारामनी बिडी बाहेर काढली, अन धूर सोडत आपल्या मठीकड गेला. गंग्या गेला तसा कालीजमधनं मायक्का आली. तिनं पहिल्यांदा हात पाय धुतले अन तडक, देवीम्होरं आली भंडारा उधळला अन मनापासून देवीला नमस्कार केला. तसं यल्लव्वाला पण नमस्कार केला! ह्या गोष्टीचं यल्लव्वाला अजीब वाटलं! असं कधी ती करत नव्हती पण आज तिनं केलं. मायक्का खूपच आनंदी पाहून यल्लव्वाला बरं वाटलं. यल्लव्वा – आज कशी काय देवीला नमस्कार केला? ब्वा न्हयातर तू कधी बी तिकड फिरकत न्हाईस! तिनं आल्यावर चहा करून घेतला, अन आईला पण दिला. तस यल्लव्वा म्हणाली. आज लै खुषीत दिस्तीयास. व्हय आय आज मी तुला समद सांगणार हाय. अस म्हणून तिन कॉलेजमध्ये अन सर्किट हौस हरुगेरीची गोष्ट तिन आपल्या आईला सांगितली. तस यल्लव्वा पण जाम खुश झाली. तिला जे पाहिजे व्हत तसच घडून आलं व्हत. ती त्यासाठीच पोरीची काळजी करीत व्हती. पोरी तुवा नशीब काढलस गं! पोरी, म्हणून तिच्या गालावरून हात फिरवून डोक्यावर कचाकचा बोट मोडली! ती एवढ्या वरच न थांबता तिनं मीठ मिरची घेऊन तिनं मायक्काची दृष्ट पण काढली! यल्लव्वाला जे पाहिजे व्हत ते न मागताच मिळालं व्हत की! पोरी आता माझं ह्या घटकला जरी ''डोलं मिटलं तरी बी चाललं! रात्रंदिन मी ह्या देवीची सेवा केली. त्याचच आज मला फळ घावलं बघ. आता मला पाटलासनी भेटून माझा निर्णय कळवायला मोकळी झाले बघ. तसं शिवानंदला पण ती चांगलं वळखीत होती. पोरगा बी चांगला हाय अन त्याची आय बी आमच्याच बिरदारीतील! ती काही न्हाय म्हणायची न्हाय.''

असं माया लेकीचं बोलणं झालं. यल्लव्वान तर रात्री गव्हाची खीर, आंबील, दहीभात करून देवीस निवद पण दावला! दोघी बी मायलेकी मुस्कट मारून निवांत झोपल्या. सकाळ झाल्यावर परत मायक्कान विजापूरला तीन दिवस परत शिबिरात जाणार अस सांगितलं. तिथं बी ह्येच कार्यक्रम आहे व सोबत शिवानंदच हाय अस सांगितल्यावर, यल्लव्वा आणखी हरकून गेली. जा पोरी जा, त्यो हाय म्हटल्यावर मला कसलीच काळजी न्हाय बघ पोरी. तुला जणू त्यो महादेवच भेटलाय बग्हं पोरी! अस म्हटल्यावर मायक्काला स्वर्ग दोन बोटच उरल्यावाणी झालं! जीवाचा घोर मिटला बघ पोरी. अस म्हणताच मायक्कान हळूच कानात कुजबुजली. आम्ही विजापूरला गेलो की कोर्टातच लगीन करणार! अस सांगताच, यल्लव्वा आनंदानी घरभर नाचाय लागली. तिनं देवी जवळ जाऊन भंडारा उधळला अन चवरी पण फिरवली!

शिवानंद पण कॉलेजमधून घरी आल्यावर आपल्या आईस ही सगळीच बातमी सांगितली! तस आई पण चाट पडली. पण मायक्काला ती चांगलीच ओळखत होती. फक्त शिवानंदच्या बाबांना ही करामत सांगायची राहिली होती. बाहेर गेलेलं पेटीमास्टर उर्फ शिवानंदचे वडील पण घरी आले. एकदम सांगायला नको, म्हणून प्रथम जेवायला वाढले. जेवणात रात्री शिरा बघून पेटीमास्टर बसप्पा म्हणाले, आज काय वाढदिवस हाय का कोणाचा? अस म्हणताच नाही सहजच केला. जेवणात बदल म्हणून जेवण झाली, तस पानाचा डबा घेऊन बसले, आज जातींन स्वतः शिवानंदच्या आईने पान लावून दिला. त्यावर पेटीमास्टर बसप्पा नाईक म्हणाले, मंजुळा खर सांग आज काय विशेष! त्यावर मंजुळाने गादीवरची बेडशीट बदलत सगळी कहाणी सांगितली. तस आनंदाने बसप्पाने तंबाखूची पिचकारी मारली. व्वा व्वा बापसे बेटा सवाई! तशी मंजुळा पण खुश झाली.

दुसऱ्या दिवशी संध्याकाळी बसप्पा आणि मंजुळा दोघेही ओटीच

सामान घेऊन, यल्लव्वाच्या घरी पोहचणार इतक्यात; कॉलेज मधून मायक्का आलेली दिसली! मायक्कानं ओळखलं आणि तिनं लगेच दोघांना खाली वाकून नमस्कार केला. यल्लव्वा बाहेर येऊन बघते तर काय, चक्क शिवानंदचे आईवडील समोर! यल्लवाने त्यांना याजी याजी अस आदरातिथ्य करून, बसायला पाट दिला. दोघेही पाटावर बसले. त्यांनी सगळी हकीकत सांगितली. अन लगेच मायक्काला बोलवलं. मायक्का लाजून आतल्या खोलीत बसली होती. ती बाहेर आली. तिला परत एक पाट आणून त्यावर तिला बसवलं. तस मंजुळा उठली सोबत आणलेली हिरवी साडी तिला दिली. तिची खण आणि नारळानी ओटी भरली! हळद कुंकू पहिल्यांदाच लावलं! सोबत आणलेली मोगऱ्याची वेणी दिली! डोकीवर अक्षता टाकल्या! तस यल्लव्वाच्या डोळ्यात टचकन पाणी आलं. तीच अन मायक्काच आयुष्य सार्थकी लागलं अस दोघींना पण वाटत व्हत. मायक्का उठली तिनं ओटीच समान बाजूला ठेवून, सगळ्यांना वाकून नमस्कार केला.

लगेचच चहापाणी पण झालं. तस मंजुळा म्हणाली आक्का काळजी करू नका. ती आता आमची लेक झाली आहे. त्यांचं लग्न विजापूरला कोर्टात होईल त्यावेळी आम्ही तुम्हाला घेऊन जाऊच. तूर्त ही गोष्ट आपण आपल्यातच ठेवूया. आणि हो लग्नानंतर तुम्ही त्यांच्या सोबत राहिला तरी आमची ना नाही. आम्हाला आनंदच वाटेल. तुम्हाला जस जमेल तसं करा. तुमच्या म्हातारपणाची आम्ही सगळीजण काळजी घेऊच. तेच आमचं आता कर्तव्य आहे. अस म्हणताच माया लेकी ओक्साबोक्शी एकमेकांना बिलगत रडू लागल्या. तस मंजुळान पण मायक्काला जवळ घेत तिची पण समजूत काढली. अन दोघांनी त्यांचा निरोप घेतला. रात्रीचे नऊ वाजले होते. तेवढ्यात परत एक जोगतीण कडमडली! तिला बसप्पा अन मंजुळाला बघून अजब वाटलं. तरी पण तिने मंजुळाला विचारलेच दोघबी आज अवचित हकड कुठं? लगेच मंजुळान सारवासारव करीत म्हटली. काही नाही आज देवीची ओटी भरायला आलो होतो. आज मंगळवारी ओटी भरण्यासाठी आम्ही देवीला मागून घेतल होत. अस म्हणताच, ती जोगतीण गप्पगार बसली. तिला यल्लव्वान देवळात चल अशी खूण केली. तशी जोगतीण देवळात गेली. तोपर्यंत मायक्कान सगळा ऐवज आत घरात नेऊन ठेवला होता. कुणालाही त्याचा मागमूस लागू दिला नाही.

दुसऱ्या दिवशी शिवानंद अन मायक्का नेहमी प्रमाणे कॉलेजला आले होतेच. दोघेही खुषीत होते. आता विजापूरला गेल्यावर कोर्टात लग्न होणार होतच. त्याला फक्त चार दिवसाचा अंतर होता.

हकड यल्लव्वा बिनधास्तपणे पाटलांच्या वाड्यावर जात हुती. ती जात असताना झम्प्या बी तिच्या मागोमाग व्हताच. झम्प्या च्या मनात चांदण फुटत व्हतंच. त्याला स्वतःचा अभिमान वाटाय लागला व्हता! मी केलेली जादू आज फळणार व्हती. तस गपगुमान त्यो मान खाली घालून वाड्यावर पोहचला. तोपर्यंत यल्लव्वा पण पोचली हुती. पटलासनी सांगावा गेला तस पाटील अन वेनीसाब दोघबी लगेच आलंच! कारण यल्लव्वा वाड्यावर का आली! हा गूढ प्रश्न पडला व्हता!

पाटील अन यल्लव्वा अन वैनी एका बंद खोलीत बसले. तिथं कोण बी नव्हतं. झम्प्या सोप्यातील बैठकीच्या खोलीत खाली मान घालून बसला व्हता. वैनीसाबनी नमस्कार केला. अन म्हणली काय आक्का आज हकड कुठं? काय काम काढलाईसा? अस म्हणताच खोलीत चहा आला चहा घेत यल्लव्वा म्हणाली. काही नाही वैनीसाब असच आले व्हते. त्यावर पाटील म्हणले काही आडपडदा न ठेवता सांगा आक्का. हे तुमचंच घर हाय. होयजी दादा होयजी ते खरंच हाय. म्हणूनच एक गोष्ट सांगायला आले बघा. सांग सांग काहिबी अडचण असलतर ती सोडवू. तस यल्लव्वा म्हणाली – दादाजी आता मी म्हतारी झाले, माझ्याच्यान आता देवीची सेवा व्हहिल की नाय सांगाय येत न्हाय. जमलं तस आता पत्तर करीत आले. आता माझ्याच्याने व्हहिल की न्हाय सांगता येणार न्हाय. तवा तुम्ही नवीन कोणतरी जोगतीण बघाय हुव! अस म्हणताच पाटील म्हनलं – आक्का मायक्का हैच की अस निर्वाणीचा का बोल लावतीयास? त्यावर यल्लव्वा म्हणाली– मायक्का कालीजला जाती, तिला लै शिकून नोकरी धरायची हाय. अन ह्या धंद्यात तिला रस न्हायजी!

ती असलं वंगाळ काम नग म्हणतीया. तवा तुम्ही कोन तर नवीन बघा. नवीन जोगतीण येई पत्तर मी काम करीलच. तुम्ही मनान मोठं हैसा म्हणूनश्यान ही गोष्ट तुमच्या कानावर घालावी अस वाटलं बघा दादा. वैनीसा म्हणल्या आक्का आम्ही नवीन जोगतींन अनु च तो पत्तर तूच ही देवीची गादी चालव. अन नवीन जरी आली तरी तू तुझं घर अन देऊळ सोडू नगस. शेवट पत्तर हितच रहा! नवीन तू जोगतींनला पण समद काम समजून सांग, मग तर झालं. तूच आत्ता पत्तर समद केलंस अन पुढं बी करत रहा! अस म्हणल्याव यल्लव्वाच्या डोळ्यात टचकन पानी आलं. पदरान 'डोल टिपत म्हणली. मी काय पुण्य केलया मला म्हैत न्हाय! पन तुमच्यावानी देवमानस मी आज ह्या डोळ्यांनी बघतीय बघा!' अस म्हनत तिनं दोघाना नमस्कार केला अन म्हनली;

ही गोष्ट कुणालाबी सांगू नगा. आक्का आम्ही ही बाब कुणालाबी कळणार न्हाय अस बघतो. तू बिनघोर जा. असं म्हटल्याव आक्का माघारी परतली. तिनं ह्यो बी डाव जिंकला व्हता! कसंबस तिन घर जवळ केलं अन देवीच्या पायावर लोटांगण घातलं!

शिवानंद अन मायक्का दोघे पण कॉलेजला गेले. त्यांचं आता जटा निर्मूलन अन देवदासी निर्मूलन ह्या शिबिरात त्यांची वर्णी लागलेली होतीच. एन एस एस तर्फे आणि अंधश्रद्धा निर्मूलन संयोजित दोघेही विजापूरला आलेले. दोघांचंही आवडतं सामाजिक कार्य होतं. त्यांना स्वतंत्र खोली दिली गेली. कारण दोघेही आता नाजूक रेशीमगाठीत, पवित्र बंधनात अडकणार ह्याची वार्ता फक्त अंधश्रद्धा निर्मूलन अधिकारी व कॉलेजचे प्रिंसिपोल ह्यांना माहीत होतं. कारण त्यांना कोर्टात स्वाक्षरी करायची होतीच. त्यात दोघेही देवदासीची मुल असल्याने ह्या गोष्टीत अंधश्रद्धा निर्मूलन अधिकारी जॅम खुश होतेच. विजापूरला आल्या वर त्यांचं हे सामाजिक कार्य एक मठात संपन्न होणार होत. सतत दोन दिवस ते देवदासीचं जटा सोडवणे, व मुख्य प्रवाहात सामील होण्यासाठी प्रबोधन करत होतेच. तिसरा दिवस उजाडला अन सकाळी ११ वाजता ही सर्व

मंडळी तसेच शिवानंदचे वडील बसप्पा नाईक अन आई मंजुळा सोबत मायक्काची आई देवदासी यल्लव्वा हजर झाले. पण विषेश प्रयत्नाने हे लग्न कोर्टात न होता मठात ठेवले गेले. सामाजिक संदेश देण्यासाठी स्वतः कोर्ट तिथं वकील सहीत हजर झाले.

आधी दोघांच्या स्वाक्षऱ्या झाल्या, नंतर दोघांचे पालक नंतर वकील व अंधश्रद्धा अधिकारी तसेच कॉलेज प्रिंसिपोल ह्यांच्या सह्या झाल्या. एकमेकांना पुष्पहार घातले गेले. मंजुळाने आणलेलं पाच तोळ्याचं मंगलसूत्र बांधले गेले. हे सर्व घटना तिथं उपस्थित असणाऱ्या देवदासींच्या डोळ्या देखत केले गेले. एक सामाजिक जिवंत संदेश देण्यासाठी, अंधश्रद्धा निर्मूलन अधिकारी कुठंही कमी पडले नाहीत. त्यांनी ही बातमी टीव्ही पत्रकारांना कव्हर करण्यासाठी सांगितले होतेच! सर्वांच्या भोजनाची सोय करण्यात मठाचे स्वामीनी पुढाकार घेतला. ह्या सर्व घटना व्हीडिओ शूट मध्ये कैद केल्या गेल्या. पत्रकार बांधव सुध्दा तिथं उपस्थित होतेच. अंधश्रद्धा निर्मूलनकडून, कॉलेजकडून, मठाकडून, तसेच पत्रकार संघाकडून पण दोघांना भरपूर संसार उपयोगी साहित्य आहेर म्हणून देण्यात आले. एकूण चार दिवस जटा अन देवदासी निर्मूलन, अंधश्रद्धा निर्मूलन ह्यावर शिवानंद व मायक्का भाषण देत, समाज प्रबोधन करत होतेच. त्यांच्या ह्या कार्याची दखल घेऊन सरकारने दोघांनाही, शिक्षण उपरांत नोकरीचा आदेश जारी करणारे पत्रक त्यांना देण्यात आले. यल्लव्वाच्या डोळ्यात तर महापूर वाहत होता. लग्न आटोपून यल्लव्वा अन शिवानंदचे आईवडील गावी परतले. तर शिवानंद आणि मायक्का मधुचंद्र साजरा करण्यासाठी म्हैसूरला गेले.

हिकडं हिप्पर्गी गावात कसलाच मागमूस लागला नव्हता. प्रत्येक बाब अगदी चोखपणे पार पडली होती. वडाच्या पारावर झम्प्या अन गावकरी कुचाळक्या करण्यासाठी जमलेलं होत. झम्प्या म्हनलं आज म्या यल्लव्वाला पाटलांच्या वाड्यावर आलेलं बघितलं. लव्हार म्हनला तुझी युक्ती कामी आली बघ. समदीजन मनात येईल तस बरळत व्हते. मगदुमच्या हॉटेल मधन चहा आणून चहा वाटप चाललं व्हत! बरीच मंडळी दबक्या आवाजात बोलत व्हतीच. समदी चहा पिऊन ताजेतवाने झाले पक्क्या मात्र धापा टाकीत पळत येत असताना दिसला. त्याच्या हातात वर्तमानपत्र हुत. त्यानं ते झम्प्याकड दिल अन म्हनलं वाच मोठयाने. त्यानं ते वाचंय चालू केलं अन समद्याचंच अवसान गळू लागलं. एव्हाना ही बातमी पाटलांच्या कानावर गेली. तस पाटील बी चाट पडलं. फकस्त त्यांनी जाणवू दिल न्हाई. टीव्ही वर पण शिवानंद अन मायक्काचा सत्कार, त्यांनी केलेल सामाजिक कार्य, अन त्यांचा विवाह सोहळा. समदी जंत्रीच दाखवली गेली सरपंच, पाटील अन समदा गाव ते डोळे चोळू चोळू बघत व्हत. काहींच्या नाकाला मिरच्या झोम्बल्या, तर काहींना त्याच कौतिक पण वाटत व्हत! झम्प्या अन पक्यां हातावर हात चोळीत बसला व्हत! पक्यां म्हनलं हे बेन लै आक्रीत निघालं बघ झम्प्या! झम्प्या म्हनलं त्याच सोड, ती मायक्का लै बेरकी निघाली! सही सलामत राडीतून भैर पडली बघ! अन तिची आई यल्लव्वा पण! आता हिप्पर्गी गावात काय बी राम उरला न्हाय बघ. आता असं वाटाय लागलंय, गाव सोडून गेल्याल बरं!

हिकडं पाटलाची पण दातखिळी बसल्याली! आता आमच्या पाटीलकीला जगायचं, अन शेवट गॉड करायचा, एवढंच हातात हाय बा! आता कायतर देखावा करावं म्हणूनश्यान त्यांनी मायक्का अन शिवानंदची जंगी वरात काढायची ठरवली. तशी तजवीज करायला झम्प्याला बोलवलं अन वाजंत्रीना आवतान दे. बँड बी सांग अन काही फटाकड्या बी आण! आणखी एक म्हंजी दोन मोठं हार बी घेऊन ये समद कस इ्याक दिसाय पाहिजे. अन समद्या गावातील लोकांना मिरवणुकीत यायला सांग! वडाच्या पारावर जी जी बसत्यात त्यांना बी घेऊन ये! सांच्याला ते शिवानंद अन मायक्का येईल तो पत्तर त्यांना गावच्या येशीत थांबावं. बैलगाडीतून त्यांची मिरवणूक चालू व्हहिल. समद्या गावच्या लोकांना त्यांचा पराक्रम कळल! झम्प्यान सिगरेट तोंडात धरली अन मदतीला पक्क्याला बी घेतला!

***

RAJE SURGICALS



Sanjay Y. Raje
D.P.O.E. (Mumbai)
Prosthetist & Orthotist
9822969535



Anjali S. Raje
B.Sc.DMLT
9922580296

- Prostheses (Artificial Limb)
- Orthoses
- Rehabilitation Aid & Equipments
- Orthopaedic Appliances
- Surgical & Scientific Instruments
- Hosptial Equipments & Furniture

POLIO CLINIC & REHAB CENTRE

'Manas', Bhosale Nagar, New Radhika Road, Near Hotel Rajtara, Satara.
Ph.: (02162) 236629
● Email Id : rajesurgicals@gmail.com ● sanjayragepcrc@gmail.com



पंकज आर्टस्

आमच्याकडे प्लॉस्टर व शाडू मातीच्या सुबक व रेखीव गणपती मुर्ती होलसेल भावात मिळतील.



श्री. बाळासाहेब धोंडिबा कुंभार
मो. ९४२३२१२१८४



पंकज बाळासाहेब कुंभार
G.D. Arts



श्री. विठ्ठल धोंडिबा कुंभार
मो. ९६७३१३२३६५

मु. भवरापुर, पो. उरळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०२.

संस्कार

– श्रीपाद पु. कुलकर्णी

देव पाण्यात ठेवणे ही अंधश्रद्धा होती की नव्हती माहीत नाही, पण देवावर श्रद्धा ठेवण्याचा निनादपुरता कुठंतरी पाहिलेला किंवा कुठून तरी ऐकलेला मार्ग होता कदाचित आईनं देवाधर्माचं केलेलं बघून देव त्याचं फळ या कसोटीच्या क्षणी नक्की देईल हा तो विश्वास असावा.



''ये रे बाळ, निनाद, घाल गंगाजल आईच्या मुखात... उगी उगी बाळा, आता तुही मोठा आहेस. तू आणि तुझ्या बाबानं कमी का प्रयत्न केले तिला मुत्यूच्या दाढेतून परत आणायला. पण तिला असा दुर्धर रोग झालेला. काय करणार आपण? परमेश्वराची इच्छा. सावर स्वतःला आणि तुझ्या बाबालाही.'' माई आत्या २० वर्षे वयाच्या निनादला समजावत होत्या. पुन्हा बहिणीच्या – कुसुमच्या – गळ्यात पडून स्वतःही रडत होत्या.

तरिता तशी अवेळीच गेली. नशीब म्हणजे लेकीचं लग्न व्यवस्थित पार पाडून गेली. माई आणि कुसुम या तिच्या नणंदांनी वेळोवेळी तिला आपल्याकडच्या चालीरिती शिकवल्या, स्वयंपाक शिकवला. तिच्या प्रत्येक कार्यात तिला काही गोष्टी कशा पुन्हा पुन्हा शिकवाव्या लागतात हेही बोलून दाखवत आल्या. तिच्या माघारी तिच्या कागाळ्याही भावाला केल्या. तिही फटकळपणे बोलायची कधीकधी, पण ते तेवढ्यापुरतंच. मनात काही नाही. नणंदांचं दुखलं-खुपलं बघायला पुढं सरायची. पण तिचा असा असाध्य रोगानं अंत व्हावा हे त्यांच्या जिवाला फारच लागलेलं दिसत होतं.

दोघीही आळीपाळीनं भावाच्या, नुकतंच लग्न पार पडलेल्या भाचीच्या गळ्यात पडून हमसून हमसून रडत होत्या. किती झालं तरी हा धाकटा

भाऊ - रमेश - लाडका होता. त्याच्यासाठी वरखाली किती बघितलं, लहानपणी आईचं लक्ष नसेल तेव्हा छोटा ओरखडा पण उठू दिला नव्हता त्यालाच काय त्याच्या मनालाही. पण तरिताचं जाणं ही जखम कधीच भरुन येणार नव्हती हे त्या प्रसंगी उपस्थित असलेल्या साऱ्यांनाच जाणवत होतं.

''चला, उचला लवकर, शववाहिका आलीय. तुम्ही कितीही सेंट मारला, फुलं हार वाहिले तरी त्या रोगानं पोखरून निघालेलं शरीर ते... लवकर पंचत्वात विलिन झालेलं बरं.'' पुरुषमंडळींपैकी रोखठोक बोलण्यात प्रसिद्ध असलेले गजाभाऊ शेवटी पुढाकार घेऊन रमेशशी बोलते झाले. ''बायकांच्या मनाप्रमाणे साडीचोळी नेसवणं, मळवट भरणं, शववाहिकेपर्यंत कुंकवाचा सडा घालणं सारं काही यथासांग पार पडलं होतंच. त्यामुळे मंडळींनी भराभर शववाहिका वैकुंठाकडे रवाना केली. त्यातून रमेश, निनाद अशी अगदी जवळचे नातेवाईक गेले आणि बाकी साऱ्या पुरुषमंडळींनी आपापल्या गाड्या त्यापाठोपाठ दामटल्या.

''मला निनादचं फार वाईट वाटतं. किती प्रौढासारखा धीरगंभीर वागला. लहानपणी याच्या खोड्या बघता बघता आई-बाप थकून जायचे गं. आज अगदी हिरमुसलं कोकरूच दिसत होतं गं!''

कुसुमच्या मनाचा बांध पुन्हा फुटला.

''हो नं! किती आशा वाटत होती त्याला, आई याही अवस्थेतून बाहेर येईल म्हणून! एकेकाळी त्याच्या बाललीलांनी आणि मग नुकतंच मिसरुड फुटलेल्या वयातल्या खोड्यांनी हैराण केलेलं आई-बापाला.'' माईनं कुसुमची री ओढली.

''तरिता किती रागवायची त्याला पाहुण्यांच्या देखत ताईची आईची टिंगलटवाळी करायचा म्हणून. ताईचा खेळ हवा म्हणून किती वेळा तिचा मैत्रिणींबरोबर रंगात आलेला खेळाचा डाव मोडला होता यानं. आई नोकरीवरून घरी आली की सुरुताईच्या याच्याबद्दलच्या तक्रारींचा पाढा. पण तरिताही जमेल तेवढं त्याला समजावून सांगायची. त्याला मदतीला लावायची.''

''बाबांच्या हाताखाली स्वयंपाकघरात एखादा पदार्थ शिक.'' असं म्हणून हसायची.

पण बापसे बेटा सवाई म्हणतात नं तसं तो चक्क आईच्या बोलण्याकडे दुर्लक्ष करायचा किंवा ''मला नाही बाबांसारखं, मला स्वयंपाक येतो अशी दवंडी पिटवायची. त्याचीच फळं भोगताहेत ना ते!'' असं म्हणून मोठ्यांदा हसत सुंबाल्या करायचा खेळायला. कधी ताईबरोबर शुभंकरोती म्हंटलं नाही. घरातल्या देवापुढे दिवा लावला नाही. बाबांबरोबर स्तोत्रं म्हंटली नाहीत. देवाला आईबरोबर जायचा आणि आईच्या प्रदक्षिणांकडे लक्ष न देता प्रसाद घेऊन बाहेर येऊन थांबायचा. हा कुठलाही अभ्यास मागे लागल्याशिवाय करायचाच नाही. आई मग छडी घेऊनच बसायची त्याचा अभ्यास घ्यायला. आता मात्र नुकतीच त्याला छान दिशा मिळाली होती व्यावसायिक शिक्षणाची. त्यात तो विशेष नैपुण्यही मिळवू लागला होता. आईचा ऊर ते सांगताना अभिमानानं भरून यायचा. मग हा तिच्याकडून विशेष पॉकेटमनीही मिळवायचा. हॉटेलमध्ये मित्रांबरोबर चमचमीत पार्टीही व्हायची छोटीशी.

''ताईच्या लग्नातच तरिता ओढूनताणून करत होती आणि दमत होती. तिला बसायला दिलं तर संकोचत होती. इच्छाशक्तिच्या बळावर निभावलं बापडीनं.'' कुसुमनं पुन्हा डोळ्यांना पदर लावला. ''निनादला काय करू अन् नको करू असं होऊन गेलं होतं उपायांच्या बाबतीत. शेवटी डॉक्टरना विनवण्या केल्या. पण निसर्गापुढे आणि ईश्वर इच्छेपुढे आपण तोकडे आहोत गं.'' माई रडवेल्या स्वरात बोलल्या.

''अगं हो नं, मी नारळ ओवाळून टाकायला गेले, कुणीतरी दिलेला अंगारा लावायला गेले आय्.सी.यू. मध्ये तर डॉक्टरनी अजिबात अडवलं नाही मला. म्हणाले, 'काकू, आता आमचे उपाय थकत आलेत. तुम्ही करा देवाची आळवणी.' अगं हेच डॉक्टर ३-४ दिवसांपूर्वी तरिताच्या बेडपाशीही जाऊ देत नव्हते.'' कुसुमही सांगता सांगता रडत होती.

''अगं नाही कां, आपल्या उषाकाकूंच्या शंकरला कोल्हापुरहून बोलवून घेतला परवा रात्री, त्याला कुठल्याशा महाराजांचा अनुग्रह आहे म्हणून, या निनादच्या हट्टापायी. पण त्यानंही हार मानली. कोण काय करणार सारं शरीर उसवल्यासारखं झाल्यावर?'' पुन्हा माईंचे डोळे वाहू लागले. कुसुमताईंचं लक्ष तेव्हढ्यात देवघराकडे गेलं. छोटसंच पण छान सजवलेलं. रमेशनं आपल्या कुलदैवतांपैकी काही टाक आणि छोट्या मूर्ति मांडलेल्या. तरिता बहुतेकवेळा पुजा अर्चा करून नोकरीवर जायची. रमेशलाही फारसं बघायला लागायचं नाही. मग मुलं तर दूरच.

''अगं माई, हे बघितलंस का, रमेशनं देव पाण्यात ठेवलेत. सांकडं घातलं होतं त्यानं देवाला तरिताला आराम पडावा म्हणून.'' कुसुमताई उद्गारल्या.

एव्हाना माणसं परतू लागली होती. रमेश आत येताच माईंनी विचारलं,

''रमेश, तू देवांना पाण्यात ठेवलं होतंस का रे? पण त्यांचाही नाईलाज झाला असावा.''

''बघू.. मी, अगं मी होतो कुठे घरी जास्त. सारखा हॉस्पिटलमध्येच असायचो. शेवटी शेवटी तर कुसुमच्या घरीच जायचो आवरायला. घरी तर निनाद यायचा झोपायला. सकाळी चहा, नाष्टा करुन यायचा हॉस्पिटलला मला आवरायला जायला मिळावं म्हणून..'' आणि रमेशच्या डोक्यात लक्खकन् उजेड पडला. ''निनाद..?''

निनाद समोर हजर होता. ''हो बाबा, मीच... देवांनी आपली परीक्षा पाहिली, मग मी त्यांनाही...'' ही अंधश्रद्धा होती की नव्हती हे माहीत नाही पण देवावर पूर्णपणे श्रद्धा ठेवण्याचा निनादपुरता कुठंतरी पाहिलेला किंवा कुठुनतरी ऐकलेला मार्ग होता. कदाचित आईनं देवाधर्माचं केलेलं बघून देव त्याचं फळ या कसोटीच्या क्षणी नक्की देईल हा तो विश्वास असावा.

रमेशनं न राहवून निनादला उराशी कवटाळलं अन् अश्रूंना वाट करून दिली. कुसुम आणि माई यांचा पुन्हा बांध फुटला. जणू या साऱ्यांच्या अश्रूंच्या महापुरात देवही वाहून जाऊ पाहात होते.

***

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



शुभेच्छुक



मनिषा आण्णासाहेब कुंभार
DEPUTY C.E.O.
PMRDA



सुर्ये अधिष्ठिली प्राची ।
जगा जाणीव दे प्रकाशाची ।।
तैसी श्रोतया ज्ञानाची ।
दिवाळी करी ।।
....संत ज्ञानेश्वर महाराज

अर्थ : अज्ञानाच्या अंधारातून ज्ञानाच्या प्रकाशाकडे नेणाऱ्या *दिवाळीच्या हार्दिक शुभेच्छा....!*

श्री. आण्णासाहेब धोंडी कुंभार सौ. सुरेखा आण्णासाहेब कुंभार
श्री. मिलिंद आण्णासाहेब कुंभार सौ. पूनम मिलिंद कुंभार
चि. कैवल्य मिलिंद कुंभार कु. प्रिषा मिलिंद कुंभार
निवास : 'मनिषा' मंगलनगर, वाकड रोड, स.नं. १७१४, थेरगाव, पुणे-४११०३३. फोन : 9561213331



साई मंगल गारमेंन्टस

रेडीमेड कापड व
लग्न बस्त्याचे भव्य दालन

प्रेरणा स्थान



स्व. श्रीरामशेठ सौदागर



स्व.प्रकाश श्रीराम सौदागर

।। श्री सुपोजी कृपा ।।



श्री. अमोल श्रीराम सौदागर

प्रोप्रा.:अमोल श्रीराम सौदागर
मोबा. ८८८८५१४९४९

जय श्रीराम कॉम्पलेक्स, बस स्टँडसमोर, मेनरोड,
जळगांव, जामोद, जि.बुलढाणा, पिन - ४४३४०२



Pradip S. Kolhe
DCE, B.Tech(Civil), M.B.A.(Contmgn)
M. 9890436432



डॉ.श्रीराम कोल्हे
सचिव श्री.संत गोरोबाकाका
समाजोन्नती बहुद्देशीय समिती



सौ.लता श्रीराम कोल्हे
अध्यक्ष बारा बलुतेदार
महासंघ अमरावती

Lata Shree
BUILDES AND DEVELOPERS
Civil Engg. and Consulting
Town Planner and N.A. Work Interior Designer
Home : 9/E, Ajinkya Colony. V.M.V. Road, Amt., Email : kolhepradip@gmail.com
Office : Matoshree Arcade, Bunglow City News Office, Jaystambha Amravati

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

- All types of construction projects from planning till execution.
- Building & Project management systems.
- Power supply : electricity, sustainable energy sources, gas, etc.
- Energy allocation.
- Facade engineering.
- Building facade consultancy.

12 Years of professional experience in large commercial & Residential projects

15 lakh square feet of construction handover till date

SAHYADRI Infracon
Construction & Consulting

Office : S. No. 147, Raikar Nagar, Dhayari, Pune 411041

Rohit Kishor Parinchekar
7276399443

Dadasaheb Sanjay Hinge
9527465146

BTE AUTOMATION SYSTEM

BRIGHT TECH ENGG. AND AUTOMATION SYSTEM
Talawade Industrial Area, Pune 411062 Mob. : 9850887116



Engr. Rajesh Jadhav

Material Handling and Automation



AN ISO9001 :2015 CERTIFIED COMPANY SOLUTION HOUSE FOR YOUR AUTOMATION NEEDS

Our Valued Customer

ŠKODA | VOLKSWAGEN · CNH INDUSTRIAL · ATEQ · JOHN DEERE · CAT · CARRARO · THERMAX



प्रोप्रा.शशिकांत लक्ष्मण शिर्के
मो. 9226757928



श्री.अक्षय शशिकांत शिर्के
(MBA in HR, MCA)
मो. 9518343134



श्री.अमित शशिकांत शिर्के
मो. 8888968605

शिर्के पाटील विट कारखाना
उत्तम प्रतीचे विट उत्पादक

आमच्याकडे बांधकामासाठी ६ इंची व ४ इंची उत्तम विट योग्य दरात मिळतील.

मु.पो. शिरुर (घोडनदी), ता. शिरुर, जि. पुणे





मा. आर. बी. के. प्रजापती

निवृत्त इन्कमटॅक्स कमिशनर

मा. राष्ट्रीय अध्यक्ष, अखिल भारतीय
प्रजापती कुंभकार महासंघ

शिक्षीत बनो – संघटीत हो – संघर्ष करो !

ऑफिस : फ्लॅट नं.१२, ४था माला, द मालाड योजना को.ऑप.हौ.सोसायटी,
न्यू येरा सिनेमाके सामने, एस.व्ही.रोड, मालाड (प), मुंबई ४०००६४
टेलीफॅक्स : (०२२) २८८१३३२० मो. ९९३०४७७७३०
• **E-mail** : abpkmahasangh2009@gmail.com • **website** : www.abpkmahasangh.net



शामराव जगन्नाथ राजे

मो. 9890104105, 9422293900

- मा. प्रदेशअध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था, महाराष्ट्र राज्य.
- प्रदेश उपाध्यक्ष बाराबलुतेदार महासंघ, महाराष्ट्र राज्य.
- मा. विश्वस्त संत गोरोबाकाका मंदिर व धर्मशाळा, आळंदी
- अध्यक्ष निरा विकास आघाडी, निरा-शिवतक्रार

मु.पो. निरा, ता.पुरंदर, जि.पुणे - ४१२ १०२



चि.आदित्य राजन कुंभार, एम.एस. (केमिकल इंजिनीरिंग), आणि अविष्कार राजन कुंभार (बी.ई.मेकॅनिकल, एम.डेस.) यांचा समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे मन:पुर्वक हार्दिक अभिनंदन करताना कुंभश्री संपादक संजय राजे समवेत इंजिनिअर राजन कुंभार व सौ.शुभांगी राजन कुंभार



घर नं.१२८२/९ वॉर्ड नं.२४, महालक्ष्मी नगर गल्ली नं.७,
शहापुर रोड, इचलकरंजी, जिल्हा कोल्हापूर
8788741739/8625857356

उद्योजक राजन कुंभार यांचे नूतन गृहप्रवेशा निमित्ताने अभिनंदन करताना डावीकडून कुंभश्री संपादक संजय राजे, सौ.शुभांगी राजन कुंभार, राजन कुंभार व अनिल शिर्के



डॉ. संजय बाबुराव कुंभार

M.B.B.S., MSCSEPI
वैद्यकीय अधिकारी, प्राथमिक आरोग्य केंद्र, उंब्रज, ता.कराड, जि. सातारा
अध्यक्ष, सातारा जिल्हा कुंभार समाज महासंघ

Email : drsanjaykumbhar@yahoo.in
Mob. 8275481481
7387370348



सौरभ संजय राजे(कुंभार)
Flying Officer
Indian Air Force



सौ.आकांक्षा सौरभ राजे
M.Sc.(Stat.) B.Ed.

डॉ. सौ. सुजाता संजय कुंभार

M.B.B.S., MD.(Pathalogy)
असोसिएट प्रोफेसर, कृष्णा वैद्यकीय महाविद्यालय, ता.कराड, जि. सातारा



Email : drsujatakumbhar@yahoo.in
Mob. 9272325081

निवास : 'कृष्णाई निवास', गांधीनगर, मु.पो.काले, ता.कराड, जि.सातारा

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!


श्री.किसनशेठ बा.काळे
(उपाध्यक्ष महा.राज्य कुंभार विकास सं.)
अध्यक्ष संत गोरोबा काका पायी दिंडी सो.मावळ ता.


सौ.उर्मिला कि. काळे


कु.ओमकार कि.काळे


कु.करण पा.काळे


श्री.रामचंद्र र.सोमवंशी

ओमकार विट कारखाना आणि ट्रान्सपोर्ट,
ओमकार ऑटोमोबाईलस्, ओमकार डेव्हलपर्स, करण ऑईल डेपो

पत्ता: श्री दत्त कॉलनी मु.पो.कामशेत, ता.मावळ, जि.पुणे | ऑफिस: साई एंटरप्राईजेस,जुना मुंबई पुणे महामार्ग, सहारा कॉलनी समोर, कामशेत
साईट :स.न.२६४कुसगांव खु ।। ता.मावळ जि.पुणे. मो.9823587625, 9763173271


प्रोप्रा.निलेश मुरलीधर जाधव
9730499808
7385719059


चि.सार्थक निलेश जाधव


चि.कृष्णा निलेश जाधव

सार्थक ट्रेडर्स
डिस्ट्रीब्युटर कंपनी

डिस्ट्रिब्युटर्स : अमुल आईस्क्रीम, कॅडबरी इंडीया लि, रेकिट बेन्स्काजर(डेटॉल) बालाजी कार्पोरेशन लि, केवीन केअर प्रा.लि.

कृष्णा ट्रेडर्स
डिस्ट्रिब्युटर्स : सोसायटी चहा, कॅपिटल फुडस् प्रा.लि.(Chings), वैभव मार्केटिंग कॉरपोरेशन(Ozone. 555), बीजूर सोपर फुडस् प्रा.लि. खंडेलवाल फूड प्रॉडक्टस्, केशरत्न फूड प्रोडक्टस्

यशश्री रेसिडेन्सी, कोल्हे मळा, मु.पो. नारायण गाव ता.जुन्नर, जि.पुणे 410504

Our Inspriation


Chandrakant More


Ratnamala More

Il Shree Il
C.M. चंद्रकांत मोटर्स
सर्व प्रकारच्या चार चाकी व कमर्शियल गाड्यांची खरेदी विक्री
(ट्रक, डंपर, हायवा, २५१५, ३११८, जे.सी.बी व इतर)

TRUCK BAZI
BUY SELL RENT FASTER
App For Used Truck & Construction Equipments
GET IT ON Google Play

शॉप नं. १, जगताप डेअरी, विशालनगर, पिंपळे निलख, औंध वाकड रोड, पुणे - २७.


कुणाल मोरे
D.A.E.


सौ. सपना मोरे
B.Com

मो.: ९५४५८८६६६६
Email : kunalmore100@gmail.com

"Ice-Bergs"
Softy, Shaks, Scoops & Cold Coffee Chat & Fast Foods
Shivaji Nagar, Gokhale Road, Eden Hall, Shop No. 4, Pune-411016. Contact No.: 9665020179

ADVOCATE



अॅडव्होकेट संदिप बाळासाहेब वाघमारे
मोबा.: 9767892400

ऑफीस १ : ऑफीस नं. ११, श्री चेंबर्स, जिल्हा न्यायालयासमोर, शिवाजीनगर, पुणे-४११००५.

ऑफीस २ : सर्व्हे नं. ७७/१/३९, दुसरा मजला पाडाळे कॉम्प्लेक्स, डी-मार्ट समोर, काळेवाडी, पुणे-४११०१७.

Email : sandeepw7@gmail.com
Website : www.adlitem.in



Harishchandra
R. Salvi
D.OPT.



Sushant's

SPECTACLES OPTICS & CONTACT LENS

4, Mahavir Niwas,
Sector No.21,
Opp.Centurion Mall,
Nerul-Seawood,
Navi Mumbai - 400 706.
Ph.: (022) 27702884

SPECTACLES

SUSHANT OPTICIANS

& Contact Lens Centre

5, Shivkrupa, Near Bombivli
Nagari Sahakari Bank,
Kulgaon, Badlapur(E)
(0251), 2694458, 2695566



SAI ELECTRO INDUSTRIES

Electrical Contractors & Consultants
Home Wiring & Industrial Wiring

Sales & Service

Online, Offline Inverters & UPS Systems
Servo Stabilizers & Batteries
Havells Official Distributor
Led Lighting, Home Appliances and Reo etc.

OUR INSPIRATION



Late D.T. Jorwekar



Late Vatsala Jorwekar



Sudhakar Jorwekar



Balasaheb Jorwekar
9422384801



Nikhil Jorwekar
BE Computers

B-No.16, Satara Sah.Grih Nirman Society,
Near Saibaba Mandir, Godoli, Satara. Ph. (02162) 234562

योगेश सुदामराव जामदार
92716 43220



मोरया इंडस्ट्रीज

- मोरया जिम ॲन्ड हेल्थ क्लब
- मोरया पेपर कप
- मोरया प्रोटीन शॉप
- मोरया प्रिंटींग सोल्युशन(कप प्रिंटींग)
- इंडस्ट्रीयल प्रिंटींग
- फुड पॅकेजिंग

Email : yogesh.jamdar143@gmail.com

ऑफिस - जुने मार्केट यार्ड, शिरुर, ता.शिरुर, जि.पुणे ४१२ २१० कंपनी - २९२८, कुंभारआळी, शिरुर, ता.शिरुर,जि.पुणे



प्रकाश हरीभाऊ
भालेराव



नंदकुमार हरीभाऊ
भालेराव



कु.आर्या प्र.भालेराव



कु.काव्या प्र.भालेराव

गजानन रोडवेज व आर.टी.ओ. सल्लागार

सर्व प्रकारच्या १४ टायर १२ टायर गाड्या
माल वहातुकीसाठी मिळतील



प्रशांत प्रकाश भालेराव
मो.: 9765670670



गणेश प्रकाश भालेराव
मो.: 9960887546
B.E., Senier Engg.





मु. पो. कुंभारवाडा, ता. अकोले, जि. अहमदनगर

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

आमचे प्रेरणास्थान



कै.देवराव ल.कापडे



कै. रविंद्र दे. कापडे



किशोर दे. कापडे
मो. : ९४२२९५९३७३
मो. : ९४२२९५९३७२



समर्थ ब्रिक्स इंडस्ट्रीज

हाता (अंदुरा), ता. बाळापूर, जि. अकोला,
फोन : ०७२५७-२२६५२४

श्री स्वामी ब्रिक्स इंडस्ट्रीज

अंदुरा, ता. बाळापूर, जि. अकोला,
फोन : ०७२५७-२२६५२४

ऑफिस : १४ जी, रामलता बिझनेस सेंटर,
अमरावती रोड, अकोला.
फोन : ०७२४-२४५८७३१

महाराष्ट्रातील पहिली चिमणी भट्टी, बांधकाम खर्चात ३०% बचत हेच आमच्या विटांचे वैशिष्ट्य



Arun S. Nigavekar
Ex. Deputy Meyor
Kolhapur



Sanjay Nigavekar
Chairman, Kumawat
Co-op. Society



Amit A.
Nigavekar

M.: 9890028199 / 8390909083

Paint Marchant & Ganpati Colours

ARUN & CO.
Ph.: 0231- 2640116
Ford Corner, Laxmipuri

ARUN BROTHERS
Ph.: 0231- 2642619

AMIT ENTERPRISES
Ph.: 0231- 2642230
C & F Agent : Indocem India Pvt. Ltd.

INDOCEM®



shivam agencies
Italian Touch Finesh Kitchen

9158589900
Shop : 1430, C, Sambhaji Bridge, Laxmipuri, Kolhapur
Email : arunbross@gmail.com

RELIABLE LIFTS India Pvt. Ltd.

Avdhut Complex, Office No.201, IInd Floor,
Near Shree Vitthal Heritage, Dattanagar,
Ambegaon BK, Pune 411046
E-mail : reliablelifts2012@gmail.com
Web.: www.reliablelifts.in



Chandrakant Kumbhar
Director
9960200174

Specialist in
Manufactures, Installation, Modernasation, AMC of all types of lifts (Elevator's)



ज्योतिषतज्ञ
सौ. लता चंद्रकांत कुंभार
मो. 9527601537

जन्मपत्रिका, वास्तुशास्त्र फेंगशुई इत्यादी बाबत तज्ञ मार्गदर्शन मिळेल.

श्री विठ्ठल हेरीटेज, दत्तनगर,
आंबेगांव बु. पुणे ४११०४६

बारामतीमधील संगणक क्षेत्रातील अग्रगण्य नाव.....
(बेस्ट तालुका ए.टी.सी. ॲवॉर्ड विजेते)

डाटाबेस कॉम्प्युटर्स



राजेंद्र कुंभार

कोर्सेस

- MS-CIT
- DTP
- TALLY
- C, C++
- VB
- ORACLE
- DCO, DCFA
- OTHER DIPLOMA & CERTIFICATE COURSES

विविध शासकिय Online फॉर्म भरण्याची सुविधा...

MKCL चे विद्यार्थी फॅसिलिटी सेंटर

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ व
महाराष्ट्र ज्ञान महामंडळ मर्या. मान्यता प्राप्त

ज्ञानगंगा घरोघरी

डाटाबेस कॉम्प्युटर्स

WE MAKE PERFECT

बुरुड गल्ली,लोंढे हॉस्पीटल समोर,बारामती,जि.पुणे.
फोन : २२६५१०/मो.९४२३२०३७७७



Umesh P. Kumbhar
D.C.E.
Treasurer, Association of
Architect & Engineers, Kolhapur.
M.: 9890159098

M/s. KARVEER CONSTRUCTIONS

ARCHITECTURAL PLANNING / R.C.C. CONSULTANT
PROJECT MANAGEMENT &CONSULTING / CONTRACOTRS

Office : 1369 / 70, A, Rankala Darshan Aprt., Kolhapur - 416 012.
Email : ernitinkumbhar@rediffmail.com


जगन्नाथ सुर्यवंशी


सौ.वंदना ज. सुर्यवंशी


निलेश ज.सुर्यवंशी
B.E.(Mech.)
9930800884


सौ.कविता नि.सुर्यवंशी
M.Sc., MBA


डॉ.राकेश ज.सुर्यवंशी
MBBS, PGCR


डॉ.गायत्री रा.सुर्यवंशी
B.H.M.S.


प्रमोद ज्ञा.थोरात
B.E.(E&TC)


सौ.वर्षा प्र.थोरात
M.Sc., B.Ed.

जगन्नाथ भिका सुर्यवंशी
निवृत्त म.रा.वि.वि.कंपनी कर्मचारी
निवास : श्री 'गजानन कृपा' श्री.इच्छापूर्ती गणेश
मंदिरा जवळ शास्त्रीनगर, चाळीसगाव, जि.जळगाव
94210 39375

अथर्व क्लिनिक

पारसिक नगर, कळवा (प) ठाणे मो.बा. 9867200456

कु.शरयु, चि.कनाद, कु.ओवी, चि.अथर्व, कु.अर्णवी, कु.रेणुश्री.

Gaondevi Vihar

Ten Minustes away from
Badlapur Station



S.K. Builders

Mob.: 9323146708
9422054931

Project by
Balaji Builders & Developers



Samir S. Shetkar
7719892266

Site Add : Survey No. 11, Gaondevi Vihar
Opp. Gaondevi Mandir, Kulgaon Badlapur(e)
samir_shetkar@yahoo.co.in

Booking Contact : 9518308646 / 9422076690

॥ प्रेरणास्थान ॥


सौ. कुसुम/श्री.अण्णासाहेब विष्णु काळे

शिरूर (घोडनदी)
ता. शिरूर, जि. पुणे



गुरुकृपा विट कारखाना,शिरूर
श्री. दत्तात्रय अण्णासाहेब काळे
उपाध्यक्ष-कुंभार समाज संघटना,अ.नगर जिल्हा
मो. 9767753743



श्री खंडेश्वर सप्लायर्स
श्री. महेंद्र अण्णासाहेब काळे
मो. 9881274288



श्रद्धा बिल्डींग मटेरियल सप्लायर्स
श्री. विठ्ठल अण्णासाहेब काळे
मो. 9011378566

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



Resort
90672 97680
96374 06134
74481 33763

Dinesh Karanjkar
(Owner)
97693 30366
93239 60857

White House • Residencies AC & NON AC

दिवेआगार

राहण्याची व जेवणाची उत्तम सोय एम.टी.डी.सी. मान्यता प्राप्त

Add : Mukkam Post Diveagar, Suvarna Ganesh Pakhadi,
Web.: www.whitehouseresidencies.in
E-Mail : whitehouseresidencies1@gmail.com
Google Map Co-ordinates : 18.1641625, 72.9909392



जया एजन्सी

प्रोपा.जयश्री बा.सावर्डेकर
9975513728



करण आर्टस्

प्रोपा.बाजीराव स.सावर्डेकर
9960081937



गणपतीसाठी लागणारे कलर, प्लॉस्टर पावडर, मोल्डींग रबर आणि सर्व प्रकारचे मटेरिअल होलसेल व रिटेल दरात मिळतील

आमचेकडे प्लॉस्टर व शाडू सुबक आकर्षक गणेशमुर्ती होलसेल व रिटेल दरात मिळतील

प्लॉट नं.१५४, संत गोरा कुंभार वसाहत, बापट कॅम्प, शेवटचा बस स्टॉप, कोल्हापूर



डॉ एम.ए. मुरुडकर

एम.ऐ(अर्थशास्त्र)
एल.एल.एम.(पुणे विद्यापिठ)
पी.एच.डी(जयपूर)
डी.बी.एम.,डी.आयटी,
जी.डी.सी.अँड ए

सहकार अधिकारी श्रेणी १
सहकार विभाग, कोल्हापूर
9123042159









सहकारी बँका व पतसंस्थासाठी उपयुक्त मार्गदर्शक ग्रंथ

कुंभार समाजाच्या पतसंस्था व संबंधित संस्थासाठी पुस्तके खास सवलतीत उपलब्ध

ॲड.चि.आकाश म. मुरुडकर

सर्व प्रकारचा कायदे विषयक सल्ला मिळेल



बी.एस.एल, एल.एल.बी., एम.ऐ(इंग्रजी)
उच्च न्यायालय मुंबई
96999602064

गट नं. "समर्थ" करवीर निवासीनी रेसीडन्सी प्लॉट क्र.५(अ), आर.के.नगर कोल्हापूर ४१६०१३



उत्तमराव व सौ. लता काळे



डॉ. स्वप्निल उ. काळे
MBBS.,DMRD,MD(USA), DNB(Rediology)



डॉ.सौ.कल्पिता स्व.काळे
MBBS, DOMS
नेत्ररोग तज्ञ



विवेक खोपे
B.E. MBA



सौ.स्नेहल वि. खोपे
MCA.,Fergusion College, Pune



डॉ. योगेश श्रीमंदिलकर
MBBS.,DNB, (Medicine)



डॉ. सौ.सुनिता श्रीमंदिलकर
BDS.,MDS

उत्तमराव भगवानराव काळे

मा. मुख्याध्यापक, आ.ब. हायस्कुल, चाळीसगांव
अध्यक्ष, महाराष्ट्र कुंभार समाज वधू-वर सूचक मंडळ, चाळीसगांव

निवास : सौरभ, लक्ष्मी नगर, अंध शाळेजवळ. चाळीसगांव, जि. जळगांव
फोन : 02589-226019
मो.: 9850199918 / 9869383625



वि.रुद्र योगेश श्रीमंदिलकर



कु.क्रिशा स्वप्नील काळे

रुद्र हॉस्पिटल, राजगरुनगर, ता.खेड, जि. पुणे

प्रार्थना

– किरण आचार्य

आयुष्यात कधी कधी खूप गोष्टी चुकतात. त्या लक्षात यायला वेळ लागतो. पण लक्षात येतात तेव्हा त्या सुधारण्याची वेळ निघून गेलेली असते. सगळ्यांसाठी देवळात जाणाऱ्या सगळ्यांचे भले व्हावे याची प्रार्थना करणाऱ्या आईने आपल्या मुलांसाठी कुटुंबासाठी कधी कोणती प्रार्थना केली असेल का? की इतरांचे भले करता करता स्वत:साठी मागायचे विसरुन गेली हे फक्त त्या आईला आणि तिच्या देवालाच माहीत!



आज मी देवळात आली आणि देवासमोर हात जोडले. आयुष्यात कधी कधी काही गोष्टी चुकतात. आणि त्या लक्षात यायला बराच वेळ लागतो. बरेचदा जेव्हा त्या लक्षात येतात तेव्हा त्या सुधारण्याची संधी निघून गेलेली असते. माझ्या बाबतीत देखील असेच काहीतरी घडले असावे. आणि म्हणून आज माझी पावले देवळाकडे वळली. मी स्वतः फारशी कधी देवळात जात नव्हती. अगदी क्वचित कधी परिवारा - सोबत, तर कधी मित्र मंडळीं सोबत, पण आज मात्र पहिल्यांदाच मी एकटी देवळात आली. देवासमोर हात जोडून उभे राहिल्यावर आत्ता मनात काहीही विचार येत नाहीयेत. काय बोलावे, काय मागावे हे देखील सुचत नाहीये. अगदी माफी सुद्धा मागायची इच्छा होत नाहीये.

चाळीत त्यांना सगळेच आई-बाबा म्हणायचे. अख्ख्या चाळीचे त्या आई-बाबा होते. मी जेव्हा चाळीत राहायला आली त्यावेळी आमची परिस्थिती फारशी चांगली नव्हती. माझ्या नवऱ्याचे एक सलून होते जे तो भाड्याने चालवायचा. घरी कमावणारा तो एकटाच आणि खाणारी तोंडे पाच. आम्ही नवरा बायको आमच्या दोन मुली आणि एक मुलगा.

मला कुणाकडे आपल्या परिस्थितीबद्दल बोलणे फारसे आवडायचे नाही. उगाच कुणाला काही का सांगावे? कोणी आपली कीव केलेली मला चालायची नाही. माझ्या नवऱ्याचे आणि माझे त्यावरून बरेचदा भांडणही व्हायचे, कारण त्याची सवय माझ्या विरुद्ध होती. त्याच्या मित्रमंडळींमध्ये, आमच्या नातेवाईकांमध्ये बरेचदा आपल्या परिस्थितीबद्दल सांगून काही ना काही मदत मिळवण्याचा तो प्रयत्न करायचा. त्याचा उद्देश वाईट होता असे नाही. ही मदत तो आपल्या कुटुंबाकरता, आमच्याकरताच मागायचा. परंतु का कुणास ठाऊक मला मात्र कुणाजवळ असे काही बोलून मागणे कधीच पटले नव्हते. आमचा वाद हा याच कारणाने असायचा. एक वाईट परिस्थिती सोडली, तर घरात दुसरी विशेष समस्या नव्हती कारण माझ्या नवऱ्याला कुठलेही व्यसन नव्हते.

आई नेमकी पहिल्यांदा माझ्याशी कधी आणि काय बोलली ते आठवत नाही. पण हळूहळू आईला आमच्या घरातील परिस्थितीची कल्पना यायला लागली. मी माझ्या स्वभावाप्रमाणे फारशी कधी तिच्याशी चर्चा करायची नाही. पण तरीही हळूहळू वरचेवर बोलण्यातून, आणि आमच्या घरी ती येत असल्याने एकंदरीत घर बघून तिला काय कळायचे ते कळले होते. आई-बाबांना एकच मुलगा होता. तो इंजिनिअरिंगचे शिक्षण घेत होता. ते चाळीत जरी असले तरी एकूण त्यांची परिस्थिती खाऊन पिऊन सुखी अशीच होती. कोणाचे देणे नाही, कोणाचे घेणे नाही, शिवाय थोडाफार पैसा ते राखूनही होते. त्यांचे चाळीत सगळ्यांशी चांगले संबंध होते. कधीही कोणाशी कुठलेही मतभेद अथवा भांडण त्यांचे झाले नव्हते. अन्यथा चाळीत इतरांचे आपापसात बरेचदा भांडण व्हायचे, मात्र हे घर सगळ्यांशी चांगले होते. एकमेकांशी भांडणारे दोघेही आई-बाबांशी मात्र बोलायचे आणि आई-बाबा कधीच कुणाच्या बाजूने असायचे नाही. शक्य झाले तर आई दोन्ही घरांना समजावण्याचाच प्रयत्न करायची.

आई देव भोळी होती. ती वरचेवर मंदिरात जायची, आणि देवाजवळ कुणा ना कुणासाठी तरी काही ना काही तरी मागायची. देव तिचे ऐकतो यावर तिचा खूप विश्वास होता. तिने कुणासाठी काही मागितले आणि ते देवाने दिले नाही असे झालेच नाही. तिने देवाजवळ घातलेल्या गाऱ्हाण्याच्या कितीतरी कथा मी इतरांकडून ऐकायची. आई मात्र त्याबद्दल एक चकार शब्दही बोलायची नाही.

चाळीतील आणि वेटाळातील लोक मात्र आईबद्दल भरभरून बोलायचे. आई घरी येते आपल्याशी बोलते आपल्या अडचणी समजून घेते आणि देवाजवळ जाऊन आपल्या घराचे भले होऊ दे यासाठी गाऱ्हाणे घालते. निर्मळ मनाने केलेली ही प्रार्थना देव ऐकतो आणि त्या घराचे भले होते.

माझा स्वभाव थोडासा हट्टी, कुठेतरी स्वाभिमान आणि अहंकार असा असल्याने आई जरी घरी येत असेल तरी मी माझी परिस्थिती तिच्यासमोर कधी येणार नाही याची काळजी घ्यायची. तरीही बोलण्यातून आईला काय समजायचे ते समजले असावे. कारण एकदा आई बोलता बोलता मला म्हणाली, ''कुणाजवळ मनातली व्यथा सांगितल्याने आपल्याला काहीही कमीपणा येत नसतो. शेवटी माणूसच माणसाच्या कामाला येतो. अगदी आपण सख्खे नातेवाईक असलेच पाहिजे असे नाही. शेवटी नाते काय माणसांनीच आपल्या सोयीने बनवलेले आहेत. मी तुझी नसली तरी कोणाची आईच आहे. आणि प्रत्येकाची आई ही सारखीच असते. भाऊ-बहीण, आई-वडील, मानले तर सगळेच आपले, आणि मानलं तर कोणीच आपलं नाही. त्यामुळे बोलावं.''

आता आई बद्दलचे माझे मत हळूहळू बदलू लागले. आमच्या घरची परिस्थिती, माझ्या नवऱ्याला असलेल्या अडचणी, या सगळ्या बाबत हळूहळू मी आईशी बोलू लागले. आईने कधी माझी कीव केली नाही किंवा असे कुठले सल्ले ही दिले नाही की ज्यात मला फार काही क्रांतिकारक करावे लागेल. मात्र अनुभवाच्या चार गोष्टी ती मला सांगायला लागली आणि मलाही हळूहळू ते पटायला लागले. घरातील वातावरण चांगले राहावे प्रसन्न असावे याकरता युक्तीच्या चार गोष्टी आई मला सांगू लागली. पैसा हा जगण्यासाठी नक्कीच आवश्यक आहे. मात्र घरातील सुख आणि आनंद यांचा आर्थिक परिस्थितीशी संबंध नाही. हे सगळे आई तिच्या अनुभवातून मला सांगायची.

दरम्यान त्यांच्या मुलाचे इंजिनिअरिंग पूर्ण झाले आणि त्याला एक चांगली नोकरी लागली. माझ्या घरची परिस्थिती जैसे थे होती. माझ्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न होता. बाकी घरच्या अडचणी देखील होत्या.

शाळेची फी न भरल्यामुळे माझ्या मुलांचा वार्षिकचा निकाल रोखून धरला होता. आईशी बोलताना हा विषय सहज निघाला, आई मला काहीच बोलली नाही. संध्याकाळी अचानक माझ्या मुलांचा निकाल घेऊन आई घरी आली. आईने दादांना म्हणजे तिच्या मुलाला याबद्दल सांगितले होते. आणि त्यांचा मुलगा शाळेत जाऊन माझ्या मुलांची फी भरून निकाल घेऊन आला. एवढेच नाही तर त्या दादाने माझ्या मुलांची पुढील वर्षाची सर्व फी भरून ठेवली होती मला काय बोलावे हेच समजेना. आई मला म्हणाली तुला हे आवडणार नाही हे माहीत आहे पण हे सर्व

पैसे तू मला योग्य वेळी आणि योग्य पद्धतीने परत करशील, माझा देवावर विश्वास आहे.

चमत्कार घडावा तशा काही गोष्टी घडत गेल्या. आमच्या जवळच एक प्लास्टिक प्रोसेसिंग चा छोटा कारखाना आला, ज्यात महिलांसाठी काही कामे निर्माण झाली. जी या महिला घरबसल्या करू शकतील. त्याची माहिती दादांनी मला आणून दिली आणि मी त्यांच्याच मदतीने त्या कारखान्यातून कामे मिळवायला लागली. घरबसल्या हळूहळू माझे इनकम वाढू लागले. माझ्या नवऱ्याला दादांच्या मदतीने लोन मिळाले व त्यांनी एक छोटे सलून सुरू केले. जादू व्हावी अशा पद्धतीने आमच्या घरची परिस्थिती हळूहळू बदलायला लागली.

आई वरचेवर घरी यायची. आपुलकीने चौकशी करायची. आता तिची सवय व्हायला लागली होती. माझा स्वभाव जरी अहंकारी, स्वाभिमानी असला तरी, हा अहंकार, स्वाभिमान आईच्या बाबतीत, एकंदरीत या घराच्या बाबतीत पूर्णपणे गळून पडला होता. दादा माझ्या मुलांना शिकवायचा. त्याला जमेल तसे माझ्या मुलांना फिरायला घेऊन जायचा. सिनेमा, फिरणे, मौजमजा या सर्व गोष्टी माझ्या मुलांच्या आयुष्यात कधीच नव्हत्या. ही सर्व हौस या माऊलीच्या मुलाने म्हणजे दादा ने पूर्ण केली. हे घर वेगळे आहे असे आता वाटतच नव्हते. माझ्या मुलांना दादा आपलासा वाटायचा. हक्काने ते त्याला काहीही सांगायचे, मागण्या करायचे दादांनी देखील कधी त्यांच्या बाबतीत दुजाभाव ठेवला नाही.

यादरम्यान आई बऱ्याचदा देवळात गेल्याचे मला बाहेरून समजले. त्यांच्या नेहमीच्या स्वभावाप्रमाणे कदाचित माझ्यासाठी सुद्धा त्या माऊलीने नक्कीच प्रार्थना केली असेल हे माझ्या लक्षात आले. दरम्यान त्यांच्या मुलाची म्हणजेच दादांची दुसऱ्या गावात बदली झाली. आणि चाळीतून हे घर कायमचे दुसऱ्या गावी निघून गेले. चाळीतून बरीच कुटुंब याआधी सुद्धा वेगवेगळ्या कारणाने निघाली होती. मात्र जेव्हा आई-बाबा चाळीतून निघाले तेव्हा चाळीतील प्रत्येकाच्या डोळ्यात पाणी होते. आई जेव्हा निरोप घ्यायला माझ्या घरी आली मला बोलता ही येत नव्हते. सारखा कंठ दाटून येत होता. मी फक्त आईला घट्ट मिठी मारली आणि माझ्या डोळ्यातून अश्रूंची धार सुरू झाली.

आई बाबा चाळ सोडून गेल्यानंतर काही दिवस फोनच्या माध्यमातून संपर्क होता. कधी मध्ये दादा देखील आई-बाबांना चाळीत आणायचे. मात्र हळूहळू हा संपर्क कमी होत गेला.

दरम्यान आईच्या प्रार्थनेमुळे ज्या कारखान्यातून मी काम मिळवायची त्या मालकाने माझ्या मुलांच्या उच्च शिक्षणासाठी मदतीचा हात दिला. माझ्या मुलाला तर चक्क परदेशात पाठवण्याची त्यांनी सोय केली. बघता बघता दिवस बदलत गेले. चाळ सोडून आज मी स्वतःच्या फ्लॅटमध्ये आहे. सगळं काही ठीक सुरू आहे. माझ्या मुलींची लग्न झाली आहे. आणि मुलाच्या लग्नासाठी ठिकाण बघणे सुरू आहे.

आज अचानक का कोणास ठाऊक चाळीत जावेसे वाटले. आणि मी चाळीत आले. आमच्यापैकी केवळ एक दोनच कुटुंबे आता तिथे उरलेली आहेत. बाकी सर्वच चाळ सोडून निघून गेले. या दोन घरांमध्ये बोलता बोलता अचानक आई-बाबा आता वृद्धाश्रमात असतात असे मला समजले. ऐकून धक्काच बसला! काळजात एकदम धस्स झाले.

काही वर्षांपूर्वीच दादांचा अपघाती मृत्यू झाला. त्यांना हा एकच मुलगा होता. नातेवाईकांशी फारसा संपर्क नव्हता. ते घर वर जरी सुखी दिसत असले तरी त्यामागे बऱ्याच गोष्टी होत्या. बरेचदा आपण एखाद्या व्यक्तीला संपूर्णपणे ओळखतच नाही. एखादी व्यक्ती अशी का वागते त्यामागे त्यांच्या काय भावना असतात, आपण बरेचदा यापासून अनभिज्ञ असतो. आई-बाबांच्या बाबतीत तेच घडले.

सगळ्यांचे भले व्हावे, नातेवाईक केवळ नावापुरते असतात, खरे नाते माणुसकीचे, आईचे हे शब्द आता माझ्या कानात घुमू लागले. माझ्या अडचणीच्या वेळी ज्या माऊलीने देवाजवळ प्रार्थना केली, मला शक्य ती मदत केली त्या माऊलीचा संपर्क मी पुढे ठेवू शकले नाही.

आयुष्याच्या वेगवान प्रवाहात जेव्हा माझ्या कुटुंबाने प्रगतीची कास धरली, तेव्हा त्याच्या मुळाशी असलेली ही आई ते दादा यांचा मला विसर पडला होता. कारखान्याच्या मालकाने माझ्या मुलांच्या उच्च शिक्षणाची सोय केली, पण त्यांच्या मूलभूत शिक्षणाची पायाभरणी ज्या दादांनी केली होती त्यांचा अपघाती मृत्यू सुद्धा मला समजू नये याचे मला वाईट वाटले. काय चूक, काय बरोबर, काय योग्य, काय अयोग्य या पठडीत न बसणारे प्रसंग कधी कधी आयुष्य आपल्यासमोर आणतो. आज माझ्या बाबतीत तेच घडले होते. चाळ सोडून गेल्यावरही त्या माऊलीने माझ्यासाठी नक्कीच प्रार्थना केली असणार आणि त्याबाबतीत मी अनभिज्ञ होते.

मी नक्कीच चुकले होते. माझ्या मुलींच्या लग्नाच्या वेळी सुद्धा मला आईची आठवण येऊ नये इतकी मी माझ्या संसाराच्या सुखात गुरफटले होते. मनुष्य स्वभावच विचित्र असतो, अडचणीच्या वेळी असणाऱ्या भावभावना या परिस्थितीप्रमाणे बदलत जातात. माझ्या बाबतीत नेमके तेच घडले होते. आज मात्र मनाला वेगळीच हुरहुर लागली होती. सगळ्यांसाठी देवळात जाणाऱ्या आणि प्रार्थना करणाऱ्या त्या माऊलीने आपल्या मुलांसाठी किंवा कुटुंबासाठी कधी कुठली प्रार्थना केली असेल कां? की इतरांचे भले करता करता आपल्याच घराला ती विसरली असेल? याचे उत्तर फक्त तिच्याजवळ आणि देवाजवळ असेल. कारण संवाद फक्त त्या दोघांचा व्हायचा.

ते ज्या वृद्धाश्रमात असतात त्याची माहिती घेऊन मी चाळीतून निघाले. चाळीच्या बाहेर आल्यावर रस्त्याच्या पुढच्याच बाजूला एक देऊळ आहे. याच देवळात आई यायची...

इथेच ती सगळ्यांसाठी प्रार्थना करायची...

त्यात मी देखील होते...

माझ्या घराच्या बदलणाऱ्या परिस्थितीसाठी एकमेव प्रार्थना करणारी माऊली याच देवासमोर माझ्यासाठी प्रार्थना करायची...

आज मी याच देवळात देवासमोर उभी आहे. हात जोडलेत आणि डोळे मिटलेत. पण काय बोलावे काय मागावे खरंच समजत नाहीये...

***

अधलं मधलं

– महेश सोवनी, नांदेड

अधलं मधलं म्हणजे सुख नसले तरी समाधान तरी असते. आपल्याला हवे ते मिळाले म्हणजे सुख असते. हे जरी खरे, म्हणून काही आपल्याला हवे ते मिळाले नाही म्हणून दुःखच असते असे नाही. सुख आणि दुःख यांच्या 'अधलं-मधलं' काहीतरी असतेच की! बहुतांश लोकांचं प्रारब्ध असेच 'अधलं मधलं' असतेच की!



माझ्या सारख्या रिटायर्ड माणसासाठी दिवस नेहमीच उजाडतो, तसाच त्या दिवशीही उजाडला. नेहमी सारखी सकाळ झाली आणि नेहमी सारखा मी दार उघडून व्हरांड्यात खुर्ची टाकून पेपरची वाट बघत बसलो. हल्ली पेपर मध्ये वाचण्यासारखं काही नसतं तरी तो वेळेवर आला नाही तर जीव वर खाली होतो. चहात पोषक द्रव्ये नसतात तरीही तो लागतोच, यातलाच हा प्रकार. सवयीचा परिणाम. नेहमीची वेळ उलटून गेली. दोन चहा झाले. तरीही पेपरचा पत्ता नाही.

'आज विसरला बहुतेक.' निवा समोर येऊन म्हणाली. मी काहीच बोललो नाही तेव्हा ती म्हणाली, 'हल्ली टीव्हीवर आणि मोबाईलवर सगळ्या बातम्या मिळतातच की.'

'तू आज कॉलेजला नाही जाणार?' मी विचारले.

'जाणार आहे. पण आज नेहमी सारखी गडबड नाही. पहिले दोन तास ऑफ आहेत. काही तरी रॅली बिली आहे.'

'तुला नाही जायचे? कम्पल्सरी असते ना सगळ्यांना?'

'असते. पण बाबा आता मी त्या कॉलेजमध्ये विद्यार्थिनी नाही तर प्राध्यापिका आहे. केलं ॲडजस्ट. शिवाय आता कॉलेजही तुमच्या वेळेसारखे नाही राहिले. तुम्ही प्रिन्सिपल असताना सगळं एकदम कडक होतं. तसं नाही आता.'

'बरं. माझी एक विनंती होती.'

'आणखी एक चहा? आणते. वेलदोडा घालू ना?'

'कसं कळतं गं तुला माझ्या मनातले?'

'बाबा, मुलगी आहे मी तुमची. सगळे म्हणतात मी फक्त तुमच्यासारखी दिसते असे नाही तर माझे वागणे, बोलणे, विचार करणे सुद्धा अगदी तुमच्या सारखेच आहे.'

'लहानपणी तर बेबी आत्या, ऋजुता मावशी सगळे म्हणायचे की तू तुझ्या आई सारखी दिसतेस म्हणून.'

'तुम्हीच मुद्दाम त्यांना तसे म्हणायला लावायचा. मला चिडवायला.'

मी हसलो. आम्हा दोघातलं साम्य कुणालाही लक्षात यावं इतकं. जणू माझाच चेहरा तिच्या चेहऱ्यावर कॉपी पेस्ट केला होता. पितृ मुखी सदा सुखी. माझ्या आणि निवातले साम्य केवळ दिसण्या पुरतेच नव्हते. तर आमचे स्वभाव, आवडी निवडी सगळं अगदी सारखेच. ती लहान असताना आम्ही कुठल्याही कार्यक्रमाला गेलो की सगळे म्हणायचे, 'सर, तुमच्या सारखीच दिसते.' मी ही मग त्यांना मुद्दाम म्हणायचो. एकदा तिला म्हणा की तू तुझ्या आई सारखी दिसतेस म्हणून. आणि कोणी जर असे म्हणाले तर ती थोड्या चढ्या आवाजात म्हणायची की, 'नाही. मी माझ्या बाबांसारखी दिसते.'

लहानपणी तर सगळे माझ्या सारखेच हवे असायचे तिला. माझ्या सारखे कप्प्याचे ताट, ग्लास, फोन, लॅपटॉप इतकेच काय आम्ही तिरुपतीला गेल्यावेळी मी जेव्हा लुंगी गुंडाळली, तेव्हा बाईसाहेबांनी सुद्धा एक पंचा गुंडाळला.

ती अगदी छोटी असल्यापासून आमची गट्टी जमली होती. मला आठवते आहे. ती फक्त दोन महिन्यांची होती तेव्हा. मध्यरात्री कधी तरी मला जाग आली. मी उठून पहिले तर पाळण्यात निवा सुद्धा जागी. तिला अलगद पाळण्यातून मी बाहेर काढले. तिला घेऊन बाहेरच्या खोलीत आलो. किती तरी वेळ वेगवेगळी तोंडे करून तिच्याशी खेळत राहिलो. ती ही हात उंचावून, हुं हुं आवाज काढत प्रतिसाद देत राहिली. तिची नजर ठरू लागली तशी ती माझ्याकडे एक टक बघत असे. मी जर खोलीच्या एका टोकातून दुसरीकडे गेलो, तर तिची नजर एखाद्या कॅमेऱ्याप्रमाणे माझा पाठलाग करत असे. आणि हे फक्त माझ्याच बाबतीत बरं का! मी तिचा जिगरी दोस्त आहे हे तिने तेव्हाच ठरवले होते. ती थोडी मोठी झाल्यावर आम्ही दोघे डोंगर पालथे घालायचो, नदीत डुंबायचो. आईशी, प्रणिताशी मात्र तिचा छत्तीसचा आकडा. तिही फिस्कारायची हिच्यावर, मग ही पण ओरडायची तिच्या अंगावर. मग आईच्या हातचा मार. मला कधीही मुलांवर हात उचलणे पसंत नव्हते. मग कळत नकळत आमच्या घरात दोन पक्ष होत गेले. एक माझा आणि निवाचा, तर दुसरा प्रणिताचा.

'मुली या वडिलांच्याच असतात.' बेबी, माझी बहिण मागे म्हणाली होती. तिला दोन्ही मुलीच. दोघींची लग्ने झालेली. त्यांनाही मुले झालेली. 'पण अजूनही काहीही सांगायचं असलं की आधी बाबांना सांगणार.' बेबी मोठ्या कौतुकाने म्हणाली होती.

'काय झालं बाबा. काय एवढा विचार करताय?' निवाने चहाचा कप समोर ठेवत विचारले आणि माझी तंद्री भंगली.

खरंतर मागच्या काही दिवसात आमच्या दोघांच्याही आयुष्यात प्रचंड उलथापालथ झाली होती. पण दोघेही एकमेकांकडे पाहत सगळं नॉर्मल असल्या सारखे वागत होते.

'तुला आठवते एकदा लहान असताना तुझे आणि आईचे काही तरी वाजले. तू माझ्या जवळ आलीस आणि मला म्हणालीस, तुम्ही माझ्यापासून एक राज की बात लपवून ठेवली आहे. आई माझी खरी आई नाही. ऋजुता मावशीच माझी आई आहे.' तुझी भाषा ऐकून हसू आले मला. हसू कसे बसे दाबत मी म्हणालो 'नाही गं, सख्खीच आहे, तर तू मला म्हणालीस नाही. तुम्ही मरताना हा राज मला सांगणार होतात. हिंदी सिनेमाचा हँगओव्हर. किती सिनेमे बघायचीस त्या वेळी.'

'हल्ली तसे सिनेमे बनतच नाहीत. आय मिस देम. ऋजुता मावशीही म्हणत होती. ही मल्टिप्लेक्स फारच चकाचक असतात. डिजिटल ट्रान्समिशन बघताना तर आपण थिएटर मध्ये नाही तर घरीच बसून सिनेमा बघतो आहे असे वाटते. सगळी मजा निघून गेली.'

'बरं ऋजुताचा विषय काढलास. आज ऋजुताचा वाढदिवस. फोन करायला हवा तिला. आता तिकडे अमेरिकेत रात्र झाली असेल ना? पण मग अमेरिकेत तिचा वाढदिवस हा आज की उद्या?' मी म्हणालो.

'उद्याच असणार तिथे. पण उद्या आपल्या इथे नसणार ना. आपण आपलं आपल्या तारखेप्रमाणे शुभेच्छा द्यायच्या. मी सकाळीच तिला मेसेज केला आहे.'

'बाबा, एक विचारू?'

'विचार की. तू कधी पासून परवानग्या घ्यायला लागलीस. अगदी करदावतेस सुद्धा कधी कधी माझ्यावर, खाष्ट सासू सारखी.'

'मग, आता या वयात तुम्ही माझी जबाबदारी आहात. मी नाही तर कोण काळजी घेणार तुमची? लहान मुलांना जसे आई वडील त्यांच्या भल्यासाठी रागावतात, तसेच मी ही तुम्हाला रागावते. एका वयानंतर मुलेच आई बाबांचे आई बाबा होतात तसे झाले आहे माझे.'

'हं! तू काही तरी विचारत होतीस.'

'तुम्हाला आईच्या आधी ऋजुता मावशीचे स्थळ आले होते आणि तुम्ही ते चक्क नाकारले होते म्हणे.'

'तुला कोण ह्या असल्या सगळ्या गोष्टी सांगतं गं?'

'सांगणारं कोणी का असेना. खरं का खोटं ते सांगा.'

'तू आधी तुझा सोर्स ऑफ इन्फोर्मेशन सांग.'

'सोर्स अगदी पक्का आहे माझा.'

'कळले. ऋजुता. एवढे वय झाले तरी काय बोलावे आणि काय नाही ते कळत नाही तिला.'

'असं काही नाही. अगदी मनमोकळी आहे ती. निष्पाप ही. सांगा ना, इतक्या छान मुलीला तुम्ही का नापसंत केले.'

'नापसंत वगैरे काही नाही गं. तेव्हा मी नुकताच, नोकरीला लागलेलो. नवी नोकरी, पगारही बेताचा. म्हणून जेव्हा कोणी तरी तिचे स्थळ घेऊन

आले तेव्हा मी नाही म्हणून सांगितले. ते ऋजुताचे होते हे सुद्धा मला लग्नानंतर काही वर्षांनी समजले, माझ्या.'

'काय सांगता?'

'हो मग. ज्या गावाला आपल्याला जायचेच नाही त्या गावाची चौकशी कशाला करा.'

'पण, तिला तुम्ही जाम आवडता, अजूनही.'

'आता हे जरा अती होते आहे.'

'एखादी व्यक्ती आवडणे हा काय गुन्हा आहे का?'

'हे वाक्यही तिचेच असणार. अशी पुस्तकी आणि फिलोसोफिकल वाक्ये केवळ ऋजुताच बोलू शकते.'

'किती चांगले ओळखता हो तुम्ही तिला. खरंच जर का तुमचं आणि तिचं लग्न झाले असते तर काय मजा आली असती. मावशी माझी आई झाली असती.'

'आणखी एक सांगू का?' चहाचा घोट घेत मी म्हणालो, 'तुझ्या हातच्या चहाला ऋजुताची चव आहे.'

'अहो मी चौथीत असताना तिच्याकडे सुट्टीत गेले होते तेव्हा तिनेच मला शिकवले चहा करायला. मी निघते कॉलेजला. दूध गार झाले की फ्रीज मध्ये ठेवा.' निवा म्हणाली.

निवाला टाटा करून तिच्या लाल स्कुटी वरून जाणाऱ्या छबी कडे मी काही काळ निरुद्देशपणे पाहत राहिलो. आपल्याला हवे ते मिळाले म्हणजे सुख असते हे खरे. पण म्हणून काही आपल्याला हवे ते मिळाले नाही म्हणून दुःखच असते असे नाही. सुख आणि दुःख याच्या अधलं मधलं काही तरी असतेच की! बहुतांश लोकांचे प्रारब्ध असेच अधलं मधलंच असते की. पण खरंच ऋजुताशी लग्न झाले असते तर आयुष्य वेगळे असते का?

प्रणिता आणि ऋजुता दोघी सख्ख्या बहिणी. पण दोघींचे स्वभाव दोन टोकांचे. ऋजुता हौशी, तर प्रणिताला बाहेर जायचे असेल तर कपडे बदलायचाही कंटाळा. कशात म्हणून रस नाही तिला. मला आश्चर्य वाटायचे असे माणूस कसे असू शकते याचा. आता या वयात आल्यावर आठवते की माणसं सगळ्या प्रकारची असतात, आणि त्यात चूक आणि बरोबर, चांगली आणि वाईट अशी विभागणी नसते. पण तरुण वयात प्रणिताने बदलावे असे वाटायचे.

निवा दोन वर्षाची होती तोवर ऋजुता आमच्याच गावात राहायची. ती यायची आमच्या बरोबर सगळीकडे. म्हणजे मी, निवा आणि ऋजुता असे बागेत, सिनेमाला, हॉटेलात जायचो. प्रणिताला कितीही ये म्हटले तर ती यायचीच नाही. मग त्याचीही सवय झाली. ऋतुजाचा नवरा तेव्हा अमेरिकेत नुकताच गेला होता. त्यामुळे तिही तशी मोकळीच. मग वर्षभराने ती ही गेली तिकडे अमेरिकेला. मग आम्ही दोघंच जाऊ लागलो सगळीकडे. पण एकदा प्रणिता आमच्या सोबत आली होती, फक्त एकदाच.

मी आत गेलो. पेपरचा अजून पत्ता नव्हता. टीव्ही, मोबाईल मला पहावासाच वाटत नाही. माझ्या खोलीत गेलो. जुन्या डायऱ्या काढल्या. सहज एक पान उघडलं आणि वाचू लागलो.

१९ फेब्रुवारी १९९८

हर्नियाचे ऑपरेशन झाल्यामुळे गेले सोळा दिवस मी घरीच. आज गावची जत्रा.

'सगळे चालले आहेत जत्रेला.' निवा म्हणाली.

'आपणही जाऊ.' मी म्हणालो.

'पण तुझा हर्निया.' 'हळू गाडी चालवू.'

'नकोच. ' 'अगं, जाऊ. उद्या पासून ऑफिसलाही जाणार आहे. '

'फोर व्हीलर.'

'नाही. टू व्हीलर. फोर व्हीलर नाही चालवायची अजून काही दिवस. आजी घरी थांबेल. आपण तिघे जाऊ.'

शहरात मॉल मध्ये कायमच चकचकीत जत्रा. ती तिने पाहिलेली. गावची जत्रा चकचकीत नाही, पण जास्त रंगीत, जास्त रसरशीत. कळत्या वयातली तिची ही पहिलीच जत्रा. अख्ख्या आयुष्यात आकाश पाळण्यात बसली नव्हती त्यामुळे त्यात बसण्याची उत्सुकताही.

'तू ही बस.' म्हणाली.

'आताच ऑपरेशन झाले आहे. नको. आई बसेल तुझ्या बरोबर.' मी म्हणालो.

निवाचा पाळणा वर गेला. मी खाली राहिलेलो. ती मला वरून टाटा करत होती. मी हात हलवला. मला जास्त वेळ राहवत नव्हते. पण बसायला कुठेच जागा नाही. आयुष्याच्या जत्रेत माझा पाळणा आता सगळ्यात उंच होता. इथून आता उतरणीला लागणार. निवाचा पाळणा आता कुठे वर जायला लागला होता. आईचा पाळणा वरून खाली यायला लागला होता म्हणून ती घरी. आणखी वीस वर्षांनी मी घरी बसेन, निवा तिच्या मुलांना जत्रेत घेऊन येईल.

आकाश पाळण्या नंतर मग मेरी गो राउंड, मग जम्पिंग. तिचे मन भरेना आणि मला उभे राहवेना.

मग बर्फाचा गोळा. आयुष्यात आईस्क्रीम तिने अनेक वेळा खाल्ले होते पण गोळा पहिल्यांदाच. कर्कश आवाजाचा भोंगा. तिच्या जीवन अनुभवाची सुरुवात होती आणि मी तिला जे जे हवे होते ते सगळे घेऊन देत होतो.

'हे असलं कशाला घेऊन द्यायचे. आधीच मला आताशा कमी ऐकू येते.' आई घरी आल्यावर म्हणाली.

'सगळं नवीन आहे तिच्यासाठी. तुझं संपत आलंय, माझं आता आटत जाणार आहे, पण तिची तर सुरुवात आहे. जगण्याचा रसरशीत अनुभवच महत्वाचा असतो. सोनं चांदी किती घातले अंगावर हे नाही आठवणार तिला मोठे झाल्यावर. पण ह्या छोट्या छोट्या आठवणी तिला आयुष्यभर पुरतील. शिवाय मी आहे तोवर सगळी गम्मत. लहानपण आई वडील जिवंत असे पर्यंतच तर असते.'

डोळ्यात टचकन पाणी उभे राहिले. मी डायरी बंद केली. उठलो. किचन मध्ये गेलो दूध फ्रीजमध्ये ठेवले. एव्हाने पेपर आलेला. मी बाहेर जाऊन तो आत आणला. पण आता मला तो वाचवा वाटेना.

वयाप्रमाणे कुणाचा पाळणा वर जाणार आणि कुणाचा खाली येणार

असे आपण ठरवले तरी त्याची दोरी मात्र परमेश्वराच्या हातात असते. एक वर्षापूर्वी प्रणिता अचानक या जगातून गेली, आणि समीर निवाच्या आयुष्यातून. समीर निवाचा बॉय फ्रेंड.

लहानपणी कधी निवाच्या लग्नाचा किंवा तिच्या मुलांचा विषय निघाला की निवा म्हणायची, 'मी लग्नच करणार नाही.' असेच एकदा ती तसे म्हणाली, तेव्हा तिची आजी, प्रणिताची आई, म्हणाली होती, 'आता असे म्हणते आहेस, मोठी झाल्यावर भांडशील बाबांशी की मला याच माणसाची लग्न करायचे आहे.' तेव्हा मला त्यांचे बोलणे अजिबात आवडले नाही. त्या नेहमी असेच काहीसे बोलायच्या. त्यामुळे मी त्याकडे दुर्लक्ष करायचे ठरवले तरी, ती गोष्ट आत कुठे तरी राहिलीच माझ्या.

डोक्यावरची झुल्पे कपाळावर आलेली, चेहरा मुरुमांच्या खड्ड्यांनी भरलेला समीर मला भेटायला आला तेव्हा मला अजिबात आवडला नाही. अर्थात त्यासाठी त्याचे दिसणे हे कारण नव्हतेच. इंजिनीअर झालेल्या समीरला नोकरी करायची नव्हती. त्याला स्वतःचे काही तरी करायचे होते. तीन वर्षात त्याची तीन स्टार्ट अप फेल गेली होती. कर्जाचा डोंगर झाला होता. अगदी राहत्या घरावर सुद्धा कर्ज होते. निदान सगळी कर्जे फिटेस्तोवर तरी नोकरी कर असे सांगितले तरी त्याला पटत नव्हते. निवा तिचा सगळा पगार त्याच्या स्टार्ट अप साठी त्याला अगदी दर महिन्याला न चुकता देत होती, तेही लग्न व्हायच्या अगोदर. समोर दरी आहे हे माहीत असतानाही कोणता बाप आपल्या मुलीला त्यात ढकलेल? 'त्याच्यात स्पार्क आहे. त्याचा स्टार्ट अप यशस्वी झाल्यावर, त्याच्याकडे पैशांच्या राशी आल्यावर काय तो माझ्याकडून पैसे घेणार आहे? त्याला गरज आहे तेव्हा दिले तर त्याची किंमत' हा निवाचा युक्तिवाद.

निवाचा मित्र म्हणून तो घरी येत राहिला, आणि कधी माझा मित्र झाला हे मलाही कळाले नाही. त्याच्या स्टार्ट अप ला माझा अजूनही विरोध होता. पण माणूस म्हणून तो अतिशय सच्चा होता. बोलताना हातचं राखून न ठेवणारा, वेळेला सगळ्यात आधी धावून येणारा आणि मुख्य म्हणजे निर्व्यसनी. मनात आलं, अगदी याचा स्टार्ट अप फेल जरी झाला तरी दोघे उपाशी तरी राहणार नाहीत. निवाची चांगली पक्की नोकरी आहे. मुलगा काही वाईट नाही.

अजून दोन वर्षे तरी लग्न करायचे नाही यावर दोघे ठाम होते. बरोबरच होतं. समीर स्थिरस्थावर कुठे होता? सगळं तसं छानच चाललं होतं, पण मग दोघांत काय बिनसलं देव जाणे! तरुण वयात असे खटके उडतातच असे समजून मी जरा दुर्लक्ष केले, त्यात पडायचे नाही असे ठरवले. समीरशी ब्रेकअप करणं हा खरं तर सर्वस्वी निवाचा निर्णय होता. नेमके दोघांत काय बिनसलं ते त्या दोघांनाच माहीत. थोड्या दिवसात दिलजमाई होईल म्हणून मी शांत बसलो. पण मग फारच ताणले जाते आहे हे जाणवल्यावर मी मध्यस्थी करायचा अयशस्वी प्रयत्न केला.

'नियतीचा खेळ बघा बाबा. ज्यावेळी मला तो हवा होता तेव्हा तुम्हाला तो अजिबात आवडत नव्हता. आणि आता मला तो सावलीलाही नको आहे तर तुम्ही जुळवून घ्या म्हणता. पण बाबा, मी काही तरी विचार करूनच निर्णय घेतला असेल ना? तुमचा माझ्यावर विश्वास नाही का?' निवा म्हणाली.

परवा समीर दिसला होता मॉल मध्ये. मला बघून लांबून कसनुसं हसला. दोन माणसांचे नाते तुटले, की त्यांच्या मुळे जुळून आलेली इतर नातीही तुटतात का? तुटली नाहीच तरी अवघड होतात, अवघडून जातात हेच खरं.

मी समीरला हात केला. तो स्वतःहून बोलला नाही तरी मी त्याच्याशी बोलायचे ठरवले. त्याच्याशी बोलायला मी त्याच्या दिशेन निघालो. तेवढ्यात निवा मला दाखवायला काही तरी घेऊन आली. कदाचित त्याने तिला पाहिले असावे. म्हणूनच तो निघून गेला तिथून. एकेकाळी जीव का प्राण असलेल्या माणसांना एकदम अनोळखीही होता येत नाही.

सिंधुबाई स्वैपाकाला आल्या. मी पुन्हा माझ्या टेबलपाशी जाऊन बसलो. विसरायच्या आत ऋजुताला फोन केला वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या. मग तिने निवाची चौकशी केली. आई नसलेल्या भाच्चीवर मुले नसलेल्या मावशीचा भलताच जीव होता. ओघाने समीरचाही विषय निघालाच. 'बरं झालं लग्ना अगोदरच हे सगळं झालं. लग्नानंतर सगळ्या गोष्टी किती अवघड होऊन जातात.' ऋजुता मला म्हणाली.

काय चूक, काय बरोबर हे इतक्या सहजपणे ठरवता येते माणसाला? प्रत्येक निर्णयाचा एक भला बुरा साईड इफेक्ट असतोच की! मलाही कधी कधी प्रणिताशी लग्न करण्याचा निर्णय चुकीचा होता असं वाटतं, तेही इतक्या वर्षानंतर, ती गेल्यानंतर. पण मग निवा कशी झाली असती? समजा माझं आणखी कुणा दुसरीशी लग्न झालं असतं तर काय खात्री की माझं तिच्याशी पटलं असतं? काय खात्री की आम्हाला मुलबाळ झाले असते आणि त्याच्याशी माझे निवा प्रमाणेच भाव बंध निर्माण झाले असते?

मग समीरशी लग्न करून निवा सुखी झालीच नसती हे कशावरून? आणखी कुणाशी लग्न करून ती दुःखी होणार नाही हे कशावरून? अधलं मधलं म्हणजे सुख नसले तरी समाधान नसते हे कशावरून?

फोन वाजला. निवाचाच होता.

'बाबा दूध आत ठेवलेत का? बरं, सिंधूबाई आल्या की त्यांना सांगा रात्रीचा स्वैपाक करू नका. आज ऋजुता मावशीचा वाढदिवस आहे आपण बाहेर जेवायला जाऊन सेलीब्रेट करू.'

'तिच्या अनुपस्थितीत?'

'आता ती इथे आहे का बाबा? पण म्हणून काय आपण तिचा वाढदिवस नाही साजरा करायचा? ती तिचं प्रत्यक्षात इथे असणं-नसणं या पेक्षा आपल्या आयुष्यात तिला असलेलं महत्वाचं स्थान जास्त महत्वाचे. सो इट कॉल्स फॉर सिलेब्रेशन. कशाला महत्व द्यायचे ते आपण ठरवायला हवं.'

'खरं आहे.' मी म्हणालो. बोलून झाल्यावर फोन ठेवला. चालू वर्षाची डायरी उघडली आणि आजचा जीवनानुभव लिहू लागलो. माझी लेक मला नेहमी काही तरी नवीन शिकवत असते.

***

पादत्राणे

– जयंत वि. देशपांडे

चप्पल दुकानांनी ही आता कात टाकली आहे. आकर्षक नेमबोर्ड, उंच आकाराची एक चप्पल दुकानाभोवती लटकवणे. गिऱ्हाईकास पसंत पडतील व सहज दिसतील अशा पद्धतीने चपलांची, बुटांची वर्गवारी करून शोकेस मध्ये केलेली असते. चप्पलमध्ये ही नवीन, नवीन व्हरायटी पहावयास मिळतात. निरनिराळ्या ब्रँड नेम चपला बूटची उत्पादने आहेत. अन ब्रँडेड खरेदी करणाऱ्याची संख्या ही खूप आहे. बाटा, अगाकर, पॅरेगॉन, कोल्हापुरी चप्पल इ. कंपन्या पादत्राणांमध्ये नाव कमविलेले आहे. भावामध्ये व कंपनीमध्ये जरी तफावत असली तरी चोखंदळ मंडळी हौसेने खरेदी करतात.



मंडळी आपल्या चपला कधी चोरीला गेल्या असतील. नसल्या गेल्यातर आपण भाग्यवान आहोत असे समजा.

मी कबूल करतो, मी भाग्यवान नाही. एकदा मी दत्तमंदिरातून दर्शन घेऊन बाहेर पडत होतो. परत येताना पाहिले तर माझ्या नव्या कोऱ्या चप्पल (जेमतेम आठ दिवस वापर केलेल्या) गायब झाल्याचे दिसले. इकडे तिकडे पाहिले. थोडा वेळ वाट पाहिली पण चप्पल मिळाल्या नाहीत.

माझ्या सोबत माझे मित्र प्रभाकर लिमये होते त्यांनी मला धीर

दिला- अहो चप्पल गेल्या म्हणजे काहीतरी कीटाळ, पीडा गेली. आता पुढे चांगले काहीतरी घडेल.

लिमयांच्या ह्या विचारांनी चप्पल चोरीला जाणे म्हणजे शुभ संकेत आहे, फारसे दु:ख करण्याचे कारण नाही. खरतर हे पहिल्यांदाच मम पामराला समजले.

भगवान श्रीकृष्ण वृदांवनामध्ये रहात होते. त्यांचे वय ५ वर्षे होते. वनामध्ये ते अनवाणी फिरत. त्यावेळी यशोदाताई कन्हैयाला समजावत असे. अनवाणी जंगलात फिरण्याने पायाला काटे रुततील, जखम होईल, त्यापेक्षा जोडे घालून जा.

गाईच्या सेवेकरिता मी जन्म घेतलेला आहे. गाईंच्या पायात जर काही नाही तर माझ्या पायात मी कसे जोडे घालू? - कन्हैया.

विनोबांनी घर सोडले त्यावेळी त्यांनी आजन्म ब्रह्मचारी रहाणार हे व्रत घेतलेले होते, निश्चय केला होता. ब्रह्मविद्येचा अभ्यास करावयाचा ह्या करिता त्यांनी तीन गोष्टीचा त्याग केला होता. गोड व मसाल्याचे चमचमीत पदार्थ न खाणे, जमिनीवर झोपणे व अनवाणी चालणे. हे व्रत जन्मभर पाळले.

मंडळी, आपण अनवाणी चाललो तर लोक काय म्हणतील? ते आपल्याला पाहून हसतील हा विचार प्रथम मनात येतो. अन् त्यामुळे आपण अनवाणी चालत नाही.

अनवाणी फिरल्याने होणाऱ्या वेदना, दु:ख जे अनुभवतात त्याच्याकरिता सलाम करणे आपल्या हातात आहे.

चप्पल चोरीला गेल्या व सापडल्या हे आजपर्यंत मी ऐकलेले नाही. बरोबर आहे नां!

पण नियमाला अपवाद असतो. खरतर संताची परीक्षा कोणी घेऊ नये. तथापि हरी कान्होबा नावाचे मुंबई निवासी गृहस्थ आपल्या मित्रासोबत शिर्डी येथे येण्यास निघाले. कोपरगाव येथे उतरले. गोदावरीत स्नान केले. अन कोपरगाव शिर्डी टांग्याने प्रवास केला. आता साईबाबांचे दर्शन घ्यायचे म्हणून हात पाय धुतले. मशिदीजवळ बाबा असल्याचे समजले. त्यांना वंदन करावे, लोटांगण घालावे हा विचार आला. पण पायात नवी कोरी पादत्राणे होती. ती कोठे ठेवावीत हा प्रश्न?

दर्शनाची उत्सुकता होती त्यामुळे पादत्राणे कोपऱ्यामध्ये ठेऊन मशिदीमध्ये दर्शनास गेले. साईंना नमस्कार केला. उदीप्रसाद घेतला व निघाले.

बाहेर पहातात तो पादत्राणे गायब. शोधाशोध केली पण काहीच पत्ता लागेना. गर्दीही खूप होती. ते बैचेन झाले. पादत्राणाखेरीज दुसरा कोणता ही विचारही मनात येत नव्हता. तथापि वाड्यावर तर जावयाचे होते. तसेच अनवाणी वाड्यावर आले. तेथे स्नान केले. पूजा, नैवेद्य करून पंक्तीस बसून प्रसादाचा आस्वाद घेतला. हात धुण्याकरिता बाहेर आले. परंतु हौसेने खरेदी केलेली पादत्राणे गायब झाली ह्याचे दु:ख व बेचैनी होती.

एवढ्यात एक चमत्कार घडला. एक मुलगा एका काठीच्या टोकावर हरीभाऊची पादत्राणे घेऊन ओरडत होता 'हरी का बेटा, जरी का फेटा' ती ओरड ऐकून हरी भाऊ धावत आले पहातात तो आपल्याच चपला.

या कुठे सापडल्या? मुलाला हरीभाऊने विचारले.

बाबांनी मला आज्ञा केली म्हणून मी घेऊन आलो आहे. पण खुण पटवून मी देणार आहे.

जो हरीचा बेटा असेल व ज्याच्याकडे जरीचा फेटा असेल त्यालाच मी देणार - मुलगा.

हरीभाऊनी खुणा पटविल्या - अरे मी हरी, माझे वडील कान्होबा, अन् हा जरीचा फेटा. मुलाची खात्री झाली. चप्पल हरीभाऊंना मिळाल्या. हरीभाऊला साहजिकच आनंद झाला.

हरीभाऊच्या मनात हा काहीतरी चमत्कार आहे. कारण हरी माझे नाव हे बाबांना कसे माहित? मी तर पहिल्यांदाच शिर्डी येथे येत आहे. तथापि हरी का बेटा म्हणत होता ते कोडे उलगडले.

साईंचा मोठेपणा त्यांना समजला. स्नेही, सोबती सांगत होते तो साईचा महिमा समजला. स्वत:च्या अनुभवामुळे बाबांच्या बद्दल आदर निर्माण झाला. धन्य ते 'साई' म्हणून वंदन करून हरीभाऊ व त्यांचे स्नेही परत निघाले.

सर्वसाधारणपणे चपलांची चोरी ही मंदिरे, मंगलकार्यालये येथे होतात. चप्पल चोरणारी ही एक जमात आहे. त्यामुळे त्यांना 'चप्पलचोर' म्हटले जाते. 'चप्पलचोर' कंपनी ही हुषार मंडळी. काही मिनिटाचे आत चप्पल गायब करतात. काही वेळेस एकच चप्पल लांबविणे, एक चप्पल दूरवर पायाने फेकणे ही त्यांची खासियत आहे. धंद्याचे कसब आहे. एक चप्पल कोणी नेत नाही ना ही खात्री करून मी दुसरी राहिलेली चप्पलवर झडप घालणे ही या मंडळीची खासियत. ही मंडळी देवास नमस्कार करून आपले कार्यसिद्धीस जावो ही प्रार्थना तर करत नसतील ना?

पण चप्पल हरविल्यानंतर होणारा मनस्ताप काही शब्दात वर्णन करता येत नाही. तद्करिता काही मंडळी चप्पल जागेवर काढून बाहेरून दर्शन घेतात.

माझे स्नेही साठे म्हणतात- काही लोक दर्शनास येतात तर काही चपला चोरण्यास येतात.

देवादारी चप्पलचोराचा सुळसुळाट अधिक असतो. कारण आपल्या मापाची, शक्यतो नवी कोरी चप्पल मिळावी हा त्यामागे उद्देश असतो. चप्पलचोर कधीही चप्पल खरेदी करत नाही म्हणतात ते ही पटते.

गर्दीचे ठिकाणी चपलांची अदलाबदल होऊ शकते. दुसऱ्याच्या जुन्या चपला आपणास मिळणे व आपल्या बऱ्यापैकी नव्या चपला दुसऱ्यास मिळणे हे आपल्यापैकी काहीनी अनुभवलेले असते. तथापि अनवाणी चालावे लागू नये म्हणून तात्पुरत्या वापराव्या लागतात. तथापि त्या कंर्फट वाटत नसल्यामुळे लौकरच नवीन जोड खरेदी करावा लागतो.

शू मार्टवाले ही हुषारीने मंदिराच्या अवतीभोवती दुकाने का थाटतात ह्याचे उत्तर लगेचच मिळते.

'ग्राहकांची सेवा ही ईश्वरसेवा' हे ब्रीद वाक्य त्यामुळेच तयार झाले असावे. ग्राहक अनवाणी हिंडू नये ही भावना दुकानदाराच्या मनात असते व त्याकरिता रोख पैसे घेऊन पायात जोडे घालण्याची सेवा ही मंडळी करतात.

काही देवस्थानांमध्ये चपला, बूट आपल्या जबाबदारीवर ठेवावेत हा बोर्ड ही लावलेला असतो. तर काही देवस्थानमध्ये चप्पलाची राखण करणारा सेवक वर्ग, चप्पल स्टँड मधील चपलांची जबाबदारी नाम मात्र भाडे घेऊन करतात. गुरुद्वार, नांदेड, शेगाव शंकर महाराज मठ, वाईचे गणपती मंदिर या ठिकाणी चप्पल स्टँड दिसतील. गुरुद्वार, शेगाव या ठिकाणी मात्र फक्त सेवा म्हणून विना मोबदला चप्पल सांभाळल्या जातात.

पादत्राणाला ही अखेर आयुष्य असते. त्याप्रमाणे वापरामुळे अंगठा तुटणे, बंद, पट्टा तुटणे, तळ झिजणे हे आजार होत असतात. तो आजार बरी करणारी चर्मकार मंडळी मोक्याच्या, वाहतुकीच्या रस्त्यावर कायम स्वरूपी बसलेली असतात.

असाच एकदा मी माझ्या कबडीचुंबक मित्राबरोबर चप्पल दुरूस्ती करता गेलो होतो. त्याच्या स्लिपरचे पट्टे तुटले होते. ते बसवून घ्यावयाचे होते. स्लिपर हातात घेतल्यावर चर्मकाऱ्याने साहेब आता चप्पल नवी घ्या, तळही गेलेला आहे.

तूर्त पट्टे बसव. महिना-पंधरा दिवसानंतर फक्त तळ बदलेन. - मित्र

चर्मकाऱ्यास व मला हसू येत होते पण हसू आवरत आम्ही तेथून पळ काढला. चर्मकाऱ्यास असे तळ बदलून घेणारे गिऱ्हाईक परत आपल्याकडे येऊ नये असेच वाटले असेल नां? त्यांच्याकडे नुसता तळ कसा मिळेल?

सध्या जाहिरातीचे युग आहे, लोकांना आकर्षित करण्याचे.

'पादत्राणांमध्ये त्राण आणणारे एकमेव दुकान' ही जाहिरात मी वाचलेली आठवते. ह्या जाहिरातीमुळे लोकांची दुरुस्तीची कामे येथे अधिक होत होती. कारण दुकान हे कायम त्याच जागेवर होते. त्यामुळे शोधाशोध करण्याचा प्रश्नच नव्हता.

चप्पल दुकानांनी ही आता कात टाकली आहे. आकर्षक नेमबोर्ड, उंच आकाराची एक चप्पल दुकानाभोवती लटकवणे. गिऱ्हाईकास पसंत पडतील व सहज दिसतील अशा पद्धतीने चपलांची, बुटांची वर्गवारी करून शोकेस मध्ये केलेली असते. चप्पलमध्ये ही नवीन, नवीन व्हरायटी पहावयास मिळतात. निरनिराळ्या ब्रँड नेम चपला बूटची उत्पादने आहेत. अन ब्रँडेड खरेदी करणाऱ्याची संख्या ही खूप आहे. बाटा, अगाकर, पॅरेगॉन, कोल्हापुरी चप्पल इ. कंपन्या पादत्राणांमध्ये नाव कमविलेले आहे. भावामध्ये व कंपनीमध्ये जरी तफावत असली तरी चोखंदळ मंडळी हौसेने खरेदी करतात.

आता पूर्वी सारखे एकच चपला जोड असणारी मंडळी कमी आहेत. घरात वापरावयाच्या 'सपाता' ऑफिसमध्ये घालून जाण्याकरिता वेगळ्या चप्पल, फिरावयास व कार्यक्रम स्थळी जाण्याकरिता बूट, ट्रेकिंग करिता, रनिंग करिता, मॉर्निंग वॉक करता वेगवेगळी पादत्राणे, बूट असतात.

स्त्रीयांचा व पादत्राणांचा फार घनिष्ट संबंध आहे. फॅशनेबल दुनियामध्ये वावरावयाचे म्हणजे मॅचिंग कपडे, कानातील, बांगड्या ह्याच बरोबर पादत्राणे ही लागतात. तद्करिता निरनिराळ्या डिझाईनच्या रंगाच्या उंचीच्या, फ्लॅट अशा पद्धतीची मागणी अधिक वाढत आहे. आता निरनिराळ्या मॉलमध्ये ही आपणास पादत्राणांची शोरुम पहावयास मिळतात. कारण कपडे खरेदी नंतरचा दुसरा क्रम चप्पलचा असतो. हातात बऱ्यापैकी पैसा असणारी वा नोकरदार मंडळी आवर्जून जाऊन मॉलमध्ये खरेदी करतात. चोखंदळ चिकित्सक गिऱ्हाईक पटविणे हे एक कसब आहे. त्याकरिता संयम, चिकाटी गुणांची आवश्यकता सेल्समनकडे असते. त्यामुळे निरनिराळ्या व्हरायटी दाखवून गिऱ्हाईक पटवावे लागते. खर तर सेल्समनचे काम काही साधे नाही. म्हणतात ना 'जावे त्यांचा वंशा तेव्हांच कळे.'

आता नवरदेव व वधू मंडळीचा वेगळा वर्ग आहे. लग्न ही एकदाच होणारी घटना असल्यामुळे भारी पैकी चप्पल, बूट पाहिजे नां! त्यामुळे खरेदी करताना दुसऱ्याचे अनुकरण, स्वत:ची पसंती, आपणास शोभून दिसेल कां? कपड्यावर मॅच होईल कां? ह्या बाबींचा बारकाईने विचार करून खरेदी केली जाते. तद्करिता आपल्या सोबत मित्र-मैत्रिणींना बरोबर घेऊन जाणे, पसंत पडेपर्यंत चार पाच दुकाने पालथी घालणे इ. सोपस्कार करतात. वरातीचे वेळी, घोड्यावर बसून देवाला जाताना बूट वा चप्पल वेगळ्या खरेदी केल्या जातात. सलवार कमीज वर घालण्याकरिता मोजडे, हटकून घेतले जातात. बूट का सारखा घालता येणार कां? तर मग एक दोन चप्पलच जोडही खरेदी केले जातात. नवीन सपाता ही त्याबरोबर घरी येतात. मोज्याचे निरनिराळ्या रंगाचे जोडही खरेदी केले जातात. थोडक्यात पादत्राणे खरेदी ही होलसेलमध्ये होते.

वधूचा थाट-पाट काही औरच असतो. लग्नप्रसंगी आपल्याकडे साऱ्यांचे लक्ष असणार म्हणजे आकर्षक रंगाच्या डिझाईनच्या चप्पल नकोत कां? लग्नाशिवाय बाहेर फिरावयास जाण्याकरिता निरनिराळ्या साड्यांच्या रंगाप्रमाणे मॅचिंग असणाऱ्या चप्पलची खरेदी केली जाते. त्याकरिता मैत्रिणी, मावश्या सोबत असतात. आता चप्पल खरेदी करिता वेळही लागणारच. त्यामुळे वधू चप्पल खरेदीला गेली म्हणजे चार-पाच तास तरी येणार नाही हे गृहीत धरलेले असते.

परवा-परवाची गोष्ट, मी ही मॉलमध्ये गेलेलो होतो. एक वधू बरोबर तीची मैत्रिणी सात ते आठ नव्या साड्या घेऊन आली होती. साडीस मॅचिंग होतील अशा चप्पल घेण्याकरिता. चप्पलच्या दूकानात साड्या घेऊन येणारी वधू-मंडळी बघून मला आश्चर्याचा धक्काच बसला. आता पादत्राणांची दुकाने 'एसी' असल्यामुळे वेळ गेला तरी त्रासही होत नाही हे निश्चितच मान्य करावे लागेल. त्यामुळे बसण्यास ऐसपैस जागा, खरेदी करण्याकरिता लागणारा वेळ व पैसा ह्यांचे गणित अवघड होऊन

बसले आहे. पटते ना माझे म्हणणे!

लग्नाच्या धामधुमीत, तयारीत बच्चे कंपनी ही आपला हट्ट पुरवून घेतात. तर काही वेळेस घरात शुभकार्य आहे ना. मग सर्वांना नव्या चपला नकोत कां?

आज काल लहानमुलांच्या पायांत रंगीत बूट, सँडल, चप्पल दिसतात. मुलाने पाय टाकला की लाईट लागणे, आवाज येणे अशा प्रकारची पादत्राणे बालकांकरिता आहेत.

आता लग्न म्हटले की हा एक आवश्यक असा पादत्राण खरेदीचा सोहळा आहे असे म्हटले तर वावगे ठरू नये.

निरनिराळ्या कार्यालयामध्ये जाऊन चर्मकार मंडळी विविध प्रकारच्या चपला, बूट ह्यांचे अल्बम दाखवित आपले गिऱ्हाईकही पटवत असतात. नोकरी करीत असताना असा एक कर्मचारी आलेला होता. त्याच्या शबनममध्ये काही तयार जोड होते, अल्बम होते, वही होती त्यामध्ये तो घेतलेल्या नवीन ऑडर नोंद करून ॲडव्हान्स रक्कम घेत होता. त्यांच्या जवळ व्हिजिटींग कार्ड ही होते तो लोकांना देत होता.

उत्सुकतेपोटी मी विचारले - असा फिरून धंदा होतो कां?

अहो, साहेब आमची नेहमीची गिऱ्हाईकेच आम्हाला वारंवार बोलवितात. शिवाय आमची पादत्राणे पाहून चौकशी करतात व आम्हांस बोलावून घेतात. आठवड्यातील चार दिवस मी निरनिराळ्या तालुक्या - च्या गावामध्ये जात असतो. गेल्या १५ वर्षापासून माझा हा उद्योग आहे. गावी आठ, दहा कर्मचारी व माझी दोन मुले बूट, चपला बांधून देण्याचे काम करतात. अन् मी डिलेव्हरी देत असतो. आमच्या कडच्या चप्पला व बुटाचे वैशिष्ट्य म्हणजे कोणत्याही हवामानात व्यवस्थित टिकतात. चप्पल १-१।। वर्षे काही न दुरुस्ती करता सहज वापरू शकतात. बुटाचे आयुष्य ३ वर्षांपेक्षा अधिक असते. आम्ही इतरांपेक्षा जास्त दर लावतो हे जरी खरे असले तरी आमच्या सारखी दुसरी कोणाची चप्पल टिकणार नाहीत. तुमचे साहेब, त्यांचे वडील हे नेहमीच आमच्याकडून खरेदी करतात. त्यांनाच विचारा.

हे सर्व ऐकल्यावर मी थक्कच झालो. माझ्या सर्व प्रश्नांची उत्तरे तर मिळाली शिवाय त्याच्या धंद्याचा व्याप ही मोठा असला पाहिजे समजले.

त्याची मॅटेडोअर गाडी खाली उभी होती त्यामध्ये अंदाजे १०० पेक्षा ही अधिक पादत्राणे, बूट होते व ते डिलेव्हरीचे होते. असो मी हे ऑफिसच्या खिडकी मधून पाहिले.

लग्न म्हटले की, चेष्टा, मस्करी, विनोद गाणी असणारच. 'हम आपके है कौन' हा चित्रपट न बघितलेले थोडे लोक असतील. त्यामध्ये नवऱ्याची बूट लपून ठेवला आहे असे एक दृश्य आहे. त्याचे अनुकरण आता आपल्याकडे व्हावयास लागले आहे.

घरामधील सर्वांच्या चप्पल जोड ठेवण्याचा प्रश्न हुषार सुतार मंडळींनी सोडवून टाकला आहे. आपण फर्निचरच्या दुकानात गेला तर आपणास निरनिराळ्या लांबी रुंदीचे, उंचीचे चप्पल स्टँड पहावयास मिळतात. दोन कप्यापासून ते ४-५ कप्यापर्यंत हे असतात. बरं एकदा चप्पल स्टँड खरेदी केला की पुढील काही वर्षे परत खरेदीही करावा लागत नाही. त्याची निगा ती काय असणार?

घरातील मंडळीमध्ये चप्पल ठेवण्याच्या बाबतीत सामंजस्य दिसून येते. प्रत्येकांनी आपापली जागा स्टँडमध्ये रिझर्व केलेली असते. पाहुणे मंडळीत जागा असेल तर आत चप्पल ठेवावयाच्या अन् त्या बाहेरच चप्पल, बूट काढावयाचे हे अलिखित नियमच झाला आहे.

मंदिरामध्ये जसे आपण चपला बाहेर काढतो त्याचप्रमाणे दुकानामध्ये, डॉ.कडे ऑफिसमध्ये चपला बाहेरच काढून ठेवाव्या लागतात. तसा नियमाचा बोर्ड दुकानचे वा इतरत्र लावलेला असतो.

तर मंडळी, चप्पलचे महत्त्व एवढ्यावर थांबत नाही. नवीन घर खरेदी केले की, उजव्या पायाची व डाव्या पायाची दर्शनी बाजूस चप्पल लटकवलेली असते. काही जणाचे मत डाव्या पायांची चप्पलच लावावी, तर काहीच मत उजव्या पायाची. उद्देश काय तर 'दृष्ट लागू नये म्हणून.' कारण कोणाची नजर काय करेल सांगता येत नाही.

कोणास फीट आली तर चप्पल हुंगावयास नाकाजवळ नेतात. मनुष्य शुद्धीवर येतो हे आपण अनुभवलेले असेल.

मारामारीचे वेळीस ही पादत्राणाचा उपयोग होतो. हमरीतुमरीवर भांडण आले की, पाहिलास का पायताण गप्प चालू लागतोस का वाजवू?

चपलांचे बाबतीत एक म्हण आहे. चांभाराच्या देवाला खेटराची पूजा. तसेच चांभाराचे लक्ष पायताणाकडे असेही म्हटले जाते.

भाविक मंडळी नदीवरील पूलावरून जाताना चप्पल हातात घेऊन जाताना मी पाहिलेले वा आपण पाहिलेले असेल.

अशी ही बहुगुणी पादत्राणे ह्यांची काळजी नको का घ्यायला. चप्पल नवी दिसावी म्हणून पॉलिश करून देणारी मुले आपणास रेल्वे, बसस्टँड वरती हमखास भेटतात. त्यांची कीव येऊन म्हणा वा आपली गरज म्हणून आपण पॉलिश करून घेतो. त्यांचे ही पोट आपल्यावर अवलंबून आहे हे जाणवते.

मंडळी लेखणी ठेवण्यापूर्वी आपणास एक आगंतुक सल्ला देतो- आपल्या चपला बूट व्यवस्थित सांभाळा. चप्पलांना बुटांना फार वर्षे ताण न देता दरवर्षी खरेदी करा. खरेदी करण्यास मुहूर्त पाहण्याची आवश्यकता नाही.

***

Prop. Kasturchand Prajapati

Vijay Electrical and Hardware

Asian Paints, PVC Pipe, GI Pipe Fitting, Fancy Brass Hardware Fitting, Building Material & Electrical Goods Etc.

Shop No. 3, Shubhashree Plaza, Ambika Nagar, Kamatwada, Ambad Link Road, CIDCO, Nashik.
Cell. : 9403418326, 8806443284

ती... काळरात्र

– अपूर्वा शिर्के

आबांना तळघरात खूप जुन्या वस्तू आणि एक छोटी पेटी सापडली. त्या पेटीत बरंच सामान आणि कागदं होती. त्यावर काहीतरी विचित्र आकृत्या होत्या आणि त्याखाली काहीतरी लिहिलेलं होतं. पणे ते काय लिहिलेलं हे त्यांना कळत नव्हतं. त्या विचित्र आकृत्या आणि काहीतरी लिहिलेली कागदं यांचे काय रहस्य असेल बरं? आबांना ते कळेल कां?

आबांना जाऊन आज पंधरा दिवस झाले होते. त्यांनी केलेला गावाचा विकास आणि ते करताना सुद्धा घराकडे ही तितक्याच बारकाईने लक्ष होत त्यांच दोन्ही जबाबदाऱ्या लीलया पार पाडल्या होत्या त्यांनी. ''**आबा**'' म्हणजेच विश्वासराव पाटील यांना एकूण दोन अपत्य होती दोन्ही मुलांची लग्न झालेली थोरला मुलगा श्याम हा मुंबईत त्याच्या कुटुंबासह स्थायिक होता. आबांच्या मृत्यूची बातमी ऐकून तो ही गावी आला होता तर धाकटा किसन, हा माई आणि आबांसह त्याच्या कुटुंबासोबत आबांचाच वारसा पुढे चालवत होता. पाटलांच घराणं तसं खूप नामांकित होतं आजूबाजूच्या गावांतही त्यांना मान होता आणि अशातच आबांच्या मृत्युची बातमी कळताच जो तो हळहळत होता तर, काही जण वाड्यावर येऊन माई, श्याम आणि किसनची भेट घेऊन त्यांना सांत्वन देऊन जात होते. सर्व गावाला ठाऊक होतं की आबा कसे गेले होते ती भयाण रात्र आठवली तरी सर्वांच्या अंगावर काटा यायचा. श्यामचा मुलगा विशाल हा अमेरिकेमध्ये शिकायला होता तो ही तीन दिवसापूर्वीच आला होता. त्याला आबा कसे गेले याची कल्पना होती पण सविस्तर असे काहीच माहीत नव्हते घरातला पहिला नातू त्यामुळे आबांचा त्याच्यावर आणि त्याचा आबांवर खूप जीव होता त्याला त्यांचं शेवटचं दर्शन ही घेता आलं नव्हत याची खंत त्याला होतीच पण तो तरी काय करणार तो ही तिथे अमेरिकेत काही कारणास्तव अडकलेला होता.

विशाल माईंच्या खोलीत गेला तेव्हा माई आबांच्या फोटोला न्याहाळत भूतकाळातल्या आठवणीत रमल्या होत्या त्याने दोन वेळा त्यांना आवाज दिल्या तेव्हा त्या भानावर आल्या. ''ये बाळा बस..!'' म्हणत त्यांनी विशालला पलंगावर बसायला सांगितल. ''माई तू ठीक आहेस ना गं?'' विशालने काळजीने विचारलं, ''हो... हो मी ठीक आहे फक्त आबांच्या जुन्या आठवणीत रमले होते'' माई म्हणाल्या. ''एक विचारू का माई?'' त्याने लगेच दुसरा प्रश्न विचारला. माईंना माहीत होतं की आता विशाल काय विचारणार ते, पण त्याला आता टाळता येणार नव्हतं कारण त्याला या प्रश्नाचं उत्तर माहीत असायलाच हवं होतं हक्क होता तो त्याचा. ''माई... काय झालं... विचारू नां?'' परत त्याने विचारलं माई ही मग ''हो'' म्हटल्या. ''काय झालेल नेमकं आबांना त्यांच्या मृत्युविषयी जेव्हा बोलतो तेव्हा सर्वांचा डोळ्यामध्ये भीती का असते आणि मी आणि आबा ते जायच्या आधी किती वेळ बोलत होतो किती नीट होते ते आणि दुसऱ्या दिवशी समजतं आबा गेले म्हणून काय झालेल माई असं?'' ''बाळं तुझे आबा खूप जिद्दी, धाडसी आणि कर्तृत्ववान होते या गावासाठी त्यांनी या आधी ही खूप समाजकार्य केलेलं आणि ते जाताना सुद्धा या गावातल्या लोकांना आपल्या सर्वांना वाचवून गेले.'' हे सांगता सांगता माईंचे डोळे आबांनी केलेल्या धाडसाने भरुन आलेले.

माई पुढे सांगू लागल्या ''आबांना दोन वर्षांपूर्वी आपल्या तळघरात खूप जुन्या वस्तू आणि एक छोटी पेटी सापडलेली त्या पेटी मध्ये बरचं सामान होतं त्यामध्ये बरेच कागदं होती त्यावर काहीतरी विचित्र आकृत्या होत्या आणि त्याखाली काहीतरी लिहिलेलं होत पण ते काय लिहिलेलं हे त्यांना काहीच कळत नव्हत. दामू आणि रखमाला सांगून त्यांनी ते तळघर साफ करायला सांगितलं व ते सर्व सामान वरती वाड्यात घेऊन यायला सांगितलं.

ती वही नेमकी कसली होती त्या आकृत्या कसल्या होत्या हे शोधायचा त्यांचा खटाटोप चालू झाला त्या कागदासोबत जी पेटी होती ती आणि ते कागदपत्रे ते सगळीकडे घेऊन फिरले, खूप लोकांची मदत घेतली पण कोणाला काहीच ठाऊक नव्हत ती लिपी ती विचित्र चित्र. अशातच एकदा राहुलने (किसनचा मुलगा) बोलता बोलता सांगितलं की गुगलवर सर्वप्रकारची माहिती आपल्याला मिळते म्हणून मग काय... सुरू झाली त्यांची शोध मोहीम अस वाटतं ना बाळा की ती दुर्बुद्धी त्यांना सुचलीच नसती तर, आबा आपल्यात असते आता; पण व्हायचं ते होतच. त्यांना गुगलवर सर्व त्या लिपीबद्दल माहिती भेटली त्यांनी ती लिपी शिकली आणि त्या कागदावर काय काय लिहिलेल ते सर्व वाचलं आणि त्यानंतर सुरुवात झाली एका नवीन वादळाला....''

''वादळ....?? कसलं माई?'' विशालने चकित होऊन विचारलं. माई पुढे सांगू लागल्या ''त्या कागदावर त्या वाईट शक्तीला आमंत्रण दिलं होत आबांनी'' ''वाईट शक्ती?'' विशालच्या कपाळावर आठ्या उमटलेल्या ''होय.., वाईट शक्ती जी आपल्या गावाचा नाश करणार होती आबांचे आजोबा म्हणजेच तुझे खापर पणजोबा '**वामनराव**' त्यांचे नाव. त्यांना त्या शक्तींना कैद करायची विद्या अवगत होती. त्यांच्या काळी पाटलांच्या घराण्याचा नाईनाट व्हावा आणि सर्व गाव आपल्या

ताब्यात व्हावं अस एका दांपत्याला वाटत होतं **सगुणा** आणि तिचा नवरा **रघु** ही त्यांची नावं, पण त्यांचा वंश चालवायला असं कोणीच नव्हत तोच राग मनात ठेऊन त्या माणसाच्या बायकोने काळी जादू करायला चालू केली हे जेव्हा वामनरावांच्या ते लक्षात आलं तेव्हा त्यांनी तिची ती वाईट कल्पना मोडून काढली तोच राग मनात ठेऊन तिने आत्महत्या केली आणि जाताना तेच वचन खाऊन गेली की पाटलांच्या घराण्याचा नाईनाट करेल आणि या गावावर राज्य करेल तिच्या जाण्याच्या धक्क्यानं तिचा पती ही काही महिन्यांनी गेला. वामनरावांना तीन अपत्य झाली परंतु ती तिनही दगावली असं कां होतंय? हे जेव्हा त्यांना आठवलं की सगुणेन जाता जाता माझ्या घराला हा श्राप दिलाय त्यांनी खूप प्रयत्न केले आपली मुलं वाचावी म्हणून पण त्यांना यश आलच नाही शेवटी त्यांनी एक निर्णय घेतला त्यांना अवगत असलेली विद्या वापरायचा तेव्हा त्यांनी आबांना सापडलेल्या त्या कागदावर त्या शक्तीला कसे बोलवायचे ते आधी लिहून घेतले म्हणजे तिला बोलवताना कोणती चूक होऊ नये आणि ती प्रक्रिया अर्धवट होऊ नये म्हणून त्यांनी ती कागदावर आधी उतरवली आणि मग तिच्या त्या वाईट आत्म्याला त्या पेटी मध्ये कैद केले ती पेटी आणि तो कागद कोणाच्या हाती पडू नये म्हणून त्यांनी ती आपल्या तळघरात लपवली आणि ती नेमकी आबांच्या हाती लागली आणि आबांनी ती पेटी आधीच उघडली, मग तो कागद वाचला आणि त्यांना त्यांची चूक लक्षात आली की त्यांचा हातून काय घडले ते. आता किसन आणि श्यामची मुलं म्हणजे राहुल आणि तू. तुम्ही दोघेच आहात जे पाटलांची पिढी आता पुढे वाढवतील म्हणून त्या शक्तीने तुम्हाला त्रास दिला राहुलचा झालेला एक्सीडेंट हा त्याच शक्तीने करवून आणलेला, आबांना काही करुन त्या शक्तीला परत कैद करुन कायमचे संपवायचे होते त्यांनी तो कागद परत डोळ्याखालून काढला त्यामध्ये लिहिलेल तस, आबांनी केलं. जिथे कोणी येत जात नाही अशी जागा असावी आणि अमावास्येच्या रात्री ही क्रिया करावी आणि आबा गेले त्या रात्री अमावस्याच होती त्यांनी ते सर्व केलं जे त्या कागदावर वामनरावांनी लिहिलेल. त्या वाईट शक्तीला पुन्हा त्या पेटीत कैद केलं ती वाईट आत्मा व्हिवळत होती पण त्यांनी तिची गय केली नाही तिला बंद केलं शेवटी त्या पेटीला जाळून नष्ट करण्यासाठी त्यावर थोडी लाकडं रॉकेल टाकून त्या पेटीला आग लावली तशी ती पेटी थोडी हालायला लागली आबांच्या हे लक्षात येताच त्यांनी चक्क स्वतःच्या हाताने ती पेटी बंद केली आणि अशातच त्या तप्त्या आगेने आबांना ही त्यांच्यात सामाहून घेतले'' हे सर्व ऐकून विशालच्या डोळ्यात आसवं होती आबांनी आम्हाला आणि या गावाला वाचवण्यासाठी स्वतःचे प्राण दिले, ही भावनाच त्याला सांगत होती की त्यांचं किती अफाट प्रेम होत आपल्यावरती. त्यांच्या फोटोजवळ जाऊन त्याने नमस्कार केला आणि डोळ्यातील आसवं पुसली.

***



– संगीता देवकर, पुणे

मंद मंद ये समीर, जागवीत आठवणी.

विकसित मधू गंध बहर, स्वर्ग सुखाच्या लहरी...

नेहा आई मालती सोबत भैरव राग गात होती. दोघी माय लेकी तल्लीन होऊन गात होत्या. गाणं संपल तसे नेहाने टाईम बघितला, आई सात वाजले मला आवरायचे आहे, आज कॉलेजमध्ये प्रेझेंटेशन आहे. तो खडूस राकेश प्रोजेक्ट बघण्याच्या बहाण्याने जवळीक साधण्याचा प्रयत्न करत असतो. मला तर त्याचा खूप राग येतो. नेहा म्हणाली. राकेश हा त्यांचा प्रोफेसर होता.

नेहा मग त्या राकेशपासून दूर रहा. जास्त त्याच्या मागे पुढे नको करुस. त्याची तक्रार का नाही करत तुम्ही मुली?

आई मी एकटी काय तक्रार करणार आणि तसा काही पुरावा ही नाही माझ्याकडे. मुली उगाच घाबरतात पण तू काळजी करू नकोस. असंही हे वर्ष संपत आले पुढच्या वर्षी तो राकेश आम्हाला शिकवायला नसेल.

बरे झाले, तरी तू सांभाळून रहा नेहा.

हो आई, मी येते आवरून इतकं बोलून नेहा रूमकडे गेली.

नेहा आता कॉलेजच्या दुसऱ्या वर्षात शिकत होती बीएस्सी मध्ये. ती आठ वर्षाची होती तेव्हा तिचे बाबा मालतीला सोडून निघून गेले होते. तेव्हापासून मालती नेहाची आई आणि वडील दोन्ही भूमिका पार पाडत होती. नेहा ही आईचे सगळे ऐकत असायची. आईला कधी ती दुखवत नसे. मालतीच्या डोळ्यात दिसणार दुःख, वेदना समजण्या इतकी नेहा मोठी होती. बरेचदा तिने आईला हताश होऊन रडताना पाहिले होते. अनेक दुःख, कष्ट घेऊन मालतीने नेहाला मोठे केले होते. मालती एका शाळेत संगीत शिक्षिका होती. थोडे दिवस नोकरी केली त्या नंतर आता घरीच ती संगीताचे क्लासेस घेत होती. नेहाने मालतीला बाबा का आपल्याला सोडून गेले, ते कुठे आहेत? अस कधीच विचारले नव्हते.

नेहा आवरून नाष्टा करायला आली. तिने एक सिवलेस टॉप आणि जिन्स घातली होती.

नेहा, आज प्रेझेंटेशन आहे ना मग असले कपडे कशाला, जा बदलून ये. मालती म्हणाली.

ठीक आहे आई म्हणत नेहा चेंज करून आली, तिने एक लांब हाताचा कुर्ता त्या जिन्सवर घातला.

आईचा निरोप घेऊन नेहा बाहेर पडली.

कॉलेजमध्ये प्रेझेन्टेशन झाले. नेहा आणि तिच्या मैत्रिणी गप्पा मारत थांबल्या होत्या. इतक्यात तिथे त्यांच्याच क्लास मधला चेतन आला. हाय नेहा, मी घरी चाललो आहे तू येतेस का, तुला ड्रॉप करतो. चेतन नेहाच्या घरापासून जरा पुढे राहत होता.

ओके चल येते मी. म्हणत नेहाने मैत्रिणींना बाय केले.

चेतन सोबत नेहा त्याच्या बाईकवर बसून निघाली. चेतन तिचा मित्र होता. आजच्या प्रेझेन्टेशन बद्दल बोलत दोघे नेहाच्या घराजवळ आले चेतनने गाडी थांबवली, थँक्यु चेतन. नेहा गाडीवरून उतरत म्हणाली.

इट्स ओके बाय सी यू चेतनने तिला शेक हॅण्ड केला. नेहाला त्याच्या स्पर्शात वेगळं अस काही नाही वाटले. चेतनचा स्पर्श सहज होता. प्रो. राकेश मात्र मुद्दामहून हाताला स्पर्श करत असे ते जाणवत असे सगळ्या मुलींना. राकेश कोणालाच आवडत नव्हता. पण चेतनचा स्पर्श नेहाला छान वाटला. मैत्री पूर्ण असा.

चेतन पुढे गेला. नेहा घरात आली.

आई कॉफी तयार कर, मी आलेच आवरून. नेहा रूमकडे गेली.

कॉफीचे दोन मग घेऊन मालती आली. नेहा आता तू कोणा सोबत घरी आलीस? कोण होता तो? मालतीने एक मग नेहाच्या हातात देत विचारले.

आई अग तो चेतन, माझा क्लासमेट आहे, चांगला आहे.

नेहा, कोणी किती ही चांगले असो पण अस कोणाच्या हातात हात वैगेरे देऊ नकोस लोक चांगली नसतात.

आई मला तुझी काळजी समजते, मी सांभाळून राहीन ओके.

नेहाला आईचा स्वभाव माहित होता, मालती तिला जास्त अंग प्रदर्शन करणारे शॉर्ट कपडे, भडक मेकअप करू देत नसे, मुलांशी ही चार हात लांबच रहा अस सांगत असे. नेहा आईच सगळं ऐकत असे. पण आई अशी का घाबरते हे तिला अजून समजले नव्हते. लोकांवर तिचा विश्वास नव्हता. सगळ्यांना एकाच नजरेने बघत असे.

नेहा तिच्या रूममध्ये गेली. ती चेतनचा विचार करत होती, तिला चेतन आवडत होता आणि त्याच्या नजरेत ही तिला तसचं काहीसे दिसत होते. चेतनला ही नेहा आवडत होती. पण आईला ही गोष्ट कशी सांगायची हा मोठा प्रश्न होता नेहा समोर, आईला हे असलं प्रेम वैगेरे संकल्पना पटण्यासारखी नव्हती. अंधार पडू लागला तेव्हा नेहा तिच्या विचारातून बाहेर आली. ती हॉलमध्ये आली तर आईने अजून दिवे ही लावले नव्हते, अस आई कधी करत नाही, आज काय झाले मग? असा विचार करत नेहा आईच्या रूमकडे आली, मालती खुर्ची वर डोळे बंद करून बसली होती, नेहा रूममध्ये आली हे ही तिला समजले नाही. नेहा मालती समोर येऊन तिने मालतीला हात लावून हलवले. आई ये आई.. नेहाने आवाज दिला, तसे घाबरून मालती ओरडली, नको प्लीज मला हात नका लावू.

आई मी नेहा.. अगं काय झाले तुला? का घाबरलीस?

मालतीने डोळे उघडले, रडून रडून ते सुजले होते.

आई तू ठीक आहेस ना? काय झाले तुला? नेहाने विचारले.

नेहा, आज ही माझा भूतकाळ माझा पिच्छा सोडत नाही गं, म्हणून तुला सांभाळून रहा म्हणत असते, जे माझ्या बाबतीत घडले ते तुझ्या बाबतीत नको घडायला.

आई सांग मला काय झाले होते? नेहाने आईचा हात हातात घेत विचारले.

नेहा, मी माझे आई बाबा आम्ही खूप आनंदात रहात होतो. सगळं कस छान चालू होते तेव्हा मी सातवीत होते, शाळेला जात होते.

दिसायला अशीच तुझ्यासारखी नाजूक, हुशार त्यात गोड गळा लाभलेली. आई बाबांना माझं खूप कौतुक वाटायचे. एक दिवस बाबा एकदम टेन्शन मध्ये घरी आले, बाबांचे स्टेशनरीचे दुकान होते त्याचे कर्जाचे हफ्ते थकले होते म्हणून बँकेकडून दुकान सिल करण्यात आले, काही ठिकाणाहून बाबांनी कर्ज घेतले होते ते फेडण्यासाठी राहते घर ही विकावे लागले. आम्हाला कोणाचा ही आधार राहिला नव्हता, तेव्हा माझ्या बाबांचे मोठे भाऊ त्यांनी आम्हाला त्यांच्या घरी राहायला बोलवले. थोडे दिवस काकांच्या घरी राहू मग आपल्या घराचे बघू अस बाबांनी ठरवले. आई बाबा आणि मी आम्ही तिघे जण काकांकडे राहू लागलो. काकांना मुलंबाळं नव्हते म्हणून ते माझे लाड करत असायचे. मी ही त्या घरात छान रुळले होते. हळू हळू काका माझ्याशी गैरवर्तन करू लागले, मी एकटी आहे अस बघून मला जवळ घ्यायचे, मला नको तिथे स्पर्श करायचे. मी नको म्हणत असायचे तरी काका ऐकत नसायचे. नेहा मध्येच बोलली. आई अग मग हे सगळ तू आजीला का नाही सांगितलेस?

नेहा, मी आईला सांगितले पण आईने मलाच गप्प राहायला सांगितले. आपण तुझ्या काकांच्या उपकारावर इथे राहत आहोत तेव्हा कोणालाही याबाबत बोलू नकोस अस सांगून आईने मलाच गप्प केले. काकांना बघितले तरी मला धडकी भरत असे. कसे बसे वर्षभर आम्ही तिथे राहिलो नंतर बाबांनी एक भाड्याने घर बघितले. पण काकानी जे माझ्या सोबत केले ते मी कधी ही विसरू शकले नाही आज ही त्यांचा तो स्पर्श आठवला की मला किळस येते. आज ही अंगावर काटा उभा राहतो. आई, आता मी आहे ना तुझ्या सोबत तेव्हा नको त्या आठवणी आठवत बसू. तो तुझा भूतकाळ होता.

नेहा, आज तुला सांगते की तुझे बाबा आपल्याला का सोडून गेले.

आई तुला कंम्फर्टेबल वाटत असेल तर सांग नाहीतर मला काही ही जाणून नाही घ्यायचे.

नेहा, आज बोलू दे मला, तेवढंच माझं मन हलक होईल.

मालतीने मग आपले अश्रू पुसले आणि पुढे बोलू लागली.

तुझ्या बाबासोबत माझं लग्न ठरंल, आई बाबा खूप खुश होते पण मी मनातून घाबरले होते, लग्न होणार आणि कोणी अनोळखी पुरुष माझ्या आयुष्यात येणार ही कल्पनाच मला घाबरून सोडत होती. मी कस पुढे सगळ्या गोष्टींना तोंड देणार होते, मला काहीच माहीत नव्हते. ठरल्या प्रमाणे माझं लग्न अनिकेतशी झाले. आईच्या गळ्यात पडून खूप रडले. अनिकेतच्या घरी आले, मला खूप अस्वस्थ वाटत होते. लग्नाचे सगळे विधी पूजा वैगेरे झाली आणि आमची पहिली रात्र आली, मी घाबरून रूममध्ये बसले होते. अनिकेतने मला ना जाणून घेतले ना समजून काही सांगितले. तरी मी बोलले की मला थोडा वेळ हवा आहे, मी कंम्फर्टेबल नाही आहे. पण अनिकेत म्हणाला की, अस प्रत्येक मुलीला वाटत असते यात काही नवीन नाही. माझं काहीच न ऐकता अनिकेतने माझ्यावर जबरदस्ती केली, हो ती जबरदस्तीच होती. मी मात्र या गोष्टीला तयार नव्हते. माझ्या मनाचा विचार तुझ्या बाबांनी कधीच केला नाही. त्यांना वाटायचे की माझं दुसऱ्या कोणासोबत अफेयर होते आणि त्यांच्याशी माझं जबरदस्ती लग्न झाले आहे. त्यामुळे त्यांनी कधी मला समजून घेतलेच नाही. तुझा जन्म झाला आणि मी तुझ्या बाबांपासून दूर राहू लागले. मला त्यांचा स्पर्श माझ्या बालपणीच्या त्या कडू आठवणी पुन्हा आठवण करून देत असायच्या. माझी लग्न करायची इच्छा नव्हती पण आई बाबांना कसे सांगणार होते मी की मला पुरुषाच्या स्पर्शाची भीती वाटते ते. मग एक दिवस अनिकेत आपल्या दोघींना सोडून निघून गेला कायमचा. थोड्या दिवसांनी त्यांनी मला घटस्फोटाचे पेपर्स पाठवून दिले. तुझ्या बाबांनी मला कधीच समजून नाही घेतले, माझ्या मनात काय सलते आहे, हे ही जाणून नाही घेतले. आई, आता जे झाले ते मागे टाक सगळं, आता त्या आठवणी मधून बाहेर ये. नेहा म्हणाली.

नेहा, तुला वाटत असेल ना की मी तुझ्यावर खूप बंधने घातली, माझ्या धाकात तुला वाढवले पण या मागे माझी भीतीच आहे नेहा, की जे माझ्या बाबतीत झाले ते तुझ्या सोबत नको व्हायला, लोक खूप वाईट आहेत, कोण कधी आपला फायदा घेईल नाही सांगता येत.

आई जगात वाईट लोक आहेत तशी चांगली लोक सुद्धा आहेत. तू माझी काळजी नको करू आणि मी तितकी समर्थ आहे की कोणी माझा गैरफायदा घेण्याचा प्रयत्न केला तर त्याला प्रतिकार करू शकते. मी गप्प बसून अत्याचार सहन नाही करणार.

हो नेहा तू माझ्यासारखी दुबळी नको बनूस, लोकांचे स्पर्श ओळखायला शिक, गैरफायदा घेऊ देऊ नकोस.

आई तुझ्या बालपणात घडलेली घटना त्याचा तुझ्या मनावर इतका पगडा होता ना की तू त्यातून बाहेर आलीच नाहीस. ना बाबांनी कधी तुला जाणून घेतले. पण आता त्या कडू आठवणी मनातून पुसून टाक. चल मी देवाजवळ दिवा लावते, तू कॉफी बनव दोघींसाठी. आईला थोड्या दिवसांनी चेतनबद्दल सांगू या असा विचार नेहाने केला कारण आता या बद्दल काहीच बोलणे योग्य नव्हते.

मालती मग प्रसन्न मनाने उठून किचनकडे गेली. कॉफी बनवून बाहेर आली, नेहाने तिच्याकडून कॉफी घेतली, आई आता आपण दोघी मिळून गाऊ. नेहाने तोपर्यंत हार्मोनियम जवळ घेतले, आता तिला आई सोबत रियाज करावासा वाटत होता, जेणेकरून आईचे मन आनंदी होईल. संध्याकाळ आता रात्रीकडे झेप घेत होती, मालती आणि नेहा यमन राग गात होत्या.

''तोच चंद्रमा नभात तीच चैत्रयामिनी
एकांती मजसमीप तीच तूहि कामिनी!
नीरवता ती तशीच धुंद तेच चांदणे
छायांनी रेखियले चित्र तेच देखणे
जाईचा कुंज तोच तीच गंधमोहिनी
सारे जरि ते तसेच धुंदि आज ती कुठे?
मीहि तोच, तीच तूहि, प्रीति आज ती कुठे?
ती न आर्तता उरात स्वप्न ते न लोचनी...

मालतीचे डोळे भरून आले होते आणि गाण्यासोबत ते वाहू लागले. आज मालतीचे मन जुन्या कडू आठवणी मधून बाहेर आले होते. नेहा सोबत सगळं मनातलं बोलून तिला खूप बर वाटत होते.

जिच्या हाती पाळण्याची दोरी ती जगाते उद्धारी.

– नितीन नानाभाऊ वाघोलीकर



आंतरराष्ट्रीय महिला दिन ८ मार्च रोजी दरवर्षी महिलांच्या सन्मानासाठी वेगवेगळ्या क्षेत्रात काम करणाऱ्या महिलांचा सन्मान करण्यासाठी तसेच महिलांनी स्वतःच्या हक्कासाठी दिलेल्या लढ्याच्या स्मरणार्थ साजरा केला जातो.

भारतात मुंबई येथे पहिला महिला दिन ८ मार्च १९४३ रोजी साजरा केला गेला. ८ मार्च १९७१ ला आपल्या पुण्यात पहिला मोर्चा काढण्यात आला. पुढे युनो ने जागतिक महिला वर्ष म्हणून ते जाहीर केले आणि त्यावर्षीचे औचित्य साधून त्या निमित्ताने संयुक्त राष्ट्र संघटनेने आंतरराष्ट्रीय महिला दिन साजरा करण्याचे ठरविले.

आठ मार्च रोजी जागतिक महिला दिनाचे आयोजन उत्सवाच्या स्वरूपात सर्वत्र होईल पण खरी गरज आहे ती महिलांच्या जीवनाकडे आणि त्यांच्या कर्तृत्वाकडे पाहण्याचा दृष्टिकोनात बदल घडवून आणण्याची. महिलांनी जगभरात अस्तित्वात असलेल्या सर्वच क्षेत्रात आपल्या बुद्धिमत्तेच्या जोरावर कर्तृत्वाची मोहर उमटवली आहे. त्या कर्तृत्वाच्या गाथा महिला दिनाच्या निमित्ताने समाजासमोर याव्यात आणि त्यातून एकूणच समाजाचा दृष्टिकोन बदलावा व स्त्री पुरुष समानतेचा नारा देणे घडावे हे महत्त्वाचे आहे. महिला दिनाच्या निमित्ताने महिलांच्या गौरवगाथा समोर येणे आणि त्या गौरव गाथेतून सामान्य महिलांना आत्मविश्वास व बळ देणे हे महत्त्वाचे आहे.

महिलांच्या आयुष्यात सन्मानाचा दिवस यावा व त्या दृष्टीने महिला सन्मान केला गेला तरच प्रगतीचे पंख लेवून विकासाच्या गतीने 'ती' सर्वांच्या पुढे जात राहील व तिला आपल्याला पुढे नेता येणार आहे.

आजही समाजाची स्त्री जन्माचे स्वागत करताना किती ठिकाणी आनंद मानला जातो हा प्रश्नच आहे? हळूहळू थोडाफार बदल दिसत आहे त्याचे स्वागत करायला हवेच.

मुलींच्या जन्माचे स्वागत करत गेलो त्याचा आनंद मनात मानत गेलो तर बदलाला सुरुवात झाली असे म्हणता येईल. मुलगा व मुलगी असा भेद न करता दोघांनाही समानतेने वागवण्याची गरज आहे. मुलींच्या कर्तृत्वाबद्दल आणि क्षमतेबद्दल शंका घेतली जात असेल तर तिला भरारीचे बळ कसे मिळणार? घर, शाळा आणि समाज माध्यमे यांनी याविषयीच्या दृष्टिकोनात बदल घडवून आणण्यासाठी आजही प्रयत्न करण्याची गरज आहे.

आज महिला पुरुषांच्या बरोबरीने खांद्याला खांदा लावून काम करत आहेत. पंतप्रधान, राष्ट्रपती, लोकसभा अध्यक्ष, संरक्षण मंत्री, इंजिनियर, डॉक्टर, पायलट अशा विविध पदावर महिलांनी आपला ठसा उमटवला आहे.

महिला आरक्षणामुळे अनेक ठिकाणी महिला निवडणूक लढवून जिंकून आज जनप्रतिनिधी म्हणून नेतृत्वाची धुरा यशस्वीपणे सांभाळत आहेत. महिलांमध्ये अशी सर्वोत्तम शिखर गाठण्याची क्षमता मोठ्या प्रमाणात दिसून येते. आजही स्त्री कर्तृत्वान आहे नव्हे तर सर्वात एक पाऊल पुढेही आहे.

अनेक समाजसुधारकांनी महिलांवर होणाऱ्या अन्यायाला वाचा फोडली आहे. त्यामध्ये राजाराम मोहन रॉय, महर्षी कर्वे, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, सरोजिनी नायडू, ईश्वरचंद विद्यासागर, रमाबाई रानडे, आनंदीबाई जोशी, ताराबाई शिंदे अगदी अलीकडच्या काळात नव्या पिढीला सर्वश्रुत असणाऱ्या इंदिरा गांधी, सिंधुताई सपकाळ अशी अनेक नावे कोणीही विसरू शकणार नाही.

आठ मार्च महिला दिन जगभरातल्या अनेक देशांप्रमाणे भारतातही साजरा केला जातो. स्त्री चळवळीचा परिणाम म्हणून आज स्त्रियांना शिक्षणाचा, संपत्तीचा, मतदानाचा असे अनेक वेगवेगळे अधिकार मिळाले आहेत. पुरुषांप्रमाणे महिलांना समान अधिकार मिळाले आहेत. पुरुषांप्रमाणे महिलांना समान अधिकार देण्याची बाब सर्व जगाने मान्य केली आहे, त्यामुळे आज या सर्व क्षेत्रात पुरुषांच्या बरोबरीने स्त्रिया आघाडीवर आहेत.

आपणही या जागतिक महिला दिनानिमित्ताने आपल्या समाजातील महिलांना प्रोत्साहन देऊन स्त्रियांना सन्मान देऊ यात व प्रगती साधुयात. सर्व समाज बांधवांना आंतरराष्ट्रीय महिला दिनाच्या खूप खूप शुभेच्छा!

***


सुनिल शिवाजी शिंदे
९९७०१४८९४७


सौ.सीमा सुनिल शिंदे
८६२४९२२९४५


विनायक सुनिल शिंदे
९८९०९६२०५५


सौ.श्रृति विनायक शिंदे

विनायक आर्टस्

आमच्याकडे सार्वजनिक श्रींची मुर्ती मिळेल व
तसेच रिपेंटींग करून मिळेल नवरात्रीच्या देवींची
मुर्ती मिळेल दिवाळीची खेळणी, किल्ले
लक्ष्मी व गौरीचे मुखवटे होलसेल भावात मिळतील

हनुमान हौसिंग सोसायटी, रुपीनगर, तळवडे, पुणे ४१२११४

प्रेरणास्थान


कै.सौ.सुनिता भगवान सुर्यवंशी

निवृत्त पोलिस अधिकारी


भगवान सुपडू सुर्यवंशी
9867710780


विजय भ.सुर्यवंशी
D.Pharm


सौ.कल्पना वि. सुर्यवंशी
B.A.


प्रशांत भ.सुर्यवंशी
B.E.(Mech.)


सौ.निता प्र. सुर्यवंशी
B.Sc.(Comp), D.Pharm


निलेश र. सोनवणे
(जावई)


सौ.जयश्री निलेश कुंभार
(मुलगी)

वेल केअर केमिस्ट

प्रशांत निवास, भवानी चौक, सुर्यनगर, विटावा
कळवा, जुना बेलापुर रोड, ठाणे

प्रोप्रा. विजय भगवान सुर्यवंशी

निवास : ओझोन व्हॅली, बिल्डिंग नं.४, फ्लॅट नं.६०३, ६वा मजला,
पारसिक नगर, रिलायन्स मार्केट जवळ, खारेगांव, कळवा(प),
जि.ठाणे ४०० ६०५ मोबा. ९९६७८३५४००








Deep Fantasy Artifacts



Shilpkar Ravindra Kumbhar
Proprietor

B190, 191 MIDC, Wai, Dist. Satara, 412803
Mob.:9923352653 **Email :** deepfantasyartifacts.in

सुंदर हॉस्पिटल व प्रसुतीगृह

धानोरा, ता.आष्टी, जि.बीड


डॉ.गोरे डी.के B.H.M.S.
Mob.:9420024104
वेळ स.८ ते २ सायं.४ ते ८


सौ.गोरे एस.डी. B.A.M.S.
Mob.:9096605095
वेळ स.९.३० ते २ सायं.४ ते ८


कु.वैष्णवी दत्तात्रय गोरे(बी.डी.एस.)
चि.ऋषिकेश दत्तात्रय गोरे(बी.ए.एम.एस.)

उपलब्ध सुविधा

प्रसुति सुविधा एक्स-रे | रक्त लघवी तपासणी २४ तास अत्यावश्यक सेवा | जुन्या आजारावर आयुर्वेदीक व होमोओपॅथी उपचार

अनघा

मेडिकल ॲण्ड जनरल स्टोअर्स

।। संत गोरा कुंभार प्रसन्न ।।


शैलेंद्र रा.कुंभार
9011389540
8208254437


सौ.रेखा शै.कुंभार


विजय शिवाजी कुंभार
9922840594
7888116568


सौ.पूजा वि.कुंभार

आर. के. आर्टस

आमच्या येथे श्रींच्या सुंदर व सुबक मुर्ती तयार करुन मिळतील.
दुर्गा देवी / दिवाळीचे चित्रे / लक्ष्मी / किल्ले
कुंड्या / दहिहंडी / मडके तसेच गौरीचे मुखवटे मिळतील

लोहगांव : सर्व्हे नं.२५९, पांडेनगर, रोड नं.२,
सिद्धार्थ बुद्ध विहारा शेजारी, लोहगांव रोड, कलवड, पुणे ४११०३२
येरवडा : २९०, जिजामाता नगर, नवी खडकी, येरवडा, पुणे-०६


प्रा.डॉ. नागोराव आवडे
(एम.कॉम.एम.फील.,पीएच.डी.)
सहयोगी प्राध्यापक, वाणिज्य विभाग,
ग्रामिण महाविद्यालय, वसंतनगर, मुखेड जि. नांदेड
तथा पीएच.डी. संशोधन मार्गदर्शक व
अभ्यासमंडळ सदस्य, वाणिज्य व व्यवस्थापनशास्त्र शाखा
स्वा.रा.ती.म. विद्यापीठ, नांदेड
भ्रमणध्वनी : 9405382461 Email : nhawade@gmail.com


सौ. मीना नागोराव आवडे


डॉ. अवंतिका नागोराव आवडे
B.A.M.S.


इंजि. अनिरूध्द नागोराव आवडे
M.Tech (VLSI Design)
Sr. Design Engineer
Synopsys INC NOIDA (U.P.)

Mob.: 9405382461 Email : nhawade@gmail.com

कुंभश्री परिवार व समस्त समाज बांधवांना
दीपावलीच्या हार्दिक शुभेच्छा...


प्रा. डॉ. दयानंद राजे
[एम. एससी, एम. फिल, पीएच. डी.]
भौतिकशास्त्र व इलेक्ट्रॉनिक्स विभाग,
राजर्षी शाहू महाविद्यालय, लातूर (महाराष्ट्र)
Mob. No.: 9822251052
Email: drdayanandraje2013@gmail.com


सौ. सिमा दयानंद राजे
गृहिणी


इंजि. आकाश दयानंद राजे
B.Tech. Mech. (WCE, Sangli)
M.M.S. (JBIMS, Mumbai)
Management Associate
(Credit Analytics & Innovation Dept.)
HDFC Bank, India


डॉ. आदित्य दयानंद राजे
M.B.B.S.
AIIMS, Nagpur

प्रेरणास्थान


महादेव नानबा कुंभार (B.Com)
9545280699


सौ.संगीता महादेव कुंभार


डॉ.प्रसाद म.कुंभार
सामुदाय आरोग्य अधिकारी
BAMS
9209642993


सौ.लता प्र.कुंभार
M.A. B.Ed.


डॉ.संतोष म.कुंभार
MBBS, D.N.B.
(Medicine)

शिवशक्ती क्लीनिक आजरा

पत्ता : 'शिवकृपा' कॉलनी, मु.पो.ता. आजरा, जि.कोल्हापूर ४१६ ५०५

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



डॉ.सागर स.कुंभार
MS(Ayu.)ENT
Reg. No.I-73769-A

॥ जीवात्मा च परमात्मा ॥
स्वस्तिक क्लिनिक
कोल्हापुर

उपलब्ध सुविधा

- Complete Ear, Nose & Throat Care
- General Health Care
- Ayurvedic ENT Consultation
- Vertigo Management
- Ear Microscopy
- Video Otoscopy
- Audiometry
- Speech & Voice Therapy
- Hearing Aids Facility

For Appointment Please Call
99601 55907 / 99605 53689



राजेश शिंदे
9850973056



महेंद्र शिंदे
9922434389

स्नेहल केटरर्स



आमच्याकडे कार्यासाठी
लागणारी सर्व भांडी, बुफे सेट, टेबल, खुर्ची, सतरंजी
भाड्याने मिळतील. सर्व प्रकारच्या केटरिंगच्या ऑर्डर्स स्विकारल्या जातील.
हनुमान हौसिंग सोसायटी, रूपीनगर, पुणे 411062

प्रयास अकॅडमी
IIT-JEE,MHT-CET & NEET ACADEMY

डॉक्टर व इंजिनिअर होण्याचे पहिले पाऊल



प्रा.शिरीष कुंभार
(Physics)(आय.आय.टी.रुरकी)(संस्थापक)
कोटा शिक्षण पद्धती मध्ये निपुण
9058916663

प्रयास से सफलता तक
धनंजय हाऊसिंग सोसायटी, सिव्हिल हॉस्पिटलच्या दक्षिणेस,
आस्था हॉस्पिटलजवळ, सांगली
Contact : 70 5805 1845, 70 5804 1845, 75 8862 6981



Bhaskar Boritkar
M.: 8108727040



Sou. Pushplata Boritkar



Vishal Boritkar
M.: 8108738776



Vivek B. Boritkar
M.: +91 9820722335

BHASKAR INDUSTRIES

- Mechanical Seals & Spares
- Precision Rubber Products
- Sheet Metal Products
- PTFE Products

Office : 1, Suraj Bhuvan, Dadisheth Rd., Opp. Malad Sahakari Bank, B.T. Branch, Malad (W), Mumbai- 64.

Workshop : 256-A, Bombay Talkies Compound, Malad (W), Mumbai - 64.
Tel.: +91-22-28898844
Mob.: 9930115883

Website : www.bhaskarindustry.com
Email : info@bhaskarindustry.com
bhaskarindustires21@gmail.com

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

जैन™
जैन इरिगेशन सिस्टीम्स लि.
कल्पना कणापरी, ब्रह्मांडाचा भेद करी



प्रोप्रा.महेश इटकर
उस्मानाबाद जिल्हा संघटक-कुंभार समाज सामाजिक संस्था
मोबा. ९०२१७६९७७६/९०४९६१५३४०

करण मशिनरीज
जैन ठिबक, जैन स्प्रिंकलर, जैन पी.व्ही.सी.पाईप, जैन सोलार
जैन सोलार पंप व स्प्रिंकलरचे सुट्टे पार्ट मिळतील.
बाजार समिती रोड, मार्केट यार्ड, कळंब,
जि.उस्मानाबाद-४१३ ५०७



प्रोप्रा. जयवंत रामभाऊ कुंभार
B.Sc., D.Pharm.
9527187751
माजी पंचायत समिती सदस्य, कळंब
माजी सरपंच ग्रा.पं.मंगरुळ, कळंब
अध्यक्ष मेडिकल असोशिएशन, कळंब
सर्व प्रकारची देशी विदेशी औषधे मिळतील



Vijay Kumbhar
9444908338



Kum. Sonali Vijay Kumbhar
B.Arch.,
M.S.C. Project Management
London

Pioneer - Punctual - Perfect
PLYDEAL
PLYWOODS • BLOCK BOARDS • VENEERS • LAMINATES • TIMBER • MOULDINGS
139, Choolai High Road, Chennai 600112 T: 26692921, 26693761
E:plydealgmb@gmail.com / info@plydealchennai.com
Website www.plydealchennai.com



Chi. Ajay Vijay Kumbhar
Master of Aerospace Engg. Chennai
Master of Aerospace Engg. Netherland

।। संत गोरोबा काका प्रसन्न ।।
श्री.सोमनाथ द.कुंभार
8888340954



।। श्री स्वामी समर्थ ।।
कुंभार मिसळ हाऊस
।। जय जय रघुवीर समर्थ ।।
सौ.अनुराधा सो.कुंभार
9561634102

स्वाद अस्सलतेचा.. स्वाद परंपरेचा...
आमच्या येथे कीटी पार्टी, बर्थडे पार्टी, गेटटुगेदर
सर्व शुभ कार्याच्या ऑर्डर स्विकारल्या जातील
(४० ते ५० लोकांसाठी)
जुना मुंबई-पुणे हायवे, टोल नाका, भजन सिंग
ढाबा शेजारी, सोमाटणे फाटा, मावळ, पुणे 410 506



डावीकडून सोमनाथ, चि. यश, कु. यशस्वी व
सौ.अनुराधा सोमनाथ कुंभार

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!


राजेंद्र ह.कुंभार
8830560055


राहुल मा.कुंभार
9604423262


रोहित सु.कुंभार
9075637540


रोहन रा.कुंभार
9356794763

श्री. गाडगीळ ज्वेलर्स
सोने-चांदीचे होलसेल व्यापारी
माने बिल्डिंग, अशोक नगर, निपाणी

गुरुप्रसाद ज्वेलर्स
सोने-चांदीचे होलसेल व्यापारी
शाखा क्र.१, गडहिंगलज, शाखा क्र.२ निपाणी
नेहरु चौक, रत्नशास्त्री मोतीवाला शेजारी, निपाणी



चांदीच्या मालाचे होलसेल निर्माते
कारखाना : मु.पो.तळंदगे, ता.कागल, जि.कोल्हापूर



निलेश बाळसराफ : ९३०९१८२५५७
संतोष जाधव : ९९६०८३२४७२

ऑफिस ९०२१०१५९२१
अक्षय शिंदे ७०५७३४३४८४

साखरपुडा पॅकेज : २५०००/-
बर्थ डे पॅकेज : ११०००/-



साई लॉन्स मंगल कार्यालय
हॉटेल साईकृपा ॲण्ड आईसक्रीम पार्लर

दादा गेस्ट हाऊस
राहण्याची उत्तम सोय, २४ तास गरम पाणी

साई मंदिरासमोर, सावरगांव – मुंजाळवाडी रोड, ता. जुन्नर, पुणे



शुभम् डायग्नोस्टिक सेंटर

डॉ. गणेश दि. मारुलकर
M.B.B.S., DMRD.
Mob.: 9822213334

डिजीटल एक्स-रे, सोनोग्राफी,
कलर डॉपलर



डॉ. सौ. सुषमा मारुलकर
M.B.B.S., DMRE.

जी ८, अजिंक्य प्रेस बिल्डींग, कृष्णा बँक शेजारी, ५१२ बी/१, अजिक्य कॉलनी, सातारा. फोन (०२१६२) २३२८२१


ह.भ.प.गुलाब महाराज विठोबा कुंभार
संस्थापक : संत गोरोबाकाका
पायी दिंडी सोहळा
M-9604040377
937377126


विश्वनाथ गुलाब कुंभार


सागर गुलाब कुंभार


चि.त्रीलोकेश गुलाब कुंभार

चैतन्य कनिफनाथ
वीट व बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स

मु.पो. माऊ, ता.मावळ, जि.पुणे

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



Hotel Sai Sangam ★★★

SHIRDI

An Extension of Comfort

Directors
Bhimashankar Sonawane
Sunil Sonawane
Cell # 9011171111
Sandeep Sonawane

43 A/C & Non AC
Executive Specious Rooms
24 Hours Room Service
Gym / Multi-Cuisine Restaurant
Advance Booking Available

Add. : Hotel Sai Sangam, Sonawane Vasti, Opp. Water Park,
At. Post - Shirdi, Tahsil - Rahata,
Dist. Ahemadnagar, Pin- 423 109. Phone : (02423) 255967/258111
Mo. : 9011113344, 9011185111
Visit us at : www.hotelsaisangam.shirdi.com







आमचे आराध्य दैवत



श्री.महादेव आनंदराव यादव
संस्थापक/चेअरमन/सचिव



सौ.सुनिता महादेव यादव
अध्यक्ष

श्री.संत गोरोबा काका कुंभार नागरी सह.पतसंस्था मर्या. करमाळा

ता.करमाळा, जि.सोलापूर फोन नं.०२१८२-२२०२० कार्यक्षेत्र - करमाळा तालुका
कार्यालय पत्ता : कै.देशभक्त नामदेवराव जगताप व्यापारी संकुल, जीन मैदान, गाळा नं.४, करमाळा
रजि.नं.एस.यु.आर/के.एल.ए/आर.एस.आर(अए)१६४३ दि.८/३/२०००
ऐकमेका साह्य करु, अवघे धरु सुपंथ .....!!!

ऑडीट वर्ग-'ब'

३१/३/२०२३ अखेरची सांपत्तीक स्थिती

१. वसुल भाग भांडवल	₹ २५३५८५०/-	५. निधी	₹ १४२३३८४/-
२. ठेवी	₹ ९१२४०६८/-	६. गुंतवणूक	₹ ३८७९४९९/-
३. नफा	₹ ३०२४०२/-	७. सभासद संख्या	१६६९
४. कर्जे	₹ १०९६७६४८/-		

ठेवींचे आकर्षक व्याजदर

४६ दिवस ते ९१ दिवस - ६%	१३ महिने - १०.५%
१८० दिवस - ८%	ज्येष्ठ नागरिक १३ महिने - १९%
दामदुप्पट ठेव - ८५ महिने(७ वर्ष १ महिना)	पिग्मी ठेवीवर व्याज - ५%
कर्जाचा व्याजदर - १५%	सेव्हींग्ज ठेव - ४%

सौ.सुनिता महादेव यादव (चेअरमन) | **श्री.चंद्रकांत जयराम कुंभार** (व्हा.चेअरमन) | **उत्तम रामचंद्र क्षिरसागर** (व्यवस्थापक)

सर्व सभासद संचालक मंडळ, कर्मचारी वृंद व पिग्मी एजंट
सर्व सभासद, ठेवीदार, कर्जदार, हितचिंतक सर्व कुंभार समाज बांधवांना हार्दिक शुभेच्छा





केंद्रिय लोकसेवा आयोगातर्फे(UPSC) संदिप सदानंद कुंभार यांची तांत्रिक सल्लागार तथा सचिव पदी केंद्रिय बाष्पक मंडळ, नवी दिल्ली, येथे निवड. पहिल्या फोटोत संदिप कुंभार यांचे सर्व कुटुंबिय. दुसऱ्या फोटोत डावीकडून मुलगा चि.सुधांशु, पत्नी सौ.शुभांगी आणि मुलगी कु.सृष्टी(M.B.B.S.)

A Building Flat no. 1301 Puneville, Pharande Project, Kate wasti, Punawale - 411033 Mob.: 9158743668

आमचे प्रेरणास्थान



श्री.पांडुरंग विष्णु कुंभार
निवृत्त उपअभियंता
जलसंपदा विभाग



सौ.ज्योती पां.कुंभार

ओम साई डेंटल क्लिनिक



डॉ.स्वप्निल पां.कुंभार
बी.डी.एस.(पुणे)



डॉ.सौ.सुचेता स्व. कुंभार
बी.ए.एम.एस.

किरण कॉम्प्लेक्स, एस.टी.स्टँड समोर, कडेगाव, जि.सांगली 415304
मोबाईल 9156397609

महालक्ष्मी अपार्टमेंट, गाळा क्र.2, एस.जी.एम. कॉलेजसमोर,
विद्यानगर, कराड, जि.सातारा 415124
मोबाईल 7447566008

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

Manufacturer of All type of Stickers, Name Plates in Aluminium & SS,
Laser marking, Hard & Soft Anodiser

ENTERPRISES
Florra

Email : floraaenterprises@gmail.com
Contact No. 7385206159, 9822796159

Works : Shed No.3,
Plot No. W-3, F-II Block,
MIDC, Pimpri,
Pune - 411 018
Maharashtra



SANJAY KUMBHAR
Proprietor

आमचे प्रेरणास्थान



कै. तुलसीभाई परमार

प्रोप्रा.नारायण तुलसीभाई परमार
9422738901

PLH परमार
लस्सी हाऊस

PARMAR LASSI HOUSE
FORMERLY TULSI BHAI LASSIWALA
SINCE-1969



राहुल अपार्टमेंट, बुरुडगांव रोड, आनंदऋषीजी हॉस्पिटल जवळ, अ.नगर

PRAJAPATI ENTERPRISES

SPECIALIST IN :
HEAT TREATMENT OF WOODEN
PALLETS WITH ISPM-15

IPPC IN-522 HT

Approved by Govt. of India



Late Ramnaresh Prajapati



Ramgopal Prajapati
9890586006
8788970208



Abhinandan Prajapati
9850303603



Vinodkumar Prajapati

- Office : Plot No.17, Gat No. 485/2, Near Saubhagya Lawn, Papaya Nursery, Trimbak Road, Satpur, Nashik-422007
- Factory : Gut No.27/A, Plot No.7, Azad Nagar, Satpur Ambad Link Road, Ambad, Nashik 422010
- Email : prajapati2008_packing@rediffmail.com



हनमंत चितळीकर
9928106320

विनायक ज्वेलर्स

सोने व चाँदी के आभूषणों के
निर्माता एवं विक्रेता



प्रविण ह. चितळीकर
9166801672

छोटा सर्राफ बाजार, हल्दिया जी की गली, बारां(राजस्थान)



प्रो.संजय काळे
मा.प्राचार्य प्रगत
कला महाविद्यालय अ.नगर
मो.९८२२८८३३०९



सौ उज्वला काळे
मो.९४०३०२७५३१

सुशांत फाईन आर्ट

• पेन्टींग • पोट्रेट पेन्टींग • फायबर म्युरल
• ब्रॉंझ स्कल्पचर • क्रिएटीव्हस्कल्पचर

स्टुडिओ मु.पो.भाळवनी, ता.पारनेर जि.अहमदनगर



श्री.चंद्रकांत कुंभार
संस्थापक अध्यक्ष
मोबाईल नं. 8805120829

संतोषी ग्रंथालय कर्वेनगर

हिंगणे होम कॉलनी
संतोषी सदन, कर्वेनगर, पुणे 411058

सहित्य सेवा सार्वजनिक ग्रंथालय

वारजे माळवाडी, पुणे 411058

सामाजिक, राजकीय,ऐतिहासिक, शैक्षणिक, वैज्ञानिक, बायोग्राफी व्यक्तिमत्व विकास, स्पर्धा परीक्षांच्या सर्व विषयांची पुस्तके वाचनासाठी उपलब्ध, तसेच सर्व दैनिके मासिके उपलब्ध, सभासद नोंदणी चालू आहे.

निवास : दोड्के पार्क ए/502, वारजे माळवाडी, पुणे 52

॥श्री गणेशाय नमः॥





॥श्री सातेरीदेवी प्रसन्न॥



कृष्णा उर्फ दाजी शेटकर

शेटकर आर्टस्

आमच्या येथे श्री गणेश, दुर्गा मातेच्या सुबक व सुंदर शाडु माती, पी.ओ.पी.च्या मुर्ती योग्य दरात मिळतील.

पोरवाल पार्क, टँक रोड, शांतीनगर, येरवडा, पुणे-6
संपर्क : 9881981310 / 9890662848 / 9833342066

आमचे प्रेरणास्थान



मधुकर गरबड बोरसे
7588307281



सौ.मंगलाबाई मधुकर बोरसे
मा.सरपंच कनाशी



किरण मधुकर बोरसे
9423546363
प्रगतीशिल बागायतदार शेतकरी



सचिन मधुकर बोरसे
9657461943
9021503568

SK TRADERS

General Merchant & Commision Agent

Post Kanashi, Tal.Kalwan, Dist.Nasik
Email : borsesachin321@gmail.com



कुंभश्रीच्या वाटचालीस हार्दीक शुभेच्छा!!

डॉ.सोनवणे डि.पी.

BAMS (Pune)

फॅमिलि फिजिशियन

9096491194 / 7588282381

श्री क्लिनिक

मु.पो.पिंपळगाव(खडकी) ता.आंबेगाव, जि.पुणे

॥ श्री गोरोबाकाका प्रसन्न ॥



श्री.बी.एस. कोते
9822747777

श्री माऊली मोटर्स

आमचे येथे स्पे. महिंद्रा पिक अप, इंडिका, सुमो, ४०७, ७०९, एल.पी.एस.ई. जे.सी.बी. गाड्यांची खरेदी विक्री कमिशनवर केली जाईल



श्री.रुपेश कोते
9561811777

मा. अध्यक्ष, श्री ज्ञानेश्वर महाराज देवस्थान ट्रस्ट, आळे



श्री.प्रतिक शिंदे
9850506422

माऊली कोल डेपो

आमचे येथे दगडी कोळसा, राख, भिलाई राख, बेल्लारी राख, गोवा राख, कोल्हापूर राख ठोक व किरकोळ भावात मिळेल.



श्री.स्वप्निल शिंदे
9860244243
9890709205

मु.पो. आळेफाटा, ओतुर रोड, ता. जुन्नर, जि. पुणे

एक घर - संवाद जपणारं...

(डॉ. सत्यपाल श्रीवास्तव, पाथरवटकार, सोलापूर)

ओल्या भिंती किती करतात कल्लोळ?
माणसं मात्र एकमेकांशी अबोल!
म्हणूनच...
प्रत्येकाला हवं असतं
एक घर संवाद जपणारं
ओघळणाऱ्या आसवांना
थोपवून ठेवणारं
नात्याची वीण घट्ट करून
मनाचा ओलावा जपणारं,
पाखरांना परतीची ओढ लावणारं,
दुरावा सांधण्यासाठी,
रुसवा काढण्यासाठी,
दूर जाणाऱ्या पावलांना
माघारी बोलवणारं...
प्रत्येकाला हवं असतं एक घर
संवाद जपणारं...

***

सुखाचे सोबती

(हर्षा चंद्रकांत कुंभार, पिंपरी चिंचवड, पुणे)

खोटी स्तुती करणाऱ्या स्वार्थी जनांची गर्दी,
सुख समयी जमे अवतीभवती,
खरंच यातली तुझी म्हणाया किती?
वादळ येता,
पाला-पाचोळ्यापरी उडून जाती,
नको करू खंत,
हे सारे केवळ सुखाचे सोबती.
वादळातही घट्ट हात हाती,
ओळख जीवाभावाची नाती,
तेच खरे सुखदुःखाचे सोबती.

***

एकांत

(प्रा. डॉ. जी. आर. प्रवीण जोशी, जि. बेळगाव)

तेच चांदणे नभात तीच शुक्र चांदणी
एकटीच मज जवळी तूच माझी भामिनी ।।ध्रु।।
रुप तुझे आरस्पानी प्रीत गीत वृंदावनी
जल सलज्ज नयनी छान रम्य उपवनी
शीतल चंद्र प्रकाश आवडते मज मनी ।।१।।
आम्रवृक्षी गंध मोहर चंद्रकांत होत बहर
राघू मैना हसतात शीत पवन कहर
ये तू जवळी ये अशी माझी तू सौदामिनी ।।२।।
नखरेल ती चांदणी चंद्र प्रकाशी आंगणी
रात राणी वेलीवर कुंज मधुर ती वाणी
गीत गंध पृथेवरी दरवळे रानोवनी ।।३।।
तुही तीच मीही तोच चांदण्याची तीच रात
मीच नभी तू धरती कळी खुले बहरात
नाचे मोर तो बेधुंद सोन केतकी वनी ।।४।।
एकटीच मज जवळी तूच माझी भामिनी

***

नारीचा सन्मान

(श्रीपाद पु. कुलकर्णी, पुणे)

समाज होई उन्नत जेथे नारीचा सन्मान
नका कुस्करू पुष्पकलिका राखून याचे भान
हुंडा घेऊन विवाह करुनी होता 'लक्ष्मीपती'
तरीही छळुनी 'सबले'ला त्या मिळते कुठली गती?
तिच्याच पोटी पुत्र जन्मता हर्षा येई उधाण
परी जन्मता कन्या, सारी मुखे होतसी म्लान!
निर्भिड होऊनी जपे कळीला आणि वाढवे माय
जमते जैसी बहु उपयोगी दुग्धावरली साय
पुत्र देतसे प्रकाश अपुला स्वतःच्याच द्वारा
कन्या होऊन दीपमालिका, उजळी दोन्ही घरा
पुराणातल्या सावित्रीने मृत्युवरही केली मात
शिक्षण घेऊन सावित्रीने नारीस केले जग ते ज्ञात
सोज्वळ कन्या, प्रेमळ भार्या तशीच वत्सल माता
रुपांत इतुक्या जन्म घेतसे केवळ स्त्रीची ममता
महान योद्धे, क्रीडाजेते जिने घातले रे जन्मा
तिच्या कपाळी का रे देता अश्वत्थाम्याच्या जखमा?
दबून जाई श्वास कळीचा जन्माआधी रे उदरी
किंवा येते शिकार होणे वासनांधतेचे पदरी
समस्त जन हो ऐका आता करुनि जिवाचे कान
चला दाखवू नारिशक्तिची जगास साऱ्या शान

***

वडारणीचे पोर

(श्रीपाद पु. कुलकर्णी, पुणे)

हा इमला बांधण्या किती घमेली टाकते
समोरच्या वाळूमध्ये माझ्या बाळाचे घरटे
माझ्या बाळाला घडते वाळु-मातीची आंघोळ

त्याच्या अंगात फाटक्या सदऱ्याचीच ग खोळ
त्याच्या डोईला ग येई सदा मातटच वास
त्याच्या चिमुकल्या मुखी मातीचाच जाई घास
होई जीवा उलघाल, वीट पडेल ग पायी
बाळा, थांब आले आले उगा करू नको घाई
त्याच्या राखट अंगाला हळूवार झटकते
त्याच्या डोईच्या जावळा माझा गाल ग घासते
माझ्या बाळाचे ग पापे कोण कधी घेत नाही?
सोनुल्याचा गोरा गोरा गाल ओला ओला होई
डोळ्यांतुन ओसंडल्या गंगायमुनांच्या धारा
ओघळल्या काजळाचा रंग मिसळला सारा
त्याच्या बोलक्या डोळ्यात अलगद नीज आली
दृष्ट लागेल बाळाला घेते बाई पदराखाली
त्याच्या चुटूक ओठांचा स्पर्श छातीला झाला ग
श्रम सारे हरले आता चला कामाला लागू ग

***

संदेश एकात्मतेचा

(कवी – विलास बापूराव कुंभार, फुरसुंगी, पुणे)

निर्गुण तो निराकार तो, नाही तन, मोह माया ।
निर्मल रूप त्याचे, नाही हाडमास नाही काया ।।
चराचरी वास त्याचा, चित् आनंदाचा हा फाया ।
ईस मसाई अल्ला ईश्वर, विविध नामे भजाया ।।
मार्ग तो एकच आपुला, अनंतात विलीन व्हाया ।
वृथा का करीसी, धर्म जात भेदभाव तू सदया ।।
तोची तो एक देई, सर्वां श्वास, प्रकाश नी छाया ।
विसरून मतभेद सारे, शक्तीस त्या भावे नमूया ।।
आरोग्य नी विश्वशांती साठी सारे तया प्रार्थू या ।
वंदूनी त्या चैतन्यशक्ती, गुण्यागोविंदाने नांदू या ।।
बंधूभाव, एकात्मतेचा संदेश जगात पोहचवू या ।
परस्पर सहकार्यातून लक्ष विकासाचे साधू या ।।

***

देवाचा दरवाजा...

(वॉटस् ॲप संकलीत)

देवाचा दरवाजा चांदीने मढला !
शाळेचा दरवाजा पाण्याने सडला !!
मंदिरातील झुंबराला हिऱ्या–मोत्यांचे खडे !
शाळेच्या भिंतींना पडु लागलेत तडे !!
मंदिरात जाऊन लोक पोथी पुराण वाचतात !
शाळेच्या ग्रंथालयात उंदीर मामा नाचतात !!
मंदिराच्या दानपेटीत गुप्तदान करतात !
शाळेच्या देणगीची पावतीच मागतात !!
दरवर्षाला देवाची भरवतात यात्रा !
पालक मेळाव्यात पालक फक्त सतरा !!
पुजाऱ्यांच्या गळ्यात सोन्या–चांदीचे हार !
कंत्राटी शिक्षकांची होऊ लागली उपासमार !!
न खाणाऱ्या देवाला पंचपक्वानांचा घास !
शाळेत खिचडी भाताचा अहो येईना वास !!
आता तुम्हीच सांगा कधी संपेल इथला अंधविश्वास !
शिकले सवरलेले तरुण–तरुणीच करु लागले आता उपवास !!

***

इवलंसं रोपटं मी

इवलंसं रोपटं मी
तू म्हणालास तर मरून जाईन
ओंजळभर पाणी दे मला
आयुष्यभर तुझ्या कामा येईन
दिलं जीवदान मला तर
तुला जगायला प्राणवायू देईन
जगवलंस मला तर
तुझ्या देवांसाठी फुलं देईन
फुलवलंस मला तर
तुझ्या मुलांसाठी फळं देईन
तळपत्या उन्हामध्ये
तुझ्या कुटुंबाला सावली देईन
तुझ्या सानुल्यांना खेळावया
माझ्या खांद्यावर झोका देईन
तुझ्या आवडत्या पाखरांना
मायेचा मी खोपा देईन
कधी पडला आजारी तर
तुझ्या औषधाला कामा येईन
झालो बेईमान जरी मी
शेवटी तुझ्या सरणाला कामा येईन
...एक ईवलंसं रोपटं

***

मास्तर आमचे दैवत

(कवी : विलास बापूराव कुंभार, फुरसुंगी, पुणे)

नाही कधी आले बाबा, नाही आली आई,
मरेस्तोवर मास्तर आम्हा जरी मार देई.
मास्तर होते गुरू आणि दैवत सर्वां ठाई
नतमस्तक होतो आम्ही सदा त्यांचे पायी
मास्तर म्हंटले की सर्वां त्यांची अपूर्वाई,
शाळेत, गावात सर्वचजन त्यांचे गुण गाई
त्यांना पहाता, आदरयुक्त भीती मनात राही,
असा मान असा आदर सर्वां गुरूवर्यां ठाई
आई वडील ईच्छा पोराने बुके चार शिकावं,

फाडफाड नाही निदान पतुर लिहावं, वाचावं.
नाही इंजेनर बॅरिस्टर निदान मास्तर तरी व्हावं,
असं गोड कौतुकानं आईचं ऊर भरून यावं

मास्तरांचं लक्ष असे अगदी शेवटच्या पोरांवर,
मुळाक्षर नी अंक सारे गिरवाया लावी पाटीवर.
असे घडवी विद्यार्थ्या, जरी वळ उमटे पाठीवर,
कडक शिस्त जरी त्यांची, जीव मात्र असे सर्वांवर.

असे होते शास्त मास्तर म्हणूनच आम्ही घडलो,
डॉक्टर, वकील, इंजिनिअर, शास्त्रज्ञ, शिक्षक झालो.
आजही अभिमानाने, नाव त्यांचे सांगत आलो,
नतमस्तक शतदा, त्यांच्या मुळेच आम्ही तरलो.

***

जीवनात 'सात'चा पाढा फार महत्त्वाचा आहे...

(कवी : विलास बापूराव कुंभार, फुरसुंगी, पुणे)

7 x 1 = 7 बालपण
7 x 2 = 14 वयात येण्यास सुरूवात
7 x 3 = 21 लग्नाचे वय
7 x 4 = 28 मुल बाळ
7 x 5 = 35 सुखी संसार
7 x 6 = 42 मुलांच शिक्षण
7 x 7 = 49 मुलांच लग्न
7 x 8 = 56 नातवंडाचे सुख
7 x 9 = 63 म्हातारपणाला सुरूवात
7 x 10 = 70 देवाचे नामस्मरण

किती अर्थपूर्ण आहे हा पाढा म्हणून हसत खेळत प्रेमाने रहा...
सर्वांना 7 द्या आणि सर्वांची घ्या.
हम 7 - 7 हैं...

***

हे म्हातारे थकत कसे नाहीत?

(वॉटसॲप संकलीत)

सकाळी सकाळी पाच वाजता उठतात
सगळ आवरून फिरायला जातात
व्यायाम करून हसत येतात
हे म्हातारे थकत कसे नाहीत?

नातवंडाशी खेळुन मस्ती करतात
घरभर पळुन उच्छाद मांडतात
पोथ्या पुराणे देव पुजेत रमतात
हे म्हातारे थकत कसे नाहीत?

पेपर वाचतात बातम्या पाहतात
राजकारणावर हिरीरीने बोलतात
नाटक सिनेमा आवडीने पाहतात
हे म्हातारे थकत कसे नाहीत?

दुध भाजी किराणा आणतात
नातवंडाना शाळेत सोडतात
संध्याकाळी खेळायला घेऊन जातात
हे म्हातारे थकत कसे नाहीत?

पडतात धडपडतात परत उठतात
एव्हढसच खातात भाराभर औषधं घेतात
निशाचरागत जागत बसतात
हे म्हातारे थकत कसे नाहीत?

लग्न समारंभात सतत मिरवतात
लहान थोरांची ख्याली खुशाली विचारतात
ताजेतवाने होऊन घरी परततात
हे म्हातारे थकत कसे नाहीत?

ते कधीच थकणार नाहीत.....
हे म्हातारे नाहीत महा–तारे आहेत
खरं आहे ना मित्रांनो...!

***

माझी आजी

(सुरभी प्रकाश राजे, निगडी, पुणे)

आकाशातल्या चांदण्यात, तुला मी रोज शोधते वेड्यापरी.
सांग ना ग आजी, दिसशील का तू मला एकदा तरी.

किती चांदण्या आकाशात, काही चमचमणाऱ्या तर काही शांत
कोणती आहेस ग तू आजी, विसावल्यागत वाटतं तुझ्या मंद प्रकाशात.

आठवणी शिवाय तुझ्या, माझा एकही क्षण जात नाही.
कोण ग खाऊ घालणार आता, लाठीवडी, आता ती मिळणार नाही.

आई बाबा रागवायचे, तेव्हा तू माझा आधार व्हायची.
खूप साऱ्या गोष्टी, तू मला समजावून सांगायची.

फुलके करणारी मी, मला पातळ भाकरी करायला शिकवली.
सुगरण होती तू आजी, खूप लवकर आम्हाला सोडून का गेली.

तू शिवलेल्या गोधड्यांवर, झोपतात तुझी नातवंड परतुंड
उबदार टोपडं बाळूत घालून, मिळतो सर्वांना आनंद.

आजी तू आहेस माझ्या मनात आणि प्रत्येक कणाकणात.
एकमेकींच्या सहवासात, आपण राहायचो ग किती आनंदात.

आजी तुझ्या गप्पा गोष्टी, दररोज ऐकाव्याशा वाटतात.
तुझे हेच अनुभव बरच काही शिकवून जातात.

तुझ्या हाताचे गोड गोड अनारसे, तिखट धपाटे आणि खर्डा.
कधी गोड तिखट मिरची, अशी होतीस ग तू आज्ञी फर्डा.

तू गेलीस मला सोडून, पण आठवणी या आजही आहेत माझ्या मनात.
शोधत राहते ग मी तुला, झाडे आणि पानाफुलात.

माझी काळजी करू नकोस, तू अगदी छान रहा.
मी अगदी मजेत आहे, तु ही अगदी मजेत राहा.

पण जमलच जर कधी तुला, तर एकदा भेटायला येऊन जा.
खूप सारे प्रेम तुझे, परत मला देऊन जा.

***

अनंतात विलीन होताना

(मनिषा)

काय होत असेल,
श्वास संपताना
सगळे पाश सोडताना
धरलेला हात सुटताना
शरीराचं पार्थिव होताना...

मनावरील ओरखड्यांचं
नात्यातल्या रूसव्या फुगव्याचं
भावनांच्या कल्लोळाचं
काय होतं नेमकं,
आयुष्यभर धरून ठेवलेल्या गोष्टी एका क्षणात निसटताना
श्वास संपताना
शरीराचं पार्थिव होताना...

प्रत्येक जीव...
प्रत्येक जीवाचं त्याचं एक आयुष्य असतं
त्याचं एक प्रयोजन असतं
कळतं का ते प्रयोजन प्रत्येकाला?
उमगतं का त्याला जीवनाचं सार
का उगाचचं जगत राहतो तो अस्ताव्यस्त...
खरचं काय होतं नेमकं श्वास संपताना
शरीराचं पार्थिव होताना...

प्रेमाचं माणूस सोडून जाताना
आक्रंदत राहतो मागे उरलेला जीव
त्याचा त्याचा मनात हिशोब जुळवत
पोहोचतो का मग हा आक्रोश प्रेमाच्या जीवापर्यंत
काय होतं नेमकं
श्वास संपताना
शरीराचं पार्थिव होताना...

काय वाटतं असेल मरणाच्या दारात उभ्या असलेल्या जीवांशाला
राहून गेलं असेलं का काही जगायचं,
समाधानी असेलं का खंत असेल काही का
मरणाची वाट पहात असेल
काय घालमेल चालू असेल त्याची श्वास संपताना
शरीराचं पार्थिव होताना...

जगावं की मरावं
जगत असताना मरणयातना
की मरताना जगण्याची इच्छा
नेमका काय संघर्ष असेल?
न सुटणारे प्रश्न...
कदाचित याचं उत्तर मरणचं देत असेल...

मरणानंतर इथला संघर्ष संपत असेल की
पुन्हा जन्म मरणाच्या भोवऱ्यात आत्मा गुरफटत असेल
आधीचे हिशोब पुन्हा जुळवण्यासाठी भरकटत असेल
८४ लक्ष योनींच्या प्रवासात...
सगळचं गूढ... अनादि अनंत...
आपणही या अनंताचे प्रवासी...
मुक्कामपोस्ट मृत्युच्या वाटेवर चाललेले...

***

आमचे प्रेरणास्थान


स्व. सौ. अनुसया


स्व. निवृत्ती शिर्के


प्रोप्रा. सुरेश निवृत्ती शिर्के
सिव्हिल इंजिनिअर

शिर्के कंस्ट्रक्शन

सर्व प्रकारचे बंगले व स्किमची कामे योग्य दरात करुन मिळतील.

मु. पो. नांदलापूर, ता. कराड, जि. सातारा.
फोन : (नि) ०२१६४/२४२०४६ मो. : ०९७६२५२१०८३

बालाजी

ऑटोमोबाईल्स


प्रोप्रा. ज्ञानेश्वर शांताराम शिंदे
Mob. : 9860159519


मनोज ज्ञानेश्वर शिंदे
सिव्हिल इंजिनियर व गव्हेंमेंट कॉन्ट्रॅक्टर
Mob. 9822011156
9890453147

टाटा व महेंद्रा गाडीचे ओरिजनल सुट्या भागांचे विक्रेते

आळेफाटा, ओतुर कल्याण रोड, ता. जुन्नर, जि. पुणे.

अन्न हे पूर्णब्रह्म

– प्रा. श्री. धनाजी जनार्धन बुटेरे

भारतीय लोक अन्नाला पूर्णब्रह्म मानतात. अन्नाला पूजण्याची परंपरा हिंदू धर्मात लाखो वर्षापासून आहे. अन्न हे पायदळी तुडवले जात नाही. देवपूजेत सर्व धान्याचीच पूजा होते. जव, सातू, गहू, शिवपूजेत तर दही, दूध, मध, साखर, शिवमूठ म्हणून तांदूळ व तीळ, मूग, सातू, जव वाहिले जातात. देवाला नैवेद्य दिलेल्या शिवाय पूजा पार पडत नाही. थोडक्यात काय तर अन्नाला देवा इतकेच पुजले जाते.



भारतीय लोक अन्नाला पूर्णब्रह्म मानतात. अन्नाला पूजण्याची परंपरा हिंदू धर्मात लाखो वर्षापासून आहे. अन्न हे पायदळी तुडवले जात नाही. देवपूजेत सर्व धान्याचीच पूजा होते. जव, सातू, गहू, शिवपूजेत तर दही, दूध, मध, साखर, शिवमूठ म्हणून तांदूळ व तीळ, मूग, सातू, जव वाहिले जातात. देवाला नैवेद्य दिल्याशिवाय पूजा पार पडत नाही. थोडक्यात काय तर अन्नाला देवा इतकेच पुजले जाते. मात्र खेदाची गोष्ट एकच की ज्या देशात अन्नाची पूजा होते. त्याच देशात अन्नाशी प्रतारणा केली जाते. तेच अन्न उकिरड्यावर प्रचंड मोठ्या प्रमाणात भारतातच फेकले जाते. जेवल्यानंतर ताटात अन्न टाकून देण्याचा प्रघातच आहे.

पात्रात अन्न शिल्लक ठेवण्याचा शिष्टाचार फक्त भारतात आढळतो. ते प्रतिष्ठेचे मानले जाते. ताटातील अन्न सगळे संपविणे हे हावरटाचे लक्षण प्रतिष्ठित समाज मानतो. ताटातील सर्व पदार्थ संपवणाऱ्याला ''न जाणे किती दिवसाचा उपाशी आहे'' असे खोचकपणे टोचले जाते. कोणाच्या घरी पाहुणचारासाठी आपण सहज गेलो. तर प्लेटमध्ये पोहे सुकामेवा थोडे टाकून देण्याचा अलिखित नियम आहे. ताटातील ते सर्व संपवायचे नसते. ते गावंढळ पणाचे लक्षण आहे. चहा बरोबर बिस्किटे वाढण्याची पद्धत भारतात आहे. पण ती सर्व बिस्किटे न संप-वण्याचा एक अलिखित दंडक आहे. समजा तुम्ही ती बिस्किटे संपवलीत तर सोम्या गोम्याच्या दृष्टीने तुम्ही गावठी ठरतात. एकूण काय तर, ताटात अन्न टाकून देणे ही सुशिक्षित प्रतिष्ठित समाजाचे सुलक्षण मानले जाते.

परंतु ज्या पाश्चात्त्य लोकांना आपण भारतीय सगळ्याच बाबतीत नाके मुरडतो. ते अन्नाला देव, पूर्णब्रह्म वगैरे वगैरे समजत नाही. पण अन्न फेकणे हे याच पाश्चिमात्य समाजात वर्ज्य असते. त्यांच्याकडे ताटात काही शिल्लक ठेवण्याची परंपरा नाही. समजा तुम्ही तिकडे गेल्यावर ताटात काही शिल्लक ठेवले.

तर तेच पाश्चिमात्य आपल्याकडे हावरट वगैरे भावाने पाहतात. मागे मी एका भारतीय उद्योगपतीचा भारताबाहेरील हॉटेलमधला एक फार मौलिक किस्सा वाचला होता. तो वाचून माझे उर त्या देशाबद्दल

अभिमानाने फुलले होते. आता त्या उद्योगपतीचे नाव आठवत नाही; पण बहुदा ते फ्रान्समध्ये एका हॉटेलवर गेले होते. जेवणासाठी भारता - प्रमाणे चार-पाच पदार्थ मागविले होते. सोबत उद्योगपतीचे कुटुंबीय होते. पैसेवाले असल्यामुळे भरपूर पद्धतीच्या डिश मागवल्या होत्या. काही वेळानंतर जेवण उरकले. त्यांनी वेटरला बोलावून बिल देण्याची विनंती केली. वेटर आल्यावर त्यांनी टेबलावरील साऱ्या थाळ्या अर्ध्या न संपविलेल्या आवस्थेत पाहिल्या. वेटरने नम्रपणे त्या उद्योगपतीला मोठ्या अर्जवतेने सर्व टाकलेले अन्न संपवण्याची विनंती केली. उद्योगपतीने तितक्याच नम्रपणे सांगितले की ''आम्ही या जेवणाचे पैसे देणार आहोत.'' मग वेटरने त्या देशातील अन्न ताटात टाकल्यावरचा कायदा सांगितला. ''जर तुम्ही ताटातील सर्व जेवण संपवले नाही तर... तुम्हाला मोठ्या रकमेचा दंड भरावा लागेल. उद्योगपतीने दंड भरण्याची मंजूर केले. आणि दंड ही भरला. ही घटना स्वतः उद्योगपतीने आपल्या भाषणात भारतीयांना सांगितली होती. पाश्चात्य त्याबाबतीत आपल्या फार पुढे आहेत. मात्र भारतीय अन्नाला देव मानतात आणि त्याच देवाला उकिरड्यात फेकतात. भारतीय ताटात उष्टे अन्न टाकण्याच्या बाबतीत जगात आघाडीवर आहेत.

भारतातील प्रत्येक हॉटेलात दररोज क्विंटलवारी अन्न खरखटे म्हणून फेकले जाते. मी तरी कोणत्याच हॉटेलात ''ताटातील सर्व अन्न संपवावे.'' अशी सूचना लावलेली कुठे दिसली नाही. कारण आम्ही भारतीय याबाबतीत फक्त धंदा पाहतो. असे लिहिले तर आपल्या धंद्यावर परिणाम होईल; म्हणून कोणी हॉटेल मालक हे धाडस करत नाही. त्यामुळे लाखो टन रोज अन्न फुकट जाते. अन्नाला देव मानणाऱ्या देशात देवालाच उकिरड्यावर फेकले जाते. मला असं नक्की आठवत नाही. पण भारतातील एका हॉटेल मालकाने एक अभिनव उपक्रम हॉटेलमध्ये राबवला होता. त्यांनी हॉटेलमध्ये कालच्या दिनांकाला किती अन्न लोकांनी ताटात टाकून दिले. हे किलोग्रामच्या प्रमाणात रोज लिहिले जाई. याचा चांगला परिणाम लोकांवर झाला होता. ही सूचना पाहून लोक ताटात अन्न टाकण्याचे कमी झाले होते. भारतातील हॉटेल मालकांनी याविषयी चिंतन करण्याची गरज आहे. तर फार मोठ्या प्रमाणात वाया जाणारे अन्न वाचले जाईल. डब्ल्यू एच ओ च्या एका अहवालानुसार दरवर्षी जगात एक कोटी दहा लाख लोक भूकबळीचे शिकार ठरतात. अजूनही आकडा वाढण्याची शक्यता आहे. आपल्या ताटातील अन्न टाकल्यावर प्रतिष्ठा मिळते. असे समजणारा भारतीय जगाच्या पाठीवर एकमेव असेल.

आपल्या देशात अन्नाची नासाडी जर कुठे मोठ्या प्रमाणात होत असेल, तर ते म्हणजे लग्न समारंभात. खोट्या प्रतिष्ठेसाठी आपली ऐपत नसताना सुध्दा मेजवानीत पदार्थांची रेलचेल ठेवली जाते. पसंती नुसार आपण जेवण स्वतःच स्वतःच्याच हाताने घ्यायचे. म्हणजे बुफे पद्धत. म्हणजे लागेल तेवढेच घ्या. याचा उलट परिणाम होतो. आधाशा सारखे लोक ताट भरभरून पदार्थ घेतात. आणि त्यातील निम्मे न खाता ताटात तसेच टाकून दिले जाते. याचे सोयरसुतक कोणालाच नसते. यात पैसा वाया जातो आणि अन्नही वाया जाते. बरे अन्न तयार व्हायला एक वर्ष लागतो. किंवा किमान सहा महिने तरी पक्के लागतात. याच अन्नासाठी शेतकऱ्याला उन्हात तान्हात रक्त आटवावे लागते. हे तरी लक्षात असू द्या. आपण इतके बे फिकिर तरी कसे? कोणत्याही इंटरनेटच्या साइटवरून धान्य डाऊनलोड करता येत नाही. किंवा कुठल्या कारखान्यात ते लगेच यंत्रातून बाहेर येत नाही. यासाठी एक मोठी प्रक्रिया असते आणि ही प्रक्रिया निसर्गाच्या मनानुसार होत असते. अगोदर जमिनीची मशागत करावी लागते. मग बी पेरावे लागते. त्या बियांचे संगोपन करावे लागते. मशागत करावी लागते. शेतकऱ्याला ऊन पावसात घाम गाळावा लागतो. निसर्गातील संकटांशी दोन हात करावे लागतात. तेव्हा कुठे आपण पोटभर अन्न खातो. मग खाल्ल्या अन्नाला आपण जागत का नाही? इतके आपण क्रियानिष्ठ माणसे कशी झालो? याचा विषाद वाटतो.

आता यावर तथाकथित बरेच समाज सुधारक, अंधश्रद्धावाले म्हणतांना पाहिलेत की आपण देवाला दहा रुपयाचे दूध अर्पण करतो. ते पण तर फुकट जाते? ही यांना अंधश्रद्धा वाटते. मात्र यांच्या घरच्या कार्यात लग्न समारंभात टनभर अन्न फेकताना यांना काहीच वाटत नाही. असो, असा समाजसेवेचा बुरखाधारण केलेल्या माणसाला कुठल्याच हॉटेल मालकाला एक प्रेमाचा सल्ला का बर देता येत नाही. अन्न वाचवून ते गरिबाच्या पदरात टाकणे म्हणजे पण जनतेची सेवा करून पुण्य पदरात मिळतात. हे या तथाकथित समाजसेवकांना अजून का बरं उमगले नाही? मला कोणता समाजसेवक यावर काम करताना दिसला नाही. त्याला फक्त मंदिरातील देवाला अर्पण केलेले फुले, पाणी, दूध हे पदार्थ वाया जाताना दिसतात. मग स्वतःच्या घरच्या लग्न कार्यात लाखभर किलो अन्न फेकून देताना स्वत:ची कीव कशी येत नाही?

आर.बी.आय.चे २००५ मध्ये असणारे गव्हर्नर विमल जालान यांच्या पत्नी दिव्या जालन यांच्याबरोबर मला काम करण्याची संधी मिळाली. त्यांच्या स्वभावातून बरेच काही शिकता आले. आमचा प्रकल्प वसई तालुक्यातील शाळांमध्ये चालू होता. शनिवारी आम्ही सारे कार्यालयात याबाबत चर्चा करण्यासाठी एकत्र असायचो. आयशर कंपनी आमच्या प्रकल्पाला फंड देत होती. त्यामुळे आयशर कंपनीमध्येच एका प्रशस्त हॉलमध्ये आमचे कार्यालय होते. अर्थात कंपनीचे स्वतःचे उपहारगृह होते. ती सुविधा कंपनीने आम्हालाही देऊ केली होती. म्हणजे कॅन्टीन होती. तेथे जेवणाची आमची पण सोय असायची. दिव्या जालान तशा खूप साध्या स्वभावच्या होत्या. कोणताही बडेजावपणा त्यांच्या राहणीमानात मला जाणवला नाही. त्यामुळे त्या नेहमी आमच्या सोबतच जेवायला कॅन्टीनमध्ये येत असत. एकदा आम्ही दुपारच्यावेळी जेवायला सर्व आठ दहा जण एका टेबलावर बसलो होतो. पुरुषांमध्ये आम्ही दोघेच शिक्षक होतो. मी आणि एक गणेश पटेल नावाचा माझा मित्र. बाकी सगळ्या महिलाच होत्या. आम्ही सवयीप्रमाणे जेवायला बसलो.

सवयीप्रमाणे पटापटा जेवण उरकून ताटात भरपूर खरकटे टाकून दिले आणि इतर सहकाऱ्यांची जेवण उरकण्याची वाट पाहू लागलो. पंधरा-वीस मिनिटांनी सगळ्यांची जेवण उरकली. माझ्या अगदी समोरच दिव्या जालनबाई बसल्या होत्या. त्यांचे ताट पाहून मला खूपच लाज वाटली. त्यांच्या ताटात लसूण, कढीपत्ता, टोमॅटो असं काही शिल्लक नव्हते. ताट आरशासारखे लखलखीत झाले होते.

आमच्या सर्व सहकाऱ्यांच्या ताटाची अवस्था बहुदा माझ्या सारखीच होती. दिव्याबाईंचे स्वच्छ ताट पाहून गणेशने मला डोळ्यांनी खूण केली. त्या अगोदर मी ही त्यांचे ताट निहाळले होते. मला माझे ताट पाहून शरम वाटली. किंबहुना दिव्या बाईंनाही ही गोष्ट जाणवली होती. पण त्यांनी ते आम्हाला बोलून दाखवले नाही. मग मी मुद्दाहून हाच विषय मुद्दाम टेबलावर चर्चेला घेतला. ''मॅडम तुमचे ताट खूप स्वच्छ असते हो?'' त्यावर दिव्या बाई म्हणाल्या- ''धनाजी कडीपत्ता खाने की चीज है. टोमॅटो खाने की चीज है, लसन खाने की चीज है, इसलिये खाने में उसे डाला जाता है उसे आप क्यू फेकते हो?'' यावर मला समजायचं ते समजले. यावर बोलण्यासारखे माझ्याकडे काही नव्हते. मी अगदी निरुत्तर झालो. गणेशही खजील झाला. बाकीची उरलेले मंडळी खाली मान घालून गुमान हात धुण्यासाठी वॉश बेसिनकडे पळाली. यानंतर बाहेर गेल्यावर मी आणि माझ्या सहकाऱ्याने यावर बरीच चर्चा केली. आणि यापुढे सगळे ताट स्वच्छ ठेवत चला असा एक दुसऱ्याला सल्ला देत चर्चा संपली.

पण या घटनेचा माझ्यावर खूप परिणाम झाला. मी तर शपथ घेतली ''यापुढे ताटात काहीच शिल्लक ठेवणार नाही म्हणून.'' गेल्या वीस पंचवीस वर्षापासून हे कटाक्षाने पालन करत आलेलो आहे. आणि त्या प्रसंगामुळे मलाही या गोष्टीची जाणीव झाली. मला कुणी अन्न ताटात टाकल्यावर खूप वाईट वाटते. पण ही मनाची अवस्था माजोर माणसांना कळायला हवी ना! त्यांची पैशाची नशा उतरायला हवी. शेतकरी तांदळाचा एक दाणाही कचऱ्यात टाकत नाही. कारण त्याला त्या दाण्याची खरी किंमत माहीत असते. म्हणून तो ताटात काही शिल्लक ठेवत नाही. जुनी जाणती मंडळी तर जेवल्यावर ताट धुवून तेच ताटातील पाणी पीत असत. केवढी ही अन्नाबद्दल कृतज्ञता. आता काही मंडळी म्हणतील की लग्नाच्या दहा-बारा किलो अक्षदा फेकल्या जातात त्याचं काय? माझ्या आजीलाही हा प्रश्न एकदा मी विचारला होता. आजीने फार मौलिक उत्तर दिले होते. आजी म्हणाली ''लग्न हे शुभकार्य होय. त्यामध्ये अन्नछत्र व्हावे ही इच्छा असते. त्यामुळे पाहुणेरावळ्यांना बोलावून मानपान करून सुग्रास भोजन वाढले जाते. पण त्या लग्नाला अजूनही फार साक्षीदार असतात. मुंग्या, चिमण्या, कावळे, कोंबड्या, आपण ते आशीर्वाद म्हणून वर वधूच्या डोक्यावर टाकतो. पण हेच दाणे, मुंग्या, कावळे, चिमण्या, कोंबड्या वेचून खातात. त्यानंतर लग्न झाल्यावर, सारे उरकले की अक्षदा कोंबड्या, चिमण्या, मुंग्या आनंदाने खात असतात. आमचे पूर्वज केवढे विचारी होते. ते शुभ कार्य म्हटला की, प्राण्यापक्षाप्रमाणे पंचमहाभूतांचाही विचार करायचे. आज मात्र आम्ही लग्नकार्यात अन्नाची फार मोठी नासाडी करतो. आपण पोटभर जेवून उठतो. तेव्हा जगात कितीतरी लोक उपाशी झोपतात. हे लक्षात असू द्या.

हे कबूल आहे की पैसा तुमचा, अन्न तुम्ही खरेदी करता. पण ते अन्न फेकण्याचा मला कुठलाच अधिकार नाही. अन्न हे पूर्णब्रह्म आहे. मग या पूर्ण ब्रह्माचा सन्मान व्हायला हवाच!

गेल्या सतरा-अठरा वर्षापासून मी आश्रम शाळेत काम करतो. तेथील वस्तीगृहातील मुले जेवणानंतर बरेच खरकटे ताटात तसेच ठेवतात. मी किमान वीस पंचवीस आश्रम शाळेतील मुलांचे निरीक्षण केले. पण मुले ताटात खूप सारे खरकटे ठेवतात. यावर मी प्रबोधनाचे कामही केले. अजून करतो आहे. पण मी खेदाने म्हणतो. मला यात म्हणावे तितके यश आले नाही. रोज मुले किमान पन्नास किलोच्या आसपास खरकटे टाकतात. जर पाचशे मुले पन्नास किलो अन्न फेकतात. तर ही चिंतेची गोष्ट आहे आणि ती ही भारतासारख्या कृषी प्रधान देशातील मुले फेकत असतील आणि ती ही शेतकऱ्याची मुले फेकत असतील, तर ही खूप चिंतेची बाब आहे. याला बरीच कारणे असतील. राज्यातील अकराशे आश्रम शाळांमध्ये या बाबत काही वेगळी परि-स्थिती नाही पन्नास गुणिले अकराशे बरोबर पंचावन्न हजार किलोग्रॅम एका दिवसाचे खरकटे. तर वर्षाचे किती? एवढ्या अन्नाला आम्ही गटारात सोडतो. जर भावी पिढीला याविषयी काही वाटत नसेल, तर पुढे काय? ही नुसती आश्रम शाळांची गोष्ट नाही. किंवा जिल्हा परिषदच्या दुपारच्या भोजनाची गोष्ट नाही. जेथे जेथे भावीपिढी वस्तीगृहात रहाते तेथे ते बहुधा हीच परिस्थिती जाणवते. हे दृष्टचक्र भेदायलाच हवे. मुलांना या विषयावर आम्ही बोलायलाच हवे. आमची भावी पिढी अशी घडत असेल तर पुढे या जगातील उपासमारीला आम्ही भारतीय कसे तोंड देणार आहोत. आणि अन्न फेकल्यानंतर ते पुन्हा वापरता येत नाही. म्हणून ते ताटात असतानाच पूर्णब्रह्म असते. म्हणून या पूर्ण ब्रह्माचा आम्ही आदर केला पाहिजे.

वदनी कवळ घेता नामघ्या श्रीहरीचे
सहज हवन होते नाम घेता फुकाचे ।।
जीवन करी जीवित्व अन्न हे पूर्णब्रह्म
उदरभरण नव्हे जाणिजे यज्ञकर्म ।।

संत रामदास स्वामींनी आम्हाला किती समर्पक शब्दात अन्ना विषयीच्या आपल्या भावना व्यक्त केलेले आहेत. आणि आम्ही काय करतो हे प्रत्येकाने विचार करायला हवे. आणि हे खरकटे अन्न वाचवायचे कसे. याचा आम्ही विचार केला पाहिजे. याची सुरुवात माझ्या घरापासून आणि माझ्यापासून मी करीन अशी प्रत्येकाने प्रतिज्ञा केली पाहिजे. तरच अन्न हे खरोखर पूर्णब्रह्म होईल.

***

अवयवांची सभा

– प्रा. विशाल गरड



एकदा काय झालं, एक व्यक्ती ऑफिस सुटल्यावर त्याच्या गाडीजवळ आली. दोनतीन वेळा स्टार्टर मारला तरी गाडी सुरू न झाल्याने त्याने लागलीच मेकॅनिकला फोन करून बोलावले. काही वेळानं मेकॅनिक आला आणि गाडीचं इंजिन चेक करून गाडीची तत्काळ सर्व्हिसिंग करण्याची सूचना केली. त्या व्यक्तीनं परवानगी दिल्यानंतर मेकॅनिकने गाडी गॅरेजला नेली.

गाडीच्या मालकाने जवळचे लोकल स्टेशन गाठले आणि लोकल च्या गर्दीतून वाट काढत काढत प्रचंड दगदगीनंतर तो घरी पोहोचला. लिफ्ट बंद असल्याने सातव्या मजल्या-पर्यंतच्या पायऱ्या चढत त्या व्यक्तीनं घर गाठला, दारावरची बेल वाजवली. बायकोने दार उघडल्यावर ती व्यक्ती घरात पाय ठेवणार इतक्यात त्याला अटॅक आला आणि काही कळायच्या आतच ती व्यक्ती धाडकन दरवाजातच कोसळली.

बायको प्रचंड घाबरून गेली. आरडाओरडा करायला लागली पण अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या माणसांच्या घराचे दरवाजे बंद असल्याने लवकर आवाज पोहोचला नाही. दहा-पंधरा मिनिटांनंतर खालचा वॉचमन पळत आला. बायकोने ॲम्बुलन्सला फोन केला पण ट्रॅफिकमुळे जवळजवळ पाऊण तासाने ॲम्बुलन्स घरी पोहोचली. अटॅकनंतर सुमारे दोन तासांनी त्या व्यक्तीला दवाखान्यात पोहोचवायला यश आले. डॉक्टरांनी सर्व चेकअप केल्यानंतर रक्तवाहिन्यात ब्लॉकेज असल्याचे सांगितले. त्यांच्यावर तत्काळ अँजिओप्लास्टी करावी लागेल. बायकोच्या परवानगीने त्या व्यक्तीला लगेच ऑपरेशन थिएटर मध्ये घेतले आणि त्याची अँजिओप्लास्टी झाल्यावर खबरदारी म्हणून त्याला अतिदक्षता विभागात ठेवण्यात आलं.

तो बेशुद्ध अवस्थेत असताना त्याच्या शरीरातील सर्व अवयवांनी बाहेर येऊन सभा भरवली आणि घरातून इथपर्यंत यायची वेळ त्याच्यावर का आली? याची कारणे देऊ लागले. सभेच्या अध्यक्षस्थानी अर्थातच मेंदू असल्याने त्याच्यासमोर प्रत्येक अवयवाने आपापल्या तक्रारींचा पाढा वाचून दाखवायला सुरुवात केली.

हृदय : अध्यक्ष महोदय, माणूस त्याची गाडी नीट चालावी म्हणून सर्व्हिसिंग करतो पण शरीराच्या सर्व्हिसिंगकडे मात्र साफ दुर्लक्ष करतो. अहो, माझ्या आरोग्यासाठी मी दिवसभरातील फक्त पंचेचाळीस मिनिटे तरी त्यानं चालावं म्हणून विनंती करतो पण हा माणूस ऑफिसच्या तीन पायऱ्या आणि गाडीपर्यंतच्या पाच-पन्नास पावलां-व्यतिरिक्त चालत नाही. माझ्या नाका तोंडात घाण साचल्याने मी पूर्ण क्षमतेने रक्ताभिसरण करू शकत नाही. या आधीही त्याला तीनचार वेळा धाप लावून दिली पण तरीही यानं दुर्लक्ष केलं. त्याचवेळी चेकअप केलं असते तर आज इथं असं पडून राहायची वेळ आली नसती.

तोंड : माझ्यावर तर प्रचंड अत्याच्यार सुरू आहे. जे कधी चघळायला नको होतं त्याच गुटखा, मावा, खर्रा मधील सुपाऱ्यांना रवंथ केल्यासारखं चघळत बसावं लागतं. त्या कामात माझी कितीतरी लाळ रोज वाया जाते. शिवाय इकडं तिकडे भिंतीवर रस्त्यावर थुंकून घाण झाल्यानं मनाला वाईट वाटतं पण हा माणूस ऐकेल तर नवलच. तंबाखू आणि सिगारेटचं याला इतकं वेड लागलंय की एक वेळ जेवण नसलं तरी चालेल पण या गोष्टी याच्या खिशात हमखास सापडतील.

पाय : माझा तर उपयोग नेमका चालण्यासाठी आहे का गाडींचे क्लच आणि ब्रेक दाबण्यासाठी आहे, हेच समजत नाही. दिवसाकाठी थोडेही चालत नाही हा माणूस. जरा कुठं मोकळं व्हावं म्हटले की हा मटकन बसतो जाग्यावर. घरात सोफ्यावर बसतो, बाहेर जाताना गाडीत बसतो, ऑफिसात खुर्चीवर बसतो आणि घरी आल्यावर बेडवर झोपतो.

माझी तर चालायची सवयच मोडली आहे. किती वर्ष झाली मी तळपायाची जाड त्वचा जमिनीला टेकवलेलीच नाही. मातीशी संपर्क येऊन कित्येक महिने लोटलेत.

यकृत : माझ्यावर तर नुसता अल्कोहोलचा पाऊस सुरू आहे. अरे माझी क्षमता किती, आकार किती, वजन किती आणि तरीही आजवर मी या माणसाच्या दिवसाकाठी दोन दोन तर कधी तीन तीन क्वार्टर पचवत आलोय. याच्या गाडीत तो प्रमाणापेक्षा जास्त ऑइल नाही टाकत, प्रमाणापेक्षा जास्त पेट्रोल नाही टाकत पण पोटात मात्र दारू टाकण्याचे याचं प्रमाण वरचेवर वाढतच चाललंय. वीकएण्डला तर याची मौज होते पण दोन दिवस मला ओव्हरटाइम करावा लागतो.

पोट : अरे माझी गत तर त्या कचराकुंडीपेक्षा बेकार झाली आहे. कारण कचरा कुंडीत फक्त एखाद्या वस्तूची आवरणे पडतात पण त्यात असलेला सगळा पदार्थ मलाच पचवावा लागतो. कसली कसली प्रिझर्वेटिव्ह, शीतपेयांमधली साखर, मैदा आणि चुकीच्या तेलानं पुरती वाट लावली आहे. अहोरात्र काम केलं तरी या माणसानं पोटात टाकलेला लोड वेळेत पचवणे आता मला कठीण जात आहे. त्यात हा माणूस ऑफिसमध्ये रोज दहा-बारा कप चहा पितो. त्याची साखर पचवण्या तच माझी ऊर्जा खर्च होते.

किडनी : माझ्यावर कामाचा इतका लोड झालाय, की या माणसाच्या रक्तात इतक्या प्रमाणात गोळ्या आणि ड्रग्ज आहेत की त्याला फिल्टर करता करता आम्ही वैतागून जातोय. याच्या शरीरातील विषारी पदार्थ बाहेर उत्सर्जित करून करून शेवटी आम्ही दमून जातो पण रक्त अशुद्ध करण्याच्या गोष्टी ग्रहण करण्यात हा माणूस काही दमत नाही. आता आम्हीही निकामी होण्याच्या मार्गावर येऊन ठेपलो आहोत. सगळ्यांचे ऐकून घेतल्यावर शेवटी मेंदू बोलू लागतो.

मेंदू : अरे, मी तर तुम्हा सगळ्यांचा मॅनेजर आहे पण आज तुमच्या सर्वांच्या अडचणी समजून घेता घेता, डोळ्यांनी आणि कानांनी माझ्यात शिरलेला स्ट्रेस दूर करता करता रक्तवाहिन्या फुटण्याची वेळ आली आहे, तुम्ही सर्व जण रात्री आराम तरी करतात पण मला मात्र दोन शिफ्टमध्ये काम करावं लागते. स्वतःच्या अडचणी दूर करत करत तुम्हाला सूचना देऊन शक्य तो प्रयत्न करून माणूस जिवंत ठेवावा लागतो. पण माणसाला माझ्या कामाची कदर नाही. भौतिक वस्तूंच्या आमिषापोटी तो पैशांच्या इतके मागे लागलाय की त्याचे अवयव हीच त्याची सर्वोच्च संपत्ती असल्याचे तो विसरलाय. निर्जीव वस्तूंना जीव लावलाय, झोप हे माझ्या आरोग्यासाठी अत्यंत महत्त्वाची पण हल्ली रात्री सुद्धा तो कामच करत बसायलाय. कधी सुट्टी असली तर लेट नाइट पार्ट्या करायलाय आणि रात्र रात्र जागून वेबसीरिज बघायलाय.

मेंदूचे बोलणे ऐकून झाल्यावर सर्व अवयवांनी त्यालाच विनंती केली, की त्याने माणसाला योग्य ती समज द्यावी. अवयवांचा ठराव झाल्याने मेंदू माणसाला अखेरचा निर्वाणीचा इशारा देत म्हणाला, ''हे बघ माणसा, तुझ्या जन्मापासून आजतागायत विनामोबदला तुला अविरत सेवा पुरवतोय. जेवढी काळजी तू तुझ्या गाडीची घेतोस तेवढीच जर आमची घेतलीस, तर तुला पुन्हा दवाखान्याची पायरी चढण्याची वेळ आम्ही तुझ्यावर आणणार नाहीत. मला माहीत आहे स्टॉक वर तुझा पन्नास लाखांचा पोर्टफोलिओ आहे, या शहरात उच्चभ्रू सोसायटीत तुझे तीन फ्लॅट आहेत, तुझ्या बँक अकाउंटमध्ये करोडो रुपयांच्या ठेवी आहेत. तुझ्याकडे पस्तीस लाखांची कार आहे. पण जर तू इथून पुढे आमची काळजी घेणार नसशील, तर या वेळी तुला निदान दवाखान्यापर्यंत पोहोचण्याची तरी मुभा दिली. पुढील अटॅकला दुसरा श्वास घेण्याचीही उसंत देणार नाही. पडल्या ठिकाणाहून थेट तुझी रवानगी स्मशानात असेल. याद राख.''

(लेखक हे प्रसिद्ध व्याख्याते आणि इतिहास व विविध सामाजिक घडामोडींचे अभ्यासक आहेत.)

***

आमचे प्रेरणास्थान



।। श्री वाढेश्वर प्रसन्न ।।



प्रशांत अनंतराव हर्णसकर

सिव्हिल इंजिनियर आणि कॉन्ट्रॅक्टर

सर्व प्रकारचे बंगले बांधकाम, नुतनीकरण आणि देखभालीची कामे खात्रीने योग्य भावात करून मिळतील.

ऑफिस : राऊतबाग, बि.नं. सी-२, फ्लॅट नं. २८, ३ रा मजला, धनकवडी, पुणे ४११ ०४३.
फोन : (०२०) २४३७२१५१ मो. : ९८२२७८८८४२.



विट कारखाना

प्रोप्रा. : धनंजय रमेश हर्णसकर

५०३, नागोबा आळी, भोर, पुणे ४११ २०६.
फोन : निवास - (०२११३) २२२७७३
मोबाईल - ९८२२२७२४७३

प्रेरणास्थान : रमेश बाबुराव हर्णसकर



श्री गणेश मेडिकल अँण्ड जनरल स्टोअर्स

प्रोप्रा. : गणेश रमेश हर्णसकर

मोबाईल - ९८२२४२६२७३

सम्राट चौक, भोर, जि. पुणे. फोन : (०२११३) २२२०८४

सुख कशात आहे ?

- डॉ. सुनील दादा पाटील

मानवी जीवनाचा एक अविभाज्य भाग म्हणजे सुख. प्रत्येकाची इच्छा असते की आपण आनंदी आणि समाधानी असावे. पण हे सुख कशात आहे? हे प्रश्न अनेकांना सतावतो. सुखाची व्याख्या व्यक्तीनुसार आणि परिस्थितीनुसार बदलू शकते. काहींसाठी, सुख म्हणजे भौतिक सुखसुविधा आणि ऐश्वर्य. काहींना प्रेम, स्नेह आणि आनंदी नातेसंबंध महत्त्वाचे वाटतात. तर काहींना आत्म-परागती आणि ज्ञानाची प्राप्ती सुखकारक वाटते. तथापि, काही सामान्य गोष्टी आहेत ज्यामुळे आपल्याला सुख मिळू शकते.

सकारात्मक दृष्टीकोन : जीवनातील चांगल्या गोष्टींकडे लक्ष देणे आणि नकारात्मक विचारांना दूर ठेवणे.

कृतज्ञता : आपल्याकडे असलेल्या गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे.

मदत करणे : इतरांना मदत करणे आणि त्यांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणणे.

नवीन अनुभव : नवीन गोष्टी करून आणि नवीन ठिकाणी प्रवास करून जीवनाचा आनंद घेणे.

संबंध : कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवणे आणि मजबूत संबंध निर्माण करणे.

आरोग्य : शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे.

आत्म-स्वीकृती : आपण कोण आहोत आणि आपण काय करू शकतो याबद्दल स्वीकार करणे.

ध्यान : ध्यान आणि योगासने यांसारख्या सरावांद्वारे मन शांत करणे.

जीवनाचा उद्देश : आपल्या जीवनाला अर्थ आणि उद्देश देणारे काहीतरी शोधणे.

हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की सुख हे एक स्थिर अवस्था नाही. जीवनात चढ-उतार येत असतात आणि कधीकधी आपण दु:खी किंवा निराश होतो. हे पूर्णपणे नैसर्गिक आहे. महत्त्वाचे म्हणजे आपण नकारात्मक भावनांमध्ये अडकून न राहता, त्यातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करणे आणि पुन्हा आनंद शोधणे.

सुख आपल्या हातात आहे. आपण निवड करू शकतो की आपण आपल्या जीवनावर लक्ष केंद्रित करू इच्छितो की नकारात्मक गोष्टींवर. आपण निवड करू शकतो की आपण कृतज्ञ राहू इच्छितो की नेहमीच तक्रार करत राहू इच्छितो. आपण निवड करू शकतो की आपण आनंद शोधू इच्छितो किंवा दु:खात राहू इच्छितो. निवड आपली आहे.

सुख : एका अमूर्त कल्पनेचे दर्शन - मानवी जीवनाचा अविभाज्य भाग म्हणजे सुख. हे असे एक अमूर्त भाव आहे ज्याची व्याख्या आणि प्राप्ती प्रत्येक व्यक्तीसाठी वेगवेगळी असते. ऋषीमुनी, दार्शनिक, मानसशास्त्रज्ञ आणि सामान्य माणूस - सर्वांनी या अमूल्य अनुभवाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.

सुखाची व्याख्या : आनंद आणि समाधान : सकारात्मक भावनांनी परिपूर्ण एक मन:स्थिती.

शारीरिक आणि मानसिक आरोग्य : रोगमुक्त आणि आरामदायी जीवन.

प्रेम आणि संबंध : कुटुंब, मित्र आणि प्रिय व्यक्तींशी मजबूत आणि सकारात्मक संबंध.

आत्म-पूर्णता : क्षमतांचा विकास आणि जीवनात उद्देशपूर्णता प्राप्त करणे.

कृतज्ञता : आपल्याकडे असलेल्या गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे आणि सकारात्मक दृष्टीकोन राखणे.

सुख प्राप्तीचे मार्ग :

भौतिक सुखसुविधा : चांगले निवासस्थान, अन्न, कपडे आणि आरोग्य सुविधा यासारख्या मूलभूत गरजा पूर्ण करणे.

सकारात्मक विचार : नकारात्मक विचारांना दूर ठेवून आणि कृतज्ञतेवर लक्ष केंद्रित करून सकारात्मक दृष्टीकोन राखणे.

संबंधांवर गुंतवणूक : कुटुंब आणि मित्रांसोबत वेळ घालवून आणि मजबूत संबंध निर्माण करणे.

मदत करणे : इतरांना मदत करून आणि समाजात सकारात्मक योगदान देऊन आनंद शोधणे.

नवीन अनुभव : नवीन गोष्टी करून आणि नवीन ठिकाणी प्रवास करून जीवनाचा आनंद घेणे.

आत्म-देखभाल : शारीरिक आणि मानसिक आरोग्याची काळजी घेणे, पुरेशी झोप घेणे आणि निरोगी आहार घेणे.

ध्यान आणि मन:शांती : ध्यान, योग आणि इतर सरावांद्वारे मन शांत करणे.

जीवनाचा उद्देश : आपल्या जीवनाला अर्थ आणि उद्देश देणारे काहीतरी शोधणे.

सुख हे क्षणभंगुर आहे का? : सुख ही एक स्थिर अवस्था नाही हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे. जीवनात चढ-उतार येत असतात आणि कधीकधी आपण दु:खी किंवा निराश होतो. हे पूर्णपणे नैसर्गिक आहे. महत्त्वाचे म्हणजे आपण नकारात्मक भावनांमध्ये अडकून न राहता, त्यातून लवकर बाहेर पडण्याचा प्रयत्न करणे आणि पुन्हा आनंद शोधणे. सुख हे आपल्या हातात आहे. आपण निवड करू शकतो की आपण आपल्या जीवनावर लक्ष केंद्रित करू इच्छितो की नकारात्मक गोष्टींवर. आपण निवड करू शकतो की आपण कृतज्ञ राहू इच्छितो की नेहमीच तक्रार करत राहू इच्छितो. आपण निवड करू शकतो की आपण आनंद शोधू इच्छितो किंवा दु:खात राहू इच्छितो. निवड आपली आहे.

भौतिक सुखसुविधा आणि ऐश्वर्य : एका मोहक कल्पनेचे दोन पैलू मानवी इतिहासात, भौतिक सुखसुविधा आणि ऐश्वर्य यांनी नेहमीच लोकांना आकर्षित केले आहे. चांगले निवासस्थान, अन्न, कपडे आणि इतर वस्तूंची इच्छा ही एक नैसर्गिक वृत्ती आहे जी जीवनात सुरक्षा आणि आराम प्रदान करते. तथापि, या मोहक कल्पनेचे दोन पैलू आहेत : सकारात्मक आणि नकारात्मक.

सकारात्मक पैलू :

जीवनमान सुधारणे : भौतिक सुखसुविधा आणि ऐश्वर्य जीवनाची गुणवत्ता लक्षणीयरीत्या सुधारू शकतात. चांगल्या निवासस्थानामुळे निवारा आणि संरक्षण मिळते, तर पौष्टिक आहार आणि योग्य कपडे चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक आहेत. शिक्षण आणि आरोग्यसेवा यांसारख्या सुविधांमध्ये प्रवेशामुळे व्यक्ती अधिक पूर्ण क्षमतेने विकसित होऊ शकतात.

आर्थिक सुरक्षा : भौतिक संपत्ती आणि उत्पन्न वाढल्याने आर्थिक सुरक्षा आणि स्थिरता मिळते. अप्रत्यक्षित घटनांसाठी बचत करण्याची आणि भविष्यातील गरजा पूर्ण करण्याची क्षमता मिळते.

सामाजिक प्रतिष्ठा : अनेक समाजांमध्ये, भौतिक संपत्ती आणि यशाला सामाजिक प्रतिष्ठेचा आणि आदराचा मार्ग मानला जातो. यामुळे आत्मविश्वास आणि आत्मसन्मान वाढू शकतो.

नवीन अनुभव आणि संधी : ऐश्वर्य नवीन अनुभव आणि संधींचे दार उघडू शकते. प्रवास, शिक्षण, सांस्कृतिक अनुभव आणि इतर मनोरंजक क्रियाकलापांमध्ये सहभागी होण्यासाठी अधिक संधी उपलब्ध होतात.

नकारात्मक पैलू :

अति लोभ आणि मत्सर : अत्याधिक भौतिकवाद आणि ऐश्वर्याची इच्छा अनेकदा अति लोभ आणि मत्सराला जन्म देऊ शकते. यामुळे नैतिकदृष्ट्या चुकीच्या कृती आणि नातेसंबंधांमध्ये तणाव निर्माण होऊ शकतो.

आनंदावर अवलंबित्व : भौतिक वस्तूंवर पूर्णपणे अवलंबून राहणे हे खोटे समाधान आणि क्षणभंगुर आनंद देऊ शकते. खरे समाधान आणि आनंद आतून येतो, बाहेरील वस्तूंपासून नाही.

असमानता आणि सामाजिक अशांतता : भौतिक संपत्तीतील मोठी असमानता सामाजिक अशांतता आणि संघर्षाला जन्म देऊ शकते. गरीब आणि श्रीमंत यांच्यातील वाढती दरी समाजाला अस्थिर करू शकते.

पर्यावरणीय ऱ्हास : अत्याधिक भौतिकवादामुळे अनावश्यक खरेदी, ऊर्जा आणि संसाधनांचा अपव्यय आणि प्रदूषण वाढू शकते. यामुळे पर्यावरणावर विपरीत परिणाम होऊ शकतो.

भौतिक सुखसुविधा आणि ऐश्वर्य हे जीवनाचे महत्त्वाचे घटक असू शकतात, परंतु ते सर्वस्व नाहीत. आनंदी आणि पूर्ण जीवन जगण्यासाठी, आपण भौतिक संपत्ती आणि आंतरिक समाधानाचा समतोल साधणे आवश्यक आहे. भौतिक वस्तूंचा वापर आपल्या जीवनात सुधारणा आणि आनंद आणण्यासाठी करा, परंतु त्यांच्यावर पूर्णपणे अवलंबून राहू नका. आपल्या आध्यात्मिक, सामाजिक आणि भावनिक गरजा पूर्ण करण्यावर लक्ष केंद्रित करा.

प्रेम, स्नेह आणि आनंदी नातेसंबंध : जीवनाचा पाया

मानवी जीवनात प्रेम, स्नेह आणि आनंदी नातेसंबंध हे अत्यंत महत्त्वपूर्ण घटक आहेत. हे आपल्याला इतरांशी जोडतात, आपल्याला आधार देतात आणि आपल्याला पूर्ण आणि समाधानी बनवतात.

प्रेम : प्रेम ही एक जटिल भावना आहे जी अनेक प्रकारे व्यक्त केली जाऊ शकते. रोमँटिक प्रेम, कुटुंबातील प्रेम, मित्रांचे प्रेम आणि मानवजातीचे प्रेम यासारख्या अनेक प्रकारचे प्रेम आहे. प्रेम आपल्याला इतरांशी खोलवर जोडून ठेवते आणि आपल्याला एकटे आणि वेगळे वाटण्यापासून वाचवते.

स्नेह : स्नेह ही प्रेमाची एक विशेष प्रकारची भावना आहे जी मजबूत बंध आणि विश्वास निर्माण करते. मित्रांमध्ये, कुटुंबातील सदस्यांमध्ये आणि इतर जवळच्या लोकांमध्ये स्नेह दिसून येतो. स्नेह आपल्याला समजून घेण्याची आणि स्वीकारण्याची भावना देतो आणि आपल्याला कठीण परिस्थितीतून जाण्यास मदत करते.

आनंदी नातेसंबंध : आनंदी नातेसंबंध हे प्रेम आणि स्नेहावर आधारित असतात. ते विश्वास, आदर, संवाद आणि समजुतीने भरलेले असतात. आनंदी नातेसंबंध आपल्याला प्रेम, आधार आणि आनंद देतात. ते आपल्याला जीवनात उद्देश आणि अर्थ देतात.

आनंदी नातेसंबंध कसे निर्माण करायचे :

प्रामाणिकपणा आणि विश्वास : आपल्या भावना आणि विचारां-बद्दल प्रामाणिक रहा आणि आपल्या जोडीदारावर विश्वास ठेवा.

संवाद : आपल्या जोडीदाराशी नियमितपणे आणि प्रामाणिकपणे संवाद साधा.

आदर : आपल्या जोडीदाराच्या भावना, विचार आणि गरजा आदराने स्वीकारा.

समजूतदारपणा : आपल्या जोडीदाराच्या दृष्टिकोनातून गोष्टी पाहण्याचा प्रयत्न करा आणि त्यांच्या भावना समजून घ्या.

क्षमा : चुका घडतात आणि क्षमा करण्याची तयारी ठेवा.

समय आणि प्रयत्न : नातेसंबंध मजबूत करण्यासाठी वेळ आणि प्रयत्न करा.

प्रेम, स्नेह आणि आनंदी नातेसंबंध हे जीवनाचे अमूल्य भेटवस्तू आहेत. ते आपल्याला पूर्ण आणि समाधानी बनवतात आणि आपल्याला जीवनात उद्देश आणि अर्थ देतात. आपल्या नातेसंबंधांना प्राधान्य द्या, त्यांची काळजी घ्या आणि त्यांचे पोषण करा. ते आपल्याला आनंद आणि समाधानाचा मार्ग दाखवतील. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की प्रत्येक नातेसंबंध वेगळा असतो आणि त्यासाठी कोणताही एक योग्य मार्ग नाही. आपल्यासाठी आणि आपल्या जोडीदारासाठी काय कार्य करते हे शोधणे महत्त्वाचे आहे.

आत्म-परागती आणि ज्ञानाची प्राप्ती : जीवनाचा प्रवास

मानवी जीवनात प्रगती आणि ज्ञान हे दोन अत्यंत महत्त्वपूर्ण स्तंभ आहेत. आत्म-परागती आपल्याला जीवनात उद्देश आणि अर्थ देते, तर ज्ञान आपल्याला जग समजून घेण्यास आणि त्यात योगदान देण्यास मदत करते.

आत्म-परागती : आत्म-परागती म्हणजे आपल्या क्षमतेचा विकास आणि आपल्या जीवनात चांगल्यासाठी बदल घडवून आणणे. यात आपल्या कौशल्यांचा विकास, आपल्या ध्येयांचा पाठपुरावा आणि आपल्या जीवनातील नकारात्मक गोष्टींवर मात करणे समाविष्ट आहे.

आत्म-परागतीचे फायदे :

आत्मविश्वास आणि आत्मसन्मान वाढवणे.

चांगल्या संधी आणि यशाची शक्यता वाढवणे.

अधिक पूर्ण आणि समाधानी जीवन जगणे.

इतरांना प्रेरणा देणे आणि प्रेरणा देणे.

आत्म-परागतीसाठी टिपा :

ध्येय निश्चित करा : आपल्या जीवनात काय साध्य करायचे आहे याची स्पष्ट कल्पना ठेवा.

योजना बनवा : आपल्या ध्येयांना कसे साध्य करायचे याची योजना बनवा आणि त्यानुसार कृती करा.

शिकत रहा : नवीन कौशल्ये शिका आणि आपले ज्ञान वाढवा.

नकारात्मक विचारांवर मात करा : सकारात्मक दृष्टीकोन ठेवा आणि आपल्या क्षमतेवर विश्वास ठेवा.

इतरांकडून प्रेरणा घ्या : आपल्यापेक्षा यशस्वी लोकांकडून प्रेरणा घ्या.

हट्टी रहा : आपल्या ध्येयांपासून कधीही हार मानू नका.

ज्ञान : ज्ञान म्हणजे माहिती आणि समजुतीचा संग्रह. हे आपल्याला जगाबद्दल शिकण्यास, निर्णय घेण्यास आणि समस्या सोडवण्यास मदत करते.

ज्ञानाचे फायदे :

आपले जीवन सुधारण्यासाठी नवीन कल्पना आणि संधी शोधणे.

इतरांशी चांगल्या प्रकारे संवाद साधणे आणि संबंध निर्माण करणे.

आपल्या समुदायात आणि जगात योगदान देणे.

अधिक पूर्ण आणि अर्थपूर्ण जीवन जगणे.

ज्ञानाची प्राप्ती कशी करावी :

वाचन : पुस्तके, लेख आणि इतर साहित्य वाचा.

शिक्षण : शाळा, महाविद्यालय आणि इतर शैक्षणिक संस्थांमध्ये शिक्षण घ्या.

अनुभव : नवीन गोष्टींचा अनुभव घ्या आणि जगाबद्दल अधिक जाणून घ्या.

इतरांकडून शिका : अनुभवी आणि ज्ञानी लोकांकडून शिका.

खुले विचार ठेवा : नवीन कल्पना आणि दृष्टिकोनांसाठी खुले रहा.

आत्म-परागती आणि ज्ञान हे दोन्ही जीवनात यशस्वी आणि पूर्ण होण्यासाठी आवश्यक आहेत. आपण आपल्या क्षमतेचा विकास करून आणि आपले ज्ञान वाढवून आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणू शकतो. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की आत्म-परागती आणि ज्ञानाची प्राप्ती ही एक सतत प्रक्रिया आहे. आपण नेहमीच शिकत आणि वाढत राहू शकतो.

सकारात्मक दृष्टीकोन : आनंदी आणि यशस्वी जीवनाचा मार्ग

जीवनात अनेक चढ-उतार येतात. कधी आपण आनंदी आणि यशस्वी असतो तर कधी दु:खी आणि निराश. अशा परिस्थितीत सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे अत्यंत महत्वाचे आहे. सकारात्मक दृष्टीकोन आपल्याला आव्हानांना तोंड देण्यास, संधी ओळखण्यास आणि आपल्या ध्येयापर्यंत पोहचवण्यास मदत करते.

सकारात्मक दृष्टीकोन म्हणजे काय? सकारात्मक दृष्टीकोन म्हणजे जीवनाच्या चांगल्या बाजूंवर लक्ष केंद्रित करणे आणि नकारात्मक विचारांना दूर ठेवणे. यात कृतज्ञता व्यक्त करणे, सकारात्मक विचार करणे आणि आव्हानांना संधी म्हणून पाहणे समाविष्ट आहे.

सकारात्मक दृष्टीकोनाचे फायदे :

मानसिक आरोग्य सुधारणे : सकारात्मक दृष्टीकोन चिंता आणि नैराश्य कमी करण्यास मदत करते आणि आत्मविश्वास आणि आत्मसन्मान वाढवते.

शारीरिक आरोग्य सुधारणे : सकारात्मक दृष्टीकोन रोग प्रतिकार शक्ती मजबूत करते आणि रक्तदाब आणि हृदय गती कमी करते.

संबंध सुधारणे : सकारात्मक दृष्टीकोन इतरांशी आपले संबंध मजबूत करण्यास मदत करते आणि अधिक सकारात्मक आणि समर्थन देणारे नातेसंबंध निर्माण करते.

उत्पादकता वाढवणे : सकारात्मक दृष्टीकोन आपल्याला अधिक प्रेरित आणि केंद्रित राहण्यास मदत करते, ज्यामुळे आपली उत्पादकता वाढते.

यशस्वी होण्याची शक्यता वाढवणे : सकारात्मक दृष्टीकोन आपल्याला आव्हानांना तोंड देण्यास आणि आपल्या ध्येयांपर्यंत पोहचण्यास अधिक चांगल्या प्रकारे मदत करते.

सकारात्मक दृष्टीकोन कसा विकसित करायचा :

कृतज्ञता व्यक्त करा : आपल्या जीवनातील चांगल्या गोष्टींबद्दल कृतज्ञता व्यक्त करा, मोठ्या आणि लहान दोन्ही.

सकारात्मक विचार करा : नकारात्मक विचारांना दूर ठेवा आणि सकारात्मक विचारांवर लक्ष केंद्रित करा.

आव्हानांना संधी म्हणून पहा : आव्हानांना नकारात्मक गोष्टी म्हणून पाहण्याऐवजी, त्यांना शिकण्यास आणि वाढण्यास मदत करणारी संधी म्हणून पहा.

इतरांशी सकारात्मक लोकांशी वेळ घालवा : सकारात्मक दृष्टीकोन असलेल्या लोकांसोबत वेळ घालवा.

सकारात्मक पुष्टीकरण वापरा : स्वत:ला सकारात्मक गोष्टी सांगा जसे की ''मी सक्षम आहे'' आणि ''मी यशस्वी होईन.''

ध्यान आणि योगा सराव करा : ध्यान आणि योगा आपल्याला

शांत आणि केंद्रित राहण्यास मदत करू शकतात, ज्यामुळे सकारात्मक दृष्टीकोन विकसित होण्यास मदत होते.

सकारात्मक दृष्टीकोन हा जीवनात यशस्वी आणि आनंदी होण्यासाठी एक अत्यंत महत्वाचा घटक आहे. सकारात्मक दृष्टीकोन विकसित करून, आपण आपल्या जीवनात सकारात्मक बदल घडवून आणू शकतो आणि आपल्या पूर्ण क्षमतेपर्यंत पोहोचू शकतो.

कृतज्ञता : आनंद आणि समाधानाचा मार्ग

आपल्या जीवनात अनेक गोष्टी आहेत ज्या आपल्यासाठी इतरांनी केल्या आहेत किंवा ज्या आपल्याला मिळाल्या आहेत त्याबद्दल कृतज्ञता व्यक्त करणे हे एक चांगले गुण आहे. कृतज्ञता ही एक सकारात्मक भावना आहे जी आपल्याला जीवनातील चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते आणि नकारात्मक विचारांना दूर ठेवते. कृतज्ञ व्यक्ती असणे आपल्याला अधिक आनंदी, समाधानी आणि निरोगी बनवू शकते.

कृतज्ञतेचे फायदे :

आनंद आणि समाधान वाढवते : कृतज्ञता व्यक्त केल्याने आपल्या मेंदूमध्ये सकारात्मक भावना निर्माण होतात ज्यामुळे आपण अधिक आनंदी आणि समाधानी होतो.

नकारात्मक विचार कमी करते : कृतज्ञता आपल्याला नकारात्मक विचारांना दूर ठेवण्यास आणि सकारात्मक विचारांवर लक्ष केंद्रित करण्यास मदत करते.

मानसिक आरोग्य सुधारते : कृतज्ञता चिंता आणि नैराश्य कमी करण्यास मदत करते आणि आत्म-सन्मान सुधारते.

शारीरिक आरोग्य सुधारते : कृतज्ञता रोगप्रतिकारशक्ती मजबूत करते, रक्तदाब कमी करते आणि हृदयरोगाचा धोका कमी करते.

संबंध सुधारते : कृतज्ञता व्यक्त केल्याने आपल्या कुटुंब आणि मित्रांसोबतचे संबंध मजबूत होतात आणि अधिक कृतज्ञता व्यक्त करतात.

अधिक चांगल्या गोष्टी आकर्षित करते : कृतज्ञता आपल्याला आपल्या जीवनात अधिक चांगल्या गोष्टी आकर्षित करण्यास मदत करते.

कृतज्ञता व्यक्त कशी करावी :

कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी दररोज काही वेळ द्या : दररोज काही वेळ शांत बसू शकता आणि आपल्या जीवनातील ज्या गोष्टींबद्दल तुम्ही कृतज्ञ आहात त्यांचा विचार करा.

कृतज्ञता व्यक्त करणारे पत्र लिहा: एखाद्या व्यक्तीला त्यांच्यासाठी तुम्ही किती कृतज्ञ आहात हे सांगणारे पत्र लिहा आणि ते त्यांना द्या किंवा पाठवा.

कृतज्ञतेचे जर्नल ठेवा : दररोज तुम्ही ज्या गोष्टींबद्दल कृतज्ञ आहात त्या लिहा.

कृतज्ञता व्यक्त करणारे कृत्य करा : एखाद्यासाठी काहीतरी चांगले करा किंवा एखाद्या चांगल्या कार्यासाठी दान करा.

सकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित करा : आपल्या जीवनातील चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करा आणि नकारात्मक गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्या टाळा.

कृतज्ञता ही एक शक्तिशाली भावना आहे जी आपल्या जीवनात अनेक सकारात्मक बदल घडवून आणू शकते. कृतज्ञ व्यक्ती असणे आपल्याला अधिक आनंदी, समाधानी आणि निरोगी बनवू शकते. आजपासूनच कृतज्ञता व्यक्त करण्यास सुरुवात करा आणि फरक अनुभवा! कृतज्ञता व्यक्त करणे हा एक सराव आहे आणि त्यासाठी वेळ आणि प्रयत्न लागतात. हार मानू नका आणि दररोज थोडीशी कृतज्ञता व्यक्त करण्याचा प्रयत्न करा. लवकरच तुम्ही त्याचे फायदे अनुभवू लागाल.

मदत करणे : जगात फरक करण्याचा मार्ग

मदत करणे ही एक चांगली गोष्ट आहे जी आपल्याला आणि इतरांनाही आनंद देते. आपण आपल्या समुदायातील लोकांना, आपल्या प्रियजनांना आणि अगदी अनोळखी लोकांना मदत करू शकतो. मदत केल्याने आपल्याला जगात चांगल्यासाठी बदल घडवून आणण्यास आणि इतरांच्या जीवनावर सकारात्मक प्रभाव पाडण्यास मदत होते.

मदत करण्याचे फायदे :

आनंद आणि समाधान वाढवते : इतरांना मदत केल्याने आपल्या मेंदूमध्ये सकारात्मक भावना निर्माण होतात ज्यामुळे आपण अधिक आनंदी आणि समाधानी होतो.

आत्मसन्मान वाढवते : इतरांना मदत केल्याने आपल्याला आपल्याबद्दल चांगले वाटते आणि आपला आत्मसन्मान वाढतो.

नवीन कौशल्ये आणि ज्ञान विकसित करते : इतरांना मदत केल्याने आपल्याला नवीन कौशल्ये आणि ज्ञान विकसित करण्याची संधी मिळते.

नवीन लोकांना भेटण्यास आणि नवीन मित्र बनवण्यास मदत करते : इतरांना मदत केल्याने आपल्याला नवीन लोकांना भेटण्यास आणि नवीन मित्र बनवण्यास मदत होते.

समुदायाची भावना निर्माण करते : इतरांना मदत केल्याने आपल्या समुदायात एकत्रितपणा आणि बंधुभावना निर्माण होते.

जगात चांगल्यासाठी बदल घडवून आणण्यास मदत करते : इतरांना मदत केल्याने आपण जगात चांगल्यासाठी बदल घडवून आणू शकतो.

मदत कशी करावी :

स्वयंसेवक : आपल्या समुदायातील एखाद्या संस्थेत स्वयंसेवक म्हणून काम करा.

दान द्या : आपल्या आवडत्या चॅरिटीला दान द्या.

आपला वेळ द्या : आपल्या मित्र, कुटुंब किंवा समुदायातील एखाद्या व्यक्तीला मदत करण्यासाठी आपला वेळ द्या.

रक्तदान करा : रक्तदान करून इतरांचे प्राण वाचवा.

कचरा उचला : आपल्या परिसरातील कचरा उचलून ते स्वच्छ ठेवा.

दार उघडून धरा किंवा कोणाचे सामान उचलण्यास मदत करा : लहान मदत देखील मोठा फरक करू शकते.

कृतज्ञता व्यक्त करा : इतरांच्या चांगल्या कृत्यांबद्दल कृतज्ञता

व्यक्त करा.

एक दयाळू शब्द बोला : दयाळू शब्द एखाद्याच्या दिवसाचा दिवस बदलू शकतो.

मदत करणे ही एक सोपी गोष्ट आहे जी आपल्या जीवनात आणि इतरांच्या जीवनात मोठा फरक करू शकते. आजपासूनच इतरांना मदत करण्यास सुरुवात करा आणि जगाला अधिक चांगले बनवण्यास मदत करा. मदत करण्याचे अनेक मार्ग आहेत. आपल्या आवडीनिवडी आणि कौशल्यांनुसार आपण मदत करण्याचा मार्ग निवडू शकता. लहान मदत देखील मोठा फरक करू शकते, म्हणून आजपासूनच इतरांना मदत करण्यास सुरुवात करा.

नवीन अनुभव : जीवनाचा रस आणि उत्साह

मानवी जीवन हे अनेक अनुभवांनी भरलेले आहे. काही अनुभव सुखद असतात तर काही कटू. काही अनुभव आपल्याला शिकवतात तर काही आपल्याला हसवतात. नवीन अनुभव घेणे हे जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. ते आपल्याला जग आणि स्वत:ला अधिक चांगल्या प्रकारे समजून घेण्यास मदत करतात. ते आपल्याला वाढण्यास, शिकण्यास आणि नवीन गोष्टींचा अनुभव घेण्यास प्रोत्साहित करतात.

नवीन अनुभवांचे फायदे :

दृष्टीकोन वाढवते : नवीन अनुभव आपल्याला जगाकडे नवीन दृष्टिकोनातून पाहण्यास मदत करतात. ते आपल्याला आपल्या पूर्वग्रहांना आव्हान देण्यास आणि नवीन शक्यतांबद्दल विचार करण्यास प्रोत्साहित करतात.

ज्ञान आणि कौशल्ये वाढवते : नवीन अनुभव आपल्याला नवीन गोष्टी शिकण्यास आणि नवीन कौशल्ये विकसित करण्यास मदत करतात. ते आपल्याला अधिक बुद्धिमान आणि सक्षम बनवतात.

आत्मविश्वास वाढवते : नवीन आव्हानांना तोंड देऊन आणि नवीन गोष्टी करून आपण आपला आत्मविश्वास वाढवू शकतो.

आनंद आणि समाधान वाढवते : नवीन अनुभव आपल्याला नवीन गोष्टींचा अनुभव घेण्यास आणि जीवनाचा आनंद घेण्यास मदत करतात. ते आपल्याला अधिक पूर्ण आणि समाधानी बनवतात.

जीवनात अर्थ आणि उद्देश देते : नवीन अनुभव आपल्याला नवीन आव्हाने आणि संधी शोधण्यास मदत करतात. ते आपल्या जीवनात अर्थ आणि उद्देश देतात.

नवीन अनुभव कसे घ्यावे :

आपल्या कम्फर्ट झोनमधून बाहेर पडा : नवीन गोष्टी करण्यास आणि नवीन ठिकाणी जाण्यास घाबरू नका.

नवीन लोकांना भेटा : नवीन लोकांना भेटणे हे नवीन अनुभव घेण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

नवीन छंद आणि आवडीनिवडी शोधा : नवीन छंद आणि आवडीनिवडी शोधणे हे जीवनात मजा आणि उत्साह आणण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

प्रवास करा : प्रवास हा नवीन संस्कृती आणि अनुभवांचा अनुभव घेण्याचा एक उत्तम मार्ग आहे.

नवीन गोष्टी शिका : नवीन भाषा, नवीन कौशल्ये किंवा नवीन विषय शिका.

हो म्हणा : नवीन संधींसाठी हो म्हणण्यास घाबरू नका.

जोखीम घ्या : आपल्या जीवनात थोडीशी जोखीम घेण्यास घाबरू नका.

उघड्या मनाचे रहा : नवीन अनुभवांसाठी खुले रहा आणि जगाकडे नवीन दृष्टिकोनातून पाहण्यास तयार रहा.

नवीन अनुभव घेणे हे जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. ते आपल्याला वाढण्यास, शिकण्यास आणि नवीन गोष्टींचा अनुभव घेण्यास मदत करतात. ते आपल्याला अधिक आनंदी, समाधानी आणि पूर्ण बनवतात. आजपासूनच नवीन अनुभव घेण्यास सुरुवात करा आणि जगाला ऑफर करायचे काय आहे ते पहा! नवीन अनुभव घेताना सुरक्षित आणि जबाबदार असणे महत्त्वाचे आहे. आपल्या मर्यादा ओळखा आणि आपल्याला काय आवडते आणि काय आवडत नाही हे शोधा. नवीन अनुभवांमुळे तुम्हाला आव्हान मिळेल आणि तुम्हाला वाढण्यास मदत होईल.

आरोग्य : एक संपूर्ण दृष्टीकोन

आरोग्य हे केवळ आजारपणापासून मुक्त असणे नाही तर शारीरिक, मानसिक आणि सामाजिकदृष्ट्या पूर्णपणे तंदुरुस्त असण्याची स्थिती आहे. चांगल्या आरोग्यासाठी, आपण शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहणे, संतुलित आहार घेणे आणि पुरेशी झोप घेणे आवश्यक आहे. तसेच, मानसिक तणाव व्यवस्थापित करणे आणि मजबूत सामाजिक संबंध निर्माण करणे देखील महत्त्वाचे आहे.

शारीरिक आरोग्य – शारीरिक आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करणे आवश्यक आहे. आठवड्यातून किमान १५० मिनिटे मध्यम-तीव्रता किंवा ७५ मिनिटे तीव्र-तीव्रता असलेला एरोबिक व्यायाम करण्याचा प्रयत्न करा. शक्ती प्रशिक्षण व्यायाम देखील महत्त्वाचे आहेत, जे आपल्या स्नायू आणि हाडे मजबूत बनवण्यास मदत करतात.

आहार – पौष्टिक आहार घेणे हे चांगल्या आरोग्यासाठी आवश्यक आहे. आपल्या आहारात भरपूर फळे, भाज्या, संपूर्ण धान्य आणि दुधाचे पदार्थ असल्याची खात्री करा. चरबी, साखर आणि मीठ यांचे सेवन मर्यादित करा.

झोप – प्रौढांना रात्री ७-८ तास झोप घेणे आवश्यक आहे. पुरेशी झोप घेतल्याने तुमच्या शरीरास आणि मनास विश्रांती घेण्यास आणि पुन्हा चार्ज करण्यास मदत होते.

मानसिक आरोग्य – मानसिक आरोग्य हे आपल्या विचार, भावना आणि वर्तनावर परिणाम करते. चांगल्या मानसिक आरोग्यासाठी तणाव व्यवस्थापित करणे, सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे आणि मजबूत सामाजिक संबंध निर्माण करणे महत्त्वाचे आहे.

तणाव व्यवस्थापन – तणाव हा आपल्या जीवनाचा एक सामान्य भाग आहे. तथापि, जास्त प्रमाणात तणाव हानिकारक असू शकतो.

तणाव व्यवस्थापित करण्याचे अनेक मार्ग आहेत, जसे की व्यायाम, योग, ध्यान आणि श्वास घेण्याच्या तंत्राचा सराव करणे.

सकारात्मक दृष्टीकोन - सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे तुमच्या मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर ठरू शकते. जीवनातील चांगल्या गोष्टींवर लक्ष केंद्रित करण्याचा प्रयत्न करा आणि नकारात्मक विचारांना आव्हान द्या.

सामाजिक संबंध - मजबूत सामाजिक संबंध असणे हे चांगल्या मानसिक आरोग्यासाठी महत्त्वाचे आहे. प्रियजनांसोबत वेळ घालवा, सामाजिक गटांमध्ये सामील व्हा आणि आपल्या समुदायात स्वयंसेवक म्हणून काम करा.

आरोग्य हे आपल्या जीवनाचा एक महत्त्वाचा भाग आहे. चांगले आरोग्य टिकवून ठेवण्यासाठी, आपण शारीरिकदृष्ट्या सक्रिय राहणे, संतुलित आहार घेणे, पुरेशी झोप घेणे, तणाव व्यवस्थापित करणे, सकारात्मक दृष्टीकोन ठेवणे आणि मजबूत सामाजिक संबंध निर्माण करणे आवश्यक आहे.

आत्म-स्वीकृती : स्वतःला पूर्णपणे स्वीकारणे.

आत्म-स्वीकृती म्हणजे आपण कोण आहोत याची पूर्णपणे जाणीव आणि स्वीकृती. यात आपल्या सकारात्मक आणि नकारात्मक दोन्ही पैलूंचा समावेश आहे, आपल्या ताकद आणि कमकुवतपणा, आपले यश आणि अपयश. आत्म-स्वीकृती ही एक सतत चालणारी प्रक्रिया आहे. आपण आपल्या जीवनात प्रवास करताना आपण सतत बदलत असतो आणि आपल्याला स्वतःला नवीन मार्गांनी स्वीकारण्याची आवश्यकता असते.

आत्म-स्वीकृतीचे महत्त्व - आत्म-स्वीकृती अनेक कारणांसाठी महत्त्वाची आहे. यामुळे आपल्याला :

अधिक आत्मविश्वास वाटू शकतो.

अधिक चांगले संबंध निर्माण करू शकतो.

अधिक लवचिक बनू शकतो.

अधिक आनंदी आणि समाधानी जीवन जगू शकतो.

आत्म-स्वीकृती कशी मिळवायची - आत्म-स्वीकृती मिळवण्यासाठी अनेक गोष्टी करता येतात. येथे काही टिपा आहेत :

स्वतःला क्षमा करा. प्रत्येकाने चुका केल्या आहेत. आपल्या चुकांवरून शिकणे आणि पुढे जाणे महत्त्वाचे आहे.

स्वतःची तुलना इतरांशी करू नका. प्रत्येकाची स्वतःची अनोखी ताकद आणि कमकुवतपणा असतात.

आपल्या भावना स्वीकारा. आपल्या भावना, जरी नकारात्मक असल्या तरीही, त्या मान्य आहेत.

स्वतःची काळजी घ्या. पुरेशी झोप घ्या, निरोगी आहार घ्या आणि नियमित व्यायाम करा.

सकारात्मक लोकांशी वेळ घालवा. सकारात्मक दृष्टीकोन असलेले लोक आपल्याला स्वतःबद्दल चांगले वाटण्यास मदत करू शकतात.

व्यावसायिक मदत घ्या. जर तुम्हाला आत्म-स्वीकृती मिळवण्यास त्रास होत असेल, तर थेरपिस्ट किंवा समुपदेशकाशी बोलणे उपयुक्त ठरू शकते.

आत्म-स्वीकृतीची उदाहरणे - आत्म-स्वीकृती अनेक प्रकारे दिसू शकते. येथे काही उदाहरणे आहेत :

आपल्या शरीराचा स्वीकार करणे. आपण लहान असो वा मोठे, आपण निरोगी असो वा लठ्ठ, आपण सुंदर आहात.

आपल्या भावनांचा स्वीकार करणे. आपण आनंदी, दुःखी, रागावलेले किंवा घाबरलेले असले तरीही, आपल्या भावना मान्य आहेत.

आपल्या चुकांचा स्वीकार करणे. प्रत्येकाने चुका केल्या आहेत. आपल्या चुकांवरून शिकणे आणि पुढे जाणे महत्त्वाचे आहे.

आपल्या मर्यादांचा स्वीकार करणे. आपण सर्वज्ञ किंवा सर्वशक्ति शाली नाही. आपल्या मर्यादांना ओळखणे आणि स्वीकारणे महत्त्वाचे आहे.

आत्म-स्वीकृती ही एक जीवनभर चालणारी प्रक्रिया आहे. ती सोपी नाही, परंतु ती फायदेशीर आहे. आपण स्वतःला पूर्णपणे स्वीकारण्यास शिकल्यावर, आपण अधिक आत्मविश्वासू, आनंदी आणि समाधानी बनू शकतो.

ध्यान : मन शांत करण्याचा मार्ग

ध्यान ही एक मानसिक प्रशिक्षण तंत्र आहे जी एकाग्रता आणि मनःशांती वाढवण्यास मदत करते. हे शतकानुशतके प्रचलित आहे आणि अनेक धार्मिक आणि आध्यात्मिक परंपरांमध्ये वापरले जाते. ध्यानाचे अनेक फायदे आहेत, ज्यात तणाव कमी होणे, चिंता आणि नैराश्य सुधारणे, एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढणे आणि आत्म-जागरूकता वाढणे यांचा समावेश होतो.

ध्यानाचे प्रकार - ध्यानाचे अनेक प्रकार आहेत, परंतु सर्वात सामान्य प्रकारांमध्ये हे समाविष्ट आहे :

मंत्र ध्यान : यामध्ये श्वासादरम्यान शांतपणे शब्द किंवा वाक्यांश पुन्हा करणे समाविष्ट आहे.

विपश्यना ध्यान : यामध्ये श्वास, विचार आणि भावनांवर लक्ष केंद्रित करणे समाविष्ट आहे.

जेन ध्यान : यामध्ये शांतपणे बसून केवळ बसण्यावर लक्ष केंद्रित करणे समाविष्ट आहे.

योग ध्यान : यामध्ये श्वास, शारीरिक मुद्रा आणि लक्ष केंद्रित करण्याच्या तंत्रांचा समावेश आहे.

ध्यान कसे करावे - ध्यान सुरू करण्यासाठी, शांत आणि आरामदायी जागा शोधणे महत्त्वाचे आहे. आपण बसून किंवा शयन करून ध्यानाचा सराव करू शकता. एकदा तुम्ही एका स्थितीत बसल्यानंतर, आपले डोळे बंद करा आणि आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करा. जेव्हा तुमचे मन भटकत असेल तेव्हा ते श्वासावर परत आणण्याचा सराव करा.

सुरुवातीला, दररोज काही मिनिटे ध्यानाचा सराव करणे पुरेसे आहे. आपण अधिक सराव केल्यावर, आपण हळूहळू आपल्या सत्रांची लांबी वाढवू शकता.

ध्यानाचे फायदे - ध्यानाचे अनेक फायदे आहेत, ज्यात हे समाविष्ट

आहे :

तणाव कमी होणे : ध्यान तुमच्या मेंदूमध्ये तणाव हार्मोन्सचे उत्पादन कमी करण्यास मदत करू शकते आणि शांततेची भावना वाढवू शकते.

चिंता आणि नैराश्य सुधारणे : ध्यान चिंता आणि नैराश्याची लक्षणे कमी करण्यास प्रभावी असू शकते.

एकाग्रता आणि स्मरणशक्ती वाढणे : ध्यान तुमची एकाग्रता आणि स्मरणशक्ती सुधारण्यास मदत करू शकते.

आत्म-जागरूकता वाढणे : ध्यान तुमची आत्म-जागरूकता आणि आत्म-स्वीकृती वाढवण्यास मदत करू शकते.

ध्यानासाठी टिपा -

शांत आणि आरामदायी जागा शोधा.

बसून किंवा शयन करून ध्यानाचा सराव करा.

आपले डोळे बंद करा आणि आपल्या श्वासावर लक्ष केंद्रित करा.

जेव्हा तुमचे मन भटकत असेल तेव्हा ते श्वासावर परत आणण्याचा सराव करा.

दररोज काही मिनिटे ध्यानाचा सराव सुरू करा.

हळूहळू आपल्या सत्रांची लांबी वाढवा.

जर तुम्हाला लक्ष केंद्रित करण्यात अडचण येत असेल तर निर्देशित ध्यान किंवा ध्यान ॲप वापरून पहा.

ध्यान हा एक शक्तिशाली साधन आहे जो तुमचे मानसिक आणि शारीरिक आरोग्य सुधारण्यास मदत करू शकतो.

जीवनाचा उद्देश : शोध आणि अर्थ

जीवनाचा उद्देश हा एक प्रश्न आहे ज्याने शतकानुशतके तत्त्वज्ञ, धर्मगुरू आणि सामान्य लोकांना विचार करायला लावला आहे. याचे सोपे उत्तर नाही, कारण प्रत्येक व्यक्तीचा जीवनाचा अर्थ आणि उद्देश वेगळा असतो. तथापि, जीवनाचा उद्देश काय आहे याचा शोध घेण्यासाठी काही सामान्य मार्गदर्शक तत्त्वे आहेत.

अर्थ शोधणे - जीवनाचा अर्थ शोधण्याचा एक मार्ग म्हणजे अशा गोष्टी शोधणे ज्यामुळे तुम्हाला पूर्णता आणि समाधान मिळते. यामध्ये प्रियजनांसोबत वेळ घालवणे, छंद जोपासणे, इतरांना मदत करणे किंवा तुमच्या आवडीनिवडींचा पाठपुरावा करणे यांचा समावेश असू शकतो. जेव्हा तुम्हाला अशा गोष्टी सापडतात ज्यामुळे तुम्हाला पूर्णता मिळते, तेव्हा तुम्हाला असे वाटू शकते की तुमच्या जीवनाचा अर्थ आहे.

जगावर परिणाम करणे - जीवनाचा अर्थ शोधण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे जगावर सकारात्मक प्रभाव पाडणे. यात स्वयंसेवा, दान करणे किंवा फक्त इतरांशी दयाळू आणि आदराने वागणे यांचा समावेश असू शकतो. जेव्हा तुम्हाला वाटते की तुम्ही जगाला चांगले बनवण्यासाठी योगदान देत आहात, तेव्हा तुम्हाला तुमच्या जीवनाचा अर्थ अधिक जाणवू शकतो.

वर्तमानात जगणे - कधीकधी, जीवनाचा अर्थ शोधण्याचा सर्वोत्तम मार्ग म्हणजे फक्त वर्तमानात जगणे. याचा अर्थ प्रत्येक क्षणाची जाणीवपूर्वक कदर करणे आणि ते पुरेपूर जगणे असा होतो. यात नकारात्मक विचारांवर लक्ष केंद्रित करण्याऐवजी सकारात्मक अनुभवांवर लक्ष केंद्रित करणे समाविष्ट असू शकते. जेव्हा तुम्ही वर्तमानात राहता, तेव्हा तुम्हाला अधिक आनंदी आणि समाधानी वाटू शकते आणि तुमच्या जीवनाचा अर्थ अधिक जाणवू शकतो.

जीवनाचा उद्देश वैयक्तिक आहे - हे लक्षात ठेवणे महत्त्वाचे आहे की जीवनाचा उद्देश हा वैयक्तिक प्रश्न आहे. याचे एकच बरोबर किंवा चुकीचे उत्तर नाही आणि तुमच्यासाठी काय महत्त्वाचे आहे हे शोधणे तुमच्यावर अवलंबून आहे. काही लोकांना धर्मातून अर्थ सापडतो, तर काहींना निसर्गातून किंवा कलातून अर्थ सापडतो. सर्वात महत्त्वाचे म्हणजे तुम्हाला काय अर्थ देते आणि तुम्हाला पूर्णतेची भावना देते ते शोधणे.

प्रवास महत्त्वाचा आहे - जीवनाचा उद्देश शोधणे हा एक प्रवास आहे, गंतव्यस्थान नाही. मार्गावर तुम्हाला अडचणी आणि आव्हानांना तोंड द्यावे लागेल, परंतु हे अनुभव तुम्हाला वाढण्यास आणि शिकण्यास मदत करू शकतात. सर्वात महत्त्वाचे म्हणजे हार न मानणे आणि तुमच्यासाठी अर्थपूर्ण असलेले काहीतरी शोधण्याचा प्रयत्न करत राहणे. हे लक्षात घेणे महत्त्वाचे आहे की उपरोक्त ही केवळ एक थोडक्यात माहिती आहे. सुख कशात आहे हे शोधणे हे एक **अखंड प्रवास** आहे आणि प्रत्येक व्यक्तीसाठी ते वेगळे असू शकते. आपण स्वतःला आणि आपल्याला काय आनंदी करते याबद्दल अधिक जाणून घेण्यासाठी वेळ घालवा.

***



श्री साईनाथ एंटरप्रायजेस

Expert Profile Cutters and Dealers in Iron Goods.



किशोर गुडेकर
Mo. : 96650 65826
98226 45832

सौ. कांचन कि. गुडेकर
Mo. : 9766690922
8624067149

प्लॉट नं. २६, सेक्टर नं. ७, पी.सी.एन.टी.डी.ए., भोसरी, पुणे ४११ ०२६.
फोन : (०२०) ६५१११८६०, ६५११६७८०

CNC Profile Cutting Machine



प्रणव एन्टरप्रायझेस

प्रणव वॉटर सप्लायर्स

६५/७, निवृत्तीनगर, हडपसर, हांडेवाडी रोड, हडपसर, पुणे ४११ ०२८.

ऑफिस

प्रोप्रा. सुधीर निवृत्ती कुंभार

१६५/क, माळवाडी, हडपसर, पुणे ४११ ०२८.

फोन नं. २६९९९२४२

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

स्वस्तिक विट कारखाना



प्रोप्रा. ॲड.श्री.सुनिल नारायणशेठ जाधव
B.Com, LLB.
मा.अध्यक्ष, जुन्नर तालुका कुंभार समाजोन्नती मंडळ
उपाध्यक्ष, पुणे जिल्हा कुंभार समाजोन्नती मंडळ
अध्यक्ष, रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरी
मो. 91-7077-7077 / 9970-988-777

गणराया मु.पो.सोमतवाडी, ता.जुन्नर, जि.पुणे

सुरज कन्स्ट्रक्शन स्वस्तिक अर्थ मुव्हर्स



लॅन्ड डेव्हलपर्स व बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स



प्रोप्रा. श्री. अनिल नारायणशेठ जाधव
Civil Engr.
मो. 9850851950

कुंभार आळी.मु.पो.जुन्नर, ता.जुन्नर, जि.पुणे

आमचे प्रेरणा स्थान



कै.विठ्ठल जोंधळे



शांताबाई विठ्ठल जोंधळे



लक्ष्मीबाई विठ्ठल जोंधळे



शरद विठ्ठल जोंधळे



सौ.अपर्णा शरद जोंधळे



कु.वैष्णवी श.जोंधळे
पोलंड येथे कमर्शीयल पायलट कोर्स साठी निवड



चि.पियुश श.जोंधळे
D.C.E. First Year

त्रिमुर्ती ब्रिक्स अँड बिल्डींग मटेरीयल सप्लायर्स

प्रोप्रा. शरद विठ्ठल जोंधळे मोबा. 9326198222 / 9226198222
"विठ्ठल कृपा", शिक्षक कॉलनी, कॉलेज रोड, मु.पो.सायखेडा, ता.निफाड, जि.नाशिक ४२२ २१०



मा. श्री. सतिश दरेकर

प्रदेश अध्यक्ष-कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश
मा.सभापति, विधिसमिती पिंचरी चिंचवड महानगरपालिका
मा. सभासद, पिंपरी चिंचवड महानगरपालिका
मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र कुंभार समाज महासंघ
9922501601 / 9422511601



Anita Borde
Partner
9881743763 / 9623158939



Sonali S. Borde
B.E. (Electrical)



Sagar Borde
Central Govt. Employee



Chi.hrishikesh Borde
Director of Photography

Qual - Comm Enterprises

Design & Mfg. Sheet Metal Dies,Jigs, Fixture Gauges, Panel Checker & VMC Job Work

Works : Gat No. 169, Shop No. 6, Talwade Road, Near Saraswati Vishwavidyalaya, Talwade, Pune - 14.
E-mail : qualcomm_enterprises@yahoo.com
Website : www.qualcommenterprises.co.in

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



शिवचरित्रायणकार
प्रा.धनाजीराव विठ्ठलराव राजे (कवी)
एम.ए.(अर्थशास्त्र व हिन्दी), बी.एड.
मा.उप प्राचार्य विवेकवर्धिनी कनिष्ठ महाविद्यालय
देवणी जि.लातूर मोबाईल : **7875669376**



सौ.चंद्रकला धनाजीराव राजे
एम.ए.(मराठी),डी.एड.
प्राथमिक शिक्षीका
जिल्हा परिषद शाळा,
लोणी, उदगीर, जिल्हा लातुर



चि.आकाश धानजीराव राजे
बी.एस.सी.ॲनीमेशन ॲण्ड डिजाइन
एम.एस.(एच.सी.आय.)



चि.विशाल धानजीराव राजे
एम.डी.मेडिसीन, प्रेस्टिजीयस युनिव्हर्सीटी
ऑफ सीलेसीया, पोलंड(शिकत आहे)

निवास : राजे निवास, अंबिका कॉलनी, मु.पो. ता. अहमदपूर
जिल्हा लातूर पिन 413515

प्रेरणा स्थान



कै.विठ्ठल रामजी जोंधळे



शांताबाई विठ्ठल जोंधळे



लक्ष्मीबाई विठ्ठल जोंधळे



सौ.सविता घ. जोंधळे
मा.सरपंच सायखेडा ग्रामपालिका



घनश्याम जोंधळे
कार्याध्यक्ष : नाशीक जिल्हा कुंभार समाज संघटना
कुंभश्री प्रतिनिधी, माजी उपसरपंच सायखेडा
सदस्य : गंगाबिसन भुतडा नागरी पतसंस्था
संचालक : भाग्यश्री ग्रामीण बिगरशेती सह.पतसंस्था



चि.पवन घ.जोंधळे
B.E. (Civil)

त्रिमुर्ती विट उत्पादक व सप्लायर्स
मु.पो. सायखेडा, ता.निफाड, जि.नाशिक
9371528152



श्री वामन पंढरीनाथ भालेराव
सेवा निवृत्त उपअभियांता
जलसंपदा विभाग
9011004391



सौ.कल्पना वामन भालेराव
(M.Com)
उपाध्यक्ष लायन्स क्लब
इकोफ्रेंडस् पुणे



कु.शाल्मली
B.E.(ENTC)



श्री.यतिन भिमराव कुंभार
M.S. Engg



सौ.तेजल यतिन कुंभार
M.B.A., M.S. Engg



निवृत्त उप अभियंता वामन भालेराव यांचा सत्कार
करताना कुंभश्री संपादक संजय राजे व ह.भ.प.वसंत महाराज सोमवंशी
४७, निवारा सोसायटी, श्रीधर नगर, धनकवडी, पुणे ४११०४३.

मित्रम् आयुर्वेद
मल्टीस्पेशलिटी क्लिनिक
व पंचकर्म सेंटर
अती गंभीर व इमर्जेन्सी रुग्णावर
आयुर्वेदिक उपचार
ब्लड प्रेशर, मधुमेह, किडनी फेल्युअर, लिव्हर फेल्युअर
कॅन्सर, आय.सी.यु.मधील गंभर रुग्ण, गुडघ्याचे व
मणक्यांचे गंभीर आजार, मुल न होणे, पोटाचे दिर्घ आजार
या सर्व आजारावर २७ वर्षाचा प्रदिर्घ अनुभव असलेले
डॉक्टर शशिकांत कुंभार
डॉक्टर मंगेश ठमके डॉ.प्रविण माने
पत्ता : वाय.पी.पोवार नगर, प्लॉट नं.१३७, अमृत डेअरी जवळ, कोल्हापुर
९९७५६१५३०३ / ८०७०८०२०११ / फोन : ०३१ २६६२०११

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



Late Ramesh S. Kumbhar



Smt.Sunanda R. Kumbhar



Swapnil R. Kumbhar
+91 7588576392



Sou. Komal S. Kumbhar



Chi. Sharvil S. Kumbhar

ONYX TECHNOLOGY

GSTIN : 27AAEFO4054E1ZG

Complete Engineering Solution, Specialised in Laser Cutting, CNC Bending, Sheet Metal Fabrication, Machining & Tooling

Factory : J-139, J-Block, MIDC, Bhosari, Pune-411 026.
Reg.Off.: Chakrapani Vasahat, Shivshankar Colony No.2, Bhosari, Pune-39
Email : onyxtechnology15@gmail.com. **Web.:** www.onyxfechnology.in



श्री.नामदेवराव वि.कुंभार
संचालक मावळ ता.कृषी उत्पन्न बाजार समिती
वरीष्ठ सल्लागार महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था
मा.ग्रा.पं.सदस्य वडेश्वर, माऊ
संचालक टाकवे बु.वि.को.सो.
९८८१५९२८८०/९८९०८७७९८०



श्री.मच्छिंद्र ना.कुंभार
(मृदंगाचार्य)
९७६७१५०४९४



श्री.समिर ना.कुंभार
युवा अध्यक्ष अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था मावळ सदस्य दिंडी सोहळा मावळ
७०३८१०३३३८



कु.वेदांत म.कुंभार



कु.सिद्धांत स.कुंभार



कानिफनाथ कॅटल फीड
पशु खाद्य निर्माते
गवत व पेंढ्यांचे व्यापारी
चैतन्य कानिफनाथ ट्रान्सपोर्ट

पत्ता - मु.माऊ, पो.टाकवे बु.ता.मावळ, जि.पुणे ४१२१०६



रघुनाथ गजमल बोरसे



सौ.मंगला रघुनाथ बोरसे



रविंद्र रघुनाथ बोरसे
उप व्यवस्थापक सीरम इन्स्टिट्युट, पुणे



सौ. वर्षा रविंद्र बोरसे
९२८४६७४९२१



कु.ऋतुजा रविंद्र बोरसे
बी.टेक.मेकॅनिकल
तृतीय वर्ष



कु.हिताक्षी रविंद्र बोरसे
बी.टेक.आय.टी.
प्रथम वर्ष



अथर्व योगेश बोरसे
१२वी सायन्स, टेक्सास
अमेरीका



कु.अविका योगेश बोरसे
इयत्ता ६वी, टेक्सास
अमेरीका

बी.५०४, अमर समृद्धि, सोलापुर रोड, वापारीमल शोरुम जवळ, रविदर्शन, हडपसर, पुणे मो. ९८२२८५५८८५

GKAMPS Technologies LLP

GKAMPS Technologies LLP
Engineering Services - A Value Adding Partner

Subject Expertise

- NVH
- Dynamics
- CAE
- Product D & D
- Durabiblity
- Thermal



Manish Kumbhar, Director
7888029614 / 9850893750

Office : 106, Magnolia Business Centre, Pashan-Baner Link Road, Pune-21

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



डॉ.विलास रा.नांदुरकर
जनसंपर्क अधिकारी
संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ
मो.नं.9011071076



प्रा.सौ.वैशाली विलास नांदुरकर
सचिव, विदर्भ कुंभार समाज
महिला मंडळ, अमरावती
मो.नं. 9552501076



डॉ. अभिलाष विलास नांदुरकर
M.B.B.S., M.D.(Medicine IInd yr.)
शासकीय वैद्यकीय महाविद्यालय
नागपूर



कु.आकांक्षा विलास नांदुरकर
M.B.B.S. (IInd yr.)
डॉ.के.एन.एस.मेडिकल कॉलेज
लखनौ

निवास : आई, भक्तमंदिर, कुंभारवाडा,
बुधवारा, अमरावती ४४४६०१



Shyam Sunder Varma
Cell : +91 98900 45674



Kusum Shyam Verma



Sonali S. Varma
B.Arch.



Gautami S. Varma
B.Sc., D.C.E.



Himanshu S. Varma
11th Std.

KUSUM
KUSUM
PROPERTY DEVELOPER & PROMOTOR

BALAJI CONSTRUCTION

Office No.204, Creative Cameo, Plot No. 24/1, Sector No.38,
Near park Street, Rahatani, Pune - 17.
Tel.: +91-20-20270767 Email : shyamkusuk@gmail.com

आमचे प्रेरणास्थान



स्व.बाबुराव नरहारी कानगुले

अहमदपूर चे उद्योजक कानगुले ब्रदर्स



सचिन बाबुराव कानगुले



नितीन बाबुराव कानगुले



अमोल बाबुराव कानगुले



दिनेश बाबुराव कानगुले



महेश बाबुराव कानगुले
प्रो.महेश डिजीटल स्टुडिओ
ता.अध्यक्ष अखिल महाराष्ट्र
कुंभार समाज विकास संस्था
9422612304

साई मेडिकल ॲन्ड जनरल	न्यु.साईराम एजन्सीज्	रोहित मेडिकल ॲन्ड जनरल	साईराम फार्मासिटीकल्स् ॲन्ड सर्जिकल डिस्टीब्युटर्स
प्रो.सचिन बाबुराव कानगुले	प्रो.नितीन बाबुराव कानगुले	प्रो.अमोल बाबुराव कानगुले	प्रो.दिनेश बाबुराव कानगुले
मो. 8483895959	मो. 9881754586	मो. 9975168968	मो. 9960197074



प्रोप्रा. सुर्यकांत आ.शिर्के
(मा.सरपंच)
९९७०८८९८०५

अतुल सुर्यकांत शिर्के
७७४५००९८३३
९७६७२५३४३४

अंबिका रबर इंडस्ट्रिज

इंडस्ट्रियल व ऑटोमोबाईलचे सर्व प्रकारचे दर्जेदार रबर पार्टस्चे उत्पादक.
मु.पो.वाठार तर्फ वडगांव, ता.हातकणंगले,जि.कोल्हापुर
फोन : ०२३०.२४०७१७६
Web. : www.ambikarubber.com **Email** : ambikarubber4462@gmail.com



ॲड.बी.के.राजे

ADVOCATE
हायकोर्ट मुंबई
मो. 98192 85091
कायदेविषयक सल्लागार
कुंभश्री मासिक, पुणे

कार्यालय
३८५, जगन्नाथ शंकरशेठ रोड, चीराबाजार, मुंबई ४०० ००२

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

प्रेरणास्थान



नेताजी कुंभार
९८२३८६१४००

।।जोतिर्लिंग प्रसन्न ।।

साक्वी ज्वेलर्स
कुंभार सोनार



विक्रांत कुंभार
७८२०९३९७४२

आमच्याकडे राशीचे खडे व अंगठी तयार करुन मिळेल. सोन्याचे व चांदीचे जोड काम अर्जंट पॉलीश करुन मिळेल. तसेच सोन्याचे पाणी देऊन मिळेल.

साई मंदिर जवळ, खोची रोड, पेठ वडगाव, ता.हातकणंगले, जि.कोल्हापूर
महालक्ष्मी कॉम्पलेक्स, दुसरा मजला, गाळा नं.२, पेठ वडगाव.



उदय कुंभार
मो.नं. ७९८२३७८७९८२

वसुधा
जनरल स्टोअर्स

किराणा मालाचे होलसेल व रीटेल व्यापारी

सुपार मार्केट,गाळा नं.१, मेन रोड, मु.पो. ता.गडहिंग्लज, जि.कोल्हापुर



Madhukar Shirke

Rubber Products Manufactured in Natural, Nitrile, Neoprene, EPDM, Silicon Compounds.

Rubber items used for the following applications:

- Diesel engine ❖ Submercible pumps ❖ Automobile
- Hydraulics & Pneumatics Equipments.
- Packaging machines ❖ Spinning mills ❖ Dairy Units
- Control Panels ❖ Insulating Applications
- Food Industries ❖ Special Purpose Machines
- Testing equipments used in Foundries
- Printing machines ❖ Rubber to metal bounded items
- Industrial rubber items as per specifications

Shree Rubber Products

442, Wathar Tarf Vadgaon, NH4 Highway west, Kolhapur 416 112
Cell : 99214 07373 Email : shreerubber1988@gmail.com

यश ऑप्टीशियन



बिचकर आय क्लिनिक

मंगळवार बंद

प्रोप्रा. सचिन निवत्ती कुंभार
Mo.7276569798

डी १०, भट्टड कॉम्पलेक्स,
दत्त चौक, कराड



श्रीकृपा किराणा
ॲन्ड जनरल स्टोअर्स

प्रोप्रा.विशाल दिगंबर सावरकर

मेन रोड, कोंढाळी, ता.काटोल, जिल्हा नागपूर ४४११०३
मोबाईल : ९०२८९४५१२५



महादेव य. जगदाळे
9890030337

प्रेरणास्थान



कै. यशवंतराव जगदाळे



अमोल म. जगदाळे
अध्यक्ष जुन्नर तालुका
कुंभार समाज विकास संस्था
9890030357
9766548222

बालाजी ब्रिक्स
बालाजी कोल डेपो

महादैव यशवंत जगदाळे
विट कारखानदार

आमचेकडे सर्व प्रकारच्या विटा होलसेल भावातमिळतील.

निवास : वारुळवाडी (आनंदवाडी) मु.पो.नारायणगाव, ता.जुन्नर, जि.पुणे



श्री मोहन दशरथ जगताप
९४०४६४०३२५

दिपावली
शुभेच्छा

शैक्षणिक क्षेत्रात
जिद्द, चिकाटी आणि अथक परिश्रमाने आई-वडीलांचे स्वप्न साकार करणाऱ्या सर्व यशस्वी विद्यार्थ्यांचे मन:पूर्वक अभिनंदन!!

घाटा पिंपरी ता.आष्टी जि.बीड



प्रेरणास्थान



दिनकर विष्णू कुंभार



मनोज दि. कुंभार



सौ.ज्योती म. कुंभार

वरदराज आर्ट

आमचेकडे सर्व प्रकारच्या सर्वांग सुंदर गणेश मुर्ती, दुर्गा मुर्ती होलसेल व रिटेल दरात मिळतील, तसेच रबर मोल्ड मिळतील.

कारखाना : पी.डी. पाटील नगर, गोवरे रोड, कराड.
निवास : १४१, सोमवार पेठ, कुंभार गल्ली, कराड, जि.सातारा
Mob.: 9823153131, 9823623131, 9545863131, 7057400031

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



नई मुंबई : तीसरी व्ही.व्हीआयपी बैठक, मॅरीएट एक्सीक्युटीव हॉटेलमे संपन्न. देश के विभन्न राज्योंसे ११० प्रतिनिधी उपस्थित थे, इनमे आय.ए.एस., आय.एफ.एस. आय.आर.एस. तथा क्लास वन अधिकारी, उद्योजक और पॉलीटीशीएन्सने बडी तादाद मे भाग लिया । इस बैठक मे प्रजापती कुंम्हार समाज के छात्राओंको उच्च शिक्षामें आगे लाने के लिए योजना बनाई ।



आकोला : उत्कृष्ठ जिल्हा निवडणूक अधिकारी पुरस्कार आकोल्याचे जिल्हाधिकारी अजित कुंभार यांना प्रदान. सर्वेत्कृष्ठ मतदार नोंदणी केल्याबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.



कोल्हापुर : देशभक्त रत्नाप्पा कुंभार स्मारकासाठी पाच कोटी निधी मंजूर केल्याबद्दल आमदार विनायक कोरे, यांचा सत्कार करताना सौ. रजनीताई मगदूम, डॉ.विश्वनाथ मगदूम बाळासाहेब कुंभार, प्राचार्य डॉ. राजेंद्र कुंभार, अशोकराव माने, पुंडलिकराव जाधव व मान्यवर



आयोध्या : सुनिल कुंभार यांनी रांगोळीने सजवली आयोध्या नगरी. सुमारे २० हजार स्क्वेअरफूट रांगोळीने केले समाज प्रबोधन सुनिल कुंभार हे मांगले ता.शिराळा,जि सांगलीचे रहिवासी आहेत.



मुंबई : राष्ट्रवादी काँग्रेसने संजयजी प्रजपतीको नॉर्थ ईस्ट राज्योंका निरीक्षक मनोनित किया गया ।पत्र प्रदान करते हुए ना.प्रफुल्ल पटेल तथा ना.सुनिल तटकरे ।



पुणे : कुंभश्री दिपावली अंकाचे प्रकाशन दिमाखात संपन्न. याप्रसंगी डावीकडून विलास जाधव, बीना राजे, वीर राजे, संजय राजे, सुरेशराव कोते, आयकर आयुक्त अभिनय कुंभार, उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार, पी.आय सोन्याबापु देशमुख, उद्योजक गणेशराव कुंभार व उद्योजक मधुकरराव काजुळकर.



बारामती : श्रीराम जन्मभुमी ट्रस्टच्या वतीने देशातील सात हजार निमंत्रण पत्रीकेमधील एक निमंत्रण पत्रिका समाजसेवक उद्योजक दत्तात्रय कुंभार (डाळजकर) यांना प्रदान करताना आर.एस.एस चे स्वयंसेवक समवेत दत्तात्रय कुंभार यांचा पूर्ण परीवार.



उद्योगरत्न देवराव कापडे
अनंतात विलीन
भावपुर्ण श्रद्धांजली.



आयोध्या : राम लल्लाच्या दर्शनानंतर भव्य मंदिरासमोर प्रसन्न मुद्रमध्ये उपस्थित दत्तात्रय कुंभार व सौ.अरुणा कुंभार. कुंभार समाजासाठी निरपेक्ष कार्याची पावती आज रामलल्ला दर्शनाने मिळाली अशी प्रतिक्रिया दत्ताभाऊंनी दिली.



बाराबलुतेदार महासंघाच्या प्रदेशकार्याध्यक्ष पदी सतिश दरेकर यांची निवड



पिंपरी : पुणे रेल्वे विभागाच्या सल्लागार सदस्यपदी शितल कुंभार यांची निवड



बारामती : वरुण दत्तात्रय कुंभार लंडन येथून एम.एस. इंजिनिअरींग उत्तीर्ण



अहमदनगर : महिलांच्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये सौ.उज्वला अभय राजे यांचे सुयश



सातारा :महिलांच्या राष्ट्रीय स्पर्धेमध्ये अनुष्का दत्तात्रय कुंभार यांचे सुयश

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



बेगलोर : सुप्रसिद्ध इंटेरीअर डिझायनर आर्किटेक्ट रविंद्र रमेश तांबट यांच्या नुतन अंबर स्टुडिओस भेट देवून त्यांचा व त्यांचे वडील रमेशराव तांबट यांचा सत्कार करताना कुंभश्री संपादक संजय राजे व कुंभश्री संचालिका सौ.बीना राजे.



पुणे : नुतन गृहप्रवेशा निमित्त दिपक उर्फ आबा शिरवळकर व पत्नी सौ.पुष्पामाला यांचा सत्कार संपन्न समवेत डावीकडून एस.व्ही.सी.बँकेचे व्यवस्थापक सुहास कुंभार, नरेंद्र राजे, दिपक व सौ.पुष्पमाला, कुंभश्री संपादक संजय राजे व सौ.चांदणी नरेंद्र राजे.



चिपळूण : संत गोरा कुंभार पतसंस्थेच्या सावर्डे शाखेचा उद्घाटन सोहळा आमदार शेखरजी निकम यांच्या हस्ते संपन्न. यावेळी उपस्थित कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रेदशाध्यक्ष सतिशदादा दरेकर यांचा सत्कार, समवेत सोमनाथ सोनवणे, रमाकांत क्षिरसागर, वसंत घोडनदीकर, पांडुरंग कुंभार व मान्यवर



थेरगाव : नूतन गृह प्रवेशाबद्दल सौ.पुनम व मिलींद, आण्णासाहेब व सौ.सुरेखा तसेच उपजिल्हाधिकारी मनीषा कुंभार यांचे अभिनंदन करुन शुभेच्छा देताना डावीकडे इंजिनीयर प्रकाश व सौ.सुरभी राजे, उजवीकडे सौ.बीना व संजय राजे समवेत चि.कैवल्य, कुमारी प्रिशा कुंभार व चि.वीर राजे.



चंद्रपुर : डॉ.श्रीराम कोल्हे यांच्या उल्लेखनीय कार्याबद्दल मातीचे शिलेदार संघटनेतर्फे डॉ.श्रीराम कोल्हे यांना समाजरत्न पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.



कोल्हापुर : वधुवर मेळाव्यामध्ये मार्गदर्शन करताना प्राध्यापक प्रकाशराव कुंभार समवेत डावीकडून आणासाहेब कुंभार, अनंतराव कुंभार, कोल्हापुरचे माजी महापौर मारुतराव कातवरे, थोरावडे, सतीशदादा दरेकर, सतीश बाचणीकर व मान्यवर



परभणी : महाराष्ट्र तत्वज्ञान परिषदेच्या अधिवेशनाचे उद्घाटन प्रसंगी दीप प्रज्वलन करताना जेष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ.नागोराव कुंभार समवेत डॉ.रवी सरवदे, ॲड.अशोक सोनी, सम्मेलनाध्यक्ष डॉ.अशोक चौसाळकर, डॉ.प्रदिप गोखले, डॉ.विलास सोनवणे, डॉ.राजेश देशमुख व मान्यवर



पुणे : सुप्रसिद्ध आर्किटेक्ट रोहित किशोर परींचेकर यांना महाराष्ट्र उद्योगरत्न पुरस्कार प्रदान

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



पुणे : नुतन गृहप्रवेशा निमित्त सौ.व श्री. नितीन शिरवळकर यांचा सत्कार, समवेत डावीकडून नरेंद्र राजे, एस.व्ही.सी.बँकेचे व्यवस्थापक सुहास कुंभार, संजय राजे, सौ.चांदणी नरेंद्र राजे.



कोल्हापुर : कुंभार समाजाचे प्रेरणा स्त्रोत देशभक्त रत्नाप्पा कुंभार (आण्णा) यांच्या २५व्या पुण्यस्मरण दिनी समाधि स्थळावर पुष्प अर्पण करताना बीड जिल्हाध्यक्ष रामदास कुंभार या प्रसंगी आणांच्या कन्या रजनीताई मगदूम व डॉ.विश्वनाथ मगदूम यांच्याशी चर्चा केली.



पुरंदर : गोष्टी गावा शहराकडील या पुस्तकास महात्मा फुले प्रबोधन मराठी संम्मेलनात महात्मा फुले साहित्य गौरव पुरस्कार प्रदान पुरस्कार स्विकारताना लेखक नारायणराव कुंभार



कराड : उंब्रज इंदोली फाटा येथे सुप्रसिद्ध तळबिडकर वडेवाले यांच्या सुसज्ज रेस्टॉरंटचे उद्घाटन प्रसंगी संचालक प्रशांत कुंभार व योगेश कुंभार यांना कुंभश्री अंक भेट देवून सत्कार करताना संजय राजे समवेत रोहित खिरोडे व अगरवाल



सातारा : पंढरपूर येथे खादीग्रामोद्योगचे अध्यक्ष मनोज गोयल यांच्या हस्ते इलेक्ट्रीक चाकांचे वितरण संपन्न या प्रसंगी त्यांच्या समवेत दत्तात्रय कुंभार मोहनराव जगदाळे व कुंभार विकास संस्थेचे प्रदेशाध्यक्ष शामशेठ कुंभार



मुंबई : आय.आय.टी. तर्फे घेण्यात आलेल्या चंद्रयान रोबोटीक्स स्पर्धेत तलीश राजेश जगदाळे यास तिसऱ्या क्रमांकाचे पारीतोषिक. तलीश हा डॉ.यशवंत कुंभार यांचा नातू असून डॉ.योगीता व राजेश जगदाळे यांचा सुपुत्र आहे.



पुणे : उद्योजक नितीन भागवत यांचे सुपुत्र चि.अक्षय व सून चि.सौ.कां.उर्मी या नवविवाहित दांपत्यास शुभेच्छा देताना संजय राजे समवेत सौ.विद्या भागवत व नितीनजी भागवत.



पुणे : लोकमत दिवाळी मिलन कार्यक्रमाध्ये लोकमतचे अध्यक्ष विजय दर्डा यांचे समवेत उद्योजक नितीनजी भागवत व सौ.विद्या नितीन भागवत



पुणे : कृषिप्रदर्शनामध्ये सहभागी साई नर्सरीच्या संचालिका सौ.विजया व जयंत कोळेकर यांचा सत्कार करताना कुंभश्रीचे जाहिरात विभाग संपादक प्रकाश राजे व मिलींद कुंभार



अकोले : अभिनव शिक्षण संस्थेच्या अध्यक्षपदी सुरेशराव कोते यांची निवड वैध धर्मादाय आयुक्त अहमदनगर यांचा महत्वपूर्ण निकाल



पुणे : कुमारी मुक्ता संतोष कुंभार हीस शासकीय एम.बी.बी.एस. कॉलेजमध्ये प्रवेश.



पुणे : चि.श्रवण अनिल गुडेकर राज्यस्तरीय शालेय बॉक्सीग स्पर्धेमध्ये विजयी



पुणे : अर्णव निलेश कुंभार यास बॉक्सींम मध्ये रौप्य पदक.

सुप्रभात

– सौ. मनीषा आवेकर



''श्री वेंकटाचलपते तव सुप्रभातम्'' ह्या आदरणीय सुब्बालक्ष्मीजी ह्यांच्या स्पष्ट आणि खणखणीत आवाजातल्या स्तोत्राने, मला लहानपणी जाग यायची. त्यांच्या ओघवत्या आणि रसपूर्ण वाणीने खूप उत्साही आणि प्रसन्न वाटायचे.

सुप्रभात म्हटल्यावर मला दिवाळी पहाट आठवते. दीपावली म्हणजे आकाशदिवे, दारात दिव्यांची आरास, रंगीबेरंगी रांगोळ्या आणि पवित्र अभ्यंग स्नान!! ही दिवाळी पहाट आता फराळाबरोबरच रंग, गंध, आणि संगीताने सजलेली असते. दिवाळी पहाटचे गीतांचे कार्यक्रमही आयोजित केले जातात.

सुप्रभात ही नेहमीच प्रसन्न आणि उत्साहवर्धक असते. हवेमधे ओझोनचे प्रमाण जास्त असते. ते आरोग्यवर्धक असते. सूर्योदया पूर्वीचा काल हा ब्राह्ममुहूर्त म्हणून ओळखला जातो. गायन साधना करणारे गायक, त्यांचे गुरु त्यांना कडक शिस्तीत पहाटे तीन वाजता उठवायचे असे सांगतात. ह्या वेळी केलेली साधना, शांत चित्ताने होत असल्याने, ती निश्चितच फलद्रूप ठरते. सूर्याचे रश्मीकिरण येण्यापूर्वीचा हा काळ प्रदूषण विरहित असल्याने, योगसाधना करणारेही ह्याच काळात योगसाधना करतात. ह्याचा निश्चितच चांगला परिणाम शरीरावर होतो. चालण्याचा व्यायामही ह्याच काळात करावा म्हणजे फुप्फुसामधे शुद्ध हवा घेतली जाते आणि आपल्याला दिवसभर ताजेतवाने वाटते.

सकाळी सहा वाजता रेडिओ केंद्र सुरु होते. उठी श्रीरामा पहाट झाली, पूर्वदिशा उजळली, घनश्याम सुंदरा, उठी गोविंदा उठी गोपाळा अशा भूपाळी मन प्रसन्न करतात. ज्योती कलश झलके हे प्रभात समयीचे वर्णन करणारे गाणे सर्वांच्याच मनाची पकड घेणारे आहे.

त्यातील सुलोचनाबाईंचा प्रसन्न चेहरा संस्मरणीय!!

'पहाटेच्या ह्या प्रहरी, म्हणा हरी हरी हरी' अशा गाण्यातून रामप्रहरी देवाचे नाव घेतले म्हणजे दिवस चांगला जातो. पहाटे वयस्कर लोकं रामनाम, विठ्ठलनाम किंवा स्वामींच्या नावाचा जप करतात. त्याने पुण्यसंचय तर होतोच पण मनात आवर्तने निर्माण होतात. मनाची एकाग्रता वाढते. शास्त्रीय दृष्ट्याही हे मान्य झालेले आहे.

सूर्याची रश्मीकिरणे जेव्हा नुकतीच धरतीवर येतात, तेव्हाचा काळही खूपच रम्य असतो. पर्वती चढणारे लोक सूर्योदयापूर्वीच पर्वती चढायला सुरवात करतात आणि वर चढल्यावर सूर्योदयाचा अनोखा नजारा त्यांच्या दृष्टीस पडतो. हे कोवळे रश्मीकिरण तनमनाला तर सुखावतातच पण अनामिक उर्जा अंगामधे खेळू लागते. हा अनुभव रोमांचकारक, सुखदायी पण फक्त पहाटे उठणाऱ्यांसाठीच बरं का!! आता कोवळ्या सूर्यप्रकाशात फिरण्याचा सल्ला डॉक्टरही देतात कारण त्यामुळे डी३ व्हिटॅमिन मिळते.

आता आपण आपल्या प्रत्यक्षातल्या सुप्रभातकडे वळूयात. आता बहुतेक ज्येष्ठ नागरिकांच्या शरीरात मधुमेह, रक्तदाब, स्थूलता अशा अनेक रोगांनी प्रवेश केल्याने, डॉक्टरांनी ''लवकर निजे लवकर उठे, त्यास आरोग्य संपत्ती लाभे.''

हे आवर्जून सांगितले आहे. आता फक्त प्रौढ व्यक्तीच नाही तर तरुणाईही तब्बेतीच्या बाबतीत सजग झाली आहे. व्यायामाचे महत्व सर्वांनाच पटल्यामुळे योगा क्लास सकाळीच घेतले जातात. ज्यांना प्रत्यक्ष जाणे शक्य नसते, ते घरी ऑनलाईन योगा क्लास करतात. ज्यांना खाली बसून किंवा उभे राहून योगासने करणे शक्य नसते, त्यांच्यासाठी खुर्चीवर बसूनही ऑनलाईन योगा क्लास सकाळी चालू असतात.

हास्य योगा हा ग्रुपने सकाळी करायचा व्यायाम. ह्यामधे टाळी वाजवून पुढे मागे करणे, तोंडाने हाहाहाहा असे म्हणणे आणि हे सर्वांसमवेत केल्याने सामूहिक व्यायामाचा आनंद मिळतो. त्यांचे गेट टुगेदरही असते, त्यामुळे मानसिक समाधानही मिळते. ज्यांना उभे राहून जमत नाही, ते बसूनही करु शकतात. वयस्कर लोक, पेशंट लोकही ह्याचा फायदा घेतात. ह्यात जमेल तसे करण्याची मुभा असते. शिक्षक अगदी परफेक्शनचा अट्टाहास धरत नाहीत. ''जमेल हळूहळू, करत रहा'' असा प्रोत्साहनपर धीर देत देत लोकांकडून व्यायाम करुन घेतात. तेव्हा शिक्षकांच्या पेशन्सचे खूपच कौतुक वाटते.

सकाळी रिकाम्या पोटी चालले तर रक्तातली साखर कमी होते, असे डॉक्टरांनीच सांगितल्यामुळे सकाळी सकाळी तरुण, मध्यमवयीन, प्रौढ, वयस्कर अशी सर्व थरांतील माणसे फिरायला बाहेर पडतात. मॉर्निंग वॉक हा आता अगदी लोकप्रिय झाला आहे. गजर लावून उठून आवरुन सगळ्या जणी पार्किंगमधे जमतात. बहुधा हा सासूगट असतो. आता सगळ्या ड्रेसमधे चकाचक असतात. हसतखेळत, गप्पा मारत चालणारा हा ग्रुप बघितला की ''तो क्या जमाना बदल गया क्या?'' असे राहूनराहून वाटते. बरं ह्यांचे गप्पांचे विषय कधी टी. व्ही. मालिकांचे, कधी निवडणूकांचे, कधी वेगवेगळ्या पदार्थांचे तर कधी वाचनीय पुस्तकांचे

असतात. समाधानाची बाब म्हणजे घरचे विषय कोणीच काढत नाही कारण घरुन बाहेर पडले की घरची कवाडे बंद करणेच चांगले असते. कधी नाटक सिनेमा चर्चांमधे रंगत आणतात. प्रभातफेरी आता रंजक होत चाललीयं असे वाटते.

मी रोज सकाळी एक तास फिरायला जाते. तेव्हा बरंच काही बघायला मिळतं, बरेच अनुभव येतात तर कधी काहीकाही नमुनेही बघायला मिळतात. काही लोकांना घरातून बाहेर पडल्यावर सतत फोनवर बोलण्याची सवय असते. मला वाटते ही लोकं फिरायला येतात की फोनवर गप्पा मारायला?

वाँक अँड टाँक चालू असले तरी सकाळच्या शांत वातावरणात इतरांना डिस्टर्ब होते ना!! काही जणांना फोनवर गाणी ऐकत फिरायची सवय असते. मलासुद्धा कमी आवाजात शांत वातावरणात भावगीते, भक्तीगीते ऐकायला आवडते. शक्यतो कानात ट्यूब्ज घालून ऐकावे किंवा आवाज अगदी कमी असावा. असे केल्याने त्या गाण्यांनी मनोरंजन होते, वाटचाल सुलभ होते आणि दुसरे कोणतेही विचार मनात येत नाहीत. आवाज मोठा असेल तर मागून येणाऱ्या वाहनांचा हॉर्न ऐकू येत नाही आणि वाहन अगदी जवळ येऊन अंगाला भिडले तर ही लोकं वाहन चालकावरच तोंडसुख घेतात.

श्वान आणि श्वानपालक हा एक वेगळाच विषय आहे. काही श्वानपालक आरामात मोबाईल बघत चालत असतात. मोकळा कुत्रा इकडे तिकडे वळणे घेत फिरत असतो. आपल्याजवळ आला तर प्रतिक्षिप्त क्रियेने आपण ''आई गं!!'' असे ओरडतो. मालकाकडे बघताच, ''अहो तो काही करत नाही. उगाच घाबरु नका'' असे शांतपणे म्हणतो.

''अहो तो तुम्हांला काही करत नाही. मला चावला म्हणजे? तुम्ही मोकळं कसं काय सोडता?'' माझ्यातील पुणेकर.

तर प्रतिटोला किती भारी बघा ''अहो मला गॅरंटी आहे तो कोणालाही काही करणार नाही. चावणार तर अजिबात नाही.''

मी अवाक् झाले. ह्या इरसाल पुणेकराला कोपरापासून वंदन (मनातल्या मनात) करुन ''तुम्ही आणि तुमचा कुत्रा घरात काहीही गोंधळ घाला, पण आमच्या जीवाशी का खेळता? गॅरंटी खूप असेल, पण चावल्यावर बोलून काय उपयोग?'' हेही मनातल्या मनात बरं का!! नाहीतर आपल्या मालकाशी भांडणाऱ्या मला, त्या कुत्र्याने कडकडून चावले असते. तर असे एकेक पुणेरी नमुने!!

एकदा तर गंमतच झाली. एक ताई माझ्यापेक्षा २/४ वर्षांनीच मोठ्या. माझ्यापुढे मोठ्या आवाजात गाणी ऐकत चालल्या होत्या. माझी व त्यांची हाय हॅलो गुडमॉर्निंग एवढीच ओळख होती. कधीकधी कोणतीही गाणी लागतात आणि ती बदलायची कशी ते माहीत नसते. मग फटफजिती होते. चढाओढीनं चढवीत होते, आला गं बाई आला गं, नंतर कजरा मोहब्बतवाला सुरु झाले. आजूबाजूचे सगळे त्यांच्याकडे गंमतीने बघत होते. मग मीच त्यांचा चॅनल बदलून दिला आणि भक्तीगीते लावून दिली. खरेतर त्यांनाही तेच हवे होते पण नवशिक्या असल्याने त्यांना बदलायला जमत नव्हते. त्यांनी मला मनःपूर्वक धन्यवाद दिले.

मैत्री हा धागा मित्र मैत्रिणींना जोडणारा!! गणपती मंदिर, सनसिटी बसस्टॉप अशा ठिकाणी बसायला बाके आहेत त्यामुळे रोजची बैठक ठरलेली असते. काय करणार? सलग चालवत नाही. मैत्रिण भेटली की तेवढ्याच गप्पा होतात. मन मोकळं होतं. ह्यात कधीकधी सुखदुःखांची देवाणघेवाण होते. डोळ्यातलं पाणी मनातलं दुःख वाहून टाकतं.

''अगं घरोघरी तेच असतं. आपण आता लक्ष द्यायचं नाही. ऐकून न ऐकल्यासारखं करायचं'' अशी प्रेमळ समजूत मैत्रीण घालते. मग समोरच्या चहाच्या दुकानात चहा घेतल्यावर मनाला उभारी येते. मनमोकळं करण्याची गरज पुरुषांनाही असते. फक्त त्यांचे प्रकार, विषय, आणि सहनशक्ती वेगळी!! सांगायची पद्धतही वेगळी.

एक-दोन दिवस जरी मित्र-मैत्रीण भेटली नाही तरी मनाला चुटपुट लागते. लगेचच फोन लावला जातो.

''पाहुणे आलेत म्हणून फिरायला दांडी'' असे समजल्यावर हुश्श वाटते. तर अशी ही सुप्रभात, मनामनाचा धागा जोडते.

भावभावनांनी विवश झालेले वयस्कर लोकही मी प्रभातफेरीत बघितलेत म्हणण्यापेक्षा अनुभवलेत!!

''अगं उद्या ॲडमिट होतीयं दीनानाथला'' असे सजल नेत्रांनी मैत्रीण सांगताना, तिला जवळ घेऊन ''काही काळजी करु नकोस. होईल व्यवस्थित'' असे गदगदलेल्या स्वरात मैत्रीणीचे समजावणे, मनाला स्पर्शून गेले.

एकदा तर एक आजोबा सर्व मित्रांमधे उभे राहून चक्क रडत होते. ''उद्यापासून मी डे केअरला जाणार. आता फिरायला नाही जमणार रे मला. गप्पांमधे वेळ किती छान जात होता. पुन्हा कधी भेटणार आपण?'' सारेच भारावलेल्या अवस्थेत त्यांना निरोप देत होते. हे सारे बघून मलाही अश्रू आवरणे कठीण झाले. एक अनामिक मानवतेचे, मैत्रबंधाचे नाते ही सुप्रभात जोडत असते.

आता कोविडनंतर सगळे तरुण लोकं ऑफिसला जाऊ लागले आहेत, पण त्यांचे ऑफिस वातानुकूलित, त्यामुळे सूर्यप्रकाश अजिबात नाही. आता तरुणाईला डी३ ची कमतरता जाणवू लागली आहे. एकाजागी तासन् तास बसल्याने आणि संगणकावर काम केल्याने पाठदुखी, मानदुखी, गुडघेदुखी सुरु झाली आहे. मग डॉक्टर कोवळ्या सूर्यप्रकाशात चालण्याचा सल्ला देतात. कामाची वेळ ॲडजेस्ट करुन ही तरुणाई सुप्रभाती बाहेर पडते आहे हे चांगलेच आहे.

सुप्रभाती वाऱ्याची झुळुक अंगावर घेत, पक्षांचा किलबिलाट, हास्यक्लबचा गडगडाट, बालकांची शाळेची लगबग, आईवडिलांची बाय करताना होणारी मनाची कुतरओढ, गाडी लांब जाईपर्यंत हलणारे हात, चहावाल्यांच्या कपबशांचा खळखळाट, घोळक्यांची विनोदाला थाप मारुन दिलेली दाद हे सर्व अनुभवायचे असेल तर प्रभातफेरी नियमित चालू ठेवा बरं!!

***

आजोबांचे पत्र

- बाळकृष्ण बाचल विद्यानगर, पुणे

(शेतकी पदवीधर झालेल्या नातवाला आजोबांनी लिहिलेले पत्र)

प्रिय राजेश,

तू कृषी पदवीधर झालास हे ऐकून खूप आनंद वाटला आणि आता तू कृषी क्षेत्रात नवनवीन आधुनिक यंत्र तंत्र यांचा वापर करून शेतीमध्ये काही बदल करावा असं तुला वाटतं. त्यासाठी तुला हे पत्र! अरे राजा, तुला आठवते का? तुम्ही सगळे नातवंडे एकदा जेवत असताना तू ताटात अर्धी भाकरी टाकून उठला होतास; आणि त्यावेळी तुम्हा सर्वांना मी गोष्ट सांगितली होती, आठवते का तुला? भाकरीची गोष्ट. त्या भाकरीसाठी शेतकऱ्याला किती कष्ट करावे लागतात तुझ्या आई-वडिलांना किती कष्ट करावे लागले हे सगळं मी त्या वेळेला सांगितलं होतं. ताटात पडणारे अन्न तयार होताना किती कष्ट घ्यावे लागतात हे आपणा सगळ्यांना माहीतच आहे. तुला माहितीये आहे की शेतकऱ्याला कोणकोणत्या संकटातून जावं लागतं? तेव्हा प्रत्येक घासाबरोबर त्या शेतकऱ्यांची आठवण प्रत्येकाला झाली पाहिजे. 'वदनी कवळ घेता नाव घ्यावे बळीराजाचे' अशीच काही भावना मला वाटते. बरं का तुला माहितीये शेतकऱ्यांना अनेक संकटांना सामोरे जावं लागतं. कधी नको इतका पाऊस तर कधी कधी पाण्याचा थेंबही नाही. कधी ओला दुष्काळ तर कधी कोरडा दुष्काळ! अशा वेळेला काय करावं? पावसाच्या पाण्याने, महापुराने उभी असलेली पिकं वाहून जातात हे दृश्य पाहून मनाला किती यातना होतात. बरं! तू पाहिलं असेल वर्षभर शेतात मरमर राबून उभी असलेली पिकं, नव्याने पेरणी केलेली पिकं, पाण्याने वाहून जातात तसेच पाण्याविना संपूर्ण पिकं जळून जातात. काय वाटत असेल बरं! तुला कल्पना आहे किती नुकसान होतं साऱ्या कुटुंबाच. कोणत्या संकटातून जावं लागतं याची कल्पनाच करवत नाही. तू तर शेतकऱ्याचा मुलगा आहेस. तुला माहीतच आहे सगळं. तू लहानपणापासून सगळं पाहिलेलं आहे. आपल्या सगळ्या मुला-बाळांचं पालन पोषण, शिक्षण, त्यातच एखाद्या बहीण भावाचं लग्न आणि इतर कार्यक्रम यामध्ये खर्च वाढत जातो. अशावेळी खचून जाता कामा नये. नैसर्गिक संकटांवर आत्महत्या करणे हा उपाय नव्हे. आत्महत्या करून प्रश्न सुटत नसतात. त्या कुटुंबावर दु:खाचा डोंगर कोसळतो. सगळेच प्राणीमात्र निसर्गाच्या संकटात कधी ना कधी सापडत असतात. अगदी किडा-मुंगी पासून वाघ-सिंह पर्यंत. त्यांनी कधी आत्महत्या केली असं कधी घडलं आहे का? तू ऐकले आहे का? नाही ना? आपण तर विचार करणारी माणसं आहोत हे आता तू सर्वांना पटवून दे. आता या सगळ्या नैसर्गिक संकटांना सरकार आपल्या परीने प्रत्येकासाठी मदत करीत आहे. सामाजिक संस्थाही मदत करतात. तू ही तुझ्या मित्रांच्या सोबतीने एखादी संघटना काढून एखाद्या संस्थेमार्फत मदत मिळवशीलच यात शंका नाही. तसा तू हुशार आहेस. तेव्हा आता कुणीही खचून जाता कामा नये यासाठी प्रयत्न कर. तू नुकतेच रेडिओवर ऐकलं असेल दूरदर्शनवर पाहिलं असेल तसेच वर्तमानपत्रात वाचलं असेल, आदिवासी भागात काम करणाऱ्या बीज बँकेच्या जन्मदात्री बीज माता राहीबाई पोपेरे यांना भारताचे माननीय राष्ट्रपती श्री. रामनाथ कोविंद यांच्या हस्ते पद्मश्री किताब देऊन त्यांचा गौरव केला होता. केवढी मोठी गोष्ट आहे बरं ही! त्यांच्या या सन्मानाबद्दल त्यांना एका वर्तमानपत्राच्या टीमनं विचारलं ''मावशी, आपण शेतकऱ्यांना काय संदेश द्याल?'' तेव्हा त्या म्हणाल्या ''देशी बियाणापेक्षा हायब्रिड बियाणांना रासायनिक खत औषध जास्त द्यावे लागतात आणि ते महाग असतात. एवढं करूनही शेतमालाला बाजार भाव मिळाला नाही तर शेतकरी कर्जबाजारी होतो. यासाठी सेंद्रिय खत वापरून शेती केली पाहिजे. काळ्या आईचे आरोग्य जपले पाहिजे.'' तर शेवटी त्या असे म्हणाल्या ''बरं का जमिनीने आपल्याला चांगलं दिलं तरच पुढची पिढी चांगली राहणार. औषध-पाण्याची गरज लागणार नाही. याचाही विचार आपण करायला हवा.

हे तू पटवून दे बरं! आणि या राहीबाई पोपेरे सारख्या अशा अनेक स्त्रिया आहेत, आपल्या माता-भगिनी आहेत. त्या शेतीमध्ये चांगले चांगले उपक्रम करत असतात आणि अधिक धान्य पिकवण्याचा प्रयत्न करत असतात हे तुला माहीत आहे. काळी आई, जिच्या सहवासात मन भरून जाते त्या मातीशी असलेल नातं कधी विसरायचं नाही बरं. जसं शेतामध्ये बी रुजल्याबरोबर धान्य उगवते तसे संस्कार करणारी आपली संस्कृती आहे. भुकेलेल्याची भूक भागवणारी, ही कष्टकऱ्यांची मूर्ती लोकसंस्कृती जपणारी आहे, आल्या-गेल्याचे स्वागत करणारी, त्यांच्यासाठी सदैव तयार असणारे अशी शेतकऱ्याची वृत्ती आहे. आपल्या घरी आपण सर्वांचे स्वागत करतो, आडल्या नडलेल्यांना मदत करतो हे तुला माहीतच आहे. तेव्हा काळ्या आईची मनापासून सेवा कर हे लक्षात ठेव; जरी तू कृषी पदवीधर झाला नोकरी मिळाली तरीच ठीकच, नाहीच मिळाली तर काळ्या आईची सेवा करणं हे तुझं कर्तव्य आहे. तसेच साऱ्या कुटुंबाचा तुझ्यावर भार आहे. कारण तू पुढे बळीराजा होणार आहे आणि बळीराजाला हा 'जगाचा पोशिंदा' असे म्हटले जाते. राजा! सगळेच दिवस सारखे नसतात. उद्याची सकाळ निश्चित चांगली असेल. फक्त एवढेच सांगावसं वाटतं आणि ते फार महत्त्वाचे आहे बरं कष्टाने मिळालेले, मिळवलेला पैसा योग्य मार्गाने खर्च कर आणि आपल्या मित्रांनाही सांगा तसेच एक लक्षात ठेव व्यसनापासून दूर राहा. कारण 'नशा करी आयुष्याचा नाश.' तू मोठा झाल्यावर आपल्या मुलाबाळांच्या शिक्षणाकडे लक्ष दे. मोठेपणाच्या हव्यासापोटी लग्नकार्य करताना कर्ज काढून वारे माप खर्च करतात हे आपण पाहिलं, आता हे शक्य आहे का? ज्या वेळेला आपल्या या शेतामधील मालाला भाव नसेल, दुष्काळ पडला असेल किंवा अतिवृष्टी झाली असेल; तसेच अनावृष्टी झाली असेल अशावेळी कर्ज काढून मोठमोठी लग्नकार्य व इतर कार्यक्रम का करावेत? हे सर्वांना तू पटवून दे. तुझा वाचलेला पैसा लग्न पैसा आपल्याच संसाराला उपयोगी पडेल. साध्या पद्धतीने मुला-मुलींची लग्न करावीत, सामुदायिक विवाहात सुद्धा लग्न चांगली होतात. हा विचार तुझ्या मित्रांनाही पटवून दे. या सर्वांचा विचार करता एवढच म्हणावसं वाटतं आणि हे माझे स्वप्न आहे.....

सारं शिवार ..... हिरवं गार !
त्यावर मदार ..... बळीराजाची !!
नदी-नाले ..... तुडुंब भरलेले !
मन हरकले ..... साऱ्या बांधवांचे !!
कष्टाचे मोल ..... आहे अनमोल !
समाधानाचे बोल ..... साऱ्या कुटुंबाचे !!
नवे नवे तंत्र ..... आधुनिक यंत्र !
सुख-शांतीचा मंत्र ..... जाणतोस तू !!
नको आत्मघात ..... करा संकटावर मात !
सन्मान जगात ..... तू पोशिंदा जगाचा !!
निसर्गला विनवणी ..... वेळेवर पाऊसपाणी !
धान्याच्या रे गोणी ..... याव्यात घरोघरी !!
मुखी घास घेता ..... आठवावा अन्नदाता !
नमस्कार येता-जाता ..... करावा बळीराजाला !!

या पत्राचा शेवट करताना मला राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या ओळी आठवतात. शेतकरी बांधवांसाठी ते म्हणतात...

तुझ्या श्रमास प्रतिष्ठा मिळो । सगळ्यांचे लक्ष तुझं कडे वळो ।
मानवतेचे तेज झळझळो । विश्धामाजी या योगे ।।

तेव्हा आता मी पत्र पूर्ण करतो.

हे राजा; तुला आणि तुझ्या सर्व मित्रांना अनेक आशीर्वाद.

- तुझाच आजोबा (साभार - आकाशवाणी पुणे केंद्र)

***

मंदार आर्टस्

सर्वांग सुंदर गणेश मुर्ती व आर्टिकल्सचे उत्पादक

सुनिल कुंभार : 9423224147 विनिल कुंभार : 9422567430

सिद्धिविनायक आर्टस्

गणेश मुर्ती व आर्टिकल्स

मंदार सुनिल कुंभार

96 73 11 39 73, 78 75 116113





केदार आर्टस्

गणेश मुर्ती व आर्टिकल्स

केदार सुनिल कुंभार

7875116113, 9673 11 39 73

दत्तवाडी, उरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे ४१२ २०२

श्री



Mob.: 9224805428 9702448280

संभाजी पा. कुंभार

देवनार मेडिकल आणि जनरल स्टोअर्स

DEONAR MEDICAL & GENERAL STORES

Chemist & Drugisst

"Human Care & Health Care"

Shop No. 1 & 2, Aastha II, Opp. Lakme Co.,
Govandi Station Road, Govandi,
Mumbai - 400 088.
Tel. : 022 - 25550020
Email: mrunalipharmacydeo@gmail.com

Free Home Delivery



भगवती

विट सप्लायर्स

जेऊर पाटोदा



सचिन ईश्वरे
मो. 9822103359



मच्छिंद्र सारंगधर ईश्वरे
मो. 9822438696

महादेव नगर, महादेव मंदीराजवळ, कोपरगांव, जि.अहमदनगर
मो. निवास : 9922720457

श्रीमहालक्ष्मी वीट उत्पादक आणि सप्लायर्स

श्री. ज्ञानेश्वर रायभान वाकचौरे

मु. पो. मुर्शदपूर, चांदगव्हाण रोड, रा. जेऊर पाटोदा,
ता. कोपरगाव, जि. अ. नगर.
मो. 9822883118, 7741003118,
7798259955



श्री. ज्ञानेश्वर वाकचौरे



सौ. मंगल ज्ञानेश्वर वाकचौरे

लढाई

– पराग रघुनाथ लोणकर

नेहमीप्रमाणं अपेक्षित टार्गेट पूर्ण न झाल्यानं बॉसचं फायरिंग ऐकून जड पावलाने बँकेबाहेर पडलो. रोजचंच होतं हे.

सकाळी बँकेत आल्या आल्या बॉससमोर सर्वांची मिटिंग. मग त्या मीटिंगमध्ये बॉसचं तेच तेच रटाळ, अपमानित करणारं बोलणं, त्या त्या दिवशी अपेक्षित असलेली टार्गेट्स सांगणं. मग कामावर बसल्यापासून संध्याकाळपर्यंत आलेल्या शक्य त्या प्रत्येक ग्राहकाला बँकेचं काहीतरी प्रॉडक्ट – म्हणजे विविध प्रकारची loans, insurance, investment options विकायचा प्रयत्न करायचा, तेही आपलं – आपल्याकडून खरं अपेक्षित असलेलं बँकिंगचं काम करता करता. पुन्हा या सगळ्या प्रयत्नात बँकेच्या गणिती कामात काही चूक झाली तर खपण्यासारखी नसतेच. प्रसंगी खिश्यातून पैसे भरावे लागतात, लागलेत. आपली काहीही चूक नसताना, आपण बँकेचेच नियम पाळत असताना, त्या नियमांमुळे ग्राहकांची काही ना काहीतरी गैरसोय होते आणि त्यांची बोलणी, आरडाओरडा, त्रागा सहन करावा लागतो, तोही अगदी रोजच.

अगदी रोज– बॉसनं सांगितलेली; खरं तर बहुतेक वेळा अशक्य अशी– टार्गेट्स पूर्ण करण्यासाठी, ग्राहकांसाठीची बँकेची वेळ संपल्यावर मन दगड बनवून ठेवण्याचा प्रयत्न करत लोकांना फोन करत बसावं लागतं. बहुतेक वेळा पलीकडच्या व्यक्तीकडून अवेळी त्रास दिल्याबद्दल शिव्याशाप मिळत असतात. पलीकडून अतिशय वैतागून, त्रागा करून फोन ठेवल्याचं लक्षात येत असतं. एकूण – सकाळी बँकेत आल्यापासून जो – सर्व बाजूंनी अपमान सोसणे चालू होते, तो संध्याकाळचे साडेसात, आठ अगदी कधी कधी नऊ वाजेपर्यंत चालू असतो. आणि हे सर्व रोज.. अगदी रोज.. नको ही प्रायव्हेट बँकेची नोकरी. राजीनामा देऊन मोकळं व्हावं, असं अक्षरश: हजारो वेळा डोक्यात आलेलं. पण ते शक्य नव्हतं. पुढील काही काळातही शक्य दिसत नव्हतं.

असंच आजही संपूर्णपणे frustrate होऊन मी बँकेबाहेर पडलो. निराश मन:स्थितीत बाइक काढली. आकाशात असलेला अंधार, माझ्याही मनात दाटला होता. खूप रडावंसं वाटत होतं, अगदी ओरडून ओरडून. पण तेही शक्य नव्हतं.

घरी पोचलो. Latchने दार उघडलं. हॉलमध्ये कुणी नव्हतं. आत गौरी फोनवर बोलत होती. बऱ्यापैकी मोठ्याने. बहुतेक तिच्या आईशी बोलत असावी. तिच्या आईला हल्ली कमी ऐकू येत होतं.

''अगंऽऽ, तू फारच काळजी करतेस माझी. सगळं छान चाललं आहे. परेश कष्टाळू आहेत. बँकेत नोकरी आहे. फार मोठ्या हौशी–मौजी करता येत नसल्या, तरी सगळे आवश्यक खर्च अगदी व्यवस्थित करू शकतोय आम्ही. अधून मधून बाहेर जेवायला जाणं, पिक्चर बघणं हे तर करत असतोच. कालच प्रथमेशच्या शाळेची फी भरायची होती. एकदम चाळीस हजार रुपये लागणार होते. पण परेशने – मी त्यांना सांगताच चेक काढून दिला चाळीस हजारांचा. अगंऽऽ हेही जमू शकत नाही अनेकांना. किंवा अनेकदा जमत असलं, तरी किती कटकटी करतात अनेकांचे नवरे. व्यसनांचं तर काही बोलूच नकोस. त्यामुळे परत सांगते, आम्ही श्रीमंत नसलो, तरी सुखी आहोत. परेशसारखा नवरा मला मिळाला, मी नशीबवान आहे. बरं चल, ठेवू फोन? परेश येतील इतक्यात. प्रथमेश देखील येईल आता खालून खेळून. आल्या आल्या भूक भूक करत बसेल. चल, बाय...''

माझ्या कानावर वरील एकन् एक शब्द पडत होता, आणि मनात, हृदयात साठत होता. माझ्या मनावर दाटलेलं निराशेचं मळभ कुठल्या कुठे पळून गेलं होतं आणि मी उद्याच्या माझ्या दिवसभराच्या लढाईसाठी नव्या उत्साहाने सज्ज झालो होतो...

***

सव्वीसावे व द्वितीय पुण्यस्मरण



कै. भगवानराव ज्ञानोबा डेंगळे (मामा)

जन्म – २/६/१९३२ मृत्यू २०/१०/१९९८

कै. नर्मदा भगवानराव डेंगळे (मामी)

जन्म – १/१/१९४१ मृत्यू ५/२/२०२३

संघर्षातून सावरला संसार। परोपकाराची किमया अपार।।
अल्पावधीत नाव कमावणारी मामी। सर्वांच्या येई कामी।।
सर्वांना आपले करणारी आई। आज आपणात नाई।।
सदैव आशिर्वाद असतो, ही श्रद्धांजली तुमच्या चरणी।

*** विनम्र अभिवादन ***

श्री. विजयकुमार, श्री. विलास, श्री. विकास, श्री. विनायक, श्री. अरुण, श्री. प्रितम, सौ. कमल, सौ. लता, सौ. प्रतिभा, सौ. मिनाक्षी, सौ. स्मिता, सौ. अपेक्षा, सौ. स्नेहल, सौ. शितल, सौ. हर्षल, कु. मानसी, प्रसाद, दर्शन, अनुज, अर्णव, सात्विक.

समस्त डेंगळे परिवार दौंड, बारामती, पुणे.

द्वारा – सिध्दिविनायक एंटरप्रायजेस – ''सिध्दिविनायक'', स.नं. २०, प्लॉट अ १२, शिवशाही कॉलनी, कर्वे नगर, पुणे. ४११ ०५२. मो. ९८२२१९४१२४ / ९८२२१९४१११.

वळण

– श्रीपाद पु. कुलकर्णी, पुणे

पंचवीस वर्षांनंतर गावी आले. घरी, ओळखीच्या, मायेच्या, आमच्या घरी. अप्पांच्या पायाशी बसून ढसढसा रडले. क्षमा मागण्याचीही लाज वाटत होती. अश्रूच काही बोलले असतील तर तेवढेच.

''पोरी, रडून काय उपयोग आता? उगी... उगी... तू लहान का आहेस? उमगायचं तेव्हाही लहान नव्हतीस. पण विचारांची झेप मात्र लहान होती. म्हणून हे असं जिणं वाट्याला आलं. तुला इथं काय कमी होतं म्हणून तू शहरच्याच नवऱ्याबरोबर गेलीस? देवाच्या तळहातावरचं फूल पायाशी तुडवलं गेलं ना? दैव देतं अन् कर्म नेतं...''

''पण अप्पा, परिस्थितीच अशी काही...''

''परिस्थितीला कशाला बोल लावतेस पोरी? कर्माचा हात मिळाल्यावर ती आपला डाव साधणारच. तुला शिकवलं कौतुकानं शेती वाडीतला भरल्या घरचा एखादा जावई शोधून तुला इथंच कुठंतरी आपल्या नजरेच्या टप्प्यात ठेवायची होती. तुझ्या शिक्षणाचा काही चांगला उपयोग करून सासर कुळाचं नाव वर आणशील एवढी छोटीशी अपेक्षा. पण तुझ्या लंब्याचौड्या बातांनी घात केला. तुला शहरातला विदेशी जाणारा गडी दिसला आणि आवडला.''

खरोखरच, माझ्यावर त्यावेळेला काय जादू झाली होती कोण जाणे. मुंबईला गेल्यावर मंडळं, समाजसेवा, सभा–संमेलनं, पार्ट्या या साऱ्या वातावरणाची जणू नशाच चढली होती. थोरामोठ्यांच्या ओळखी झालेल्या.

प्रकाश अमेरिकेला गेला. खूप आश्वासनं देऊन, मला समाजसेवेच्या नादत गुरफटून ठेवून. त्यातच जाईचा जन्म झाला. त्याला कळवलं. पण त्याचं पत्रही नाही आलं अभिनंदनाचं. थोड्या दिवसांनी तो तिकडेच एकीच्या रिलेशनशिपमध्ये असल्याचं कळलं, त्यातूनच ग्रीन कार्ड घेऊन सेटल झाल्याचंही कळलं अन् मग सारा खेळच उद्ध्वस्त झाल्यासारखी मी विमनस्क झाले. एक दिवस जाईला आई–अप्पांकडे आणलं आणि कुणाच्याही नकळत तिला इथेच ठेवून मुंबईला निघून गेले, गावात माझी किती नाचक्की होईल या भयानं पछाडलेलं अन् मुंबईला या परिस्थितीत मानसिक आणि आर्थिक आधार देण्याचा आव आणणारे भेटलेले साव यांनी माझं मला कळू दिलं नाही की मी काय करतेय.

मुंबईत माझ्या कामाची किती गरज आहे हे पटवून देणारे असेच काही देणगीदार... फिरोज बाटलीवाला, त्यातलेच एक. मला प्रोत्साहन देणारे, माझ्या नवऱ्यापेक्षाही मला बरेच काही वाटावे असे. ग्यानू गुजराती त्यांपैकीच. साऱ्यांचे बुरखे पुढेपुढे पार फाटले अन् माझ्या हातात राहिल्या माझ्याच आयुष्याच्या चिंध्या. वावटळीत सापडलेल्या पानासारखी मी भरकटले गेले. पार्ट्या, संमेलनं, उद्घाटनं, देणग्या आणि कौतुक समारंभ, कशासाठी सारं करत आहोत ते विसरून. अधेमधे भाषणं ठोकत होते, लेख लिहित होते, कुणाची सेक्रेटरी म्हणून, कुणाची हस्तक म्हणून अन् संध्याकाळी कुणा संधीसाधूची प्रेयसी बनूनही. जगत होते इतकंच.

बापू, माझ्या वहिनीचे थोरले बंधू, म्हणाले,

''शशीताई, तुम्ही आपल्या लोकांवर, आपल्या गावावर विश्वास ठेवला नाहीत. विश्वासघात, फसवणूक करुन घेतलीत तुमची तुम्हीच, आम्ही एवढी सारी तुमची जिवाभावाची माणसं असूनही.''

''बापू, गाव किती बदललंय नाही!'' विषय बदलण्याचा माझा प्रयत्न होता हा.

''हं. वीज, पाणी... आता सुकाळ आहे अगदी. गोबर गॅस प्लँटच्या सोयीमुळं तुमचा तो भाडोत्री गॅस नको अन् घरं कशी सुटसुटीत झालीत. शशीताई, तुम्हाला ओळखू यायची नाहीत. पूर्वीची चौसोपी भगदाडं ती हीच का म्हणून विचाराल तुम्ही.''

''हो ना! अप्पासाहेब इनामदारांचं घर हेच का म्हणून विचारायची वेळ आली खरी मला.''

''पण माणसं बदलली नाहीत, शशीताई.''

खरं होतं. काही माणसं पूर्वीचीच होती. आमच्या अप्पांच्या वयाची... मोरूअण्णा, घारूअण्णा... त्यांचा कणखरपणा उतरला नाही. आमच्या चंदूच्या दुकानात... चंदू माझा धाकटा भाऊ, दुकान चालवतो किराणा मालाचं... बसल्याबसल्या त्यांनी शिंतोडे उडवायला कमी केले नाहीत. चंदूच वैतागून सांगत होता नं...

मोरुअण्णा म्हणाले, ''आली वाटतं शशी फारीनहून!''

घारूअण्णा लगेच उद्गारलेच, ''मेणबत्ती इथं ठेवून गेलीवती कुठं फटाकडे लावायला?''

सीताकाकू, उमाकाकू त्यांच्या ओट्यांवर कुजबुजताना आढळल्या होत्या परवा. त्यांची तिन्हीसांजेची भजनं, सकाळची सडा–संमार्जनं, दुपारची पापडलोणची घालणं... पूर्वीच्या सकाळ, दुपार, तिन्हीसांजा आठवून देत होत्या; त्यावेळी आईही असायची त्यांच्यात. आई... आई गेल्याचं कळलं तेव्हा मी फक्त मूकपणे ढसढसा रडले होते... मनात. आत्ताही दोन थेंब ओघळलेच गालावर.

''पण शशीताई, या सुधारणांच्या गदारोळात काहीचजणांचं फावतं. पुढारी हुलकावण्या देत राहतात. स्वतःच्या जमिनी सांभाळत राहतात. गाळ तो गाळच राहतो. आपल्या गावात काही वेगळी परिस्थिती नाही. गरीबगुरीब नव्या झालेल्या महागाईला तोंड देत बसलेत. पोरं–सोरं अजून नाकं पुशीत अर्धनग्नं हिंडत असतात आपल्या आयांच्या मागनं. शाळेत गेली गेली नाही गेली, त्याचं काही नाही. भाडोत्री मास्तरही तेवढ्याच आस्थेनं वर्गात येऊन पोरांच्या 'पाट्या' टाकतात अन् झोपा काढतात.''

मला नकळत हसू फुटलं. ते दाबत मी या गंभीर, सात्विक माणसाच्या चेहऱ्याकडे पाहात विचारती झाले,

''बरं मग?''

''बघताच आहात शशीताई तुम्ही. आपल्या जाईचं लक्ष गेलंय या पोरा-सोरांकडे. त्यांच्या सुखदुःखांशी एकरूप होऊन ती काहीना काही वेळ त्यांच्या तोंडच्या शिव्यांची हकालपट्टी करण्यात, त्यांच्या हृदयाच्या जखमांना मलमपट्टी करण्यात घालवते आहे. इतरांना बरोबर घेऊन संस्कार वर्ग उघडून चालवतेही आहे. मला खूप अभिमान वाटतो तिचा.''

रास्त होता हा अभिमान. जाईची आई मी होते. पण तिचे आईबाप बापूच होते असं म्हणलं तर वावगं होणार नाही. होय, हे सत्य आहे. वहिनीनं तिला अव्हेरलं तेव्हा तिच्या जखमांवर मायेची फुंकर घालून वात्सल्यानं छातीशी कवटाळलं या देवमाणसानं. माझ्या ओठांपाशी खूप वेळा शब्द येतात, 'बापू, तुमच्यासारखा पुरुष मला भेटला असता तर?'

आता जाईचा आदर्श बापूच होते; नव्हे, माझ्यासारख्यांचे सुद्धा. परवा मला त्यांनीच बळेबळे मारुती मंदिरात उघडलेल्या संस्कारवर्गाचं उद्घाटन करण्यासाठी नेलं, एक थोर समाजसेविका म्हणून; पण खरं सांगू, माझी मलाच लाज वाटली. पण जाईचा उत्साह पाहून मी भारावूनच गेले. औपचारिक उद्घाटन झालं. मी दोन शब्दही धड बोलू शकले नाही. मुंबईसारख्या विराट नगरीतल्या एका कोपऱ्यात भिरकावलेले शब्दांचे खोटे मोती इथल्या मोकळ्या आकाशाखाली मनाच्या खोल समुद्रात कुठे गडप होऊन गेले होते कोण जाणे!

बापूंनीच माझी ओळख करून दिली. उद्घाटन झाल्यावर माझ्या अपेक्षेप्रमाणे जाई घरी आली नाही. तिनं 'शुभस्य शीघ्रम' केलं होतं. मी ते कौतुक भारावून पाहात बसले. ती कुठलीतरी गोष्ट सांगून त्या मुलांना खिळवून ठेवणार होती. ती गोष्ट सांगायला सुरुवात करणार तोच, एक काळाबिंद्रा, शर्टाची बटणं तुटलेला मुलगा उभा राहिला.

''कारे, खंडू, गोष्ट नाही ऐकणार?'' तो जातोय असं पाहून जाईनं त्याला विचारलं. तो थबकला.

''आय अंथरुणात हाय. तिला डागदरकडनं अवशिद आनायचंय.''

''जरा इकडे ये रे खंडू, तुझ्या शर्टच्या गुंड्या लावते मी, तोवर गोष्ट ऐक मी सांगते ती अन् मग जा लगेच औषध आणायला.''

मुलगा कावराबावरा झाला. जाई हसून त्याला म्हणाली, ''अरे, तुझी आई आजारी आहे ना? मग जाईताईनं लावल्या आज गुंड्या म्हणून काय झालं?''

तिनं कृतीला सुरुवातही केली होती अन् गोष्टही सुरू झाली.

हे खोल खोल शिरणं आपल्याला कधी जमलंच नाही. मी मनोमन शरमले. माझी जाई... माझी जाई ही कल्पना मात्र मला आभाळात नेत होती. या सगळ्या घाईत जाई माझ्याशी धड बोलली सुद्धा नाही. बापूंनी तिला त्याबद्दल हटकलंही. पण तिचं उत्तर कुणीही गप्प बसावं असंच होतं...

''...हे सारं केवळ प्रदर्शन नाही, बापू, केवळ नजर फिरवून सुखी होण्यासाठी मांडलेलं. त्यावरून आपला हात फिरला पाहिजे, पक्का, आपला हात. वेळ गमावून चालणार नाही.''

इथं जाईला कसलीच इतर आकर्षणं नव्हती. सिनेमा, नाटक, पार्टी, भपकेबाज समारंभ, तोंडदेखलं हसणं असं काहीच नाही. छान छोकीनं नवेनवे कपडे घालून हिंडण्याजोगे रस्ते अन् बागाही नव्हत्या. साऱ्या गावासाठी जीव लावावा, शरीर झिजवावं अशातऱ्हेची सरळ पण करारी भूमिका होती, कुठलाही नाटकीपणा नसलेली, अगदी रानच्या मोकळ्या वाऱ्याचा मस्तपणा होता त्यात.

लहानांपासून थोरांपर्यंत गावात साऱ्यांच्या तोंडी तिचं नाव आहे. पण तिला त्याचं काहीच अप्रुप असं नाही.

मुंबईच्या एका कोपऱ्यात माझा जीव गुदमरत होता, फक्त एका कोपऱ्यात. इतर कुठेही माझं अस्तित्व कुणाला जाणवण्याचं कारणच नव्हतं. इथं खरोखरच हलकं वाटतंय. मोकळं वाटतंय. जाईची आई झाल्याचा आनंद मिळतोय भरभरून.

''बापू, आज जाई कुठं गेलीय?''

''शिबिरासाठी गेलीय ती गावातल्या मित्रमैत्रिणींबरोबर. नदीपलीकडे काही वाड्या-वस्त्या आहेत नं तिथलं जीवन अभ्यासण्यासाठी.''

''बापरे, पोर सर्व्हे वगैरे करायला लागली की काय? गावात काय कमी उद्योग आहेत का?''

''शशीताई, तिचा आवाका प्रचंड आहे. त्या वाड्यांमधून आपल्या कार्याची खूप गरज आहे. किती दिवस घोकतेय ती हे. तिथलं कष्टमय जीवन, त्यात तिथल्या पोरांचे होणारे हाल, त्यांच्यावर अकाली येणारी निसर्गाशी दोन हात करण्याची वेळ आणि त्यातून निर्माण होऊ घातलेली निराशा, संस्कारांचा अभाव... असं बरंच काही अनुभवणार आहे ती.''

''एका दिवसात?'' मी आश्चर्यानं विचारलं.

''छे हो, तीन चार दिवसांचं आहे शिबीर.'' बापूंनी शांतपणे सांगितलं ते अन् मी जवळजवळ ओरडलेच,

''बापरे! बापू, तुम्ही परवानगी दिलीत तिला?'' माझा जीव धडधडू लागला.

''शशीताई, हेच वय आहे तिचं उत्साहाचं, उमेदीचं. करू द्या तिला तिचं काम आणि कमवू द्या नावही. आहेत जोडीला दोघं चौघं मुलं मुली, सारी बहीणभावंडांसारखीच आहेत एकमेकांना आणि मुख्य म्हणजे जाईच्या शब्दाबाहेर नसतात कोणी.''

हो; मीही एके काळी याच उमेदीत गावातून बाहेर पडले होते; छे! उमेद कसली, उन्माद होता तो. माझा आवाका अविचारी होता... सुरक्षित कुंपणाबाहेर मारलेली मुसंडीच जणू. पण जाई इथंच आहे... जवळ.

''जाई, कशी काय झाली ट्रीप?'' चार दिवसांनी जाई आली तेव्हा मी विचारलं.

''छान! आई, गाव लहानसंच, पण नेटकं. साऱ्यांच्या उपजीविका यथास्थित. निसर्ग तर उदंडच. नितांत सुंदर जंगलच. वाटलं पिकनिकलाच आलो आहोत. पण आई, पुढाऱ्यांचं स्तोम भारी गं. धनदांडगे शहरी लोक येऊन स्थानिक पाटील, सावकार त्यांना गुंड पोसायला प्रोत्साहन देतात आणि इथले डोंगर, रानं कवडीमोलानं विकत घेऊन इनव्हेस्ट-मेंटवाल्यांना विकून धन करतात. इथल्या

गरिबांना त्यांच्या कोवळ्या मुलांना नोकऱ्या देण्याचं आमीष दाखवतात. त्यामुळं मुलांनाही शिक्षणाचं, संस्कारांचं वावडंच आहे. आमच्यासारखे कळवळा दाखवणारे गावात आलेले दिसले की स्थानिक गुंड हटकतात. 'पिकनिकला आल्यासारखे दोन दिवस वावरून परत जा, जास्त घोळात शिरू नका' अशी तंबी देतात.''

''बाई गं!'' माझ्या तोंडून उद्गार बाहेर पडले.

''मावशी, सरपंचाच्या मुलानं तर अतिप्रसंगाची वेळ आणली होती हिच्यावर.''

जाईच्या डोळ्यांच्या वटारण्याकडं लक्ष न देताच तिच्या मैत्रिणीनं सांगितलं अन् माझ्या छातीत लक्क झालं.

''...नदीकाठानं फिरायला गेली एकटीच. आम्ही सारे थांबलेले देवळात. त्यानं वेळ साधली.''

''जाईऽऽ!'' मी घाबरून गेले होते ऐकून.

''घाबरु नका, शशीताई, काहीही झालं नाही आपल्या जाईला. जाईनं स्वतः वेळ निभावली. हे अजय चितळे, झटापटीचे साक्षीदार आणि पंच.'' बापू एका तरूणाला घेऊन आले होते बरोबर.

''चेष्टा नको बापू... आणि काय हो चितळे, तुम्ही नुसतेच बघे झालात?''

''अहो, जाईनं त्या नराधमाचा धुव्वा उडवला मी जाईपर्यंत तिथं. मीही मुंबईहून पिकनिकला आलेलो. सहज फिरता फिरता तिथं गेलो तर हा प्रसंग. पुढे होऊन पाहतो तो सरपंचाचा मुलगा सुजलेलं थोबाड घेउन पळत सुटलेला. जाईनं काय चॉप हाणलेत अन् पायामध्ये घालून असा आपटला म्हणता...''

''बस, बस! पुरे वर्णन. जाई, काय ग प्रसंग ओढवला होता!''

मी अजून डोकं धरून बसले होते तोच अजय बोलला,

''...अन् हा गावरान झटका मी मुंबईला घेऊन जाणार आहे. शहरातल्या मुलींवरचे वाढलेले अतिप्रसंग पाहता, जाईसारख्या मुलींची शहरात खूप जरूर आहे.''

''हो आई, आम्ही लग्न करणार आहोत. खूप शिकलेत हे. कदाचित विदेशी जाण्याची संधीही...''

''नको जाई, नको गं, तसला विचारही मनात आणू नकोस...'' मी जवळजवळ किंचाळलेच. माझ्या डोळ्यांसमोर सारा चित्रपट सरकू लागला.

''शशीताई अहो, घाबरु नका. इतिहासाची पुनरावृत्ती होतेच असं नाही.'' बापू समजावत होते. मला... चटके खाऊन जखमी झालेल्या अभागिनीला... आणि माझं मन टाहो फोडत होतं.

''नको जाई, हा मोह सोड, इतिहासाची पुनरावृत्ती होणारच नाही कशावरून?...''

...माझ्या डोळ्यांपुढे अंधारी येत होती...

***

त्रिस्कंध पंचकर्म चिकित्सालय

सर्व प्रकारच्या रोगांवर आयुर्वेदिक उपचार



वैद्य निलेश भागवत शिर्के
बी.ए.एम.एस.
7391955911



वैद्य सौ. गौरी निलेश शिर्के
बी.ए.एम.एस.

चिंचवड : फ्लॅट नं. १, बिल्डिंग नं. बी १०, राजपार्क, पोतदार शाळेजवळ, केशवनगर, चिंचवड, पुणे ४११ ०३३.
सकाळी १० ते सायंकाळी ८

खोपोली : माहेर हॉस्पिटल, मुख्य बाजारपेठ, खोपोली, ता. खालापूर, जि. रायगड
प्रत्येक महिन्याच्या १ व १५ तारखेस
सकाळी ९ ते सायं. ४

Email : drnileshshirke@gmail.com



अनिल मुरलीधर कुंभार
Mo. 9822596694



सुनिल मुरलीधर कुंभार
Mo. 9822919739



अभिजीत अनिल कुंभार
B.B.A.-MBA II

श्री साई कोल डेपो

राख व दगडी कोळसा ठोक व किरकोळ भावात मिळेल.

अभिजित विट कारखाना
ॐ साई मॉटर्स

स्वयंवर मंगल कार्यालयासमोर, चाकण, ता. खेड, जि. पुणे.

निवास : धावडे वस्ती, गणेशनगर, भोसरी, पुणे 9270303222

आमचेकडे जुने ट्रक, एल.पी. व टेम्पो गाड्यांचे व्यवहार खात्रीपूर्वक केले जातील

स्त्रियांचे कर्तृत्व

- प्रा.डॉ. निलकुमार शिंदीकर

स्त्री ही देवता आहे. ती आदिमाया आहे. ती आदिशक्ती आहे. ती संस्कृतीची निर्माती आहे. स्त्रीने शेतीचा शोध लावला, घरांची निर्मिती स्त्रियांनी केली. नवाश्मयुगात स्त्रियांनी शेतीचा शोध लावला. निऋती ही स्त्रीराज्याची आद्य महाराणी असून ती कृषीप्रधान संस्कृतीची महाराणी होती असे प्राच्यविद्यापंडित शरद पाटील यांनी सिद्ध केलेले आहे. पुरुषापेक्षा स्त्री अधिक सृजनशील आहे. तिच्याकडे प्रसवक्षमता आहे, ती पुरुषाकडे नाही, त्यामुळे अपत्यप्राप्तीची जबाबदारी निसर्गाने स्त्रीवरती टाकलेली आहे, असेही प्राच्यविद्यापंडित शरद पाटील सांगतात. भटक्या अवस्थेतील मानवाला सुखी-संपन्न जीवन स्त्रियांनी दिले, असे आपण नेहमी ऐकतो, म्हणतो आणि वाचतो, पण एवढे बोलून स्त्रियांचा आदर सन्मान होईलच असे नाही, कारण आज देखील महिलांना अनेक संकटाला सामोरे जावे लागत आहे.

असंघटित क्षेत्रामध्ये महिलांना विषम वेतन दिले जाते. खाजगी आणि असंघटीत क्षेत्रांमध्ये पुरुषांना सुमारे पाचशे रुपये प्रतिदिन वेतन असेल, तर महिलांना सुमारे दोनशे किंवा तीनशे रुपये दिले जातात. पुरुषांच्या बरोबरीने किंबहुना त्याहीपेक्षा अधिक काबाडकष्ट महिलांना करावे लागते. तरीदेखील महिलांना वेतन कमी का? यातून भारतीय समाजाची पुरुषसत्ताक स्त्रीदास्य मानसिकता प्रकर्षाने दिसते, यातून स्त्रियांना दुय्यम-दुर्बल ठरविले जात आहे. विज्ञानाने हे सिद्ध केलेले आहे की स्त्रीदेखील पुरुषांप्रमाणेच शारीरिकदृष्ट्या, मानसिकदृष्ट्या आणि बौद्धिकदृष्ट्या हिंमतवान आहे, कर्तृत्ववान आहे. संविधानाने देखील लिंगभेदाला विरोध करून स्त्री-पुरुष समानतेचा पुरस्कार केलेला आहे.

आपल्या देशात आज देखील मुलगा जन्माला आला, तर पेढे वाटतात आणि मुलगी जन्माला आली तर जिलेबी वाटतात. यातून वंशाला दिवा फक्त मुलगाच आहे, मुलगी वंशाचा दिवा नाही, अशी समाजाची मानसिकता आहे. अनेक ठिकाणी स्त्रीभूण हत्या होते. मुलाप्रमाणेच मुलगी वंशाचा दिवा आहे, असे बुद्ध राजा प्रसेनजितला म्हणाले होते. छत्रपती शिवाजीराजांनी देखील मुलाप्रमाणेच स्वतःच्या सुनांना युद्धकलेचे, घोड्यावर बसण्याचे आणि राजनीतीचे स्वातंत्र्य दिले होते. आपल्या विरोधकांच्या स्त्रियांचा देखील आदर सन्मान केला पाहिजे, हे छत्रपती शिवाजी राजांचे धोरण होते, यातून त्यांचा दृष्टिकोन स्त्रियांबद्दल अत्यंत सकारात्मक होता हे स्पष्ट होते.

केरळ मधील अयाप्पा मंदिरात सर्व वयोगटातील महिलांना प्रवेश दिला पाहिजे, असा महत्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिलेला आहे, तरीदेखील मंदिराशी संबंधित पुजारी आणि काही धर्ममार्तंड महिला प्रवेशाला अनुकूल नाहीत. त्यांचे म्हणणे आहे की महिलांना मासिक पाळी येते, त्यामुळे मंदिराचे आणि धर्माचे पावित्र्य नष्ट होते. मुळात मासिक पाळी ही अपवित्र किंवा अशुद्ध बाब नाही, असे सर्वज्ञ चक्रधर म्हणाले होते. नाकाला येणारा शेंबूड आणि मासिक पाळी या दोन्हीही नैसर्गिक क्रिया आहेत, त्या अशुद्ध किंवा अपवित्र नाहीत. आपल्या आईला मासिक पाळी आली नसती तर आपला जन्मच झाला नसता. मानवी प्रजननासाठी मासिक पाळी अत्यावश्यक असते. जे कोणी मासिक पाळीला अपवित्र किंवा अशुद्ध समजून महिलांच्या मंदिर प्रवेशाला विरोध करत असतील किंवा करतात, त्यांचाही जन्म मातेच्या उदरातूनच झालेला आहे, ते काही आभाळातून पडलेले नाहीत. पण ती मानसिकता बदलणे अत्यावश्यक आहे. त्यासाठी क्रमिक पाठ्यपुस्तकात आमूलाग्र बदल होणे गरजेचे आहे, त्याच वेळेस खरा महिलांचा सन्मान होईल.

आईवरून शिवी देणे, हे सुद्धा पितृसत्ताक व्यवस्थेचे लक्षण आहे. एखाद्या अकार्यक्षम पुरुषाला चोळी-बांगडीचा आहेर करणे, बांगड्या भरल्या काय? असे टोमणे मारणे, हे देखील महिलांना दुबळ्या ठरविण्याचा प्रकार आहे. मुळात साडीचोळी, बांगड्या ही स्त्रियांची आभूषणे आहेत. पेहरावावरून कर्तृत्वाचे मूल्यमापन होऊ शकत नाही. एखाद्या व्यक्तीने पुरुषाची कपडे घातली म्हणून ती व्यक्ती खूप सामर्थ्यशाली असते आणि एखाद्या व्यक्तीने महिलांची कपडे घातली म्हणून ती व्यक्ती अकार्यक्षम असते, असा तर्क करणे हेच मुळात अवैज्ञानिक आहे. स्त्री ही क्षमतेच्या बाबतीत पुरुषांपेक्षा कोणत्याही क्षेत्रात कमी नाही, हे स्त्रीवादी अभ्यास शास्त्र, प्राच्यविद्या, पुरातत्वशास्त्र, मानवविद्या आणि आधुनिक विज्ञानाने सिद्ध केलेले आहे. ज्यादिवशी आईवरून शिव्या देण्याचे बंद होईल, महिलांना दुबळ्या समजण्याची मानसिकता बदलेल, त्या दिवसापासून स्त्रियांच्या सन्मानाला सुरुवात होईल.

आपल्या देशातील महिलांमध्ये आरोग्याचे खूप मोठे प्रश्न आहेत. हिमोग्लोबीनचे प्रमाण कमी असणे यापाठीमागची कारणमीमांसा महिलांना प्रचंड कष्ट करावे लागते, त्यातून उपासतापास-व्रतवैकल्ये, आहारात जीवनसत्वे, मिनरल्स, प्रोटीन, फायबरचे कमी प्रमाण, अनेक अंधश्रद्धा त्याचा परिणाम शारीरिक आणि मानसिकतेवर होतो.

मध्ययुगीन काळातील अमानुष अशा सती प्रथेची जागा आधुनिक युगात लैंगिक छळाने घेतलेली आहे. लैंगिक छळ करणे, महिलांच्या हत्या हा मोठा गंभीर प्रश्न आहे. हा प्रश्न सोडवण्यासाठी शासनाने मानसतज्ञ, शिक्षणतज्ञ, पोलीस अधिकारी, न्यायाधीश, कायदेतज्ञ, स्त्रीवादी अभ्यासक यांची एक समिती स्थापन केली पाहिजे. त्याद्वारे स्त्री-पुरुषांचे सुंदर, आनंददायी, प्रेमळ, नैसर्गिक जीवन कसे जगावे याचा एक दिशादर्शक आराखडा तयार करणे अत्यावश्यक आहे. मुलामुलींना एकमेकांबद्दल वाटणारे आकर्षण ही बाब अनैसर्गिक नाही. तो स्थायीभाव आहे, सहज भाव आहे, यामध्ये विकृतीचा उदय कसा होतो? त्याचे निराकरण कसे करावे, यावरती अधिक अभ्यास होणे गरजेचे आहे.

भारतीय समाज व्यवस्थेमध्ये योनीशुचितेबाबत अनेक कडक निर्बंध

आहेत. परंतु शिश्न शुचितेबाबत अवाजवी स्वातंत्र्य आहे. सर्वोच्च न्यायालयाने एका निकालांमध्ये स्त्री-पुरुषांना एकमेकांबद्दल वाटणारे आकर्षण ही नैसर्गिक बाब आहे. विवाह संस्थांचा उदय ही कृत्रिम समाजरचना आहे, त्यामुळे लैंगिक निर्बंध ही देखील एक अन्यायकारक बाब आहे, असे मत मांडले आहे, हा अनेक कर्मठाना संस्कृती वरचा हल्ला वाटत असला तरी मानवतावादी मूल्य जपणारा हा सर्वोच्च न्यायालयाचा निर्णय आहे. आज आपल्या देशातील सर्वाधिक हत्या/आत्महत्या या लैंगिक कारणावरून होतात, त्यामध्ये महिलांचं मोठ्या प्रमाणामध्ये बळी जातात.

आपल्याकडे मातृत्व हे परिपूर्ण जीवन मानले जाते. विवाहानंतर अपत्यप्राप्ती नाही झाली तर त्या दांपत्याला समाजाकडून मोठ्या प्रमाणामध्ये मनस्ताप दिला जातो. एखाद्या दांपत्याला अपत्य प्राप्ती होत नसेल, तर हा काही गुन्हा नाही किंवा अपत्यप्राप्ती म्हणजे परिपूर्ण जीवनही नाही. अपत्यप्राप्ती नाही झाली तरी अशा महिलांचा सन्मान केला पाहिजे, आदर केला पाहिजे हे समाजमन तयार करणाऱ्या अभ्यासक्रमाची देशाला गरज आहे.

हुंडा देणे, हुंडा घेणे हा कायद्याने गुन्हा आहे, त्याहीपेक्षा तो सामाजिक अपराध आहे, कारण मुलींना जशी लग्नाची गरज असते, तशीच ती मुलांनादेखील असते. एखाद्या नवरदेवाची किंमत ठरविण्यासाठी तो काही बाजारातील प्राणी नाही. हुंडा घेणे हे काही शौर्याचे लक्षण नाही. छत्रपती शिवाजीराजांनी हुंडा न घेता गरीब कुटुंबातील मुलीचे लग्न स्वतःच्या राजपुत्राबरोबर लावले. आज हुंडा न घेणे हेच खरे शिवप्रेम ठरेल. हुंडा पद्धतीमुळे अनेकांची कुटुंब उद्ध्वस्त झाली आहेत. अनेकांनी आत्महत्या केल्या आहेत. दोन वर्षापूर्वी मराठवाड्यातील एका अविवाहित मुलीने आपल्या वडिलांना आपल्या लग्नाचा त्रास नको म्हणून आत्महत्या केली होती, तर गुजरातमधील एका विवाहित तरुण मुलीने हुंड्याच्या छळाने नदीमध्ये उडी टाकून आत्महत्या केली. म्हणजे भारतीय समाज व्यवस्था अजून किती क्रूर आहे हे स्पष्ट होते. हुंडा पद्धती ही जशी गरीब कुटुंबांमध्ये आहे, तशीच ती श्रीमंत आणि उच्चशिक्षित वर्गात देखील मोठ्या प्रमाणात आहे. ज्यादिवशी हुंडा पद्धती बंद होईल तो दिवस महिलांच्या सन्मानाचा दिवस असेल.

वैधव्य हा काही गुन्हा नाही किंवा अपराध नाही. विधवांनी देखील इतिहास घडविला आहे. जिजामाता, ताराराणी, अहिल्याबाई होळकर, सावित्रीबाई फुले यांनी पतीनिधनानंतर सती न जाता निर्भीडपणे, कणखरपणे, हिमतीने अनेक संकटावर मात करून देशासाठी महान ऐतिहासिक कार्य केले. आज देखील विधवांना अशुभ समजले जाते. विधवांना मंगल कार्यक्रमाला आमंत्रित केले जात नाही. ज्यावेळेस विधवांचा आदर सन्मान केला जाईल, त्याच वेळेस महिलांचा आदर सन्मान होईल.

सरळ नाक, पांढरा रंग, उंचीपुरी देहयष्टी म्हणजे सौंदर्य अशा आपल्याकडे सौंदर्याच्या कल्पना आहेत. किंबहुना उंच असणे, गोरे असणे, सरळ नाक असणे हे आपल्याकडे सौंदर्याचे निकष आहेत, मग अशा व्यक्तींकडे अपवाद वगळता सौंदर्याचा प्रचंड अहंभाव असतो. मग एखादी व्यक्ती बुटकी असेल, काळी असेल, नाकाने नकटी असेल तर मग ती सुंदर नाही का? उंची, रंग आणि नाकाच्या रचनेवरून सौंदर्य ठरविणे ही कर्मठ, सनातनी वृत्ती आहे. खरे सौंदर्य हे कर्तृत्वामध्ये असते. परंतु आपल्याकडे रंगरूप, उंचीवरुन अनेकांची अवहेलना केली जाते. कुरूप म्हणून हिणविले जाते.

जगभरातील भांडवली आणि सनातनी विचारधारा सौंदर्यप्रसाधनांची उत्पादन करून ते खपविण्यासाठी विश्वसुंदरी स्पर्धा आयोजित करतात व त्यातून आपली उत्पादन खपवत असतात, हे मोठे मार्केटिंगचे व त्याला जोडूनच वर्णद्वेषाचे जागतिक षडयंत्र आहे. याला अनेक अविकसित आणि विकसनशील देश बळी पडतात. यातूनच काळ्या नकट्या, बुटक्या स्त्रियांना नाकारण्याची मानसिकता तयार केली जाते. काळा रंग हा अशुभ किंवा अपवित्र नाही. विठ्ठलाचा रंग काळा आहे. त्याचा बुक्काही काळ्या रंगाचा आहे. काळी जमीन अधिक कसदार असते. सर्व रंग आणि सर्व मानव प्राणी हा निसर्गाचा आविष्कार आहे, त्यांना सुंदर-कुरूप ठरविण्याचा अधिकार कोणालाही नाही. जगाचा इतिहास घडविण्यामध्ये बुटक्या, नकट्या आणि काळ्या लोकांचादेखील मोलाचा वाटा आहे. त्यामुळे काळ्या, नकट्या, बुटक्या लोकांना दुय्यम लेखू नये. सुंदर असणे म्हणजे नाजूक असणे, नाजूक असणे म्हणजे दुबळे असणे, त्यामुळे मादी ही दुबळी असती, ही पुरुषी मानसिकता धर्मांध सौंदर्य संकल्पनेतून निर्माण केली जाते. पुरुषी, सनातनी, धर्मांध, कर्मठ मानसिकता बदलेल तेव्हाच महिलांचा आदर सन्मान होईल.

***

हार्दिक अभिनंदन ! सौ. नयनाताई सचिन सौदागर यांची सरपंच पदी निवड



निरोड (बाजार) तालुका संग्रामपूर जिल्हा बुलढाणा येथील सौ. नयनाताई सचिन सौदागर यांची सर्वसाधारण महिला प्रवर्गातून सरपंच पदी निवड झाली आहे, संग्रामपूर तालुक्यातील महत्त्वाचे म्हणून ओळखले जाणारे निरोड (बाजार) गाव आहे या गावातील सामान्य कुटुंबातील रहिवासी सौ. नयनाताई यांची निवड सरपंच पदी झाल्यामुळे कुंभार समाजात आनंदाचे व उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. त्यांच्या निवडीमध्ये सुरेशराव सौदागर, वासुदेवराव सौदागर व राजेश सौदागर यांनी महत्त्वाची भूमिका पार पाडली आहे. सर्वत्र नयनाताईचे कुंभार समाज बांधवांकडून कौतुक केले जात आहे. कुंभश्री परिवाराकडून त्यांचे हार्दिक अभिनंदन व पुढील वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

मूल

– जयदीप प्रतिभा दत्तात्रय आफळे



विमान उतरताच किशोरने मोबाइल सुरु केला. नेटवर्क मिळायला वेळ लागू लागला तसा तो अस्वस्थ झाला. फोन सुरु होताच त्याने पहिला फोन केला नेहाला, त्याच्या मुलीला, ''नेहा कशी आहेस तू? मी आत्ताच मुंबईला लँड होतो आहे, घरी येईन चार तासात.'' तिचे आनंदात आहे हे उत्तर ऐकताच तो खुश झाला. आपण घरी कधी पोचून तिला भेटतो आहे असं त्याला वाटले. लगेच दुसरा फोन करुन त्याने घरी जायच्या गाडीची सोय केली. सामान घेतल्यावर तो लगबगीने विमानतळाबाहेर आला. त्याने केलेली गाडी एक फोन करताच त्याच्या समोर आली. घरचा पत्ता त्याने दिलाच होता. आता त्याने बायकोला, कल्पनाला फोन केला व आपण घरी निघाल्याचे तिला कळविले. त्यानंतर त्याने ऑफिसमध्ये फोन करुन आपण मुंबईला पोचल्याची कल्पना दिली व त्याबरोबरच आपली पुढे दोन दिवस सुट्टी आहे हेही सांगून टाकले.

बरोबर तीन तास व पन्नास मिनीटांनी तो घरी पोहचला. सामान काढेपर्यंत कल्पना बाहेर आली. ''नेहा कुठे आहे?'' त्याने विचारले. ''तिच्या सासुची मैत्रीण आल्यामुळे ती तिथेच थांबली आहे, त्या गेल्या की येईल,'' हे सांगताना पण तिचा चेहरा पडला होता. एक मिनीट किशोरला तिच्या सासुरवाडीतील लोकांचा अतिशय संताप आला. तो यावेळी घरी येणार हे त्याने आठ दिवसांपूर्वीच तिच्या घरी सांगितले होते व नेहाला त्यावेळी घरी पाठवायला सांगितले होते, पण तरीही तिच्या सासुची मैत्रीण टपकल्याने नेहाचे येणेच लांबले होते. नेहाचे लग्न झाल्यानंतर त्याला तीनच महिन्यात अमेरिकेला जावे लागले व त्याचा मुक्काम लांबत तो चार महिन्यापासून सहा महिन्यांपर्यंत लांबला. तो खरच वैतागला होता, त्यातच नेहाकडील 'गुड न्युज' कळल्यानंतर तो घरी येण्याकरता फारच कासाविस झाला. तरी त्याचा आठवड्यातून किमान एक व्हिडीओ कॉल व्हायचाच. पण शेवटी प्रत्यक्ष भेटीची सर व्हिडीओ कॉलला थोडीच येणार?

घरी आल्यावर त्याने आधी आंघोळ केली, तोपर्यंत कल्पनाने त्याला गरम पोहे खाण्याकरता करुन ठेवले होते. नेहाला यायला अवकाश आहे हे कळल्यावर तो फारच निवांत आवरु लागला. आंघोळ करायलाच त्याने अर्धा तास घेतला! एरवी त्याला दहा मिनीटेही पुरत!!

शेवटी तासाभराने नेहा आली व तीही एकटीच!! खरंतर तिचा नवराही त्यावेळी घरीच होता पण त्याने सासऱ्याला भेटायचे कष्ट घेतले नाही. अजूनही ती तशीच दिसत होती, लग्नाच्या वेळी होती तशी, फक्त चेहऱ्यालाच जरा उतरती कळा लागली होती. तिने कितीही प्रयत्न केला तरी त्याच्या बापाच्या नजरेला हे जाणवलेच.

आता त्याने बॅग उघडून एक एक वस्तू काढायला सुरुवात केली. नेहमीप्रमाणे निम्याहुन जास्त गोष्टी त्याने नेहा करताच आणल्या होत्या. नेहाने त्या बघितल्या खऱ्या, पण नेहमीच्या उत्साहाने लगेच घेतल्या नाही. एरवी तिला आणलेले ड्रेसतर घालूनच दाखवे व बाकीच्या गोष्टीतर लगेच ताब्यात घेऊन वापरायला सुरुवात करे. पण आज तिने फक्त बघितले व तिथेच ठेऊन दिले.

''का गं आवडले नाही कां? ड्रेसचा रंग तुझ्या आवडीचे आणले आहेत,'' किशोरने विचारले, ''तसं नाही, घालेन ना मी'' तिने सांगितले खरे पण त्याच्यावरुन त्याला काही विश्वास वाटला नाही.

''तिला फक्त साड्याच नेसायला सांगितल्या आहेत, त्यामुळे तीने ड्रेस घालणे बंद केले आहे'', कल्पनाने माहिती पुरवल्यावर किशोर भडकलाच. ''ती काय आजी झाली आहे का साड्या नेसायला?''

नेहा नेहमीसारखी बोलतही नव्हती. केवळ अर्धा तास थांबून ती गेलीही. ती गेल्यावर कल्पना तिच्या सासरच्या लोकांबद्दल सांगू लागली. जे काही ऐकले ते त्याला आवडले नव्हते, पण त्याने थेट काही बोलायला कल्पनाचा ठाम विरोध होता. मुळात नेहाचा नवराच तिचे बोलणे ऐकत नव्हता, त्याला त्याच्या आईवडिलांचेच नेहमी बरोबर वाटत होते, त्यामुळे नेहा स्वभावाने किशोरसारखी बंडखोर नव्हतीच, त्यामुळे तिही त्यांच्या विरोधात कधी गेली नाही, व तिला न पटूनही त्यांचे ऐकत गेली.

मग किशोरने ठरविले, आता तिच्या सासरच्या लोकांना भेटायला जायचे. त्याचवेळी कल्पनाने बजावून सांगितले, की जास्त विरोधी बोलायचे नाही.

''हे बघ तुझ्याकरता पुस्तक आणले आहे, नक्की वाच'', नेहाच्या घरी येताच किशोरने तिला पुस्तक दिले.

''घरोघरी ज्ञानेश्वर, हे कुठले पुस्तक? ज्ञानेश्वरीवरीला आहे काय?'', नेहाच्या सासऱ्यांनी नकुलरावांनी विचारले.

''तुम्हाला अभिमन्युची गोष्ट माहिती आहे ना?'' किशोरने विचारले, ''त्यात काय दिले आहे, की तो पोटात असताना कृष्णाने चक्रव्युहात आत कसे जायचे हे सांगितले होते व ते गर्भात असताना त्याने ऐकल्याने तो ते भेदून आत जाऊ शकला, पण परत कसे यायचे हे त्याने ऐकले नसल्याने तो आतच अडकला व त्यात त्याचा मृत्यु झाला. या गोष्टीवर परदेशातही बरेच संशोधन झाले व त्यावरुन त्यांनी हा निष्कर्ष काढला की मुल गर्भात असताना मातेवर जे संस्कार होतात, ज्या वातावरणात ती रहाते, ती ज्या मानसिक अवस्थेत असते, त्याचा थेट परिणाम बाळावर होतो. असे म्हणतात शिवाजी महाराजांच्या वेळी जिजाऊमाता

तलवारबाजी करत असत, त्यांना ती आवड निर्माण झाली होती. जर आई जन्माच्या वेळी उत्साही असेल तर मूलही तसेच होईल. जर तीच दमलेली आणि त्रासलेली असेल तर मूलही तसेच असेल. म्हणून तुला म्हणतो नेहा तू नेहमी खुश रहा, बाळ पण आयुष्यभर आनंदी राहील. तू जशी आत्ता राहशील, तसा त्याचा स्वभाव बनू शकतो पूर्ण जन्माकरता. त्यामुळे तुझ्या अवतीभवती वातावरणही त्याला अनुरुप असायला हवे.''

नेहाच्या सासुला सुरवातीला त्याचा बोलण्याचा रोख ऐकून त्याला काय ऐकवायचे आहे याचा अंदाज आला होता. त्याला कसे खरमरीत उत्तर द्यायचे याचा त्यांनी विचारही केला होता. पण एकंदर त्यांनी जे काही सांगितले ते ऐकल्यावर त्यांना पण आपल्या मुलाला होणाऱ्या बाळाची चिंता होऊ लागली. किशोरने त्याच्या नोकरीच्या तीसपैकी पाच वर्षे युरोप व अमेरिकेत घालवली असल्याने त्याचे ज्ञान व माहिती याबद्दल त्यांना शंका नव्हती. त्यामुळे त्यांनीही काही न बोलायचे ठरविले.

''आज रविवार आहे, नेहाकडे जायचे का?'' कल्पनाने विचारले. ''काही नको, त्यांना फोन करुन आधी परवानगी मागा, ते हो म्हणाले तर जा, हे मला पटणार नाही, मी तरी जाणार नाही. तुला जायचे असेल तर तुझी मर्जी'' किशोरने पूर्ण उडवून लावले. ती गेले दोन दिवस त्याच्या मागे लागली होती, पण त्याची अजिबात तयारी नव्हती.

तेवढ्यात बेल वाजल्याने कल्पना दरवाजा उघडायला गेली. बघते तर काय नेहा व तिही त्यांनी अमेरिकेहून आणलेल्या ड्रेसवर!

''बाबा झिंदाबाद'' आल्याबरोबर तिला मिठी मारुन नेहा म्हणाली. तशीच पळत ती किशोरला येऊन बिलगली. आता ती लग्नाआधी सारखीच खेळकर दिसत होती.

***

विधवा विवाह आणि आपण

– सानिका काळे

सर्वसाधारणपणे, नवरा गेल्यावर अनेक स्त्रिया एकटेपणाने जीवन व्यतीत करतात. (धर्म, जात, जमात, आर्थिक स्तर इ. नुसार चित्र वेगळे असू शकते.) स्त्रीने दुसरे लग्न केले किंवा मृत नवऱ्याच्या आई-वडिलांनीच सुनेचे दुसरे लग्न लावून दिले अशी उदाहरणे असली तरी ती अपवादात्मक आहेत. विधवा स्त्रीचे वय तरुण असेल तर तिचे दुसरे लग्न होण्याची शक्यता तरी असते पण ती जर तिशी-चाळीशीच्या पुढची असेल तर मात्र ते कठीण असते. शिवाय, विधवा स्त्रीला मुले असतील तर दुसरे लग्न केल्यावर दुसरा नवरा त्या मुलांना स्वीकारेल का, याचीही शंका असते.

विधवेबरोबर लग्न करण्याची तयारी काही पुरुष दाखवतात, पण तिला मुले असतील तर तिला स्वीकारले जाण्याची शक्यता कमी होते. स्त्रीने मात्र तिच्या नवऱ्याच्या पहिल्या पत्नीची मुले स्वीकारावीत आणि त्यांचा सांभाळ करावा, अशी अपेक्षा असते. विधुरांनी अविवाहित स्त्रीशी लग्न केल्याची अनेक उदाहरणे आहेत, मात्र अविवाहित पुरुषाने विधवेशी लग्न केल्याची तुरळकच उदाहरणे सापडतात.

अनेक पुरुष वयाच्या चाळीशी-पन्नाशीनंतरही लग्न करतात, असे दिसून येते. त्याबद्दल आक्षेप असण्याचे कारण नसले तरी पुरुषाला जो न्याय असतो तो बाईला का नाही, हा प्रश्न विचारणे आवश्यक आहे. पुरुषप्रधान आणि जातीव्यवस्थेत स्त्रीची लैंगिक शुद्धता हा कळीचा मुद्दा असतो. स्त्रीने नवऱ्याव्यतिरिक्त दुसऱ्या पुरुषाचा विचारही मनात आणणे गैर मानले जाते. काही जातींमध्ये स्त्रियांचा पुनर्विवाह मान्य केला जात नाही. अशा जाती स्वत:ला 'उच्च' मानतात. पुरुषाने दुसरे लग्न केलेले चालते, घरात लग्नाची बायको असताना दुसरीशी संबंध ठेवलेलेही चालतात पण स्त्रीने मात्र नवऱ्याशी एकनिष्ठच असावे, अशी अपेक्षा असते. अशा परिस्थितीत, नवरा गेल्यावर स्त्रीने दुसऱ्या लग्नाचा विचार मनात आणणे स्वीकारले जाणेच अवघड असते. अनेक स्त्रिया नवऱ्यावर-सासरच्यांवर आर्थिकदृष्ट्या अवलंबून असतात. नवरा-मुलेबाळे आणि संसार हेच त्यांचे जग असते. अशा वेळी, नवरा गेल्यावर त्यांचे जगच उद्ध्वस्त होते. त्यामुळे, भौतिक गरजा तरी पूर्ण होतील का या चिंतेतून त्यांना असुरक्षित वाटू शकते. अनेक विधवा (आणि नवऱ्याबरोबर न राहणाऱ्या) स्त्रिया आर्थिक ओढगस्तीचे जीवन जगत असतात. विधवा म्हणून जगत राहणे त्रासाचे असते.

एखाद्या पुरुषाची बायको वारली की तिचे प्रेत स्मशानात नेतानाच 'याला दुसरी कोणती बायको करून आणायची' याची चर्चा सुरू होते. काही वेळा तर तिचा दहावा व्हायच्या आतच दुसरे लग्नही उरकले गेल्याची उदाहरणे आहेत. मुले लहान असतील तर त्यांना सांभाळायला, भाकरतुकडा करून घालायला कोणी तरी स्त्रीच असली पाहिजे, असे गृहीत धरून पुरुषाचे दुसरे लग्न केले जाते. म्हणजे व्यावहारिक कारणांमुळे पुरुषाचे दुसरे लग्न केले जाते आणि त्यातून त्याच्या शारीरिक-लैंगिक गरजांचीही पूर्तता होते. थोडक्यात, पुरुषाचा 'माणूस' म्हणून विचार करणारी ही व्यवस्था स्त्रियांना मात्र अनेक अर्थांनी माणूसपण नाकारते.

***



प्रो. केशव धोंडीबा कुंभार
मो. 9892616177, 9867833287



केशव रसवंती गृह
हरगंगा महल, प्लॉट नं. ४५,
टिळक रोड, दादर टी. टी.,
मुंबई ४०० ०१४.

श्री. गुरुदेव रसवंती गृह
शांती भवन, प्लॉट नं. ४२७,
डॉ. बाबासाहेब आंबेडकर मार्ग,
माटुंगा, मुंबई ४०० ०१९.

● शाळेतील मुलांसाठी खास सवलत

योग्य निर्णय... नेहमीच गरजेचा!

- अनुजा कुलकर्णी, पुणे.

''आई, आज जेवायला आवडीचं काहीतरी खायला कर ना... थालपीठ करतेस? किती दिवस झाले तुझ्या हातचे थालपीठ खाऊन...'' पूजा म्हणाली...

आज बरी आठवण आली आईच्या हातच्या थालपीठाची? आणि आज इतके दिवसांनी वेळ मिळतोय तुला माझ्याबरोबर बोलायला... आईनी हसतच पूजाला प्रश्न विचारला.

''आई हसू नकोस... वेळच मिळत नाही हल्ली घरी थांबायला... यु नो ना, कॉलेज प्लस डान्स आणि इतर ॲक्टिविटी... कुठून थांबू घरी? त्यात जरा निवांत झाले की सबमिशन असतातच डोक्यावर टांगत्या तलवारीसारखी...''

''हाहा... आय नो, यु आर बिझी! मी गंमत करतीये... पण कधीतरी निवांत वेळ काढून ठेवत जा आईसाठी... तुझ्याशी बोलून बरं वाटत... आणि सांग, तुला कोणतं थालपीठ करू... मेथीचं का तुला आवडणारं वांग्याचं थालपीठ? आत्ता घरात मेथीही आहे आणि वांगी हि आहेत... वांग्याचं हव असेल तर आधीच सांगून ठेव... मी लगेच वांग्याची भाजी करून ठेवते...''

''वांग्याच्या भाजीच थालपीठ कर... बरेच दिवस खायचंय वांग्याच्या भाजीच थालपीठ.... आणि तू मस्त करतेस... भारी लागतं ते दह्याबरोबरं... मी वांगी खात नाही म्हणून कसली आयडिया काढलीस गं आई...''

''मग... मुलीला सगळं खायलाच घातलं पाहिजे ना... तू वांग्याची भाजी खात नाहीस म्हणून काहीतरी वेगळी आयडिया... वांगी पोटात गेल्याशी मतलब! आज रात्री जेवायला वांग्याच्या भाजीच थालपीठ करते अगदी तुला आवडत तसं... खुश?''

''हो आई... एकदम खुश... थँक यु आई...''

इतकं बोलून पूजानी आईला घट्ट मिठी मारली आणि पूजा बाहेर पडली... संध्याकाळी घरी आली खरी पण घरी थांबायला नाही... परत आईला मिठी मारुन तिने बोलायला सुरवात केली,

''आई...''

''काय झालंय काय आज पूजा... इतक प्रेम का येतंय? लहानपणी काही हवं असेल तर लाडात यायचीस... आत्ता पण काही हवंय का?''

''नो ग आई... आता मी मोठी झालीये! मी काय फक्त काही हवं असेल तेव्हाच नाही मारत मिठी! मला तू खूप आवडतेस आई म्हणून मिठी मारली... एक सांगू?''

''काय सांगायचं? सांग... मला वाटलंच... तू उगाच लाडात नाही येत अशी! सांग काय झालंय?''

''आई, चिडू नकोस! आज रात्री मी जेवायला घरी नसणारे गं... तू प्लीज चिडू नकोस.''

''तूच म्हणालीस थालपीठ कर आणि आता म्हणतेस घरी थांबणार नाही? आणि थालपीठ नाही खाणार? सगळी तयारी केली होती मी... आणि एकदम कुठे जायचा प्लॅन केलास पूजा? कधी ठरलं बाहेर जायचं?...'' आईनी पूजासाठी थालपिठाची सगळी तयारी केली होती पण आयत्यावेळी पूजानी बाहेर जायचं काढलं... आईचा चेहरा थोडा पडला... ते पूजानी नोटीस केलं आणि पूजा बोलली,

''चिल आई, यु नो... आम्ही मित्र मैत्रिणी कधीही बाहेर जातो... अचानक ठरलं आज भेटायचं बाहेर जेवायला... आणि थालपीठ उद्या नक्की... आज साठी सॉरी...''

''अगं पण...'' आई तिचं वाक्य पूर्ण करायच्या आधीच पूजा बाहेर निघून गेली... आईनी आज तिच्यासाठी तिला आवडतो तो सगळा स्वयंपाक केला होता... अगदी वांग्याची भाजी करून वांग्याच्या थालपीठाची तयारी पण केली होती ती फक्त मुलीला आवडत ते खायला घालायला... पण आई काय बोलतीये ते ऐकून घ्यायलाही पूजाला वेळ नव्हता... आईचा मूड एकदम खराब झाला... तिने सगळं आवरून ठेवलं आणि तिही न जेवताच एकटीच बसून राहिली...

पूजाचं रात्री बाहेर पडणं हळू हळू वाढायला लागलं... पूजाचं रात्र रात्र बाहेर हिंडण आईला अजिबात आवडत नव्हतं पण पूजा आईच बोलण ऐकून घेण्याच्या मनस्थितीतच नसायची कधी... एकदा आईनी पूजाला समोर बसवून घेतलं आणि ती बोलली,

''पूजा, तू कुठे जातेस गं हल्ली रात्री? रात्र रात्र भर बाहेर असतेस... तू कुठे जातेस... काय करतेस हे कधी विचारतही नाही आम्ही... तू स्वत:हून सांगशील अस वाटलं होतं... पण तू काही सांगतच नाहीस... रात्री तू बाहेर कुठेतरी हिंडत बसतेस, घरी येत नाहीस म्हणून परवाच बाबा चिडले होते... कसंतरी करून त्यांना शांत केलं मी...''

''काही नाही गं आई.... सध्या डान्सची खूप प्रॅक्टिस चालूये... खरंच वेळ नाही मिळत... पुढच्या आठवड्यात प्रोग्राम आहे... त्यामुळे आम्ही सगळे एकत्रच असतो रात्र भर...''

''रात्री डान्सची प्रक्टिस करता? कुठे?''

''मैत्रिणीच्या घरी... ॲड यु नो हर! डोंट वरी आई... तुझा माझ्यावर विश्वास आहे ना?''

''विश्वास आहे ग... पण तुझं वय नाजूक आहे. म्हणून काळजी वाटते... चांगल्या लोकाबरोबरं असतेस का नाही त्याची काहीच आयडिया नाही आम्हाला... तू कधी कुणाला भेटवलं ही नाहीस...''

तितक्यात पूजाचा फोन वाजला... ती फोन वर बोलली आणि आईला म्हणाली,

''ए आई चल मी पळते... सगळे जमले आहेत डान्सची प्रॅक्टिस आहे... नंतर बोलू...''

आईच्या बोलण्याकडे साफ दुर्लक्ष करत पूजा घरातून बाहेर पडली... आईला पूजाची चिंता वाटत होती पण पूजा तिला खात्री देत होती... आणि आईलाही सगळं पटत होतं... कारण ती खरही बोलत होती... तिच्या ग्रुपचा डान्सचा प्रोग्राम होता... आणि त्यासाठी सगळे खूप मेहनत घेत होते... फायनल रिहर्सल झाली आणि प्रोग्रामचा दिवस आला... तिचा डान्सचा प्रोग्रम मस्त झाला आणि आईला वाटल आता तरी पूजाच रात्र रात्र बाहेर राहाण बंद होईल... पण तसं झालं नाही...

आईनी पूजाला विचारलं,

''आता घरी थांबणार ना रात्री?''

त्यावर पूजाचा उत्तर तयार होतं आणि ती बोलली,

''आई डान्स संपला पण सबमिशन्स आहेत आता. खूप आहेत! शेवटचं वर्ष... खूप लोड आहे सबमिशनच... सबमिशन संपली की रात्री बाहेर राहणं बंद...''

पूजाच्या आईला तेही पटलं आणि तिने विचार केला, शेवटच वर्ष आहे... परत अशी मजा करायला नाही मिळणार! करू दे मजा!

सबमिशन्स झाली... परीक्षाही झाली... आता आईला वाटल पूजा रात्री घराबाहेर राहणार नाही... पण ती चुकीची होती... तीच घराबाहेर राहाण बंद झाल नाही... एक दिवस आईला शंका आली आणि तिने पूजाला विचारलं,

''पूजा... कॉलेज संपल की... आता काय करतेस रात्री मैत्रिणीच्या घरी?''

पूजाकडे काही उत्तर नव्हतं आणि तिने विषय टाळला आणि तिने आईला मिठी मारून ती बोलली,

''आई... मैत्रिणीकडे गप्पा मारायला जमतो...''

सेम रुटीन बरेच दिवस चालू राहिलं... एक दिवशी पूजा सकाळी घरी आली... आईनी दार उघडल आणि चिडूनच बोलली,

''पूजा, तुझं रात्र रात्र बाहेर राहाण आता बंद कर... तू काय करतेस, कुठे जातेस? काही सांगतही नाहीस... काय समजायचं आम्ही?''

''आई उद्या बोलते... प्लीज! खूप दमली आहे आत्ता... थोड्या वेळानी बोलू...'' इतक बोलून पूजा तिच्या रूममध्ये निघून गेली. पूजा टेन्शनमध्ये आहे हे आईला जाणवलं होतं.

दुसऱ्या दिवशी पूजाच्या आईनी तिला फैलावरच घेतलं...

''पूजा, तू काय करतेस रोज रात्री मैत्रिणीच्या घरी? आज मला ऐकायचं... इतक काय प्रेम आहे तुला त्या मैत्रिणीच की काही झाल की तिच्याकडे राहायला जातेस? आणि हल्ली जरा वेगळीच वागतेस... काहीतरी झालंय आणि ते तू सांगत नाहियेस...''

''अ... अ!'' पूजाकडे द्यायला उत्तर नव्हतं... आणि तिला काही उत्तर सुचतही नव्हतं... तिने मान खाली घातली...

''बोल पूजा...'' आईनी पूजाला दटावलं...

''आई, चिडू नकोस! मैत्रिणीकडे आम्ही एकत्र भेटतो आणि...'' पूजा थोडी रडवेली झाली...

''आणि काय बोल पटापट! कोण एकत्र भेटता? नीट सांग पूजा... मला काही कळतंच नाहीये...'' पूजाची आई अधीर झाली.

''तू चिडणार नाहीस अस सांग आधी.''

''ते बघू नंतर... आधी तू सांग! कुणाकडे जातेस... कोणाबरोबरं असतेस आणि काय करत असतेस?''

''आमच्या डान्स ग्रुप मधला एक मुलगा मला आवडायला लागलाय... आम्ही रोज रात्री मैत्रिणीच्या घरी भेटतो... मैत्रीण एकटीच असते सो तिला काही प्रॉब्लेम नसतो... तिच्या ४ रूम्स आहेत सो.''

''तुला कोणी आवडत तर आम्हाला सांगायचं... आम्ही काय नाही म्हणालो असतो का? सांगून भेटायचं की... आणि मैत्रिणीकडे ४ खोल्या आहेत म्हणजे? नीट सांग आणि पटापट सांग... उगाच वेळ दवडू नकोस...''

''आम्ही मिठ्या मारतो... लाडीगोडीत बोलते... तुम्हाला आवडेल? नाही... मला माहिती होतं म्हणूनच मला लपून भेटावं लागत होतं त्याला... मला इतकी मोकळीक दिली असती तुम्ही? पण माझं चुकलं गं आई...''

''मुद्याचं बोल... पुढे सांग!''

''आई, गेल्या काही महिन्यात आम्ही खूप म्हणजे खूप जवळ आलो... आणि मी प्रेग्नन्सी टेस्ट करून पहिली! आय ॲम प्रेग्नंट!'' हे बोलतांना पूजा रडवेली झाली आणि मटकन खालीच बसली. तिच्या आईने तिचं बोलणं ऐकलं आणि ती एकदम स्तब्ध झाली... पण मन खंबीर करून बोलायला लागली.

''काय? काय बोलती आहेस तू पूजा? आर यु इन युअर सेन्सेस?'' आई खूप चिडली... तिला पूजाच्या मुस्काडीत मारावीशी वाटली पण तिने कंट्रोल केला...

''हो गं आई... झाली चूक माझ्याकडून! नाही राहिला माझा स्वतःच्या भावनांवर कंट्रोल!'' पूजा रडत रडत बोलत होती. ''हे तुम्हाला कसं सांगणार होते मी? माझीच मला लाज वाटतीये आता'' रडू आवरत पूजा बोलली.

''पूजा... मी तुला सारखं बजावत होते... पण तू माझ्याकडे लक्ष दिलच नाहीस... आणि सगळं झाल्यावरही तू का बोलली नाहीस काहीच?? आपण इतक्या मोकळ्या बोलायचो की नेहमी...''

''हो आई... पण मला कळलं नाही हे तुला कस सांगू?'' रडतच पूजा बोलली.

''शांत हो पूजा... आता काय करायचं ठरवलं आहेस? चूक

तुझी आणि ह्या चुकीचे पडसाद... मला विचार करून सुद्धा भीती वाटतीये... आपला समाज...'' आई एकदम शांत झाली पण पुढच्या क्षणी ती बोलली, ''निर्णय तुझा असेल पूजा... तुला आम्ही इतकं खंबीर बनवलं आहे की तू तुझे निर्णय स्वतः घेऊ शकशील...''

''माहित नाही आई... मला खरंच कळलं नाही माझ्या हातून इतकी मोठी चूक कशी झाली...''

''आता ठीके पूजा... झालंय आणि ते बदलू शकत नाही. आपण मार्ग शोधू! तुझ्या मित्राला सांगितलस? तो हो म्हणाला तर आपण कोर्ट मॅरेज करून टाकू...''

''त्याला सांगितलं... पण मला नाही वाटत तो लग्नाला तयार होईल...''

''म्हणजे काय? लग्नाला तयार होणार नाही चा अर्थ काय?''

''आई मी त्याला फोन लावला... त्यानी फोन उचलला... मी त्याला सगळं सांगितलं पण त्या क्षणी त्यानी फोन बंद केला... परत फोन लावला तेव्हा म्हणाला, अबॉर्शन करून टाक! म्हणजे काय अर्थ घेशील तू? त्याला कोणतीही जबाबदारी नकोय... त्यांनी फक्त टाईमपास केला आणि मी मूर्ख होते...'' पूजा थोडी शांत झाली.

''म्हणजे त्यानी फक्त तुझ्याबरोबर टाइम पास केला... मी तुला सांगितलं होतं, कोणाशीही अशी मैत्री वाढवू नकोस... तेव्हा तू हो हि म्हणत होतीस... पण...''

''आई काय करू आता... माझ्या हातून चूक झाली आणि मला ती मान्य आहे...'' पूजाला रडू आवरता आलं नाही... आणि ती परत रडायला लागली.

''काय करणारेस आता सांग... अबॉर्शन करून टाकायचं?''

''मी अबॉर्शन करणार नाहीये गं... अबॉर्शन कारण म्हणजे खून करण्यासारखाच आहे... आणि काही झालं तरी हे माझं बाळ आहे...'' पूजा खंबीरपणे बोलली.

''मग?''

''मग काय... मी ह्या बाळाला जन्म देणारे... मी खूप विचार केलाय... आणि मगच ह्या निर्णयावर पोहचले आहे... आणि समाज वगैरे च मला सांगू नकोस... प्लीज.''

''बरं तू बाळाला जन्म दिलास... पण पुढे कायं? तुझ्या लग्नाचं काय? त्यातही प्रोब्लेम्स येतील... तू आयुष्यभर एकटीच राहणार कां? निर्णय तुझे... आम्ही साथ देऊ पण तुला नीट विचार करून निर्णय घ्यायचा आहे.''

''मे बी... मी एकटी राहीन... आणि निर्णय झालाय... कोणी मला आणि माझ्या बाळाला ॲक्सेप्ट केलं तर ठीक नाहीतर मी एकटी बाळाला वाढवू शकते... तितकी क्षमता आहे माझ्यात...''

''तू ठरवलं आहेस म्हणजे करशील ह्याची मला खात्री आहे... आणि खर सांगू? आय ॲम प्राउड ऑफ यु पूजा... हा निर्णय इतका सोप्पा नाहीये... पण तू असा निर्णय घेतलास... आणि तू खूप सिरिअस वाटते आहेस... तू बाळाला जन्म दे... मी आहे तुझ्याबरोबरं! आणि मी बाबांना समजून सांगेन. तेही तुझ्या निर्णयात तुझी साथ देतील.''

''थँक्यू आई... आणि सॉरी! मी लपवून ठेवायला नको होतं सगळं तुझ्यापासून... मला वाटलेलं तू माझ्यावर खूप चिडशील... पण तू माझा निर्णय स्वीकारलास... तुझ्यासारखी आई मिळाली हे माझं भाग्याच समजते मी...''

''चल पूजा... आता यू स्लीप फॉर सम टाइम... तुला बराच ताण आला असेल! आणि अश्या दिवसात अजिबात ताण घ्यायचा नाही... मन फ्रेश ठेव! आपल्याला हेल्दी हवंय बाळ!''

''येस आई... पडते जरा वेळ... तुझ्याशी बोलून मोकळ वाटतंय...''

इतक बोलून पूजा झोपायला गेली.

काही महिन्यातच तिने एका गोंडस बाळाला जन्म दिला... तिने तिच्या निर्णयावर ठाम राहत बाळाला पोटातच मारून टाकल नाही ह्याच तिला समाधान होतं... अश्याच एका वळणावर तिला रोहित भेटला... तो खूप समंजस होता... त्यानी बाळासकट पूजाला आपलंस केलं... नंतर दोघांचा सुखी संसार चालू झाला...

स्त्री नेहमीच खंबीर असते... तिच्या आयुष्यात चुका होतात पण तिचा एक बरोबर निर्णय नेहमीच गरजेचा असतो.

***

आर. आर. विट उत्पादक
आर. आर. सर्व्हिस स्टेशन
अंबिका चौक देवी मंदीर, कोपरगांव
जि. अ. नगर - ४२३६०१.
मो. ९८२२६२५०६६, ९३२६५४८०००, ९२७२७३८००९



विनायक गायकवाड
अध्यक्ष : कोपरगांव शहर भाजपा
चेअरमन : पद्मश्री विठ्ठलराव विखे पाटील पतसंस्था
चेअरमन : कोपरगांव तालुका विट उत्पादक सहकारी संस्था
जिल्हा अध्यक्ष : कुंभार समाज (अ. नगर)



चि. शुभम विनायक गायकवाड
१२ वी कॉमर्स



श्री. सुदाम गायकवाड
मो. : ९८२२७३८३१६

जादू शब्दांची

– अलका दिलीप कुमठेकर

सगळेच म्हणतात. शब्द शस्त्र आहे त्याला धार असते. चूकीचे शब्द नाती तोडतात. मन दुखवतात म्हणूनच ते जपून वापरावेत. तरीपण शब्द हे मनात रुजणारे, उदास मन फुलवणारे, दुखऱ्या मनाला उभारी आणणारेही असतात अशा औषधी गुणांच्या शब्दांचा मला खूप छान अनुभव आला.

२००१ साली माझ्या पतीने व्ही.आर.एस. घेऊन नोकरी सोडली. व्ही.आर.एस मधून फार काही पैसे मिळाले नाहीत. थोड्याच दिवसात आर्थिक अडचणी जाणवू लागल्या. अशा आडनीड वयात बाहेर कुठे काम मिळणार होते. त्याच दरम्यान नेव्हीमधून निवृत्त झालेला माझा भाचा श्री. प्रसाद मधुकर बागडे आम्हाला नेहमीसारखा भेटायला आला. गप्पांच्या ओघात माझी परिस्थिती त्याच्या लक्षात आली. तो अगदी सहज बोलून गेला, ''मावशी, काही काळजी करू नकोस, माणसाच्या अंगात प्रचंड ताकत असते आणि काम करावयास लागले की, ती आपोआप वापरली जाते.'' तो निघून गेला. पण त्याच्या या वाक्याचा डोस पुरता मनात घर करून बसला. त्या दिवशी पूर्ण वेळ, आपल्या शक्तीनुसार आपल्याला काय करता येईल याचा विचार करू लागले. शिवणकाम करत होते पण मशिनवर बसून सायटीकाचा त्रास सुरू झाला होता. त्यामुळे ते करता येणार नव्हते. डोक्यात घरगुती खानावळ सुरु करण्याचे विचार घोळू लागले आमच्या घरासमोरच्या घरात कॉलेजच्या तीन मुली रहात होत्या. त्या मुली जेवणासाठी थोड्या लांब जात होत्या त्यांना जवळच जेवण मिळणार म्हणून बरे वाटले पण मध्येच अशी अगोदरची मेस सोडता येणार नव्हती, पण त्यांना कॉलेजला जाण्या अगोदर नाश्ता पाहिजे होता. तो देण्याचे मी कबूल केले. अन् माझ्या नवीन व्यवसायाचा श्री गणेशा झाला.

त्या मुलींना नाश्ता देत होते. काही दिवसातच त्या मुली म्हणू लागल्या, ''आम्हाला दोन्ही वेळचे जेवणही दया.'' थोड्याच दिवसांत माझ्या घरगुती खानावळीत बऱ्यापैकी मेंबर वाढू लागले

माझ्या घरगुती खानावळीची सुरुवात अशी झाली. हळूहळू पैशाच्या अडचणी कमी होऊ लागल्या. आम्ही दोघेच नवरा बायको खानावळीचे काम बघत असू. मुलगा–मुलगी कॉलेज क्लास अभ्यास सांभाळून मदत करत असत. जवळ जवळ चौदा वर्ष ही घरगुती खानावाळ चालवली. सर्व काम अतिशय प्रामाणिकपणे केले. खानावळीत येणाऱ्या मुलांना जास्तीत जास्त चांगले देण्याचा प्रयत्न असायचा. या कामाच्या खूप चांगल्या आठवणी मनात आहेत. पहाटे साडेपाचला सुरु झालेले काम रात्री बारा साडेबारापर्यंत सुरु असायचे. आता शांत–निवांत बसले तर मनात विचार येतातच, की त्यावेळी आपण एवढे काम कसे काय केले? प्रसाद म्हटल्या प्रमाणे, माणसाच्या अंगात प्रचंड शक्ती असते, अन् वेळ आली की ती आपोआप वापरली जाते. याप्रमाणेच हे घडले असावे. त्यावेळी इतरांचीही खूप मदत झाली. गॅस एकच होता तो संपल्यावर शेजारून आणायचा. भाजीवाले चाचा दर कमी लावायचे. कोणती भाजी येत नसेल तर शेजारची मैत्रीण कल्पना ती भाजी सांगायची किंवा करूनच दयायची. त्यावेळी ही मदत खूप लाखमोलाची असायची. खरंतर ही जादू प्रसादच्या शब्दांची होती. आमच्या हताश झालेल्या मनाला त्याने उभारी दिली होती. अशा सकारात्मक विचाराने आमची परिस्थिती रोकी होती.

आई बत्तीस वर्षाची असताना आमचे वडील गेले. आम्ही चार भावंडे यांची जबाबदारी पार पाडताना आईची ओढाताण होत आहे ते पाहुन मोठ्या भावाने घरची जबाबदारी अगदी लहान वयात अंगावर घेतली. असे आदर्श डोळ्यासमोर होते. माझी वहिनी सुगरण होतीच वेळीवेळी यांचे मिळालेले मार्गदर्शन मोलाचे ठरले.

असे हे शब्दच कोणत्याही परिस्थितीत मदत करतात, उपयोगी पडतात. कोणाला काही दयावयाचे असेल तर उमेदीचे सकारात्मक शब्द दयावेत आपण सहज म्हणून जातो. आज वातावरण किती प्रसन्न आहे, तर समोरच्याला पण तसेच प्रसन्न वातावरण वाटू लागते. घरात म्हटले, आज खूप कंटाळा आला आहे, तर खरंच, सर्व घर कंटाळून जाते. घरातील सर्वांनाच कंटाळा आल्याप्रमाणे वाटू लागते. खरं तर रागवल्यावर कोणी छान दिसते का? पण समोरची व्यक्ती रागवलेली असताना तिला म्हटले की, तू रागवल्यावर खुप छान दिसतेस हं, मग काय, तिचा राग कुठल्या कुठे पळून जातो. लहान मुलाला म्हटले की, तुझे अक्षर खूप छान आहे तर तो अजून छान अक्षर काढण्याचा प्रयत्न करतो. असे सकारत्मक शब्द मनाची ताकत वाढवतात.

शब्द न वापरताही शब्दाची ताकद वाढत जाते ती म्हणजे मौन रहाणे. पण मौन राहून समस्या वाढत जाते. ती सुटत मात्र नाही. त्यावरील उपाय म्हणजे, मौन सोडून देणे, एकमेकांच्या मनात काही अढी असल्यास, गैरसमज असल्यास ते काढून टाकण्यासाठी सकारात्मक शब्दांचाच आधार घ्यावा लागतो. डोक्यात अन् मनात गैरसमज, काही आढी असल्यास त्याची घाण साठत गेल्यास नात्यात दुरावा निर्माण होऊ शकतो. त्यामुळेच वेळोवेळी अशा सकारात्मक शब्दांचा आधार घेऊन, कोणास न दुखवता ही घाण काढून टाकावी. स्वच्छ मनाने आणि सकारात्मक विचाराने नाती जपावीत.

***

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

इंदौर मे अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ राष्ट्रीय कार्यकारीणी सभा संपन्न। राष्ट्रीय अध्यक्ष पद पर सतिशजी कुंकळेकर तथा महासचिव पद पर मनोज प्रजापती सर्व सहमती से अविरोध चुने गये।



सभास्थान पर पधारे राष्ट्रीय अध्यक्ष आर.बी.के. प्रजापती तथा मुख्य नेताओंका वाद्योंसे स्वागत किया गया ।



श्रीयादेवी माता का पूजन करते हुए आर.बी.के.प्रजापती, सतिशजी कुंकळेकर, मनोज प्रजापती व मान्यवर



श्रीयादेवी माता की आरती करते हुए सोमाभाई प्रजापती, साहू, लुणचंद सिनावाडीया, भवरलाल पॉटर व मान्यवर



महासंघके राष्ट्रीय ट्रेझरर भैरुलाल प्रजापती आय व्यय का हिसाब देतेहुए समवेत महासंघ के मंचासीन पदाधिकारी



महासंघ के राष्ट्रीय महासचिव सी.ए.मनोज प्रजापती अपने विचार रखते हुए, समवेत महासंघ के मंचासीन वरीष्ठ पदाधिकारी.



दिवंगत आत्माओंको श्रद्धांजली अर्पित करते हुए राष्ट्रीय कार्यकारीणी सभाके सदस्य तथा नेतागण.



महासंघके राष्ट्रीय कार्यकारीणी सभा को उपस्थित सदस्य तथा पदाधिकारी



महासंघ के नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष सतिशजी कुंकळेकर तथा मुख्य महासचिव मनोज प्रजापती .



नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष सतीशजी कुकळेकर सभा के समक्ष अपने विचार व्यक्त करते हुए.



महासंघ की ओर से सतीशजी कुंकळेकर तथा मनोज प्रजापती का अभिनंदन करते हुए आर.बी.के. प्रजापती एवं मुख्य पदाधिकारी



महासंघ के वरीष्ठ पदाधिकारीयों के समवेत सतिशजी कुंकळेकर तथा मनोज प्रजापती

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

संत शिरोमणी गोरोबाकाका समाजसेवा संस्था नेहरुनगर, पिंपरी पुणे यांचा वर्धापन दिन सोहळा दिमाखात संपन्न.



माजी महापौर हनुमंतराव भोसले उर्फ आण्णा यांना संस्थेतर्फे समाजरत्न पुरस्कार संजय राजे यांचे हस्ते प्रदान. समवेत प्रतिभाताई ओव्हाळे, माजी महापौर वैशालीताई घोडेकर, डॉ.कैलास कदम, सतिश परबते व पदाधिकारी



आदर्श सरपंच वैशालीताई दत्ताराम साळवी यांना समाजगौरव पुरस्कार प्रदान हस्ते संजय राजे समवेत तुकाराम परबते, काशीराम साळवी, माजी महापौर हनुमंतराव भोसले व पदाधिकारी



गोरोबाकाका मंदिराचे निर्माण करण्यामध्ये सिंहाचावाटा असणारे कै.पांडुरंग शेठ परबते यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विद्यार्थ्यांचा गौरव करताना त्यांच्या पत्नी श्रीमती अलकाताई पांडुरंग परबते समवेत मान्यवर.



विद्यार्थ्यांचा गौरव करताना संस्थेचे नवनिर्वाचित अध्यक्ष तुकाराम परबते समवेत मान्यवर.



सुप्रसिद्ध शाहिर गुरुराज कुंभार यांनी संत गोरोबाकाकांचा सुंदर पोवाडा सादर केल्याबद्दल त्यांचा व त्यांच्या सहकार्याचा सत्कार करताना संजय राजे समवेत रघुनाथ कुंभार, संतोष कुंभार, हनुमंतराव भोसले, हेमंत खटावकर, वैशाली घोडेकर



वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमास मोठ्या प्रमाणात महिला भगिनी उपस्थित होत्या कार्यक्रमाची सांगता हळदी कुंकू समारंभाने झाली. कार्यक्रमानंतर रुचकर भोजनाची व्यवस्था संस्थेने केली होती.



धुळे : शिरपुर येथील उद्योजक सुभाष कुंभार यांची पुतणी डॉ.कु.गायत्री अशोक कुंभार प्रथम श्रेणीत एम.बी.बी.एस. परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार करताना रतीलाल कुंभार, गोकुळ कुंभार, किशोर कुंभार समवेत सौ.सरीता व सुभाष कुंभार



वसई : वसई नालासोपारा कुंभार समाज मंडळातर्फे सौ.व श्री.डॉ.यशवंत कुंभार यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना मान्यवर



धाराशिव :श्री क्षेत्र तेर येथे संत गोरोबा काका यांच्या जन्मस्थानी उभारलेल्या भव्य वाड्यासमोर सातारकर बंधु आणि भगिनींची सदिच्छा भेट. या आध्यत्मिक सहलीचे आयोजन नवरंग कुंभार, चंद्रकांत कुंभार व पदाधिकाऱ्यांनी केले होते.



डॉ अमोल कुंभार
जनरल फिजिशियन
M.D.(Ayu)
Reg.No. I-51336-A
Mob. 9730025568

कुंभार हॉस्पिटल
तळमावले
उपलब्ध सुविधा

१) ॲडमिटची सोय
२) वाफारा (नेब्युलायझेशन)
३) रक्तातील साखर तपासणी(BSL)
४) हृदयरोग तपासणी (ECG)
२) वजन लावणे (Traction)
३) पल्स ऑक्सिमीटर



डॉ सौ.शुभांगी अ.कुंभार
B.A.M.S. फॅमिली फिजिशियन
Reg.No. I-72620-A
Mob.: 8412972228

खालील आजारांवर उपचार सुविधा

१.हृदयरोग २. मधुमेह ३.पक्षाघात ४.दमा ५.टी.बी. व छातीविकार ६.टायफॉईड ७.मलेरीया ८.डेंग्यू ९.अतिसार १०. कावीळ ११. पोट व पचनाचे विकार १२. लिव्हर संबंधित विकार १३. अल्कोहोलिझम(व्यसन) १४.मुळव्याध, भगंदर इ. १५. त्वचाविकार १६. मुतखडा १७. स्त्रीरोग, गरोदर माता.



प्रोप्रा. चि.किशोरकुमार घटकार
(B.Pharm.) मो.नं.८९८३७५२६४७

सानवी मेडिकल, तळमावले
वांगव्हॅली भवन, ढेबेवाडी-कराड रोड, तळमावले

क्षणचित्रे







नाशिक : १. ममदापुर ता.येवला येथील पॉट मेकर्स इंडिया लि.कंपनीमध्ये कुंभार कारागिरांना प्रशिक्षण कार्यक्रम प्रसंगी गोरोबाकाकांचे प्रतिमा पुजन करताना दत्तात्रय कुंभार, संदिप सोनवणे समवेत रंगनाथ सुर्यवंशी व पदाधिकारी. २. कारागिरांच्या स्वयंचलित चाकांचे पुजन मान्यवरांच्या हस्ते संपन्न. ३. उपस्थित कारागिरांचा संस्थेतर्फे सन्मान करताना संचालक ज्ञानेश्वर भागवत समवेत नंदूशेठ सोनवणे, रंगनाथ सुर्यवंशी व कंपनीचे अध्यक्ष दत्तात्रय कुंभार डाळजकर.



पुणे : दिगंबर उर्फ राहुल घोडनदीकर यांच्या स्टँडर्ड इंडस्ट्रीज कंपनीमध्ये रामनवमी उत्साहात साजरी झाली.





१. सातारा जिल्हा वधुवर मेळाव्याचे प्रसंगी संत गोरोबाकाकांचे प्रतिमा पुजन करताना शामशेठ राजे, बाळासाहेब कुंभार, आर.आर. कुंभार, संदीप कुंभार, अध्यक्ष भरत कुंभार, चंद्रकांत कुंभार, भाग्यवंत कुंभार व मान्यवर २. ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते आर.आर.कुंभार यांच्या पंच्याहत्तरी निमित्त विशेष सन्मान करताना विकास संस्थेचे प्रदेशाध्यक्ष शामशेठ राजे व बाळासाहेब कुंभार



नवी मुंबई : गंगाधर देवडे यांची पोलीस निरीक्षक पदी पदोन्नती



देहुगाव : ॲड.रंगनाथ जोरुळे यांची नोटरीपदी निवड



आशिष आनंदराव कुंभार यांची दुय्यम निबंधक या पदावर निवड



देवराष्ट्रे उपसरपंचपदी दगडू शामराव कुंभार यांची बिनविरोध निवड



दिल्ली : सेंन्ट्रल बॉयलर बोर्डच्या सचिव तथा तांत्रिक सल्लागार पदाचा पदभार सदानंद कुंभार यांनी नुकताच स्विकारला.



रामेश्वर व्यंकटी कानगुले यांची चिखलभोशी ता.कंधारच्या पोलीस पाटील पदी निवड



गणेश विठ्ठलराव बाभुळगावकर यांची ॲक्सेस बँक मुंबई येथे व्हाईस प्रसिडेंट(आय.टी) पदी निवड



सुपे : प्राजक्ता मतिमंद शाळेचे संचालक जयराम कुंभार यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर समाज भुषण पुरस्कार जाहिर



धुळे : शिरपुर येथील उद्योजक सुभाष कुंभार यांचा मुलगा डॉ.राजपाल सु.चव्हाण एम.डी.रेडीऑलॉजी परीक्षा उत्तीर्ण झाला. समवेत वडील सुभाष कुंभार व आई सरीता कुंभार.

क्षणचित्रे



नाशिक : रिक्षात राहिलेले बारा तोळे सोने प्रामाणिकपणे परत करणारे रिक्षा चालक राहुल अशोक सुके(कुंभार) यांचा पोलिस अधिकाऱ्यांतर्फे सत्कार



मुंबई : विद्यानिकेतन शाळेत मराठी भाषा गौरव दिनानिमित्त पुस्तक प्रदर्शनाचे उद्घाटन करताना नगरसेवक अशाके पटेल समवेत शाळेचे सचिव विजय मांडळकर, मुख्याध्यापिका प्रविणा वाडेकर व मान्यवर



पुरंदरचे आमदार संजय जगताप व सासवडचे ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेशराव कुंभार व सहकाऱ्यांनी केली काशी, रामेश्वर, कन्याकुमारी यात्रा



पुणे : हेमंत चव्हाण यांची वाशीम येथे कार्यकारी अभियंता पदी पदोन्नती झाल्याबद्दल सत्कार करताना धनश्री लिमये, दिपगौरी जोशी, निवेदिता वाणी, रोहिणी ठाणेकर, प्रियांका व अनुसया



पुणे : कोकणस्थ कुंभार ग्रामविकास संघ पिंपरी संस्थेच्या रौप्य महोत्सवी वर्धापन दिनानिमित्त कार्यक्रमाचे अध्यक्ष केंद्रिय बाष्पक मंडळाचे तांत्रिक सल्लागार संदिप कुंभार यांचा सत्कार करताना कोंडीराम साळवी, अजय साळवी व पदाधिकारी तसेच संदिप कुंभार यांच्या सुविद्य पत्नी शुभांगी कुंभार यांचा सत्कार करताना शुभांगी सुनिल साळवी समवेत उमेश काजुळकर व संदिप कुंभार



गजानन ढाणेगावकर याची पी.डब्लू.डी. इंजिनियरपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना शिवानंद लिंगायत, शिवाजी पिंपळे, समवेत गजानन यांचे कुटुंबिय



शिरपुर : किशोर कुंभार यांची शिरपुर भाजप धुळे जिल्हा युवा अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना रतिलाल कुंभार, सुभाष कुंभार व शिरपुर तालुका कुंभार समाजाचे पदाधिकारी



पुणे : अहमदनगर येथील सामाजिक कार्यकर्ते व सुप्रसिद्ध आर्किटेक्ट संतोष राजापुरे यांचा कुंभश्री मित्र परिवार व समस्त कुंभार समाजातर्फे सत्कार करताना संपादक संजय राजे समवेत चि.वीर प्रकाश राजे.



जळगाव : बहिणाबाई चौधरी विद्यापिठाच्या उपकुलसचिव पदावर सिताराम बच्छाव यांची निवड झाल्याबद्दल पत्र प्रदान करताना मान्यवर.



सांगली : श्री रामजन्मभुमी अयोध्या येथे रांगोळी काढणारे संदिप कुंभार राहाणार कादे ता.शिराळा यांचा कुंभार समाज सांगली जि.अध्यक्ष रमेश कुंभार यांच्या हस्ते सन्मान, त्यांच्या कर्तृत्वाला मानाचा मुजरा.



लातुर : राज्य स्तरीय कुस्ती स्पर्धेत प्रांजली राजाराम कुंभार हिला कास्यपदक. प्रांजली ही मुंबई येथे फिजिओथेरीपीच्या दुसऱ्या वर्षात शिकत असुन मुंबई विद्यापिठाचे सुवर्ण पदक मिळवले आहे. ती कुस्ती महर्षी भाऊसाहेब कुंभार यांची नात आहे.

क्षणचित्रे



नाशिक : चि.सौ.कां.अनुष्का शरदराव आहेर व चि.ओम संजयराव रुईकर यांच्या शुभविवाहा प्रसंगी उपस्थित रमाकांत क्षीरसागर, वसंत घोडनदीकर, सोमनाथ सोनवणे, डॉ.दिलीप मेनकर व पदाधिकारी



पुणे : अकोले येथील अभिनव ऐज्युकेशन सोसायटीच्या अध्यक्षपदी सुरेश कोते यांची झालेली निवड धर्मादाय आयुक्तानी वैध असल्याचा निकाल दिल्याबद्दल अभिनंदन करताना सतीशदादा, मंगळकर, घोडनदीकर, चांदेकर, प्रकाश व नारायण कुंभार



पुणे : आयकर आयुक्त अभिनय कुंभार यांचा सत्कार करताना दिपक उर्फ आबा शिरवळकर, सुरेश कुंभार, निवृत्त पी.आय पी.बी.कुंभार, निवृत्त उपअभियंता जी.डी.कुंभार व शशांक कुंभार



सटाणा : उद्योजक बापुसाहेब गोरे यांच्या निवासस्थानी सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष सतिशदादा दरेकर यांचा सन्मान समवेत अनंत कुंभार वसंत घोडनदीकर, सोमनाथ सोनावणे, राहुकर, रामदास धायरीकर व मान्यवर



अहमदनगर : कोपरगाव येथील गोरोबाकाका मंदिरास पुन्हा एकदा दहा लाख रुपये निधी मंजुर केल्याचे पत्र मा.आमदार अशुतोषदादा काळे यांचे हस्ते अध्यक्ष विनायक शेठ गायकवाड यांना प्रदान समवेत मच्छिंद्र ईश्वरे, दिलीप जोर्वेकर व पदाधिकारी



गुजरात : जामनगरमे वरीया प्रजापती समाज सामुदायीक विवाह में चोबीस जोडोंका विवाह वसंत पंचमी के दिन संपन्न.



शिर्डी : रयत शिक्षण संस्था साताराचे प्रभारी कुलगुरु विजय कुंभार यांचा सत्कार करताना हॉटेल साई संगमचे संचालक सुनिल सोनावणे व सामाजिक कार्यकर्ते बाळासाहेब दुधाळे.



चाळीसगाव : सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष सतिशदादा दरेकर ह्यांचा सत्कार करताना करंळकाळ सर, भगवान सुर्यवशी, अशोक वाघ, राजन चित्ते, सुभाष पगारे, शालिक कुंभार समवेत वसंत घोडनदीकर, अनंत कुंभार राहुकर व पदाधिकारी



कोल्हापुर : कोतोली येथे वास्तुशांती निमीत्त आदर्श शिक्षक सौ व श्री.अशोक कुंभार यांना शुभेच्छा तसेच त्यांचे वडील मारुती कुंभार यांच्या ब्यानव्या वाढदिवसा निमित्त कुंभश्री परीवारातर्फे शुभेच्छा देताना संजय राजे समवेत डॉ.सुखदेव, सौ.व श्री.महादेव कुंभार



पुणे : सुप्रसिद्ध आर्कीटेक्ट मंगेशराव सोनवणे व राष्ट्रवादी काँग्रसचे पुणे जिल्हा उपाध्यक्ष संतोषशेठ पाषाणकर यांचा सत्कार हस्ते आर्कीटेक्ट सागर कुंभार, संजय राजे व प्रकाश राजे.



पुणे : सुप्रसिद्ध आर्कीटेक्ट सागर संजय कुंभार(उंब्रज) यांच्या नुतन आत्याधुनिक ऑफिसमध्ये सत्कार करताना संजय राजे, चि.वीर राजे, सौ.रश्मी सागर कुंभार व कु.रमा सागर कुंभार



पुणे : उद्योजक विजयराव कुंभार यांनी चेन्नई येथे प्लायडील नावाचे प्लायवुडचे मोठे शोरुम उघडून व्यापारामध्ये उत्कृष्ट यश मिळवले आहे त्याबद्दल त्यांचा सत्कार करताना संजय राजे समवेत त्यांचे जावई उद्योजक संतोष कुंभार

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



M.P. Malaiyrasan D.
Kallahurichi Constituency
Tamilnadu (DMK)
कुंभार समाजाचे एकमेव खासदार



सिंगापूर – लोकमत ग्लोबल इकॉनॉमिक कन्व्हेन्शन कार्यक्रमाचे दिप प्रज्वलन करताना उद्योजक नितिन भागवत समवेत डॉ.विजय दर्डा, आचार्य लोकेश मुनी व मान्यवर



सिंगापूर – लोकमत ग्लोबल ट्रेलब्रेझर अवॉर्ड नोबेल कास्ट कॉम प्रा.लि. कंपनीचे अध्यक्ष नितिन भागवत यांना प्रदान



पुणे : शिल्पकार सौ.सीमा विजय शिर्के खेडकर अश्वारुढ शिवाजी महाराजांच्या पुतळ्यावर अखेरचा हात फिरवताना सीमा या कुंभार समाजातील एकमेव महिला शिल्पकार आहेत.



अमरावती : सावित्रीबाई फुले स्मृतिदिनानिमित्त कर्तृत्ववान महिलांचा यथायोग्य सन्मान करुन त्यांना मनोगत व्यक्त करण्याची संधी देण्यात आली.



अमरावती : महिला मंडळाच्या वतीने हुन्नर २०२४ सांस्कृतिक व स्नेह मिलन सोहळा संपन्न या कार्यक्रमात विविध स्पर्धा घेण्यात आल्या याप्रसंगी उपस्थित महिला अध्यक्ष प्रभाताई भागवत, सौ.सरीता खोबरे, गोकर्णा, सविता कोल्हे व महिला पदाधिकारी



सोलापूर : निवासी उपजिल्हाधिकारी मनीषाताई कुंभार यांचा महिलादिना निमित्त सन्मान करताना डावीकडून पुष्पा बळवंत कुंभार, मिनाक्षी रामदास कुंभार समवेत बळवंत उर्फ बाळासाहेब कुंभार.



पुणे : नवनिर्वाचित सोलापुर जिल्हा निवासी उपजिल्हाधिकारी मनीषाताई कुंभार यांचा सत्कार करताना कुंभश्री संचालिका बीना राजे समवेत रोहित खिरोडे, डॉ.कल्पना राजे खिरोडे, संजय राजे, वीर राजे, प्रिशा, सुरेखा व अण्णासाहेब कुंभार



नाशिक : कुंभार समाज उन्नती मंडळ नाशिक तर्फे महिला दिनानिमित्त संत गोरोबा काका प्रतिमेचे पुजन करुन विविध उपक्रमाने साजरा. यावेळी डॉ. सुचेता पावसकर यांनी महिलांच्या आरोग्य विषयक समस्यावर मार्गदर्शन केले.



पुणे : नेहरुनगर येथील संत गोरोबाकाका मंदिर येथे कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या अध्यक्षा अरुणाताई कुंभार यंच्या नेतृत्वाखाली महिला दिन विविध उपक्रमाने साजरा, कार्यक्रमास उपस्थित महिला भगिनी



नाशिक : नवयुवक कुंभार समाज विकास संस्थेतर्फे महिला दिन विविध उपक्रमांनी साजरा केला महिला दिन. सौ.प्रमिला लक्ष्मिकांत शिंदे, अंजली गायकवाड व सोशल मिडीया अध्यक्ष अशोक गायकवाड यांनी कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी परीश्रम घेतले.



सांगली : कु.पुजा राजाराम कुंभार हिचे विक्रीकर निरीक्षक पदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना सांगली जिल्हा कुंभार समाज अध्यक्ष रमेश कुंभार समवेत पुजाचे कुटुंबिय



बारामती : सुप्रसिद्ध उद्योजक डॉ.कांचन उदय कुंभार (डाळजकर) यांना महिला दिना निमीत्त कॉसमॉस बँकेतर्फे आदिशक्ती पुरस्कार प्रदान समवेत उद्योजक उदय दत्तात्रय कुंभार डाळजकर, कॉसमॉस बँकेचे संचालक व अधिकारी वर्ग



पुणे : कुंभश्री मोबाईल ॲपचा लोकार्पण सोहळा संपन्न हस्ते उद्योजक नितीन भागवत समवेत नरेंद्र कुंभार, संजय राजे, उद्योजक सचिन कुंभार, सुरभी राजे बीना राजे व प्रकाश संजय राजे.



मुंबई : अर्थसंकल्पामध्ये संत गोरोबा काका मातीकला मंडळास भरघोस निधीची तरतूद केल्याबद्दल अर्थमंत्री ना.अजितदादा पवार यांचा सन्मान करताना सामाजिक संस्थेचे प्रदेशध्यक्ष सतिशदाद दरेकर, खजिनदार अनंत कुंभार, विकास संस्थेचे प्रदेशाध्यक्ष शामशेठ राजे व पदाधिकारी

क्षणचित्रे





धाराशिवःश्री.क्षेत्र तेर येथे अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या प्रदेशाध्यक्षपदी ज्ञानेश्वर भागवत, कार्याध्यक्षपदी बळवंत कुंभार व रामदास कुंभार तसेच महिला प्रदेशाध्यक्षपदी सौ. किर्तीमाला महादेव खटावकर यांची निवड झाल्याबद्दल अभिनंदन करताना, विश्वनाथ कोळमकर, राजेंद्र सवांदे, संतोष पाषाणकर, रंगनाथ सुर्यवंशी, ज्ञानेश्वर भागवत, सोमनाथ सोनवणे, मोहन जगदाळे, दिपकमहाराज खरात, माजी अध्यक्ष शामशेठ राजे, सौ.किर्तीमाला व महादेव खटावकर, बळवंत कुंभार, रामदास कुंभार, भगवान श्रीमंदीलकर, नथूशेठ कुंभार, गुलाब महाराज कुंभार व मान्यवर



कोटा : दुसरीबार लोकसभा अध्यक्ष ओमप्रकाश बिर्ला का अभिनंदन करते हुए नदलाल प्रजापती, जगन, तुलसीराम, किशोर, जगदीश व डॉ.राजेश प्रजापती.



डॉ.नागोराव कुंभार यांना फुले आंबेडकर साहित्य पुरस्कार सपत्नीक प्रदान हस्ते शरदचंद्र पवार समवेत मा.खा.श्रीनिवास पाटील व मान्यवर.



दिल्ली : विश्वकर्मा योजनेबाबत विकास आयुक्त मंत्रालय यांना निवेदन देताना दत्ताभाऊ कुंभार



पैठण : शककर्ता राजा शालिवाहन जयंती निमित्त विजय स्तंभावर अभिवादन करताना नागनाथ कुंभार, मोहन जगदाळे, सुर्यकांत घोडके, सुनिल रोकडे व पदाधिकारी



नाशिक : विकास संस्थेच्या प्रदेशअध्यक्ष पदी निवड झाल्याबद्दल ज्ञानेश्वर भागवत यांचे अभिनंदन करताना सोमनाथ सोनवणे, रमाकांत क्षीरसागर, अशोक जाधव, सुभाष कुंभार व मान्यवर



जुन्नर : जुन्नर महा ई सेवा केंद्र, आपले सरकार सेवा केंद्र व आधार केंद्र संघटनेच्या तालुका अध्यक्षपदी ॲड.संजय उकिर्डे यांच्या निवडी बद्दल सत्कार.



फलटण : अध्यक्ष शिक्षक बाळकृष्ण कुंभार निवृत्त झाल्याबद्दल त्यांचा सपत्नीक सत्कार करताना सुप्रसिद्ध नेत्ररोगतज्ञ डॉ.विकास कुंभार समवेत रघुनाथ व धनाजी कुंभार



डॉ.प्रणव अरुण कुंभार एम.बी.बी.एस उत्तीर्ण झाल्याबद्दल सुयोगनगर कराड येथे त्यांचे अभिनंदन करताना मान्यवर



येवला तालुका अध्यक्ष व उद्योजक राजेंद्र रोकडे यांचे पुत्र राहुल व चि.सौ.कां. सोनाली संदीप गायकवाड यांचा शुभविवाह थाटामाटात संपन्न.

क्षणचित्रे



जामखेड ते श्रीक्षेत्र तेर दिंडी सोहळ्याच्या मिरवणूक प्रसंगी उपस्थित पंढरीनाथ महाराज, मधुकर महाराज, जठार काका, प्रा.ज्ञानदेव कुंभार, विनायक विठ्ठलराव राऊत, बबनराव गोरे, महादेव खटावकर व मान्यवर



नागपुर : संत गोरोबाकाका पुण्यतिथी निमित्त अभिवादन करताना जेष्ठ नेते नरेश जुगेले समवेत उपस्थित बंधु भगिनी



जम्मू : विकास संस्थेचे उपाध्यक्ष किसनशेठ काळे यांची जम्मू येथील गोरोबाकाका मंदिरास शुभेच्छा भेट समवेत जम्मू काश्मीर प्रदेशाध्यक्ष आयोध्या प्रसाद मनावा व मान्यवर



कोपरगाव : संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या पुण्यतिथी निमीत्त भव्य शोभा यात्रेत सहभागी नगरजिल्हा अध्यक्ष तथा कोपरगाव तालुका अध्यक्ष विनायक शेठ गायकवाड व तालुका पदाधिकारी तसेच यात्रेमध्ये अनेक संत महंत, बंधु भगिनी, अबाल वृद्ध यांनी प्रचंड उत्साहात सहभाग घेतला.



अमरावती : मौजे येनकी ता.उदगीर या ठिकाणी समाजातील अल्पवयीन मुलीवर झालेल्या बलात्काराबाबत आरोपींना फाशी द्यावी अशी मागणी मुख्य मंत्र्यांच्याकडे सकल ओबीसी समन्वय समिती द्वारे जिल्हा अधिकाऱ्यांना करण्यात आली यावेळी उपस्थित बंधु भगिनी



पलूस : शककर्ता राजा शालिवाहन जयंती निमित्त अभिवादन करताना माजी सरपंच बाळासाहेब कुंभार, प्रभाकर माळी, विजय फल्ले, मधुकर कुंभार व मान्यवर



इंदापूर : संतगोरोबा काका पुण्यतिथी निमित्त अभिवादन करताना भाजपा ओबीसी मोर्च्याचे प्रदेशाध्यक्ष संजयराव गाते समवेत उपस्थित समाज बांधव



वसई : कामण येथील गोरोबाकाका मंदिरामध्ये पुण्यतिथी निमित्त उपस्थित वासुदेव कामणकर, प्रदिप हरमळकर, सुरशे गुरुजी व मान्यवर



नाशिक : अभोणा येथे गोरोबाकाका पुण्यतिथी निमित्त आरती करताना नाशिक जिल्हाध्यक्ष सौ.व श्री.सोमनाथशेठ सोनवणे समवेत उपस्थित बंधुभगिनी.



अकोला: संतगोरोबा काका पुण्यतिथी निमित्त अभिवादन करताना प्रा.दिलीप आप्तुरकर, जेष्ठ नेते नाना सौदागर ॲड.अरुण सौदागर, तळोकार, कोल्हे व मान्यवर



रत्नागिरी : पावस कुंभारवाडी येथील गोरोबाकाका मंदिरास डॉ.विजय कमळे नवी मुंबई यांचे कडून मुर्ती सप्रेम भेट ही सुंदर मुर्ती शिल्पकार संतोष चौलकर यांनी साकारलेली आहे.

आई गुगलचे इंजिन

-रत्नाकर वाणी, पुणे

''ए ताई माझा काळा पेन दिसला का गं तुला'' विजयने वृंदा ताईला विचारले.

''नाही रे'' वृंदाने नकारार्थी उत्तर दिले.

''अगं काल सबमिशनचे काम होते ते झाल्यावर येथेच ठेवला होता.'' विजय म्हणाला.

''अरे मग असेल तिथेच कोठेतरी जाणार कोठे? नीट बघितलस का? टेबलाच्या ड्रॉवरमध्ये'' वृंदाने सुचविले. विजयने टेबलाचा ड्रॉवर उघडला, तर डायरी खाली त्याचा काळा पेन लपलेला दिसला. एखाद्या शास्त्रज्ञाला फार मोठा शोध लागावा व आनंदाच्या भरात युरेका ऽ युरेका ऽ असे म्हणत नाचावे ओरडावे तद्वत तो वृंदा ताईला म्हणाला– ''सापडला ऽ सापडला ऽ'' पण यावर त्याचे समाधान झाले नाही. तो वृंदाला चिडवित व तिच्यावर खोटा आक्षेप घेत म्हणाला, ''तुला गं कसे माहिती? तूच लपविला असशील. नाहीतर एवढे अचूक कसे सांगितले.''

''वा रे! बावळ्या, स्वतःच स्वतःच्या वस्तू इकडे तिकडे ठेवायच्या आणि नाही आठवल्या तर आहेच आई आणि ताई शोधून द्यायला.'' वृंदा फुशारकी मारीत म्हणाली, ''ए जास्त फुशारक्या मारू नकोस हं. तु तरी काय करतेस गं? माझ्यासारखे आईलाच तर विचारतेस, ''आई माझा निळा स्कार्फ सापडत नाही. माझी थिअरीची वही सापडत नाहीय. वगैरे वगैरे'' विजय तिच्या फुशारकीची हवा काढीत म्हणाला. वृंदा वैतागून म्हणाली, ''बरं बरं नको शहाणपणा दाखवू जास्तीचा''

वृंदा व विजय यांच्यातील संवाद ऐकून आई वैशाली, पदराला हात पुसतच बाहेर आली दोघांना दटावित दटावणीच्या सूरात म्हणाली, ''काय रे काय भांडण चाललय आपसात? जरा शांत राहता येत नाही का तुम्हाला?'' आईच्या रागावण्याने दोघे क्षणभर शांत झाले पण शांत बसेल ती वृंदा कसली हळूच दबक्या आवाजात आईसमोर आपली कैफियत मांडू लागली. ''अगं, त्याचा काळा पेन सापडत नव्हता मी त्याला टेबलाच्या ड्रॉवरमध्ये असेल असे सहजच म्हटले आणि तेथे मिळाला. तर हा शहाणा म्हणतो कसा, ''तूच तेथे ठेवला असशील?'' वैशाली दोघांना समजावणीच्या सूरात म्हणाली, ''बरं! बरं! असू दे. तुमच्या बाबांच्या सकट सगळ्यांच्या खोडया मला माहीत आहेत. स्वतःच्या वस्तू नीट कधी जागेवर ठेवायच्या नाहीत आणि वेळेवर सापडल्या नाही म्हणजे ओरडा करायचा.''

वृंदा म्हणाली, ''आई, आमचे सर म्हणतात, गुगल आहे तर माहिती तंत्रज्ञान आहे. गुगल आहे तर सर्व काही आहे. अन् गुगल नसते तर काहीच नसते. माहिती तंत्रज्ञान पण नसते. कोणत्याही प्रकारची माहिती किंवा जगातील कोणतेही शहर, त्याचा नकाशा, तेथे जाण्याचा मार्ग किंवा तेथील भौगोलिक परिस्थितीची माहिती मिळाली नसती. इंटरनेटवर गुगल टाइप करून गुगल उघडून गुगलच्या इंजिन द्वारे शोध घेऊन काही क्षणात अनेक पर्याय आपल्या समोर मांडले जातात. त्यातील योग्य तो पर्याय निवडून, आपण त्या ठिकाणाची माहिती घेऊन गरज पूर्ण होऊ शकते. खर सांगू आई! तू या आपल्या छोटयाशा घरातले गुगलचे इंजिन आहेस.'' वैशाली तिला मध्येच अडवित म्हणाली, ''ते कसे काय गं?'' वृंदा खुलासा करती झाली. ''अग हे बघ! बाबांना हात रूमाल, डायरी, चाव्या सापडत नाहीत, लगेच तू शोधून देणार. आपल्या विज्याला पेन, पायमोजे, क्रीकेटचा बॉल, टेनिसची बॅट सापडत नाही. लगेच तू शोधून देणार. आजीला स्वयंपाक घरात वेलची पूड, मिरचीचा डबा, लवंगा काही सापडल्या नाहीत लगेच तू शोधून देणार.''

विजय मध्येच तिला अडवित म्हणाला, ''आणि ए शहाणे तुझा स्कार्फ, मेकअपचा डबा, पर्समधल्या स्वतःच्या वस्तू मोबाईल चार्जर पण आईच शोधून देते ना! ते कधी सांगणार.''

''अरे हो रे बावळ्या'' असे म्हणत शोध वस्तूंची यादी पूर्ण करीत वृंदा पुढे बोलती झाली, ''दोन दिवसापूर्वीचा पेपर, किराणा दुकानदाराची वाण सामानाची वही, सुई दोरा वगैरे घरातल्या सुई दोऱ्या सकट छोटया मोठ्या वस्तू कोठे आहेत याची माहिती तू क्षणात कशी गं देतेस? कसे जमते गं तुला हे सारे? खरंच तु महान आहेस तुला घराचे गुगल इंजिन म्हणावयास काहीच हरकत नाही.'' वृंदाने आपले म्हणणे एक मोठा श्वास घेत संपविले. ''ए. चल काही तरीच काय बोलतेस.'' आई लटक्या स्वरात म्हणाली.

असा माय लेकरांचा संवाद चालू असतानाच आजी हॉलमध्ये प्रवेश करती झाली. ''काय चाललय माय लेकरांच? कसल्या वस्तूंची यादी करताय? कोणत्या गहन विषयावर एवढा काथ्याकूट चाललाय? मला अडाणीला तरी कळू देत जरा'' आजी म्हणाली.

''अगं आजी, ही आपली हुषार वृंदाताई आहे ना, ती आईला गुगलचे इंजिन म्हणते'' विजयने खुलासा केला.

''इंजिन म्हणजे रूळावर धावणारे, आगगाडीचे डबे ओढून नेणारे रेल्वेचे इंजिन कां?'' आजीने भोळ्या भाबडया स्वभावाने प्रश्न केला.

''अगं हो इंजिनच, पण रेल्वेचे नाही, गुगलचे. अगं! आजकालच्या इंटरनेटच्या जमान्यात गुगल एक माहिती तंत्रज्ञानातील सेवा देणारी कंपनी आहे. जिथे आपणास पाहिजे असणारी सर्व काही माहिती काही क्षणात मिळते. ते शोधून देणारे त्याला गुगलचे सर्च इंजिन म्हणतात.'' विजय खुलासा करता झाला.

''बरं बरं राहू दे तुझे ज्ञान तुझ्याजवळ एवढी माहिती आहे मला. मी काही एवढी अडाणी नाही. तुमची आजी आहे म्हटलं.'' आजी म्हणाली. आजी पुढे खुलासा करती झाली. ''ते कोठले का असेना इंजिन आहे खरंय. तू वृंदा, मी आणि बाबा आपले पंचकोनी कुटुंब तसेच सासर माहेरची सर्व नातेवाईक मंडळी या इंजिनाला जोडलेले डबे आहेत. या सर्वांच्या आवडी–निवडी, त्यांची मने सांभाळीत या संसार रूपी रूळावरून जोरात धावते आहे. संसारात कितीही अडचणी व सुख दुःखे रूपी चढ–उतार, डोंगर–दऱ्या, छोटेमोठे पूल आलेत तरी न डगमगता, कंटाळा अथवा किट किट न करता हसत मुखाने पार करीत हा संसाराचा गाडा ओढते आहे. रोज सकाळी लवकर उठून सर्वांचा चहा नाश्ता, तुमचे डबे, दुपारचे व रात्रीची जेवणे, घरातील पसारा आवरून तुम्ही इतस्ततः ठेवेलेल्या, पडलेल्या वस्तू आवरून जागेवर ठेवणे. त्याशिवाय का तुम्हाला तुमच्या वस्तू वेळेवर मिळतात. एवढेच नव्हे तर दिवसभर घरातली कामे सांभाळून आल्या गेल्या पाहुण्याची सरबराई पण तीच करते. सकाळी उठल्यापासून रात्री झोपेपर्यंत आपली

स्वत:ची प्रकृती सांभाळत सदैव कामात असते. लग्नानंतर प्रत्येक स्त्रीला या भूमिकेतून जावे लागते. जी स्त्री हे सर्व यशस्वीरित्या करू शकते तीच खरी स्त्री व तिचेच जीवन सार्थकी ठरते.''

आजीचा खुलासा संपत नाही तोच खोडसाळ वृंदा विजयला चिडवित म्हणाली, ''ए बावळ्या समजले का आता?''

कॉलेजला जाण्याची वेळ झाली असून सुध्दा जाता जाता विजयने टीव्ही चालू केला. ते पाहून वैशालीताई जराशा लटक्या रागानेच विजूवर ओरडल्या, ''आता कॉलेजला जाणार आहेस की टीव्हीवर मॅच बघत बसणार आहेस?'' ''कॉलेजलाच जाणार आहे पण नाणेफेक कोणी जिंकली व फलंदाजी कोण करतंय एवढेच पाहायच आहे.'' विजू आपली बाजू मांडीत म्हणाला. एवढयात घरातून विनायकरावांनी आवाज दिला. ''वैशाली, ए वैशाली – मला ऑफिसला जायला उशीर होतोय.''

आवाजाच्या दिशेने तोंड फिरवित नेमकी गरज अजमावित वैशाली तत्परतेने म्हणाली, ''होय, आलेऽ आलेऽ. तुमचा आजचा ड्रेस, टाय, चाव्या आणि डायरी लाकडी कपाटात वरून दुसऱ्या रकान्यात ठेवलेत.'' वैशाली आत जाणार त्याच वेळी विजयने मागूनच तिला पाठमोरी हाक दिली. ''एऽ आई.'' त्याच्या हाकेला प्रतिसाद देत आतमध्ये जाता जाता ती म्हणाली, ''अरे हो रे! मला माहित आहे तुझा पॉकेटमनी संपलाय ते. घेते मागून बाबांकडून.''

आजी आणि वृंदा दोघी जणी आईची चाललेली धावपळ व तारेवरची कसरत पाहत होत्या. वृंदा विजयला सुचवित म्हणाली, ''समजलं मी आईला गुगलचे इंजिन का म्हणाले ते. तुझ्या व बाबांच्या हाके सरशी तिने न सांगता तुमच्या गरजा ओळखल्या व तत्क्षणी पूर्ण केल्या. 'त' म्हणजे 'ताक' ओळखणारी माझी आई आहेच मुळी गुगलचे इंजिन. त्यापेक्षा चपळ, तत्पर व बिरबलासारखी हजरजबाबी.''

''ए शहाणे त्याला शहाणपणाचे डोस पाजत बसू नको. अपचन होईल. जा घरात जा आईला कामामध्ये थोडीफार मदत कर. हे इंजिन काम करून थकले तर तुमची आमची सर्वांचीच पंचाईत होईल. सर्वांच्या गरजा आवडी निवडी सांभाळून घरचे व बाहेरच सांभाळायचे सोपे काम नाही. लक्षात ठेव! तुला पण इंजिनाच्या भूमिकेतून जायचे आहे.'' आजी वृंदाला थोडयाशा दरडावणी व उपदेशात्मक स्वरात म्हणाली.

वृंदा आजीची आज्ञा शिरसावंद्य मानीत घरात गेली. आईला घरकामात थोडीशी मदत करीत बाबांना आणि विजूला हसत निरोप दिला. बाबा व विजू गेल्यावर सासू, सून आणि नातीने बनविलेल्या स्वयंपाकावर गप्पा गोष्टी व हसी मजा करीत यथेच्छ भोजनावर ताव मारला. जेवण होते न होते तोच ''ए वृंदे, संध्याकाळी चहाबरोबर नाश्ता आणि रात्रीच्या जेवणासाठी काय बनवायचे गं? त्याप्रमाणे भाज्या आणून तयारीला लागले पाहिजे.'' वैशालीने चिंतात्मक स्वरात विचारले.

''अगं सूनबाई, झोप आता जरा निवांत थोडावेळ. थोडासा आराम कर. संध्याकाळचे संध्याकाळी आम्ही बघू. वृंदा आणि मी जाईन बाजारात भाजी आणायला. येताना देवळात पण जाऊन येईन. संध्याकाळच्या चिंतेची डोक्यावरची टांगती तलवार तात्पूरती बाजूला ठेऊनच वैशाली नामक इंजिन बेडमध्ये निद्राधीन झाले.

***

प्रेरणास्थान



बी. एम. धुमाळ



श्री. गणेश धुमाळ

जय गणेश मेडिकल

अँड जनरल स्टोअर्स केमिस्ट अँड ड्रगिस्ट

साई मेडिकल

गंगाई चेंबर्स, पहिला मजला, मेन रोड, आकुर्डी, पुणे ४११ ०३५.

प्रोप्रा. गणेश बबनराव धुमाळ

कुंटे कॉम्प्लेक्स, मारूती मंदिराजवळ, मेनरोड, आकुर्डी, पुणे-३५. मो. 9011561919



गणेश आर्टस्

आमचेकडे सर्वांग सुंदर गणेशमुर्ती होलसेल भावात मिळतील

श्रीराम मंगल कार्यालय

मु.पो. काशीळ, पुणे-बेंगलोर हायवे, ता. जि. सातारा.



जयवंत रामचंद्र कुंभार

संचालक

मो. ९८२२०५६३२४

अजिंक्यतारा सहकारी साखर कारखाना सातारा



वसंत रामचंद्र कुंभार

मा. पंचायत समिती सदस्य सातारा

मो. ९८५०४१८२२५

वात्सल्यसिंधू आई

– सौ. मनीषा आवेकर, वडगाव बुद्रुक, पुणे.



आई ह्या दोन शब्दांत माया, ममता, वात्सल्य, प्रेम सर्व काही सामावलेले आहे.

आईसाठी तिचे बाळ हे सर्वस्व असते. खरेतर बाळाचा भार ती नऊ महिने वाहते. जन्माआधीपासूनच ती खाणे, चालणे ह्याची बंधने पाळत असते. एवढेच काय, गरोदरपणात तिचे खरे असले तरी, ती कोणाला पटवून द्यायच्या फंदात पडत नाही कारण भांडण विकोपाला गेले तर त्याचा त्रास बाळाला होईल अशी तिला भीती वाटते. एखाद्या स्त्रीला पहिल्या महिन्यापासूनच संपूर्ण विश्रांती सांगितली असेल तर, ती क्षणाचाही विचार न करता, नोकरीमधे रजा घेते. तिच्या दृष्टीने बाळ ही सर्वात महत्वाची गोष्ट असते.

माझ्या एका मैत्रिणीला मधुमेह असल्यामुळे पहिले बाळ पोटातच गेले. नंतर चान्स घेऊ नका असे डॉ. नी सांगूनही तिने एकच नाही तर दोन चान्स घेतले. सुदैवाने दोन्हीही मुली अगदी व्यवस्थित आहेत. अशावेळी तिच्या निर्णयक्षमतेचे कौतुक करावेसे वाटते. बाळ होण्याची तिची आस इतकी जबरदस्त असते की ती त्यासाठी स्वतःच्या जीवावरही उदार होऊ शकते. एवढे करुनही ती म्हणते, ''तुझ्यामुळे मी झाले आई, बाळा होऊ कशी उतराई!!''

बाळ झाल्यावर तिला परमानंद होतो. त्याला ती जीवापाड जपते. त्याचे हसणे, खेळणे, रांगणे तिला स्वर्गसुख देते. प्रत्येक आई घरी राहून हा आनंद उपभोगू शकत नाही कारण तिला नोकरीवर जायचे असते, ''घार हिंडते आकाशी चित्त तिचे पिल्लापाशी'' हे अगदी खरे आहे. बाळ घरी असेल तर, ती घरच्यांना फोन करुन खुशाली विचारते. आता बाळाचे पाळणाघरातले व्हिडिओ आईला whatsapp वर बघायला मिळतात. त्यात ती समाधान मानते.

ज्यांच्या नशिबी दुर्दैवाने आई होण्याचे भाग्य नसते, त्या मूल दत्तक घेऊन, त्याच्यावर यशोदेप्रमाणे प्रेम करतात.

आईचे प्रेम निःस्वार्थी असते. निरपेक्ष असते. ती मुलाकडून कोणतीही अपेक्षा ठेवत नाही. तन, मन, धन अर्पून ती मुलाला लहानाचे मोठे करते. त्याला उच्च शिक्षण मिळावे म्हणून ती जीवाचे रान करते. आपली सगळी चैन, मौजमजा सोडून ती मुलाला वाढवते. हे ती बोलण्या–वागण्यातून अजिबात जाणवून देत नाही. हे आपले परम कर्तव्य आहे असेच ती समजते. मुलाला नुसतेच शिक्षण देत नाही तर, त्याच्यावर संस्कारही करते. ते संस्कार मुलाला आयुष्यभर कुकर्मापासून, अनीतीपासून लांब ठेवतात.

मुलाचे शिक्षण पूर्ण झाल्यावर तिला परमानंद होतो. त्याला चांगली नोकरी लागून, तो तिथे स्थिरस्थावर झाल्यावर, तिला हिमालयाची एक पायरी चढल्याचे समाधान मिळते. तिचे सर्व कष्ट सार्थकी लागल्यासारखे वाटतात. परदेशगमनाची संधी आली तर, पूर्वीचा छोटा फ्लॅट, गावाकडची शेती विकून त्याला परदेशी पाठवते. त्याने परदेशी मुलीशी लग्न केले तर, तिला धक्का बसतो. ती खरेतर दुखावतेही, पण ते सर्व ती अंतरी ठेवून, ''अहो त्याला आवडली आहे ना!! मग बास!! आता आपले काय चाळीस गेलेत अन् चार राहिलेत'' असे म्हणून नवऱ्याची समजूत काढते. मुलाला बोलावून घेऊन नव्या नवरीचे लक्ष्मीप्रमाणे मोठ्या मनाने स्वागत करते. तिला सांभाळून घेते कारण आपला मुलगा आनंदी असावा, ही तिची जन्मजन्मांतरीची आस असते.

आईचे मन विशाल असते. आभाळाचा कागद, वृक्षांची लेखणी आणि सागराची शाई केली तरी, तिची महानता लिहिता येणार नाही. तडजोड करुन, दुसऱ्याला आनंद देण्यातच तिला आनंद लाभतो. मुलगा परदेशात स्थायिक झाला तर, खरेतर ती इथला आधार गमावत असते, पण इतरांशी बोलताना, ती त्याचे कौतुकच सांगत असते. त्याचवेळी इथल्या अडचणींवर दुर्गेप्रमाणे मात करते. नवऱ्याने मुलाबद्दल नाराजी व्यक्त केली तरी ''आपण आहोत ना एकमेकांना'' असे म्हणून गोड बोलून नवऱ्याची समजूत काढते.

''कुपुत्रो जायेत् क्वचिदपि, कुमाता न भवेत् कदापि'' असे संस्कृत सुभाषितकारांनी म्हटले आहे. ते अगदी खरे आहे. तिची सहनशीलता, सोशिकता अपार आहे. मुलाने वृद्धाश्रमात टाकले, तरी तो जबरदस्त घाव, ती प्रारब्ध म्हणून स्विकारते आणि नवऱ्यालाही स्विकारायला शिकवते. मुलगा, सून भेटायला आले तरी, आला क्षण आनंदाने जगावा ह्या न्यायाने त्यांची खुशाली विचारुन, नातवंडांच्या गप्पांमधे रममाण होते. किती विशाल असते तिचे मन!! केवढी ही क्षमाशीलता!! ईश्वराने तिला घडवताना एवढे सारे सद्गुण ठासून भरले आहेत, म्हणूनच ही दुनिया चालली आहे.

काही मुले आईवडीलांना विचारत नसली तरी, सर्वच काही तशी नाहीत. काही प्रेमळ मुले रोजच्या व्यस्त जीवनातही आईवडीलांची रोज विचारपूस करुन, त्यांच्यासाठी वेळ देत आहेत. त्यांच्याबरोबर राहून त्यांना आधार देत आहेत. आपल्या मुलांसमोर चांगला आदर्श ठेवत आहेत, ही खरोखरीच समाधानकारक गोष्ट आहे.

आईचे प्रेम दीर्घकाळ लाभणे ही भाग्याची गोष्ट आहे. आपले अपत्य साठीचे झालेले बघणे ही आईसाठीही खूप भाग्याची गोष्ट आहे. ते भाग्य आम्हांला लाभले ही प्रभूकृपाच!! मृत्यूनंतरही ती माझ्या स्वप्नात येते ह्यावरुन तिचा जीव किती मुलांच्यात अडकलेला असतो ते समजते. म्हणूनच तिचा गौरव करताना म्हणावेसे वाटते–

आई कसे तुझे मी
गुण वर्णू सांग ना
ती मालिकाच मोठी
शब्दांमधे माईना !!

***

नुसतं माझा धर्म भारी आणि माझी जात भारी म्हणून चालत नसत

बाहेरून आलेल्या पारसींनी पुण्यात हॉस्पिटल्स उभारली आणि अख्खं गाव जगवलं.

मुळचे पर्शियाचे म्हणून त्यांना आपण पारसी म्हणतो. पर्शिया म्हणजे आजचे इराण. तिथेच झोराष्ट्रीयन हा समाज जन्माला आला. या धर्माला हजारो वर्षांची परंपरा आहे. पण हे पारसी भारतात कसे आले याची एक कथा सांगितली जाते. अस म्हणतात की शेकडो वर्षापूर्वी मुस्लीम अरब टोळ्यांनी पर्शियावर आक्रमण केले. धर्मांतर करू लागले. जुलमी आक्रमकांना तोंड देण्याएवढी ताकद या झोराष्ट्रीयन समाजाकडे नव्हती. यातूनच मोठ्या प्रमाणात स्थलांतर होऊ लागले.

अशीच एक जहाजात भरून निघालेल्या पारशी कुटुंबांची नौका गुजरातला नवसारी इथल्या किनाऱ्यावर येऊन पोहचली. तिथल्या राजा समोर त्यांना उभं करण्यात आलं. त्यांचा म्हातारा प्रमुख समोर आला. राजाला व त्याला एकमेकांची भाषा येत नव्हती. राजाने एक दुधाने काठोकाठ भरलेला पेला मागवला आणि त्या पर्शियन लोकांच्या प्रमुखाला सुचवलं की आमचा देश असा काठोकाठ भरलेला आहे आता आम्हाला आणखी माणसे नकोत. तेव्हा तो पारसी माणूस हसला. त्याने त्या दुधात थोडासा मध टाकला. त्याचा अर्थ होता की आम्ही इथे दुधात मध मिसळल्या प्रमाणे राहू व या देशाची गोडी वाढवू. राजा खुश झाला. त्याने पारसी लोकांना भारतात राहण्याची परवानगी दिली.

पारसी लोक बुद्धिमान होते, उद्यमी होते. ते गुजरात बाहेर पडले, देशभर पसरले. इथल्या मातीशी एकरूप झाले. ब्रिटीश भारतात आले तेव्हा पारसी लोकांनी त्यांची भाषा शिकून घेतली. याचा त्यांना प्रचंड फायदा झाला. ब्रिटीशांच्या मुंबईसारख्या महानगरात त्यांनी बस्तान बसवलं. आधुनिक शिक्षणपद्धतीचा स्वीकार केला. अनेक पारसी कुटुंबांनी आपल नाव कमवल. पैसा कमावला.

पण पारसी फक्त पैशांच्या मागे लागलेले नव्हते. हजारो वर्षांपूर्वी आपल्यावर झालेला अन्याय, हालअपेष्टा ते विसरले नाहीत. आपल्या इतिहासाची जाणीव ठेवली त्यामुळे जिथे जातील तिथे आपल्या कमाईतला वाटा समाजाला काही तरी देण्यासाठी वापरला.

पुण्यात ब्रिटीशांनी लष्करी छावणी उभारली तेव्हा त्यांच्या मदतीसाठी इंग्रजी भाषा जाणनारे स्थानिक कर्मचारी लागणार होते. त्यांनी उच्चशिक्षित पारसी लोकांना पुण्यात आणलं. बऱ्यापैकी कॅम्पच्या भागात हे पारसी वसले. इथले आल्हाददायक हवामान त्यांना मानवल.

त्यामुळे अनेक पारसी कुटुंबांनी आपले बिऱ्हाड पुण्यात कायमच हलवलं. पारसीप्रमाणेच आपला देश सोडून परागंदा झालेले बगदादचे ज्यू डेव्हिड ससून हे देखील भारतात आले होते. व्यापारात त्यांनी व त्यांचे पारसी पार्टनर जमशेदजी जीभॉय यांनी प्रचंड पैसा कमावला होता. यातूनच पुण्यात पहिले हॉस्पिटल उभे राहिले. त्याला त्यांचे नाव देण्यात आले, डेव्हिड ससून रुग्णालय.

पुण्यात १८६७ साली डेव्हिड ससून रुग्णालय उभे राहिले. हे हॉस्पिटल उभे राहत असताना एक पारसी उद्योजक बैरामजी जीजीभोय हे मुंबईहून पुण्याला आले होते. त्यांनी मुंबईत अनेक शिक्षण संस्था उभारल्या होत्या. जीजीभोय यांनी पुण्यात ससून रुग्णालयाच्या शेजारी एक छोट वैद्यकीय प्रशिक्षण केंद्र उभ केलं. त्याला त्यांचच नाव देण्यात आलं.

१८७१ साली स्थापन झालेलं हे वैद्यकीय प्रशिक्षण केंद्र पुढे जाऊन पुण्याचे सुप्रसिद्ध बी.जे. मेडिकल कॉलेज बनलं. एकोणिसाव्या शतकात पुण्याला प्लेग सारख्या रोगराईने चांगलंच सतवलं होत. इंग्रजांच्या राज्यात पुण्यात आरोग्य सेवा म्हणाव्या तशा सुधारलेल्या नव्हत्या. अजूनही लोक वैद्य, हकीम यांच्यावर अवलंबून असायचे. ससून सोडले तर मोठे रुग्णालय नव्हते.

याकाळात छोटी छोटी पारसी रुग्णालये उभी राहत होती. असाच एक दवाखाना चालवणाऱ्या एडलजी कोयाजी यांनी एक हॉस्पिटल बांधायचं ठरवलं. पारसी समाजातील उद्योगपती पुढे आले. वाडियांनी त्यांना पैशांची मदत केली. तर सर कोवासजी जहांगीर व लेडी हिराबाई या दांपत्याने जागा दिली अत्याधुनिक हॉस्पिटल उभारून दिल. या हॉस्पिटलला त्यांच्या मुलाचं जहांगीरच नाव देण्यात आलं. १९४६ साली त्या काळच्या सर्वोत्तम सेवा सर्वसामान्य रुग्णांना अत्यल्प दरात उपलब्ध करून देण्याचा जहांगीर हॉस्पिटलमध्ये प्रयत्न करण्यात आला होता.

याच जहांगीर हॉस्पिटलमध्ये हृदयरोगावर उपचार करायला केकी बैरामजी हे सुप्रसिद्ध डॉक्टर होते. त्यांनी अमेरिकेतून हृदयरोगावरील विशेष उपचाराचा प्रशिक्षण घेतलं होतं. पण तिथेच स्थायिक होण्याऐवजी आपल्या मूळ गावी पुण्याला परत आले. जहांगीर हॉस्पिटलमध्ये त्यांचे काही कारणांनी एडलजी कोवासजी यांच्याशी मतभेद झाले. यामुळे केकी बैरामजी यांनी स्वतःच फक्त चार खाटांच एक हॉस्पिटल सुरु केलं. त्यावेळच्या गव्हर्नरने त्यांना जागा दिली होती. या गव्हर्नरच्या बायकोच्या स्मरणार्थ हॉस्पिटलचं नाव रुबी हॉल क्लिनिक असे करण्यात आले. एकेकाळी ४ बेडचे हॉस्पिटल पुढे जाऊन ७५० बेडचे पुण्यातले सर्वात अत्याधुनिक रुग्णालय बनले.

अशीच कथा केईएमची.

पुण्याच्या रास्ता पेठेत सरदार मुदलियार यांचं एक छोट प्रसूतीगृह होतं. सर्वसामान्य गरीब रुग्णांचा आधार असलेले हे हॉस्पिटल चालवणे सरदार मुदलियार यांना अवघड चालले होते. त्यांनी जहांगीर हॉस्पिटलच्या एडलजी कोयाजी यांना एखादा तज्ञ डॉक्टर व चांगला प्रशासक मिळवून देण्याची मागणी केली. त्यावेळी एडलजी यांनी प्रसूतीशास्त्रात उच्च पदवी घेतलेल्या आपल्या वहिनीकडे म्हणजेच बानू कोयाजी यांच्याकडे ही जबाबदारी दिली.

काही महिन्यांसाठी लक्ष द्यायचं म्हणून डॉ. बानू कोयाजी यांनी ही जबाबदारी उचलली खरी मात्र केईएम हे पुढच्या आयुष्यभराच हे मिशन बनलं. बानू कोयाजी यांनी केईएमचा कार्यक्षेत्र पुण्याच्या ग्रामीण भागापर्यंत वाढवल. त्यांचं कार्य फक्त वैद्यकीय सेवेपुरत मर्यादित राहिलं नाही तर कुटुंब नियोजनासारखे समाजहिताचे कार्यक्रम जनजागृती अशा अनेक उपक्रमांची जोड दिली. डॉ. बानू कोयाजी हे पुणेकरांसाठी एक आदराच आणि आपलेपणाचं नाव बनलं.

आजही ही जहांगीर पासून ते केईएमपर्यंत अनेक रुग्णालये पुण्यात तितक्याच कार्यक्षमतेने कार्य करत आहेत. वेळोवेळी येणाऱ्या संकटात मेडिकल इमर्जन्सीमध्ये या हॉस्पिटलनी पुण्याला जगवल आहे.

सायरस पूनावाला यांच्यासारखे उद्योगपती औषधनिर्मितीच्या क्षेत्रात जगभरात ओळखले जातात. प्रत्येक समाज पिढ्यानपिढ्या आपापल्या परंपरा जपत असतो पण पुण्याच्या पारसींनी वैद्यकीय क्षेत्रात छाप पाडून एक वेगळीच ओळख निर्माण केली एक अजरामर पायंडा पाडला.

टिप : माझाच धर्म श्रेष्ठ म्हणून माणसं जगत नसतात...

प्रत्येक धर्मियांचा आदर हेच भारतीयत्व... Live Let Live

रतन टाटा, आदर पुनावाला, डॉ. बानू कोयाजी, डॉ. ग्रँट... होमी भाभा अशा अनेक पारसी धर्मियांनी देशासाठी सर्वस्व अर्पण करुन भारताचा नावलौकिक वाढवला आहे. आणि कोणत्याही जाती धर्माचा द्वेष हे महान लोक करत नाहीत... बघा जमलं तर विचार करा.

***

बरेच लोक मुंबई येथे वैद्यकीय उपचारासाठी जातात.
ही उपयुक्त माहिती आहे. कृपया ते जतन करा.

डीमार्ट – डी मार्ट चे प्रमोटर राधाकिशन दमानी यांनी गोपाळ हवेली येथे ए मेट्रो सिनेमा क्लीन्स रोड मुंबई जवळ एक सुविधा बांधली असून मुंबईत उपचार घेत असलेल्या रूग्णांच्या कुटुंबीयांसाठी रुम्स ५३ खोल्या आहेत. काल त्याचे उद्घाटन झाले. हे खूप छान केले गेले आहे. हितचिंतकांच्या अशा कोणत्याही वास्तविक गरजेचा उल्लेख केला जाऊ शकतो.

पत्ता : गोपाळ हवेली, ५०, क्लीन रोड (सिनेमा लेन) मेट्रो सिनेमा जवळ, मुंबई – ४०००२०

संपर्काची माहिती : व्हॉट्सॲप ॲप्लिकेशन.

मोबाईल : +९१ ८८७९९८६८९३

ई–मेल : fdgpalmansion.com, gmgpalmansion.com

दूरध्वनी क्रमांक : ०२२ २२०५५००१/०२

www.gpalmansion.com

दर खूप वाजवी आहेत. न्याहारी – ३०, लंच प्लेट – ७५, डिनर प्लेट – ७५. ८०० खोल्या, स्वयंपाकघर आणि जेवणाचे खूप प्रशस्त. कृपया व्यापकपणे सामायिक करा.

मुंबईत आप्त नातेवाईक असल्यास पी.एल. ही माहिती प्रत्येकासह सामायिक करा. आम्ही रुग्णांना आणि नातेवाईकांना विनामूल्य टिफिन प्रदान करतो. क्षेत्र – दक्षिण मुंबई

हॉस्पिटल्स : जसलोक, सैफी, बॉम्बे, नायर, जेजे, मुंबई सेंट्रल जवळ आणि व्हीटी.

संपर्काची माहिती : आपण आम्हाला व्हॉट्सॲप देखील करू शकता. ✲ कल्पेश लोढा – ९९६७२३६००६, ✲ मनोज पटवारी – ९८२०६४५०७०, ✲ अमृत जैन – ९०२९३७३७५१

कमीतकमी अशा लोकांसह पुढे जा जे अग्रेषित करुन इतरांना मदत करू शकतील. आर. के. घरगुती वैद्यकीय उपकरणे चॅरिटेबल ट्रस्टने सुरू केली आहेत. व्हीलचेअर, सक्शन मशीन, वॉटरबेड, एअरबेड, वापरण्यास विनामूल्य (परताव्यायोग्य ठेवीसह)

संपर्क व्यक्ती : ✲ संजय शाह – ९३२२५१६६२८, ✲ चिंतन पांड्या – ७६६६३११९४२

जोडा : १७–डी, निसारगा उपट, आयडीबीआय बँक जवळ, महावीर नगर, कांदिवली पश्चिम मुंबई ६७ ६७

साई वल्यात्री साक्षरता पॉलीक्लिनिक, कंबर दरबार शांतीलाल मोदी रोड, भुराभाई हॉल समोर, कांदिवली (प.), मुंबई.

टी : ०२२६५८११६४४, ०२२२८६५९६१५

www.kambardarbar.org

दिवसाची वेळ :

१. सामान्य ओपीडी – रु. १/– केवळ औषधांसह

दररोज सकाळी ११.३० आणि संध्याकाळी ४.३०

२. एक्स–रे – रु. १००/– दररोज ९ ते ५–०० वाजता

३. ईसीजी – रु. ७०/– दररोज ९.०० ते सकाळी ११.००

४. पॅथॉलॉजी अत्यधिक अनुदानित दर.

केवळ सीबीसी – रु. २०/– दररोज ८.३० ते १२.००

५. नेत्र तपासणी – रु. २०/– दररोज ३.३०

सकाळी ९ वाजता : बुध, शुक्र, शनि

६. मोतीबिंदू शस्त्रक्रिया : सर्वोत्कृष्ट भारतीय लेन्ससह विनामूल्य.

लेझर (फाको) शस्त्रक्रिया : रु. ५,३००/– यू.एस. फोल्डेबल लेन्स आयात करीत आहे.

रु. १०,०००/– यूकेने फोल्डेबल herफेरिक लेन्स आयात केले. (बाहेरील दर रु. ४०,०००/– आहे.)

स्त्रीरोगशास्त्र/ आयव्हीएफ/ हिस्टेरोस्कोपी

ट्यू / थुर / शुक्र. १ p.m.

७. त्वचेचे विभाजन .०० २०.००

सोमवारी दुपारी ..pm0 वाजता

८. ऑर्थोपेडिक ✲ २०.०० – मंगळ ३.३०.३०

९. मधुमेह आणि कार्डिओ ✲ .०० २०.००

बुधवारी दुपारी ८.३० वाजता

१०. मुलाचे विभाजन. ✲ .०० २०.०० – शुक्रवारी ५.३० pm

११. कान / नाक / घसा ✲ .०० २०.००

बुधवारी / शुक्र ४–३० संध्याकाळ

१२. दंत नाममात्र शुल्क आरसी शुल्क : रु. ७५०/–

दररोज ९.०० ते दुपारी १.०० दिली दुपारी ०.०० वाजता ते सायंकाळी ००.००

१३. डायलिसिस ✲ बीपीएल रूग्णांसाठी विनामूल्य

दैनिक (फोन : २८०६७६४५)

१४. ग्रीवाचा कर्करोग (ग्रीवाचा कर्करोग) चाचणी मोफत

१५. अँटी कॅन्सर इंजेक्शन १४ ते २४ वर्षांच्या मुलींसाठी.

१६. ज्येष्ठ नागरिकांसाठी वास्तविक सुनावणी, प्रत्यक्ष खर्चाच्या ५०%. जन्मतःच पात्र मुलांसाठी विनामूल्य.

१७. उन्हाळ्याच्या सुट्टीमध्ये सर्व विद्यार्थ्यांना सवलतीच्या दरात नोटबुक आणि इतर हार्डवेअर वस्तू.

१८. बी.बी., एमबीबीएस, सी.ए., सी.एस., बी.पी.एच.आर.एम. एम.सी.ए. आणि एमबीए निवडले. विद्यार्थ्यांसाठी पात्र उमेदवारांसाठी उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती. ✲ भेट ✲

www.kambarda bar.org आणि सर्व आवश्यक तारणांसह फॉर्म सबमिट करा. कृपया p_zijn zasainani@rediffmail.com ईमेल वर संपर्क साधा. कोणत्याही शिफारसी आवश्यक नाहीत. कृपया शेअर करा. प्राप्त केल्यानुसार आपल्या ओळखीच्या ग्रुपमध्ये पाठवा कोणाला तरी फायदा होईल.

✲✲✲

आरबीआय - देखील दिवाळखोरीच्या मार्गावर आहे?

- विजय घोरपडे (अर्थतज्ज्ञ)



लोकसभा निवडणुकीच्या काळात सरकारने आरबीआय कडून १.६५ लाख कोटी घेतले होते. आणि आता आरबीआयची राखीव रक्कम ३०,००० कोटींवर आली आहे. हे सूचित करते की केवळ बँकाच नाही तर आरबीआय देखील दिवाळखोरीच्या मार्गावर आहे, ही एक धोक्याची घंटा नाही का? हे का आणि कसे घडले? असे प्रश्न सर्वसामान्य नागरिक आज विचारणार नाहीत, कारण ते अर्थशास्त्रापेक्षा धार्मिक शास्त्रात रमलेले आहेत.

२०१४ पूर्वी कोणत्याही सरकारने आरबीआय कडून संपूर्ण 'सरप्लस मनी – एकूण नफा' घेतला नव्हता हे त्यांना कदाचित माहीत नसेल. सरकारने लाभांश म्हणून फक्त काही भाग घेतला होता. २०१८ मध्ये, जेव्हा उर्जित पटेल आरबीआयचे गव्हर्नर होते, तेव्हा मोदी सरकारने सर्व नफ्याचे पैसे बँकेकडे मागितले. मात्र, पटेल यांनी नियमानुसार नकार दिल्याने त्यांनी गव्हर्नरपदाचा राजीनामा दिला. त्यानंतर सरकारने आरबीआयचे माजी गव्हर्नर बिमल जालान यांच्या अध्यक्षतेखाली ६ सदस्यीय समिती स्थापन केली, ज्यामुळे सरकारचा मार्ग मोकळा झाला. तोपर्यंत आरबीआय कडून लाभांश म्हणून घेतलेली कमाल रक्कम ५०/५५ हजार कोटी होती. बांगलादेश मुक्ती युद्धादरम्यान तत्कालीन प्रधानमंत्री इंदिरा गांधी यांनी आरबीआय कडे ५० हजार कोटींऐवजी ७० हजार कोटी रुपये मागितले होते, परंतु बँकेने स्पष्टपणे नकार दिला आणि सरकारने ते स्वीकारले.

या सरकारने केवळ स्वत:साठी आरबीआयचे नियमच बदलले नाहीत तर कॉर्पोरेट्स आणि कंपन्यांसाठी ३२३ ते २७ कायदे बदलून त्यांची कामे व्हाईटवॉश केली आहेत. गेल्या ३ ते ५ वर्षात ५० हजार कंपन्या दिवाळखोरीत निघाल्या. बँकांची कर्जे बुडाली, ७० हजार नवीन कंपन्या नवीन कर्ज घेऊन उभ्या राहिल्या. हे आहे, या सरकारचे अर्थशास्त्र!

आज जर आरबीआय ला अपेक्षित? ७४ हजार कोटींचा नफा नसेल आणि जे काही थोडे आहे, ते सरकारने घेतले तर बुडणाऱ्या बँकांना कोण वाचवणार? लक्ष्मीविलाससारख्या बँका लक्षात ठेवल्या पाहिजेत, येस बँक, डीएचएफएल! लक्ष्मी विलास यांची सिंगापूर बँकेला विक्री करण्यात आली. इतर दोन बँकांची अवस्था अजूनही बिकट असून आता आणखी दोन बँकांचे खासगीकरण केले जात आहे. कुतुबमिनार 'विष्णूस्तंभ' आहे की, ज्ञानवापीमध्ये 'शिवलिंग' आहे हे समजून घेण्याऐवजी सरकारचे हे आर्थिक धोरण देशाला कुठे नेऊन बसवले आहे, हे समजून घेतले पाहिजे.

सलग चार महिने महागाई वाढत राहिल्यास सरकारने थेट रिझर्व बँकेलाच प्रश्न विचारावा, असे घटनात्मक नियम सांगतात आणि आरबीआय ने देखील योग्य प्रतिसाद द्यावा. पण गेल्या ६ महिन्यांपासून महागाईचा निर्देशांक वाढत असतानाही सरकारने याबाबत कोणतीही चौकशी केली नाही किंवा आरबीआयने कोणतेही स्पष्टीकरण दिलेले नाही. संसदेत चर्चा व्हायला हवी होती, पण या सरकारने तसे केले नाही. आजचे आरबीआय बोर्ड सरकार नियुक्त करते, त्यामुळे कोणाला जबाबदार धरणार? उर्जित पटेल सरकारच्या विरोधात गेले म्हणून त्यांच्यावर कारवाई, अशी ज्वलंत उदाहरणे समोर असताना, सरकारच्या विरोधात कोण जाणार? याउलट सरकारने नेमलेल्या मंडळाने सरकारला पाठीशी घालून आरबीआयला या स्थितीत आणले आहे.

माजी प्रधानमंत्री डॉ. मनमोहन सिंग यांच्या २००६ ते २०१४ या आठ वर्षांच्या कालावधीची मोदींच्या २०१४ ते २०२२ या कालावधीशी तुलना केल्यास हे स्पष्ट होते की डॉ. सिंग यांच्या कार्यकाळात सरकारने आरबीआय कडून केवळ १,०१,६७९ कोटी रुपये घेतले, तर मोदींच्या कार्यकाळात ही रक्कम ५,७४,९७६ कोटी आहे. ते पाचपट जास्त आहे. याला म्हणतात, 'व्यवस्थेच्या माध्यमातून धूर्तपणे केलेला भ्रष्टाचार!' आरबीआयला कोणी दिवाळखोरीत आणले ते तुम्हीच ठरवा!

***

डोणजेगावच्या सरपंचपदी रोहिणी कुंभार यांची निवड



खडकवासला : डोणजे (ता. हवेली) येथील ग्रामपंचायतीच्या सरपंचपदी रोहिणी शंकर कुंभार यांची निवड करण्यात आली. जिल्हाधिकारी तथा निवडणूक निर्णय अधिकारी सुहास दिवसे यांच्या आदेशानुसार आज निवडणूक घेण्यात आली.

अध्यासी अधिकारी म्हणून मंडल अधिकारी हिंदुराव पोळ आणि सचिव म्हणून ग्रामसेवक सतीश चव्हाण यांनी काम पाहिले. याप्रसंगी माजी जिल्हा परिषद सदस्य नवनाथ पारगे, जि. प. माजी सभापती पूजा पारगे, उपसरपंच मारुती कंक, तेजस कोडीतकर, सारिका भगत, योगेश भामे, सायली चव्हाण, स्नेहा वाल्हेकर उपस्थित होते.

स्पेनची वैभवशालीनता

– मंदाकिनी डावरे, पुणे



सौंदर्याच्या बाबतीत दुसऱ्या कोणत्याही देशाला मात देऊ शकेल असा देश म्हणजे स्पेनच ठरू शकेल. प्रथम पासूनच हा देश ''अति आधुनिक देश'' अशी याची प्रसिद्धी आहे आणि हा देश त्यासाठीच नावाजलाही गेला आहे. पूर्वी मात्र ''स्पेन साम्राज्य'', असे याबद्दल म्हटले जात होते. 'संस्कृती' या शब्दाची आठवण करून देण्यास 'स्पेन' हे नाव पुरेसे आहे. कारण इतर कितीतरी देशांच्या तो एक पाऊल पुढेच ठरला गेला आहे.

होय! ह्यामुळेच दरवर्षी सुमारे पाच करोडपेक्षा जास्त पर्यटक पर्यटनासाठी येथे येत असतात. या 'किंगडम ऑफ स्पेन' मध्ये ऐंशी टक्के लोक, शहरात तर केवळ वीस टक्के खेडयात रहातात. 'नृत्य आणि संगीत' ही या 'इस्पानियन' लोकांची खासियतच ठरली गेली आहे. हे लोक अनेकवेळा संगीत आणि नृत्य यामध्ये गुंग होऊन अक्षरश: रस्त्या, रस्त्यावर नृत्य करीत असताना दिसतात.

स्पेन मधील मुख्य शहरे आहेत माद्रिद आणि बार्सीलोना! यातील माद्रिद ही स्पेनची राजधानी! फुटबॉल हा त्यांचा नॅशनल गेम तर 'सांड' म्हणजे वळु हा त्यांचा नॅशनल प्राणी असतो. इंटरनॅशनल फुटबॉल खेळातील 'मेस्सी' हे नाव ज्याला माहीत नाही असा 'फुटबॉल वेडा' माणूस विरळाच असू शकेल. येथे 'सांड' याच्या साथीने एक खेळ खेळला जातो. त्याचे नाव आहे ''बुल फाइट!'' हा माणसाच्या आणि सांडच्या जीवावर उठलेला खेळ असूनही येथील जनता मोठाच रस घेऊन हजारोंच्या संख्येने या खास मैदाना भोवती जमलेली असते.

आपल्याकडे खरे तर प्राण्यांकडून कोणत्याही प्रकारची कसरत करवून घेणे हा मोठाच गुन्हा आहे. मात्र येथे 'सांड' सारख्या जाडजूड आणि भक्कम प्राण्याला त्याच्या समोर मोठे लाल कापड पसरवून दाखवीत त्याला टक्कर घ्यायला लावणे. हीच गोष्ट पुन्हा पुन्हा करायला लावून लाल कापड हलविणारा माणूस ही फाईट जिंकतो की 'सांड' जिंकतो? हे अगदी प्रोत्साहन देत ही जनता पहात असते ''आ बैल मुझे मार'' या खेळात मात्र फार मोठा धोका असल्यानेच कित्येक खेळाडूंचा यात मृत्यु झाल्याची नोंद येथे आढळते.

''शब्दांऐवजी फक्त संगीताचा वापर'' ही आहे स्पेनच्या राष्ट्रगीताची निराळी ओळख! ज्या आपल्या भारतीय राष्ट्रगीतातून 'जन गण मन' तसेच स्वातंत्रेच्या, ''वंदे ऽऽ मातरम्'' ह्या गीतांमधील शब्दांमधून आपल्या भारताचे गुणगान करीत असतो आणि त्याच शब्दांमधून आपण देशाशी जवळीक साधलेली असते तेथे मात्र हे स्पॅनिश लोक केवळ म्युझिक मधून आपलेपणा व्यक्त करतांना ऐकून वेगळेपण जाणवल्या शिवाय रहात नाही.

'होळीचा सण' फक्त आपल्याच देशात साजरा होतो असे अजिबात नाही. कारण आपल्यासारखी नाही तरी तेच स्वरूप असलेली एका प्रकारची होळी स्पेनमध्ये सुद्धा साजरी होत असते. ''लारोमॅटिना'' हे त्या त्योहाराचे नाव! या नावातच कळल्याप्रमाणे टोमॅटोच्या सहाय्याने ही स्पॅनिश होळी खेळली जाते. गुलाल आणि हिरव्या, पिवळ्या, लाल रंगांच्या या पावडरीऐवजी, येथील लोक एकमेकांवर टोमॅटो फेकून त्यांना लाल रंगाने लडबडून टाकतात. अशा प्रकारे फेकून मारलेल्या त्या टोमॅटोचा खच चा खच रस्ताभर पडत जातो आणि तुडविल्या गेलेल्या टोमॅटोरूपी चिखलाने संपूर्ण रस्तेचे रस्ते खडबडले जातात.

स्पेनमध्ये अनेक धर्मीय लोक वास्तव्य करून राहिलेले आढळतात. मात्र त्यामध्ये 'कॅथोलिक' या ख्रिश्चन धर्मीयांचे प्रमाण जास्त आहे. त्यानुसार त्यांच्या चर्चेस्ची संख्या सुद्धा मोठीच आहे. स्वत:ची खूप खूप काळजी घेणारे हे स्पॅनिश लोक कमीतकमी आजारी पडत असतात. त्यामुळेच स्पेनमध्ये आपल्याकडल्या सारखी दवाखान्यांची व स्वत:च्या तब्येतीची काळजी न घेणाऱ्या रोग्यांची संख्या अगदी नगण्य असते.

'ऑलिव्ह' हे स्पेनचे राष्ट्रीय पीक मानले गेलेले आहे. येथे ऑलिव्ह तेलाचे उत्पादन एवढ्या मोठ्या प्रमाणावर होत असते की त्यातील ५०% पेक्षा सुद्धा जास्त तेल हे दुसऱ्या देशांना पाठवावे लागते. स्पेनमध्ये शिरता शिरताच रस्त्याच्या कडेकडेंनी असली ऑलिव्हची प्रचंड मोठी शेती याची साक्ष देऊ शकते.

स्वच्छ, मोठ मोठे अतिसुंदर समुद्र किनारे, ह्यांच्या ओळखी व्यतिरिक्त, तेथे आपत्याला स्पेनची दुसरी एक ओळख पटते तो म्हणजे, ''या स्पॅनियन लोकांकडे मोबाईल फोन पेक्षा गाड्यांची संख्या जास्त आहे.'' आणि म्हणूनच येथील रस्त्यांवर गाड्यांच्या लाईनीच्या लाईनी पहाव्या लागतात. जगामध्ये जी ''वर्ल्ड हेरिटेज'' म्हणून मानली गेलेली ठिकाणे आहेत. त्यामधील 'सस्ते चाळीस' ठिकाणे ही एकट्या स्पेनमध्ये आहेत. 'माद्रिद' ही स्पेनची राजधानी! 'माद्रिद' हा अरबी शब्द असून त्याचा अर्थ आहे ''अनेक धारां''चे ठिकाण! येथील ''रॉयल पॅलेस'' हेच खरे माद्रिदचे वैभव आहे. याचा पहिला मजला एकसंध अशा मार्बल मधून बनविलेला असून येथील पेंटिग्ज केवळ अप्रतिमच नाही तर जगातील कितीतरी उत्कृष्ट पेंटिग्जची तुलना रॉयल पॅलेस येथील पेंटिग्जशी क्वचितच होऊ शकेल.

येथील कोरीव कामे पहाताना त्यातील नजाकत आणि भावभावना आपल्याला अगदी दिग्मूढच करून टाकीत असतात. या स्थळाची ओळख 'क्रिस्टल पॅलेस' ही सुद्धा आहे अशा प्रकारे या पॅलेसचे वरचे दोनही मजले उत्कृष्ट कलाविष्काराने सजलेले आहेत. येथील तीन हजार पेक्षा जास्त खोल्या सौंदर्याच्या बाबतीत पूर्वीचेच वैभव टिकवून आहेत. सुमारे १८८७ या सालातील हा पॅलेस पूर्वीसारखा तेवढाच आखीव रेखीव दिसत असून स्पेनमधील प्रमुख आकर्षण ठरलेला आहे.

''सिटी ऑफ कल्चर अँड आर्किटेक्चर'' याने अगदी परिपूर्ण असलेले असे हे शहर रस्त्यारस्त्यावरून धावणाऱ्या आरामदायी आणि आलिशान गाड्यांचे जणू प्रदर्शनच घडवीत असते असे वाटते. येथे मोठ्या प्रमाणावर वावर दिसतो तो अति फॅशनेबल लोकांचा! त्या बाबतीत पॅरिसच्या

खालोखाल 'माद्रिद'चाच क्रमांक लागतो.

'प्युरोटो सेल' हा माद्रिद मधील प्रमुख चौक! येथे 'बेअर लिकींग प्लाझा' आणि 'मेअर प्लाझा' ह्या अतिशय सुंदर इमारती असून त्यांच्या सहाव्या मजल्या वर 'बार' आणि 'रेस्टॉरंट' आहेत. ओपन स्पेस आणि निरनिराळ्या प्रदर्शनासाठी हा भाग प्रसिद्धच आहे तर येथील रुंद आणि भव्य रस्तेच जणू पर्यटकांना ह्या भागाकडे आकर्षित करतात असे वाटते. 'शेरिओ पार्क' ही माद्रिद मधील 'तापो' या नदीतील रोईंगसाठी खुप गर्दी खेचणारी जागा आहे! येथे आपण आपले स्वतःचे रोईंग करून एक अनोखा अनुभव मिळवू शकतो. 'रोईंग' याचा अर्थ आहे स्वतःचे स्वतः बोट वल्हविणे. या तापो नदीचे दोन्ही किनारे अतिसुंदर असून दोन्ही बाजूला खंदक तयार केले गेले असल्याने नदी अगदी सुरक्षित राहिली गेलेली आहे. अतिशय व्यस्त आणि गोंगाटाचे शहर असलेल्या या ठिकाणी २००० वर्षापूर्वीचे इजिप्शियन पद्धतीचे मंदिर आपल्याला त्या ठिकाणच्या कलेचा नमुना दाखविते तर 'टोलोडो' ही खूप जुनी वास्तू 'तापो' नदीच्या किनाऱ्यावरच उभी असून प्राचीन संस्कृतीचा अनुभव देते. 'तापो' ही नदी माद्रिद पासून जवळ जवळ सत्तर किलोमीटर दूरीवर आहे. येथील 'सर्कल द माद्रिद' हा स्क्रेअर पर्यटकांसाठी आकर्षणाची सर्वांत महत्वाची जागा आहे, ती अशासाठी की, अतिशय सुंदर अशा भेटवस्तूंच्या दुकानामधून आपल्या आवडीच्या आणि गरजेच्या वस्तूंचे वैविध्य हेच होय. खरेतर अशा असंख्य प्रवाशांच्या भेटीमुळे, खरेदीमुळे माद्रिद शहराची आर्थिक स्थिती चांगली राहू शकलेली आहे हे मानले गेलेले आहे.

'माद्रिद'चे नाव घेताच खेळ प्रेमी विशेषत: फुटबॉल प्रेमी लोकांना आठवण होते ते येथील 'माद्रिद स्टेडियम' आणि 'लिओनल मेस्सी' हा जगप्रसिद्ध खेळाडू यांची! येथील 'रिअल माद्रिद' या फुटबॉल क्लबने या क्षेत्रातील आपला वरचा क्रमांक दाखवून दिलेला आहे.

'स्पेन' या देशाला येथील लोक बऱ्याचदा 'इस्पाना' ह्या नावाने संबोधतात. माद्रिदच्या 'इस्पाना प्लाझा' मध्ये वेगवेगळे लहान मोठे पुतळे, भव्य अशी स्मारके मोठ्या प्रमाणावर आढळतात. याच ठिकाणी अनेक स्ट्रीट आर्टिस्ट आपआपल्या करामती दाखवून लोकांची वाहवा तर मिळवितातच या शिवाय अनेक लोक आर्टिस्टच्या त्या कामांची 'बिदागी' म्हणून कित्येक युरोज आणि सेंट्स त्यांच्यापुढे असलेल्या बॉऊल मध्ये टाकत असतात.

'रॉयल प्लाझा' हा आणखी एका वेगळ्याच गोष्टीसाठी नावाजला गेला आहे, तो म्हणजे येथील, ''सॅण्डविचेसची विविधता!'' या लज्जतदार पदार्थासाठी लांबून लांबून सुद्धा आलेल्या लोकांची सतत गर्दी असते. ब्रंच अथवा डिनर झाल्यानंतरचा लोकांचा मूड तयार होतो तो येथील या भव्य आणि शानदार प्लाझामध्ये खरेदी करण्यासाठी!! या ठिकाणी जर तुम्हाला एक दिवस जरी हॉटेल मध्ये रहावयाचे असेल तरी त्यासाठी जवळजवळ दोनशे पन्नास युरो (म्हणजे आपले साडे एकवीस हजार रु.) खर्च करण्याची तयारी असावी लागतो. येथील 'सेविली' ह्या भागामधे 'रॉयल पॅलेस ऑफ सेविली' हा राजवाडा खूप जुना असूनही व्यवस्थित दुरुस्त ठेवलेला आणि अगदी नीटनेटका असल्याने भेट देणाऱ्या पर्यटकांना अगदी प्रसन्न वाटते. येथील रॉयल म्युझियमस् मधील वैविध्यपूर्ण कण आणि संस्कृती, चर्चेस आपल्या डोळ्यांना आणि मनाला सुस्नात करून सोडतात. 'कॅथड्रेल द सेविली' या नावाने येथील चर्चेस ओळखली जात असतात. 'पार्क मरिना' हे सुद्धा अतिशय सुंदर आणि प्रसिद्ध स्थळ पहाण्यासाठी दररोज दहा हजार तरी पर्यटकांची तेथे गर्दी झालेली पहावयास मिळते. 'बार्सिलोना' हे स्पेनमधील दुसऱ्या क्रमांकाचे मोठे शहर! 'सागरादा फॅमिला' या नावाचे प्रचंड मोठे चर्च हे बार्सिलोनाचे खास वैशिष्ट्य आहे. यासंबंधी अशी माहिती मिळते की, ''गेली दिडशे वर्षे या चर्चचे बांधकाम चालू असूनही ते अद्यापही पूर्णत्वास आलेले नाही. वेळोवेळी वेगवेगळी कन्स्ट्रक्शनस् सुरु असतात. खूप देखणे असे हे चर्च त्याच्या भव्यपणामुळे आपल्या मनात आणि डोक्यात त्याचे कायमचे अस्तित्व राखून असल्याची जाणीव आपल्याला होत रहाते. प्रचंड उंची असलेले हे चर्च खूप लांबूनही दृष्टीपथात येत असते.

''जवळ जवळ सात हजार लोक एकाच वेळी बसू शकतील एवढा मोठा प्रार्थना हॉल; बाजूला भरभक्कम आणि भरीव असे उंच उंच चढत जाणारे स्तंभ'' हे पाहून तेथे खरोखरच नवचैतन्य निर्माण झाल्यासारखेच वाटते. वरच्या बाजूला छतावर असलेले अफलातून कोरीवकाम हे वैशिष्ट्यामध्ये जास्तीत जास्त भर घालत या चर्चमध्ये मध्यंतरी एक ऐंशी वर्षाचे गृहस्थ आले होते त्यांच्या आठवणींबद्दल सांगताना ते म्हणाले होते की ''मी सातव्या वर्षी प्रथम ह्या चर्चला भेट दिली होती तेव्हा तेथे बांधकाम चालू होते आणि आजही येथे बांधकाम चालू असलेले पाहून मी थक्क झालेलो.'' सततची नवनिर्मिती आपणासही चकीत करून सोडीत असतेच.

जगप्रसिद्ध पर्यटक कोलंबसाची आठवण येथे 'कोलंबस टॉवर' या भल्या उंच स्मारकाने करून दिलेली आहे. सुमारे नऊशे मीटर उंच स्तंभावरील कोलंबसाचा उभा पुतळा एका विशिष्ट दिशेकडे बोट दाखवीत असलेला दिसतो. असे म्हणतात की कदाचित तो त्या दिशेला असलेला 'अमेरिका' खंडाकडे निर्देश करीत असावा कारण येथूनच पुढे प्रवास करीत करीत त्याने 'अमेरिका' खंडाचा शोध घेतला होता. सोळाव्या शतकात जन्मलेला; एका मध्यमवर्गीय कुटुंबातील असा आणि समुद्र प्रवासाची आवड असलेला हा 'नाविक' पुढे एवढा जगप्रसिद्ध होईल असे त्याच्या कुटुंबातील कोणाही व्यक्तीला जाणवलेले नव्हते.

'कोलंबस टॉवर' हे बार्सिलोनामधील एक अत्याकर्षक पर्यटन केंद्र मानल्यास चुकीचे होणार नाही. ह्या उंच स्तंभावर आकर्षक असे चेहरे, सुरेख असे नक्षीकाम आणि फळाफुलांची सजावट पहात पहात वरपर्यंत आपली दृष्टी जात रहाते. एवढ्या उंचीवरील हे सर्व कोरीवकाम बघतांना मान कितीही उंचावली तरी अवघडून न जाता त्या विलोभनीय दृश्याचा मनाला आनंदच होत रहातो. ''ऑलंपिक स्पर्धा'' गाजविलेले भव्य स्टेडियम, फुटबॉल मैदान नॅशनल म्युझियम्स या सारख्या भव्य वास्तुबरोबरच जेव्हा आपण ''कोसा बाल्टो'' या सर्वांत उंच जागेवर उभे असतो तेव्हा तेथून दिसणारे खालील बार्सिलोना शहर एका नजरेत मात्र मावत नसते. अशा या सौंदर्य स्थळाचा ''याची देही याची डोळा'' अनुभव ही कधीतरी विसरण्यासारखी बाब असू शकेल का?

***

काश्मीर - लेह मोटर सायकल स्वारी!

- सौ. उज्वला अभय राजे





''काठी न घोंगड घेऊ द्या की रं मला बी बाईक राइडला येऊ द्या की र.''

...असं मी नवऱ्याला सांगत होते आणि जेव्हा त्यांनी हो म्हटलं तेव्हा

''बाईक राईडला जायचं जायचं जायचं, आनंद पोटात माझ्या माईना माईना''

आणि सगळ्यात जास्त आनंद जेव्हा झाला की विमान दिल्लीतून सुटणार आहे. एखादी व्यक्ती किती नशीबवान असते बघा ना, कारण त्याचवेळी माझे वडील सुद्धा, दिल्लीला माझ्या भावाच्या (उमेश) घरी त्याच्या मुलाच्या वाढदिवसासाठी येणार होते त्यामुळे मी

''किती सांगू मी सांगू कुणाला, आज आनंदी आनंद झाला'' मग काय ११ जून पासून माझी तयारी चालू झाली. आंब्याची पेटी, जांभळं आणि भावाच्या मुलांना धोतर आण, चटणी कुरड्या, लोणची जमा कर.

१२ जून - मी घरातील व बाहेरील सर्व वस्तू आणून ठेवल्या. पण सामान भरताना खूप दमछाक झाली.

''बरसो रे मेघा मेघा, बरसो रे मेघा मेघा'' अशा पावसाळी वातावरणात देखील यांचे मित्र शुभेच्छा देण्यासाठी आले. रात्री सहा बॅगा भरून झाल्या, तेव्हा कुठे शांत झोप लागली. कारण ट्रेन मधून जायचे होते त्याचबरोबर थंडीचे सर्व कपडे घेतले होते रेनकोट, मेणबत्ती, काडीपेटी, कात्री वगैरे.

१३ जून - दुपारी ११:४५ कर्नाटका एक्सप्रेसने आम्ही निघालो.

''झुक झुक, झुक झुक आगीनगाडी धुरांच्या रेघा हवेत काढी, पळती झाडेच पाहूया भावाच्या गावाला जाऊया.''

''मेरा कुछ सामान तुम्हारे पास पड़ा है।'' एवढ्या सहा बॅगा पण ट्रेनमध्ये सिटच्या खाली सुद्धा बसेना. तेव्हा एक व्यक्ती म्हणाले, ''अहो एवढी मोठी बॅग घेऊन कशाला चालले?''

त्या मी म्हणाले, ''आहो, माहेरी निघाले'' बिचारा बाबा पटकन उठला आणि माझ्या बॅगांना त्यांनी जागा करून दिली. केळीच्या बागा, जळगाव, भुसावळ झाल्यावर सात वाजता मस्त वांग्याची घरची भाजी व चपाती खाल्ली आणि रिल बनवून मी झोपी गेले.

१४ जून - सकाळी नऊ वाजता दिल्लीत पोचलो. भावाने गाडी पाठवली होती. वातावरणामध्ये खूप चेंज होता कारण आम्ही एसी मधून डायरेक्ट दिल्लीमध्ये उतरलो. दिल्लीच्या सर्वांग हॉटेल मस्त नाष्टा केला 'राव' मध्ये मुलांना मिठाई घेतली. तोपर्यंत मुलांचे सारखे फोन बुवा कुठे आहेस? शेवटी घरी पोहोचलो. मुलांनी व मालतीने अगदी पाय धुवून आमचं स्वागत केलं. उमेश ने दुपारी सुट्टी घेतली मग संध्याकाळी आम्ही चार वाजता दिल्ली फिरायला गेलो.

''ये दिल्ली मेरी जान, बस इश्क मोहब्बत प्यार'' जामा मशीद लांबूनच पाहिले चांदणी चौक मध्ये फिरलो आणि 'करीम' मध्ये जेवलो.

१५ जून - ''रिंगटोन नमस्कार, हम उड़ान भरने के लिए तयार है'' सकाळी नाष्टा व जेवण खाऊन डोमेस्टिक एअरपोर्टवर पोहोचलो. साडेचार वाजता बोर्डिंग चालू केलं. साडेपाचला विमान उडाले विमानात माझी विंडोशीट होती त्यामुळे 'ये कहा आ गये हम' असा नजारा वरून दिसत होता. हिमालयाची शिखरे, पर्वत, सूचिपर्णी वृक्ष पाहून खरंच ''सारे जहा से अच्छा, हिंदोस्ता हमारा'' असंच वाटत होतं. सहा वीसला श्रीनगर एअरपोर्टवर पोहोचलो. गाडीत बसलो आणि ड्रायव्हरने चक्क गाडीच्या काचा खाली घेतल्या. वातावरणामध्ये इतका बदल झाला होता. सुंदर बंगले, झेलम नदी विस्तीर्ण पसरलेल दल सरोवर आणि 'बेहतरीन हॉटेल' मध्ये केलेला विश्राम.

१६ जून - ''ये तो काश्मीर है इसकी फिजा का क्या कहना, देश दुल्हन है, दुल्हन के तन का ये है गहना''

एंटा०रॅ गाडी घेऊन पूर्ण श्रीनगर आम्ही ''चक्के पे चक्का, चक्के पे गाडी, गाडी पे निकली अपनी सवारी, थोडी अघाडी, थोडी पिछाडी''

कारण मी गाडी चालवत होते ना? प्रथम बॉटनिकल गार्डन नंतर



शालिमार गार्डन तिथे आम्ही कश्मीरी ड्रेस घालून फोटो व रिल बनवल्या. तिथे चिनार वृक्षही पाहिला, तो ३६५ वर्षाचा होता.

''हे चिंचेच झाड दिसे मज चिनार वृक्षापरी दिसशी तू नवतरुणी काश्मिरी'' नंतर 'हजरतमल दर्गा' पण तो बंद असल्यामुळे आम्ही तो बाहेरूनच पाहिला. 'हरीपर्वत किल्ला' खूप लांब आहे. वरती देवीचे मंदिर, गुरुद्वारा आणि जलबेरीचे झाड आहे. तटबंदी अगदी मजबूत आहे. त्यानंतर आम्ही आद्यशंकराचार्य मंदिराला गेलो. वरून पूर्ण श्रीनगर खूप छान दिसतं. खूप जुने मंदिर आहे. मग आम्ही 'मुघल दरबार' हॉटेलमध्ये जेवलो. उद्या ईद होती त्यामुळे लाल चौक अतिशय गजबजलेला होता. कपडे, भांडी, शाली, पर्स, स्वेटर किती किती म्हणून वस्तू तिथे होत्या व लोक ही खरेदीला भरपूर आले होते. सहज मी पण एका ड्रेसची चौकशी केली. पण रेट् मला सारखेच वाटले. दल सरोवर- अभयला मी नको म्हणत होते तरीपण हजार रुपए किंमतीचा शिकारा त्याने बुक केला. मग तिथे आम्ही फोटो काढले.

''ये देखके दिल झूमा, ली प्यार ने अंगड़ाई, दिवाना हुआ बादल, सावन की घटा छाई, ये देखके दिल झूमा, ली प्यार ने अंगड़ाई, दिवाना हुआ बादल...''

अर्धा तास मस्त पाण्यात फिरून आलो आणि खरंच पुस्तकात वाचल्याप्रमाणे तेथे चहाची दुकानं, दागिन्यांची दुकान अगदी ड्रेसची दुकानं सुद्धा पाण्यावर होती. अभय मला हॉटेलमध्ये सोडून परत गाडी द्यायला गेला, पण तो परत येईपर्यंत मला खरंच भीती वाटत होती कारण श्रीनगर मधील लोकांचे ड्रेस आणि वडाप गाडी पाहून मी खूप घाबरले होते, त्यात आणखीन लाईट गेली त्यामुळे मोबाईलला चार्जिंग सुद्धा नव्हते. रात्री आमची बाईक रायडर बरोबर मिटिंग झाली आणि आणि मग आम्ही झोपी गेलो.

१७ जून - सकाळी आम्ही आठ वाजता रूममधून बाहेर पडलो.



पण बाईक सर्वांना मिळून, सूचना, हेल्मेट घेऊन आम्ही अकरा वाजता हॉटेलमधून बाहेर निघालो. आम्हाला हिमालयन ४५० बाईक मिळाली होती.

''धूम मचाले, धूम मचाले, धूम धूम'' स्टाईलने सोनमर्ग (सोन्याचे कुरण) ला आम्ही सर्वजण आलो. रस्ता खराब होता. पण तेथील कुरणे, फुलांनी आच्छादलेली शेती, बर्फाच्छादित पर्वत, पाइनवृक्षाची जंगले, धबधबे, सरोवरे पाहून वाटते.

''हिरवे हिरवे गार गालिचे, हरित तृणांच्या मखमालीचे त्या सुंदर मखमाली वरती फुलराणी ही खेळत होती.'' रस्त्यावर रहदारी होती. आर्मीच्या गाड्या सायरन वाजवत जात होत्या. आम्हाला मध्येच पाऊसाने न्हाऊ घातलं. कारगिल 'मिशन विजय' पाहून व त्याची गाथा ऐकून खरोखरच माझ्या डोळ्यातून पाणी आणि तोंडातून 'भारत माता की जय' अशी घोषणा आली व सर्वांनी त्याला दुजोरा दिला.

विक्रम बत्रा व त्यांच्या साथी मित्रांची पत्र वाचून सर्वांचे डोळे पाणवले होते. ''पप्पा, तुम्ही काळजी करू नका. मुलीला, आईला त्रास देऊ नको. मोदींनी, आमचे मनोबल वाढवले आहे. मीडियावर लक्ष देऊ नका. घरातील सर्वांची काळजी घ्या. इथे जेवण छान आहे.'' अशी वाक्य वाचल्यावर तर

''ऐ मेरे वतन के लोगो, जरा आँख में भर लो पानी, जो शहीद हुए है, उनकी जरा याद करो कुर्बानी...'' या गाण्याची खूप आठवण झाली. टायगर हिल व ती बोचरी थंडी उन्हाळ्यात ही परिस्थिती तर थंडीत काय होत असेल आपल्या सैनिकाचे? आमचा आजचा मुक्काम कारगिल ला होता. दुपारी जेवण व्यवस्थित न झाल्यामुळे भूक पण लागली होती. आता आम्ही सुसाट वेगाने सुटलो. पण रस्त्यावर फक्त डांबावरच्या लाईट्स मातीची छोटी छोटी घरे, खिडकी आहे पण लाईट नाही. रस्त्या शेजारी खळखळ वाहणारी नदी काळाकुट्ट अंधार खूप भीती वाटत होती, इथे प्रत्येक ठिकाणी परवाना घ्यायला लागतो. रात्री दहा वाजता आम्ही कारगिला पोचलो व जीवात जीव आला. हॉटेलमध्ये आले की फोनला रेंज येई त्यामुळे मी सर्वांना फोन किंवा मॅसेज करायची.

१८ जून - सकाळी उठल्यावर कारगिल चे रूप पाहिले चित्रपटात पाहिल्या प्रमाणे डोंगरावरची छोटी छोटी घरे, छोट्या छोट्या खिडक्या आणि हे पाहिल्यावर त्याचा फोटो घेण्याचा मोह मला आवरला नाही. साडेनऊ वाजता मी एकवीस जण (६ लोक + ८ मुले + २ कपल्स + २ फॉरेनर + ईशांत) निघालो. येथेही परवाना दिला. आम्ही तिथे मून प्लेस पाहिले. नुसते वाळवंट, जांभळ्या रंगाचे उंच उंच पर्वत आणि

खोल खोल दरी, वेडी वाकडी वळणे व शेजारी खळखळणारी नदी त्यात अभय स्टंट करायचा व एक १२० च्या स्पीडने गाडी पळवायचा. मला खरंच सर्कशीत असल्यासारखं वाटायचं कारण हे पहिल्यांदाच होतं.

लेहला सगळीकडे मिलिटरीच्या गाड्या होत्या. शेवटी पाच वाजता आम्ही लेहला हॉटेलमध्ये पोचलो आणि कावा (चहा) देऊन आमचं स्वागत केलं. कावा खरच खूप छान होता. एकदम आम्ही फ्रेश झालो. मग त्यांनी इथं आमच्यासाठी लोकल डान्स केला आयोजित केला होता. त्यांचे ड्रेस, गाणे, आवाज खरच छान होतं व प्रेझेंटेशन खूप छान होतं आणि ते प्रत्येक वेळी Julley (लेह भाषेत याला नमस्ते म्हणतात) करून आमचे स्वागत करत होते.

१९ जून – सकाळीच आम्ही लेह दर्शनाला निघालो. ईशांतचे (हा आमचा ग्रुप लिडर होता. पंचवीस वर्षाचा असेल. पाच फूट उंची आणि त्याच्याकडे हिरो कंपनीची गाडी होती) गाव असल्यामुळे आम्ही सर्वजण गाड्यांचे एक्सीलेटर वाढवायचं आणि ते इतके छान वाटायचं सगळे लोक आमच्याकडे बघायचे.

१) आम्ही लेह पॅलेस बघितला. ही नऊ मजली इमारत आहे. ती त्यावेळी बांधलेली कारण लेह मध्ये नऊ नंबर हा लकी मानला जातो. तिथे आता दृकश्राव्य व्हिडिओची पण सोय आहे, त्यामुळे आपल्याला तिथला सगळा इतिहास कळतो.

२) मग आम्ही मॅग्नेटिक प्लेसला गेलो. तिथे खूप वारे आहे.

३) सिंधू व झंस्कार नदी संगम बघितला. आम्ही खूप नशीबवान आहोत या जन्मात आपल्याला आपल्या पूर्वजांची उत्पत्ती करणारी नदी पाहायला मिळाली. नदीतील पाण्याने हात पाय धुतले, डोक्यावर थोडे पाणी घेतलं आणि मनात म्हटलं... ''गंगेचे यमुने चैव गोदावरी सरस्वति. नर्मदे, सिंधु कावेरी जलस्मिन्सन्निधि करू''

४) पत्थर वाला गुरुद्वारा – एवढ्या उंचीवर गुरुद्वारांमध्ये अन्नछत्र ची सोय मिलिटरी ने केलेली पाहून खरोखर धन्य वाटले.

५) हॉल ऑफ फेम – हे संग्रहालय आहे यामध्ये भारत पाकिस्तान युद्धामध्ये शहीद झालेल्या सैनिकांच्या स्मृती ठेवल्या आहेत.

६) शांती स्तूप – बुद्धाची खूप मोठी मूर्ती आहे आणि इथून सगळं लेह दर्शन होतं.

७) मार्केट – मी अंदाज केला होता की गाव छोटे आहे. त्यामुळे मार्केट पण छोटेच असेल. पण मार्केटमध्ये गेल्यावर अलिबाबाच्या गुहेत गेल्यासारखं वाटलं आतापर्यंत आमच्या २० जणांची खूप छान ओळख झाली होती. अभय खूप दमला होता त्यामुळे मी मुलांच्या बरोबर शॉपिंगला गेले ती मुलं (बॉम्बे चा मुलगा) होता तो मला आंटी आप भाव करो, फॉरेनर के लिए कुछ सामान लेना है ना आणि मग आम्ही भाव करत अर्धा तास बसलो पण त्याचा काहीच उपयोग झाला नाही आणि बाजारामध्ये लोकल गाणे व नाच ही करत होते.

अशा रीतीने आमच्या सहलीची सांगता झाली.

***

TCAC



Adv. Abhay Raje
B.E. (Prod), MIE, MBA, LL.M.
Director

Tubular Coupling And Auto-Comp Pvt. Ltd.
Manufacturers of API Coupling & Auto Components
G-27, MIDC, Ahmednagar 414 111
Cell : + 91 9923284242 e-mail : abhaykraje@gmail.com
website : www.tcac.co.in

ॲड. अभय राजे
सर्व प्रकारचा कायदेविषयक सल्ला
८३३, बागडपट्टी, नेता सुभाष रोड, अहमदनगर ४१४ ००१
फोन (०२४१) २३४५४०१ मोबा. ९९२३२८४२४२

सर्वांगसुंदर गणेशमुर्तीचे उत्पादक





महेश(राजु)कुंभार
९४२२३५१४५८

जयश्री महेश कुंभार
९६३७८५४२४२

चिंतामणी आर्ट

जय आर्टस्

आमच्याकडे सर्वांगसुंदर गणेशमुर्ती होलसेल भावात मिळतील

दत्तवाडी, उरळी कांचन, पुणे ४१२ २०२

महाराजा सयाजीराव गायकवाड एक आदर्श राजा

(जन्म ११ मार्च १८६३, कौळाणे, ता. मालेगांव, नाशिक जिल्हा)

– संभाजी ब्रिगेड, नाशिक



१८९३ मध्ये शिकागोच्या सर्वधर्म परिषदेत भाषण करुन सर्वांची मने जिंकणारे स्वामी विवेकानंद सर्वांना माहीत आहेत, परंतु २७ सप्टेंबर १९३३ ला शिकागो येथे झालेल्या दुसऱ्या जागतिक सर्वधर्म परिषदेचे अध्यक्ष महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज होते, हे किती लोकांना माहिती आहे? त्यांनी जगातील सर्व धर्माचा तौलनिक अभ्यास केला होता.

त्यांना आपल्या परंपरेचा अभिमान होता, परंतु जगातील इतर धर्मीयांचा त्यांनी कधी द्वेष केला नाही. सर्व धर्मातील तत्त्वज्ञानाचा त्यांनी अभ्यास केला होता, पण ते प्रवाहपतित नव्हते, तर ते प्रागतिक विचारांचे होते.

ऑलम्पिक स्पर्धा ही जगातील क्रीडा क्षेत्रातील सर्वोच्च स्पर्धा मानली जाते. १९३५ साली बर्लिन (जर्मनी) येथे झालेल्या क्रीडा स्पर्धेचे महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज हे प्रमुख पाहुणे होते, यावरून स्पष्ट होते की, क्रीडा क्षेत्रात त्यांचे मोलाचे योगदान आहे आणि त्यांची लोकप्रियता आणि मान्यता ही जागतिक स्तरावरील होती, म्हणूनच ते जर्मनीत झालेल्या ऑलिंपिक क्रीडा स्पर्धेचे प्रमुख पाहुणे होते.

२८ जुलै १९११ रोजी लंडन येथील ऑक्सफर्ड विद्यापीठात जागतिक मानवशास्त्र (Anthropology) परिषद झाली होती. या परिषदेच्या अध्यक्षस्थानी महाराजा सयाजीराव गायकवाड होते. यावरून स्पष्ट होते की, महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांचा मानवशास्त्राचा दांडगा व्यासंग होता.

लंडन येथे १९३० – ३१ आणि ३२ साली पहिली, दुसरी, तिसरी गोलमेज परिषद झाली, या गोलमेज परिषदेसाठी भारतातील अनेक मान्यवर उपस्थित होते, ज्यामध्ये प्रामुख्याने डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि महात्मा गांधी यांचा सहभाग महत्त्वपूर्ण मानला जातो.

विशेषतः डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी भारतीय अस्पृश्यांचे प्रश्न मोठ्या हिमतीने आणि ताकतीने त्याठिकाणी मांडले. त्याच गोलमेज परिषदेला १९३० आणि १९३१ साली महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी मोठ्या ताकतीने भूमिका मांडलेली होती. तेथेच त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा सन्मान देखील केला होता.

ब्रिटिश लायब्ररी ही जगविख्यात लायब्ररी मानली जाते. त्याठिकाणी जगभरातील महत्त्वाचे दस्तऐवज आहेत. महत्त्वाचे ग्रंथ आहेत. ते ज्ञानाचं जगविख्यात भांडार आहे. त्या ब्रिटिश लायब्ररीचे महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज अध्यक्ष होते. हा बहुमान मानला जातो.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज उत्तम राज्यकर्ते होते, तसेच ते उत्तम वाचत होते, जिज्ञासू होते, म्हणूनच त्यांना १९३५ साली ब्रिटिश लायब्ररीच्या अध्यक्षपदाचा बहुमान मिळाला.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज जसे उत्तम वाचक होते, तसेच ते उत्तम लेखक देखील होते. त्यांनी ''फ्रॉम केसर टू सुलतान'' हा पाचशे पृष्ठांचा ग्रंथ लिहिला आहे. त्यांनी ज्या वेळेस ग्रंथ लिहिला त्यावेळेस त्यांचे वय फक्त ३१ वर्षाचे होते. त्यांचा जगाच्या राजकारणाचा, सामाजिक, सांस्कृतिक, धार्मिक, आर्थिक, औद्योगिक, शैक्षणिक, कला इत्यादी क्षेत्रांचा दांडगा अभ्यास होता.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांच्या कार्याचा परिप्रेक्ष केवळ बडोदा राज्यापुरता मर्यादित नव्हता, तर तो जागतिक स्तरावरचा होता, म्हणूनच महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज हे जागतिक स्तरावरचे महामानव ठरतात.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी आर्थिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिलेले आहे. सावकारशाही नष्ट व्हावी आणि जनसामान्यांचा आर्थिक विकास व्हावा, यासाठी त्यांनी ९ जुलै १९६० रोजी ''बँक ऑफ बडोदाची'' स्थापना केली.

भारताच्या आर्थिक विकासात या बँकेचे महत्त्वपूर्ण योगदान आहे. आज देशभर आणि विदेशात देखील बँकेच्या शाखा आहेत. ही राष्ट्रीयीकृत बँक आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज हे या बँकेचे संस्थापक आहेत.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज महान शिक्षणप्रेमी राजे होते. त्यांनी आपल्या राज्यात आणि राज्याबाहेर शिक्षणाचा प्रसार आणि प्रचार केला. शैक्षणिक क्षेत्रात मोलाचे योगदान दिले. गोरगरिबांच्या घरात शिक्षण गेले पाहिजे ही त्यांची तळमळ होती. त्यांनी १८८२ साली आदिवासी आणि अस्पृश्यांसाठी आपल्या राज्यात शाळा सुरू केली.

त्यांनी पुणे येथील डेक्कन कॉलेज, सातारा येथील रयत शिक्षण संस्थेला भरघोस आर्थिक मदत केली. १८९२ साली त्यांनी आपल्या राज्यात सर्वांना आणि मोफत शिक्षण असा कायदा केला. त्यांनी पायाभूत शिक्षणासाठी तीन चतुर्थांश रक्कम खर्च केली. त्यांनी आपल्या राज्यातील शाळांचा अभ्यासक्रम तयार केला.

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अमेरिकेतील शिक्षणासाठी महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी सर्वतोपरी आर्थिक मदत केली. तसेच त्यांनी अरविंद घोष, आर. सी. दत्त, दादाभाई नवरोजी, नामदार गोखले, महात्मा फुले, न्यायमूर्ती रानडे, बाळ गंगाधर टिळक, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस, लाला लजपतराय, महर्षी विठ्ठल रामजी शिंदे, रवि वर्मा, मादाम कामा, बालगंधर्व इत्यादींना भरघोस मदत केली.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज हे नेहमी प्रागतिक

विचारांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले. महात्मा ज्योतिराव फुले यांनी बडोद्याला जाऊन महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांना ''शेतकऱ्यांचा आसूड'' हा ग्रंथ ऐकवला. तो ग्रंथ ऐकून महाराज प्रभावित झाले आणि तो ग्रंथ प्रकाशित करण्यासाठी महाराजांनी भरघोस मदत केली. सावित्रीबाई फुले यांनाही त्यांनी मोलाची मदत केली. वाराणसी येथे हिंदू बनारस विद्यापीठ आहे. त्या विद्यापीठाला महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी जमीन दिली. महाराजांच्या मदतीमुळेच आज बनारस विद्यापीठ उभं राहिलं आहे. महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांना आपल्या अस्मितेचा अभिमान होता. त्यांनी ३१ डिसेंबर १९१० रोजी बडोदा येथे गौतम बुद्ध यांचा पुतळा उभारला, तर १९१४ साली बडोदा येथे त्यांनी छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा उभारला. त्यांना गौतम बुद्ध आणि शिवाजी महाराज यांच्याबद्दल नितांत आदर होता. त्यामुळेच ते गौतम बुद्ध, तुकाराम महाराज आणि शिवचरित्र लिहिणाऱ्या कृष्णाजी अर्जुन केळुस्कर यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिले.

सामाजिक परिवर्तनाच्या लढ्यात महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज अग्रेसर असत. राजर्षी छत्रपती शाहू महाराज आणि महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज हे समकालीन महापुरुष आहेत. त्यांची विचारधारा एकच होती. महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी आपल्या राज्यात मानवतेवर कलंक असणारी अस्पृश्यता ही अमानुष प्रथा बंद केली. आपल्या राजवाड्यात त्यांनी अस्पृश्यांना शेजारी बसवून सहभोजन केले. आपले खाजगी खंडोबा मंदिर अस्पृश्यांसाठी खुले केले.

२३ मार्च १९१८ रोजी मुंबई येथे झालेल्या अस्पृश्यता निर्मूलन परिषदेच्या अध्यक्षस्थानी महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज होते. महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज स्वाभिमानी होते. आपल्या राज्यात त्यांनी ब्रिटिशांना हस्तक्षेप करू दिला नाही. ''मी तुमचा नोकर नाही, तर मित्र आहे'' असे त्यांनी लॉर्ड कर्झनला सुनावले होते.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज हे प्रागतिक विचारांचे होते. युरोपचा दौरा करून त्यांनी समुद्र ओलांडला. समुद्र उल्लंघनाला धर्मद्रोह म्हणणाऱ्यांना त्यांनी वठणीवर आणले. त्यांनी ग्रहणाची रजा बंद केली. परदेशगमन प्रायश्चित्त रद्द केले. पुरोहितांना दानधर्म देणे बंद केले. ते समतावादी होते. विषमतेमुळे आपली अधोगती झाली, असे ते नेहमी म्हणत. रयत शिक्षण संस्थेत भेट द्यायला आल्यानंतर त्यांनी सर्व जाती-धर्माच्या मुलांसोबत बसून पिठलं-भाकरी खाल्ली. ते जनतेचे राजे होते. ते छत्रपती शिवाजी महाराजांच्या विचारांचे वारसदार होते.

महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांनी ६३ वर्षे राज्य केले. या दरम्यान त्यांनी पंचाहत्तर हजार लोककल्याणकारी कायदे केले. त्यांनी आपल्या राज्यात जमनाबाई हॉस्पिटल सुरू केले. स्टेट लायब्ररीची स्थापना केली. १८८२ मध्ये बडोदा कॉलेजची स्थापना केली. तसेच मिलची स्थापना केली. वसतीगृहांची स्थापना केली. १८८५ मध्ये तलावाचे बांधकाम केले. तसेच स्त्री शिक्षणाचा कायदा केला. १८९० मध्ये कलाभवनची स्थापना केली. १९०२ मध्ये विधवा पुनर्विवाह कायदा केला. १९०४ मध्ये बालविवाहावर बंदी आणणारा कायदा केला. १९०५ मध्ये फिमेल ट्रेनिंग कॉलज सुरू केले. १९०९ मध्ये जातीभेद निर्मूलनाचा कायदा केला. १९३७ मध्ये साल्हेर येथे आदिवासी परिषद घेतली.

महाराजा सयाजीराव गायकवाड यांनी आपल्या संपूर्ण कारकीर्दीत एकूण पंचाहत्तर हजार लोककल्याणकारी कायदे केले. एवढेच नव्हे तर कोल्हापूर येथे झालेल्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. २४ मार्च १९३४ रोजी दिल्ली येथे झालेल्या २३ व्या अखिल भारतीय हिंदी साहित्य संमेलनाचे ते अध्यक्ष होते. १९२४ मध्ये मुंबई येथे झालेल्या अखिल भारतीय तत्त्वज्ञान परिषदेचे ते अध्यक्ष होते. असे हे शतपैलू महाराजा सयाजीराव गायकवाड महाराज यांची आज जयंती आहे, जयंतीनिमित्त त्यांना विनम्र अभिवादन!

***

माळशेज घाट व कुंभार समाज

कुंभार समाजाचे प्राचीन काळी पैठण उपराजधानी प्रतिष्ठान जुन्नर प्रांतातील कुंभार उद्योजक कल्याण बंदरकडे जड सामान वाहतुकी साठी गाढवाचा वापर करीत असे. कोकण मधून व्यापार करून कुंभार मजूर माळशेज घाट ठाणे जिल्हा सीमा प्रांतावर वीर कुंभारचा देव प्रसिद्ध असून नववर्ष पाडवाच्या दिवशी पूर्वज यांचे स्मरण वीर दिन म्हणून मंदिरात पूजा अभिषेक नैवेद्य दाखवून जत्रा काही स्थानिक घाट माथा परिसरातील जुन्नरचे मावळ तसेच कोंकणी देखील पूजा अर्चा करून भक्ती करून देणगी देऊन अलीकडे जीर्णोद्धार केला आहे.

जुनी कथा अशी होती की, कुंभार समाज व्यापार गाढवावरती करीत असे. पैसा सोने दागिने मूल्यवान वस्तू मुठाडावरती बांधून कोकण तळा खालून घाटावर ये-जा करीत असता काही इंग्रज दरोडेखोर बंदूकीने असंख्य कुंभार व्यापारी यांना लुटून मारले. त्यावेळी गाढवे जुन्नरच्या कुंभार वाड्यात जाऊन मुके गाढवे रडत होती. कोणी जुने म्हातारा शिंदे यांनी जाणले की, गाढवाच्या पायात साक्षात महादेवाची पिंड असते सर्व प्रकार पाहून त्यावेळी स्थानिक कुंभार बांधव कोकणी यांनी स्मरणार्थ मेलेले सर्वांना एकत्र दफन करून समाधी मंदिर बांधले. अजूनही जो शरण जातो त्याला न कळत चेरोबा दर्शन देऊन भक्ताच्या हाकेला जातो. बाळूमामासारखे कार्य आहे पण लिखित कथा प्रचलित केली नाही. पण घाट मार्ग मुख्य मंदिर पॉईंट वरून कोकण दर्शन दिसते. समोर हरिचंद्रगड दिसतो. बाजूला जुन्नर चावंड हडसर किल्ला दिसतो. नवनाथ पंथ कानिफनाथ सह गोरखनाथ हटकेश्वर डोंगरावर येऊन गेले अशी घटना पूर्वी प्राचीन काळी घडली. सध्या कुंभार समाज माळशेज घाटात कुंभारचा देव वीर चेरोबासाठी जत्रेला चैत्र गुढी पाडवा या दिवशी नित्य नियमाने जातात.

शेतकऱ्यांच्या लेकरांचे हक्काचे घर 'स्नेहवन'

- मनोज कापडे



ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर यांच्यासोबत देशमाने दांपत्य.



'स्नेहवन'चे आता वटवृक्षात रूपांतर झाले आहे.

आत्महत्याग्रस्त, निराधार किंवा आर्थिकदृष्ट्या गरीब शेतकरी कुटुंबातील मुलांसाठी अशोक व अर्चना या देशमाने दांपत्याने श्री क्षेत्र आळंदीपासून (जि. पुणे) नजीक 'स्नेहवन' उभारले आहे. सुमारे दोनशे मुलामुलींसाठी वसतिगृह, शिक्षणासह प्रयोगशाळा, वाचनालय तसेच अन्य आवश्यक व आधुनिक सुविधा येथे तयार केल्या आहेत. उत्तम संस्कार व चारित्र्याने भारलेला येथील प्रत्येक विद्यार्थी असावा याच ध्येयाने स्नेहवनची यशस्वी वाटचाल सुरु आहे.

अशोक देशमाने हा परभणी जिल्ह्यातील मंगरूळ (ता. मानवत) येथील गरीब शेतकरी कुटुंबातील तरुण, जिद्दीने शिकून तो संगणक अभियंता झाला. एकीकडे चांगल्या वेतनाची नोकरी करीत जगणे सुरू होते. दुसरीकडे शेतकरी आत्महत्याविषयक समस्यांमुळे तो अस्वस्थ होत असे. अशा आत्महत्याग्रस्त कुटुंबातील मुलांच्या शिक्षणाची हेळसांड होते. ती बालमजुरीकडे वळतात. अशा मुलांसाठी काहीतरी केले पाहिजे हा ध्यास अशोकला लागला. मग चक्क नोकरी सोडत त्याने पुणे उपनगर परिसरात पत्र्याच्या शेडमध्ये केवळ दोन खोल्यांमध्ये १८ मुलांसह २०१५ मध्ये वसतिगृह सुरू केले. या प्रकल्पाला नाव दिले स्नेहवन, बाबा आमटे, स्वामी विवेकानंद, भारतरत्न नानाजी देशमुख यांच्या प्रेरणेतून सुरू झालेल्या या स्नेहवनाचे आज वटवृक्षात रूपांतर झाले आहे. या वाटचालीत अशोक यांना तेवढीच समर्थ साथ मिळाली ती पत्नी अर्चना यांची. दांपत्याचा हा प्रवास प्रेरणादायी व चकित करणाराच आहे.

आळंदी भागात साकारले ज्ञानग्राम : निराधार मुलांना वाढविण्याची दांपत्याची धडपड, जिद्द पुण्यातील वैद्यकीय व्यावसायिक डॉ. रवींद्र व स्मिता हे कुलकर्णी दांपत्य बारकाईने बघत होते. त्यांनी आपली आळंदीमधील काही कोटी रुपयांची दोन एकर जागा 'स्नेहवन'साठी दान केली. अशोक यांनी मग त्या भागात समाजातील दानशूर व्यक्तींकडून हळूहळू आवश्यक साधने जमा करीत या परिसराला नाव दिले 'नलिनीताई कुलकर्णी ज्ञानग्राम'. आजमितीला येथे राज्यातील गरजू शेतकरी कुटुंबातील सुमारे २०० मुलांसाठी निवास व शिक्षणाची सुविधा उपलब्ध झाली आहे.

सक्षम व आत्मनिर्भर भारतासाठी शेतकऱ्यांच्या मुलांना त्याग, सेवा, समर्पण, सामाजिक बांधिलकीचे धडे देण्याचा संकल्प असल्याचे अशोक सांगतात.

खेडेगावात घरची गरिबी असेल, गावात शाळा नसेल तर मुलांना शिकवणे शक्य होत नाही. त्यातूनच स्नेहवनचा जन्म झाला. राज्यातील आत्महत्याग्रस्त किंवा आईवडील नसलेल्या शेतकरी कुटुंबातील मुले येथे जरूर पाठवावीत. त्यांना मोफत प्रवेशाची संधी देणारा हा अभिनव प्रकल्प दानशूरांच्या बळावर सुरू आहे. येथे पहिल्या वर्षापासून प्रवेश दिला जातो. मुलांना ज्ञान-विज्ञानाबरोबरच गीता, ज्ञानेश्वरीचे धडे दिले जातात. उत्तम संस्कार व चारित्र्याने भारलेला येथील विद्यार्थी असावा याच ध्येयाने आमची वाटचाल सुरू आहे. - अशोक देशमाने

संपूर्ण परिवार झटतोय : अशोक यांचे आई-वडील सत्यभामा व बाबाराव हे देखील आपले गाव सोडून नव्या रूपातील स्नेहवनमध्ये राहण्यासाठी आले आहेत. मुलांचे शिक्षण, आरोग्य व एकूणच संगोपनाची जबाबदारी आता संपूर्ण परिवाराने घेतले आहे. अशोक-अर्चना दांपत्याच्या आनंदी व राधा या मुलींना देखील याच स्नेहवनमध्ये वाढविण्याचा निर्णय त्यांनी घेतला आहे. देणगीतून आता तीन सुसज्ज इमारती उभारल्या आहेत. विविध संकटांमधून मार्ग काढत स्नेहवनचा ज्ञानयज्ञ अखंड सुरू ठेवण्यात देशमाने परिवार यशस्वी झाला आहे.

स्नेहवन व त्यातील सुविधा : आळंदीपासून आठ किलोमीटर अंतरावर आहे स्नेहवन. ❋ रखुमाई, विठाई, माऊली अशी तीन वसतिगृहे. पहिल्या इमारतीत निवासाची सोय ❋ स्वयंपाकघर, ग्रंथालयासह असलेल्या या इमारतीत खेळती हवा, भरपूर सूर्यप्रकाश, प्रसाधनगृहे, सौर दिव्यांची सोय ❋ रखुमाई नावाच्या इमारतीत १०० मुलींच्या संगोपनाची सोय ❋ तीन लाख लिटर क्षमतेचा 'रेन वॉटर हार्वेस्टिंग' प्रकल्प ❋ माउली वसतिगृहात आणखी १०० मुलांच्या निवासाची सोय. साहित्य ठेवण्यासाठी कप्पे. ❋ परदेशी शिक्षक विविध विषय शिकवण्यासाठी येतात. 'ग्लोबल क्लासरूम' तयार करण्यात आली आहे. जगाच्या कानाकोपऱ्यात सामाजिक विषयात कार्यरत युवावर्ग दूरदृश्यप्रणालीद्वारे येथील मुलांना प्रशिक्षित करतात. वर्षातून एकवेळ तरुण किंवा तरुणी सहा आठवडे येथे मुक्कामाला असतात. मुलांना



मुलांना परदेशी शिक्षकांचे मार्गदर्शन होते.



स्नेहवनमधील सुसज्ज वसतिगृहे.

संभाषण कौशल्य, जागतिक भाषा, विज्ञान–तंत्रज्ञानाची माहिती या वेळी दिली जाते. * मुलांच्या सुरक्षिततेसाठी संपूर्ण परिसर 'सीसीटीव्ही' प्रणालीखाली.

पुस्तकांच्या जगात रमतात मुले

इंग्रजी, हिंदी, मराठी भाषांमधील सुमारे पंधरा हजार पुस्तकांचे वाचनालय येथे आहे. वाचनालयाचे विविध भाग केले आहेत. प्रत्येक भागाला समन्वयक असून त्याची जबाबदारी मुलांकडे सोपविली आहे. ते पुस्तकांची देवघेव घडवून आणतात. एक पुस्तक–एक चित्रपट असा अभिनव उपक्रमही येथे राबवला जातो.



मल्लखांब उपक्रम.



स्नेहवनचे समृध्द वाचनालय.

देशी गायींचे दूध : सुमारे १६ गीर गायींच्या गोशाळा उभारणीतून मुलांना देशी, निर्भेळ दूध मिळते. त्याचबरोबर दुग्ध व्यवसाय, दुग्धजन्य पदार्थ निर्मिती, शेणापासून बायोगॅस, वीजनिर्मिती, आधुनिक गोठा उभारणी आदींचे प्रत्यक्ष शिक्षण मुलांना मिळते.

मुलांमध्ये रुजतेय कौशल्य : मल्लखांब, योगा आदींच्या माध्यमातून येथे खेळाडू तयार होत आहेत. स्नेहवनचा एक विद्यार्थी मल्लखांब स्पर्धेत जिल्ह्यात तिसरा आला आहे. बुद्धिबळ, कथ्थक, पाककला, शेतीकामांपासून ते प्रशासन, व्यवस्थापन, लेखा, संभाषण अशा प्रत्येक कौशल्याला हलक्याफुलक्या खेळांमधून मुलांपर्यंत पोहोचविण्याचे काम सुरू आहे.

संगीत आणि शास्त्राचे धडे : स्नेहवनमध्ये फेरफटका मारला संगीत वर्गात संवादिनीची धून, तबल्यावरील ठेके ऐकू येतात. नृत्याचेही धडे मिळतात. शालेय अभ्यासक्रमातील प्रयोगांचे योग्य आकलन व्हावे यासाठी जीवशास्त्र, भौतिकशास्त्र व रसायनशास्त्राच्या प्रयोगशाळा येथे उभारल्या आहेत. संगणक प्रशिक्षण केंद्रही चालवले जाते.

घडताहेत उद्याचे उद्योजक : उद्योजक होण्याचे प्रत्यक्ष धडे स्नेहवनातील मुलांना शालेय जीवनातच मिळत आहेत. येथील काही मुले पदवीधर होत आहेत. भारतरत्न नानाजी देशमुख श्रम संस्कार केंद्र आणि सावित्री महिला सक्षमीकरण केंद्र या ठिकाणी आहे. शिवणकाम, दुग्ध व्यवसाय, प्लंबिंग, वेल्डिंग, वायरमनपासून ते भरतकामापर्यंत व्यावसायिक शिक्षणाची सुविधा येथे आहे. डाळ, पापड, मसाले, पनीर निर्मितीची साधने येथे आहेत. डॉ. एपीजे अब्दुल कलाम शेती उद्योग प्रशिक्षक केंद्र आकारास आले आहे.

मान्यवरांच्या भेटीने गजबजते स्नेहवन : राज्याच्या काना कोपऱ्यातून स्नेहवनला भेट देण्यासाठी व मुलांशी गप्पा मारण्यासाठी दानशूर मंडळी तसेच मान्यवर येथे येतात. यात ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. रघुनाथ माशेलकर, 'यशदा'चे अतिरिक्त महासंचालक शेखर गायकवाड, सनदी अधिकारी किरण गित्ते, डॉ. तात्याराव लहाने, डॉ. अशोक कुकडे, रमेश पतंगे, डॉ. प्रकाश आमटे आणि मंदाताई आमटे यांचा यात समावेश आहे.

पर्यावरणपूरक जीवनशैलीचा आदर्श : पर्यावरणपूरक जीवन शैलीचा आदर्श देशमाने दांपत्याने मुलांना घालून दिला आहे. स्नेहवन पूर्णतः सौरऊर्जेवर चालवले जाते. त्यासाठी ७० किलोवॉट ऊर्जेचा प्रकल्प उभारला आहे. त्याचबरोबर स्वयंपाकघर किंवा परिसरातील ओला कचरा संकलित करून बायोगॅस प्रकल्पही साकारला आहे.

पत्ता – स्नेहवन (आळंदीपासून ८ किलोमीटर) वडगाव घेनंद रोडवर, कोयाळी फाटा, कोयाळी फॉरेस्ट, कोयाळी तर्फे चाकण, ता. खेड, जि. पुणे ४१०५०१.

***

आळंदीतला सेवादूत - अशोक देशमाने

शेकडो मुलांचे भवितव्य घडवण्यासाठी पूर्णतः समर्पित जीवन जगणारे आळंदी येथील अशोक देशमाने यांचे कार्यविचार हे समाजकार्य करणाऱ्यांसाठी आदर्श. त्या जीवनकार्याचा मागोवा घेणारा हा लेख...



'स्नेहवन'चे संस्थापक आळंदीच्या अशोक देशमाने यांचे नाव सामाजिक क्षेत्रात तसे सुपरिचित. 'आयटी' क्षेत्रातली गलेलठ्ठ पगाराची नोकरी सोडून ते पूर्णवेळ आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांच्या मुलांसाठी शोषित, वंचित, पीडित कुटुंबांच्या मुलांच्या उत्थानासाठी काम करतात. नुकतेच त्यांच्या संस्थेमार्फत आळंदी येथे २०० मुलांसाठी वसतिगृह बांधण्यात आले. मान्यवरांच्या हस्ते या वसतिगृहाचे उद्घाटनही झाले. या सगळ्या कामात सज्जनशक्ती मनापासून त्यांच्या पाठीशी उभी राहिली. डॉ. रवींद्र कुलकर्णी यांनी आळंदी येथील जमीन अशोक यांना सामाजिक कार्यासाठी दानही दिली. आत्महत्या केलेल्या शेतकऱ्यांची मूल, भटके विमुक्त गरीब कुटुंबातली मूल, कर्जबाजारी किंवा परिस्थितीमुळे मुलांचे शिक्षण न करू शकणाऱ्या एकल मातेच्या मुलांचे आज अशोक देशमाने पालक आहेत.

देशमाने कुटुंब मूळचे परभणीतल्या मानवत गावचे वारकरी कुटुंब. त्यांची आई सत्यभामा आणि वडील बाबाराव आयुष्यभर शेतात राबले. पण, हातात कधीच काही पडले नाही. शेतजमीन होती. पण पाऊस कमी, पाण्याचे दुर्भिक्ष. अशावेळी चार वर्षे शेतात काहीच पिकत नसे. त्या काळात गावातल्या सगळ्याच शेतकऱ्यांच्या घरी चुली थंडावलेल्या असायच्या. लहान पोरंबाळं भूकभूक करत रडत निपचित पडून जात. ते दुःख बघून आयाबाया घरात खंगून जात, तर बापे माणूस कामाच्या शोधात घराबाहेर पडे. पण, तरीही दुःख कमी होत नसे. एका वर्षी पाऊस झाला. देशमाने कुटुंबाने शेतात ऊस लावला. कधी नव्हे, पीक-पाणी तरारेल, पैसे हातात येतील, अशी अपेक्षा होती. पण, त्या वर्षी उसाचे उत्पन्न सगळीकडे विक्रमी झाले. उसाला भाव मिळालाच नाही. अगदी तोटा सहन करून विकू म्हणायचे तरीही कुणी ऊस विकत घेतला नाही. तेव्हा अशोक यांनी पाहिले होते की, तोच ऊस उभ्या शेतात जाळावा लागला होता.

असो. याही परिस्थितीमध्ये अशोक शाळेत जाऊ लागले. बाबाराव खताच्या पिशवीला शिवून त्यातून शाळेची बॅग तयार करत. ती बॅग घेऊन अशोक शाळेत जात. कधी पुस्तक नाहीत, तर कधी पेन्सिल-पेन नाही. अशोक दहावीला गेले. पण, दहावीचे परीक्षा शुल्क भरायलाही पैसे नव्हते. अशोक यांच्या शिक्षकाने ३५ रु. परीक्षा शुल्क भरले. पुढे ते परभणी शहरात महाविद्यालयात जाऊ लागले. काम करून ते शिकू लागले. शिक्षण घ्यायचेच ही जिद्द होती. कारण, त्यांच्यावर स्वामी विवेकानंदांच्या विचारांचा प्रभाव होता. स्वामी विवेकानंदांचे आत्मचरित्र तसेच त्यांचे चरित्र घडवताना हे पुस्तक अशोक यांच्या वाचनात आले. त्याच काळात बाबा आमटे यांच्या कार्याचा परिचयही त्यांना झाला. आपल्यापेक्षाही खडतर परिस्थितीमध्ये समाजबांधव जगतात. आपण समाजाचे देणे लागतो. आपण परिस्थितीवर मात करून पुढे जायला हवे आणि समाजालाही सोबत घ्यायला हवे, असा विचार त्यांच्या मनात ठाम झाला. त्यामुळेच त्यांनी पुढे प्रतिकूल परिस्थितीमध्ये कॉम्प्युटर सायन्समध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. पुढे त्यांनी 'रेडहॅक सर्टिफाईड इंजिनिअर', 'रेड हॅट सर्टिफाईड सिस्टीम ॲडमिन' हे दोन कोर्स हैदराबाद येथून पूर्ण केले. शिक्षण पूर्ण करून ते पुण्यात नोकरीसाठी आले. त्यांना चांगली नोकरीही लागली. या सगळ्या काळात ते सुट्टीच्या दिवशी शहरातील काही सेवावस्त्यांमध्ये मुलांना शिकवण्यासाठी जात, आर्थिक सहकार्य करत.

२०१३ ते २०१५ या काळात परभणी जिल्ह्यात दुष्काळ पडला. परभणीच्या मानवत गावात एका शेतकऱ्याने आत्महत्या केली. अशोक यांचे आई-बाबा मानवतमध्ये गावी राहायचे. गावात दुष्काळाने पाण्याचे दुर्भिक्ष होते. त्यामुळे सगळ्याच गोष्टींची वानवा. आई-बाबांना पुण्याला आणण्यासाठी ते गावी गेले. पण, त्यांच्या आई-बाबांनी सांगितले की, काही काळाने पुण्यात येऊ, आता नाही. त्यामुळे ते एकटेच पुण्याच्या दिशेने निघाले. एसटीमध्ये बसले, तर गावातले अनेक जण लेकराबाळां सकट गाव सोडून पुण्याला निघालेले. त्यांच्यासोबत लहान मूलं होती, किशोरवयीन मूलंही होती. त्यांच्या शाळेचे काय? विचारल्यावर गावकरी म्हणत होते, ''काय करणार ती शिकून. जगू वाचू हेच मोठं,'' असे त्यांचे उत्तर. अशोक यांच्या मनावर आघात करून गेले. त्यातूनच पुढे दुष्काळाने होरपळलेल्या शेतकरी कुटुंबातील मुलांच्या शिक्षणासाठी काम करण्याचे अशोक यांनी ठरवले. पुण्यात त्यांना फ्लॅट घ्यायचा होता. पण, आता मुलांच्या शिक्षणाचा खर्च करायचा म्हणून त्यांनी दोन छोट्या खोल्या घेतल्या. तिथे सुरुवातीला १८ मूलं होती. आई-बाबा म्हणाले की, ''आता कुठे आपली परिस्थिती सुधारली, तू हे काय करतोस.'' पण, अशोक यांनी त्यांनाही समजावले. पुढे मुलांची संख्या वाढतच गेली. या मुलांकडे पूर्णवेळ लक्ष देणे गरजेचे होते. त्यामुळे अशोक यांनी चक्क नोकरी सोडली. आता समाजाची सज्जनशक्ती त्यांच्या पाठीशी सक्षमपणे उभी राहिली. पुढे विवाह करतानाही त्यांनी नियोजित वधूला सांगितले की, ही सगळी आपली मूलं आहेत, हे समजूनच माझ्यासोबत संसार करावा लागेल. तिने होकार दिला आणि अशोक यांचा संसार सुरू झाला. अशोक म्हणतात, ''शिक्षणाच्या आणि उत्तम भवितव्याच्या संधीपासून कुणीही वंचित राहू नये, यासाठी मी आजन्म काम करणार आहे.'' अशोक यांच्यासारखे लोक समाजाचे दिशादर्शक असतात, हे नक्की. अशोक देशमाने म्हणजे आळंदीतले सेवादूतच!

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!

समाजनभी हे चमचम करती ज्ञानाचे तारे... शिष्यवृत्ती देऊन कुंभश्री ज्ञानदान यज्ञात सहभागी व्हा!

'कुंभश्री' तर्फे शिष्यवृत्ती ज्ञानदान यज्ञात सर्वांनी सहभागी व्हावे अशी विनंती. आपणा सर्वांच्या सहकार्याशिवाय ते पूर्ण होणार नाही म्हणूनच आम्ही आपणास कळकळीचे आवाहन करतो की सर्वांनी जास्तीत जास्त शिष्यवृत्ती निधी पाठवून द्यावा. ''उंची ज्यांची आभाळाएवढी, त्यांनी मधे-मधे खाली यावे, जमिनीवर बसलेल्या आपल्या विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन उंचच उंच न्यावे, उंचच उंच न्यावे'' कुंभश्री संपादक संजय राजे व कुंभश्री परिवार


अनुष्का कुंभार सुवर्ण पदक
ज्यु.ॲशियन चॅम्पीयनशिप


भक्ति बोरुडे MPSC
अन्न पुरवठा निरक्षक


श्वेता कुंभार MPSC
सहाय्यक अभियंता


प्रणिता कुंभार MPSC
सहाय्यक अभियंता


डॉ.प्रिती जोर्वेकर Phd.
Computer Enngineering


डॉ.धनश्री बाबुराव कुंभार
M.D. Gold Medal


डॉ.वृषाली किरण कुंभार
MPTH


उत्कर्ष संतोष पाषाणकर
MSC Engg. Management

HIGHER


डॉ.नेहा रमेश सोनवणे
M.B.B.S.


डॉ.संपदा मोहन जगताप
M.B.B.S.


डॉ.दिक्षा विजय मोरे
M.B.B.S.


डॉ.प्रणव अरुण कुंभार
M.B.B.S.


डॉ.विशाल नारायण हिंगरुपे
M.B.B.S.


प्रज्वल संजीव कुंभार
B.E. 8.53CGPA


कौस्तुभ लक्ष्मीकांत शिंदे
C.A.


अक्षर ज्ञानेश्वर काळे
C.A.

HSC


संस्कार अमित कुंभार
JEEE 96.58 percentile


अपुर्वा रमेश बहाळस्कर
93.50% Science


सिद्धि सुरेन्द्र वाडकर
88.33% Science


कार्तिकी धनंजय गाडेकर
85.17% Commerce


पार्थ रविंद्र पवार
85% Science


मोनिका देविदास गारे
83.50% Commerce


वेदांत योगेश राऊत
82.83% Science


भाग्येश शरद चित्ते
82.33% Science

HSC


ज्ञानेश्वरी प्रकाश जोंधळे
80.50% Science


शताक्षी सातीश राऊत
80.33% Science


ईशान राजेश जोर्वेकर
80.00% Commerce


सार्थक सुदाम जाधव
79.67% Science


आर्या अजित जाधव
79.33% Science


नीशा विष्णु मास्कर
79.28 Commerce


अदित्य अनिल कुंभार
79.00% Science


शुभम भानुदास मोरे
78.50% Science

HSC


गायत्री रतन कदम
78.17% Science


वैभवी सदानंद कुंभार
76.17% Science


अवधुत अनिल पवार
77.00% Science


याज्ञीका भानुदास गोऱ्हेकर
77.00% Science


आराध्य तानाजी कुंभार
75.00% Sci. CET 95.82


युक्ता हेमंत कुंभार
75.00% Sci. CET 97.44


अद्वैत सचिन कुंभार
72.00% Sci.CET 98.06


हर्षाली प्रभाकर जगदाळे
70.83% Science

HSC

अदित्य कांतिलाल सोनवणे
70.67% Science

वेदांत योगेश बाहीकर
70.20% Science

श्रावणी प्रकाश जाधव
69.33% Science

संचिता सुनिल रसाळ
69.17% Science

मयुर ऊत्तम जाधव
67.17% Science

कुणाल भरत शिरसाठ
65.83% Commerce

समिक्षा शैलेश भागवत
62.50% Science

अक्षय अनिल भालेराव
उत्तेजनार्थ आर्टस्

समाजनभी हे चमचम करती ज्ञानाचे तारे...

SSC


स्वयंम् संदिप कुंभार
100%


गायत्री अशोक कुंभार
98.4% CBSE


वेदिका गणेश चव्हाण
97.60% CBSE


वरद ज्ञानेश्वर शिर्के
96.80%


श्रेयस सुधीर वाघ
96.80%


मधुरा दिगंबर नरवणकर
94.80%


जिजाऊ रविकुमार जगताप
94.20% CBSE


स्पंदन श्रीकांत बोरसे
94.20%

SSC


प्रणवी जगदीश विश्वास
94.00%


गणेश कैलास भालेराव
93.80%


अंकिता उत्तम जाधव
93.60%


चेतन कांतिलाल सोनवणे
92.80%


प्रांजल गोरख रसाळ
92.20%


रुतुजा सागर कुंभार
92.00%


शुभंकर राहुल कुंभार
91.00%


स्वरा विशाल सोनवणे
90.80%

SSC


पुष्कराज रमेश कुंभार
90.40% CBSC


सन्याम वसंत काशीकर
89.60%


अमेय सुरेश शिर्के
89.40%


प्राजली नितीन रेणावकर
89.20%


तन्वी नितीन कुंभार
88.40%


तेजस प्रविण जाधव
86.00%


समृद्धि उमेश सोनवणे
85.20%


प्रणव सुदाम श्रीमंदीलकर
83.60% CBSE

SSC


जिज्ञासा सोमनाथ सोमाशे
83.80%


आर्याही मिलींद शेटकर
83.60% CISCE


ओम प्रकाश जाधव
83.20%


तेजश्री भिमराज उपाध्ये
82.20%


यश मंगेश सोनवणे
82.00%


प्रज्ञा राजेंद्र चव्हाण
81.80%


श्रेया निलेश घोडनदीकर
81.00%


यश कृष्णा बागुल
80.40%

SSC


अथर्व बंडू राऊत
80.20%


समिक्षा विजय गोरे
80.00%


व्यंकटेश किशार जोंधाळे
78.00%


कुबेर अरविंद क्षीरसागर
77.00%


प्रथमेश संतोष जोर्वेकर
76.40%


अनुष्का संतोष रसाळ
76.40%


कार्तीक अविनाश वाघ
74.20%


सौरभ शशिकांत जाधव
73.00%

श्रृती सुनिल सुर्यवंशी
88.80%

वेदांती सुनिल वाकचौरे
70.00% SSC

पियुष शरद जोंधळे
70.00% SSC

वैष्णवी शरद जोंधळे
कमर्शीयल पायलट कोर्स साठी पोलंडला निवड

शितल विजय भालेराव
इंटेरीयर डिजायनिंग डिप्लोमा

खुशी बालासाहेब सेलुकर
सैनिक स्कुल प्रवेश परीक्षेत भारतात तृतिय क्रमांक

ध्रुव किरण जगताप
इयत्ता ५वी शिष्यवृत्ति

प्रणाली अनिल कुंभार
फार्म डी.

क्षणचित्रे



जालना : प्रा.लक्ष्मण हाके व नवनाथजी वाघमारे यांच्या उपोषणाला पाठिंबा पत्र देताना संजय गाते, संजय जोरले व मान्यवर.



पुणेः ॲड.मंगेश ससाणे यांच्या उपोषणास सामाजिक संस्थेचा पाठींबा देताना डावीकडून हेमंत खटावकर, मोगरवाडीकर, ज्ञानेश्वर व सुधिर चांदेकर, वसंत घोडनदीकर/सुपेकर, दिपक शिरवळकर व मान्यवर



पुणेः ॲड.मंगेश ससाणे यांच्या उपोषणास समाज विकास संस्थेचा पाठींबा देताना संगापुरे, गोरगिले, श्रीमंदीलकर, लक्ष्मण कुंभार व पदाधिकारी



चाळीसगाव : भाजपा ओबीसी मोर्च्याचे प्रदेशाध्यक्ष संजयराव गाते यांच्या सत्कार प्रसंगी उपस्थित उत्तमराव काळे, राजू चौधरी, करनकाळ सर, नाना काळे, राजन चित्ते व मान्यवर



पुणे : हिंजवडी येथील पाषाणकर बंधू निर्मित दत्तमंदिर प्राणप्रतिष्ठा सोहळ्यास उपस्थित राष्ट्रवादी काँग्रेसचे वरीष्ठ नेते संजय प्रजापती (दिल्ली) यांचा सत्कार हस्ते महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष सतीशजी कुंकळेकर समवेत मच्छिंद्र कुंभार सर, आण्णासाहेब कुंभार, हनुमंतराव कुंभार, सतीशदादा दरेकर, सुरेशराव हिरे व अनंत कुंभार.



ह.भ.प. जगन्नाथ महाराज कुंभार गुरुजी यांच्या अमृत महोत्सवी वर्षानिमित्त सत्कार करताना विकास संस्थेचे कार्याध्यक्ष बळवंत कुंभार समवेत प्रदेशाध्यक्ष शामशेठराजे, सुरेशराव कुंभार, नथुशेठ कुंभार व मान्यवर



पुणे : नवनिर्वाचित खासदार मुरलीधर मोहोळ यांचा सत्कार करताना दिपक उर्फ आबा माऊली शिरवळकर व मान्यवर



आर्यन दिगंबर घोडनदीकर याची दहा मिटर पिस्तुल शुटींग विभागीय स्पर्धेसाठी निवड. आर्यन हा उद्योजक दिलीप घोडनदीकर यांचा नातू आहे



रवि चंद्रकांत गोरे B.Com.
9423872792



सौ.संगीता र. गोरे



अजिंक्य र. गोरे
M.E.(Design)



राहुल र.गोरे
B.Sc.(Micro)

बिल्डींग मटेरीयल सप्लायर

प्लॉट नं.१६, रत्नत्रया कॉलीनी, लक्ष्मीमाता मंदिरा जवळ, कुपवाड रोड, सांगली ४१६ ४१६

क्षणचित्रे





मुंबई : उपमुख्यमंत्री देवेद्रजी फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर महाराष्ट्र विधानसभा प्रभारी भुपेंद्रजी यादव यांच्या उपस्थितीमध्ये कुंभार समाजातील प्रमुख पदाधिकाऱ्यांची बैठक संपन्न. या बैठकीत भाषण करताना लोणावळा नगरपालिकेच्या नगराध्यक्षा सुरेखाताई जाधव समवेत भुपेंद्रजी यादव, अतुलजी सावे, हंसराज आहीर, सतिशदादा दरेकर, संजय गाते, संजय जोर्ले, नंदकुमार कुंभार, रसीका खेडकर. या प्रसंगी प्रभारी भुपेंद्रजी यादव यांचा भव्य सत्कार करण्यात आला, कुंभार समाजाच्या सर्व मागण्या मान्य करु असे अश्वासन या वेळी त्यांनी दिले.



श्री क्षेत्रतेर : सासवड येथील सुरेशराव कुंभार यांनी विकास संस्थेच्या गोरोबा काका पायी दिंडी सोहळ्यास चांदीच्या पादूका भेट दिल्या या प्रसंगी उपस्थित किसन शेठ काळे, गुलाब महाराज कुंभार व मान्यवर



करमाळा : आदर्श केंद्र प्रमुख मा.महादेवराव यादव सेवा निवृत्त झाल्याबद्दल सपत्नीक भव्य सत्कार संपन्न. समवेत सौ.सुनिता महादेव यादव व मान्यवर



पुणे: साहित्यिक भारत ससाणे यांना साहीत्य अकादमीचा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल अभिनंदन करताना मराठी प्रकाशक संघाचे संस्थापक शरद गोगटे, अध्यक्ष राजू बर्वे, सचिव पराग लोणकर, संचालक संजय राजे व मान्यवर



पुणे : सोमाटणे फाटा येथे कुंभार मिसळच्या संचालीका सौ. अनुराधा सोमनाथ कुंभार यांचा सत्कार करताना शामशेठ राजे, संजय राजे, अशोक कुंभार, प्रकाश कुंभार सुरेशराव कुंभार, मनोहर सोमवंशी, जालिंदर कुंभार व मान्यवर



नाशिक : डॉ.दिक्षा विजय मोरे एम.बी.बी.एस. उत्तीर्ण झाल्याबद्दल सत्कार हस्ते संजय राजे समवेत सौ.स्नेहल विजय मोरे, विजय तुळशीराम मोरे अनिल शिर्के व राजेंद्र तुळशीराम मोरे



पुणे : एस.व्ही.सी.बँक निगडीच्या व्यवस्थापक पदी नियुक्ती झाल्याबद्दल सुहास भानुदास कुंभार यांचा सत्कार करताना संजय राजे समवेत वैद्य.गौरी शिर्के डॉ.निलेश शिर्के व चि.अवीक शिर्के



कराड : राहुल लक्ष्मण कुंभार यांची सारस्वत बँकेच्या व्यवस्थापक पदी नियुक्ती झाल्याबद्दल सत्कार करताना संजय राजे, अभिजीत कुंभार व सत्यभामा कुंभार.



पुणे : वाकड येथील बांधकाम उद्योजक शामसुंदर वर्मा यांचे हस्ते कुंभश्री संचालीका बीना राजे व संपादक संजय राजे यांचा सत्कार



हिंजवडी येथे चितळे बंधू मिठाई शाखेचे संचालक महेश व अमित पाषाणकर यांचा सत्कार करताना संजय व बीना राजे समवेत वासंती व सौ.तृप्ती पाषाणकर

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



सातारा : डॉ.नागोराव कुंभार यांना डॉ.बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार प्रदान हस्ते शरदचंद्रजी पवार समवेत श्रीनिवास पाटील, सौ.नागोराव कुंभार, भगवानराव वैराट व मान्यवर



कोल्हापुर : कुमावत को.ऑप.क्रे.सोसायटीच्या अध्यक्ष पदी मारुतराव कातवरे, उपध्यक्षपदी दिपराज माजगावकर यांची निवड, अभिनंदन करताना प्रकाश कुंभार, सतिश बाचणीकर व संचालक



पुणे : जीवन विठ्ठल सोमावंशी यांची लायन्स क्लब ऑफ भोजापूर गोल्डच्या अध्यक्ष पदी निवड समवेत संदीप माहेश्वरी, गिरीष मालपानी, डॉ.शंकर गायकवाड, मुरलीधर साठे, मुकुंद आवटे व मान्यवर



कोल्हापुर : इस्पुर्ली येथे नव विवाहित डॉ.जयश्री मुरुडकर व डॉ.केदार कुंभार यांचे अभिनंदन करताना संजय राजे, अनिल शिर्के समवेत डॉ.उषादेवी कुंभार



इचलकरंजी : उद्योजक अमितशेठ व सोनाली कुंभार यांना श्रीयांश पुत्ररत्न प्राप्त झाल्याबद्दल अभिनंदन करताना संजय राजे, अनिल शिर्के समवेत सौ.लता व बळवंतराव कुंभार.



इचलकरंजी : उद्योजक राजन कुंभार व सौ.शुभांगी कुंभार यांना नुतन गृह प्रवेशा निमित्त शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे व अनिल शिर्के



नाशिक : घोटी येथे अखिल भारतीय कुंभार समाज विकास संस्थेचे नव निर्वाचित प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत यांचा सत्कार करताना संजय राजे, रामचंद्र कुंभार समवेत डॉ. अतुल भागवत



पुणे : आर्किटेक्ट रोहित परींचेकर यांच्या नुतन कार्यालयात वाढदिवसानिमित्त शुभेच्छा देताना संजय राजे, समवेत किशोर परींचेकर, सौ मिनल रोहित परींचेकर व सौ.अनिता किशोर परींचेकर



निपाणी : श्री.गाडगीळ ज्वेलर्सचे संचालक राजेंद्र कुंभार यांना शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे, अनिल शिर्के समवेत अभिषेक कुंभार व रोहन कुंभार



कराड : तळबीडकर वडेवाले उद्योग समुहास कुंभश्री संपादक संजय राजे व अनिल शिर्के यांची सदिच्छा भेट, समवेत संचालक प्रशांत कुंभार, विलास कुंभार. येथे रोज सुमारे १०० किलो मिरच्यांच्या मसाला तयार केला जातो व सर्व शाखांना पुरवला जातो.



निपाणी : यमगर्णी ते पंढरपूर पायी वारीमध्ये हरवलेले श्वान महाराज पंढरपूर वरुन पाच दिवसानंतर घरी आल्याबद्दल समाजमाध्यमावर सर्वत्र कौतुक होत होते त्या श्वान महाराजांची सदीच्छा भेट प्रसंगी कुंभश्री संपादक संजय राजे, महादेव कुंभार, ज्ञानदेव कुंभार, विमल कुंभार व मान्यवर



पुणे : सुप्रसिद्ध आर्किटेक्ट मंगेश शिवाजी सोनवणे यांच्या नूतन कार्यालयात त्यांना शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे.

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



अहमदनगर : इंजिनिअर अभय राजे यांचा सत्कार करताना खासदार निलेशराव लंके समवेत इंजिनीयर असोशिएनचे पदाधिकारी व मान्यवर



कराड : बिदर(कर्नाटक) मतदार संघाचे खासदार केंद्रीय मंत्री भगवंतराव खुबा यांचा सत्कार करताना डॉ.संजय कुंभार, कॅप्टन सौरभ राजे, चंदेकांत साठे मल्लीकार्जून कुंभार, शांताराम कुंभार, चंद्रकांत कुंभार व मान्यवर



फलटण : केंद्रीय मंत्री भगवंतराव खुबा यांचा सत्कार करताना विकास संस्थेचे कार्याध्यक्ष बळवंतराव कुंभार, मल्लीकार्जून कुंभार, राजेंद्र कुंभार, सचिन कुंभार, सुहास कुंभार व मान्यवर



दिल्ली : हॉटेल ताज मध्ये नोबेल कास्ट कॉम्प कंपनीला सी.एन.बी.सी तर्फे उत्कृष्ठ निर्यात पुरस्कार प्रदान. पुरस्कार स्विकारताना संचालक अक्षय नितिन भागवत



अमेरीका : नोबेल कास्ट कॉम्प प्रायवेट लिमिटेड कंपनीचा अमेरीकेत विस्तार, चार्ल्सटन(यु.एस.ए) येथील नवीन कार्यालयात आणि वेअर हाऊस समोर उपस्थित कंपनीचे सी.ई.ओ. नितीन भागवत, संचालक अक्षय नितीन भागवत, सौ.उर्मी अक्षय भागवत व मान्यवर



जळगाव : डॉ.प्रमोद पांडुरंग माहुलीकर यांना जीवन गौरव पुरस्कार प्रदान करताना प्रा.व्ही.एल.माहेश्वरी समवेत प्रा.एस.टी.इंगळे, प्रा.पी.पी.वडगावकर, अशोक शिंपी व मान्यवर



जुन्नर : उद्योजक सुनील शेठ जाधव यांची रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीच्या अध्यक्षपदी निवड झाल्याबद्दल सत्कार करताना सुरेशराव कोते, रोटरीचे पदाधिकारी व मान्यवर



पुणे : डॉ.प्रिती प्रकाश जोर्वेकर(डॉ.प्रिती ऋषिकेश कुंभार) यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापिठातर्फे डॉक्टरेट पदवी प्रदान. या प्रसंगी उपस्थित कुंभार व जोर्वेकर परिवार



शिर्डी : युवा नेते संदिप सोनवणे यांना प्रहार रत्न पुरस्कार सुप्रसिद्ध सीने अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते प्रदान समवेत उपस्थित मान्यवर



पुणे : वामन भालेराव यांची लायन्स क्लब ऑफ ईकोफ्रेंडसच्या सेक्रेटरी पदी निवड समवेत उद्योगपती गिरीष मालपाणी व मान्यवर



आळेफाटा : उद्योजक राजेंद्र जाधव यांच्य प्रयत्नातून रोटरी क्लब आळेफाटा यांच्या वतीने बाळासाहेब जाधव महाविद्यालयात मुलींसाठी स्वच्छतागृहाचे निर्माण करण्यात आले.

कुंभश्री परिवारांस व सर्व समाज बांधवांस आमच्या हार्दिक शुभेच्छा...!



नाशिक : ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते जगदीश मोरे यांना समाजभुषण पुरस्कार प्रदान हस्ते शदरभाऊ आहेर, समवेत रमाकांत क्षीरसागर, सतीशदादा दरेकर, सोमनाथशेठ सोनावणे व मान्यवर



नाशिक : धुळे जिल्हाध्यक्ष सुरेशराव बहाळकर यांना समाजभुषण पुरस्कार प्रदान हस्ते शदरभाऊ आहेर समवेत सोमनाथशेठ सोनावणे, रमाकांत क्षीरसागर, ज्ञानेश्वर सोमवंशी व मान्यवर



धुळे : धुळे जिल्हा गुणगौरव सोहळ्यामध्ये विद्यार्थ्यांचा सत्कार करताना रमाकांत क्षिरसागर समवेत भगवानराव सुर्यवंशी, सुरेश बहाळकर, सुभाषशेठ कुंभार, सोमनाथ शेठ सोनवणे व मान्यवर



चाळीसगाव : आमदार दादा चव्हाण यांनी कुंभार समाजाला १५ लाखाची देणगी दिल्याबद्दल सत्कार करताना उत्तमराव काळे, प्रा.हिरामण करणकाळ, राजेंद्र चित्ते व मान्यवर



पुणे : नेहरुनगर पिंपरी येथील गोरोबाकाका मंदिरामध्ये विद्यार्थी गुणगौरव सोहळा संपन्न मान्यवरांसमवेत गुणी विद्यार्थी व संस्थापदाधिकारी



बेंगलोर : पुण्यातील उद्योजक व सुप्रसिद्ध कन्नड कवी शरनु कुंभार यांना कन्नड साहित्य परीषदे तर्फे राष्ट्र कवी कुवेंम्पू पुरस्कार प्रदान



कोल्हापुर : कुंभार समाजाचे नेते कै.के.आर.आकोळकर यांच्या पत्नी कॉम्रेड पार्वती आकोळकर यांना आदर्श माता पुरस्कार प्रदान हस्ते देवदत्त परुळेकर व मान्यवर



नाशिक : कै.पुष्पा उत्तमराव भालेराव यांच्या वर्ष श्राद्धानिमित्त श्रद्धांजली अर्पण. या प्रसंगी ॲड चेतन भालेराव यांनी विविध संस्थांना देणग्या दिल्या.



पुणे : डोणजे गावच्या सरपंच रोहिणी कुंभार यांचा सत्कार करताना वाव्हळ, भागवत, सविता कुंभार, रोहिणी कुंभार, कल्पना कुंभार व रसाळ सर



पुणे : सावित्रीबाई फुले पुणे विद्यपिठात हॅमर थ्रो स्पर्धेत अनुज अरुण डेंगळे यास सुवर्ण पदक



कोपरगाव : येथे गोरोबाकाका पुण्यतिथी निमित्त भव्य शोभा यात्रा संपन्न संत महंता सोबत नेते विनायकराव गायकवाड समवेत बंधु भगिनी



हरीयाणा : कुम्हार प्रजापती समाज के नेता रणवीर सिंह गंगवा, कॅबिनेट मंत्री बननेपर हार्दिक अभिनंदन

'कुंभश्री' रूपी कल्पवृक्ष हा, लावूनिया आण्णा गेले ।
कल्पवृक्ष हा बहरूनी आला, याल का हो बघायाला ।।



प्रेरणास्थान
संस्थापक कै. बाबुराव साळवी उर्फ आण्णा



संपादक : संजय पांडुरंग राजे
संचालिका : सौ. बीना संजय राजे

तुफानातील दिवे आम्ही, तुफानातील दिवे ।
तुफान वारा, पाऊसधारा मुळी न आम्हां शिवे ।
जळू परंतू धरती उजळू, प्रकाश समाजास असाच देऊ ।
असेच सांगणे, सुखी नांदणे हेच आम्हाला हवे ।
तुफानातील दिवे, आम्ही तुफानातील दिवे ।।

राष्ट्रीय पत्रिका

कुंभश्री मासिक

कुंभश्रीरूपी दिवा प्रत्येकाचे घरी हवाच
(कुंभार समाजाच्या प्रगतीचा आलेख म्हणजे कुंभश्री)

कुंभश्री वधु-वर सूचक मंडळ सून मनपसंत हवी, जावई मनपसंत हवा,
चला तर मग आम्हाकडे आपल्या मुला-मुलींची नोंदणी करा आणि वेबसाईट मार्गदर्शन मिळवा

Visit us at www.kumbhashree.com ● kumbhshree@gmail.com

कुंभश्री मोबाईल ॲप(Kumbhashree APP) Playstore वरुन डाऊनलोड करुन सुविधांचा लाभ घ्या.

कुंभश्री वधुवर नोंदणी + द्वैवार्षिक सभासद	रु. १,०००.००
कुंभश्री पंचवार्षिक सभासद	रु. १,१००.००
कुंभश्री दशवार्षिक सभासद	रु. २,१००.००
कुंभश्री आजीव सभासद (२५ वर्षे)	रु. ५,०००.००

कुंभश्रीची अतुलनिय सामाजिक कामगिरी

* कुंभश्री विद्यार्थी दत्तक योजनेअंतर्गत अनेक अत्यंत हुषार गरीब विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी बीन व्याजी शिष्यवृत्ती
* कुंभश्री शिष्यवृत्ती योजनेअंतर्गत इ १०वी, १२ वीच्या हजारो गरीब व हुशार मुलांना लाखो रुपयांची शिष्यवृत्ती प्रदान.
* कुंभश्री वधूवर सूचक मंडळातर्फे आत्तापर्यंत ७००० पेक्षा जास्त विवाहयोग जुळून आले.
* कुंभश्रीमध्ये गुणगौरव, अभिनंदन आणि सर्व बातम्या विनामुल्य प्रकाशित केल्या जातात.
* कुंभार समाजातील लेखक, कवि, कार्यकर्ते व सर्वांसाठी हक्काचे मौल्यवान व्यासपिठ.
* सुमारे ७००० वर्गणीदार दोन लक्ष जाणता वाचक वर्ग.
* कुंभश्रीमधील जाहिरातदारांची व्यवसाय वृध्दी होते तसेच त्यांचे समाजातील स्थान व प्रतिष्ठा उंचावते.

आजच आपली वर्गणी किंवा जाहिरात नजिकच्या कुंभश्री प्रतिनिधीकडे जमा करा अथवा खालील बँकेत जमा करावी.
बँकेचे नाव : बँक ऑफ महाराष्ट्र शाखा : निगडी, पुणे
सेव्हींग खाते क्रमांक : 68027587242
ISFC CODE : MAHB0000601 नांव : संजय पांडुरंग राजे
रक्कम बँकेत जमा केल्यानंतर जमेची पावती व आपला पत्ता ९५०३४२८९८७ या क्रमांकावर त्वरीत व्हॉट्सअप करावी

PhonePe ACCEPTED HERE
PAY ON 9822838169

कुंभश्री मासिक

संजय राजे, संकल्प अपार्टमेंट, फ्लॅट नं.३, दुसरा मजला, सेक्टर नं.२७ अ, प्लॉट नं.६७, लोकमान्य हॉस्पिटल जवळ, प्राधिकरण निगडी, पुणे ४११०४४
मोबा. ९८२२८३८१६९ / ९५०३४२८९८७
मोबाईल वरुन संपर्क करुन येणे.

गोष्ट तीन मित्रांची आणि 'रोहित्र'ची !



वेगवेगळ्या शहरांतून आलेल्या त्या तिघांची एकदा भेट झाली आणि ही भेट त्यांच्या आयुष्याला कलाटणी देणारी ठरली. बोलता बोलता त्यांच्या लक्षात आले की, आपले ध्येय, स्वप्न एकच आहे. या समान ध्येयाच्या धाग्याने या तिघांना एकत्र आणले आणि निर्माण झाला एक ऊर्जावान उद्योग. विद्युत रोहित्र तयार करणाऱ्या रोहित्र इंडिया प्रा.लि. ने आज देशातच नव्हे, तर जगातही आपला ठसा उमटवला आहे. त्यांची ही यशोगाथा... - प्रसाद घारे



कौस्तुभ तावरे, सचिन हिवरकर आणि शुभम सेठी

संगमनेर (अहमदनगर), छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) आणि पुणे या महाराष्ट्रातील तीन वेगवेगळ्या जिल्ह्यांतील कौस्तुभ तावरे, शुभम सेठी आणि सचिन हिवरकर या तीन उच्चशिक्षित तरुणांची काही वर्षांपूर्वी उद्योगनगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पुण्यनगरीत भेट झाली. या भेटीत त्यांना लक्षात आले, की प्रत्येकाचे उद्दिष्ट आणि आवड एकच आहे, ती म्हणजे स्वतःचा उद्योग–व्यवसाय सुरू करायचा. मग स्वतंत्र उद्योग, व्यवसाय करण्यापेक्षा तिघांच्या शिक्षणाचा, अनुभवाचा आणि कौशल्याचा उपयोग करून तिघांनी एकत्र येऊन एक उद्योग सुरू करावा, अशी कल्पना त्यांच्या मनात आली आणि ही कल्पना हवेत विरून न जाता प्रत्यक्ष कृतीत आली. यातूनच 'पॉवर टू यू' (Power to you) हे ब्रीदवाक्य असणाऱ्या रोहित्र इंडिया प्रा. लि. (आरआयपीएल) या कंपनीची ९ एप्रिल २०१८ या दिवशी मुहूर्तमेढ रोवली गेली. ही कंपनी आज विविध आकाराचे, क्षमतेचे ट्रान्स्फॉर्मर तयार करण्यात केवळ महाराष्ट्रातच नव्हे, तर गोवा, कर्नाटक, गुजरातसह देशातही आघाडीवर आहे. केनिया, दक्षिण आफ्रिका, अशा देशात देखील 'रोहित्र'चे ट्रान्स्फॉर्मर निर्यात करण्यात आले आहेत. विविध प्रकारचे उद्योग–व्यवसाय समूह, रुग्णालये, मॉल, शाळा, महाविद्यालय, विद्यापीठ, हॉटेल, निवासी गृहप्रकल्प, व्यावसायिक इमारती, मंदिर, पुणे महानगरपालिका, म्हाडा, महावितरण, पुणे मेट्रो अशा अनेक ठिकाणी या कंपनीचे ट्रान्स्फॉर्मर ३६५ दिवस अहोरात्र कार्यरत आहेत. यामुळेच असंख्य नागरिकांना अखंडित वीजपुरवठा होत असतो.

पर्यावरणस्नेही ट्रान्स्फॉर्मर

नॅचरल इस्टर ऑइल या पर्यावरणस्नेही, आधुनिक ऑइलवर चालणारे ट्रान्स्फॉर्मर तयार करणारी देशातील पहिली कंपनी होण्याचा बहुमान 'रोहित्र'ला मिळाला आहे. ट्रान्स्फॉर्मर उद्योगाला आवश्यक असणारे 'आयएसओ', 'एनएबीसीबी', 'आयसीएस' ही दर्जा प्रमाणपत्रे; तसेच महावितरण (MSEDCL) 'बीआयएस ११८०' हे ऊर्जा कार्यक्षम (Energy Efficient) ट्रान्स्फॉर्मर तयार करण्यासाठी आवश्यक असणारे प्रमाणपत्र 'रोहित्र'कडे आहे. शिरुर तालुक्यातील सणसवाडी येथे सुमारे वीस हजार चौरस फूट जागेवर कंपनीचा आधुनिक यंत्रसामग्रीने युक्त उत्पादन प्रकल्प आहे. महाराष्ट्राबरोबरच गोवा, गुजरात, कर्नाटक या राज्यात 'रोहित्र'च्या ट्रान्स्फॉर्मरला चांगली मागणी आहे.

संगमनेर ते पुणे व्हाया संभाजीनगर

अहमदनगरमधील संगमनेर या गावातील कौस्तुभ तावरे यांचे बारावीपर्यंतचे शिक्षण हे संगमनेरमध्येच झाले. इचलकरंजी आणि बंगळूर येथे टेक्स्टाईल इंजिनिअरिंगचे शिक्षण आणि विविध कंपन्यांमध्ये नोकरीचा अनुभव त्यांनी घेतला. नोकरी सोडली आणि २००७ मध्ये ते पुण्यात आले. त्यांचे मेव्हणे आणि सासरे हे इलेक्ट्रिक व्यवसायात कार्यरत होते. यामुळे या क्षेत्राची त्यांना आवड निर्माण झाली. भविष्यात याच क्षेत्रात काम करण्याचे त्यांनी ठरवले. या तीन मित्रांमधील शुभम सेठी हे सगळ्यात लहान. छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) हे त्यांचे जन्मगांव. येथेच त्यांचे शालेय आणि महाविद्यालयीन शिक्षण झाले. बी. कॉम.ची



रोहित्र इंडिया प्रा. लि. ने बनविलेले ट्रान्स्फॉर्मर

पदवी घेतल्यानंतर ते पुण्यात आले. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून त्यांनी मार्केटिंग या विषयात एमबीए ही पदवी घेतली. घरात व्यवसायाची पार्श्वभूमी होती. त्यामुळेच त्यांची पावले आपोआपच उद्योगव्यवसायाच्या दिशेला पडली. इलेक्ट्रिकल क्षेत्रात काही काळ त्यांनी अनुभव घेतल्यावर त्यांनी स्वतःचा उद्योग व्यवसाय करण्याचे ठरवले. अस्सल पुणेकर असणाऱ्या सचिन हिवरकर यांचे शालेय शिक्षण मॉडर्न हायस्कूलमध्ये झाले. वाडिया कॉलेजमधून अकरावी, बारावी झाल्यावर त्यांनी बीई इलेक्ट्रिकल ही पदवी संपादित केली. त्याचे वडिल इलेक्ट्रिकल व्यवसायात कार्यरत असल्याने त्यांनी प्रथम कृत्रिका इलेक्ट्रिकल या नावाने ट्रेडिंग क्षेत्रात काम करायला सुरुवात केली. या क्षेत्रातील अनुभव घेतला. आज 'रोहित्र' बरोबरच हा व्यवसाय देखील ते सांभाळतात.

'रोहित्र'ची मुहूर्तमेढ

ट्रान्स्फॉर्मरला संस्कृत आणि मराठी भाषेत 'रोहित्र' असे म्हणतात. या तरुण मराठी उच्चशिक्षित उद्योजकांनी आपल्या कंपनीचे नाव रोहित्र इंडिया प्रा. लि. ठेवले, याचे मला कौतुक वाटले. या नावाबद्दल मी त्यांचे अभिनंदन देखील केले. मराठी माणूस आणि उद्योग हे समीकरण जुळत नाही, हा आता इतिहास झाला. नव्या पिढीने हे समीकरण बदलायला सुरुवात केली आहे. याची अनेक उदाहरणे आपल्या आजूबाजूला बघायला मिळतील. भविष्यात विविध प्रकारच्या उद्योग–व्यवसायात मराठी तरुणाईचा टक्का लक्षणीय वाढलेला दिसेल. हे तिघे तर महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या जिल्ह्यातील, तरीसुद्धा स्वतंत्र उद्योग उभारण्यासाठी एकत्र आले आणि त्यांनी आज 'रोहित्र' नावाने ट्रान्स्फॉर्मरनिर्मिती करायला सुरुवात केली, ही नक्कीच कौतुकास्पद गोष्ट म्हणायला हवी. या क्षेत्रात अनेक बड्या देशी–परदेशी कंपन्या आहेत. यांच्याशी स्पर्धा करत या क्षेत्रात आपला ब्रँड निर्माण करण्याचे अवघड काम 'रोहित्र'ने लीलया पार पाडले आहे.

या कंपनीमध्ये सध्या साधारणपणे ५० लोक काम करतात. त्यापैकी २० ते २५ कर्मचारी तांत्रिकदृष्ट्या कुशल (Skilled), तर बाकी अकुशल (Semi skilled) आहेत. महावितरण (MSEDCL) या राज्य



रोहित्र इंडिया प्रा. लि. ला मिळालेले विविध पुरस्कार.

सरकारच्या कंपनीबरोबर त्यांना नियमितपणे काम करावे लागते. याबरोबरच बांधकाम व्यावसायिक, महानगरपालिका, मेट्रो प्रकल्प, शाळा, महाविद्यालय, रुग्णालये आणि खासगी कंपन्यांबरोबर त्यांचे काम चालू असते. ग्राहकांच्या गरजेनुसार वेगवेगळ्या क्षमतेचे ट्रान्स्फॉर्मर तयार करुन देण्यात त्यांची खासियत आहे.

'रोहित्र' मध्ये टेक्निकल (तांत्रिक) बाजू प्रामुख्याने इलेक्ट्रिकल इंजिनिअर असणारे सचिन हिवरकर बघतात. कौस्तुभ तावरे मार्केटिंग बघतात, तर शुभम सेठी ऑपरेशन पाहतात. प्रत्येक जण आपले कौशल्य आणि अनुभव लक्षात घेऊन जबाबदारी घेत असल्याने 'रोहित्र'चे दैनंदिन कामकाज व्यवस्थित पार पडते.

विजेची वाढती मागणी

विजेशिवाय, ऊर्जेशिवाय आपण कोणीच जगू शकत नाही. दहा–पंधरा मिनिटे वीजपुरवठा खंडित झाला, तर आपण बेचैन होतो. प्रत्येकच उद्योग–व्यवसायासाठी वीज ही अत्यावश्यक असते. ३६५ दिवस अखंड वीज उपलब्ध असणे ही काळाची गरज झाली आहे. भारताला जगातील पाचव्या मोठ्या अर्थव्यवस्थेवरुन तिसऱ्या क्रमांकावर जायचे असेल, तर वीज या दोन शब्दांना अतिशय महत्त्व असणार आहे. ट्रान्स्फॉर्मर हा वीज वितरणाचा जणू आत्माच. आपल्या घरापर्यंत किंवा उद्योग–व्यवसायासाठी अखंडित वीज पुरवठा होतो, त्याचे कारण हा ट्रान्स्फॉर्मर.

'रोहित्र'चा ट्रान्स्फॉर्मर हा 'मेड इन इंडिया' असा शिक्का असणारा आहे. गुणवत्ता, दर्जा आणि विश्वासार्हता या कसोटीवर तो खरा उतरणारा आहे म्हणूनच आजपर्यंत विविध आकाराचे आणि क्षमतेचे दोन ते तीन हजार ट्रान्स्फॉर्मर 'रोहित्र'ने तयार केले आहेत. ते देशाच्या कानाकोपऱ्यात; तसेच परदेशात कार्यरत आहेत, असे कौस्तुभ तावरे, सचिन हिवरकर आणि शुभम सेठी यांनी सांगितले.

सचिन हिवरकर म्हणाले, ''इलेक्ट्रिकल, मेकॅनिकल किंवा सिव्हिल इंजिनिअर झालेले तरुण त्यांच्या क्षेत्रात काम करण्याऐवजी आयटी क्षेत्रात जातात, असे सर्वसाधारण चित्र आहे. त्यामुळे आमच्या क्षेत्रात इलेक्ट्रिकल इंजिनिअरला बरीच मागणी आहे. या क्षेत्रात फिल्डवर काम करावे लागते. हात काळे करावे लागतात. आयटीपेक्षा या क्षेत्रात थोडे कष्ट अधिक करावे लागतात; पण संधी मोठी आहे. त्यामुळेच इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग पूर्ण केलेल्या विद्यार्थ्यांनी ट्रान्स्फॉर्मर क्षेत्रात जरूर यावे आणि स्वतंत्र उद्योग व्यवसाय सुरू करावा.''

सामाजिक जबाबदारीचे भान

कोविड महासाथीच्या काळात टिकून राहणे ही सगळ्याच उद्योग-व्यवसायासाठी अतिशय अवघड परीक्षा होती. याच काळात सामाजिक जबाबदारी म्हणून 'रोहित्र'ने पुणे जिल्ह्यातील ऑक्सिजन प्रकल्पासाठी आवश्यक असणारे तीन ट्रान्स्फॉर्मर उभारण्यासाठी सहकार्य केले. काही शाळांना संगणक आणि पाण्यासाठी टाक्या दिल्या. आगामी काळातदेखील समाजासाठी काही उपक्रम राबविण्याचा आमचा विचार आहे, असे कौस्तुभ तावरे यांनी सांगितले.

महाराष्ट्राच्या तीन जिल्ह्यांतून आलेले हे तीन उच्चशिक्षित मराठी तरुण एकत्र येऊन ट्रान्स्फॉर्मरच्या क्षेत्रात कमी काळात आपला वेगळा ठसा उमटवितात, ही गोष्टच वाखाणण्याजोगी आहे. त्यांच्या आजपर्यंतच्या कामगिरीसाठी त्यांना विविध संस्था, संघटना आणि कंपन्यांनी पुरस्कार, सन्मानपत्र देऊन गौरवले आहे. 'रोहित्र'ला या क्षेत्राशी निगडित विद्युत सल्लागार, विद्युत कंत्राटदार, ईपीसी, एमईपी, पीएमसी सल्लागार यांचे योगदान अतिशय मोलाचे ठरले आहे. त्यामुळेच या क्षेत्रात अग्रेसर असणाऱ्या मित्रमंडळींना, सर्व क्षेत्रातील आमच्या मान्यवर ग्राहकांना अभिवादन करणे आणि त्यांचे आभार मानणे आम्ही आमचे भाग्य समजतो, असे हे तिघे नम्रपणे सांगत होते. या तिघांची ही यशकथा महाराष्ट्रातील नव्हे, तर देशभरातील तरुणाईसाठी प्रेरणादायक आहे.

महाराष्ट्राची विजेची मागणी वाढणार

महाराष्ट्राला सध्या साधारणपणे २३ ते २४ हजार मेगावॉट वीज लागते. वाढते उद्योग-व्यवसाय, शहरीकरण आणि विस्तारणारी बाजारपेठ यांचा विचार करता नजीकच्या काळात यामध्ये पाच ते दहा हजार मेगावॉटची भर पडणार आहे. याचाच अर्थ ट्रान्स्फॉर्मर उद्योगाला सुगीचे दिवस येणार आहेत. इलेक्ट्रिकल इंजिनिअरिंग करून आयटीमध्ये जाण्यापेक्षा तरुणाईने या क्षेत्रात यावे. त्यांना स्वतःचा उद्योग-व्यवसाय सुरू करायला खूप मोठी संधी उपलब्ध होणार आहे, असे सचिन हिवरकर सांगत होते. या क्षेत्रात सध्या सुमारे ५० कंपन्या कार्यरत आहेत, त्यापैकी १४ पुण्यात, २० मुंबईत, तर उर्वरित नाशिक, औरंगाबाद आणि नागपूर येथे आहेत. या क्षेत्रातील महाराष्ट्रातील उलाढाल जवळपास १५०० ते २००० कोटी रुपये इतकी आहे. सौरऊर्जेला देखील चांगले भवितव्य आहे. केंद्र आणि राज्य सरकारने सौरऊर्जेला प्रोत्साहन देण्यासाठी अनेक योजना आखल्या आहेत, याचा लाभ आपण घ्यायला हवा. 'रोहित्र'ला तीन वर्षांत शंभर कोटींच्या उलाढालीचा टप्पा पार करायचा आहे. यासाठी आमचे प्रयत्न सुरू आहेत, असा विश्वास या तिघांनी व्यक्त केला.

***

पियुष ओलीवकर यांच्या खडतर प्रयत्नांना यश.



जेव्हा प्रत्येकजण IIT किंवा NIT मध्ये प्रवेश घेण्यासाठी JEE परीक्षेची तयारी करतो, तेव्हा भारतातील निवड प्रमाण १% पेक्षा कमी असल्यामुळे बहुतेक विद्यार्थी ते साध्य करू शकत नाहीत. तथापि, असे काही विद्यार्थी आहेत जे आपली स्वप्ने सोडत नाहीत आणि पियुष ओलिवकर त्यापैकीच एक आहे. पियुषने झुलेलाल इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजीमध्ये मेकॅनिकल इंजिनीअरिंगचे शिक्षण घेतले, सर्व काही त्याच्या ध्येयांवर लक्ष ठेवून होते. खाजगी महाविद्यालयातून येऊनही आणि विविध अडचणींचा सामना करूनही त्यांनी उच्च शिक्षणासाठी आयआयटीमध्ये प्रवेश मिळवण्यासाठी सातत्याने प्रयत्न केले. त्याचा दृढनिश्चय, संयम आणि चिकाटी अखेर फळाला आली आणि त्याने आयआयटी जम्मूमध्ये मेकॅनिकल इंजिनीअरिंगच्या उपशाखा ''थर्मल अँड फ्लुइड सिस्टम्स'' मध्ये प्रवेश मिळवला. पण तो एवढ्यावरच थांबला नाही. पीयूषने आपले प्रयत्न चालू ठेवले आणि आयआयटी जम्मू आणि आयआयटी दिल्लीच्या सहयोगी संस्थांमध्ये संशोधन कार्यात गुंतले. बिनधास्त, त्यांनी कायम ठेवले आणि आयआयटी बॉम्बे, आयआयटी दिल्ली आणि आयआयटी मद्रासकडून पीएचडी प्रवेशाच्या ऑफर यशस्वीपणे मिळवल्या. आज ते आयआयटी मद्रास आणि कर्टिन विद्यापीठ, ऑस्ट्रेलिया येथे अप्लाइड मेकॅनिक्स विभागात संयुक्त पीएचडी करत आहेत. हा प्रेरणादायी प्रवास दाखवून देतो की जो विद्यार्थी आपल्या स्वप्नाशी सातत्य राखतो तो एका टप्प्यावर अपयशाचा सामना करूनही ध्येय निश्चित करू शकतो आणि शेवटी आपल्या आकांक्षा पूर्ण करू शकतो. मराठी शाळेतून आलेला पियूष हा स्वतःला हुशार नाही तर मेहनती समझतो. नम्र पार्श्वभूमी असूनही एखाद्याच्या सातत्य आणि स्पष्ट दृष्टीच्या तुलनेत प्रतिभा कशी फिकी पडते याचे हे उत्तम उदाहरण आहे.

***

नोबेल कंपनीच्या डायरेक्टर कै. सौ. विद्या भागवत यांचे कार्य कर्तृत्व

पुणे : सुप्रसिद्ध उद्योगपती नोबेल कास्ट कॉम्प. प्रायव्हेट लिमिटेड चे मॅनेजिंग डायरेक्टर मा. नितीनजी भागवत यांच्या सुविद्य पत्नी सौ. विद्या नितीन भागवत यांचे अल्पशा आजाराने दिनांक २८/१/२४ रोजी वयाच्या ५७ व्या वर्षी दुःखद निधन झाले.

सौ. विद्याताई यांच्या पश्चात पती नितीनराव, मुलगा अक्षय, सून सौ. उर्मी, मुलगी सौ. प्रेरणा, जावई निखिल भालेराव, नातवंडे कु. रेवा व चि. निल असा परिवार आहे.



असा जन्म लाभावा देहाचा चंदन व्हावा ।
गंध संपला तरी सुगंध दरवळत राहावा ।।

वरील उक्ती प्रमाणे जीवन व्यतीत करणाऱ्या विद्या नितीन भागवत यांच्यावर अत्यंत शोकाकुल वातावरणात रविवार दिनांक २८ जानेवारी २०२४ रोजी अंत्यसंस्कार करण्यात आले.

कुणाचाही विश्वास न बसणारी ही एक घटना अचानक घडली. विद्या मॅडम यांनी २०१० साली कंपनी जॉईन केलेली आहे. त्यांनी गेले पंधरा वर्ष नोबेल कास्ट कॉम प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे डायरेक्टर म्हणून काम पहिले होते. विद्या मॅडम यांनी नोबल परिवारात घालवलेली पंधरा वर्ष सर्वांच्या कायम स्मरणात राहतील. त्यांच्या जाण्याने जी पोकळी निर्माण झालेली आहे ती कधीही भरून निघणार नाही. त्यांची उणीव त्यांच्या कुटुंबियांना तसेच नोबेल परिवारातील सर्वांनाच कायम भासत राहील. त्यांचा हसरा चेहरा नेहमी डोळ्यासमोर राहील, त्यांनी कधीही कुणाचे मन दुखवले नाही सर्वांशी प्रेमाने बोलून सर्वांची मने जिंकली होती. कुठल्याही संकट काळी नेहमी खंबीरपणे पाठीशी उभे राहणारे नेतृत्व म्हणून मॅडमचे नाव घ्यावेसे वाटते.

मॅडमचा स्वभाव अतिशय कडक आणि तितकाच प्रेमळ देखील होता. मॅडम कंपनीचे सर्व अकाउंट आणि एडमिन डिपार्टमेंट पहात होत्या. अकाउंट डिपार्टमेंट पाहत असताना मॅडम अतिशय बारकाईने त्यामध्ये लक्ष देत असे. मॅडम अकाउंट डिपार्टमेंट पाहत असताना आम्हाला त्याची खूप मदत होत असे कारण मॅडम त्यामधील बारीक बारीक पॉईंट नोटीस करत असत आणि आम्हाला सांगत असत त्यामुळे त्याचा आम्हाला मोठ्या प्रमाणात फायदा झाला.

मॅडम आपल्या स्टाफ मधील अधिकारी आणि कर्मचारी यांची देखील खूप काळजी घेत असत. जर एखाद्या वेळेस कुणाला काही आर्थिक मदत लागली तर मॅडम लगेच त्यांची मदत करत असत. तसेच आमची कंपनी भोसरी एमआयडीसी मध्ये असल्यामुळे तिथे आम्हाला स्थनिक व दादागिरी प्रवृत्ती असलेले अनेक लोक येत परंतु, मॅडम असल्यावर ते कंपनीमध्ये येत नसत असा त्यांचा दरारा होता. मॅडमच्या कडक स्वभावामुळे तिथे आम्हाला भरपूर मदत होत असे. तसेच सर काही कामानिमित्त बाहेरगावी गेले असताना मॅडम संपूर्ण कंपनीची जबाबदारी संभाळत असत, असा हा खूप मोठा आधार त्यावेळी सरांना भेटत असे, परंतु आता ही खूप मोठी पोकळी मॅडमच्या जाण्याने तयार झालेली आहे.

कंपनी २००५ मध्ये सुरू झाली तेव्हापासून कंपनीने अनेक संकटे बघितली आहे त्यामध्ये मंदी असेल, कामगार प्रॉब्लेम असतील, स्थानिक लोकांचा त्रास असेल. कोरोना सारख्या जीवघेण्या अनेक संकटांना मॅडम, सर आणि कंपनी सामोरे गेले आहे आणि त्यातून मार्ग काढले आहेत. तसेच मॅडमच्या जाण्याने एक मोठे संकट आमच्या समोर उभे राहिले आहे त्या संकटाला देखील सर आणि कंपनी हे असेच सामोरे जातील आणि यातून आम्ही मार्ग काढू. यामध्ये आम्ही सर्व कर्मचारी सरांच्या पाठीमागे खंबीरपणे उभे राहून सरांना पाठिंबा देऊ.

नोबल परिवाराचे नेतृत्व हरपले आहे. आपण भागवत परिवारावर, नातेवाईक, सगे सोयरे आणि नोबल परिवारावर जी शोककळा पसरली आहे, त्यातून सावरण्याची परमेश्वर त्यांना शक्ती देवो. विद्या भागवत मॅडम यांना भावपूर्ण श्रद्धांजली तसेच त्यांच्या आत्म्यास परमेश्वर चरणी चीर शांती आणि सद्गती लाभो अशी सद्गुरू चरणी विनम्र प्रार्थना.

– निलेश डांगे, प्रोडक्शन मॅनेजर
नोबेल कास्ट कंपनी प्रायव्हेट लिमिटेड, भोसरी, पुणे.

***

शिल्पकार सीमा खेडकर-शिर्के



पुणे : छत्रपती शिवाजी महाराजांची जयंती. शिवरायांचे शिल्प साकारताना एका शिल्पकाराची भावना काय असेल? प्रसिद्ध शिल्पकार बी. आर. खेडकर यांच्या कन्या व महिला शिल्पकार सीमा खेडकर शिर्के यांनी शिवरायांना केलेला हा मानाचा शब्दमुजरा.

प्रत्येक कलाकाराला, मग तो चित्रकार, शिल्पकार किंवा अन्य कोणत्याही क्षेत्रातील कलाकार असो; महाराष्ट्राचे दैवत छत्रपती शिवाजी महाराजांची कलाकृती एकदा तरी आपल्या हातूने साकार व्हावी, असे मनापासून वाटत असते. मलाही अनेक कलाकृती साकारताना श्री छत्रपती शिवाजी महाराजांचे भव्य-दिव्य शिल्प माझ्या हातून घडावे, असे मनोमन वाटायचे. माझे वडील आणि गुरू स्वर्गीय शिल्पकार बी. आर. खेडकर ऊर्फ आप्पासाहेब यांच्या मार्गदर्शनाखाली अनेक पुतळ्यांचे मातीकाम करायचे भाग्य मला मिळाले.

योगायोग : आप्पासाहेबांप्रमाणेच आपल्या हातूनही छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ शिल्प तयार व्हावे, असे मनापासून वाटत होते. आश्चर्य म्हणजे दोन दिवसांतच आंध्र प्रदेशमधून एक शिष्टमंडळ आप्पासाहेबांना भेटायला आले. त्यांना दोन पायांवर उभा असलेला आठ फुटांचा पंचधातूंचा अश्वारूढ छत्रपती शिवाजी महाराजांचा पुतळा हवा होता. आप्पासाहेबांनी त्यांच्या समोरच मला विचारले, ''काय गं, करणार का हे काम?'' मी आनंदाने होकार दिला. 'आपण आहातच की मला मार्गदर्शन करायला,' असे मी त्यांना सांगितले.

प्रत्यक्ष अनुभव : आमिंचरची (लोखंडी सांगाडा) मापे घेऊन ते तयार केले. मातीकामाला सुरुवात करण्यापूर्वी क्षणभर डोळे मिटून महाराजांचा इतिहास डोळ्यासमोर आणला. शत्रूला गनिमी काव्याने उद्ध्वस्त करणारा माझा राजा, हर हर महादेवच्या गर्जनेत शत्रूवर चाल करून जाणारा राजा, हे सर्व स्मरण करताना सांगाड्यावर माती कधी चढत गेली, हे समजलेच नाही. छत्रपती शिवाजी महाराजांनी एकेक गड, किल्ला घेत घेत राज्य विस्तारत नेले. हे चित्र डोळ्यासमोर आले. त्याप्रमाणे मी शिल्पाला आकार देत गेले. महाराजांची धीरगंभीर अन् शांत मुद्रा मला महाराजांच्या चेहऱ्यामध्ये साकारायची होती. माझे शस्त्र म्हणजे लाकडी व तारेच्या कोरण्या. त्याच्या साह्याने मातीला आकार देत होते. यातूनच धीरगंभीर, करारी तरी प्रसन्न, शांत भाव असलेले शिल्प साकार झाले.

मानसिक ऊर्जा : छत्रपती शिवाजी महाराजांच्या अश्वारूढ आणि अर्धपुतळ्यांचे मातीकाम करताना वेगळीच ऊर्जा आणि उत्साह अंगात संचारतो. छत्रपती शिवाजी महाराजांची शिकवण, त्यांचा नीटनेटकेपणा, शिस्त, आत्मनिर्भयता, साहस या गोष्टींचा लहानपणापासून झालेला परिणाम मनात आत खोलवर कुठेतरी रुजलेला आहे. शिवरायांचे एखादे शिल्प करायला घेतले की, आपली छातीही अभिमानाने फुगून येते. विशेष करून छत्रपती महाराजांच्या चेहऱ्याचे काम करताना एकाग्र होऊन करावे लागते.

शिल्प साकारण्याआधी : दहा वर्षांच्या तपश्चर्येनंतर पहिल्यांदाच मी माझे स्वतःचे काम साकारणार होते आणि तेही छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ शिल्प. गणपती बाप्पाचा आणि आप्पासाहेबांचा आशीर्वाद घेऊन मार्च २०१४ मध्ये 'शिवछत्रपतींच्या शिल्पाच्या कामाला सुरुवात केली. त्या आधी सारसबाग, पेशवे उद्यान, जिथे घोडे दिसतील तिथे त्यांचे फोटो काढणे, स्केचेस करणे याला सुरुवात केली. दोन पायांवरील घोड्यांचे मसल, शिरा, शेपटी कोणत्या 'पोझीशन'ला असणार, असा सर्व अभ्यास केला.

योद्धयाची मुद्रा : शिरपेच करताना त्यांचे. कोकणापासून तंजावर पर्यंतचे विस्तारलेले राज्य माझ्या डोळ्यासमोर दिसत होते. हे काम करत असताना मला वेळोवेळी माझ्या गुरूंचे मार्गदर्शन मिळत गेले. आप्पासाहेबांच्या मार्गदर्शनाखाली दोन महिन्यांतच छत्रपती शिवाजी महाराजांचे अश्वारूढ शिल्प मातीकामामध्ये पूर्ण झाले. ज्यांची 'ऑर्डर' होती, त्यांना पाहायला बोलावले. त्यावेळेस त्यांनी महाराज प्रत्यक्ष युद्धावर निघाले आहेत, असे आम्हाला भासते आहे, अशी प्रतिक्रिया दिली. महाराजांचे हे शिल्प आंध्र प्रदेशात तंजावर या परिसरात २०१५ पासून दिमाखात उभे आहे.

प्रत्येकवेळी मिळाला तोच अनुभव : प्रत्येक वेळी छत्रपतींचे नवीन शिल्प साकारताना याच भावना मनात दाटून येतात. माझे गुरु आणि वडील यांच्या कृपेने छत्रपती शिवाजी महाराजांचे बारा फुटांपर्यंतचे अश्वारूढ आणि अर्धपुतळे माझ्या हातून साकार झाले आहेत. कर्नाटक मध्ये विजापूर, भालकी, बिदर, गुलबर्गा, व्होनाली आदी ठिकाणी; तसेच कोल्हापूर येथे मुरगूड नगरपालिका आणि पुणे परिसरात पुणे शहर आणि कान्हेवाडी (चाकण) येथे मी केलेली महाराजांची शिल्पकामे दिमाखात उभी आहेत. आप्पासाहेबांनी साकारलेल्या छत्रपतींच्या भव्य-दिव्य अश्वारूढ १८ फूट उंचीच्या शिल्पाची तीन फुटांची प्रतिकृती अमेरिकेतील एका शिवप्रेमीसाठी सध्या मी करत आहे. कर्ताकरविता तो आहे, मी फक्त निमित्तमात्र आहे...

बालक पालक प्रबोधनावर अविरत झटणाऱ्या अनसूयाताई कुंभार

– चैताली शिंदे



शिक्षिका म्हणजे केवळ शाळेतच मुलांना घडवू शकते, या संकल्पनेच्या बाहेर जाऊन अनसूया कुंभार यांनी आजपर्यंत अनेक विद्यार्थी घडविले. घरातील स्त्री शिकली की संपूर्ण घर शिकते, अशा विचारांच्या अनसूया ताई. यामुळे त्या निवृत्तीनंतरही विद्यादानाचे पवित्र कार्य करत आहेत. माणूस म्हणून जन्माला आलो आहोत म्हणजे आपण समाजाचे काही देणं लागतो, या विचारांच्या अनसूया ताई आहेत. पिढ्यान् पिढ्यांचे दारिद्र्य आणि ज्ञानापासून वंचित असलेल्या महापालिकेच्या गरीब विद्यार्थ्यांसाठी ताई झटल्या. दरवर्षी शाळेत विविध स्पर्धा, प्रकल्प यातून बालकांच्या शैक्षणिक तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी ताईंनी क्षण नि क्षण वेचला.

साने गुरुजींचा मानवतेचा ध्यास आपल्या जीवनात उतरवणाऱ्या ७२ वर्षांच्या अनसूयाताई कुंभार यांचे मूळगाव सांगवड, ता. पाटण, जि. सातारा. मुंबई महानगरपालिकेच्या विविध शाळांमध्ये कार्यरत राहून ३० वर्षांच्या सेवेनंतर निवृत्त झालेल्या या शिक्षिकेने खरंतर आपले शिक्षण अत्यंत हालाखीच्या परिस्थितीत पूर्ण केले आहे. शिक्षिका म्हणजे केवळ शाळेतच मुलांना घडवू शकते, या संकल्पनेच्या बाहेर जाऊन अनसूया कुंभार यांनी आजपर्यंत अनेक विद्यार्थी घडविले. घरातील स्त्री शिकली की संपूर्ण घर शिकते, अशा विचारांच्या अनसूयाताई. यामुळे त्या निवृत्तीनंतरही विद्यादानाचे पवित्र कार्य करत आहेत.

माणूस म्हणून जन्माला आलो आहोत म्हणजे आपण समाजाचे काही देणं लागतो, या विचारांच्या अनसूयाताई आहेत. घरच्या प्रतिकूल परिस्थितीवर मात करत स्वतःचे अस्तित्व सिद्ध करणाऱ्या ताईंनी कायमच इतरांचाही तेवढाच विचार केला आहे. विशेष करून, विद्यार्थ्यांचा आणि गोरगरीबांचा. पिढ्यान् पिढ्यांचे दारिद्र्य आणि ज्ञानापासून वंचित असलेल्या महापालिकेच्या गरीब विद्यार्थ्यांसाठी ताई झटल्या. स्वतःची हौसमौज बाजूला सारत गणवेशदान, धान्यवाटप, बालक–पालक मार्गदर्शन शिबिरेही ताईंनी भरवली. कित्येकदा तर पदरचे पैसे खर्च करून अन्य स्वरुपातही मदतीचा हात दिला. दरवर्षी शाळेत विविध स्पर्धा, प्रकल्प यातून बालकांच्या शैक्षणिक तसेच व्यक्तिमत्व विकासासाठी ताईंनी क्षण नि क्षण वेचला. याचेच फलित म्हणून ताईंना आंतरराष्ट्रीय कास्प प्लॅन संस्थेतर्फे आदर्श शिक्षक पुरस्कार, २००७ साली प्रतिभाताई पाटील यांच्या हस्ते राष्ट्रीय शिक्षक पुरस्कार, बृहन्मुंबई महापौर शिक्षक गौरव पुरस्कार, राष्ट्रीय फेलोशिप – मुंबई, साहित्यरत्न पुरस्कार, आदर्श शिक्षक पुरस्कार–आंबेडकर अकादमी, मुंबई असे अनेक गौरव प्राप्त झाले आहेत.

अनसूया ताईंनी आजवर काटकसर करत गरजूंना मदतीचा हातही दिला आहे. या कार्यात त्यांना त्याच्या पतीची अर्थात व्यंकटराव कुंभार यांची मोलाची साथ लाभली, असे त्या आवर्जून सांगतात. दोघा पती–पत्नींना समाजकार्याची अतिशय आवड असल्याने पती व्यंकटराव कुंभार यांच्यासह विक्रोळी येथे मुंबईतील पहिले कुंभार समाज संस्था कुंभकार सहकारी पतपेढी निर्माण केली. समाजऋण फेडण्याचा यथाशक्ती प्रयत्न त्यांनी केला. अनसूयाताईंनी बाबा आमटे यांच्या आनंदवन आश्रमात राहून अनाथांना, अंधाना शिक्षण दिले तसेच 'आनंदवनीचे आनंद यात्री' हे पुस्तकही लिहिले. अनसूयाताई साहित्यिक लेखिका, कवयित्री म्हणूनही अग्रेसर राहिल्या आहेत.

वाचनातून मी घडले, असे त्या सांगतात. लिखाणातून, पुस्तक वाचनातून माणूस कुठल्या कुठे जाऊ शकतो, याच विचारांच्या अनसूयाताई आहेत. विशेष करून मुले तसेच पालकांच्या प्रबोधनासाठी, संस्कारांसाठी त्यांनी आतापर्यंत जवळपास ३९ पुस्तकांचे लिखाण केले आहे. ताईंनी लिहिलेल्या किशोर नाटिका व समर्थांचे विचारधन या पुस्तकांची भारत सरकारच्या 'ऑपरेशन ब्लॅकबोर्ड'साठी निवड झाली आहे. ताईंनी आजवर अनेक काव्यसंग्रह, लेख, मासिक, वृत्तपत्रातून लिखाण केले आहे. विशेष करून ताईंनी समाजातील रूढी, परंपरा आणि अंधश्रद्धा निर्मुलनावर लिखाण केले आहे. लहानग्यांना उपयुक्त ठरेल असा अडीच हजार सुविचारांच्या 'संस्कार दीप' या पुस्तकाला महाराष्ट्रातून दांडगा प्रतिसाद मिळाला आहे. ताईंच्या उत्कृष्ट लिखाणांची दखल घेत त्यांना दूरदर्शनवर कविता वाचन, आकाश–वाणीवर कथाकथन करण्याची संधी मिळाली आहे.

बालकांसोबत पालकांचे प्रबोधन होणे हे काळाची गरज आहे, या विचारांच्या अनसूयाताई आहेत. ताईंनी आजवर बालक–पालक प्रबोधनासह तरुणांना प्रेरित करतील असे नरेंद्र दाभोलकर, बाबा आमटे, देशसेवक अण्णा हजारे, नेल्सन मंडेला, महात्मा गांधी, डॉ. अब्दुल कलाम अशी चरित्रे त्यांनी लिहिली आहेत. यासह श्री समर्थ–विचारधान, संस्कारक्षम बोधकथा, संतांच्या सांगाती, १०५ शास्त्रज्ञ, मंत्र नव्या युगाचा, साहित्यिकांच्या सहवासात, चांदण्याची वरात, आज काय घडले अशी अनेक पुस्तके लिहिली आहेत. तसेच, ताईंनी विविध सामाजिक कार्यक्रमातून महिला सक्षमीकरणासाठी मार्गदर्शन केले आहे. पतीच्या निधनांतर स्त्रीने आभूषणांचा त्याग करू नये, स्त्री तितक्याच सक्षमतेने समाजात जगू शकते, उघडपणे वावरू शकते, आजची स्त्री आत्मनिर्भर असायलाच हवी, असा विचार त्या मांडत आहेत.

अनसूयाताई समाजासाठी, भारताचे भविष्य घडविणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी, गोर–गरीबांसाठी क्षण–क्षण वेचत आहेत. आज त्या झोपडपट्टीमध्ये राहणाऱ्या होतकरू विद्यार्थ्यांचा शोध घेत समाजात वावरण्यासाठी किमान लेखन, वाचनापासून असे विद्यार्थी वंचित राहू नये या उद्देशाने मोफत शिक्षण देत आहेत. जुन्या कपड्यांचे संकलन करून अनेक संस्थाना पुरवत आहेत. यासह प्लास्टिकचा भविष्यातील धोका लक्षात घेत पर्यावरण रक्षणाचे कार्य आपल्या लहान नातवासह करत आहेत. ताईंच्या या कार्यामुळे समाजात काहीतरी बदल घडत आहे, एवढं मात्र नक्की...

***

कर्तव्यनिष्ठ, कर्मनिष्ठ विद्यार्थी प्रिय शिक्षक - प्रा. प्रभाकर बाभुळगांवकर

प्रा. मारोती बुद्रुक पाटील



आयुष्यात भावनेपेक्षा कर्तव्य किती मोठे असते नुसती स्वप्न पाहून चालत नाही तर ती स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी आयुष्याची राख रांगोळी करावी लागते. तेव्हाच आपल्या आयुष्याला बहरलेली बाग पाहायला मिळते.

स्वप्न हे असे साधन आहे जे आपल्याला जीवन जगण्याचे उद्दिष्ट देते. स्वप्न हे एका ध्येयासारखे असते आणि कोणत्याही ध्येयाशिवाय आपण आपल्या आयुष्यात काहीही बनू शकत नाही. महात्मा गांधी महाविद्यालयाच्या जडणघडणीत आणि पॅटर्नमध्ये सरांचा मोलाचा वाटा आहे. ध्येयवादाने झपाटलेले कर्तव्यदक्ष, कर्मनिष्ठ, विद्यार्थी प्रिय, विलोभनीय सुसंस्कारित सर्व गुणसंपन्न, सर्वांना सोबत घेऊन चालणारे, चुकलेल्या विद्यार्थ्यांनाही वाट दाखवणारे प्रसंगी कठोर तर कधी माया ममतेने समजून सांगणारे. माणुसकीचा ओतप्रोत झरा असणारे गुरु या पदाला साजेस काम करून आपल्या पाऊलखुणा महात्मा गांधी महाविद्यालयाच्या प्रांगणामध्ये ठेवलेले आदर्श गुरुजी म्हणजे प्रा. प्रभाकर बाभुळगांवकर. विद्यार्थी प्रिय, शिस्तप्रिय, आणि विद्यार्थी चुकला तर त्याची खरडपट्टी काढणारे, त्याला जीवनाचा खरा मार्ग सांगणारे व चुकलेल्या वाटेवरच्या अनेक विद्यार्थ्यांना योग्य मार्गदर्शन करून त्यांना उच्च ध्येय पदापर्यंत पोहोचवणारे खरंच आपण गुरुजीच आहात. होतात आणि पुढे राहतीलच. विद्यार्थी तुमचे ऋण कधीच फेडू शकणार नाहीत माझा मुलगा दीपक मारुती बुद्रुक यालाही आपण अनमोल सल्ला देऊन त्याचे जीवन घडविण्यात आपला खूप मोलाचा वाटा आहे. आमचा परिवार आपले ऋण कधीही फेडू शकणार नाही.

शिक्षणाचा खरा पॅटर्न सुरू झाला तो अहमदपूर मधूनच. अवघ्या महाराष्ट्रात अहमदपूरचे नाव गाजले आणि वाजत राहिले त्या महात्मा गांधी महाविद्यालयाचे कर्तव्यदक्ष प्रा. बाभुळगांवकर सर निर्मोही... संघर्षशील... प्रयत्नशील... कार्यतत्पर... अभ्यासू... आणि आदर्श... सामर्थ्यशली... कर्तृत्ववान माणसात देव शोधणारा डोळस कर्मयोगी... सर्वगुणसंपन्न, प्रेमळ, मित्रासाठी चंदनाप्रमाणे झिजाणारा, फुला प्रमाणे सुगंध देणारा, वात्सल्य, प्रेम, जिव्हाळा, माया, ममता, करूणेने ओतप्रोत भरलेला सच्चा दिलदार मित्र, ज्यांच्यात पृथ्वीची उदारता, सागराची अथांगता, चंदनाची शीतलता, फुलाची मधुरता कायम बहरत असते. ज्यांना ज्यांना त्यांचा सहवास मिळाला ते कायमचे मित्र झाले. सरांच्या आयुष्यातील हा शब्द प्रपंच आजच्या युवकांसाठी प्रेरणादायी आहे.

ऊन, वारा, थंडी, पाऊस, वादळे अंगावर घेत विद्यार्थ्यांना घडविण्यासाठी स्वतःच्या जीवावर अनेक संकटे झेलत कुटुंबासोबत, नातेवाईका सोबत उत्सवांमध्ये आनंद साजरा न करता कर्तव्यावर स्वार होऊन आपलं आयुष्य जगणारा खरा हाडामासाचा शिक्षक बाभुळगांवकर सर असामान्य, प्रेरणादायी व्यक्तिमत्व होय. विद्यार्थ्यांना, तरुणांना योग्य असे मार्गदर्शन करुन त्यांना जीवनाच्या खरा मार्ग दाखविणारे एक आदर्श शिक्षक. काहीही झाले तरी डोक्यावर बर्फ आणि तोंडामध्ये साखर ठेवून सरांनी आतापर्यंतचे आयुष्य जगले. वेळप्रसंगी रागावले परंतु मनात कधीच राग, द्वेष, मत्सर बाळगला नाही. हे सरांचे वेगळेपण आहे. काही कारणास्तव रागावले असले तरी आपलसं करुन खर काय आहे हे अप्रत्यक्षरित्या समजावून सांगून त्यांना आपलस करून घेतल सर्वांना जमत नाही.

विचार विकास मंडळ संचलित, महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालय अहमदपूर जि. लातूर येथील गणित विषयाचे शिक्षक प्रभाकर बाबाराव बाभुळगांवकर हे ३१ वर्षाच्या प्रदीर्घ सेवेनंतर उपप्राचार्य पदावरून सेवानिवृत्त झाले आहेत. सरांचा जन्म नांदेड शहरालगत बाभुळगांव येथे २५ जुलै १९६६ रोजी झाला. आई–वडिलांनी त्यांचे नाव प्रभाकर ठेवले. प्रभाकर म्हणजे सूर्य. सूर्यासारखं तेजस्वी, इतरांना प्रकाश देऊन अंधाराचे कायम साम्राज्य दूर करण्यासाठी त्यांचा नावाप्रमाणेच प्रयत्न राहिला सरांच्या घरची जेमतेम परिस्थिती, अल्पभूधारक शेतकरी व कुंभारकाम स्वव्यवसाय करणाऱ्या जेमतेम अर्थिक परिस्थिती असणाऱ्या कुटुंबात झाला. आजी, आई–वडील, चार भाऊ व दोन बहिणी असा त्यांचा बालपणीचा परिवार होता. तर सर हे कुटुंबातील सर्वांत लहान होते. सरांचे प्राथमिक शिक्षण बाभुळगांव येथील जि.प. शाळेत झाले. पुढे मोठे भाऊ विठ्ठल बाभुळगांवकर हे छत्रपती संभाजीनगर येथे खाजगी कंपनीत नोकरीस लागले. त्यामुळे मोठ्या भावाच्या मदतीने माध्यमिक शिक्षण हे श्री सरस्वती भुवन हायस्कूल छत्रपती संभाजीनगर येथे झाले. पुढील उच्च माध्यमिक, पदवी बी.एस्सी. व पदव्युत्तर एम.एस्सी. (गणित) हे संपूर्ण शिक्षण नांदेड एज्युकेशन सोसायटीच्या सायन्स कॉलेज नांदेड येथे झाले. विशेष म्हणजे एम.एस्सी. गणित विषयात मराठवाडा विद्यापीठात (आजचे डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, संभाजीनगर) मार्च/एप्रिल १९९१ परीक्षेत चौथा Rank मिळाला. शारदा भवन अध्यापक महाविद्यालय नांदेड येथून एप्रिल १९९३ परीक्षेत बी.एड. शिक्षण पूर्ण केले. या परीक्षेचा निकाल ९ जून १९९३ ला लागला आणि दुसऱ्या दिवसापासून नोकरीची शोध मोहीम सुरू झाली. तेथून एक ते दीड महिन्यात नांदेड जिल्ह्यातील चार शाळेत शिक्षक पदासाठी व दोन वरिष्ठ महाविद्यालयातील प्राध्यापक पदासाठी मुलाखती दिल्या परंतु कुठेही डाळ शिजली नाही. २५ जुलै १९८८ ते २४ जुलै १९९३ हा सरांच्या जीवनातील अत्यंत संघर्षाचा काळ होता. या काळातील शिक्षण हे इयत्ता ११ वी, १२ वी आणि तंत्रशिक्षण पदविका अभ्यासक्रमाच्या गणित विषयाच्या खाजगी शिकवणी घेऊन केले. त्याशिवाय एम.एस्सी. सुरू असतांना सिडको नांदेड येथे कस्तुरबा गांधी कन्या शाळेत गणित

विषयाचे शिक्षक म्हणून दोन वर्ष काम केले आणि बी.एड.चे शिक्षण सुरू असतांना एक वर्ष वसंतराव नाईक महाविद्यालय सिडको नांदेड येथे पदवी वर्गास शिकविण्याचे काम केले. या अथक परिश्रमाचे फलित म्हणून २५ जुलै १९९३ ला विचार विकास मंडळ संचलित अहमदपूर जि. लातूर येथील महात्मा गांधी कनिष्ठ महाविद्यालयात सरांची गणित शिक्षक म्हणून केवळ गुणवत्तेवर निवड झाली. त्यामुळे सर संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष कै. भगवानरावजी नागरगोजे, सचिव कै. भाई किशनरावजी देशमुख, कै. कॅप्टन व्ही. व्ही. ढोबळे यांचे खूप ऋण व्यक्त करतात. गणित शिक्षक म्हणून घडविण्याचे श्रेय प्रामुख्याने एन.ई.एस. सायन्स कॉलेज नांदेड येथील त्यांचे गुरूवर्य प्रा. डॉ. एस.टी. पाटील व प्राचार्य डॉ. एस. बी. आगाशे या दोन महान विभूतींना देतात. या दोन्ही गुरूवर्यांचे आशीर्वाद घेऊन २६ जुलै १९९३ ला म.गां.म. अहमदपूरला गणित शिक्षक म्हणून रूजू झाले. एकूण ३१ वर्ष सेवेच्या कालावधीत दहा हजार पेक्षा जास्त इंजिनिअर, दोन हजार पेक्षा जास्त डॉक्टर, वीस पेक्षा जास्त भारतीय प्रशासन सेवा (IAS, IPS, IRS, IFS, IAAS, IIS), तसेच दहा पेक्षा जास्त उपजिल्हा–धिकारी, तहसीलदार आणि अशा असंख्य सेवेत विद्यार्थी घडविण्याच्या प्रक्रियेत एक घटक म्हणून खारीचा वाटा उचलता आल्याने ते समाधान व्यक्त करतात. महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या इयत्ता १२ वी गणित व संख्याशास्त्र भाग–१ च्या क्रमिक पुस्तक प्रथम आवृत्ती २०१० चे लेखक होते. यापूर्वीही बोर्डाच्या गणित विषयाच्या प्रश्न पेढीवर विषय तज्ज्ञ म्हणून काम केले आहे. वर्ष २०१४ ते २०२१ या कालावधीत विद्याभारती प्रकाशनच्या Complete Objective Mathematics for MHT-CET and JEE Mains Volume I, Volume II या दोन्ही पुस्तकावर लेखक म्हणून काम केले. नोकरीत असतांना नोव्हेंबर २००७ मध्ये गणित विषयात एम.फिल. हे शिक्षण पण पूर्ण केले.

सरांच्या अर्धांगिनी सौ. शोभा या एम.ए. डी.एड. असून जि.प.शाळेत शिक्षिका आहेत. सरांच्या खांद्याला खांदा लावून त्या प्रत्येक संकटात आणि सुखदुःखात साथ देत आल्या आहेत. प्रत्येक यशस्वी पुरुषाच्या पाठीमागे एका स्त्रीचा हात असतो तो कायम हात सरांच्या सोबत आहे. विद्यार्थी घडवताना घराकडे सरांनी दुर्लक्ष मात्र केले नाही.

सरांची जेष्ठ कन्या शुभदा ही बी.टेक. एम.बी.ए. Data Analytics असून मुंबई येथे येस बँकेच्या हेड ऑफिसला सीनिअर मॅनेजर (Data Scientist) आहे. तर लहान कन्या ही हैद्राबाद येथे MBBS च्या तृतीय वर्षात शिकत आहे.

शैक्षणिक जबाबदारी यशस्वी सांभाळून तब्बल वीस वर्ष स्टाफ सेक्रेटरी, एक वर्ष पतसंस्था अध्यक्ष, एक वर्ष जुक्टा अध्यक्ष, पाच वर्ष विचार विकास मंडळ शिक्षक प्रतिनिधी सदस्य, एक वर्ष सीईटी सेल प्रमुख, दोन वर्ष विज्ञान शाखेचे पर्यवेक्षक अशा विविध जबाबदाऱ्या यशस्वी पणे सांभाळणारे अष्टपैलू व्यक्तिमत्त्व असणारे शिक्षक प्रभाकर बाबाराव बाभुळगांवकर सर हे नियत वयोमानानुसार दिनांक ३१ जुलै २०२४ रोजी सेवानिवृत्त होत असताना त्यांच्या कार्याची यशोगाथा निश्चितच महात्मा गांधी महाविद्यालयाच्या इतिहासात कायम अजरामर असणार आहे. तुमचा प्रभाव वर्गाच्या पलीकडे पसरला आहे आणि तुम्ही असंख्य विद्यार्थी आणि सहकाऱ्यांच्या हृदयाला स्पर्श केला आहे. अशी प्रेरणा दिल्याबद्दल धन्यवाद.

तुमचे उर्वरित आयुष्य कुटुंबासाठी आणि समाजकार्यासाठी जावं. यासाठी आरोग्यदायी सेवापूर्तीच्या मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा.

***

अजिंक्य राणे यांस सिल्वर विनर पुरस्कार



कोल्हापूरचे असलेल्या अजिंक्य अरविंद राणे यांनी कराडच्या शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून मेकॅनिकल इंजिनीअरिंगमध्ये बी.ई.ची पदवी संपादन केली. तेथून त्याला चांगल्या खाजगी संस्थेत कॅम्पस ड्राइव्हद्वारे नोकरी मिळाली. तेथे त्यांनी दोन वर्षे काम केले. देशासाठी काम करण्याची इच्छा पूर्ण करण्यासाठी आणि मेकॅनिकल इंजिनीअरिंगची आवड म्हणून त्यांनी तांत्रिक क्षेत्रातील सरकारी परीक्षांची तयारी सुरू केली. त्यांनी विविध शासकीय परीक्षा उत्तीर्ण केल्या. त्यापैकी, त्याने २०२२ मध्ये IIT खरगपूर द्वारे आयोजित मेकॅनिकल अभियांत्रिकी (GATE) मधील ग्रॅज्युएट ऑप्टिट्यूड टेस्टमध्ये १.२ लाख उमेदवारांमध्ये अखिल भारतीय रँक १९७ मिळवला. पुढे, तो ग्रुप डिस्कशन, ग्रुप टास्क आणि पर्सनल इंटरव्ह्यू फेऱ्यांमध्ये यशस्वी झाला. या आधारावर त्यांची केंद्र सरकारच्या प्रतिष्ठित कंपनी ''इंडियन ऑईल कॉर्पोरेशन लिमिटेड'' मध्ये 'ग्रेड A' अधिकारी म्हणून निवड झाली.

नुकताच त्यांचा एक वर्षाचा प्रोबेशन कालावधी पूर्ण झाला आहे. भारतभर नियुक्त केलेल्या सर्व प्रोबेशनरी ऑफिसर्समध्ये, त्याला ''सिल्व्हर विनर'' पुरस्कार मिळाला. मा. इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे कार्यकारी संचालक यांनी त्यांच्या या कामगिरीबद्दल त्यांचा सत्कार केला आहे. या यशाबद्दल त्याचे मनःपूर्वक अभिनंदन.

***

संत परीक्षक संत गोरोबा काका

– सुरेश पाठक, नागपुर

वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांनी संतांची महती सांगताना म्हटले आहे –

ईश्वर भजनाचा करिता प्रचार ।
होईल आमचा उद्धार ।
परंतु जगासी तारावया अपार ।
सामर्थ्य पाहिजे अंगी ।।१।।
ते कार्य संताचे करू जाणे ।
जे देवचि झाले जीवे प्राणे ।
येरा गबाळांनी केली भजने ।
तरी काय होते ।।२।। अ. ३।।



महाराष्ट्राच्या या पुण्यभूमीत तेराव्या शतकात अवतरलेल्या निवृत्तीनाथ, ज्ञानेश्वर, सोपान, मुक्ताबाई, नामदेव, चोखामेळा या संतांच्या मांदियाळीत संत गोरोबा काकांनीही वारकरी संप्रदायाच्या स्थापनेत व भागवत धर्माची पताका फडकविण्यात महत्त्वाची भूमिका बजावली आहे.

अबोल, अज्ञानी, गाढवांनाही 'कर्मण्यवाधिकारस्ते' ची शिकवण देणारा, आपल्या चाकाच्या गतीतच 'भ्रामयन सर्वभूतानी यंत्रारूढानि मामया' या गीता सूत्राचे मर्म जाणून आपल्या ग्रामीण कलेने मातीला सत्पात्राचे रूप देणाऱ्या संत गोरोबा कुंभारांनी आपल्या थापटण्याने संतांचा कच्चेपणा सिद्ध करण्याचा अधिकार संत मंडळींनी गोरोबा काकांना दिला होता. यावरून त्यांचे भक्ती सामर्थ्य सिद्ध होते. संत गोरा कुंभार हे निर्विकार निष्काम भक्तीत लीन झाल्यामुळे ते काम, क्रोध, मोह, मत्सर लोभ, मद, अहंकार या षड्रिपुतून अलिप्त होते. त्यांचे आचार, विचार व व्यवहार जन सामान्यापेक्षा 'बोले तैसा चाले' असे वेगळेपण होते.

चिखल माती तुडविताना, गाडगे मडके घडताना हरिनामाविना त्यांचा एक क्षणही जात नसे, हरिनामाची ही तंद्री लागल्यामुळेच गोरोबा काकांच्या प्रपंचात अनेक अप्रात्याक्षिक घटना घडल्या व संकटे आली. परंतु, त्यांनी पांडुरंगाशी एकनिष्ठ राहून आपल्याच पायाने चिखलात तुडविलेल्या बाळाच्या मृत्यूचे दुःख, पत्नी वियोग व सांसारिक सुखाचा त्याग केला. शब्द प्रमाण मानणारे गोरोबा काकांच्या कुटुंबाची आर्थिक घडी विस्कळित झाली. कुटुंबावर उपासमारीची पाळी आली. अशावेळी सुद्धा त्यांनी

मोक्ष तुमचा देवा, दुर्लभ तो तुम्ही ठेवा ।।
मज भक्तीची आवडी । नाही अंतरीचे गोडी ।।

या तुकाराम महाराजांच्या अभंगाप्रमाणे त्यांनी आपले सर्वस्व पांडुरंगाला समर्पित केले होते. गोरोबांच्या कुटुंबाची ही दयनीय अवस्था व वातावरण पाहून पंढरपूरच्या देव्हाऱ्यात उभ्या असलेल्या पांडुरंगाच्या हृदयाला पाझर फुटला. पांडुरंग बाहेर पडताच रुक्मिणीही त्यांच्या सोबतीला आली. पंढरपूरापासून २५–३० कोसावर असलेल्या तेर (ढोकी) गावात कुंभाराच्या वेशात आलेल्या. पांडुरंगाने गोरोबांकडे कामाची मागणी केली. पांडुरंगाच्या रूपात आलेल्या विठू कुंभाराने घडलेल्या माठ–मडक्यांना मागणी वाढू लागली व गोरा कुंभाराची आर्थिक घडी नीट बसण्यास मदत झाली व गोरोबांचा प्रपंच सुरळीत झाला. नित्यनेमाने पांडुरंगाची पूजा करणाऱ्या संत नामदेवांना देऊळ सुने वाटू लागला. इतर संतही पंढरपुरात गोळा झाले व देव कुठे गेले यावर विचार मंथन सुरू झाले. संत नामदेवांना पांडुरंग तेरला असल्याची प्रचिती झाली. त्यांनी संत मंडळीला तेरला चालण्याचा आग्रह केला.

संत मंडळी अचानक तेरला आल्याचा संत गोरोबा काकांना अत्यानंद झाला. गावकऱ्यांनीही संतांचे स्वागत केले. गोरोबांना हिनवणाऱ्या गावकऱ्यांनाही संत गोरोबाचे श्रेष्ठत्व आता कळले होते. गोरोबांनी अचानक आगमन झालेल्या संतांना येण्याचे कारण विचारले असता पांडुरंग तुमच्या घरी असल्याचे संत नामदेवांनी सांगताच गोरोबांना आश्चर्याचा धक्का बसला. तत्क्षणी गोरोबांनी विठू कुंभार व रुक्मिणी कुंभारीणची घरात चौकशी केली असता ते अंतर्धान झाल्याचे कळले तेव्हा गोरोबांना पश्चात्ताप झाला की साक्षात ईश्वराच्या हातून काम करवून घेण्याचे अक्षम्य पाप आपण केले आहेत. म्हणून पांडुरंगाची क्षमा मागण्यासाठी आपल्या दोन्ही बायका (संती–रामी) बरोबर संत मेळ्यासह गोरोबा पंढरपूरला आले.

तिघांनी चंद्रभागेत स्नान करून पुंडलिकाचे दर्शन घेतले गरूड पारावर सुरू असलेल्या संत नामदेव महाराजांच्या कीर्तनाचा आस्वाद घेत तन्मयतेने, कीर्तनात समरस झाले होते. कीर्तन चरम सीमेवर असताना नामदेवांनी सर्वांना हात वर करून टाळ्या वाजवण्याच्या सूचना केल्या. गोरोबा थोटे असल्यामुळे चुळबूळ करू लागले. नामदेवांनी गोरोबांची स्थिती ओळखली व ते म्हणाले....

वरती करा कर दोन्ही,
पताकाचे अनुसंधानी ।।१।।
सर्वहस्त करिती वरी,
गोरा लाजला अंतरी ।।२।।
नामा म्हणे गोरोबाशी ।
वरती करणे हस्ताशी ।।३।।

गोरोबांना हात आले व ते टाळ्या वाजवू लागले. गोरोबांना मिळालेले हात पाहून संती व रामीलाही आनंद झाला. जीवनात दुःखाचे डोंगर पार केलेल्या गोरोबांना आता प्रपंचात स्थायित्व आले होते. त्यांची पांडुरंगावरील भक्ती अधिकाधिक बहरू लागली होती. तत्कालीन संत मंडळीत गोरोबा हे वयाने ज्येष्ठ व भक्तीत श्रेष्ठ असल्याने संत मंडळीत त्यांना मानाचे व आदराचे स्थान होते. म्हणून त्यांना सर्व संत 'काका' म्हणत. आळंदीला नेहमीच भक्तमंडळींची किर्तने, प्रवचने चालायची. यावेळी नामदेवांचा

अहंकार उतरवण्यासाठी ज्ञानदेवांनी गोरोबांना निमंत्रित केले. सिद्धेधराच्या देवळात सर्व मंडळी एकत्र जमली असताना आपण सर्वांनी आपली परीक्षा करून घेऊ असा ज्ञानदेवांनी प्रस्ताव ठेवल्यावर सर्व संतांनी संमती दर्शविली.

मात्र, कोपऱ्यात बसलेल्या नामदेवांनी कसलीही प्रतिक्रिया दिली नाही. संतांचे परीक्षक म्हणून गोरोबा काकांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले. ज्ञानदेव गोरोबा काकांना म्हणाले, 'काका, तुम्ही आयुष्यभर मडकी भाजली. आव्यातून निघालेले कोणते मडके कच्चे आणि कोणते पक्के भाजलेले आहे, हे तुम्हाला बरोबर ओळखता येत. गोरोबा काका, ही जबाबदारी घ्यायला कचरू लागल्याचे समजताच ज्ञानदेव म्हणाले, 'काका, तुमचं आयुष्यच परमार्थ रूप आहे. शिवाय, अनुभवाचे थापटणे तुमच्या हाती असल्यामुळे मातीची मडकी काय आणि हाडामांसाची मडकी काय दोन्ही सारखीच पण ते ओळखायची योग्यता तुमच्या शिवाय अन्यथा कोणातही नाही.'

सर्व संतांचा आग्रह पांडुरंगाची आज्ञा मानून गोरोबा काकांनी परीक्षकाची भूमिका स्वीकारली. नामदेव महाराज अजूनही कोपऱ्यात स्वस्थ बसून सर्व संतांचा वार्तालाप ऐकत होते. संत गोरोबांनी थापटणे हातात घेतले व संत मंडळीची उत्सुकता शिगेला पोहचली. सर्वप्रथम गोरोबा काकांनी निवृत्तीनाथांच्या डोक्यावर थापटणे मारले. निवृत्तीनाथ शांत होते. काकांनी निकाल जाहीर केले, अरे हा तर डेरा पक्का भाजला गेला आहे. निर्विकार आहे. परब्रम्ह झाला आहे. नंतर थापटणे ज्ञानोबांच्या डोक्यावर आपटले व गोरोबा उद्गारले, हे मडके कच्च्या-पक्क्याच्या पलीकडचे आहे. ज्ञानाच्या ज्वलंत अग्नीत तापून अनुभवाच्या चाकावर त्याला आकार मिळाला आहे. या मडक्यात विश्वप्रेमाच्या गंगेचं प्रतिबिंब दिसते. अशाप्रकारे सोपान, मुक्ताईनंतर सावतामाळी, चोखामेळा, या सर्वांची परीक्षा घेऊन मंडळी उत्तम भाजली असल्याचा अभिप्राय दिला. आपल्या क्रमांकाच्या प्रतिक्षेत चुळबुळ करीत बसलेल्या नामदेवांकडे काकांनी आपला मोर्चा वळवला व त्यांनी थापटणे नामदेवांच्या डोक्यावर मारले. त्याबरोबर संत नामदेव दुःख, आवेगाने कळवळले आणि डोके चोळीत अश्रू ढाळत बसले. गोरोबांनी आपला निर्णय सुनावला 'डेरा कोरा नीका राहिला गं बाई' हा मडका एवढा कच्चा राहिला आहे. त्याला पुन्हा भक्तीच्या आव्यात अंतर्बाह्य भाजून काढले पाहिजे असे गोरोबांनी सहज व मार्मिकतेने नामदेवांच्या अहंकारावर बोट ठेवले. गोरोबांच्या या निकालामुळे नामदेव व्यथित झाले. सर्व संतांनी मिळून आपल्या विरुद्ध कट रचून आपली, थट्टा केली असा त्यांचा समज झाला.

त्यांनी सरळ पंढरपूर गाठून पांडुरंगाच्या चरणाशी सर्व व्यथा व झालेला अवमान कथन केला. पांडुरंगानी नामदेवांना सांगितले गोरोबांनी तुला रस्ता दाखवला आहे. तू औंढा-नागनाथ येथे विठोबा खेचरांना भेटून गुरू केल्यास तुला पूर्णब्रह्माची प्राप्ती होईल. पारमार्थिकात अहंकार राहतोच कसा? राहिल्यास तो काढून त्याला शहाणे करायला नको का? शब्दातीत राहून आनंद उपभोगायचा नसतो?

आनंदी आनंद मिळोनी राहणे ।
अखंडीत होणे न होनिया ।
गोरा कुंभार म्हणे जीवनमुक्त होणे ।
जग हे करणे शहाणे बापा ।।

नामदेव हे श्रेष्ठ भक्त होते हे गोरोबांना मान्य होते. संतांच्या मनाची समत्वबुद्धी व सद्विचार किती उच्च प्रतीचे होते हे कळते. 'संत तेचि देव, देव तेचि संत' अशी भावना संतांमध्ये होती. गोरोबांची उत्कट भक्ती त्यांची निरपेक्ष समर्पणशीलता इतर सर्वांना आदरणीय होती.

जय श्री गोरोबा काका ।। श्री संत शिरोमणी गोरोबा काकांना ७०७ व्या पुण्यतिथी निमित्त विनम्र अभिवादन !

लालगंज कुंभारपुरा, इतवारी, नागपूर
मो. क्र. ७८८८१२९७५१, ९०२८३९८७८८
(लेखक मूर्तिकार असून माती मूर्तिकार व इस्तकारागीर संघाचे मुख्य संयोजक आहे.)

***

आमचे प्रेरणास्थान



कै. शंकरराव हर्णसकर उर्फ भाऊ



कै. नरेंद्र शंकरराव हर्णसकर

श्री वाढेश्वर
वीट कारखाना

वडगांव डाळ, शिरवळ-भोर रस्ता, ता. भोर, जि. पुणे.

प्रोप्रा. सौरभ नरेंद्र हर्णसकर (बी.ई.)
मो. 9822087678
४०४, नवी आळी, ता. भोर, जि. पुणे. फोन ०२११३-२२२००५

राजश्री टिंबर मर्चन्ट व जितेंद्र ट्रेडर्स
जनरल कॉन्ट्रक्टर अॅन्ड सप्लायर्स

आमचे प्रेरणास्थान



जितेंद्र अशोकराव हर्णसकर
मो. 9850833695



अशोकराव ब. हर्णसकर
मो. 9850402010

सचिन अशोकराव हर्णसकर
नगराध्यक्ष भोर नगरपालिका
मो. 9850243030

सागवानी व इमारतीच्या जंगली, लालटीक, बेलपण, पीळकोटा, मंगलोरी, कौल, वासे, शहाबादी फारशीचे व्यापारी
मु. पो. ता. भोर, जि. पुणे.फोन. ऑफिस : **०२११३ - २२३९७३**

विद्यार्थीनिष्ठ विज्ञानप्रसारक

प्रचार-प्रसारासाठी विविध उपक्रमांच्या माध्यमातून पोटतिडकीने विद्यार्थी घडवणाऱ्या डॉ. सुधीर कुंभार यांची ही विज्ञानविश्वातील सफर...



विज्ञानाचा प्रसार व्हावा आणि त्यातल्या लहानसहान गोष्टी विद्यार्थ्यांना समजाव्या, या दृष्टिकोनातून त्यांच्यासाठी स्वत: हाताने बनवलेल्या माहितीपूर्ण भित्तीफलकांचा १०५८ वा अंक दि. २७ नोव्हेंबर रोजी प्रकाशित होईल. या संकल्पनेचे जनक आणि त्यावर अखंडपणे काम केलेले विज्ञानप्रसारक म्हणजे डॉ. सुधीर कुंभार.

सुधीर यांचा जन्म सांगलीतील कवलापूर गावातला. सातवीपर्यंतचं शिक्षण नांद्रे पूर्ण केल्यानंतर, पुढील शिक्षण चांदोरी येथे घेतले. कराडच्या एस.जी.एम. महाविद्यालयात त्यांनी महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. साताऱ्यातील आझाद कॉलेज ऑफ एज्युकेशनमध्ये शिक्षणशास्त्राचा अभ्यास केला. डॉ. सुधीर यांनी 'बीएससी', 'एमए' आणि 'एमएड'पर्यंतचे शिक्षण घेतले. पुढे यशवंतराव चव्हाण मुक्त विद्यापीठातून त्यांनी 'एन्व्हार्यन्मेंटल कम्युनिकेशन' या विषयात 'पीएचडी' पूर्ण केली. सुरुवातीच्या काळात पुण्यातील वडगाव मावळ येथे शाळेत रुजू झाल्यानंतर, ढेबेवाडीची कर्मवीर भाऊराव पाटील शाळा, साताऱ्यातील एका शाळेत २२ वर्षांची शिक्षकी सेवा त्यांनी दिली. त्यानंतर आता कडेगावच्या महात्मा गांधी विद्यालयात विज्ञान शिक्षक म्हणून ते कार्यरत आहेत.

विद्यार्थ्यांच्या मनात विज्ञानाविषयी तळमळ आणि जागरूकता निर्माण व्हावी, या दृष्टिकोनातून नावीन्यपूर्ण संकल्पनांना मूर्त रूप देणाऱ्या सुधीर यांनी १९९८ साली पर्यावरण आणि विज्ञानाशी संबंधित पहिला भित्तीफलक तयार केला. यानंतर दर रविवारी याच विषयांशी संबंधित भित्तीफलक बनवत, त्यामध्ये पर्यावरणातील विविध विषयांचा समावेश करायला त्यांनी सुरुवात केली. वनस्पती, प्राणी, कीटक, फुलपाखरे, पक्षी याविषयीची शास्त्रीय माहिती, छायाचित्रे यांचे एकत्रीकरण असलेला हा भित्तीफलक अतिशय आकर्षक. रविवारी हा भित्तीफलक बनवल्यानंतर सोमवारी तो प्रकाशित करुन शाळेच्या सूचना फलकावर लावायचा, असा त्यांचा नित्यक्रम. दर आठवड्याला नवीन विषयावर भित्तीफलक बनवत, विद्यार्थ्यांमध्ये विविध विषयांवर जनजागृती होऊ लागली. त्याचबरोबर दिनविशेष किंवा इतर विशेष औचित्य साधत दिवाळीतील प्रदूषण, 'पक्षी सप्ताहा' निमित्त पक्ष्यांविषयी, 'वन्यजीव सप्ताहा'मध्ये सस्तन प्राण्यांविषयी माहिती या भित्तीफलकांवर झळकते. शाळेच्या सूचना फलकावरील तक्ता त्या शाळेपुरताच मर्यादित राहत असल्याने, या भित्तीफलकाला पुढे सोशल मीडियामुळे प्रसाराचा अनोखा मार्ग मिळाला. विज्ञानाचा अगदी नि:स्वार्थ भावनेने आणि कल्पकपणे वापर केलेल्या या भित्तीफलकांच्या संकल्पनेची दखल 'लिमका बुक ऑफ रेकॉर्ड'नेही घेतली. २०१६ साली वॉलपेपर अर्थात भित्तीपत्रके म्हणून 'लिमका बुक'ने याची नोंद घेतली आहे. याच भित्तीपत्रकांची डॉ. सुधीर यांनी अनेक ठिकाणी मोफत प्रदर्शनेही आयोजित केली. बस स्थानके, रेल्वे स्थानके, उद्याने अशा सार्वजनिक ठिकाणांवर या भित्तीफलकांचे प्रदर्शन भरवले जाते. ''अनेकदा सार्वजनिक ठिकाणी भित्तीफलकांचे प्रदर्शन भरवूनही माझी भित्तीफलके कधीच खराब केली गेली नाही किंवा फाडली गेली नाहीत, हेच माझ्या कामाचं यश आहे'' असे सुधीर सांगतात.

याव्यतिरिक्त सुधीर जटा निर्मूलनाचे देखील काम करतात. अंधश्रद्धा निर्मूलनाच्या कार्यात सुधीर आपले योगदान देत असून जटा सोडवणे व त्याबाबत जनजागृती केली जाते. कराड–ढेबेवाडी रोडवरील वाहनांच्या धडकेत मृत्यू झालेल्या प्रत्येक प्राण्याचा त्यांच्याकडे २००४ पासूनचा डाटादेखील उपलब्ध आहे. वणवा निर्मूलन मोहीम, त्याचबरोबर फुलपाखरु उद्यान, औषधी वनस्पतींच्या उद्यानामध्येही त्यांनी हातभार लावला आहे. गेली ३३ वर्षं विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन निर्माण व्हावा, यासाठी 'विज्ञान पंधरवडा' आयोजित केला जातो. तसेच 'रयत विज्ञान परिषदे' अंतर्गत प्रकाशित होणाऱ्या 'विज्ञान पत्रिका' या मासिकाचे संपादक म्हणूनही गेली दहा वर्षं सुधीर यांच्याकडे जबाबदारी आहे. 'फुलपाखरु' या विषयावरील पॉकेट बुक तर 'वणवा निर्मूलन मोहीम', 'पर्यावरण आणि प्रदूषण', 'पर्यावरण मित्र होऊया' यांसारख्या माहितीपूर्ण पुस्तकांचे लेखक म्हणूनही डॉ. सुधीर प्रसिद्ध आहेत.

विज्ञान क्षेत्रातील त्यांच्या योगदानासाठी महाराष्ट्र शासनाचा २०११ सालचा 'आदर्श शिक्षक पुरस्कार', 'रयत शिक्षण संस्थे'अंतर्गत दिला जाणारा 'यशवंतराव चव्हाण बेस्ट टीचर पुरस्कार' (२०१३), २०११ सालचा 'मधुकरराव चौधरी पुरस्कार' आणि 'मराठी विज्ञान परिषदे' अंतर्गत दिला जाणारा २०२० सालचा 'विज्ञान प्रसार पुरस्कार' अशा विविध पुरस्कारांनी सुधीर यांच्या कामाला एक सोनेरी किनार लावली, असेच म्हणावे लागेल. याव्यतिरिक्त कोल्हापूर आकाशवाणीच्या 'विज्ञान जगत' मालिकेसाठी आणि सातारा आकाशवाणीच्या परिसर विज्ञान मालिकेसाठी दोन वर्षं लेखनाचे कामही त्यांनी केले आहे. त्याचबरोबर भारतातून काही निवडक व्यक्तींची किंवा संस्थांच्या 'VIPNET क्लब' या निवडीत सुधीर सहभागी असलेल्या 'कडेगाव सायन्स क्लब'ची दोनदा निवड झाली आहे. विज्ञान प्रसार आणि ज्ञान प्रसाराचा वसा, वारसा आणि ध्यास घेतलेले सुधीर येत्या काही काळातच शिक्षकी पेशातून निवृत्ती होतील. पण, निवृत्त झाल्यानंतर ही विज्ञानप्रसाराचे काम सोडणार नाही, हे दृढ निश्चयाने सांगणाऱ्या, अशा या विज्ञाननिष्ठ शिक्षकाला मन:पूर्वक शुभेच्छा!

***

श्रम साफल्य

जीवन परिचय : रघुनाथ गजमल बोरसे



माझे वतनचे मूळगाव कोळगाव ता. भडगाव, जिल्हा जळगाव. माझ्या वडीलांचा जन्म १९१८ साली कोल गावला झाला. १९१८ साली प्लेगची मोठी साथ होती. वडील सहाच (६) महिन्याचे असतांना त्यांचे आई-वडील व एक भाऊ तिघेजण एकाच दिवशी वारले. वडीलांच्या आईच्या मावशीने वडीलांचा सांभाळ केला. त्यांनी वडीलांना कोळगावहून ६ महिन्याचे असतांनाच गुढयाला नेले. तेथेच वडीलांचा सांभाळ झाला लग्नही झाले.

माझा (रघुनाथ) जन्म १५.९.१९४३ ला गुढे (ता. भडगाव, जि. जळगाव) येथेच झाला. मोठ्या बहिणीचे लग्नही ती ५ वर्षाची असतांना गुढे येथेच झाले. पूर्वी लग्न लवकर करीत असत.

गुढयाहून ब्राम्हण शेवग्याला स्थलांतर : कुंभार कामाच्या धंद्यामुळे प्रत्येकाची वतनची खेडे नेमलेली असायची. गुढे येथे पूर्वीचेच कुंभाराचे घर होते, त्यामुळे ज्या गावात कुंभाराचे घर नाही त्या गावी जाऊन धंदा करायचा या विचाराने वडिलांनी ब्राम्हण शेवगे (ता. चाळीसगांव) या गावाची निवड केली. म्हणून ब्राम्हण शेवग्याला स्थलांतर झालो १९४७ मध्ये. तेथे कुंभारी कामाचाच व्यवसाय व हातमजुरी होती परंतु पुढे आमच्या दुर्दैवाने १९५२ चा मोठा दुष्काळ पडला. कॉलऱ्याची साथ खूप मोठी होती. गावात रोज ७-८ मृत्यू व्हायचे. माझी आईही आषाढ महिन्यात कालऱ्याच्या साथीत वारली. सकाळी वांत्या, डिसेंट्री सुरु झाली व ११ वाजताच आई वारली. खेडेगाव असल्यामुळे वाहन-वगैरेची, डॉक्टराची औषधांची सुविधा नव्हती. कॉलऱ्यामुळे गावबंदी होती त्यामुळे आईच्या अंत्यविधीला एकही नातेवाईक नव्हता. गावातील १५-२० माणसांनीच अंत्यविधी पार पाडला. त्यावेळी आईचे वय २७ वर्ष व वडीलांचे वय ३४ वर्षच होते. आई वारल्यामुळे आमचे खूप हाल झालेत. वडिल मी व तीन लहान बहिणी जेवण बनविण्याची पंचाईत, कुणालाच स्वयंपाक येत नव्हता. परंतु गावातील सर्व लोक सहकार्य करणारे होते. १-१।। महिना गावातील लोकांनीच स्वयंपाक करून आम्हाला खाऊ घातले. वडीलांनी नंतर स्वयंपाक बनवायला सुरु केले. १९५२ चा दुष्काळ मोठा असल्यामुळे अन्नधान्य व पाण्याचीही खूपच टंचाई होती. आई वारली त्यावेळी मी तिसरीमध्ये होतो.

शिक्षणात खंड : आई वारल्यामुळे कुंभार-कामात मदतीसाठी वडीलांनी मला बरेच दिवस ६-७ महिने शाळेत जाऊ दिले नाही. परंतु शाळेचे मुख्याध्यापक श्री. नथू श्रावण चव्हाण यांनी वडिलांना समजावून परत माझी शाळा सुरू केली. १ली पासून तर ७वी पर्यंत मी ब्राम्हण शेवग्यालाच शिकलो. स्थावर इस्टेट काही नसल्यामुळे घरी अठरा-विश्व दारिद्र. त्यामुळे शाळेतील पुस्तक वगैरे मित्रांचीच वापरलीत. काही वेळा शाळेतील शिक्षकांनीच शैक्षणिक मदत केली. शाळेचे काम करून घरी वडिलांना माती तुडविणे, लीद तयार करणे, आवा भाजणे, डोक्यावर मडकी घेऊन खेडयावर विकायला जाणे, स्वयंपाक करणे, लहान बहिणींचे डोके माथे धुणे, केस विंचरणे, स्वयंपाक करणे इ. कामेही केलीत.

सातवी पास झाल्यानंतर ब्राम्हण शेवग्यापासून ७-८ किलोमीटरवर उंबरखेडे येथेच जवळचे हायस्कूल होते. ८ वी ते ११ वी पर्यंत उंबरखेडे येथेच शिकलो. वसतीगृहात रहायची व्यवस्था होती. बहिणीच्या सासऱ्याने त्र्यंबक महादू कुंभार खडकीसीम यांनी १९५८ मध्ये वसतीगृहाचा सर्व खर्च केला. नंतर शिक्षण संस्थेच्या अध्यक्षांना भेटून माझी बिकट आर्थिक परिस्थिती सांगितली. त्यामुळे वसतीगृहात मला रहायला व जेवायला फुक्कट मिळायचे. माझे मित्र परिवार चांगला असल्यामुळे मी संपूर्ण हायस्कूलसाठी त्यांच्याच पुस्तकांचा वापर केला. ८ वी पासून ११ वी पर्यंत काही शिक्षकांकडे पाणी भरले. वसतीगृहाची सर्व कामे मी करीत असे. मुलांकडून वसतीगृहासाठी प्रत्येक महिन्याला येणारे धान्य मी जमा करुन त्याचा हिशेब ठेवणे, दर रविवारी रोजंदारीवर बांधकामावर जाणे. मध्ये-मध्ये १-२ दिवस सुट्टी घेऊन वडिलांना आवा भाजण्यासाठी व मडके विकण्यासाठी मदत केली. ८ वी ते ११ वी दरम्यान शैक्षणिक खर्चासाठी खडकी ब्राम्हण शेवगे देवगाव मुढे, गोंडगाव इ. ठिकाणाहून १-१-२-२ रु. वर्गणी गोळा केली. ११ वीच्या फॉर्म फी साठी शिक्षकांनी पैसे भरले. मार्च १९६२ मध्ये ११ वी पास झालो नंतर डिग्रीसाठी चाळीसगावला कॉलेजमध्ये नाव नोंदले. परंतु पुढे जेवणाची सोय न झाल्यामुळे, कॉलेज अर्धवट सोडावे लागले. १-१-२-२ दिवस उपाशी रहावे लागत होते. त्यामुळे कॉलेज सोडावे लागले. वाईट वाटले.

कॉलेज सोडल्यानंतर २-३ महिने बेकार राहिलो. नोकरीही नाही रोजगारही नाही. वडिलांनी कुंभारकामात मदत व्हावी म्हणून व लहान मुलांचा सांभाळ व्हावा म्हणून दुसरे लग्न केले होते, परंतु आम्हालाच दुसऱ्या आईकडून त्रास व्हायला लागल्यामुळे त्यांनी आईशी घटस्फोट घेतला व त्यांनीच आमचा सर्वांचा सांभाळ केला. वडील हनुमानवाडीवर राहून दुसऱ्या कुंभाराकडे माठ बनविण्याचे काम करायचे. आतापर्यंत दोनही लहान बहिणींचे लग्न झालेली होती.

नोव्हेंबर १९६२मध्ये कान्हेगाव येथे सोमय्या साखर कारखान्यात कामास लागलो. मला वाटले लेखी काम मिळेल, परंतु त्यांनी ६५ किलोचे चुन्याचे पोते खालच्या मजल्यावरून तिसऱ्या मजल्यावर न्यायचे काम दिले. १५-२० दिवसांनी मी तेथील चीफ केमिस्ट यांना भेटून

विनंती केली. त्यानंतर मला लॅब-बॉय म्हणून लेबोरेटरीत काम करायला मिळाले. सिझन संपल्यावर घरीच बसले. असेच १ वर्ष वाया गेले. तशातच आम्ही झोपडीतच रहात होतो ती पण आगीने पेटली त्यावेळी मी कारखान्यात, वडील कामावर, त्यामुळे सर्व जळून राख झाली. कारखान्याकडून नवीन सामान घेऊन झोपडी तयार केली.

बऱ्याच प्रयत्नानंतर वडिलांच्या मित्राच्या ओळखीने वरवार महामंडळात स्टोअर-किपर म्हणून दरमहा ११५ रु. वेतनावर २२.७.१९६३ रोजी रुजू झालो. शिक्षणाची आवड म्हणून बहिस्थ: विद्यार्थी म्हणून ५-६ वर्षात बी.कॉम. हॉन. झालो. १९६३ ते सप्टेंबर २००२ पर्यंत ३९ वर्ष वेअरहौसमध्ये कामकाज केले. ३०.९.२००२ ला जळगावला उपव्यवस्थापक म्हणून निवृत्त झालो. नोकरीच्या काळात चांगला कर्मचारी म्हणून २-३ वेळा सत्कारही झाला.

१९६८ ते १९७५ या कालावधीत चाळीसगाव येथे वेअर हाऊस केंद्रप्रमुख म्हणून काम केले. त्याच वेळेस बहाळ येथील दगडू गबरू बागूल यांनी ''जळगाव जिल्हा अहिर कुंभार समाज सेवा'' म्हणून संघटना स्थापन केली. त्यावेळी मी संस्थेचा सचिव (Secretary) म्हणून १९७५ पर्यंत काम पाहिले. बागूल गुरूजींनी व आम्ही खेडोपाडी समाजात फिरून संघटनेची माहिती दिली. संघटनेत असतांना आपले रत्नाप्पा आण्णा कुंभार, त्यावेळेचे गृहराज्यमंत्री यांचा चाळीसगाव येथे सत्कारही घडवून आणला. सत्काराच्या वेळेला केंद्रीय गृहराज्यमंत्री सोनूसींग धनसींग पाटील, वनमंत्री डी.डी. चव्हाण, व स्थानीक आमदार-खासदारही उपस्थित होते. आपल्या समाजाचेही खेड्यावरून बरेचसे लोक आले होते. संघटनेत गरीब विद्यार्थ्यांसाठीही आम्ही शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून दिली होती. ज्यांना चाळीसगावला हॉस्टेलवर रहाणे परवडत नव्हते त्या विद्यार्थ्यांसाठी आम्ही हायस्कूल कॉलेजमध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी वसतीगृह सुरू केले होते. दोन विद्यार्थ्यांना पहिल्या वर्षी त्याचा लाभ घेतला. त्यांनी संघटनेने केलेल्या वसतीगृहात राहून आपला कॉलेजपर्यंतचा अभ्यास पूर्ण केला (वसतीगृह - भाडयाने घेतलेला रूम) फक्त रहाण्यांची व्यवस्था केली होती.

मी समाजाचे काम चाळीसगावला १९६८ ते डिसेंबर १९७५ पर्यंत केले नंतर माझी बदली सटाणे येथे झाल्यामुळे मी संघनेचे सचिव पदाचे काम सोडले. त्यानंतर संघटनाच बंद पडली. समाज जागृती होऊन जिल्हा पातळीवर, तालुका पातळीवर नविन संघटना स्थापन झाल्या. मी केलेले समाजाचे काम भूतकाळात जमा झाले होते. मी नवीन संघटनांच्या संपर्कात होतो, परंतु विशेष माहिती माझ्याबद्दलची दिली नाही. २०१७ मध्ये चाळीसगावच्या 'जळगाव जिल्हा बहुउद्देशीय विकास संस्था चाळीसगाव' यांनी समाजभूषण पुरस्कार द्यायचे ठरविले. त्या कार्यकारिणीत श्री. जे.बी. सूर्यवंशी आप्पा हे ही सदस्य होते. मी समाज कार्य केल्याची कल्पना त्यांनीच २०१७ मधील संघटनेच्या सदस्यांना दिली. कारण स्वत: सूर्यवंशी आप्पा हे विद्यार्थी म्हणून, त्यावेळी सुरू केलेल्या वसतीगृहात राहिलेले होते. विद्यार्थी म्हणून त्यामुळे त्यांनाच कल्पना होती, ती त्यांनी संघटनेच्या लक्षात आणून दिली, त्यामुळे जळगाव जिल्हा बहुउद्देशिय विकास संस्था चाळीसगाव यांचेकडून मानपत्र देऊन समाजभुषण पुरस्कार देऊन गौरविण्यात आले.

सध्या मी हडपसर येथे मोठ्या मुलाकडे वास्तव्यास आहे. सध्याचे माझे वय ८२ चालू आहे. आयुष्याच्या सर्व सुख दु:खाच्या प्रसंगी माझी पत्नी सौ. मंगला हिने आयुष्यभर साथ दिली. वडिलांची सेवाही तिने भरपूर केली. आम्ही दोघेही हडपसरला आहोत. मोठा मुलगा चि. रविंद्र हा सिरम कंपनीत उपव्यवस्थापक आहे. मोठी सून वर्षा ही एम.ए. असून वयस्कर लोकांच्या सेवेसाठी घरीच आहे. लहान मुलगा बी.ई. असून, सून लहान एम.टेक. आहे. दोघेही नोकरी निमित्त टेक्सास, अमेरिका येथे आहेत. चि. योगेश हा AT&T कंपनीत Associate Director - Technology म्हणून काम करतो. सौ. श्रध्दा ही Plano Independent School येथे Government School Teacher आहे. योगेशचा मुलगा १२ वीत शिकतो, अविका मुलगी ६ वीत शिकते. रविंद्र मोठा मुलगा याला २ मुली असून मोठी मुलगी ऋतुजा ही JSPM ह्या कॉलेजमध्ये B-Tech Mechinical Engineering कॉलेजच्या ३ ऱ्या वर्षात शिकत आहे. लहान मुलगी हेताक्षी ही V.I.T (विश्वकर्मा इन्स्टीट्यूट ऑफ टेक्नॉलाजी) पुणे या कॉलेजमध्ये पहिल्या वर्षाला आय.टी. पुणे मध्ये शिकत आहे. सौ चे ४-५ मेजर ऑपरेशन झाले असूनही तिने आयुष्यात प्रत्येक प्रसंगी साथ दिली.

जीवनात मागे वळून पाहिले असतांना जन्मापासून तर निवृत्तीपर्यंत अनेक खडतर प्रसंगांना तोंड द्यावे लागले. शिक्षणात खूपच अडचणी आल्यात, परंतु बाहेरून परीक्षा देऊन B-Com Hon. केले. नोकरीतही अनेक अडचणी आल्या लागल्यानंतर ९-१० महिन्यांनीच अधिक कर्मचारी झाल्यामुळे १० लोकांना कमी केले होते. त्यात मी पण होतो. नंतर विनंती वगैरे करून परत लागलो. नोकरी करतांना फसवणूकपण झाली. आर्थिक झळही सोसावी लागली. पत्नीचे आजारपण व मोठमोठे ऑपरेशन्स त्यामुळे अनंत अडचणींना तोंड देऊन मुलांना व्यवस्थित शिक्षण देऊन सुसंस्कृत केले. दोघेही त्यांच्या आयुष्यात नोकरीत जबाबदारीने काम करतात. प्रत्येक व्यक्तीच्या जीवनात अनेक प्रकारची संकटे अडचणी येतच असतात, आयुष्यात संघर्ष करावाच लागतो. परमेश्वरावर विश्वास ठेऊन अडचणीतून संकटातून मार्ग निघतोच व श्रमसाफल्य होते. आयुष्यात यशस्वी रितीने, जबाबदारीने खंबीरपणाने संकटांना तोंड दिले तर आयुष्य यशस्वी होते. जीवनाची यशस्वी कर्तव्यपूर्ति हीच वृध्दापकाळाची, वार्धक्याचे सुख व समाधान स्मृतीरूपाने मिळते. घरचे सर्वजण माझी काळजी घेतात. त्यामुळे मी समाधानी आहे.

- रघुनाथ गजमल बोरसे
निवृत उपव्यवस्थापक वस्वार महामंडळ
ह.मु. हडपसर, पुणे.

***

पब्जी एक जीवघेणा गेम

- प्रा. उत्तमराव भगवान काळे

१८ वर्षाचा जय आता १२वी सायन्सला शिकत होता. एस.एस.सी. परीक्षेत तो ९९% गुण मिळवून तालुक्यात पहिला क्रमांकानं उत्तीर्ण झाला होता. समाजात, गावात मोठं कोड-कौतुक झालं. सत्कार, सन्मान ही झालेत. जय लहानपणापासूनच अत्यंत बुद्धीवान, उंच, गोरापान देखणा होता. जयनं मोठं होऊन काही वेगळचं करावं असं त्याच्या आई वडिलांची इच्छा होती. तसं ते जयला मधून-मधून बोलून दाखवत असे. जयचे वडील शिक्षक म्हणून नोकरीस होते. जयला त्यांनी ११वी, १२वी करिता कोटा (राजस्थान) येथे आय.आय.टी.च्या तयारी वर्गाला नामांकित क्लासमध्ये प्रवेश घेतला. दोन वर्षाची अडीच लाख फी भरली. जय अत्यंत बुद्धीमान असल्यानं भविष्यात त्यानं आय.आय.टी. इंजिनिअर व्हावं असं वडिलाचं स्वप्न होतं. एकुलत्या जयकडे आई-वडिलाचं तसं विशेष लक्ष होतं.

भारतात आणि महाराष्ट्रात कोरोनानं कहर केला होता. महाराष्ट्रात पुर्णपणे लॉकडाऊन सुरू झालं. जय कोट्याहून काही काळासाठी घरी परत आला, आणि घरीच ऑनलाईन क्लास सुरु झालेत. आई-वडिलांनी जयची विशेष काळजी घेतली. जयला वरच्या मजल्यावर अभ्यासासाठी स्वतंत्र खोली, पुस्तकं, टेबल, खुर्ची, बेड आणि सोबत लॅपटॉपसह अँड्रॉईड मोबाईलही दिला. जयच्या कोटा येथील क्लासचे टेस्ट पेपर ही अधून-मधून होत असे. त्यात जय टॉपर होता. क्लासचे संचालक, प्राध्यापक ही जयचे कौतुक करत असे, जयला भविष्यात उज्वल यश मिळेल आणि त्याला निश्चित आय.आय.टी. ला प्रवेश मिळणार अशी त्यांची ही खात्री होती.

भारतात कोरोनानं थैमान घातलं होतं. भारतभर ट्रॅव्हल्स आणि रेल्वे बंद झाली होती. जयचे ऑनलाईन क्लास चालूच होते. टेस्टमध्ये तो टॉपला होता. तो रात्रंदिवस अभ्यास करीत होता. टेस्ट पेपर होत असे. वडिलांचा त्याच्यावर अत्यंत विश्वास होता. तसं लक्षही होतं. जय एकटाच वरच्या मजल्यावर अभ्यास करीत असे पण पण जयला मधूनच मोबाईलवर गेम खेळण्याची चटक लागली. तो आता वडिलांची नजर चुकवून त्यांना न कळता रात्री-बेरात्री जागून मोबाईलवर पब्जी गेम खेळू लागला. वडिलांना याचा थांगपत्ताही लागू देत नव्हता. जय रात्रंदिवस अभ्यास करतो असाच त्यांचा गोड समज होता.

आता जय मोबाईलवर गेम खेळण्यात इतका आहारी गेला की, रात्र-रात्र तो पब्जी गेम खेळू लागला. त्याशिवाय त्याला पर्यायच नव्हता असच घडू लागलं आणि एक दिवस... आई-वडील घरी नसतांना एकांतात जय मोबाईलवर पब्जी गेम खेळू लागला. गेम खेळता-खेळता तो त्या गेममध्ये इतका डीप (खोलवर) गेला की त्याला त्या गेममधून बाहेर येताच आले नाही. गेममधील ऑडर्स तो फॉलो करु लागला. त्याला काहीच कळत नव्हतं, तो काय करतोय याच ही त्याला भान राहिलं नव्हतं. मोबाईलवरील गेममधील ऑर्डरप्रमाणेच तो सर्व काही करीत होता, इतका की त्याला आता फाशी घेतल्याशिवाय पर्याय नव्हता. मोबाईल वरील गेममधील ऑर्डरप्रमाणे त्याने खोलीचा दरवाजा बंद केला. दोर पंख्याला बांधला. खुर्चीवर उभा राहिला. भराभर ऑर्डर सुटत होती. आणि जयने दोर गळ्याला लावला आणि फाशी घेतली. पब्जी गेम संपला. रात्री उशीरानं आई-वडील घरी आले. जय! जय!! आवाज येईना. गावातील लोक जमा झालेत. दरवाजा तोडला. पाहतो तर काय? समोरील दृष्य पाहून आई-वडील ओक्सा-बोक्सी रडू लागलेत. सारं गाव हादरलं, समाज हादरला, सारं कुटूंब दु:ख सागरात लोटलं गेलं. होत्याचं नव्हतं झालं. कुटुंबातला एकुलता, भविष्यातला आय.आय.टी. इंजिनिअर कायमचा सर्वांना सोडून गेला. दुसरे दिवशी, पोलीस चौकशी झाली. मोबाईल तज्ञांना बोलावण्यात आलं. जयच्या मोबाईलची 'बॅक हिस्ट्री' तपासली असता हा सर्व प्रकार लक्षात आला. शेवटची ऑर्डर होती. 'आता फाशी घे.' समाज बांधवांनो, आपली मुलं, कितीही हुशार असू देत, त्यांच्यावर इतका फाजील विश्वास ठेवू नका. मधून-मधून त्यांच्या जवळ जाऊन, त्यांच्या वह्या, पुस्तकं, होमवर्क, अभ्यास आणि इतर, मोबाईल सह चौकशी करीत रहावे असं मला वाटतं. मधून-मधून नकळत त्याच्या मोबाईलवर आलेला व गेलेला डाटा पहा. त्याच्याशी मैत्री करुन विश्वासात घ्या. त्याच्यावर कोणतंही दडपण न आणता त्याच्या कलेन त्याला काय व्हायचं ते होऊ द्या. अतिरेक्यांनी तयार केलेले हे खतरनाक गेम जीव घेणे असतात. त्यास मोजके मुलं बळी पडतात. वरील घटना एक सत्य कथा आहे. सामाजिक प्रबोधन व्हावं याकरता या लेखप्रपंच करीत आहे.



लोकमत वृत्तपत्राचे चेअरमन विजय दर्डा यांच्याशी लोकमत दिवाळी मिलन या कार्यक्रमांमध्ये भेट झाली. त्यांनी अतिशय आपुलकीने ग्रॅव्हिटी डाय कास्टिंग बद्दल टेक्निकल व प्रोसेस ची माहिती करून घेतली तसेच त्याचा एप्लीकेशन कुठे आहे व त्याचा बिजनेस किती आहे खूप चांगली मुलाखत झाली व त्यांनी लोकमतच्या प्रत्येक कार्यक्रमाला येण्याचे त्यांच्या लोकांना निर्देश दिले. भविष्यामध्ये एमएसईबी व कास्टिंग विषय वृत्तपत्रांमध्ये कव्हरेज देण्याचे टीमला आश्वासन दिले.

उन्हाळ्यात डोळ्यांची काळजी कशी घ्याल ?

डॉ. सुधाकर संभाजीराव तहाडे नेत्रशल्यचिकित्सक, जिल्हा सामान्य रुग्णालय, नांदेड



उन्हाळा आणि कडक सूर्य हे मजा आणि दुःखाच्या प्राणघातक संयोजनापेक्षा कमी नाहीत. भारतातील उन्हाळा नेहमीच तीव्र असतो. असे असले तरी, आम्ही अनेकदा सूर्य आणि उष्णतेच्या परिणामांचा सामना करण्यासाठी तयार राहण्याचा प्रयत्न करतो. सर्वोत्तम सनक्रीम निवडण्या –पासून ते आपल्या चेहऱ्याला सुंदर स्कार्फ बांधण्यापर्यंत, आपल्या त्वचेला टॅनिंग किंवा अपायकारकपणे इजा होण्यापासून स्वतःला मदत करण्यासाठी आपण काय करत नाही? तथापि, आपल्या शरीरातील इतर सर्वात संवेदनशील संवेदी अवयवाचे काय? होय, आम्ही आमच्या डोळ्यांबद्दल बोलत आहोत. उन्हाळ्यात आपल्या त्वचेप्रमाणे डोळ्यांनाही तितकेच नुकसान होते. तथापि, आमच्या उन्हाळ्यात काळजी घेण्याच्या संरक्षणात्मक उपायांच्या तयारीच्या बाबतीत आम्ही अनेकदा डोळ्यांच्या काळजीकडे दुर्लक्ष करतो. हीच वेळ आहे जेव्हा आपण डोळ्यांची काळजी घेण्याचे उपाय आणि उपायांना आपले सौंदर्य आणि आरोग्य राखण्यासाठी एक महत्त्वाची पायरी मानतो. आपल्या डोळ्यांचे आरोग्य सुरक्षित ठेवण्यासाठी उन्हाळ्यात या सात टिप्स पाळल्या पाहिजेत.

१) प्रभावी संरक्षणात्मक चष्मा घेण्याची वेळ आली आहे सनग्लासेस उन्हाळ्यात आपल्या डोळ्यांसाठी आवश्यक आहेत. आपल्या डोळ्यांना सूर्याच्या हानिकारक अल्ट्राव्हायोलेट किरणांच्या संपर्कापासून संरक्षण आवश्यक आहे कारण अतिनील किरणांमुळे आपली दृष्टी गंभीरपणे खराब होऊ शकते. म्हणून, प्रत्येक वेळी दिवसा बाहेर जाताना सनग्लासेस घालण्याची जोरदार शिफारस केली जाते.

२) सनग्लासेसचा उत्तम दर्जाचा चष्मा निवडण्याची खात्री करा सनग्लासेसची जोडी निवडताना त्याच्या गुणवत्तेकडे लक्ष द्या. सनग्लासेस चांगल्या दर्जाचे नसतील तर ते घातल्याने डोळ्यांना फायदा होत नाही. म्हणून, सनग्लासेस निवडताना ते UVA आणि UVB दोन्ही किरणांपासून डोळ्यांचे संरक्षण करण्यास सक्षम आहेत याची खात्री करा.

३) डोळे झाकल्याशिवाय तलावात डुबकी मारू नका, उन्हाळ्यात पोहण्याइतके आरामदायी इतर कोणतेही काम वाटत नाही. तथापि, विशेषतः उघड्या डोळ्यांनी तलावामध्ये डुबकी न घेण्याचा सल्ला दिला जातो. पाण्यात असलेले क्लोरीनचे प्रमाण डोळ्यांसाठी अत्यंत घातक ठरू शकते. म्हणून, पुढच्या वेळी पूलमध्ये डुबकी मारताना, स्विमिंग गॉगल बाळगण्यास विसरू नका.

४) स्वच्छतेकडे लक्ष द्या. उन्हाळा हा घामाचा ऋतू आहे, दिवसभर आपल्याला सर्व प्रकारच्या जंतू आणि बॅक्टेरियांचा सामना करावा लागतो. अशा परिस्थितीत, आपण अनेकदा उघड्या हातांनी डोळे चोळल्यास, जंतू डोळ्यांच्या संपर्कात येतात. त्यामुळे डोळ्यांना संसर्ग आणि ॲलर्जी होऊ शकते. म्हणून, निरोगी डोळ्यांसाठी, स्वच्छतेची काळजी घ्या आणि अधिक वेळा हात धुवा.

५) डोळ्यांचे थेंब वापरून डोळ्यांना स्नेहन ठेवा. उन्हाळ्यात डोळे कोरडे होणे आणि जळजळ होण्याचा अनुभव येतो. हे बहुतेक लोकांमध्ये उद्भवते जे उन्हात बाहेर काम करण्यासाठी बराच वेळ घालवतात. डोळ्यांवर जास्त ताण आल्याने देखील वेदना होऊ शकतात. या समस्येपासून मुक्त होण्यासाठी प्रिस्क्रिप्शनवर आय ड्रॉप्स वापरण्याचा सल्ला दिला जातो. हे डोळ्यात वंगण घालेल आणि वेदना आणि कोरडेपणा दूर करेल.

६) भरपूर पाणी प्या. डिहायड्रेशन ही एक मोठी समस्या आहे जी आपल्याला अनेकदा उन्हाळ्यात सामोरे जावे लागते. यामुळे आपल्या शरीरात पाण्याची कमतरता तर होतेच पण त्यामुळे डोळे कोरडे आणि चिडचिड होतात. डिहायड्रेशनमुळे अश्रू ग्रंथी आपल्या डोळ्यांना ओलसर ठेवण्यासाठी पुरेसे अश्रू निर्माण करण्यास असमर्थ ठरतात. कोरड्या डोळ्यांमुळे डोळ्यांच्या आणखी समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे उन्हाळ्यात भरपूर पाणी पिणे गरजेचे आहे.

७) चांगली झोप घेऊन डोळ्यांना आवश्यक विश्रांती द्या. अभ्यासानुसार असे दिसून आले आहे की जे लोक दिवसातून अठरा तास किंवा त्याहून अधिक काळ काम करतात त्यांना दृष्टी कमकुवत होण्याची शक्यता असते. म्हणून, आपल्या डोळ्यांना आवश्यक विश्रांती देणे आपल्यासाठी महत्वाचे आहे.

***



अंकिता

बीट सप्लायर्स व उत्पादक



प्रोप्रा. रामकृष्ण तुळशीराम गारे
मो. **8805778851**

गणेश रामकृष्ण गारे
मो. 8806288768 /9764312822



कु. अंकिता गणेश गारे



चि. युवराज गणेश गारे



चि. शिवम् गणेश गारे

आमचेकडे सर्व साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील

मु. पो. चाटोरी, ता. निफाड, जि. नाशिक

लग्नाआधी विचारा हे पाच प्रश्न...

– डॉ. संजय मित्तल



वैवाहिक जीवनात दोन व्यक्तींनी एकमेकांना समजून घेणे जितके महत्त्वाचे आहे, तितकेच दोन व्यक्तींमध्ये आर्थिक समज असणेही महत्त्वाचे आहे. बदलत्या जीवन परिस्थितीमुळे, चांगल्या भविष्यासाठी, घट्ट नाते संबंधासाठी वित्तविषयक प्रश्न विचारणे महत्त्वाचे आहे. लग्नाआधी लोक सहसा एकमेकांच्या आवडी–निवडी विचारतात. कुटुंबाबाबत चर्चा होते, पण यासोबतच एक अतिशय महत्त्वाचा विषय असतो तो म्हणजे अर्थ. लग्नानंतर आयुष्य जसजसे बदलते तसतसे जबाबदाऱ्या आणि गरजा दोन्ही बदलतात. जर दोन व्यक्ती वेगवेगळ्या आर्थिक दृष्टिकोनाने राहत असतील तर वैवाहिक जीवनात नंतर समस्या उद्भवू शकतात. त्यामुळे लग्नाआधी पैसा आणि त्याचे व्यवस्थापन याबद्दल बोलल्याने लग्नानंतरच्या प्रत्येक परिस्थितीला सामोरे जाणे खूप सोपे जाते. म्हणून वित्तविषयक काही प्रश्न–उत्तरे विचारून, आपण एकमेकांचा दृष्टिकोन आणि योजना सहजपणे समजून घेऊ शकतो.

१. तुमचे उत्पन्नाचे स्रोत कोणते आहेत आणि पैशाचे व्यवस्थापन कसे करता? – आपण ज्या व्यक्तीशी लग्न करण्याचा विचार करत आहोत त्या व्यक्तीच्या उत्पन्नाचे स्रोत आणि खर्च करण्याच्या सवयींबद्दल आपण प्रश्न विचारू शकतो. आपल्या जीवनाची उद्दिष्टे काय आहेत आणि त्यांची उद्दिष्टे काय आहेत यावर चर्चा केल्याने आपल्याला दोघांच्या विचारसरणीतील फरक समजेल. त्यांना विचारा की ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी त्यांची योजना आहे का? बजेट, गुंतवणूक आणि आपल्या जोडीदाराच्या खर्च करण्याच्या सवयींचा आपल्या भविष्यावर खूप मोठा प्रभाव पडतो, त्यामुळे त्याबद्दल स्पष्टपणे बोलणं खूप गरजेचं आहे.

२. तुमच्यावर सध्या काही कर्ज किंवा थकबाकी आहे का?

आपण आपल्या भावी जोडीदाराने घेतलेले सध्याचे कर्ज आणि त्याचे हप्ते याबद्दल बोलले पाहिजे. विद्यमान कर्ज आणि भविष्यात कर्ज मिळवण्याची क्षमता आपल्या जीवनातील उद्दिष्टांवर परिणाम करू शकते. जसे की आपले स्वतःचे घर, कार खरेदी करणे किंवा इतर कोणतीही जीवन उद्दिष्टे आणि गरजांशी संबंधित इतर कर्ज. आपण आपल्या जोडीदाराच्या क्रेडिट स्कोअरवर चर्चा केल्यास काहीही चुकीचे होणार नाही. खराब क्रेडिट स्कोअर आपल्या जोडीदाराची सध्याची आर्थिक परिस्थिती, कर्ज परतफेडीची स्थिती आणि सवयी दर्शवू शकतो.

३. लग्नानंतर आपण आपल्या पैशाचे व्यवस्थापन कसे करू?

लग्नानंतर आपण आपले आर्थिक एकत्रीकरण करण्याचा आणि आपले जीवन एकत्र चालवण्याचा निर्णय घेऊ शकता. हे दोघांसाठी सोपे असू शकते. कोणी कशावर खर्च करायचा आणि कोणता खर्च उचलणार हेही आपण ठरवू शकतो. उदाहरणार्थ, जर पतीने गृहकर्जाचे हप्ते भरायचे ठरवले, तर पत्नी कमावती असल्यास कार कर्जासारखे इतर कर्जाचे हप्ते भरू शकते. विलीनीकरणाबाबत मतभेद असले तरी काही गुंतवणूक एकत्र करणे सामायिक संपत्ती निर्माण करण्यास उपयुक्त ठरते.

४. आपण आपल्या आयुष्याचे ध्येय कसे साध्य करू शकतो?

लग्नानंतर प्रत्येक विवाहित जोडप्याची स्वतःची ध्येये असतात, जसे की स्वतःचे घर, स्वतःची गाडी, प्रवास, मुलांना उत्तम शाळा किंवा महाविद्यालयात शिक्षण देणे इ. प्रश्न विचारावे आणि एकमेकांशी चर्चा करावी की ही उद्दिष्टे साध्य करण्यासाठी तुम्ही कसे नियोजन करता. नियोजनाशिवाय काहीही साध्य होत नाही हे माहीत आहे का? तो काय विचार करतो आणि आपण दोघे कोणते खर्च नियंत्रित करू, बचत करण्यावर आपण कसे लक्ष केंद्रित करू इत्यादींबद्दल दोघांनीही बोलले पाहिजे.

५. आपले घरगुती बजेट आणि जीवनशैलीचे व्यवस्थापन कसे कराल? – प्रत्येकाला लग्नानंतर एक सुंदर आणि विलासी जीवनाचा आनंद घ्यायचा असतो, परंतु आपण आपले घर आणि बचतीचे बजेट बनवण्याबद्दल देखील बोलले पाहिजे जेणेकरून आपण आपले जीवन सुरळीतपणे चालवू शकू. लग्नाआधी, समोरची व्यक्तीही आपल्यासारखी बचत करण्यावर विश्वास ठेवते की नाही हे जाणून घ्यावे. याशिवाय कोणते खर्च करावेत, कोणते ऐषोआराम उपभोगले पाहिजेत आणि कोणते ऐषोआराम टाळले पाहिजेत यावरही चर्चा करायला पाहिजे.

***

अल्पवयात फुटतात वासनेचे धुमारे !



* शारीरिक आकर्षणाला समजलं जातेय प्रेम
* मैत्रीच्या दशेत जवळचेच करतात घात
* ऑनलाईन पॉर्नसाइट वाढवतात धोका
* पालकांनी मुलांचे स्क्रीन टाईम पहावे
* शाळांमधून लैंगिक जनजागृती करावी

प्रेमाची व्याख्या करणे आज तसं कठीण आहे. प्रेम म्हणजे माया, ममता, आपुलकी, आकर्षण, कळकळ, मैत्रभाव, भक्ती, आवडणे, दया, लैगिंक इच्छा, प्रिय असणे, वात्सल्य, ध्यास, निष्ठा असे डझनभर शब्द शोधता येऊ शकतात. पण आज शाळेत जाणारे कसंबसं दहाबारा वर्षांचं माप ओलांडणाऱ्या मुलींना प्रेमाचे पंख फुटू लागतात. हे पंख आज वसंत ऋतुतील पालवीप्रमाणे तरुणांना आकर्षित करु लागतात. सोळाव वरीस धोक्याच तर कायद्याच्या चौकटीतील अठराच वय असं म्हटलं जात असले, तरी अल्पवयातील मुली अन मुले एकत्र येत असल्यामुळे वासनेचे धुमारेच फुटू लागतात. पण ते कुटुंबाला विनाशाकडे नेणारेच ठरत असतात. त्यामुळे पालकांनी जागृतपणे आपल्या पाल्याकडे लक्ष देणे आज काळाची बनली आहे.

सातारा जिल्ह्यात पोलीस ठाण्याच्या रेकॉर्डवरील माहितीनुसार फेब्रुवारी २०२३ मध्ये इयत्ता सातवीमधील मुलगी इयत्ता नववीमधील मुलाच्या अत्याचारातून गर्भवती राहिल्याचे समोर आले. या घटनेमुळे जिल्ह्यातील पोक्सोच्या गुन्ह्याचे भयानक वास्तव समोर आले. जानेवारी २०२१ ते जानेवारी २०२३ पर्यंत तब्बल ३१२ गुन्हा दाखल करण्यात आले होते. ही आकडेवारी जानेवारी २०२३ पासून २०२४ पर्यंत त्याच तुलनेत राहिली आहे. या घटनेने साताराच नव्हे जिल्ह्यातील समाजमन ढवळून निघाले आहे. या वाढत्या आकडेवारीला कोण जबाबदार? आई, वडील की समाज याबाबत मतमतांतरे असू शकतील. पण सर्वाधिक जबाबदार हे आईवडीलच समजले जात आहेत. त्यामुळे आजच्या वाढत्या आकडेवारीवरुन तरी आई वडील यांनी यामधून बोध घ्यावा, अशी अपेक्षा सातारकरांमधून व्यक्त केली जात आहे.

सातवीतील मुलगी ही नववीतील मुलाच्या अत्याचाराला बळी पडते. अन ही बाब पुढे ती गर्भवती झाल्यानंतरच कळत असेल तर आईवडील यांचे पाल्याकडे दुर्लक्ष होतेय, ही बाब आज दुर्लक्षून चालणार नाही. कुमारवयात पायरी चढतानाच तोल घसरण्याचे प्रमाण हे आता मोबाईलमधील नवनवीन ॲपचा प्रताप म्हणावा लागेल. कायद्याच्या चौकटीतील अठराच वय आता बाजूलाच राहिले आहे पण त्यापूर्वीच बारा तेरा वर्षातील मुलींचा जाणारा तोल हा समाज मनाला नक्कीचा विचार करायला लावणारे ठरत आहे. जानेवारी २०२१ ते जानेवारी २०२३ या कालावधीत ३१२ पोक्सो कायद्यांतर्गत गुन्हे जिल्हाभरात दाखल आहेत. यामध्ये २०२१ मध्ये अत्याचाराचे १११, विनयभंगाचे ७८ तर २०२२ मध्ये अत्याचाराचे १२७ व विनयभंगाचे ८४ आणि जानेवारी २०२३ मध्ये अत्याचाराचे ८ व विनयभंगाचे ४ गुन्हे दाखल झाले आहेत. जानेवारी २०२३ ते आजपर्यंत यामध्ये वाढच होत राहिली आहे. त्यामुळे जिल्हावासियांमधील समाजप्रबोधन करणाऱ्या चळवळींनी समाजजागृतीसाठी पुढे आले पाहिजे.

समाजजागृती, समाजप्रबोधन आज जिल्हावासियांच झालं नाही तर आगामी काळात आजची आकडेवारी ही भयावह असणार आहे. त्यामुळे आतापासूनच पोलीस प्रशासनासह समाजातील सर्वच घटकांनी यावर नियंत्रण ठेवण्यासाठी पुढाकार घेतला पाहिजे.

बालकांचे लैंगिक अत्याचारापासून संरक्षण करण्यासाठी हा कायदा २०१२ पासून लागू करण्यात आला आहे. पण तरीही लैंगिक अत्याचाराला बळी पडण्याचे प्रमाण खूपच आहे. हे अत्याचार करणारे विशेषत: जवळचे मित्र, नातेवाईकच असल्याचे पोलीस ठाण्यातील गुन्ह्यांची उकल होत असताना या बाबी पुढे येत आहेत. ९९ टक्के गुन्हे हे ओळखीच्या व्यक्तीकडूनच झाल्याचे दाखले पोलीस दप्तरी पहायला मिळत आहेत. अल्पवयीन मुलांमध्ये सोशल मिडीयाचा अधिक प्रभाव आहे. त्यामुळेच मुली अन मुलांच्यात मानसिक अन शारीरिक जवळीक वाढू लागली आहे. शारीरिक आर्कषणामुळे मग अत्याचार, विनयंभगाचे गुन्हे घडू लागले जात आहेत. मुलामुलींची मैत्री ही काहीवेळा तिचं रुपांतर शारिरीक आकर्षणात होत असते. त्यामुळे आईवडील यांनी आपला पाल्य मोबाईलवर ऑनलाईनमध्ये कोणता अभ्यास करतो हे पोलीस दप्तरी नोंद झाल्यावरच कळत आहे. त्यामुळे पालकांनी सजग राहणे हे त्यांच्या व संपूर्ण कुटुंबाच्या हितावह राहणार आहे. साताऱ्यातील अल्प वयातील मुलगी अन मुलगा यांचे प्रताप पोलीस डायरीच्या माध्यमातून संपूर्ण जिल्हावासीयांना समजले तेव्हा समाजमन ढवळून गेले. आपला पाल्य आता नेमक्या कोणत्या वाटेवर आहे हे पहा. असा कळत न कळत संदेशच मिळाला. साताऱ्यात इयत्ता सातवीतील विद्यार्थीनीचे वय तसं खेळण्या बागडण्याच. पण या मुलीच्या शाळेतील दुसऱ्या गल्लीत असणाऱ्या शाळेतील नववीच्या विद्यार्थ्याने सप्टेंबर २०२२ मध्ये तिच्याशी गोड बोलून त्या मुलीच्या घरातच तिच्याशी संबंध ठेवले.

या घटनेनंतर त्यावेळी त्या मुलीने हा प्रकार घरातील कोणालाच सांगितला नाही. आता निसर्गनियमाने त्याचा चमत्कार दाखवला. नियमित येणारी मासिक पाळी अनियमित झाल्यामुळे रुग्णालयात तपासणी केली असता धक्कादायक प्रकार समोर आल्यानंतर मुलीच्या आईवडिलांची जमिनीखालील मातीच सरकली. आता पुढे तिची सोनोग्राफी करण्यात आली त्यावेळी ती चार महिन्याची गर्भवती असल्याचे समोर आल्यानंतर त्यावेळी शाहुपूरी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला. या सर्व घटनाक्रमाचे मुळ अन कुळ पोलीस दप्तरात शोधताना इन्टाग्रामच्या मैत्रीच गुढ उजेडात आलं. या मुलाने इन्स्टाग्रामवरुन मुलीला पाठवलेल्या

संदेशाला तिच्या कल्पनेप्रमाणे दिलेल्या उत्तराच पुढे मैत्रीत रुपांतर झाले. ही मैत्रीच प्रेमापेक्षा शारीरिक आकर्षण ठरली. अन त्यातूनच ही घटना घडली. त्यामुळे पालकांनो आपला मुलगा, मुलगी मोबाईलच्या दुनियेत नेमकी करतात तरी काय? याचा अधून मधून त्यांच्याशी मैत्री व आदरयुक्त भीती ठेवत संवाद करत चला. ते त्यांच्या व कुटुंबाचे हितावह असेल. त्याचबरोबर शाळांमधूनही लैगिंक शिक्षणाचे धडे मिळणे तितकेच गरजेचे राहणार आहे. प्रेम अन आकर्षण यामधील वास्तव न कळल्यामुळे मुली-मुले अभासी दुनियेत जाऊन क्षणिक आनंदात जात असतात. पण हा आनंदच पुढे तिच्यासह कुटुंबाची वाटचाल विनाशाकडे नेत असते. तर मुलगाही याच अभासी दुनियेत राहिल्यामुळे अल्पवयात तो कायद्याच्या चौकटीतून बाहेर पडण्याच्या प्रयत्नात मनामध्ये प्रेमातील आकृतीपेक्षा विकृतीकडेच त्याचा ओढा अधिक वाढल्याचे आजपर्यंतच्या पोलीस ठाण्यातील दप्तरी नोंदीतील बोलकी आकडेवारी आज सर्वांनाच विचार करायला लावत आहे. आज आपल्या कुटुंबातील प्रत्येक सदस्यांच्या हातातील मोबाईलची गोळाबेरीज अन त्याचा प्रतिमहाचा खर्च याचा विचार केला तर आपली वाटचाल नेमकी कुठं चालली आहे. अन आपण नेमकं कोणत्या व्यवस्थेला प्रोत्साहन देत आहे, ही बाब प्रकर्षाने प्रत्येकाला जाणवल्याशिवाय राहणार नाही. त्यामुळे अजूनही वेळ गेली नाही, सोशल मिडीयाचा आवश्यक तेवढाच वापर केला पाहिजे. अन्यथा येत्या काळात समाजातील एकोप्याची कुटुंबव्यवस्थाच विस्कळीत झाल्याशिवाय राहणार नाही.

प्रेमाच वास्तव दोघांनाही ज्ञात असावं..!

प्रेम करणाऱ्यांमध्ये जेव्हा ब्रेकअपची वेळ येते. तेव्हा तुमच्या आवडत्या व्यक्तीपासून विभक्त होता. तेव्हा ते विसरायला काही दशकेही लागू शकतात. यामध्ये मानसिक त्रासही होत असतो. संबंधित व्यक्तीची ही अनेकदा आठवणच येत असते. ही परिस्थिती जेव्हा येते त्यावेळी तुम्ही खऱ्या अर्थाने प्रेमात असता. प्रेमात पडणे ही सुखद भावना आहे. पण मुलाने मुलीला पाहताच त्या क्षणी प्रेमात पडल्याचे अनेक उदाहरणे ऐकायला मिळत असतात. पण वास्तवात पाहताच क्षणी प्रेमात पडणे अशी गोष्ट कधीच होत नसते. अनेकदा आकर्षणाला आपण प्रेम समजतो. त्यामुळे प्रेम आणि आकर्षण या दोन्ही गोष्टीमधील वास्तव समजणे हे दोघांच्याही हितावह असते. आकर्षण हे क्षणिक असते. तर प्रेम हे चिरकाल टिकणारे असते. याची जाणीव दोघांनाही असणे तितकेच गरजेचे आहे.

प्रेम म्हणजे हार्मोन्सचा झोल..!

प्रेम म्हणजे प्रेम नसतं, तो असतो हार्मोन्सचा झोल..! असं म्हटलं जाते. सायन्सनुसार प्रेमात पडलेल्या व्यक्तीच्या शरीरात काही बदल होत असतात. हार्मोन्सच्या गुंत्यामुळे कमी जास्त स्त्रवण्यामुळे ती व्यक्ती प्रेमात गुंतत जाते. प्रेमात पडण्याचा संबंध हा मनापेक्षा मेंदूशी जोडलेला असतो. म्हणूनच प्रेम म्हणजे नुसतं प्रेम नसतं तर त्यामागे हार्मोन्सचा गुंता किंवा सध्याच्या पारावरील भाषेत त्याला झोल म्हणूनही म्हटलं गेले आहे. आपलं शरीर हे फक्त रिॲक्शन देत असते. प्रेमात पडण्याच्या कारणामध्ये हार्मोन्सच मजबूत झालं की एखाद्या व्यक्तीबद्दल आपल्याला आकर्षण वाटायला लागत असते.

मोबाईलमधील नेमका अभ्यास पालकांनी तपासावा.

मुलगी, मुलगा मोबाईलमध्ये डोके घालून ऑनलाईनचा अभ्यास कोणता करत आहे. याबाबत पालकांनी सतर्कच राहिले पाहिजे. मोबाईलमध्ये घेण्यात आलेले तरुणाईच्या आकर्षणासाठी असलेले ॲप याबाबत लक्ष दिले पाहिजे. अनेकदा ही मुले आभासी जीवनाकडे आकर्षित होत असतात. अन पोलीस ठाण्याची वारी जेव्हा करायला लागते त्यावेळी आपल्या मुलांचे प्रताप दिसून येत असतात. त्यासाठी आजची पाटीपेन्सिलवरुन सोशल मिडीया वापरणाऱ्या पिढीने आपली मुले, मुली मोबाईलमधील कोणते ॲप कुठे दडवत असतात. याबाबतही संगणक तज्ञ यांच्याकडून माहिती करुन घेतली तर भविष्यातील होणारी अनर्थ टाळता येऊ शकतील.

***

एखतपूर मुंजवडीच्या उपसरपंचपदी सागर कुंभार यांची निवड



सागर कुंभार यांची उपसरपंचपदी निवड झाल्याने त्यांचा सत्कार

सासवड : पुरंदर तालुक्यातील एखतपूर-मुंजवडी ग्रामपंचायतीच्या उपसरपंचपदी भाजपा व शिवसेनेचे सागर कुंभार यांची बिनविरोध निवड झाली आहे. ग्रामपंचायतीच्या सर्व सदस्यांना काम करण्याची संधी मिळावी म्हणून विद्या हनूमंत झुरंगे यांनी ठरल्याप्रमाणे उपसरपंच पदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे या रिक्त जागेसाठी निवडणूक घेण्यात आली. यावेळी सागर कुंभार यांचा एकमेव अर्ज आल्याने त्यांची बिनविरोध निवड झाल्याची सरपंच शीतल टिळेकर यांनी जाहीर केली. यावेळी पुरंदर तालुका भाजपा अध्यक्ष निलेश जगताप, भाजपा नेते ॲड. श्रीकांत ताम्हाणे, माजी उपसरपंच विद्या झुरंगे, ग्रामपंचायत सदस्य तुषार झुरंगे, सुदर्शन भामे, ग्रामपंचायत सदस्य कोमल गद्रे, जनार्दन मोरे, काळूराम झुरंगे, हेमंत कुंभार, अशोक कुंभार, संजय कुंभार, अमित गोरे आदी मान्यवर उपस्थित होते.

***



श्री. अनिल शिंदे

चरित्रे, आत्मचरित्रे प्रकाशन योजना



सौ. उषा शिंदे

राजकीय, साहित्य, सामाजिक, औद्योगिक, व्यापार, व्यावसायिक इ. अथवा अन्य क्षेत्रात स्वत:चे नाव करणाऱ्या कुंभार समाजातील यशस्वी मान्यवरांची चरित्रे, आत्मचरित्रे प्रकाशित करण्याची योजना

मुलाखत, शब्दांकन, लेखन, संपादन, डी.टी.पी., मुद्रितशोधन, बांधणी सर्व व्यावसायिक जबाबदारी उषा-अनिल प्रकाशन (पुणे) घेणार

ही प्रेरणादायी आत्मचरित्रे प्रकाशित























पुढच्या पिढ्यांना आपल्या ज्ञान, अनुभवाचा वारसा देऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकाने संपर्क साधावा.

उषा-अनिल प्रकाशन

संत गोरा कुंभार सोसायटी, प्लॉट क्र. १०९, साळुंके रस्ता,सहकारनगर क्र. २,
पर्वती, पुणे ४११ ००९. मो. क्र. ९८५०६६७४१६

पुस्तक परीक्षण - बाळूचे तात्या



अनिल शिंदे हे पुण्यातील एक प्रथितयश प्रकाशक आहेत. नव्याने लिहिणाऱ्या अनेकांना त्यांनी प्रोत्साहन देऊन लिहिते केले आहे. वाचकांना आवडेल, रुचेल असं लेखन कसं करावं, त्यातील लालित्य कसं फुलवावं असं मौलिक मार्गदर्शन साहित्य क्षेत्रात पहिलं पाऊल ठेवणाऱ्या लेखकांना अनिल शिंदे यांच्याकडून लाभत असते. त्यांनी स्वतःही विविधांगी विषयावर विपुल लेखन केले आहे. नुकतेच त्यांचे 'बाळूचे तात्या' हे पुस्तक प्रकाशित झाले आहे. आपल्या वडिलांवर लिहिलेले हे व्यक्तिचित्रण आहे. एखाद्या पालकाने आपल्या मुलांवर साहित्य, कला, क्रीडा, संगीत या अभिजात कलांविषयी कशी आवड निर्माण करावी याचा वस्तूपाठ सांगण्यात हे पुस्तक कमालीचे यशस्वी ठरले आहे.

'बाळू' हे लेखकाचे घरातील नाव. स्व. पांडुरंग शिंदे हे त्यांचे वडील. सर्वजण त्यांना 'तात्या' म्हणत. आपल्या तात्यांविषयी लेखकाने भरभरून लिहिताना आपल्या आईच्या संस्कारांचाही उल्लेख केला आहे. पुस्तकाच्या प्रस्तावनेत आपल्या आईच्या शिस्तीची एक आठवण सांगितली आहे. बरं वाटत नाही अशी थाप मारून मधूनच शाळेतून पसार झाल्यावर आईला आपण घरी येण्याचे दिलेले खोटे कारण चालणार नाही ही आईच्या शिस्तीची एक झलक यात प्रकर्षाने जाणवते. घरकाम करता करता आईने आपल्या अभ्यासाकडे, वाचनाकडे बारकाईने लक्ष ठेवल्याची कृतज्ञता लेखक व्यक्त करताना भावूक होतात. आपले आजोबा आणि आई या दोघांनी परिचितांना अडीअडचणीच्या वेळी मदत केल्याचे ते सांगतात. थंडीत कुडकुडणाऱ्या एका मुलाला आई घरातला स्वेटर देते. आईच्या या छोट्या कृतीतून एखाद्या गरजवंताची नड कशी भागवावी हा संस्कार नकळतपणे झाल्याची भावना यात प्रकर्षाने जाणवते. अनिल शिंदे यांनी आईचा फार काळ सहवास न लाभल्याची खंत व्यक्त केली आहे. तथापि वडिलांनी त्यांच्या व्यक्तीमत्व विकासासाठी घेतलेली अपार मेहनत अनेक प्रसंगातून त्यांनी वाचकांना खुलवून सांगितली आहे. तात्यांनी केलेले आपल्या मुलांवरील वाचनाचे संस्कार पहिल्याच प्रकरणात वाचताना वाचन संस्कृतीचा त्यांचा हा पन्नास साठ वर्षापूर्वीचा प्रयोग अत्यंत सफल झाल्याची अनुभूती पुस्तकाच्या पानापानात प्रत्ययास येते. तात्यांचे वाचन अफाट होते. त्यांच्या घरात असंख्य वर्तमानपत्रे, नियतकालिके, साप्ताहिके येत होती. मुलांना वाचनाची गोडी लावणारे 'चांदोबा' हे आकर्षक मासिक घरात येत होते. टाइम्स व इतर इंग्रजी वृत्तपत्रासोबत त्यांच्याकडे देशातील अग्रगण्य असे 'द हिंदू' हे पत्र येत होते.

तात्यांचे स्वत:चे वाचन अफाट होते. मुलांना आवडतील असे पुस्तकातील रोचक, साहसी व गमतीदार प्रसंग घरात जेवताना वडील आम्हाला सांगत असल्याने आपोआप अशा पुस्तकांबद्दल कुतूहल निर्माण झाल्याचे लेखक सांगतात. त्यातील 'श्यामची आई' या पुस्तकाने केलेला पहिला वाचन संस्कार अतिशय संवेदनशील पद्धतीने अनिल शिंदे यांनी वर्णिला आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे ग्रंथप्रेम जोपासण्याचे काम त्यांच्या वडिलांनी केले. हा आदर्श डोळ्यासमोर ठेवून तात्यांनी स्वामी, श्रीमान योगी, कऱ्हेचं पाणी आदी अनेक उत्तमोत्तम ग्रंथांचे मुलांकडून अभिवाचन करून घेतले. बागेत फिरायला घेऊन जाताना तात्यांनी आपल्याकडून 'मनाचे श्लोक' पाठ करून घेतले हे वाचताना तो प्रसंग जसाच्या तसा डोळ्यासमोर उभा करण्याची हातोटी हे अनिल शिंदे यांच्या प्रवाही लेखनाचे एक वैशिष्ट्य म्हणावे लागेल. तात्यांनी लेखकाला पुण्यातील नामवंत पुस्तकांच्या दुकानात नेऊन तिथला खजिना दाखविला, ग्रंथालयाचे सभासद करून घेतले. मुलांना उत्तम चित्रपट पाहायला नेले. त्यातील नीती मूल्यांच्या नेमक्या जागा शोधायला शिकविले. दर्जेदार नाटके दाखविली. हे वाचताना तात्यांची रसिकता, उच्च अभिरूची आणि उत्तमतेची जाण या साऱ्या उत्तम पुरुष लक्षणांना त्रिवार वंदन करावेसे वाटते. ते स्वतः उत्तम कुस्तीपटू होतेच. पण मुलांनाही त्यांनी शरीरसंपदेची गोडी लावली. पोहणे, ज्युदो, बॉक्सिंग आदी क्रीडाप्रकारात तात्यांनी दोन्ही मुलांना नैपुण्य मिळविण्यासाठी प्रोत्साहन दिले. ते उदार होते. अनेक परिचितांच्या तसेच कुटुंबातील सदस्यांना त्यांनी वेळोवेळी आर्थिक मदत केल्याचा गौरवपूर्ण उल्लेख लेखकाने केला आहे.

तात्यांच्या व्यासंगातून, त्यांनी लावलेल्या वाचनाच्या गोडीमुळे आपली लेखणी बहरली असल्याची कबुली अनिल शिंदे यांनी दिली आहे. ''श्यामची आई'' या पुस्तकाने आईची महती गात तिने मुलावर केलेल्या संस्काराचा गौरव केला आहे. वडिलांवर फार कमी लोकांनी लिहिले आहे. अनिल शिंदे यांच्या ''बाळूचे तात्या'' या पुस्तकाने वडिलांच्या अष्टपैलू व्यक्तीमत्वावर प्रकाश टाकला आहे. तसेच आपल्या मुलांवर कला, क्रीडा, साहित्य यांचे मूल्य जोपासण्याचा जो प्रयोग मागच्या पिढीतील एका अष्टावधानी व्यक्तीने केला त्याचं सुंदर दर्शन या पुस्तकात घडले आहे. पुस्तकाचे आकर्षक मुखपृष्ठ आणि आतील रेखाचित्रे सिद्धहस्त चित्रकार रमेश नावडकर यांनी रेखाटली आहेत. ती अत्यंत समर्पक व प्रभावशाली आहेत. मुखपृष्ठावरील वाचनात गुंग झालेल्या तात्यांचे रेखाचित्र अत्यंत बोलके आहे. आतील चित्रे पुस्तक वाचण्याची उत्सुकता वाढवितात. ''बाळूचे तात्या'' हे व्यक्तीचित्रात्मक पुस्तक साहित्य प्रेमींना मोठा वाचनानंद देईल यात शंकाच नाही.

बाळूचे तात्या : लेखक – अनिल पांडुरंग शिंदे
उषा – अनिल प्रकाशन, पुणे
मुखपृष्ठ व रेखाचित्रे – रमेश नावडकर
पुस्तक परिचय – नारायण नामदेव कुंभार, पुणे

***

नारायण नामदेव कुंभार (एखतपूरकर) ह्यांच्या 'गोष्टी गावांशहरांकडील': वास्तव अनुभवदर्शन



माणूस म्हणजे काळानुसार जीवनशोध घेणारा बुद्धिमान प्राणी होय. माणसाने प्रकृतीतून संस्कृतीला गतिशील केले आणि प्रकृतीतील विकृतीला दूर सारले. हा जीवनसंघर्ष इतिहास प्रत्येकाचा एक अमृतकुंभ आहे. असाच अनुभव देणारे नऱ्हेगाव पुणे येथील नारायण नामदेव कुंभार (एखतपूरकर) ह्यांनी लिहिलेले 'गोष्टी गावांशहरां–कडील' हे आत्मजीवनाचे लेखन वास्तवदर्शी आणि प्रेरणादायी आहे.

कुंभार समाजातील नवोदित साहित्यिकांना नेहमीच प्रकाशपर्व ठरणारे पुणे येथील उषा–अनिल प्रकाशनचे प्रकाशक अनिल पांडुरंग शिंदे यांनी लेखकाला खूप मौलिक सूचना करून आपलेपणाने हे पुस्तक ०२ जुलै २०२३ रोजी प्रकाशित केले. ह्या आत्माविश्वकारी पुस्तकाला प्रसिद्ध लेखिका डॉ. संगीता बर्वे ह्यांची अनुरूप प्रस्तावना लाभली आहे. त्या लिहितात,

'गोष्टी गावांशहरांकडील' या लेखसंग्रहामध्ये नारायणरावांनी खेड्यातील आणि शहरांकडील जीवनानुभव शब्दचित्रित० केले आहेत. हे सर्व लेख वाचतांना एकूणच जगण्याविषयी, समाजजीवनाविषयी त्यांना वाटणारा जिव्हाळा किती आत्मीय आहे, याची प्रचिती येत राहते. या लेखसंग्रहामध्ये ग्रामीण आणि शहरी जीवनाचे चित्रण नारायणरावांनी त्यांच्या पद्धतीने सुरेख रेखाटले आहे.

आपल्या जीवनातील अनेक हृदयस्पर्शी अनुभव नारायणराव कुंभार ह्यांनी प्रामाणिकपणे चित्रित केले आहेत. त्यांचा जन्म १ जून १९५७ रोजी पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील एखतपूरकर गावी झाला. त्यांनी प्रतिकूल परिस्थितीत एम.कॉम. जी.डी.सी. अँड ए., सी.ए.आय.आय.बी. ०१, असे उच्च शिक्षण प्राप्त केले. अलाहाबाद बँकेत ३७ वर्षे नोकरी करून ते २०१७ मध्ये सेवानिवृत्त झाले. अलाहाबाद बँकेत नोकरी करताना त्यांनी अनेक सामाजिक, साहित्यिक उपक्रमात भाग घेतला. त्यांनी लिहिले आहे,

''खरंतर मी एक पुस्तकप्रेमी. वाचन हा एक आवडीचा छंद म्हणून मी जोपासला आहे. हे करीत असताना काही वर्षांपूर्वी मी थोडेफार लिहीत होतो. काही कविताही केल्या. मात्र या लेखनामध्ये सातत्य नव्हते. तथापि 'दिसामाजी थोडे लिहीत जावे' या उक्तीप्रमाणे मी काही वर्षे नियमितपणे 'दैनंदिनी' लिहीत होतो. हे करताना आपण काहीतरी लिहितोय याचं समाधान मिळत असे.''

नारायणराव कुंभार ह्यांचा परिवार सुशिक्षित आहे. त्यांची पत्नी सौ. प्रतिमा कुंभार ह्या एक लेखिका आहेत. मराठी विषयाच्या शिक्षिका आहेत. त्यांनी 'प्रकाशाचे बेट' पुस्तक संपादित केले आहे. त्यामध्ये त्यांनी छ. संभाजीनगर येथील त्यांचे वडील कै.प्रा.डॉ. मारुतीराव बारीकराव हिरे ह्यांच्या आठवणी संपादित केल्या आहेत. त्या कवयित्री आहेत. आकाशवाणीवरून त्यांचे अनेक कार्यक्रम प्रसारित झाले आहेत. त्यांच्यामुळे नारायणराव कुंभार ह्यांना अशा लेखनाकडे कसे वळविले हे लेखकाने नमूद केले आहे. आपले आत्मानुभव हे वाचकांना उपयुक्त ठरावे ही लेखकाची इच्छा असते. आत्मपर, आत्मचरित्राचे काही हेतू असतात, त्यापैकी वाचकांना जीवनप्रेरणा हा महत्वाचा हेतू सांगताना नारायणराव कुंभार लिहितात,

''दैनंदिनी लेखनापासून सुरु झालेला हा लेखन प्रवास आता लिखित स्वरूपात पुस्तक स्वरूप धारण करीत आहे. माझ्या लहापणातील गावचे अनुभव मी यात मांडले आहेत. तसेच नोकरीनिमित्त वेगवेगळ्या ठिकाणी फिरत असताना, निवडक शहरांतील मला भावलेले अनुभवही मी यात कथन केले आहेत. या प्रत्येक अनुभवाने मला काहीतरी शिकवलं आहे. वाचकांना हे अनुभव वाचायला आवडतील अशी मी अशा करतो.'' नारायणराव कुंभार यांचा स्वभाव सेवाभावी, निरपेक्ष आणि देतो तो देव स्वरूपाचा आहे. जीवनातील निर्मळपणा त्यांनी जपला आहे. अशा निर्मळ मनातच एक तीर्थस्थळ असते. तेच मला त्यांच्या लेखनात दिसते. निर्मळ मनातून पाझरलेले हे शब्दरूपी अमृतधन समाधान देणारे आहे.

'गोष्टी गावांशहरांकडील' ह्या आत्मपर लेखनाचे अनुक्रमणिकेत दोन भाग केलेले आहेत. 'ग्रामीण' ह्या पहिल्या भागात त्यांना आवडणारी 'मटकीची भाजी', त्यांची प्रेमळ 'आई' यामध्ये त्यांनी लिहिले, ''माझ्या आईचे नाव गंगूबाई नामदेव कुंभार. पुणे जिल्ह्यातील पुरंदर तालुक्यातील एखतपूर हे आमचं गाव. माझं आजोळ जवळच मल्हार गडाच्या पायथ्याशी असलेलं सोनोरी गाव. आमच्या आजोबांची अंजिराची बाग होती. ते सावकार होते. त्यांच्याकडे घोडा होता. आईबरोबर घोड्यावर बसून आम्ही भावंडे आजोळहून एखतपूरला यायचो'' (पृष्ठ १८)

आपली आई कशी कष्ट करणारी, निरक्षर पण मुलांच्या अभ्यासाकडे लक्ष ठेवणारी होती, असे अनेक अनुभव वाचनीय आहेत. 'पहिली कमाई' मध्ये भाऊ श्रीकांत व लेखकाने गावाच्या यात्रेत नारळ विक्रीचा व्यवसाय केला. जत्रेत उरलेले नारळ घरी नेले. लेखक लिहितात, ''आईने ते फोडून, खोबरं वाळवून त्यात लाल तिखट घालून चटणी केली. शेजारी पाजारी देऊन सांगितले, ही आमच्या पोरांची पहिल्या कमाईची आहे बरं'' (पृष्ठ २३) अशी आईची परिस्थितीतही सकारात्मक दृष्टी असल्याचे लेखकाने लिहिले आहे. हाच संस्कार ते जपतात. या आत्मपर पुस्तकात गावातील गणपती उत्सव, यात्रा, शिक्षक, श्रावण महिना, वडिलांचे घड्याळ, शाळा, निवडणुकीतील गमती जमती, आंबा असे अनुभव वाचनीय आहेत.

'शहरी' ह्या दुसऱ्या भागात साहित्यिकांच्या भेटी, मधमाश्यांशी झुंज, नऊ जूनच्या आठवणी, वाचन छन्द, कंगवा, तेलगू चित्रपट, शिस्त, साहित्य संमेलन, हसणे, कविता असे अनुभवचिंतन आहे. मार्च १९७४ ला अकरावी परीक्षा झाल्यावर पाहिलेला हिंदी चित्रपट 'आपकी कसम' अलाहाबाद येथे बँकेत नोकरी करताना १० ऑगस्टचा फेस्टिव्हल कार्यक्रम, चहा पुराण, 'काय ते डोंगर, काय ती झाडी, काय ते हॉटेल' वाचताना आमदार शहाजी बापू पाटील ह्यांची आठवण होते. छायाचित्रण, बँकेचे बोधचिन्ह, 'एका अपूर्व भेटीचा पुर्नयोग'असे अनेक आत्मकथा प्रसंग येथे वाचण्यास मिळतात, ते अगदीच सहजसोप्या भाषेत मांडलेले आहेत. एक निर्मळ मनाचं आणि वास्तवदर्शी अनुभवांचं ही आत्मपर लेखनशैलीचं पुस्तक मनात घर करणारं आहे. सहजसोपी आणि ग्रामीण अनुभवांची भाषा असली तरी ती मौलिक जीवनपोषक आणि प्रबोधक आहे. १२६ पृष्ठांचे हे पुस्तक आई ह.भ.प. गंगूबाई नामदेव कुंभार आणि वडील ह.भ.प. नामदेव गोविंद कुंभार ह्यांना हे त्यांचे पहिलेच पुस्तक लेखकाने अर्पण केले आहे. रमेश नावडकर ह्यांनी छानच मुखपृष्ठ काढले असून अक्षरजुळणी व मुद्रक वेदिका एन्टरप्रायजेस, धनकवडी, पुणे ह्यांनी सौन्दर्यशील बनविले आहे. २२० रुपये किंमतीचे हे पुस्तक कुंभार समाजातील एक प्रभावी लेखन आहे. सहज, सरळ जगण्याची ही अमृतकुपी आहे, एवढे सामर्थ्य असलेले लेखन वाचक नक्कीच वाचतील आणि जाणकार व्यक्ती, संस्था लेखकाचा सन्मान करतील अशी सदिच्छा आहे.

परीक्षण : डॉ. बाबुराव उपाध्ये, श्रीरामपूर जि. अहमदनगर

शशिकला कुंभार लिखित 'जगायचं असतं' हे एका सेवाभावी शिक्षिकेचे आत्मकथन



सातारा जिल्ह्यातील कराड तालुक्यातील बेलवडे बुद्रुक येथील प्राथमिक शाळे तील सेवानिवृत्त शिक्षिका सौ. शशिकला शिवाजी कुंभार ह्यांनी 'जगायचं असतं' हे प्रांजळ अनुभवाचं आत्मकथन मे २०१८ मध्ये प्रकाशित केले. १२ एप्रिल १९५६ रोजी जन्म झालेल्या शशिकलाताई कुं भार यां नी अतिशय प्रतिकूल स्थितीत शिक्षण घेतले. आई जानकी बाई कुंभार आणि वडील मारुतराव कुंभार ह्यांच्या संस्कार व शिस्तीत त्यांचे बालपण गेले. वडील पोलीस खात्यात होते. त्यांची नोकरी धावपळीची, खूप शिस्तीची होती. शशिकलाताई कुंभार लिहितात,

''पुण्यभूमी दौन्ड येथे एका मध्यमवर्गीय कुटुंबात माझा जन्म झाला. माझे वडील पोलीस खात्यात सेवेत होते. त्यामुळे त्यांच्या सारख्या बदल्या होत. त्यांनी प्रामाणिकपणे आपली नोकरी केली. माझी आई जानकीबाई भक्तिरसात अखंड भिजलेली असायची.''

शशिकलाताई कुंभार यांचे प्राथमिक शिक्षण दौन्डला झाले. पुणे शहरातील पाषाण भागातील गोरा कुंभार हायस्कुलला माध्यमिक शिक्षण झाले. फलटण येथे त्यांनी डी. एड. ची पदवी घेतली. महाबळेश्वर येथे प्रथम अध्यापन केले. शिक्षण, समाजक्षेत्रात त्यांना अनेक चांगले, वाईट अनुभव आले. संसार, नोकरी आणि समाजसेवेचे कार्य करताना त्यांना खूप कसरत करावी लागली. त्यातूनच या पुस्तकांची निर्मिती झाली, असल्याचे नमूद केले आहे.

शशिकलाताई कुंभार ह्या लोकशिक्षिका आहेत. महाबळेश्वर, अवकाळी येथे १९७६ मध्ये त्यांनी कस्तुरबा गांधी ट्रस्ट सासवडमार्फत बालग्राम केंद्र येथे पदमभूषण डॉ. शोभनाताई रानडे यांच्यामुळे सेवेची व ज्ञानदानाची त्यांना संधी मिळाली. १९८० साली फलटण येथे भारत सेवक समाज–सर्व्हन्ट ऑफ इंडिया सोसायटी मार्फत समाजजागृती प्रकल्प, जागृत युवा नावाने प्रौढ शिक्षण, अनौपचारिक प्रकल्प संयोजन, पर्यवेक्षक म्हणून त्यांनी कार्य केले. १९८५ ते २०११ या काळात त्यांनी जि. प. शाळेत राजाळे, फलटण, तालुका कराड, बेलवडे बुद्रुक, तळबीड, कासार शिरंबे आदी ठिकाणी ज्ञानदान केले. २०११ ते २०२३ या काळातील त्यांची समाजसेवा अधिक गतिशील झाली. गरीब, गरजू विद्यार्थी आणि अनेक महिलांसाठी त्यांचे कार्य सुरु आहे. डॉ. अनिल अवचट, डॉ. नरेंद्र दाभोलकर इत्यादींनी त्यांच्या कार्य आणि उपक्रमाला भेटी देऊन कौतुक केले. महानुभाव आश्रमातील मुलींना त्यांच्या इच्छेखातर त्यांचे योग्य स्थळी विवाह करून दिले, त्याबद्दल डॉ. नरेंद्र दाभोलकरांनी प्रत्यक्ष भेट घेऊन शुभेच्छा दिल्या. लक्ष्मण माने, समाजसेविका डॉ. शोभनाताई रानडे, अशोक देशमाने, डॉ. बाबा आढाव, मॅक्सीनबाई बर्नसन असे अनेकांचे त्यांना समाजसेवेत मार्गदर्शन, सहकार्य लाभले. भोसरी येथील स्नेहवन आश्रम, जामखेड येथील निवारा आश्रम, नारायणपूर येथील आनंदग्राम, सावरगा येथील ज्ञानाई बालसंगोपन अनाथ आश्रम, कराड येथील आशाकिरण महिला वसतिगृह, पंढरपूर येथील प्रार्थना समाज संचलित वा. बा. नवरंग बालकाश्रम आदी ठिकाणी त्यांनी केलेले कार्य, योगदान प्रेरणादायी आहे.

शशिकलाताई कुंभार ह्यांनी 'जगायचं असतं' ह्या आत्मकथनातून आपले कुटुंब, समाज, सेवाभावी माणसं आणि विविध अनुभवांची प्रामाणिकपणे मांडणी केली आहे. त्यांचे हे लेखन म्हणजे सहजस्फुर्त निर्मिती आहे. अशोक देशमाने 'प्रस्तावना' मध्ये लिहितात,

''शशिकलाताई म्हणजेच आई यांचे 'जगायचं असतं' हे आत्मचरित्र वाचताना जी प्रेरणा मला मिळाळी ती श्रीज्ञानेश्वरी वाचण्याइतकीच पवित्र आहे. आईंनी आणि बाबांनी स्वतः खूप हालाखीतून दिवस काढले. संघर्ष हा त्यांच्या जीवनाचा अविभाज्य घटक होता. परंतु त्यातही त्यांनी सामाजिक बांधीलकीचा कधी विसर पडू दिला नाही हे विशेष. त्यांच्या संस्काराच्या ठेवीमुळे आज त्यांची पुढची पिढीदेखील समाजासाठी कार्य करीत आहे.''

शशिकलाताई कुंभार यांचे माहेरचे नाव पाटसकर होय. भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील जगन्नाथ पाटसकर हे त्यांचे मामा होते. म. गांधी चळवळीत ते होते. त्यांनी तुरुंगवास सोसला. १९६७ ते १९७२ या काळात ते दौन्डचे आमदार होते. समाजवादी विचारांचे ते देशभक्त म्हणून त्यांची कीर्ती आहे. त्यांनी प्रामाणिकपणे अनेक सेवाकार्य केले पण आजही त्यांना राहण्यास साधे घरही नाही, ही खंत लेखिकेने व्यक्त केली आहे. शशिकलाताई कुंभार यांचे कुटुंब सतशील, धार्मिक, वारकरी विचारांचे आहे. २००२ मध्ये वडील वारल्यावर त्यांची आई एकाकी झाली, आजारी पडली तेव्हा आई म्हणाली, ''शशी, तू मांसाहार करत नाहीस, मग माळ घाल आणि आषाढी, कार्तिकी वारी सुरु कर. मी आयुष्यभर वारी केली. तुझ्याशिवाय ही वारी कोणी मनापासून करणार नाही.'' (पृष्ठ १०२) आईचे म्हणणे मान्य करीत शशिकलाताई आजही पंढरीची वारी करीत आहेत. पती शिवाजी कुंभार हे शिक्षकच होते. मुलगा रामकृष्ण, मुलगी वृषाली, बहिणी उषा लक्ष्मण कुंभार, मंगल दत्तात्रय कुंभार व बेबी दत्तात्रय कुंभार ह्यांच्या आठवणी, प्रसंग येथे वाचण्यास मिळतात. ह्या पुस्तकात म. फुले, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे असे लेख परिशिष्टमध्ये समाविष्ट केले आहेत. १२८ पृष्ठांचे हे आत्मकथन वाचनीय, प्रेरणादायी आणि कुंभार समाजातील स्त्रीजीवनावर प्रकाश पाडणारे आहे. पुस्तकात अनेक

छायाचित्रे आणि प्रसंगचित्रे असल्यामुळे त्यांचे अनुभव अधिक बोलके झालेले आहेत. प्रकाशक सौ. उषा अनिल शिंदे पुणे ह्यांनी पुस्तकरचना छानच केली. नावडकर बंधू, पुणे ह्यांनी बोलके मुखपृष्ठ काढले आहे. लेखिकेने 'बदलती मने' व इतर लेखन केले आहे, त्यांच्या प्रांजळ लेखनातून नवोदित महिला वर्गास आपले अनुभव लिहिण्याची प्रेरणा मिळेल, कुंभार समाजातील महिलांचे लेखन फारसे प्रकाशित आलेले नाही. शशिकलाताई कुंभार यांचे आत्मचरित्र वाचून इतर महिला, युवतींनी लेखन करावे अशीच सदिच्छा आहे.

संदर्भटीपा :

०१) शशिकला शिवाजी कुंभार 'जगायचं असतं', प्रकाशक, सौ. उषा अनिल शिंदे, उषा अनिल प्रकाशन, पुणे, मे २०१८, पृष्ठ ०४

०२) तत्रैव, ०५

०३) अशोक देशमाने, तत्रैव ०६, ०७

परीक्षण : डॉ. बाबुराव उपाध्ये, इंदिरानगर,
श्रीरामपूर जि. अहमदनगर भ्रमणसंवाद : ९२७००८७६४०

***

'स्मार्टफोन' मुळे मेंदू दगड बनत चाललाय! - राणी बंग : पालकांनो वेळीच मुलांना सावरा

-अभय लांजेवार



उमरेड : एकीकडे आईवडील जेवणाच्या टेबलवर बसलेले आणि दुसरी कडे मुलांच्या हातात 'स्मार्टफोन'. आई तिच्या बाळाला घास भरवते. तोंडासमोर घास आणून ठेवलेला आणि बाळ मोबाईल गेममध्ये मग्न. मध्येच त्याची इच्छा होईल त्यावेळेस त्याला घास भरविला जातो. मग मुलं सातत्याने मोबाईलमध्येच तोंड खुपसतात. कालांतराने त्यांना इतरांच्या भावना समजत नाही. संवेदना संपल्याचाच हा प्रकार वारंवार घडतो. 'स्मार्टफोन'मुळे मेंदू दगड बनत चाललाय. तेव्हा मुलांनो ब्लू व्हेल, पबजी यासारख्या जीवघेण्या गेमच्या व्यसनापासून आताच सावध राहा. पालकांनो, मुलांना वेळीच आवरा, असा मौलिक सल्ला गडचिरोली जिल्ह्यातील 'सर्च' या संस्थेच्या सहसंचालक पद्मश्री डॉ. राणी बंग यांनी दिला. प्रस्तुत प्रतिनिधीने घेतलेल्या विशेष मुलाखतीच्या निमित्ताने त्या बोलत होत्या.

उमरेट येथील रितीक विवेक कोलारकर (१९) तसेच खुशी जगजित परिहार (२०) रा. हिंगणा या दोन वेगवेगळ्या घटनांमुळे मुलं कुठे भरकटत चालली, असा सवाल करीत यात दोष पालकांचा आहे, असेही त्यांनी स्पष्टपणे सांगितले. रितीक कोलारकर यास पबजीचे व्यसन जडले होते. त्यानंतर त्याच्यावर मेडिकलमध्ये उपचारही केले. मानसोपचार तज्ज्ञांनीही देखरेख केली. त्यानंतर त्याच्या दोन्ही किडन्या निकामी झाल्या. शिवाय घामगंड आजारानेंही तो त्रस्त होता. यातूनच त्याच्यावर मृत्यू ओढवला. आज गल्लोगल्लीत, घरादारात पबजीचे वेड लागल्याचे चित्र दिसून येत आहे. शिवाय या व्यसनाच्या आहारी जाऊन अनेक व्याधीही पुढे येत आहेत. उमरेडच्या या घटनेमुळे समाजमन सुन्न झाल्याचे चित्र आहे.

अलीकडे दोन तीन वर्षाच्या मुलांनाही अगदी बिनधास्त मोबाईल दिला जातो. अशावेळी आमची मुलं-मुली किती स्मार्ट आहेत. त्याचे तोंडभरुन कौतुक केले जाते. इतक्या लहान वयात टीव्हीसमोर, तासन्तास मुलांच्या हातात मोबाईल देणे या बाबी घातक आहेत. मी तंत्रज्ञानास वाईट म्हणत नाही. त्याचा उपयोग कसा करता, हे महत्त्वाचं आहे, अशी मौलिक बाबही त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितली.

'गेम'चे व्यसन महाभयंकर : चित्रपटासारखं आयुष्य सुपरफास्ट नसतं. यामुळे आपली मुलं नेमकी काय करीत आहेत, काय बघत आहेत, याकडे पालकांनी बारकाईनं लक्ष दिले पाहिजे. सतत मोबाईल मध्येच डोकं खुपसत राहिल्यामुळे मेंदू बधिर होतो. आपल्या भावना व्यक्त करता येत नाही. दुसऱ्यांच्या भावनाही समजत नाही, ही बाब अत्यंत धोकादायक आहे. मग खाण्यात, खेळण्यात आणि शिक्षणात आपसुकच दुर्लक्ष होतं. दारु आणि ड्रग्जपेक्षाही पबजी, ब्ल्यू व्हेलसारख्या मोबाईल गेमचे हे महाभयंकर 'व्यसन' आहे.

ही कम्युनिकेशन गॅप : खुशी परिहार ही मुलगी घर सोडून गेली, काय केलं पालकांनी? मुलांवर धाक नको का? संवाद पाहिजे. अशावेळी आई-वडिलांनी चर्चा करायला पाहिजे. संवादाला वेळच नाही. ही जनरेशन गॅप नाही. कम्युनिकेशन गॅप आहे. शाळा-कॉलेजमध्ये पाठवलं. शिकवणी वर्ग लावून दिले की जबाबदारी संपली. मुलांसाठी वेळ काढा. त्यांच्या गरजा समजून घ्या. 'मागेल ते द्यायचं' असे लाड पुरविले गेले की मग त्या मुलांना त्याच सवयी लागतात. एखाद्या प्रेमात नकार दिला की ते पचविण्याची ताकद नसते. मग हत्या नाही तर आत्महत्या घडतात. आपण समाज म्हणून आणि पालक म्हणून कमी पडत आहोत, अशीही वास्तविकता त्यांनी व्यक्त केली.

योग्यवेळी उपचार : हे व्यसन सोडविण्यासाठी योग्यवेळी उपचार महत्त्वाचे आहेत. निदान मानसोपचार तज्ज्ञांकडे घेऊन गेले पाहिजे, असे त्यांनी एका प्रश्नाच्या उत्तरात सांगितले. उपचारासोबतच पुन्हा चर्चा, संवाद, त्यांच्या भावना समजून घेणे आणि त्यांचा आत्मविश्वास वाढविणे महत्त्वाचे आहे. त्यानंतर पर्यायी इतर साधने उपलब्ध आहेत, याची जाणीव करुन द्या. हे व्यसन आहे. पालकांच्या बसची बात नाही. कितीही सांगितलं तरी समस्या सुटणार नाही. त्यांना सायक्रॅटिक कौन्सिलिंग आणि डी-ॲडिक्शन थेरपी देणे गरजेचे आहे, अशीही बाब डॉ. बंग यांनी मांडली.

***

सविता कुंभार यांचे 'तू चाल पुढं' स्त्री आत्मनिर्भतेचे आत्मकथन





मराठीत स्त्री आत्म–कथनाची परंपरा नव्या युगाची हाक बनत आहे. बोलणे, लिहिणे आणि व्यवहारी जगात स्वतंत्र व्यक्तिमत्व आकाराला आणणे ही आवाहनात्मक प्रेरणा आहे. पती निधनानंतर एका मुलीचा सांभाळ करणे, उच्च शिक्षित करून तिला संसाराला लावणे ही दिसायला साधी गोष्ट वाटत असली तरी ही तारेवरची कसरत आहे. पुण्यात शाळकरी मुलांची रिक्षा, गाडी चालवून आपला संसार सावरणारी एक महिला आपला जीवघेणा जीवन अनुभव सांगणारं 'तू चाल पुढं' हे आत्मचरित्र अंतरंगात मुरणारं आहे, अंतर्मुख करणारं आहे.

'तू चाल पुढं' हे सविता कुंभार यांचे आत्मचरित्र अनेक अंगाने वैशिष्टपूर्ण आहे. केवळ ८६ पृष्ठाचं हे आत्मचरित्र बांधीव, आशयसंपन्न आहे. ते कल्पनामय न बनता अल्पाक्षरी कथाशैली, संवेदनशीलतेच्या भावमय जाणिवेचे आणि आटोपशीर असे वाङ्मयीन पंचगुणांनी युक्त असे लेखन झाले आहे. त्याबद्दल अल्पशिक्षित असलेल्या परंतु प्रतिभा संपन्नतेची साक्षीदार अनुभव देणारं असं लेखन करणाऱ्या सविता कुंभार यांचे प्रथम अभिनंदन आहे.

'तू चाल पुढं' ह्या आत्मचरित्राच्या सोळा प्रकरणांमधून सविता कुंभार यांच्या जीवनसंघर्षाचे आशयद्रव्य सामावले आहे. 'माझे बालपण' या प्रकरणातून सविता कुंभार यांनी खुशाली आणि आनंदी कुटुंबाचे चित्रण रेखाटले आहे. सोलापूर जिल्ह्यातील करमाळा येथील भवानी पेठेतील कुंभारवाडा वाचकांसमोर उभा राहतो. सविता क्षीरसागर यांचे वडील श्रीरंग आणि आई कमल यांचे संस्कार त्यांना लाभले. सविता यांचे बालपण आनंदात गेले. मोठ्या वाड्यात २५ जणांचे कुटुंब राहत होते. आजी, आजोबा, आई, वडील, पाच भावंडे याशिवाय तीन चुलते, दोन आत्या आणि त्यांची मुले, मुली मोठ्या वाड्यात एकत्र राहत असत. ग्रामीण भागातले वाडे, विहिरी, मंदिरे, झाडे, गावकुसातला परिसर, शेती हे सर्वच वर्णन आल्हादायक आहे. अशा वाड्यातील कौटुंबिक काही घटना त्यांनी सांगितल्या आहेत. बालपणातील सुंदर आयुष्य आणि निरागस जगणे मनाला भावते.

धार्मिकपणा, शाकाहारी परिवार आणि त्यामुळेच एक सात्विक कुटुंबदर्शन मनाला भावणारं आहे. या कुटुंबामध्ये काशीबाई, महादेव, अनिता, सविता, विजय ही पाच भावंडे यापैकी काशीबाईच्या लग्नाचा प्रसंग 'ताईचे लग्न' प्रकरणात आहे. काशीबाईचे माहेर, सासर करमाळाच झाले. हनमंतराव व काशीबाई यांचा लग्नसोहळा चित्रित झाला आहे. 'दादांचा एस.टी.चा प्रवास' मध्ये वडिलांविषयक एस.टी. ड्रायव्हरचे काही मजेदार, काही कुटुंब प्रसंग आहेत. 'माझे लग्न' हे प्रकरण म्हणजे सुखाच्या जागी दुःखाच्या वेदना सुरु झाल्या. शिक्षणाची हौस असलेल्या सविताला नववीत असतानाच सासरी जावे लागले. सासरी अत्यन्त वाईट प्रसंग उद्भवले. लग्नात जी बहीण म्हणून वावरली ती सविताच्या नवऱ्याची खास मैत्रीण होती. लेखिका लिहितात, ''दि.२३ फेब्रुवारी १९९२ ही तारीख माझ्या जीवनातली सुख घेऊन येणारी नव्हती. ती दुःखाची शिदोरी आयुष्यभर घेऊन येणारी होती.'' हा शोकात्म जीवनप्रवास वाचताना वाचक मनाने अस्वस्थ आणि डोळ्यांनी ओलाचिंब होतो. केवळ गावात आपल्या माहेरच्या माणसांना त्रास होऊ नये म्हणून सविता ह्या सासरी सासू, नवरा आणि इतरांची हाणमार, दुःख सोसत राहिली. 'गूड न्यूज' या प्रकरणात गरोदरपणाचा आनंद आहे, पण सविताला ठार मारण्यापर्यंतचे तिच्यावर प्रसंग आले आहेत, ते वाचून ही खरे तर ती बॅड न्यूज ठरली. नवरा चारित्र्यहीन, दारुडा आणि सतत हाणमार करणारा होता. गरोदरपणात आपण आपल्या लेकराला वाचविले पाहिजे म्हणून सविताने माहेरी पळून जाण्याचा निर्णय घेतला. नवरा, सासू खूप मार देऊन कुठे बाहेर गेले, पण सासूने दाराला बाहेरून कुलूप लावले होते. शेजाऱ्यांना हाक मारून दार उघडण्यात आले. आपले अत्यावश्यक कपडे घेऊन सविता रडतच माहेरी निघाली, जाताना बिबवेवाडी पोलीस स्टेशनमध्ये झाला प्रकार सांगितला. मारहाणीच्या खुणा दाखविल्या. शेजाऱ्याप्रमाणे पोलिसांना पिशवीत फक्त कपडे असल्याचे दाखविले. तक्रार दाखल झाल्यावर स्वारगेटहून सविता दुपारी चार वाजता खूपच घाबरत माहेरी करमाळा येथे पोचली. अगोदर तिने घरात काहीच सांगितले नाही. शेवटी सर्वांना तिच्या चेहऱ्यावरील जखमा लक्षात आल्या. सविताने रडून सर्व काही सांगितले. दुःख, संताप आणि अंतर्मुखता हे सर्व वाचक येथे अनुभवतो. ०५ मे १९९३ रोजी सविताला मुलगा झाला. माहेरी सर्वांना आनंद वाटला. पत्रे पाठवूनही सासरचे कोणी आले नाही. सुंदर प्रथमेश महिन्याचा झाला. पुढे तो आजारी पडला बरेच उपचार करूनही चिंटू उर्फ प्रथमेश ११ नोव्हेंबर १९९३ रोजी तो जगातून कायमचा निघून गेला. सविताचे दुःख आभाळवेणा झाले. 'माझे सांत्वन' मध्ये सविताचे दुःख आणि सोशिकपणा चित्रित झाला आहे. सविताच्या नवऱ्याला शेजारी महिलांनी घरातल्या मैत्रिणीबद्दल खोदून खोदून विचारले. गड्याची ती बाई घरातच राहत होती. 'सासरी घरी परतताना', 'लढाई माझ्या एकटीची' या प्रकरणात सविताचा सुरु झालेल्या संसाराचे आणि मुलीच्या जन्माचे प्रसंग व आनंदी वातावरणाचे चित्रण आहे. 'एक वेगळे वळण' मध्ये नवऱ्याचा अपघात आणि जीवनातला एकाकी संघर्ष सुरु झाल्याचे चित्रण आहे. सविता यांचे वय अवघे बावीस वर्षाचे होते.

मुलगी प्राजक्ता तीन वर्षाची झाली होती. आई, वडील यांनी सविताला घरी नेले पण तिने विचार केला, ''आपण दुसरे लग्न न करता आता मुलीसाठीच स्वतः हिंमतीने उभे राहिले पाहिजे या विचारातून माहेरातून पिल्लूसह एकटीने येऊन १९ सप्टेंबर २००० रोजी पुण्यात एकाकी संसार थाटला. रिक्षा स्वतः चालवू लागल्या. छोटी मुलगी बरोबर घेऊन पुण्यात एका विधवा बाईने रिक्षा चालविणे हे धाडसाचे काम सुरु झाले. रिक्षा चालविण्याची परवानगी आणि इतर कागदपत्र मिळविताना त्यांची झालेली दमछाक अंतर्मुख करणारी आहे. प्रतिकूल परिस्थितीत त्यांनी माघार घेतली नाही. साड्यांना पिको फॉल करणे, इतर घरगुती कामे आणि रिक्षा चालविणे सुरु होते. 'मोठी स्वप्नं' मध्ये एका मैत्रिणीने सुचविल्याप्रमाणे फोर व्हीलर त्या चालवू लागल्या. ते प्रसंग आहेत. 'हितगुज मुलीशी' या प्रकरणातून सविता कुंभार यांनी शाळेत जाणाऱ्या मुलीशी संवाद साधता साधता तिला परिस्थितीची जाणीव दिली. जे इतर महिलांनी नाकारले ते कोलंबस ॲम्ब्युलन्सचे काम सविताताईनी स्वीकारले. मुलगी प्राजक्ता खूपच समजूतदार असल्याने आईला तिने समजून घेतले. 'जीवनातली प्रगती आणि त्याचा आनंद' या प्रकरणात त्यांनी विविध उपक्रमात भाग घेतला. पथनाट्य, रांगोळी, हळदी कुंकू, सांस्कृतिक कार्यक्रम, समाजसेवा यातून त्यांनी स्वतःला सामाजिक कार्यात वाहून घेतलं. स्वतःची व्हॅन घेतली. अशा प्रगतीच्या वाटेवर असताना 'अचानक दादाचं जाणं' त्यांना आणखी एकाकी करणारं ठरलं. वडील गेल्याचं दुःख पचवून २००७ मध्ये दुसरी गाडी घेतली. भावाला ते काम दिले पण पुण्यात गाडी चालविणे त्यांना अवघड गेले. भाऊ महादेव अण्णा करमाळा गावी गेले. शेवटी ड्रायव्हरला गाडी चालविण्यास दिली. सविता कुंभार यांना ड्रायव्हिंग करतानाचे सर्व शारीरिक दुखणे सोसावे लागले. त्यांच्या महिला सबलीकरणाची, सामाजिक कार्याची माध्यमांनी दखल घेतली. महिला दिनी त्यांची मुलाखत वृत्तपत्रात छापून आली. त्यांना पुरस्कार लाभले. 'विरह आईचा' सोसत त्यांनी आपलं मन मोकळं केलं. ते हृदयस्पर्शी आहे. 'मुलीचे लग्न आणि परीचे आगमन' या शेवटच्या प्रकरणातून प्राजक्ताचा संसार आणि नातीचा जन्म असे प्रसंग आहेत. १६ मे २०१७ रोजी मुलीचा विवाह पुण्यातील आनंद मुलाशी झाला. आई लांब नको अशी प्राजक्ताची इच्छा पूर्ण झाली. सविता कुंभार यांनी सर्व संसारकर्तव्य केले आणि त्यांनी आता आनंदाने पुढील वाटचाल सुरु केली आहे.

'तू पुढं चाल' हे सविता कुंभार यांचे आत्मचरित्र एकल महिलांना जीवनप्रेरणा देणारे आहे. 'लेखिकेचे मनोगत' मध्ये त्या लिहितात,

''माझ्यासारखी गावाकडील एक मुलगी पुण्यात येऊन संघर्षमय जीवनाचा आनंदाने स्वीकार करून जगत असेल तर ते पाहून इतरांना प्रेरणा मिळावी हेच या पुस्तकाचे खरे वैशिष्ट आहे.''

'तू चाल पुढं' हे पुस्तक पुण्यातील अनुश्री प्रकाशने प्रकाशित केले. प्रकाशिका अनिता मुसळे लिहितात,

''हे पुस्तक आपण वाचत नसून जणू एखादी चित्रफीत पाहत आहोत असा तिचा जीवनप्रवास तिने या पुस्तकात अगदी सहज, सुंदर, मोजक्या आपल्या शब्दांत स्वतःच्या बोलीभाषेत मांडला आहे आणि तो खूप हृदयस्पर्शी आहे. हे पुस्तक वाचताना निश्चितच डोळ्याच्या कडा ओल्या झाल्याशिवाय राहत नाही.''

प्रार्थना सदावर्ते यांनी 'दोन शब्द' लिहिताना सविता कुंभार यांच्या आईच्या वात्सल्य वर्णनाला 'करमाळ्याची हिरकणी' संबोधून म्हटले आहे,

''रसिक, वाचक या करमाळ्याच्या हिरकणीचे हे आत्मकथन मनोभावे वाचतील इतरांना वाचण्यासाठी भेट देतील अशी अपेक्षा व्यक्त केली आहे, ती सार्थच वाटते.''

संजय आवटे यांनी ''प्रकाशवाटा दाखविणारे आत्मकथन'' अशी प्रस्तावना लिहिली आहे. ते लिहितात,

''सविताचा हा संघर्ष लोकविलक्षण आहे. जरा मनाविरुद्ध काही घडले की, निराशेच्या खाईमध्ये स्वतःला लोटून देणाऱ्या माणसांनी ही कथा वाचायला हवी. ही साधी कथा नाही. एखाद्या चित्रपटाची कथा आहे. सविता ही त्या चित्रपटाची नायिका आहे.''

एवढे लिहून ते पुढे लिहितात, ''तिचे हे आत्मचरित्र मराठी साहित्याला समृद्ध करीलच, पण अनेक थकल्या-भागलेल्यांना ते बळ देईल.''

सविता कुंभार यांचे 'तू चाल पुढं' हे आत्मचरित्र म्हणजे एका अल्पशिक्षित पण कणखर मनाच्या स्त्रीजीवनाचं प्रांजळ आत्मचरित्र आहे. आपल्या आईवडिलांना ते अर्पण केलं आहे. शैलेन्द्र परदेशी यांचे बोलके मुखपृष्ठ आणि पुणे येथील रचना एंटरप्रायजेस यांची सुंदर अक्षरजुळणी, श्री. जे. प्रिंटर्सचे हे पुस्तक वाचनीय आणि सौन्दर्यपूर्ण झाले आहे. हे लेखन वाचलं तर आत्मनिर्भर भारत आणि महिला सबलीकरणाचा संदर्भ लक्षात येईल. एका कुंभार समाजातील विधवा स्त्रीने मराठीत लिहिलेले एकमेव आत्मचरित्र असल्याचे लक्षात येते. त्यामुळे सूज्ञ वाचक, समीक्षक, समाजातील जाणकार आणि संवेदनशील व्यक्ती या लेखनाची नक्की दखल घेतील अशी सदिच्छा आहे.

'तू चाल पुढं' : लेखिका - सविता कुंभार

परीक्षण : डॉ. बाबुराव उपाध्ये

प्रकाशक : अनिता मुसळे, अनुश्री प्रकाशन, पुणे,

प्रथम आवृत्ती ०८ मार्च २०२३. किंमत १२५ रुपये.

***



Tirupati Motors

All type of Vehicles Spaers,
Specialist in
Tata & Mahindra Jeep

V.K. Sonawane
Mob. : 9860708969

Amit Vilas Sonawane
Mob. : 9960883863

Alephata, Kalyan Road, Tal. Junnar, Dist. Pune.

ल. रा. कुंभार लिखित 'काटेरी वाट' प्रांजळ मनाचे आत्मकथन



कुंभार समाज आता शिक्षण घेऊ लागला आहे. शिक्षणामुळे या समाजात आत्मभान, आत्मजागृती, आत्मजाणीव, आत्मचिंतन आणि आत्मलेखनाची प्रेरणा निर्माण होत असल्याची प्रचिती ल. रा. कुंभार ह्यांच्या 'काटेरी वाट' आत्म–कथनातून येते.

पुणे जिल्ह्यातील, आंबेगाव तालुक्यातील चांडोली खुर्द येथील लक्ष्मण रामभाऊ कुंभार (वाव्हळ) ह्यांनी १४ मे २०२२ रोजी 'काटेरी वाट' हे आत्मकथन प्रकाशित केले. एका प्रामाणिक, ज्ञाननिष्ठ, विद्यार्थीप्रिय शिक्षक, लोकशिक्षक, समाजसेवक आणि कुटुंबप्रेमी व्यक्तिमत्वाचे हे आत्म –कथन सामाजिक, शैक्षणिक आणि वाङ्मयीन दृष्टीने वैशिष्टपूर्ण आहे.

ल.रा. कुंभार ह्यांच्या बालमनावर म.फुले, सावित्रीबाई फुले, साने गुरुजी, यशवंतराव चव्हाण, म. गांधी, पंडित नेहरू, ह.भ.प. दांडेकरमामा इत्यादींचे वाङ्मयीन आणि सेवाभावांचा प्रभाव निर्माण झाला. ते लिहितात, ''त्यांचाच आदर्श डोळ्यासमोर ठेवून प्रयत्न केला. कोणाची गरिबी, कोणाचे औदार्य, कोणाचा त्याग, असामान्य ज्ञान तर कोणाची देशभक्ती या सगळ्यांचा माझ्या मनावर परिणाम झाला होता. ह.ना. आपटे व लक्ष्मीबाई टिळक यांच्या कादंबऱ्या या पेन्शनर झाल्यानंतर वाचनात आल्या आणि लेखन करण्यास प्रवृत्त झालो.'' ०१

०१ एप्रिल १९४८ रोजी जन्म झालेले लक्ष्मण कुंभार (वाव्हळ) गुरुजी ह्यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीत शिक्षण घेतले. ७६ वर्षाची जीवन वाटचाल करणारे कुंभार गुरुजी चांडोली खुर्द पंचक्रोशीत आपल्या प्रामाणिक आणि सेवाभावी वृत्तीमुळे लोकप्रिय आहेत. त्यांचे आत्मचरित्र म्हणजे जीवनचरित्राचा एक मुक्तसंवाद आहे. मंचर येथील डॉ. ज्ञानेश्वर थोरात हे 'प्रस्तावना'मध्ये लिहितात,

''लेखक स्वतः शिक्षक असल्याने त्यांचे जीवन सामाजिक आणि शैक्षणिक क्षेत्राभिमुख असणे स्वाभाविक आहे. त्यामुळे त्यांच्या सामाजिक व शैक्षणिक जीवनाचे विविध पैलू त्यांनी येथे अत्यंत हळुवारपणे उलगडून दाखविले आहे. भारतीय शिक्षण, साहित्य, संस्कृती आणि समाज पुरस्कृत जीवनमूल्य त्यांच्या संपूर्ण लोकव्यवहाराचे शुद्धीकरण करणारी, समाजाचे उन्नयन करणारी सामाजिक व शैक्षणिक मूल्ये आहेत. त्यांची उपयुक्तता काळाच्या ओघात आवश्यक असल्याने ही साहित्यकृती लेखकाच्या स्वकर्तुत्वाने आदर्श दाखवून देणाऱ्या समाज मार्गदर्शकाची आहे. त्यातूनच उद्याचा भारत विकसित होईल, अशी आशा पल्लवित होते.'' ०२

ल.रा. कुंभारगुरुजी यांनी 'कानसे शाळा' हे शिक्षक जीवनातील अनुभवातील पुस्तक नोव्हेंबर २०२१ मध्ये प्रकाशित केले. त्यामध्ये त्यांनी 'शिक्षेची शाळा बनली आदर्श' अशी अनुभव मांडणी केली आहे. पुणे जिल्ह्यातील आंबेगाव तालुक्यातील एक आडवळणी भागात असलेल्या कानसे गावात कुंभार गुरुजींनी आपल्या प्रेममय वागण्याने आणि प्रामाणिक शिकविण्यातून नको असलेली शाळा गावाला आणि विद्यार्थी वर्गाला हवीहवीशी वाटली. ह्या शाळेचा पंचक्रोशीत आदर्श निर्माण झाला, तो केवळ कुंभार गुरुजींमुळेच होय, असे गावकरी म्हणत. अशा कुंभार गुरुजींचे आत्मकथन 'काटेरी वाट' शीर्षकाप्रमाणे आहे. वडील रामभाऊ आणि आई शेवंताबाई ह्यांच्या संस्कारातून लक्ष्मण कुंभार गुरुजी घडले. घरात वारकरी संप्रदायाचा प्रभाव असल्याने सतत त्यांची वर्दळ असे. एक सात्विक कुटुंब म्हणून गावात ते धर्मसेवक मानले जाई. अशा परिवारात सेवाभावाचा आदर्श कुंभार गुरुजींनी कसा जपला ते त्यांच्या 'काटेरी वाट' मध्ये दिसून येते. एकूण ३८ प्रकरणातून आणि २९६ पृष्ठामधून हे आत्मकथन साकार झाले आहे. हे आत्मकथन भिमाजी कोंडाजी वाव्हळ यांच्यासह आई शेवंताबाई रामभाऊ वाव्हळ व वडील ह.भ.प. रामभाऊ कोंडाजी वाव्हळ ह्यांना अर्पण केले आहे. अशिक्षित आई, वडील ह्यांनी खूप कष्ट करीत आपल्या पोराला शिकविले. मुलगा आदर्श शिक्षक झाला ह्याबद्दल घरात सर्वांना अभिमान होता, असे अनुभव ह्या आत्मचरित्रात आहेत. चांडोली गावातील देवदेवळे, शेतशिवार, परंपरा, गावातील आदर्श व्यक्ती, त्यांचे स्वभाव ह्यांचे अनेक अंगाने चित्रण आलेले आहे. गाव आणि गावसंस्कृतीचे प्रभावी दर्शन पुस्तकातून होते. चांडोली येथील राज्य पुरस्कारप्राप्त शिक्षक, सेवानिवृत्त मुख्याध्यापक ज्ञानेश्वर नारायण थोरात लिहितात.

''ल. रा. कुंभार यांनी गावाचे वर्णन, मागील वैयक्तिक आठवणी तसेच गावची देवालयं यांचे कथानक स्वरूपात उत्कृष्ठरित्या मांडण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांच्या बालपणीच्या आठवणी त्यांनी अगदी जशाच्या तशाच मांडल्या आहे. त्या वाचताना मला अतिशय भावल्या. कारण आम्ही दोघेही सातवीपर्यंत एकाच वर्गात होतो.'' ०३ आपल्या वर्गमित्राच्या आठवणी वाचून थोरात ह्यांनी प्रेरणादायी अभिप्राय व्यक्त केला. हा जुना काळ त्यांना चित्रपटासारख्या अनुभवण्यास मौज वाटली. ०४

'काटेरी वाट' मधील काही कथानुभव वाचनीय झाले आहेत. 'माझा गाव' चित्रित करताना त्यांनी जुन्या गावकुसातले जुने संदर्भ सांगितले आहेत. गावातील 'रेणुका माता', 'कान्होबा देव', 'श्रीसीताराम बाबा', 'पुजारी', 'होळी पाच दिवसाची' असे लेखन केले, ते वाचनीय आहे. 'तृतीय रत्न' या प्रकरणातून भाऊ कृष्णाच्या जन्माचे वर्णन आहे. 'माझा तिसरीचा वर्ग' मध्ये ज. को. फलटणे गुरुजींच्या आठवणी आहेत. 'घाटाची पायरी', 'बैलगाड्यांची शर्यत', 'रेणुकेची यात्रा', 'महापूर आला', 'गेंगणीच्या घरात निवास', 'ब्राह्मणाच्या घरात वास्तव्य', 'शिवनेरीची सहल', 'आमचा घोडा', 'शिक्षणासाठी पैसा पाहिजे', 'चौदा दिवस विंचू', 'व्यायाम अभ्यास', 'पोहऱ्याने पाणी', 'डी. एड. कॉलेज प्रवेश' असे अनेक अनुभवी किस्से वाचकांना ग्रामीण जीवन, शिक्षणाचा परिचय करून देतात. 'बहिणीचा विवाह ', 'गृहलक्ष्मी', 'लाकडाची वखार', 'संकट', 'घर पाडले', 'मोठा बाबा', 'माझी आई' मध्ये लेखक लिहितात, ''आई अडाणी म्हणावं तर हे वनस्पती विषयीचे ज्ञान, प्राण्यांविषयीचे ज्ञान तिच्याकडे कुठून आले? संध्याकाळी दिवेलागणीला देवासमोर सांजवात न चुकता दररोज लावणार. देवाच्या पाया पडणार.'' (पृ. २०४) अशा साध्याभोळ्या पण घरात सर्व कामात हुशार असलेली आई आपल्या घरी आलेल्या भावाशी संवाद करू शकत नाही. ती मूकपणे सर्वांचे ऐकत संसार करणारी होती, अशी प्रेमळ आई ०१ सप्टेंबर १९९० रोजी मरण पावली, त्यावेळी लेखक दुःखी झाल्याचे वर्णन अंतर्मुख करणारे आहे. 'मळ्याची शाळा', 'भोईवाडा', 'वडिलांची तीर्थयात्रा', 'देवाच्या घरातून पुनरागमन', 'जडणघडण', 'पंढरीची वारी', 'आम्ही आसामला', 'श्रीलन्का पारायण सोहळा' आणि शेवटी 'मी सुखी झालो' असे समाधानाचे प्रकरण आहे. त्यात आपण मनाने सुखी असावे व इतरांना सुखी करण्यात आनंद शोधावा अशी शिकवण देणारे हे आत्मचरित्र मंगलमय जीवनाला दिशादर्शक ठरणारे आहे. कुंभार समाजातील ज्ञानी आणि सेवाभावी शिक्षकाची ही आत्मकथा मनाला प्रेरणादायी आहे.

परीक्षण : डॉ. बाबुराव उपाध्ये, श्रीरामपूर

डॉ. डी.डी. कुंभार लिखित 'कुंभकार : बलुतेदारी-शिक्षण-आत्मपरीक्षण' प्रबोधक आत्मचरित्र



कुंभार समाजातील सुशिक्षित माणूस लिहू लागला आहे, ही अभिनंदनीय वाटचाल आहे. कोल्हापूर जिल्ह्यातील राधानगरी तालुक्यातील कौलव येथील डॉ. डी.डी. तथा दादासाहेब दत्तात्रय कुंभार ह्यांनी लिहिलेले 'कुंभकार : बलुतेदारी-शिक्षण-आत्म परीक्षण' हे आत्मचरित्र समाज प्रबोधक आणि सांस्कृतिकदृष्ट्या मौलिक स्वरूपाचे आहे. प्रकाशक सौ. मालन दा. कुंभार, कोल्हापूर ह्यांनी हे आत्मचरित्र २४ फेब्रुवारी २०२३ रोजी प्रकाशित केले. यशवर्धने खटावणे ह्यांनी अनुरूप मुखपृष्ठ काढले आहे. शाहूनगरी, कोल्हापूर येथील भारती मुद्रणालयमध्ये हे पुस्तक छापले आहे. १५० रुपये किंमत असलेल्या ह्या पुस्तकाला ११२ पृष्ठे आहेत. अनेक संत, महात्मे कार्य करतात, त्यांचा आदर्श घेतला पाहिजे. आपल्या पुस्तकावर मनोगत व्यक्त करताना ह्या पुस्तकाच्या संदर्भात लेखक लिहितात,

''अशा पुस्तकांच्या वाचण्याच्या व्यसनामुळे माझ्या आयुष्यात आलेल्या सर्व प्रकारचे अनुभव कथन करण्याचा मनोदय झाला त्यामुळे हे आत्मचरित्र त्यांनी लिहिले आहे.'' ते पुढे लिहितात, ''कोणत्याही फळाची अपेक्षा न करता कार्यतत्पर राहणे, म्हणजे यश आणि अपयश यांची जाणीव होणार नाही तसेच ज्ञान व श्रम घेण्याची प्रबळ इच्छा निःस्वार्थी असेल तर जात-धर्म, गरीब-श्रीमंत, आधार (टेकू) इत्यादी आपल्या कार्याच्या आड येत नाहीत. अपयश आल्यानंतर खचून जायचे नाही, कारण तेच अपयश आपल्याला प्रगतीचा मार्ग दाखविते. मी हे आपणासमोर माझ्या आयुष्यात आलेल्या अनुभवातून मांडण्याचा प्रयत्न केला आहे. देव अनेक रूपकात्मक पद्धतीने प्रत्येकाला मार्गदर्शन करत असतो', परंतु ती ओळखण्याची पात्रता आपण निर्माण केली पाहिजे.''

डॉ. दादासाहेब कुंभार ह्यांची हीच तत्वस्पर्शी जीवनरेखा त्यांच्या आत्मचरित्रात दिसून येते. ह्या पुस्तकात १७ प्रकरणे अनुक्रमणिकेत दिलेले आहेत, त्यातून आत्मचरित्राचे आशयविश्व त्यात सामावले आहे.

'जन्मभूमी-योनीभूमी-कर्मभूमी' ह्या पहिल्या लेखात त्यांनी आपले गाव कौलवचे वेगळेपण सांगितले आहे. अशा सुजलाम सुफलाम गावात, पवित्र भूमीत लेखकाचा जन्म २४ फेब्रुवारी १९४५ रोजी झाला. ज्या समाजात आपण जन्म घेतला त्याला लेखकाने योनीभूमी म्हटले आहे. त्याचबरोबर कुंभार समाजाची प्रजापती, राजे ह्या नावाची चर्चा त्यांनी केली आहे. कुंभार समाज प्रजेच्या हितावह कामे करीत असल्यामुळे कुंभार समाजासाठी प्रजापती नाव पडले आणि कार्यकुशल कुंभार प्रजेच्या महत्वाच्या गरजा स्वतः भागवितो, म्हणून त्याला खेडेगावात 'राजे' या टोपण नावाने संबोधतात (पृष्ठ ०८) नवीन पिढीने शिक्षण घेऊन उद्योग, नोकरी, व्यवसायाच्या स्पर्धेमध्ये उतरून वेगळ्या कर्मभूमीची आस धरली पाहिजे, ही काळाची गरज आहे. (पृष्ठ ०९) असे लेखकाने नमूद केले आहे. कुंभार समाज हा बारा 'बलुतेदारी' मधला घटक असल्याचे सांगून सविस्तर लिहिले आहे. 'आनंदी गोपाळ - परिवार वृंद' लेखात कुटुंब परिचय आहे. आजी, आजोबा, आई, वडील, लेखक व त्यांचे पाच भाऊ, दोन बहिणी अशा मोठ्या परिवारात लेखकाचे शिक्षण झाले. आजी साथीत वारल्यावर लेखकाच्या आई सावित्रीवर संसाराची सर्व जबाबदारी आली. लग्नाची वेळी त्यांचे वडील दत्तात्रय पंधरा-सोळा वर्षाचे होते तर त्यांची आई तेरा-चौदा वर्षाची होती. घरी कुंभारकाम, शेतीकाम भरपूर होते. शिक्षण आणि घरातील कामे करीत लेखक शिकले. १९६८ मध्ये त्यांनी बी.एस्सी. कृषी पदवी घेतली. १९७७ मध्ये ते एम.एस्सी. झाले. १९८६ मध्ये पीएच. डी. झाले. एम. एस्सी. मृद्शास्त्र पदवीसाठी त्यांना फेलोशिपही मिळाली. तेरा वर्षे या क्षेत्रात त्यांनी संशोधन केले. राहुरी, पुणे, कोल्हापूर या क्षेत्रात कार्य केले. कृषी क्षेत्रात प्राध्यापक म्हणून दर्जेदार संशोधन केले. राष्ट्रीय नियतकालिकात त्यांचे पंचवीस शोधनिबंध प्रसिद्ध झाले. राष्ट्रीय चर्चासत्रात त्यांनी सोळा शोधनिबंध सादर केले. शेतकऱ्यांसाठी त्यांचे आकाशवाणी, दूरदर्शनवर अनेक कार्यक्रम प्रसारित झाले. २००३ मध्ये त्यांनी हनुमान भक्त चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना करून मंदिराची उभारणी केली. १९८९ मध्ये त्यांनी श्री रत्नप्पा कुंभार नगर नागरी सहकारी पतसंस्थेची स्थापना केली. आजही ते संस्थापक, संचालक म्हणून कार्यरत आहेत. आर. के. नगर सो. नं. १च्या संचालक मंडळात १० वर्षे ते कार्यरत आहेत. संस्थेचे कार्यालय इमारत, सांस्कृतिक हॉल, बाग इत्यादी कामात त्यांनी योगदान दिले. आपल्या कुटुंब स्थितीविषयी लिहितात,

''सन १९८२ मध्ये सर्व भाऊ स्वतंत्र झाले. आई संभाजीकडे राहत होती. वडील आनंदरावाकडे. वडील दत्तात्रय कुंभार २००१ मध्ये वारले. आई सावित्रीमाई २०१३ मध्ये वारली. आईचे औषधपाणी व खर्च मी महिन्यास करीत होतो. आता भावाच्या मुलांनी त्यांच्या आवडीप्रमाणे व्यवसाय चालू केले आहेत. परंतु चांगले शिक्षण कोणीच घेतले नाही, याची खंत वाटते.'' (पृष्ठ २३)

डॉ. दादासाहेब कुंभार आणि त्यांची पत्नी सौ. मालन कुंभार ह्यांनी आपल्या संसाराला आदर्श बनविले. ''माझ्या जीवन परिक्रमातील गृहिणी, सहचारिणी व अर्धांगिनी'' मध्ये त्यांनी लिहिले आहे,

''माझी सहचारिणी अनेक सद्गुणांचा सागर आहे. महत्वाचे म्हणजे ती सुशिक्षित असून सासरच्या खेडवळ वातावरणाशी जुळवून घेते. सासरच्या संबधित लोकांशी माझ्यापेक्षा तिचे संबंध जिव्हाळ्याचे आहेत. तिच्या हातचा स्वयंपाक उत्तम असतो, असे अनेक पै-पाहुणे म्हणतात. घरी येणाऱ्या सर्वांचे सारख्या पद्धतीने आदरतिथ्य करते. कपडे व दागदागिन्यांविषयी इच्छा कधी केली नाही.'' (पृष्ठ १०३)

डॉ. दादासाहेब कुंभार ह्यांची पत्नी बालवाडीत काम करून संसाराला हातभार लावी. मुलगी संगीता एम. एमस्सी. झाली. मुलगा सचिन इंजिनिअर झाला. २००३ मध्ये डॉ. दादासाहेब कुंभार सेवानिवृत्त झाले. सात्रळ येथील तात्यासाहेब जोर्वेकर ह्यांच्या आठवणी त्यांनी चर्चेत सांगितल्या. राहुरी, नगर, सात्रळ परिसरात त्यांचे कौटुंबिक संबंध आहेत. समाजकार्य, लेखन, वाचन ह्यांची त्यांना आवड आहे. एक सुंदर आणि प्रबोधक असे हे आत्मचरित्र कुंभार समाजातील उच्च शिक्षित आणि सद्गुणी व्यक्तिमत्वाचा आदर्श सांगणारे आत्मचरित्र प्रत्येकाने वाचावे असे उद्बोधक आहे.

परीक्षण : डॉ. बाबुराव उपाध्ये, श्रीरामपूर जि. अहमदनगर

***

मांडवगणचे डाळिंब 'लाल भडक अन् भाव कडक'

५० गुंठ्यांत घेतले १९ लाखांचे उत्पन्न; प्रतिकिलो १९१ रुपयांचा विक्रमी भाव



मांडवगण फराटा (ता. शिरूर) : डाळिंब पीक दाखवताना शेतकरी रोहिदास कुंभार.

आंधळगाव : मांडवगण फराटा (ता. शिरूर) येथील रोहिदास शशिकांत कुंभार या शेतकऱ्याच्या ५० गुंठे क्षेत्रातील डाळिंबाला जागेवर १९१ रुपयांचा भाव मिळाला. तो भाव सध्या तालुक्यात विक्रमी आहे. त्यापासून त्यांना तब्बल १९ लाख रुपये मिळाले असून खर्च वजा जाता साडेपंधरा लाखांचा निव्वळ नफा मिळाला आहे. यंदाच्या हंगामात डाळिंबाच्या उत्पादनात वाढ झाल्यामुळे बांगलादेशच्या बाजारपेठेत डाळिंबाची मागणी वाढली आहे. त्यामुळेच या फळाला इतका उच्च दर मिळाला आहे. मांडवगण फराटा या गावाशेजारी भीमा नदी असल्याने ऊस हे येथील प्रमुख पीक आहे. मात्र, गेल्या काही दिवसांपासून येथील शेतकरी हा डाळिंब पिकाकडे वळला आहे. दरम्यान, युवा शेतकरी रोहिदास कुंभार यांनी आधुनिक पद्धतीने शेती करण्याचे ठरवले. त्यांनी सर्व अभ्यास करून तसेच माहिती घेऊन २०२२ मध्ये डाळिंब पिकासाठी पहिल्यांदा सहा ट्रॉली शेणखत टाकून बेड तयार केला. डाळिंबाच्या दोन झाडांतील अंतर सुमारे आठ फूट असून, दोन ओळीतील अंतर साडेतेरा फूट आहे. झाडांच्या वाढीसाठी पुरेशी व खेळती हवा मिळत आहे. डाळिंब लागवडीपूर्वी योग्य प्रकारची जमिनीची मशागत केली. ५० गुंठे क्षेत्रात भगवा जातीच्या ५०० डाळिंबाची झाडे आहेत. यावर्षी दुसऱ्या बहरात जिद्द आणि चिकाटीच्या जोरावर त्यांनी डाळिंबाची बाग फुलवली. रासायनिक खतांचा वापर न करता सेंद्रिय पद्धतीने डाळिंब पीक घेतल्याने अतिशय मोहक आणि दर्जेदार फळ त्यांच्या बागेला लागले. त्यामुळे परराज्यातून व्यापारी त्यांच्या शेतात पोचले. त्यांच्या मालासाठी व्यापाऱ्यांमध्ये चढाओढ निर्माण झाल्याने श्रीगोंदा येथील व्यापाऱ्याने कुंभार यांच्या डाळिंबाला १९१ रुपये इतका भाव दिला. या दरामुळे शेतकऱ्याने समाधान व्यक्त केले. अधिकाधिक उत्पादन घेण्यासाठी प्रोत्साहन मिळाल्याचे सांगितले आहे. त्यामुळे त्यांची सर्वत्र चर्चा आता होऊ लागली आहे.

सव्वा एकरात १९ लाखांचे उत्पन्न - मांडवगण येथील कुंभार कुटुंबीयांनी आधुनिक शेतीची कास धरली आहे. श्रीगोंदा येथील व्यापाऱ्यांनी ही बाग जागेवर खरेदी केली. त्यामुळे त्यांना ५० गुंठ्यांत खर्च वजा जाता साडेपंधरा लाखांचे डाळिंबातून उत्पन्न मिळाले. त्यासाठी त्यांना तीन लाख तीस हजार रुपये खर्च आला. त्यातून कितीतरी पटीने त्यांनी फायदा झाला आहे. कुंभार यांना डाळिंब शेती करण्यासाठी राजकुमार जाधव व सार्थक ॲग्रो मांडवगण फराटा यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

तेल्या व मर रोगाच्या संकटामुळे डाळिंब बागायतदारांचे कंबरडे मोडले आहे. डाळिंब शेती संपुष्टात येण्याच्या मार्गावर असताना अशा परिस्थितीत डाळिंबाची रोपांचे योग्य नियोजन व निगा राखून योग्य प्रकारे जतन, पालनपोषण करून बाग वाढवली व त्याचे फळ आम्हा कुटुंबीयांना भेटले आहे.

- रोहिदास कुंभार, शेतकरी, मांडवगण फराटा

शिरूर तालुक्याच्या पूर्व भागातील तांदळी गणेगाव मांडवगण फराटा, इनामगाव या गावांतील अनेक शेतकरी डाळिंब पिकाकडे मोठ्या प्रमाणात वळाले आहेत. डाळिंब पिकातून अधिकचे दोन पैसे जास्त मिळाल्याने शेतकऱ्यांची आर्थिक प्रगती होत आहे. जमिनीचा सेंद्रिय कर्ब व अचूक पाणी नियोजन केले, बाबीकडे लक्ष दिल्यास डाळिंब पिकाचे उत्तम उत्पादन व गुणवत्ता मिळण्यास मदत होणार आहे. - महादेव गदादे, कृषी सहाय्यक

संत गोरोबा सेवा मंडल नागपूर संस्थेच्या प्लॉटवर वृक्षारोपण



आज झाडाचे रोपटं लावून त्याच पाच वर्ष संगोपन करून निसर्गाचे संतुलन करण्याचा संकल्प विश्वस्त मंडळानी घेऊन नागपूर (हुडकेश्वर) परिसरात असलेल्या संत शिरोमणी गोरोबा सेवा मंडल नागपूर संस्थेच्या प्लॉट परिसरात १०० झाडाचे वृक्षारोपण कार्यक्रम नुकताच संपन्न झाला. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष एडवोकेट श्रीधर कालकर, विश्वस्त सर्वश्री अरुण वाघ, गंगाधर खोपे, महेंद्र भातकुलकर, डॉ. रामदास खोपे, संतोष नरसेकर, संजय कोथलकर आदिसह समाज बांधव उपस्थित राहून वृक्षारोपणात सहभाग देऊन मोलाचे कार्य पार पाडून वृक्ष संवर्धनाने परिसराला हिरवे करण्याच आश्वासन दिले. कुंभार समाजाने या आर्थिक वर्षी विकास कामात तीन काम हातात घेतले होते जसे विहीर बांधकाम, कार्यालय बांधकाम आणि वृक्षारोपण त्यापैकी विहीर बांधकाम पूर्ण झाले व कार्यालयाचे बांधकाम सुरु आहे. उपस्थित समाज बांधवानी वृक्ष संवर्धनाची जबाबदारी घेतली हे विशेष. विशेष म्हणजे वृक्ष हे संस्थेचे संतोष नरसेकर यांनी उपलब्ध करून दिले हे मोलाचे समाज कार्य करून योग्य समयी समाज भान जपले.

रुग्णांना 'नवजीवन' देण्यासाठी तत्पर डॉ. शिवाजी कुंभार कुटुंबीय

- धनंजय चिंचकर (कातरखटाव)

पथदर्शी कुटुंबप्रमुखाने निवडलेला रस्ता सर्वहिताचा असेल आणि त्यातून कर्तव्यपूर्तीचे समाधान लाभत असेल, तर ते संपूर्ण कुटुंबच त्या रस्त्यावर अग्रेसर होते. कुटुंबातील सर्व सदस्यांना त्या रस्त्याने जाण्याचे बाळकडू मिळाल्यावर यशस्वितीही पाठोपाठ प्रवेशते. त्यातून आपल्या कुटुंब प्रमुखाने अंगीकारलेले व्रत सर्व कुटुंबीयांचे सर्वस्व होऊन जाते आणि त्यातून त्या कार्याला सदोदित नवी झळाळी प्राप्त होत जाते. त्याचप्रकारे आरोग्य सेवेतील एक वाखाणण्याजोगे उदाहरण म्हणजे डॉ. शिवाजी कुंभार आणि कुटुंबीय.



डावीकडून डॉ. शिवाजी ज्ञानू कुंभार, M.B.B.S. M.D. (DGO) (GYN) (OBST).
डॉ. गौरी शिवाजी कुंभार, M.B.B.S. M.D. D.M. (Gastro) (Entrology),
डॉ. सौरभ शिवाजी कुंभार, M.B.B.S. M.D. (Med.) D.M. (Cardiogy).
डॉ. शीला शिवाजी कुंभार, M.B.B.S. M.D. (DGO) (GYN)

सोलापूर येथील वैशंपायन मेमोरियल मेडिकल विद्यालयात डॉ. शिवाजी कुंभार यांनी वैद्यकीय पदवी प्राप्त केली. सातारा येथील क्रांतिसिंह नाना पाटील सर्वसाधारण रुग्णालयात दोन वर्षे वैद्यकीय सेवेचा सराव केला, तर खटावच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात वैद्यकीय अधिकारी म्हणून दोन वर्षे सेवा दिली. त्यानंतर १९८८ मध्ये वडूजच्या पेडगाव रस्त्यावर 'नवजीवन हॉस्पिटल' द्वारे जनसेवेस प्रारंभ केला.

दरम्यान, यवतमाळ येथील सर्वसाधारण कुटुंबातील, वैद्यकीय पदवी प्राप्त केलेल्या डॉ. शीला कुंभार यांच्याशी ते विवाहबद्ध झाले. त्यांनीही सोलापूर येथील वैशंपायन मेमोरियल मेडिकल विद्यालयातून वैद्यकीय पदवी मिळवली होती. या दोघांनीही स्त्री रोग तज्ज्ञ व प्रसूतिशास्त्र विषयात पदवी घेऊन आपला व्यवसाय सुरू ठेवला. शीला कुंभार यांनी सिव्हिल हॉस्पिटल येथे अधिव्याख्याता म्हणून दोन वर्षे काम पाहिले. दोघांचीही वैद्यकीय क्षेत्रातील पदवी एकसारखी असल्याने त्यांच्या जनसेवेच्या भावनेला नवसंजीवनी मिळाली. पत्नी शीला कुंभार यांच्यामुळे महिला रुग्णांची संख्या वाढू लागली. महिला रुग्णांच्या तपासणीचा कल नवजीवन हॉस्पिटलकडे वाढू लागला. त्यांनी ही सेवा ३७ वर्षे अखंड सुरू ठेवली आहे.

नवी पिढीही कार्यरत

उभयतांची कन्या गौरी हिने वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस ही पदवी बी जे मेडिकल कॉलेजमध्ये पूर्ण केली, तसेच एमडी मेडिसिन ही पदवी नायर रुग्णालय, मुंबई येथून घेतली. देशातील नामांकित सी एम सी वेल्लोर येथून डीएम गॅस्ट्रो इलेक्ट्रॉलॉजी व हिपॅटॉलॉजीमध्ये त्याचबरोबर दिल्ली बोर्डाची गॅस्ट्रो इलेक्ट्रॉलॉजिस्ट व हिपॅटॉलॉजिस्ट पदवी मिळवली. गौरी हिने सध्या वैद्यकीय क्षेत्राबरोबरच संशोधन क्षेत्रामध्ये उत्तम कार्य केले आहे, तसेच लंडन येथील एमआरपी ही पदवी प्राप्त केली. एवढ्यावर न थांबता तीने देशपातळीवरील आंतरराष्ट्रीय वैद्यकीय संमेलने पार पाडली. या संमेलनातून तिने आंतरराष्ट्रीय पातळीवर अजूनही काम सुरू ठेवले आहे.

ती सध्या सीएमसी वेल्लोर येथे असोसिएट प्रोफेसर म्हणून कार्यरत आहे.

डॉ. गौरीसारखाच तिचा भाऊ सौरभ यानेही आपल्या थोरल्या बहिणीच्या पाठोपाठ आपले वैद्यकीय क्षेत्रातील एमबीबीएस पदवीचे शिक्षण बीजे मेडिकल कॉलेज येथे पूर्ण केले. त्यानंतर एआयआय एमएस (ऋषिकेश) येथून एमडी मेडिसिन ही पदवी मिळवली. ग्रीस (अथेन्स) येथील ऑल इंटरनॅशनल असोसिएन्स ऑफ फिजिशिएशन संमेलनात भाग घेऊन शोध निबंध सादर केला, तसेच नुकत्याच झालेल्या ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ मेडिकल सायन्स सुपर स्पेशालिटी एंट्रन्स परीक्षेत कार्डिओलॉजी या विषयात संपूर्ण भारतात प्रथम क्रमांक मिळविला. त्याच्या या यशाने एआयआयएमएस (दिल्ली) येथे कार्डिओलॉजीमध्ये डीएम ही पदवी प्राप्त करीत आहे.

सौरभ यानेही लंडन येथील एमआरसीपी ही पदवी प्राप्त केली. या दोन्ही मुलांच्या वैद्यकीय शिक्षणाने डॉ. शिवाजी कुंभार यांची पुढील पिढी वैद्यकीय क्षेत्रात कार्यरत झाली आहे. या दोन्ही मुलांनी खटाव-माणसारख्या दुर्गम भागातील रुग्णांची सेवा करण्याचा मानस ठेवला आहे. ग्रामीण भागातील युवक व युवतींना या गौरी आणि सौरभ यांच्या उच्चशिक्षणामुळे एक चांगली प्रेरणा मिळणार आहे.

समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे कुंभार कुटुंबियांचे मन:पुर्वक हार्दिक अभिनंदन व खुप खुप शुभेच्छा. आम्हाला तुमचा अभिमान आहे. तुम्हा सर्वांना समस्त कुंभार समाजातर्फे मानाचा मुजरा.

***

राष्ट्रीय समाचार

सतीशजी कुंकळेकर बने अखिल भारतीय प्रजापती (कुंभकार) महासंघ के राष्ट्रीय अध्यक्ष



राष्ट्रीय कार्यकारिणी बैठक के शुरवात को राष्ट्रीय अध्यक्ष आर.बी.के. प्रजापति एवम् मुख्य पदाधिकारीओं का आगमन



दिप प्रज्वलन करते हुए आर.बी.के. प्रजापति, सतिशजी कुंकळेकर, मनोज प्रजापति और मान्यवर



पुजा एवम् आरती करते हुए भवरलाल पॉटर, लुणचंद सिनावाडीया, सोमाभाई प्रजापति (पगडी शेठ) एवम् मान्यवर



सभा के शुरवात मे ज्ञात अज्ञात मृत समाज बंधूओ को श्रद्धांजली अर्पण



मंचासिन महासंघ के मुख्य पदाधिकारी



नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष सतिशजी कुंकळेकर संबोधित करते हुए



कार्यकारी बैठक को उपस्थित मान्यवर पदाधिकारी तथा सदस्य

इंदौर : अखिल भारतीय प्रजापति कुंभकार समाज की राष्ट्रीय कार्यकारिणी की बैठक रविवार को होटल द ग्रैंड राघवम् में आयोजित की गई। इसमें देशभर के प्रतिनिधि जुटे। सभी ने एक मत से समाज के विकास के लिए मध्यप्रदेश और छत्तीसगढ़ की तरह देशभर में माटी कला बोर्ड गठन करने की मांग की। इस मौके पर नवीन कार्यकारिणी का गठन भी हुआ। आपसी विचार विमर्श कर ३ सितंबर को मुंबई में होने वाले राष्ट्रीय अधिवेशन की रूपरेखा भी तैयार कीं गई।

बैठक में देश के विभिन्न राज्यों से एक हजार प्रतिनिधि शामिल हुए। इसमें प्रतिनिधियों ने निर्णय लिया कि इंटरनेट मीडिया युवाओं के जीवन का बड़ा हिस्सा लील रहा है। जागरूकता के लिए अभियान चलाएंगे और सभी को समझाएंगे कि अपने समय का सदुपयोग करें। जीवन में उत्तरोतर उन्नति करें, ताकि हमारा देश सर्वोच्च स्थान पर बना रहे। युवा पीढ़ी को अश्लीलता से दूर रखने और दहेज प्रथा का विरोध करने का संकल्प भी कुंभकार समाजजन ने लिया। अखिल भारतीय प्रजापति कुंभकार महासंघ के सीए मनोज प्रजापत, मदन मोहन प्रजापत व भगवान नकसवाल ने बताया कि प्रजापति समाज की राष्ट्रीय बैठक में राजनीतिक सशक्तीकरण पर जोर दिया गया। सभी प्रमुख राजनीतिक दलों से समाजजन की अपेक्षा है कि समाज के व्यक्तियों को संगठन और जनप्रतिनिधियों के तौर पर नियुक्ति में प्राथमिकता दी जाए।

पदाधिकारियों ने जानकारी दी कि शिक्षा के क्षेत्र में बच्चों को बेहतर अवसर दिलाने के लिए कार्य योजना बनाई जा रही है। वहीं महिलाओं को उच्च शिक्षा से जुड़े रखने और निरंतर आगे बढ़ाने का भी संकल्प



नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष सतिशजी कुंकळेकर तथा मुख्य महासचिव मनोज प्रजापतिजी का अभिनंदन करते हुए महासंघ के पदाधिकारी



नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुख्य महासचिव का अभिनंदन करते हुए महासंघ के प्रमुख पदाधिकारी



नवनिर्वाचित राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुख्य महासचिव का अभिनंदन करते हुए महासंघ के प्रमुख पदाधिकारी



राष्ट्रीय अध्यक्ष तथा मुख्य महासचिव निर्वाचन के बाद जल्लोश करते हुए महासंघ के पदाधिकारी

समाजजन ने लिया। पदाधिकारियों ने बताया कि जन्म से लेकर मृत्यु तक और विवाह आदि संस्कार में भी हमारी भूमिका महत्वपूर्ण होती है। हम सेवा की भाव से समाज के हर वर्ग तक निष्काम भाव से समर्पित रहते हैं। इस मौके पर जगदीश खंडारे, सत्यनारायण सेराटिया, मांगीलाल रेडवाल, सुशील प्रजापत, विष्णु प्रजापत, रमेश भगत, अमित प्रजापत, योगेश गेदर, राजेश प्रजापत, रूपेश प्रजापत, गोपु प्रजापत, अनिल प्रजापत, विजय प्रजापत मौजूद थे।

राष्ट्रीय कार्यकारिणी घोषित

कुंभकार महासंघ की राष्ट्रीय कार्यकारिणी इंदौर में घोषित की गई। इसमें राष्ट्रीय अध्यक्ष सतीश प्रजापत (गोवा), मुख्य महासचिव मनोज प्रजापत (इंदौर), तारसेम सिंह (पंजाब), सुनीता गोला (दिल्ली), विश्वनाथ साहू (ओड़िशा), गुलाब राम (कर्नाटक), विशाल वर्मा (हरियाणा) को जिम्मेदारी सौंपी गई। मुंबई से नथमल प्रजापत, तेलंगाना से मीठालाल प्रजापत आदि के साथ अन्य प्रदेशों से आए पदाधिकारियों को नए दायित्व सौंपे गए।

***

स्वास्थ शिविर में २१० मरीजों का परीक्षण



इंदौर : विश्व स्वास्थ्य दिवस के उपलक्ष्य में रविवार को छावनी स्थित चमेली देवी अग्रवाल रेडक्रॉस डायग्नोस्टिक सेंटर पर निशुल्क स्वास्थ्य शिविर का आयोजन किया गया । केंद्र के प्रमुख डॉ. आर. के. गौर एवं अन्य चिकित्सकों ने दीप प्रज्वलन कर शिविर का शुभारंभ किया । शिविर में साइंस हाउस भोपाल के डॉ. बीके तिवारी, डॉ. आशीष अग्रवाल, डॉ. सुजाता, डॉ. रवि गुप्ता, अरुण निहाले सहित केंद्र के सहयोगी उपस्थित थे । शिविर में हृदय रोग, महिला रोग, शिशु रोग, हड्डी रोग, दंत रोग एवं अन्य विशेषज्ञों ने २१० मरीजों का परीक्षण कर आवश्यक औषधियां एवं परामर्श प्रदान किया । जरूरतमंद मरीजों को अल्ट्रासाउंड, ईसीजी एवं अन्य सभी तरह के पैथोलॉजी जांच की सुविधा भी उपलब्ध कराई गई ।

3rd Successful VVIP PRAJAPATI SUMMIT

नई मुम्बई : तृतीय सफलतम वीवीआईपी प्रजापति शिखर सम्मेलन नवी मुंबई के पांच सितारा होटल मैरियट में दिनांक १७/१२/२३ को आयोजित किया गया।

इस सम्मेलन में देश के बीस राज्यों से पधारे ११३ वीवीआईपी/ प्रजापति एलिट्स ने आपसी सौहार्द माहौल में उत्साहपूर्वक उपस्थित होकर कार्यक्रम की शोभा बढ़ाई। जिसमें पूर्व/वर्तमान IAS, IPS, IRS, DM, राजनीतिज्ञ, पूर्व सांसद, विधायक, राजकीय सचिव, आयुक्त विधि वेत्ताओं, बिल्डर्स, व्यवसायी, उद्यमी और संभ्रांत समाजसेवीयो ने शिरकत की।

एक दिवसीय कार्यक्रम पूर्णतया उल्लासपूर्ण रहा। जिसमें विभिन्न क्षेत्रों के वीवीआईपी ने प्रजापति समाज के उत्थान के लिए शिक्षा की मूलभूत जरूरतों और अभावग्रस्त परिवार को आर्थिक मदद मुहैया कराने पर गहन चर्चा की। इस संदर्भ में जल्द ही हेल्पलाइन संपर्क की सुविधा बनाए जाने के लिए निर्णय लिया गया। आवश्यक पोर्टल के निर्माण के लिए भी आम सहमति मिली। बेरोज़गारी से संबंधित महत्वपूर्ण व ज्वलंत मुद्दा को भी गम्भीरता से लिया गया। जिसमें हर प्रजापति उद्यमी अपने कंपनियों में जरूरतमंद प्रजापति परिवार के बच्चों को रोजगार मुहैया कराएंगे।

महाराष्ट्र से निवृत्त आय.ए.एस. अधिकारी डॉ. ए.टी. कुंभार, संदीप कुंभार, सुरेशराव कोते, शरदभाऊ आहेर, सतिशदादा दरेकर उपस्थित थे। गुजरात के सांसद दिनेश आनवाडीयाजी तथा मुंबई विभाग प्रजापति समाज के उद्योजक उपस्थित थे।



यह शिखर सम्मेलन अपने आप में अद्वितीय अवसर रहा। प्रजापति समाज के अग्रणी सूत्रधार व प्रणेता प्रजापति एल सी राठौर जी और प्रजापति कंस्ट्रक्शन के सीईओ राजेश प्रजापति जी की दूरदर्शिता और कुशल टीम प्रयास से यह कार्यक्रम सफल सिद्ध हुआ।

शुभकामनाओं सहित! कार्यक्रम आयोजन समिति।

***

मिट्टी के बर्तन में खाना खाने से कम हुआ कॉलेस्ट्रोल और सुधरी पाचन क्रिया

जोधपुर : सर्वपल्ली डॉ. राधाकृष्णन राजस्थान आयुर्वेद विश्व विद्यालय में नए शोध कार्यों और इनोवेशन में भागीदारी बढ़ा रहा है। रिसर्च के लिए आईआईटी और अन्य संस्थाओं के साथ कदम बढ़ाए जा रहे है तो आयुर्वेदिक मेडिसिन और चिकित्सा पद्धति को ज्यादा बढ़ाने के लिए कई तरह के प्रयास किए जा रहे है।

इसी कड़ी में विवि में अब सिलिकोसिस जैसी गंभीर बीमारी पर रिचर्स शुरू किया और दूसरी ओर कॉलेस्ट्रॉल के बर्तनों से खाना खाने से सेहत में आए सुधार पर भी काम किया जा रहा है।

आयुर्वेद विश्वविद्यालय की ओर से स्टूडेंट्स के लिए ना केवल नए-नए कोर्स शुरू करने के प्रयास किए जा रहे है और साथ ही साथ जिन में सफलता हासिल कर ली है, उसे देश के हर कोने में पहुंचाने के प्रयास किए जा रहे है।

स्वर्णप्राशन को लेकर विवि हर माह निशुल्क दवा पिला रहा है तो एनिमिया और लेकर प्रोजेक्ट शुरू किया। इसके अलावा ट्रीटमेंट को लेकर प्रोटोकॉल भी बनाया।

आईआईटी के साथ कई बीमारियों पर शोध किए जा रहे है। मारवाड़ सहित पूरे प्रदेश की माइंस में काम करने वाले श्रमिक सिलिकोसिस की गंभीर बीमारी से पीड़ित हो जाते है।

सिलिका के बारीक कण साँसो के जरिए फेफड़ो में जमा होने लग जाते हैं और ये फेफड़ो को कमजोर कर देते हैं साथ-साथ कॉलेस्ट्रॉल के बर्तनों में खाना खाने से भी सेहत में सुधार आया है, इसके लिए विवि में ३ माह तक शोध किया है और उसके सकारात्मक परिणाम आने के पश्चात यह ट्रायल ६ माह का कर दिया है।

***

राजस्थान से प्रजापति समाज के दो उम्मीद्वार पहुंचे विधानसभा

चुनाव – बीजेपी के जोराराम कुमावत २७३८२ वोटो से तो कांग्रेस के डूंगरराम गेदर ने ५०४५९वोटों के जबरदस्त अंतर से जीत दर्ज की



जोराराम कुमावत



डूंगरराम गेदर

राजस्थान : राजस्थान में ऐतिहासिक जीत के साथ भारतीय जनता पार्टी सरकार बनाने जा रही है। प्रदेश में सरकार बदलने का ट्रेंड बना रहा है। कांग्रेस के लोक लुभावने वादे और चुनावी घोषणायें भी इस परम्परा को बदलने से नहीं रोक पाई। राजस्थान के साथ–साथ मध्यप्रदेश एवं छत्तीसगढ़ में भी भाजपा सरकार बनाने जा रही है। बात करें राजस्थान में प्रजापति समाज की तो यहाँ पर भाजपा ने कुमावत समाज के तीन उम्मीद्वारों को टिकिट दिया था। जिसमें दो उम्मीद्वार चुनाव हार गयें है। केवल अकेले जोराराम कुमावत ही सीट निकाल पायें है। निर्मल कुमावत एवं गजानन्द कुमाव चुनाव हार गयें। इसी प्रकार कांग्रेस ने भी प्रजापति समाज के तीन उम्मीदवारों को टिकिट दिया था जिसमें से डूंगरराम गेदर ही जीत सकें है। मदन प्रजापति एवं सुरेन्द्र गोयल अपने प्रतिद्वंदियों से हार गये। बात करें सुमेरपुर की तो भाजपा के टिकिट पर चुनाव लड़े जोराराम कुमावत ने २७३८२ वोटों से जीत दर्ज की है। उन्होंने कांग्रेस के उम्मीदवार हरिशंकर को हराया है। जोराराम कुमावत को कुल १०४०४४ वोट मिले वहीं हरिशंकर को ७६६६२ वोट प्राप्त हुए। फूलेरा से भाजपा उम्मीदवार निर्मल कुमावत कांग्रेस उम्मीदवार विद्याधर सिंह से २६८९८ वोटों से हार गये है इसी प्रकार भाजपा के तीसरे उम्मीदवार दांतारामगढ से गजानन्द कुमावत कांग्रेस प्रत्याशी विरेन्द्र सिंह से ७९९७ वोट से हार गये है। इसी प्रकार कांग्रेस ने प्रजापति समाज के तीन उम्मीदवारों को टिकिट देकर चुनावी मेदान में उतारा था जिसमें से सूरतगढ़ सीट से डूंगरराम गेदर ने ५०४५९ वोटों के जबरदस्त अंतर से जीत दर्ज की है।

उन्हें कुल ११६८४१ वोट प्राप्त हुए वहीं भाजपा उम्मीदवार रामप्रताप कसानिया को कुल ६६३८२ वोट ही मिल सकें है। बात करें पचपदरा सीट की तो यहाँ पर कांग्रेस उम्मीदवार मदन प्रजापत २५२९ वोटों से हार गयें है। मदन प्रजापत को कुल ७५४६८ वोट मिले। वहीं भाजपा उम्मीदवार अरूण चौधरी को कुल ७७९९७ वोट मिले है। इस प्रकार मदन प्रजापत को बहुत कम वोटों के अंतर से हार का सामना करना पड़ा है। इसी प्रकार जेतारण से कांग्रेस उम्मीदवार सुरेन्द्र गोयल को भी १३५२६ वोटों से हार का सामना करना पड़ा है। सुरेन्द्र गोयल को कुल ५२७५१ वोट मिले वहीं यहाँ से भाजपा उम्मीदवार को कुल ६६२७७ वोट मिले। वहीं मध्यप्रदेश के बड़नगर से कांग्रेस की सीट से चुनाव लड़ रहे प्रजापति समाज के उम्मीदवार मुरली मोरवाल भी चुनाव हार गये है। उन्हें भाजपा उम्मीदवार जितेन्द्र उदय सिंह पाण्डेय ने ३६६९३ वोटों के अंतर से हरा दिया है।

***

मध्यप्रदेश से इंजि. नरेन्द्र प्रजापति विधानसभा चुनाव जित गये। मुरली मोरवाल व नर्मदा प्रसाद प्रजापति हार



मध्यप्रदेश शासन : विधानसभा सीट से ३ दिसंबर को घोषित हुए चुनावी नतीजों में इंजि. नरेन्द्र प्रजापति जीत दर्ज कर विजयी हुए है। उन्होंने रिकार्ड ३१९१२ वोटों के भारी अंतर से अपने प्रतिद्वंदी को हराया है। प्राप्त जानकारी के अनुसार विधानसभा चुनाव २०२३ में जीत कर विधान–सभा पहुंचने वाले प्रजापति समाज के अकेले नेता है। नरेन्द्र प्रजापति को कुल ७८७५४ वोट प्राप्त हुए वहीं कांग्रेस उम्मीदवार बबिता सकेत को कुल ४६८४२ वोट मिल सके। इस प्रकार ३१९१२ के भारी मतों के अंतराल से नरेन्द्र प्रजापति विजयी रहे। मध्यप्रदेश की गोटेगाँव विधानसभा सीट से कांग्रेस प्रत्याशी नर्मदा प्रसाद प्रजापति को हार का सामना करना पड़ा है। उन्हें भारतीय जनता पार्टी के उम्मीदवार महेन्द्र नागेश ने ४७७८८ वोटों के अंतराल से हरा दिया है। नर्मदा प्रसाद प्रजापति को कुल ४३९४९ वोट मिले जबकि विपक्षी महेन्द्र नागेश को कुल ९१७३७ वोट प्राप्त हुए है। मध्यप्रदेश के बड़नगर से कांग्रेस की सीट से चुनाव लड़ रहे प्रजापति समाज के उम्मीदवार मुरली मोरवाल भी चुनाव हार गये है। उन्हें भाजपा उम्मीदवार जितेन्द्र उदय सिंह पाण्डेय ने ३६६९३ वोटों के अंतर से हरा दिया है। मुरली मोरवाल को कुल ४४०३५ वोट ही मिल सके जबकि जितेन्द्र उदय सिंह को ८०७२८ वोट प्राप्त हुए है। मध्यप्रदेश में नर्मदा प्रसाद प्रजापति एवं मुरली मोरवाल दोनों ही कांग्रेस के लोकप्रिय नेता माने जाते है और पूर्व में विधायक भी रह चुके है लेकिन इस चुनाव में उन्हें हार का सामना करना पड़ा है।

प्रजापति समाज को ५ विधानसभा व १ लोकसभा टिकट दें : शिवकुमार

राज्य स्तरीय प्रजापति/ कुम्हार महाकुंभ को लेकर करनाल में हुई मीटिंग



मीटिंग में मौजूद प्रजापति समाज के गण्यमान्य लोग।

करनाल : प्रजापति चौपाल/धर्मशाला में प्रजापति चौपाल समिति के प्रधान रामकुमार की अध्यक्षता में मीटिंग हुई। बैठक में गोहना से शिव कुमार रंगीला व उनका प्रतिनिधिमंडल पहुंचा। उन्होंने समाज के लोगों को आगामी २४ फरवरी को होनेवाले प्रजापति महाकुंभ का निमंत्रण दिया।

बैठक में मौजूद करनाल के समस्त प्रजापति समाज ने शिव कुमार रंगीला आयोजक प्रजापति महाकुंभ व उनके प्रतिनिधिमंडल का फूल मालाओं से स्वागत किया। गुरु दक्ष प्रजापति की प्रतिमा भेंट की और शाल ओढ़ाकर सम्मानित किया। प्रधान रामकुमार ने प्रजापति समाज की तरफ से गोहाना से आए प्रतिनिधिमंडल को आश्वस्त किया कि करनाल से ज्यादा से ज्यादा संख्या में साथियों के साथ गोहाना पहुंचेंगे। मंच संचालन कैलाश कुमार व पदम सिंह प्रजापति ने किया। गोहाना से आए शिवकुमार रंगीला ने कहा कि आज तक सभी राजनीतिक दलों ने प्रजापति समाज का शोषण किया है। जनसंख्या के अनुपात में उनको राजनीतिक भागीदारी नहीं दी गई है। प्रजापति समाज की हरियाणा में ५ प्रतिशत जनसंख्या है। उस हिसाब से हर राजनीतिक दल प्रजापति समाज को कम से कम ५ विधानसभा की टिकट व १ लोकसभा की टिकट दें।

उन्होंने कहा कि जो राजनीतिक दल समाज को उपरोक्त राजनीतिक भागीदारी देगा समाज उसी को वोट देकर सत्ता में भेजेगा।

मिट्टी कला बोर्ड के लिए बजट दें : शिवकुमार रंगीला ने कहा कि हरियाणा में मिट्टी कला बोर्ड का गठन तो कर दिया गया है लेकिन इसे न तो संवैधानिक दर्जा दिया, न ही इसके लिए बजट का प्रावधान किया गया है। यह बोर्ड मिट्टी से जुड़ा कार्य करने वाले लोगों की मदद तभी कर सकेगा जब बजट जारी होगा। उन्होंने मांग की कि सरकार मिट्टी कला बोर्ड को जल्द से जल्द संवैधानिक दर्जा दे। इसके लिए बजट का प्रावधान करे। इसके अन्य सदस्यों को मनोनीत कर स्टाफ उपलब्ध करवाया जाए ताकि बोर्ड किसी जरूरतमंद की मदद कर सके।



एस.डी.ओ. धर्मबीर आर्य को सम्मानित करते प्रजापति समाज के लोग। (पंकज)

गांव-गांव देंगे महाकुंभ का न्यौता : पदम सिंह

पदम सिंह ने कहा कि प्रजापति महाकुंभ को सफल बनाने और जिले में टीम बनाकर गांव–गांव में निमंत्रण दिया जाएगा। पालेराम धनखड़ ने कहा कि हम सबको संगठित होकर आगे बढ़ना चाहिए। इस अवसर पर जिला पार्षद सुरेंदर उडाना, घरौंडा धर्मशाला प्रधान ओमपाल, एम.सी. सोमपाल, जयभगवान जय सिंहपुर, डा. रामकुमार रत्तक व मदन लाल सहित अन्य मौजूद रहे।

धर्मबीर आर्य व सुनील को किया सम्मानित : बैठक में धर्मबीर आर्य को जे.ई. से एस.डी.ओ. और सुनील गोलू को जी.एस.ओ. से जे.ई. पदोन्नत होने पर सम्मानित किया गया। धर्मबीर आर्य समाजसेवी कार्यों से जुड़े हैं। वह डिप्लोमा इंजीनियर एसोसिएशन के करनाल जिले के प्रधान भी रह चुके हैं।

एस.डी.ओ. धर्मवीर आर्य ने कहा कि वह हमेशा समाज के कार्यों में तन–मन व धन से सहयोग करेंगे। सुनील गोलू ने कहा कि शिक्षा हर ताले की चाबी है। हमें अपने बच्चों को शिक्षित करना चाहिए। ईमानदारी से अपना व समाज का कार्य करते रहना चाहिए।

***

सरोज प्रजापत को बनाया जयपुर प्रभारी



नागौर : प्रदेश अध्यक्ष भारतीय जनता पार्टी राजस्थान सीपी जोशी व चंपालाल गेदर द्वारा लोकसभा चुनाव २०२४ में पूर्व प्रदेश मंत्री सरोज प्रजापत को जयपुर ग्रामीण का प्रभारी बनाया गया। इस पर कार्यकर्ताओं ने खुशी जताई तथा प्रजापत को बधाई दी।

प्रजापति समाज को ५ विधानसभा, एक लोकसभा की सीट दें : रंगीला



करनाल में रविवार को प्रजापति समाज की बैठक में मौजूद समाज के प्रतिनिधि

प्रजापति चौपाल में समिति के प्रधान रामकुमार की अध्यक्षता में जिला स्तरीय मीटिंग हुई। गोहना से शिव कुमार रंगीला एवं उनका प्रतिनिधि मंडल २४ फरवरी को होने वाले प्रजापति महाकुंभ का निमंत्रण देने पहुंचा। बैठक में मौजूद करनाल के समस्त प्रजापति समाज ने आयोजक प्रजापति महाकुंभ रंगीला एवं उनके प्रतिनिधि मंडल का फूल मालाओं, गुरु दक्ष प्रजापति की प्रतिमा भेंट कर स्वागत किया। प्रधान रामकुमार ने समस्त प्रजापति समाज की तरफ से गोहाना से आए प्रतिनिधि मंडल को आश्वासन दिया कि करनाल से ज्यादा से ज्यादा संख्या में साथी गोहाना पहुंचकर आवाज बुलंद करेंगे। मंच संचालन कैलाश कुमार एवं पदम सिंह प्रजापति द्वारा किया गया।

शिव कुमार रंगीला ने कहा कि आज तक सभी राजनीतिक दलों ने प्रजापति समाज का शोषण किया है, जनसंख्या के अनुपात में उनको राजनीतिक भागीदारी नहीं दी गई है।

प्रजापति समाज की हरियाणा में ५ प्रतिशत जनसंख्या है। उस हिसाब से हर राजनीतिक दल प्रजापति समाज को कम से कम पांच विधानसभा की टिकट एवं एक लोकसभा की टिकट दे। जो राजनीतिक दल समाज को उपरोक्त राजनीतिक भागीदारी देगा समाज उसी को वोट कर सत्ता में भेजेगा। उन्होंने कहा कि हरियाणा में मिट्टी कला बोर्ड का गठन तो कर दिया गया है, लेकिन इसको न तो संवैधानिक दर्जा दिया गया न ही इसके लिए किसी बजट का प्रावधान किया है।

मौके पर पाले राम धनखड़, सुरेंद्र उड़ाना जिला पार्षद, घरोंडा धर्मशाला प्रधान ओमपाल, घरोंडा से एमसी सोमपाल, जयभगवान जय सिंहपुर, डाक्टर रामकुमार रत्तक, मदन लाल लेखाधिकारी, मास्टर राजेंद्र, रणधीर सिंह, सुमेर चंद, धर्मवीर आर्य, सुनील गोलू, कृष्ण कुमार, रामपाल तरावडी, नाथी राम, मंगत राम, लाडवा से पार्षद योगेश, राधेश्याम बल्ला, डाक्टर अजय वर्मा हिसार, मनीत वर्मा, जोनी प्रजापति, नरेश प्रजापति, मास्टर करन सिंह, रमेश प्रजापति उपलाना, बलबीर सिंह, रविंद्र कुमार एसडीओ, सूरजभान प्रजापति, मास्टर नरेश कुमार, राजेश कुमार, हरि चंद प्रबंधक धर्मशाला, सुभाष सहित अन्य मौजूद रहे।

***

सर्व प्रजापति शक्ति ट्रस्ट ने किया वाराणसी निवासी बालिकाओं की बकाया स्कूल फीस का भुगतान



वाराणसी (उ.प्र.) : मुंबई की एनजीओ सर्व प्रजापति शक्ति ट्रस्ट हमेशा ही आम जन मानस के सहयोग में तत्पर रहता है। प्रति माह कुछ न कुछ जरूरतमंद लोगों को मेडिकल, शिक्षा, शादी, इत्यादी में निरंतर आर्थिक सहयोग करते आया है।

पुनः एक बार वाराणसी के रहने वाले विनोद प्रजापति की ४ पुत्री एमडी पब्लिक स्कूल में पढ़ रही रही थी। जिनकी अगस्त से अब तक कि फीस परिवार की आर्थिक स्थिति खराब होने के कारण माता पिता फीस भरने में असमर्थ थे। जिसकी जानकारी संतराम बी ए एजुकेशन एंड वेलफेयर सोसाइटी के सचिव भारत प्रसाद प्रजापति को मिली। उन्होंने तत्काल उस पर विचार करते हुए की बच्चियों की परीक्षा में कोई बाधा नही आये इसलिए सर्व प्रजापति शक्ति ट्रस्ट के संस्थापक अजय प्रजापति, सचिव विनोद कुमार प्रजापति (पनवेल) कोषाध्यक्ष इन्द्रजीत प्रजापति को सूचित किया। जिसके फलस्वरूप सन्तराम बी ए एजुकेशन के अध्यक्ष एवं सर्व प्रजापति शक्ति के सलाहकार राजेन्द्र बाबू प्रजापति के द्वारा मदद मांगने वाले का सत्यापन के बाद स्तुति करते हुए सहयोग करने का निर्णय लिया गया एवं संस्था ने तमाम लोगो से मदद की अपील किया और निम्न लोगो ने सहयोग किया।

जिसके माध्यम से तीनों बच्चियों की स्कूल फीस भर दिया गया। सहयोगियों के नाम अजय प्रजापति, स्वेता प्रजापति, इन्द्रजीत प्रजापति, विनोद प्रजापति, पीयूष प्रजापति, रवींद्रनाथ प्रजापति, श्यामराज, सुनील प्रजापति, शुवलाल, गुलाबचंद, हंसराज, पंकज, राधिका प्रजापति, टुनटुन, संजय, शंकरलाल प्रजापति, लोकनाथ, रमेश, राकेश, भारत, प्रमिता, अंकित, हार्दिक, सर्वेश, आशिष, इत्यादी ने सहयोग किया। संस्था एवं बेटी के पिता ने सभी का दिल हार्दिक आभार व्यक्त किया।

***

मध्य क्षेत्र गूंज उठा
कुंभकार समाज ने लगाए मा आराध्य श्री या देंवी माता जयकारे







इंदौर : कुंभकार समाज के विभिन्न घटकों संगठनों ने रविवार शाम आराध्य देवी मां श्रीया देवी माता की जयंती के अवसर पर मध्य क्षेत्र में शोभायात्रा निकाली । जिसमे अलग–अलग झांकियां भजन कीर्तन करते समाज जनों की टोलियां आकर्षण का केंद्र रही । वही जयकारों से प्रमुख बाजार गूंज मान कर रहे थे । दो दर्जन से ज्यादा मंचों से यात्रा का स्वागत व प्रसादी वितरण किया गया ।

प्रजापति ८४ महासंघ, अखिल भारतीय प्रजापति कुंभकार महासंघ, प्रजापति युवा संगठन आदि १३ कुंभकार रविवार को एक जुटता के साथ नजर आए । सीए मनोज प्रजापत, भोला ठाकुर, मदन मोहन प्रजापत, योगेश गेन्दर, सत्यनारायन लुनिया, भगवान नकसवाल, मांगीलाल रेडवाल, रमेश भगत, रूपेश बाबरिया प्यारेलाल नकसवाल, मुन्ना भैया, जगदीश खंडारे आदि समाज जनों ने गोरा कुण्ड चौराहे से बैंड बाजे घोड़े ऊंट के साथ शोभायात्रा का शुभारंभ किया । यात्रा खजूरी बाजार, राजवाड़ा जबरेश्वर महादेव, सराफा, पिपली बाजार, बर्तन बाजार, बजाज खाना, सठा बाजार होते हुए इतवारिया बाजार पहुंची जहां पर समापन किया गया ।

दहेज मुक्त विवाह करकर समाज को दिया सन्देश



सीकर : श्री श्रीयादे परिवार भारत द्वारा पहली बार श्री श्रीयादे माता मन्दिर में शिश्यू रानोली निवासी दूल्हे मुकेश मारवाल, दरभंगा बिहार निवासी दुल्हन अरुणा प्रजापति का दहेज मुक्त विवाह पंडित बनवारीलाल शास्त्री द्वारा विधि विधान से सम्पन्न करवाया गया । ट्रस्ट चेयरमैन शिवभगवान सारडीवाल ने बताया कि इस शादी से देशभर के कुम्हारो में आपसी रोटी बेटी का सबन्ध स्थापित करने का संदेश दिया गया । इस मौके पर महन्त सिद्धगिरी महाराज ने कहा कि आज के दौर में देशभर का कुम्हार प्रजापति समाज रोटी बेटी के अभियान से एक नई मिशाल कायम कर सकता है । समाज के राष्ट्रीय संगठनों के गणमान्य लोगों को भी अब आपस मे रिश्ते करके समाज को जोड़ने का कार्य करना होगा । में देशभर में समाज जाग्रति के लिए भ्रमण करता हुँ और अब इस मिशन पर बड़ा अभियान चलाएँगे ओर आगामी दीपावली तक ११ जोड़ो का दहेज मुक्त सामुहिक विवाह सम्मेलन आयोजित करवाएंगे । इस मौके पर महंत सिद्धगिरी महाराज चतुर्भुज तूनवाल, आनन्द पंडित, अंशु कुमार प्रजापति, शेखरचन्द मरेठिया, नेमीचंद दमीवाल, नंदलाल काम्या, जगदीश तूनवाल, मनोज पंडित, शंकर कुमार पंडित, नंदकिशोर मरेठिया, दिनेश कुलचानिया, हरिराम प्रजापत, राजकुमार निरानीया, पवन होड़कासिया, मूलचन्द मारवाल, सांवरमल भोडीवाल, रामावतार पारमुवाल, श्रीराम भोडीवाल, सुरेश कोलगरिया, गोपाल निरानिया, वर वधु के परिवारजनों सहित सैंकड़ों कुम्हार समाज के बंधु मौजूद थे ।

– श्री श्रीयादे परिवार भारत

***

सुरेश कोहली बने स्टेट को-ऑर्डिनेटर व प्रभारी



मंडी आदमपुर : ऑल इंडिया कांग्रेस कमेटी (ओबीसी डिपार्टमेंट) ने सुरेश कोहली को हरियाणा प्रदेश का स्टेट को–ऑर्डिनेटर व सिरसा व फतेहाबाद जिले का प्रभारी बनाया गया । सुरेश कोहली ने अपनी नियुक्ति के लिए पार्टी के राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खड़गे, सोनिया गांधी, राहुल गांधी, केसी वेणुगोपाल, चेयरमैन कैप्टन अजय सिंह यादव और पूरे शीर्ष नेतृत्व का आभार जताया है ।

कुम्हार जाति को एससी में शामिल किया जाए



उपमुख्यमंत्री केशवप्रसाद मौर्य को ज्ञापन देते हुए प्रजापति प्रतिनिधी मंडल

*** युवा प्रजापति प्रतिनिधिमंडल ने उप मुख्यमंत्री को सौंपा ज्ञापन**
*** अपने हक के लिए प्रदेशभर में अभियान चलाएगा प्रतिनिधिमंडल**

आगरा : युवा प्रजापति समाज का पांच सदस्यीय प्रतिनिधिमंडल युवा समाजसेवी सुमित प्रजापति के नेतृत्व में लखनऊ कार्यालय पर भाजपा के उप मुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य से मिला। सुमित प्रजापति ने ज्ञापन के माध्यम से उप मुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य को अवगत कराया कि कुम्हार अनुसूचित जाति की जाति है, उसको पिछड़ा वर्ग की सूचि में सूचि बंध कर दिया है, इसीलिए कुम्हार जाति को पिछड़ा वर्ग की सूचि से हटवाकर अनुसूचित जाति की सूचि में सूचि बध कराया जाए। युवा समाजसेवी सुमित प्रजापति ने बताया कि कुम्हार जाति वर्ष १९३१ से आज तक अनुसूचित जाति की सूची में शमिल होने और सुविधाएं पाने के सभी मानक पूरा करती है। वर्ष १९३१ में जे.एच. हयूटन द्वारा जन गणना कराई गई थी, उस समय कुम्हार जाति की संख्या ७ लाख ७२ हजार नौ सौ चौरासी थी। कुम्हार जाति जो वर्ष १९३१ की जाति गणना में जेएच हयूटन द्वारा कराई गई, जनगणना में ऐसी जातियों का चयन किया गया। जिन जातियों की सामाजिक, आर्थिक एवं शैक्षिक दयनीय स्थिति के आधार पर जो जातियां आज अनुसूचित जाति की सुविधाएं पा रही है, उसी गणना में कुम्हार जाति वेलदार, खरोट एवं लुनिया जाति है। वेलदार और खरोट को अनुसूचित जाति में शामिल कर लिया। लेकिन लिपिकिय त्रुटि के कारण कुम्हार और लुनिया अनुसूचित जाति की सूची में सूची बध होने से रह गयी है। बता दें कि कुम्हार अनुसूचित (एससी) जाति की जाति है, उसको पिछड़ा वर्ग (ओबीसी) कर सूचि में सूचि बध कर दिया है, इसीलिए कुम्हार जाति को पिछडा वर्ग की सूचि से हटवाकर अनुसूचित जाति की सूचि में सूचि वध कराने के लिए भाजपा के उप मुख्यमंत्री केशव प्रसाद मौर्य को ज्ञापन के माध्यम से अवगत करा दिया है। साथ ही ज्ञापन के माध्यम से यह भी अवगत कराया कि उत्तर प्रदेश में अनुसूचित जाति की जाति है, उसे पिछड़ा वर्ग की सुविधाएं दी जा रही है और पिछडे वर्ग की जाति (मौची) को अनुसूचित जाति की सुविधाएं दी जा रही है। कुम्हार जाति जो किसी लिपिकिय त्रुटि के चलते अनुसूचित जाति में होने से रह गई है, उसे जल्द ही किया जाए। वहीं सुमित प्रजापति ने बताया कि जेएच ह्यूटन द्वारा लिखित सेसंस ऑफ इण्डिया १९३१ के वाल्यूमन–१ प्रति संलग्न है, जिसमें यूनाईटेड प्रोविसंस की जनसंख्या का उल्लेख करते हुए चार जातियों को क्रमश– बेलदार, खरोट, कुम्हार एवं लूनिया जाति को वाह्य जातियों के रूप में इगित किया गया है। इन जातियों में से वेलदार व खरोट को अनूसूचित जाति की सूची में सम्मिलित कर लिया गया है। लेकिन कुम्हार और लूनिया जाति को लिपिकीय त्रुटि के कारण अनूसूचित जाति की सूची में सम्मलित होने से बंचित रह गई है। ज्ञापन देने वालों में वीरपाल प्रजापति, विपिन प्रजापति, रमाकांत प्रजापति, बंटी प्रजापति, मनीष प्रजापति आदि ने दिया।

***

प्रजापति शिक्षा समिति ने छात्र-छात्राओं को किया सम्मानित

जासं, अलीगढ़ : प्रजापति शिक्षा समिति ने आगरा रोड स्थित शिवा गेस्ट हाउस में मेधावी छात्र–छात्रा सम्मान समारोह आयोजित किया। मुख्य अतिथि डा. एनसी प्रजापति, डा. इंद्रजीत सिंह, विशिष्ट अतिथि दिग्विजय सिंह, वीपी सिंह प्रजापति, डा. जयपाल सिंह व डा. शशि कुमारी ने शुभारंभ किया। वक्ताओं ने समाज में व्याप्त कुरीतियों को दूर करने व शिक्षा को बढ़ावा देने पर जोर दिया। निदेशक राजवीर सिंह प्रजापति, अध्यक्ष ओपी वर्मा ने अतिथियों का स्वागत किया। अध्यक्षता पी. वर्मा, संचालन सीएल वर्मा व सत्यप्रकाश प्रजापति ने किया। इस अवसर पर शिशुपाल सिंह, राम प्रकाश गोला, रूप सिंह प्रजापति, मुकेश आर्य, विजय गोला, दाताराम वर्मा, गंगा प्रसाद, ओमप्रकाश सिंह, थान सिंह आदि मौजूद रहे।



प्रजापति शिक्षा समिति के मेधावी छात्र–छात्रा सम्मान समारोह में शामिल विद्यार्थी, मंचासीन अतिथियों में डा. एनसी प्रजापति, डा. इंद्रजीत सिंह व अन्य. सौ. समिति

***

अखिल भारतीय प्रजापति कुंभकार महासंघ के प्रदेश अध्यक्ष का चुनाव निर्विरोध संपन्न



प्रदेशाध्यक्ष लक्ष्मीनारायण प्रजापति का सम्मान करते हुए पदाधिकारी

इंदोर : अखिल भारतीय प्रजापति कुंभकार महासंघ के प्रदेश अध्यक्ष के चुनाव रूपगंगा गार्डन इंदौर में सम्पन्न हुए। यह जानकारी महासंघ के उज्जैन जिला महामंत्री संदीप प्रजापति महाकाल ने देते हुए बताया कि इस चुनाव प्रक्रिया को संपन्न करवाने के लिए समन्वय समिति का गठन महासंघ के राष्ट्रीय मुख्य महासचिव प्रजापति मनोज जी द्वारा किया गया। समिति मे राजस्थान से महासंघ के फाउंडर मेंबर रूपचंदजी संवाडीयां, माटी कला बोर्ड के पुर्व प्रदेश अध्यक्ष रामदयाल प्रजापतिजी, राष्ट्रीय उपाध्यक्ष छगनलालजी चक्रवर्ती, अंजड निमाड़ से नरेंद्र गोलेजी, सनावद से पुर्व पार्षद नानू रामजी प्रजापति, मोर्चा के पुर्व प्रदेश उपाध्यक्ष मांगीलालजी रेडवाल, और स्वयं मनोजजी। प्रदेश अध्यक्ष की दावेदारी पेश करने वालो में उज्जैन से कैलाश प्रजापति (पार्षद), इंदौर से गिरधारी लालजी डोलियां, मदन मोहन प्रजापतिजी, लक्ष्मी नारायणजी प्रजापति (मुन्ना भईया), राधेश्यामजी कुम्भकार, राजकुमारजी प्रजापति, सुमितजी प्रजापति कुल ७ उम्मीदवार रहे। चुनाव प्रक्रिया के पुर्व कार्यक्रम की शुरुवात प्रजापति समाज की आराध्य देवी मां श्री यादें के समक्ष दीप प्रज्वलित करके की गई, इस चुनाव प्रक्रिया कार्यक्रम में पूरे देश व प्रदेश एवम द्वश्व के समस्त जिलों के लगभग ३०० से भी ज्यादा पदाधिकारी मुख्य रूप से उपस्थिति रहे। चुनाव प्रक्रिया में शामिल समस्त ७ उम्मीदवारों में से ६ उम्मीदवारों द्वारा वरिष्ठ समाज सेवी महासंघ के राष्ट्रीय उपाध्यक्ष लक्ष्मी नारायण (मुन्ना भईया) को एकजुटता से अपना समर्थन प्रदान करते हुवे उनके अध्यक्ष पद पर आसीन करने का अपना समर्थन दिया। इस प्रकार चुनाव समिति द्वारा निर्विरोध निर्वाचित घोषित करते हुए (मुन्ना भईया) को प्रदेश अध्यक्ष घोषित किया। उनके प्रदेश अध्यक्ष घोषित होने पर समस्त पदाधिकारो द्वारा हर्ष व्यक्त करते चुनाव स्थल पर ही बड़ी गर्म जोशी से जोरदार स्वागत किया गया। स्वागत के इस अवसर पर अखिल भारतीय प्रजापति कुंभकार महासंघ उज्जैन से कैलाश जी बोबारीया, कैलाश प्रजापति जी पार्षद, सचिव राजू बाबाजी, कोषाध्यक्ष राधा किशन जी, रमेश जी, दुलीचंद जी, गुलाब जी, प्रकाश जी, कमल जी आदि प्रमुख पदाधिकारियों द्वारा किया गया।

श्री कुंभार एंटरप्रायजेस

इले. व मेक. वजन काटे, मापे, मिल्क ॲनालायझर, फॅट मशिन

इ. चे अधिकृत विक्रेते



अशोक धोंडीराम कुंभार
Mo. : 9890368125

SKE
Shree Kumbhar Enterprises





M I L K ANALYSER

शासनमान्य
वजन काटावाले
विक्री पश्चात
सेवेची हमी









संचालक



सचिन अ. कुंभार
Mo. + 91 9890169492
9970049494
Shop. 02162-233492

Corp. Office
Plot No. 49, Near Aditya Nagari,
Bombay Restaurant Chowk,
Satara 415 003
shreekumbharenterprises@gmail.com
www.shreekumbharenterprise.com

१५५, कुभारवाडा, केसरकर पेठ, नगरपालिकेजवळ, सातारा.

श्री आर्टस्



गणेश मुर्ती व गौरीचे

* होलसेल विक्रेते *

मु. पो. दत्तवाडी, ऊरुळी कांचन, ता. हवेली, जि. पुणे – ४११ २०२



पंकज ह. कुंभार
मो. ९९२३१९४३९४



चरण ह. कुंभार
मो. ९९२३०६२७०६

संविधान नफरतकी नहीं... मोहब्बत की किताब है ।

(डॉ. राजेंद्र कुंभार)

वे संविधान के आगे सर झुकाने का नाटक करेंगे ।
वे संविधान के पुस्तकपर सुनहरी जिल्द चढायेंगे ।
वे संविधानका मंदीर बनायेंगे नये मंत्र गढ़ेंगे और पढ़ेंगे ।

संविधान की पुस्तककी रक्षा के लिए मंदीर के
इर्द गिर्द पुलिसका पहरा लगायेंगे ।
ताकि कोई दलित, आदिवासी, महिला, कारीगर उसे
छूकर अपवित्र न कर सके ।

वे धर्मगुरुओंसे कहकर फर्मान निकालेंगे,
जो संविधान मंदीरके एकहजार फेरे लगायेगा उसे मोक्ष मिलेगा ।
इससे संविधान की महिमा बढ़ेगी ।

उधर मंदीर के अंदर सुनहरी जिल्द के बीच
धर्मांध विषमतावादी, भ्रष्ट राज्यकर्ता और भयभीत न्यायालय
संविधानके एक एक अनुच्छेदको दीमक की तरह कुतर डालेंगे
और संविधान एक खोखली जिल्द बन जायेगा ।

अब वे ऐलान करेंगे, हम बताये वही संविधान है,
विषमतामें ही विकास है, राजा कभी चूकता नहीं,
स्त्री शूद्रातिशूद्र किसी हकके काबिल नहीं ।

यही परंपरा है और यही संविधान है ।
नागरिकों के हक एक अफवाह है ।
और हक मांगनेवाले देशद्रोही है ।

शिक्षा और रोजगार की मांग
धर्म के दुष्मनोंका षडयंत्र है ।
मनुस्मृतीही असली संविधान हैं ।

मगर दोस्तों संविधान पवित्र ग्रंथ नहीं है ।
वह हमारी दिनचर्या और ऋतुचर्या है ।
वह ऐलान है...
भूखसे, विषमतासे और नफरतसे मुक्तीका ।

संविधान की पुस्तक किसान के हातोमें, कारीगरों के वर्कशॉपमें,
जंगलमें, आदिवासी महिलाओं से पढ़ते पढ़ते मैली हो जाये ।

वह बच्चों के स्कूलमें, कारखानोंमे, चौराहोपर पढी जाय ।
उसमें मेहनतकशके हातों के छालों जैसे निशान पड़ जाय ।

शायद किताब फट भी जाय
पर इसके बाद...
संविधान उभरेगा हर नागरिक के दिमागमें खुद जायेगा
शिलालेखों की तरह हड्डीयोंपर, खून बनके दौडेगा ।

हर समतावादी मेहनत कश शरीरमें ।
संविधान
रेशम और मखमलकी पोशाक नहीं है ।
जिसे केवळ समारोह में पहना जाय ।

वह ऐसी चादर है जिसे हर कोई दररोज ओढकर निर्भयतासे,
चैन की नींद सो सके ।
दोस्तों... संविधान नफरत या दमन का दस्तावेज नहीं है ।
वह हर एक आदमी के लिए सुरक्षा और मोहब्बत का पैगाम है ।

***

बेरोजगार हूँ साहब रोजगार चाहिए

(संकलित)

खाली कंधों पर थोड़ा सा भार चाहिए ।
बेरोजगार हूँ साहब रोजगार चाहिए ।

जेब में पैसे नहीं है डिग्री लिए फिरता हूँ
दिनोदिन अपनी नजरों में गिरता हूँ ।
कामयाबी के घर में खुले किवाड़ चाहिए
बेरोजगार हूँ साहब मुझे रोजगार चाहिए ।।

टेलेंट की कमी नहीं हैं भारत की सड़कों पर,
दुनिया बदल देगे भरोसा करो इन लड़कों पर ।
लिखते लिखते मेरी कलम तक घिस गई,
नौकरी की प्रक्रिया में अब सुधार चाहिए ।।

बेरोजगार हूँ साहब मुझे रोजगार चाहिए...

दिन रात करके मेहनत बहुत करता हूँ,
सुखी रोटी खाकर ही चैन से पेट भरता हूँ ।
भ्रष्टाचार से लोग खूब नौकरी पा रहे हैं,
रिश्वत की कमाई खूब मजे से खा रहे है ।।

नौकरी पाने के लिए यहाँ जुगाड़ चाहिए,
बेरोजगार हूँ साहब मुझे रोजगार चाहिए ।।

***

उनके साथ चल रहा जमाना

(ओपी प्रजापति गंजबासोदा जिला विदिशा म.प्र.)

सदा बुराई उनकी कर रहे ।
कभी न बढने दे रहे आगे ।।

तनिक राहत मिलती वो देखे ।
करम ठोक रहे पछताने ।।

शासन में जिनके बैठे आ रहे ।
वो ही देश में मजे उडा रहे ।।

जिनका न कोई बैठा हो शासन में ।
वों ही रात दिन धक्के खा रहें ।।

अपना भाई उन्हें कभी न माननें ।

अपनों अपनों को पहिचानें ।।
कितनी भी उनकी सेवा करलें ।
तनिक मिले तो टांग अडानें ।।
मेहनत मजदूरी ही करते आ रहे ।
नोकरी का नही कोई ठिकाना ।।
जिनका सोर्स है सब से भारी ।
उनके साथ चल रहा जमाना ।।

***

मेरे लिखने से क्या?

(अमन मालवीय, पलटवाड़ा, छिंदवाड़ा मप्र)

मेरे लिखने से क्या?
तुम पढो, तो कोई बात बने...
मेरे सोचने से क्या?
तुम समझो तो कोई बात बने...
चुप हूँ तो क्या?
तुम कुछ बोलो तो कोई बात बने...
मेरे चाहने से क्या...?
तुम एमसास करो तो कोई बात बने...
फूल हूँ तो क्या?
तुम खुशबू बनो तो कोई बात बने...
मै मै बैरंग हूँ तो क्या?
तुम रंग भरो तो कोई बात बने...
मै निराकार हूँ तो क्या?
तुम साकार करो तो कोई बात बने...

***

आदमी की औकात

(दिवंगत जैन मुनि तरुण सागर जी द्वारा रचित कविता)

फिर घमंड कैसा घी का एक लोटा,
लकड़ियों का ढेर, कुछ मिनटों में राख.....
बस इतनी-सी है आदमी की औकात!!!
एक बूढ़ा बाप शाम को मर गया, अपनी सारी ज़िन्दगी,
परिवार के नाम कर गया, कहीं रोने की सुगबुगाहट,
तो कहीं ये फुसफुसाहट....
अरे जल्दी ले चलो
कौन रखेगा सारी रात.....
बस इतनी-सी है आदमी की औकात!!!
मरने के बाद नीचे देखा तो नज़ारे नज़र आ रहे थे,
मेरी मौत पे....
कुछ लोग ज़बरदस्त,
तो कुछ ज़बरदस्ती
रोए जा रहे थे।
नहीं रहा.... चला गया....
दो चार दिन करेंगे बात....
बस इतनी-सी है
आदमी की औकात!!!
बेटा अच्छी सी तस्वीर बनवायेगा,
उसके सामने अगरबत्ती जलायेगा,
खुश्बुदार फूलों की माला होगी....
अखबार में अश्रुपूरित श्रद्धांजली होगी....
बाद में कोई उस तस्वीर के
जाले भी नही करेगा साफ़....
बस इतनी-सी है
आदमी की औकात!!!
जिन्दगी भर,
मेरा-मेरा-किया....
अपने लिए कम,
अपनों के लिए ज्यादा जिया....
फिर भी कोई न देगा साथ....
जाना है खाली हाथ....
क्या तिनका ले जाने के लायक भी,
होंगे हमारे हाथ??? बस
ये है हमारी औकात....!!!
जाने कौन सी शोहरत पर,
आदमी को नाज है!
जो आखरी सफर के लिए भी,
औरों का मोहताज है!!!
फिर घमंड कैसा?
बस इतनी सी हैं
हमारी औकात...
जीवन में ''ठंड'' और ''घमंड''
दोनों से बच कर रहिए....
क्योंकि दोनों ही से
''अकड़न'' आ जाती है...!!!

***



महाराष्ट्र आपला

''कुंभश्री'' दिपावली विशेषांकाचे दिमाखात प्रकाशन

'कुंभश्री' दिवाळी अंकाचे प्रकाशन करताना आयुक्त अभिनय कुंभार कार्यक्रमास उपस्थित असलेल्या युवा वर्गाला उद्देशून म्हणाले, 'आपले दिवस अंधारलेले असतील तेव्हा 'अंधाराचीच गाणी गावीत' जो अंधाराला भीत नाही त्याचा मुकाबला कोणीच करु शकत नाही. प्रकाशाच्या लाटा जरी उद्या त्याच्या आयुष्यात आल्या तरी तो उच्छंकूल होत नाही. कारण कधितरी त्याने अंधारही पाहिलेला असतो. कारण त्याच अंधाराने त्याला 'परिस्थिती'वर आरुढ व्हायला शिकविलेले असते. 'अहंकाराचा वारा न लागो माझिया चित्ता' हे त्याला त्या परिस्थितीनेच शिकविलेले असते. वेळ आलीतर साधेसुधे रहा परंतु वृत्तीचा सच्चेपणा कायम ठेवा. आपला भूतकाळ कधीही विसरु नका. शालीवाहन हा कुंभार समाजातील एक तरुण एकेकाळी या देशाचा राजा होता हे कायम लक्षात ठेवा.



संतशिरोमणी गोरोबाकाका आणि शककर्ता राजा शालिवाहन यांचे प्रतिमा पूजन करताना मान्यवर



कुंभश्री दिपावली अंक प्रकाशन प्रसंगी डावीकडून विलास जाधव, सौ. बीना राजे, संजय राजे, सुरेशराव कोते, अभिनय कुंभार, मनिषा कुंभार, सोन्याबापू देशमुख, गणेश कुंभार व मधुकर काजूळकर.



कुंभश्री संपादक संजय राजे व संचालिका सौ. बीना राजे यांचा सत्कार हस्ते सुरेशराव कोते व अभिनय कुंभार



नवनिर्वाचीत जाहिरात विभाग संपादक प्रकाश राजे व सौ. सुरभी राजे यांचा सत्कार हस्ते अभिनय कुंभार

पुणे (निगडी) : कुंभश्री मासिकाच्या दिपावली विशेषांकाचे प्रकाशन लिज्जत पापड या प्रसिद्ध उद्योग संस्थेचे प्रमुख संचालक (सीईओ) तसेच अकोले येथील अभिनव शिक्षण संस्थेचे अध्यक्ष आणि कुंभार समाजाचे आधारवड–समाजरत्न सुरेशराव कोते यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले. या प्रकाशन समारंभासाठी पुण्याचे विभागीय आयकर आयुक्त अभिनय कुंभार, पी.एम.आर.डी.(पुणे)च्या उपकार्यकारी अधिकारी मनिषा कुंभार, हिंजवडी पोलीस स्टेशनचे पोलीस निरीक्षक सोन्याबापू देशमुख, प्रसिद्ध उद्योजक गणेशराव कुंभार हे मान्यवर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

याशिवाय कुंभार समाजातील अनेक मान्यवरही या समारंभास आवर्जून आले होते. त्यापैकी उद्योजक मधुकर काजूळकर, एम.क्युअर कंपनीचे डायरेक्टर नरेंद्र कुंभार, आदर्श शिक्षक मोहन जगताप, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेशराव कुंभार–रोपळेकर, नामदेव कुंभार यांचा उपस्थित पाहुण्यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

कुंभश्रीचे संपादक संजय राजे यांनी या कार्यक्रमाचे प्रास्ताविक केले. संजय राजे यांचे चिरंजीव प्रकाश राजे यांची कुंभश्री मासिकाच्या जाहिरात विभागाच्या व्यवस्थापकीय संचालक–संपादकपदी निवड करण्यात आली आहे. आयकर आयुक्त अभिनय कुंभार यांच्या हस्ते याप्रसंगी त्यांचा सत्कार करण्यात आला. सौ. सुरभी प्रकाश राजे यांनी कुंभश्री मासिकाच्या वतीने तयार करण्यात आलेल्या नव्या मोबाईल 'ॲप' बद्दलची सविस्तर माहिती उपस्थितांना याप्रसंगी दिली. कार्यकारी संपादक प्रा. विलास जाधव यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले.

बाळासाहेब कुंभार (कालेकर) यांनी सर्व उपस्थितांचे आभार मानले. कुंभश्री मासिकाच्या दिवाळी अंकाच्या प्रकाशन समारंभात कार्यक्रमाच्या अध्यक्ष पदावरुन बोलताना सुरेशराव कोते आपल्या भाषणात पुढे म्हणाले, ''कुंभार समाजाला उज्ज्वल भविष्यकाळ लाभावा. सर्वसामान्य घटक असलेला कुंभार समाज उन्नत व्हावा हे उद्देश डोळ्यापुढे ठेऊन बाबुराव साळवी यांनी 'कुंभश्री' मासिक सुरु केले. पुढे त्यांच्या निधनानंतर संजय राजे यांनी हे मासिक 'शिवधनुष्य' म्हणून पुढे सुरु ठेवले. कोणाचेही, कोणत्याही स्वरुपाचे पाठबळ नसताना आज तिसाव्या वर्षीही हा अंक दिमाखात प्रकाशित होतो आहे याचे सारे श्रेय राजे कुटुंबिय आणि त्यांच्या परिवारास आहे. संजय राजे यांनी या मासिकाला अक्षरश: वाहून घेतले आहे. या झाडाला आता पाने-फुले व फळे येऊ लागलेली आहेत, ज्या झाडाला पाने-फुले व फळे लागतात तिच झाडे कृतज्ञतेने वाकतात आणि आपल्या अवती भवतीच्या समाजाला काहीतरी देतात. संजय राजे यांचे सारे जीवन असेच झाले आहे.

कुंभार समाजाला येथून पुढे आपल्या व्यवसायात अमुलाग्र बदल करावे लागतील असे सांगून कोते पुढे म्हणाले, ''ज्यांना परांपरागत कुंभारी व्यवसायात साचलेपणाच योग्य वाटत असेल, बदल करावासा वाटत नसेल त्यांनी 'व्यवसाय' बंद करावा. या व्यवसायाला प्रतिष्ठा मिळेल असे काम आजवर कोणी केले नाही. भविष्यकाळातही तसे काही दिसत नाही. ही 'इंडस्ट्री' बंद करणे हाच यावरील उपाय आहे. शिक्षणाची कास धरा. आपल्या मुलांना सर्वोत्तम शिक्षण द्या. कुंभार समाजातल्या माणसाला एकेकाळी राजा म्हटले, कारण आपल्या राजा शालीवाहन यांनी भारतावर ३५० वर्षे राज्य केले.

प्रचलित कुंभार कामाचे निरीक्षण केले तर ते राजेपण परत मिळविणे अवघड काम आहे. ते राजेपद परत मिळवायचे असेल तर प्रगतिशील शिक्षणाशिवाय पर्याय नाही. आपला समाज सर्वदृष्टीने अजूनही 'फाटका' आहे. एकेकाळी सर्व समाजात आपल्याविषयी आदर आणि विश्वास होता. हे वैशिष्ट्य आजही टिकून आहे असे सांगून कोते पुढे म्हणाले, ते 'राजे' आणि 'राजेपण' पुन्हा मिळवायचे असेल तर नव्या, बदलत्या काळाला अनुसरून नवेपणाची कास कुंभार समाजाने धरली पाहिजे याला पर्याय नाही.

प्रमुख पाहुणे या नात्याने बोलताना आयुक्त अभिनय कुंभार यांनी कुंभश्री हे केवळ मासिक नसून ते कुंभार समाजाच्या विकासाची एक चळवळ आहे. हे आपण लक्षात घेतले पाहिजे. आपल्या भाषणात ते पुढे म्हणाले, ''संगणक युगाची चाहूल लागताच डिजिटल स्वरूपात आपला अंक प्रसिद्ध करून आपले स्वतंत्र मोबाईल ॲप तयार करणारे कुंभश्री मासिक तांत्रिक, सांस्कृतिक, साहित्य आणि सामाजिक दृष्ट्या यापुढील काळातही अग्रणी राहील असा मला विश्वास वाटतो. कुंभार समाजावर कुंभश्री परिवारातर्फे मायेची शाल नेहमीच पांघरली जाते.

कुंभश्रीच्या प्रत्येक महिन्याच्या अंकात उच्च आणि सुरेख दर्जाच्या गोष्टींची, विचारांची मेजवानी असते. एकादृष्टीने कुंभश्री म्हणजे साहित्य वर्तुळातले एक विलोभनीय इंद्रधनुष्य आहे. आपलाही समाज हा हळूहळू प्रबोधनाच्या वाटेवर चालत आहे. जीवनाच्या प्रत्येक क्षेत्रात आपल्या समाजाची माणसे वरपर्यंत पोहोचत आहेत. त्यांना अजून बळ देण्याचे काम कुंभश्री ने करीत रहावे. देशातल्या सर्व भाषांमध्ये हा अंक प्रसिद्ध व्हावा, महाराष्ट्र किंवा देशातली अनेक राज्ये एवढ्यापर्यंत नाही तर यापुढे कुंभश्रीने जागतिक पातळीवर जावे यासाठी आपण सर्वजण नेटाने कुंभश्रीच्या मागे उभे राहू असा विश्वासही कुंभार यांनी व्यक्त केला.

सौ. बीना संजय राजे यांनी संपूर्ण कार्यक्रमाची आखणी नियोजन अत्यंत रेखीवपणे केले. वरील उपस्थित प्रमुख पाहुण्यांपैकी श्रीमती मनिषा कुंभार, पोलिस अधिकारी सोन्याबापू देशमुख, उद्योजक गणेशराव कुंभार यांनीही आपली मनोगते या कार्यक्रमात व्यक्त केली. स्वादिष्ट अल्पोपहारानंतर या कार्यक्रमाची सांगता झाली.

***

खेड शिवापूर येथे संत श्रीगोरोबाकाका मूर्ती प्राणप्रतिष्ठा, कलशारोहण सोहळा उत्साहात



खेड शिवापूर : शिवापूर (ता. हवेली) गावामध्ये श्रीसंत शिरोमणी गोरोबाकाका मूर्ती प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण समारंभ मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी महिलांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती. यानिमित्त बुधवारी (दि. २४) सायंकाळी संत श्रीगोरोबाकाका मूर्तीची मिरवणूक काढण्यात आली.

गुरुवारी (दि. २५) मूर्तीला जला भिषेक करण्यात आला. शुक्रवारी (दि. २६) सकाळी ११ ते १२ या कालावधीत मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा पार पडला. दुपारी १२ ते १ या वेळेत कलशारोहण समारंभ पार पडला. दुपारी १ ते २ पूर्णाहुती व आरती झाली. सायंकाळी ५ ते ७ या वेळेत ह.भ.प. बाळकृष्ण महाराज डांगे यांची कीर्तन सेवा झाली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. यावेळी खासदार सुप्रिया सुळे, आमदार भीमराव तापकीर, शिवसेना जिल्हाप्रमुख रमेश कोंडे यांच्यासह अनेक मान्यवरांनी दर्शन घेतले.

याप्रसंगी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष सतीश दरेकर, उपाध्यक्ष वसंत घोडनदीकर, सरपंच आण्णा दिघे, उपसरपंच राजू सट्टे, तंटामुक्ती अध्यक्ष उमेश दिघे, माजी उपसरपंच मंगेश कुंभार, सचिन कुंभार, सोमनाथ कुंभार, प्रवीण कुंभार, ह.भ.प. तुकाराम कुंभार, दिनेश कुंभार, मारुती कुंभार, विजय कुंभार आदी उपस्थित होते.

***

कुंभश्री 'मोबाईल ॲप'चा लोकार्पण सोहळा संपन्न

संजय राजे



गोरोबाकाका प्रतिमेस अभिवादन करताना डावीकडून नितीन भागवत, सचिन कुंभार, संजय राजे व नरेंद्र कुंभार



नितीन भागवत यांचा सत्कार करताना शशिकांत कुंभार समवेत नरेंद्र कुंभार, सचिन कुंभार व संजय राजे.



नरेंद्र कुंभार यांचा सत्कार करताना संजय खटावकर समवेत नितीन भागवत, सचिन कुंभार व संजय राजे



मोबाईल ॲप उद्घाटन प्रसंगी डावीकडून नितीन भागवत, नरेंद्र कुंभार, संजय राजे, सचिन कुंभार, सुरभी राजे, बीना राजे व प्रकाश राजे.

पुणे : दिनांक १५/३/२४ रोजी कुंभश्री मोबाईल ॲपचा लोकार्पण सोहळा मान्यवरांचे हस्ते संपन्न झाला. नोबेल कास्ट कॉम्प. प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर उद्योजक नितीनजी भागवत (पुणे), सातारा येथील श्री कुंभार एंटरप्रायजेसचे संचालक उद्योजक सचिनजी कुंभार व M Cure Pharmasitical Ltd चे संचालक नरेंद्रजी कुंभार यांच्या हस्ते मोबाईल ॲप लोकार्पण समारंभ संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरवातीला संत शिरोमणी गोरोबा काकांच्या प्रतिमेचे पूजन उपस्थित मान्यवरांचे हस्ते करण्यात आले.

कुंभश्री आय टी विभाग प्रमुख इंजि. सुरभी राजे यांनी पाहुण्यांचा परिचय करून दिला. उद्योजक इंजि. नितीनजी भागवत यांनी २००५ साली चालू केलेल्या छोट्या नोबेल कास्ट कंपनीचे रोपटे आता वटवृक्ष झाला. या कंपनीचे आता प्रायव्हेट लिमिटेड कंपनीत रूपांतर झाले आहे आणि व्यवसायाची उलाढाल सुमारे १०० कोटीच्या जवळपास पोहचली आहे. या कंपनीचे एम डी नितीनजी भागवत आहेत त्यांचा आम्हाला अभिमान आहे, ते नेहमी सर्वांनाच खुप चांगले मार्गदर्शन करतात त्यामुळे अनेक उद्योजक तयार होत आहेत.

सातारा येथील श्री कुंभार एंटरप्रायजेसचे संचालक तरुण तडफदार उद्योजक सचिनजी कुंभार हे गेली २१ वर्षांपासून इलेक्ट्रोनिक वजन काटे आणि डेअरी इक्विपमेंट मध्ये सेल्स अँड सर्विस क्षेत्रात कार्यरत राहून त्यांनी नाव कमावले आहे. महाराष्ट्राच्या जवळपास सर्व जिल्ह्यात त्यांचा व्यवसाय विस्तार आहे आणि कोट्यावधी रुपयांची त्यांची उलाढाल आहे. त्यांच्या प्रेरणेमुळे आजच्या कुंभश्री मोबाईल ॲपची निर्मिती झाली आहे.

एम क्युअर लिमिटेड कंपनीचे संचालक नरेंद्र कुंभार हे एम फार्मसी झाले असून सुमारे तीस वर्ष फार्मसी क्षेत्रात कार्यरत आहेत. संचालक म्हणून चार वर्षे गोवा येथील वॉलेस फार्मा लि. या कंपनीत कार्य केले आणि दोन वर्षापासून ते एम क्युअर कंपनीत कार्यरत आहेत. असे पाहुणे आजच्या आपल्या कार्यक्रमास लाभले आहेत हे आपले भाग्य आहे.

नंतर या तिनही मान्यवर पाहुण्यांचा शाल, श्रीफळ, गुलाबाचे रोप आणि गोरोबा काकांची सुंदर मूर्ती भेट देऊन सत्कार करण्यात आला.

संजय राजे यांनी प्रास्ताविक केले ते म्हणाले की, या महत्वपूर्ण कार्यक्रमास उद्योजक नितीनजी भागवत, तरुण तडफदार उद्योजक सचिन कुंभार आणि उच्च विद्याविभुषीत एम क्युअर लिमिटेड कंपनीचे



सचिन कुंभार यांचा सत्कार करताना शिरीष कुंभार समवेत नरेंद्र कुंभार, नितीन भागवत, संजय राजे व प्रिशा कुंभार



कार्यक्रमास उपस्थित समाज बंधू-भगिनी

डायरेक्टर नरेंद्र कुंभार हे मान्यवर त्रिमूर्ती आपणास कुंभश्री मोबाईल ॲपच्या लोकार्पण सोहळ्यास लाभली हे आपणा सर्वांचे अहंभाग्य आहे. नितीनजी यांचे आपणास नेहमीच सहकार्य असते मार्गदर्शन असते. नितीनजी यांनी केलेली प्रगती म्हणजे शून्यातून विश्व निर्मिती असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही, आम्हांला तुमचा खूप, खूप अभिमान आहे.

नरेंद्रजी कुंभार आपल्या कुंभश्री परिवाराचे सुरुवातीपासूनचे कार्यकर्ते आहेत, अगदी सतरंज्या उचलण्यापासून त्यांनी काम केले आहे. आज सुद्धा गरज पडल्यास कमी तिथे आम्ही असे ते हाडाचे कार्यकर्ते आहेत. ते एका नामांकित फार्मासिटिकल कंपनीचे आता डायरेक्टर झालेत याचा मोठा अभिमान आपणा सर्वांनाच आहे.

सातारचे राजे म्हणजे तरुण उद्योजक सचिनजी कुंभार ज्यांनी आपल्या व्यवसायाचे नावच श्री कुंभार एंटरप्रायजेस असे ठेऊन कोटीच्या कोटी उड्डाणं घेत आहेत आणि कुंभार नावाच्या ब्रँडला प्रतिष्ठा मिळवून देत आहेत आम्हां सर्वांना तुमचा अभिमान आहे.

आजच्या मोबाईल ॲपचा जन्म मुळी सचिनजी यांच्यामुळेच झाला असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही. सुमारे चार वर्षापूर्वी सचिन यांच्याकडे गेलो होतो त्यावेळी ते म्हणाले की, ''काका तुम्ही आणखी किती वर्षे असे गावोगावी फिरून कार्य करणार? तुमच्यानंतर कोण फिरणार? आधुनिक टेक्नॉलॉजीचा उपयोग करून मोबाईल ॲप करा त्यातून व्यावसायिक लोकांना व्यवसाय मिळू द्या, तद्नंतर हेच व्यावसायिक कुंभश्री ॲपला स्वतः पैसे देतील. तुम्हांला गोवोगावी फिरायची गरज भासणार नाही, तसेच तुमच्यानंतर तुमची पुढील पिढी एका जागेवर बसून हा उपक्रम चालवतील. जर काळानुरूप तुम्ही ॲप बनवला नाही तर तुमच्यासारखे फिरणे तुमच्या पुढील पिढीला जमणार नाही आणि मग हे समजोपयोगी कार्य थांबेल.''

मला त्यांचे म्हणणे पटले मी विचार करतो असे म्हणालो, तद्नंतर कोरोनाचा गंभीर काळ आला सर्वच विस्कळीत झाले. तरी त्या काळात वेबसाईट मोबाईल फ्रेंडली केली त्यामुळे वधू-वर मंडळ खूप चांगले सेवा देऊ लागले त्याचा समाजाला खूप फायदा झाला. कोरोनाचा कठीण काळ गेल्यानंतर सचिन यांच्याकडे गेलो आणि त्यांनी त्यांचे मित्र ॲप बनवणारे विशाल गायकवाड यांना बोलावून घेतले आणि तिथूनच कुंभश्री मोबाईल ॲपचा श्रीगणेशा झाला.

आमचे जावई सॉफ्टवेअर इंजि. रोहित चंद्रकांत खिरोडे, सून सॉफ्टवेअर इंजि. सौ. सुरभी राजे यांनी वेबोटीक्स टेक्नॉलॉजीचे संचालक विशाल गायकवाड यांच्याशी सुमारे सहा महिने विचार विनिमय करून खूप श्रम घेऊन kumbhashree ॲप बनवला. या त्रिमूर्तीचे मनःपूर्वक अभिनंदन व आभार.

डायरेक्टर नरेंद्र कुंभार यांच्या सुचनेनुसार मोबाईल ॲप बनवणाऱ्या रोहित खिरोडे आणि सुरभी प्रकाश राजे यांना कुंभश्री आय टी विभागाचे प्रमुख म्हणून नियुक्ती देण्यात आली. तसेच वेळोवेळी कुंभश्रीच्या विविध उपक्रमात मदत करणाऱ्या डॉ. कल्पना राजे-खिरोडे यांना सल्लागार पद देण्यात आले.

सुरभी राजे हिने कुंभश्री ॲप विषयी उपस्थितांना खालील प्रमाणे माहिती दिली.

kumbhashree ॲप डाउनलोड लोड करण्याची पद्धत -

प्रथम मोबाईल मध्ये Play Store वर जाऊन kumbhashree टाईप करा खालील बाजूस कुंभश्री लोगो दिसेल तेथे क्लीक करा मग ॲप डॉउनलोड होईल. या ॲपवरून पहिल्या सेक्शनमध्ये कुंभश्री मासिकाची पीडीएफ कॉपी व लेटेस्ट बातम्या वाचता येतील, दुसऱ्या सेक्शनमध्ये वधुवर नोंदणी करता येईल.

आणि सर्वांत महत्वाचे म्हणजे सर्व व्यावसायिक, नोकरदार, सामाजिक कार्यकर्ते, राजकीय कार्यकर्ते, समाज बांधवांनी आपली नोंदणी करून घ्यावी ही नोंदणी निशुल्क आहे. सर्व डेटा एकत्र झाल्यानंतर आपण आपल्या भागातील आपल्या व्यावसायिक बांधवाकडून खरेदी करू शकतो ते आपणास बांधव म्हणून काही सवलत देऊ शकतील. म्हणजे आपलाही फायदा आणि व्यवसायिकांचा सुद्धा फायदा.

एकमेका साहाय्य करू, अवघे धरू सुपंथ या उक्ती प्रमाणे तुमची आमची सर्वांची प्रगती होईल.

आपल्या गरजेनुसार आपल्या भागातील राजकीय, सामाजिक कार्यकर्ते, शासकीय नोकरदार, खाजगी नोकरदार, इंजिनियर, डॉक्टर असे अनेकांचे संपर्क होतील एकमेकांची कामे होतील.

चला तर मग kumbhashree ॲप डाउनलोड करून लगेच नोंदणी करून समाजाची न भूतो न भविष्यती अशी प्रगती आपण करूया.

सर्व मान्यवारांच्या हस्ते मोबाईल ॲपचे लॅपटॉपवर लोकार्पण करण्यात आले. यावेळी उपस्थित समाज बंधू भगिनी यांनी प्रचंड टाळ्यांचा गजर केला.

उद्योजक नितीनजी भागवत आपल्या भाषणात म्हणाले की, संजय राजे यांची चिकाटी, जिद्द खूप मोठी आहे, त्यांना अनेक अडचणी आल्या तरी त्यांनी त्यातून धाडसाने व शांततेने मार्गक्रमण केले. काळानुरूप बदल करून घेण्यास ते नेहमीच तयार असतात. कुंभश्रीचे यु ट्यूब चॅनेल सुरु करण्यासाठी आता विचार करावा अशी सूचना त्यांनी केली. पत्रकार म्हणून राजेंचे कार्य आदर्श आहे. समाज बांधवांच्या सुख दुःखाच्या प्रसंगी ते आवर्जून उपस्थित असतात त्यामुळे त्यांचा जनसंपर्क प्रचंड आहे.

उद्योजक सचिनजी कुंभार आपल्या भाषणात म्हणाले की, मोबाईल ॲप चा निर्माता मी आहे असे जरी राजे सर म्हणत असले तरी खरे निर्माते ते स्वतः आहेत हे मी नम्रपणे सांगू इच्छितो, मी फक्त सूचना केली प्रत्यक्षात राबवण्याचे कार्य स्वतः राजे साहेबांनी आणि त्यांच्या कुटुंबियांनी केले आहे. स्वतःच्या आयुष्यातील तीस वर्षे झोकून देऊन कार्य केल्यामुळे आमच्या सारख्या तरुणांना ते आदर्श वाटतात. आजच्या काळात फक्त स्वतः आणि स्वतःच्या कुटुंबाच्या प्रगतीसाठी झटणारेच बहुतांश लोक आहेत, परंतु राजेसरांसारखा आपल्या समाजाच्या प्रगतीसाठी झटणारा लाखोमध्ये एखादाच असतो हे आपल्या समाजाचे भाग्य आहे असे मी समजतो.

नरेंद्रजी कुंभार आपल्या भाषणात म्हणाले की राजेंचे निमंत्रण आल्यानंतर लगेचच ॲप पाहिला अत्यंत सुंदर आणि समाजपयोगी ॲप आहे. मी लगेचच मोबाईलवर राजेंना सांगितले ॲप छान आहे, तुमच्या जावयाला, सुनेला आणि मुलीला या ॲपच्या निर्मितीमध्ये घ्या त्यांची नावे मोबाईल ॲपमध्ये येऊ द्यात तसेच ॲपचा साईझ बराच मोठा आहे. 137 mb तो कमी हवा. विशेष म्हणजे ॲपचे उद्घाटन झाल्या नंतर मी पुन्हा ॲप लोड केला त्यावेळी ॲपचा साईझ कमी होऊन 30 Mb वर आला तसेच इंजि. रोहित खिरोडे, इंजि. सुरभी राजे आणि डॉ. कल्पना राजे खिरोडे यांना पदभार आजच देण्यात आला हे पाहून खूप खूप आनंद झाला. आलेल्या योग्य सूचनांवर त्वरीत अंमल बजावणी करणारे नेहमीच यशस्वी होतात. गेली तीस वर्षांपासून स्वतःचा उद्योग व्यवसाय सांभाळून समाजासाठी झटणारा राजे परिवाराचा आम्हाला खूप मोठा अभिमान आहे. कुंभश्री परिवार व राजे परिवार यांचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा!

या कार्यक्रमास खालील समाज बांधव व भगिनी उपस्थित होत्या. डॉ. कल्पना राजे–खिरोडे, अव्यान खिरोडे, आनंदा कुंभार, बाळासाहेब कुंभार, शिरीष कुंभार, शशिकांत कुंभार, संजीव कुंभार, संजय खटावकर, अभिजित कुंभार, सुरेंद्र कुंभार, मिलिंद कुंभार, सौ. रेश्मा कुंभार, सौ. वंदना कुंभार, सौ. सुरेखा कुंभार, सत्यभामा कुंभार, ताराबाई कुंभार, रवि साळवी, ज्ञानेश्वर कुंभार, पुनम कुंभार, प्रिशा कुंभार इत्यादी. कार्यक्रमास उपस्थितांचे आभार शिरीष उर्फ बाळासाहेब कुंभार यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सुरभी राजे यांनी केले.

***

आदिशक्ती पुरस्काराने डॉ. कांचन कुंभार सन्मानित

दत्तात्रय कुंभार



बारामती : कॉसमॉस बँकेतर्फे महिला उद्योजिका कांचन उदय कुंभार यांना आदिशक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले.

बारामती : बारामती येथील एमआयडीसी भागातील डॉक्टर व महिला उद्योजिका कांचन उदय कुंभार यांना कॉसमॉस बँकेतर्फे आदिशक्ती पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले. कॉसमॉस बँक मुख्य प्रबंधिका अनुराधा कुलकर्णी यांच्या हस्ते महिला दिनी बारामती शाखेत हा पुरस्कार कांचन कुंभार यांना प्रदान करण्यात आला. महिला दिनाचे औचित्य मधून जिद्दी, महत्त्वाकांक्षी, ध्येयवादी अशा कर्तृत्ववान महिलांना आदिशक्ती पुरस्कार देऊन त्यांना प्रोत्साहन देण्याचे महत्त्वाचे कार्य कॉसमॉस बँकेतर्फे अनेक वर्षे करीत आहे.

डॉ. कांचन उदय कुंभार या एका असाध्य आजाराला बळी पडल्या होत्या. परंतु आपल्या लढाऊ वृत्तीने आणि जिद्दीने त्यांनी त्यावर मात करून आता त्या मुले, घर, संसार सांभाळून अनेक सामाजिक कार्यात महत्वाचे योगदान देत आहेत, कुटूंबाचा एमआयडीसी बारामती येथील औद्योगिक व्यवसाय समर्थपणे सांभाळून तीसपेक्षा जास्त महिलांना रोजगार पुरविण्याचे महत्वाचे काम करीत आहेत. अशा बहुगुण संपन्न महिला उद्योजिका डॉ. कांचन कुंभार यांना आदिशक्ती पुरस्कार दिल्याने कॉसमॉस बँकेचे उद्योग क्षेत्रात कौतुक होत आहे.

***

शिष्यवृत्ती देणगी दात्यांना आवाहन

आत्तापर्यंतची शिष्यवृत्ती जमा रक्कम रुपये १,५१,०००/–एवढी आहे, कृपया आपली नावे खालील यादीत तपासून काही दुरुस्ती असल्यास तसेच नाव आले नसल्यास 9822838169 वर ताबडतोब कळवणे ही विनंती.

ज्यांची उंची आभाळा एवढी, त्यांनी मधे मधे खाली यावे, जमिनीवर बसलेल्या आपल्या गरजू हुशार विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन उंचच उंच न्यावे!!!

कुंभश्री शिष्यवृत्ती योजनेत हुशार व गरजू विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती वितरित करण्यात येते.

आपल्या वतीने किंवा आपल्या प्रियजनांच्या स्मृती प्रित्यर्थ किमान रु. १,०००/– किंवा त्याच्या पटीत रक्कम आपण देणगी देऊ शकता. इच्छुक देणगी दात्यांनी कृपया आपली देणगी रक्कम 9822838169 या मोबाइलला गूगल पे किंवा फोन पे करावी किंवा खालील अकाउंट वर लवकरात लवकर जमा करावी ही नम्र विनंती.

अकाउंटचे नाव – संपादक कुंभश्री मासिक
करंट अकाउंट क्र. – 60276922092
IFSC Code - MAHB0000601
बँक ऑफ महाराष्ट्र, निगडी ब्रँच.

देणगीचा स्क्रीन शॉट, आपले नाव आणि पत्ता तसेच कोणाच्या स्मृती प्रित्यर्थ देणगी द्यायची आहे त्यांचे नाव, गाव, 9822838169 या मोबाइलला व्हॉट्सअप करावे, पावती आपणास पाठवण्यात येईल.

आपले नम्र
संजय राजे संपादक कुंभश्री व कुंभश्री मित्र परिवार

❊ इ. १०वी चे शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची यादी ❊

निवृत्त आदर्श प्राध्यापक मा. विठ्ठल शंकरराव सोमवंशी, नेहरूनगर पुणे यांच्यातर्फे रु. ११,०००/-.

❊ स्वयंम संदीप कुंभार गडहिंग्लज, १००% रु. ५५००/- ❊ गायत्री अशोक कुंभार पुणे, सी.बी.एस.ई. ९८.४% रु. ५५००/-

कुंभश्री संपादक संजय राजे यांचेतर्फे कै. श्रीमती तारुबाई पांडुरंग कुंभार यांच्या स्मृतीप्रित्यर्थ रु. ११,०००/-.

❊ वेदिका गणेश चव्हाण नवी मुंबई, ९७.६% रु. ५५००/- ❊ वरद ज्ञानेश्वर शिर्के कराड, सी.बी.एस.ई. ९६.८०% रु. ५५००/-.

नोबेल कास्ट कॉम प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर मा. नितीनजी भागवत पुणे यांच्यातर्फे रु. ११,०००/-.

❊ श्रेयस सुधीर वाघ पुणे, सी.बी.एस.ई. ९५.८% रु. २०००/- ❊ मधुरा दिगंबर नरवणकर पुणे, ९४.८०% रु. २०००/- ❊ जिजाऊ रवीकुमार जगताप पुणे, सी.बी.एस.ई. ९४.२०% रु. २०००/- ❊ स्पंदन श्रीकांत बोरसे नाशिक, सी.बी.एस.ई. ९४.२०% रु. २०००/- ❊ प्रणवी जगदीश विश्वास नवी मुंबई, सी.बी.एस.ई. ९३.८०% रु. २०००/- ❊ गणेश कैलास भालेराव नाशिक, ९३.८०% रु. १०००/-.

निवृत्त एक्झीक्युटिव इंजिनियर मा. नानासाहेब रंगनाथ शिर्के, पुणे यांचे तर्फे कै. रंगनाथ गणपत शिर्के व कै. शेवंताबाई रंगनाथ शिर्के यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. ११,०००/-

❊ अंकिता उत्तम जाधव नाशिक, ९३.६०% रु. २०००/- ❊ रुतुजा सागर कुंभार पुणे, ९३.६०% रु. ३०००/- ❊ चेतन कांतीलाल सोनवणे नाशिक, ९२.८०% रु. २०००/- ❊ प्रांजल गोरख रसाळ नाशिक, ९२.२०% रु. २०००/- ❊ शुभंकर राहुल कुंभार पुणे, ९१% रु. २०००/-.

कुंभश्री संचालिका मा.सौ. बीना संजय राजे पुणे, यांचे तर्फे कुंभश्री संस्थापक कै. बाबुराव भुजंगराव साळवी यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. ११,०००/-.

❊ स्वरा विशाल सोनवणे नाशिक, ९०.८०% रु. २०००/- ❊ पुष्कराज रमेश कुंभार सांगली, सी.बी.एस.ई. ९०.४०% रु. २०००/- ❊ सन्यम वसंत काशिकर नागपुर, सी.बी.एस.ई. ८९.६०% रु. १०००/- ❊ अमेय सुरेश शिर्के कराड, ८९.४०% रु. २०००/- ❊ प्रणाली नितीन रेणावकर चिंचवड, सी.बी.एस.ई. ८९.२०% रु. २०००/- ❊ श्रुती सुनिल सुर्यवंशी चाळीसगाव, सी. बी.एस.ई. ८८.८०% रु. २०००/-

कुंभश्री संचालिका मा.सौ. बीना संजय राजे, पुणे यांचे तर्फे कै. सौ. कमल बाबुराव साळवी यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. ११,०००/-.

❊ तन्वी नितिन कुंभार चिंचवड, ८८.४०% रु. २०००/- ❊ तेजस प्रविण जाधव नाशिक, ८६% रु. २०००/- ❊ समृद्धी उमेश सोनवणे नाशिक, ८५.२०% रु. २०००/- ❊ जिज्ञासा सोमनाथ सोमाशे नाशिक, सी.बी.एस.सी. ८३.८% रु. २०००/- ❊ प्रणव सुदाम श्रीमंदिलकर पुणे, सी.बी.एस.सी. ८३.६०% रु. २०००/- ❊ ओम प्रकाश जाधव नाशिक, ८३.२०% रु. १०००/-.

कुंभश्री संपादक मा. संजय पांडुरंग राजे, पुणे यांचे तर्फ कै. पांडुरंग हरी कुंभार (कराड) यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. ११,०००/-.

❊ आर्याही मिलींद शेटकर डोबींवली, सी.आय.एस.सी.इ. ८३.६% रु. २०००/- ❊ तेजश्री भिमराज उपाध्ये नाशिक, ८२.२०% रु. २०००/- ❊ यश मंगेश सोनवणे नाशिक, ८२% रु. २०००/- ❊ प्रज्ञा राजेंद्र चव्हाण पुणे, ८१.८०% रु. २०००/- ❊ श्रेया निलेश घोडनदीकर पुणे, ८१% रु. २०००/- ❊ यश कृष्णा बागुल नाशिक ८०.४०% रु. १०००/-.

लिज्जत पापडचे निवृत्त सी.ई.ओ. मा. सुरेश मारुती कोते, पुणे यांचेतर्फे

कै. मारुती कोते व कै. पार्वतीबाई मारुती कोते यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. १०,०००/-.

✻ अथर्व बंडु राऊत नाशिक, ८०.२०% रु. २०००/- ✻ समिक्षा विजय गोरे नाशिक, ८०% रु. २०००/- ✻ व्यंकटेश किशोर जोंधळे नाशिक, ७८% रु. २०००/- ✻ कुबेर अरविंद क्षीरसागर, ७७% रु. २०००/- ✻ प्रथमेश संतोष जोर्वेकर नाशिक, ७६.४०% रु. २०००.

सिडको नवी मुंबईचे लेखाधिकारी मा. सुजित व्यंकटराव कुंभार, डोंबिवली यांचे तर्फे कै.समाजरत्न व्यंकटराव कुंभार सर यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. १०,०००/-.

✻ अनुष्का संतोष रसाळ नाशिक, ७६.४०% रु. २०००/- ✻ कार्तिक अविनाश वाघ नाशिक, ७४.२०% रु. २०००/- ✻ पियुश शरद जोंधळे नाशिक, ७३% रु. २०००/- ✻ सौरभ शशिकांत जाधव नाशिक, ७३% रु. २०००/- ✻ वेदांती सुनित वाकचौरे नाशिक, ७०% रु. २०००/-

✻✻✻

✻ इ. १२वी चे शिष्यवृत्ती प्राप्त विद्यार्थ्यांची यादी ✻

बी.एस.एन.एल. चे निवृत्त उच्च अधिकारी मा. यशवंत प्रजापती काजूपाडा, बोरीवली पूर्व, मुंबई यांच्यातर्फे रु. ५०००/-.

✻ संस्कार अमित कुंभार कराड, जे.ई.ई. ९६.५८% रु. २०००/- ✻ अपूर्वा रमेश बहाळसकर छ. संभाजीनगर, वाणिज्य ९३.५०% रु. १५००/- ✻ सिध्दी सुरेंद्र वाडेकर अमरावती, विज्ञान ८८.३३% रु. १५००/- .

बांधकाम उद्योजक व माजी नगरसेवक मा. तानाजीराव कुंभार, कोल्हापूर यांच्यातर्फे रु. ५०००/-.

✻ कार्तिकी धनंजय गाडेकर नाशिक, वाणिज्य ८५.१७% रु. २५००/- . ✻ पार्थ रविंद्र पवार छ. संभाजीनगर, विज्ञान ८५% रु. २५००/.

मूर्तिकार मा. विजय शिवाजी कुंभार कलवड, पुणे यांच्या तर्फे कै.सौ. नलूताई शिवाजी कुंभार यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. ५०००/-.

✻ मोनिका देविदास गोरे नाशिक, वाणिज्य ८३.५०% रु. २५००/- ✻ वेदांत योगेश राऊत नाशिक, विज्ञान ८२.८३% रु. २५००/-.

मा. गणेशराव कुंभार, असिस्टंट पोलीस कमिशनर सोलापूर यांचे तर्फे कै. बेबीताई विलास कुंभार, कराड यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. ५०००/- .

✻ भाग्येश शरद चित्ते नाशिक, विज्ञान ८२.३३% रु. २५००/- ✻ ज्ञानेश्वरी प्रकाश जोंधळे येवला, विज्ञान ८०.५०% रु. २५००/-

मा. डॉ. राहुल राजे, चाकण पुणे यांच्यातर्फे रु. ५०००/-.

✻ शताक्षी सतीश राऊत नाशिक, विज्ञान ८०.३३% रु. २५००/- ✻ इशान राजेश जोर्वेकर नाशिक, वाणिज्य ८०% रु. २५००/-.

मा. राजेंद्र पळसदेवकर पुणे यांच्यातर्फे रु. ५०००/-.

✻ सार्थक सुदाम जाधव नाशिक, विज्ञान ७९.६७% रु. २५००/- ✻ आर्या अजित जाधव नाशिक, विज्ञान ७९.३३% रु. २५००/-

मा.नितीन नानासाहेब वाघोलीकर, वाघोली पुणे यांचे तर्फे कै. नानाभाऊ विठोबा वाघोलीकर (कुंभार गुरुजी) यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. २०००/-

✻ आदित्य अमोल कुंभार, विज्ञान ७९% रु. २०००/-.

आदर्श शिक्षक मा. राजेंद्र रामचंद्र कुंभार, वडगांव हवेली कराड, जिल्हा सातारा यांचे तर्फे कै. रामचंद्र गोविंद कुंभार यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. २०००/-.

✻ निशा विष्णु मासकर बुलढाणा, वाणिज्य ७९.२८% रु. २०००/-

आदर्श प्राध्यापक मा. सुरेशराव भागवत सर, संगमनेर, जिल्हा अहमदनगर यांच्यातर्फे रु. २०००/-.

✻ शुभम भानुदास मोरे छ. संभाजीनगर, विज्ञान ७८.५०% रु. २०००/

आदर्श इंग्रजी शिक्षण संस्था संचालक मा. किरण तात्याबा कुंभार, सोळशी, जिल्हा सातारा यांच्यातर्फे रु. २०००/-.

✻ गायत्री रतन कदम नाशिक, विज्ञान ७८.१७% रु. २०००/-.

जेष्ठ समाजसेवक मा. हनुमंतराव कुंभार (धायरीकर) यांचेतर्फे कै. मनोज आणि कै. दीपक हनुमंतराव कुंभार यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. २०००/- व कुंभश्री संपादक संजय राजे यांच्याकडून ३०००/-.

✻ वैभवी सदानंद कुंभार सांगली, विज्ञान ७६.१७% रु. ५०००/-.

सुप्रसिद्ध गणपती साहित्य विक्रेते मा. विक्रम श्रीरंग राहुकर यांचे तर्फे शिल्पकार कै. श्रीरंग राहुकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. १५००/- व मा. देविदास शंकर हटकर, बदलापूर, जिल्हा ठाणे यांच्यातर्फे रु. ५००/-.

✻ अवधुत अनिल पवार नाशिक, विज्ञान ७७% रु. २०००/-.

निवृत्त डेप्युटी डायरेक्टर आरोग्य विभाग मा.डॉ. आर. एम. कुंभार चिंचवड, पुणे यांच्यातर्फे कै. महानंदा महालिंग कुंभार आणि कै. महालिंग तुकाराम कुंभार यांच्या स्मृती प्रित्यर्थ रु. ६०००/-.

✻ याज्ञिका भानुदास गोव्हेकर मुंबई, विज्ञान ७५.५०% रु. २०००/-✻ आराध्य तानाजी कुंभार सातारा, विज्ञान ७५% रु. २०००/- ✻ युक्ता हेमंत कुंभार, विज्ञान ७५% रु. २०००/-.

मा. शरद शामराव कुंभार, पलूसकर, पुणे यांचे तर्फे कै. शामराव कुंभार यांच्या स्मृती प्रित्यर्थ व मा. वासुदेव कामणकर, वसई, जिल्हा पालघर. यांच्यातर्फे प्रत्येकी रु. १०००/-.

✻ अद्वैत सचिन कुंभार सांगली, विज्ञान ७२% रु. २०००/-

मा. विजय शंकरराव राजे, सांगवी, पुणे. व मा. अविनाश दादा कुंभार बारामती, हल्ली मुक्काम कात्रज पुणे यांच्यातर्फे प्रत्येकी रु. १०००/-.

✻ हर्षाली प्रभाकर जगदाळे नाशिक, विज्ञान ७०.८३% रु. २०००/-

पोलीस इन्स्पेक्टर मा. गोकुळ बोरसे, कल्याण जिल्हा ठाणे यांच्या तर्फे कै. झावरू रावजी बोरसे, भारखंडे ता. भडगाव जिल्हा जळगांव यांच्या स्मृती प्रित्यर्थ. व मा. विकासराव दिनकर शिंदे, इंदौर, मध्य प्रदेश यांच्यातर्फे कै. लक्ष्मीबाई दिनकर शिंदे, वडगांव सहानी, ता. जुन्नर, जिल्हा पुणे यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रत्येकी रु. १०००/-.

* आदित्य कांतीलाल सोनवणे नाशिक, विज्ञान ७०.६७% रु. २०००/-

मा. अनिल प्रल्हाद कुंभार शाहूनगर, चिंचवड, पुणे व ईसरो शास्त्रज्ञ मा. चि. दिनेश खैरनार, अहमदाबाद यांच्यातर्फे प्रत्येकी रु. १०००/-

* वेदांत योगेश बाहीकर कोल्हापुर, विज्ञान ७०.२०% रु. २०००/-

मा. सौ. माधुरी विजय कुंभार, खोपोली, जिल्हा रायगड व आदर्श शिक्षक आणि उत्कृष्ट गायक संजयराव खटावकर, प्राधिकरण, निगडी, पुणे यांच्यातर्फे प्रत्येकी रु. १०००/-

* श्रावणी प्रकाश जाधव नाशिक, विज्ञान ६९.३३% रु. २०००/-

अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे प्रदेश कार्याध्यक्ष आदर्श शिक्षक रामदास कुंभार, केज जिल्हा बीड व मा. अक्षय राजे, सिंधूनगर, प्राधिकरण, निगडी, पुणे यांच्यातर्फे प्रत्येकी रु. १०००/-.

* संचिता सुनिल रसाळ नाशिक, विज्ञान ६९.१७% रु. २०००/-

मा. लक्ष्मीकांत परशुराम शिंदे, विशालनगर, पुणे व मा. नरेंद्र कुंभार, कर्वेनगर, पुणे यांच्यातर्फे प्रत्येकी रु. १०००/-

* मयुर उत्तम जाधव नाशिक, विज्ञान ६७.१७% रु. २०००/-

आदर्श शिक्षक मा. व्यंकटराव घुमाडे गुरुजी, चिंचवड, पुणे व निवृत्त आदर्श शिक्षिका मा. शशिकला शिवाजी कुंभार, बेलवडे बुद्रुक, ता. कराड, जिल्हा सातारा यांचे तर्फे पती कै. शिवाजीराव कुंभार गुरुजी यांच्या स्मृती प्रित्यर्थ प्रत्येकी रु. १०००/-.

* कुणाल भरत शिरसाठ नाशिक, विज्ञान ६५.८३% रु. २०००/-

मा. श्री. दत्तात्रय सोमवंशी नाशिक यांचेकडून रु. १०००/-

* समिक्षा शैलेश भागवत पुणे, विज्ञान ६२.५०% रु. १०००/-.

***

वरील सर्व विद्यार्थ्यांच्या पालकांनी आपल्या पाल्यांच्या नावाने बँक अकाऊंट नसेल तर काढून घ्यावे लवकरच धनादेश मुलांच्या नावे पाठवण्यात येतील. तसेच आपला पूर्ण पत्ता, पिन कोड सह मोबा. : 9822838169 व 9503428987 या भ्रमणध्वनीवर कळवावा ही नम्र विनंती.

संजय राजे, संपादक कुंभश्री मासिक

प्रिती जोर्वेकर - कुंभार यांना डॉक्टरेट पदवी प्रदान

डॉ. प्रिती प्रकाश जोर्वेकर – कुंभार यांना सावित्रीबाई फुले विद्यापीठाची कॉम्प्युटर इंजिनिअरींग मधील पी.एचडी. नुकतीच प्रदान करण्यात आली.

पुण्यामधील सर्वसामान्य कुटुंबातील डॉ. प्रिती प्रकाश जोर्वेकर – कुंभार यांना An Intelligent predictive algorithmfer crop production using soil and meteorological parameters in agricultural domain (AI/ML domain) या संगणकीय विषयावर प्रबंध सादर करून डॉ. प्रिती यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाने नुकतीच अत्यंत सन्मानाची शैक्षणिक क्षेत्रातील अति उच्च डॉक्टरेट पी.एचडी. सनद देऊन सन्मानित केले.



डॉ. प्रिती हिचे अभिनंदन करताना डॉ. नंदकुमार दळवी, डॉ. जयश्री, प्रसाद व डॉ. राजेश प्रसाद, प्रिती ऋषिकेश कुंभार

प्रिती जोर्वेकर – कुंभार ही मा.रु.दा. मालपाणी (संगमनेर) शाळेची माजी विद्यार्थिनी आहे. १०वी नंतरचे शिक्षण अमृतवाहिनी पॉलीटेक्निक येथे Diploma in Information Technology Department मध्ये झाले व त्यानंतर पुढील शिक्षण अमृतवाहिनी अभियांत्रिकी महाविद्यालया मध्ये BE in Information Technology आणि Master in Computer Engineering असे झाले. नंतर त्यांनी Ithape polytechnic, Amoutvahini Engineering, JSPM Pune, and NBN Sinhgad School of Engineering अश्या विविध अभियांत्रीकी कॉलेजमध्ये Assistant Professor ह्या पदावर अकरा वर्ष काम केले.

त्यांनी २०२० साली पी.एचडी. Computer Engineering साठी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठामध्ये प्रवेश नोंदणी केली. पी.एचडी. साठी त्यांना An Intelligent Predictive Algorithm for Crop production using soil & meteorological parameters in agricultural domain हा विषय त्यांना प्रबंधासाठी मिळाला. या सर्व प्रवासात पी.एचडी. करण्यासाठी त्यांना त्यांचे मार्गदर्शन डॉ. शर्मिला वाघ, डॉ. जयश्री प्रसाद व डॉ. राजेश प्रसाद, डॉ. नंदकुमार दळवी यांचे अमुल्य मार्गदर्शक लाभले.

तसेच त्यांना जोर्वेकर आणि कुंभार कुटुंबियांची विशेष प्रेरणा आणि सहकार्य लाभले. सध्या डॉ. प्रिती ह्या Calsoft Pvt. Ltd. (Pune) ह्या IT Company मध्ये As a senior Principal Software Developer म्हणून कार्यरत आहेत. डॉ. प्रिती ह्या संगमनेर येथील वीट कारखानदार प्रकाश जोर्वेकर यांच्या कन्या आहेत, तसेच पुण्यातील बांधकाम उद्योजक संपतराव कुंभार यांच्या स्नुशा आहेत. त्यांचे पती ऋषीकेश हे उच्चशिक्षित सीवील इंजीनिअर आहेत.

समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे डॉ. प्रिती जोर्वेकर – कुंभार यांचे मन:पूर्वक अभिनंदन व शुभेच्छा!

***

- * वाचकांच्या प्रतिक्रिया * -

कुंभश्री दिपावली अंक २०२३. संपादक महोदय कुंभश्री मासिक पुणे. मी २०२३ चा कुंभश्री दिपावली अंक पूर्णपणे वाचून काढला. अंक पूर्णपणे विज्ञानवादी, परिवर्तनशील, अंधश्रद्धा निर्मूलन व सुधारणा वादी वाटला. मी कुंभश्रीचे ऑनलाईन अंक वाचले नाही परंतु हा अंक पुस्तक रुपाने असल्यामुळे वाचण्यात आला.

या अंकातील विशेषकरून लिंबू मिरचीबद्दल अंधश्रद्धा, कोण होते बुद्ध, परिवर्तनवादी बसवेश्वर, संत गोरोबाकाका, हिंदू, उच्च शिक्षित चिमणीचे रखडलेले लग्न व ब्राम्हण समाजातील एकता जोशी यांचा परिवर्तनवादी लेख, मुलीच्या संसारात आईची दखल हे खूपच आवडले. यातील एकता जोशी यांचा लेख व चिमणीचे रखडलेलं लग्न हे दोन्ही लेख मी २०० झेरॉक्स काढून इतरांना वाचावयास दिले व मित्रांच्या व्हॉट्सॲपवर पाठविले.

तसेच गरीब मुलांना शिष्यवृत्ती व वधूवरांची यादीमुळे समाजाची बरीच मदत व वेळ वाचतो. यानंतरचे कुंभश्रीचे अंक पुस्तक रूपाने काढल्यास सामान्य समाज तो अंक वाचेल असे माझे मत आहे. वर्गणी वाढविली तरी चालेल पण अंक पुस्तकरूपाने छापण्याची कृपा करावी. ही विनंती.

सर्व कुंभश्री वाचकांना माझा साष्टांग नमस्कार.

– बाळाजी भिमाजी गोरे

सत्यशोधक व कुंभश्री प्रतिनिधी, देउळगांव राजा

***

सर्वांग सुंदर 'दिपावली विशेषांक २०२३' मिळाला. धन्यवाद. सर्वच २० कथा, १० कविता, ९ कविताएं प्रेरणादायक आहेत. संपूर्ण महाराष्ट्रातील कुंभार समाजातील विविध घटनांचे फोटोंसहित वर्णन वाचल्यानंतर समाज पूर्ण जागरुक होत आहे. ही 'आनंदाची गोष्ट' समाजातील विविध क्षेत्रात समाजातील बंधू–भगिनीने उत्तुंग यश मिळविले ही गौरवास्पद व अभिमानास्पद आहे.

'शुभमंगल' सदरावरुन घर बसल्या सर्व वधु–वरांची माहिती मिळते व स्थळासाठी होणारी यातायात थांबते. मासिकातील इतर सर्व माहिती आपणांस सोडून गेलेल्या सर्व नातेवाईकांची माहिती कळते.

३९४ पानांचा हा विशेषांक कौतुकास्पद आहे. 'कुंभश्री'च्या पुढील वाटचालीस अनेक शुभेच्छा!

– विनायक कुंभार

जयसिंगपूर, जि. सांगली

***

कुंभश्री दिवाळी अंक २०२३ मिळाला. फारच सुंदर अंक झाला आहे. मुखपृष्ठ, आतील कागद, फॉन्ट, लेआऊट, डिझाईन वगैरे खूप छान! दोनच गोष्टी अगदी सहज सुचवतो.

१) अनुक्रमणिकेत लेखकांचे नाव बघायला आवडले असते. अनुक्रमणिका दोन पानी झाली असती, तरी साहित्य आणि साहित्यकार यांना महत्व दिल्यासारखे झाले असते.

२) आणि दुसरी छोटीशी पण महत्वाची गंमत म्हणजे माझ्या कथेच्या सुरुवातीला जो परिच्छेद दिला आहे, तो – कथेमध्ये जो सस्पेन्स शेवटी उघड व्हायला हवा, तो (चाणाक्ष वाचकाला) सुरुवातीलाच उघड करणारा आहे. त्यामुळे कथेत काही गूढ असेल, तर ते सुरुवातीला उघड होणार नाही, उलट वाचकाची उत्सुकता वाढेल असा परिच्छेद निवडायला हवा होता. असो.

आधी म्हटल्याप्रमाणे अंक खूप आवडला. माझी एक कथा यापूर्वी आम्ही आमच्याच 'मधुश्रीच्या दिवाळी अंकात' खूप वर्षांपूर्वी घेतली होती. यावर्षी प्रथमच माझे लेखन मधुश्री सोडूनच्या दिवाळी अंकांत प्रकाशित झाले आहे. एक तुमच्या कुंभश्रीमध्ये आणि एक लेख ब्रह्मचैतन्य मध्ये. त्यामुळे तुम्हाला खूप खूप धन्यवाद!

तुमच्याकडून pdf आली की मी फक्त मुखपृष्ठ आणि माझी कथा माझ्या फेसबुकवर टाकेन.

मागे तुम्ही माझ्या बाबांच्या कथा तुमच्या दिवाळी अंकात प्रकाशित झाल्याचे म्हणाला होतात. तुमच्या अगदी सवडीने, शक्य झाले तर त्या अंकांच्या पीडीएफ सुद्धा मला पाठवता आल्या तर नक्की नक्की पहा

– पराग लोणकर

***

कुंभश्रीचे संस्थापक कै. बाबुराव भु. साळवी उर्फ आण्णा यांचे लावलेले छोटेसे रोपाचे रूपांतर वटवृक्षात केले. ते कुंभश्रीच्या संचालिका सौ.बीना राजे व संपादक श्री. संजयजी राजे यांनी. 'कुंभश्री' रूपी दीप तेवत ठेवला आहे. तसेच कुंभश्रीतर्फे आखिल महाराष्ट्र पातळीवर समाजोपयोगी कार्यक्रम दरवर्षी राबविले जातात.

आज आपण पहातो बरेच समाज आपापसात दुभंगलेले आहेत. त्यामुळे त्या समाजाची कधीच प्रगती करू शकत नाही. लोक एकमेकांपासून दूर जात आहेत. अशा परिस्थितीत समाजाच्या ऐक्यासाठी व समाज मजबूत ठेवण्याचे समाजकार्य करीत आहे ते 'कुंभश्री'.

संपुर्ण 'कुंभश्री परिवारास' मनःपूर्वक शुभेच्छा.

चंद्रकांत बोरसे व बोरसे परिवार

धुळे–नाशिक–पुणे–दुबई–कॅनडा

***

Congratulations Sir, **"Kumbhashree"** is really a good road map to educate our community. I appreciate the work of all the Executives of Kumbhashree and giving best wishes to Shree Raje Sir and their all members.

- Yashwant Prajapati

Retired chief executive manager, BSNL, Borivali East, MUMBAI

***

कुंभश्री मासिकाचे संपादक, श्री. संजय राजे यांचे आभार. कुंभश्री वधू–वर मंडळाच्या वेबसाईटच्या स्तुत्य उपक्रमामुळे माझ्या मुलीचे चि.

माधवी विकास शिंदे (इंदौर, मध्यप्रदेश) हिचे लग्न श्री. मिलिंद राजे (वारणानगर, कोल्हापूर) यांचा मुलगा श्री. पृथ्वीराज मिलिंद राजे याच्याशी ठरवण्यात आले आहे. दिनांक १८/११/२०२३ या दिवशी श्री. अनंत भाऊ कुंभार (मुलीचे मामा) यांच्या घरी पुणे येथे गंध आणि ओटी भरून लग्न विवाह निश्चित केला आहे. धन्यवाद.

– विकास शिंदे, इंदौर

***

राज्यव्यापी कुंभार समाज व समाजाचे नवीन नाती–गोती जोडण्याचे बहुसंख्य श्रेय मी कुंभश्रीला अर्थात श्री.संजय राजे व परीवारास देतो.

– प्रा. प्रभाकर बाभुळगावकर,
अहमदपूर, लातूर

***

Kumbhashree मोबाईल ॲप बाबत प्रतिक्रिया

It's not about idea, but it's gabout making ideas happen... May kumbhshree continue with many more ideas to happen and cm out with flying colours.

- Manisha Kumbhar, Residential Deputy Collector
Solapur District.

***

वाह! मस्तच... हार्दिक अभिनंदन काका व काकू (तुम्हा दोघांचे) तसेच सर्व कुंभश्री परिवाराचे सुद्धा हार्दिक अभिनंदन व पुढच्या innovation साठी शुभेच्छा. प्रवास एवढा सोपा नव्हता... मासिक ते ॲप.

– किरण जोर्वेकर, पुणे

***

श्रीमान संजयजी राजे साहेब, कुंभश्री ॲप लाँच केल्याबद्दल तुमचे व कुंभश्री टिमचे मन:पूर्वक अभिनंदन, अपग्रेड झालेच पाहिजे. तुमचे सतत चांगले प्रयत्न चालू असतात, खुप छान प्रगती होत आहे.

–चंद्रकांत बोरसे, नाशिक

***

व्हाट्सअप व यूट्यूब वर व्हायरल यमगर्णी येथील श्वान महाराजांचे दर्शन



फोटो मध्ये या श्वान महाराजांचे समवेत डावीकडून हभप दगडू महाराज, ज्ञानदेव महाराज, महादेव कुंभार सरूडकर, हभप कृष्णा कुंभार, श्वान महाराज, कुंभश्री संपादक संजय राजे, हभप सौ. विमल ज्ञानदेव कुंभार व कु. मनीषा ज्ञानदेव कुंभार (एम.एस.सी.)

बेळगांव : यमगर्णी, तालुका निपाणी येथील ह.भ.प. ज्ञानदेव उर्फ आबा महाराज कुंभार यांचा पाच वर्षाचा श्वान (कुत्रा) यमगर्णी ते पंढरपूर बेलुंकीच्या बाळूमामा पायी दिंडी मधून गेला. पंढरपूर येथे शेवटच्या कीर्तनानंतर ह.भ.प. परभणीकर महाराज यांच्या पायावर पुढील दोन पाय ठेऊन दर्शन घेतले, नगर प्रदक्षिणा केली आणि गायब झाला. परतीचा प्रवास करताना वाहनातून त्याला न्यायचे नियोजन केले होते पण खूप शोध घेऊन सापडला नाही, दु:खद अंतकरणाने नाईलाजाने सर्वजण परतले. चार दिवसानंतर हे श्वान महाराज यमगर्णी मध्ये परतले आणि सर्व गाव आनंदी झाला जवळपासच्या पंचक्रोशीत बातमी पसरली श्वान महाराजांच्या दर्शनाला रीघ लागली. लहानपणापासून या श्वानास गावकरी महाराज म्हणून बोलावतात कारण हभप दगडू महाराज कुंभार यांच्याकडे गावातील सात मंदिराच्या पूजेचा मान आहे, रोज सकाळी त्यांच्याबरोबर हा श्वान साती मंदिरात जायचा, गावात हरीनाम सप्ताह असला की हजर असायचा, नवरात्रामध्ये नऊ दिवसाच्या सर्व कार्यक्रमाला हजर राहायचा या काळात फक्त दूध प्यायचा, जोतिबाच्या काठीबरोबर जोतिबाला जायचा, चिले महाराजांच्या दिंडी बरोबर पैजारवाडीला जायचा अशा त्याच्या गुणामुळे या श्वानास सर्व जन महाराज संबोधू लागले.

आता तर या श्वान महाराजांची कीर्ती कर्नाटक व महाराष्ट्राच्या काना कोपऱ्यात पसरली आहे त्याच्या व मालक हभप ज्ञानदेव महाराज कुंभार यांच्या दर्शनासाठी रोज अनेक भाविक येत आहेत, उभयतांच्या दर्शनाचा लाभ आम्हांला सुद्धा मिळाला आणि खूप समाधान व आनंद मिळाला.

***

आला रे आला 'कुंभश्री ॲप' आला

एकमेका सहाय्य करू, अवघे धरू सुपंथ! या उक्ती प्रमाणे आपल्या समाजाच्या प्रगतीसाठी Kumbhashree **मोबाईल ॲप लाँच केला आहे.** https://play.google.com/store/apps/details?id=com.kumbhashree_app **वरील लिंकवरुन ॲप डाउनलोड होईल.**

ॲपमध्ये खालील गोष्टी उपलब्ध आहेत. १) ताज्या बातम्या व कुंभश्री मासिकाचा पी.डी.एफ. अंक २) कुंभश्री वधुवर सूचक मंडळ (matrimony website) **३) निशुल्क व्यवसायिक, नोकरदार, राजकीय, सामाजिक समाज बंधू भगिनींची नोंदणी.** (Free Business registration). **कृपया सर्व समाज बंधू भगिनींनी आपली नोंदणी करावी. सर्व समाज बंधू भगिनींनी ॲप डाऊनलोड करून जास्तीत जास्त** Like, Share, Comment **करावे ही नम्र विनंती.**

वीरगती प्राप्त मित्र प्रथम महालेच्या आई वडिलांना
लेफ्टनंट अनिकेत कुंभार यांनी दिला स्टार लावण्याचा बहुमान

डेहराडून : कोल्हापूर येथील लेफ्टनंट अनिकेत कुंभार यांची भारतीय संरक्षण सेवेत लेफ्टनंट पदी नुकतीच निवड झाली.

डोणोली ता. शाहूवाडी, जि. कोल्हापुर येथील अनिकेत सहदेव कुंभार यांची भारतीय संरक्षण सेवेतील आर्मी विभागातील गोरखा रेजिमेंट या ठिकाणी लेफ्टनंटपदी निवड झाली आहे.



ले. अनिकेत सहदेव कुंभार



डावीकडून सहदेव कुंभार, वैशाली कुंभार, लावण्या कुंभार, अनिकेत कुंभार, ऋतुजा महाले, शितल महाले, गो महाले.

अगदी २२व्या वयातच उच्च पदस्थ अधिकारी पदी निवड झाल्यामुळे अनिकेत वर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. अनिकेतचे प्राथमिक शिक्षण आर्मी पब्लिक स्कूल येथे झाले आहे. इयत्ता सहावी मध्ये सातारा येथील सैनिक स्कूल येथे २०१२ साली निवड झाली. अनिकेत चे सहावी ते बारावी पर्यंतचे शिक्षण सैनिक स्कूल सातारा येथे झाले. सैन्य अधिकारी बनण्याची प्रेरणा कुटुंबाकडून मिळाली त्या दृष्टीने त्याने अथक प्रयत्न केले. अनिकेतला इयत्ता दहावीमध्ये ९३% टक्के तर इयत्ता बारावीमध्ये ८०% गुण होते.



लेफ्टनंट अनिकेत यास स्टार लावताना शितल महाले व गोरख महाले

अनिकेतची पासिंग आऊट परेड व पदवीदान समारंभ दिनांक ८ जून २०२४ रोजी इंडियन मिलिटरी अकॅडमी देहरादून येथे संपन्न झाला. पदवीदान समारंभा मध्ये (Pipping Ceremony) मुलाला स्टार लावण्याचा सन्मान हा आई वडिलांना दिला जातो. परंतु अनिकेत याचा वर्गमित्र वीर SCC प्रथम महाले NDA Course 145... NDA मध्ये अंतर्गत बॉक्सिंग स्पर्धेमध्ये खेळत असताना डोक्याला मार लागून जखमी झाला नंतर त्यास वीर गती प्राप्त झाली होती.

अनिकेतने स्टार लावण्याचा मान प्रथम महाले याचे आई-वडिलांना देऊन खऱ्या अर्थाने मित्राला श्रद्धांजली अर्पण केली. या समर्पित माणुसकीच्या भावनेचं प्रदर्शन अनिकेत व त्यांच्या आई वडील यांनी केले ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.



लेफ्टनंट अनिकेत याचे अभिमान करताना शितल महाले व गोरख महाले

अनिकेतचे वडील सहदेव नामदेव कुंभार लष्करा मधून सेवानिवृत्त झाले आहेत आणि श्रीमती वैशाली सहदेव कुंभार गृहिणी आहेत. कुंभार परिवाराच्या या कृतीमुळे सैन्य दलातील कुंभार परिवाराचे सर्व स्तरावरती कौतुक होत आहे.

अनिकेतच्या एकूण चार वर्षाच्या प्रशिक्षण कालावधीमध्ये पहिली तीन वर्षे देशात एकमेव असलेल्या खडकवासला पुणे येथे एन.डी.ए.ची ३ वर्षे खडतर व कठीण असे प्रशिक्षण पूर्ण झाले त्यानंतर डेहराडून येथे भारतीय मिलिटरी अकॅडमी मध्ये एक वर्ष मिलिटरी प्रशिक्षण पूर्ण केले. ग्रामीण भागात शाहूवाडी तालुक्यात मिलिटरी अधिकारी होण्याची संधी अनिकेतच्या रुपाने मिळाली आहे.

या यशस्वी वाटचालीमध्ये आई-वडील, आजी-आजोबा, नातेवाईक व मित्रमंडळी यांचे प्रोत्साहन लाभले. लेफ्टनंट अनिकेत कुंभार याचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा!

***

राज्यातील पहिले पॉटरी क्लस्टर ममदापूरला!

मातीपासून कलात्मक भांडी बनविण्यासाठी कुंभार कारागिरांना प्रशिक्षण सुरू



संत गोरोबा काकांचे प्रतिमा पूजन करताना दत्ताभाऊ कुंभार, रंगनाथ सुर्यवंशी, ज्ञानेश्वर भागवत व मान्यवर



उपस्थित मान्यवरांचे सत्कार संपन्न समवेत पदाधिकारी



उपस्थितांना मार्गदर्शन करताना दत्ताभाऊ



मातीपासून कलात्मक भांडे बनविण्याचे प्रशिक्षण घेताना बांधव.



राज्यातील पहिले पॉटरी क्लस्टरची भव्य वास्तू

येवला : मातीपासून भांडी बनविण्याची कला तशी जुनीच; परंतु बदलत्या काळाबरोबर या कलेतून साकारलेल्या वस्तू शोभेसह फॅशनच्या बनल्याने त्याला विशेष महत्त्व आले आहे. याच कलेला प्रोत्साहन देण्यासाठी राज्यातले पहिले पॉटरी क्लस्टर तालुक्यातील ममदापूर येथे साकारले आहे. या माध्यमातून कुंभार कारागिरांना प्रशिक्षण देण्यात येणार असून, त्याचा प्रारंभ झाला. केंद्र व राज्य शासनाच्या निधीतून अखिल महाराष्ट्र कुंभार समाज संस्थेच्या पुढाकाराने राजापूर–ममदापूर रस्त्यावर स्वतंत्रपणे जागा घेऊन या ठिकाणी नाशिक पॉटरी क्लस्टर उभे राहिले आहे. कुंभार व्यवसायाला आधुनिक टच देऊन चालना देण्याचा हेतू आहे. यासाठी साडेचार कोटी रुपयांचा निधी शासनाने खादी ग्रामोद्योग मंडळ या संस्थेने अर्थसहाय्यातून उपलब्ध झाला आहे. सुमारे ३७ लाख रुपये कुंभार समाज संस्थेने गुंतवले आहे. कुंभार कारागिरांना मातीपासून विविध मातीच्या वस्तू तयार करण्यात येणार आहेत. येवला परिसरातील कुंभार कारागिरांना यातूनच रोजगार उपलब्ध करण्याचा प्रयत्न आहे.

कुंभार व्यवसायाला मिळणार गती : माती क्लस्टर केंद्रामध्ये प्रशिक्षण घेऊन कारागीर आपल्या हस्तकलेतून विविध प्रकारच्या मातीच्या वस्तू बनविणार आहे. यामुळे अडचणीत सापडलेल्या कुंभार समाजाला सणासह शोभेच्या वस्तू व इतर भांडी बनवून बाजारात विक्रीसाठी ठेवता येणार आहे. यापूर्वी प्रशिक्षण घेतलेले ममदापूर येथील कुंभार कारागीर वाल्मीक शिरसाठ यांनी आतापर्यंत मातीच्या विविध वस्तू बनविलेल्या मातीची भांडी, वस्तू या एक आकर्षण बनत आहे.

तीन वर्षांपूर्वी कुंभार व्यवसायाला नवी ओळख देण्याच्या हेतूने आम्ही हे क्लस्टर स्थापन करण्यासाठी पुढाकार घेतला, त्याचा हेतू सफल होत आहे. अनेकांना हा प्रकल्प आवडत असून, रोजगार उपलब्ध करून देणारा ठरणार आहे. कारागिरांची वाढती मागणी पाहून यंत्र मागणी केली. अनेक जण या माती क्लस्टर केंद्राला भेट देत असून, पहिल्या टप्प्यात २०० हून अधिक कारागिरांना प्रशिक्षण देण्यात येणार आहे. **– कृष्णा सोनवणे,** जिल्हाध्यक्ष, कुंभार समाज संस्था

८० टक्के अनुदानावर मिळणार यंत्र : कारागिरांना इलेक्ट्रॉनिक यंत्र २० टक्के अनुदानावर उपलब्ध करून देण्यात येणार आहे. ८० टक्के सबसिडी दिली जाणार आहे. यंत्राच्या सहाय्याने चिखलाच्या गोळ्याला आकार देऊन कलाकार देखण्या वस्तू साकारणार आहेत. ममदापूर रस्त्यावरील माती क्लस्टर केंद्र आता राज्यातील कारागिरांसाठी आकर्षण केंद्रबिंदू ठरणार आहे. मातीपासून तांब्या, ताट, पातेल, मातीचे कुकर, खापर, रांजण, माठ, महिलांना मकरसंक्रांतीच्या सणासाठी बोळके, वाण असे विविध प्रकारचे भांडी बनविली जाणार आहेत.

६० जणांना प्रशिक्षण सुरू : या क्लस्टरमध्ये पहिल्या टप्प्यात ६० कुंभार कारागिरांना प्रशिक्षण दिले जात आहे. कुंभार कारागिरांना प्रशिक्षण देण्यासाठी संदीप मोरे, वाल्मीक शिरसाठ, सुनील शिरसाठ, दादासाहेब शिरसाठ, बाळकृष्ण कुंभार हे विशेष परिश्रम घेत आहेत. यंत्राच्या माध्यमातून आधुनिक तंत्रज्ञानाद्वारे मातीच्या गोळ्याला योग्य आकार देऊन त्यावर नक्षीकाम करून देखणे रूप देण्याची कला या ६० कुंभार बांधवांना या प्रशिक्षणात शिकवली जात आहे. महाराष्ट्र कुंभार विकास समाज अध्यक्ष मनोहर जगदाळे, जिल्हाध्यक्ष कृष्णा सोनवणे, दत्ता डाळसकर, तालुकाध्यक्ष नंदकुमार सोनवणे, भागवत सूर्यवंशी, सरपंच विजय गुडघे, गोरख वैद्य, मच्छिंद्र साबळे, बाळासाहेब वैद्य आदींच्या हस्ते यंत्र पूजन करून या प्रशिक्षणाला सुरवात झाली.

***

कुंभार मंगलम वेबसाईट व ॲपने अडचणी दूर - सतीश दरेकर यांचे मत
राज्यस्तरीय कुंभार समाज वधू-वर परिचय मेळावा



गोरोबा काकांचे पुजन प्रसंगी उपस्थित मान्यवर



कुंभार समाज वधू-वर परिचय मेळाव्याप्रसंगी उपस्थित मान्यवर



कुंभार मंगलम वेबसाईटचे उद्घाटन करताना उपस्थित मान्यवर



मेळाव्यास उपस्थित प्रमुख मान्यवरांचा सत्कार



मेळाव्यास उपस्थित वधूवर आणि मान्यवर



मेळाव्यास उपस्थित समाज बंधू-भगिनी



मेळाव्यास उपस्थित सामाजिक संस्थेचे पदाधिकारी व नेते मंडळी

मोशी : ''वधू-वर परिचय मेळाव्यांमधून मुला-मुलींच्या अडचणी लवकर सोडविल्या जाव्यात, यासाठी कुंभार मंगलम या वेबसाईटची, तसेच जनगणना अभियानासंदर्भातील अडचणी मोबाईल ॲपद्वारे सोडविणे शक्य होणार आहे. त्याने राज्यातील सर्व समाज बांधवांची जनगणना पूर्ण होण्यास मदत होईल,'' असे मत राज्य कुंभार समाजाचे अध्यक्ष सतीश दरेकर यांनी व्यक्त केले. मोशीतील साधुराम मंगल कार्यालय येथे रविवारी (ता.८) कुंभार समाजाचा राज्यस्तरीय वधू-वर परिचय मेळावा आयोजित करण्यात आला. त्यावेळी दरेकर यांच्या हस्ते जनगणना अभियान, मोबाईल ॲप व वधू-वरासाठी कुंभार मंगलम या वेबसाईटचे उद्घाटन करण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. प्रदेश कार्याध्यक्ष रमाकांत क्षीरसागर हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी होते. डॉ. दिलीप मेनकर, कार्याध्यक्ष महेश सायकर, शाम राजे, उपाध्यक्ष वसंत घोडनदी-कर, कोषाध्यक्ष अनंत कुंभार, डॉ. सदानंद जाधव, समाजोन्नती मंडळाचे अध्यक्ष बाबाजी कुंभार, कार्याध्यक्ष विशाल शिंदे, ऋषिकेश काशीद, आप्पासाहेब जोर्वेकर, उपाध्यक्ष बाळासाहेब सोनवणे, अविनाश कोल्हाडे, प्रकाश सोनावळे, प्रकाश भालेराव आदी उपस्थित होते. मेळाव्यात सतीश दरेकर, बबनराव जगदाळे, गंगाधर जोर्वेकर, हेमंत खटावकर आदींना मातृरक्षा पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. तत्पूर्वी, प्रजापती बिमला राठोड यांचे हस्ते संत शिरोमणी श्री गोरोबाकाकांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. पुणे जिल्हा अध्यक्ष ज्ञानेश्वर सोमवंशी यांनी प्रास्ताविकात अध्यक्ष वधू-वर परिचय मेळावा, जनगणना अभियान आणि कुंभार मंगलम याबाबत उद्देश सांगितला. प्रदेश प्रवक्ते मच्छिंद्र जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले; तर भोसरी विभाग अध्यक्ष सत्यवान वाळके यांनी आभार मानले.

विद्यार्थी गुणगौरव, समाज भूषण व जीवनगौरव पुरस्कार समारंभ संपन्न!

– जगदीश मोरे (सोशल मीडिया)



सुरेश बहाळकर समाजभूषण पुरस्कार प्रदान करताना मान्यवर



रामदास बोरसे यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान



जगदीश मोरे यांना समाज भुषण पुरस्कार प्रदान करताना मान्यवर



शरदभाऊ आहे यांचा सत्कार करताना मान्यवर

नाशिक : दि. ११/८/२०२४ कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश संलग्न नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीच्या वतीने आयोजित (सालाबाद प्रमाणे) विद्यार्थी गुणगौरव, समाज भूषण जीवनगौरव, पुरस्कार समारंभ आज रविवार दि. ११/८/२०२४ रोजी शर्मा मंगल कार्यालय, दिपाली नगर नाशिक येथे मोठ्या उत्साही आनंदी, वातावरणात संपन्न झाला.

सर्वप्रथम प्रमुख मान्यवर पाहुण्यांच्या हस्ते संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या मूर्तीचे पूजन दीप प्रज्वलन करून करण्यात आले.

व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष –

मा. सतीश दादा दरेकर तसेच नाशिक पश्चिमच्या विद्यमान आमदार मा.ना.सौ. सीमाताई हिरे, नाशिक जिल्हा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष – मा. रमाकांतजी क्षीरसागर, मा. संजयजी रुईकर, मा.डॉ. दिलीपजी मेणकर, मा. शरदजी आहेर, मा. संजयजी जोरले, उमाजी सूर्यवंशी, ज्ञानेश्वर सोमवंशी, अनंत कुंभार, उत्तमराव काळे, डॉ. संजय काशीद, सुभाष कुंभार (शिरपूर), गोकुळ कुंभार, भगवान सूर्यवंशी, सौ. संध्याताई आहेर, आप्पासाहेब राउकर, तसेच नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीचे जिल्हा अध्यक्ष : सोमनाथ सोनवणे, शहराध्यक्ष : गणेश आहेर, सुभाष गाडेकर (कुंभार), पप्पू भालेराव, विलास कर्वे, आप्पासाहेब जोर्वेकर, महिला अध्यक्षा : सौ. सुवर्णाताई जाधव तसेच अनेक मान्यवर पदाधिकारी व्यासपीठावर उपस्थित होते. (सर्वांची नावे लक्षात नाही राग नसावा)

व्यासपीठावरील मान्यवरांचा पुष्पगुच्छ व शाल देऊन समितीच्या वतीने सत्कार करण्यात आला. सर्वप्रथम नाशिक जिल्ह्यातील कार्यक्रमाचा आढावा, कार्यक्रमाची रूपरेषा कुंभार समाजात दरवर्षी राबविणारे विविध उपक्रम, तसेच समाजातील समाज बांधवांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी केलेले प्रयत्न याविषयी संस्थेचे नाशिक जिल्हा अध्यक्ष सोमनाथजी सोनवणे यांनी मार्गदर्शन केले. तसेच सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष मा. सतीश दादा दरेकर व नाशिक जिल्हा विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष रमाकांतजी क्षीरसागर यांनी बहुमूल्य असे मार्गदर्शन केले. तसेच नाशिक पश्चिमच्या विद्यमान आमदार मा.ना.सौ. सीमाताई हिरे यांनी आपले बहुमूल्य असे मार्गदर्शन केले.

त्यानंतर कुंभार समाजात ज्यांनी उल्लेखनीय भूषणावह असे कार्य केले अशा पुरस्कारार्थी मान्यवरांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मान ट्रॉफी, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला.

समाज भूषण पुरस्कारार्थी –

मा. श्रीमती हौशाबाई गायकवाड (नाशिक), मा. किसनराव आहेर (नाशिक), मा. ह.भ.प. अशोक महाराज वैद्य (खेडगाव नाशिक), मा. रामदासजी बोरसे (मालेगाव), मा. सुरेशजी बहाळकर (धुळे), जगदीश मोरे (नाशिक) तसेच सौ. कमल विश्वनाथ मेणकर व मा. विश्वनाथ आबाजी मेणकर यांना आदर्श माता–पिता पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले तसेच सेवानिवृत्त समाज बांधव, पदवीधर, तसेच विशेष प्राविण्य तसेच दहावी/बारावीच्या गुणवंत विद्यार्थ्यांना ट्रॉफी व प्रशस्तीपत्र देऊन प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. सर्व कार्यक्रम अतिशय आनंदी वातावरणात अगदी व्यवस्थितपणे पार पडला.

याचे संपूर्ण श्रेय विकास समितीचे संस्थापक अध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष, शहर अध्यक्ष, उपाध्यक्ष, तालुका अध्यक्ष, सरचिटणीस, सहचिटणीस, कोषाध्यक्ष, महिला आघाडीची सर्व कार्य कारणी व कार्यकर्ते यांना जाते.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अगदी छान पद्धतीने नाशिक जिल्हा संघटक तसेच वधू वर आघाडीचे पुंडलिकराव सोनवणे व महिला आघाडीतील सचिव सौ. सविताताई जगदाळे यांनी केले. तसेच कार्यक्रम सुटसुटीत व्यवस्थितपणे नियोजनबद्ध पद्धतीने पार पाडण्यासाठी नाशिक जिल्हा विकास समितीचे मीडियाचे जिल्हा अध्यक्ष तसेच जिल्हा संघटक, रमेशजी गायकवाड यांनी खूप परिश्रम घेतले. विकास समितीतील सर्वांचेच मोलाचे सहकार्य होते. कार्यक्रमाच्या शेवटी सर्वांनी भोजनाचा आस्वाद घेतला.

वरील सर्व कार्यकारणी, पदाधिकारी तसेच या कार्यक्रमासाठी ज्या ज्या समाज बांधवांनी आर्थिक योगदान दिले. त्या सर्वांचेच नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समिती संस्थापक अध्यक्ष रमाकांतजी क्षिरसागर जिल्हा अध्यक्ष सोमनाथजी सोनवणे शहर अध्यक्ष गणेशजी आहेर व सामाजिक संस्थेचे प्रदेश अध्यक्ष माननीय सतीश दादा दरेकर यांच्या वतीने अभिनंदन व शुभेच्छा!

***

नंदुरबारच्या लोकमत स्पर्धा विजेता चि. सिद्धांशु दिनेश वाडीलेची हवाई सफर संपन्न...!



आई-वडिलांसोबत चि. सिद्धांशु

नंदुरबार : लोकमतच्या वतीने दरवर्षी शालेय मुलांचा सर्वांगीण विकास व्हावा त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा, वाचनाची सवय लागावी यासाठी 'संस्काराचे मोती' प्रमाणेच याही वर्षी 'लोकमत संस्कार आई बाबाचे' स्पर्धेतील विजेत्यांची 'दिल्ली हवाई सफर'चे आज आयोजन करण्यात आले होते. ह्या स्पर्धेत नंदुरबार जिल्हा कुंभार संघटना जिल्हा युवा अध्यक्ष आर्किटेक्ट दिनेशजी व सौ. कविता वाडीले ह्यांचे चिरंजीव सिद्धांशु (ई. ८ वी) ह्याने लोकमत स्पर्धा जिंकून नंदुरबार जिल्ह्यातून प्रथम क्रमांक पटकावून आपले छत्रपती संभाजीनगर ते दिल्ली ते परत छत्रपती संभाजीनगर असे दिल्ली दर्शनसह तिकीट कन्फर्म केले.

लोकमत-२०२४ या हवाई सफरमध्ये राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातील एक विजेता याप्रमाणे ३८ विजेते लोकमतचे उपाध्यक्ष (वितरण) यांच्या मार्गदर्शनात आयोजित करण्यात आले होते. सोबत संजय पाटील, रविराज अंबडवार, नरेन्द्र तांबोळी आदी लोकमत परिवार सहभागी झाले होते. या दिल्ली भेटीत विद्यार्थ्यांनी राष्ट्रपिता महात्मा गांधी समाधी स्थळ राजघाट, ऐतिहासिक इंडिया गेट, महाराष्ट्र सदन, संसद भवन आदी ठिकाणी भेटी दिल्यात. विमानाने हवाई सफर आणि दिल्ली दर्शनमुळे सर्व बच्चे कंपनी खुश होती. चि. सिद्धांशु दिनेशजी वाडीले ह्यांचे लोकमत स्पर्धा विजेता झाल्याबद्दल आणि मोफत दिल्ली विमान हवाई प्रवास करुन आल्याबद्दल, समस्त कुंभार समाज आणि कुंभश्री मित्र परिवाराकडून हार्दिक अभिनंदन आणि पुढील कारकिर्दीसाठी हार्दिक शुभेच्छा...!

नॅशनल स्पर्धेमध्ये 'सौ. उज्वला राजे' यांचे उज्वल यश



अहमदनगर (२५ डिसेंबर) : तिसऱ्या खेलो मास्टर गेम्स नॅशनल मार्फत नुकताच कॉमनवेल ग्राउंड, दिल्ली येथे झालेल्या महिलांच्या (४० ते ४५ वयोगटातील) स्पर्धेत सौ. उज्वला अभय राजे यांचा १०० मीटर धावणे प्रकारात दुसरा तर थाळीफेक प्रकारात तिसरा क्रमांक आला आहे. दोन्ही प्रकारात उज्वल यश मिळवून त्यांनी नगरचे नाव उज्वल केल्याबद्दल त्यांचे सर्व थरातून अभिनंदन होत आहे. दिनांक २५ व २६ नोव्हेंबर २०२३ रोजी छत्रपती शिवाजी बीपेड कॉलेज, अमरावती येथे झालेल्या राज्यस्तरीय (४० ते ४५ महिला वयोगटात) त्यांनी १०० मीटर धावणे, थाळीफेक व गोळा फेक या तिन्ही प्रकारात प्रथम क्रमांक मिळवला होता. आणि त्यामुळे त्यांची दिल्ली येथे तिसऱ्या खेलो मास्टर गेम साठी निवड झाली होती. सौ. उज्वला राजे लहानपणापासूनच अष्टपैलू खेळाडू आहेत. शाळा व कॉलेजमध्ये त्यांचा बेस्ट ऍथलेटिक्स म्हणून गौरव करण्यात आला आहे. त्याचबरोबर मा. रत्नाप्पा कुंभार शिवशाहीर बाळासाहेब पुरंदरे या मान्यवरांच्या हस्ते ही त्यांचा गौरव करण्यात आला आहे. त्यामुळे दहावीत असताना त्यांची सांगली आकाशवाणीवर मुलाखत प्रसिद्ध झाली होती. त्यांना आदर्श विद्यार्थिनी म्हणून ही गौरवण्यात आले आहे. दूरदर्शनवर 'हुकमाची राणी' मध्ये त्यांनी मुकुटही संपादन केला आहे. लग्नानंतर सुरुवातीची १२ वर्षे त्यांनी सीबीएससी स्कूलमध्ये शिक्षिका म्हणून काम केले. आदर्श शिक्षिका म्हणून त्यांचा रोटरीने सन्मान केला आहे. सध्या त्या रोटरी क्लब ऑफ अहमदनगर डिग्नेटीच्या सेक्रेटरी म्हणून कार्यरत आहेत. आपल्या उज्वल यशाचे श्रेय त्यांनी आई-वडील, सासू-सासरे, नणंद ,भाऊ, दिर व पती ॲड. अभय राजे व त्यांचे कोच दिनेश भालेराव सर यांना दिले आहे.

''जिद्द जिच्या ठायी, यश तिच्या पायी हेच खरे.''

शिक्षणाचा गोवर्धन सारे मिळून उचलू या... - डॉ. श्रीराम कोल्हे

मातीचे शिलेदार तर्फे कुंभार समाजातील गुणवंतांचा व प्रतिभावंतांचा सत्कार



प्रतिमा पूजन व दिप प्रज्वलन करताना डॉ. श्रीराम कोल्हे, के.एन. मोरे, अजय मार्केडेवार व मान्यवर



व्यासपिठावर उपस्थित मान्यवर पाहूणे दौलतराव वरवाडे, डॉ. श्रीराम कोल्हे, सुधाकर उत्तुरवार व मान्यवर



डॉ. श्रीराम कोल्हे यांना समाजरत्न पुरस्कार मान्यवरांच्या हस्ते प्रदान



कार्यक्रमास उपस्थित समाज बंधू-भगिनी

चंद्रपूर : आजच्या युगात पालकांच्या अज्ञान आणि गरीबीमुळे मुले शिक्षणाच्या प्रवाहाबाहेर फेकली जात असतील तर त्यासारखे दुसरे दुःख नाही. इतरांनी यासाठी काय केलं म्हणण्यापेक्षा आपण मदतीसाठी पुढे येऊ या. शिक्षणाचा हा गोवर्धन पर्वत सारे मिळून उचलू या. असे मनोगत ज्येष्ठ समाजसेवी व माजी सहाय्यक पशुसंवर्धन आयुक्त डॉ. श्रीराम कोल्हे यांनी व्यक्त केले.

चंद्रपूर येथील सीडीसीसी बँकेच्या सभागृहात आयोजित मातीचे शिलेदार तर्फे कुंभार समाजातील गुणवंत विद्यार्थी व प्रतिभावंतांच्या सत्कार सोहळ्यात 'शैक्षणिक विकासात समाजाचे योगदान' या विषयावर ते बोलत होते. ते पुढे म्हणाले, दुसऱ्यांना वाईट म्हटले म्हणजे आपण चांगले होत नाही, तर आपण चांगले व्हावे लागते. त्यासाठी उघड्या डोळ्यांनी स्वप्न बघून त्याच्या पूर्ततेसाठी स्वतःला झोकून देण्याची वृत्ती अंगी बाणवावी लागेल. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी दौलतराव वरवाडे हे होते. यावेळी कवी अविनाश पोईनकर, सुधाकर उत्तुरवार, खिवराज प्रजापती, व्यंकटेश माडगुलवार, वैशाली गोटमवार आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी डॉ. श्रीराम कोल्हे यांना महाराष्ट्रातील गरीब व होतकरू विद्यार्थ्यांसाठी राबविलेल्या चळवळीसाठी समाजरत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. तर सामाजिक कार्यासाठी दौलतराव वरवाडे यांना समाजविभूषण पुरस्कार देण्यात आला. यावेळी मान्यवरांची समयोचित भाषणे झालीत.

कार्यक्रमात चंद्रपूर व गडचिरोली जिल्ह्यातील एकशे सहा गुणवंत विद्यार्थी व समाजातील सेवाव्रती व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. यात तन्वी गरपल्लीवार, प्रतीक्षा शेगमवार, आर्थिका पाठक, मयुरी खोबरे, अक्षय ठाकूर, उज्ज्वला खोबरे, सानिया वालदे, आर्या गोटमवार यांना प्रथम पुरस्कार तर स्नेहा ठाकरे, पलक व्यवहारे, चांदणी खोबरे, मयुरी खोबरे, अक्षय पातर, आर्यन बुरबांदे यांना द्वितीय क्रमांकाचे पारितोषिक देऊन गौरविण्यात आले. याशिवाय डॉ. संस्कृती गरपल्लीवार, मिलन रामगुंडेवार, पृथ्वी उत्तुरवार, पूनम मंचलवार, वैशाली कपाट, अश्विनी कपाट अशा अनेक पदवीधरांना रोख रक्कम, प्रशस्तीपत्र व पुस्तके देऊन गौरविण्यात आले. डॉ. ओमप्रकाश सोनोने, कैलास पुराणकर, किशोर पातर, अशोक ताटकंटीवार, मंगेश कपाट, ज्ञानेश्वर वरवाडे, आशिष चात्रेश्वार, संजय रामगुंडेवार, सुवर्णा चात्रेश्वार, शेखर रामगुंडेवार, भास्कर उत्तुरवार, अमित कोलुरवार यांना समाजभूषण



गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते संपंन्न



डॉ. श्रीराम कोल्हे यांचे हस्ते गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार संपंन्न

पुरस्काराने सन्मानीत करण्यात आले. अश्विनी ताटकंटीवार, रामचंद्र ताटकंटीवार, मेहुल शेगमवार, अंशिका वलादे, किशोर चिकाने यांना क्रीडापुरस्कार तर जय पातळे यास कलाभूषण पुरस्कार देण्यात आला. विमल येरावार, विलास उत्तुरवार, सुधाकर खोबरे, वसंत गाते, चंपत पातर, रामभाऊ खोबरे, रविंद्र गिरोले यांना सेवाव्रती पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सूरज बुरबांदे, सोनल येरावार, प्रियंका इसलवार, नेहा ताटकंटीवार, वृषभ शेगमवार, सचिन बोरसरे, शुभम खोबरे, वेदांत कोटांगले यांचा नव्याने नोकरीस लागल्यामुळे सन्मान करण्यात आला.

कार्यक्रमाचे सूत्रसंचलन डॉ. राजेश्री मार्कंडेवार व वंदना चात्रेश्वार यांनी केले. प्रास्तविक अजय मार्कंडेवार यांनी तर अहवाल वाचन गजानन अमरोजवार यांनी केले. यशस्वीतेसाठी राजेश रामगुंडेवार, प्रशांत चात्रेश्वार, राकेश चात्रेश्वार, शरद मंचलवार, गणेश रामगुंडेवार, मुकेश ठाकूर, रविजी व्यवहारे, रामभाऊ बोरसरे, कमलेश व्यवहारे, प्रशांत मार्कंडवार, चंदू श्रीकोंडावार यांनी परिश्रम घेतले.

***

माझे मत.... विद्यार्थी विकासात पालकांचा सहभाग हवा

विद्यार्थ्यांचा शारीरिक, मानसिक, बौद्धिक विकास घडविण्यासाठी शिक्षकांबरोबरच पालकांचाही सहभाग असणं अत्यंत आवश्यक आहे. कारण विद्यार्थी जरी सकाळी १० ते संध्या. ५ या वेळेत शाळेत असला तरी इतर पूर्ण वेळी तो आपल्या पालकांच्या सहवासात असतो. मुलांचं खरं शिक्षण हे कुटुंबातूनच सुरू होतं त्यामुळे मुलांची पहिली शाळा म्हणजे त्याच कुटुंब. कुटुंबातील व्यक्तींच्या वागण्या–बोलण्याचा, सवयींचा परिणाम लहानपणीच मुलांवर होत असतो आणि तो परिणाम चिरकाल टिकणारा असतो. त्यामुळे पालकांनी आपल्या कुटुंबात वागताना, बोलताना विचार करावा आणि आपल्या मुलावर आपल्या वागण्याचा विपरित परिणाम होणार नाही याची दक्षता घ्यावी. इयत्ता १ली व २री तील विद्यार्थ्यांची निरीक्षण शक्ती अफाट असते. ती घरात घडलेल्या सर्व घटना शाळेत येऊन सांगत असतात. मग त्या चांगल्या असो की वाईट.

अजूनही ग्रामीण भागातील पालक शिक्षणाबाबत अज्ञानी दिसून येतात. अनेक पालकांना शिक्षणाबाबत गंधही नसतो. तसेच काहींना तर आपला पाल्य कोणत्या इयत्तेत शिकतो, हे ही लवकर सांगता येत नाही. वास्तविक पाहता जर विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास करावयाचा असेल तर पालकांनी आपली भूमिका समर्थपणे सांभाळली पाहिजे. आपल्या पाल्याकडे गांभिर्याने लक्ष दिले पाहिजे. दररोज संध्याकाळी त्याला जवळ घेऊन त्याच्याशी प्रेमाने बोलले पाहिजे. त्याला शाळेतील घटना विचारून घेतल्या पाहिजेत. तसेच त्याला असलेले मित्र कसे आहेत याबाबतची माहिती पालकांना असावयास हवी. कारण मुलांवर लहानपणी झालेले चांगले संस्कार त्याच्या आयुष्यात खूप मोलाचे ठरतात यासाठी शिक्षकांनी पालकांचे उद्‌बोधन करणे गरजेचे आहे.

शिक्षकांनी पालकांच्या भेटी घेण्यासाठी त्यांच्या घरी जाण्याऐवजी पालकांनी आपल्या पाल्याच्या सर्वांगीण विकासासाठी शाळेत येऊन शिक्षक भेटी घेतल्या पाहिजेत. आपल्या पाल्याच्या शाळेतील वर्तणुकीची, गुणवत्तेची माहिती घेतली पाहिजे. त्याचप्रमाणे शाळेत वेळोवेळी होणारे पालक मेळावे, पालक सभा, शाळेतील इतर उपक्रम, कार्यक्रम यांना आवर्जून उपस्थित राहून आपले शिक्षण विषयक मत मांडले पाहिजे. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे कोणतेही कारण नसताना पाल्यांना घरी न ठेवता वेळेवर शाळेत पाठविले पाहिजे. या पुढील काळात नवीन स्पर्धा युगात टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास होणं अतिशय महत्त्वाचं आहे. त्यासाठी पालकांनी कटाक्षाने लक्ष दिले तर शिक्षक व पालक या दोघांच्या प्रयत्नातून विद्यार्थ्यांचा विकास नक्कीच घडेल व आपल्या देशासाठी सुजाण नागरिक घडतील यात शंका नाही.

– परसराम पोपट झोजे, पदवीधर शिक्षक
जि.प.प्राथ. शाळा कामतवाडी,
ता. मुळशी, जि. पुणे

***

शिरपूर येथे कुंभार समाजाचे वार्षिक स्नेहसंमेलन व पुरस्कार वितरण सोहळा संपन्न



संत शिरोमणी गोरोबाकाका यांचे प्रतिमा पुजन करताना मान्यवर समवेत पदाधिकारी



रमाकांत क्षिरसागर यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करताना नाशिक जिल्हा अध्यक्ष समवेत सोमनाथशेठ सोनवणे व मान्यवर



पुरस्कार प्रदान करताना मान्यवर



सर्व पुरस्कार प्राप्त मान्यवर

धुळे : शिरपूर येथील कुंभार संत गोरोबाकाका कुंभार (प्रजापती) समाज विकास व शैक्षणिक संस्था शिरपूर जि. धुळे यांच्या तर्फे आयोजित, वार्षिक स्नेहसंमेलन तसेच समाजभूषण, उद्योगरत्न, आदर्श शिक्षक, कृषिरत्न, मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार, समारंभ विठ्ठल लॉन्स, शिरपूर जि. धुळे येथे उत्साहात झाला. कार्यक्रमाच्या सुरवातीला प्रमुख पाहुणे व मान्यवरांच्या हस्ते संत शिरोमणी गोरोबाकाका यांच्या प्रतिमेचे दीप प्रज्वलन करून पूजन करण्यात आले. व्यासपीठावर कार्यक्रमाचे अध्यक्ष मा. रमाकांतजी क्षीरसागर (कार्याध्यक्ष सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश) तसेच शिरपूर तालुक्याचे आमदार काशिराम दादा पावरा, सुभाषदादा कुलकर्णी, राहुलजी रंधे सरपंच बोराडी, जगदीशजी कलाल, माजी नगराध्यक्षा सौ. संगीताताई देवरे, तसेच धुळे जिल्हा खान्देश कुंभार समाज विकास व शैक्षणिक संस्थेचे जिल्हा अध्यक्ष सुरेश बहाळकर, नासिक जिल्हा अध्यक्ष सोमनाथजी सोनवणे, नंदुरबार जिल्हाध्यक्ष हृदयेश चव्हाण, जळगाव जिल्हा अध्यक्ष चंद्रशेखर कापडे, इंजि. बबनराव जगदाळे, दिनेश वाडीले, गोविंद शेठ, युवराज ठोंबरे, पुंडलिकराव सोनवणे, डॉ. जितेंद्र भालेराव, सोशल मीडियाचे जगदीश मोरे, तसेच अनेक पदाधिकारी मान्यवर व्यासपीठावर उपस्थित होते. व्यासपीठावरील सर्वच मान्यवरांचा शिरपूर तालुका समितीच्या वतीने शाल व पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. तसेच वसंतराव गाडेकर, अशोक जाधव, भरत शिरसाठ, रमेश गायकवाड, नंदू मामा सोनवणे, अरविंद क्षीरसागर, राधेश्याम गायकवाड, गोकुळ सोनवणे, सुरेश रसाळ, लक्ष्मीकांत क्षीरसागर, सुधाकर सोनवणे, धुळे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख अनिल चित्ते, अशोक पंडित, मिलिंद कुंभार, वरील मान्यवरांचा शाल, पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. आ. काशीराम पावरा, सुभाष कुलकर्णी, राहुल रंधे, यांनी मनोगतातून शिरपूर तालुका येथील कुंभार समाज बांधवांच्या समस्या, त्यांना भेडसाविणाऱ्या अडी अडचणींमध्ये आम्ही कायम आपल्या समाजाच्या पाठीशी उभे राहून त्या सोडवण्यासाठी कटिबद्ध आहोत असे आश्वासन दिले. कुंभार समाजात ज्यांनी उल्लेखनीय, भूषणावह असे कार्य केले आहेत अशा पुरस्कारार्थी मान्यवरांचा प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते पुरस्कार ट्रॉफी, शाल, पुष्पगुच्छ देऊन सन्मान करण्यात आला. त्यात सर्वप्रथम समाजभूषण पुरस्कारार्थी म्हणून रमाकांत क्षीरसागर (नाशिक) समाजभूषण अनिल कुंभार (होळनांथे) समाजभूषण विनोद पंडित भुसावळ समाजभूषण अनिल कुंभार (दहिवद) समाजभूषण, घनश्याम हरणकर (विवरे) समाजभूषण सुरेश परिस्कर (भुसावळ) समाजभूषण. प्रवीण धाडे (धुळे) उद्योगरत्न मल्हार कुंभार (चोरवड) कृषीरत्न दिलीप कुंभार (नगाव) आदर्श शिक्षक स्व. चंद्रशेखर उर्फ पूनम शेठ वाडीले यांना मरणोत्तर जीवनगौरव पुरस्कार देण्यात आला. कार्यक्रम यशस्वीतेसाठी उत्तर महाराष्ट्र खान्देश विभागीय अध्यक्ष रतिलाल कुंभार शिरपूर तालुका विकास व शैक्षणिक संस्थेचे शिरपूर तालुका संस्थापक अध्यक्ष सुभाष कुंभार, ता. अध्यक्ष गोकुळ कुंभार, उपाध्यक्ष आत्मारामभाऊ कुंभार, धुळे जिल्हा युवा अध्यक्ष किशोर कुंभार, भूषण कुंभार, तसेच शिरपूर तालुका कार्यकारणी सदस्य, कार्यकर्ते, युवक, तथा महिला आघाडी, यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन किशोर कुंभार व पुंडलिकराव सोनवणे यांनी केले. तर आभार प्रदर्शन धुळे जिल्हा युवा उपाध्यक्ष भूषण कुंभार यांनी मानले.

***

संत शिरोमणी गोरोबाकाका समाज सेवा संस्थेचा २६ वा वर्धापन दिन कार्यक्रम संपन्न



माजी महापौर हनुमंतराव भोसले उर्फ आण्णा यांना संस्थेतर्फे समाजरत्न पुरस्कार संजय राजे यांच्या हस्ते प्रदान समवेत प्रतिभाताई ओव्हाळे, माजी महापौर वैशालीताई घोडेकर, डॉ. कैलास कदम, सतिश परबते व पदाधिकारी



आदर्श सरपंच वैशालीताई दत्ताराम साळवी यांना समाजगौरव पुरस्कार प्रदान हस्ते संजय राजे समवेत तुकाराम परबते, काशीराम साळवी, माजी महापौर हनुमंतराव भोसले व पदाधिकारी



सुप्रसिध्द शाहीर गुरुराज कुंभार यांनी संत गोरोबाकाकांचा सुंदर पोवाडा सादर केल्याबद्दल त्यांचा व त्यांच्या सहकार्याचा सत्कार करताना संजय राजे समवेत रघुनाथ कुंभार, संतोष कुंभार, हनुमंतराव भोसले, हेमंत खटावकर, वैशाली घोडेकर व मान्यवर



गोरोबाकाका मंदिराचे निर्माण करण्यामागे सिंहाचा वाटा असणारे कै. पांडुरंग शेठ परबते यांच्या स्मृतिप्रित्यर्थ विद्यार्थ्यांचा गौरव करताना त्यांच्या पत्नी श्रीमती अलकाताई पांडुरंग परबते समवेत मान्यवर

पुणे : नेहरूनगर पिंपरी येथे संस्कृती आणि कर्तृत्वाच्या भव्य देखाव्यामध्ये, संत शिरोमणी गोरोबाकाका समाज सेवा संस्थेचा २६ वा वर्धापन दिन कार्यक्रम कुंभश्री चे संपादक संजय राजे यांच्या अध्यक्षतेखाली २६ जानेवारी, २०२४ रोजी पार पडला. मान्यवर पाहुण्यांमध्ये माजी महापौर हनुमंतराव भोसले, संजय राजे, सुरेशराव कोते, सतीषदादा दरेकर, माजी महापौर वैशाली घोडेकर, नगरसेवक राहुल भोसले, डॉ. कैलास कदम, संतोष कुंभार, श्रीमती प्रतिभाताई ओव्हाळे तसेच श्रीमती अलका पांडुरंगशेठ परबते आणि इतर अनेक मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात सर्व मान्यवरांच्या हस्ते दीप प्रज्वलनाने झाली. पूज्य संत गोरोबाबा काकांवर लक्ष केंद्रित करून प्रख्यात शायर गुरुराज कुंभार यांनी सादर केलेल्या भावपूर्ण पोवाड्याने वातावरण प्रसन्न झाले.

कार्यक्रमाचे एक महत्त्वाचा क्षण म्हणजे हनुमानराव भोसले यांच्या १९८६ ते २०१२ या कालावधीत संस्थेतील आणि सार्वजनिक सेवेतील २५ वर्षांच्या उल्लेखनीय योगदनाला आणि अनुकरणीय समर्पणाबद्दल त्यांना प्रतिष्ठित समाज रत्न पुरस्काराने अध्यक्ष कुंभश्री संपादक संजय राजे यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. याशिवाय, भिवा गुडेकर आणि सौ. वैशाली ताई गुडेकर यांना त्यांच्या उल्लेखनीय योगदानाची दखल घेऊन समाज गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. नर्सरीपासून एमबीएपर्यंतच्या विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरीची दखल घेऊन त्यांचा सत्कार करण्यात आला. जसजशी रात्र झाली तसतसे कार्यक्रमाची सांगता हळदी कुंकू समारंभाने झाली, जो उपस्थित महिलांसाठी समृद्धी आणि कल्याणाचे प्रतीक आहे. सणाची सांगता हृदयस्पर्शी आरतीने झाली आणि त्यानंतर सर्व उपस्थितांसाठी चिरस्थायी आठवणी निर्माण करून आनंददायी रात्रीचे जेवण घेऊन झाली. २६ व्या वार्षिक कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी खालील व्यक्तींनी आपले मोलाचे योगदान दिले आहे. तुकाराम परबते, अनिल नरवणकर, प्रभाकर गुडेकर, मनोहर साळवी, शिवाजी साळवी, संतोष नरवणकर, दिलेश साळवी, नारायण साळवी, अनिल साळवी, दिवेश परबते, सुहास साळवी, दिवेश परबते, सुहास साळवी, संतोष भिवा परबते, शरद साळवी, बबन परबते, अविनाश चिपळूणकर, प्रशांत साळवी, नरेश साळवी, अजित साळवी, चंद्रकांत गोविंद साळवी, संपत साळवी, संजय परबते, साळवी, संजय परबते, नितीन साळवी, ओंकार साळवी, विनय परबते, दीपक महादेव साळवी, भावेश परबते, सुरज शिवराम साळवी.

विद्यार्थ्यांनी पालकांचे नावलौकिक करावे.

अण्णाराव कुंभार यांचे प्रतिपादन; ६५ गुणवंतांचा सत्कार

विद्यार्थ्यांना प्रेरणा : नेताजी शिक्षण संस्थेतर्फे गेल्या पंधरा वर्षांपासून कुंभार समाजातील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात येत आहे. आतापर्यंत सुमारे पंधराशे विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देऊन पुढील उच्च शिक्षणासाठी प्रोत्साहन देण्यात आले आहे. सोलापूर शहर व ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीचा लाभ घेऊन विविध क्षेत्रात कार्यरत असल्याचे संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी सांगितले.



मान्यवरांसमवेत गुणी विद्यार्थी

सोलापूर : कुंभार समाज बारा बलुतेदार असल्याने ८० टक्के समाज ग्रामीण भागात राहतो. कुंभार व्यवसायासामुळे पालक पाल्यांच्या शिक्षणाकडे लक्ष देत नाहीत. मुलांनी पालकांचे अडचण लक्षात घेऊन जिद्दीने, चिकाटीने व प्रामाणिकपणे अभ्यास करुन उच्च शिक्षण मिळवून आई-वडीलांचे नाव लौकीक करावे, असे प्रतिपादन नेताजी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष अण्णाराव कुंभार यांनी केले. नीलम नगर येथील नेताजी सुभाषचंद्र बोस कन्नड भाषा कन्नड संस्कृती संवर्धक कुंभार समाज शिक्षण प्रसारक मंडळाच्यावतीने कुंभार समाजातील ६५ विद्यार्थ्यांचा गौरव सोहळा उत्साहात पार पडला. यावेळी संस्था अध्यक्ष अण्णाराव कुंभार बोलत होते.

प्रथम संत गोरोबाकाका कुंभार, वीरतपस्वी चन्नवीर शिवाचार्य महास्वामीजीं, योगिराजेंद्र शिवाचार्य महास्वामीजीं व संस्थेचे माजी सचिव कै. बसवराज कुंभार यांच्या प्रतिमेचे पूजन व दीपप्रज्वलन करुन उद्घाटन करण्यात आले.

यावेळी व्यासपीठावर खजिनदार ललिता कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य काशिनाथ राजे (लातूर), प्रा. प्रशांत कुंभार (मोडनिंब), माजी नगरसेवक भिमाशंकर म्हेत्रे, सिद्धेश्वर देवस्थानचे विश्वस्त सुरेश म्हेत्रे, सोलापूर जिल्हा कुंभार समाजाचे सचिव गुरुलिंग कुंभार, पत्रकार विरुपाक्ष कुंभार, सेवानिवृत्त प्राचार्य सुभाष धुमशेट्टी, विजयकुमार हुल्ले, लेखापरीक्षक महेश आळंगे, धानय्या मठपती, प्राचार्य रविशंकर कुंभार, मुख्याध्यापक ज्ञानेश्वर म्हेत्रे, मुख्याध्यापिका विजयालक्ष्मी कुंभार आदी उपस्थित होते. यावेळी मान्यवरांच्या हस्ते कुंभार समाजातील ६५ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीचे धनादेश देऊन पालकांसोबत सत्कार करण्यात आला. दहावी-बारावी परीक्षेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा तसेच कर्मचारी पाल्यांचा सत्कार पार पडला. यावेळी सेवानिवृत्त शिक्षक महादेव बिराजदार व अण्णासाहेब सुतार यांचा सत्कार करण्यात आला.

सूत्रसंचालन विश्वाराध्य मठपती, मुख्याध्यापिका वैशाली कुंभार यांनी आभार मानले. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी पर्यवेक्षक गौरीशंकर आंळगे, विठ्ठल कुंभार, सिद्धाराम कुंभार, चंद्रकुमार कुंभार, गोदावरी कुंभार, षडाक्षरी हिरेमठ, शिवानंद पुजारी, शिवकुमार शिरुर, राजेंद्र मुलगे, प्रकाश कोरे, उमादेवी कुंभार, केदार कुंभार, चंद्रशेखर पाटील, काशिनाथ माळगोंडे, गणपती पाटील, शिवानंद गुड्डोडगी आदींनी परिश्रम घेतले.

***

कुंभार समाजाच्या वतीने 'अभिनय कुंभार' यांचा सन्मान



पुणे : कुंभार समाज सामाजिक संस्था पुणे शहराच्या वतीने अभिनय कुंभार आयुक्त आयकर विभाग कर सवलत यांना आयकर भवन स्वारगेट येथे सन्मानित करण्यात आले. अभिनय कुंभार यांनी अतिशय प्रतिकूल परिस्थितीतून वाटचाल करत ग्रामीण भागातून येऊन येथपर्यंत मजल मारली आहे. याप्रसंगी कुंभार म्हणाले, समाजातील मुलांनी मेहनत, चिकाटी व अभ्यास करून ध्येय ठेवले तर निश्चितच आपली मुलं प्रशासकीय सेवेत कार्यरत होतील. गरीब होतकरू मुलांना मी नक्कीच मार्गदर्शन करेन अशी ग्वाही दिली. कार्यक्रमाचे आयोजन कुंभार समाज सामाजिक संस्था पुणे शहरचे अध्यक्ष दीपक आबा माऊली शिरवळकर यांनी केले.

या प्रसंगी पी.बी. कुंभार निवृत्त पोलीस निरीक्षक, उद्योजक सुरेश कुंभार (शिरवळ), जी.डी. कुंभार निवृत्त उप अभियंता जलसंधारण कोल्हापूर, शशांक कुंभार, थोतमल, समीर कुंभार उपस्थित होते. सुनील कुंभार यांनी स्वागत केले. रमेश देवतरसे यांनी आभार प्रदर्शन केले.

***

प्रजापती कुंभकार संघा तर्फे गुणगौरव समारंभ संपन्न



गुणी विद्यार्थ्यांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते संपंन्न डावीकडून चंद्रकांत कुंभार, विश्वनाथ कोळमकर व मान्यवर



सामाजिक संस्थेचे प्रदेशाध्यक्ष सतिशदादा यांचा सत्कार करताना प्रजापति संघाचे प्रदेशाध्यक्ष गंगाधर उर्फ आप्पा जोर्वेकर



सतिशदादा दरेकर यांना समाज भूषण पुरस्कार प्रदान करताना गंगाधर जोर्वेकर, चंद्रकांत कुंभार, विश्वनाथ कोळमकर व मान्यवर



बाळासाहेब शिंदे यांना कुंभभुषण पुरस्कार प्रदान करताना मान्यवर

आखिल भारतीय प्रजापती कुंभकार संघ दिल्ली रजि. १९८१ च्या महाराष्ट्र कार्य कारणीमधील सातारा जिल्ह्याच्या कार्यकारणी चा वर्धापन दिन सोहळा रविवार दिनांक २० ऑक्टोबर २०२४ रोजी सकाळी ११ ते ३ वाजेपर्यंत सातारा येथे सप्तपदी मंगल कार्यालय सोनगाव फाटा येथे संपन्न झाला.

सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक माननीय चंद्रकांत कुंभार पेरलेकर यांनी करून सातारा संघाचे आतापर्यंत केलेले उपक्रमांची माहिती दिली. तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माननीय जयसिंग कुंभार आणि बाळकृष्ण कुंभार यांनी केले.

यामध्ये इयत्ता पहिली पासून तर पोस्ट ग्रॅजुएशन पर्यंत आणि याशिवाय इतर अभ्यास क्रमामधील अतिशय गुणवंत आणि हुशार विद्यार्थी आणि विद्यार्थिनी यांचा गुणगौरव सोहळा, तसेच एखाद्या कलेमध्ये विशेष प्राविण्य असणाऱ्या कलावंत आणि सेवानिवृत्ती झालेले पदाधिकारी यांचा सुध्दा सत्कार सोहळा पार पडला. याच बरोबर अखिल भारतीय प्रजापती कुंभकार संघच्या महाराष्ट्र कार्यकारणीचा वार्षिक स्नेहमेळावा सुद्धा पार पडला. असा तिहेरी संगम असणारा कार्यक्रम अतिशय नियोजनबद्ध पद्धतीने सातारा येथील कुंभार समाज बांधवानी साजरा केला. या कार्यक्रमासाठी सातारा कार्यकरणी मधील माननीय चंद्रकांत शंकर कुंभार उपाध्यक्ष महाराष्ट्र – तसेच माननीय नवरंग कुंभार महासचिव सातारा कार्यकरणी – अध्यक्ष माननीय दिनकर कुंभार सातारा, संपूर्ण सातारा कार्यकारणीचे सर्व पदाधिकारी आणि सभासद यांनी विशेष परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे वैशिष्ट म्हणजे समाज्याची विशेष समाजसेवा करणाऱ्या कुंभार समाज बंधूना पुरस्कृत करण्यात आले. यामध्ये महाराष्ट्र कुंभ भूषण पुरस्कार माननीय बाळासाहेब बबन शिंदे पिंपरी चिंचवड, सातारा कुंभ भूषण पुरस्कार माननीय चंद्रकांत शंकर कुंभार सातारा, आणि समाज भूषण पुरस्कार माननीय सतीश दरेकर पुणे यांना प्रधान करण्यात आला.

तसेच कुंभार समाज बांधव शंकर कुंभार राहणार परळी सज्जनगड यांनी मातीची भांडी, शो च्या मातीच्या वस्तूचा स्टॉल पाहण्याचा लाभ सर्व कुंभार बांधवांना मिळाला. तसेच तरुण मूर्तिकार सोहम संभाजी कुंभार सातारा यांनी संत गोरोबा काका यांचा मातीचा पुतळा बनविण्याचे प्रत्यक्षात करून दाखविले. कार्यक्रमासाठी सातारा मधील आणि विविध



विश्वनाथ कोळमकर यांना कुंभभुषण पुरस्कार प्रदान करताना सतिशदादा दरेकर व मान्यवर

जिल्ह्यामधील सुमारे ५०० समाज बांधव हजर होते. माती कलेचे प्रदर्शन लिबर्टी आर्ट संगमनेर येथील सौ. वंदना हेमंत जोर्वेकर यांनी करून दाखवले.

या कार्यक्रमामध्ये कुंभार कलेचे प्रदर्शन करण्यात आले. यामध्ये १५ मिनिटामध्ये गणपती बनविणे याचे प्रात्यक्षिक दाखविण्यात आले, तसेच कुंभ विकास या अंकाचे सुद्धा प्रकाशन या कार्यक्रमामध्ये करण्यात आले. तसेच प्रा. शुभांगी कुंभार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमासाठी सातारा कुंभार समाज बांधवानी सर्वांसाठी चविष्ट नाश्ता आणि दुपारी जेवणाची सुद्धा मेजवानीची सोय केली होती. कार्यक्रमाला महाराष्ट्र मधील लातूर, बुलढाणा, अहिल्यानगर, गडचिरोली, सं. नगर, पुणे, संगमनेर, नाशिक, मुंबई, कोल्हापूर, गंगापूर, सांगली, सोलापुर, पिंपरी चिंचवड अशा महाराष्ट्र मधील सर्व विभागामधून कुंभार समाज बांधव आले होते.

या कार्यक्रमासाठी काही प्रतिष्ठीत महानुभाव हस्तींचा समावेश होता. मा. सतीश दरेकर, मा. संजय गाते, मा. विश्वनाथ कोलंमकर, मा. संजय कुंभार, मा. गंगाधर जोर्वेकर, मा. गजानन कोलमकर, मा. दिगंबर इंगळे, मा. सूर्यकांत कानुरे, मा. बाळासाहेब शिंदे, मा. विजय देवडे, मा. ज्योती बावसकर लक्ष्मण कुंभार, मा. दिगंबर कुंभार, मा. गोविंद प्रजापती, मा. भाऊसाहेब आवंडकर, मा. अनील झोजे होते. या सोहळ्यासाठी प्रा. विलासराव तुळे सेवानिवृत्त प्राचार्य श्रीरामपूर ४० वर्षेनंतर सदर कार्यक्रमासाठी आवर्जून उपस्थित होते.

अतिशय दिमाखदार नियोजन बद्ध आणि मनमोहक कार्यक्रम सातारा कुंभार समाज बांधवानी करून दाखवला.

***

व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत परसराम झोजे मुळशी तालुक्यात प्रथम



महाराष्ट्र शासनाच्या शालेय शिक्षण व क्रीडा विभाग अंतर्गत महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषदेने सन २०२३ मध्ये राज्यातील शिक्षकांसाठी दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धा आयोजित केली होती.

एकूण सहा गटात ही स्पर्धा घेण्यात आली होती. त्यामध्ये गटनिहाय भाषा, गणित, इंग्रजी, परिसर अभ्यास, विज्ञान, सामाजिक शास्त्रे हे विषय देण्यात आले होते.

या स्पर्धेचा निकाल नुकताच जाहीर झाला असून त्यामध्ये सहावी ते आठवी गटातील विज्ञान या विषयात परसराम पोपट झोजे यांनी तयार केलेल्या व्हिडिओला मुळशी तालुक्यात प्रथम क्रमांक मिळाला आहे. या स्पर्धेत अनेक शिक्षकांनी भाग घेतला होता.

स्पर्धेतील विजेत्यांना रोख बक्षिसे व प्रमाणपत्रे दिली जाणार आहेत. परसराम झोजे हे श्री क्षेत्र भालगुडी येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा कामतवाडी येथे पदवीधर शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी यापूर्वीही व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत अनेक बक्षिसे मिळविली आहेत. त्यांनी शाळेचा यु-ट्युब चॅनेल तयार केला असून त्या माध्यमातून शाळेतील विद्यार्थ्यांचे अनेक उपक्रम प्रसारित केले आहेत.

त्यांच्या या यशाबद्दल गटविकास अधिकारी सुधीर भागवत, गटशिक्षण अधिकारी सुजाता देशमाने, विस्तार अधिकारी अशोक गोडसे, केंद्र प्रमुख हरी खंडागळे, शाळा व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष कैलास साठे, मुळशीतील सर्व शिक्षकांनी व गावातील ग्रामस्थांनी त्यांचे अभिनंदन केले.

त्यांना नुकताच पुणे जिल्हा परिषदेचा गुणवंत शिक्षक पुरस्कार जाहीर झाला आहे.

***

महाराष्ट्र फुटबॉल संघात श्रृती कुंभारची निवड



सातारा : बेळगाव कर्नाटक येथे होणाऱ्या राष्ट्रीय ज्युनिअर मुलींची फुटबॉल चॅम्पियनशिप स्पर्धेसाठी महाराष्ट्र संघात साताऱ्यातील श्रृती कुंभार हिची निवड झाली. कोल्हापूर येथील कॅम्पमधून ही निवड करण्यात आली. श्रृतीला प्रशिक्षक राहुल मोरे, तमन्ना मोरे व अभिजीत जाधव यांचे मार्गदर्शन लाभले. तिचे या निवडीबद्दल श्रीमंत वृषालीराजे भोसले, सुरेश साधले, धनराज जाधव, सुधाकर शानभाग, प्रा. शिवराज गायकवाड, धैर्यशील कुंकले, प्रा. गौरव जाधव, अमित उघाडे यांनी अभिनंदन केले.

कोकणस्थ कुंभार ग्रामविकास संघ कुंभाड संस्थेचा २५ वा वर्धापन दिन संपंन्न
विद्यार्थी गुणगौरव समारंभ आणि कौटुंबिक स्नेहमेळावा

– सौ. शुभांगी सुनिल साळवी



कार्यक्रमाचे अध्यक्ष संदीप कुंभार यांचा सत्कार करताना संस्थेचे संस्थापक कोंडिराम साळवी



प्रतिभाताई ओव्हाळे आपले मनोगत व्यक्त करताना समवेत उमेश काजुळकर व संजय राजे



संस्थेचे संस्थापक कोंडिराम साळवी यांचा सत्कार करताना संदीप कुंभार व पदाधिकारी



छत्रपती शिवरायांचे पूजन करताना कुंभश्री संपादक संजय राजे



सौ. शुभांगी संदीप कुंभार यांचा सत्कार करताना सौ. शुभांगी सुनिल साळवी समवेत उमेश काजुळकर व संदीप कुंभार

पिंपरी : संस्थेचे २६ जानेवारी २०२४ हे वर्ष रौप्य महोत्सवी वर्ष होते. त्यानिमित्ताने सत्यनारायण महापूजा आणि महाप्रसादाचे आयोजन केले होते. तसेच कार्यक्रमाचे विशेष म्हणजे संस्थेचे मूळ संघटक कैलासवासी सोमाजी बंडु काजुळकर ज्यांनी संस्थेची मुहूर्तमेढ रोवली. त्यांच्या स्मृती प्रित्यर्थ गेली अनेक वर्ष संस्थेचे अविरत कार्य करणारे जे मान्यवर कार्यकर्ते आहेत त्यांना सन्मानचिन्ह देऊन गौरवण्यात आले. समारंभाचे अध्यक्षपद श्रीयुत संदीप सदानंद कुंभार यांनी भूषविले. कार्यक्रमास प्रमुख पाहुणे म्हणून शिल्पकार बी आर खेडकर प्रतिष्ठानच्या अध्यक्षा श्रीमती प्रतिभाताई ओव्हाळे तसेच कुंभश्री मासिकाचे संपादक संजय राजे उपस्थित होते. कोकण कुंभार समाज पुणेचे अध्यक्ष कोकणरत्न चंद्रकांत चिवेलकर यांनी आपली उपस्थिती दर्शवून कार्यक्रमाची शोभा वाढवली.

कार्यक्रमाची सुरुवात नेहमीप्रमाणे दीपप्रज्वलनाने झाली. नंतर गोरोबाकाकांच्या प्रतिमेचे पूजन व शिवरायांच्या प्रतिमेचे पूजन झाले. मान्यवरांनी विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमानिमित्त विद्यार्थ्यांना तसेच पालकांना मोलाचे मार्गदर्शन केले.

प्रतिभाताईंनी मुलांचे तसेच संस्थेचे कौतुक केले त्यांच्या भाषणात त्या म्हणाल्या, सालाबादप्रमाणे हा कार्यक्रम करता आहात मला नक्कीच कौतुक वाटते. मुलांनी अभ्यासाला महत्व दिले पाहिजे.

तसेच संजय राजे आपल्या भाषणात म्हणाले की, जर महात्मा ज्योतिराव फुले आणि सावित्रीमाई फुले नसत्या तर आज आपण किंवा इथे बसलेल्या महिला आज आपल्याला एवढ्या मोठ्या संख्येने दिसल्या नसत्या. खरोखरच त्यांचे आपल्यावर खूप उपकार आहेत आणि त्या उपकाराची जाणीव आपण कायम ठेवली पाहिजे. शिक्षण करत असताना वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये आपला ठसा उमटवला पाहिजे.

तसेच चंद्रकांत चिवेलकर यांनी महिलांना उद्देशून त्यांच्या भाषणामध्ये सांगितले महिलांनी संघटित होऊन बचतगट सारखे इतर काही एकत्र

येऊन गट तयार केले पाहिजेत. जर समाजाची खऱ्या अर्थाने प्रगती व्हायची असेल तर महिलांचा पुढाकार महत्त्वाचा आहे.

अध्यक्षिय भाषणामध्ये संदीप कुंभार साहेबांनी त्यांचा शिक्षण प्रवास अगदी थोडक्यात मोजक्या शब्दात सांगितला. विद्यार्थ्यांना असे सांगितले की, आपण कुठल्या शाळेत शिकतो हे महत्त्वाचे नसून कसे शिकतो हे खूप महत्त्वाचे आहे. तसेच ते म्हणाले की, अभ्यास तर महत्त्वाचा आहेच पण अभ्यासाबरोबरच इतर कलागुणांना, खेळाला महत्व दिले पाहिजे. आपला सर्वांगीण विकास कसा होईल यावर अधिक लक्ष दिले गेले पाहिजे.

अध्यक्ष कार्यक्रमाला सपत्नीक आले होते. त्यांच्या पत्नी सौ. शुभांगी कुंभार यांनीही विद्यार्थ्यांसाठी तसेच पालकांसाठी प्रोत्साहन पर दोन शब्द सांगितले. त्यांच्या बोलण्यामध्ये योगाभ्यास किती महत्त्वाचा आहे आणि योगशास्त्राने आपण कठीणातील कठीण गोष्ट साध्य करू शकतो असे सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन उमेश काजुळकर यांनी केले. तसेच पाहुण्यांचा परिचय सौ. शुभांगी साळवी यांनी करून दिला.

संस्थेचे संस्थापक कोंडीराम साळवी यांनी संस्थेची २५ वर्षांची वाटचाल सांगितली. कोणतीही गोष्ट शिकण्यासाठी वयाची अट नसते आपण कोणत्याही वयामध्ये मनात आणले तर शिकू शकतो या उक्तीवर सौ. शुभांगी सुनील साळवी यांनी लग्नानंतर आपले पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले. त्याचा प्रवास जमलेल्या समुदायाला सांगितला. कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ सभासदांचा सत्कार करण्यात आला. विभागीय कार्यकर्त्यांचाही सत्कार केला गेला. विद्यार्थी गुणगौरव कार्यक्रमांमध्ये ज्या विद्यार्थ्यांना विशेष पारितोषक देऊन सत्कार करण्यात आला. त्यांना आपले मनोगत व्यक्त करण्याची संधीही या कार्यक्रमात देण्यात आली. या सत्रामध्ये कुमारी रचना अजय साळवी आणि कुमारी सिद्धी नागेश साळवी यांनी आपले मनोगत व्यक्त केले. त्यांचे ते थोडेसे बोलणे खरोखरच विद्यार्थ्यांना प्रोत्साहन पर मार्गदर्शन, प्रेरणा देणारे होते.

कार्यक्रमाची सांगता आभार प्रदर्शनाने झाली. त्यानंतर महिलांसाठी हळदीकुंकूचा समारंभ होता. नंतर सर्वांनी महाप्रसादाचा लाभ घेतला. अशाप्रकारे संस्थेचा २५ वा वर्धापन दिन आणि विद्यार्थी गुणगौरव समारंभ पार पडला.

***

''अध्यात्म हा भारतीय संस्कृतीचा मूलाधार!'' - पंडित वसंत गाडगीळ

विलास कुंभार लिखित आध्यात्म दर्पण काव्यसंग्रहाचे प्रकाशन संपन्न

- प्रदीप गांधलीकर



''अध्यात्म हा भारतीय संस्कृतीचा मूलाधार आहे!'' असे विचार ज्येष्ठ संस्कृतपंडित वसंत गाडगीळ यांनी माधवराव पटवर्धन सभागृह, महाराष्ट्र साहित्य परिषद, टिळक रस्ता, पुणे येथे व्यक्त केले. रविवार, दिनांक ०७ जानेवारी २०२४ रोजी ज्येष्ठ कवी विलास कुंभार लिखित 'अध्यात्म दर्पण' या कवितासंग्रहाचे प्रकाशन करताना वसंत गाडगीळ बोलत होते. याप्रसंगी आळंदी येथील श्री ज्ञानेश्वर महाराज संस्थानचे माजी विश्वस्त डॉ. अजित कुलकर्णी, लिज्जत पापडचे मुख्य कार्यकारी अधिकारी सुरेश कोते, सनदी लेखापाल प्रा. डॉ. अशोककुमार पगारिया, ॲड. प्रमोद आडकर, ह.भ.प. अशोक महाराज गोरे, ज्येष्ठ साहित्यिक नारायण कुंभार, प्रकाशक सुनील उंब्रजकर आणि कवी विलास कुंभार यांची व्यासपीठावर; तसेच साहित्यिक, सांस्कृतिक, सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील अनेक मान्यवरांची सभागृहात उपस्थिती होती.

अस्खलित संस्कृतमधून आपले विचार मांडताना ९४ वर्षीय ज्येष्ठ संस्कृतपंडित वसंत गाडगीळ पुढे म्हणाले की, ''विलास कुंभार यांचा अध्यात्माचा व्यासंग असल्याने त्यांच्या कवितांमध्ये वैचारिक प्रगल्भता आढळून येते!'' डॉ. अजित कुलकर्णी यांनी अध्यात्मातील लौकिक दर्शनाचे विविध दाखले देत 'अध्यात्म दर्पण' या संग्रहातील कवितांमधून प्रपंच आणि परमार्थ यांचा सुरेख समतोल साधला आहे, असे मत मांडले. कवी विलास कुंभार यांनी आपल्या मनोगतातून कवितालेखनाची प्रक्रिया मांडताना कुटुंबीय, आप्तेष्ट, मित्रपरिवार आणि समाजाप्रती कृतज्ञता व्यक्त केली.

सरस्वतीपूजन तसेच अथर्व बोत्रे यांनी बासरीवादनातून देस, हंसध्वनी या रागांच्या केलेल्या सुरेल सादरीकरणाने कार्यक्रमाचा प्रारंभ करण्यात आला. सुनील उंब्रजकर यांनी प्रास्ताविक केले. ज्येष्ठ कवयित्री शोभा जोशी आणि तानाजी एकोंडे यांचीही कार्यक्रमाला विशेष उपस्थिती होती. अमोल कुंभार, पंढरीनाथ कुंभार, सुहास सरवडेकर, मुरलीधर दळवी यांनी संयोजनात सहकार्य केले.

प्रदीप गांधलीकर यांनी सूत्रसंचालन केले. नारायण कुंभार यांनी आभार मानले. अशोक गोरे यांनी म्हटलेल्या पसायदानाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

***

पुणे येथे कोकणस्थ विकास संस्थे तर्फे गुणगौरव समारंभ संपन्न



मान्यवर पाहुण्यांचा सत्कार करताना ज्येष्ठ नेते चंद्रकांत चिवेलकर



अरुण पालशेतकर यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान

पुणे : कोकणस्थ कुंभार समाज विकास संस्था पुणे यांनी १५ ऑगस्ट २०२४ रोजी समाजाचा महासोहळा ऑफलाईन व ऑनलाईन फेसबुकच्या माध्यमातून दिमाखात आयोजन केले. संस्थेचे सन्माननीय अध्यक्ष कोकणरत्न चंद्रकांतजी चिवेलकर (साळवी) यांच्या प्रेरणेने समस्त समाज बांधव मोठया संख्येने एकत्रित झाले होते.

या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान ॲड. स्वप्नील सूर्यकांत साळवी (चिवेलकर) होते तर कार्यक्रमाची प्रमुख उपस्थिती मा. महापौर आदरणीय मुरलीधर मोहोळ व आदी मान्यवरांनी भूषविले. दुपारी ४.०० वाजता सुरू झालेला हा सोहळा सायंकाळी ९.०० वाजेपर्यंत धुमधडाक्यात साजरा झाला.

यामधे अनेक मनोरंजनपर कार्यक्रम सादर झाले. इयत्ता १०वी मधे ९५.००% गुण मिळविलेल्या कु. अदिती बबन कुंभार व इयत्ता ११वी मधे ८७.००% गुण मिळविलेल्या कु. आर्या गणेश बिरवाडकर यांचे विषेश गुणवंत विद्यार्थी पुरस्कार प्रदान करून त्यांचे कौतुक केले गेले त्याच बरोबर समाजासाठी मनापासून झटणाऱ्या व आपल्यातील कलागुणांची जनमाणसात विशेष छाप सोडणाऱ्या मान्यवरांना विविध पुरस्काराने सन्मानित केले गेले. यामध्ये सन्माननीय अरूणजी हरीभाऊ पालशेतकर (साळवी) यांना ''समाजभूषण'' पुरस्काराने गौरविण्यात आले. याच बरोबर शिक्षण क्षेत्रात विशेष गुण मिळविणाऱ्या विद्यार्थ्यांना व गृहिणींना गुणवंत विद्यार्थी पुरस्कार, विशेष गुणवंत गृहिणी पुरस्कार रूपाने सन्मानपत्र व स्मृतीचिन्ह देऊन त्यांना गौरवविण्यात आले. समस्त समाज बांधवांचे व निमंत्रितांचे स्वागत व प्रस्तावना सादरीकरण समाजाचे संघटक समाजरत्न संतोष साळवी (चिवेलकर) यांनी केले तर सूत्रसंचालनाची जबाबदारी सौ. जोत्स्नाताई सागर साळवी, कु. प्रगती साळवी, कु. स्वरदा साळवी, कु. आदित्य साळवी, कु. दिव्यांश कळमकर यांनी पार पाडली.

कार्यक्रमाची सुरूवात ऑनलाइन स्वरूपात अमोलजी निवळकर व सोहम गुहागरकर यांच्या अप्रतिम निवेदनाने झाली. कार्यक्रमामध्ये देशभक्तीपर गीत, नृत्य, भक्तीगीत, समूहगीत, बासरी वादन, चित्रपटगीत अशा विविधांगी मेजवानीने रंगतदार झाला.

या सोहळ्याचा आस्वाद अखिल कुंभार बांधवांना घेता यावा यासाठी फेसबुकच्या माध्यमातून 'LIVE' सादरीकरण पाहण्याची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली होती. यासाठी समाजाचे आदरणीय खजिनदार राजेंद्रजी पडवेकर, आदरणीय उपाध्यक्ष समाजरत्न गजानन दादा बागवडे, अशोकजी शिरकर व सूर्यकांतजी चिवेलकर (साळवी), तुकारामजी शिरकर, संतोषभाऊ कळमकर, कु. धनंजय बागावडे, सौ. छाया साळवी, संदीप मटकर (साळवी), सागर विन्हेरकर, साईचंद्र करंजेकर, मदन व्हालकर, अजय वाडकर यांनी विशेष मेहनत घेतली. यांच्यामुळेच सर्वांना घर बसल्या सोहोळ्याचा मनमोकळा आनंद अनुभवता आला. या सोहळ्याच्या माध्यमातून पुणे शहरातील कुंभार समाजाच्या कोहिनुर हिऱ्यांचा प्रकाश संपूर्ण महाराष्ट्रातील कुंभार बांधवांच्या घराघरात पोहोचला आहे. हा सोहळा प्रकाशमान सोहळा झाला आणि सर्वांच्या मनातला अंधकार दूर करून सर्वांच्याच जीवनाला सकारात्मक ऊर्जा व दिशा देणारा ठरला.

श्रवण गुडेकर राज्यस्तरीय शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धेत १७० स्पर्धकांतून अव्वल विजयी



पुण्याचा कु. श्रवण अनिल गुडेकर दि. ३ ते ५ डिसेंबर २०२३ कालावधीत अकोला येथे झालेल्या 'राज्यस्तर शालेय बॉक्सिंग क्रीडा स्पर्धा सन २०२३-२०२४' मध्ये १४ वर्षाखालील ४६ ते ४८ किलो वजनी गटात महाराष्ट्रातील १७० स्पर्धकांतून अव्वल विजयी झाला आहे. त्यामुळे राष्ट्रीय स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धा खेळण्याचा मार्ग त्याला खुला झाला आहे. श्रवण पुणे येथील एस्.एस्. अजमेरा हायस्कूलचा विद्यार्थी असून सध्या इयत्ता आठवीमध्ये शिकत आहे. यापूर्वी जिल्हा स्तरावरील बॉक्सिंग स्पर्धेतही त्याने विजय मिळवला होता. श्रवणचे वडील अनिल गुडेकर पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या सेवेत असून आई सौ. प्राची खाजगी अकौंटस् फर्ममध्ये नोकरीला आहे. श्रवणच्या बॉक्सिंगमधील राज्यस्तरीय स्पर्धेतील विजयाबद्दल हार्दिक अभिनंदन! भविष्यात श्रवण राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धांतही बॉक्सिंग चॅंपीयन बनो या हार्दिक शुभेच्छा!

शरद वाडेकर

दुर्जन मंडळीत बसण्यापेक्षा एकटे बसणे बरे आणि एकटे बसण्यापेक्षा सज्जन मंडळीत बसणे हे त्याहून बरे.

अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या प्रदेश अध्यक्ष पदी ज्ञानेश्वर भागवत कार्याध्यक्ष पदी बळवंतराव व रामदास कुंभार



प्रदेशाध्यक्ष पदी ज्ञानेश्वर भागवत यांची निवड समवेत विश्वनाथ कोळमकर, राजेंद्र सावंदे, संतोष पाषाणकर, रंगनाथ सुर्यवंशी, नंदुशेठ सोनवणे, मोहन जगदाळे, दिपक खरात, शामशेठ राजे, दत्ताभाऊ कुंभार.



महिला प्रदेश कार्याध्यक्षपदी सौ. किर्तीमाला महादेव खटावकर यांची निवड समवेत सौ. व श्री. ज्ञानेश्वर भागवत, संतोष पाषाणकर व मान्यवर



प्रदेश कार्याध्यक्ष पदी बळवंत उर्फ बाळासाहेब कुंभार यांची निवड समवेत ज्ञानेश्वर भागवत, मोहन जगदाळे व इतर



प्रदेश कार्याध्यक्षपदी रामदास कुंभार बीड यांची निवड समवेत ज्ञानेश्वर भागवत, नंदू सोनावणे, रंगनाथ सुर्यवंशी व मान्यवर

शिरुर : अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था महाराष्ट्र राज्य बैठक नुकतीच संत शिरोमणी गोरोबाकाका समाधी स्थळ तेर येथे संपन्न झाली.

या बैठकीत राज्य अध्यक्षपदी ज्ञानेश्वर भागवत तर राज्य संपर्क प्रमुखपदी भगवान श्रीमंदिलकर यांची निवड करण्यात आली. संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या वाड्याच्या वास्तूचा १० वा वर्धापनदिन मोठ्या उत्साहाने अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था यांच्या वतीने साजरा करण्यात आला.

या कार्यक्रमाचे आयोजन सातारा जिल्हा यांच्या वतीने घेण्यात आले होते. या बैठकीचे अध्यक्षस्थान अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे मावळते प्रदेशाध्यक्ष श्याम राजे यांनी भूषविले.

या बैठकीत संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहन जगदाळे, मावळते प्रदेश श्यामशेठ राजे, कोअर कमिटी अध्यक्ष विश्वनाथ कोलमकर, सर्व कोअर कमिटी सदस्य, सोमनाथशेठ सोनवणे, माती कला बोर्डाचे राष्ट्रीय अध्यक्ष दत्ता डाळजकर, उपाध्यक्ष किसन काळे, व्यंकट गोरगिले, प्रकाश कुंभार, राजेंद्र सावंदे, यांच्यासह सर्व सदस्य, पदाधिकारी उपस्थित होते.

यावेळी नवीन पदाधिकारी यांची निवड करण्यात आली. सर्व पदाधिकारी यांना संस्थेचे मावळते प्रदेशाध्यक्ष श्याम शेठ राजे, कोअर कमिटी अध्यक्ष विश्वनाथ कोलमकर, संस्थापक अध्यक्ष मोहन जगदाळे, नूतन अध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत यांच्या हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले. सर्व नूतन पदाधिकारी यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.

अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था महाराष्ट्र राज्य नूतन कार्यकारणी :

मा. ज्ञानेश्वर भागवत प्रदेशाध्यक्ष महाराष्ट्र राज्य, मा. व्यंकटराव गोरगिळ प्रदेश युवक अध्यक्ष, मा. भगवान श्रीमंदिलकर राज्य संपर्क प्रमुख, मा. बळवंतराव कुंभार कार्याध्यक्ष, मा. रामदास कुंभार कार्याध्यक्ष, नथु पिरगुंटकर खजिनदार, मा. सुरेश कुंभार सचिव, मा. रेवनकुळे श्रावण कुंभार प्रदेश उपाध्यक्ष, मा. कृष्णा सोनवणे प्रदेशाध्यक्ष विट भट्टी आघाडी, सौ. किर्तिमाला महादेव खटावकर प्रदेशाध्यक्ष महिला आघाडी, मा. नंदू मामा सोनवणे नाशिक जिल्हा अध्यक्ष, मा. लक्ष्मण राम कुंभार पुणे जिल्हा अध्यक्ष.

***

श्री संत शिरोमणी गोरोबा काका कुंभार यांच्या वाड्याच्या जिर्णोद्धाराचा वर्धापन दिन सोहळा मोठ्या उत्साहात श्री क्षेत्र तेर धाराशिव येथे साजरा करण्यात आला



गोरोबा काकांच्या वाड्यामध्ये भजन किर्तन करताना वारकरी



सुंदर आकर्षक रांगोळीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले

दि. १० जून २०२४ रोजी श्री क्षेत्र तेर धाराशिव येथे राष्ट्र संत, संत श्रेष्ठ, श्री संत शिरोमणी गोरोबा काका कुंभार यांच्या वाड्याचा व समाधी स्थळाचा वर्धापनदिन सोहळा मोठ्या उत्साहात अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या वतीने व सातारा जिल्ह्याच्या सहकार्याने साजरा करण्यात आला. सकाळी ११.०० वा गोरोबा महाराज यांच्या घरात भगवंत विठ्ठलाच्या नामस्मरणाने दंग होऊन ह.भ.प. घंटे महाराज रा. म्हाडज ता. उमरगा यांनी टाळकरी, विणेकरी व मृदुंगधारी यांच्या सहवासात भजनाचा कार्यक्रम आनंदात करण्यात आला. त्यानंतर वाड्याचे व स्वयंभू मूर्ती विठ्ठलाचे पुजन व आरती करण्यात आली. व पुढील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी ह.भ.प. दिपक महाराज खरात यांनी वाड्याबद्दल व श्री संत शिरोमणी गोरोबाकाका यांच्या जिवन प्रवासा बद्दल प्रवचन केले. ज्या वाड्यात प्रत्यक्ष भगवान पांडुरंग व रखुमाई आले होते तसेच सर्व संत आले होते त्या वाड्याचा १० जून हा वर्धापनदिन उत्साहात साजरा करावा व उटिच्या वारीला यावं असे संबोधले.

त्यानंतर कार्यक्रमाचे अध्यक्ष श्याम शेठ राजे यांनी अध्यक्षीय भाषण केले. व कोअर कमिटी अध्यक्ष कोलमकर साहेब व दत्ताभाऊ कुंभार यांनी मनोगत व्यक्त केले.

सुत्रसंचलन प्रकाश कुंभार सर यांनी केले व आभार प्रदर्शन राजेंद्र सावंदे यांनी केले व पुढिल नियोजन करण्यात आले. वाड्यासमोर महिलांनी भव्यदिव्य रांगोळी काढली व ह.भ.प. घंटे महाराज व उपस्थित सर्व बंधु भगिनीं यांनी वाड्या पासुन ते समाधीस्थळा पर्यंत भजनाचा आनंद घेत मिरवणूक काढण्यात आली. व समाधीस्थळ येथे अभिषेक करुन भजनाने समाधीस्थळ दुमदुमून टाकले.

कार्यक्रमाचा शेवट महाप्रसादाने झाला. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अखिल भारतीय कुंभार समाज महासंघाचे उपाध्यक्ष नागनाथ अण्णा कुंभार, संस्थापक अध्यक्ष मोहनराव जगदाळे, महादेव खटावकर, माजी प्रदेशाध्यक्ष श्याम शेठ राजे, अखिल भारतीय मातीकला विकास सेलचे अध्यक्ष दत्ताभाऊ कुंभार, नवनिर्वाचित अध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत, बळवंतराव कुंभार, सोमनाथ शेठ सोनवणे, कोलमकर साहेब व महाराष्ट्र राज्यातील अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे सर्व पदाधिकारी, नवनिर्वाचित महिला प्रदेशाध्यक्ष सौ. किर्तिकाताई खटावकर व महिला माता भगिनी व सर्व कुंभार समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पुढील १० जून २०२५ हा वर्धापनदिन सोहळा अकोला जिल्ह्यातर्फे व १० जून २०२६ लातुर जिल्ह्याच्या वतीने साजरा करण्यात येणार आहे. अशी सुचना अकोला व लातुर जिल्ह्याच्या वतीने करण्यात आली. तरी सर्वांच्या वतीने अकोला व लातुर जिल्ह्याचे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा.

मनःपुर्वक आभार :

वर्धापणदिन साजरा करण्यासाठी भजनी मंडळ, मिरवणूकिचे नियोजन नागनाथ अण्णा व सातारा जिल्हा कुंभार समाज बांधव यांनी आयोजन केले होते. त्यांचे सर्व कुंभार समाज बांधव व माता भगिनी यांच्या वतीने आभार व धन्यवाद.

तेर गावी झाला भक्तीचा आनंद.
गोरोबांच्या चिखलावरी नाचे पांडुरंग.

राजेंद्र सावंदे
अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्था पदाधिकारी

***

पैठण येथे शककर्ता शालिवाहन राजा जयंती उत्साहात



पैठण : श्रीक्षेत्र पैठणच्या दक्षिण काशीतील जुन्या कुंभार वाड्यातील गोरोबा काका मंदिरात शककर्ता शालिवाहन राजाची जयंती चैत्र शुद्ध दशमी गुरूवारी (दि.१८) उत्साहात साजरी करण्यात आली.

यावेळी इतिहास संशोधक जयवंत पाटील यांचे 'त्यागचा मुकुटमणी सम्राट शालिवाहन' याविषयावर व्याख्यान झाले. यावेळी ज्ञानेश्वर महाराज कानेगावकर, नागनाथ कुंभार, मोहन जगदाळे, महादेव खतावकर, राहुल पगारे, दिनेश पारीख, सूर्यकांत घोडके, निवृत्ती जाधव, गणेश पंजावले, गणेश रोकडे यांची भाषणे झाली. जुन्या पैठणमधील शालिवाहनाची नगरी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पालथी नगरीमधील वेडी बाभळीची २८ एकरमधील झाडीझुडपी केंद्र सरकारने तात्काळ काढावी अशी मागणी यावेळी करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी राम पंजावाले, राजू भालेकर, रविंद्र पंजावाले, जालिंदर पंजावाले, प्रमोद पंजावाले, अंबादास रोकडे, लाला रिळे, बबन पंजावाले, अजय पंजावाले, विशाल पंजावाले, बाबासाहेब रोकडे, दिलीप रोकडे, ओंकार पंजावाले आदींनी परिश्रम घेतले.

पसायदानाने कार्यक्रमाचा समारोप झाला. शालिवाहन सम्राटांच्या विजयाचे प्रतिक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या तीर्थ स्तंभ येथील उद्यानातही कार्यक्रम घेण्यात आला.

***

शालिवाहन राजाच्या पराक्रमाची आठवण करून देणारा स्तंभ
पैठणमधून शालिवाहन शके कालगणनेचा प्रारंभ



आजपासून नव्या मराठी नववर्षाचा म्हणजे शालिवाहन शके १९४६ चा प्रारंभ. या मराठी कालगणनेची सुरुवात पैठणमधून (जि. संभाजीनगर) झाली.

आजपासून १९४५ वर्षांपूर्वी दक्षिण भारतात सातवाहन घराण्यातील एका मराठी राजाने स्वतंत्र व सार्वभौम राज्य निर्माण केले. शक-क्षत्रप राजांचा पराभव करून त्यांनी स्वतंत्र राज्याची पहिली गुढी प्रतिष्ठान नगरीत (पैठण) उभारली आणि तेव्हा पासून सातवाहन राजाने शालिवाहन शक नावाने कालगणना सुरू केली.

या वैभवशाली काळाची साक्ष देणारा तीर्थस्तंभ पैठणमध्ये उभा आहे. सन ११०० च्या काळात म्हणजे यादवांच्या काळात हा कोरीव स्तंभ उभारण्यात आला.

- **५० फूट स्तंभाची उंची**
- **तळाशी मातृका मंडळाचे कोरीव काम**
- **शिल्पाची रचना स्वर्ग, नरक व पाताळ अशी ३ टप्प्यांत कोरलेली.**
- **स्तंभाच्या मध्यभागी मृत्युलोक आहे.**
  तेथे मैथुनशिल्पे कोरलेली.
- **मकरमुखाचे अष्टकोनी वर्तुळ व मूर्तीवर कमालीच्या कलाकुसर**
- **वरच्या भागात - श्रीदेवी, भूदेवी, गणेश**
- **सप्तमातृकांच्या दुर्मिळ शैलीतील मूर्ती**

***

७/१२ शब्दाचा उगम

साधारणपणे घराचा अथवा जागेचा व्यवहार करताना 'सात बाराचा उतारा' आणावा लागतो. हे बहुश्रूत आहे. 'सात बारा' हे कुठल्याही कायद्याचे कलम नव्हे. ते अहिल्याबाई होळकरांनी दिलेले योगदान आहे. त्यांनी सरकारी खर्चाने गरीब माणसाच्या दारात १२ फळझाडे लावली. त्यातील सात झाडे त्या गरीबाची आणि पाच झाडे सरकारची. बारा झाडांची निगा राखून, सात झाडांची फळे स्वत:ला घ्यायची आणि राहिलेल्या पाच झाडांची फळे सरकारी जमा करावयाची याला ७/१२ असे म्हणू लागले. गरीबांना फळे मिळण्यासाठी एक दफ्तर निर्माण करून या झाडांची नोंद करण्यात आली. या नोंदीच्या उताऱ्याला 'सात-बाराचा उतारा' म्हणण्याचा प्रघात पडला. तो आजतागायत चालू आहे. धन्य ती महाराणी... धन्य तिची दूरदृष्टी...!!

सुलेखन : बाळ माने

नेहरूनगर पिंपरी येथे विदयार्थी गुणगौरव समारंभ संपन्न



कार्यकम्रास उपस्थित मान्यवर



गुणवंत विद्यार्थांसोबत मान्यवर व संस्थेचे पदाधिकारी

पुणे : कोकण खेड कुंभाड गावातील पिंपरी चिचंवड स्थित संत शिरोमणी गोरोबाकाका समाज सेवा संस्था आयोजित ''विद्यार्थी गुणगौरव सोहळा'' दि. १५ ऑगस्ट २०२४ रोजी संत गोरोबाकाका मंदिर नेहरुनगर पिंपरी चिंचवड येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. कार्यक्रमाची सुरुवात संध्याकाळी ४:३० वाजता करण्यात आली. कार्यक्रमाचे अध्यक्षपद सुभेदार सखाराम परबते साहेब यांनी भूषवले. याप्रसंगी मान्यवरांसह समाजातील आदरणीय ज्येष्ठ व्यक्तिमत्वांचा सन्मानाने सत्कार करण्यात आला. समाजगौरव काशीराम साळवी, विष्णू परबते, वामन परबते, केशव चिपळूणकर, शांताराम साळवी, मा. श्री. मधुकरजी सूर्यवंशी सर वरिष्ठ अधिकारी टाटा मोटर्स पुणे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. तसेच अनिल नरवणकर, प्रभाकर गुडेकर यांनी आपल्या प्रभावी सूत्रसंचालनाने कार्यक्रमाची शोभा अधिक वाढवली.

विद्यार्थ्यांना प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने आयोजित या कार्यक्रमात सर्व समुदायाच्या उपस्थितीत विद्यार्थ्यांचा गौरव करण्यात आला. नर्सरी ते दहावी–बारावी तसेच पदवीधर विद्यार्थ्यांनी आपले शैक्षणिक प्रमाणपत्र सादर करून त्यांची उज्वल कामगिरी साजरी करण्यात आली. केवळ गुणवंत विद्यार्थ्यांचेच नव्हे तर ज्या विद्यार्थ्यांनी मध्यम श्रेणी प्राप्त केली होती त्यांनाही प्रोत्साहनपर सन्मान देण्यात आला.

कार्यक्रमाच्या शेवटी प्रमुख पाहुणे सूर्यवंशी सर यांनी करिअर मार्गदर्शनाचा एक अतिशय प्रेरणादायक आणि माहितीपूर्ण सत्र घेतले. त्यांनी विद्यार्थ्यांना आणि पालकांना शिक्षणाचे महत्त्व, आधुनिक औद्योगिक शाखा आणि भविष्यातील करिअरच्या संधींबद्दल मार्गदर्शन केले. त्यांनी आपल्या जीवनातील कठीण प्रसंग कसे पार केले आणि मागासवर्गीय समाजातून वर येत कशाप्रकारे आपले स्थान निर्माण केले, याबद्दलही अनुभव कथन केले. त्यांच्या मार्गदर्शनामुळे विद्यार्थ्यांना पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी योग्य दिशा मिळाली.

कार्यक्रमाची सांगता आदरणीय वडीलधाऱ्यांच्या शुभेच्छा आणि समाजातील सर्व सदस्यांच्या एकत्रित अभिनंदनाने झाली. हा कार्यक्रम कुंभार समाजातील एकता, परस्पर सहकार्य आणि भविष्यातील प्रगतीच्या दिशेने घेतलेली महत्वाची पावले दर्शवणारा ठरला.संपूर्ण कार्यकारणी विश्वस्त मंडळी, संस्था अध्यक्ष तुकाराम परबते यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन अत्यंत सुंदर पध्दतीने यशस्वी केले. प्रत्येकाने आपल्या जबाबदाऱ्या पार पाडल्या आणि संपूर्ण कार्यक्रम उत्साहात संपन्न झाला.

कै. वसंत विष्णू उकिर्डे यांचे प्रथम वर्ष श्राद्ध



नवी मुंबई : कुंभार समाज उत्कर्ष समिती मुंबई संघटनेचे माजी सचिव जेष्ठ समाजसेवक कै. वसंत विष्णू उकिर्डे यांच्या प्रथम वर्ष श्राद्धानिमित्त प्रतिमा पूजन प्रसंगी उपस्थित उकिर्डे कुटूंबीय.

या निमित्ताने ह.भ.प. शालिनीताई निवृत्ती महाराज देशमुख (इंदुरीकर) यांचे संगीत प्रवचन संपन्न झाले. कै. वसंतराव यांच्या वर्षश्राद्धास निवृत्त आय.ए.एस. अधिकारी डॉ. ए.टी. कुंभार, समृद्धी महामार्गाचे चीफ इंजिनिअर एस. के. सुरवसे, कुंभार समाज सामाजिक संस्थेचे कार्याध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, पारंपारिक आघाडीचे प्रदेशाध्यक्ष प्रकाश भालेराव, कुंभार समा उत्कर्ष समितीचे अध्यक्ष रत्नाकर सोनवणे, सचिव यामाजी श्रीमंदिलकर, नवी मुंबई कुंभार समाजाचे कार्याध्यक्ष संतोष चौलकर, सचिव नितीन कुंभार साबाजकर, कुंभश्री संपादक संजय राजे, सुरेश कुंभार रोपळेकर आणि अनेक मान्यवर उपस्थित होते. समस्त कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे भावपूर्ण आदरांजली.

***

लायन्स क्लब भोजापूर गोल्डच्या अध्यक्षपदी जीवन सोमवंशी



जीवन सोमवंशी यांना अध्यक्षपदाची सुत्रे देताना गिरीष मालपाणी माजी अध्यक्ष समवेत संदीप माहेश्वरी व मान्यवर



कार्यक्रमात आपले मनोगत व्यक्त करताना नवविर्वाचित अध्यक्ष ला. जीवन सोमवंशी



ह.भ.प. सुभाष महाराज गेढे यांना देणगीचा धनादेश सोमवंशी परिवाराच्या हस्ते देण्यात आला.



कुंभश्री संपादक संजय राजे यांनी जीवन सोमवंशी यांचा सपत्नीक सत्कार करताना सोबत सौ. वासंती सोमवंशी, सौ. बीना राजे, चि. वीर राजे, सौ. शीतल, आयुश व श्री. विठ्ठलराव सोमवंशी

पिंपरी (दिनांक : २३ जुलै २०२४) : लायन्स क्लब भोजापूर गोल्डच्या अध्यक्षपदी जीवन सोमवंशी यांची निवड करण्यात आली. ऑटोक्लस्टर सभागृह, चिंचवड येथे गुरुपौर्णिमेनिमित्त रविवार, दिनांक २१ जुलै २०२४ रोजी वेदान्ताचार्य ह.भ.प. सुभाषमहाराज गेठे, निर्माण डेव्हलपर्सचे चेअरमन संदीप माहेश्वरी, मालपाणी उद्योगसमूहाचे डायरेक्टर आणि लायन्सच्या महाराष्ट्र विभागाचे माजी मल्टिपल कौन्सिल चेअरमन गिरीश मालपाणी यांच्या प्रमुख उपस्थितीत जुलै २०२४ ते जून २०२५ या १९व्या सेवावर्षासाठी नूतन कार्यकारिणीने पदभार स्वीकारला. त्यामध्ये जीवन सोमवंशी (अध्यक्ष), मुरलीधर साठे (सचिव), मुकुंद आवटे (कोषाध्यक्ष) यांची निवड करण्यात आली.

याप्रसंगी गिरीश मालपाणी यांनी आपल्या मनोगतातून रामायण आणि महाभारतातील दाखले देत उत्तम नेतृत्वासाठी आवश्यक असलेल्या दहा गुणांची माहिती दिली. सुभाष महाराज गेठे यांनी उत्तम कर्म करून अर्जित केलेले धन योग्य ठिकाणी खर्च करण्यासाठी लायन्स क्लब हे उत्तम माध्यम आहे, असे विचार मांडले; तर संदीप माहेश्वरी यांनी लायन्स क्लबच्या सर्वांगीण सेवाकार्याविषयी गौरवोद्गार काढून संस्थेसोबत काम करण्याची इच्छा व्यक्त केली. माजी अध्यक्ष डॉ. शंकर गायकवाड यांनी आपल्या सेवावर्षातील ९३ सेवा उपक्रमांविषयी चित्रफितीच्या माध्यमातून वैद्यकीय, शैक्षणिक, साहित्यिक, सामाजिक, आध्यात्मिक आणि पर्यावरणविषयक उपक्रमांवर सुमारे वीस लाखांहून अधिक निधी खर्च केल्याचा अहवाल सादर केला. नूतन अध्यक्ष जीवन सोमवंशी यांनी आपल्या सेवावर्षात तन, मन, धन समर्पित करून क्लबच्या सर्व सदस्यांच्या सहयोगातून सेवेचा नवा मानदंड निर्माण करणार असल्याचा निर्धार व्यक्त केला. नवीन अध्यक्ष यांच्या सेवावर्षाची सुरवात खालील सेवाकार्याने पाहुण्यांच्या उपस्थितीत करण्यात आली. त्यामध्ये जिल्हा परिषद शाळा नरकेवाडी, शिरूर येथे विद्यार्थांना बसण्यासाठी संदीप वाळुंज यांच्या देणगीतून रु. २५०००/- चे बेंच भेट दिले. ऊसतोड कामगाराच्या मुलाला लॉ कॉलेज शिक्षणाचा एक वर्षाचा संपूर्ण खर्च डॉ. रोहिदास आणि डॉ. माधुरी आल्हाट यांच्या देणगीतून रु. ६०,०००/- देऊन केला. त्याचप्रमाणे घरकामगार असलेल्या महिलेच्या दहावीला ९६% गुण मिळवलेल्या मुलीला पुढील दोन वर्षे संपूर्ण शिक्षणासाठी लागणारी सर्व रक्कम जीवन सोमवंशी यांनी देण्याचे वचन देऊन सुरवातीचे रु. ३०,०००/- अदा केले; तसेच आळंदीतील वारकरी शिक्षण संस्थेतील विद्यार्थांना वैद्यकीय उपचार करण्यासाठी प्रतिवर्षी क्लब सदस्यांच्या वर्गणीतून रोख रु. १५०००/- ची मदत केली.

शीतल सोमवंशी, जयश्री साठे, सायली संत, तृप्ती शर्मा, डॉ. दीपाली कुलकर्णी, डॉ. माधुरी आल्हाट, किरण आवटे यांनी संयोजनात परिश्रम घेतले. प्रा. दिगंबर ढोकले आणि मुकुंद आवटे यांनी सूत्रसंचालन केले. संदीप वाळुंज यांनी आभार मानले. पसायदानाने कार्यक्रमाची सांगता झाली. कार्यक्रमानंतर सर्वांनी सुंदर सुरुची भोजनाचा लाभ

घेतला.

सौ. शीतल जीवन सोमवंशी यांनी जीवन सोमवंशी यांचा थोडक्यात परिचय करुन दिला.

बिजनेस करीअर जीवन यांनी १० वी मध्ये उत्तम मार्क्स मिळवून सिव्हील इंजीनियर होण्याचे ध्येय पूर्ण करण्यासाठी नामवंत 'Governmennt Politechnic Pune' येथून डिप्लोमा पूर्ण केला. पुढे पुणे युनिर्व्हसिटीमधून बी.ई. सिव्हील ही डिग्री घेतली. त्यानंतर पुण्यातील नामवंत 'निर्माण डेव्हलपर्स' येथे कामाचा अनुभव घेतला. तिथे त्यांना 'संदिप माहेश्वरी' सरांसारखे अनुभवी गुरू मिळाले. स्वत:चा व्यवसाय करण्याची जिद्द आणि माहेश्वरी सरांचे मार्गदर्शन यांच्या जोरावर त्यांनी वयाच्या २४ व्या वर्षी व्यवसायात पदार्पण केले.

आजपर्यंत त्यांनी Architect, Consultant, Contruction आणि Builder Developer अशा विविध जबाबदाऱ्या पार पडल्या आहेत. Industrial, Commercial आणि Residential असे अनेक विविध Project त्यांनी केले आहेत. कोणतीही व्यावसायिक पार्श्वभूमी आणि आर्थिक पाठबळ नसताना आज त्यांनी मिळवलेले यश हे खरच कौतुकास्पद आहे. Business च्या या व्यापात मी Accountant म्हणून मदत करते.

Family : जीवन यांचे वडिल रयत शिक्षण संस्थेतील Retired Professor आहेत. तर आई गृहिणी. आई वडिलांची कडक शिस्त आणि संस्कार यामध्ये ते वाढलेले आहेत. आमच्या कुटुंबाची शैक्षणिक पार्श्वभूमी भक्कम आहे. यांच्या दोन्ही बहिणी डॉक्टर, भाऊ इंजिनिअर आहे. आमचा मुलगा आयुष Manipal University Banglore - B.Tech in CS शिकतो आहे. एकत्र कुटुंब पद्धतीत येणाऱ्या सर्व जबाबदाऱ्या आणि कर्तव्ये ते समर्थपणे पार पाडतात.

Business मध्ये त्यांच्याबरोबर काम करत असल्यामुळे Husband & Boss अशा दोन्ही भूमिकेत मी त्यांना पाहते. He is perfect in both the roles. कोणतेही काम करताना 100% dedication & determination ने करतात. कुटुंबात असो किंवा व्यवसायात दुसऱ्यांना Motivate करणे आणि Confidence देणे त्यांना चांगले जमते. Teamwork करण्याला महत्त्व. ते अतिशय शिस्तप्रिय आहेत. Well organised & sorted. Travelling करणे आणि Cricket त्यांना अतिशय प्रिय आहे.

***

अनुष्का कुंभार हिचा अडथळा शर्यतीत विक्रम. कोईमतूरमध्ये ४०० मीटर ५९.५९ सेकंदात पूर्ण



सातारा : चारशे मीटर अडथळा शर्यतीत ऐतिहासिक कामगिरी करीत सातारा तालुक्या –तील वरणे येथील अनुष्का कुंभार हिने नवा विक्रम स्वत:च्या नावावर स्थापित केला. पूर्वीचा स्पर्धा विक्रम १.०४.०० मोडीत काढीत ५९.८९ सेकंदांत स्पर्धा पूर्ण केली. आंतरराष्ट्रीय खेळाडू धावपटू अनुष्का कुंभार हिने तीन सुवर्ण पदके मिळवत कोईमतूरमध्ये अप्रतिम धावण्याच्या तंत्राचे प्रदर्शन करीत सुवर्ण पदकांची हॅटट्रिक केली आहे. कोईमतूर (तामिळनाडू) येथे ७ ते १० नोव्हेंबर या कालावधीत सुरू असलेल्या ज्युनिअर नॅशनल ॲथलेटिक्स चॅम्पियनशिप स्पर्धेत वरणे येथील आंतरराष्ट्रीय खेळाडू धावपटू अनुष्का दत्तात्रेय कुंभार हिने चारशे मीटर धावणे, चारशे मीटर धावणे अडथळा शर्यत आणि ४ बाय ४०० मीटर रिले यामध्ये आपल्या अप्रतिम धावण्याच्या कौशल्याचे प्रदर्शन करीत तीन सुवर्ण पदके जिंकली. सातारा जिल्ह्याचा आणि आपल्या महाराष्ट्राचा डंका कोईमतूरमध्ये वाजवला आहे. या स्पर्धेत १६ वर्षे वयोगटात सहभागी झालेल्या कऱ्हाडच्या स्वराली कुंडलेने ८० मीटर अडथळा शर्यतीत कांस्य पदक जिंकले. यशाबद्दल तिचे कौतुक केले जात आहे.

नाशिक जिल्ह्यातील कुंभार समाज विट उत्पादक व्यवसायीकांची बैठक संपन्न



एकलहरे येथील २०% राख १०० रुपये टन प्रमाणे मिळावी या केलेल्या पाठपुराव्या संदर्भात निघालेल्या आदेश संदर्भात नाशिक जिल्हा कुंभार समाज विट उत्पादक व्यवसायिक यांची बैठक ''राम सृष्टी गार्डन'' तपोवन नाशिक येथे २६/१२/२३ रोजी आयोजित करण्यात आली होती. प्रसंगी नाशिक जिल्ह्यातून शेकडो वीट उत्पादक व्यावसायिक समाज बांधव उपस्थित होते. या बैठकीत ज्येष्ठ समाज बांधव विट उत्पादक व्यावसायिक यांनी राखेच्या पाठपुराव्या संदर्भात कागदपत्रे जमा करने बाबत मार्गदर्शन केले. यावेळी सर्वांनी एकमताने ठराव करून राखेच्या संदर्भातल्या विषयी नवयुवक कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या पाठीमागे उभे राहण्याचा निर्णय घेण्यात आला. वरील विषयाला अनुसरून लवकरच पुढील दिशा ठरवण्यात येत आहे. सदर बैठकीस जिल्ह्यातून वीट उत्पादक व्यावसायिक समाज बांधव बहुसंख्येने उपस्थित राहून संस्थेवर विश्वास दाखवून मार्गदर्शन केल्याबद्दल सर्वांचे धन्यवाद व आभार. व्यावसायिक अडचणी संदर्भात असेच सहकार्य मार्गदर्शन आपणा सर्वांकडून अपेक्षित आहे. नवयुवक कुंभार समाज विकास संस्था नाशिक.

***

संतोष कुंभार यांना राष्ट्रीय पुरस्कार जाहीर



कोकरूड : डालमिया भारत शुगर अँड इंडस्ट्रीज शुगर युनिट निनाईदेवी कारखान्याचे युनिट हेड संतोष जयकुमार कुंभार यांनी साखर उद्योगात दिलेल्या विशेष योगदानाबद्दल भारतीय शुगर या राष्ट्रीय साखर उद्योगात काम करणाऱ्या संस्थेकडून 'बेस्ट इंडस्ट्री एक्सलन्स ऑफ द इयर' हा राष्ट्रीय पुरस्कार जाहीर करण्यात आला आहे. संपूर्ण भारतामध्ये सहकारी व खासगी असे सुमारे ५३० साखर कारखाने कार्यरत आहेत. त्या सर्वांमधून संतोष कुंभार यांची निवड करण्यात आली आहे. सदरचा पुरस्कार वितरण कार्यक्रम दि. १० फेब्रुवारी रोजी हॉटेल सयाजी, कोल्हापूर येथे संपन्न झाला. संतोष कुंभार हे रसायनशास्त्रातील पदवीधर असून त्यांनी या अगोदर कर्मयोगी इंदापूर, रेणुका शुगर, ओलम शुगर, सिद्धेश्वर साखर कारखाना सोलापूर, बारामती ॲग्रो, पिकॅडल्ली शुगर हरियाणा येथे चांगल्या पद्धतीने काम केले आहे. सध्या ते श्री निनाईदेवी करुंगली आरळा येथील कारखान्याचे युनिट हेड म्हणून काम पाहत आहेत. ऊस उत्पादन वाढीसाठी विविध उपक्रम राबवून ते यशस्वी केले आहेत.

कुंभार समाजाच्या विकासासाठी सर्वांनी एकत्र आले पाहिजे - शिंदे



नांदेड : अखिल भारतीय प्रजापती कुंभकार संघ दिल्ली यांच्या महाराष्ट्र कार्यकारिणीचा मेळावा आळंदी मध्ये पार पडला. दिल्ली कार्यकारणी मधील वरिष्ठ उपाध्यक्ष गंगाधर जोर्वेकर अध्यक्षस्थानी होते. प्रदेशाध्यक्ष गजानन कोलमकर, सचिव बाळासाहेब शिंदे, सुर्यकांत कानुरे यांची यावेळी उपस्थिती होती.

सध्या कुंभार समाजास स्वतःचा माल विकण्यासाठी बाजारपेठ नाही, कुंभार समाज कल्याण विभागामध्ये समाजाच्या लोकांची विविध योजनांसाठी अडवणूक केली जाते. समाजाचा विकास करायचा असेल तर कुंभार समाजाने एकत्र आले पाहिजे असे मत सचिव बाळासाहेब शिंदे यांनी केले. यावेळी अहमदनगर, सातारा, जळगाव, नांदेड, नाशिक, पिंपरी चिंचवड, मुंबई, शेगाव, जालना, पुणे आदी भागातील पदाधिकारी उपस्थितीत होते. या कार्यक्रमाचे सुत्रसंचालन अमोल क्षीरसागर यांनी केले तर आभार सचिव बाळासाहेब शिंदे यांनी मानले.

***

अर्जुन प्रशांत वडवलकरने ११ व्या राष्ट्रीय रोलर स्केटिंग स्पर्धेत पटकावले ब्रॉन्झ पदक..!



खोपोली : आईच्या नात्याने खान्देशचा नातू (गाळण ता. पाचोरा जि. जळगांव) आणि वडिलांच्या नात्याने (कुंभारमाठ ता. जि. सिंधुदुर्ग) कोकणचा नातू असलेल्या आणि आता खडकपाडा कल्याण येथे वास्तव्य असलेल्या ११ वर्षीय चि.अर्जुन प्रशांत वडवलकर ह्याने खोपोली येथे पार पडलेल्या २०२३-२०२४ वर्षीच्या नॅशनल लेव्हल रोलर स्केटिंग स्पर्धेत अनेक राज्याच्या खेळाडूंना मागे टाकत ब्रॉन्झ पदक मिळविले. नॅशनल लेव्हलला मिळालेल्या यशामुळे चि. अर्जुनवर त्याचे शाळेकडून व कल्याणवासियांकडून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. या आधीही चि. अर्जुनने कमी वयात अबेकस मध्ये पदवी प्राप्त केली असून शैक्षणिक व क्रीडा क्षेत्रात अनेक पदके, रोख बक्षीसे, पुरस्कार पटकावले आहेत. शैक्षणिक तथा क्रीडा क्षेत्रात नेत्रदिपक कामगिरी करणाऱ्या चि. अर्जुनचा कुंभार समाजातर्फे यथोचित सत्कार-गौरव व्हावा हीच अपेक्षा..!! आमचा नातू चि. अर्जुन, मुलगी सौ. त्रिवेणी आणि जावई प्रशांत वडवलकर (९३२२८३९१५९) व मोरे-वडवलकर परिवाराचे त्रिवार अभिनंदन व पुढील कारकिर्दीस हार्दिक शुभेच्छा..!

***

ध्रुव जगताप शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत



ध्रुव जगताप



अहमदनगर : राज्य परीक्षा परिषदेच्या वतीने फेब्रुवारी २०२४ मध्ये घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षेत जिल्हा परिषद प्राथमिक शाळा जगदंबा क्लास केडगाव शाळेचा इयत्ता पाचवी मधील विद्यार्थी ध्रुव किरण जगताप याने २१८ गुण मिळवून जिल्ह्याच्या गुणवत्ता यादीत स्थान मिळवले आहे. त्याचबरोबर देवयानी दिनेश येणे, यश महेश गाडे व किरण चंद्रकांत पारधे हे विद्यार्थी शिष्यवृत्तीसाठी पात्र झाले आहेत. या गुणवंत विद्यार्थ्यांना वर्ग शिक्षिका किशोरी भोर, राजेंद्र वाबळे, कानिफनाथ गुंजाळ, अनिलकुमार ढवळे, उपाध्यापक सिमा खाजेकर, सुषमा तरडे, राजेंद्र वाघमारे, बबन कुलट यांचे मार्गदर्शन लाभले. शाळेचे मुख्याध्यापक किसन दुधाडे यांनी मार्गदर्शक शिक्षक व विद्यार्थ्यांचे कौतुक केले.

गुणवंत विद्यार्थ्यांना शाळेत पेढे भरवून सत्कार करण्यात आला. नगर पंचायत समिती यांनी वर्षभर सुरू ठेवलेले ऑनलाइन क्लास आणि शाळेत प्रश्नपत्रिकांचा सरावामुळे विद्यार्थ्यांना यश मिळवता आल्याची भावना वर्ग शिक्षिका किशोरी भोर यांनी व्यक्त केली. या यशाबद्दल गटशिक्षणाधिकारी बाबुराव जाधव, केडगाव बीटच्या विस्ताराधिकारी निर्मला साठे, विषय तज्ञ प्रियवंदा कुलकर्णी, केडगावचे केंद्र प्रमुख बाळासाहेब दळवी यांनी अभिनंदन केले.

कुंभश्रीचे संपादक संजयजी राजे, विनायक राऊत, मोहन जगताप सर यांनी ध्रुव जगताप याचे आभिनंदन केले.

***

विजयरावजी देवडे यांना शिक्षणरत्न पुरस्कार प्रदान, संभाजीनगर मधे सत्कार समारंभाचे आयोजन



श्रीराम तेलंग – छत्रपती संभाजीनगर, महात्मा ज्योतिराव फुले शिक्षक परिषदेच्या वतीने नांदेड शहरात भव्य शिक्षण परिषद व पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते यावेळी स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे संस्थापक अध्यक्ष तथा गंगामाता शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष आदरणीय विजय रावजी देवडे साहेब यांना शिक्षण रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले, महाराष्ट्र राज्याचे माजी मंत्री जयप्रकाश जी दांडेगावकर यांच्या हस्ते हा राज्यस्तरीय शिक्षण रत्न पुरस्कार विजयरावजी देवडे साहेब यांना प्रदान करण्यात आला, विजय रावजी देवडे साहेब यांचे शैक्षणिक क्षेत्रासह सामाजिक क्षेत्रामध्ये ही चांगले काम आहे, मिळालेल्या पुरस्काराबद्दल विविध स्तरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे. स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था छत्रपती संभाजी नगर येथील पदाधिकाऱ्यांच्या वतीने विजयरावजी देवडे साहेब यांचा सत्काराचा कार्यक्रम शनिवार दि. १४/०९/२०२४ रोजी आयोजित केला असल्याची माहिती शिवानंद पसेवार यांनी दिली.

***

तानाजी राजे यांना राज्यस्तरीय समाजरत्न पुरस्कार



अहमदपूर : महात्मा ज्योतीराव फुले शिक्षक परिषद महाराष्ट्र यांच्याद्वारे आयोजित पुरस्कार वितरण सोहळ्यात तानाजी विठ्ठलराव राजे यांना राज्यस्तरीय समाजरत्न नागरी पुरस्कार प्रदान करण्यात आला असून हा पुरस्कार जयप्रकाश दांडेगावकर (माजी सहकार मंत्री) यांच्या हस्ते देण्यात आला.

या सोहळ्यास प्रमुख पाहुणे म्हणून गिरीषभाऊ जाधव, प्रा. डॉ. नागेश कल्याणकर आणि आयोजक जाधव, व्यंकटराव जाधव, वडजे देशमुख यांच्या उपस्थितीत पार पडला. या प्रसंगी विजय देवडे, शिवाजीराव पांगरीकर, शिरुरे, बालाजी घुमनवाड, उपअभियंता सुभाष कांबळे, बालाजी पाटील, अभियंता मुंढे, संतोष बारूळकर, प्राचार्य धनाजी राजे, बाबुराव गोरगिळे, महेश कानगुले, चंद्रकांत गोरगिळे, गुंजरगे, ईश्वर बेंबडे, अशोक कानगुले, डॉ. संतोष राजे, अविनाश तेलंगे, दैवशाला राजे, चंद्रकला राजे, प्रतिभा बारूळकर, शालू कानगुले यांच्यासह नागरिक उपस्थित होते.

टेक मॉडर्न ऑटो इंडस्ट्रीचे उदघाटन संपन्न हस्ते नंदगिरी महाराज



फॅक्टरीच्या उद्घाटनाची फीत कापताना नंदगिरी महाराज समवेत राजेश कुंभार, ओंकार कुंभार, आदित्य कुंभार व मान्यवर



ऑफिसच्या उद्घाटनाची फीत कापताना सावंत साहेब व मान्यवर



कंपनीची भव्य वास्तू



कंपनीचे संचालक राजेश कुंभार व ओंकार कुंभार यांचा सत्कार करून शुभेच्छा देताना डावीकडून निवृत्त आदर्श शिक्षक शेखर शिर्के, कुंभश्री संपादक संजय राजे सत्कार मूर्ती इंजि. ओंकार कुंभार, राजेंद्र कुंभार, नंदगिरी महाराज, इंजि. आदित्य कुंभार व सौ. उर्मिला राजेश कुंभार.





कंपनीमध्ये उभारलेली भव्य अत्याधुनिक मशीनरी

कराड : कराड एम.आय.डी.सी. मधील प्रशस्त जागेमध्ये टेक मॉडर्न ऑटो इंडस्ट्रिज प्रायव्हेट लिमिटेड कंपनीचे उद्घाटन शनेश्वर देवस्थानचे मठाधीपती नंदगिरी महाराज यांच्या हस्ते संपन्न झाले.

यावेळी शुभेच्छा देताना कुंभश्री संपादक संजय राजे म्हणाले की, पाटण येथील राजेश कुंभार यांनी शून्यातून विश्व निर्माण केले. सायकल रिपेयरिंग, पेन्टिंग या छोट्याशा व्यवसायाचे रूपांतर एक नव्हे तर दोन मोठ्या कंपन्यात झाले, हा जणू एक वटवृक्ष तयार झाला आहे असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

राजेश यांची दोन्ही मुले इंजिनियर आहेत. चि. ओंकार याने बी ई (ऑटोमोबाईल) व एमबीए (एच आर व प्रॉडक्शन) शिक्षण घेतले आहे आणि पूर्ण वेळ व्यवसाय पाहत आहे. तर चि. आदित्य यांनी बी टेक (ऑटोमोबाईल) करून मास्टर इन डिझाईन हे उच्च शिक्षण पुणे येथे घेत आहे.

ओंकार व आदित्य यांनी वडिलांच्या मार्गदर्शनामध्ये पुढे या कंपनीची न भूतो तो न भविष्यती अशी प्रगती करावी अशा शुभेच्छा दिल्या.

नंदगिरी महाराज शुभेच्छा देताना म्हणाले की, सचोटीने आणि प्रामाणिकपणे कोणताही उद्योग व्यवसाय केल्यास यश नक्की मिळते. आपल्या उपजीविकेसाठी आपण पैसे कमावत असताना देव, धर्म आणि चांगले कर्म करणे ह्या गोष्टी करणाऱ्या व्यक्ती उद्योग व्यवसाय वा नोकरी सर्वच ठिकाणी यशस्वी होतात.

राजेश यांच्या सायकल रिपेयरिंग व पेंटिंगच्या छोट्या उद्योगा –पासून ते आता दुसऱ्या फॅक्टरीचे उद्घाटन हे माझ्या हस्ते झाले आहे. त्यांच्या प्रगतीचा मी साक्षीदार आहे.

राजेश यांच्या पत्नी सौ. उर्मिला यांचे योगदान खूप महत्वाचे आहे, त्यांनी पती आणि दोन मुलांची अन्नपूर्णा बनून सेवा केली, उभायंतानी मुलांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. कुंभार कुटुंबाचा व्यवसाय मोठा होवो त्याच्या अनेक शाखा होवोत, त्यांची भरभराट होवो अशा शुभेच्छा दिल्या. सेंट्रल बँकेचे व्यवस्थापक सावंत साहेब, जिल्हा उद्योग केंद्राचे अधिकारी साळुंके साहेब यांच्यासह अनेकांनी शुभेच्छा दिल्या. देऊर गावचे वारकरी संप्रदाय यावेळी उपस्थित होता.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन इंजिनियर ओंकार कुंभार यांनी केले. कार्यक्रमामध्ये उपस्थित सर्वांचे आभार निवृत्त आदर्श शिक्षक शेखर शिर्के यांनी मानले. रुचकर भोजनाने कार्यक्रमाची सांगता झाली.

राजेश कुंभार व त्यांच्या परिवाराचे कुंभश्री मित्र परिवार व समस्त कुंभार समाजातर्फे मनःपूर्वक हार्दिक अभिनंदन व शुभेच्छा!

***

'कोटा'तील 'आयआयटीयन्स' सांगलीतील प्रयास अॅकॅडमीमध्ये
३५ लाखाचे पॅकेज डावलून विट्याच्या प्रा. शिरीष कुंभार यांचा जिद्दीचा 'प्रयास'

सांगलीमध्ये सर्वात जास्त सिलेक्शन रेशो प्रयास अकॅडमीचा असून जानेवारीतील जेईई-मुख्य परीक्षेत प्रयास अॅकॅडमीचे विद्यार्थी अव्वल स्थानावर आहेत... त्यांचे पर्सेंटाईल खालीलप्रमाणे...



सांगली : उत्तराखंडमधील आयआयटी रुरकीमधील पदवीनंतर कार्पोरेट उद्योग क्षेत्रातील अनेक संधींना नाकारत थेट सांगलीत क्लास घेण्यासाठी आलेल्या शिरीष कुंभार यांचा प्रवास नव्या पिढीसाठी प्रेरणादायी असाच आहे. काही काळ खासगी क्लास सेंटर्सचे हब असलेल्या राजस्थानमधील कोटामधील प्रसिद्ध अशा क्लासेसमध्ये ते शिकवत होते. मात्र तिथं सांगलीतून आलेल्या मुलांनी त्यांना 'गावाकडं या' अशी घातलेली साद ऐकून तिथले ३५ लाखांचे पॅकेज नाकारून ते सांगलीत आले. वयाच्या तिशीत त्यांनी सांगलीतून आयआयटीयन्स घडवण्याचा संकल्प एका आटणी कामगाराच्या मुलाने केला आहे. खरं तर देशभरातील 'आयआयटीयन्स' चर्चेत येतात ते त्यांना मिळणाऱ्या गलेलठ्ठ पॅकेजमुळे. रुरकी आयआयटीमधून ते २०१५ मध्ये पदवी घेऊन बाहेर पडले. त्यानंतर शिरीष यांनाही अनेक कार्पोरेट संधी चालून आल्या. मात्र शिक्षकच व्हायचं या इराद्याने त्यांनी राजस्थानमधील क्लासेसची पंढरी कोटाकडे धाव घेतली. या प्रवासाबद्दल ते म्हणाले, महाविद्यालयातील 'एनएसएस'त सक्रियतेमुळे शिक्षक व्हायचं स्वप्न पाहिले. पदवीनंतर कोटा गाठले. तिथल्या टॉप दोन क्लासेसमध्ये सलग सहा वर्षे अध्यापन केले. तिथे दरवर्षी ३५ लाखांपर्यंतची पॅकेज मिळाली. तेथे देशभरातून दरवर्षी दोन लाखांवर विद्यार्थी जेईई व नीट परीक्षांच्या तयारीसाठी यायचे त्यातून तिथले अर्थकारण लक्षात यावे. तिथल्या क्लासेसच्या गर्दीत सांगली जिल्ह्यातून आलेल्या काही



प्रा. नारायण उंटवाले



प्रा. शिरीष कुंभार

सांगलीमध्ये ३० वर्षाहून अधिक काळ भौतिकशास्त्र विषय शिकवणारे युनिक अॅकॅडमीचे प्रा. नारायण उंटवाले हे प्रयास अॅकॅडमीचे मॅनेजिंग डायरेक्टर आहेत. आयआयटी-रुरकीतून इंजिनिअर झालेले प्रा. शिरिष कुंभार हे संचालक व भौतिक शास्त्र विभागाचे प्रमुख आहेत.

विद्यार्थ्यांनी – पालकांनी तुम्ही सांगलीत का येत नाही अशी विनंती केली. आणि मग तीन वर्षापूर्वी मी सांगलीत यायचा निर्णय केला. खरे तर माझे वडील विटा सोडून आटणी व्यवसायासाठी लहानपणापासून राजस्थानला स्थायिक झालेले. मात्र अलीकडे ते गावी परतले. सध्या वडील जयवंत आणि आई सिंधुताई विट्यामध्येच स्थायिक आहेत. त्यामुळे मी सांगलीत येतोय याचा त्यांना कोण आनंद झाला.'' ते म्हणाले, सांगलीत आल्यानंतर युनीक अॅकॅडमीच्या प्रा. नारायण उंटवाले यांनी त्यांना सहकार्याचा हात दिला. त्यांच्यासोबत त्यांनी 'प्रयास अॅकॅडमी' सुरू केली. महापूर, कोरोना अशा संकटाच्या मालिकेत तीन वर्षापूर्वी सुरू केलेला 'प्रयास' आता आकाराला येत आहे. मला समाजाच्या सर्व स्तरातील मुले क्लासला यावीत असे अपेक्षित आहे. त्यासाठी कोरोनामध्ये आई किंवा पालक गमावलेल्या मुलांना मोफत शिकवण्याचा निर्णय केला. यावर्षीही अशा कुटुंबातील मुलांसाठी ही योजना कार्यरत असेल. सर्व स्तरातील विद्यार्थी येत आहेत. माझ्या या

धडपडीत प्रा. उंटवाले यांच्या प्रेरणेबरोबर एनआयटीमधील मुरारी लववंशी, केमिकल इंजिनिअर मनीष सर, बायॉलॉजीचे रजत सर यांच्यासह सातहून अधिक शिक्षक यांचाही सहभाग आहे. प्रा. उंटवाले सरांना अध्यापन क्षेत्रात गेल्या ३० वर्षांपासून मार्गदर्शनाचा अनुभव आहे. कोटामध्ये असतानाही माझे अनेक विद्यार्थी जेईई ॲडव्हान्समध्ये व नीटमध्येही यशस्वी झाले आहेत. तेच यश मला सांगलीतही मिळवायचे आहे. येत्या कांही वर्षात शिक्षणाची पंढरी सांगली राज्यात लक्षवेधी ठरेल याची मला खात्री वाटते.

खरे तर सध्या इंजिनिअरिंग किंवा मेडिकलकडे जाणाऱ्या विद्यार्थ्यांना त्यांचे विषय सोप्या भाषेत समजावणे अत्यंत आवश्यक आहे. प्रयास ॲकॅडमीने नेमके हेच केले आहे. भौतिकशास्त्र, रसायनशास्त्र, जीवशास्त्र व गणितातील किचकट संकल्पना सोप्या भाषेत शिकवून त्या लवकरात लवकर कशा सोडवायच्या याच्या क्लृप्त्या शिकवल्या जातात. सुधारित आणि अद्यावत तंत्रज्ञान वापरुन विद्यार्थ्यांना विषयाची काठिण्यपातळी सहजपणे समजावून दिली जाते. वस्तुनिष्ठ चाचणी व वर्णनात्मक चाचणी वेळच्या वेळी घेऊन त्यांचे परिणाम विद्यार्थ्यांना लगेच सांगून झालेल्या चुकांबद्दल मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण व विषयाची आवड ओळखून त्यांना मार्गदर्शन केले जाते. विद्यार्थ्याचे दैनंदिन व्यवस्थापन ठरवून दिले जाते. सरावाची नियमितता आणि स्वयंशिस्त ही कोणत्याही मोठ्या यशाची गुरुकिल्ली आहे आणि हीच प्रयास ॲकॅडमीमध्ये दिली जाते.

प्रयास ॲकॅडमीचे सर्वात महत्वाचे वैशिष्ट्य म्हणजे संपूर्ण अभ्यासक्रम आणि गृहपाठ हा ॲकॅडमीमध्येच करुन घेतला जातो. परीक्षेनंतर करिअर मार्गदर्शन शिबिराचेही आयोजन केले जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना त्याचा चांगलाच लाभ होतो. कोटा पॅटर्नचे मार्गदर्शक, प्रशस्त, हवेशीर क्लासरुम, होस्टेल सुविधा, अभ्यासाला पूरक वातावरण आणि विद्यार्थ्याचे लक्ष विचलित होऊ नये यासाठी केले जाणारे खास प्रयत्न करणारी असे या प्रयास ॲकॅडमीचे स्वरुप आहे. प्रयास ॲकॅडमीतील विद्यार्थ्यांनी पहिल्याच प्रयत्नात जेईई मेन्समध्ये उत्तम यश मिळवलेले आहे आणि नीटमध्येही उत्तम यश मिळवतील अशी आशा आहे. येथे IIT-JEE, MHT-CET & NEET, ११वी, १२वी, क्रॅश कोर्स, ९ वी, १०वी साठी फाऊंडेशन कोर्ससाठी प्रवेश सुरु आहेत. अधिक महितीसाठी सांगलीतील धनंजय हाऊसिंग सोसायटी, सिव्हिल हॉस्पिटलच्या दक्षिणेस, मराठा सेवा संघाजवळ, सांगली येथे संपर्क साधावा.

संपर्क – ७०५८०५१८४५, ७०५८०४१८४५, ७५८८६२६९८१

***

सदानंद उर्फ नंदुबाबा कुंभार यांचा अमृतमहोत्सव सोहळा



सोलापूर : माळशिरस येथील संत सावतामाळी कार्यालय येथे सदानंद उर्फ नंदुबाबा यांचा अमृतमहोत्सव दि. २९/१/२४ रोजी सोहळा संपन्न झाला.

या प्रसंगी सार्वजनिक भजन मंडळाचा भजनाचा कार्यक्रम सादर करण्यात आला. नंतर वारकरी भाषाण ह.भ.प. अनिल महाराज पाटील बार्शी यांचे सुश्राव्य कीर्तन संपन्न झाले. तद्नंतर उपस्थित मान्यवरांच्या हस्ते सदानंद कुंभार यांचा अमृतमहोत्सवी सन्मान करून शुभेच्छा देण्यात आल्या. या निमित्ताने सदानंद कुंभार यांचा अल्पपरिचय देत आहोत.

ह.भ.प. सदानंद कुंभार यांचे मूळगाव इस्लामपूर, ता. माळशिरस हे असून ते सध्या माळशिरस येथे वास्तव्यास आहेत. सुवर्णा कुंभार धर्मपत्नी आहेत. आदर्श पती–पत्नी यांनी आपली मुले सुशिक्षित व संस्कारक्षम बनवली. संदीप, सचिन, सतीश अशी तीन मुले. त्यापैकी सचिन आणि सतीश पुणे येथे नोकरी करत आहेत. संदीप कुंभार यांनी इस्लामपूर येथील जिल्हा परिषद शाळेत शिक्षण घेऊन चौथी ते बारावी पर्यंत सदाशिवनगर येथील कर्मवीर बाबासाहेब पाटील विद्यालयात तर मेकॅनिकल इंजिनिअरिंग ही पदवी शिवाजी युनिव्हर्सिटी कोल्हापूर येथे घेऊन त्यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या २०११ मध्ये उत्तीर्ण होऊन उपसंचालक बाष्पक के बॉयलर इन्स्पेक्टर मुंबई येथे कार्यरत झालेले होते. त्यानंतर त्यांनी केंद्रीय लोकसेवा आयोगामध्ये यश संपादक करून ते आता तांत्रिक सल्लागार तथा सचिव केंद्रीय बाष्पक मंडळ नवी दिल्ली येथे कार्यरत आहेत. त्यांना सुविद्य पत्नी शुभांगी उत्कृष्ट गृहिणी असून व्यवसाय करीत आहेत. मुलगी सृष्टी सध्या प्रथम वर्षाला डॉक्टर विखे पाटील कॉलेज, अहमदनगर येथे शिकत आहे. मुलगा सुधांशू दहावीमध्ये शिकत आहे.

पुण्यात बनविलेले ॲल्युमिनियम पार्ट्स थेट सातासमुद्रापार

पुणे : जगभरात सध्या ॲल्युमिनियम पार्ट्सला मोठी माग आहे. पुण्यातही अनेक कंपन्या ॲल्युमिनियम पार्ट्स बनवत आहेत. मात्र, पुण्यातील एका व्यावसायिकाने या क्षेत्रात भरीव कामगिरी करत सातासमुद्रापार भारताचा झेंडा रोवला आहे. या कंपनीत तयार झालेल्या जवळपास ८० टक्के ॲल्युमिनियम पार्ट्सला परदेशात मागणी आहे.

आपल्या या प्रवासाबद्दल बोलताना भागवत म्हणाले की, ''उत्पादन क्षेत्रात आज भरपूर वाव आहे. आम्ही किंमत आणि गुणवत्तेच्या बाबतीत चीनसारख्या देशांशी स्पर्धा करत आहोत.'' अमेरिका, जर्मनी, इटली, ऑस्ट्रेलिया यासारख्या प्रगत देशांत आमचे ग्राहक आहेत. आम्ही अमेरिकेत लवकरच एक गोदाम आणि कार्यालय सुरू करणार आहोत. आम्ही दुचाकी वाहनांमध्ये वापरल्या जाणाऱ्या अलॉय चाकांचे मोठ्या प्रमाणात काम करतो. कास्टिंगही तयार करतो. दर महिन्याला १५ ते २० हजार अलॉय व्हील आम्ही तयार करतो आणि ही संख्या अनेक पटींनी वाढविण्याचा आमचा निर्धार आहे. 'परकीय चलन मिळवा आणि परकीय चलन वाचवा' हे आमचे ब्रीद आहे. आम्ही योग्य गुणवत्ता आणि प्रमाण प्रदान करतो आणि योग्यवेळी पुरवठा पूर्ण करतो. ज्याने व्यावसायिक संबंध वृद्धिंगत होण्यास बळ मिळते.'

'मेक इन इंडिया'च्या माध्यमातून घेतली गरुडझेप



नितीन भागवत यांनी २००५ मध्ये 'नोबल कास्ट अँड कॉम्पोनंट्स' या नावाने कंपनीची स्थापना केली. भागवत यांच्या दूरदृष्टी कोनामुळे अल्पावधीतच या कंपनीने आपले वेगळे स्थान निर्माण केले. कंपनी 'बुअरी डाई कास्टिंग' या प्रक्रियेद्वारे ऑटोमोबाइल, इले-क्ट्रिकल उद्योग आणि अभियांत्रिकी सारख्या क्षेत्रांमध्ये मोठ्या प्रमाणात ॲल्युमिनियम पार्ट्सचा पुरवठा करते. जगभरातील अनेक मोठ्या उद्योगांशी भागवत यांनी व्यावसायिक नाते जोडले आहे. अलीकडेच एका अमेरिकन कंपनीने त्यांच्या संस्थेला १० दशलक्ष डॉलर्सचे कंत्राट दिले आहे.

डी. डी. कुंभार यांच्या जहांगीर कला दालन मुंबईतील प्रदर्शनास उस्फूर्त प्रतिसाद





धाराशिव : जिल्ह्यातील तुळजापूर खुर्द येथील चित्रकार दिग्विजय दत्तात्रय कुंभार यांचे प्राथमिक शिक्षण न. प. शाळेत झाले. बालपणापासून चित्र कलेची आवड असल्याने वडिलांचा कापड व्यवसाय दुकान असून दिग्विजयचा चित्रकलेच्या क्षेत्रात आवड ओळखून त्यांनी त्यास प्रेरित करून चित्रकलेचे उच्च शिक्षणासाठी रहेजा आर्ट कॉलेज, सर. जे. जे. स्कूल ऑफ आर्ट मुंबई येथे पाठविले. दिग्विजयने चिकाटीने शिक्षण घेऊन आपली वेगळी चित्र शैली निर्माण केली. ''पद्म या चित्रमालिकेचे आर्ट गॅलरी मुंबई येथे दि. ४ डिसेंबर ते १० डिसेंबर या कालावधीमध्ये चित्र प्रदर्शन होत आहे. हे सर्व चित्रमानवी भावनाशी सांगड घालणाऱ्या कमळ या विषयावरील असून हे सकारात्मकतेचे प्रतिक आहे. सभोवतालची परिस्थिती कशीही असली तरीही कमळ स्वतःचे पावित्र्य सकारात्मकता, शुभ्रता टिकवून ठेवते. ''पद्म'' या चित्र मालिकेमध्ये यावर भाष्य करण्याचा प्रयत्न दिवस रात्रीचे बदलते प्रहर विविध रंग छटा चित्रकारांनी यात दर्शवले आहेत. मानवी जगण्यातल्या विविध भाव-भावनांमध्ये हे श्वेत कमळ आपली उर्जा ढळू देत नाही. जीवनाशी सांगड घालून जगण्यातील सकारात्मकता अधोरेखित केली आहे. सदर पद्म चित्र मालिका प्रदर्शन कला क्षेत्रात प्रोत्साहित करणारे वडील स्व. दत्तात्रय (अप्पा) कुंभार यांना समर्पित केले असून आतापर्यंत व भारत व परदेशी चित्र संकलन आहे. जहागीर आर्ट गॅलरी मध्ये दुसरे प्रदर्शन असून काही संग्रहालयात डी.डी. कुंभारचे चित्रे लावली गेली आहेत. अश्या मराठवाड्यातील धाराशिव तुळजापूरचा कलावारसाचे प्रतिनिधित्व करणाऱ्या गुणी चित्रकारांच्या चित्र प्रदर्शनास प्रचंड प्रतिसाद मिळत असून अनेक चित्र-शिल्पकला, प्रशासकीय, कला रसिक, राजकीय, क्षेत्रातील मान्यवर संस्कार भारती राष्ट्रीय अध्यक्ष चित्रकार वासुदेव कामत, मुंबईचे प्रसिद्ध शिल्पकार चंद्रजीत यादव, ललीत कला अकादमी दिल्ली अध्यक्ष डॉ. उत्तम पाचारण, चित्रकार अनिल नाईक, मोग्गलान श्रावस्ती, राजेश पाटील कलाध्यापक संघ तथा संस्कार भारतीचे शेषनाथ वाघ, भाजपा प्रदेशकार्यकारिणी सदस्य गुलचंद व्यवहारे, उमाकांत मिटकरी, दालन व्यवस्थापक गौरी वाघमारे प्रदर्शनास भेट देऊन शुभेच्छा दिल्या. पद्म प्रदर्शन पाहण्यासाठी विद्यार्थी कलारसिकांनी प्रचंड गर्दी केली आहे.

माजी प्र-कुलगुरु माहुलीकर यांना एसीटीतर्फे जीवनगौरव पुरस्कार



डॉ. प्रमोद माहुलीकर यांना जीवन गौरव पुरस्कार मान्यवरांचे हस्ते प्रदान

धुळे : कवयित्री बहिणाबाई चौधरी उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव अंतर्गत असोसिएशन ऑफ केमिस्ट्री टीचर्स एसीटीच्या पाचवा वार्षिक समारंभ नुकताच जैन हिल्स, शिरसोली रोड जळगाव येथे आयोजित करण्यात आला. याप्रसंगी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. व्ही. एल. माहेश्वरी व प्र–कुलगुरू प्रा. डॉ. एस. टी. इंगळे यांच्या प्रमुख उपस्थितीत विद्यापीठाचे प्रथम प्र–कुलगुरु प्रा.डॉ.पी.पी. माहुलीकर यांना केमिस्ट्री असोसिएशन मार्फत दिला जाणारा जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. यावेळी विज्ञान व तंत्रज्ञान विभागाचे अधिष्ठाता व एसीटीचे अध्यक्ष प्राचार्य डॉ. एस. एस. राजपूत, रसायनशास्त्र अभ्यास मंडळ अध्यक्ष तथा एसीटीचे सचिव प्रा.डॉ. गुणवंत सोनवणे, शहादा महाविद्यालयाचे प्राचार्य प्रा. डॉ. एम. के. पटेल, माजी प्राचार्य डॉ. एस. एन. पटेल व एसीटीचे सभासद उपस्थित होते. कुलगुरू प्रा. डॉ. माहेश्वरी सर यांनी आपल्या खास शैलीत केमिस्ट्री असोसिएशन ऑफ टीचर्सचे कौतुक केले. तसेच प्रा. डॉ. माहुलीकर यांच्या जीवनगौरव पुरस्कार दिला याबद्दल सुद्धा कौतुक केले. विद्यापिठाच्या विकासात प्रा. माहुलीकर यांनी दिलेल्या महत्वपूर्ण योगदानाबद्दल अभिनंदन केले. उन्हाळी परिक्षेत सर्व रसायनशास्त्र विभागाच्या प्राध्यापकांनी पूर्ण केले त्याबद्दल डॉ. गुणवंत सोनवणे व प्राध्यापक यांचे कौतुक केले.

पुरस्कारास उत्तर देताना डॉ. माहुलीकर यांनी केमिस्ट्री टिचर्स असोशियनचे आभार मानले व विद्यापीठात १९९४ पासून ते २०२४ पर्यंत विद्यापीठ निर्मितीचे अनुभव सांगितले. विद्यापीठाच्या उभारणीचे आम्ही साक्षीदार आहोत. ते म्हणाले, प्रथम कुलगुरु प्रा. ठाकरे सर यांना ठरविले असते तर विद्यापीठ निर्मितीबद्दल नोबेल प्राईज दिले गेले असते. नोकरी एक समाज निर्माण करण्याची संधी आहे, असे समजून आपले कार्य करावे. सदर कार्यक्रमात प्रा. डॉ. भूषण चौधरी यांनी उच्च शिक्षणातील समस्या व उपाय यावर मार्गदर्शन केले तसेच रसायन शास्त्र परिवारातील उल्लेखनीय कामगिरी केलेल्या प्राध्यापक व प्राचार्य यांच्या सन्मान करण्यात आला.

या सत्राचे आभार प्रदर्शन डॉ. भरत पाटील यांनी व्यक्त केले. सूत्रसंचालन प्रा. डॉ. प्रियंका सिसोदे, प्रास्ताविक प्रा. डॉ. गुणवंत सोनवणे तसेच कार्यक्रम यशस्वीतेसाठी प्रा. डॉ. नेमाडे, प्रा. मनोज चौधरी, प्रा. डॉ. दीपक दलाल, प्रा. डॉ. बेंद्रे मॅडम प्रा. डॉ. गीते, प्राचार्य पी. एस. गिरासे, प्राचार्य डॉ. एच. ए. महाजन, माजी प्राचार्य डॉ. एस. एन. पटेल सर व इतर सर्व मान्यवरांनी सहभाग घेतला.

***

आमदार कांदे यांच्या प्रयत्नातून, नांदगाव मतदार संघातील कुंभार समाजासाठी सुमारे १ कोटी रुपयांचा निधी मंजूर



किरण काळे, प्रबंधभूमी न्युज नांदगाव : मतदार संघातील बारा बलुतेदार मध्ये मोडत असलेल्या कुंभार समाजासाठी सुमारे १ कोटी रुपयांचा निधी मंजूर करून आणल्याची माहिती आमदार सुहास कांदे यांनी दिली आहे. या कुंभार समाजाच्या कार्यकर्त्यांनी आमदार कांदे यांना दिलेल्या निवेदनात, समाजातील मूर्तिकार, विटभट्टी, व अन्य कुंभार काम करत असलेल्या स्थानिक कामगारांना अनेक अडचणींना तोंड द्यावे लागत असल्याची माहिती देऊन, वीट भट्टीसाठी ११ महिने बिनशेती परवानगी मिळावी, परप्रांतीय मूर्तिकारांकडून स्थानिक मूर्तिकारांना त्रास सहन करावा लागतो, आठवडे बाजारासाठी ठराविक जागा उपलब्ध करून द्यावी. व शहरात समाज सभामंडप साठी जागा उपलब्ध करून सभामंडप बांधून द्यावा. आदी मागण्या करण्यात आल्या होत्या. त्यावर आमदार कांदे यांनी सभामंडप व अन्य सुविधाकरिता सुमारे एक कोटी रुपये मंजूर केल्याची माहिती यावेळी दिली. समाज बांधवानी याबद्दल समाधान व्यक्त केले.

यावेळी ज्ञानेश्वर भागवत, कृष्णा सोनावणे, नंदू सोनावणे, किरण शिकारे, ज्ञानेश्वर रसाळ, सखाहरी गोरे, निलेश राऊत, बाजीराव मोरे, योगेश बाहीकर, ज्ञानेश्वर बाहीकर, दीपक बाहीकर, प्रशांत भालेराव, बाळासाहेब जाधव, अरुण मोरे, जगदीश रसाळ, विजय जोर्वेकर, नितीन मोरे, सुनील बाहीकर, बाबासाहेब चव्हाण, अमोल बाहीकर, यशवंत चौधुले, आनंद राऊत, नवनाथ मोरे, तुकाराम मोरे, संदीप मोरे, बाळू रोकडे आदी उपस्थित होते.

***

इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्सचे नवीन जागी स्थलांतर
सचिव अभय राजे यांचा खासदार निलेशराव लंके यांच्या हस्ते सत्कार



सचिव अभय राजे यांचा सत्कार करताना खा. निलेश लंके समवेत मान्यवर



नुतन वास्तू समोर उपस्थित पदाधिकारी

अहमदनगर : दि इन्स्टिट्यूशन ऑफ इंजिनिअर्स (इंडिया), अहमदनगर स्थानिक केंद्र दिनांक १५ सप्टेंबर रोजी अभियंता दिनाचे औचित्य साधून नगर–कल्याण रस्त्यावर स्वत:च्या जागेत स्थलांतरित झाले. गेल्या ३७ वर्षांपासून संस्थेचे कामकाज पाटबंधारे विभागातील इमारतीमधून चालत होते. कामकाजाच्या दृष्टीने स्वत:च्या इमारतीची आवश्यकता भासल्याने संस्थेने, संस्थेचे संस्थापक सदस्य कै. कृष्णकांत राजे यांनी नगर–कल्याण रस्त्यावर बक्षीसपत्र करून दिलेल्या ८०० चौ. मी. भूखंडावर, संस्थेचे सभासद व एम आय डी सी तील उद्योजक व इतर दानशूर व्यक्तींच्या देणगीमधून तीन मजली इमारतीचे बांधकाम सुरू करून पहिला मजला पूर्ण केला आहे.

भारत फोर्ज लिमिटेडच्या सहकार्याने संस्था कौशल्य विकास केंद्राची स्थापना करत असून, संस्थेला राज्य शासनातर्फे आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र म्हणून मान्यता मिळाली आहे. नुकतीच भारत फोर्ज लिमिटेडच्या मानव संसाधन उपाध्यक्षा डॉ. लीना देशपांडे यांनी भेट देऊन संस्थेच्या कार्याबद्दल गौरवोद्गार काढले. अभियंत्यांसाठी लवकरच आधुनिक तंत्रज्ञानावर तसेच आर्टिफिशियल इंटेलिजियन्स वर आधारित कौशल्य विकास कोर्सेस सुरू करण्याचा संस्थेचा मानस आहे. या प्रसंगी आयोजित केलेल्या समारंभाला संस्थेचे सभासद व देणगीदार, उद्योजक यांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून शुभेच्छा दिल्या, ज्यात श्नायडर इलेक्ट्रिक इंडियाचे उपाध्यक्ष अरविंद पारगावकर, पाटबंधारे विभागाचे माजी अधीक्षक अभियंता शिवाजी बोलभट, ए. बी. चौधरी, डॉ. सुनील गोरंटीवार, आदिनाथ लवांडे, संदीप डेरे, सुभाष गांधी, दिलीप आढाव, प्रदीपकुमार ब्रम्हा, रविंद्र कवडे, पी. एस. पांडे, प्रमोद पारिख यांचा समावेश आहे. खासदार नीलेश लंके यांनीही सदिच्छा भेट देऊन संस्थेच्या कार्याची माहिती घेतली व सहकार्य करण्याचे आश्वासन दिले. संस्थेचे अध्यक्ष मनोहर अणेकर, मानद सचिव अभय राजे, माजी अध्यक्ष प्रकाश गांधी व अविनाश कुलकर्णी, कार्यकारिणी सदस्य सर्वश्री मधुकर बालटे, भारतभूषण भागवत, राजकुमार मुनोत, हरिश्चंद्र ठिगळे, रामनाथ वायकर, किशोर डोंगरे, दीपक विधाते, डॉ. दादासाहेब करंजुले, अंसार शेख यांनी सर्वांचे स्वागत केले.

हिलाल जगदाळे यांना आदर्श शिक्षक पुरस्कार



नाशिक : नाशिक महानगरपालिका नाशिक यांच्या वतीने दरवर्षी आदर्श शिक्षक पुरस्कार देण्यात येतो. नाशिक महानगरपालिका यांचे वतीने पाथर्डी गाव येथील मनपा शाळेचे आदर्श शिक्षक हिलाल जगदाळे सर यांना प्रदान करण्यात आला. मानाचा आदर्श शिक्षक पुरस्कार जिल्ह्याचे पालकमंत्री तथा कॅबिनेट मंत्री दादाजी भुसे, मनपा आयुक्त करंजकर साहेब, तसेच प्रशासन अधिकारी बी. टी. पाटील साहेब आणि इतर पदाधिकारी यांचे उपस्थिती मध्ये देण्यात आला. हिलाल जगदाळे सर व सौ. सविताताई जगदाळे हे दोघेही आपली नोकरी सांभाळून, कुटुंबातील जबाबदारी सांभाळून, समाजाच्या कार्यक्रमात त्यांची उपस्थिती अग्रभागी असते. सौ. सविताताई उत्कृष्ट निवेदिका असून, अनेक सामाजिक कार्यक्रमात त्यांचा सहभाग असतो. परिसरात तसेच कर्मचारी वर्गात आनंदाचे वातावरण आहेत. भावी वाटचालीसाठी कुंभार समाज सामाजिक संस्था, महाराष्ट्र प्रदेश. नासिक जिल्हा कुंभार विकास समिती, आणि कुंभार समाज उत्कर्ष मंडळ, म्हणजेच कुसुम, यांचे वतीने भरभरून शुभेच्छा देण्यात आल्या.

संत गोरा कुंभार विकास मंडळ चिपळूण ''स्वप्न पूर्तीचा आनंद सोहळा संपन्न''!

शब्दांकन – रविंद्र शिरकर, सोशल मिडिया जिल्हाध्यक्ष



संस्थेची नुतन सुंदर वास्तु



नुतन वास्तुचे उद्घाटन करताना सतिशदादा दरेकर व संस्थेचे पदाधिकारी व मान्यवर पाहुणे



व्यासपिठावर उपस्थित मान्यवर



मार्गदर्शन करताना नेते महेश सायकर



संस्थेच्या वतीने सतिशदादा दरेकर यांचा भव्य सत्कार

संत गोरा कुंभार विकास मंडळ चिपळूण व चिपळूण तालुका कुंभार समाज बांधव यांच्या श्रमदान व आर्थिक मदत यातून उभारलेल्या वास्तूचा उद्घाटन सोहळा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष मा. सतिशदादा दरेकर यांच्या शुभहस्ते मोठ्या थाटामाटात संपन्न झाला. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी अध्यक्ष कुंभार गुरूजी होते.

प्रथमत: संत शिरोमणी गोरोबाकाका व सरस्वती देवी मुर्तीची प्राणप्रतिष्ठा विधिवत करण्यात आली. यानिमित्त गणेश पूजन व श्री सत्यनारायण पूजेचे आयोजन करण्यात आले होते. ''श्री संत गोरोबाकाका सभागृहात सभेचे'' आयोजन करण्यात आले होते.

प्रथमत : संत गोरोबा काका व छत्रपती शिवाजी महाराज यांच्या प्रतिमेस मान्यवरांच्या शुभहस्ते पुष्पहार व दिप प्रज्वलन करण्यात आले. या कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती मा. आ. शेखरजी निकम, प्रदेश अध्यक्ष सतिशदादा दरेकर, माजी आमदार रमेशभाई कदम, वाशिष्ठी डेअरीचे अध्यक्ष प्रशांतजी निकम, सामाजिक कार्यकर्ते जयंत शेठ खताते, खेर्डी सरपंच सौ. अश्विनी पंडित, अबूशेठ ठसाळे, मा. सरपंच दशरथ दाभोळकर, सौ. दिक्षा दाभोळकर, महाराष्ट्र प्रदेश कार्याध्यक्ष महेशदादा सायकर, डॉ. सुरेश काळे, शशिकांत पाभरेकर, योगेश इवलेकर, गजानन पंदिरकर, सुरेश पालकर, प्रदेश कोषाध्यक्ष अनंत कुंभार, उपाध्यक्ष वसंतराव घोडनदीकर, बाळासाहेब कुंभार, अण्णासाहेब कुंभार, कोंकण अध्यक्ष राजेंद्र मंगरुळकर, उपाध्यक्ष संतोष साळवी, प्रकाश फुलगांवकर, पुणे अध्यक्ष तुकाराम परबते, रायगड अध्यक्ष अनंत महाडकर, ठाणे अध्यक्ष भास्कर कल्याणकर, रामदास कुंभार, जिल्हा उपाध्यक्ष सुनिलशेठ साळवी, कार्याध्यक्ष विलास जालगावकर, खजिनदार गणपत जामसूतकर, सह खजिनदार नाना पालकर, खेड तालुकाध्यक्ष अनंत पालकर, माजी सभापती रामदास राणे, असोंड मा. सरपंच दाभोळकर, संगमेश्वर संपर्क प्रमुख निलेश कुंभार. विकास मंडळाचे अध्यक्ष प्रकाशशेठ साळवी यांनी सभागृहाला माहिती दिली. तर संपूर्ण कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हाध्यक्ष सुभाषजी गुडेकर यांनी केले. या कार्यक्रमाला विकास मंडळ उपाध्यक्ष प्रकाश महाराज निवळकर, रविशेठ साळवी, सचिव अमोल पिरदनकर, खजिनदार जनार्दन मालवणकर, सोनू कुंभार, प्रकाश कराडकर, प्रकाश शिरकर, संजय गुडेकर, दिपक साळवी, किशोर साळवी, अनंत गुडेकर, अण्णा गुडेकर, महेंद्र शिरकर गुरुजी, दिपक शिरकर, पतसंस्था चेअरमन तुकाराम बाबा साळवी, व्हा. चेअरमन तुकाराम भाऊ टेरवकर, बबन शेठ पडवेकर, सुनिल निवळकर, तुकाराम शेठ साळवी, सुरेश कोळथरकर, अँड. शशिकांत पिरदनकर, संचालिका सौ. सुमन साळवी, महिला तालुकाध्यक्षा सौ. ऋतुजा शिरकर, सौ. सुजाता गुडेकर, दिपा कोलतेकर, किशोरी साळवी, युवा जिल्हाध्यक्ष महेश पडवेकर, कार्याध्यक्ष पंढरीनाथ माय शेटये व सहकारी, पतसंस्था सर्व समन्वयक, कोंकण युवा आघाडी उपाध्यक्ष प्रदिप शिरकर आदी समाज बांधव उपस्थित होते. पतसंस्था मा. व्हा. चेअरमन सुनिल (नाना) टेरवकर यांच्या आभार प्रदर्शाने सभेची सांगता झाली.

***

मा. खा. सौ. नवनीत राणा यांचे हस्ते 'के.एन. मोरे' ह्यांना समाजगौरव पुरस्कार प्रदान



खा. सौ. नवनीत राणा यांचा सत्कार हस्ते के.एन.मोरे व मान्यवर



समाज गौरव पुरस्कार स्विकारताना सौ. व श्री. के. एन. मोरे व मान्यवर

के.एन. मोरे म्हणजे एक आदर्श व्यक्तीमत्व कुंभार समाजाला प्रेरणा आणि बळ देण्याच काम करत आहे. उर्जा देणारं नेतृत्व म्हणून आज त्याचेकडे पाहत असतात. प्रत्येक कार्यात नेहमी अग्रेसर असतात. एखादी जबाबदारी जर घेतली तर ती पूर्ण केल्याशिवाय स्वस्थ बसत नाही. शांतपणे, नम्रपणे विश्वासात आपुलकीने येईल त्याचे सोबत समाज जोडण्याचे काम सुरु आहे अशा माणसाबद्दल समाजाचे काही देणे असते त्याचे कार्याचा जागर झाला पाहिजे. समाजामध्ये एक–एक माणूस जमा करत त्याला ते समाजाच्या चिंतनाचे शब्द देतात. के.एन. मोरे हे स्वत:च्या प्रयत्नाने फुललेले व्यक्तीमत्व व कर्तृत्व होय. चिखलातून कमळ फुलते तसे त्यांचे 'नेतृत्व फुललेले' आहे. त्यांचे कुटुंबामध्ये कोणत्याही प्रकारचे शैक्षणिक, बौद्धीक आणि सांस्कृतिक पर्यावरण नसताना त्यांनी अपार कष्टाने स्वत:च्या व्यक्तीमत्वाला व कर्तृत्वाला आशय आणि आकार दिलेला आहे म्हणून त्यांचे व्यक्तीमत्व समाजासाठी मान दंडावत आहे. निस्वार्थी, निर्मोही, निश्चयी व ध्येयवादी कार्यकर्त्यात त्यांचे नाव आहे. हसतमुखाने जगावे व वागावे आचरणांत विनम्रता असावी मन संवेदशील असावे आणि जीवनात प्रामाणिकपणाला सर्वाच्च स्थान द्यावे हा त्यांचे स्वभावातील सर्वांनाच मोहीत करणारा असा आहे. त्यांचे स्वभावात चिंतनशीलता, सजृनशीलता, क्रियाशीलता अनुभवाची प्रगल्भता आणि संघटन चातुर्य या मौलिक मुलभूत गुणाचा समावेश आहे. सार्वजनिक जीवनात यशस्वी होण्यासाठी लागणारा जनसंपर्क त्यांचे जवळ आहे. आक्रमक व खंबीर भूमिका घेऊन लढणारं नेतृत्व त्याचे जवळ आहे. त्यांच बहुआयामी व्यक्तीमत्व खरोखर मनाला भावणारे आहे. कुंभार समाजासाठी मोठी किंमत देऊन कुंभार समाजाला मदत करणारा एक साधा कार्यकर्ता म्हणून त्यांचे नाव लौकिक आहे.

उच्चकोटीचे संघटन कौशल्य, सर्वांना मदत करणारा एक चांगला माणूस म्हणून अशी विविध रुपे त्यांचे ठिकाणी दिसून येतील. ती अशी मनाला भावणारी आहेत. कुंभार समाजासाठी केलेले काम निश्चितपणे भरीव व उपयुक्त आहे. मोरे साहेबांनी स्वत:च्या प्रगल्भ अनुभवाचा संघटन कौशल्याचा पुरेपूर वापर करुन कुंभार समाजाचे कार्याला आवर व गती देण्याचे मोलाचे कार्य केले आहे. याची जाणीव समाजाला आहे. कुंभार समाजाला मातीप्रमाणे आकार आणि चाकाप्रमाणे गती देण्याचे काम जीवनभर करत राहणार आहेत.

विदर्भ कुंभार सुधार समिती अमरावतीचे वतीने कुंभार समाज विकाससह इतर क्षेत्रात भरीव आणि सातत्यपूर्ण कामगिरी करणारे समाज बंधू–भगिनींना राज्यस्तरीय समाजगौरव पुरस्कार दिला जातो. सन २०२३ चा समाजगौरव पुरस्कार यवतमाळ जिल्ह्याचे के.एन. मोरे ह्यांना मा. खासदार सौ. नवनीत राणा यांचे हस्ते गुणगौरव समारंभ कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. सुधाकर शेंडोकार विदर्भ कुंभार समाज सुधार समिती अध्यक्ष प्रमुख पाहुणे भाजपा ओबीसी महामोर्चाचे प्रदेशाध्यक्ष संजयजी गाते, विजयकुमार सोनोने, भगवान सुर्यवंशी, बबनराव जगदाळे, तांबटजी, समाजोन्नतीचे अध्यक्ष पंजाबरावजी काकडे, सचिव डॉ. श्रीराम कोल्हे, प्रा. सुरेश नांदुरकर, सचिव सुरेंद्र सरोदे, महिला अध्यक्ष प्रभाताई भागवत यांचे उपस्थितीत देण्यात आला. स्मृतिचिन्ह, सन्मानपत्र असे पुरस्काराचे स्वरूप आहे. के.एन. मोरे यांनी कुंभार समाजासाठी यवतमाळ मधील लोहारा परिसरात गट क्र. ११९ क्षेत्र २ हेक्टर ७५ आर जमिन आणि उत्खननसाठी जिल्हाधिकारी यांचे आदेश दिनांक १६/१०/ २०१८ नुसार मिळवून घेतली.

यवतमाळ जिल्ह्यातील पुसद आणि घाटजी तालुक्यातील मौजे शेलू व वरोडा येथील दोन कुंभार समाजाचे मुलींवर अत्याचार झाला या दोघांनाही शासनाच्या मनोधैर्य योजनेमधून आर्थिक मदत मिळवून दिली. अकोला जिल्हा येथून मा. देवरावजी कापडे साहेब यांचेकडून आलेली मदत ही त्याचे पर्यंत पोहचविली या कामी पुसदचे संतोषजी पेंढारकर व सुनिल पोतगटवार यांनी खूप सहकार्य केले. कुंभार समाजाला मडकी बनविण्यासाठी १० चाके अमरावती येथून आणि २३ विद्युत चाके अकोला येथून मिळवून दिली. यावर्षी २०२३ मध्ये खादीग्रामोद्योग कडून यवतमाळ जिल्ह्यासाठी ४० विद्युत चाके मंजूर झाली असून

प्रशिक्षण लवकरच घेणार आहे. कुंभार समाज बांधवांना तहसीलदार यांचेकडून ओळखपत्र काढून देण्यात आली. घर तिथे गोरोबा काकांचा फोटो हे अभियान राबविण्यात येत आहे. कुंभश्रीचे प्रतिनिधी म्हणून काम करत असताना मुलांना कुंभश्री शिष्यवृत्ती मिळवून दिली. गजानन कोतपेल्लीवार या विद्यार्थ्यांला कुंभश्रीकडून इंजिनिअरींग करणेसाठी बिनव्याजी कुंभश्रीने आर्थिक मदत ७५,०००/– रुपये केली. तो नोकरीला औरंगाबाद येथे लागला तेव्हा त्याने २०२२ मध्ये पूर्ण रक्कम कुंभश्रीला परत केली. कुंभश्रीचे १५०० सभासद घडवून आणले तसेच रेशीमगाठी बांधण्याचे पवित्र काम ही ह्या माध्यमातून करत आहे.

या २०२३ चे दुर्गादेवी आणि गणपती बनविण्यासाठी लालमातीची गरज असते. मा. जिल्हाधिकारी यवतमाळ यांना माती उपलब्ध करुन देण्याची विनंती केली परंतु शासनाकडून मंजूरी आल्याशिवाय माती देता येणार नाही असे आमचे शिष्टमंडळास सांगितले. नकार दिला. त्यानंतर मा. मदनभाऊ येरावत आमदार भाजप यांना भेटून त्यांचे माध्यमातून जिल्हाधिकारी तहसिलदार यांचेशी संपर्क करुन प्रश्न सोडविला आणि २५० टॅक्टर लाल माती कुंभार समाजाला मिळवून दिली. त्यामुळे कुंभार समाजाचा उदरनिर्वाहाचा प्रश्न मिटला. तालुका स्तरावर तयार झालेली वीट विक्रीसाठी नेताना मालवाहू ट्रक अडवून तहसील कार्यालय माहूर येथे (जि. नांदेड) अडविले परंतु शासन परिपत्रक दाखवून ते सोडविण्यात यश आले. श्री संत गोरोबाकाका समाजोन्नती बहुउद्देशीय समिती अमरावती या समितीने के.एन. मोरे यांची उपाध्यक्ष म्हणून नियुक्ती सप्टेंबर २०२० मध्ये केली. तेव्हापासून समितीला १२०० रुपये भरुन घेऊन आजीवन सभासद करण्यात आले. आजपर्यंत समितीला ७०,०००/– रुपये पर्यंत निधी उपलब्ध करुन दिला. ही समिती गरीब हुशार होतकरु मुलांना शिक्षणासाठी मदत करणे हा समितीचा मूळ उद्देश आहे. यवतमाळ जिल्ह्यामध्ये आतापर्यंत जवळजवळ १४ मुलांना शिक्षणाकरिता मदत केली. यामधून तीन मुल नितेश अहिलापूरम युनियन बँकेत, प्रतिक कोलपवार आणि अरविन्द तेलंग या मुलांनी घेतलेली रक्कम परत करायला सुरुवात केली आहे. समाजोन्नतीसाठी तसेच कुंभार समाजाचे कामासाठी झटणारा धडपड करणाचा एक सामान्य व्यक्तीमत्व म्हणून के.एन. मोरे यांचेकडे पाहिले जाते. कुंभश्रीसाठी महिला विशेषकांमध्ये दरवर्षी त्यांचा लेख असतो कारण आदी कामगिरीवर आधारित हा पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार सर्व समाज बांधवांना समर्पित करत आहे.

या कार्यक्रमासाठी ठाणे, नंदुरबार, धुळे, अकोला, यवतमाळ, वाशिम, बुलढाणा आणि नागपूर अशा विविध जिल्ह्यातून कुंभार समाज बांधव यांनी हजेरी लावली. स्वादिष्ट भोजनानंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

नंदुरबार येथे मा. संजयजी गाते साहेब ह्यांचा पंतप्रधान विश्वकर्मा योजना मेळावा संपन्न

नंदुरबार जिल्हा कुंभार संघटनेच्या पदाधिकाऱ्यांनी उपस्थित राहून घेतले मार्गदर्शन...!



नंदुरबार : कुंभार समाजाचे तडफदार वक्ते, महाराष्ट्र राज्य कुंभार समाजाचे माजी अध्यक्ष तथा भाजपा ओबीसी मोर्च्याचे नवनियुक्त राज्य अध्यक्ष माननीय संजयजी गाते साहेब नंदनगरीत पंतप्रधान विश्वकर्मा योजना मार्गदर्शन मेळाव्यासाठी प्रथमच नंदनगतीत आले होते. त्यांचे स्वागत संत शिरोमणी श्री गोरोबाकाका ह्यांची प्रतिमा व भला मोठा पुष्पहार घालून टाळ्यांच्या गजरात नंदुरबार जिल्हा कुंभार समाज संघटना पदाधिकारी ह्यांनी केले.

पंतप्रधान विश्वकर्मा योजना मार्गदर्शन मेळाव्यास, प्रदेश सर चिटणीस इंजि. बबनराव जगदाळे, नंदुरबार जिल्हा कार्याध्यक्ष भगवानभाई वाडीले, जिल्हा युवा अध्यक्ष आर्किटेक्ट दिनेशजी वाडीले, युवा शहरा––ध्यक्ष एकनाथ कुंभार, नंदुरबार तालुका कार्याध्यक्ष शशिकांत पवार, मूर्तिकार आघाडी अध्यक्ष नारायण वाघ, नरेंद्र कुंभार, राजेंद्र कुंभार, विजय कुंभार, नामदेव कुंभार, रोहिदास कुंभार, प्रल्हाद कुंभार, आनंदराव कुंभार, भीमा कुंभार, कृष्णा कुंभार, युवराज कुंभार, चंद्रकांत कुंभार, दिपक कुंभार, महेंद्र कुंभार, अनिल कुंभार, भाईदास कुंभार आदी मंडळीनी उपस्थित राहून कर्ज योजना समजून घेतली.

संजयजी गाते साहेबांच्या पाऊण तासाच्या घणाघाती, आवेशपूर्ण भाषणाने, मुद्देसूद आकडेवारी विश्लेषक मार्गदर्शनाने, बहुसंख्येने उपस्थित भाजपा कार्यकर्ते, ओबीसी मोर्चा पुरुष, महिला पदाधिकाऱ्यांना मंत्रमुग्ध करीत खिळवून ठेवले. कुंभार समाज पदाधिकाऱ्यांनी पूर्णवेळ उपस्थित राहून पंतप्रधान विश्वकर्मा योजना समजून घेतली. केवळ दोन दिवसआधी मेळावा घेण्याचे सांगितले आणि भाजपा कार्यकर्ते, पदाधिकारी सह कुंभार समाज पदाधिकारी ह्यांनी बहुसंख्येने उपस्थित राहून मेळावा यशस्वी केल्याबद्दल संजयजी गाते साहेबांनी आनंद व्यक्त केला. दोन दिवस झालेल्या अवकाळी गारपीट पाऊसामुळे वीट उद्योजकांचे झालेल्या नुकसानीची माहिती संजयजी गाते ह्यांनी भगवानभाई वाडीले व एकनाथभाई कुंभार ह्यांचेकडून घेतली. सामूहिक राष्ट्रगीत गायनाने मेळाव्याचा समारोप झाला. त्यानंतर संजयजी गाते साहेब ह्यांनी धुळ्याकडे मेळावा मार्गदर्शनासाठी प्रयाण केले.

***

प्रा. दिलीप सोनवणे यांची 'देवमाणसं' वाचून वाचकांनी आपल्या जीवनातील देवमाणसं चित्रित करावी - डॉ. अशोकराव सोनवणे



देव माणसं या पुस्तकाचे प्रकाशन डॉ. अशोक सोनावणे व मान्यवरांचे हस्त संपंन्न

श्रीरामपूर : माणसांचं जग माणसांनीच सुखी केलं पाहिजे. त्यासाठी दुसऱ्यातील देवत्व पाहण्याची मानसिकता वाढली पाहिजे. संगमनेर येथील प्रा. दिलीप सुखदेव सोनवणे यांनी शब्दबद्ध केलेली 'देवमाणसं' वाचून सूज्ञ वाचकांनी आपल्या जीवनात भेटलेली देवमाणसं शब्दचित्रित करावी अशी अपेक्षा दै. लोकमंथनचे मुख्य संपादक डॉ. अशोकराव सोनवणे यांनी व्यक्त केली.

श्रीरामपूर येथील आसरा प्रकाशनने प्रकाशित केलेल्या प्रा. दिलीप सोनवणे यांच्या 'देवमाणसं' या पुस्तकाचा प्रकाशन सोहळा केडगाव येथील हॉटेल अर्चना सभागृहात आयोजित करण्यात आला होता, त्याप्रसंगी प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. अशोकराव सोनवणे बोलत होते. अध्यक्षस्थानी श्रीरामपूर येथील ॲड. रावसाहेब शिंदे प्रतिष्ठानचे चेअरमन माजी प्राचार्य टी.ई. शेळके होते. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते दीपप्रज्वलन होऊन श्रीसरस्वतीमाता, श्रीसंत गोरा कुंभार आणि स्व.सुखदेव पांडुरंग सोनवणे यांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. अध्यक्षीय सूचना संकेत सोनवणे यांनी मांडली तर डॉ. प्रताप सोनवणे यांनी अनुमोदन दिले. स्वागत व प्रास्ताविक अरविंद सोनवणे यांनी केले. लेखक प्रा. दिलीप सोनवणे यांनी मान्यवरांचा शाल, बुके, पुस्तके, भेटवस्तू देऊन सत्कार केले. व्यासपीठावर प्राचार्य टी.ई. शेळके, डॉ. अशोकराव सोनवणे, साहित्यिक डॉ. बाबुराव उपाध्ये, आसरा प्रकाशनचे डॉ. शिवाजी काळे, डॉ. यशवंत कुंभार, प्रा. मेधाताई काळे, प्राचार्य विश्वासराव काळे, विश्वलक्ष्मी ग्रामीण प्रतिष्ठानचे संस्थापक, सचिव सुखदेव सुकळे, प्रा. शिवाजीराव बारगळ, कैलास वाकचौरे, ह.भ.प. मानसिंग महाराज इथापे, सौ. छायाताई सोनवणे, श्रीमती सिंधुताई सोनवणे, लेखक दिलीप सोनवणे, डॉ. प्रताप सोनवणे, संकेत सोनवणे आदिंच्या हस्ते 'देवमाणसं' पुस्तकांचे प्रकाशन झाले. डॉ. अशोकराव सोनवणे आपल्या भाषणात पुढे म्हणाले, माझे बंधू प्रा. दिलीप सोनवणे यांनी 'देवमाणसं' हे पुस्तक लिहून त्यांच्या मनातलं देवपण शब्दबद्ध केले आहे. लेखक, पत्रकार हे समाजाचे दिशादर्शक असतात. त्यांचे लेखन हे अनेक काळासाठी दीपस्तंभीय असते. आमची पत्रकरिता ही सुळावरची पोळी आहे. स्पष्ट, सत्यदर्शी आणि समाजपोषक पत्रकारिता करताना अनेकदा कठीण प्रसंग आले. तुरुंगवास सोसावा लागला. एका कुंभाराची प्रसार माध्यमातील झुंज ही तळमळीची जडणघडण आहे, परंतु समाजातील देवमाणसांमुळेच ही पत्रकारिता मोठ्या श्रध्देने व परिश्रमाने गतिशील ठेवली आहे, प्रा. दिलीप सोनवणेसारखे कुंभार समाजातील प्रत्येकाने लिहिते व्हावे असे आवाहन त्यांनी करून प्रा. सोनवणे यांच्या लेखनावर आपण पुस्तक प्रकाशित करणार असल्याचे आश्वासन दिले. यावेळी डॉ. बाबुराव उपाध्ये, डॉ. शिवाजी काळे, सुखदेव सुकळे, मेधाताई काळे, कैलास वाकचौरे, प्रा. डी.आर. जाधव, प्रा. दिलीप सोनवणे यांनी मनोगत व्यक्त केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य टी.ई. शेळके म्हणाले, आमच्या हस्ते आणि माझ्या अध्यक्षते खाली प्रा. दिलीप सोनवणे लिखित 'देवमाणसं' पुस्तकाचा सोहळा झाला, हा माझ्या जीवनातील अमृतानंद आहे. या पुस्तकात प्रा. सोनवणे सर यांनी डॉ. बाबुराव उपाध्ये, गुरुवर्या प्रा. मेधाताई काळे यांच्यासह १० पुरुष व १२ स्त्री व्यक्तिचित्रे शब्दबद्ध केली आहेत, त्यामध्ये प्रा. सोनवणे यांनी त्यांची पत्नी सौ. छायाताई सोनवणे यांचा देवमाणसं स्वरूपात केलेला शब्दगौरव ही स्त्री सन्मानाची उच्चतर भावना आहे, आपल्या पत्नीला देवरुपात पाहणारे सोनवणे सर भारतीय संस्कृतीचा आदर्श सांगणारे आहेत असे गौरवोद्गार काढून पुस्तक प्रकाशन संपन्न झाल्याचे घोषित केले. यावेळी बबनराव गोरे, सौ. राजश्री सोनवणे, सौ. हेमलता सोनवणे, सौ. विमल सोनवणे, शिरीष सोनवणे, राहुल सोनवणे, बाळाजी गोरे, भारत जोर्वेकर, संतोष जोर्वेकर, राजेंद्र जोर्वेकर, अनिल जोर्वेकर, सोमनाथ जोर्वेकर, मोमीन महेमूद, डॉ. यशवंत कुंभार, डॉ. आशिष सोनवणे, डॉ. सौ. विशाखा सोनवणे, सौ. प्राजक्ता सोनवणे, रंगनाथ जाधव, शंतनू सोनवणे, आनंद सोनवणे, प्रशांत सोनवणे, डॉ. रिया सोनवणे, सुधीर जाधव, डॉ. अनुपमा सोनवणे, डॉ. उषाताई कुंभार आदीसह कुंभार समाजातील व मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होते. स्व. सुखदेव पांडुरग सोनवणे यांच्या पाचव्या पुण्यस्मरणाच्या निमित्ताने झालेला हा पुस्तक प्रकाशन सोहळा पितृभक्तीचा आदर्श सांगणारा असल्याचे सांगून ह.भ.प. मानसिंग महाराज इथापे यांनी आपल्या प्रवचनातून मातृपितृ भक्तीचे विवरण केले. सूत्रसंचालन डॉ. चंद्रकांत सोनवणे यांनी केले तर अशोक सोनवणे यांनी आभार मानले.

***

आदर्श शिक्षिका 'सुरेखा भालेराव' यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न



आदर्श शिक्षिका सुरेखा संजीव भालेराव यांचा सेवापूर्ती सोहळा कलासागर मंगल कार्यालय नारायणगाव येथील मोठ्या उत्साहात संपन्न झाला.

सन १९८८ ते १९९९ या कालावधीमध्ये श्री शिवनेर विद्यालय आर्वीच्या माजी विद्यार्थ्यांनी हा सोहळा संपन्न केला. प्रथमच असे पाहायला मिळाले की २५ वर्षांपूर्वी ज्या शिक्षकांनी ज्ञानदानाचे पवित्र कार्य केले त्या शिक्षकांचा सेवापूर्ती सोहळ्यात माजी विद्यार्थ्यांनी एकत्रित येऊन त्यांचे प्रेम आदर कृतज्ञता दर्शविली. गुरु ब्रह्मा गुरुर्विष्णु गुरुर्देवो महेश्वरा गुरुर साक्षात परब्रम्ह तस्मै श्री गुरवे नमः या उक्तीप्रमाणे सन्मानार्थ शाल श्रीफळ पुष्पगुच्छ व छत्रपती शिवाजी महाराजांची प्रतिमा भेट दिली. श्री रंगदास स्वामी शिक्षण मंडळ आणे या संस्थेत एकूण ३९ वर्ष ११ महिने अविरत सेवा केली त्यांच्या हाताखाली अनेक विद्यार्थी घडले मोठ्या पदावर जाऊन कार्यरत आहे. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी प्राचार्य व ज्योतिष पंडित रावसाहेब नागरगोजे यांनी शुभेच्छा दिल्या तर प्रमुख पाहुणे माजी मुख्याध्यापक राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त आयुब इनामदार आणि माजी प्राचार्या, एम.ए. मराठी गोड मेडलिस्ट, शोभना खडके, माजी प्राचार्य बाळासाहेब ढेपे यांनी आपल्या मनोगतातून मॅडमचा जीवनपट प्रस्तुत केला. सुरेखा भालेराव यांचे प्राथमिक शिक्षक रसाळ गुरुजी, वहिनी निशा विश्वासराव, माजी प्राचार्य विलास विश्वासराव आर्वी गावचे माजी विद्यार्थी विद्यालयातील व विद्यमान सरपंच भावेश डोंगरे, संजय डोंगरे राष्ट्रपती पुरस्कार प्राप्त बाळासाहेब कानडे यांनी मनोगत व्यक्त केले.

याप्रसंगी माजी केंद्रप्रमुख परशुराम कोते, भाऊसाहेब जाधव, आप्पासाहेब बढे, नंदराम भालेराव, सुरेश भागवत, आत्माराम जगदाळे, आशालता लोखंडे, जुबेदा मणियार, शालिनी कुटे, निशा दळवी, तारा डुंबरे, संध्या घोलप, तारा दुराफे, मेघना तांबे, मीना कांबळे, कुसुम थोरात, शारदा तोतरे असे अनेक मान्यवर आणि आप्तेष्ट नातेवाईक मित्रपरिवार मोठ्या संख्येने उपस्थित होता. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योगिता बुट्टे आणि दत्ता रोकडे यांनी केले तर आभार संजीव भालेराव यांनी मानले.

नव्या तंत्रज्ञानाने कुंभारी उद्योगाला मिळणार ऊर्जा - आ. कृष्णाभाऊ खोपडे

१० दिवसीय कुंभार कला प्रशिक्षण कार्यशाळेचा शुभारंभ

- सुरेश पाठक







नागपुर : सामाजव्यवस्थेतील महत्वपूर्ण घटकापैकी एक प्रमुख घटक कुंभार कारागीराची कला आधुनिक तंत्रज्ञान व औद्योगिकरणामुळे हस्तशिल्प कारगीरांच्या हातचे कला–कौशल्य लुप्त होत आहे. यामुळे त्यांची आर्थिक व सामाजिक स्थिती दयनीय झाली आहे. भारताची कला व सांस्कृतिक वारसा जपणारे हस्तशील्पकारागीरांसाठी पंतप्रधान विश्वकर्मा सन्मान योजना व खादी और ग्रामोद्योग आयोगतर्फे आयोजित कुंभार सक्षमीकरण योजनेच्या माध्यमातून कुंभारी उद्योगाला ऊर्जा देऊन हस्तशिल्प कारागीरांना खुशहाल बनविण्याचा प्रयत्न केला जात आहे. असे खादी व ग्रामोद्योग आयोगतर्फे आयोजित कुम्भार सक्षमीकरण कार्यक्रम अंतर्गत आयोजित १० दिवसीय विद्युत चलित चाक प्रशिक्षण कार्यशाळेच्या उद्घाटकच्या रूपात आमदार कृष्णा खोपडे संबोधित करताना पुढे म्हणाले कि, शासनाच्या कल्याणकारी योजनाचा कारागीरांनी लाभ घेऊन आपली आर्थिक उन्नती साधावी. चंदनलाल प्रजापती यांचे अध्यक्षतेखाली संपन्न या कार्यक्रमात प्रमुख अतिथी सहा. संचालक राजेंद्र खोडके यांनी खादी ग्रामोद्योग आयोगची क्लस्टर योजना, अर्थ सहाय्यता, विपणन व्यवस्था सारख्या विभिन्न योजनेची माहिती दिली. चंदनलाल प्रजापती, राजीव खरे व कार्यक्रम अधिकारी शशिकांत यांनी कारागीरांना संबोधित केले. २७ डिसें. ते ५ जाने. २०२४ पर्यंत १० दिवसीय कार्यशाळामध्ये नागपूर जिल्ह्यातील सर्व तहसीलचे कुम्भार कारागीर मास्टर क्राफ्ट्समन लक्ष्मण बोरसरेच्या मार्गदर्शनात मातीच्या विविध कलाकृती तयार करण्याचे कसाब शिकविणार आहेत. कार्यक्रमाचे संचालन हस्तशिल्पी बहुउद्देशीय संस्थाचे अध्यक्ष सुरेश पाठक यांनी केले. आभार प्रवीण गाते यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी गोविंदा कपाट, गजानन बुरबादे, रामेश्वर चौधरी, मनोज वरवाडे, सुनील कोलूरवार, श्याम बुरबादे, शुभम वालदे, मयूर गाते हे अथक परिश्रम घेत आहेत.

नामपूर येथे संतशिरोमणी श्री. गोरोबाकाका, श्री. शिवाजी महाराज प्रतिमापूजन करुन मोरे - जगदाळे विवाह संपन्न! लॉन परिसरात वधू-वरांनी लग्न प्रित्यर्थ केले वृक्षरोपण!



संत गोरोबा काकांच्या प्रतिमेचे पूजन करताना वधूवर व मान्यवर



वधूवरांसोबत उपस्थित मान्यवर पाहूणे



लग्नाप्रित्यर्थ वधूवरांचे हस्ते वृक्षारोपण समवेत उपस्थित मान्यवर



वधूवरांना आशिर्वाद देण्याकरिता आलेला जनसमुदाय

नामपूर (दि.२६.२.२०२४) : सौ. सुनंदा व श्री. पांडुरंग सिताराम अहिरे ह्यांची नात व श्रीमती जयश्री व कै. शामराव दत्तात्रय मोरे ह्यांची सुपुत्री तथा इंजि. सौ. पूनम व श्री. भूषण अहिरे ह्यांची भाची राहणार नामपूर ता. सटाणा बागलाण जि. नाशिक ह्यांची सुपुत्री चि.सौ.कां.मयुरी (पल्लवी BCS) हिचा शुभ विवाह नवापूर जि. नंदुरबार येथील घर तेथे श्री. गोरोबाकाका फोटो अभियान चे सौ. संगिता आणि इंजि. बबनराव जगदाळे (प्रदेश सरचिटणीस कु.स.सा.सं.) ह्यांचे चिरंजीव आणि सौ. कमलबाई आणि श्री. उत्तमराव गोविंदा मोरे ह्यांचे नातू चि.इंजि.परेश (सिव्हिल इंजि.+इंटेरियर) ह्याच्याशी दि.२६/२/२०२४, सोमवारी दुपारी, भाग्यविधाता लॉन्स, नामपूर ता. सटाणा जि. नाशिक येथे श्री.संत शिरोमणी श्री.गोरोबाकाका ह्यांचे प्रतिमा पूजन व छत्रपती श्री.शिवाजी महाराज ह्यांना अभिवादन करुन व जय श्री. गोरोबाकाका नावाचा जयजयकार करुन संपन्न झाला. लग्नाआधी वधू–वर ह्यांनी लॉन प्रांगणात शमी, आवळा, बेल आदि रोपे संरक्षक जाळी सह लावलेत. शास्त्रशुद्ध व वैदिक विवाह विधी श्री. गिरीश देवा कुलकर्णी महाराज ह्यांनी पार पाडला.

लग्नसामारंभास कुंभार समाज सामाजिक संस्था अध्यक्ष सतीशदादा दरेकर, कार्याध्यक्ष इंजि. संजयजी रुईकर, कार्याध्यक्ष रमाकांत क्षीरसागर, कोषाध्यक्ष अनंतराव कुंभार, कुंभार समाज तथा काँग्रेस नेते शरदजी आहेर, विदर्भ कुंभार सुधार समितीचे माजी अध्यक्ष डॉ. श्रीराम कोल्हे, सचिव सुरेंद्र सरोदे, कुंभविश्वदर्शन चे दिलीप खांडेकर, डॉ. नंदकुमार माळशिरसकर, सोशियल मीडिया प्रमुख जगदीशजी मोरे ह्यांचे सह प्रमुख नेते, नंदुरबार जिल्हा कुंभार जिल्हा अध्यक्ष हृदयेशभाई चव्हाण, संघटनेचे सर्व पदाधिकारी, गुजरात राज्य कुंभार समाज महासंघ अध्यक्ष गजानन्द खानझोडे, नाशिक जिल्हाध्यक्ष सोमनाथ सोनवणे, जळगांव जिल्हाध्यक्ष इंजि. चंद्रशेखर कापडे आदिसह तापीकाठ खान्देश, मध्यप्रदेश, गुजरात आणि महाराष्ट्र सर्व भागातून कुंभार समाज बंधू भगिनी उपस्थित होते.

शब्दांकन : सौ. संगिता आणि इंजि. बबनराव जगदाळे, नवापूर जि. नंदुरबार, खान्देश

फोटो सौजन्य : महेंद्र मोरे, नवसारी व हेमंत जाधव, नवापूर

***

'अभिजात मराठी' हे महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडीचे यश
लेखकांनी उभारला लढा : श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी उलगडला पाठपुराव्याचा प्रवास

– पराग मगर

नागपूर : 'अभिजात मराठी'चा लढा हा दहा वर्षांचा आहे. यासाठी २०१४ ला झालेल्या आंदोलनानंतर तत्कालीन राज्य सरकारने पाठपुरावा समिती नेमली. पण सर्वपक्षीय प्रतिनिधी मंडळाने हा मुद्दा रेटावा यासाठी सर्वपक्षीय मंडळासह लेखकांच्या प्रतिनिधींचे मंडळ पंतप्रधानांकडे नेण्याचे आश्वासनही हवेत विरले.

मात्र या प्रयत्नांतून २०० साहित्य संस्थांचा सहभाग असलेल्या 'महाराष्ट्र सांस्कृतिक आघाडी व मराठीच्या व्यापक हितासाठी' या चळवळींनी लाखो पत्रांच्या माध्यमातून केलेला पाठपुरावा हे आजच्या 'अभिजात मराठी'चे यश असल्याचे मत अखिल भारतीय मराठी साहित्य महामंडळाचे माजी अध्यक्ष व भाषा सल्लागार समितीचे सदस्य श्रीपाद भालचंद्र जोशी यांनी नोंदविले.

'सकाळ'शी साधलेल्या संवादात त्यांनी मराठीला अभिजात भाषेचा दर्जा मिळण्यासाठी राज्यातील अनेक साहित्यिक व भाषाशास्त्रज्ञांनी दिलेला लढा, अनुभवलेली शासकीय अनास्था, वर्चस्ववादाचे राजकारण यासह इतरही घडामोडींचा विस्तृत पट उलगडला. ते म्हणाले, आज मिळालेला अभिजात भाषेचा दर्जा जरी 'राजकीय' असला तरी त्यामागे १० वर्षांच्या परिश्रमाचे संचित आहे. या दहा वर्षांत चळवळीच्या माध्यमातून मराठी भाषिक समाजाचे उद्बोधन करता आले. कारण ही भाषिक पर्यावरणाची चळवळ आहे. आज जगभरात सांस्कृतिक राजकारणावर भर दिला जात आहे. भाषा हे शास्त्र आहे आणि आपल्या राज्यघटनेला भारतीय दृष्टीचा समाज निर्माण करायचा आहे. भाषा हा त्याचा पाया आहे. अभिजात मराठीतून हा पाया नक्कीच मजबूत करण्याचे प्रयत्न करायचे आहेत असा विश्वासही बोलून दाखविला.

दीपक पवार, महेश केळूसकर, चंद्रशेखर गोखले, मासूरकर या साहित्यिक कार्यकर्त्यांमुळे ही लढाई बळकट झाली. तर संजय नहार यांनी केलेले प्रयत्न मोलाचे ठरल्याचे त्यांनी सांगितले.



श्रीपाद जोशी

वर्चस्ववादामुळे दहा वर्षे विलंब : आज अभिजात भाषेचा दर्जा महाराष्ट्री प्राकृतला मिळाला हे या लढ्यातील खरे यश आहे. कारण मराठी ही मुळात प्राकृत म्हणजेच श्रमण संस्कृतीची भाषा आहे. वर्चस्ववादाचा या श्रमण संस्कृतीलाच विरोध आहे. या वादामुळेच दहा वर्षांपासून नवीन निकषांच्या नावाखाली हा निर्णय प्रलंबित ठेवला गेला. पण मराठी प्राकृतला अभिजात दर्जा मिळणार असल्याने श्रमण परंपरेतील तत्वज्ञान जगासमोर येणार असून त्याचे पुनरुज्जीवन होईल ही आशा जोशी यांनी बोलून दाखविली.

अडीच हजार वर्षांचा इतिहास : या अहवालाच्या माध्यमातून मराठीचा अडीच हजार वर्षांचा इतिहास मांडण्यात आला आहे. प्रा. रंगनाथ पाठारे आणि प्रा. हरी नरके यांची प्रचंड मेहनत यामागे आहे. पण तो न वाचता त्यावर चर्चितचर्वण सुरू आहे. हा अहवाल आधी वाचून त्यातील बारकावे समजून घेणे आवश्यक असल्याचे जोशी म्हणाले.

***

चि. इंजि. परिमल गवळी (कुंभार) उच्च शिक्षणासाठी जर्मनीस रवाना..!



आई वडिल बहिणी सोबत चि. इंजि. परिमल

जळगांव : पाचोरा पिंपळगाव हरेश्वर येथील कुंभार सामाजिक नेते, विदर्भ, खान्देश, मराठवाड्यात सर्वदूर प्रसिद्ध सेंद्रिय भरीतचे वांगे, संत्री–मोसंबीचे दर्जेदार रोप आणि सेंद्रिय फळांचे उत्पादक–विक्रेते बागायतदार अशोकराव गवळी ह्यांचे चिरंजीव इंजि. परिमल ह्याने बी. ई. एन्ड टी.सी. पदवी प्राप्त केली. पुणे येथे काही काळ आय.टी. क्षेत्रात नोकरी केल्यावर त्यांना जर्मनी येथील नामांकित युनिव्हर्सिटी मध्ये कॉम्प्युटर शाखेत एम.एस. शिक्षण घेण्याची संधी प्राप्त झाली असून इंजि. परिमल जर्मनीस रवाना झाले आहेत. त्यांना मुंबई विमानतळवर निरोप देण्यासाठी वडील अशोकराव, आई सौ. वंदना, बहीण कु. इंजि आकांक्षा (बी.ई.केमिकल) उपस्थित होते.

ग्रामीण भागातील एक कष्टाळू प्रगतीशील शेतकऱ्याचे पोर उच्च शिक्षणासाठी परदेशी रवाना झाल्याने पिंपळगाव हरेश्वर व पंचक्रोशीतून इंजि. परिमल ह्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे. इंजि. परिमल अशोकराव गवळी ह्यांना उच्च शिक्षणासाठी सकल कुंभार समाजा तर्फे हार्दिक शुभेच्छा..!

शब्दांकन : सौ. संगिता आणि इंजि. बबनराव जगदाळे, नवापूर

***

नांदेड येथे संत शिरोमणी गोरोबा काका यांच्या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा संपंन्न



श्री संत शिरोमणी गोरोबा काका यांचे मंदिर मुर्ती प्राणप्रतिष्ठा कलशारोहण व वसतिगृहाचे लोकार्पण सोहळा माजी मंत्री भास्करराव खतगावकर यांच्या हस्ते संपन्न



मार्गदर्शन करताना आ. मोहन हंबर्डे व व्यासपिठावरील मान्यवर



प्रमुख पाहुण्यांचा सत्कार करताना संस्थेचे अध्यक्ष विजयराव देवडे, मान्यवर व इतर पदाधिकारी



कार्यक्रमास उपस्थित समाज बंधू भगिनी

नांदेड : शहरात प्रथमच संत शिरोमणी गोरोबा काकांचे मंदिर स्थापन करण्यात आले. या मंदिरासाठी व वस्तीगृहासाठी मा. आमदार मोहनरावजी हंबर्डे साहेब यांनी २० लक्ष रुपये निधी देऊन सहकार्य केले तसेच कुंभार समाजातील सर्व समाज बंधू भगिनीने वर्गणी देऊन हा कार्यक्रम संपन्न केला.

कार्यक्रमाची रूपरेषा – दिनांक १० व ११ फेब्रुवारी २०२४ रोजी वरील कार्यक्रम आयोजित केलेला होता. १० फेब्रुवारी रोजी शनिवारी सकाळी दहा ते दोन या वेळेमध्ये होम हवन व पाच ब्राह्मणांच्या उपस्थितीत मंत्रोचारांमध्ये पाच मूर्तीची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली. त्यामध्ये संत शिरोमणी गोरोबा काका, विठ्ठल, रुक्मिणी, संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज अशा पाच मुर्त्यांची प्राणप्रतिष्ठापना करण्यात आली.

तर दुपारी दोन वाजता सिडको येथील बालाजी मंदिर येथून शोभायात्रेस प्रारंभ झाला ही शोभायात्रा संत शिरोमणी गोरोबाकाका मंदिर येथे विसर्जित करण्यात आली. या शोभा यात्रेमध्ये बँड पथक, लेझीम पथक, भजनी मंडळ व नांदेड जिल्ह्यातील महिलांनी डोक्यावर कळस आणि तुळशी वृंदावन घेऊन या शोभा यात्रेमध्ये सहभाग घेतला. शोभायात्रेमध्ये सर्वांनी भगवे फेटे बांधले होते. या रॅलीमध्ये फुगडी, लेझीम व बँड पथकाच्या तालावर नाचत सर्व भाविक भक्तानी आनंद उत्सव साजरा केला. शोभा यात्रेतील महिलांनी गरबा व दांडिया हा कार्यक्रम सुद्धा साजरा केला. सर्व सिडको शहर भक्तिमय वातावरणात रंगून गेलेले होते. स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या पदाधिकाऱ्यामार्फत शोभायात्रेत सर्व समाज बांधवांना व भगिनींना बिसलेरी पाणी बॉटल आणि रसना वाटप करण्यात आला.

विशेष आकर्षण – कु. प्रिया शिवाजीराव पांगरेकर हिने काढलेली संत शिरोमणी गोरोबा काकांची व पांडुरंगाची काढलेली हुबेहूब रांगोळी. सायंकाळी हरिपाठ झाला व रात्री आठ ते दहा हभप सौ. कान्होपात्राताई कुंडलवाडीकर माऊलीचे हरिकीर्तन झाले. ११ फेब्रुवारी रोजी सकाळी दहा वाजता गुरुवर्य नागेंद्र गैबी महाराज मठपती चिखलमोशीकर यांच्या हस्ते कळस रोहनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर कुंभार समाजातील हभप राम महाराज पांगरेकर यांच्या पवित्र वाणीतून अकरा ते एक हरी कीर्तनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर दुपारी दोन वाजता उपस्थित राजकीय नेत्यांचा सत्कार आयोजित करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्घाटक–आदरणीय अशोकरावजी चव्हाण साहेब माजी मुख्यमंत्री महाराष्ट्र राज्य (कार्यक्रमास उपस्थित राहता आले नाही म्हणून) त्यांचा शुभेच्छा व्हिडिओ स्क्रीनवर दाखवण्यात आला व शुभेच्छा पत्र वाचन करण्यात आले. कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी मंत्री मा. भास्कर रावजी पाटील खतगावकर साहेब.

सत्कारमूर्ती – मा. मोहनरावजी हंबर्डे साहेब आमदार दक्षिण नांदेड. **विशेष उपस्थिती –** माननीय किशोरजी स्वामी साहेब स्थायी समिती सभापती मनपा नांदेड. आदरणीय संजयजी देशमुख लहानकर साहेब सभापती कृषी उत्पन्न बाजार समिती नांदेड. आदरणीय संतोषजी पांडागळे साहेब प्रवक्ता, आदरणीय सतीश बसवदे साहेब ब्लॉक कमिटी अध्यक्ष सिडको. आदरणीय अनंतकुमार कुंभार साहेब उपमुख कार्यकारी

अधिकारी सामान प्रशासन हिंगोली. डॉक्टर प्रकाश देवडे साहेब डी एम अंकोलॉजिस्ट, आदरणीय मोहनरावजी जगदाळे साहेब संस्थापक अध्यक्ष अखिल भारतीय कुंभार समाज विकास संस्था. आदरणीय रंगनाथराव सूर्यवंशी साहेब वरिष्ठ कार्याध्यक्ष विकास संस्था नाशिक, आदरणीय देविदासरावजी बासरकर साहेब मार्केटिंग मॅनेजर मुंबई अंकोकेअर सेंटर, आदरणीय भीमराव दळे साहेब प्रदेशाध्यक्ष बारा बलुतेदार, आदरणीय श्रीनिवासजी भोसले साहेब उपसंपादक दैनिक लोकमत. आदरणीय विश्वनाथरावजी कोलमकर साहेब मुख्य मार्गदर्शक स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था. आदरणीय पुंडलिकराव घुमलवाड साहेब मार्गदर्शक स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था.

आदरणीय विजयराव देवडे लहानकर साहेब प्रदेशाध्यक्ष स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था, आदरणीय शिवाजीराव पांगरेकर साहेब प्रदेश सचिव स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था, आदरणीय बालाजीराव घुमलवाड साहेब वा प्रदेशाध्यक्ष स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था, आदरणीय गणेशराव बेल्लाळे साहेब पुरवठा अधिकारी मुंबई आदरणीय गंगाधररावजी देवडे साहेब एपीआय क्राईम ब्रँच मुंबई. आदरणीय धनराजजी शिरोळे साहेब को क. सचिव प्रदेश उपाध्यक्ष भाजपा, आदरणीय व्यंकटेशजी गोत्रम साहेब प्रदेश उपाध्यक्ष.

आदरणीय केरोजी आचार्य साहेब प्रदेश कार्याध्यक्ष आदरणीय श्रीराम तेलंग साहेब मराठवाडा युवा संपर्क प्रमुख, आदरणीय राजकुमार गोरगिळे साहेब मराठवाडा युवा अध्यक्ष, आदरणीय तानाजीराव राजे साहेब लातूर जिल्हा सल्लागार. आदरणीय महेश कानगुले साहेब लातूर जिल्हाध्यक्ष, आदरणीय शिवानंद पाशेवार साहेब छत्रपती संभाजी नगर जिल्हाध्यक्ष. सौ. कविताताई राजे नायगावकर नांदेड जिल्हाध्यक्षा. सौ अनिताताई शंकरराव मल्हारे छत्रपती संभाजी नगर जिल्हाध्यक्षा. आदरणीय बालाजीराव तेलंग गउळकर सल्लागार, आदरणीय गजानन कोलमकर साहेब प्रदेशाध्यक्ष प्रजापती महासंघ, आदरणीय लक्ष्मणराव विभुते साहेब युवा अध्यक्ष, आदरणीय संदीप अवनुरे साहेब युवा सचिव. आदरणीय माधवराव पदमपेंटे साहेब जिल्हा कार्याध्यक्ष छत्रपती संभाजी नगर आदरणीय श्रीराम पोतगंटे साहेब युवा अध्यक्ष छत्रपती संभाजीनगर आदरणीय उत्तमराव मल्हारे जिल्हा उपाध्यक्ष छत्रपती संभाजीनगर, आदरणीय बालाजीराव घटकार साहेब सोशल मीडिया प्रमुख छत्रपती संभाजीनगर, आदरणीय बालाजीराव निरटूडे साहेब जिल्हा संघटक छत्रपती संभाजीनगर मान्यवरांना मंचावर पाचारण करून पाहुण्यांचा संघटनेतर्फे शाल, श्रीफळ, ट्रॉफी आणि पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.

त्यानंतर मंचावरील मान्यवरांचे भाषणे झाली. यावेळी स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या वतीने कुंभार समाजाला निवडणुकीत राजकीय नेतृत्व देण्याची विनंती प्रास्ताविकात करण्यात आली. सोहळ्यास सुमारे चार हजार समाज बांधवांची उपस्थिती होती. सन्माननीय भास्कर रावजी पाटील खतगावकर साहेब यांच्या हस्ते वसतिगृहाचे रिबीन कापून लोकार्पण करण्यात आले. हा कार्यक्रम स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था या संघटनेच्या सर्व पदाधिकाऱ्यांनी सहकार्य करून यशस्वी केला. छत्रपती शिवाजी माध्यमिक विद्यालय लहान या शाळेतील विद्यार्थ्यांनी लेझीम पथकासह सर्व मान्यवरांचे स्वागत केले. शाळेतील शिक्षक व कर्मचाऱ्यांनी या कार्यक्रमास खूप मदत केली त्याबद्दल त्या सर्वांचे सुद्धा मनापासून आभार.

विशेष आभार –

मा. शेषराव तेलंग साहेब लोहा यांच्या वतीने कार्यक्रमास अन्नदान (भंडारा). मा. विजयराव राजे साहेब नायगावकर यांच्यातर्फे संपूर्ण टाइल्स, ग्रेनाईट व फरशी मंदिरास अर्पण. मा. धनराज शिरोळे साहेब नायगाव यांच्या वतीने संत शिरोमणी गोरोबा काकांची मूर्ती मंदिरास अर्पण. मा. बाबुरावजी चिलवंतकर साहेब मुदखेड यांच्या वतीने विठ्ठल रुक्मिणी मूर्ती मंदिरास अर्पण, मा विजयराव देवडे लहानकर साहेब यांच्या वतीने संत ज्ञानेश्वर व संत तुकाराम महाराज यांच्या मुख्य मंदिरास अर्पण. मा. गंगाधररावजी मीरदोडे साहेब धर्माबाद यांच्यातर्फे मंदिरास बोअर मारून देण्यात आले. (पाण्याची व्यवस्था) मा. संगमेश्वर धुळे पीडब्ल्यूडी सातारा यांच्यातर्फे मंदिरास कळस अर्पण. कार्यक्रमाचे प्रास्ताविक विजयरावजी देवडे लहानकर साहेब यांनी केले तर आभार बालाजीराव घुमलवाड यांनी मानले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शिवाजीराव पांगरेकर यांनी केले. शेवटी महाप्रसादाचे (भंडाऱ्याचे) आयोजन करण्यात आले होते.

कार्यक्रम अतिशय सुंदर नियोजनबद्ध झाला. कार्यक्रमास प्रत्यक्ष व अप्रत्यक्षरीत्या सहकार्य केलेल्या सर्व समाज बांधव, मित्र मंडळ व देणगीदारांचे संघटनेच्या वतीने मनापासून आभार.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सहकार्य केलेले खालील संघटनेचे पदाधिकारी, लक्ष्मणराव शिरोळे सर, विठ्ठलराव कीवळेकर, विजयराव राजे नायगावकर, रमेश घुमलवाड सर, बालाजीराव चक्रधर सर, रमेशराव देगावकर, विजयकुमार घुमाडे, बाबुराव चिलवंतकर, कृष्णा सोनुले, लक्ष्मणराव मर्कटे, डी आ मर्कटे, संतोषराव कानघुले, सोपान कानगुले, काळेवर देवडे, विजयकुमार वादे, हनुमंत कानगुले, हनुमंतराव गोरडवार, शेषेराव तेलंग, धोंडीबा गोत्रम, शंकरराव कुरणापल्ले सर, बालाजीराव पाशावर, शिवाजीराव नर्शीकर, गणेशराव राजे, तुकाराम तेलंग, कपिल कांनगुलकर, चंद्रकांत तेलंग, गिरीश बिचकुंदे, गणेश रपेवार, गंगाधर रावणपले, शंकरराव इजगिरवाड सर, गंगाधर राजरवाड, बालाजीराव आवडे, बालाजीराव पाशावार, तिरुपती जोगपेटे, लिंगुराम मीरदोडे, सुभाष तेलंग, विठ्ठल आचार्य, पांडुरंग रावणपल्ले, मारुती नागपुरे, साहेबराव मिर्झापुरे, भागवत कापशीकर, भगवान निरदूडे, विश्वनाथराव मरवाळीकर, बाबुराव पांगरेकर, धोंडीराम राजे, मारोती कानगुले, आनंदराव शेवाळे, जयप्रकाश कानगुले, नीटुरे सर व सर्व स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे पदाधिकारी. शिवाजी पांगरेकर संस्थापक सचिव स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र राज्य.

***

कळंबचे माजी नगराध्यक्ष पांडुरंग कुंभार
कळंब - धाराशिव विधानसभा रणांगणात उतरण्याची शक्यता?

कळंबचे नगरपरिषदेचे माजी नगराध्यक्ष तथा भारतीय राष्ट्रीय काँग्रेस पक्षाचे कळंब तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार यांनीही विधानसभा निवडणूक लढण्याची तयारी दर्शवली असून पक्षाकडे त्यांनी उमेदवारी मागणी अर्ज दाखल केला आहे.

महाराष्ट्रात काही दिवसापूर्वी काँग्रेस पक्षाने विधानसभा निवडणूक लढवू इच्छिणाऱ्या उमेदवारांना प्रत्येकी २० हजार रुपये भरून आपल्या उमेदवारी मागणीकरिता अर्ज मागविण्यात आले होते. उमेदवारीचा मागणी अर्ज काँग्रेस पक्षाचे कळंब तालुकाध्यक्ष पांडुरंग कुंभार यांनी भरला असून तेही विधानसभा निवडणूक लढण्याच्या तयारीत असल्याचे यावरून दिसून येत आहे.

पांडुरंग कुंभार यांची मोठी राजकीय कारकीर्द असून त्यांनी आतापर्यंत विविध पदावर कळंब तालुक्यात व पक्ष संघटनेत काम केलेले आहे. ते १९९० ते १९९४ या काळात मराठवाडा विद्यापीठाच्या वेल्फेअर बोर्डवर अध्यक्ष म्हणून त्यांनी काम पाहिले आहे. तसेच १९९२ ते १९९७ यादरम्यान युवक काँग्रेसचे जिल्हा सरचिटणीस म्हणून देखील त्यांनी पक्ष कार्य केले आहे तर १९९६ ते २००१ या काळात कळंब नगर परिषदेचे ते प्रथम नगरसेवक झाले होते. त्यानंतर २००१ ते २००६ यादरम्यान त्यांनी कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीच्या सभापती पदाची देखील धुरा सांभाळली होती तर २००१ ते २००७ यादरम्यान कळंब तालुका काँग्रेस कमिटीचे तालुका संघटक म्हणून देखील त्यांनी काम पाहिले आहे. २००७ ते २००९ या काळात प्रशासकीय सदस्य म्हणून कळंब कृषी उत्पन्न बाजार समितीवर काम केले आहे. २००८ ते २०१४ या काळात काँग्रेस पक्षाचे जिल्हा सरचिटणीस म्हणून देखील ते कार्यरत होते त्यासोबतच २०११ ते २०१४ या काळात त्यांनी कळंब नगर परिषदेचे उपनगराध्यक्ष पद भूषवलं असून २०१४ मध्ये त्यांनी काही काळ प्रभारी नगराध्यक्ष म्हणून देखील काम केलेले आहे. काँग्रेस पक्षाशी एकनिष्ठ राहत त्यांनी आतापर्यंत विविध पदे उपभोगली आहेत. त्यामुळे या कार्याची दखल घेऊन पक्षश्रेष्ठी त्यांना विधानसभा निवडणुकीत संधी देणार का? याची चर्चा सध्या विधानसभा मतदारसंघात सुरू आहे. पांडुरंग कुंभार हे ओबीसी चेहरा असून त्यांचे नेतृत्व हे सर्वसमावेशक असे आहे. पांडुरंग कुंभार यांनी जरी कळंब – धाराशिव मतदार संघातून निवडणूक लढवण्याची तयारी दर्शवली असली तरी देखील महाविकास आघाडीमध्ये ही जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाकडे राहण्याची शक्यता आहे. विद्यमान आमदार कैलास घाडगे पाटील या मतदारसंघाचे नेतृत्व करत असल्यामुळे ही जागा शिवसेनेला सुटल्यानंतर पांडुरंग कुंभार यांची भूमिका नेमकी काय असणार हे देखील पाहणे महत्त्वाचे आहे.



राजकारणात कधीही काहीही घडू शकते म्हणून मी पक्षाकडे पक्षाच्या आवाहानानुसार उमेदवारी मागणी अर्ज दिलेला आहे. त्यामुळे जर पक्षाने मला संधी दिली तर मी निश्चितपणाने कळंब धाराशिव विधानसभा मतदारसंघात निवडणूक लढवण्यास तयार आहे. परंतु जरी ही जागा महाविकास आघाडीत इतर पक्षाला मिळाली तरी मी पक्ष सांगेल तो आदेश पाळणार आहे.

- पांडुरंग कुंभार, तालुकाध्यक्ष–भा.रा.काँग्रेस कळंब

स्केटिंगमध्ये चौफुल्याच्या ऋत्विक कुंभारचा विक्रम



केडगाव, चौफुला (ता. दौंड) येथील ऋत्विक पराग कुंभार (वय ५) याने लिंबो स्केटिंगमध्ये ७ क्रेटा (मोटार) गाड्या व ७ ज वलंत लोखंडी पाइप (फायर बार) खालून जमिनी पासून ९ इंचावरून जाऊन ५० मीटर अंतर अवघ्या १९ सेकंदात पूर्ण केले.

हा या क्षेत्रातील विक्रम ठरला असून याबद्दल ऋत्विकचे सर्व स्तरांवर कौतुक केले जात आहे. ग्लोबल 'जनियस रेकॉर्ड' या जागतिक रेकॉर्ड नोंद करणाऱ्या संस्थेने या ऋत्विकच्या या विक्रमाची नोंद घेतली आहे, अशी माहिती जनियस रेकॉर्डचे निरीक्षक पंच विशाल देसाई यांनी दिली. ऋत्विक हा केडगावच्या ग्रेट स्पोर्ट्स अॅकॅडमीत स्केटिंगचे धडे घेत असून तो शारदा सदन शाळेत बालवाडीत शिकत आहे. लिंबो स्केटिंगसाठी ऋत्विकला ग्रेट स्पोर्ट्स अॅकॅडमीचे समाधान दाणे, गणेश घुगे, यश बारवकर, आकाश कसबे, खुशनंदन सिंग यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी देसाई म्हणाले, ग्रामीण भागात हा खेळ फारसा खेळला जात नाही. अशा रेकॉर्डसाठी आम्ही तीन ट्रायल देत असतो. मात्र ऋत्विकने ट्रायल न घेता पहिल्याच प्रयत्नात हे यश मिळविले आहे. या खेळात शारीरिक फिटनेस व मनाच्या एकाग्रतेचा कस लागतो. तसेच, ग्रेट स्पोर्ट्स अॅकॅडमीचे समाधान दाणे म्हणाले, संत सेवा संघाच्या माध्यमातून ग्रेट स्पोर्ट्स अॅकॅडमी ग्रामीण भागातील मुलांना साहसी खेळ शिकविण्याचे काम करते. स्केटिंग हा खेळ ग्रामीण भागात अभावानेच खेळला जातो. अशा खेळात विक्रम होणे ही आमच्यासाठी अभिमानाची बाब आहे. याप्रसंगी शुभांगी धायगुडे, रूपाली टेंगले, नितीन जगताप, पूनम बारवकर, डॉ. नीलेश लोणकर, संदीप टेंगले आदी उपस्थित होते.

कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे ऋत्विकचे विशेष अभिनंदन व शुभेच्छा!

***

जुन्नर रोटरीच्या अध्यक्षपदी सुनिल जाधव तर सचिवपदी दत्तात्रय म्हस्के



जुन्नर ता. २९ : रोटरी क्लब ऑफ जुन्नर शिवनेरीचा पदग्रहण समारंभ सोहळा महालक्ष्मी मंगल कार्यालय जुन्नर येथे मोठ्या उत्साहात संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे डिस्ट्रिक्ट गव्हर्नर रोटेरियन मोहनभाई पालेशा, प्रमुख उपस्थिती जुन्नर तालुका आमदार रोटेरीयन अतुल बेनके, लिज्जत पापड उद्योग समूहाचे सर्वेसर्वा सुरेश कोते तसेच असिस्टंट गव्हर्नर रोटेरियन ज्ञानेश जाधव उपस्थित होते. सन २०२४–२५ चे नवनियुक्त अध्यक्ष सुनिल जाधव यांनी अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारली तर सेक्रेटरी म्हणून रोटेरियन दत्तात्रय म्हस्के यांनी पदभार स्वीकारला.

यावेळी पाच सदस्यांची नवीन रोटेरीयन म्हणून नियुक्ती करण्यात आली. यामध्ये रोटरियन मेहुल गांधी, रोटरियन संदीप बारवे, रोटरियन धोंडीराम वारे, रोटरियन गणेश पापडे, रोटरीयन निलेश शिंदे. या कार्यक्रमाच्या प्रसंगी प्रमुख पाहुणे रोटरियन मोहन भाई पालेशा यांच्या अप्रतिम व्याख्यानाने सर्वजण भारावून गेले तसेच नवनिर्वाचित अध्यक्ष सुनिल जाधव यांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.

यावेळी रोटरीयन आमदार अतुल बेनके आणि सुरेश कोते यांनी देखील अध्यक्षांना पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमाप्रसंगी नारायणगाव, आळेफाटा, मंचर, राजगुरुनगर, दौंड या ठिकाणचे रोटरीयन अध्यक्ष आणि इतर संचालक मंडळ उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन विलास कडलक यांनी केले आणि आभार मिलिंद घोडेकर यांनी मानले.

***

संत शिरोमणी गोरोबा सेवा मंडल नागपूरच्या मासिक सभा संपंन्न



महेंद्र भातकुलकर : संत शिरोमणी गोरोबा सेवा मंडल नागपूरची मासिक सभा दि. ११ ऑगस्ट रोजी स. १० वा. मानेवाडा स्थित जवाहर सभागृह, नागपूर येथे संपन्न झाली. पुणे येथील कुंभश्री मासिकचे संपादक संजय पांडुरंग राजे यांच्या मातोश्री स्व. तारूबाई पांडुरंग कुंभार यांचे दि. १० ऑगस्ट रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी अल्प आजाराने निधन झाले. याप्रसंगी विश्वस्तांनी मासिक सभेच्या सुरवातीस त्यांना श्रद्धांजली देऊन कुंभार समाजाप्रती समाजभान जपले. कारण संपादक संजय राजे हे समाजाचे प्रतिष्ठित खंदक आहे. याप्रसंगी मंडळाचे अध्यक्ष ॲड. श्रीधर कालकर, याचेसह सर्वश्री गंगाधर खोपे, महेंद्र भातकुलकर, विजय वाघ, किशोर कोल्हे, संजय कोथलकर, विनोद मेहरे, राऊत आदिंसह समाज बांधव उपस्थित होते.

***

कु. अर्णव निलेश कुंभार याने तीन मॅच जिंकत रौप्यपदक संपादन केले.



School Olympic Boxing सकाळ स्कूल ऑलम्पिक आयोजित दिनांक ०८/१२/२०२३ ते ०९/१२/२०२३ रोजी पुणे येथील भवानी पेठ मध्ये बॉक्सिंग स्पर्धेत नेताजी सुभाषचंद्र बोस मुलांची सैनिकी शाळेतील मुलांनी सहभाग घेऊन ९ पदकांची कमाई केली. वयोगट : १४ वर्षे खालील मुलांमध्ये ४०–४२ वजन गटांमध्ये अर्णव निलेश कुंभार याने तीन मॅच जिंकत रोप्यपदक संपादन केले.

सर्व विद्यार्थ्यांना आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विजय कोद्रे, प्रशिक्षक गणेश शिंदे, प्राचार्य अमर क्षीरसागर सर, लोकसेवा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष मा. दिपकजी पायगुडे साहेब, क्रिडा प्रमुख तानाजी पाटील सर, उप प्राचार्य विकास तीरकुंडे, अर्जुन शिंदे यांचे मार्गदर्शन लाभले. आंतरराष्ट्रीय प्रशिक्षक विजय कोद्रे, क्रीडा प्रमुख तानाजी पाटील, प्रशिक्षक गणेश शिंदे.

***

दुर्जन मंडळीत बसण्यापेक्षा एकटे बसणे बरे आणि एकटे बसण्यापेक्षा सज्जन मंडळीत बसणे हे त्याहून बरे.

आर्किटेक्ट रविंद्र रमेश तांबट यांच्या अंबर स्टूडिओचे बेंगलोरमध्ये उद्घाटन





रविंद्र तांबट व रमेश तांबट यांचा सत्कार हस्ते कुंभश्री संपादक संजय राजे व सौ. बीना राजे

रमेशरावजी तांबट बंगलोर, त्यांचे मुळगांव उंबर्डा बाजार. नोकरी निमित्ताने बंगलोर (कर्नाटक) शहरात स्थायिक झालेत. प्रदेश नवा, माणसे अपरिचित, भाषा नवी, कुणीही नातेवाईक नाहीत, अशावेळी सर्वसामान्य व्यक्ति एकच काम करतो ते म्हणजे बदली करून स्वप्रांतात जाणे किंवा न जमल्यास नोकरी सोडून स्वप्रांतात येणे परंतु रमेशराव यांचा पिंडच वेगळा, त्यांची विचार करण्याची तऱ्हा वेगळी. खरं म्हणजे त्यांचे बुद्धी चातुर्य व भविष्याचा वेध घेणारी दूरदृष्टी तसेच जीवनात जोखीम पत्करण्याची हिम्मत व क्षमता या बळावर त्यांनी परप्रांतातच राहणे पसंत केले एवढेच नव्हे त्यांनी त्यांच्या भाऊबंधांना व स्वकीयांना तेथेच बोलावून घेतले. त्यांच्या हातात कौशल्य व काम दिले, त्यांना स्वतःच्या पायावर उभे केले, स्वयंपूर्ण केले, त्यांना स्वतःचा व्यवसाय थाटण्यात मदत केली व अशा रितीने सर्वप्रथम स्वतःला व आपल्या नातेवाईकांसाठी स्वतःची सामाजिक सुरक्षा निर्माण केली. याला म्हणतात परफेक्ट प्लानिंग.

त्यानंतर त्यांनी तेथील स्थानिकांसोबत देखील जीवाला जीव देणारे मित्रांशी नातेवाईकांसारखे संबंध स्थापित केले. ते जीवापाड जपले. या सर्व संबंधाच्या बळावर एकेकाळी अपरिचित अशा बंगलोर शहरात आज रमेश तांबट नावाचा ब्रँड तयार झाला. ''आज बंगलोर मे रमेश तांबट नाम का शिक्का चलता है भाई'' अस बंगलोर मध्ये म्हटले जाते.

समस्त कुंभार समाजासाठी ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे. त्यांच्याकडून समाज बांधवांनी प्रेरणा घ्यावी अशी ही बाब आहे कारण नुकतेच दि. १७/०९/२३ ला रमेशराव तांबट यांच्या मुलाचे इंटेरियर डेकोरेशनच्या अति भव्य शोरूमचे ओपनिंग झाले.

त्या क्षणाची काही क्षणचित्र समाजाच्या माहिती करिता शेअर करीत आहे.

सर्व समाज बांधव व मित्र परिवाराकडून त्यांना शुभेच्छा व त्यांचे खूप खूप अभिनंदन!!

***

वाळूज, जिल्हा सांगलीचे सुपुत्र उद्योजक विजयराव कुंभार यांचे हार्दिक अभिनंदन !!



पुणे : वाळूज तालुका खानापूर जिल्हा सांगलीचे सुपुत्र उद्योजक विजयराव कुंभार यांनी चेन्नई येथे PLYDEAL नावाचे मोठे प्लायवुड शोरूम आहे, खूप कमी कालावधीमध्ये त्यांनी प्लायवुड ट्रेडिंगच्या व्यवसायात खूप चांगला जम बसवला त्यांचा सत्कार कुंभश्री मित्र परिवार व समस्त कुंभार समाजातर्फे कुंभश्रीचे संपादक संजय राजे यांच्या हस्ते करण्यात आला. या प्रसंगी त्यांचे जावई उद्योजक संतोष कुंभार उपस्थित होते.

विजय कुंभार व सौ. वंदना यांनी खूप कष्टाने मुली सौ. रुपाली हिस चांगले शिक्षण दिले, कु. सोनाली हिने बी आर्च नंतर लंडन येथून एम एससी प्रोजेक्ट मॅनेंजमेन्ट डीग्री मिळवली व तेथेच नोकरी करते आहे. तसेच मुलगा अजय कुंभार हा नेदरलंडमध्ये airospace इंजिनियरिंग मधील उच्च शिक्षण (एम.एस.) करतो आहे. विजयराव स्वतः अल्पशिक्षित असून आपल्या दोन मुली आणि मुलाला उच्च शिक्षण दिले ही अत्यंत अभिमानास्पद गोष्ट आहे. पुनःश्च एकदा विजयराव व त्यांच्या परिवाराचे मनःपूर्वक अभिनंदन व शुभेच्छा!

***

कुंभार समाजोन्नती मंडळाच्या जिल्हाध्यक्षपदी बाबाजी कुंभार यांची निवड
वार्षिक सर्वसाधारण सभेत नव्या कार्यकारिणीची घोषणा


बाबाजी कुंभार


विशाल शिंदे


संतोष कुंभार

हिंजवडी : पुणे जिल्हा कुंभार समाजोन्नती मंडळाच्या अध्यक्षपदी आयटीपार्क जवळील मारुंजी गावचे बाबाजी कुंभार तर कार्याध्यक्षपदी पुण्यातील विशाल शिंदे यांची एकमताने निवड करण्यात आली.

कुंभार समाजोन्नती मंडळाची सर्वसाधारण सभा पुण्यातील वीर बाजीप्रभू पासलकर सभागृहात संपन्न झाली. महासंघाचे कार्याध्यक्ष सतीश पाषाणकर यांच्या अधिपत्याखाली झालेल्या सभेत यावेळी एकमताने नव्या कार्यकारणीची घोषणा करण्यात आली. यावेळी श्री संतश्रेष्ठ गोरोबाकाका पायी पालखी सोहळ्याच्या अध्यक्षपदी मावळचे संतोष कुंभार यांचीही फेरनिवड करण्यात आली. सर्व उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित पदाधिकऱ्यांचा सतिश पाषाणकर, रघुनाथ कुंभार, बाळासाहेब जेजुरीकर व संतोष कुंभार यांच्या हस्ते पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला. सर्व तालुका अध्यक्षांचे वतीने भगवान कुंभार यांनी स्वागत केले.

ऋषिकेश काशीद यांनी सभेचे सूत्रसंचालन केले तर सचिव रामचंद्र कुंभार (हाडशीकर) यांनी आभार मानले. या सभेला पुणे जिल्ह्यातून पांडुरंग कार्लेकर (गुरूजी) बाळासाहेब जेजुरीकर, नितीन राहूकर, राजेंद्र जाधव, उद्धव कुंभार, राजेंद्र सोमवंशी, संभाजी चांदेकर, अशोक वाडेकर, वसंत दरेकर, विजय कुंभार, योगेश कुंभार, प्रविण कुंभार, दत्तात्रय पांगारकर, दत्ता बावधनकर, संजीव भालेराव सर, अभिजित हातनोलकर, तानाजी दरेकर तसेच महिला आघाडीतील ज्योती शिंदे, महिला अध्यक्ष कल्पना शिंदे, जयश्री कुंभार, पल्लवी झोजे आदी मान्यवर उपस्थित होते.

तेर येथे संत गोरोबाकाका कुंभार असोसिएशनची बैठक उत्साहात

तेर : धाराशिव तालुक्यातील तेर संत शिरोमणी गोरोबा काका असोसिएशनची रविवारी (दि.१०) बैठक घेण्यात आली. मराठवाड्यात प्रथमच संत गोरोबा काकांच्या नगरीत अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ व अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या माध्यमातून क्लस्टर होत आहे. नियोजित क्लस्टरसाठी शेडचे बांधकाम व मशिनरी खरेदी व शेअर्स जमा करणे आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. भागधारकांनी ठरल्याप्रमाणे फेब्रुवारी २०२४ अखेर ही रक्कम क्लस्टरच्या बँक खात्यात जमा करण्याचे एकमताने ठरले. क्लस्टरचे मुख्य संचालक नागनाथ कुंभार यांनी





महाराष्ट्रातील सर्व कुंभार समाजबांधवांनी क्लस्टरमध्ये सहभाग घेण्याचे आवाहन केले. क्लस्टरसाठी लागणारी जमीन महादेवराव खटावकर (रा. तेर) यांनी दान केली आहे. त्या जमिनीवर हा प्रकल्प उभा रहाणार आहे. बैठकीस सर्व संचालक, अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे पदाधिकारी, जिल्ह्यातील कुंभार बांधव उपस्थित होते.

***

कु. तलीश राजेश जगदाळे याचे हार्दिक अभिनंदन!

– शरद वाडेकर



कु. तलीश राजेश जगदाळे, या नॅशनल इंग्लीश स्कुल, ICSE, विरार जि. ठाणे येथे इयत्ता सातवीत शिकणाऱ्या विद्यार्थ्याने आय.आय.टी. मुंबई टेकफास्ट (IIT Mumbai Techfast) तर्फे आयोजित आखिल भारतीय स्तरावरील चांद्रयान रोबोटिक्स स्पर्धेत तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक पटकावले. कु. तलीश हा नालासोपारा स्थित डॉ. यशवंत कुंभार यांचा नातू असुन डॉ. योगिता आणि इंजिनीअर राजेश जगदाळे यांचा चिरंजीव आहे. तलीशचे या स्पृहणीय यशाबद्दल हार्दिक अभिनंदन! पुढील उज्वल वाटचालीसाठी हार्दिक शुभेच्छा!

कुंभार समाजाच्या विविध मागण्यांसाठी उपमुख्यमंत्री मा. अजित दादा पवार यांना साकडे

– रमेश नामदेव गायकवाड (जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया नाशिक जिल्हा)



दिनांक ०२ ऑगस्ट २०२४ रोजी मा. उपमुख्यमंत्री अजितदादा पवार हे अभोणा येथे दौऱ्यावर आलेले असताना राष्ट्रवादी काँग्रेस शहराध्यक्ष (अभोणा) आणि जिल्हाध्यक्ष नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समिती सोमनाथ सोनवणे यांच्या नेतृत्वाखालील शिष्टमंडळाने त्यांची प्रत्यक्ष भेट घेऊन कुंभार समाजाच्या विविध मागण्यांचे निवेदन दिले. साहेबांसोबत चर्चा करताना कुंभार समाज सध्या अनुभवत असलेल्या अडीअडचणी आणि इतर विविध मुद्दयांवर सविस्तर चर्चा केली. चर्चे दरम्यान मातीच्या विटा, सणासुदीला लागणाऱ्या विविध वस्तू व मूर्ती बनविण्यासाठी उपयुक्त अशी जिल्ह्यातील विविध लहानमोठे धरणे, बंधारे आणि तळी यामध्ये साठलेला गाळ विनामूल्य उपसा करुन स्वखर्चाने वाहून नेणेसाठी परवानगी मिळावी यासाठी विनंती करण्यात आली. मा. जिल्हाध्यक्ष सोमनाथ सोनवणे यांनी माननीय उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांना दिलेल्या निवेदनास नाशिक शहर आणि नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीच्या सर्व पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा संपूर्ण पाठिंबा आहे.

नाशिक शहर आणि नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समितीचे

रमाकांत क्षिरसागर (संस्थापक अध्यक्ष), अशोकराव जाधव (उपाध्यक्ष नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समिती), तानाजी आष्टेकर (उपाध्यक्ष नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समिती), बापुराव गोरे (उपाध्यक्ष नाशिक जिल्हा कुंभार समाज विकास समिती), गोरक्षनाथ (गणेश) आहेर (शहराध्यक्ष नाशिक), वसंतराव कुंभार (विभागीय उपाध्यक्ष महाराष्ट्र प्रदेश), जगदीश मोरे (प्रदेशाध्यक्ष, सोशल मीडिया महाराष्ट्र राज्य), गंगाधर आप्पा जोर्वेकर (वधु वर सुचक आघाडी प्रमुख महाराष्ट्र प्रदेश), पुंडलिकराव सोनवणे (वधु वर सुचक आघाडी सचिव महाराष्ट्र प्रदेश), रमेश गायकवाड (जिल्हाध्यक्ष सोशल मीडिया नाशिक) आणि सोबत शहर, तालुका आणि जिल्ह्यातील विकास समितीचे सर्व पदाधिकारी व कार्यकर्ते.

***

पाच किल्ल्यांवरच्या मातीचे छत्रपती शिवाजी महाराजांचे शिल्प



कोल्हापूर : शिवजयंतीनिमित्त सर्व शिवभक्तांना छत्रपती शिवाजी महाराजांचे दर्शन घेण्यासाठी छत्रपती शिवाजी महाराजांच्या चरण स्पर्शाने पावन झालेले किल्ले त्यातील पन्हाळा, भुदरगड, अजिंक्य तारा, सज्जनगड आणि रायगड या पाच किल्ल्यांवरची माती आणि पाणी आणून सतिश वडणगेकर यांच्या कल्पनेतून त्या मातीचे छत्रपती शिवाजी महाराजांचे शिल्प तयार केले आहे.

छत्रपती शिवाजी महाराज यांचे शिल्प पाहण्यासाठी शाहुपूरी ७ वी कुंभार गल्ली येथे उपलब्ध आहे. या शिल्पासाठी ऋषीकेश पुंडलिक मालोरे (रायगड), अशोक कुंभार सातारा (अजिंक्यतारा, सज्जनगड), राजू उमेश कुंभार (पन्हाळा) या किल्ल्यांतील माती आणि पाणी देण्याचे सहकार्य केले. तसेच छत्रपती शिवाजी महाराज शिल्प तयार करण्यासाठी सतिश वडणगेकर यांना अमोल आरेकर, सचिन पुरेकर, मनोज वडणगेकर, शरद पुनाळकर, दिनकर कुंभार यांचे सहकार्य मिळाले.

ही मूर्ती करण्याचा विचार आधुनिक तंत्रज्ञानाची प्रगती झाल्यावर अतिदुर्गम भागातील गड–किल्ल्यांवर जाणे–येणे कमी झाल्याने गड–किल्ले पडले. काही ठिकाणी फक्त कागदावरच गड–किल्ल्यांची नावे दिसत आहेत. यासाठी प्रत्येकाने पुरातन गड–किल्ले शाबूत राखण्यासाठी सहभागी होणे गरजेचे असून गड–किल्ल्यांचे संवर्धन होणे काळाची गरज आहे. याबरोबरच छत्रपती शिवाजी महाराज यांनी कृषी क्षेत्राला खूप मोलाचं योगदान दिलं आहे. 'रयत सुखी तर राजा सुखी, शेतकरी सुखी तर राजा सुखी' हे छत्रपती शिवाजी महाराजांच्या राज्यकारभाराचे प्रधान सूत्र होते. विशेषतः प्रशासकीय जमीन महसूल, जल, राजकीय, लष्करी, मुलकी, न्यायालयीन, उद्योग, परराष्ट्रीय, आरमार, शैक्षणिक, धार्मिक, वतन, महिला यांच्या धोरणाप्रमाणेच छत्रपती शिवाजी महाराजांचे कृषी धोरण वर्तमान तसेच भविष्यकाळालाही हजारो वर्षे मार्गदर्शक ठरणारे आहे. यासाठी ही मूर्ती समाजाला प्रेरणा देण्यासाठी जाणीव करून देण्यासाठी ही मूर्ती तयार करण्याची कल्पना सतिश वडणगेकर यांनी केली.

संदीप सोनवणे 'प्रहार रत्न पुरस्कारा'ने सन्मानित



शिर्डी : राष्ट्रवादी काँग्रेसचे अजित पवार गटाचे राहता तालुका अध्यक्ष संदीप भीमाशंकर सोनवणे यांना प्रहार रत्न पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. शिर्डी येथील हॉटेल साई संगम येथे हा पुरस्कार सोहळा संपन्न झाला. सुप्रसिद्ध सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते संदीप सोनवणे यांना सन्मानित करण्यात आले. प्रहार रत्न व प्रहार जीवनगौरव पुरस्कार प्रदान सोहळा २०२४ श्री साईबाबांच्या पदस्पर्शाने पावन झालेल्या पुण्यभूमी शिर्डी नगरीत संपन्न झाला.

पुरस्कारार्थीना सिने अभिनेते मकरंद अनासपुरे, श्री साईबाबा संस्थानचे मुख्य कार्यकारी अधिकारी गोरक्ष गाडीलकर, दैनिक प्रहारचे महाव्यवस्थापक तसेच मुद्रक, प्रकाशक मनिष राणे, संपादक डॉ. सुकृत खांडेकर आदी मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. यावेळी दैनिक प्रहारचे लेखा व प्रशासकीय प्रमुख ज्ञानेश सावंत, वरिष्ठ विभागीय अधिकारी किशोर उजैनकर, जाहिरात विभागाचे उपव्यवस्थापक कौशल श्रीवास्तव, जाहिरात व्यवस्थापक दिनेश कहर, सहाय्यक मार्केटिंग अधिकारी चंदन पेडणेकर, नाशिक ब्युरो चीफ कुमार कडलग, जमीर शेख, अहमदनगर कार्यालयाचे उपसंपादक राजकुमार जाधव उपस्थित होते. या पुरस्काराबद्दल संदीप सोनवणे यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे. यामध्ये त्यांचे बंधू सुनील भीमाशंकर सोनवणे, पुणे राष्ट्रवादी काँग्रेसचे सरचिटणीस राहुल होले, प्रशांत उमाणे आदी मान्यवरांनी अभिनंदन केले.



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांची हॉटेल साईसंगम येथे सदिच्छा भेट प्रसंगी उपस्थित सौ. व श्री. सुनिल सोनवणे, सौ. व श्री. संदिप सोनवणे



संदिप सोनवणे यांच्या वाढदिवसानिमित्त सत्कार करताना महसुल मंत्री राधाकृष्ण विखे पाटील



सिने अभिनेते मकरंद अनासपुरे यांचा सत्कार करताना संदिप व सुनिल सोनावणे



उपमुख्यमंत्री अजितदादा पवार यांचे समवेत कुंभार समाज बांधव

भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्षपदी सुरेश बहाळकर यांची निवड



सुरेश बहाळकर यांना निवडीचे पत्र देताना भाजपा ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजयराव गाते

धुळे : धुळे जिल्हा खान्देश कुंभार समाज विकास व शैक्षणिक संस्थेचे अध्यक्ष सुरेश बहाळकर यांची भारतीय जनता पार्टी ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष पदी निवड करण्यात आली.

मुंबईत उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर, राज्याचे विधानसभा प्रभारी व केंद्रीय वन व पर्यावरण मंत्री, भूपेंद्र यादव, महामंत्री विजय चौधरी, भाजपा ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष संजय गाते, यांच्या प्रमुख उपस्थतीत सुरेश बहाळकर यांना नियुक्ती पत्र प्रदान करण्यात आले.

यावेळी ओबीसी आयोगाचे अध्यक्ष हंसराज अहीर, मंत्री अतुल सावे, आमदार कालिदास कोळंबकर, माजी खासदार संगमलाल गुप्ता, ओबीसी मोर्चा उपाध्यक्ष संजयजी जोरले, तसेच महाराष्ट्रातून कुंभार समाजाचे नेते, प्रदेशाध्यक्ष सतिष दरेकर, वरिष्ठ उपाध्यक्ष उमाजी सूर्यवंशी, कार्याध्यक्ष रमाकांत क्षिरसागर, नाशिक जिल्हाध्यक्ष सोमनाथ सोनवणे, राज्य महिला अध्यक्षा रसिकाताई खेडेकर, धुळे जिल्हा उपाध्यक्ष रतीलाल शेठ कुंभार, जिल्हा युवा अध्यक्ष किशोरभाऊ कुंभार, शिरपूर ता. अध्यक्ष गोकुळभाऊ कुंभार, धुळे जिल्हा प्रसिद्धी प्रमुख अनिल चित्ते आदी प्रमुख मान्यवर यावेळी उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या सागर बंगल्यावर उपस्थित होते.

२०२४ च्या लोकसभा निवडणुकीत त्यांनी माजी केंद्रिय मंत्री डॉ. सुभाष भामरे, भाजपा जिल्हाध्यक्ष गजेंद्र अंपळकर, तसेच विधानसभा प्रमुख अनुपभैया अग्रवाल यांच्या प्रमुख उपस्थितीत भारतीय जनता पक्षात प्रवेश केला होता. ते कायम पक्षाशी एकनिष्ठ राहिले त्यांच्या याच कार्याची दखल राज्य पातळीवर देखील घेतली गेली व आज त्यांना ओबीसी मोर्चा महाराष्ट्र प्रदेश उपाध्यक्ष या पदाची जबाबदारी दिली गेली. त्यांनी केंद्रिय मंत्री भूपेंद्र यादव, ओबीसी मोर्चा प्रदेशाध्यक्ष संजयजी गाते, ओबीसी आयोगाचे हंसराजजी आहीर, संजयजी जोरले, मंत्री अतुलजी सावे यांचे त्यांनी मनापासून आभार मानले आहेत. त्यांच्या निवडीचे धुळे जिल्हा कुंभार समाज कार्याध्यक्ष सुभाष कुंभार शिरपूर, धुळे जिल्हा उपाध्यक्ष रतीलाल कुंभार, रमेश बहाळकर सरचिटणीस धुळे जिल्हा, अनिल भाऊ चित्ते प्रसिध्दी प्रमुख धुळे जिल्हा विजय ठाकरे साक्री तालुका अध्यक्ष गोकुळ कुंभार शिरपूर तालुका अध्यक्ष, विजय कुंभार शिंदखेडा तालुका भानुदास वाघ धुळे तालुका अध्यक्ष, मिलिंद कुंभार धुळे जिल्हा, प्रवीण धाडे. श्रीराम मोरे निजामपूर शेखर बागुल सुरेश जगदाळे, नारायण जगदाळे, नेर धुळे जिल्हा संपर्क प्रमुख, भरत बापू वाघ धुळे जिल्हा तालुका संपर्क प्रमुख, दिनेश वाघ शिंदखेडा तालुका अध्यक्ष, मिलिंद कुंभार धुळे जिल्हा संपर्क धुळे शहर, शांताराम चव्हाण धुळे शहर अध्यक्ष, मनसुखभाई कोशीया नियोजन समिती, प्रवीण धाडे वीट उद्योग, धुळे जिल्हा अध्यक्ष, रमेश पितांबर कुंभार जेष्ठ मार्गदर्शक, विश्वास कुंभार शिरपूर, सुनील हिवरकर धुळे विटभट्टी आघाडी, भूषण कुंभार शिरपूर धुळे जिल्हा युवा उपाध्यक्ष, अनिल कुंभार होळनाथे, हिम्मत चित्ते, राजेंद्र चित्ते यांच्यासह आदिंकडून कौतुक करण्यात आले आहे.

अंदुरा येथील किशोर कापडे उत्कृष्ट वीट उद्योजक पुरस्काराने सन्मानित



अंदुरा येथील किशोरभाऊ कापडे तसेच डॉ. मनोज अग्रवाल यांना मा.नितीनजी गडकरी यांचे हस्ते दिल्ली येथे उत्कृष्ट वीट उद्योजक पुरस्कार देण्यात आला त्याकरिता त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन!

दिल्ली : बाळापूर तालुक्यातील हाता अंदुरा येथील स्वामी ब्रिक्सचे संचालक तथा स्व. देवराव कापडे यांचे सुपुत्र किशोर कापडे यांना नुकताच दिल्ली येथे आयोजित कार्यक्रमात उत्कृष्ट 'वीट' उद्योजक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. सदर पुरस्कार बुधवार दि. २४ जुलै रोजी केंद्रीय मंत्री मा. नितीनजी गडकरी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला. किशोर कापडे हे स्व. देवराव कापडे यांचे सुपुत्र असून देवराव कापडे यांनाही 'उद्योगरत्न' पुरस्काराने सन्मानित करण्यात आले होते. किशोर कापडे यांना मिळालेल्या पुरस्काराने कुंभार समाज विकास परिषदेचे संस्थापक अध्यक्ष रामकृष्ण साविकर, तसेच उद्योजक तुळशीदास तळोकार, रामदास गाडेकर (गुरुजी) राम मेहरे, सुनील साविकर, रवींद्र सोनावणे, ॲड लखन बडदिया, प्रा. दिलीप अमुरकार, गणेश पासुळकर, रामदास सरोदे, रमेश कोल्हे, संतोष सरोदे, अमोल प्रजापती, धनराज सोनावणे, इत्यादी कुंभार समाज बांधवांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

***

वीटभट्ट्यांचे सौरऊर्जेकडे पाऊल
उत्तर प्रदेशात कोळशाऐवजी सौर पॅनेलला पसंती





अलिगड : येथील वीटभट्टीत सौर ऊर्जेसाठी उभारलेले सौर पॅनेल दाखविताना वीटभट्टी मालक ओम प्रकाश शर्मा.

कोडियागंज/पिलाखाना (उत्तर प्रदेश) : वीटभट्टीच्या चिमणीतून निघणारा धूर सौर पॅनेलवर जमलेल्या आकाशातील पावसाळी ढगांना बिलगतो आणि त्यातून प्राचीन व आधुनिक तंत्रज्ञानाचे अनोखे मिश्रण होते. पश्चिम उत्तर प्रदेशात सौर ऊर्जा छोट्या–मोठ्या मार्गाने जीवनात बदल घडवत आहे. सौर ऊर्जेमुळे पारंपरिक वीटभट्ट्यांतील प्रदूषण तर कमी झाले आहेच, शिवाय परिसरातील खेड्यांना वीज व डिजिटल जोडणी उपलब्ध झाली आहे.

विजेची गरज पूर्ण करण्यासाठी उत्तर प्रदेशातील अलिगड जिल्ह्यातील कोडियागंज, पिलाखाना आणि अकराबादमधील आठ वीटभट्ट्यांनी कोळशाऐवजी सौर पॅनेलचा वापर करण्यास सुरूवात केली आहे. जिल्ह्यातील ५५५ वीटभट्ट्यांपैकी या आठ वीटभट्ट्यांनी आदर्श निर्माण केला आहे, असे उत्तर प्रदेश प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या अहवालात म्हटले आहे.

सौर ऊर्जेचा वापर करणाऱ्या वीटभट्टीचे मालक ओम प्रकाश शर्मा म्हणाले, की सौर पॅनेलच्या उभारणीचा सुरुवातीचा खर्च सात लाखांपर्यंत जातो. मात्र, त्याचे अनेक दीर्घकालीन फायदे आहेत. मी ४५५ वॉटचे प्रत्येकी १६ सौर पॅनेल उभारले आहेत. वीटभट्टीतील जनरेटरमधून वीजनिर्मिती करण्यासाठी या सौर ऊर्जेचा वापर केला जातो. जनरेटरमधून निर्माण झालेली वीज वीटभट्टीसाठी वापरली जाते.

प्रत्येक महिन्याला सौर पॅनेलमधून ५० हजारांची बचत होते. त्याचप्रमाणे, वीटभट्टी कामगारांच्या झोपड्यांनाही वीज पुरवठा केला जात असून त्यासाठी अधिक खर्च येत नाही, असेही त्यांनी सांगितले.

एरवी अंधारातच राहावे लागणारे वीटभट्टी कामगारही झोपडीत वीज आल्याने आनंदी झाले आहेत. एरवी मोबाईल चार्ज करण्यासाठीही या कामगारांना साडेतीन किमीवरील पिलाखाना येथे जावे लागत होते. त्यासाठी प्रतितास दहा रुपयेही द्यावे लागत होते आता घरीच मोबाईल चार्ज करू शकत असल्याचे अनिल या अठरावर्षीय वीटभट्टी कामगाराने सांगितले. वीज आल्याने घरी अभ्यास करून दहावी उत्तीर्ण होईन, असा विश्वास व्यक्त करत साप व इतर प्राण्यांच्या हल्ल्यांची भीती कमी झाल्याचेही त्याने सांगितले. त्याआधी कामगारांना रात्री दक्ष राहून गस्तही घालावी लागत असे.

केवळ वीटभट्ट्यांचे मालकच सौर पॅनेलमध्ये गुंतवणूक करत नसून कामगारही विजेची आपली दैनंदिन गरज भागविण्यासाठी छोट्या सौर पॅनेलमध्ये गुंतवणूक करत आहेत. ४० वॉटच्या १,७०० रुपयांच्या सौर प्लेटमुळे प्रत्येकी एक पंखा, बल्ब, चार्जिंग पॉईंट चालू शकतो. कामगारांना दर महिना आठ हजार रुपये वेतन मिळते. दररोज एक हजार विटांसाठी त्यांना ३०० रुपये मिळतात.

****

मी सर्वप्रथम सौर पॅनेल पाहिले तेव्हा ते नक्की काय आहे, हे समजले नाही. ते कोळसा आणि तेलाची जागा घेतील, असे सांगितले गेले. मात्र, या सौर पॅनेलमुळे आम्हाला काय फरक पडेल, याचे आम्हाला आश्चर्य वाटले. आमच्या झोपड्यांत वीज आल्यानंतर आम्हाला खरे महत्त्व समजले. इतके दिवस आम्हाला वीज नसल्याने तेलाच्या दिव्यावरच अवलंबून राहावे लागत होते. - कलावती, वीटभट्टी कामगार

एक लाख देशातील एकूण वीटभट्ट्या (अंदाजे) – २५० अब्ज
दरवर्षी निर्माण होणाऱ्या विटा – १.५ कोटी
एकूण कामगार – ३.५ कोटी टन कोळशाचा वापर

कुंभश्री मित्र परिवाराच्या सभासदांना दिपावलीच्या हार्दिक शुभेच्छा!



निवास
५४, जानकीनगर, पंचायत समिती
कार्यालय समोर, वाडीभोकर रोड,
देवपूर, जि. धुळे ४२४ ००२.



श्री. दगाजी धुडकू चव्हाण — सौ. ठर्मिलाबाई दगाजी चव्हाण
कुंभश्री प्रतिनिधी धुळे जिल्हा

इंजि. हेमंतकुमार दगाजी चव्हाण (कार्यकारी अभियंता) — **सौ. सुरेखा हेमंतकुमार चव्हाण**

प्राध्यापक रविंद्रनाथ विश्वनाथ मेनकर — **सौ. योजना रविंद्रनाथ मेनकर**

डॉ. गोकुळ भाऊराव चित्ते — **सौ. वैशाली गोकुळ चित्ते**

इंजि. किरण धोंडीराम जगताप MBA — **सौ. आश्विनी किरण जगताप**

इंजि. प्रितेश मेनकर B.E.Mech., चि. शिवम चव्हाण, कु.शिवानी चित्ते, चि. शिवांशु मेनकर, चि. ओम व शिवाग जगताप, कु. सानवी चित्ते.

'डॉक्टर्स डे'च्या निमित्ताने डॉ. कुंभार दाम्पत्याचा सन्मान
फलटण लायन्स क्लबने केला मान्यवरांचा गौरव



फलटण : नेत्रतज्ज्ञ डॉ. विकास कुंभार आणि डॉ. सौ. सुषमा कुंभार यांचा सन्मान करताना सौ. स्वाती चोरमले व क्लबच्या पदाधिकारी.

फलटण : फलटण लायन्स क्लबच्या वतीने डॉक्टर्स डे च्या निमित्ताने नेत्रतज्ज्ञ डॉ. विकास कुंभार आणि डॉ. सौ. सुषमा कुंभार यांचा क्लबच्या नूतन अध्यक्षा सौ. स्वाती चोरमल सन्मान करण्यात आला. डॉक्टर कुंभार हे दांपत्य गेली २२ वर्षांपासून फलटण शहरामध्ये अविरतपणे रुग्णांची सेवा करीत आहेत. त्यांचे सुसज्य असे दृष्टी हॉस्पिटल फलटण येथे सुरु असून हजारो रुग्णांना दृष्टी देण्याचे पवित्र काम त्यांच्या हातून होत आहे.

अगदी लहान मुलांपासून वयोवृद्धांपर्यंत खूप अवघड ऑपरेशन्स त्यांनी केली असून कितीतरी रुग्णांची दृष्टी गेली होती ती परत त्यांना चांगली दृष्टी देण्याचं खूप मोठं कार्य केले आहे. त्यांनी बऱ्याच गावांमध्ये मोफत नेत्रशिबीर घेतली आहेत. यावेळी डॉ. सौरभ खराडे आणि डॉ. सौ. सई खराडे यांचाही सन्मान करण्यात आला.

खराडे दांपत्याचे सुसज्य असे साई हॉस्पिटल असून त्यांनी वैद्यकीय क्षेत्रामध्ये अतिशय उत्कृष्ट असे कार्य केले आहे. खूप रुग्णांचे प्राण वाचवण्याचे खूप मोठं पवित्र काम त्यांचे हातून झाले आहे. चार्टर्ड अकौंटंट सुजय चव्हाण यांचेही काम गेली २० वर्षांपासून अतिशय उल्लेखनीय असून यावेळी सीए डे च्या निमित्ताने त्यांचा सन्मान करण्यात आला.

यावेळी लायन्स क्लब फलटण गोल्डनच्या नूतन अध्यक्षा सौ. स्वाती चोरमले, माजी अध्यक्षा सौ. निलम देशमुख, संस्थापक अध्यक्ष सौ. उज्वला निंबाळकर, संचालिका सौ. सुनिता कदम, माजी अध्यक्ष सुनंदा भोसले तसेच पदाधिकारी, सदस्या उपस्थित होत्या.

***

वैभवी बनली डिझाइन इंजिनीअर
१७ लाखांच्या पॅकेजने पंखांना मिळाली ताकद



दहावीत ९६ टक्के गुण मिळवल्या नंतर आर्थिक परिस्थिती अभावी शिक्षणाचे मार्ग खुंटलेल्या वैभवी जोर्वेकरला 'मटा हेल्पलाइन'ने दिलेला मदतीचा हात आज तिच्या आयुष्यात वैभव घेऊन आला आहे.

पुण्यातील 'कॅडेन्स डिझाइन सिस्टीम' या कंपनीत वैभवी नुकतीच डिझाइन व्हेरिफिकेशन इंजिनीअरिंग म्हणून रुजू झाली असून, तिला १७ लाखांचे पॅकेज मिळाले आहे. या प्रवासात 'मटा हेल्पलाइन'ने दिलेला आधार महत्त्वाचा असल्याचे ती आवर्जून सांगते.

दहावीचा निकाल जाहीर होणारा दिवस अनेकांच्या आयुष्यात उज्वल यशासोबत भविष्यातील शिक्षणाच्या आर्थिक तरतुदीची चिंताही घेऊन येतो. असाच दिवस २०१८ मध्ये वैभवी विनोद जोर्वेकर या कोठारी कन्याशाळेतून दहावीत ९६ टक्के गुण मिळविलेल्या विद्यार्थिनीच्या आयुष्यात आला. वडील रिक्षाचालक आणि आई गृहिणी. वडिलांच्या कमाईवरच सगळं अवलंबून असल्याने चांगले मार्क मिळूनही इंजिनीअरिंगचा खर्च कसा पेलवणार, हा प्रश्न या कुटुंबापुढे होता.

फी भरण्याची परिस्थिती नसल्याने सायन्स शाखा आपल्यासाठी नाही हे मी मनाशी पक्कं केलं होतं. दुसऱ्या शाखेला प्रवेश घेण्यादरम्यान 'मटा'मध्ये माझी बातमी प्रसिद्ध झाली आणि वाचकांनी माझ्यासाठी सढळ हाताने आर्थिक मदत उभी केली. या मदतीमुळे मी आज स्वतःच्या पायावर उभी आहे. या मदतीची परतफेड म्हणून मी ही 'मटा हेल्पलाइन'च्या विद्यार्थ्यांना मदत करणार आहे. - वैभवी जोर्वेकर

याच वेळी वैभवीच्या यशाची आणि परिस्थितीची दखल घेत 'मटा हेल्पलाइन'मधून तिच्याबाबतची माहिती प्रसिद्ध झाली. या गुणी मुलीच्या स्वप्नांना आधार देण्यासाठी दानशूर नाशिककरांनी ३ लाख २० हजारांची मदत उभी केली आणि तिच्या शिक्षणाच्या मार्गातील जणू सगळे अडथळेच दूर झाले. नाशिकमध्ये बारावीपर्यंत शिक्षण घेऊन 'एमएचटी-सीईटी'ला ९५ पर्सेंटाइल मिळवत वैभवीने पुण्याच्या 'व्हीआयटी'मधून, नुकतीच इलेक्ट्रॉनिक अँड टेलिकम्युनिकेशनची पदवी मिळविली आहे. कॅम्पस इंटरव्ह्यूच्या माध्यमातून तिची 'कॅडेन्स डिझाइन सिस्टीम' या कंपनीत निवड झाली असून, १ जुलैपासून १७ लाखांच्या पॅकेजसह ती येथे डिझाइन व्हेरिफिकेशन इंजिनीअरिंग म्हणून रुजू झाली आहे.

***

संत गोरा कुंभार नागरी सह. पत. चिपळूण संस्थेच्या चौथ्या सावर्डे शाखेचा उद्घाटन सोहळा

चिपळूण संगमेश्वर मतदार संघाचे कार्य सम्राट आ. शेखरजी निकम सर यांच्या शुभहस्ते करण्यात आले.



कार्यक्रमाची सुरुवात मान्यवरांच्या हस्ते दिप प्रज्वलन व संत गोरोबाकाकांच्या प्रतिमेस पुष्पमाला अर्पण करून शुभारंभ करण्यात आला. या कार्यक्रमाला सावर्डे सरपंच सौ. समिक्षा बागवे, दहिवली सरपंच सौ. कल्पना घाग, प्रदेश अध्यक्ष सतिश दादा दरेकर, कार्याध्यक्ष रमाकांत क्षिरसागर, उपाध्यक्ष वसंतराव घोडनदिकर, कोषाध्यक्ष अनंत कुंभार, सोमनाथ सोनवणे, वसंत कुंभार, पांडुरंग कुंभार, विश्वंभर मैदाड, अशोक जाधव, गणेश आहेर, प्रविण जाधव, अण्णा राहूकर, प्रकाश फुल गांवकर, बाळूशेठ मोहिरे, संजय कोकाटे, शौकत माखजनकर, गांवकर... रघुनाथ भुवड, रुपेश घाग, गोविंद साळवी, जिल्हाध्यक्ष सुभाषजी गुडेकर, तालुकाध्यक्ष प्रकाश शेठ साळवी, चेअरमन तुकारामबाबा साळवी, व्हा. चेअरमन तुकारामभाऊ टेरवकर, प्रकाश महाराज निवळकर, रविशेठ साळवी, खजिनदार जनार्दन मालवणकर, सचिव अमोल पिरदन कर, सह सचिव प्रकाश शिरकर, प्रकाश कराडकर, तुकारामशेठ साळवी, अंकुश कुंभार, दिपकबुवा साळवी, सोनू कुंभार, रामचंद्र चिपळूणकर, दिपक शिरकर, अनंत गुडेकर, सुधीर गुडेकर, बावाशेठ गुडेकर, किशोर साळवी, संजय गुडेकर, राकेश भैरवकर, सुनिल (नाना) टेरवकर, बबनशेठ पडवेकर, सुनिल निवळकर, सुरेश कोळथरकर, महिला जिल्हाध्यक्षा सौ. रुक्मीणी कुंभार, तालुकाध्यक्षा सौ. ऋतुजा शिरकर, सौ. सुमन साळवी, सौ. विमल साळवी, तंटामुक्ती अध्यक्ष अण्णा गुडेकर, वधु वर सुचक अध्यक्ष महेंद्र शिरकर गुरुजी, मनोहर बुरबाडकर, तुकाराम बुरबाडकर, महेंद्र कराडकर, लक्ष्मण पालकर, सुभाष शिरकर, सतीश साळवी, गुहागर संपर्क प्रमुख नाना पालकर, युवा नेता उमेश खैर, मिडिया अध्यक्ष प्रमोद साळवी, लांजा युवा तालुकाध्यक्ष पंढरीनाथ मायशेटये व सहकारी, जिल्हा युवा अध्यक्ष महेश पडवेकर व सहकारी, युवा तालुकाध्यक्ष दिनेश वहाळकर व सहकारी, कोंकण उपाध्यक्ष संतोष साळवी, युवा उपाध्यक्ष प्रदिप शिरकर, पतसंस्था सर्व समन्वयक, मिडिया जिल्हाध्यक्ष रविंद्र शिरकर व अनिल पडवेकर, सावर्डे पंचक्रोशितील सर्व समाज बांधव. सर्व मान्यवरांचा शाळ, श्रीफळ व बुके देवून यथोचित सत्कार करण्यात आला.

सरपंच सौ. बागवे मॅडम, प्रदेशाध्यक्ष सतिषदादा दरेकर व कार्याध्यक्ष रमाकांत क्षिरसागर यांची यथोचित भाषणे झाली व संस्थेला शुभेच्छा दिल्या. तालुकाध्यक्ष प्रकाश शेठ साळवी यांनी संस्थेबद्दल माहिती दिली व संचालक सुनिल (नाना) टेरवकर यांच्या आभार प्रदर्शनाने सभेची सांगता झाली.

उंडाळेतील शिक्षकाची अयोध्येत चित्रे. मंदिरात करणार रामायणातील प्रसंगांवर रेखाटन



उंडाळे : चित्र रेखाटन करताना किरण कुंभार.

उंडाळे : अयोध्येतील श्रीराम मंदिराचा उद्घाटन सोहळा होणार आहे. त्या सोहळ्यापूर्वीचे तेथील चित्र रेखाटण्यासाठी येथील कलाशिक्षक किरण कुंभार यांची निवड झाली आहे. सध्या ते काले येथील महात्मा गांधी विद्यालयात सेवेत आहेत. राम मंदिराचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते होणाऱ्या उद्घाटन सोहळ्यापूर्वी श्री. कुंभार चित्र रेखाटणार आहेत. अयोध्या येथे प्रत्यक्ष चित्र रेखाटण्यासाठी त्यांना बोलावण्यात आले आहे. त्यासाठी देशातून २० चित्रकारांची निवड झाली आहे. त्यात येथील चित्रकार श्री. कुंभार यांचा समावेश आहे.

पुणेस्थित ओंडच्या शिक्षकाचीही निवड : ओंड येथील चित्रकार दिलीप माळी यांचाही त्या २० जणांत समावेश आहे. श्री. माळी सध्या पुणे येथे नोकरीस आहेत. पुण्याच्या प्रेरणा हायस्कूल येथे ते कलाशिक्षक म्हणून नोकरीस आहेत. त्यांनाही अयोध्येत चित्र काढण्यासाठी निमंत्रण देण्यात आले आहे. श्री. माळीही १८ ते २१ जानेवारीअखेर तेथे असणार आहेत. श्री. कुंभार यांच्यासह श्री. माळी यांची निवड झाल्याने कऱ्हाड तालुक्यातील दोन चित्रकारांची अयोध्येच्या राममंदिरात चित्र रेखाटने असणार आहेत.

किरण कुंभार १४ ते १७ जानेवारी या कालावधीत तेथे जाणार आहेत. त्यासाठी त्यांच्या प्रवासाची व तेथे राहण्याची सर्व सोय मंदिर समितीने केली आहे. श्री. कुंभार रयत शिक्षण संस्थेच्या महात्मा गांधी विद्यालय काले येथे कलाशिक्षक म्हणून कार्यरत आहेत. अयोध्येतील श्रीराम मंदिर परिसरात काही चित्रे लावण्यात येणार आहेत. श्रीराम

मंदिर सोहळ्याच्या उद्घाटनाचे निमंत्रण श्री. कुंभार यांना आहे. श्री. कुंभार कलाशिक्षक आहेत. त्यासोबतच ते चित्रकार आहेत. अयोध्येतील रामानंद मिशन ट्रस्ट आणि मुंबईच्या वाची आर्ट गॅलरी यांच्या वतीने चित्र मागवण्यात आली होती. त्यात कुंभार यांची निवड झाली. श्री. कुंभार येथे सध्या श्रीरामाचे चित्र रेखाटत आहेत. ते चित्र आणि प्रत्यक्ष मंदिरात १४ जानेवारीला रेखाटले जाणारे चित्र अशीच दोन चित्र मंदिरात लावणार आहेत.

***

पंढरपूर येथे 'मनोज गोयल' यांच्या हस्ते विद्युत चलित चाक वितरण कार्यक्रम संपन्न





सातारा जिल्ह्यातील कुंभार समाज बांधवांना दि. २१/१२/२३ रोजी पंढरपूर येथे खादी ग्रामोद्योग चे विद्यमान चेअरमन मनोज गोयल साहेब यांच्या हस्ते कुंभार सशक्त मिशन योजने अंतर्गत इलेक्ट्रिक चाकांचे वितरण करण्यात आले. त्याप्रसंगी अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या वतीने चेअरमन साहेबांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे संस्थापक अध्यक्ष मोहनरावजी जगदाळे, संस्थेचे प्रदेशाध्यक्ष श्याम शेठ राजे, मातीवर कला बोर्डाचे अध्यक्ष दत्ताजी डाळजकर, विट भट्टी आघाडी अध्यक्ष तसेच सातारा जिल्हा कार्याध्यक्ष बळवंत कुंभार आणि सातारा जिल्हा पदाधिकारी किरण कुंभार सोळशी, अंकुशराव कुंभार बावधन आणि सुहास कुंभार ओझर्डे यांचे उपस्थित विद्युत चलित चाक वितरण कार्यक्रम संपन्न झाला.

***

कुं.स.सामा.संस्था ता. सुधागड जि. रायगड येथे मातीकाम व प्रशिक्षण कार्यक्रम संपन्न





कुंभार समाज सामाजिक संस्था तालुका सुधागड जिल्हा रायगड संस्थे मार्फत दिनांक २२/१२/२३ रोजी सकाळी ११ वा. कार्यालय विकास आयुक्त (हस्त शिल्प), वस्त्र मंत्रालय, भारत सरकार मार्फत घेण्यात आलेल्या चौपाळ कार्यक्रम अंतर्गत आर्टिझन कार्ड (terracotta) मातीकाम व प्रशिक्षण देण्यासंदर्भात माहिती देण्यासाठी सुरेंद्र मसराम (सर) वरिष्ठ सहाय्यक निर्देशक (ह) अशिष (सर) तरडे सहाय्यक अभियंता, डी.टी. सारंग, मल्टी तास्किंग स्टाफ तसेच ज्याच्या प्रयत्नातुन कार्यक्रम घेण्यात आला असे कुंभार समाज सामाजिक संस्था जिल्हा रायगड, संस्थेचे अध्यक्ष अनंत पां. महाडकर जि. कार्यकारणी सदस्य रामदास साळवी, कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी जिल्हा कार्यकारिणी सदस्य प्रविण कुंभार, तालुका अध्यक्ष सुनिल वाघोसकर, तालुका महिला अध्यक्षा सौ. सोनाली कुंभार, परळी अध्यक्षा सौ. सुजाता कुंभार, पाली अध्यक्षा श्रीमती. वच्छा कुंभार तालुक्यातील समाज बांधव व महिला वर्ग बहुसंख्येने उपस्थित होते. तसेच जिल्हा कार्यालय सचिव मधुकर कुंभार, सल्लागार वसंत कुंभार उपस्थित होते व तालुका सचिव यांनी आलेल्या मान्यवरांचे आभार मानुन कार्यक्रमाची सांगता करण्यात आली.

***

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना फुले - आंबेडकर साहित्य पुरस्कार



डॉ. नागोराव कुंभार

लातूर : येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्रे विद्याशाखेचे पहिले अधिष्ठाता (डीन) आणि विद्यापीठाच्या पहिल्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व महाराष्ट्रामध्ये वैचारिक साहित्याला वाहिलेल्या विचारशलाका या त्रैमासिकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था व फुले–आंबेडकर साहित्य पंचायत, सातारा या संस्थांच्या वतीने देण्यात येणारा २०२३–२४ चा फुले–आंबेडकर साहित्य पुरस्कार यांना जाहीर झाला आहे, अशी घोषणा भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक माजी आमदार लक्ष्मण माने यांनी केली आहे.

या पुरस्काराचे वितरण संस्थेचे अध्यक्ष आणि देशातील ज्येष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या शुभहस्ते ९ जुलै २०२४ रोजी सकाळी दहा वाजता शारदाश्रम जकातवाडी, सातारा येथे केले जाणार आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान माजी खासदार श्रीनिवास पाटील हे भूषविणार आहेत.

भारतीय भटके–विमुक्त विकास व संशोधन संस्था व फुले–आंबेडकर साहित्य पंचायत या संस्थांच्या वतीने दरवर्षी या पुरस्काराचे आयोजन केले जाते. यंदाच्या वर्षी फुले–आंबेडकर साहित्य पुरस्कारासाठी निवड झालेल्या प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी गेले ३८ वर्षे सातत्य व गुणवत्ता टिकवून 'विचारशलाका' या नियतकालिकाचे संपादन करीत आहेत. राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर या विचारधारेचा आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आदी मूल्ये आणि तत्त्वांचा तसेच भारतीय संविधान यांच्या प्रचार व प्रसाराचे कार्य प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी मराठवाड्यातील लातूरसारख्या शहरात राहून 'विचारशलाका' चालवून समाजप्रबोधनाचे मोठे कार्य अत्यंत व्रतस्थवृतीने केलेले आहे. प्राचार्य डॉ. कुंभार त्यांच्या मार्गदर्शनाखाली ५ विद्यार्थी एमफील व ११ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांनी समाजप्रबोधनाच्या दृष्टीने म. गांधीजींचे सामाजिक तत्त्वज्ञान, महात्मा गांधीजींची सत्याग्रहाची संकल्पना, भ्रष्टाचार : स्वरुप व संदर्भ, डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, महाराष्ट्रातील ध्येयवादी तत्त्वचिंतक, सामाजिक कार्याच्या दिशा, विचारतरंग, तरुण मनाच्या वाटा आणि वळणे आदी ग्रंथाचे लेखन आणि तसेच त्यांनी चिंतन एका कुलगुरुचे, शिक्षण विचार, महाराष्ट्रातील समाजचिंतन, सर्वस्पर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण आदी ५० ग्रंथांचे संपादन केलेले आहे. त्यांनी शासकीय आणि निमशासकीय विविध समित्यांमध्ये लोकोपयोगी कार्य केलेले आहे. त्यांनी सदस्य राज्य मागासवर्ग आयोग, अध्यक्ष महाराष्ट्र तत्त्वज्ञान परिषद, सदस्य महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, सदस्य महाराष्ट्र राज्य दर्शनिका संपादक मंडळ आणि पुणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या तत्त्वज्ञान अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून भरीव कार्य केलेले आहे.

ते महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार, आंतरराष्ट्रीय शिक्षण व व्यवस्थापन संस्था, दिल्लीचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, महाराष्ट्र फौंडेशनचा ५०,०००/– चा पुरस्कार आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा श. वा. किर्लोस्कर पुरस्कार या व इतर अनेक पुरस्कारांनी ते सन्मानित आहेत. या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले जाते आहे.

'भारतीय कुंभार समाजातील ग्रंथ' अनमोल संशोधन - ढंगारे



शिरसगाव : जगाच्या कल्याणा संतांच्या विभुती असतात. संत जे बोलतात त्यात तथ्य आणि समाजप्रबोधन असते. अशा संतवाटेवर प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी लिहिलेला 'भारतीय कुंभार समाजातील संत' हा ग्रंथ अनमोल संशोधन ग्रंथ असल्याचे मत ह.भ.प. हरिनाथ ढंगारे महाराज यांनी व्यक्त केले. श्रीरामपूर येथील सूतगिरणी रोडवरील श्रीसंत गोरा कुंभार मंदिरात आयोजित कै. सीताराम मारुती रसाळ : एक संतत्त्व आणि ममत्त्व विषयावर विवेचन करताना श्रीसंत गोरा कुंभाराचे मोठेपण त्यांनी सांगितले. त्यावेळी मंदिरात डॉ. बाबुराव उपाध्ये यांनी ह.भ.प. हरिनाथ ढंगारे महाराज यांचा सत्कार केला. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी योगेश रसाळ, भोकर येथील जगन्नाथ मंदिराचे अध्यक्ष व हरेकृष्ण सत्संग केंद्र प्रमुख चैतन्य करणदास झिने महाराज, भाऊसाहेब तुळशीराम रसाळ आदी उपस्थित होते. डॉ. उपाध्ये म्हणाले, 'भारतीय कुंभार समाजातील संत' ह्या ग्रंथास विद्यापीठ अनुदान आयोग नवी दिल्ली यांचे अनुदान मिळाले. त्यातूनच हे संशोधन झाले, असे दुर्लक्षित संशोधन पुस्तक रुपाने प्रकाशित होणे गरजेचे असल्याचे पत्र अनुदान आयोगाने कळविले. पुणे येथील डॉ. स्नेहल तावरे यांच्या स्नेहवर्धन प्रकाशनतर्फे हा ग्रंथ प्रकाशित झाला.

***

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना फुले-आंबेडकर साहित्य पुरस्कार प्रदान हस्ते शरदचंद्र पवार



डॉ. नागोराव कुंभार यांना पुरस्कार प्रदान करताना मा. शरदचंद्र पवार, मा. खासदार श्रीनिवास पाटील व मान्यवर

सातारा – लातूर : येथील महात्मा बसवेश्वर महाविद्यालयाचे सेवानिवृत्त प्राचार्य, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या सामाजिक शास्त्र विद्याशाखेचे पहिले अधिष्ठाता (डीन) आणि विद्यापीठाच्या पहिल्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य व महाराष्ट्रामध्ये वैचारिक साहित्याला वाहिलेल्या ''विचारशलाका'' या त्रैमासिकाचे संपादक प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांना सातारा येथील भारतीय भटके विमुक्त विकास व संशोधन संस्था व फुले–आंबेडकर साहित्य पंचायत, सातारा या संस्थांच्यावतीने देण्यात येणारा २०२३–२४ चा फुले–आंबेडकर साहित्य पुरस्कार जाहीर झाला आहे अशी घोषणा भटक्या विमुक्त जमाती संघटनेचे अध्यक्ष सुप्रसिद्ध साहित्यिक माजी आमदार लक्ष्मण माने यांनी केली आहे. या पुरस्काराचे वितरण संस्थेचे अध्यक्ष आणि देशातील जेष्ठ नेते खासदार शरद पवार यांच्या शुभ हस्ते ०९ जुलै २०२४ रोजी सकाळी दहा वाजता शारदाश्रम जकातवाडी, सातारा येथे होणार आहे. या समारंभाचे अध्यक्षस्थान माजी खासदार श्रीनिवास पाटील हे भूषविणार आहेत.

भारतीय भटके–विमुक्त विकास व संशोधन संस्था व फुले–आंबेडकर साहित्य पंचायत या संस्थांच्यावतीने दरवर्षी या पुरस्काराचे आयोजन केले जाते. यंदाच्या वर्षी फुले–आंबेडकर साहित्य पुरस्कारासाठी निवड झालेल्या प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी गेली ३८ वर्षे सातत्य व गुणवत्ता टिकवुन विचारशलाका या नियतकालिकाचे संपादन करीत आहेत. राजर्षी शाहू महाराज, महात्मा फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारधारेचा आणि स्वातंत्र्य, समता, बंधुता, न्याय, लोकशाही, समाजवाद, धर्मनिरपेक्षता आदी मूल्ये आणि तत्वांचा तसेच भारतीय संविधान यांच्या प्रचार व प्रसाराचे कार्य प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी मराठवाड्यातील लातूरसारख्या शहरात राहून विचारशलाका चालवुन समाजप्रबोधनाचे मोठे कार्य अत्यंत व्रतस्थवृत्तीने केले आहे.

प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या मार्गदर्शनाने ५ विद्यार्थी एम. फील. व ११ विद्यार्थ्यांनी पीएच.डी. पदवी संपादन केली आहे. त्यांनी समाजप्रबोधनाच्यादृष्टीने महात्मा गांधीजींचे सामाजिक तत्त्वज्ञान, महात्मा गांधीजींची सत्याग्रहाची संकल्पना, भ्रष्टाचार : स्वरूप व संदर्भ, डॉ. आंबेडकरांचे शैक्षणिक तत्त्वज्ञान, महाराष्ट्रातील ध्येयवादी तत्वचिंतक, सामाजिक कार्याच्या दिशा, विचारतरंग, तरुण मनाच्या वाटा आणि वळणे आदी ग्रंथाचे लेखन आणि तसेच त्यांनी चिंतन एका कुलगुरूचे, शिक्षण विचार, महाराष्ट्रातील समाजचिंतन, सर्वस्पर्शी डॉ. बाबासाहेब आंबेडकर आणि यशवंतराव चव्हाण आदी ५० ग्रंथाचे संपादन केलेले आहे. त्यांनी शासकीय आणि निमशासकीय विविध समित्यांमध्ये लोकोपयोगी कार्य केलेले आहे. त्यांनी सदस्य, राज्य मागासवर्ग आयोग, अध्यक्ष, महाराष्ट्र तत्वज्ञान परिषद, सदस्य, महाराष्ट्र राज्य मराठी विश्वकोश निर्मिती मंडळ, सदस्य, महाराष्ट्र राज्य दर्शनीका संपादक मंडळ आणि पुणे येथील माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या तत्त्वज्ञान अभ्यास मंडळाचे अध्यक्ष म्हणून भरीव कार्य केलेले आहे.

ते महाराष्ट्र शासनाचा डॉ. बाबासाहेब आंबेडकर दलित मित्र पुरस्कार, स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचा पहिला आदर्श शिक्षक पुरस्कार, आंतरराष्ट्रीय शिक्षण व व्यवस्थापन संस्था, दिल्लीचा उत्कृष्ट प्राचार्य पुरस्कार, महाराष्ट्र फाउंडेशनचा ५०,०००/– चा पुरस्कार आणि महाराष्ट्र साहित्य परिषद पुणेचा श.वा. किर्लोस्कर पुरस्कार या व इतर अनेक पुरस्कारांनी सन्मानित आहेत. या पुरस्काराबद्दल सर्व स्तरातून त्यांचे मनःपूर्वक अभिनंदन केले जात आहे.

***

अजातशत्रू व्यक्तिमत्व : ॲड. विशाल कुंभार



आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो, या उदात्त हेतूने काम करणारी माणसे समाजात अजूनही आहेत. यापैकीच एक म्हणजे ॲड. विशाल कुंभार होय. विटा न्यायालयास संपूर्ण राज्यभरात विधिज्ञ म्हणून ते काम करत आहेत. हे काम करत असताना समाजाप्रति असणारी नाळ त्यांनी जपून ठेवली आहे. २००८ पासून ते वकिली व समाजकार्यात अग्रेसर आहेत. प्रधिकृत अधिकारी म्हणून ते दोन हजार वीस पासून कोल्हापूर विभागाच्या सहनिबंधक येथे काम करत आहेत. दीनदयाळ नागरी सहकारी पतसंस्था, पंचमुखी पतसंस्था, विटा अर्बन पतसंस्था, साई नागरी पतसंस्था येथे ते कायदेशीर सल्लागार म्हणून काम करत आहेत. अनेक अडत्यानडल्या ना कायदेशीर सल्ला मोफत देतात. तलाठी कार्यालयापासून मंत्रालयापर्यंत शासकीय कामे करण्यात त्यांचा हातखंडा आहे. सामाजिक कार्यात ते अग्रेसर असतात. कोणाच्या महामारी मध्ये अनेक गरजू लोकांना दुचाकीवरून जेवण व पाण्याची सोय त्यांनी केली होती. आपल्या सामाजिक कार्याची कोठेही वाच्यता न करता आपण समाजाचे काहीतरी देणे लागतो. या भावनेतून ते सामाजिक कामांमध्ये पुढे असतात. त्यांना वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा!

***

शिक्षणातून विद्यार्थ्यांच्या बौद्धिक सामर्थ्याचा विकास - डॉ. नागोराव कुंभार



पदवी प्रमाणपत्राचे वितरण प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांच्या हस्ते यावेळी संस्थाध्यक्ष प्रा. एकनाथ पाटील, शैक्षणिक संचालक डॉ. पी.एन. सगर, संस्थेचे सी.ए. संभाजी सरडे, प्रभारी प्राचार्य अंधोरीकर.

यावेळी प्राचार्य कुंभार म्हणाले, विद्यार्थ्यांनी आपल्या चारित्र्याचे जतन करावे. क्षेत्र कोणतेही असो प्रामाणिकपणे निरंतर कार्य करत राहावे. संस्थाध्यक्ष प्राचार्य एकनाथ पाटील यांनी महाविद्यालयात राबविण्यात येणारे उपक्रम, शैक्षणिक सुविधांची माहिती दिली.

लातूर : विद्यार्थी हा शिक्षणाचा केंद्रबिंदू असून, विद्यार्थ्यांनी वेळोवेळी तज्ज्ञांचे मार्गदर्शन घेतले पाहिजे. शाश्वत मूल्यांचा अंतर्भाव असणारे अभिजात ग्रंथाचे नियमित वाचन करावे. आपण अवगत केलेल्या ज्ञानावर चिंतन, मनन करावे. पदवी देणे हा शिक्षणाचा मुख्य हेतू नसून शिक्षणातून विद्यार्थ्यांचे बौद्धिक सामर्थ्य विकसित करणे, ज्ञान व सद्गुण संपादित करण्यासाठी प्रेरणा देणे हा आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी येथे केले.

लातूर येथील ब्रिलियंट महाविद्यालयात (सायंकाळचे) चतुर्थ पदवी प्रमाणपत्र वितरण समारंभ झाला. अध्यक्षस्थानी शैक्षणिक संचालक डॉ. पी. एन. सगर होते. यावेळी लोकमाता अहिल्यादेवी चॅरिटेबल ट्रस्टचे अध्यक्ष प्राचार्य एकनाथ पाटील, सचिव सी. ए. संभाजी सरडे यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रास्ताविक प्रभारी प्राचार्य युवराज अंधोरीकर यांनी केले. सूत्रसंचालन एन. एस. एस. कार्यक्रम अधिकारी प्रा. बळीराम मोठेराव व कला विभागप्रमुख डॉ. अर्चना धनवे यांनी केले. सांस्कृतिक विभागप्रमुख प्रा. सोनाली कांबळे यांनी आभार मानले.

यावेळी समन्वयक डॉ. एस. एम. मुचाटे, वाणिज्य विभागप्रमुख प्रा. प्रियंका गोमचाळे, प्रा. सोनाली दिघे, प्रा. रत्नेश्वर डुमणे, प्रा. ऋषिकेश साके, प्रा. प्रियंका नाईक, प्रा. मनाली आगलावे, प्रा. बुशरा शेख, प्रा. ज्योती तांदळे, प्रा. दिलीप दाडगे, प्रा. विष्णू कदम, धनराज पडिले, सिद्धार्थ जवळगेकर, प्रशांत तिवारी, परमेश्वर लवटे, दयानंद भारती, गणेश लवटे, अजय सांडूर आदींची उपस्थिती होती.

पूजा कुंभार बनली विक्रीकर निरीक्षक

काखे येथे जंगी स्वागत : आई-वडील करायचे वीटभट्टीवर काम



कोडोली : महाराष्ट्र लोकसेवा आयोगा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेमध्ये काखे (ता. पन्हाळा) येथील पूजा राजाराम कुंभार हिची विक्रीकर निरीक्षकपदी निवड झाली. आई-वडिलांनी वीटभट्टीवर काम करत तिला कष्टातून शिकवले या यशामुळे त्यांच्या कष्टाचे चीज झाले.

पूजाने काखे येथील विद्यामंदिरमध्ये प्राथमिक तर माध्यमिक शिक्षण श्री वारणामाई हायस्कूल काखे येथे घेतले. यशवंतराव चव्हाण वारणा महाविद्यालयातून पदवी पूर्ण केली. पहिल्या प्रयत्नात तिला अपयश आले. पुन्हा तिने जिद्दीने स्पर्धा परीक्षा देऊन यश खेचून आणले. वडिलांची आठ गुंठे जमीन आहे. प्रपंचाचा गाडा चालविण्यासाठी ते वीटभट्टीवर काम करायचे. आपण काबाडकष्ट करीत राहिलो ती परिस्थिती आपल्या मुलांच्या वाट्याला येऊ नये म्हणून राजाराम कुंभार यांनी मुलांना चांगले शिक्षण दिले. पूजाची काखेत वाजतगाजत मिरवणूक काढण्यात आली. तिला एस.एल. पाटील, शशिकांत सावंत, सनीराजे भोसले, एल.आर. अकॅडमी यांचे मार्गदर्शन मिळाले.



आहेर ब्रिक्स

बिल्डिंग मटेरियल

ॲण्ड सप्लायर्स



श्री. राजेंद्र रंगनाथ आहेर

अध्यक्ष निफाड तालुका कुंभार समाज सामाजिक संस्था

अध्यक्ष कुंभार समाजोन्नती मंडळ

ओझर शहर बारा बलुतेदार महासंघ

M. : 9422249690/9405888687/7588212624

बाणगंगा, मारुती मंदिराजवळ, विटभट्टी, ओझर (मिग), ता. निफाड, जि. नाशिक 422 206. **Mob.: 9423972947**

चि. ज्ञानेश्वर राजेंद्र आहेर

डिप्लोमा इन ॲग्रीकल्चर



सौ. सुनंदा रा. आहेर



दत्तकृपा कोल सप्लायर्स

इंपोर्टेड कोळसा व राख ठोक व किरकोळ भावात मिळेल

श्री दत्तकृपा वीट कारखाना

उत्तम प्रतीचे वीटा होलसेल भावात मिळतील.

सुहास उर्फ सतिश चंद्रकांत कुंभार

मो. 9922234552



विट कारखानदार व मुर्तीकार

सर्वांगसुंदर गणेशमूर्ती मिळतील.

चि. श्रीनिवास चंद्रकांत कुंभार

मो. 9822472552

निवास : मु.पो. ओझर्डे, ता. वाई, जि. सातारा.

दर्जेदार लेखनासाठी मूलभूत चौफेर वाचन असणे आवश्यक आहे : प्राचार्य डॉ. कुंभार



लातूर : दर्जेदार लेखनासाठी मूलभूत चौफेर वाचन आवश्यक आहे, असे प्रतिपादन ज्येष्ठ विचारवंत प्राचार्य डॉ. नागोराव कुंभार यांनी लातूर ग्रंथोत्सवात 'वाचन आधी की लेखन आधी' या परिसंवादात बोलताना केले. उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ग्रंथालय संचालनालय, महाराष्ट्र राज्य व लातूर जिल्हा ग्रंथालय अधिकारी कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या दोन दिवसीय ग्रंथोत्सवाच्या दुसऱ्या दिवशी 'वाचन आधी की लेखन आधी' या विषयावरील परिसंवाद संपन्न झाला. या परिसंवादात प्रा. डॉ. राजशेखर सोलापूरे, विवेक सौताडेकर यांनीही आपला सहभाग नोंदवला. यावेळी ज्येष्ठ साहित्यिक-विचारवंत प्राचार्य डॉ. सोमनाथ रोडे, जिल्हा ग्रंथालय अधिकारी संयज मस्के यांची मंचावर प्रमुख उपस्थिती होती. यावेळी आपले विचार व्यक्त करताना प्राचार्य डॉ. कुंभार पुढे म्हणाले की, सांस्कृतिक पर्यावरणात विचार-ज्ञानाला अनन्यसाधारण असे महत्व असते. वाचन-लेखन या सांस्कृतिक-बौद्धिक क्रिया आहेत. मानवी जीवनात ज्ञान हे सर्वश्रेष्ठ असते. त्यासाठी प्रत्येकाने सत्य हे सत्य म्हणून तर असत्य हे असत्य म्हणून समजून घेतले पाहिजे. बौद्धिक उंची वाढल्याशिवाय समाज, राष्ट्राची उंची वाढू शकत नाही. लेखन-वाचन या परस्पर पूरक प्रक्रिया आहेत. समाजाला वैचारिक दिशा, दृष्टीकोन देण्याचे काम ग्रंथालयांच्या माध्यमातून केले जाते. जगाच्या सर्वच यशस्वी व्यक्तींच्या यशाचा पाया ग्रंथ असतात, हे लक्षात घ्यायला हवे. संपत्तीपेक्षा ग्रंथ संपत्ती मौलिक असते. सगळ्यात उच्च प्रतीचे सुख ग्रंथातून मिळते असेही त्यांनी सांगितले. विवेक सौताडेकर यांनी यावेळी बोलताना वाचनाने लेखन प्रगल्भ आणि प्रभावी होते असे सांगितले. चिंतन आणि वाचन हे लेखनातील महत्वाचा दुवा असतात. ज्यांनी वाचन केले नाही त्यांचे लेखन सकस होत नाही असे सांगून वाचन ही लेखनाच्या आधीची प्रक्रिया असल्याचे सौताडेकर म्हणाले. प्रा. डॉ. राजशेखर सोलापूरे यांनी आपले विचार व्यक्त करताना वाचन केवळ ग्रंथांचेच होते असे नाही तर माणसांच्या चेहऱ्याचे होत असते. प्रज्ञा-प्रतिभेतून साहित्य जन्माला येत असले तरी वाचनाचा स्पर्श झाला की लेखन प्रगल्भ होत असते. इसवी सनापूर्वी शिलालेखाच्या माध्यमातून लेखन केले जात असे. तर साडेचार हजार वर्षांपूर्वी पहिला ग्रंथ सुमोलियन संस्कृतीत महाकाव्याच्या रूपात लिहिण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. लेखन हे वाचनाइतकेच महत्त्वाचे असते. प्रत्येक व्यक्तीने भारतीय राज्यघटनेचे वाचन करणे अत्यंत आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन शार्दूल शेख यांनी तर आभार प्रदर्शन राम मोतीपवळे यांनी केले.

***

किशोर कुंभार व भूषण कुंभार यांची निवड झाल्याबद्दल हार्दिक अभिनंदन!





धुळे : आ. आमदार भाईसाहेब अमरीशभाई पटेल यांच्या आदेशाने तालुक्याचे आ. काशीराम दादा पावरा तसेच भाजपा जिल्हाध्यक्ष आदरणीय बबन भाऊ चौधरी व भाजपा शहर अध्यक्ष भाई साहेब चितनभाई पटेल यांच्या प्रमुख उपस्थितीत शिरपुर येथील (कुंभार समाज धुळे जिल्हा युवा अध्यक्ष) किशोर भाऊ कुंभार यांची भाजपा शिरपुर तालुका युवा मोर्चाच्या उपाध्यक्ष पदी व (धुळे जिल्हा कुंभार समाजाचे युवा उपाध्यक्ष) भुषण भाऊ कुंभार यांची भाजपा शिरपूर तालुका युवा मोर्चाच्या कार्यकारणी सदस्य पदी नियुक्ती झाल्याबदल हार्दिक अभिनंदन!

शिरपूर तालुका व धुळे जिल्हा कुंभार समाजाच्या वतीने जाहीर सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित धुळे जिल्हा कुंभार समाजाचे नेते व अध्यक्ष दादासाहेब सुरेशजी बहाळकर साहेब, मिलिंद कुंभार, हिम्मतराव चित्ते, प्रवीणजी धांडे वीट उद्योग आघाडी अध्यक्ष, सुभाष कुंभार धुळे जिल्हा कार्याध्यक्ष, रतीलाल भाऊ कुंभार धुळे जिल्हा उपाध्यक्ष, गोकुळ भाऊ कुंभार शिरपुर तालुका अध्यक्ष, विश्वास भाऊ कुंभार तालुका उपाध्यक्ष, आत्माराम कुंभार विभागीय उपाध्यक्ष, संजय कुंभार, भुपेश कुंभार, काशिनाथ कुंभार, राकेश कुंभार, वसंत कुंभार, कैलास कुंभार व सर्व तालुक्याचे समाज बांधव उपस्थित होते.

***

नागोराव कुंभारांची तळपती 'विचारशलाका'!



ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्या हस्ते पुरस्कार स्वीकारताना विचारशलाका नियतकालिकाचे संपादक नागोराव कुंभार.

बहुमाध्यमांच्या सध्याच्या काळात 'विचारशलाका' नावाचे नियतकालिक लातूरमधून गेली ३८ वर्षे प्रसिद्ध होत आहे. सामाजिक–शैक्षणिक आणि तत्त्वज्ञानपर विषयांना वाहिलेले बहुमोल लेखन हे त्या नियतकालिकाचे वैशिष्ट्य. नियतकालिकाचे कर्ते संपादक आहेत नागोराव कुंभार. छोट्या जगातून उच्चपदी जाऊन पोचलेली मोदी–मुर्मू यांच्यापासून धोनी–बुमराह या क्रिकेटपटूंपर्यंतची अनेक उदाहरणे आहेत; पण तसे स्थान विद्वतजगात प्राप्त करणे यासारखी असाधारण गोष्ट नाही. ती किमया नागोरावांनी साधली. 'लातूर पॅटर्न' हा नुसता परिक्षेतील मार्कांच्या हुशारीचा नाही; तर प्रतिकूल काळात उच्च वैचारिक कास धरून ती जवळजवळ चार दशकांपर्यंत एकहाती घेऊन जाणे हा नागोरावांचा पराक्रम फार मोठा आहे. नागोराव हे तत्त्वज्ञानाचे प्राध्यापक आहेत. त्यांचे उच्चशिक्षण पुण्यात झाले; परंतु त्यांनी अध्यापन देगलूर व लातूर या मायप्रदेशात केले.

नागोरावांनी 'विचारशलाका' वर्ष १९८७ मध्ये सुरू केले. त्यांचे उद्दिष्ट वैचारिक साहित्य वाचणारा जाणकार, चोखंदळ वाचकवर्ग आणि वैचारिक साहित्य लिहिणारा लेखकवर्ग घडवावा हे होते. ते त्यांनी साधलेच; परंतु विसंगती अशी की, त्या मासिकाच्या जन्मकाळापासून नेमकी या समाजाने सर्व तऱ्हेच्या गांभीर्याला फाटा देणारी जीवनशैली अंगीकारली! करमणूक हा समाजाचा जीवनमंत्र झाला; पण नागोराव तशा परिस्थितीतही बधले नाहीत. त्यांनी लोकशिक्षण आणि मूल्यविचार या दोन्ही पातळ्या तोलाने सांभाळल्या; मात्र नागोरावांना वाटते की, समाजाची मूल्यदृष्टी घडवण्यात पुरोगामी लोक कमी पडले आहेत.

समाजातही जीवननिष्ठेचा अभाव आहे. अशा परिस्थितीत तंत्रज्ञानाची सुविधा उपकारक ठरेल; परंतु तंत्रज्ञानाचा वापर विवेकाने होण्यास हवा आणि विचार जागृतीचे प्रयत्न सातत्याने सुरू ठेवले पाहिजेत. नागोरावांनी एकापेक्षा एक वेगळे विषय आणि निमित्त शोधून 'विचारशलाका'चे विशेषांक काढले. किंबहुना विविध विषयांवरील विशेषांक हेच 'विचारशलाका'चे वैभव ठरले आहे. त्यामध्ये नागोरावांनी अगदी वेगळ्या लेखकांना लिहिते केले आहे. स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवा निमित्त प्रसिद्ध झालेला अंक तर पाचशे पानांचा आहे! पुणे–मुंबई–वाईची विद्वतपरंपरा 'आशीर्वादा'पुरती घेऊन नागोरावांनी वेगळे विचारविश्व निर्माण केल्याचे त्यांचा पुस्तके–मासिकांचा पसारा पाहून जाणवते.

मुंबई–पुणे आणि महाराष्ट्र असे एक द्विभाजन महाराष्ट्रात सर्व क्षेत्रांत भासते. या दोन राजधानींच्या प्रभावक्षेत्रापलीकडे काही मोठी माणसे राज्यभर होऊन गेली आणि आहेतही; ती पुणे–मुंबईच्या मान्यतेला तरसलेली असतात. वाईला लक्ष्मणशास्त्रींचे पीठ निर्माण झाले; परंतु त्यांना त्यासाठी सरकारचा विश्वकोश तिकडे न्यावा लागला. नागोरावांनी स्वतःच्या हिमतीवर आणि गुणविशेषांवर एक वेगळे विचारपीठ उभे केले. तसे, ललित साहित्य–समीक्षेचे आधीचे उदाहरण नोंदता येते ते म.सु. पाटील यांच्या 'अनुष्टुभ'चे. नागोरावांना मोठे पुरस्कार अनेक मिळाले. त्यांची स्वतःची बारा आणि संपादित पन्नास पुस्तके आहेत. अडतीस शोधनिबंध त्यांच्या नावावर आहेत; परंतु त्यांनी 'विचार शलाका'च्या माध्यमातून जे अढळ स्थान प्राप्त केले आहे ते बिनतोड होय.

उदगीर येथील घटनेचा निषेध



दिंडोरी : उदगीर घटनेतील दोषींना कठोर शिक्षा व्हावी या मागणीचे निवेदन निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना देताना कुंभार समाजाचे पदाधिकारी

दिडोंरी : उदगीर येथे आठ वर्षीय बालिकेवर झालेल्या लैंगिक अत्याचाराचा जाहीर निषेध नाशिक जिल्ह्यातील कुंभार समाजाच्या वतीने करण्यात आला. पीडितेला न्याय मिळावा व दोषीला कठोरात कठोर शिक्षा व्हावी यासाठी अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेच्या वतीने निवासी उपजिल्हाधिकारी राजेंद्र वाघ यांना निवेदन देण्यात आले. निवेदनात म्हटले आहे की, अत्याचार करणाऱ्याला कठोरात कठोर शिक्षा व्हावी, यासाठी हे प्रकरण फास्ट ट्रॅक कोर्टात चालवून पीडितेस न्याय द्यावा, पीडित कुटुंबाला संरक्षण द्यावे.

याप्रसंगी प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत, सोमनाथ सोनवणे, रंगनाथ सूर्यवंशी, नंदू सोनवणे, श्रीकृष्ण सोनवणे, संजय भालेराव, किरण शिकारे, राजेंद्र सावंदे, बाळासाहेब जोर्वेकर, नरेंद्र कलांकर, अमर गारे, राम सोनवणे आदींसह समाजबांधव उपस्थित होते.

***

महादेव यादव यांना आदर्श केंद्रप्रमुख पुरस्कार प्रदान



करमाळा (सं.प्र.) : करमाळा पंचायत समिती शिक्षण विभागच्या वतीने सन २०२२-२३ या वर्षाचा आदर्श केंद्रप्रमुख पुरस्कार केंद्रशाळा देवळालीचे केंद्रप्रमुख महादेव यादव गुरूजी यांना प्रदान करण्यात आला आहे.

या पुरस्काराचे वितरण सोलापूरचे प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर, गटविकास अधिकारी मनोज राऊत यांचे हस्ते करण्यात आले. यावेळी गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, विस्तार अधिकारी जयवंत नलवडे, सुग्रीव नीळ, नितीन कदम तसेच सर्व केंद्रप्रमुख, मुख्याध्यापक व शिक्षण वृंद उपस्थित होते.

केंद्रप्रमुख महादेव यादव गुरूजी यांनी केंद्रशाळा देवळाली मध्ये शैक्षणिक गुणवत्ता व शालेय, सहशालेय उपक्रमांची प्रभावी अंमलबजावणी तसेच लोकसहभागातून विद्यार्थ्यांना भौतिक सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी केलेले प्रयत्न याची दखल घेऊन त्यांना आदर्श केंद्रप्रमुख पुरस्कार प्रदान करण्यात आला. मिळालेल्या पुरस्काराबद्दल सर्व शिक्षण वृंद, कुंभार समाज बांधव व संत गोरोबा काका पतसंस्थेच्या वतीने महादेव यादव गुरूजी यांचे विशेष अभिनंदन केले जात आहे.

***

आदर्श केंद्रप्रमुख महादेव यादव सेवानिवृत्त



करमाळा : आदर्श केंद्रप्रमुख महादेव यादव हे ३० एप्रिल रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांनी जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत ३८ वर्षे प्रामाणिकपणे सेवा बजावली आहे. त्यानिमित्त त्यांचा देवळाली केंद्रात जिल्हापरिषद शाळेत सेवानिवृत्ती निमित्त सत्कार आयोजित करण्यात आला. महादेव यादव गुरूजी हे करमाळा येथील रहिवाशी असून, त्यांनी शिक्षणाबरोबरच अनेक सामाजिक उपक्रम राबविले आहेत. शाळेच्या कामकाजावर कोणताही परिणाम न होता, त्यांनी अनेक समाजपयोगी कामे राबवली आहेत. तसेच अनेक विद्यार्थीही चांगल्याप्रकारे घडविले आहेत. सुरूवातीला ते पारेवाडी येथे रूजू झाले होते. त्यानंतर झरे, कामोणे, माळशिरस, हिवरवाडी व शेवट देवळाली येथे आदर्श केंद्रप्रमुख म्हणून ते सेवानिवृत्त झाले आहेत. २०२१-२२ साली त्यांना आदर्श मुख्याध्यापक पुरस्कार तर २०२३-२४ चा आदर्श केंद्रप्रमुख म्हणून पुरस्कार मिळाला आहे. ३० एप्रिल रोजी ते सेवानिवृत्त झाले असून, झालेल्या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी गटविकास अधिकारी मनोज राऊत हे होते. प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त शिक्षक बाळासाहेब गोरे, गटशिक्षणाधिकारी राजकुमार पाटील, विस्तार अधिकारी सुग्रीव नीळ, माजी सरपंच आशिष गायकवाड, सरपंच धनंजय शिंदे तसेच नगर जिल्हा शिक्षक संघाचे अध्यक्ष नारायण राऊत, म.रा. कुंभार समाजाचे सचिव विनायक राऊत, नगर जिल्हा कुंभार समाजाचे अध्यक्ष ज्ञानदेव कुंभार, करमाळा तालुका शिक्षक सोसायटीचे व्हा. चेअरमन तात्यासाहेब जाधव व ग्रामस्थ उपस्थित होते. यावेळी गटविकास अधिकारी मनोज राऊत यांनी महादेव यादव गुरूजी यांच्या ३८ वर्षाच्या कामकाजाची प्रशंसा केली असून त्यांनी भविष्यात चांगले विद्यार्थी घडविण्यासाठी काम करावे; असे आवाहन केले. यावेळी विद्यार्थींनी भक्ती कदम व अश्विनी गोसावी यांची भाषणे झाली. तसेच प्रफुल्लता सातपुते, लहु गभाले, भैरू गभाले, प्रतिक्षा स्वप्नील यादव, दिपांजली महादेव यादव यांची भाषणे झाली. यावेळी यादव गुरूजी यांचा सपत्नीक सत्कार करण्यात आला. या समारंभानिमित्त यादव गुरूजी यांनी शाळेला भाषणासाठी आवश्यक असलेला डायस भेट दिला. सूत्रसंचालन राजकुमार खाडे यांनी केले. आभार निलेश कुलकर्णी यांनी मानले.



अत्यंत कठीण परिस्थितीतून शिक्षण घेऊन जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची नोकरी मिळाली. मिळालेल्या नोकरीमध्ये मी सर्व ठिकाणी प्रामाणिक काम करून चांगल्या पद्धतीने विद्यार्थी घडविण्याचे काम केले आहे. या कामामुळेच आदर्श मुख्याध्यापक व आदर्श केंद्रप्रमुख हे पुरस्कार मिळाले आहेत. भविष्यातही विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षेसाठी मार्गदर्शन तसेच कुंभार समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी काम करणार आहे. - महादेव यादव गुरूजी

रत्नागिरी जिल्ह्यातील पाटगाव, गोळप येथे कुंभारवाड्यात सामाजिक नेत्यांच्या भेटीगाठीसह श्री गोरोबाकाका फोटोप्रतिमा वाटप संपन्न...!



देवाभाऊ गवंडी, पाटगाव.



दक्ष उमंग साळवी, गोळप.

रत्नागिरी : नडगीवे जि. सिंधुदुर्ग येथील भेटीगाठी नंतर परतीच्या प्रवासात पाटगाव संगमेश्वर येथील सामाजिक नेते तथा शासकीय बांधकाम ठेकेदार सुनिलशेठ काशिनाथ साळवी ह्यांची प्रकृतीची विचारपूस, युवा सामाजिक युवा नेते, ठेकेदार प्रकाश मठकर ह्यांचे मातृछत्र हरपल्याने त्यांचे सांत्वन करनेकामी तसेच पाटगाव चे माजी सरपंच, युवा नेते देवाभाऊ कुंभार ह्यांच्या भेटीगाठी कुंभारवाड्यास भेट दिली. भक्तीफेरी करीत, समाजाचे जेष्ठ नेते सुनिलशेठ साळवी, सौ. वर्षाताई साळवी, युवा नेते, समाज विकास कामांसाठी सतत संपर्कात राहणारे पाटगाव चे माजी सरपंच देवाभाऊ गवंडी–कुंभार, केके इव्हेंट मॅनेजर तथा नामांकित भवानी म्युझिक सिस्टीमचे केतन गवंडी, शिवमंगल कार्यालय लॉन्स आणि मंडप तथा केटरिंग व्यावसायिक जेष्ठ नेते दिलीपराव गवंडी, सुशील गवंडी, मुंबईतील कीर्ती कॉलेज सेवेतील संदेश आत्माराम गवंडी, सौ. द्रौपदी गवंडी, देवाभाऊ बळीराम, बळीराम गवंडी, सौ. भारती गवंडी ह्यांच्या निवासस्थानी भेटी देत कुंभार समाज आराध्य दैवत संत शिरोमणी श्री गोरोबाकाकांची फोटो प्रतिमा आणि आरती पत्रक भेट दिले. वीज कोसळून घराची हानी झालेल्या दशरथ गवंडी ह्यांची प्रत्यक्ष भेट न झाल्याने बोलसंपर्क करुन विचारपूस करुन नैसर्गिक आपत्ती नुकसान भरपाई साठी पंचनामा निवेदन देण्यास सांगितले. ह्याची माहिती सतिशदादा दरेकर, अध्यक्ष महोदय, कुंभार सामाजिक संस्था ह्यांना तात्काळ दिली. सर्वांच्या सुख समृद्धी, आरोग्यासाठी शुभ कामना दिल्यात. कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या महत्वकांशी जनगणना कामी नोंदणी आणि सहकार्य करण्याचे युवक–युवतींना आवाहन केले.

गोळप गावातील कुंभारवाडयात फोटो वाटप

रत्नागिरी शहराच्या दक्षिणेस पावस रोडवरील गोळप येथील सुंदर, भव्य हॉटेल सदिच्छा आणि हापूस आंबे निर्यातदार राज मँगो एक्स्पोर्टचे प्रमुख मंगेशजी शंकरशेठ साळवी, सौ. मानसी साळवी, साळवी ब्रदर्स मँगो एक्स्पोर्ट चे प्रमुख प्रकाशराव शंकरशेठ साळवी, सौ. प्रगतीताई साळवी, सौ. उर्वी उमंग साळवी, चि. यश साळवी, अलिबागचे निवासी सुभाषराव विठ्ठल कुंभार, इंजि. चि. निखिल सुभाषराव साळवी, विनोदजी शेठकर ह्यांच्या भेटीगाठी घेऊन श्री गोरोबाकाका ह्यांची फोटो प्रतिमा आणि आरती भेट दिली. इस्लामपूर वाळवा येथे एम.बी.बी.एस. शिक्षण घेणाऱ्या कु. मृणाल मंगेश साळवी हिचा वाढदिवस आमच्या विनंती वजा आग्रह नुसार साळवी कुटुंबाने, संत शिरोमणी श्री गोरोबाकाका प्रतिमापूजन करुन साजरा केला. पाटगावचे युवा नेते, शासकीय कामांचे ठेकेदार चि. इंजि. प्रतिक सुनिलजी साळवी आणि कडवई संगमेश्वर येथील प्रा.निलेशजी कुंभार सर ह्यांनी गोळप गांव ते रत्नागिरी रेल्वेस्टेशन पर्यंत वाहनसेवेसह सोबत–संगत करुन आमचा प्रवास भक्तीफेरी सुकर केली.

सौ. संगिता आणि इंजि. बबनराव काशीराम जगदाळे
आपण सर्वांचे घर तेथे श्री गोरोबाकाका फोटो अभियान
नवापूर जि. नंदुरबार, खान्देश

***

खुशी बालासाहेब सेलुकर सैनिक स्कूल परिक्षेत भारतात तिसरी



वसमत येथील बालरोगतज्ज्ञ डॉ. ॲड. बालासाहेब सेलुकर यांची मुलगी खुशी बालासाहेब सेलूकर हिने सैनिक स्कूल परीक्षा मध्ये इयत्ता नववी प्रवेशासाठी घेण्यात आलेल्या ४०० गुणांच्या परिक्षेत ३८८ गुण घेत संपूर्ण भारतात तिसरा क्रमांक पटकावून कुटुंबाचे व वसमतचे नावलौकिक संपूर्ण भारतात गाजवले आहे.

या परिक्षेत भारतात मुलींमध्ये पहिला क्रमांक पटकावणारी खुशी बालासाहेब सेलुकर हि पहिलीच मुलगी आहे. खुशीच्या यशाबद्दल तिचे सर्वत्रच कौतुक व सत्कार करत पुढील शैक्षणिक प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या जात आहेत.

फिरत्या चाकावर पोट; कधी मिळणार मातीकला बोर्डाच्या योजनेचा लाभ?
पाच वर्षांत नाही एक रुपचाही निधी, तांत्रिक युगात ३० लक्ष कुंभार बांधवांची उपासमार

विदर्भात ३० लाखांच्या घरात कुंभार समाज आहे. हा समाज ओबीसी प्रवर्गात मोडतो. तथापि, स्वत:चे शिक्षण विद्यार्थ्यांना स्वत: करावे लागते. कोणत्याही सवलतीचा लाभ मिळत नाही. शासन समाजाच्या विकासासंदर्भात योजना आखतात. मात्र, त्या कागदावरच आहेत. आता तरी सकारात्मक दृष्टिकोनाने कुंभार समाजाकरिता योजना राबवाव्यात.
-डॉ. श्रीराम कोल्हे, अध्यक्ष, संत गोरोबाकाका समाज संस्था



अमरावती : ओल्या मातीपासून सुरई, माठ, खुजे, रांजण, कुंड्या, घट, गाडगी, मडकी, झाकण्या, पणत्या, कौले, विटा, कुंड्या घडवून आपल्या संसाराचा गाडा चालविणाऱ्या विदर्भातील ३० लक्ष कुंभार बांधव तंत्रज्ञानाच्या युगात मागास राहण्याचा अभिशाप भोगत आहेत. राज्य शासनाने स्थापन केलेल्या मातीकला बोर्डाला पाच वर्षात एक रुपया दिला नाही. परिणामी त्यांच्या योजनाच कार्यान्वित न झाल्याने या समाजबांधवांवर उपासमारीची पाळी आली आहे.

कुंभार समाज हा बारा बलुतेदारांपैकी एक. अलीकडे संत गोरा कुंभार यांची परंपरा ते सांगतात. तथापि, वंशपरंपरागत असलेल्या त्यांच्या कुंभारकलेला आधुनिक तंत्रज्ञान व चिनी वस्तूंमुळे उतरती कळा आली आहे. त्यामुळे आजघडीला त्यांच्या कौटुंबिक उदरनिर्वाहाचा प्रश्नसुद्धा ऐरणीवर आला आहे.

विदर्भात अमरावती, यवतमाळ, वर्धा, अकोला, गोंदिया या जिल्ह्यात कुंभार समाज मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांनी थाटलेला वंशपंरपरागत व्यवसाय गावोगावी पाहावयास मिळतो. मात्र, त्यांनी मातीपासून तयार केलेल्या भांड्यांना कोणत्याच जिल्ह्यात स्थायी बाजारपेठ उपलब्ध नसल्यामुळे गावखेड्यात भटकंती करून ही मातीची भांडी विकावी लागत आहेत. वाढत्या महागाई व दुष्काळात कसे तग धरून राहायचे व कुटुंबाचा उदरनिर्वाह कसा चालवायचा, असा गंभीर प्रश्न त्यांच्यासमोर निर्माण झाल्याची व्यथा वर्धा नदीकाठी असलेल्या ओमेश वझे यांनी मांडली.

दोन वेळेची भागत नाही सांज :

सतत तीन महिने तयार केलेली मातीची भांडी घेऊन बाजारात विक्रीसाठी गेल्यानंतर ग्राहकही कमी किमतीत मागतात. एकीकडे मातीपासून तर इंधनापर्यंत सर्वच विकत आणावे लागते. व्यवसायासाठी लागणारा खर्च व यातून मिळणारे उत्पन्न फार कमी आहे. विक्री केल्यानंतर दोन वेळेची सांजही भागत नाही.

मातीकला बोर्ड केवळ नावालाच :

राज्य शासनाने कुंभार बांधवांच्या उन्नतीसाठी राज्यात मातीकला बोर्ड स्थापन केले. खादी ग्रामोद्योग अंतर्गत दहा कोटींचे अनुदान तसेच मातीपासून दिवा, गंगाळ, घागर अशा वेगवेगळ्या वस्तू बनवून प्रदर्शनात विकण्याकरिता देण्याची घोषणा केली होती. मात्र, अद्याप एक रुपयाचाही निधी देण्यात आला नाही.

मातीच्या भांड्याची जागा घेतली प्लास्टिकने :

३० वर्षांपूर्वी मातीच्या भांड्यांना मोठी मागणी होती. घराघरात स्वयंपाकासाठी, पाणी गरम करण्यासाठी, पिण्याच्या पाण्यासाठी, अंघोळीसाठी मातीपासून तयार झालेल्या भांड्यांचा वापर व्हायचा. मात्र, आजघडीला मातीच्या भांड्यांची जागा स्टील व प्लास्टिकच्या भांड्यांनी घेतली आहे.

***

प्रेरणास्थान



गंगाधर दगडू जोंधळे



कै. लक्ष्मीबाई गंगाधर जोंधळे



सौ. शोभा प्र. जोंधळे



प्रकाश उर्फ सुभाषशेठ गंगाधर जोंधळे

जोंधळे विट सप्लायर्स

9x4x3 साईज

विट, वाळु, खडी, डाबर योग्य भावात मिळेल.

पाटोदा, ता. येवला, जि. नाशिक

Mob. : 9011746159/9075956159

श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयातील प्रा. डॉ. रामदास खोपे यांचा सेवानिवृत्तीप्रसंगी उभंयतांचा सत्कार. प्रा. खोपे यांनी घडविले अनेक विद्यार्थी - हेमंत काळमेघ



सौ व डॉ. रामदास खोपे यांचा सत्कार करताना हेमंत काळमेघ समवेत डॉ. माजी प्राचार्य देवेंद्र बुरघाटे, डॉ. लेपसे, डॉ. डाईलकर व मान्यवर

अमरावती : श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालय, नागपूर येथील रसायनशास्त्र विभाग प्रमुख म्हणून कार्यरत डॉ. रामदास उत्तमराव खोपे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या सेवानिवृत्तीप्रसंगी त्यांचा व पत्नी सौ. संगिता खोपे यांचा शॉल, श्रीफळ, स्मृतिचिन्ह देऊन श्री शिवाजी शिक्षण संस्थेचे कार्यकारी अध्यक्ष हेमंत काळमेघ यांच्या हस्ते उभयंतांचा सत्कार करण्यात आला. त्याप्रसंगी व्यासपीठावर महा–विद्यालयाचे प्राचार्य डॉ. ओ. एस. देशमुख, माजी प्राचार्य डॉ. देवेंद्र बुरघाटे, विज्ञान महाविद्यालय, पवनीचे प्राचार्य डॉ. लेपसे, दुसरे सत्कारमूर्ती उभयंता डॉ. डाईलकर, प्रयोगशाळा परिचर उपस्थित होते.

सत्कारप्रसंगी अध्यक्षस्थानावरुन बोलतांना हेमंत काळमेघ म्हणाले, विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासावर देशाचा विकास अवलंबून आहे. नवीन पिढी घडविण्यासाठी डॉ. खोपे यांनी सेवा काळात परिश्रमपूर्वक कार्य केले आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली ७ विद्यार्थ्यांनी आचार्य पदवी मिळविली असून १ विद्यार्थी सध्या संशोधन कार्य करीत आहे. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय जर्नल्समध्ये त्यांचे संशोधनपर ५२ संशोधन पेपर सादर केले आहेत. त्यांनी सिंगापूर आणि बँकॉक येथे झालेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेमध्ये सहभागी होऊन संशोधन पेपर सादर केले. ४ पुस्तके त्यांनी लिहिली असून क्वांटम, मेकॅनिक्स, फिजिकल केमेस्ट्री हे त्यांचे आवडीचे विषय राहिले आहेत. त्यांच्या कार्याचा सन्मान म्हणून श्री शिवाजी विज्ञान महाविद्यालयाने त्यांना उत्कृष्ट शिक्षक पुरस्कार देऊन गौरविले असल्याची माहिती देऊन काळमेघ यांनी डॉ. खोपे यांच्या भावी आयुष्याकरीता शुभेच्छा दिल्यात.

सत्कारप्रसंगी डॉ. रामदास खोपे म्हणाले, शिक्षक म्हणून विद्यार्थी घडविण्यासाठी सातत्यपूर्ण प्रयत्न केलेत. मी विद्यार्थी असताना मला चांगल्या शिक्षकांचा सहवास लाभला हे मी माझे भाग्य समजतो. माझा विषय विद्यार्थ्यांना सोपा वाटावा यासाठी माझ्या सेवा काळात मी प्रामाणिक प्रयत्न केलेला आहेत. आज माझे विद्यार्थी देशातच नव्हे, तर जगामध्ये मोठमोठ्या संस्थेत कार्यरत असल्याचा मला अभिमान आहे. शिक्षक विद्यार्थ्यांच्या जीवनात आमूलाग्र बदल घडवितात. त्याचप्रमाणे विद्यार्थी सुध्दा शिक्षकांसाठी अभिमान असतात.

याप्रसंगी प्रयोगशाळा परिचर डाईलकर यांचा सुद्धा उभयंता सत्कार करण्यात आला. याप्रसंगी डॉ. अवचार, डॉ. राजेंद्र देशमुख, डॉ. खैरे, डॉ. अणे तसेच डॉ. दर्शना खोपे, डॉ. पांडे, डॉ. उताडे, डॉ. तिवारी यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व संचालन डॉ. वैशाली किन्हीकर व डॉ. रेशल देशमुख व आभार डॉ. प्रिया देशमुख यांनी मानले. कार्यक्रमाला महाविद्यालयातील शिक्षकगण, कर्मचारी, विद्यार्थी, सत्कारमूर्तींच्या कुटुंबातील सदस्य, बाळकृष्ण खोपे, चेतन कोथळकर व दिनेश खोपे आदी उपस्थित होते.

***

विद्यार्थी साहाय्यक समितीत गरजू मुलींकरिता प्रवेश सुरू

पुणे : विद्यार्थी साहाय्यक समितीच्या वसतिगृहात मुलींसाठी प्रवेश सुरू झाले आहेत. उच्च शिक्षणासाठी पुण्यात प्रवेश घेतलेल्या ग्रामीण भागातील गरजू, होतकरू आणि अल्प उत्पन्न गटातील विद्यार्थिनींनी या टप्प्यात अर्ज करावेत, असे समिती व्यवस्थापनाने कळविले आहे. पुण्यात मुलींसाठी बांधण्यात आलेल्या नव्या वसतिगृहात ३३६ जणींची व्यवस्था वाढणार आहे.

ग्रामीण भागातील ज्या विद्यार्थिनी सध्या पदवीच्या दुसऱ्या, तिसऱ्या आणि त्यापुढील वर्गात पुण्यातील महाविद्यालयांत शिक्षण घेत आहेत आणि ज्यांच्या निवास, भोजनाची अडचण आहे अशांना समितीच्या संकेतस्थळावर www.samiti.org जाऊन प्रवशेसाठी ऑनलाइन अर्ज भरता येईल. अर्जाची छाननी होऊन मुलाखतीनंतर प्रवेश निश्चित केले जातील. समितीचे कार्य गेली ६९ वर्षे केवळ समाजाच्या मदतीवर सुरू आहे. सध्या पाच वसतिगृहांतून ७५० मुला–मुलींसाठी व्यवस्था उपलब्ध आहे. ग्रामीण भागातील मुलींचे पुण्यात शिक्षणाला येण्याचे प्रमाण वाढल्याने अजून एका वसतिगृहाची उभारणी झाल्यामुळे ही संख्या सुमारे ११०० होणार आहे. कमी खर्चात निवास, भोजनाची सुविधा पुरविणे एवढाच समितीचा हेतू नसून, युवा परिवर्तनाचे केंद्र म्हणूनही समिती कार्य करते.

डॉ. मेघा यांच्या डेंटल क्लिनिकचे उद्घाटन

कर्तबगार मुलीचा पिता होणं हे महतभाग्य : सौ. प्राजक्ता धस



उद्घाटन करताना प्राजक्ताई धस, प्रशांत दादा जगताप, डॉ. मेघा, सौ जयश्री व मोहन जगताप, ओंकार व सहदेव कुंभार



आष्टी : घाटा पिंपरी, ता. आष्टी येथील आदर्श शिक्षक मोहन जगताप व सौ. जयश्रीताई जगताप यांची कन्या डॉ.सौ. मेघा ओंकार कुंभार यांच्या डेन्टल क्लिनीकचे उद्घाटन वानवडी पुणे येथे पाडव्याच्या शुभ मुहूर्तावर सौ. प्राजक्ताताई धस यांच्या शुभहस्ते मोठ्या थाटात संपन्न झाले. यावेळी पुण्यनगरीचे माजी महापौर प्रशांत दादा जगताप, शिक्षण समिती सदस्या पुणे मनपा कालिंदीताई पुंडे, उद्योजिका कविताताई महादेव बिरंगळ, उद्योगपती मुरलीधर पुंडे, शिक्षणाधिकारी निलेश गुंड यांची प्रमुख अतिथी म्हणून उपस्थिती होती. यावेळी सौ. प्राजक्ताताई यांनी क्लिनीकला शुभेच्छा देताना डॉ. मेघाचे आई–बाबा मोहन जगताप व सौ. जयश्रीताई यांच्याविषयी बोलताना जगताप दांपत्य हे ग्रामीण भागातून जिथे माध्यमिक शिक्षणाची देखील सुविधा नाही अशा ठिकाणी वास्तव्यास असताना देखील आपल्या तीनही मुलींना डॉक्टर बनवून समाजात एक आदर्श प्रस्थापित केला हे नक्कीच कौतुकास्पद आहे. मुलगी–मुलगा असा कोणताही भेदभाव न करता मुलींच्या शिक्षणावर लक्ष केंद्रीत करून तीनही मुली उच्चशिक्षित डॉक्टर केल्या. आज जेंव्हा आपल्या मुलगी ओमेगा क्लिनीकच्या माध्यमातून स्वकतृत्व सिद्ध करते आहे यापेक्षा आनंद आणि समाधान दुसरे असूच शकत नाही. हे समाधान भाग्यवान माता–पित्यालाच लाभू शकते असे गौरवोद्गार काढले. पुण्य नगरीचे माजी महापौर प्रशांत दादा यांनी डॉ. मेघनाच्या माध्यमातून सुरू होत असणारे क्लिनीक हे वानवाडी येथे रुग्णांसाठी नक्कीच उपयुक्त ठरेल. आई–वडिलांचे स्वप्न साकार करण्यात मुलीच नेहमी पुढे असतात हे डॉ. मेघाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे. रुग्णांना आता इतरत्र जाण्याची गरज नाही. ओमेगा डेन्टल क्लिनीक हे वानवाडी परिसराचे वैभव ठरेल असे सांगितले. मुलगा–मुलगी असा भेदभाव न करता मुलींसाठी सर्वस्व अर्पण करणारे मोहन जगताप हे आम्हा आष्टीकरांसाठी भूषण आहेत असे प्रतिपादन सौ. कालिंदीताई पुंडे शिक्षण समिती सदस्या मनपा पुणे यांनी केले. या प्रसंगी सहदेव कुंभार, ओंकार कुंभार, आदर्श केंद्रप्रमुख उगले मॅडम, डॉ. शैलेश कुंभार, डॉ. सौ. दिपाली जगताप, डॉ. अश्लेषा राऊत, डॉ. श्रीनिवास म्हस्के, डॉ. अनिकेत सोनवणे, डॉ. शुभम पद्मे, शैलेश गुंड, हर्षवर्धन तळेकर, डॉ.सौ. सुखदा व कु.डॉ. संपदा मोहन जगताप, धनवडे दादा, रविकुमार जगताप, पुष्कर शेळगावकर यासह परिसरातील अनेक मान्यवर, शुभचिंतक उपस्थित होते.

***

शाहिरीला पुन्हा एकदा प्रोत्साहन देण्याची गरज



शाहीर गुरुराज कुंभार यांना युवा शाहीर पुरस्कार प्रदान करताना मंचाचे अध्यक्ष अंबादास तावरे, शाहीर प्रकाश ढवळे आणि साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ

चिंचवड : निगडी येथील आत्माराम पाटील शाहिरी मंचातर्फे राष्ट्रसंत तुकडोजी महाराज जयंती आणि शाहीर आत्माराम पाटील जन्मशताब्दी यमुनानगरात बुधवारी (दि.१) साजरी करण्यात आली. मंचातर्फे वर्षभर शाहिरीचे विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले.

प्रमुख पाहुणे म्हणून ज्येष्ठ साहित्यिक प्रभाकर ओव्हाळ, ज्येष्ठ शाहीर प्रकाश ढवळे व्यासपीठावर उपस्थित होते. यावेळी मंचाने संस्थापक अध्यक्ष शाहीर अंबादास तावरे म्हणाले, की शाहिरीची कला जतन करून ती पुढील पिढ्यांना शिकवण्यासाठी प्रोत्साहन देणे गरजेचे आहे. शुद्ध शाहिरी परंपरेने सामाजिक प्रबोधन करणाऱ्यांना दिशा मिळेल. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यामध्ये शाहिरांना फार मोठे योगदान दिले आहे. प्रभाकर ओव्हाळ यांनी शाहीर अमर शेख, अण्णा भाऊ साठे, शाहीर गव्हाणकर, शाहीर साबळे, पिराजीराव सरनाईक आणि आत्माराम पाटील आठवणींना उजाळा दिला. शाहीर आत्माराम पाटील यांचा उल्लेख शाहिरांचे शाहीर

असा करत त्यांच्या विपुल साहित्य संपदेवर प्रकाश टाकला. कार्यक्रमात परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त सहभाग होता. शाहीर गुरुराज कुंभार, महिला शाहीर अक्षदा मोरे, ऋतुजा शिंदे, यांना युवा शाहीर पुरस्काराने पाहुण्यांच्या हस्ते सन्मानीत करण्यात आले. पुरोगामी छत्रपती नावाचा पोवाडा संस्कार चव्हाण व चैतन्य काजुळकर यांनी सादर केला.

आश्लेषा पाडवेकर हीने 'महाराष्ट्राची यशोगाथा' हा पोवाडा सादर केला. राजेश कावळे यांनी शाहिरीची परंवरा सांगितली. चैतन्य काजुळकर यांनी संत तुकडोजी महाराजांचा दारूबंदीवरील पोवाडा सादर केला. प्रभाकर ओव्हाळ लिखित एका शाहिराची कथा या आत्माराम पाटील यांचे जीवनचरित्र कलाकारांना भेट म्हणून देण्यात आले. यावेळी शाहिरी परंपरेतील अनेक मान्यवर तसेच शाहिरी मंचाचे माजी विद्यार्थी उपस्थित होते.

***

संजय खटावकर यांचा सेवापूर्ती सत्कार संपन्न



प्रा. संजय खटावकर यांचा सेवानिवृत्ती निमित्त सत्कार करताना एम.एच. मोलेदिना, रियाझ उमर व मान्यवर

पुण्यातील मोलेदिना कनिष्ठ महाविद्यालयातील इलेक्ट्रॉनिक्स विभागाचे वरीष्ठ प्राध्यापक संजय निवृत्ती खटावकर हे आपल्या ३८ वर्षाच्या प्रदिर्घ सेवेनंतर ३० जून २०२४ रोजी सेवानिवृत्त झाले. संस्थेच्या वतीने त्यांचा सेवापूर्ती सत्कार संस्थेचे अध्यक्ष एम.एच. मोलेदिना, चेअरमन सदस्य रियाज उमर, सेक्रेटरी एस.एन कोतवाल, महाराष्ट्र शासनाचे कौशल्य शिक्षण विभागाचे सहसंचालक राजेंद्र घुमे, व्यवसाय शिक्षण सहसंचालक चंद्रकान्त निनावे व आजी माजी प्राचार्य शिक्षक कर्मचारी आदीच्या उपस्थितीत संपन्न झाला.

खटावकर यांनी ३८ वर्षाच्या सेवाकाळात विद्यार्थ्यांसाठी रोजगार जकता विकास, स्वंय रोजगार, उच्च शिक्षणाच्या संधी मिळण्यासाठी अनेक उपक्रम राबविले. त्यांनी सकाळ, महाराष्ट्र टाईम्स, लोकसत्ता इ. वृत्तपत्रातून शैक्षणिक लेखन केले. एच.एस.सी. बोर्डच्या कमेटी सदस्य म्हणून त्यांनी काम केले. महाराष्ट्र शासनाच्या कौशल्य विभागाचे सुद्धा ते क्रियाशील सदस्य होते.

त्यांच्या शिक्षणक्षेत्रातील अति उत्कृष्ट कार्याबद्दल त्यांना महाराष्ट्र शासनाने २००७ रोजी उपमुख्यमंत्री आर.आर. आबा पाटील व उच्च तंत्र शिक्षण मंत्री, दिलीप वळसे पाटील ह्यांच्या हस्ते महाराष्ट्र शासनाच्या आदर्श शिक्षक पुरस्काराने त्यांना गौरविण्यात आले. ह्याप्रसंगी शिक्षण सहसंचालक राजेंद्र घुमे, चंद्रकान्त निनावे, उज्वला गरूड ह्यांची कौतुकास्पद भाषणे झाली. मोलेदिना संस्थेच्या विकासात त्यांनी केलेले कार्य, योगदान अतुलनीय असून त्यांची उणीव नेहमी जाणवत राहील असे मत मोलेदिना यांनी व्यक्त केले. संजय खटावकर यांची पत्नी श्रीमती वंदनी खटावकर देखील केंद्र सरकारच्या संरक्षण विभागाच्या देहूरोड येथील कार्यालयात अभियंता आहेत. तसेच त्यांचा मुलगा प्रसाद खटावकर हे मेकॅ. इंजिनिअर असून आय.टी. क्षेत्रात कार्यरत आहे तर याची कुमारी तन्वी कुंभार ह्या एम.फार्मा असून एका चांगल्या बायोक्लिनिका इंडीया लिमिटेड कंपनीत उच्च पदावर कार्यरत आहे.

संजय खटावकर यांना सेवापूर्तीच्या शुभेच्छा, तुमचे पुढील आयुष्य उत्तम जावो, चांगले आरोग्य लाभो ही सदीच्छा...

हिराताई गारे यांचा सेवापूर्ती सोहळा संपन्न



नाशिक : संत शिरोमणी गोरोबाकाका यांचे कृपेने, नासिक शिक्षण प्रसारक मंडळ संचलित, संजीवनी प्राथमिक विद्या मंदिर सिन्नर. या शाळेतील शिक्षिका श्रीमती हिराताई पंढरीनाथ गारे यांनी ३५ वर्षे सेवा केली, याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष, उपाध्यक्ष, मुख्याध्यापक आणि शिक्षक उपस्थित होते. श्रीमती गारेताई या नाशिक जिल्हा कुंभार विकास समितीचे जेष्ठ मार्गदर्शक भागवत विश्वनाथ क्षीरसागर यांच्या धर्मपत्नी आहे. ताईविषयी बोलताना अनेक वक्ते भरभरून बोलत होते. एक वैशिष्ट्य असे समजले की, गारेताईंची पूर्ण सेवा ३५ ही एकाच ठिकाणी झाली, इतके प्रामाणिक काम विद्यार्थी प्रिय, शिस्तबद्ध, उपक्रमशील असे विविध गुण त्यांच्या अंगी असल्याने, त्यांची कुठेही बदली झाली नाही. याप्रसंगी रमाकांतभाऊ क्षीरसागर, सोमनाथ सोनवणे, नंदा मामा सोनवणे, वसंतराव गाडेकर, अशोक नाना जाधव आणि इतरही मान्यवर उपस्थित होते.

सौ. हिराताई यांना पुढील आयुष्य निरोगी, सुख समाधानाचे जावो अशी सद्भावना नाशिक जिल्हा कुंभार विकास समिती, कुंभार समाज सामाजिक संस्था, महाराष्ट्र प्रदेश यांचे वतीने, कार्यक्रमाचे ठिकाणी व्यक्त करण्यात आली.

जुन्नर तालुका कुंभार समाजाच्या वतीने सामुदायिक विवाह सोहळा संपन्न



सामुदायिक विवाह सोळ्यामध्ये सहभागी झालेले वधु-वर

''सामुदायिक विवाह सोहळा करणे ही समाजाची गरज आहे यामध्ये आर्थिक मदत सर्वसामान्य परिवाराला निश्चित रुपाने होत असते. कुंभार समाजाचे सामुदायिक विवाह सोहळ्याचे कार्य गेली १८ वर्षे अविरतपणे सुरू आहे. भविष्यामध्ये तुम्हाला कुठल्याही प्रकारची गरज लागली तर नक्की आम्हाला सांगा नारायणगाव ग्रामपंचायत आणि आम्ही सर्व मंडळी तुम्हाला नक्कीच मदत करू.'' प्रथम लोकनियुक्त सरपंच बाबू पाटे

जुन्नर तालुका कुंभार समाजाच्या वतीने सामुदायिक सोहळा तीर्थक्षेत्र ओझर या ठिकाणी मोठ्या उत्साहामध्ये संपन्न झाला सालाबाद प्रमाणे यावर्षी देखील जुन्नर तालुका समाजाच्या वतीने सामुदायिक विवाह सोहळ्याचे नियोजन करण्यात आले होते. चार जोडप्यांनी या सोहळ्यात सहभाग घेऊन समाजाला आदर्श दाखवून दिला. समाजाच्या वतीने विविध उपक्रम राबवले जातात. अनेक समाज उपयोगी कार्य देखील समाजाच्या माध्यमातून होत असतात. या सामुदायिक विवाह सोहळ्यासाठी आळेफाटा येथील दानशूर व्यक्तिमत्त्व उद्योजक सुरेशशेठ कोते यांचे संपूर्ण आर्थिक योगदान लाभले. या सामुदायिक सोहळ्याच्या प्रसंगी कल्पना आढळराव, कृषी उत्पन्न बाजार समितीच्या संचालिका प्रियंका शेळके, नारायणगाव उपसरपंच बाबू पाटे, राष्ट्रवादी काँग्रेस महाराष्ट्र राज्य ओबीसी सेल उपाध्यक्ष सतीश दरेकर, विघ्नहर देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष बाळासाहेब कवडे, संत गोरोबा नागरी पतसंस्थेचे अध्यक्ष गोरखनाथ उर्किडे, संत गोरोबा नागरी पतसंस्थेचे संस्थापक संचालक अँड संजय उर्किडे, ओझर गावचे उपसरपंच विठ्ठल जाधव, ज्ञानेश्वर शिंदे, कुंभश्रीचे संपादक संजय राजे, जुन्नर माजी नगरसेवक भाऊसाहेब कुंभार, डिंगोरे गावच्या सरपंच सिमाताई सोनवणे, बाळासाहेब कोते, मीनन शिंदे, वसंत रसाळ, सुनीलशेठ जाधव, वसंत कोते, स्वप्निल हिवरेकर, मनोज शिंदे, दीपक कुडाळकर, सचिन विश्वासराव, लक्ष्मण गोरे, मनोहर सोमवंशी, प्रकाश कुडाळकर, ज्ञानेश्वर सोमवंशी, श्रीकृष्ण सोनवणे, ज्ञानेश्वर जगदाळे, सुरेशशेठ शिंदे, निलेश शिंदे, ज्योतीताई सोमवंशी, राजेंद्र सोमवंशी, वैभव जगताप, अमोल भागवत, संतोष भागवत, अनिल सोमवंशी, सुषमा उर्किडे, नवनाथ शिंदे, संदीप शिंदे, संतोष वाघ, सुरेश शेठ सोमवंशी, निखिल जगदाळे, संदीप विश्वासराव, बाबुशेठ रसाळ, निलेश रसाळ, किशोर दरेकर, सुरेश शिंदे, माऊली शिंदे, संतोष जाधव, गणेश उर्किडे तसेच कुंभार समाजाचे सर्व मान्यवर उपस्थित होते. सदर कार्यक्रमाचे प्रास्ताविक शरद दरेकर यांनी केले तर कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मच्छिंद्र जगदाळे यांनी केले. जुन्नर तालुका कुंभार समाज अध्यक्ष अमोल जगदाळे यांनी उपस्थितांचे स्वागत तर विठ्ठल जाधव यांनी उपस्थितांचे आभार मानले.

***

विश्रांतवाडीतील कुंभार समाज एकवटला



विश्रांतवाडी : चिखल मळण्याच्या मशीनच्या उद्घाटनप्रसंगी मोहन कुंभार, आशा कुंभार, राजू पालकर, धाकलू कुंभार, संजय कुंभार व इतर.

बेळगांव खानापुर : खानापूरपासून चार किमी अंतरावर असलेल्या विश्रांतवाडी परिसरातील कुंभार समाज विखुरलेला होता. संत गोरा कुंभार समाज विकास मंडळाचे माजी अध्यक्ष मोहन कुंभार यांनी पुढाकार घेत या समाजाला संघटीत केले.

मंगळवारी दि. ९ गुडीपाडव्याच्या मुहूर्त साधून समाजाला चिखल मळण्याचे मशीनही उपलब्ध करून देण्यात आले. केंद्र सरकारकडून चिखल मळण्याचे मशीन, ब्लेंजर आणि मडकी तयार करण्याच्या मशीनचे मोफत वितरण केले जाते. मात्र या मशिनी नादुरुस्त झाल्या की दुरुस्ती करण्यासाठी कुणीही पुढे येत नाही.

विश्रांतवाडी, नागुर्डा व वत्तोळी गावातील कुंभार समाजाने एकत्र येऊन चिखल मळण्याचे मशीन विकतच घेतले. मशिनीअभावी व्यवसाय थांबल्यास कृतज्ञता निधीतून मदत दिली जाईल. बिनव्याजी रक्कम यंत्रसामुग्री करिता उपलब्ध करून दिली जाईल. वर्षभरानंतर ही रक्कम परत करायची आहे, असे कुंभार यांनी सांगितले. यावेळी सातेरी कुंभार, धाकलु कुंभार, प्रभाकर कुंभार, राजू पालकर, संजय कुंभार, सीताराम कुंभार, गंगाराम कुंभार, राणी पालकर, कल्पना कुंभार, सुजाता कुंभार, सविता कुंभार, माया कुंभार, लता कुंभार आदी उपस्थित होते.

***

आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवामध्ये 'पाठवणी' लघुपटाला तीन नामांकन
मानवतावादी कथालेखक निंबाजी हिवरकर यांचा कथासंग्रह

कुऱ्हा काकोडा, ता मुक्ताईनगर :

अहमदाबादला आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव नुकताच पार पडला. त्यात मुक्ताईनगर तालुक्यातील निंबाजी हिवरकर यांच्या कथासंग्रहातील कथेवर आधारीत अमोल घटे दिग्दर्शित 'पाठवणी' लघुपटाला तीन नामांकन मिळाले आहेत.



या महोत्सवात उत्कृष्ट दिग्दर्शक, उत्कृष्ट लघुपट, उत्कृष्ट सहाय्यक अभिनेत्री अशा तीन नामांकन मिळाले आहेत. सहाय्यक अभिनेत्री म्हणून विभा घनमाडे यांना सन्मानित करण्यात आले. नामांकनाची ट्रॉफी, प्रमाणपत्र घाटे यांनी स्वीकारले. हा लघुपट आधी मुंबई, पुणे, छत्रपती संभाजीनगर, जळगाव, अकोला, हरियाणा, गुजराथ अशा ठिकाणी झालेल्या प्रदर्शनात निवडण्यात आला होता. गावखेड्यांचे चित्रण लेखणीतून मांडणारे कसदार साहित्यिक निंबाजी हिवरकर यांच्या भरकटलेली वाट या कथासंग्रहातील पाठवणी हि कथा आहे. या कथेत शेतकऱ्यांची होत असलेली दयनीय अवस्था याबाबत लिखाण केलेले आहे.

निंबाजी हिवरकर यांनी आपल्या लेखनाची सुरुवात कवितांनी केली, पण भावना व्यक्त करण्यासाठी मर्यादा येत असल्याने कालांतराने ते कथा, कादंबरी लेखनाकडे वळले. वैयक्तीक आयुष्यात अबोल व प्रसिद्धीविन्मुख म्हणून त्यांची ओळख. त्यांच्या एकाही कथेत दुर्बोधता आढळत नाही, हे विशेष. फिरत्या चाकावरती हि आत्मचरित्रात्मक कादंबरीही त्यांनी लिहली. राज्यातील जाणकार समिक्षकांनी तिची दखल घेतली. शांताबाई शेळके, अण्णा भाऊ साठे तुका म्हणे असे मानाचे पुरस्कार त्यांच्या या साहित्यकृतीला मिळाले. मराठीतील भक्ती साहित्याचाही अभ्यासपूर्ण असा धांडोळा त्यांनी वेळोवेळी घेतला. 'महान विभूती वियोगी महाराज' हे आध्यात्मिक विषयावरचे पुस्तक हिवरकर यांनी लिहले. वयाच्या सत्तरीच्या उंबरठ्यावर असले तरी त्यांच्या लिखाणातला उत्साह तसूभरही कमी झालेला नाही. भरकटलेली वाट हा त्यांचा कथासंग्रह नवकथा लेखकांनी चिंतनशीलपणे अभ्यासावा असाच आहे. त्यात 'पाठवणी' ज्यामध्ये हुंड्यामुळे मुलीच्या बापावर व परिवारावर काय परिस्थिती उभी राहते, याचे जिवंत उदाहरण या कथेत आहे.

परिसरातून होतोय कौतुकाचा वर्षाव

या लघुपटाचे बेस्ट डायरेक्टर, बेस्ट शॉट फिल्म आणि बेस्ट सहाय्यक अभिनेत्री अशी तीन नामांकने शॉर्ट फिल्मला मिळाली. ज्यामध्ये सहाय्यक अभिनेत्री म्हणून विभा घनमोडे यांना पुरस्कार मिळाला. बेस्ट शॉट फिल्म आणि बेस्ट डायरेक्टर म्हणून ट्रॉफी व प्रमाणपत्र देऊन पाठवणी या लघुपटाला सन्मानित करण्यात आले. या फिल्ममध्ये प्रसिद्ध दिग्दर्शक नागराज मंजुळे यांच्या लघू चित्रपटात काम केलेल्या वैशाली केंदाळे यांनी प्रमुख भूमिका केली आहे. तर इतर कलाकारांनी नाटक, एकांकिका यामध्ये काम केलेले आहे. साहित्यिक निंबाजी हिवरकर आणि दिग्दर्शक अमोल घटे या दोघांमुळे पुन्हा कुऱ्हा परिसराचे नाव आंतरराष्ट्रीय फिल्म फेस्टिव्हलमध्ये झळकले. यामुळे त्यांच्यावर कौतुकांचा वर्षाव होत आहे.

***

संत गोरोबाकाका पालखीचे स्वागत
भाविकांना महाप्रसाद, चप्पल दुरुस्ती, आरोग्य तपासणी



आंबेगाव बु. : संत ज्ञानेश्वर महाराज व जगद्गुरू संत तुकाराम यांच्या पालखीबरोबर संत गोरोबा कुंभार यांची पालखी पुण्यामध्ये दाखल झाली. पुण्यात ट्यूलिप रेसिडेन्ससी व कुंभार समाज यांच्यातर्फे या संत गोरोबाकाका दिंडीचे, सर्व वारकरी बंधूंचे स्वागत केले. वारकरी बंधूंना महाप्रसाद व चप्पल दुरुस्ती, सेवा केस कटिंग सेवा व आरोग्य तपासणी सेवा वसंतराव घोडनदीकर मित्रपरिवार यांच्यातर्फे पुरवली गेले आज दिंडी दुपारी तीन वाजता सासवडकडे रवाना झाली. यावेळी दिंडीचे चालक गुलाब महाराज मावकर, पालखीचे अध्यक्ष किसनराव काळे उपस्थित होते. यावेळी गुलाब महाराज मावकर यांचे कीर्तन झाले. स्वागत करण्यासाठी पुण्यातील कुंभार समाज मोठ्या संख्येने उपस्थित होता. या दिंडी सोहळ्यासाठी जवळपास २५० वारकरी आले होते. यावेळी कुंभार समाज महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष सतीश दरेकर, कोषाध्यक्ष अनंत कुंभार, सुनील कवठेकर, रमेश देवकरसे, सुधीर चांदेकर, गणेश कुंभार, दिपक शिरवळकर आदी उपस्थित होते.

विद्यापीठात बहुजन समाजातील संत-महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करावी. बारा बलुतेदार महासंघाचे प्र-कुलगुरू यांना निवेदन

– डॉ. श्रीराम कोल्हे, अध्यक्ष



प्र-कुलगुरू यांना निवेदन देताना डॉ. श्रीराम कोल्हे व बारा बलुतेदार महासंघाचे पदाधिकारी

अमरावती : संत गाडगे बाबा अमरावती विद्यापीठामध्ये बारा बलुतेदार समाजातील संत-महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करण्यात याव्यात, अशा मागणीचे निवेदन बारा बलुतेदार महासंघाच्या वतीने विद्यापीठाचे प्र-कुलगुरू डॉ. प्रसाद वाडेगावकर यांना देण्यात आले.

निवेदनानुसार, विद्यापीठामध्ये बाराबलुतेदार समाजातील अण्णाभाऊ साठे, संत रोहिदास महाराज, संत सेवालाल महाराज, संत गाडगे बाबा, सर्वज्ञ चक्रधर स्वामी, संत जगनाडे महाराज, पुण्यश्लोक अहिल्याबाई होळकर, महात्मा बसवेश्वर, बिरसा मुंडा, महात्मा ज्योतिबा फुले, सावित्रीबाई फुले, संत तुकडोजी महाराज, छत्रपती शाहू महाराज, राजमाता जिजाऊ, स्वामी विवेकानंद, छत्रपती शिवाजी महाराज आदी महापुरुषांची व संतांची जयंती साजरी केल्या जातात. अशाच प्रकारे भगवान विश्वकर्मा, भगवान जिव्हेश्वर, श्री संत गोरा कुंभार, श्री संत नरहरी सोनार, श्री संत चोखामेळा, श्री लहुजी साळवे, माता चौंडेश्वरी, श्री संत तुकाराम, श्री संत सेना महाराज, श्री संत भगवान बाबा, श्री संत भिमा भोई, श्री संत उपासराव महाराज, श्री संत काशिबा महाराज, परमहंस परशराम महाराज, श्री संत भाकरे महाराज, श्री संत नामदेव महाराज, श्री संत सावता महाराज, महाकर्मा देवी, श्री संत आडकुजी महाराज वरखेड या संत, महापुरुषांच्या सुध्दा जयंती विद्यापीठामध्ये साजरी करण्यात याव्यात आणि याबाबतचा प्रस्ताव मान्यतेकरिता सिनेट अथवा व्यवस्थापन परिषदेत ठेवावी, अशी मागणी निवेदनातून करण्यात आली आहे. निवेदन सादर करताना महासंघाचे अध्यक्ष डॉ. श्रीराम कोल्हे, इंजि. वासुदेव चौधरी सकल ओबीसी समन्वय समिती, जिल्हा कार्याध्यक्ष दिलीप आकोटकर, जिल्हा महासचिव प्रवीण शेंदरे तसेच महासंघाचे पदाधिकारी सर्वश्री ओंकार राऊत, ज्ञानेश्वर ढगारकर, गणेश भोरे, श्रीकृष्ण माहोरे, दि.बा. पवार, अशोक वडुरकर, डॉ. विजय भोजणे, ॲड. संदेश अहेर, ॲड. गजानन तांबटकर, सुभाष खंडारे, सचिन पराये, नरेंद्र पाटमासे, गणेश नांदणे, राजेंद्र नवाथे, रमेश सालपे, जानराव घटारे, सुभाष परणकर, ज्ञानेश्वर कुर्वे, संजय हिंगासपुरे आदी उपस्थित होते.

जामखेड ते श्री क्षेत्र तेर पायी वाहन दिंडी सोहळा संपंन्न





जामखेड : श्री क्षेत्र तेर या ठिकाणी दिंडी पोहचल्यावर नगर प्रदक्षिणा होऊन श्री संत गोरोबा काकांच्या चांदीच्या पादुकांची मिरवणूक एकादशी दिवशी सकाळी संपन्न झाली. यावेळी ह.भ.प. पंढरीनाथ महाराज राजगुरू, ह.भ.प. मधुकर महाराज यादव, ह.भ.प. हरिभाऊ काका जठार, प्रा. ज्ञानदेव कुंभार सर, विनायक विठ्ठलराव राऊत, तेरचे मा. सरपंच महादेव खटावकर, सिताराम राळेभात, माऊली कुंभार, बबनराव गोरे सर, गोकुळ नाना देवतरसे, सतीश देवतरसे, भागवत नाना करडकर, उद्धव महाराज कुंभार, सचिन गोरे श्रीगोंदा, अशोक करडकर, पंढरीनाथ गोरे, संतोष पाटील, जयहरी राजगुरू, संजीवन मेंढकर, आनंद राजगुरू, नामदेव दिवटे गुरुजी, दत्तात्रय सोनवणे, भुजंग करडकर, संतोष गिरी, अशोक पन्हाळकर, हिरालाल राऊत, अनिल शेकळे, दिवटे काका, ओंकार महाराज, रोहित महाराज सानप, मुरलीधर राऊत, भालू टेकाळे, दादा सिध्देश्वर व महिला भगिनी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

वै. विठ्ठलराव राऊत आण्णा गेल्यावर त्यांचे सुपुत्र आणि कुंभार समाज महासंघाचे सचिव विनायकराव राऊत यांना आण्णांनी दाखवून दिलेल्या मार्गावर अगदी योग्य पावले उचलली जात आहेत, वैयक्तिक

फार मोठी जबाबदारी असून देखील कै. आण्णांनी घालून दिलेला वसा प्रत्येक कार्य आणि समाजाची सेवा, अवरित चालू ठेऊनी खऱ्या अर्थाने आण्णांना शांती मिळणार आहे व बांधवांना समाधान मिळणार जशी आण्णांनी समाज सेवा केली आहे त्याच विचारधारेत विनायकराव आपण चाललात अभिनंदन आहे आपलं व स्वागत आहे, हे केलेलं योगदान गोरोबा काका नक्कीच आशीर्वाद देतील व आपला परिवार व सर्व समाज बांधवांना आणि वारकरी संप्रदायिक भक्त मंडळी यांनाही काका आशीर्वाद देतील अशीच समाज सेवा आपणा सर्वांचे हातुन होवो हीच गोरोबा काका चरणी प्रार्थना. मस्तक हे चरणावरी या वारकरी संतांच्या.

***

वासुदेव कामणकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे प्रकाशन संपन्न



प्रकाशन करताना वसई महापालिकेचे माजी नगरसेवक सुनिल आचोळकर व मान्यवर

वसई : कामण गावचे सुपुत्र असलेले व तलाठी ते मंडळ अधिकारी पदापर्यंत, महसूल विभागात सेवा करुन काही वर्षांपूर्वी सेवानिवृत्त झालेले, वासुदेव नारायण कामणकर, यांनी स्वतःच्या सुवाच्य अक्षरात वासुदेव कामणकर यांनी लिहिलेल्या पुस्तकाचे... लिहिलेल्या, ईदं न मम, या ग्रंथ रुपी पुस्तकाचा प्रकाशन सोहळा, संत शिरोमणी गोरोबा कुंभार यांच्या सातशे सात व्या पुण्यतिथी निमित्ताने. कामण येथील संत गोरोबा काका मंदिरात मान्यवरांच्या उपस्थितीत मंगलमय वातावरणात पार पडला. वासुदेव कामणकर यांनी अतिशय खडतर परिस्थितीतून मार्ग काढत शिक्षणाची आवड असल्याने महाविद्यालयीन शिक्षण घेतले. पुढे नोकरीच्या शोधात असताना त्यांना तलाठ्याची नोकरी लागली. आपल्या सुसंस्कृत व सु स्वभावाने त्यांना मंडळ अधिकारी पदापर्यंत बढती मिळाली. जगावर कोरोना चे संकट येण्याआधी ते सेवा निवृत्त झाले होते. कोरोना काळात काही लोक नको ते प्रयोग करीत असताना, वासुदेव कामणकर यांना आपल्यातील सुप्त कलेचा उपयोग करण्याची इच्छा झाली. मुळात वासुदेव कामणकर यांच्या वडिलांचे अक्षर हे अतिशय सुवाच्य होते. सुवाच्य अक्षराला विचारवंतांनी दागीन्याची उपमा दिली आहे. वडिलांचे सुंदर अक्षर पाहून वासुदेव यांनी देखील स्वतःचे अक्षर सुधारण्यासाठी प्रयत्न सुरु केले. प्रत्येक कामात झोकुन देण्याच्या स्वभावाने अल्पावधीतच त्यांना शाळेतून सुंदर व सुवाच्य अक्षरातील लिखाणासाठी शाबासकी मिळु लागली. त्यामुळे कोरोना काळातील वेळ घालवण्यासाठी त्यांनी स्वतःला सुचेल, पटेल असे लिखाण सुरु केले होते. सतत अभ्यासु स्वभावामुळे त्यांनी सुमारे दोनशे तेरा पाने सुबक अक्षरात लिहून कधी काढली त्यांना ही कळले नाही. कामणकर यांनी त्या लिखाणाचे पी.डी.एफ. फाईल आपल्या काही मित्रांना पाठविल्या, ज्यांना ज्यांना त्यांनी लिखाण पाठवले, त्यांनी वासुदेव यांना त्याचे पुस्तकात रुपांतरीत करण्यासाठी आग्रह धरला. त्यातुन प्रेरणा घेऊन वासुदेव यांनी ते सर्व लिखाण स्व अक्षरांत पुन्हा लिहून जसेच्या तसे छापुन घेतले. पुस्तक लिहीत असताना पुस्तकाला नाव काय द्यावे या चिंतेत असताना ते नेहमीच म्हणत की हे माझ्या कडून कोणा अदृश्य शक्तीने लिहून घेतले आहे. मग त्यांना संस्कृत शब्द, 'ईदं न मम' (हे माझे नाही) आठवले, आणि मग हेच नाव पुस्तकासाठी योग्य आहे असे त्यांच्या अनेक मित्रांनी सांगितले. या पुस्तक प्रकाशन सोहळ्यास अनेक मान्यवरांनी उपस्थिती लावली. ठाणे जिल्हा परिषद माजी सभापती प्रभाकर म्हात्रे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या सोहळ्यासाठी अनेक माजी शासकीय अधिकाऱ्यांनी हजेरी लावली. त्यामधे निवृत्त ना. तहसीलदार हरिहर ठाकुर, विश्वनाथ पाटील, ज्ञानेश्वर पाटील, नामदेव पाटील, नरेंद्र ठाकुर, गणेश ठाकुर, नरेंद्र भोईर, दादाराव जाधव, निवृत्त विस्तार अधिकारी जयंत देसले, सुरेश निकुंभ, मा. नगरसेवक सुनिल आचोळकर, मा. सरपंच दिनेश म्हात्रे, कमलाकर जाधव, प्रशांत पारगावकर, भानुदास गोरेकर, कुंभार मित्र साप्ताहिकाचे संपादक कमलाकर केंभुलकर व जेष्ठ किर्तनकार डॉक्टर प्रदीप महाराज पाठक हे आवर्जुन उपस्थित राहून वरील सर्व मान्यवरांनी वासुदेव कामणकर यांच्या कर्तृत्वाचे तोंड भरून कौतुक केले. पुस्तकाची रचना मंदार नेने यांनी केली. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन किरण खानिवडेकर यांनी केले.

सीमा रमेश सोनवणे यांना राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार





सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार २०२४ सीमा रमेश सोनवणे आदर्श सरपंच ग्रामपंचायत डिंगोरे तालुका जुन्नर जिल्हा पुणे यांना प्राप्त झाला. सीमा रमेश सोनवणे यांनी आपल्या सरपंच पदाचे संपूर्ण मानधन गावच्या ग्रामविकासासाठी दिले. डिंगोरे गावात दारूबंदी केली आणि तसा ग्रामसभेत ठराव मंजूर करून घेतला. स्मशानभूमी मध्ये २०० झाडे लावून त्यांचे सुंदर प्रकारे जतन केले. कोरोना काळात अतिशय उल्लेखनीय कामगिरी केली या सर्व कामाची दखल घेऊन सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य राज्यस्तरीय आदर्श सरपंच पुरस्कार २०२४ सीमा रमेश सोनवणे यांना दिला गेला.

***

फलटण येथे वधूवर सुचक मेळावा संपन्न



दिनांक २७/०४/२०२४ रोजी फलटण येथील नवलबाई मंगल कार्यालय येथे युवा स्वाभिमानी कुंभार समाज संघटना, फलटण आणि कुंभार समाज सामाजिक संस्था महाराष्ट्र प्रदेश यांच्या संयुक्त विद्यमाने राज्यस्तरीय कुंभार समाज वधूवर सुचक मेळावा संपन्न झाला.

या कार्यक्रमाचे नेटके आयोजन ह.भ.प. गोरख महाराज कुंभार, कृष्णात कुंभार सर, रघुनाथ कुंभार (सासकलकर), संभाजी कुंभार तसेच सामाजिक चळवळीत उल्लेखनीय कामगिरी करणारे युवा नेतृत्व गणेश उध्दव कुंभार, राजेंद्र कुंभार, विजय कुंभार आणि सागर शिवाजी कुंभार यांनी केले. कुंभार समाजाचे राज्याध्यक्ष, जिल्हा अध्यक्ष, तालुका अध्यक्ष व पदाधिकारी या कार्यक्रमात उपस्थित होते.

यावेळी संत गोरोबाकाकांच्या प्रतिमेस पुष्पहार घालून दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. उपस्थित वधूवरांनी व पालकांनी आपला परिचय करून देऊन आपल्या अपेक्षा व्यक्त केल्या.

शामराजे कुंभार, बळवंत कुंभार सर, पाषाणकर सर, कृष्णात कुंभार सर, नाना कुंभार, पोपट कुंभार, सागर कुंभार, प्रा. महेश कुंभार सरांनी लग्न व समाज विकास व विविध योजनांचे मार्गदर्शन केले. यावेळी कुंभार समाजातील काही बंधु-भगिनींनी सहभाग घेतला.

***

नागपुरात कुंभार समाजभवनाचे स्वप्न लवकरच साकारणार

- महेंद्र भातकुलकर



कोराडी : नागपूर येथील संत शिरोमणी गोरोबा सेवा विश्वस्त मंडाळानी नुकतीच हुडकेश्वर परिसरातील समाज भवन निर्मित स्थळी प्रत्यक्ष भेट देऊन विकासात्मक दृष्टिने पाहणी केली. याप्रसंगी अध्यक्ष ऍड. श्रीधर काळकर, महेंद्र भातकुलकर, विजय वाघ, विनोद मेहर, दिलीप राऊत आदी हजर होते. हुडकेश्वर परिसरात संत शिरोमणी गोरोबा सेवा मंडल (रजी. नं. ३६२/२०१०) द्वारे १३,००० चौरस फूट आकाराचा भूखंड मागील १० वर्षापासून समाजबांधवाकडून जमा केलेल्या लोकवर्गणीतून सन २०१० या वर्षात खरेदी केला. प्रस्तावित जागेच्या विकासात संरक्षण भिंतीचे काम पूर्ण झालेले असून त्यानंतर सर्व प्रथम विहीर किंवा बोरवेल, भूखंडाचे सपाटीकरण, कार्यालय बांधकाम, शेकडा वृक्षरोपण आदी सारखे काम पुढील सहा महिन्यात पूर्ण करण्यासाठी नागपूर शहर कुंभारवासीय प्रयत्नात आहेत. प्रस्तावित विकासासाठी लोक वर्गणीची अत्यंत गरज असून समाजभवनाच्या बांधकामासाठी तन, मन, धनानें व स्वेच्छेने समाज बांधव संख्येनी समोर येत आहे हे विशेष आर्थिक मदत समाजबांधवाकडून होत असल्याने समाज भवनाचे स्वप्न साकारण्यासाठी अधिकचा समय लागणार नाही. समाजाचे हक्काचे भवन तयार झाल्यावर सर्वांना छोटे मोठे कार्यक्रमाचे कार्यासाठी, लग्नासाठी तसेच आदि कार्यासाठी समाजाच्या प्रत्येक माणसाला आगाऊ खर्च देऊन कार्यक्रमाचे आयोजनासाठी इतर समाजाच्या भवनात जाण्याची गरज राहणार नाही हे निश्चित. तेव्हा विश्वस्त मंडळाने बैंक ऑफ इंडिया, हुडकेश्वर शाखा, खाता क्रमांक ८७५३१०११०००४७१३, IFSC code BKIA0008753 या खात्यावर यथाशक्ति आर्थिक मदत करण्याची विनंती केली आहे.

विश्वकर्मा योजनेबाबत माननीय विकास आयुक्त सूक्ष्म लघु मध्यम उद्योग मंत्रालय नवी दिल्ली यांना निवेदन देताना दत्तात्रय कुंभार व मान्यवर



विश्वकर्मा योजनेअंतर्गत आपले समाजासाठी अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ व वंश पारंपरिक चेंबर ऑफ कॉमर्स व इंडस्ट्रीज या संस्थेच्या अथक परिश्रमाने व प्रयत्नाने देशासाठी १,२५,००० एवढे लाभार्थी टारगेट मिळविले आहे. तरी त्याबद्दल सूक्ष्म लघु मध्यम उद्योग मंत्रालय नवी दिल्ली यांचे खूप खूप आभार.

तसेच जास्तीत जास्त कारागीर बांधवांनी या योजनेत सहभागी व्हावे. ज्या कारागिरांनी अद्याप या योजनेत नोंदणी केलेली नाही त्यांनी ताबडतोब नोंदणी करावी ही विनंती.

अमरावती येथे सांस्कृतिक व स्नेहमिलन सोहळा संपन्न
महिलांनी आपले कलागुण जगासमोर आणावे - प्रभाताई भागवत



मनोगत व्यक्त करताना प्रभाताई भागवत



मंचावर विराजमान मान्यवर



कार्यक्रम संपंन्न करणाऱ्या सर्व पदाधिकारी महिला भगिनी



कार्यक्रमास उपस्थित महिला भगिनी व बंधू

अमरावती : (दि. २७.०२.२०२४) विदर्भ कुंभार समाज सुधार समिती महिला मंडळाच्यावतीने आयोजित हुन्नर २०२४ सांस्कृतिक व स्नेहमिलन सोहळा बडनेरा रोडवरील शशीनगरातील श्री संत गोरोबा भवन येथे नुकताच मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. मंचावर अध्यक्षस्थानी श्रीमती प्रभाताई भागवत, प्रमुख अतिथी म्हणून सौ. सरिता खोबरे, गौकर्णा कोल्हे, सविता कोल्हे, निर्मलाताई नांदुरकर, संगिता साळवीकर, वैशाली नांदुरकर, समितीचे अध्यक्ष डॉ. सुधाकर शेंडोकार, इंजि. वासुदेवराव चौधरी, डॉ. श्रीराम कोल्हे यांची उपस्थिती होती.

कार्यक्रमामध्ये रांगोळी, पाककला, फ्रुट्स डेकोरेशन, उखाणे, संगित खुर्ची, वन मिनिट गेम, नृत्य कला अशा विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. स्पर्धेत विजेत्या स्पर्धकांना पुरस्कार देऊन मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. नृत्यकला स्पर्धेत (मोठा गट) प्राची सरोदे प्रथम, पायल नांदुरकर व्दितीय, निधी नांदुरकर तृतिय, तर लहान गटात तन्वी जोंधळे प्रथम, स्वराली नांदुरकर व्दितीय, कल्पक राऊळकर तृतिय पुरस्काराचे मानकरी ठरले. रांगोळी स्पर्धेत भावना चिल्लोरकर प्रथम, मेघा सरोदे व्दितीय, शिवाजी महाराजांच्या रांगोळीला तृतिय, पाककला स्पर्धेत माहुलकर प्रथम, सुषमा काळकर व्दितीय, सविता कोल्हे तृतिय, उखाणे स्पर्धेत स्वाती नांदुरकर, माया नांदुरकर व प्रज्ञा राऊळकर यांनी प्रथम, फळांच्या सजावट स्पर्धेत राशी लाडवीकर प्रथम, माहुलकर व्दितीय व माला खांडेकर तृतिय, वन मिनिट गेममध्ये मंदा काळे व माहुलकर प्रथम, व्दितीय लिला साळवीकर, माया नांदुरकर तृतिय क्रमांकाचे मानकरी ठरले. याप्रसंगी मनोगत व्यक्त करतांना महिलांनी आपल्यातील कलागुण जगासमोर आणावे, असे आवाहन कार्यक्रमाच्या अध्यक्ष श्रीमती प्रभाताई भागवत यांनी केले. सरिता खोबरे यांनी महिलांनी जीवनात पुढे प्रगती कशी करावी याविषयी मार्गदर्शन केले. समितीचे अध्यक्ष डॉ. सुधाकर शेंडोकार, इंजि. वासुदेव चौधरी, भारती गुहे, स्वाती बडगुजर यांनीही याप्रसंगी आपले मनोगत व्यक्त केले. स्पर्धेचे परिक्षण स्वाती बडगुजर, माधुरी सुधा, गौरी राठी यांनी केले. संचालन प्रा. वैशाली नांदुरकर, आभार सुषमा काळकर यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरीता नंदा पोहनकर, सविता कोल्हे, मंदा काळे, सुषमा काळकर, संगिता साळवीकर, गौकर्णा कोल्हे, निर्मला नांदुरकर, सौ. शितल आगरकर, सौ. सुशील चौधरी, सौ. दिपाली मेहरे, ॲड. ज्योतीताई बावस्कर, वनिता गावंडे, वैशाली सरोदे, वंदना काळकर, सविता काकडे, निता धामणकर यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला पंजाबराव काकडे, डॉ. श्रीराम कोल्हे, सुरेश नांदुरकर, प्रा. संजय साळवीकर, ॲड. गजानन तांबटकर, अरुण पोहनकर, सतिश गावंडे, सुरेंद्र सरोदे, मधुकर खांडेकर, शंकरराव धामणकर, राजेंद्र अंबुलकर, सुनिल भागवत, केशव मदनकर, नंदकिशोर काकडे, नंदु काळकर, नंदु नांदुरकर, विलास धामणकर, विलास मेहरे, रमेश तांबटकर, मोहन नांदुरकर, दिनेश आगरकर, जगत लोंधे, दिनेश टेंभरे, रमेश अंबुलकर तसेच समाजबांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

***

ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले यांचे स्मृतीदिनी कर्तृत्ववान महिलांचा सत्कार



अमरावती : सर्व शाखीय भावी समाज, सकल ओबीसी समन्वय समिती अमरावती सावता व्यायाम व क्रिडा मंडळाचे संयुक्त विद्यमाने सावतामाळी सभागृह रामनगर अमरावती येथे बारा बलुतेदार, अलुतेदार, भटक्या विमुक्त जाती, जमातीतील कर्तृत्ववान महिलांचा सावित्रीबाई फुले स्मृती सन्मान चिन्ह, शाल, श्रीफळ व पुष्प देऊन सत्कार करण्यात आला. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी प्रा.डॉ. उज्वला मेहरे (माळोरे) तर प्रमुख पाहुण्या म्हणून सौ. स्मिताताई वाटोळ, सौ. सविताताई नवले, सौ. सुशीलाताई चौधरी, प्राचार्य सोनालीताई निमकर, सौ. नंदाताई जो. मालपे, सौ. कविताताई पाचघरे, सौ. संगीताताई पाचघरे उपस्थित होत्या.

सर्वप्रथम क्रांतीसूर्य ज्योतिबा फुले व ज्ञानज्योती सावित्रीबाईंचे प्रतिमेचे पूजन व क्रांतीज्योत पेटविण्यात आली. त्यानंतर ज्येष्ठ रंगकर्मी श्री सुनीलदास यांनी मी 'सत्यबोधक ज्योतीराव फुले बोलतोय' हा एकपात्री प्रयोग सादर केला. त्यानंतर पतीचे छत्र हरविलेल्या उपस्थित असंघटित घरेलु कामगार महिलांचा मान्यवरांचे हस्ते साडीचोळी देऊन सत्कार करण्यात आला. त्यानंतर बारा बलुतेदार, अलुतेदार, ओबीसी, भटक्याविमुक्त जाती जमातीतील कर्तृत्ववान महिलांचा मान्यवरांचे हस्ते शाल श्रीफळ स्मृतीचिन्ह देऊन यथोचित सत्कार करण्यात आला. यामध्ये सौ. सविताताई डाहे (भोई), श्रीमती प्रभाताई भागवत, सौ. निर्मलाताई नांडूरकर, सौ. ज्योतिताई वावल्हर (सर्व कुंभार), सौ. ज्योतिताई सैरीसे, सिमाताई पाखरे (बेलदार), श्रीमती वैशाली पिहूलकर, सुचिता सातपूते (शिंपी), सौ. राजकन्या मालखेडे (चर्मकार), सविताताई वरणकर (न्हावी), प्रियंका राऊत (न्हावी), देवयाणी कुर्वे, अर्चना खांडेकर (सुवर्णकार), शोभाताई डुकरे (वडर), सौ. वंदनाताई घुगे, श्रीमती मालाताई ढाकणे (वंजारी), सौ. रीताताई मोकलकर, श्रीमती ललीताताई पेढेकर (धोबी), सौ. संगीताताई साने, सौ. प्रेमाताई लव्हाळे (धनगर), सौ. जयश्री नागपूरे, श्रीमती अश्विनी गाडेकर, सौ. वनिता जंगले, सौ. उषाताई वर्‍हेकर (सर्व माळी), सौ. अनुष्काताई बेळोकार, सौ. शोभाताई नवलकर (सुतार), श्रीमती शिलाताई मेश्राम (बौद्ध), सौ. निलीमा अंजीकर, सौ. मधूरा साहावे (गुरव), सौ. वंदना जामनेकर (महादेव कोळी), शोभाताई चारघोडे, भूमिका सायगण (ओतारी), अनिता निखीले, किरणताई गुलवाडे (तेली), शाखाताई लसनकर (खसिक) वैशाली गळसुंदरे (आरेवाली), संगीताताई दांडगे (कोळी) कार्यक्रमाचे संचलन सौ. स्मिता घाटोळ यांनी केले. उद्घाटनपर भाषण प्रा. श्रीकृष्ण बनसोड तर प्रास्ताविक इंजि. वासुदेवराव चौधरी यांनी केले. कार्यक्रम गझली करण्याकरीता डॉ. श्रीराम कोल्हे अध्यक्ष बारा बलूतेदार महासंघ, श्रीकृष्ण माहोरे, इंजि. भरतराव खासबागे, प्रा. अरुण बुंदेळे, ओमप्रकाश अंबाडकर, इंजि. सुभाष गोहत्रे, कमलाकर घोगळे, वसंत भडरे, प्रा. होले, सुभाष खंडारे, प्रविण शेंदरे, दिलीप आकोटकर, डॉ. नवाये संजय हिंगालपूरे यांनी अथक प्रयत्न केले. या प्रसंगी सर्व समाजातील मान्यवर महिला व पुरुष बहुसंख्येने उपस्थित होते.

***

महिलांनी स्वावलंबी व्हावे : डॉ. पावसकर



सातपूर : जागतिक महिला दिन कार्यक्रमास कुसुम महिला सखी मंचाच्या पदाधिकारी.

नाशिक सातपूर : महिलांसाठी शासनाच्या विविध स्वयंरोजगाराच्या संधी आहेत. अशा संधींचा लाभ घेऊन स्वावलंबी व्हावे असे प्रतिपादन मनपा मायको रुग्णालयाच्या आरोग्य अधिकारी डॉ. रुचिता पावसकर यांनी केले. कुंभार समाज उत्कर्ष मंडळ संचलित कुसुम महिला सखी मंचाच्या वतीने महिला सबलीकरण या विषयावर त्या बोलत होत्या. तर डॉ. गौरी बोरुडे यांनी महिलांचे आरोग्य या विषयावर मार्गदर्शन केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शंकुतला जोर्वेकर होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून कुसुम संस्थेचे अध्यक्ष प्रा. तुळशीराम मोरे, सेक्रेटरी गुलाबराव सोनवणे, राजेंद्र सावंदे, अरुण बागूल, नारायण सोनवणे, अनिल मोरे, गंगाधर जोर्वेकर, वसंत चव्हाण, दत्तात्रय सोमंवशी, किरण बोरसे यांनी स्वागत केले. सविता जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले. उषा चित्ते यांनी आभार मानले. यावेळी कुसुम सोमवंशी, शोभा सोनवणे, मीना सोनवणे, कल्पना सावंदे, लक्ष्मी सोनवणे, पुष्पा चव्हाण आदींसह महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

कुंभार समाजाचा स्नेहमिलन कार्यक्रम उत्साहात



उदगीर : स्वाभिमानी कुंभार समाज सामाजिक संस्थेच्यावतीने रविवारी (दि.२१) छत्रपती संभाजीनगर शहरातील ज्योतीनगर येथील श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरात हळदी कुंकू व स्नेह मिलन कार्यक्रम पार पडला.

या कार्यक्रमास प्रमुख उपस्थिती म्हणून प्रसिद्ध नेत्ररोग तज्ञ डॉ. श्रीलताताई देवडे (धूत हॉस्पिटल), सुमित्रा हाळनोर (नगरसेविका), जया गोत्रम, जमुना आचार्य, अनिता मल्हारे यांची उपस्थिती होती. त्याचबरोबर प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. प्रकाश देवडे (डायरेक्टर, मुंबई अंकोकेअर सेंटर), गिरीजाराम हाळनोर (माजी नगरसेवक तथा माजी सभागृह नेते), वेंकटेश गोत्रम (प्रदेश उपाध्यक्ष), केरोजी आचार्य (प्रदेश कार्याध्यक्ष), प्रल्हाद निमगावकर (माजी नगरसेवक), आनंदा मल्हारे, शंकरराव मल्हारे, श्रीराम तेलंग, (राज्य युवक संपर्कप्रमुख), राजकुमार गोरगिळे (मराठवाडा युवक अध्यक्ष), शिवानंद पासेवार (जिल्हाध्यक्ष), संतोष कानगुलकर (जिल्हा सचिव), उत्तमराव मल्हारे (जिल्हा उपाध्यक्ष), माधवराव पदमपेंटे (जिल्हा कार्याध्यक्ष) यांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात श्री संत गोरोबाकाका यांचा जीवन परिचय देणारे भावदर्शन हे पुस्तक सर्व महिलांना वाण स्वरूपात भेट देण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक संघटनेच्या महिला जिल्हाध्यक्षा अनिता मल्हारे यांनी केले, त्याचबरोबर कार्यक्रमात उपस्थित महिलांना नेत्ररोग तज्ञ डॉ. श्रीलताताई देवडे यांनी डोळ्यांच्या आजाराविषयी काळजी कशी घ्यावी या संदर्भात मार्गदर्शन केले. अनुराधाताई मारोती पासेवार यांनी आभार मानले. सूत्रसंचालन कु. यशश्री पासेवार व कु. धनश्री निरदोडे यांनी केले, अशी माहिती सोशल मीडिया प्रमुख बालाजी घटकार यांनी दिली. **यांनी घेतले विशेष परिश्रम :** कार्यक्रमासाठी बालाजी निरदोडे, गोरोबा राजरवाड, माधवराव निरदुडे, धोंडीबा कानगुले, श्रीराम पोटगंटे, मारोती पासेवार, रमेश कानगुले, भगवान विभुते, प्रविण वैद्य, दीपक जोगपेटे, अरुण आहेरकर, निलेश लोणकर, गंगाधर रामरुळे, प्रेम राजमाने, पिराजी कानपुर्णे, अवधूत मल्हारे, रामेश्वर कानघुले या सर्व पदाधिकाऱ्यांनी प्रयत्न केले.

यड्रावच्या रजनी कुंभारांची अनोखी रामभक्ती
सतरा वर्षांपासून श्रीराम नामाचा जप : २ कोटींवर जप लिखाण

इचलकरंजी : यड्राव (ता. हातकणंगले) येथील ८६ वर्षीय श्रीमती रजनी राजाराम कुंभार यांचे श्री राम नाम जप लिखाण अव्याहतपणे सुरू आहे. रामनामाचा मनोमनी जप करत अनोखी रामभक्ती त्यांनी या वयातही जोपासली आहे. त्यातूनच त्यांचे २ कोटी २ लाख ५४ हजार श्रीराम नाम जप लिखाण झाले आहे. जप लिखाण अखंडपणे सुरू आहे. सतरा वर्षांपूर्वी श्री राम नाम जप लिखाणाचा प्रवास सुरू झाला. त्यावेळी श्रीराम नाम जप लिखाणाच्या वहीत २३ हजार जप लिखाण होत होते. सध्या बाहत्तर पानी वही मिळते. त्यामध्ये २९ हजार २३२ राम नाम जप लिहिले जातात. दोन्ही प्रकारच्या वह्या मिळून आजपर्यंत एकूण ७८७ वह्या नाम जप लिखाण केले आहे. असे एकूण दोन कोटी दोन लाख ५४ हजार २३४ नाम जप लिखाण झाले आहे. लिखाण केलेल्या वह्या इचलकरंजी येथे एका सेवाभावी संस्थेमध्ये संकलित करून अयोध्या येथे पाठवण्यात येतात. यामुळे स्वलिखित राम नाम जप श्रीरामाच्या चरणी अर्पण होत असल्याचा एक त्यांना मनस्वी आनंद होतो. सुरुवातीपासून धार्मिकवृत्ती असल्याने त्यांना अध्यात्माची ओढ आहे. श्रीराम नाम जप लिखाणातून मिळणाऱ्या आत्मिक समाधानामुळे ओळखीच्या व नात्यातील शंभरहून अधिक लोकांना त्यांनी श्रीराम लिखाणासाठी प्रवृत्त केले आहे. इतरांच्या राम नाम जप लिखाणाच्या वह्या अपूर्ण राहिल्या तर त्या पूर्ण करून अयोध्यासाठी पाठवतात.



'राम राम आजी' म्हणून ओळख

श्रीराम रजनी कुंभार यांनी सुरुवाती –पासून कोणतेही नवल किंवा वेगळी गोष्ट ऐकल्यानंतर राम राम म्हणण्याची सवय होती. त्याच सवयीचे रूपांतर राम नाम लिखाणात झाले. यामुळे त्यांना माहितीतील व संपर्कातील नागरिक, पाहुणे 'राम राम आजी' या नावानेच ओळखतात. सर्वांना चांगली बुद्धी, आरोग्य, सुख, आनंद, ऐश्वर्य मिळू दे याच सद्भावनेने श्री राम नाम जपाचे लिखाण त्या आजही अव्याहतपणे करत आहेत.

***

महिलांना व्यवसायासाठी तीन लाखांपर्यंत बिनव्याजी कर्ज

खास महिलांसाठी केंद्र सरकारकडून उद्योगिनी योजना सुरु

पुणे : महिला उद्योजकांच्या संख्येत आता लक्षणीय वाढ होत आहे. तरीही अनेक महिला उद्योजकांकडे अपुरे भांडवल असल्यामुळे औद्योगिक क्षेत्रात प्रवेश करता येत नाही. त्यामुळे महिला सक्षमीकरणासाठी केंद्र सरकारकडून अनेक योजना आणल्या जात आहेत. केंद्र व राज्य सरकार आपापल्या स्तरावर महिलांना स्वावलंबी बनविण्यासाठी अथक प्रयत्न करीत आहेत.

उद्योग असो, कृषी असो किंवा अन्य कोणतेही क्षेत्र, महिला प्रत्येक क्षेत्रात आपला ठसा उमटवत आहेत. केंद्राच्या सुचनेनुसार अनेक बँकांनी महिलांना व्यवसायात मदतीसाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. उद्योगिनी योजना बँकांच्या माध्यमातून राबविली जात असून, या योजनेंतर्गत महिलांना पाच लाखांपर्यंत कर्ज मिळत आहे. या योजनेचा लाभ महिलांना मिळावा, यासाठी प्रशासन प्रयत्नशील आहे. वेगवेगळ्या क्षेत्रांत महिलांना स्वावलंबी बनावे, यासाठी ही योजना लाभदायक ठरत आहे.

या राष्ट्रीय बँकांमध्ये करा अर्ज :

या योजनेचा लाभ घेणाऱ्या महिलांना काही राष्ट्रीय व खासगी बँकांमार्फत कर्ज उपलब्ध करून दिले जाते. त्यासाठी अर्ज करावा लागतो. अर्जाची पडताळणी केल्यानंतर कर्ज मिळते.

काय आहे उद्योगिनी योजना?

केंद्र सरकारच्या सूचनेवरुन बँकांनी खास महिलांसाठी सुरु केलेली योजना आहे. यामध्ये पाच लाखांपर्यंत कर्ज विनातारण, म्हणजेच काहीही गहाण न ठेवता काही महिलांना मिळते, तर काहींना या योजनेंतर्गत कर्ज उपलब्ध होते. महिलांना स्वावलंबी होणे, स्वत:च्या पायावर उभे राहून घराला आर्थिक हातभार लावणे सध्याच्या काळात महत्त्वाचे आहे. काही वेळेला त्यांनी केलेली बचत अपुरी पडते. अशावेळी ही योजना त्यांना फायदेशीर ठरते.

कोणत्या कामासाठी मिळते कर्ज?

या योजनेंतर्गत बांगड्या बनविणे, ब्यूटी पार्लर, बेडशीट आणि टॉवेल बनविणे, बुक बायंडिंग, नोटबुक बनविणे, कॉफी आणि चहा बनविणे, कापूस धागा उत्पादन, रोपवाटिका, कापड व्यवसाय, दूग्ध व्यवसाय आणि पोल्ट्री संबंधित व्यवसाय, डायग्नोस्टिक लॅब व्यवसाय, ड्रायक्लिनिंग लॅब व्यवसाय, ड्रायक्लिनिंग, सुक्या मासळींचा व्यापार, खाद्यतेलाचे दुकान, नायलॉन बटन उत्पादन, जुने पेपर मार्ट, पापड निर्मिती आदी अनेक व्यवसायांसाठी उद्योगिनी योजनेंतर्गत पाच लाखांपर्यंतचे कर्ज मिळू शकते.

कोणकोणती कागदपत्रे लागतात?

अर्जासोबत पासपोर्ट २ फोटो, आधार कार्ड, दारिद्र्यरेषेखालील व्यक्तीचे रेशनकार्ड, उत्पन्नाचा दाखला, रहिवासी दाखला, जन्म दाखला, जात प्रमाणपत्र, बँक खाते बुक आदी.

कमी व्याजात महिलांना तीन लाखांपर्यंत कर्ज

महिलांसाठी केंद्राने पुढाकार घेण्यास सुरुवात केली आहे. उद्योगिनी योजनेंतर्गत अनुसूचित जाती, अनुसूचित जमाती तसेच शारीरिकदृष्ट्या विकलांग असलेल्या महिलांना बिनव्याजी कर्ज दिले जाते.

निकष काय?

या योजनेचा लाभ घेण्यासाठी उमेदवार महिला असणे आवश्यक आहे. पात्र वयोगटाची श्रेणी १८ ते ५५ इतकी आहे. वार्षिक उत्पन्न मर्यादा १.५ लाखापर्यंत असून व्यवसाय कर्जासाठी फक्त महिला व्यवसाय मालक होण्यास पात्र आहेत.

बिनव्याजी कर्ज : अनेक बँकांनी महिलांना व्यवसायात मदत करण्यासाठी एक पाऊल पुढे टाकले आहे. उद्योगिनी योजनेंतर्गत तीन लाखांपासून ते पाच लाखांपर्यंत कर्ज मिळते. यामध्ये अनु. जाती, जमाती यांचा समावेश आहे.

***



Manoj Prajapati (C.M.D.)
9371587053

समृध्द जीवन जगण्यासाठी ...

An ISO 9001 - 2008

SHIVAM PRAJAPATI®

BUILDERS & DEVELOPERS

Address : Office No. 10, Prajapati Cascade,
Sector -1, New Panvel, Dist. Raigad - 410206
Tel. :022 2746 2053 / Mob. : 7303 386 820.
Email : info@shivamprajapatibuilders
shivamprajapati1983@gmail.com
www.shivamprajapatibuilders.com

नाशिक येथे गोरोबाकाका मंदिराचे भूमिपूजन संपन्न





नाशिक : तीर्थक्षेत्र नगरी श्रीक्षेत्र नाशिक येथे गोदावरीच्या तिरी संत शिरोमणी श्री गोरोबा काका कुंभार यांच्या भव्य अशा मंदिराचे भूमिपूजन दिनांक १० फेब्रुवारी २०२४ रोजी महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते ऑनलाईन पद्धतीने झाले तसेच प्रत्यक्ष जागेवर मंदिराचा पायाभरणी व भूमिपूजनाचा कार्यक्रम दिनांक २२ फेब्रुवारी २०२४ रोजी हभप संजय महाराज आहेर, हभप अंबादास गारे, हभप सोमनाथ वाकचौरे, हभप भीमराव चव्हाण, हभप किशोर शिंदे, हभप हनुमान जाधव, हभप निवृत्ती रसाळ, हभप परसराम राऊत, हभप राजाराम वैद्य, हभप रामकृष्ण जाधव, हभप लक्ष्मण राजापुरे यांच्या हस्ते कुदळ मारून व श्रीफळ फोडून संपन्न झाला.

याप्रसंगी नवयुवक कुंभार समाज विकास संस्थेचे संस्थापक अध्यक्ष निलेश राऊत यांनी मंदिरा संबंधी माहिती दिली व मनोगत व्यक्त केले.

या कार्यक्रमासाठी रंगनाथ शेठ सूर्यवंशी, सोमनाथ शेठ सोनवणे (दिंडोरीकर), ज्ञानेश्वर भागवत, विजय चव्हाण, शांतीलाल काळे सर, विलास कर्वे, श्याम जोंधळे, भारत सेठ सोनवणे, भरतशेठ शिरसाट तसेच या कार्यक्रमासाठी नाशिक जिल्ह्यातून व नाशिक शहरातून असंख्य समाज बांधव उपस्थित होते.

भूमिपूजन सोहळा यशस्वी करण्यासाठी नवयुवक कुंभार समाज विकास संस्था नाशिक, जिल्हाध्यक्ष निलेश राऊत, शहर कार्याध्यक्ष मा.लक्ष्मीकांत शिंदे, संपर्क प्रमुख विजयकुमार सोनवणे तसेच नाशिक शहर उपाध्यक्ष मनोज गायकवाड, सुरेश जाधव, नाशिक तालुका अध्यक्ष मा. शिवप्रसाद क्षीरसागर, ज्येष्ठ मार्गदर्शक चंद्रकांतजी गायकवाड, बाळासाहेब जोर्वेकर, बाळासाहेब जाधव, अशोक सुके, उमाकांत गायकवाड, वसंतराव गायकवाड, सुरेश गायकवाड, शिवाजी गायकवाड, महिला आघाडी शहराध्यक्षा सौ. प्रमिला शिंदे.

***

कुंभार समाजबांधवांची तेर येथे आध्यात्मिक सहल





कराड : सातारा जिल्हा अखिल भारतीय प्रजापती कुंभकार (कुंभार) संघ यांच्या वतीने सातारा जिल्ह्यातील कुंभार समाजबांधवांची आध्यात्मिक सहल तेर (जि. उस्मानाबाद) येथे उत्साहात झाली. संत गोरोबा काका यांच्या कार्याविषयी माहिती व्हावी यासाठी या सहलीचे आयोजन करण्यात आले होते. सहल सातारा येथून रवाना होऊन गोंदवलेकर महाराज मठ येथे दर्शन घेऊन पुढे तेरकडे प्रयाण झाली. संत गोरोबा काका यांच्या निवासस्थानाला भेट देण्यात आली. यावेळी तेथील पुजारी श्रीमती प्रभावती, विठ्ठल पुजारी यांना संत गोरोबाकाका यांच्या निवासस्थानाची माहिती दिली. यावेळी राष्ट्रपतीपदक विजेत्या सौ. कमलाताई कुंभार यांनी सहलीसाठी आलेल्या सर्वांचे स्वागत केले. यावेळी संत गोरोबा काकांच्या समाधी स्थळी सुरू असणाऱ्या विनाधारी पारायण याची माहिती घेण्यात आली. त्यानंतर तुळजापूर, अक्कलकोट येथे दर्शन घेऊन सातारा येथे सहलीची सांगता करण्यात आली.

सहलीचे नियोजन सातारा जिल्हा कार्यकारिणीचे महासचिव नवरंग कुंभार, सातारा जिल्हा अध्यक्ष चंद्रकांत कुंभार, उपाध्यक्ष रवी कुंभार, पदाधिकारी दिनकर कुंभार, रामदास कुंभार, तानाजी कुंभार, व्यंकट कुंभार, रामचंद्र कुंभार, नितीन कुंभार, दत्ता कुंभार, जयसिंग कुंभार, राजेंद्र कुंभार, सुनील कुंभार यांनी केले.

***

देशभक्त रत्नाप्पा कुंभार स्मारकास पाच कोटी मंजूर
विनय कोरे यांचा पुढाकार; स्मारक समितीतर्फे सत्कार

कोल्हापूर : पद्मश्री. देशभक्त रत्नाप्पाणा कुंभार यांच्या स्मारकासाठी आमदार विनयरावजी कोरे (सावकर) यांच्या माध्यमातून प्रादेशिक पर्यटन विकास योजना सन २०२३-२४ अंतर्गत पाच कोटी रूपयाचा निधी मंजूर केल्याबद्दल मा. आमदार विनयरावजी कोरे (सावकर) यांचा वारणानगर येथे जाऊन सत्कार करण्यात आला.



कोल्हापूर : आ. विनय कोरे यांचा सत्कार करताना स्मारक समितीचे पदाधिकारी, यावेळी रजनीताई मगदूम, डॉ. विश्वनाथ मगदूम, पुंडलिक जाधव, सुनील स्वामी आदी उपस्थित होते.

यावेळी रजनीताई मगदूम, डॉ.विश्वनाथ मगदूम, पदमाकर पाटील, बाबगोंडा पाटील, प्रा. राजेंद्र कुंभार, महावीर पाटील, प्रा. शांताराम कांबळे, पुंडलिक जाधव, सुनील स्वामी, उदय माळी, संतोष आवटी, सरपंच सौ. अश्विनी गुरव, ग्रा. सदस्या सौ. वैशाली पाटील, प्रा. डॉ. नंदकुमार कुंभार, स्वस्तिक पाटील, देवगोंडा पाटील, सतिश सावंत, इंजि. राहूल कुंभार, इंजि. राजू हुपरे, इंजि. कणाद कुंभार यांचेसह मान्यवर उपस्थित होते.

या स्मारकामध्ये देशभक्त रत्नाप्पाण्णा कुंभार यांचा पूर्णाकृती पुतळा, स्वातंत्र्य चळवळीचे दालन, शेती व जलसिंचन प्रशिक्षण, दोनशे आसन क्षमतेचे सभागृह, संविधान संग्रहालय, लोकशाही प्रशिक्षण केंद्र, व्यायामशाळा, अभ्यासिका व ग्रंथालय, डिजिटल प्रदर्शन, संशोधन व ग्रंथ प्रकाशन, शंभर पुरुष व शंभर स्त्रियांसाठी स्वतंत्र निवासस्थान उभारण्यात येणार आहे.

उद्योजक कुंभार यांना सहकुटुंब अयोध्याचे निमंत्रण
बारामतीत पत्रिका सुपूर्द : पत्नी पुष्पांजली यांचा सहभाग

बारामती : बारामती चेंबर ऑफ कॉमर्स व इंडस्ट्रीजचे कार्याध्यक्ष व अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ न्यू दिल्लीचे माती कला विकास सेलचे राष्ट्रीय चेअरमन दत्ता कुंभार व त्यांच्या पत्नी पुष्पांजली कुंभार यांना अयोध्या येथे (दि. २२) जानेवारी रोजी होत असलेल्या ऐतिहासिक प्रभू श्रीराम प्राणप्रतिष्ठा सोहळ्याचे निमंत्रण आले आहे. श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र यांच्या वतीने पुणे विभागाचे सरकार्यवाहक पोपटराव शिंदे तसेच मंगेश मासाळ, अमोल देशमुख व नवनाथ साळुंखे यांनी दत्ता कुंभार यांच्या निवासस्थानी जाऊन निमंत्रण पत्रिका दिली. या ऐतिहासिक सोहळ्यास दत्ता कुंभार हे सहकुटुंब उपस्थित राहणार आहेत. अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ ही कुंभार समाजाची देशव्यापी संघटना आहे. देशातील प्रत्येक राज्यात कार्यरत आहे. दत्ता कुंभार व त्यांची टीम ही गेले १० वर्षांपासून कुंभार समाजातील तळागाळातील कुंभार काम करणारे कारागीरांसाठी आधुनिक तंत्रज्ञान, प्रशिक्षण व माती कलेचा विकास यांवर काम करीत आहेत. खादी ग्रामोद्योग आयोग भारत सरकार यांच्या वतीने राबविण्यात येणारे कुंभार सशक्तीकरण मिशन योजने अंतर्गत देशातील ३ लाख ५ हजारांहून जास्त कुंभार कारागिरांना विजेवर चालणारी यांत्रित चाके, चिखल मिळणी यंत्रे व आधुनिक माती कलेचे प्रशिक्षण देण्याचे मोलाचे काम दत्ता कुंभार यांचे नेतृत्वाखाली प्रजापती कुंभकार महासंघाने केलेले आहे.



बारामती : श्रीराम जन्मभूमी तीर्थक्षेत्र यांच्या वतीने निमंत्रण पत्रिका देण्यात आली.

विश्वकर्मा योजनेत योगदान : अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघ न्यू दिल्लीचे माती कला विकास सेलचे राष्ट्रीय चेअरमन कुंभार हे देशपातळीवर काम करीत आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुरू केलेली पंतप्रधान विश्वकर्मा विकास योजना सुरु करण्यासाठीही प्रजापती महासंघाचे योगदान आहे. अखिल भारतीय स्तरावर काम करणारे कुंभार महासंघाला या ऐतिहासिक सोहळ्याचे प्रतिनिधित्व करण्याची संधी मिळाल्याबद्दल संपूर्ण देशातील प्रजापती कुंभकार समाजामध्ये सर्वत्र अभिनंदन होत आहे.

कळंब आयटीआयला आता संत गोरोबाकाका यांचे नाव
कुंभार समाजाकडून शासन निर्णयाचे जोरदार स्वागत

पांडुरंग तात्या कुंभार

कळंब : येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था आता संत गोरोबा काका शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था या नावाने ओळखली जाणार आहे. राज्याच्या कौशल्य, रोजगार, उद्योजकता व नावीन्यता विभागाने शुक्रवारी एका शासन निर्णयानुसार हा निर्णय घेतला आहे.

शासकीय व खासगी औद्योगिक प्रशिक्षण संस्था अंतर्गत (आयटीआय) शिल्प कारागीर प्रशिक्षण योजनेंतर्गत (सीटीएस) प्रशिक्षण देण्यात येते. या योजनेचा मुख्य उद्देश हा युवकांना रोजगाराभिमुख प्रशिक्षण देऊन त्यांना रोजगार व स्वयंरोजगारासाठी सक्षम बनवणे व खासगी औद्योगिक आस्थापनास लागणाऱ्या कुशल मनुष्यबळाचा पुरवठा करणे असा आहे.

राज्य सरकारने राज्यातील २६ शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थांच्या नावात बदल करून समाजात उल्लेखनीय योगदान देणाऱ्या व्यक्तींची नाव देण्याचा निर्णय ३० सप्टेंबरच्या मंत्रिमंडळ बैठकीत घेण्यात आला होता. यात कळंब येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेचा समावेश असून, या संस्थेचे तेर येथील संतश्रेष्ठ श्री संत गोरोबा काका कुंभार शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्था कळंब असे नामकरण करण्यात आले आहे.



४० वर्षांपूर्वी स्थापना :
कळंब येथील शासकीय औद्योगिक प्रशिक्षण संस्थेची १९८४ साली स्थापना झाली असून, १९९७ साली सुसज्ज व अद्ययावत असे बांधकाम झालेल्या या संस्थेत विविध ९ ट्रेड आहेत. १५ युनिटमध्ये तब्बल ३०० विद्यार्थी शिक्षण घेत आहेत, असे प्राचार्य के.जे. पवार यांनी सांगितले.

मारुती महाराज कुंभार यांच्या उत्तरकार्याला ज्ञानेश्वरी ग्रंथ वाटप



सरूड : कोतोली (ता. शाहूवाडी) येथील मारुती कुंडलिक कुंभार (वय ९३) यांचे सोमवारी निधन झाले. ग्रामीण कथाकार प्रा. अशोक कुंभार यांचे ते वडील होत. गावकऱ्यांना पिण्याच्या पाण्यासाठी आड बांधणी, धर्मशाळा उभारणी असे अनेकांगी समाजोपयोगी कार्य करून संस्कृती जतन आणि सामाजिक जडणघडणीत त्यांनी मोलाचा वाटा उचलला. गावाला पुण्यभूमीचा मान मिळवून दिला. त्यांचा हा वसा आणि वारसा जपत त्यांच्या तिनही मुलांनी महाराजांच्या उत्तरकार्याच्या औचित्याने उपस्थित नातलग, ग्रामस्थांना ज्ञानेश्वरी ग्रंथ व विठ्ठल–रुक्मिणीची मूर्ती भेट देऊन वडिलांना आदरांजली वाहिली. त्यांच्या या अनुकरणीय उपक्रमाचे परिसरात कौतुक होत आहे.

***

⁂- महत्वाची माहिती -⁂

सर्व प्रजापती/ कुंभार/ कुमावत विद्यार्थ्यांसाठी तुमची व्यावसायिक पदवी/पदासाठी निवड झाली असल्यास पदवी अभ्यासक्रम उदा. अभियांत्रिकी/ वैद्यकीय/ एमबीए/ कायदा/ आर्किटेक्चर इ. आणि तुम्ही किंवा तुमचे कुटुंब आर्थिक अडचणींना तोंड देत असाल तर, तुम्ही खाली नमूद केलेल्या वेबसाइटवर आर्थिक सहाय्यासाठी अर्ज करू शकता.

https://prajapatifoundation.org

आमच्याशी कनेक्ट व्हा : prajapatisgmail.com

भारतातील कोणत्याही राज्यातील आर्थिकदृष्ट्या तणावग्रस्त कुटुंबातील सर्व प्रजापती/कुंभार/कुमावत विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र आहेत.

प्रजापती कम्युनिटी सर्व्हिसेस फाउंडेशन,

प्लॉट क्र.१३/बी, कोटक महिंद्रा बँकेच्या वर, से.१९, नवीन पनवेल, नवी मुंबई – ०६.

IMPORTANT INFORMATION

FOR ALL PRAJAPATI/KUMBHAR/KUMAWAT STUDENTS

If you have been selected for a professional Graduate / Post Graduate course eg. Engineering/ Medical/ MBA/ Law/ Architecture etc. and you or your family are facing financial challenges, then you may apply for financial assisatance on the below mentioned website.

https://prajapatifoundation.org

Connect with us: prajapaticsfgmail.com

All Prajapati/ Kumbhar/ Kumavat students from economically stressed families from any state in India are eligible to apply.

PRAJAPATI COMMUNITY SERVICES FOUNDATION, Plot No. 13/B, Above Kotak Mahindra Bank, Sector 19, New Panvel, Navi Mumbai - 410206

Conditions apply.*

संत गोरोबा काकांचा चरित्र ग्रंथ गोरोबाकाकांच्या चरणी अर्पण



गोरोबाकाकांचा चरित्र ग्रंथ अर्पण करताना ह.भ.प. दिपक महाराज खरात व मान्यवर

तेर – समय सारथी : संत गोरोबा काकांची जीवनगाथा असलेला चरित्र ग्रंथ, 'वैराग्य महामेरू संत श्री गोरोबा काका' आज गुरुपौर्णिमेच्या शुभ मुहूर्तावर गोरोबा काकांच्या समाधी स्थानी त्यांच्या चरणी अर्पण करण्यात आला. या ग्रंथाचे लेखक, संत वाङ्मयाचे अभ्यासक व कथा प्रवक्ते तथा संत चरित्र निरूपणकार दीपक महाराज आणि या ग्रंथाच्या निर्मिती प्रक्रियेमध्ये महत्त्वाचे योगदान असलेले, श्रीराम हॉस्पिटल मुरुडचे मुख्य वैद्यकीय अधिकारी डॉ. सुरेश रणदिवे यांच्या हस्ते सदरील ग्रंथ गोरोबाकाकांच्या समाधीस अर्पण करण्यात आला. याप्रसंगी कला शिक्षक नवनाथ पांचाळ, लातूर येथील युवा सामाजिक कार्यकर्ते आदिनाथ चिरे, ह.भ.प. अविनाश तपिसे इत्यादींची उपस्थिती होती.

संत परीक्षक श्री गोरोबाकाकांचे हे जीवन चरित्र समग्र प्रकाशन यांच्या वतीने प्रकाशित करण्यात आले असून या पुस्तकामध्ये कवी राजेंद्र अत्रे, धाराशिव व नवनाथ पांचाळ, तेर यांची रेखाटने टाकण्यात आली आहेत. पुस्तकाचे मुखपृष्ठ फोर्टीफाय कम्युनिकेशन मुंबई यांनी तयार केले असून मुद्रण व्यवस्था शिवानी प्रिंटर्स पुणे यांनी पाहिली आहे. अक्षर जुळणीचे काम नेताजी जावीर आणि पुस्तकातील छायाचित्रे राज फोटो स्टुडिओ यांच्या वतीने देण्यात आली आहेत. या पुस्तकामध्ये ८० GSM^2 चा कागद वापरण्यात आला असून, १३० GSM^2 च्या आर्ट पेपरवर १२ पृष्ठांवरती या विषयाने रंगीत छायाचित्रे समाविष्ट करण्यात आली आहेत. संत गोरोबाकाकांच्या चरित्र व वाङ्मयाचा प्रसार व प्रचार करण्याच्या हेतूने निर्माण करण्यात आलेला, सुमारे २७० पृष्ठांचा हा ग्रंथ, वाचकांसाठी केवळ ८० रुपयांना उपलब्ध करून देण्यात आला आहे. परफेक्ट व पुठ्ठा किंवा गॅली बाइंडिंग प्रकारात तयार करण्यात आलेल्या या पुस्तकाचे वितरण लवकरच सुरू करण्यात येणार आहे अशी माहिती वैराग्य महामेरू प्रबोधिनीचे प्रसिद्धी प्रमुख यांच्याकडून देण्यात आली आहे.

***

महाराष्ट्र कुंभार विकास संस्थेतर्फे इलेक्ट्रिक चाके वाटप



फोटोत डावीकडून पद्माकर शिरसाठ, धनलाल शिरसाठ, ज्ञानेश्वर भागवत, राजेंद्र सावंदे, निंबाजी हिवरकर व मान्यवर

सावदा : येथील खादी व ग्रामउद्योग आयोग (भारत सरकार) व अखिल महाराष्ट्र कुंभार विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने कुंभार सशक्तीकरण मिशन राबविण्यात आले. सूक्ष्म लघु व मध्यम उद्यम मंत्रालय (भारत सरकार) यांच्या अंतर्गत कौशल्य विकास प्रशिक्षण कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता त्यात जळगांव जिल्हयातील समाज बांधवांना इलेक्ट्रिक चाकांचे दहा दिवसीय प्रशिक्षण देऊन इलेक्ट्रिक चाके वाटप करण्यात आले.

अखिल महाराष्ट्र कुंभार विकास संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मोहनराव जगदाळे व राष्ट्रीय मातीकला सेलचे चेअरमन दत्ता कुंभार यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अ.म.कुं.वि. संस्था जळगांव जिल्हाध्यक्ष हे होते. राज्य अध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत, राज्य प्रवक्ते राजेंद्र सावंदे, वीट उत्पादक अध्यक्ष कृष्णा सोनवणे, नाशिक जिल्हाध्यक्ष नंदकुमार सोनवणे, ज्येष्ठ साहित्यीक निंबाजी हिवरकर व समाज भूषण पुरस्कृत धनलाल शिरसाठ, जळगांव जिल्हा युवक अध्यक्ष मल्हार कुंभार, युवक उपाध्यक्ष समाधान कुंभार, विशाल हिवरकर, सुनिल न्हावकर, गोबा पंडित, दिलीप हिवरकर, निलेश पंडित, पुनमचंद ठाणकर सह समाज बांधव उपस्थित होते.

कार्यक्रमामध्ये ज्येष्ठ साहित्यिक निंबाजी हिवरकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले. जिल्हयातील माती काम करणारे समाज बांधव यांना ४० चाकांचे वाटप करण्यात आले तर अजून काही समाज बांधवांना चाके मिळवून देण्यासाठी शासनोपयोगी लागणारे कागदपत्रे जमा करण्याचे आवाहन अध्यक्ष यांनी केले व अ.म.कुं.वि. संस्था जळगांव यांच्याशी सलग्न म्हणून सावदा शहरातील कार्यकारिणी जाहीर करण्यात आली त्यात रविंद्र प्रेमचंद हिवरकर यांची शहराध्यक्ष तर मोतीराम हिवरकर यांची उपाध्यक्ष व गोपाल हिवरकर यांची सचिव म्हणून निवड करण्यात आली.

सूत्रसंचालन योगेश हिवरकर यांनी केले.

***

प्रजापती समाजाच्या मदतीसाठी कुंभार समाज धावून गेला

– रमाकांत गोरे



मंदिरात उपस्थित मोहन कुंभार, नितीन कुंभार, बेलाराम कुंभार, ललित प्रजापति, नेमसिंग सिसोदिया व मान्यवर

प्रजापती कुंभार समाजाचे सीबीडी बेलापूर सेक्टर ८ येथे टेकडीवर श्री यादे माँ देवीचे मंदिर १९८७ सालापासून अस्तित्वात आहे, या मंदिराचे व्यवस्थापन श्री प्रजापती समाज जनसेवा संस्था करत आहे. काल दिनांक १४ जुलै २०२४ रोजी कुंभार समाजाच्या प्रतिनिधीने, पदाधिकाऱ्यांनी या मंदिरास भेट देऊन तेथील मंदिराच्या समस्या जाणून घेऊन चर्चा करण्यात आली, सिडको कडून हे मंदिर पाडण्यासाठी नोटीस आली आहे, कुंभार समाज आणि प्रजापती समाज हे मंदिर वाचवण्यासाठी एकत्रितरित्या प्रयत्न करेल तसेच कुंभार समाजातर्फे पूर्ण सहकार्य करण्याचे आश्वासन त्यांना देण्यात आलेले आहे तसेच प्रजापती समाज हा कुंभार समाज महाराष्ट्र प्रदेश या संघटनेशी संलग्न राहणार असल्याचे सांगितले.

याप्रसंगी मोहन कुंभार (अध्यक्ष कुंभार समाज, नवी मुंबई), नितीन कुंभार (विश्वस्त कुंभार समाज नवी मुंबई), रमाकांत गोरे (सरचिटणीस कोकण विभाग), यशवंत अष्टेकर (अध्यक्ष कल्याण डोंबिवली कुंभार समाज) राजेश हिवरेकर (अंबरनाथ तालुका पदाधिकारी) पांडुरंग कुंभार, नारायण कुंभार, (पोयंजे, पनवेल) तसेच नेमसिंग सिसोदिया (क्षत्रिय कर्णी सेना प्रमुख) तर प्रजापती समाजाच्या वतीने अध्यक्ष, बेलाराम कुंभार तसेच सचिव, ललित प्रजापति तसेच पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते.

***

संत महात्म्य व्याख्यानमाला संपन्न



संत जनगाडे महाराजांच्या प्रतिमेसमवेत उपस्थित महिला व पुरुष पदाधिकारी

अमरावती : श्री संत संताजी जगनाडे यांचेमुळे तुकाराम महाराजांचे अभंग जनसामान्यांना उपलब्ध होऊ शकली असे प्रतिपादन संत गाडगेबाबा विद्यापीठाचे माजी प्रा. कुलगुरू यांनी केले. ते अलुतेदार बलुतेदार, भटक्या विमुक्त जनजाती, अल्पसंख्यांक जाती समन्वय समिती अमरावती द्वारा आयोजित संत चरित्र व त्यांचे महात्म व्याख्यान माळेतील नववे पुष्प गुंफताना बोलत होते.

तैलिक समिती सभागृह भूमिपुत्र कॉलनी अमरावती येथे आयोजित कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून दिनेश बिजवे, अध्यक्ष अमरावती जिल्हा तैलिकसमिती अमरावती तर प्रमुख पाहुणे म्हणून बारा बलुतेदार महासंघाचे अध्यक्ष डॉ. श्रीराम कोल्हे, डॉ. राजेंद्र नावाथे जिल्हाधक्ष वंजारी समाज, श्रीकृष्ण जी माहोरे कार्याध्यक्ष उपेक्षित समाज महासंघ, कैलास गिरोडकर, सौ. डॉ. रंजनाताई बनारसे उपस्थित होते.

दीप प्रज्वलन, जगनाडे महाराजांचे प्रतिमेचे पुजनानंतर कार्यक्रमाची सुरुवात झाली. स्फूर्ती दायक संचालन प्रा. सुरेश नांदुरकर यांनी केले. प्रमुख पाहुण्यांची यथोचित मार्गदर्शन झाले.

या प्रसंगी शांताराम होले यांनी समितीच्या कार्याची स्तुती केली. अशोक पिंपरकर यांची सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक या पदावरून सेवानिवृत्त झाले बद्दल तसेच सौ. अंजली व अर्चना पिंपळकर या भगिनींचे वाढदिवसाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. आभार प्रदर्शन वि. दा. पवार यांनी केले.

कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता अविनाश राजगुरे, डॉ. विजय शिरभाते यांनी अथक प्रयत्न केले. या प्रसंगी इंजि. सुभाष गोहत्रे, डॉ. राजवजी जामठे, वासुदेवराव वानखडे, सुरेश सिरभाते, डॉ. बलखंडे, डॉ. काढानें, नाना रमतकर, दिलीपसिंग खांबरे, सिदार्थ भोजने, डॉ. गोरे, डॉ. गोहत्रे, डॉ. झोडपे, डॉ. उडाखे, डॉ. खांनंदे, डॉ. आजनकर, हांडे, अशोक गुल्हाने, राजू डांगे, नरेंद्र जिरापुरे, आनंद हिवराळे, मालखेडे, सोनोने, एस. बी. वऱ्हेकर, दिलीप आकोटकर, सुभाष सिंधे, कॅप्टन रमेश वडगावकर, डॉ. मोहोड, डॉ. गोपीचंद चौव्हाण, नरेंद्र पाठमासे, सौ. जयश्री शिरभाते, डॉ. विजयकर, इंजि. ज्ञानेश्वर कुर्वे, शरद पुसदकर, शांताराम होले, सौ. अनुक्शा बेलोरकर, दिलीप शेलोटकर, सुधाकर नान्हे, सौ. देवयांनी कुर्वे, जयश्री शहकार, प्रमोद वेलकर, ॲड. संदेश आहेर, नंदकिशोर नेतानावर उपस्थित होते.

***

पुणे ससून रुग्णालयाच्या सिस्टर इन्चार्ज सौ. सरोज नंदकुमार माळशिरसकर सेवानिवृत्त!



पुणे (१.९.२०२४) : कुंभार समाज सामाजिक संस्था, उपाध्यक्ष डॉ. नंदकुमार माळशिरसकर रा. भोसरी पुणे ह्यांच्या धर्मपत्नी सौ. सरोजताई नंदकुमार माळशिरसकर मॅडम ह्या पुण्याच्या प्रख्यात ससून रुग्णालयाच्या सिस्टर इंचार्ज म्हणून ३५ वर्षाच्या अविरत सेवेनंतर नुकत्याच निवृत्त झाल्यात. कोरोनाचा काळ हा त्यांच्या रुग्णसेवेतील कसोटीचा काळ ठरला. त्या काळात सलग ड्युटीमुळे घरी येणे–जाणे ही दुरापास्त झाले होते. रुग्णालयात रुग्ण सेवा आणि घरी सासूची सेवा हा त्यांचा नित्यक्रम. संसारवेली उमलेल्या एका मुलाला डॉक्टर केले तर लहान्याला मरीन इंजिनियर करुन नामांकित कंपनीत नोकरीस लावले. त्यांच्या कर्तृत्वाची दखल घेऊन रुग्णालय प्रशासनाने वेळोवेळी बढती देऊन त्यांना सन्मानित केले. कुंभार समाज सामाजिक संस्थेच्या मोशी येथील वधू वर मेळाव्यातून वेळ काढून भोसरी येथील त्यांच्या निवासस्थानी जात संत शिरोमणी श्री गोरोबाकाकांची प्रतिमा – आरती व भेट वस्तू देत सत्कार केला. सुख समृद्धी आरोग्याच्या शुभेच्छा देण्याबरोबर लहान्या मरीन इंजिनियर चि. इंजि. क्षितिजला मनपसंत वधू मिळावी म्हणूनही शुभेच्छा दिल्यात. आता घर सांभाळून उर्वरित वेळेत पती डॉ. नंदकुमार ह्यांच्या बरोबर वैद्यकीय–धर्मार्थ सेवाभावी शिबिरांना सेवा देण्याचा मानस बोलून दाखविला. ह्यावेळी त्यांचे पती डॉ. नंदकुमार साहेब, मोठा मुलगा डॉ. आकाश, खान्देशची नात डॉ. सौ. ऐश्वर्या उपस्थित होत्या. सौ. सरोजताई नंदकुमार माळशिरसकर ह्यांना सेवानिवृत्तीच्या हार्दिक शुभेच्छा..! **– सौ. संगिता आणि इंजि. बबनराव जगदाळे, नवापूर जि. नंदुरबार**

प्रा. डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्या कथेची बी.ए. अभ्यासक्रमात निवड



श्रीरामपूर : येथील शिरसगाव इंदिरानगर भागातील वाचन संस्कृती प्रतिष्ठानचे संस्थापक, अध्यक्ष प्रा.डॉ. बाबुराव दत्तात्रय उपाध्ये यांच्या कथेची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत मराठी विषयाच्या प्रथम वर्ष कला शाखा अभ्यासक्रमात निवड करण्यात आली आहे.

सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ अंतर्गत पुणे येथील सर परशुराम भाऊ स्वायत्त महाविद्यालयातील मराठी विषयासाठी डॉ. उपाध्ये यांच्या आणि कमल सापडली या कथेचा समावेश अभ्यासक्रमात करण्यात आला आहे. या कथेत मुलेमुले पळवून नेणे आणि त्यामुळे कुटुंब, गाव यांच्या जीवनात कशी कुत्तरओढ होते, त्यातून सुटका प्रसंगाचे अत्यंत हृदयस्पर्शी कथानक गुंफलेले आहे. डॉ. उपाध्ये हे रयत शिक्षण संस्थेत १९८४ ते २०१७ या काळात मराठीचे प्राध्यापक होते. सातारा, पुणे, कर्जत, श्रीरामपूर या शाखेत त्यांनी अध्यापन केले. मराठी विभाग प्रमुख म्हणून ते रा.ब. नारायणराव बोरावके महाविद्यालयातून सेवानिवृत्त झाले. डॉ. उपाध्ये यांची ५१ पुस्तके प्रकाशित झाली आहेत. पुणे येथील डॉ. स्नेहल तावरे यांच्या स्नेहवर्धन प्रकाशन तर्फे प्रकाशित झालेल्या आणि डॉ. संजीवनी वाघ, प्रा. स्वप्नील जोशी यांनी अभ्यासक्रमासाठी संपादित केलेल्या 'भावलेल्या कथा' ह्या पुस्तकात ही कथा समाविष्ट आहे. डॉ. उपाध्ये यांच्या 'माकडांच्या हाती शाळेची खिचडी' या कथासंग्रहातून ही कथा घेतली आहे. डॉ. उपाध्ये यांच्या मार्गदर्शनाखाली ०८ विद्यार्थी पीएच.डी. व १७ विद्यार्था एम.फिल्. झाले आहेत. ते बहिःशाल शिक्षण मंडळ अंतर्गत व्याख्याते आहेत. अभ्यासक्रमात कथा समाविष्ट झाल्याबद्दल त्यांचे सर्वत्र अभिनंदन होत आहे.



अशोकराव सोनवणे साहेब यांच्या समर्थ कृषी पर्यटनाला भेट दिल्याबद्दल त्यांना शुभेच्छा दिल्या.

अशोकराव सोनवणे साहेब यांच्या समर्थ कृषी पर्यटनला अखिल महाराष्ट्र कुंभार समाज विकास संस्थेचे प्रदेशाध्यक्ष ज्ञानेश्वर भागवत साहेब, सोमनाथ शेठ सोनवणे, रंगनाथ शेठ सुर्यवंशी, राजेंद्र सावंदे, राजाभाऊ बोरूडे साहेब, नितीन घोडके, मारुती रसाळ यांनी सदिच्छा भेट दिली. त्याप्रसंगी अशोकराव सोनवणे यांनी आनंद व्यक्त केला व सर्वांना शाल श्रीफळ देऊन सन्मानित केलं. तसेच अशोकराव सोनवणे साहेब यांनी श्री समर्थ कृषी पर्यटना बद्दल माहिती दिली व ज्ञानेश्वर भागवत साहेब, सोमनाथ शेठ सोनवणे, रंगनाथ शेठ सुर्यवंशी, राजेंद्र सावंदे यांच्या बरोबर संस्थांचे परिवर्तन व समाजाची प्रगती झालीच पाहिजे व काही महत्त्वाच्या विषयावर अशोकराव सोनवणे साहेब यांनी चर्चा केली.

***

कर्मवीरांची कमवा व शिका योजना आणि आदर्श शिक्षकांमुळे जीवन परिपूर्ण झाले.

- प्रा. विलासराव तुळे



सेवापूर्ती निमित्त प्रा. विलास तुळे यांचा सत्कार मान्यवरांचे हस्ते संपंन्न

श्रीरामपूर : रयत शिक्षण संस्थेचे संस्थापक पद्मभूषण डॉ. कर्मवीर भाऊराव पाटील यांनी सुरु केलेली कमवा व शिका योजना तसेच संस्थेत लाभलेले प्रा. भगवान पाटील, डॉ. बाबुराव उपाध्ये, डॉ. सौ. नलिनी महाडिक इत्यादी मराठी गुरुवर्यामुळे माझे शिक्षण झाले, ॲड. रावसाहेब शिंदे यांच्यामुळे प्राध्यापक होता आले, जीवनात भेटलेली अनेक देवमाणसं हीच माझी जीवनप्रेरणा असल्याचे मत प्रा. विलासराव शिवाजी तुळे यांनी व्यक्त केले.

येथील श्रीसंत गोरा कुंभार प्रतिष्ठानचे उपाध्यक्ष प्रा. विलासराव तुळे यांचा सेवानिवृत्ती सोहळा मोखाडा येथील महर्षी विठ्ठल रामजी शिंदे प्राथमिक, माध्यमिक व कनिष्ठ महाविद्यालयात आयोजित करण्यात आला होता, त्याप्रसंगी प्रा. तुळे बोलत होते. प्राचार्य अर्जुन शेळके अधक्षस्थानी होते तर प्रमुख पाहुणे म्हणून उच्च माध्यमिक विभाग प्रमुख प्रा. बंडू विठ्ठल शिर्के होते. कर्मवीर अण्णा व रयतमाऊली सौ. लक्ष्मीबाई भाऊराव पाटील यांच्या प्रतिमेचे पूजन, दीपप्रज्वलन झाले. स्वागत, प्रास्ताविक प्राथमिक विभागाचे मुख्याध्यापक कृष्णा जगदाळे यांनी केले. यावेळी शाखेतर्फे प्रा. तुळे आणि सौ. कुंदा तुळे यांचा सत्कार करण्यात आला. मंचर येथील विद्यार्थिनी सौ. शीतल गाढे, निलेश घोडेकर, जमीर शेख, मोखाड्याचे पत्रकार विलासराव पाटील, कमळाकर झिंजुर्डे, बाळासाहेब घाणे, सौ. कमलताई घाणे इत्यादिंनी तुळे दांपत्यांचा सत्कार केला.

प्रा. विलासराव तुळे आपल्या मनोगतात पुढे म्हणाले, माझा जन्म ०७ जुलै १९६६ रोजी झाला. माझे प्राथमिक शिक्षण काठापूर गावी झाले. आईवडील यांनी कुंभारकाम करीत मोठ्या प्रतिकूल परिस्थितीत माझे शिक्षण केले. सातारा येथे बहीण सौ. मीरा शिवाजी सासवडकर यांनी आधार दिला. छत्रपती शिवाजी कॉलेजमध्ये कमवा व शिका योजनेत भाग घेतला. संस्थेचे सचिव प्राचार्य जे. जी. जाधव, मराठी विषयाचे प्रा. भगवान पाटील, प्रा.डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्यामुळे अनेक कामात सहभागी होता आले. रयत शिक्षण संस्था ही आदर्श शिक्षकांमुळे नावारूपास आली. अशा संस्थेत गोधेगाव, श्रीरामपूर, मंचर, नगर, कोळपेवाडी, राहाता, चांभारशेत, मोखाडा आश्रमशाळा शाखेत कार्यरत राहिलो. प्रामाणिक काम करण्यातच आज समाधान आहे.

श्रीरामपूरला सासूबाई श्रीमती सुमनबाई मांढरे यांनी सर्व प्रकाराचा आधार दिला. त्यामुळे श्रीरामपूर हीच कर्मभूमी झाली. हे शहर सर्वांना हवेहवेसे वाटते. गुरूवर्य व साडू डॉ. बाबुराव उपाध्ये यांच्यामुळे लेखन, वाचन चळवळीत सहभागी आहे. नगर जिल्ह्यात साहित्यिक उपक्रम सुरु आहेत, त्यातच आता अधिक भाग घेऊन आत्मचरित्र पूर्ण करीत आहे. अनेकांच्यामुळे जीवन घडले, घडते आहे असे उद्‌गार काढून प्राचार्य अर्जुन शेळके यांनी भव्यदिव्य सेवानिवृत्तीचा सोहळा घेतल्याबद्दल आभार मानले. प्रमुख पाहुणे प्रा. बंडू शिर्के यांनी प्रा. तुळे यांच्या शैक्षणिक आदर्श कार्याचे कौतुक केले. प्राचार्य अर्जुन शेळके यांनी प्रा. तुळे हे विद्यार्थीप्रिय प्राध्यापक असल्याने आदिवासी भागात त्यांनी नावलौकिक प्राप्त केला. चरित्र आणि चारित्र्याचा आदर्श निर्माण केला असे गौरवोद्गार काढले. शीतल गाढे, जमीर शेख, अधिक्षक बळीराम पोळ, संजय देवरे, तुकाराम लोंढे, कृषी अधिकारी सोनाली केमदारणे, गंगाराम चव्हाण इत्यादीसह विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. सौ. कुंदा तुळे, चेतन तुळे, सौ. सुजाता तुळे, शिक्षक, शिक्षकेतर, विद्यार्थी उपस्थित होते. मुख्याधापक कृष्णा जगदाळे यांनी सूत्रसंचालन केले. धनाजी शिंदे यांनी आभार मानले.

'जाणता राजा' तर्फे जि. प. शाळा विद्यार्थ्यांना रेनकोट वाटप



पुणे : जाणता राजा प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष दीपक आबा शिरवळकर व मित्रपरिवार यांच्या वतीने जिल्हा परिषद सायरखळा व गाडेकरवाडी प्राथमिक शाळेतील विद्यार्थ्यांना मोफत छत्र्या व रेनकोट देण्यात आले.

याप्रसंगी संतोष कुंभार, अक्षय घोडनदीकर, संदीप कुमार, पुष्पमाला शिरवळकर, शीतल कुंभार, प्रियांका घोडनदीकर, गौरी कुंभार, मीना गभाले, विनय राजणीकर, मच्छिंद्र जगदाळे, संजय केंगले, ग्रामस्थ उपस्थित होते. विनय राजणीकर यांनी सूत्रसंचालन केले. मीना गभाले यांनी आभार मानले.

***

ब. ना. कुंभार गुरुजी माध्यमिक विद्यालय येथे आदर्श शिक्षक पुरस्काराचे वितरण



नावे

शिरपूर : ब. ना. कुंभार गुरुजी माध्यमिक विद्यालय वाघाडी ता. शिरपूर जि. धुळे येथे विद्यालयाला ज्यांचे नाव दिलेले आहेत असे कै. बळीराम नागोजी कुंभार गुरुजी यांच्या स्मरणार्थ त्याचे कनिष्ठ सुपुत्र प्रभाकर बळीराम कारभारी यांच्या सौजन्याने विद्यालयातील शिक्षकांना ''आदर्श शिक्षक'' पुरस्कार देण्यात आले. याप्रसंगी सर्वप्रथम कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी संस्थेच्या खजिनदार माननीयताई सौ. आशाताईजी रंधे, तर प्रमुख उपस्थिती म्हणून जिल्हा परिषद माजी सदस्य सौ. सिमा रंधे, सरपंच किशोर लोटन माळी, सुभाष नगर सरपंच विजय अर्जुन पवार, शालेय शिक्षण समिती अध्यक्ष बापूसाहेब देवरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. विद्यार्थ्यांच्या स्वागत गीत व ईश स्तवनाने कार्यक्रमाची सुरुवात झाली. मान्यवरांच्या हस्ते दीपक प्रज्वलन करून आदरणीय दादासो विश्वासदादा रंधे, डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन व बळीराम नागोजी कुंभार यांच्या प्रतिमेस माल्यार्पण करून पुष्पांजली वाहण्यात आली. यानंतर विद्यालयातर्फे आलेल्या अतिथी व मान्यवरांचा शाल श्रीफळ व बुके देऊन सत्कार करण्यात आला. प्रस्तावनेत विद्यालयाच्या मुख्याध्यापिका कोठारी मॅडम यांनी थोर पुरुषांना मानवंदना दिली व बक्षिसाचे स्वरूप व निवडीचे निकष स्पष्ट केले. प्रा. प्रभाकर बळीराम कारभारी यांचेकडून आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षकांचा शाल, श्रीफळ, बुके सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र व रोख रक्कम अशा स्वरूपात सत्कार करण्यात आला. पुरस्कार प्राप्त शिक्षक छोटू उत्तम मोरे, रामकृष्ण कोमलसिंग राजपूत, श्रीमती वंदना नामदेव चित्ते व श्रीमती स्मिता वनीतलाल कोठारी यांना पुरस्कार मिळाला. सी यु मोरे व राजपूत सर यांनी विद्यार्थ्यांच्या सर्वांच्या यशाचे हे गमक होय असे सांगितले तर विद्यालयाच्या मुख्याध्यापिका यांनी हा पुरस्कार केवळ एकट्याचा नसून हा सर्व विद्यालय परिवाराचा सर्वांचाच आहे असे सांगितले तर प्रमुख पाहुणे श्रीमती सीमाताई रंधे यांनी विद्यार्थ्यांनी लहान, विद्यार्थी तसेच संस्काराचे बाळकडू घ्यावे. शिस्त स्वच्छता नीटनेटकेपणा यांचा आग्रह बालपणीच घ्यावा असे सांगितले तर प्रमुख अध्यक्ष यांनी संस्थेचे उपक्रम ही विशद केले व त्यांच्या मनातील काही संकल्पना ही स्पष्ट केल्यास कार्यक्रमाची सांगता राष्ट्रगीताने झाली.

***

कुंभार समाजाच्या कार्यक्रमात सटाण्यातील अशोक सोनवणे यांचा समाजभूषण पुरस्काराने सन्मान



नावे

धुळे : अनिल चित्ते प्रतिनिधी, धुळे येथील राष्ट्रीय पुरस्कार प्राप्त संस्था, धुळे जिल्हा खान्देश कुंभार समाज विकास शैक्षणिक संस्थेच्या वतीने दिला जाणारा ह्या वर्षीचा मानाचा समाजभूषण पुरस्कार हा सटाणा ता. बागलाण, जि. नाशिक येथील संत गोरोबाकाका बहुउद्देशीय पतसंस्थेचे चेअमन व कुंभार समाजाप्रती सदैव दातृत्व भाव ठेवणारे व्यक्तिमत्त्व, अशोक निंबा सोनवणे यांना जाहीर झाला होता.

त्यांच्या सटाणा येथील निवास्थानी जाऊन धुळे जिल्हाध्यक्ष सुरेश बहाळकर यांच्या हस्ते समाजभूषण पुरस्कार अशोक निंबा सोनवणे यांना डोक्यावर पगडी ठेऊन, शाल, सन्मान चिन्ह व मानपत्र देऊन त्यांना सपत्निक सन्मानपूर्वक प्रदान करण्यात आला. यावेळी अनिल चित्ते धुळे जिल्हा प्रसिध्दी प्रमुख व मिलिंद भाऊ कुंभार धुळे जिल्हा संघटक यांच्यासह सोनवणे परिवारातील सर्व सदस्य ही उपस्थित होते. या प्रसंगी सुरेश बहाळकर यांनी मनोगत व्यक्त करताना सांगितले की, अशोक नाना यांची साधी राहणी आणि उंच विचार हे वाखाणण्याजोगे आहेत. ते अतिशय मेहनती व कार्यक्षम असे व्यक्तिमत्व आहेत. त्यांनी नेहमीच स्वहितापेक्षा समाज हितालाच प्राधान्यक्रम देण्याचे काम केले आहे. ते बागलाण तालुक्यातील कुंभार समाजाच्या तळागाळातील कुटूंबापर्यंत पोहचून त्यांना सक्षम कसे करता येईल यासाठी ते नेहमी झटत असतात व त्याचे आम्ही साक्षीदार आहोत. आपल्या पतसंस्थेच्या माध्यमातून ते दरवर्षी विविध समाज उपयोगी व शैक्षणिक उपक्रम ते राबवत असतात. असे बहुआयामी व्यक्तिमत्त्व आपल्या कुंभार समाजाला लाभले आहे हे आपले अहम् भाग्य आहे आणि म्हणूनच त्यांच्या या कार्याचा कुठेतरी गौरव व्हावा यासाठी संस्थेतर्फे त्यांची समाजभूषण पुरस्कारासाठी सार्थ निवड केली. त्यांना समाजभूषण पुरस्कार प्रदान करताना अभिमान वाटावा असा हा क्षण आहे. त्यांना मिळालेल्या समाजभूषण पुरस्काराने संपूर्ण कसमादे पट्टयातील कुंभार समाज बांधवांमध्ये ही आनंद होत आहे.

***

बारा बलुतेदार अठरा पगड जातीची ९ ऑगस्ट रोजी यलगार यात्रा निघणार....





पुणे येथे बारा बलुतेदार (महाराष्ट्र राज्य) कार्यकारणीची बैठक मा. कल्याण दळे बारा बलुतेदार संघटनेचे राज्य अध्यक्ष यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली असून राज्याच्या काना–कोपऱ्यातून आलेल्या कार्यकारणी पदाधिकारी व सदस्य यांच्या बैठकीत अनेक सामाजिक मुद्द्यावर चर्चा झाली.

आज महाराष्ट्रामध्ये सामाजिक सलोखा पूर्णपणे उद्ध्वस्त झालेला आहे. भारतीय घटनेच्या शिल्पकारांनी जो अधिकार दिला आहे, तो अधिकार बारा बलुतेदारांना नाकारण्यात आलेला आहे. अनेकांनी बारा बलुतेदारांचा राजकीय वापर केला असल्याचा सूर राज्य कार्य–कारणीच्या बैठकीत निघाला असून रोहिणी आयोगाची अंमलबजावणी करण्यात यावी यासाठी बारा बलुतेदार महासंघाने केंद्र सरकारकडे मागणी केलेली आहे. सदर प्रस्ताव सध्या राष्ट्रपती महोदय यांच्या कार्यालयात मंजुरीसाठी प्रस्तावित आहे.

राज्यातील बारा बलुतेदार यांच्या जनजागृतीसाठी क्रांती दिन ९ ऑगस्टपासून संत गाडगेबाबा कर्मभूमी येथून बारा बलुतेदार अठरा पगड जाती, महाराष्ट्र राज्य यांच्यावतीने यलगार यात्रा काढण्यात येणार आहे.

९ ऑगस्ट क्रांतीदिनी सुरू होणारी यलगार रथ यात्रेची सांगता १२ सप्टेंबर २०२४ रोजी चैत्रभूमी मुंबई येथे होणार आहे. तसेच शिवाजी पार्क मुंबई येथे बारा बलुतेदार यांची जाहीर सभा घेण्यात येणार असल्याचे नियोजन राज्य कार्यकारणीच्या बैठकीत घेण्यात आली आहे. सदरील बैठकीस सतीश दरेकर कार्याध्यक्ष, प्रतापराव गुरव उपाध्यक्ष, चंद्रकांत गवळी सरचिटणीस, अशोकराव सोनवणे, विजय पोहनकर, पांडुरंग कुंभार, सतीश कसबे, धनंजय शिंगाडे, भगवान श्रीमंदीलकर, मुजावर, यांच्यासह प्रदेश पदाधिकारी उपस्थित होते.

***

एकच पर्व, ओबीसी सर्व... आरक्षण बचाव, संविधान बचाव.

आरक्षण आमच्या हक्काचे, नाही कुणाच्या बापाचे..... अशा घोषणांनी कुंभार समाजातील कार्यकर्ते व पदाधिकारी यांनी पुणे जिल्हा अधिकारी कचेरीचा परिसर दणाणून सोडला.



ॲड. मंगेश ससाणे यांनी ओबीसी आरक्षण बचाव आणि मराठ्यांना ओबीसीतुन आरक्षण देऊ नये. तसेच त्यांना सगेसोयरेची सवलत देऊ नये यासाठी आमरण उपोषण सुरू केले आहे. या उपोषणाचा सातवा दिवस त्यानिमित्ताने कुंभार समाजातील सर्व संस्थांचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी या उपोषणाला व आंदोलनाला कुंभार समाजाचा जाहीर पाठिंबा व्यक्त केला.

यावेळी बोलताना ज्ञानेश्वर चांदेकर यांनी सांगितले की, ससाने सर यांनी सुरू केलेल्या या उपोषणास आमचा जाहीर पाठिंबा आहे. तसेच सुधीर चांदेकर यांनी यावेळी बोलताना म्हटले की, आरक्षण म्हणजे खैरातीत वाटणीची वस्तू नाही. तेव्हा हे सरकारने ध्यानात घ्यावं आरक्षण हे समाजातल्या गरिबातल्या गरिबाला द्यायचं असतं त्याला आपल्यासोबत घेण्यासाठी हे आरक्षण द्यायचं असतं कोणत्याही स्थितीत ओबीसीमधून मराठा समाजाला आरक्षण दिलं. तर आमचा समाज रस्त्यावरची लढाई लढायला देखील तयार आहे.

यावेळी कुंभार समाज सामाजिक संस्थेचे पदाधिकारी उपाध्यक्ष वसंत घोडनदीकर, सुभाष कर्डेकर, वसंत सुपेकर, हेमंत खटावकर कार्याध्यक्ष पुणे जिल्हा, दीपक शिरवळकर अध्यक्ष पुणे शहर, तसेच विजय कुंभार, दत्ता बावधनकर पदाधिकारी पुणे जिल्हा कुंभार समाजोन्नती मंडळ. महाराष्ट्र कुंभार समाज महासंघाचे माजी पदाधिकारी सुधीर चांदेकर, ज्ञानेश्वर चांदेकर, संजय मोगरवाडीकर व भाजप प्रदेश ओबीसी मोर्चाचे सदस्य सुरेख राजे, राजेंद्र भिगवणकर इत्यादी कार्यकर्ते, पदाधिकारी उपस्थित होते.

***

ओबीसींच्या विरोधात बोलणाऱ्यांचा पुढच्या निवडणुकीत कार्यक्रम करा
भिवंडीच्या सभेत मंत्री छगन भुजबळ यांचे ओबीसी समाजाला आवाहन



भिवंडी : मनोज जरांगे यांनी सरकारला मराठा समाजाला ओबीसीमधून आरक्षणासाठी २४ डिसेंबर पर्यंतच वेळ दिलाय. सरकार कडून देखील मनोज जरांगे यांच्याशी संपर्क साधला जातोय. मात्र, ओबीसीमधून ओबीसींच्या विरोधात बोलणाऱ्यांचा कार्यक्रम पुढच्या निवडणुकीत करा, मोर्चे मराठा समाजाला आरक्षण देऊ नका, या मागणीसाठी आज भिवंडीत झालेल्या ओबीसीच्या सभेत मोर्चे काढा, साखळी उपोषण सुरू करा, असे आवाहन उगन भुजबळ यांनी केले.

भिवंडीत झालेल्या ओबीसींच्या सभेत छगन भुजबळ यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. ओबीसींच्या विरोधा बोलणाऱ्या आमदारांना देखील भुजबळांनी इशार दिला. मराठा समाजाच्या आरक्षणाला आमचा विरोध नाही. त्यांना स्वतंत्र आरक्षण देण्यात यावे. ओबीसमधून त्यांना आरक्षण नको. ओबीसी मधून मराठा समाजाला आरक्षण मिळालं तर ओबीसीचा जिल्हा परिषद सदस्य विसरा साधा सरपंच सुद्धा होणार नाही, असा इशारा भुजबळ यांनी दिला. तसेच आमचा विरोध हा झुंडशाही, दादागिरीला आहे. असे ठणकावून सांगितले. आरक्षण म्हणजे गरीबी हटाव कार्यक्रम नाही. मागास असलेल्या समाजाला प्रतिनिधित्व देण्याचा कार्यक्रम आहे. मात्र, बाळासाहेब सराटे यांनी न्यायालयात ओबीसीला आरक्षण हे कायद्याला धरून नाही म्हणून केस केली आहे. म्हणजे आम्हाला ओबीसींमधून बाहेर काढयंच आणि मराठा समाजाला ते आरक्षण द्यायचं असा डाव आहे, असा आरोप भुजबळ यांनी केला.

उच्च शिक्षणात 'आधार'; 'ओबीसीं'चा टक्का वाढणार

४० ते ६० हजारांपर्यंत मिळणार छात्रवृत्ती; कोल्हापूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांना गुणवत्तेनुसार संधी

कोल्हापूर : अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना 'स्वाधार' व इतर जमातींच्या विद्यार्थ्यांना 'स्वयम' योजनेंतर्गत ६० हजारांची छात्रवृत्ती दिली जाते. त्याचप्रमाणे आता ओबीसी विद्यार्थ्यांनाही ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजनेंतर्गत ६० हजार रुपयांची छात्रवृत्ती मिळणार आहे. ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटीच्या वसतिगृहात प्रवेश न मिळालेल्या विद्यार्थ्यांना निर्वाह, भोजन व निवासाचा खर्च भागविता येणार आहे. या निर्णयामुळे ओबीसी विद्यार्थ्यांचा उच्च शिक्षणातील टक्का वाढणार आहे.

ग्रामीण भागातील विद्यार्थी तालुका, जिल्हा व महानगरांमध्ये शिक्षणासाठी गाव सोडून येतात. सरकारने मोठ्या प्रमाणात वसतिगृहे उभारती नसल्याने त्यांना खासगी रूम करून राहावे लागते. अनुसूचित जातींच्या विद्यार्थ्यांना सामाजिक न्याय विभागातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वाधार योजनेचे अनुदान मिळते.

आदिवासींसाठी पंडित दीनदयाल उपाध्याय योजना स्वयमची छात्रवृत्ती मिळते. ओबीसी, एसबीसी व व्हीजेएनटीच्या विद्यार्थ्यांनाही छात्रवृत्ती मिळावी, अशी मागणी विद्यार्थ्यांनी केली होती. १९ ऑक्टोबर रोजी मंत्रिमंडळात योजनेला मंजुरी मिळाली. १३ डिसेंबरला शासन निर्णय झाला आहे.

राज्य सरकारने या योजनेसाठी १०० कोटी रुपयांची तरतूद केली. ज्ञानज्योती सावित्रीबाई फुले आधार योजना असे नाव दिले आहे. प्रत्येक जिल्ह्यातून शैक्षणिक गुणवत्तेनुसार ६०० विद्यार्थ्यांची निवड केली जाणार आहे. त्यांना ३८ ते ६० हजार रुपयापर्यंतची छात्रवृत्ती मिळणार आहे. महानगरात उच्च शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना ६० हजार. पालिका क्षेत्रासाठी ५१ हजार. जिल्ह्याच्या ठिकाणे ४३ हजार रुपये तर तालुक्यांच्या प्रत्येक ठिकाणी ३८ हजार रुपये विद्यार्थ्यांना दिले जाणार आहेत.

ठिकाण	भोजन	निवास	भत्ता
महानगर क्षेत्र	३२,०००	२०,०००	८,०००
पालिका क्षेत्र	२८,०००	१५,०००	८,०००
जिल्हा ठिकाण	२५,०००	१२,०००	६,०००
तालुका ठिकाण	२३,०००	१०,०००	५,०००

ओबीसी सत्तेत येऊ नयेत म्हणूनच जातनिहाय जनगणनेला विरोध

नागपूर : देशात लोकसंख्येच्या ५२ टक्के असलेला ओबीसी समाज सत्तेत येऊ नये, म्हणूनच ओबीसींची जातनिहाय जनगणना होऊ दिली जात नाही. हा प्रकार आजचा नाही तर स्वातंत्र्यकाळापासूनचे हे एक मोठे षडयंत्र आहे, असे प्रतिपादन राष्ट्रीय मागासवर्ग मोर्चाचे राष्ट्रीय अध्यक्ष चौधरी विकास पटेल यांनी केले.

पारडी येथे सुरू असलेल्या भारत मुक्ती मोर्चाच्या राष्ट्रीय अधिवेशनात ते बोलत होते. पटेल म्हणाले, या देशात जनावरांची गणना होते. इतकेच नव्हे तर तृतीयपंथींचीही गणना होते; पण ओबीसींची जनगणना केली जात नाही, उलट त्याला विरोध केला जातो. असे का? विरोध करणारे नेमके कोण आहेत? ओबीसी समाज ५२ टक्के आहे. तरीही तो सत्तेत का नाही? याचा विचार ओबीसी समाजाला करावा लागेल.

सकल ओबीसींच्या हक्कांसाठी आमरण उपोषण

नायगाव येथे प्रारंभ : आदेश जमदाडे यांनी समाज बांधवांसाठी उचलले पाऊल

खंडाळा : राज्य शासनाने मराठा आरक्षणासंदर्भात सगेसोयरे या शब्दाची व्याख्या बदलून मराठा समाजाला कुणबी प्रमाणपत्र देण्यासाठी मसुदा काढला आहे. त्यामुळे ओबीसी समाजामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, आपला हा निर्णय मूळ ओबीसींवर अन्याय करणारा आहे. त्याचबरोबर शिंदे समितीच्या शिफारशीवरून कुणबी प्रमाणपत्र देणे हे घटनाबाह्य आहे.

चुकीच्या कार्यपद्धतीने व बेकायदेशीररीत्या वितरीत होणाऱ्या या मराठा – कुणबी/कुणबी – मराठा प्रमाणपत्रांच्या वितरणाला स्थगिती द्यावी. तसेच हा मसुदा रद्दबातल ठरवून ओबीसींचे आरक्षण अबाधित ठेवावे. यासाठी नायगाव येथील क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकासमोर सामाजिक कार्यकर्ते आदेश जमदाडे यांनी आमरण उपोषण सुरू केले आहे. मराठा समाजाच्या दबावाला बळी पडून सरकारने घेतलेल्या या बेकायदेशीर आणि मागासवर्गीयांसाठी अन्यायकारक असलेल्या या निर्णयाला माझा विरोध आहे. या अधिसूचनेच्या मसुद्याला सकल ओबीसी समाजाची हरकत असल्याने हा अधिसूचनेचा मसुदा रद्द करण्यात यावा. जोपर्यंत हा अन्यायकारक मसुदा रद्द केला जात नाही, तोपर्यंत क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकासमोर आमरण उपोषण सुरू करण्यात आले. क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले स्मारकास अभिवादन करून उपोषणाला प्रारंभ केला.

यावेळी खंडाळा तालुका बहुजन आरक्षण बचाव समितीचे पदाधिकारी व नायगाव ग्रामस्थ उपस्थित होते.

काही झाले तरी मागे हटायचे नाही :

सरकारच्या असंवेदनशील कारभारामुळे ओबीसी आरक्षण संपुष्टात येत आहे. या सरकारला ठिकाणावर आणण्यासाठी अखेरपर्यंत लढा देण्याचा निश्चय ग्रामस्थांनी केला आहे. यासाठी काही झाले तरी मागे हटायचं नाही, असा निर्धार करून सावित्रीबाई फुले स्मारका समोरच सर्वांनी शपथ घेतली.

सरकारने ओबीसी समाजावर अन्याय करणारे निर्णय घेतले आहेत. त्यामुळे ओबीसींचे आरक्षण धोक्यात आले आहे. मुळातच राजकीयदृष्ट्या हा समाज पुढारलेला नाही. त्यामुळे त्यांचा स्वभाव आक्रमक नाही, याचा अर्थ तो अन्याय सहन करणारा आहे, असा गैरसमज सरकारने करून घेऊ नये.

याबाबत राज्यातील सर्व समाज एकवटून लढा देईल. सरकारने याचा गांभीर्याने विचार करावा. आमचे आरक्षण अबाधित ठेवल्याशिवाय मागे हटणार नाही.

- आदेश जमदाडे, उपोषणकर्ते

महादेव ऑर्थोपेडिक
व
पेडीयाट्रीक हॉस्पिटल



डॉ. वैभव महादेव राजे
MBBS D. Ortho



डॉ. सौ. वृषाली वैभव राजे
MBBS D.C.H.

पेठ रोड, इस्लामपूर, ता. वाळवा, जि. सांगली ४१५४०९
फोन : (०२३४२) २२४०२३
मो. : 9822399584 **नि. :** (02342) 225343.

MARVEL
Automotive Industries
The Engineering Wonders..!

Mfgrs. of Sheet Metal Prototypes, Press-Tools,
Pressed & Machined Components.



Dattaprasad V. Ghumade
Proprietor

Plot No. 3, Gat No. 90, Hari-Om Industrial Estate,
Jyotiba Nagar, Talwade, Pune 411 062.
Cell. : +91-9850893276

E-mail : marvel.automotive@yahoo.com

सर्वांच्या कल्याणासाठी जातिव्यवस्था हवी
पुण्यातील व्याख्यानमालेत शंकराचार्य विद्यानृसिंह भारती यांचे प्रतिपादन



पुणे : ''जातिव्यवस्था सर्वांच्या कल्याणासाठी आहे. मात्र अनेकांनी स्वार्थासाठी चुकीच्या पद्धतीने जातिव्यवस्थेचा वापर केला. त्यामुळे धर्मशास्त्र व समाजव्यवस्थेचे महत्त्वाचे अंग असलेली जातिव्यवस्था वाईट ठरली. मानवाच्या कल्याणासाठी जातिव्यवस्था टिकवणे आणि योग्य पद्धतीने त्याचे अनुकरण करणे समाज व देशहिताचे आहे,'' असे प्रतिपादन करवीर पीठाचे शंकराचार्य विद्यानृसिंह भारती यांनी येथे केले. सद्गुरू श्री गंगाधर स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथीनिमित्त डीएम फाउंडेशनतर्फे आयोजित सप्ताहाचे व व्याख्यानमालेचे उद्घाटन शंकराचार्य यांच्या हस्ते झाले. यावेळी 'जात असावी की नसावी' व्याख्यानमालेत बोलताना त्यांनी धर्मशास्त्र, जातिव्यवस्था, समाजातील अनिष्ट चालीरीती यावर परखड भाष्य केले, या प्रसंगी ब्राह्मण महासंघाचे आनंद दवे, पत्रकार दत्ता जाधव, फाउंडेशनचे विजय देशमुख महाराज यांनी विचार मांडले. फाउंडेशनच्या उपाध्यक्ष कुमारी सुवर्णा बालेघाटे, पदाधिकारी नरहर शिदोरे, जयमाला अनारसे आदी उपस्थित होते.

शंकराचार्य म्हणाले, ''समाज सुशिक्षित होतोय; मात्र सुसंस्कृतपणा विसरत चालला आहे. सनातन वैदिक संस्कृतीने मानवाच्या कल्याणासाठी जातिव्यवस्थेचे महत्व अधोरेखित केले आहे. धर्मशास्त्राचे पालन न केल्याने अनेक समस्या उद्भवल्या आहेत. जात घालवण्याचा प्रयत्न करतो, तेव्हा ती अधिक प्रभावी होत जाते. जातिव्यवस्थेचे कवच असल्यानेच ब्रिटिशांना धर्म फोडता आला नाही. आरक्षण व्यवस्था सर्वांसाठी घातक आहे. समाजाची घडी चांगली राहण्यासाठी जातिव्यवस्था टिकवली पाहिजे.'' दिलीप भिकुले यांनी सूत्रसंचालन केले. बालेघाटे यांनी आभार मानले.

शंकराचार्यांचा तीव्र निषेध : नितीन पवार

देशमुख महाराज फाउंडेशनच्या वतीने आयोजित व्याख्यानमालेत शंकराचार्य विद्यानृसिंह भारती यांनी जातिव्यवस्थेचे समर्थन केले आहे. ते करताना ब्राह्मण परमेश्वराच्या मुखापासून, क्षत्रिय बाहूपासून, वैश्य मांडीपासून आणि शुद्र पायांपासून निर्माण झालेल्या श्लोकाचा संदर्भ दिला. शोषणावर, विषमतेवर आणि उतरंडीवर आधारलेल्या जातिव्यवस्थेचे समर्थन करणाऱ्या शंकराचार्यांचा आम्ही तीव्र निषेध करतो.

व्याख्यानमालेत संयोजकांनी वक्ता म्हणून मलाही आमंत्रित केले होते. मात्र त्यांनी आधी सांगितलेला विषय बदलून 'जात असावी की नसावी' असा निषेधार्ह विषय सांगितल्यामुळे व्याख्यान सुरू होण्याआधीपासूनच व्याख्यानमालेत अनुपस्थित राहून असहमती व निषेध दर्शवला होता.

शंकराचार्यांच्या भाषणाचे काही व्हिडिओ प्रसारित झाले आहेत. त्यांच्या भाषणाच्या मागे असलेल्या बॅनरवर त्यांच्यासमवेत माझाही फोटो आहे. संबंधित फाउंडेशनने बॅनरवर फोटो लावण्यासाठी माझी परवानगी घेतली नव्हती. तसेच व्हिडिओमध्ये विषमता आणि शोषणमूलक जातिव्यवस्थेचे समर्थन शंकराचार्य करत आहेत, असे स्पष्ट होत आहे. त्यामुळे मी त्यांचा निषेध करत आहे, असे पवार यांनी स्पष्ट केले आहे.

***

डबकं

– प्रा. उत्तमराव भगवान काळे

नदी, नाला, झरा वाहाता असला की, त्यातलं पाणी कसं अगदी स्वच्छ असतं. वाहत्या पाण्यामुळं मानव जीवन सुखी समृद्ध होतं. भरभरुन आनंद मिळतो आणि कदाचित त्या नदी, नाला आणि झऱ्यालाही मनस्वी समाधान वाटत असेल. पण नदी, नाला आणि झरा यातलं हेच पाणी वाहातं नसलं की, ते साठतं, त्याच 'डबकं' बनतं. मग डबक्यातील पाणी सडतं, घाणेरडं होऊ लागतं. नंतर त्याची दुर्गंधी येऊ लागते. माणसाला या डबक्यातील पाणी नकोसं होतं. असंच शाळा, महाविद्यालयातील शिक्षक, प्राध्यापकाचं ज्ञानदानाचं आहे. शिक्षक, प्राध्यापकांच ज्ञान नदी, झऱ्यातील पाण्याप्रमाणे वाहातं असलं पाहिजे. आपल्या विद्यार्थ्यांना ते भरभरुन ज्ञान देत असतील, तर ते वाढत जातं, विद्यार्थी ही समाधानी होऊन ते खुश होतात, शिक्षकांनाही मनस्वी आनंद होतो. पण ह्याच ज्ञानदानात कंजुषी होत असेल, विद्यार्थ्यांना भरभरुन दिल्या जात नसेल, तर त्याचही 'डबकं' बनतं, मग या डबक्याची येते दुर्गंधी. ज्ञान दिल्यानं वाढतं. ते ज्ञान निर्मळ झऱ्याप्रमाणं वाहतं असलं पाहिजे हे शिक्षक, प्राध्यापकांनी लक्षात ठेवलं पाहिजे. असंच अध्यात्मिक गुरु, वारकरी संप्रदयातील गुरु माऊली यांच ही आहे. म्हणून ते आपल्या अनुयायांना सतत भरभरुन ज्ञान देत असतात.

पैसा, धन, दौलतीचं ही असंच आहे. झऱ्यातील पाण्याप्रमाणे धन ही प्रवाही असलं पाहिजे, गरजेप्रमाणे वेळेवर धनाचं दान केलं पाहिजे. दान केल्यानं मिळतो आनंद, आत्मिक समाधान, दान केल्याचं धन ही वाढत जातं.

अन्यथा एक दिवस साठवलेल्या धनाचही 'डबकं' बनतं. मग ते सडतं, असं की एक दिवस त्याला सोडून निघून जावं लागतं. अन्नदानाचही असंच आहे. तेही सतत प्रवाही ठेवावं लागतं.

ज्ञानदान, अन्नदान आणि धनदान हे झऱ्यातील वाहत्या पाण्याप्रमाणं स्वच्छ असलं पाहिजे असं मला वाटतं.

'अन्नदानं परं ज्ञानं विद्यादानमत:परम् ।
अन्नेन क्षणिका तृप्ति: यावज्जीवं च विद्यया ।।'

***

प्रोप्रा. अशोक मुरलीधर कुंभार.मो. 9822640375.
(अध्यक्ष. अ. महा. कुंभार समाज विकास संस्था पुरंदर तालुका)



श्रीनाथ विट सप्लायर्स
बिल्डिंग मटेरियल सप्लायर्स
मु. पो. काळेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे.



राधिका फ्रुट अॅन्ड फ्रोझन सप्लायर्स
फ्रुट : चिकू पल्प, मँगो पल्प, सिताफळ पल्प, ब्रिनपिस, स्विटकॉर्न, पनिर.
श्री. हरीष कुंभार मो. 9922349291
मु. पो. काळेवाडी, ता. पुरंदर, जि. पुणे.

५० टक्क्यांची आरक्षण कोंडी

श्रीराम पवार

बिहारमधल्या आरक्षणाचा पैस वाढवणारा निर्णय पाटण्याच्या उच्च न्यायालयानं रद्दबातल ठरवल्यानंतर पुन्हा एकदा सामाजिक न्याय आणि त्यातल्या आरक्षणसंधींवरील राजकारणाला उकळी फुटण्याची चिन्हं आहेत. बिहारमधल्या नितीशकुमार सरकारनं आरक्षणाची ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडून ते ६५ टक्क्यांपर्यंत नेलं, ते अमान्य करताना न्यायालयानं 'आरक्षणाची मर्यादा ५० टक्के आहे' या सर्वोच्च न्यायालयानं घालून दिलेल्या निकषाचा आधार घेतला. आरक्षणासाठी देशभरातले निरनिराळे समूह करत असलेल्या आंदोलनांच्या वाटचालीत पुन्हा एकदा ही ५० टक्क्यांची अट उभी राहिली आहे. अनारक्षित समूहांना आरक्षण मिळावं, एका प्रवर्गाऐवजी दुसऱ्या प्रवर्गातलं आरक्षण मिळावं, 'आरक्षित समूहांतर्गत आरक्षणाचं वाटप व्हावं अशा सर्व प्रकारच्या मागण्यांत' '५० टक्के मर्यादा' हा ठोस अडसर आहे. केंद्र सरकारनं लागू केलेल्या आर्थिक मागासांसाठीच्या, म्हणजे अनारक्षित उच्च समजल्या जाणाऱ्या जातसमूहांना मिळू शकणाऱ्या, दहा टक्के आरक्षणाचा अपवाद वगळता आरक्षणाचा पैसे वाढवणारे सारे निर्णय न्यायालयातून रद्द होत आहेत. तेव्हा आता आरक्षणाच्या मागण्या आणि बिहारमधून समोर आलेल्या आकडेवारीचा आधार घेतला तर, इतर मागास समूहांनाही अधिकचं आरक्षण लागू करण्याची गरज यांचा विचार करता ५० टक्क्यांच्या मर्यादेचा फेरविचार केंद्र करणार का हा मुद्दा असेल. बाकी, राज्य सरकारं निरनिराळे आयोग आणि आरक्षणाचे खेळ करत राहतील. कोंडी फोडणं सर्वस्वी केंद्र सरकारच्या हाती असेल. बिहारमधलं आरक्षण रद्द होणं हा नितीशकुमार यांनाही झटका आहे. ते केंद्रातल्या सत्तारूढ एनडीएचे महत्त्वाचे घटक आहेत. आपली भूमिका रेटताना ते केंद्रावर किती दबाव आणणार, त्याला भाजप कसं तोडं देणार यातून केंद्रातल्या आघाडीमधले घटकपक्ष आणि भाजप यांचं नातं कसं राहील याचेही संकेत मिळतील.

'अपवादात्मक स्थिती'चा पेच

मंडल आयोगाच्या अंमलबजावणीनंतर आरक्षण हा सामाजिक न्यायाचा, त्याआधारे संधी उपलब्ध करून देण्याचा मुद्दा म्हणून समोर आला, तसंच यातून राजकीय घुसळणही सुरू झाली. आरक्षण हा पुढची तीन दशकं मतपेढीच्या राजकारणातला महत्त्वाचा घटक बनला. आरक्षणवाटपाच्या सगळ्या प्रवासात १९९२ मध्ये सर्वोच्च न्यायालयानं 'एकूण आरक्षित जागांची मर्यादा ५० टक्क्यांहून अधिक असता कामा नये' अशी मर्यादा ठरवून दिली. त्यानंतर आरक्षणवाटपाचं अंकगणित या मर्यादित करत राहणं अनिवार्य बनलं. सुरुवातीला इतर मागास समूहांमधल्या निरनिराळ्या घटकांत आरक्षणाचं वाटप करताना ही मर्यादा पाळण्यात राज्यकर्त्यांना फार अडचणीचं काही नव्हतं. मात्र, एकदा मर्यादा पूर्ण केल्यानंतर येणाऱ्या मागण्यांचं काय करायचं हा मुद्दा होता आणि अजूनही आहे. सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयात अपवादात्मक परिस्थितीत आरक्षणमर्यादा ५० टक्क्यांपुढं नेण्याचा उल्लेख आहे; मात्र, १९९२ नंतरच्या कोणत्याही मर्यादेपलीकडच्या आरक्षणात अशी स्थिती आल्याचं न्यायालयानं मान्य केलेलं नाही. महाराष्ट्रातल्या मराठा-आरक्षणाचा निर्णय सर्वोच्च न्यायालयात टिकला नाही, त्याचाही एक आधार हाच होता. तोच आता बिहारच्या निर्णयालाही लागू झाला आहे. त्यावर बिहार सरकार सर्वोच्च न्यायालयात धाव घेईल. मात्र, आरक्षणाच्या नव्या मागण्यांसाठी अपवादात्मक स्थिती कधी मानायची याचा फैसला कोणत्या तरी निमित्तानं व्हायला हवा. बिहारमधल्या आरक्षण वाढवण्याच्या निर्णयानं त्यासाठी एक आधार पुरवायचा प्रयत्न केला होता. बिहारमधल्या ओबीसी गटांत समाविष्ट असलेल्या जातींची लोकसंख्या जितकी समजली जाते, त्याहून कितीतरी अधिक आहे, हे बिहारमध्ये जातनिहाय सर्वेक्षणातून समोर आणलं गेलं. खरं तर देशातच जातगणनेची मागणी होते आहे आणि ती भाजपच्या सरकारला मान्य करायची नाही हे स्पष्ट आहे. भाजपला आरक्षणावरून कोणतेही नवे संघर्ष टाळायचे आहेत. ते टाळण्याचा एक ठोस प्रयत्न म्हणून मोदी सरकारनं आर्थिकदृष्ट्या मागास घटकांसाठी दहा टक्के आरक्षणाची तरतूद घटनादुरुस्तीद्वारे लागू केली. ज्यांना अन्य, म्हणजे ओबीसी अथवा अनुसूचित जाती-जमातींसाठीचं आरक्षण मिळत नाही, अशा पुढारलेल्या जातींनाच हे आरक्षण लागू झालं आहे. आरक्षण न मिळालेल्या; मात्र, त्यासाठी आंदोलनं करणाऱ्या सगळ्यांचं समाधान या आरक्षणानं होईल असा सरकारचा होरा होता. तो मात्र चुकला. आरक्षणाच्या मागण्या थांबल्या नाहीत. उलट, त्या अधिक तीव्रतेनं पुढं येत आहेत.

मुद्दा बिहार पुरताच नाही

बिहारमधल्या आरक्षणाची मर्यादा वाढवण्याचा आणि आरक्षणाच्या फेरवाटपाचा निर्णय घेताना नितीशकुमार हे काँग्रेस आणि राष्ट्रीय जनता दल (राजद) यांच्याबरोबर होते. हा निर्णय घेण्याआधी बिहारनं राज्यभरात जातनिहाय सर्वेक्षण केलं होतं. त्यात जातवार लोकसंख्येविषयी नवी माहिती समोर आली, जी इतर मागास समूहांची बिहारमधली लोकसंख्या समजली जात होती, तीहून मोठी असल्याचं दाखवणारी होती. इतर मागासांमध्ये ओबीसी आणि ईबीसी म्हणजे अतिमागास असे दोन गट बिहारमध्ये आहेत. या दोहोंची संख्या ६३ टक्के असल्याचं सर्वेक्षणानं समोर आणलं होतं. मंडल आयोगानं १९३१ च्या जनगणेच्या आधारे ओबीसींची संख्या ५२ टक्के गृहीत धरून २७ टक्के आरक्षण दिलं. मात्र, प्रत्यक्षात ही लोकसंख्या ६३ टक्के असल्यानं, हा वाटा वाढवला पाहिजे, असा तर्क बिहारमधल्या निर्णयामागं होता. बिहारमध्ये आरक्षण मिळणाऱ्यांची लोकसंख्या ८५ टक्के आहे. त्यांना ५० टक्केच आरक्षण मिळू शकतं, यासाठी आरक्षण ६५ टक्क्यांपर्यंत वाढवण्याचा निर्णय बिहारनं घेतला होता. १० टक्के ईडब्ल्यूएस आरक्षणासह ते ७५ टक्क्यांवर पोहोचले. बिहारचा हा निर्णय उच्च न्यायालयानं, ५० टक्के मर्यादेचं तत्त्व उचलून धरत अमान्य केला. आता पलटी मारून भाजपसोबत सरकार बनवलेल्या नितीशकुमार यांना तर हा झटका आहेच; तसंच आरक्षणात वाटा मिळावा म्हणून देशभरात होत असलेल्या आंदोलनांसमोरही हा निर्णय प्रश्नचिन्ह उभं करणारा आहे. मराठा, जाट, पटेल या समूहांच्या आंदोलनांतही हा पेच येणार आहे. यातल्या कोणत्याही जातीला आरक्षण द्यायचं तर इम्पिरिकल डेटा सादर केला पाहिजे असं मानलं जातं. मात्र, असा कितीही डेटा गोळा केला तरी, ५० टक्क्यांच्या बाहेर आरक्षण जात असेल तर ते मान्य होणार नाही, असाच न्यायालयाचा पवित्रा असेल तर, अशा सगळ्या मागण्यांना ५० टक्क्यांच्या मर्यादित बसवणं हे

सारी सामाजिक–राजकीय समीकरणं नव्यानं मांडायला भाग पाडणारं ठरू शकतं, ते नव्या राजकीय–सामाजिक ताणांनाही निमंत्रण ठरू शकतं. साहजिकच मुद्दा बिहारपुरताच उरत नाही, तर आरक्षणाकडं पाहण्याच्या दृष्टिकोनाचा बनतो.

शिवाय, सध्या 'ओबीसी आरक्षणाला धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण देऊ,' असं राज्यातलं सरकार आणि राज्यातले भाजपनेते सांगतात; मात्र, तसं करायचं म्हणजे ५० टक्क्यांची मर्यादा ओलांडावीच लागेल. ती ओलांडायची तर केंद्रानं काही भूमिका घ्यावी लागेल. त्यावर राज्यातले नेतेही काही बोलत नाहीत आणि भाजपचं केंद्रीय नेतृत्वही काही भूमिका घेत नाही.

इथं राजकीयदृष्ट्या सगळ्यांचाच कस लागणार आहे. बिहारमधलं आरक्षण टिकवणं ही आता नितीशकुमार यांची आणि भाजपच्या सरकारचीही जबाबदारी बनते आहे.

मागण्या 'केंद्राच्या कोर्टा'त !

महाराष्ट्रातलं आरक्षण सर्वोच्च न्यायालयात टिकलं नाही हे तत्कालीन महाविकास आघाडीचं अपयश असल्याचं महाराष्ट्रातले भाजपवाले सांगत असत. हेच आता भाजपला बिहारमध्ये ऐकावं लागेल. आरक्षणकेंद्री राजकारणापासून जमेल तितकं दूर राहायचा प्रयत्न करणाऱ्या भाजपला यात भूमिका घ्यावी लागेल. मुद्दा केंद्रातल्या पाठिंब्याच्या बदल्यात नितीशकुमार आरक्षणाचा पैस वाढवण्यासाठी भाजपवर किती दबाव आणू शकतात हाही आहे.

केंद्र सरकारनं बिहारमधलं वाढीव आरक्षण टिकवण्याच्या बाजूनं भूमिका सर्वोच्च न्यायालयात घेतली तर तीच अन्य राज्यांमधल्या मागण्यांसाठी कायम ठेवावी लागेल. यात दोन बाबींचा समावेश आहे. इंदिरा साहनी प्रकरणात सर्वोच्च न्यायालयानं १९६२ मधल्या न्यायालयाची 'एकूण आरक्षण ५० टक्क्यांवर असता कामा नये' ही भूमिका अधोरेखित केली. ती करताना अपवादात्मक स्थितीत याला अपवाद करायची सोयही ठेवली; मात्र, असा अपवाद कोणत्या स्थितीत ग्राह्य मानायचा यावर अद्याप स्पष्टता झालेली नाही. केंद्राला एकदा हा मुद्दा धसास लावावा लागेल. प्रत्येक राज्यानं आपल्या भागातल्या आरक्षणाच्या मागण्या सामावून घेताना केलेल्या सगळ्या तरतुदी ५० टक्के मर्यादेच्या खडकावर फुटणार असतील तर, अपवाद कधी मानायचा हे ठरवून घेऊन त्यात बसणाऱ्यांनाच नवा लाभ देता येईल, याची स्पष्टताही करावी लागेल किंवा ५० टक्के या मर्यादित नव्या मागण्या सामावून घेणं शक्य नाही आणि मागण्या करणाऱ्या समूहांची संख्या मोठी आहे हे लक्षात घेऊन, ही मर्यादा ओलांडण्याला घटनात्मक स्वरूप देण्याचा विचार करावा लागेल. हे केंद्र सरकारच करू शकतं. 'केंद्रानं बिहारचा कायदा घटनेच्या नवव्या परिशिष्टात समाविष्ट करावा,' अशी मागणी तेजस्वी यादव यांनी केली आहे. त्यामुळे त्यावर न्यायालयाला निर्णय देता येणार नाही. तामिळनाडूत आरक्षण ६९ टक्क्यांवर गेलं आहे. ते नवव्या परिशिष्टात समाविष्ट झाल्यानं सुरक्षित राहिलं. मात्र, १९९२ मधल्या तामिळनाडू सरकारच्या त्या निर्णयाला आधी राष्ट्रपतींनी मान्यता दिली. त्यानंतर त्याला न्यायालयाच्या छाननीतून बाजूला ठेवणाऱ्या तरतुदीत बसवण्यात आलं. बिहारमध्ये हे घडलेलं नाही. केंद्राला हा अपवादात्मक मार्ग वापरायला नितीशकुमार भाग पाडणार का, हाही बिहारच्या राजकारणातला एक मुद्दा बनतो आहे. केंद्र या मार्गाने जाणार असेल तर अन्य राज्यांतूनही याच मागण्या होऊ लागतील. म्हणजेच, यापुढं आरक्षणाच्या मागण्या केंद्राच्या कोर्टात जातात.

भाजपसाठी कठीण पेच

या निकालानं देशात जातगणनेची मागणी करणाऱ्यांपुढंही पेच आणला आहे. अशा गणनेनंतरही ५० टक्के हा अडथळा असेलच तर तिचा आरक्षणासाठी उपयोगच उरत नाही. या मागणीची सुरुवात बिहारमध्येच झाली. मात्र, नंतर काँग्रेसनेते राहुल गांधी यांनी 'जितनी आबादी, उतना हक' अशी घोषणा देत ती देशभरात पोहोचवली. जातनिहाय जनगणना करण्याचं आणि आरक्षणाची ५० टक्के मर्यादा काढून टाकण्याचं आश्वासन काँग्रेसनं लोकसभेच्या जाहीरनाम्यातच दिलं होतं.

बिहारमधल्या निर्णयाला तिथल्या भाजपनं समर्थन दिलं असलं तरी देशभर जातनिहाय जनगणना करण्याची तयारी भाजपनं कधीच दाखवलेली नाही; किंबहुना भाजपच्या सरकारनं मुळात जनगणनाच, कोरोना संपून चार वर्ष उलटली तरी, टाळली आहे. आता ती जेव्हा होईल तेव्हा जातींची नोंद आणि त्या आधारावर ५० टक्क्यांची मर्यादा वाढवण्याचं समर्थन सरकार करेल काय असा प्रश्न असेल. असं करणं म्हणजे काँग्रेसच्या जाहीरनाम्याला दाद देणं आणि तो जाहीरनामा मुस्लिम लीगची याद देत असल्याची टीकाही गिळून टाकणं.

भाजपसाठी हा कठीण पेच आहे; याचं कारण, आरक्षणाच्या मागण्यांकडं पूर्णतः दुर्लक्ष करावं अशा अवस्थेत लोकसभेनंतरचा भाजप नाही. भाजपच्या विस्तारात ओबीसी समूहांचा पाठिंबा हा किमान उत्तर भारतात निर्णायक घटक आहे. बिहारची जातगणना आणि आरक्षणाच्या फेरवाटपानं 'मंडल २.०' चं राजकारण सुरू झालं. त्यात 'रोहिणी आयोगा'च्या निमित्तानं आरक्षण मिळालेल्या समूहातल्या काहींना ते खूपच अधिक, तर काहींना अजिबातच मिळत नाही हे समोर आलं आहे, याचीही भर पडते आहे.

यात गुंतलेलं राजकारणही लक्षवेधी आहे. आरक्षणाभोवतीच्या मतपेढ्या भाजपच्या राजकारणाला छेद देणाऱ्या आणि प्रादेशिक पक्षांना बळ देणाऱ्या असतात. भाजपला जातनिहाय मतविभागणीपेक्षा बहुसंख्य अल्पसंख्य ही मांडणी अधिक लाभाची ठरते. बिहारमधला निर्णय उच्च न्यायालयानं रद्द ठरवल्याच्या पार्श्वभूमीवर लोकसभेच्या निवडणुकीत सुरू झालेली, जात पुन्हा अधिक महत्त्वाची बनण्याची प्रक्रिया वेगावली तर तिला तोंड देताना भाजपला आरक्षणाविषयीच्या धोरणाचा फेरविचार करावा लागेल आणि तो कसाही केला तरी न्यायालयाच्या कसोटीवर उतरावं लागेल. खुल्या गटातल्या आर्थिक दुर्बलांना दिलेलं आरक्षण ५० टक्क्यांच्या बाहेरचं असलं तरी सरकारनं न्यायालयात टिकवलं होतं. ओबीसी–आरक्षणाचा टक्का वाढवण्यात अशीच समर्थनाची भूमिका केंद्र घेणार का हा सर्वोच्च न्यायालयातल्या लढाईत एक कळीचा मुद्दा बनेल.

खरं तर, या सगळ्या गदारोळात आरक्षणाच्या मागण्या वाढतात त्या संधीची उपलब्धता आक्रसत जाण्यातून, हे राज्यकर्त्यांनी विसरायचं कारण नाही. त्यासाठी धोरणं आखणं, ती राबवणं याकडं जसं दुर्लक्ष होईल तसा हा गुंता आणखी वाढत जाईल.

***



वधु पाहिजे

नम्र विनंती

आपण ऑनलाईन फॉर्म व पैसे भरले असतील परंतु आपणास आजपर्यंत पावती आली नसेल किंवा आपले नाव कुंभश्री बेवसाईट वर असेल पण अंकात येत नसेल तर मोबा. 9503428987/ या नंबरवर WhatsApp करावे तसेच पैसे भरल्याची पावती (स्क्रिन शॉट), आपले आधार कार्ड, शेवटच्या वर्षाचे शैक्षणिक सर्टीफिकेट, पगाराची स्लिप, आपल्या निवासाचा संपुर्ण पत्ता, आपल्या WhatsApp Mob. No. सहित E-mail वर पाठवावा. तसेच घटस्फोटित किंवा विधवा-विधुर असेल तर घटस्फोटाचे पेपर किंवा जोडीदाराच्या मृत्युचा दाखला मेलवर पाठवणे बंधनकारक आहे. **सर्व पेपरची पुर्तता झाल्याशिवाय आपला फॉर्म ॲक्टिव्हेट केला जाणार नाही. याची कृपया नोंद घ्यावी.** email : kumbhshree@gmail.com

डॉक्टर

ID11820: डॉ. विश्वजित शशिकांत कुंभार. जन्म-१३/१/९५, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.१५ वाठार तर्फ वडगांव, उंची-५.४, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.ए.एम.एस+ एम.डी., स्वत:चा दवाखाना, उप्तन्न - ५५,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID11771: डॉ. प्रथमेश गुरुदास कुंभार. जन्म-१७/१/९६, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ४.३६ कोल्हापुर, उंची-५.५, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.बी.बी.एस+ एम.डी.+डी.एम., नोकरी - भोपाळ, पगार - १,००,०००/-, अपेक्षा - अनुरुप

ID10083: डॉ. राजपाल सुभाष चव्हाण. जन्म-९/९/९३, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे १२.०२ भिवंडी, उंची-५.१०, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.बी.बी.एस+ एम.डी. रेडिओलॉजी, अपेक्षा - अनुरुप

ID11402: डॉ. कृष्णकांत महादेवराव साखरे. जन्म-८/६/९०, उंची-५:१०, वर्ण- गोरा, शिक्षण-बी.डी.एस., स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न - ६०,०००/- अपेक्षा - अनुरुप.

ID11238: डॉ. प्रवीण बसवराज कुंभार. (लिंगायत) जन्म-१७/११/९३, जन्मवेळ व ठिकाण-१० रायबाग, उंची-५:१०, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.डी. रेडिओलॉजी, नोकरी-खाजगी, पगार - २,००,०००/- अपेक्षा - अनुरुप.

ID11152: डॉ. शुभंकर अनिल नंदखेडकर. (लिंगायत) जन्म-१/२/९६, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी १.०१ औरंगाबाद, उंची-५:१०, वर्ण-गोरा, शिक्षण- बी.डी.एस.+एम.डी.एस. करत आहे, स्वत:चा व्यवयाय, अपेक्षा - अनुरुप.

एम.फार्म, बी.फार्मसी, डी.फार्मसी.

ID11827: चि. ओंकार सुनिल राजे. जन्म-१३/१०/९६, जन्मवेळ व ठिकाण-रात्री ११.४७ कोल्हापुर, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.फार्म, नोकरी-खाजगी मुंबई, पगार - ३१,४५८/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11674: चि. प्रज्योत बाळासो कुंभार. जन्म-४/६/९६, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी ३.३७ हनिमनल, उंची-५:६, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.फार्म, नोकरी-खाजगी कोल्हापुर, अपेक्षा- अनुरु

ID11277: चि. चंदन रामचंद्र कुंभार. जन्म-११/३/९७, जन्मवेळ व ठिकाण-९.४० पाटस, उंची-५:११, वर्ण-गोरा, शिक्षण-बी. फार्म, नोकरी-खाजगी बंगलोर, पगार-३४,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10003: चि. संतोष उत्तमराव पिंपळे (लिंगायत). जन्म-१३/६/९३, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे २ नांदेड, उंची-५.५, वर्ण-निमगोरा, शिक्षण -डी. फार्मसी.+बी.ए., नोकरी-खाजगी मुंबई, पगार - ३०,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

बी.ई. + उच्चशिक्षित

ID11390: चि. अमेय बाळासाहेब कुंभार. जन्म-९/१०/९६, जन्मवेळ व ठिकाण-११.५५ कोल्हापुर, उंची-५:५, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.बी.ए. + सिव्हिल डिप्लोमा + बॅचलर ऑफ ॲनिमेशन ॲन्ड फिल्म मेकिंग, स्वत:चा व्यवसाय कोल्हापुर, उप्तन्न - ३०,०००/- अपेक्षा - अनुरुप.

ID10228: चि. योगेश वसंत भागवत. जन्म-३१/१०/९१, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे २.४५ मुंबई, उंची-५:११, वर्ण-गोरा, शिक्षण-पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा + कॉम्प्युटर, नोकरी-खाजगी, पगार-१,७५,०००/-, अपेक्षा-अनुरुप

ID11017: चि. गजानन मोहन कुंभार. जन्म-२९/८/९५, जन्मवेळ व ठिकाण-रात्री ११.०५ सातारा, उंची-५:३, वर्ण-गोरा, शिक्षण- सिव्हिल + एम.एस. अमेरिका, नोकरी- अमेरिका, पगार वार्षिक - ९५००० डॉलर, अपेक्षा-अनुरुप.

ID11184: चि. हर्षल उत्तम कुंभार. जन्म-१४/७/९३, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ४.३८ अकलुज, उंची-५:१०, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मास्टर इन अनॅलायसिस, नोकरी-खाजगी यु.एस.ए., पगार-$ ७,०००/-, अपेक्षा-अनुरुप

ID10936: चि. संतोष बाळकृष्ण कुंभार. (लिंगायत) जन्म-२१/४/८७, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी ३.०२ सांगली, उंची-५.८,

वर्ण–गोरा, शिक्षण–मेक + पीजीडीएम पायपिंग इंजि+ एम.बी.ए. पायपिंग, नोकरी – खाजगी ठाणे, पगार – ६०,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11685: चि. श्रेयस संतोष कुंभार. जन्म–१२/३/९६, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २.४५ सांगली, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–मेक. + एम.बी.ए., नोकरी–खाजगी, पगार–१,००,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11679: चि. निरंजन गजानन कुंभार. जन्म–१६/१०/९५, जन्मवेळ व ठिकाण–६.३५ कराड, उंची–५:८, वर्ण–निमगोरा, शिक्षण–एम.टेक टनल इंजि., नोकरी–खाजगी, पगार–४,००,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID: चि. शुभम सोमनाथ अष्टेकर. जन्म–१/८/९६, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४.२४ पुणे, उंची–६:१, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस. सिव्हिल अमेरिका, नोकरी– अमेरिका, पगार वार्षिक – ८५ लाख, अपेक्षा–अनुरुप.

ID11641: चि. आदित्य विठ्ठलराव चोंडके. जन्म–२०/१०/९६, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ४.५९ अकोला, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण– बी.टेक + एम.टेक, नोकरी–खाजगी बंगलोर, पगार–४० लाख, अपेक्षा–अनुरुप.

ID11576: चि. शुभम प्रदीप काळे. जन्म–२०/४/९६, उंची–६ फुट, वर्ण–निमगोरा, शिक्षण–एम.एस., नोकरी–खाजगी यु.एस.ए., पगार–३,००,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11568: चि. आदित्य शिवाजी कुंभार. जन्म–१९/११/९५, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ७.४७ पिंपरी, उंची–५:८, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेक+एम.बी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–७०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11517: चि. निरंजन प्रल्हाद कुंभार. जन्म–१५/१२/९३, जन्मवेळ व ठिकाण–१६.२५ इस्लामपुर, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु. + एम.बी.ए., नोकरी–खाजगी, पगार–५,४०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11466: चि. प्रितेश रविंद्रनाथ मेनकर. जन्म–११/१/९४, जन्मवेळ व ठिकाण– रात्री ९.१० धुळे, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण – मेक. + एम.बी.ए., नोकरी–खाजगी, पगार–८७,५००/, अपेक्षा–अनुरुप.

ID10716: चि. अमेय श्रीराम जगदाळे. जन्म–२१/६/९६, जन्मवेळ व ठिकाण– १६.४५ बारामती, उंची–५:११, वर्ण–निमगोरा, शिक्षण –सिव्हिल+एम.बी.ए., नोकरी–खाजगी, पगार–३०,०००/, अपेक्षा–अनुरुप.

ID11410: चि. युवराज शंकर कुंभार. जन्म–१०/१/९३, जन्मवेळ व ठिकाण– सकाळी१०.३५ कोरेगांव सातारा, उंची–५.७, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु. + एम.बी.ए. मार्केटिंग, नोकरी – खाजगी, पगार – ५५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11372: चि. अभिनंदन मारुती कुंभार. जन्म–७/८/९५, जन्मवेळ व ठिकाण– दुपारी १.३७ इचलकरंजी, उंची–५.७, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.टेक.(मेक. डिझाईन) + बी.टेक. (मेक), नोकरी – खाजगी, पगार – १,०६,६६६/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11310: चि. सौरभ दिलीप कुंभार. जन्म– २६/१/९८, जन्मवेळ व ठिकाण–११.४४ फलटण, उंची–५:९, वर्ण–गोरा, शिक्षण –बी.टेक. मेक.+ एम.बी.ए. मार्केटिंग, नोकरी – खाजगी मुंबई, पगार – ५५,०००/–, अपेक्षा–अनुरु

ID11175: चि. निखिल सुनिल कुंभार. जन्म–१५/११/९३, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.टेक., नोकरी – सरकारी, पगार –७६,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11180: चि. अनुज नामदेव कुंभार. जन्म–२६/६/९५, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ३.४९ गडहिंग्लज, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.टेक., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11201: चि. विकी मच्छिंद्रनाथ तुळे. जन्म–४/११/९६, जन्मवेळ व ठिकाण–३.४५ चाकण, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु.+एम.बी.ए., नोकरी–खाजगी, पगार – ४५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID10244: चि. कैलास बळवंत वागवेकर. जन्म–८/२/९१, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ५.३० कोल्हापूर, उंची–५.९, वर्ण–निमगोरा, शिक्षण–एम.टेक. स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न–३०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11123: चि. सुरज अशोक सोनवणे. जन्म–२/५/९३, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.३२पुणे, उंची–५.५, वर्ण–निमगोरा, शिक्षण–इंजि.+एम.बी.ए.+पी.एच.डी.,नोकरी – खाजगी पुणे, पगार – ६०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

बी.ई.

ID11019: चि. तुषार दशरथ कुंभार. जन्म–२८/८/९३, जन्मवेळ –रात्री १२.४५ सोनावडे, उंची–५.४, वर्ण–गोरा, शिक्षण–मेक., नोकरी – खाजगी, पगार – ६५,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11817: चि. मंथन वसंत कुंभार. जन्म–६/७/९७, जन्मवेळ –रात्री १०.४०, उंची–५.७, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी – खाजगी, पगार – ५६,५००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID: चि. अर्थव दत्तात्रय कुंभार. जन्म–१/१/९८, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २.३५ नातेपूते, उंची–५.७, वर्ण–गोरा, शिक्षण–इ.अॅन्ड टी.सी., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ५०,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11812: चि. प्रतिक सुरेश भागवत. जन्म–१८/१/९८, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ११.३२ भोसरी, उंची–५:५, वर्ण–गोरा,

शिक्षण – मेक + कॉम्प्युटर, नोकरी – खाजगी, पगार – १,०५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11777: चि. किरण माणिक कुंभार. जन्म–८/१/२००१, उंची–५.८, वर्ण–गोरा, शिक्षण–मेक., नोकरी – खाजगी पुणे, पगार – ३०,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID10304 चि. संकेत नरेंद्र राजे. जन्म–२४/१२/९६, उंची–५.११, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु. नोकरी–खाजगी दुबई, पगार–३,०७, ६००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID9890: चि. सुरज दत्तात्रय कुंभार. जन्म–६/१/९१, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ५.१५ सातारा, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण – कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी, पगार – १,३०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11782: चि. मयुर कृष्णाजी साळवी. जन्म–१/३/९२, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ११.३० कान्हुर पठार, उंची–५:७, वर्ण–निमगोरा, शिक्षण – कॉम्प्युटर, नोकरी – खाजगी, पगार – १,९९,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11781: चि. कृष्णा खंडू पंजरकर. जन्म–१०/८/९३, जन्मवेळ व ठिकाण–००.१० आंबेजोगाई, उंची–५.१०, वर्ण–गोरा, शिक्षण–मेकॅ., नोकरी–खाजगी, पगार–७०,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11779: चि. तुषार सदाशिव जगताप. जन्म–१७/९/९५, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १.३० वारी , उंची–५.३, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी, पगार – १,१४,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11778: चि. मयुर युवराज नरवणकर. जन्म–१४/९/९३, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १२.१२ खाचरोड, उंची–५.५, वर्ण–गोरा, शिक्षण–मेक, नोकरी–खाजगी गुजरात, पगार – ३२,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11766: चि. गणेश अरुण विश्वासराव. जन्म–२१/५/९६, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ३.३०आने, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण – मेक., नोकरी – खाजगी खोपोली, पगार – ३३,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11767: चि. आकाश जगन्नाथ जाधव. जन्म–१९/८/९५, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ९.३० औरंगाबाद, उंची–५.७, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी पुणे, पगार–२,००,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11760: चि. किरण जालींदर कुंभार. जन्म–९/१२/९१, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ६ मुंबई, उंची–५.८, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी पुणे, पगार–१,००,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID10228: चि. योगेश वसंत भागवत. जन्म–३१/१०/९१, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २.४५ मुंबई, उंची–५:११, वर्ण–गोरा, शिक्षण – कॉम्प्युटर + डिप्लोमा, नोकरी – खाजगी, पगार – १,७५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID9949: चि. ओंकार राजाराम कुंभार. जन्म–२०/४/९३, उंची–५.९, वर्ण–गोरा, शिक्षण–आय.टी., नोकरी–खाजगी, पगार – ४५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11739: चि. स्वप्निल नामदेव कुंभार. जन्म–१/५/९७, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ३.५५ गुंजेगाव, उंची–५.८, वर्ण–निमगोरा, शिक्षण–इ ॲन्ड टी.सी., नोकरी–खाजगी, पगार–१,००,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11720: चि. स्वप्नदीप भरत कुंभार. जन्म–१/३/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.३५ राजेवाडी, उंची–५.९, वर्ण–निमगोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी–खाजगी, पगार –१,२०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11728: चि. ओंकार सुभाष दाते. जन्म–१०/११/९७, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ५.३८सासवड, उंची–५.८, वर्ण–गव्हाळ, शिक्षण–कॉम्प्यु, नोकरी–खाजगी, पगार वार्षिक –२० लाख, अपेक्षा – अनुरुप.

ID11711: चि. अनिकेत सुनिल जोंधळे. जन्म–२९/१/९५, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ७.२५ सिन्नर, उंची–५.९, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी–खाजगी, पगार–१,३०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11712: चि. सौरभ भीमराव कुंभार. जन्म–२५/११/९४, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १.३५ इस्लामपुर, उंची–५.८, वर्ण–गोरा, शिक्षण–इ. ॲन्ड टी.सी., नोकरी–खाजगी, पगार –१,००,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID10956: चि. संकेत बाळासाहेब कुंभार. जन्म–२७/२/९८, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ४.४३ शिरुर, उंची–५.७, वर्ण–गोरा, शिक्षण–मेक, नोकरी–खाजगी मुंबई, पगार –५,००,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID10973: चि. अनिकेत सुरेश कुंभार. जन्म– २७/२/९६, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ५.१४ गारगोटी, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न – १,३०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11702: चि. पुष्कराज जयवंत सोनावणे. जन्म– ११/८/९४, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी २.३० शिरपुर, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–मेकॅ, नोकरी – खाजगी पुणे, पगार–१,२१,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11701: चि. पार्थ मोहन साळवी. जन्म– १७/१२/९२, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ६.४३ मुंबई, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी – खाजगी पुणे, पगार – १,४०,०००/–,

अपेक्षा–अनुरुप.

ID11696: चि. जितेश सदाशिव पाटील. जन्म–२०/१/९६, जन्मवेळ व ठिकाण–२२.०४ मुंबई, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ई, नोकरी–खाजगी मुंबई, पगार वार्षिक–१३लाख, अपेक्षा – अनुरुप.

ID11693: चि. प्रितम अशोक कुंभार. जन्म– १६/१०/९६, जन्मवेळ व ठिकाण– रात्री ११.१० कराड, उंची–५:१०, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी – खाजगी नवी मुंबई, पगार – ५३,०००/– अपेक्षा–अनुरुप.

ID11664: चि. कृणाल दिपक कुंभार. जन्म–१४/१०/९७, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ८.२० रात्री मलकापुर, उंची–६ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, नोकरी–खाजगी पुणे, पगार – ४५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11647: चि. किरण हनुमंत कुंभार. जन्म– २५/६/९७, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १२.४५ मुंबई, उंची–५:८, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेकॅ, नोकरी – खाजगी मुंबई, पगार – ७५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11621: चि. पियुष महेश कुलाल. (लिंगायत) जन्म–१/६/९४, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे १२.०५ बार्शी, उंची–५:६ फुट, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेकॅ., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ४७,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11614: चि. गणेश बाळासाहेब कुंभार. जन्म–९/३/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.२५ धुळे, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–मेकॅ., नोकरी–खाजगी नवी मुंबई, पगार–१५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID10869: चि. ऋषिकेश अशोक कुंभार. जन्म–२५/१/९४, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ११.०५कळस, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–मेकॅ, नोकरी–खाजगी पुणे, पगार – ७,५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11598: चि. कुलदीप पांडुरंग कुंभार. जन्म–३/९/९४, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी ९.३० हिटनी, उंची–५:७, वर्ण–निमगोरा, शिक्षण – कॉम्प्यु., नोकरी – खाजगी पुणे, पगार–७०,२००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID10722: चि. वैभव रंगराव कुंभार. जन्म–१३/६/९६, जन्मवेळ व ठिकाण – २२.४५ सडोली, उंची–५:९, वर्ण–निमगोरा, शिक्षण – मेक., नोकरी – खाजगी ऑस्ट्रेलिया, पगार–३,००,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11566: चि. गणेश सुधीर राजे. जन्म–३०/३/९१, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४.२०कराड, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण– सिव्हिल, नोकरी – खाजगी, पगार–३०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11577: चि. प्रवीण जयसिंग कुंभार. जन्म–५/१०/९३, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.०२ कागल, उंची–५.६, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.टेक. कॉम्प्यु., नोकरी – खाजगी पुणे, पगार – १,००,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11571: चि. ओंकार दत्तात्रय कुंभार. जन्म– १३/४/९६, उंची–५:७, वर्ण–निमगोरा, शिक्षण–बी.ई., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ५४,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11553: चि. मयुर शेखर कुंभार. जन्म–२९/१/९६, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ५ निरा, उंची–५.८, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेकॅ., स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न – २५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11542: चि. ओंकार विनोदकुमार कुंभार. (लिंगायत) जन्म–२/११/९५, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २.१०आटपाडी, उंची–५.९, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.टेक. इलेक्ट्रॉनिक, नोकरी – खाजगी, अपेक्षा– अनुरुप.

ID11534: चि. प्रज्ञेश अशोक चव्हाण. जन्म–६/४/९७, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे५.०५भोसरी, उंची–५.६, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी – खाजगी, पगार – ३०,२८३, अपेक्षा– अनुरुप.

ID11491: चि. अमीत अशोक गोरे. (लिंगायत) जन्म – १/६/९४, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ६.०४ औरंगाबाद, उंची–५:९, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेक, नोकरी–खाजगी मुंबई, पगार – ४८,६००/ ,अपेक्षा–अनुरुप.

ID11477: चि. विशाल विष्णु कुंभार. जन्म – २३/१०/९३, जन्मवेळ व ठिकाण–८.३०मालवाडी, उंची–५:९, वर्ण–निमगोरा, शिक्षण – सिव्हिल, नोकरी – खाजगी, पगार–४५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11476: चि. शुभम आनंदराव मल्हारे. जन्म – १०/१०/९८, जन्मवेळ व ठिकाण–२.१५ नांदेड, उंची–६फुट, वर्ण–गोरा, शिक्षण – कॉम्प्यु., नोकरी–खाजगी पुणे, पगार–५६,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11472: चि. अभिजीत जगन्नाथ कुंभार. जन्म–५/२/९३, जन्मवेळ व ठिकाण– सकाळी ७.२७ अहिर, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, नोकरी–खाजगी, पगार–६२,०००/, अपेक्षा–अनुरुप.

ID11463: चि. संतोष विष्णु कुंभार. (लिंगायत) जन्म– २४/५/९१, जन्मवेळ व ठिकाण– ११.५५ उस्मानाबाद, उंची–५:१०, वर्ण–गोरा, शिक्षण – ॲटोमोबाईल, नोकरी – खाजगी बंगलोर, पगार – ६५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11428: चि. आशुतोष अनिल कोळेकर. जन्म–१०/२/९१, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ३.२० कोल्हापुर,उंची–६ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, नोकरी–खाजगी, पगार – ४५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11392: चि. श्रीकांत नामदेव कानुरे. जन्म– १३/१/९२, जन्मवेळ व ठिकाण– सकाळी ११ नांदेड, उंची–५:८, वर्ण–गोरा,

शिक्षण–बी.टेक., नोकरी–खाजगी, पगार–७०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11411: चि. अवधुत सुभाष माजगांवकर. जन्म–१/७/९७, जन्मवेळ व ठिकाण– पहाटे २.३६ कोल्हापुर, उंची–५.९, वर्ण–निमगोरा, शिक्षण–बी.टेक, नोकरी–खाजगी पुणे, पगार–४०,०००/– अपेक्षा – अनुरुप.

ID11396: चि. सौमित्र विलास कुंभार. जन्म–२५/६/९७, जन्मवेळ व ठिकाण– संध्या ६.०९वडूज, उंची–५.५, वर्ण–गोरा, शिक्षण–इलेक्ट्रिक, नोकरी–खाजगी मुंबई, पगार–४१,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11371: चि. इंद्रजित बाजीराव कुंभार. जन्म– २३/१२/९३, जन्मवेळ व ठिकाण– सकाळी ६.२८ कोल्हापुर, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण – मेकॅट्रॉनिक्स, नोकरी – खाजगी पुणे, पगार – ४५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11373: चि. आकाश गोरख कुंभार. जन्म–३/६/९७, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ८.०१ फलटण, उंची–५.८, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ९५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11379: चि. सागर दिलीप संन्यासी. जन्म–२७/३/९४, जन्मवेळ व ठिकाण– दुपारी १.१० जळगांव, उंची–६ फुट, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेकॅ., नोकरी–खाजगी पुणे, पगार वार्षिक – ६.२० लाख, अपेक्षा – अनुरुप.

ID11358: चि. अक्षय रामराव कुंभार. जन्म–१०/१२/९८, जन्मवेळ व ठिकाण– १२.५७ सातारा, उंची–५.१०, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी – खाजगी, पगार – ५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11327: चि. महेश अरुण पाडळकर. जन्म–२/१०/९४, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी २.४५ कोल्हापुर, उंची–५.५, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न –५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11340: चि. अक्षय उत्तम कुंभार. जन्म–२/७/९६, जन्मवेळ व ठिकाण–१६.५० कुंभारगांव, उंची–५.२, वर्ण–गोरा, शिक्षण–इ ॲन्ड टेलि., नोकरी–खाजगी बंगलोर, पगार –९०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11299: चि. प्रशांत भाऊसाहेब कुंभार. जन्म–१६/९/९५, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ११.३० पुणे, उंची–५.८, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, नोकरी–खाजगी, पगार–८५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11308: चि. ऋषिकेश संजय कुंभार. जन्म–१०/८/९५, जन्मवेळ व ठिकाण–००.०५ सांगली, उंची–५.४, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेक., नोकरी–खाजगी पुणे, पगार–६,८२,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11293: चि. आदित्य संदीप कुंभार. जन्म–१/९/९७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १०.१२ पुणे, उंची–५.८, वर्ण–गोरा, शिक्षण–मेक., नोकरी–खाजगी पुणे, पगार–६६,६६६/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11291: चि. आदित्य अशोक कुंभार. जन्म–११/७/९५, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ११.०९ कोल्हापुर, उंची–५.६, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेक., नोकरी–खाजगी पुणे, पगार–४०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11182: चि. योगेश बाळासाहेब जाधव. जन्म–२८/१२/९३, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४.२७ कडूस, उंची–५.८, वर्ण–निम गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी मुंबई, पगार–१,८०,०००/–, अपेक्षा अनुरुप.

ID10385: चि. धनंजय देविदास कुंभार. जन्म–३/२/९३, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ९.३० करमाळा, उंची–५.६, वर्ण–निमगोरा, शिक्षण–इंजि. करत आहे, अपेक्षा – अनुरुप.

ID11250: चि. भुषण रामेश्वर कपाट. जन्म–१८/११/९३, जन्मवेळ व ठिकाण–१५.४५ यवतमाळ, उंची–५.९, वर्ण–निमगोरा, शिक्षण–आय.टी., नोकरी–खाजगी पुणे, पगार–१,४०,०००/–, अपेक्षा अनुरुप.

ID11244: चि. रोहित अशोक तहाडे. जन्म–१२/६/९५, जन्मवेळ व ठिकाण–११.२५ नांदेड, उंची–५.९, वर्ण–निमगोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी–खाजगी युनाटेड किंडम्, पगार–२,७५,०००/–, अपेक्षा अनुरुप.

ID11247: चि. अक्षय अशोक वाडकर. जन्म–४/१/९१, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १०.३०वाडेगांव, उंची–५.३, वर्ण–गोरा, शिक्षण–इ ॲन्ड सी., नोकरी–खाजगी नवी मुंबई, पगार– ८०,०००/–, अपेक्षा अनुरुप.

ID11243: चि. धनाजी यशवंत शिर्के. जन्म–१८/२/९५, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४.१२ उंब्रज, उंची–५.३, वर्ण–गोरा, शिक्षण–इलेक्ट्रिकल, नोकरी–खाजगी पुणे, पगार–६५,०००/–,अपेक्षा–अनुरुप.

ID11239: चि. अक्षय सुरेश महाले. जन्म–२३/६/९५, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.५० सुरत, उंची–५.७, वर्ण–निमगोरा, शिक्षण–इलेक्ट्रिकल, नोकरी–खाजगी पुणे, पगार–३०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11235: चि. दर्शन चंद्रकांत कुंभार. जन्म–२०/७/९५, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १०.१५ पुणे, उंची–५.५, वर्ण–निमगोरा, शिक्षण–इंजि., नोकरी–खाजगी पुणे, पगार–४२,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11269: चि. प्रसाद आनंदा कुंभार. जन्म–२५/१/९१, जन्मवेळ व ठिकाण–१९.४० कोल्हापुर, उंची–५.८, वर्ण–गोरा, शिक्षण–इ ॲन्ड सी., नोकरी–खाजगी पुणे, पगार–१,५८,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11275: चि. सौरभ संजय कुंभार. जन्म–३०/११/९६, जन्मवेळ व ठिकाण– रात्री ११.०५ मुंबई, उंची–५.८, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, नोकरी–खाजगी मुंबई, पगार–५०,०००/–, अपेक्षा अनुरुप.

ID11232: चि. प्रशांत महादेव कुंभार. जन्म–१८/१०/९४, जन्मवेळ व ठिकाण–रात्री २.१० मुंबई, उंची–५.८, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेक., नोकरी–खाजगी पुणे, पगार–३,९१,६६७/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11224: चि. सागर सिद्धार्थ माहिरे. जन्म–१९/७/९५, उंची–५.४, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी–खाजगी पुणे, पगार–३५,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11274: चि. शैलेश लिलाधर भारते. जन्म–२९/९/९५, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४.४५ जळगांव, शिक्षण–मेक, स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न –८० ते ९०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11203: चि. आतिश दत्तात्रय कुंभार. जन्म–६/६/९५, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ११.५५ कोल्हापुर, उंची–५.११, वर्ण–निम गोरा, शिक्षण–मेक, नोकरी–खाजगी पुणे, पगार–३१,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11724: चि. अभिषेक रमेश कुंभार. जन्म–१६/५/९६, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ९.४५ जुन्नर, उंची–५:५, वर्ण–निमगोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी – खाजगी, अपेक्षा–अनुरुप.

ID11194: चि. गणेश माधव जाधव. जन्म–१९/९/९७, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे १.३० साखरखेर्डा, उंची–५:९, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेक, नोकरी – खाजगी, पगार–५३,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11191: चि. प्रशांत बाळासाहेब सडोलीकर. जन्म–२१/९/९१, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ६.५० कराड, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी – खाजगी पुणे, पगार – ६५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11189: चि. दृष्टांत सदाशिव वाल्हेकर. जन्म–१४/११/९८, जन्मवेळ व ठिकाण–संध्या. ६.५५ दौंड, उंची–५:८, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेक., नोकरी–खाजगी पुणे, पगार–२९,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11169: चि. सागर रघुनाथ काळे. जन्म–१०/१/९३, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे १कोपरगाव, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, नोकरी–खाजगी पुणे, पगार–१,००,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11165: चि. नितिन नागनाथ घटकार. जन्म–१२/८/९१, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–धातूशास्त्र, नोकरी–खाजगी, पगार–२५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11136: चि. तुषार मोहन जामसुतकर. जन्म–१४/१२/९०, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ३.२८ पुणे, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण–इले.,नोकरी–खाजगी पुणे, पगार–६०,०००/–,अपेक्षा–अनुरुप.

ID11133: चि. गणेश तुळसीदास कुंभार. जन्म–२/११/९६, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १०.३०सातारा, उंची–५.६, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेकॅ. नोकरी–खाजगी पुणे, पगार–४०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID8568: चि. बालाजी सोपान कुंभार. जन्म–२/१०/९३, उंची–५:१०, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ई., स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न – ४,००,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11112: चि. आदित्य अशोक कुंभार. जन्म–१५/८/९२, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ६.०५ मिरज, उंची–५.२, वर्ण–गोरा, शिक्षण–मेकॅ., नोकरी–खाजगी, अपेक्षा–अनुरुप.

ID9755: चि. परिमल मिलींद सोनावणे. जन्म–१८/१०/९२, जन्मवेळ व ठिकाण–१४.०० संगमनेर, उंची–५.८, वर्ण–निमगोरा, शिक्षण–मेकॅ., स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न–५/६ लाख, अपेक्षा– अनुरुप.

ID11109: चि. स्वप्निल भगवान कुंभार. जन्म–२/१०/८९,, जन्मवेळ व ठिकाण–१३.१५ इंदापुर, उंची–५:७, वर्ण–निमगोरा, शिक्षण–कॉम्प्यु., स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न–५०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11110: चि. उत्कर्ष सतिश नांदिवडेकर. जन्म–२३/५/९३, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.२२ मंडणगड, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–मेकॅ, अपेक्षा–अनुरुप.

ID10464: चि. गणेश शिवाजी रसाळ. जन्म–५/६/९६, जन्मवेळ व ठिकाण–५.३०साकुर, उंची–५:६, वर्ण–निमगोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी पुणे, पगार–९०,०००/–, अपेक्षा–अनुरुप

सी.ए.

ID10523: चि. स्वप्नील दशरथ उर्किडे. जन्म–२०/७/९३, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ११.०५ जुन्नर, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण – सी.ए. सी.एफ.ए. लेव्हल २, स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न – १,५०,०००, अपेक्षा–अनुरुप.

बी.बी.ए./एम.बी.ए./एम.बी.एस.

ID10814: चि. अभिजीत संभाजी परळकर. जन्म–१९/९/८९, जन्मवेळ व ठिकाण–२.१५ कोल्हापुर, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.बी.ए., स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न –६०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID: चि. अक्षय शंकरराव वाल्हेकर. जन्म–३०/८/९१, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.१०मंचर, उंची– ६फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस्सी + एम.बी.ए., नोकरी – खाजगी दिल्ली, पगार – ३५लाख

वार्षिक, अपेक्षा–अनुरुप.

ID11743: चि. नितीश शिवाजी कुंभार. जन्म–१५/६/९२, उंची–५:१०, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.कॉम+ एम.बी.ए., नोकरी–खाजगी, पगार–८०,०००/–, अपेक्षा–अनुरुप

ID10651: चि. सुरज चर्तुभूज शिंगोलकर. जन्म–२३/१०/९४, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १.३० लातुर, उंची–५:७, वर्ण–निमगोरा, शिक्षण –बी.बी.ए., नोकरी – एच.एस.बी.सी बँक बंगलोर, पगार – १,२५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID10854: चि. राहुल किशोर कुंभार. जन्म–२८/२/९६, जन्मवेळ व ठिकाण–९.१४ कोरेगाव सातारा, उंची–५:१०, वर्ण–निमगोरा, शिक्षण –बी.कॉम+पी.जी.डी.एम., नोकरी – एच.डी.एफ.सी बँक, पगार – ४७,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11601: चि. गौरव दिपक डेंगळे. जन्म–२६/५/९७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १.५० अकोला, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण – एम.बी.ए.+पोस्ट ग्रॅज्युएट बँकिंग ॲड फायनान्स, नोकरी – खाजगी पुणे, पगार – ४०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11511: चि. रघुनाथ आनंदा कुंभार. जन्म–१५/२/९०, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९ कोल्हापुर, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण –बी.ए+बी.बी.ए, नोकरी – तहसील ऑफिस, सांगली, पगार – ५०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11408: चि. निखिल विठ्ठल कुंभार. जन्म–१८/२/९५, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ३.४५ पुणे, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण –एम.बी.ए., नोकरी – एच.डी.एफ.सी बँक, पगार – ४०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11391: चि. अक्षय हरिभाऊ राजे. (लिंगायत) जन्म–३१/५/९४, जन्मवेळ व ठिकाण–सायं. ६.०६ मोहोळ,उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण –एम.बी.ए., नोकरी – खाजगी, अपेक्षा–अनुरुप.

ID9766: चि. गुरुदत्त पांडुरंग असुकर. जन्म–२०/८/९०, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ३.२२ कोल्हापुर, उंची–५.२, वर्ण–निम गोरा, शिक्षण–बी.बी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार –४५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID10388: चि. हर्षवर्धन अनंत कुंभार. जन्म–२८/१२/९४, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.४५ पुणे, उंची–५.७, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.बी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ५१,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11045: चि. कुणाल कल्याणाप्पा कोरे. (लिंगायत) जन्म–२९/९/९१ जन्मवेळ व ठिकाण–संध्या ७.४५ धारवाड, उंची–६.१, वर्ण–निमगोरा, शिक्षण–एम.बी.ए.,नोकरी – खाजगी मुंबई, पगार–४८,५९८/–, अपेक्षा– अनुरुप.

बी आर्च

ID11670: चि. ओंकार उमाजी कातवरे. जन्म–२०/६/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ७.२० कोल्हापुर, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.आर्च, स्वत:चा व्यवसाय कोल्हापुर, उप्तन्न – ४०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11120: चि. ऋषिकेश चंद्रकांत बोरसे. जन्म–२१/४/९१, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १पुणे, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.आर्च, नोकरी–खाजगी दुबई, पगार–१,५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

बी.एफ.ए.

ID11120: चि. अजिंक्य विजय लोहगांवकर. जन्म–४/१/९७, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ३.०८पुणे, उंची–५:९, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एफ.ए., स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न – ६०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

एल.एल.बी. (वकिली क्षेत्र)

ID11811 चि. वल्लभ दगडू कुंभार. जन्म–२९/१/९६, जन्मवेळ व ठिकाण – ९.२६ कोल्हापुर, उंची–५.६, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम + एल.एल.बी. करत आहे,स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न – ४०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11425: चि. प्रशांत महेश बाहिकर. जन्म–१२/१०/९६, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम+एल.एल.बी.,स्वत:चा व्यवसाय, अपेक्षा–अनुरुप.

ID11433: चि. सागर दादासाहेब वाघमारे. जन्म–२७/६/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १२ पुणे, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए.+एल.एल.बी. शेवटचे वर्ष, पगार–२५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11249: चि. नरेंद्र विठ्ठल राजे. जन्म–३०/१२/९४, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १०.४४ सातारा, उंची–५:७, वर्ण–निमगोरा, शिक्षण–बी.कॉम+एल.एल.बी., स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न – ४०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

हॉटेल मॅनेजमेंट

ID11418: चि. सौरभ विक्रम राहूकर. जन्म–१५/१/९७, जन्मवेळ व ठिकाण–सायं. ७.११ पुणे, उंची–५:७, वर्ण–निमगोरा, शिक्षण–बी.एस्सी+हॉटेल मॅनेजमेंट, स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न वार्षिक – ७ लाख, अपेक्षा – अनुरुप.

ID11619: चि. ओंकार अनिल साळवी. जन्म–१/१/९४, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २.५८ खानापुर, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–हॉटेल मॅनेजमेंट, नोकरी –बंगलोर, पगार – २५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11394: चि. अभिषेक शिवाजी राजे. जन्म–२/९/९५, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण–हॉस्पिलीटी मॅनेजमेंट, नोकरी – खाजगी, पगार – ७०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11313: चि. विनय बाळकृष्ण कुंभार. जन्म– २९/४/९०, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी १०.५० सातारा, उंची–५:३, वर्ण–निमगोरा, शिक्षण – हॉटेल मॅनेजमेंट, नोकरी–खाजगी, पगार–४१,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID10966: चि. केदारनाथ नागप्पा कट्टमणी. जन्म – २२/५/९५, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण – हॉटेल मॅनेजमेंट, स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न – ५०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

बी.सी.ए.-एम.सी.ए., बी.सी.एस.-एम.सी.एस.

ID11833: चि. मयुरेश नितीन साळीवकर. जन्म – ६/१२/९४, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २.३० अकोला, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण– एम.सी.एस., नोकरी–खाजगी पुणे, पगार–२०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11714: चि. सागरनंदा पंडितराव वाघोलीकर. जन्म – २४/३/९८, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.४६पुणे, उंची–५:११, वर्ण–गोरा, शिक्षण– एम.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–४१,९१४/–, अपेक्षा – अनुरुप.

ID10560: चि. हेमंत प्रकाश कुंभार. जन्म–२८/७/९५, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.ए., नोकरी–खाजगी, पगार–१,६५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID10977: चि. अक्षय प्रल्हाद कुंभार. जन्म–२३/६/९५, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ६फलटण, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.ए., नोकरी–खाजगी, पगार–८०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11718: चि. शेखर विजय राजे. जन्म–१४/७/९९, जन्मवेळ व ठिकाण–१४.२० कोल्हापुर, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–३५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11714: चि. राहूल तानाजी अष्टेकर. जन्म – १९/५/८९, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४.३० धांधरफळ खु., उंची–५:१०, वर्ण–गोरा, शिक्षण– एम.सी.ए., नोकरी–खाजगी मुंबई, पगार–८०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11675: चि. अक्षय दिलीप मोरे. जन्म–१९/५/९३, जन्मवेळ व ठिकाण–७.३० जळगांव, उंची–५:५, वर्ण–निमगोरा, शिक्षण–एम.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–७२,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11636: चि. रोहन संजय कुंभार. जन्म – ८/३/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.५५ सातारा, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–७०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11697: चि. अनिरुध्द दिलीपराज पाडळकर. जन्म – ११/८/९०, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ११.५० सातारा, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण– बी.सी.एस., नोकरी–खाजगी पुणे, पगार – २,४०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11632: चि. करण चारुहास शिंदे. जन्म–२७/३/९६, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ५.३५ पुणे, उंची–५:१०, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.एस., नोकरी–खाजगी पुणे, अपेक्षा – अनुरुप.

ID11551: चि. अजय अण्णाजी कुंभार. जन्म–१४/१२/९६, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण– बी.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार – २०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11569: चि. अमित विकास कुंभार. जन्म–२४/११/८७, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ८ कराड, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार वार्षिक – १६ लाख, अपेक्षा – अनुरुप.

ID11475: चि. सिद्धांत सुनिल कुंभार. जन्म – २४/७/९५, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ५ पुणे, उंची–५:७, वर्ण–निमगोरा, शिक्षण – बी.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–२१,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11222: चि. निशांत सुभाष कोलुवार. जन्म – २५/३/९१, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी ६.२० नागपुर, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण – एम.सी.एम, नोकरी – खाजगी नागपुर, पगार – ३०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11170: चि. दिपक पांडुरंग कुंभार. जन्म – ११/१०/९०, जन्मवेळ व ठिकाण – २२.३८ पुणे, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण – एम.सी.ए, नोकरी खाजगी पुणे, पगार–१,२१,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

फाईन आर्ट/बी.एफ.ए.

ID: चि. ऋषिकेश राजेंद्र उकिरडे. जन्म–११/४/८७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.०५ पुणे, उंची–५:५, वर्ण–निमगोरा, शिक्षण–जी.डी.आर्ट डिप्लोमा, नोकरी–खाजगी, पगार – ६०,०००/–, अपेक्षा–समकक्ष.

ID: चि. ओंकार प्रताप कोळेकर. जन्म–५/८/९२, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.१९ कोल्हापुर, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–जी.डी.आर्ट डिप्लोमा, स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न–४५,०००/–, अपेक्षा–समकक्ष.

बी.एस्सी., एम.एस्सी.

ID11824: चि. सतिश बसवंत कुंभार. जन्म– १८/३/९४, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण –एम.एस्सी कॉम्प्यु., नोकरी – खाजगी बंगलोर, पगार – २,००,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11762: चि. अभिषेक दिपक साळवी. जन्म- २०/३/९७, जन्मवेळ व ठिकाण-रात्री ९.०६ रत्नागिरी, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण -बी.एस्सी ॲग्री, नोकरी - खाजगी मुंबई, पगार वार्षिक - ५,५०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11757: चि. भुषण प्रदीप कोलमकर. जन्म- २५/३/९२, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण -बी.एस्सी आय.टी., नोकरी - सरकारी मुंबई, पगार-६०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11746: चि. शुभम आनंदराव कुंभार. जन्म- २८/११/९५, जन्मवेळ व ठिकाण-१२.३८ सातारा, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण -एम.एस्सी, नोकरी - खाजगी पुणे, अपेक्षा-अनुरुप.

ID11752: चि. निखिल नरेंद्र धामणकर. जन्म- ३/१/९८, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ५.४५ कोरेगांव, उंची-५:१०, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.एस्सी कॉम्प्युटर, नोकरी - खाजगी पुणे, पगार-१० लाख, अपेक्षा-अनुरुप.

ID11011: चि. ओंकार राजन कुंभार. जन्म-१३/९/९४, जन्मवेळ व ठिकाण - पहाटे ५.१० निपाणी, उंची-५.७, वर्ण-गोरा, शिक्षण- ॲग्रीकल्चर, नोकरी - सरकारी ॲग्रीकल्चर डिपार्टमेंट निपाणी, पगार-४०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10840: चि. प्रसाद यशवंत पाषाणकर. जन्म- ३०/१/९५, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ५.५५ पुणे, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.एस्सी (कॉम्प्यु), नोकरी-खाजगी पुणे, पगार-१,५०, ०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11654: चि. सचीन अशोक कुंभार. जन्म- १७/६/९६, उंची-५:७, वर्ण-निमगोरा, शिक्षण-एम.एस्सी, नोकरी-खाजगी, पगार-३५, ०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID10243: चि. योगेश पांडुरंग कुंभार. जन्म-२४/१/९४, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी १२.०५कोल्हापुर, उंची-५:६, वर्ण-गोरा, शिक्षण- बी.एस्सी., स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न -७५,०००/-, अपेक्षा - अनुरु

ID11618: चि. निलेश विकास कुंभार. जन्म-२५/४/९६, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७ बिळाशी, उंची-५.७, वर्ण-गोरा, शिक्षण- एम.एस्सी., नोकरी- खाजगी गुजरात, पगार-३०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11550: चि. निनाद नंदकुमार चिंदरकर. जन्म- १२/६/९६, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ८.४५ गुहागर, उंची-५:१०, वर्ण-गोरा, शिक्षण -एम.एस्सी, नोकरी - खाजगी पुणे, पगार-६०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11348: चि. रितेश अशोक साळवी. जन्म-२१/८/९३, जन्मवेळ व ठिकाण - सकाळी १०.३० चिपळूण, उंची-५.१, वर्ण-सावळा, शिक्षण- एम.एस्सी., नोकरी- खाजगी पुणे, पगार-३०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11231: चि. लखन शिवाजी पगडे. जन्म-७/११/८८, उंची-५.७, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.एस्सी.ॲग्री, नोकरी - युनियन बँक, पगार - १,००,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID11213: चि. अनुज चंद्रकांत पडवेकर. जन्म-८/१०/९२, जन्मवेळ व ठिकाण - सकाळी ५.१६ मुंबई, उंची-५.५, वर्ण-गोरा, शिक्षण- कॉम्प्युटर, नोकरी - खाजगी मुंबई, पगार-४५,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID8853: चि. अमोल गणपती कुंभार. जन्म-२८/५/९१, उंची-५.९, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.एस्सी.+ एम.बी.ए., नोकरी- खाजगी, अपेक्षा-अनुरुप.

बी. कॉम, एम. कॉम.

ID11751: चि. विश्वजित दिलीप कुंभार. जन्म-२६/१०/९८, जन्मवेळ व ठिकाण-सायं. ६.५२ उंब्रज, उंची-५:५, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.कॉम., नोकरी-सरकारी, पगार-४८,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11609: चि. वैभव राजाभाऊ पाटणकर. जन्म- २५/७/९४, जन्मवेळ व ठिकाण- ६.१५ आंबेजोगाई, उंची-५:७, वर्ण-गोरा, शिक्षण-एम.कॉम., नोकरी-खाजगी नवी मुंबई, पगार-३२,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID11462: चि. सौरभ सुरेश घाटोळे. जन्म- २२/१/८४, जन्मवेळ व ठिकाण- पहाटे २.४५ नागपुर, उंची-५:६, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.कॉम., नोकरी-खाजगी,पगार-२०,०००/-, अपेक्षा अनुरुप.

ID: चि. गोविंद हरी सोनवणे. जन्म-१८/१२/९७, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७.३० जामखेड, उंची- १६५से.मी.,वर्ण-गोरा, शिक्षण-बी. कॉम, स्व:ताचे सुविधा केंद्र, उत्पन्न - २५ ते ३० हजार, अपेक्षा- अनुरुप.

ID11331: चि. संकेत दिपक राजे . जन्म-३०/५/९७, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे १.१० सातारा, उंची- ६:२, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.कॉम, नोकरी - खाजगी, पगार -४०,०००/-, अपेक्षा- अनुरुप.

बी.ए., एम.ए., बी.एड., एम.एड.

ID11707: चि. पवन निवास कुंभार. जन्म- १६/११/९६, जन्मवेळ व ठिकाण- रात्री ११.१५ पाटण, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.ए.+आय.टी.आय. इलेक्ट्रिक + डिप्लोमा, नोकरी - खाजगी चाकण, पगार - २५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11356: चि. माधव दत्तात्रय पाटणकर. जन्म- २/८/९७, जन्मवेळ व ठिकाण- सकाळी ६.४५ सातारा, उंची-५:११, वर्ण-निमगोरा, शिक्षण-एम.ए., स्व:ताचे व्यवसाय, उत्पन्न - ५८,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID: चि. परमेश्वर वसंतराव लोणीकर. जन्म- २६/१/९५, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७.४० चापोली, उंची-५:६, वर्ण-गोरा, शिक्षण-एस.वाय.बी.ए., स्व:ताचे कापडाचे दुकान, अपेक्षा-अनुरुप.

ID11330: चि. निखिलेश राजेंद्र लिंबकर. जन्म-२५/५/९४, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी ३.५० नाशिक, उंची-५:९, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.ए., नोकरी - खाजगी नाशिक, पगार - २५,०००/-, अपेक्षा- अनुरुप.

डिप्लोमा

ID11090: चि. विकास भिमराव रुद्रमणी. जन्म-२/८/२०००, जन्मवेळ -पहाटे ५ भालकी, उंची-५.८, वर्ण-गोरा, शिक्षण-इलेट्रॉनिक, स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न - ८०,०००/-, अपेक्षा- अनुरुप.

ID11780: चि. तेजस रामकृष्ण चिलके. जन्म- १९/६/९६, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी १.३० औंध पुणे, उंची-५:२, वर्ण- गोरा, शिक्षण-टॅक्सेशन लॉ.,स्व:तचा व्यवसाय, उत्पन्न-१,००,०००/, अपेक्षा-अनुरुप.

ID11656: चि. निखिल सिताराम शिरसे. जन्म- ४/२/८६, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ४.३५ मुंबई, उंची-५:६, वर्ण- गोरा, शिक्षण-मेकॅ. + आय.टी.आय., नोकरी-खाजगी रांजणगांव, पगार-४०,०००/, अपेक्षा-अनुरुप.

ID11635: चि. लोकेश शरद सोनावणे. जन्म- ६/३/९५, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.३५ नाशिक, उंची-५:८, वर्ण- गोरा, शिक्षण-फायर ॲन्ड सेफ्टी + इंडस्ट्रियल सेफ्टी, नोकरी-खाजगी पुणे, पगार-४३,०००/, अपेक्षा-अनुरुप.

ID11471: चि. अमित चंद्रकांत कुंभार. जन्म- ३०/४/९६, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.२०कोल्हापुर, उंची-५:५, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेक., नोकरी-खाजगी पुणे, पगार-३७,५००/, अपेक्षा-अनुरुप.

ID11464: चि. आशिष अविनाश कुंभार. जन्म- ४/३/९६, जन्मवेळ व ठिकाण- दुपारी ३.५५ ठाणे, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण - डिप्लोमा मेक., नोकरी-खाजगी नवी मुंबई, पगार-३०,०००/, अपेक्षा-अनुरुप.

ID11436: चि. चेतन काशिनाथ शिंदे. जन्म-१४/९/९७, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी ४ साखरखेर्डा, उंची-५:५, वर्ण-गोरा, शिक्षण-डी.सी.इ. + पी.जी.डी.बी., नोकरी - आय.सी.आय.सी.आय. बँक, पगार - ४५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11320: चि. आदित्य राजेंद्र खोपे. जन्म-१०/३/९८, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी १२.२६ पुणे, उंची-५:३, वर्ण-निमगोरा, शिक्षण-कॉम्प्युटर, नोकरी-खाजगी पुणे, पगार-१५,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11276: चि. अमीत सुरेश शिर्के. जन्म-१५/१२/९५, उंची-५:१०, वर्ण-निमगोरा, शिक्षण-कॉम्प्युटर, नोकरी - खाजगी बंगलोर, पगार - ३७,८००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11258: चि. अनिकेत नंदकुमार कुंभार. जन्म-१३/२/९५, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ८.४५ सातारा, उंची-६:२, वर्ण-गोरा, शिक्षण-प्रोजेक्ट मॅनेजर, नोकरी-खाजगी पुणे, पगार- २२,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11211: चि. सुशांत विजय कुंभार. जन्म-१७/५/९५, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.०१ मुंबई, उंची-५:८, वर्ण-गोरा, शिक्षण-टेक्सटाईल केमिस्ट्री, नोकरी - खाजगी पुणे, पगार - ३०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11162: चि. चेतन राजु नावकर. जन्म-२६/१/९६, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ८.४५ गुंज खुर्द, उंची-५:११, वर्ण-गोरा, शिक्षण-पेट्रो केमिकल, नोकरी - खाजगी, अपेक्षा-अनुरुप.

ID11141: चि. आकाश दत्तात्रय घांगरे. जन्म-१०/११/९४, जन्मवेळ व ठिकाण - पहाटे ६ पुसद, उंची-५.२, वर्ण-गोरा, शिक्षण-मेकॅ., नोकरी-खाजगी पुणे, पगार - २०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

आय.टी.आय.

ID11305: चि. सागर परशुराम कुंभार. जन्म-१६/९/९२, जन्मवेळ व ठिकाण - ४.३० तुडील महाड, उंची-५.६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-आय.टी.आय., नोकरी-कुवेत, पगार - ५०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11102: चि. संतोष शंकर कुंभार. जन्म-२१/१/९२, जन्मवेळ व ठिकाण-संध्या ६.३० बेळगांव, उंची-५.६, वर्ण-निमगोरा, शिक्षण-मेकॅ.,स्वत:चा व्यवसाय. उत्पन्न - ५०,०००/-

१०वी/१२वी

ID11338: चि. रोहित कैलास भोसले. जन्म-८/७/८९,जन्मवेळ व ठिकाण - पहाटे १.०५ लोणावळा, उंची-५.७, वर्ण-गोरा, शिक्षण -१२वी + मर्चंट मरिन, नोकरी - खाजगी, पगार - २७,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

घटस्फोटित/विधुर

विधुर किंवा घटस्फोटीत असल्यास कागदपत्रांची झेरॉक्स कुंभश्रीच्या मेलवर पाठवणे अत्यंत आवश्यक आहे याची नोंद घ्यावी.

ID11066: शेखर शिरीष कुंभार. (घट.) जन्म-१३/१०/८४, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ७.३२ तासगांव, उंची-५:५, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.ए+एम.बी.ए., नोकरी-बँकेत मुंबई, पगार - २ लाख अपेक्षा - अनुरुप.

ID11818: ओंकार महादेव कुंभार. (घट.) जन्म-१३/७/९०, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.२६ मंडणगड, उंची-५:१०, वर्ण-

निमगोरा, शिक्षण–बी.ई.मेक + आय.टी. कोर्स, नोकरी–खाजगी पुणे, पगार वार्षिक – १७ लाख, अपेक्षा – समंजस, सुशिक्षित.

ID11051: रामदास अंबादास कुंभार. (लिंगायत) (विधुर) जन्म–४/१/७४, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ५.१०नांदुरघाट, उंची–५:५, वर्ण–निमगोरा, शिक्षण–बी.एस्सी.+बी.एड., नोकरी–शिक्षक बीड, पगार – १,२५,०००/–, अपेक्षा–अनुरुप. (जबाबदारी एक मुलगा आहे, एम.आय.टी. पुणे येथे शिक्षण चालू आहे.)

ID11149: श्रीकांत गजानन कुसुंबीकर. (घट) जन्म–४/१०/८७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ६.५० कल्याण, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–इंजि., नोकरी– खाजगी, पगार – ५५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11733: ज्ञानेश्वर लक्ष्मण वाघ. (घट) जन्म–२०/५/९०, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ६.३० धुळे, उंची–५:१०, वर्ण–गोरा, शिक्षण–डी.एड.+एम.ए.+ बी.एड., नोकरी– खाजगी, पगार – २५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11722: अक्षय आनंदराव कुंभार. (घट) जन्म–१०/६/९४, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १०.२८कोल्हापुर, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम, नोकरी– खाजगी कोल्हापुर, पगार – २५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11695: अशोक शामराव बिदरकर. (घट) जन्म–४/५/९२, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ६ मनमाड, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण–इंजि. मेक, नोकरी– खाजगी, पगार – ५६,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11662: श्री. निलेश गणपत कुंभार (घट.) जन्म– २४/४/८९, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ९.१५ बदलापुर, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण – एम.कॉम.,नोकरी – खाजगी ठाणे, पगार – ३०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11597: श्री. अजिंक्य अरुण देगांवकर (घट.) जन्म– १/१२/९१, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ५.४९ सातारा, उंची–५:११, वर्ण–गोरा, शिक्षण –एम.बी.ए.+बी.टेक मेकॅ, एम.कॉम.,नोकरी – खाजगी मुंबई, पगार – १,७०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11443: श्री. संकेत बाळासाहेब कुंभार (घट.) जन्म– १५/२/९६, जन्मवेळ व ठिकाण– सकाळी ९.२० पुणे, उंची–५:८, वर्ण–गोरा, शिक्षण – बी.कॉम., स्वत:चा व्यवसाय, उप्तन्न – २०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11407: श्री. राहुल जनार्दन राजे. (घट.) जन्म– १९/५/८८, जन्मवेळ व ठिकाण– २०.२५ कराड, उंची–५:१०, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.बी.ए.+यु.जी.सी. नेट,नोकरी–स्टेट बँक, पगार – १ लाख ५०हजार, अपेक्षा–अनुरुप.

ID11198: श्री. चैतन्य तुकाराम कुंभार. (घट.) जन्म–९/६/८०, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी ११.५५ बारामती, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण–इंडस्ट्रियल इलेक्ट्रॉनिक्स, स्वत:चा व्यवसाय, उत्पन्न – २०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11197: श्री. अविनाश धोंडिबा कुंभार (घट.) जन्म–१४/८/८५, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी ५.०१ जेजुरी, उंची–६ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए., स्वत:चा व्यवसाय, अपेक्षा–अनुरुप.

ID11176: श्री. संदीप एकनाथराव निमगांवकर (घट.) जन्म–१०/६/९१, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण–मेकॅ., नोकरी – खाजगी पुणे, पगार – ९१,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11128: श्री. स्वप्नील भरत तांगडे. (घट.) जन्म–२/५/८४, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एस्सी. सेकंड इअर, नोकरी – सरकारी औरंगाबाद, पगार – ३०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

Our Inspiration
Late Onkar S. Mangalkar



Prop. : Avinash O. Mangalkar

ROMSAM ENGINEERS

TEXTILE M/C MANUFACTURING &
CONSULTING ENGINEERS
(WEAVING PREPARATORY)

WORKS :
GALA NO. 11, KAMAT INDUSTRIALCOMPLEX,
NR. HOTEL SAI PALACE, PHILIPS-TELCO ROAD,
BHOSARI PUNE 411026

Ishan Sanskriti, Building No. 3, RH -13, Near Chaitanya Nagari,
Warje, Pune 411 058 ● MOBILE : 09823114804
● E-MAIL - romsam@bsnl.in



ALHAD TANDALE

SUNSHINE PAINTS & ALLIED CHEMICALS COMPANY

OFF. & FACT.:
W/90/A, M.I.D.C. Ambad, Nashik 422010
Allhad S. Tandale B.Sc., B.Sc.(Tech)
Mobile : 9225112961
Office : (0253) 2382991, 2380879 Resi. : (0253) 2581627

Range of Our Product

* Epoxy & Polyurethane Paints * Stoving & NC Paints
* Synthetic & Acrylic Distempers * Plastic Emulsion Paints
* 100% Acrylic & Semi-Acrylic Paints
* All Kinds of Primers, Enamels & Thinners

वर पाहिजे

डॉक्टर

ID11787: डॉ. वैष्णवी पांडुरंग पंजरकर. जन्म–७/७/२०००, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.५०उकली मेहकर, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एच.एम.एस. शिकत आहे, अपेक्षा–अनुरुप.

ID11661: डॉ. अंकिता राजेंद्र कुंभार. जन्म–२६/४/२००१, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १.१५ आकुर्ले, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए.एम.एस. शिकत आहे, अपेक्षा–अनुरुप.

ID11684: डॉ. ऋतुजा तुकाराम कानगुले. जन्म–१६/११/९९, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १२.०५ नवी मुंबई, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.डी.एस., स्वत:चे क्लिनिक एरोली, अपेक्षा–डॉक्टर, इंजि, सी.ए.

ID11607: डॉ. मोनिका रंगनाथ जाधव. जन्म–२५/६/९६, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १.२० केडगाव, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एच.एम.एस., नोकरी–खाजगी, पगार – २०,०००/–, अपेक्षा – डॉक्टर, इंजि.

ID11389: कु. एश्वर्या राममुर्ती काळकर. जन्म–८/४/९५, जन्मवेळ व ठिकाण–७.४५ अमरावती, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए.एम.एस., नोकरी–खाजगी अमरावती, पगार – ३४,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11349: डॉ. कुंतल सुरेशराव वाघ. (लिंगायत). जन्म–१७/२/९३, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १२.५५ अचलपुर, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.डी.एस., स्वत:चे क्लिनिक, उप्तन्न–७०,०००/–, अपेक्षा–डॉक्टर, इंजि, सी.ए.

ID11288: मयुरी प्रल्हाद रावरकर. जन्म–११/५/९८, उंची–५:१, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एच.एम.एस. शेवटचे वर्ष शिकत आहे, अपेक्षा–अनुरुप.

ID4241: डॉ. मैथिली प्रमोद भोगावकर. जन्म–२९/१०/८६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.३० मुंबई, उंची–५:३, वर्ण–गव्हाळ, शिक्षण–बी.डी.एस., स्वत:चे क्लिनिक बदलापुर, उप्तन्न–७०,०००/–, अपेक्षा–डॉक्टर, इंजि, सी.ए.

बी. फार्मसी, डी. फार्मसी.

ID10225: कु. तन्वी दिलीप कुंभार. जन्म–१७/३/९६, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २.३५ पुणे, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण – एम.फामसी., नोकरी–खाजगी, पगार–५०,०००/– अपेक्षा–अनुरुप.

ID11773: कु. प्रितछाया गणेश कुंभार. जन्म–३/७/९३, जन्मवेळ व ठिकाण– ७.१० निलंगा, उंची–५:१, वर्ण–गोरा, शिक्षण – बी.फार्मसी., नोकरी–खाजगी, पगार–२०,०००/– अपेक्षा–अनुरुप.

ID11754: कु. निकिता दत्तात्रय कुंभार. जन्म–१७/५/२००२, जन्मवेळ व ठिकाण– पहाटे ४.४५ पाटस, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण – बी.फार्मसी.+एम.बी.ए. करत आहे, नोकरी–खाजगी, पगार–१७,०००/– अपेक्षा–अनुरुप.

ID11726: स्वाती शंकर कुंभार. जन्म–२६/२/९९, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ९.३१ उंब्रज, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.फार्म, नोकरी – खाजगी सातारा, पगार – २०,०००/–. अपेक्षा–अनुरुप.

ID11602: कु. अमृता सुभाष कुंभार. जन्म–२१/१/९८, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.फार्म. अपेक्षा–अनुरुप.

ID11570: कु. श्रद्धा गजानन लिंगे. (लिंगायत) जन्म–२/६/९९, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.०७नांदेड, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.फार्म. नोकरी – खाजगी पुणे, पगार – ७०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID10777: कु. प्राची राजीवकुमार राजे. जन्म–३/७/९८, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.४०हडपसर, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.फार्म., नोकरी – खाजगी, अपेक्षा–अनुरुप.

ID11366: कु. ऋतुजा गिरीश कुंभार. जन्म–१७/४/२०००, जन्मवेळ व ठिकाण–१३.०५ फलटण, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.फार्म करत आहे. अपेक्षा–अनुरुप.

नर्सिंग

ID11623: कु. तेजस्वी कैलास तुळे. जन्म–६/५/९९, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १०.२५ मुंबई, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–नर्सिंग, नोकरी–खाजगी मुंबई, पगार–२०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

बी. ई. सर्व प्रकार

ID11805: कु. माहेश्वरी मनोहर कोरे. जन्म–३/७/९५, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी, पगार–६५,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11819: कु. आरुषी प्रमोद सावलदेकर. जन्म–२३/९/९९, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४ खामगांव, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–इ ॲन्ड टी.सी., नोकरी–खाजगी, पगार–३५ हजार, अपेक्षा – अनुरुप.

ID8272: कु. प्रज्ञा गोपाळ डेंगळे. जन्म–३०/१/९१, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १०.४५बारामती, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस. ऑस्ट्रेलिया, नोकरी–खाजगी सिडनी, पगार–१,५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11792: कु. साक्षी बाळकृष्ण खेडेकर. जन्म–३/९/२००२, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ५ पिंपरी, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–इ ॲन्ड टी.सी., नोकरी–खाजगी, पगार–२५ हजार, अपेक्षा – अनुरुप.

ID11794: कु. शैला बाळासाहेब वाईकर. जन्म–११/५/९५, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ३ कळंब, उंची–५फुट, वर्ण–निमगोरा,

शिक्षण–आय.टी., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11741: कु. शितल गोरख कुंभार. जन्म–२८/११/९८, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८ चिंचवड, उंची–५:२, वर्ण–गोरा,शिक्षण–आय.टी., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ७०,०००/–,अपेक्षा – अनुरुप.

ID111774: कु. गुंजन प्रभाकर कुंभार. जन्म–३१/३/२०००, जन्मवेळ –१०.३०, उंची–५:४, वर्ण–निमगोरा, शिक्षण–आय.टी., अपेक्षा – अनुरुप.

ID11769: कु. पुजा सखाराम कुंभार. जन्म–१७/८/९६, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ३.२० औंध पुणे, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी पुणे, अपेक्षा – अनुरुप.

ID11759: कु. निकिता पोपटराव गोरे. जन्म–३/६/२०००, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी, पगार – ३६,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11737: कु. वृषाली संजय रसाळ. जन्म–७/१२/९१, जन्मवेळ व ठिकाण–२३.३६ नाशिक, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु, अपेक्षा – अनुरुप.

ID10712: कु. श्रद्धा अरुण सोनावणे. जन्म–१५/२/९६, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १२.२०नाशिक, उंची–५:३, वर्ण–निमगोरा, शिक्षण–इ.ॲन्ड टी.सी., नोकरी–खाजगी पुणे, अपेक्षा – अनुरुप.

ID: कु. मानसी विलास डेंगळे. जन्म–१०/१०/९८, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.१४ पुणे, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.टेक., नोकरी – खाजगी पुणे, अपेक्षा–अनुरुप.

ID10996: कु. निकिता विठ्ठल कुंभार. जन्म–२६/५/९४, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे १.१५कोल्हापुर, उंची–५:४, वर्ण–निमगोरा, शिक्षण–फुड इंजिनिअर, नोकरी–खाजगी पुणे, पगार–२५,०००/–, अपेक्षा – अनुरु

ID10976: कु. अर्पणा हिंदुराव कुंभार. जन्म–१/११/२०००, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.३० टाकारी, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.टेक.कॉम्प्यु., अपेक्षा – अनुरुप.

ID10960: कु. योगिता गोरख कुंभार. जन्म–३१/१०/९८, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ५.०५ फलटण, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी–खाजगी पुणे, पगार–३५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11677: कु. अमृता भरतराव साळवी. जन्म–१२/५/२००१, जन्मवेळ व ठिकाण–२२.३० कोल्हापुर, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–इलेक्ट्रॉनिक, नोकरी – खाजगी पुणे, पगार – ४९,५००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11655: कु. सायली संजय कुंभार. जन्म–१६/६/९७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ६ सातारा, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु, नोकरी–खाजगी बंगलोर, पगार–६ लाख, अपेक्षा – अनुरुप.

ID11642: कु. काजल संजय जगताप. जन्म–२/३/२०००, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे १ कडूस, उंची–४:१०, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यू, नोकरी–खाजगी पुणे, पगार–३२,५०२/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11637: कु. स्वराली राजेंद्र कुंभार. जन्म–२५/७/९९, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी ४.५८ सांगली, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.टेक. इ ॲन्ड टी.सी., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ४०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11596: कु. समृद्धी जर्नादन कुंभार. जन्म–२२/१०/९९, जन्मवेळ व ठिकाण – पहाटे ६.१५ मुंबई, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.टेक. मेकॅ, नोकरी–खाजगी तामिळनाडू, पगार – ४०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11606: कु. प्राजक्ता बालाजी कानगुले. जन्म–२६/१/९९, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी ८.१० लोहा, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.टेक. आयटी, नोकरी–खाजगी पुणे, पगार – ४०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11591: कु. गौरी सुभाष कुंभार. जन्म–३/९/९८, जन्मवेळ व ठिकाण – १२.२० नातेपुते, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ४५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11587: कु. प्रणाली सुभाष कुंभार. जन्म–३/४/९७, जन्मवेळ व ठिकाण – संध्या ८.०१ तासगांव, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.टेक. आय.टी., नोकरी–खाजगी पुणे, पगार – १,९५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11575: कु. हर्षदा शशिकांत कुंभार. जन्म–३/१०/९७, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी ११.३० सावंतवाडी, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्यु., नोकरी–खाजगी पुणे, अपेक्षा – अनुरुप.

ID11578: कु. मेघा दत्तात्रय कुंभार. जन्म–७/४/९५, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १०.३० दौंड, उंची–५:१, वर्ण–गोरा, शिक्षण–इ.ॲन्ड टी.सी., नोकरी–खाजगी पुणे, पगार–१,२२,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID9286: कु. प्रिती गोरखनाथ कुंभार. जन्म–२७/७/९६, जन्मवेळ व ठिकाण– सं. ७.१५ पुणे, उंची–५:१, वर्ण–गव्हाळ, शिक्षण–प्रोडक्शन, नोकरी–खाजगी पुणे, पगार – ८.५ लाख, अपेक्षा – अनुरुप.

ID11523: कु. हर्षदा दयानंद कुंभार. जन्म–२४/१२/९१, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–मेकॅ.+डिप्लोमा, नोकरी–खाजगी, अपेक्षा – अनुरुप.

ID10390: कु. ऋतुजा सुनिल मंगळकर. जन्म–१९/३/९८, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ७.४५ नाशिक, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल, नोकरी–खाजगी, पगार–४५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11512: कु. प्रतिभा धनाजी कुंभार. जन्म-२०/११/९७, जन्मवेळ व ठिकाण-२३.३० सातारा, उंची-५:३, वर्ण-गोरा, शिक्षण-इ.ॲन्ड टी.सी., नोकरी-खाजगी, पगार-३५,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID10777: कु. कोमल जगन्नाथ कुंभार. जन्म-१९/९/९५, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ८.२० इचलकरंजी, उंची-५:१, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी, अपेक्षा - अनुरुप.

ID11421: कु. पल्लवी राजाभाऊ कुंभार. (लिंगायत) जन्म-१/११/९७, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण-इ ॲन्ड टी.सी., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ४०,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID11415: कु. सायली शरद सोनावणे. जन्म-२४/२/९९, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ६.१० सातपुर, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ५८,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID10724: कु. श्रद्धा कारभारी कुंभार. जन्म-१८/८/९६, जन्मवेळ व ठिकाण - संध्या ८.२५ अ.नगर, उंची-५ फुट, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., अपेक्षा - अनुरुप.

ID11414: कु. स्मिता कुमार कुंभार. जन्म-७/१२/९७, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ८.२५ कोल्हापुर, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.टेक. (फुड टेक्नॉलॉजी), नोकरी-खाजगी, पगार - ४५,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID10465: कु. रेणुका राजाराम कुंभार. जन्म-१०/११/९५, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे १.५५ पुणे, उंची-४:११, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., अपेक्षा - अनुरुप.

ID11384: कु. श्रद्धा सुनिल राजे. जन्म-४/१०/९७, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ९.१० सातारा, उंची-५:२, वर्ण-गोरा, शिक्षण-इ.ॲन्ड टी.सी., नोकरी - खाजगी, अपेक्षा - अनुरुप.

ID11376: कु. अश्विनी अनिल काकडे. जन्म-१५/७/९२, जन्मवेळ व ठिकाण-४.३० नांदेड, उंची-५ फुट, वर्ण-गोरा, शिक्षण-बी.ई., नोकरी-खाजगी पुणे, पगार - ५५,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID11360: कु. वृषाली शंकरराव कुंभार. (लिंगायत). जन्म-२४/७/९१, उंची-५:१, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु., नोकरी - खाजगी पुणे, पगार - १,००,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID11354: कु. सोनल संतोष काळे. जन्म-१३/४/९८, उंची-५ फुट, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्यु.+डिप्लोमा, नोकरी - खाजगी पुणे, पगार - २३,५००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID11341: कु. सायली संजय कुंभार. जन्म-४/१०/९५, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ८.३५पुणे, उंची-५:३, वर्ण-गोरा, शिक्षण-मेक., नोकरी-खाजगी पुणे, पगार - १,००,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID6109: कु. स्वाती संतराम मुलगे. जन्म-५/१२/८९, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ५.२० परभणी, उंची-५:३, वर्ण-गोरा, शिक्षण-इलेक्ट्रॉनिक, नोकरी-खाजगी पुणे, पगार-१,२०,०००/-, अपेक्षा - अनुरुप.

ID11318: कु. ज्योती बाबुराव कानगुलकर. जन्म-२५/१०/९८, उंची-५:३, वर्ण-गोरा, शिक्षण-सिव्हिल, अपेक्षा-अनुरुप.

ID11302: कु. विशाखा देविदास वाकचौरे. जन्म-३१/८/९९, जन्मवेळ व ठिकाण-१८.४५ नाशिक, उंची-५:४, वर्ण-गोरा, शिक्षण- सिव्हिल, अपेक्षा-अनुरुप.

ID11296: कु. पुजा जगन्नाथ कुंभार. जन्म-१/२/९६, जन्मवेळ व ठिकाण-दुपारी १ नेवारे, उंची-५:२, वर्ण- गोरा, शिक्षण-सिव्हिल, नोकरी - खाजगी पुणे, अपेक्षा-अनुरुप.

ID11306: कु. ऋतुजा नरेंद्र डेंगळे. जन्म-१४/१०/९९, जन्मवेळ व ठिकाण - पहाटे ४.२० बारामती, उंची-५:२, वर्ण-निम गोरा, शिक्षण- सिव्हिल+एम.पी.एस.सी. परिक्षा देत आहे, अपेक्षा-अनुरुप.

ID9489: कु. पायल गुणाजी शिंदे. जन्म-२५/८/९४, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ११.१५ जालना, उंची-५:३, वर्ण-गोरा, शिक्षण-इ ॲन्ड टी.सी., नोकरी-खाजगी, पगार-८३,०००/- अपेक्षा-अनुरुप.

ID11257: कु. मेघा गहिनीनाथ कुंभार . जन्म-२३/९/९४, जन्मवेळ व ठिकाण-१०.२५ करमाळा, उंची-५:३, वर्ण-गोरा, शिक्षण-कॉम्प्युटर, अपेक्षा-अनुरुप.

ID10397: कु. चांदनी ज्ञानेश्वर झोजे. जन्म-१/१२/९४, जन्मवेळ व ठिकाण-सकाळी ११.५५ खंदक, उंची-५:२, वर्ण-निम गोरा, शिक्षण- कॉम्प्युटर, नोकरी-खाजगी पुणे, पगार-५०,०००/-, अपेक्षा-अनुरुप.

ID11240: कु. मोहिनी राजेश शिंदे. जन्म-१८/२/९८, जन्मवेळ व ठिकाण - सकाळी ९.४० पुणे, उंची-५ फुट, वर्ण- गोरा, शिक्षण-इ ॲन्ड टी.सी., अपेक्षा-अनुरुप.

ID11225: कु. प्रिती माधव जाधव. जन्म-४/९/९९, उंची-५:४, वर्ण-निमगोरा, शिक्षण-सिव्हिल, अपेक्षा - अनुरुप.

ID11200: कु. योगिता जगदीश शिरसाळे. जन्म-२७/९/९८,जन्मवेळ व ठिकाण-दुपारी १.४८भुसावळ, उंची-५:६,वर्ण-गोरा, शिक्षण-बी.टेक, नोकरी-खाजगी, पगार-१ लाख, अपेक्षा-अनुरुप.

ID11174: कु. ऋतुजा चंद्रकांत कुंभार. जन्म-३०/१०/९८, जन्मवेळ व ठिकाण - दुपारी १२.५१थेरगांव पुणे, उंची-५ फुट, वर्ण-गोरा, शिक्षण- बी.टेक, नोकरी-खाजगी पुणे, अपेक्षा-अनुरुप.

ID11148: कु. प्रगती मधुकर कुंभार. जन्म-२४/५/९९, जन्मवेळ व ठिकाण-पहाटे ४.२० कुंभारगाव, उंची-५:१, वर्ण-निमगोरा, शिक्षण-बी.टेक., नोकरी - खाजगी मुंबई,पगार - ४,७०,०००/-,

अपेक्षा – अनुरुप.

ID9090: कु. प्रणाली यशवंत चव्हाण. जन्म–२३/११/९५, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी २.१० धुळे, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–सिव्हिल अपेक्षा–अनुरुप.

ID10438: कु. पुजा शिवाजी शिंदे. जन्म–२२/६/९८, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे १.१३ संगमनेर, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण– इ. अँड टी.सी., नोकरी–खाजगी पुणे, पगार वार्षिक – ४ लाख, अपेक्षा–अनुरुप.

ID: कु. पुजा तानाजी कुंभार. जन्म–१२/४/९७, जन्मवेळ व ठिकाण – संध्या ७.१५ अहमदपुर, उंची–५:५, वर्ण–गव्हाळ, शिक्षण–इ. ॲन्ड टी.सी., नोकरी – प्राध्यापक पुणे, अपेक्षा–अनुरुप.

ID7750: कु. नयना नारायण कुंभार. जन्म–१३/९/९२, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–इलेक्ट्रॉनिक, नोकरी – सरकारी रेव्ह्युन्यु डिपार्टमेंट, पगार–३१,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID10012: कु. प्रियांका अशोक कुंभार. जन्म–२१/४/९५, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ई. + एम.बी.ए., नोकरी – खाजगी हरियाणा, पगार – ७,९२,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11108: कु. श्वेता गुरुदास कुंभार. जन्म–१४/८/९०, जन्मवेळ व ठिकाण – सकाळी १०.२५ कोल्हापुर, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.टेक + पी.एच.डी. करत आहे केमिकल इंजि., आय.आय.टी. गुहाटी, अपेक्षा–अनुरुप.

एम.बी.ए.

ID11839: कु. साक्षी भैरु कुंभार. जन्म–२७/१२/९९, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ३ निपाणी, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण– बी.कॉम + एम.बी.ए., नोकरी–खाजगी, पगार – १५,०००/–,अपेक्षा – अनुरुप.

ID11796: कु. सुरभी सुधीर कुंभार. जन्म–१०/११/९७, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे १.५०अंबरनाथ, उंची–५फुट, वर्ण–गोरा, शिक्षण– एच.आर.एम. इंदोर, नोकरी–खाजगी, अपेक्षा – अनुरुप.

ID11765: कु. दिशा अजय शिर्के. जन्म–१२/१२/९९, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ११.१३ कोल्हापुर, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.फार्म + एम.बी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–४४,४२७/–, अपेक्षा – अनुरुप.

ID10591: कु. क्षितीजा रविंद्र बीडकर. जन्म–१६/३/९९, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ५.०५ कोल्हापुर, उंची–५:१, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम+एम.बी.ए., अपेक्षा – अनुरुप.

ID11689: कु. मयुरी रमेश पारिसकर. जन्म–२५/८/९८, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १२.१५ भोपाळ, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.सी.एस.+एम.बी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–४ लाख, अपेक्षा – अनुरुप.

ID10148: कु. श्वेता रमेश कुंभार. जन्म–२०/२/९४, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.सी.एस.+एम.बी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11344: कु. देविका नंदकुमार राजे. जन्म–१८/५/९६, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ३.४०पुणे, उंची–५:१, वर्ण–गव्हाळ, शिक्षण–बी.कॉम+एम.बी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार – ४.५ लाख, अपेक्षा–अनुरुप.

ID9245: कु. गौरी शशिकांत कुंभार. जन्म–२०/९/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.२४ विटा, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.फार्म+ एम.बी.ए. (फार्मा), नोकरी–खाजगी मुंबई, पगार–३३,०००/–, अपेक्षा – डॉक्टर, इंजि, एम.फार्म, सरकारी अधिकारी.

ID11134: कु. कावेरी राजेंद्र कारभारी. जन्म–२८/३/९६, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम + एम.बी.ए.+डिप्लोमा लेबर लॉ., नोकरी–खाजगी, पगार – २२,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

बी.सी.ए., एम.सी.ए., बी.बी.ए. बी.सी.एस., एम.सी.एस.

ID10085: कु. राजश्री विष्णु कुंभार. जन्म–४/३/८९, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ११.१५ बेळगांव, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, पगार–३५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11808: कु. विद्या मारुती कुंभार. जन्म–१६/४/८९, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ६.४५ सांगली, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.ए., अपेक्षा–अनुरुप.

ID11459: कु. सोनल प्रकाश सोमवंशी. जन्म–२६/७/९५, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ५.५४ पुणे, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.एस., नोकरी–खाजगी पुणे, अपेक्षा–अनुरुप.

ID11072: कु. विशाखा दत्तात्रय कुंभार. जन्म–११/४/९९, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ८ नाशिक, उंची–४:११, वर्ण–गोरा, शिक्षण–कॉम्प्युटर, नोकरी–खाजगी पुणे, पगार–५५,०००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11139: कु. ज्योती संजय नावकर. जन्म–१८/९/२००२, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २ चाकण, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.एस., अपेक्षा–अनुरुप.

ID11254: कु. भाग्यश्री राजेंद्र तारळकर. जन्म–२८/४/९५, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४.५० कोल्हापुर, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.सी.ए., नोकरी–खाजगी पुणे, अपेक्षा–अनुरुप.

आर्किटेक्ट, इंटिरिअल डिझाननिंग

ID11103: कु. चित्रिका अनिल सोनावणे. जन्म–३१/५/९७, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण– आर्किटेक्ट, नोकरी – खाजगी मुंबई, अपेक्षा– अनुरुप.

ID11398: कु. श्रद्धा स्वीशंकर माजगांवकर. जन्म–१०/११/९८, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १.५१ कोल्हापुर, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.आर्च, अपेक्षा– अनुरुप

ID11273: कु. शितल रघुनाथ कुंभार. जन्म–११/१२/९३, जन्मवेळ व ठिकाण–मध्यरात्री १.०५ सांगली, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.बी.आय.+एम.कॉम.+बी.ॲन्ड एफ+एम.आर्ट, नोकरी – खाजगी मुंबई, पगार – २५,०००/–, अपेक्षा– अनुरुप

ID11256: कु. अंकिता सतीश कुंभार. जन्म–१२/७/९७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.५० सातारा, उंची–५:३, वर्ण–निमगोरा, शिक्षण–इंटिरिअल डिझायनिंग, नोकरी – खाजगी पुणे, पगार – १८,०००/–, अपेक्षा– अनुरुप

ID10005: कु. सोनाली विजय कुंभार. जन्म–५/१०/९६, जन्मवेळ व ठिकाण–संध्या. ५.०५ विटा, उंची–५:१, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.आर्च + एम.एस्सी प्रोजेक्ट मॅनेजमेंट इन लंडन, नोकरी – चेन्नई, अपेक्षा – अनुरुप.

बी.एच.एस्सी./एल.एल.बी. व इतर

ID11456: कु. प्रियंका दादासाहेब वाघमारे. जन्म–२९/१०/९९, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १०.३८ पुणे, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए+ एल.एल.बी. अंतीम वर्ष, अपेक्षा – अनुरुप.

ID11377: कु. अंजली अरुण सोनुने. (लिंगायत) जन्म–१९/१०/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ७.१५ कोली, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए.+एल.एल.बी.+एल.एल.एम, स्व:ताची प्रॅक्टिस, अपेक्षा – अनुरुप.

D11278: कु. मृणाल रमेश जगदाळे. जन्म –७/२/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.४५ त्रिंबकेश्वर, उंची–४:११, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए.+डिप्लोमा इन सायबर लॉ, नोकरी–खाजगी मुंबई, पगार – १५,०००/–, अपेक्षा– अनु

फाईन आर्ट व इतर कोर्स

ID11815: कु. काजल बाळासाहेब वालीवकर. (लिंगायत) जन्म–१२/८/९७, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ६.१५अमरावती, उंची–५:१, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एस्सी. होम सायन्स, अपेक्षा–अनुरुप.

D11814: कु. अमरजा सुनील कातवरे. जन्म –३१/७/९६, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ११.२० कोल्हापुर, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–कथ्थक नृत्य विशारद, अपेक्षा – अनुरुप.

ID11660: कु. श्रद्धा चंद्रकांत साळवी. जन्म–१८/७/९९, जन्मवेळ व ठिकाण–संध्या. ७.४० गुहागर, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–फाईन आर्ट + पी.एच.डी. डिझायनिंग, नोकरी – खाजगी पुणे, पगार – ४५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

बी.एस्सी, एम.एस्सी.

D11776: कु. मृण्मयी सचिन बाहिकर. जन्म – १९/१/९८, जन्मवेळ व ठिकाण–संध्या ५.४५ अकोला, उंची–५:१, वर्ण–गोरा, शिक्षण–एम. एस्सी. इलेक्ट्रॉनिक सायन्स, नोकरी–खाजगी पुणे, पगार – ५८,५००/–, अपेक्षा– अनुरुप.

ID11558: कु. तन्वी समर पाटसकर. जन्म–२/११/९८, जन्मवेळ व ठिकाण–१५.३५ पुणे, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस्सी., नोकरी–खाजगी डब्लिन, पगार–१,६२,०००/, अपेक्षा–अनुरुप.

ID11671: कु. ऋतुजा सुधाकर शिंदे. जन्म–१४/९/९९, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १२.५२ पुणे, उंची–५ फुट, वर्ण–निमगोरा, शिक्षण–एम.एस्सी., नोकरी–खाजगी, पगार–१०,०००/, अपेक्षा–अनुरुप.

ID11658: कु. पुनम हनुमंत कुंभार. जन्म–११/९/२०००, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ११.४० मुंबई, उंची–५:६, वर्ण–निमगोरा, शिक्षण–बी.एस्सी., नोकरी–खाजगी कर्जत, पगार–१६,०००/, अपेक्षा – अनुरुप.

ID11604: कु. सायली प्रकाश कुंभार. जन्म–१०/५/२००२, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १ सातारा, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एस्सी., अपेक्षा– अनुरुप

ID11557: कु. सायली सुधाकर लोणकर. जन्म–४/७/९९, जन्मवेळ व ठिकाण–संध्या. ८ जालना, उंची–५:५, वर्ण–निमगोरा, शिक्षण–एम.एस्सी., अपेक्षा – अनुरुप.

ID11532: कु. श्वेता महादेव साळवी. जन्म–१९/१/९९, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी १२.२५ वडगांव, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एस्सी., नोकरी–खाजगी, पगार–९,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11413: कु. जागृती विलास कुंभार. जन्म–२/४/९७, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस्सी., अपेक्षा–अनुरुप.

ID11478: कु. निकिता राजु डोखे. जन्म–२६/१०/९७, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १.२५लोणी, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस्सी+बी.एड.+सायबर सिक्युरीटी, नोकरी – खाजगी पुणे, पगार – ७२,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11385: कु. योगिता संजय भागवत. जन्म–२/४/२०००, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १२ नाशिक, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एस्सी+स्पोर्टस् ॲकेडमी + ब्युटिशियन + फॅशन डिझाईन, अपेक्षा–अनुरुप.

ID11333: कु. दिपाली विनोद कुंभार. जन्म–१८/५/२००१, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ५.१५ जळगांव, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस्सी. कॉम्प्यु., अपेक्षा–अनुरुप.

ID11303: कु. वैशाली माधव कारनाळे. जन्म–८/११/९६, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४ उजान, उंची–५:१, वर्ण– गोरा, शिक्षण–एम.एस्सी. ॲग्री., नोकरी – सरकारी, पगार – ५०,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID8920: कु. प्रतिक्षा गणेश सोनुने. जन्म–१२/५/९९, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ७.२८ भुसावळ, उंची–५:२, वर्ण–गव्हाळ, शिक्षण–एम.एस्सी., अपेक्षा – अनुरुप.

ID11268: कु. पुजा चंद्रकांत कुंभार. जन्म–१९/९/९७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.३० धवलेश्वर, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस्सी., नोकरी–खाजगी नवी मुंबई, पगार–२८,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11262: कु. मयुरी शरद चित्ते. जन्म–३/८/२०००, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ५.४० मालेगांव, उंची–५:३, वर्ण– गोरा, शिक्षण–बी.एस्सी., नोकरी – खाजगी नाशिक, पगार – ३३,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11217: कु. अमृता सुनिल श्रीमंदिलकर. जन्म–३०/६/९७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ७.३४ रुई छत्रपती, उंची–५:३, वर्ण– गोरा, शिक्षण–बी.एस्सी., अपेक्षा – अनुरुप.

ID11168: कु. ऐश्वर्या अशोक कुंभार. जन्म–६/११/९८, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ६.३० कोरेगाव, उंची–४:११, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.एस्सी.+डिप्लोमा ॲग्री., अपेक्षा – अनुरुप.

ID11127: कु. मिनल वासुदेव कापडे. जन्म–५/५/९८, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे २.३० भुसावळ, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस्सी., नोकरी–खाजगी पुणे, पगार–१७,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

ID11126: कु. प्राजक्ता संपत कुंभार. जन्म–३/७/९६, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ५.३० सातारा, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.एस्सी, वर्ण – गोरा, नोकरी–खाजगी सांगली, पगार–१५,०००/–, अपेक्षा – अनुरुप.

एम. कॉम., बी. कॉम.

ID11747: कु. श्रृती वसंत बोरसे. जन्म–२८/१/२००१, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.३५ जळगांव, उंची–५:५, वर्ण–गव्हाळ, शिक्षण–बी.कॉम, नोकरी–खाजगी मुंबई, पगार–२४,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11426: कु. श्रृती रघुनाथ कुंभार. जन्म–२५/७/२०००, जन्मवेळ व ठिकाण–२३.४५फैजापुर, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम, नोकरी–खाजगी नाशिक, पगार–१५,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11556: कु. प्रिती गणपत बांबरकर. जन्म–७/१०/९२, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १.५३ मुंबई, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम, अपेक्षा–अनुरुप.

ID11526: कु. शिवानी भिकाजी बोरुडे. जन्म–२३/१०/९८, जन्मवेळ व ठिकाण–रात्री ९.२५ दादर, उंची–५:२, वर्ण–निमगोरा, शिक्षण–बी.कॉम., अपेक्षा – अनुरुप.

ID11514: कु. ऐश्वर्या प्रकाश कुंभार. जन्म–७/४/९७, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ९.१५कोल्हापुर, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.कॉम., अपेक्षा – अनुरुप.

ID11437: कु. आरती यशवंत पाषाणकर. जन्म–११/१२/९६, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १०.०८ पुणे, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.कॉम. + डी.टी.एल., अपेक्षा–अनुरुप.

ID11440: कु. ऋतुजा लक्ष्मण कुंभार. जन्म–५/११/९८, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १२.५५ गोडोली सातारा, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.कॉम, नोकरी–खाजगी पुणे, पगार–२१,५००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11279: कु. शामल राजेंद्र रासकर. जन्म–११/९/९५, जन्मवेळ व ठिकाण–१३.१० सातारा, उंची–५:७, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम, अपेक्षा–अनुरुप.

ID11271: कु. कोमल रामकृष्ण काळे. जन्म–२९/१/२०००, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ५ शेवगांव, उंची–४:८, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.कॉम, नोकरी–खाजगी शेवगांव, पगार–९,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

बी.ए., एम.ए. बी.एड. डी.एड व इतर

ID11055: कु. पुजा सोनाबापू देशमुख. जन्म–३०/८/९९, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ६ सोनाई, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए.+शासकीय परिक्षेची तयारी चालू आहे, अपेक्षा – अनुरुप.

ID10471: कु. स्नेहल राजन कुंभार. जन्म–४/८/९७, जन्मवेळ व ठिकाण–५.०५ यमगर्णी, उंची–५:६, वर्ण–गोरा, शिक्षण– एम.ए. + यु.पी.एस्स.सी. तयारी चालू आहे., अपेक्षा–अनुरुप.

ID11226: कु. शुभांगी बाळु बोरसे. जन्म–२०/१२/२०००, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे ४.१६ न्याहालोड धुळे, उंची–५:४, वर्ण–गोरा, शिक्षण–एम.ए., अपेक्षा–अनुरुप.

ID9197: कु. प्रियांका अशोक कुंभार. जन्म–७/८/९३, जन्मवेळ व ठिकाण–पहाटे १.२० सातारा, उंची–५:२, वर्ण–निमगोरा, शिक्षण–एम.ए.+डी.एड.+पीएचडी करीतआहे, नोकरी–खाजगी सातारा, पगार – १८,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

डिप्लोमा

ID11729: कु. पुजा अशोक कुंभार. जन्म–१९/११/२००२, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी १२.५० कोडोली, उंची–५ फुट, वर्ण–गोरा, शिक्षण–डी.एम.एल.टी.,अपेक्षा – अनुरुप.

ID11355: कु. प्रगती बापू प्रजापति. जन्म–८/६/९५, उंची–५:५, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.कॉम. + पोस्ट ग्रॅज्युएट डिप्लोमा बॅकिंग

ॲड फायनान्स, नोकरी–खाजगी, पगार–३२,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

ID11364: कु. विनया भीमराव कुंभार. जन्म–१८/२/९७, जन्मवेळ व ठिकाण–दुपारी ३.२५ इंदापुर, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–ॲडव्हास स्कीन केअर ॲड मेकअप आर्टिस्ट,अपेक्षा – अनुरुप.

घटस्फोटित/पुनर्विवाहित

ID10393: स्नेहा दिगंबर सडोलीकर. (घट.) जन्म–१४/१०/८६, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ई. कॉम्प्यु., नोकरी – खाजगी पुणे, पगार – १,२०,०००/– अपेक्षा–अनुरुप.

ID11361: अनुजा उद्धवराव विभुते. (घट.) जन्म–२/९/९९, जन्मवेळ व ठिकाण–सकाळी ८.१० माजलगांव, उंची–५:३, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.व्ही.ए+एम.बी.ए., अपेक्षा–अनुरुप.

ID10581: जान्हवी मिलींद हिवरकर. (घट.) जन्म–३/९/९८, जन्मवेळ व ठिकाण–रात्री १०.३५ नाशिक, उंची–५:१, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ए.+डी.एड., अपेक्षा–अनुरुप.

ID10430: कु. दिपिका दत्तात्रय सोमवंशी. (घट.) जन्म–३१/१०/८९, जन्मवेळ व ठिकाण–१७.३० नाशिक, उंची–५:२, वर्ण–गोरा, शिक्षण–बी.ई.+एम.ई. कॉम्प्यु., नोकरी – खाजगी पुणे, पगार – ४०,०००/–, अपेक्षा–अनुरुप.

***



श्री. हनुमंत भिकु कुंभार
मा.चेअरमन - खादी ग्रामोद्योग
मुळशी ता.जि. पुणे
मो. 9822394711

विट कारखानदार
राज ट्रान्सपोर्ट
राजेंद्र ट्रान्सपोर्ट

आमच्याकडे सर्व साईजच्या उत्तम प्रतिच्या विटा होलसेल भावात मिळतील

मु.पो. पिरंगुट, ता. मुळशी, जि. पुणे



श्री. राजेंद्र हनुमंत कुंभार
मा.चेअरमन - खादी ग्रामोद्योग
मुळशी ता.जि. पुणे
मो. 9049917111



चि. आरुष राहुल कुंभार



RAJESH PRAJAPAT
(Managing Director)
Mob: 9822768944

PRAJAPATI FOUNDRY PVT.LTD.

Manufactuers of Ferrous, C.I., Casting etc. Daily Heat



*** PRESS TOOLS * DIE CASTING * MACHIN TOOL CASTING**
*** AUTOMOBILES * PARTS CASTING**

F-II Block, Plot No. 14, Telco Material Gate Road, MIDC,
Pimpri, Pune - 411 018. Ph: 020-30694041 / 42 / 43 / 44 / 45.

E-mail : rajeshprajapati@rediffmail.com ■ prajapatifdrypl@redffmail.com



गणराज हार्डवेअर

डिलर
उदय एच.डी.पी.ई.पाईप



श्री. हेमराज बोराराम प्रजापति **श्री. गोपाल हेमराज प्रजापति**

फिनोलेक्स पाईप, पी. व्ही. सी. पाईप फिटींग, जी. आय. पाईप फिटींग, रस्सी, ताडपत्रीचे व सर्व प्रकारचे मोटर होलसेल आणि रिटेल विक्रेते.

उत्तम प्रकारच्या सर्व साईजच्या विटा होलसेल भावात मिळतील.

श्री छत्रपती शिवाजी मार्केट, गाळा नं. ४३, सासवड, पुणे. मो. ९०११४९२९४३.

।।श्री।।

सिद्धी आर्टस्



* गणपती मुर्ती * आर्टीकल्स
* लक्ष्मी मुर्ती * गौरी मुखवटे



दत्तवाडी, उरुळी कांचन, पुणे ४१२ २०२

रोहन (भैय्या) कुंभार
Mo. 9011321000/9156321000

भावपूर्ण श्रद्धांजली

खालील सर्व व्यक्ति व समाजातील ज्ञात व अज्ञात व्यक्तींना अखिल कुंभार समाज व कुंभश्री मित्र परिवारातर्फे भावपूर्ण श्रद्धांजली. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरशांती व सद्‌गती देवो हीच परमेश्वर व संत गोरोबाकाकांचे चरणी विनम्र प्रार्थना.

उद्योगरत्न देवराव कापडे अनंतात विलीन



अकोला : सांगवी पुणे येथे सुप्रसिध्द चिमणी वीटभट्टी उद्योजक उद्योगरत्न देवराव कापडे यांचे दि. ५/१/२४ रोजी जावई नागेश बावस्कर यांचे निवासस्थानी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने दु:खद निधन झाले.

देवराव कापडे यांच्या अंत्यदर्शना –साठी कुंभश्री संपादक संजय राजे, कुंभार समाज विकास संस्थेचे प्रदेश कार्याध्यक्ष संतोषशेठ पाषाणकर, दिनकर लाहुडकर, विनोद खानजोडे, ओंकार आंबुलकर, जावई नागेश बावस्कर, मुलगी सौ. कल्पना बावस्कर, पत्नी, नातू, नात तसेच गजानन महाराज संस्थान सांगवी या संस्थेचे सर्व विश्वस्त पदाधिकारी उपस्थित होते.

देवराव कापडे यांचे पार्थिवावर अकोला येथे दि. ६ रोजी हजारो शोकाकूल लोकांच्या उपस्थितीत अंत्यसंस्कार मुलगा किशोर कापडे यांनी केले. देवराव कापडे यांनी पत्नी कमलाबाई यांच्या समर्थ साथीने दोन मुले आणि एक मुलीला चांगले शिक्षण आणि संस्कार दिले. कै. देवराव यांच्या पश्चात पत्नी कमलाबाई, मुलगा किशोर, मुलगी सौ. कल्पना नागेश बावस्कर, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवारआहे.

***

समाजभुषण निवृत्त आदर्श शिक्षक नानासाहेब शिर्के यांचे निधन



शिक्रापुर : जनसेवा बँकेचे संचालक सूर्यकांत शिर्के आणि उद्योजक नंदकुमार शिर्के यांचे पिताश्री समाजभूषण आदर्श शिक्षक नानासाहेब श्रीपती शिर्के गुरुजी यांचे वयाच्या ९६ व्या वर्षी वृद्धापकाळाने दि. २४/१२/२३ रोजी दु:खद निधन झाले.

कै. नानासाहेब यांच्या पश्चात दोन मुले, मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

प्रतापराव शिंदे यांचे निधन



पुणे : पुणे जिल्हा कुंभार समाजोन्नती मंडळाचे वरिष्ठ उपाध्यक्ष ह.भ.प. प्रतापराव शंकरराव शिंदे यांचे दि. १९/१२/२३ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. कै. प्रतापराव यांच्या पश्चात पत्नी कल्पना, मुलगा ॲड. केदार, मुलगी प्रज्ञा गणेश पांगारकर, सुन, जावई,नातवंडे असा परिवार आहे.

***

उद्योजक मोतीलाल भागवत यांचे निधन



पुणे : सुप्रसिध्द उद्योजक आणि ज्येष्ठ समाजसेवक लायन मोतीलाल नानासाहेब भागवत उर्फ अप्पासाहेब यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी दि. २१/१२/२३ रोजी वृद्धाप–काळाने दु:खद निधन झाले. पुण्यातील सुप्रसिद्ध भागवत गॅरेजचे ते संस्थापक संचालक होते, शिवाजीनगर आणि सदाशिव पेठ या ठिकाणी गॅरेजच्या दोन शाखा कार्यरत आहेत. धायरी येथे आधुनिक यांत्रिक पद्धतीने वीट निर्मितीचा कारखाना त्यांनी अनेक वर्षे चालविला. पुणे लायन्स क्लबचे ते अध्यक्ष होते. त्यांच्या पत्नी सुद्धा लायन क्लबच्या माध्यमातून समाज कार्य करत होत्या. कै. मोतीलाल यांच्या पश्चात पत्नी, मुले राजेश, मनोज, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

***

आर्किटेक्ट योगेश वाजेकर यांना पितृशोक



पनवेल : येथील सुप्रसिद्ध आर्किटेक्ट योगेश वाजेकर यांचे वडील पांडुरंग किसन वाजेकर यांचे वयाच्या ७२ व्या वर्षी दि. २७/१२/२३ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. कै. पांडुरंग वाजेकर यांच्या सामाजिक बांधिकीचा वारसा त्यांचे चिरंजीव आर्किटेक्ट योगशे यांनी चालवला, योगेश यांनी पनवेल कुंभारवाडयामध्ये संत शिरोमणी गोरोबा काकांचे सुंदर मंदिर स्वखर्चाने बांधले ही गोष्ट खुप अभिमानास्पद आहे. पांडुरंग वाजेकर यांनी भारतीय नौदलात नोकरी केली. पत्नी सुशीला यांच्या समर्थ साथीने दोन मुले आणि एक मुलगी यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. कै. पांडुरंग वाजेकर यांच्या पश्चात पत्नी सुशीला, मुले योगेश व अमित, मुलगी सौ. हर्षल सागर चोणकर, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

***

शांताबाई वाघ यांचे निधन



धुळे : कुंभार समाजाचे सामाजिक कार्यकर्ते नारायण झावरु वाघ, नाशिक तसेच आदर्श शिक्षक लक्ष्मण झावरु वाघ धुळे यांच्या मातोश्री शांताबाई झावरु वाघ यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी निहालोद धुळे येथे दि. ३/१/२४ रोजी दु:खद निधन झाले.

***

कुंभश्री प्रतिनिधी सौ. अनिता बोर्डे यांना मातृशोक



जुन्नर : पिंपरी चिंचवड कुंभश्री प्रतिनिधी सौ. अनिताताई सुभाषराव बोर्डे यांच्या मातोश्री जमुनाबाई दत्तात्रय जाधव यांचे वयाच्या ८९ व्या वर्षी वृद्धापकाळाने दि. ३/१/२४ रोजी दु:खद निधन झाले.

कै. जमुनाबाई यांच्या पश्चात मुलगा बाळासाहेब, मुली सौ. लक्ष्मीबाई लक्ष्मण वाव्हळ, श्रीमती नंदा एकनाथ उकिर्डे, सौ. संगिता राजेंद्र लोणकर, सौ. अनिता सुभाष बोर्डे, सुन, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

नंदिराम चौरे यांचे निधन



नाशिक : सातपूर येथील वीट कारखानदार नंदिराम आबाजी चौरे यांचे दि. ७/१/२४ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. मितभाषी वर प्रेमळ स्वभावामुळे त्यांचे नातेसंबंधी व मित्रपरिवार मोठा होता. कै. नंदिराम यांच्या पश्चात पत्नी लीलाबाई, मुले खंडू, धनाजी, अशोक, दिलीप मुलगी श्रीमती सुनंदा अशोक जोर्वेकर, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

ज्येष्ठ पत्रकार महादेव कुंभार यांना पितृशोक



लातुर : औसा तालुक्यातील आलमला येथील ज्येष्ठ नागरिक केराप्पा भैरु कुंभार वय १०९ यांचे दि.९/१/२४ रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात चार मुले, तीन मुली, पाच सुना, नातवंडे, पतवंडे, खापरपतवंडे असा मोठा परिवार आहे.

दैनिक देशान्नतीचे लातूर आवृत्तीप्रमुख तथा लातुर जिल्हा पत्रकार संघाचे उपाध्यक्ष महादेव कुंभार यांचे तसेच औसा तालुका खादी ग्रामोद्योग संघाचे सभापती शिवाजी कुंभार यांचे ते वडील तर आलमला गावच्या माजी सरपंच सौ. सुनंदाताई शिवाजी कुंभार यांचे ते सासरे होते.

***

कुंडलिक शिंदे यांचे निधन



पुणे : नेहरुनगर येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते कुंडलिक बाबुराव शिंदे यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८७ व्या वर्षी दि. १५/१/२४ रोजी दु:खद निधन झाले. त्यांनी टेलिग्राम खात्यात नोकरी केली केली, निवृत्ती नंतर कुंभार समाजाच्या सुख दु:खाच्या सर्व कार्यक्रमांस ते आणि त्यांचे मेहुणे कुंभश्री वधूवर मंडळाचे माजी अध्यक्ष गंगाधर जाधव आवर्जून उपस्थित असत. कुंडलिक शिंदे यांनी अनेक लग्ने जमवली त्यामुळे त्यांचा जनसंपर्क चांगला होता.

त्यांच्या पश्चात पत्नी लिलावती, मुले सुधीर, उमेश, मुली सौ. सुनंदा पांडुरंग कुंभार, सौ. शैलजा दत्तात्रय कुंभार, सौ. अरुणा सुरेश कुंभार, भाऊ शांताराम, पुतणे संदीप, सुना, जावई, भावजय, पुतणे, पुतण्या, एकवीस भाचरंडे, अकरा नातवंडे आणि दहा पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

डेटा बेसच्या राजेंद्र कुंभार यांना पितृशोक



बारामती : येथील डेटा बेस कॉम्प्युटर संस्थेचे संचालक राजेंद्र कुंभार सर यांचे वडील दगडू तुकाराम कुंभार यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी वृद्धापकाळाने दि. ८/१/२४ रोजी दु:खद निधन झाले.

कै. दगडू कुंभार यांच्या पश्चात पत्नी मथुरा, मुले राजेंद्र, धनेश, मुलगी सौ. संगीता चंद्रकांत कुंभार (गुणवडी), उच्चशिक्षित नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

माजी सरपंच आकाराम शिर्के यांचे निधन



कोल्हापूर : वाठार तर्फ वडगांवचे माजी सरपंच आकाराम सीताराम शिर्के उर्फ बापू यांचे दिनांक ११/०२/२०२४ रोजी वयाच्या ९३ व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. विशेष म्हणजे त्यांनी त्यांच्या परिवाराला निधनाच्या दिवसाचा संकेत दिला होता. कुंभार सोसायटीचे ते संस्थापक संचालक होते. गावातील अनेक संस्था उभारणी मध्ये त्यांचा मोलाचा वाटा होता. आकाराम शिर्के यांच्या निधनामुळे फार मोठी पोकळी निर्माण झाली असून शिर्के आणि कुंभार परिवाराची खुप मोठी हानी झाली असून दु:खाचा डोंगर कोसळला आहे या दु:खातून सावरण्याची शक्ती परमश्वर त्यांना देवो.

कै. आकाराम शिर्के यांच्या पश्चात मुले सूर्यकांत, शशिकांत, जयराम तसेच मुली श्रीमती सुलोचना संभाजी कुंभार (मनपाडळे), सौ. मीना कृष्णात कुंभार (वाठार तर्फ वडगांव) सुना, जावई, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

वरिष्ठ अभियंता दीपक कुंभार यांचे निधन



पुणे : पिंपरी चिंचवड महापालिकेचे वरिष्ठ अभियंता दीपक महादेव कुंभार (स्थापत्य विभाग) यांचे दिनांक ३०/११/२०२३ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. मृत्यू समयी त्यांचे वय ५४ वर्षे होते. दीपकराव यांचे मूळ गाव कवठे एकंद, तालुका तासगाव, जिल्हा सांगली हे होते. अत्यंत मृदू भाषी आणि प्रेमळ स्वभावामुळे ते शिस्त प्रिय अधिकारी

म्हणून प्रसिद्ध होते.

कै. दीपक यांच्या पश्चात पत्नी श्रीमती चारूलता (एम. कॉम.) मुलगा सोहम (इयत्ता १२ वी), आई सौ. कमल, वडील महादेव कुंभार, भाऊ प्रमोद असा परिवार आहे. डॉ.सी.जी. कुंभार यांचे ते जावई होते.

***

श्री. शीतलकुमार यांना पितृशोक



शिराळा : पिंपरी चिंचवड येथील सामाजिक कार्यकर्ते जिल्हा भाजपा कार्यकारिणी सदस्य शीतल कुंभार यांचे वडील लक्ष्मणराव धोंडीराम कुंभार यांचे वृद्धापकाळाने वयाच्या ८५ व्या वर्षी दि. १९/१/२४ रोजी दु:खद निधन झाले. शासकीय तंत्रनिकेतन, नांदेड येथे त्यांनी शिक्षक पदी कार्य केले, विद्यार्थीप्रिय शिक्षक म्हणून ते सुपरिचित होते. त्यांच्या पत्नी कै. शालिनीताई कुंभार या शिवसेनेच्या नांदेड जिल्हा प्रमुख होत्या. त्यांच्या पश्चात मुलगा शीतल, सुनील, सुना, नातवंडे असा परिवार आहे.

***

श्रीमती शांताबाई लाड अनंतात विलीन



येवला : श्रीमती शांताबाई भाऊलाल लाड रा. येवला जि. नाशिक यांचे वृद्धापकाळाने दि. २३/१/२४ रोजी दु:खद निधन झाले. त्या ८८ वर्षाच्या होत्या. कुंभार समाजातील एक मनमिळाऊ व्यक्तिमत्वाला समाज पारखा झाला त्यांचे जाण्याने त्याची मुले अशोकराव, रमेशराव आणि प्रकाश लाड, मुली सौ. लता किशोर हिवरकर, सौ. मंगल महाले आणि सौ. पुष्पा निंबाजी पारीसकर मातृप्रेमाला मुकली आहे. त्यांचे मागे सुना, जावई, नातवंडे आणि पतवंडे असा मोठा आप्तपरिवार आहे.

***

लीलाधर पुं. शिरसाठ यांचे अपघाती निधन



पुणे : जळगांव आव्हाणा येथील लीलाधर पुंडलिक शिरसाठ या तरुण तडफदार मुलाचे दिनांक १८/२/२०२४ रोजी पुणे येथे वयाच्या अवघ्या २७ व्या वर्षी अपघाती निधन झाले. सुशिक्षित असलेल्या लीलाधरचे दीड वर्षांपूर्वी लग्न झाले होते आणि नुकतेच उभयतांना अपत्य झाले होते, त्यामुळे समाजात खुप हळहळ व्यक्त होत आहे. लीलाधर याचे वडील खुप धार्मिक वृत्तीचे असून आव्हाणे येथील देवस्थानचे सर्वेसर्वा आहेत. सुप्रसिद्ध चिमणी भट्टी उद्योजक धनलाल शिरसाठ यांचा तो पुतण्या होता, तर कुंभार समाज विकास संस्थेचे जळगांव जिल्हा अध्यक्ष पद्माकर शिरसाठ यांचा भाऊ होता.

कै. लीलाधर यांच्या पश्चात पत्नी, एक अपत्य, आई, वडील पुंडलिकराव, भाऊ राहुल, बहीण, मेहुणे, चुलते धनलाल, वासुदेव, चुलत भाऊ, बहिणी असा मोठा परिवार आहे.

***

उद्धव कुंभार यांना मातृशोक



सातारा : मायणी येथील श्रीमती लक्ष्मी सोपान कुंभार यांचे दि.९.३.२०२४ रोजी अल्पशा आजाराने दु:खद निधन झाले. कै. लक्ष्मी कुंभार यांच्या पश्चात त्यांचा मुलगा उद्धव सोपान कुंभार व तीन मुली छाया, साधना व आशा, जावई, सून सुजाता, नातू ओंकार व दोन नाती माधुरी व मयुरी, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे

***

पत्रकार धोंडिबा कुंभार यांना मातृशोक



मुळशी : लवळे येथील आदर्श माता ताराबाई विष्णू कुंभार वय ९० वर्षे यांचे दिनांक २३/१/२४ रोजी वृद्धापकाळाने निधन झाले. त्यांच्या पश्चात दोन मुलगे, दोन मुली, सूना, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे. पत्रकार संघ मुळशीचे संस्थापक अध्यक्ष, पुणे दैनिक सकाळचे पत्रकार व पुणे जिल्हा शिक्षण मंडळ या संस्थेतील सेवानिवृत्त शिक्षक धोंडीबा कुंभार तसेच मामासाहेब मोहोळ शिक्षण संस्थेतील म्हाळुंगे बालेवाडी येथील माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक विठ्ठल कुंभार यांच्या त्या मातोश्री होत. मुळशी तालुका विविध कार्यकारी सहकारी ग्रामोद्योग संघाचे माजी अध्यक्ष दत्तात्रय कुंभार यांच्या त्या चुलती होत.

***

पुष्पा मालखेडे यांचे निधन



नाशिक : सौ. पुष्पा भागवत मालखेडे यांचे अल्पशा आजाराने दिनांक १२/१/२४ रोजी दु:खद निधन झाले. सौ. पुष्पा यांनी पती भागवतराव यांच्या समर्थ साथीने मुलगा विशाल व मुलगी पूनम यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. यांच्या पश्चात पती भागवतराव, मुलगा विशाल, मुलगी सौ. पूनम शैलेश उकिर्डे, सून, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

***

नागनाथ कुंभार यांना मातृशोक



उस्मानाबाद : उमरगा येथील रहिवासी अखिल भारतीय प्रजापती कुंभकार महासंघांचे राष्ट्रीय उपाध्यक्ष, उद्योजक नागनाथ कुंभार यांच्या मातोश्री बसव्वाबाई रेवणप्पा कुंभार यांचे वयाच्या १०६ व्या वर्षी वृद्धापकाळाने दिनांक ३१/१/२०२४ रोजी दु:खद निधन झाले.

पती रेवणप्पा यांच्या समर्थ साथीने त्यांनी

सहा मुले आणि आठ मुली यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. कै. बसव्वाबाई यांच्या पश्चात सहा मुले व आठ मुली, सुना, जावई, नातवंडे, पतवंडे, खापरतुंडे असा मोठा परिवार आहे.

***

अनिलशेठ कुंभार गहुंजेकर यांना पितृशोक



पुणे : भोसरी येथील उद्योजक अनिलशेठ कुंभार यांचे वडील मुरलीधर धोंडिबा कुंभार यांचे वयाच्या ७७ व्या वर्षी वृद्धापकाळाने दिनांक ११/२/२०२४ रोजी दुःखद निधन झाले.

मुरलीधर कुंभार हे खडकी येथील एच ई फॅक्टरी मध्ये कार्यरत होते. पत्नी कौसल्या यांच्या साथीने ते वीट व्यवसाय व वाळू व्यवसाय छोट्या प्रमाणात करायचे. जुन्या काळी नदी मध्ये डुबकी मारून घमेल्याने वाळू काढली जायची, असे खुप कष्टाचे काम उभयंता करायचे. उभायंतानी दोन मुलगे व एका मुलीस चांगले शिक्षण व संस्कार दिले.

कै. मुरलीधर कुंभार यांच्या पश्चात पत्नी कौसल्या, दोन मुलगे उद्योजक अनिलशेठ, सुनिलशेठ, मुलगी सौ. अनिता बाळासाहेब कोते, सुना, जावई उद्योजक बाळासाहेब कोते (विश्वस्त – कुंभार समाज धर्मशाळा व गोरोबाकाका मंदिर ट्रस्ट आळंदी), भाऊ पांडुरंग, सुरेश, भावजया, बहिणी बायडाबाई काळे, नंदाबाई दरेकर, मेहुणे, भाचे, भाच्या, पुतणे, पुतण्या, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

कुंभार समाज धर्मशाळेचे विश्वस्त सुधीर समजिसकर यांना मातृशोक



मुंबई : आळंदी कुंभार समाज धर्मशाळा व गोरोबाकाका मंदिर ट्रस्टचा पाया रचणारे व वारकरी संप्रदायातील तात्यासाहेब बाबासाहेब वासकर महाराज (आबा) यांचे अनुयायी वै. ह.भ.प. श्री. सोनूशेठ काशीराम समजिसकर यांच्या पत्नी श्रीमती आशाबाई सोनू समजिसकर (आई) यांचे वृद्धापकाळाने दि. ३१/१/२०२४ रोजी वैकुंठ गमन झाले. त्यांच्या पश्च्यात मुले मधुसूदन, अशोक, सुधीर, मुली सौ. कल्पना, सौ. चारू, सुना सौ. आरती मधुसूदन, तन्वी अशोक, शिवानी सुधीर, नातवंडे समीर, स्मिता, राशी, आकाश, लोहितक्ष असा मोठा परिवार आहे.

***

श्रीमती लिलावती शिंदे यांचे निधन



चिंचवड : जेष्ठ समाजसेवक कै. कुंडलिक शिंदे यांच्या निधनानंतर थोड्याच कालावधीत त्यांच्या पत्नी श्रीमती लिलावती शिंदे यांचे दिनांक ६/४/२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कै. लिलावती यांच्या पश्चात मुले सुधीर, उमेश, तीन मुली, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

विश्वंभर शिर्के यांचे निधन



दौंड : येथील सुप्रसिद्ध उद्योजक व समाजसेवक विश्वंभर रखमाजी शिर्के यांचे बुधवार दि. २४/०४/२०२४ रोजी रात्री ११.२५ वाजता वृध्दापकाळाने दुःखद निधन झाले. कै. विश्वंभर यांच्या पश्चात मुले संजय, विजय, राजेंद्र, सतीश, मुलगी सौ. अनुराधा जयदीप क्षीरसागर, सुना, जावई, उच्च शिक्षित नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

भामाबाई व नानासो कुंभार या पती पत्नीचे निधन





शिरूर : पिंपळसुटी येथील सौ. भामाबाई नानासाहेब कुंभार यांचे वयाच्या ८७ व्या वर्षी वृद्धापकाळाने दिनांक २२/४/२०२४ रोजी दुःखद निधन झाले. तद्नंतर दोनच दिवसांनी त्यांचे पती नानासाहेब उर्फ आण्णा शिवराम कुंभार यांचे वयाच्या ९५ व्या वर्षी दिनांक २४/४/२०२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. पती पत्नीचं सलग निधन झाल्याने परिसरात हळ हळ व्यक्त झाली. बबन, संजय, सतीश, मुली श्रीमती शालन शांताराम आगलावे, सौ. द्वाराका पोपटराव काळे, सुना, जावई, पुतणे, पुतण्या, नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

आदर्श शिक्षक राजाराम कुंभार यांचे निधन



सांगली : इस्लामपूर गावचे सुपुत्र आदर्श माध्यमिक शिक्षक राजाराम शंकर कुंभार यांचे वयाच्या ७९ व्या वर्षी वृद्धापकाळाने दिनांक १२/४/२०२४ रोजी दुःखद निधन झाले. नोकरीच्या सुरवातीची वीस वर्षे बारामती तालुक्यातील वडगांव निंबाळकर या गावी काढली. नंतरची तेरा वर्षे लट्ठे एज्युकेशन सोसायटीच्या सांगली हायस्कुल, सांगली येथे नोकरी केली. त्यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी उच्चपदावर कार्यरत आहेत, एक आदर्शशिक्षक म्हणून परिचित होते. कै. राजाराम यांनी पत्नी विजया यांच्या साथीने तीन मुलींना चांगले शिक्षण व संस्कार दिले.

कै. राजाराम यांच्या पश्चात पत्नी विजया, मुली सौ. माया रमेश कुंभार (रेठरे हरनाक्ष), सौ. मनीषा महेश शेटकर (गोवा), सौ. चित्रा विजय कार्वेकर (बारामती), जावई नातवंडे असा परिवार आहे.

***

प्रांत सुरेशराव बगळे यांना पितृ शोक



अकोला : नागपूर येथे सध्या कार्यरत असलेले प्रांत अधिकारी सुरेशराव बगळे यांचे वडील रामसिंग फकीरचंद बगळे यांचे वयाच्या ९८ व्या वर्षी दिनांक ३०/६/२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. त्यांनी पत्नी कै. राधाबाई यांच्या साथीने चार मुले आणि चार मुली यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. कै. रामसिंग यांच्या पश्चात मुले अशोकराव, प्रकाशराव, विजयराव, प्रांत अधिकारी सुरेशराव, मुली वच्छलाबाई गोपाळ गुजरे, रा.अकोला. कमलाबाई मोतीलाल गुजरे, रा.अमरावती. विमलाबाई नारायण लोलुरे रा.वाशीम. ललीताबाई राजेंद्र गुजरे रा. रिसोड. सुना, जावई, उच्चशिक्षित नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

उद्योजक नितीन भागवत यांना पितृशोक



पुणे : भोसरी येथील नोबेल कास्ट कॉम्प प्राय. लि. कंपनीचे मॅनेजिंग डायरेक्टर उद्योजक नितीनजी भागवत यांचे वडील ठकसेन महादेव भागवत यांचे दिनांक २०/६/२०२४ रोजी वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. ठकसेन भागवत हे औंध आय टी आय मध्ये शिक्षक होते त्यांनी घडवलेले अनेक विद्यार्थी उद्योग व्यवसायात यशस्वी झाले. एक आदर्श शिक्षक म्हणून ते प्रसिद्ध होते. सुमारे तीस वर्षांपूर्वी त्यांना पक्षाघाताचा झटका आला होता त्यातून सावरून ते सतत चतुश्रृंगी वर चालायला जात असत हे त्यांचे वैशिष्ट्य कौतुकास्पद होते. पत्नी विमल यांच्या समर्थ साथीने त्यांनी दोन मुले व एक मुलगी यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. त्यांचा मुलगा नितीन यशस्वी उद्योजक आहेत तर दुसरा मुलगा मनोज इंजिनियर असून अमेरिकेत स्थायिक झाले आहेत. मुलगी सौ. नीलम बबन कुंभार या पुणे महापालिकेतून निवृत्त झाल्यानंतर वयाच्या ६२ व्या वर्षी काही महिन्यापूर्वी त्यांचे निधन झाले.

कै. ठकसेन भागवत यांच्या पश्चात मुले नितीन, मनोज (अमेरिका), सून, जावई, उच्च शिक्षित नातवंडे, भाऊ गजाननराव, बाळासाहेब, भावजया पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे.

***

शिल्पकार गणेश व महेश कुंभार यांना मातृशोक



उरळी : उरळी येथील सुप्रसिद्ध शिल्पकार गणेश वसंत कुंभार यांच्या मातोश्री श्रीमती कलावती यांचे दिनांक २९/६/२४ रोजी वयाच्या ७२ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कलावती यांनी पती वसंत कुंभार यांच्या समर्थ साथीने दोन मुली व दोन मुलांना चांगले शिक्षण आणि संस्कार दिले आणि एक आदर्श मातेचे सर्व कर्तव्य पार पाडले.

कै. कलावती यांच्या पश्चात मुले शिल्पकार गणेश, मूर्तिकार महेश, मुली सौ. आशा अरविंद कुंभार (माहूर), सौ. उषा किसन कुंभार (गुळुंचे), सुना, जावई, उच्च शिक्षित नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

उद्योजक नितीन भागवत यांना भगिनी शोक



पुणे : उद्योजक नितीन भागवत यांच्या भगिनी सौ. नीलम बबनराव कुंभार यांचे दिनांक २७/४/२०२४ रोजी दीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. सौ. नीलम या पुणे महानगर पालिकेतून निवृत्त झाल्या होत्या.

***

सुखदेव शिंदे यांना मातृशोक



जुन्नर : निवृत्त वजन मापे निरीक्षक अधिकारी सुखदेव शिंदे यांच्या आई श्रीमती कलावती बाबुराव शिंदे यांचे वयाच्या ८८ व्या वर्षी वृद्धापकाळाने दिनांक १२/५/२०२४ रोजी दुःखद निधन झाले.

कलावती यांनी पती बाबुराव यांच्या साथीने दोन मुले आणि तीन मुलींना चांगले शिक्षण व संस्कार दिले. कै. कलावती यांच्या पश्चात मुलगा सुखदेव, मुली सौ. चंद्रभागा बबन जाधव, श्रीमती अलका पंढरीनाथ कुंभार, सौ. रुक्मिणी लक्ष्मण उकिर्डे, सुना, जावई, उच्चशिक्षित नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

विमल कुंभार यांचे निधन



पुणे : काळेवाडी पिंपरी येथील रहिवासी विमल सुदाम कुंभार यांचे दिनांक १/६/२०२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कै. विमल यांनी पती सुदामराव यांच्या साथीने मुले संजय व संदीप यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. कै. विमल यांच्या पश्चात पती सुदामराव, मुले संजय, संदीप, सुना अनुक्रमे सौ. योगिता, सौ. प्रज्ञा, उच्चशिक्षित नातवंडे असा परिवार आहे.

***

निवृत्त पो. अधि. सयाजी जाधव यांचे निधन



पुणे : पिंपरी नेहरूनगर येथील रहिवासी आणि बोरी बुद्रुक तालुका जुन्नरचे सुपुत्र कर्तव्यदक्ष पोलीस अधिकारी, सयाजी शंकर जाधव यांचे दिनांक १/७/२०२४ रोजी वृद्धापकाळाने वयाच्या ९५ व्या वर्षी दुःखद निधन झाले. प्रामाणिकपणे काम केल्याने राईटर पदावरून पदोन्नती घेत घेत पीएसआय

पदावरून ते निवृत्त झाले. पत्नी कै. ठकूबाई यांच्या साथीने त्यांनी दोन मुली व तीन मुले यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. एक आदर्श पिता म्हणून त्यांनी सर्व कर्तव्य चांगल्या प्रकारे पार पाडले. मुलगी रेखावर त्यांचा खुप जीव होता, आमच्या रेखाने खुप कष्टाने संसार सांभाळून व्यवसाय वाढवला असे ते सर्वांनाच अभिमानाने सांगत असत. कै. सयाजी यांच्या पश्चात मुले शिरीष (व्यावसायिक), विवेक (सामाजिक कार्यकर्ता), संजय (पिंपरी चिंचवड महापालिका निवृत्त कर्मचारी), मुली सौ. वनिता शांताराम शिंदे, कृतिका इलेक्ट्रीकल्सच्या संचालिका सौ. रेखा सुहास हिवरकर, सुना, जावई व्यावसायिक शांताराम शिंदे, उद्योजक सुहास हिवरकर, उच्च शिक्षित नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

बाबुराव आहेर यांचे निधन



नाशिक : मिग ओझर येथील बाबुराव रावबा आहेर यांचे दिनांक १५/६/२०२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. मा. सरपंच छबू शेठ रावबा आहेर यांचे ते मोठे बंधू होते. कै. बाबुराव यांच्या पश्चात पत्नी मीराबाई, मुलगा संजय, रमेश, खंडेराव, संतोष, पांडुरंग, रवींद्र, मुली सौ. लता मधुकर तांदळे, सौ. रिता दत्तात्रय जोर्वेकर, सुना जावई नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

राजेंद्र पळसदेवकर यांना भगिनी शोक



पुणे : जेष्ठ समाजसेवक राजेंद्र पळसदेवकर यांच्या भगिनी सौ. सुनंदा रमाकांत चव्हाण (राहूकर) (वय वर्षे ७२, रा. कसबा पेठ, पुणे) यांचे रविवार दिनांक २३/०६/२०२४ रोजी रात्री अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. कै. सौ. सुनंदा यांच्या पश्चात पती रमाकांत, मुले अतुल, राजेश, अभिजीत, मुलगी सौ. रोहिणी अरविंद पालवणकर, दोन भाऊ भावजया, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

***

साईनाथ सोनावळे यांना मातृशोक



ठाणे : अखिल महाराष्ट्र समाज विकास संस्थेचे खजिनदार साईनाथ सोनावळे यांच्या आई मीना हरीभाऊ सोनावळे यांचे दि. २५/६/२४ रोजी पहाटे ३.३० वाजता हृदय विकाराने आकस्मित दुःखद निधन झाले. कै. सौ. मीना यांच्या पश्चात पती हरिभाऊ, मुले गणेश, साईनाथ, सुना, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

***

कै. महादेव बाबुराव हर्णसकर



भोर : येथील जेष्ठ व्यावसायिक महादेव बाबुराव हर्णसकर यांचे वृद्धापकाळाने दिनांक १/७/२०२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले. ईश्वर त्यांच्या आत्म्यास चिरःशांती देवो. हीच ईश्वरचरणी प्रार्थना. शोकाकुल – समस्त हर्णसकर, कुंभार परिवार, भोर.

***

रमेश रसाळ यांचे निधन



नाशिक : रमेश भिकाजी रसाळ यांचे दिनांक २१/४/२०२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कै. रमेशराव यांच्या पश्चात पत्नी कुसुम, मुलगा ॲड. स्वप्नील रसाळ, भाऊ अंबादास, सोमनाथ, मुलगी, जावई सुनिल सोनवणे (शिर्डी), सून, नातवंडे असा परिवार आहे

***

गडहिंग्लज येथील सुप्रसिद्ध हॉटेल व्यावसायिक शिवाजी कुंभार यांचे निधन



कोल्हापूर : गडहिंग्लज येथील सुप्रसिद्ध हॉटेल साईप्रसादचे संचालक शिवाजी अप्पाजी कुंभार यांचे दिनांक १५/७/२०२४ रोजी वयाच्या ६६व्या वर्षी हृदय विकाराच्या तीव्र झटक्याने दुःखद निधन झाले. वयाच्या दहाव्या वर्षी मुंबई येथे हॉटेलमध्ये मोरीवर भांडी साफ करण्याचे काम सुरु केले. अतिशय चुनचुणीत असलेल्या शिवाजीने अल्पावधित मालकांचा विश्वास संपादन केला. वेटर, कॅप्टन, कुक, शेफ अशी पदे त्यांनी तारुण्यवस्थेतच मिळवली, पुढे मालकांनी त्यांना व्यवस्थापक पद दिले. या काळात ते मराठी हिंदी भाषे व्यतिरिक्त इंग्रजी, कन्नड, तुलू, तेलगू, मल्याळम अशा अनेक भाषा ते बोलायला शिकले. आनंदी व्यक्तिमत्व, मधाळ वाणी आणि हरहुन्नरी स्वभावामुळे ग्राहकांशी खुप चांगला संवाद साधत, तसेच सर्व पदार्थांचा दर्जा उत्तम ठेवल्यामुळे व्यवसाय खुप वाढला त्यामुळे मालकांनी त्यांना चांगला इन्सेन्टिव्ह दिला. कालांतराने त्यांनी सिन्नर, नाशिक येथे भागीदारीत हॉटेल चालू केले, अल्पावधीत हे हॉटेल सुप्रसिद्ध झाले परंतु भागीदाराच्या तोंडाला पाणी सुटले त्यांनी नफ्यातला योग्य वाटा न देता शिवाजीराव यांना बाजूला केले त्यामुळे खुप मोठे संकट आले. नावातच शिवाजी असल्याने त्यांनी खचून न जाता स्वतःच्या गावाजवळ गडहिंग्लज येथे भडगाव रोडला जागा घेतली आणि हॉटेल साईप्रसादची मुहूर्तमेढ रोवली. गावापासून थोडे लांब असल्याने हे हॉटेल चालणार नाही असे गावातील लोक म्हणत असत परंतु शिवाजीराव यांनी आपले सर्व कौशल्यपणाला लावून काम केले, पदार्थांचा दर्जा उत्तम ठेवला त्यामुळे अल्पावधीत हॉटेल साईप्रसाद लोकप्रिय झाले आणि शुद्ध

शाकाहारी हॉटेल म्हणून अव्वल स्थान मिळवले ही अत्यंत अभिमानास्पद बाब आहे.

शिवाजीराव यांनी पत्नी सुगंधा यांच्या साथीने दोन मुली आणि एक मुलगा यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. मोठी कन्या शीतल हातकणंले येथे नेत्र चिकित्सा अधिकारी आहे, दोन नंबरची मुलगी श्वेता बी फार्म आहे, मुलगा सुशांत याने हॉटेल मॅनेजमेंटची डिग्री मिळवली आहे व दोन वर्षांपासून हॉटेल साईप्रसाद सांभाळत आहे त्याचे लग्न शिवाजीराव यांनी राजेशाही थाटात स्वतः केले.

कै. शिवाजीराव यांच्या पश्चात पत्नी सुगंधा, मुलगा सुशांत, सून सौ. भावना, मुली सौ. शीतल सुनील कुंभार नेत्रचिकित्सा अधिकारी हातकणंगले, तालुका जयसिंगपूर, सौ. श्वेता सुहास कुंभार, आजरा, जावई सुनील, सुहास, आणि नातवंडे असा मोठा परिवार आहे.

***

ह.भ.प. मारुती महाराज कुंभार यांचे निधन



कोल्हापूर : कोतोली तालुका शाहूवाडी येथील ह.भ.प. मारुती महाराज कुंडलिक कुंभार यांचे दिनांक २९/७/२४ रोजी वयाच्या ९३व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कुमार अवस्थेत असतानाच अध्यात्माची ओढ असलेल्या मारुती यांनी केदारनाथ येथे तपश्चर्या केली. सात वर्ष उपवास साधना केली. गुरु आज्ञा घेऊन कोतोलीगावी आले आणि गृहस्थाश्रमात प्रवेश केला. सुरवातीच्या काळात कोकरूड येथे कापड दुकान सुरु केले परंतु ते तोट्यात गेले. पुढे नशीब अजमावण्यासाठी मुंबई मध्ये गेले डोक्यावर पावाची पेटी घेऊन दारोदारी फिरून पाव विक्री केली. त्यातून जमा झालेल्या भांडवलावर एक बेकरी चालवायला घेतली परंतु हवे तसे यश मिळाले नाही. नंतर पुन्हा ते कोतोली गावी आले, त्या वेळी चांदोली डॅमची निर्मिती चालू होती, कॅनॉलची छोटी छोटी कामे घेऊन शासकीय ठेकेदारी सुरु केली, वीट कारखाना चालू केला, व्यवसायात चांगला जम बसवला. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज, स्वामी नामानंद महाराज, तनपुरे महाराज अशा अनेक संतांना कोतोलीमध्ये आणून शाळा व विहिरींची उद्घाटने केली. कोतोली गावाच्या पंचक्रोशीत एकवीस अखंड हरीनाम सप्ताह स्वखर्चाने केले. मारुती महाराजांनी कोतोलीला पुण्यभूमी केली असे म्हटले तरी वावगे ठरणार नाही.

सर्व राजकीय नेत्यांशी मारुती महाराजांचे घनिष्ठ संबंध होते. पत्नी लक्ष्मीबाई यांच्या साथीने त्यांनी तीन मुलांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. मोठे चिरंजीव डॉ. सुखदेव एम डी झाले असून सुप्रसिद्ध होमिओपॅथी तज्ञ आहेत. अरोंदा, तालुका सावंतवाडी आणि पर्वरी, गोवा येथे त्यांचा दवाखाना आहे. दुसरे चिरंजीव कोतोलीचे माजी सरपंच अशोक हे आदर्श माध्यमिक शिक्षक असून उत्कृष्ट लेखक आणि ग्रामीण कथा कथनकार म्हणून ते सुप्रसिद्ध आहेत. अनेक साहित्य संमेलनामध्ये त्यांनी ग्रामीण कथा कथन सादर केले आहे. सून सौ. आशा अशोक कुंभार यांनी सुद्धा कोतोलीचे सरपंचपद भूषवले आहे. धाकटे चिरंजीव गणेश हे सिविल इंजिनिअर असून पुणे येथे कार्यरत आहेत.

वै. मारुती महाराज यांच्या पश्चात पत्नी लक्ष्मीबाई, मुले डॉ. सुखदेव, अशोक, गणेश, सुना, उच्चशिक्षित नातवंडे, पणती, एक भाऊ, एक बहीण असा मोठा परीवार आहे.

***

कुंभश्री संपादक संजय राजे यांना मातृ शोक



पुणे : कुंभश्री संपादक संजय राजे यांच्या मातोश्री तसेच सोलापूर जिल्ह्याच्या निवासी उपजिल्हाधिकारी मनीषाताई कुंभार यांच्या आजी श्रीमती तारूबाई पांडुरंग कुंभार यांचे दिनांक १०/८/२०२४ रोजी वयाच्या ९५ व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. अत्यंत प्रतिकूल परिस्थिती असताना तारूबाई यांनी चुली, गणपती आणि शिलाईकाम करून पाच मुली आणि एक मुलगा यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. ही सहा कुटुंबे सुस्थितीत असून समाजकार्यात सहभागी असतात. त्यांच्या या कार्याची दखल घेऊन राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी पिंपरी चिंचवड आणि शिल्पकार बी आर खेडकर प्रतिष्ठान, पुणे यांच्या तर्फे तारूबाई यांना आदर्श माता पुरस्कार प्रदान करण्यात आला होता.

कै. तारुबाई यांच्या पश्चात मुलगा संजय राजे, मुली श्रीमती सत्यभामा बाळकृष्ण कुंभार, सौ. सुरेखा आंण्णासो कुंभार, श्रीमती सुनंदा नाथा कुंभार, सौ. सुनिता महादेव कुंभार, सौ. सुवर्णा मानसिंग थोरावडे, सुन, जावई, उच्चशिक्षित नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

मनोहर आचोळकर यांचे निधन



वसई : पालघर जिल्हा कुंभार समाज संघटनेचे माजी उपाध्यक्ष आणि अनेक वर्षे ते कामण या गावचे व वसई तालुका कुंभार समाजाचे अध्यक्ष असणारे धडाडीचे नेते मनोहर चिंतामण आचोळकर यांचे वयाच्या ६८ व्या वर्षी दिनांक २६/८/२०२४ रोजी दुःखद निधन झाले. त्यांनी कामण येथील संत शिरोमणी गोरोबा काका मंदिर मंडळाचे कार्याध्यक्ष म्हणून सलग १२वर्षे धुरा सांभाळली. तत्पूर्वी कामण येथील गोरोबाकाका मंदिर उभारण्यात त्यांचा फार मोठं योगदान होते. कै. मनोहर आचोळकर यांच्या पश्चात पत्नी प्रिती मनोहर आचोळकर, मुलगा राहुल मनोहर आचोळकर, मुली सौ. रसिका मंगेश कुंभार, सौ. निशिगंधा जय पवार, जावई, नातवंडे, भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे. वसईला विरार महानगरपालिका स्थायी समितीचे माजी अध्यक्ष सुनिलराव आचोळकर यांचे ते काका होते.

***

बाळाबाई कुंभार यांचे निधन



कराड : सरूड तालुका शाहूवाडी जिल्हा कोल्हापूर येथील रहिवासी श्रीमती बाळाबाई नारायण कुंभार यांचे कराड येथे दिनांक २४/७/२०२४ रोजी वयाच्या ८३ व्या वर्षी दुःखद निधन झाले. पती नारायण यांच्या साथीने कुंभार काम करून खुप कष्टाने एक मुलगा व एक मुलगी यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. त्यांचा मुलगा आनंदा हे उत्कृष्ठ कला शिक्षक होते. गडहिंग्लज येथील हायस्कूल मधून नुकतेच ते निवृत्त झाले. सध्या ते कराड मध्ये स्थायिक झाले आहेत. मुलगी सौ. विमल लक्ष्मण कुंभार ही विरार जिल्हा पालघर येथे असून, जावई लक्ष्मण कुंभार हे आदर्श माध्यमिक शिक्षक होते. मुंबई महानगरपालिकेच्या हायस्कूल मधून नुकतेच ते निवृत्त झाले आहेत. कै. बाळाबाई यांच्या पश्चात मुलगा आनंदा, सून सौ. संगीता, मुलगी सौ. विमल लक्ष्मण कुंभार, जावई लक्ष्मण कुंभार, भाऊ बाळासाहेब, महादेव, भावजया, भाचे, भाच्या, नातवंडे असा मोठा परिवार आहे.

***

चंद्रशेखर उर्फ पूनम शेठ वडिले यांचे निधन



नंदुरबार : येथील सुप्रसिद्ध व्यावसायिक आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते पूनमशेठ वडिले यांचे दिनांक २७/०७/२०२४ रोजी दुःखद निधन झाले. पूनमशेठ यांच्या पश्चात मुलगा दीपक (आर्किटेक्ट), सून, नातू, भाऊ, भावजया, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे.

***

सौ. यमुनाताई दरेकर यांचे निधन



जुन्नर : आर्वी येथील सौ. यमुनाताई कचरू दरेकर यांचे २८/८/२०२४ रोजी वयाच्या ७४व्या वर्षी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कै. सौ. यमुनाताई यांच्या पश्चात पती कचरू, मुले रवींद्र, गणेश, तीन मुली, सुना, जावई, नातवंडे असा मोठा परिवार आहे. ओबीसी महामंडळाचे जिल्हा प्रमुख रवींद्र दरेकर यांच्या त्या आई होत्या.

***

अशोक वाडेकर यांना मातृशोक



पुणे : चिंचवड येथील व्यावसायिक आणि जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते अशोक रामचंद्र वाडेकर यांच्या आई श्रीमती लक्ष्मीबाई यांचे वयाच्या ८५ व्या वर्षी वृद्धापकाळाने दिनांक १५/५/२०२४ रोजी दुःखद निधन झाले. पती रामचंद्र यांच्या साथीने त्यांनी दोन मुले आणि एक मुलगी यांना चांगले शिक्षण व संस्कार दिले. कै. लक्ष्मीबाई यांच्या पश्चात मुलगा अशोक, मुलगी सौ. सुशीला मारुती चव्हाण (किवळे), सुना, जावई, उच्च शिक्षित नातवंडे असा परिवार आहे. त्यांचा एक नातू समीर अशोक वाडेकर हा लेफ्टनंट कर्नल या पदावर आसाम येथे देश सेवा करत आहे. इतर नातवंडे सुद्धा उच्च शिक्षण घेऊन विविध ठिकाणी कार्यरत आहेत.

***

भाग्यवंत कुंभार यांना मातृशोक



सातारा : सातारा येथील जेष्ठ सामाजिक कार्यकर्ते आणि माजी नगरसेवक भाग्यवंत श्रीपती कुंभार यांच्या मातोश्री श्रीमती सुभद्रा श्रीपती कुंभार यांचे वृद्धापकाळाने दिनांक २२/८/२०२४ रोजी दुःखद निधन झाले.

***

माजी सभापती सुनंदा जोर्वेकर यांचे निधन



संगमनेर : संगमनेर पंचायत समितीच्या माजी सभापती सौ. सुनंदा बाळासाहेब जोर्वेकर यांचे दिनांक ३०/८/२०२४ रोजी अल्पशा आजाराने दुःखद निधन झाले.

***

रामदास काळे यांचे निधन



मालेगाव : येसगाव येथील रामदास फकिरा काळे यांचे वयाच्या ८३ व्या वर्षी दिनांक २९/८/२०२४ रोजी वृद्धापकाळाने दुःखद निधन झाले. कै. रामदास यांच्या पश्चात दोन मुले, दोन मुली, सुना, जावई, नातवंडे, भाऊ भावजय, पुतणे पुतण्या असा मोठा परिवार आहे.

***

महासंघाचे माजी अध्यक्ष सुरेश हिरे यांचे निधन



छत्रपती संभाजीनगर : तत्कालीन औरंगाबाद नगरपरिषदेचे अभ्यासू नगरसेवक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते सुरेश हिरे वय ७४, रा. नागेश्वरवाडी, छत्रपती संभाजी नगर, यांचे शनिवारी पुणे येथे निधन झाले. १९८४ साली सुरेश हिरे यांनी मराठवाडा पदवीधर मतदारसंघातून निवडणूक लढवली होती. स्व. वसंतराव काळे यांच्याकडून ते अवघ्या काही मतांनी पराभूत झाले होते. त्यावेळी ते विजयी झाले असते तर ते भाजपचे एक मोठे नेते म्हणून पुढे आले असते. नंतर त्यांनी सामाजिक कार्याला वाहून घेतले.

महाराष्ट्र कुंभार समाज महासंघाचे अध्यक्ष म्हणून त्यांनी सात वर्षे काम केले. या काळात त्यांनी सारा महाराष्ट्र पिंजून काढत समाजाचे उत्कृष्ट संघटन केले. छत्रपती संभाजीनगर कुंभार समाजाने ८ ऑक्टोबर २०२३ रोजी कुलस्वामिनी मंगल कार्यालयात तत्कालीन केंद्रीय अर्थ राज्यमंत्री डॉ. भागवत कराड, ओबीसी कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या

हस्ते 'जीवनगौरव' पुरस्कार देऊन हिरे यांना सन्मानित केले होते. त्यांच्या पश्चात पत्नी सुनंदा, मुलगा सुयोग व एक मुलगी, सून, नातवंडे असा परिवार आहे. शनिवारी हिंजवडी गावठाण (पुणे) येथील स्मशानभूमीत हिरे यांच्या पार्थिवावर अंत्यसंस्कार करण्यात आले.

***

किसनराव जाधव यांचे निधन



सिन्नर : किसनराव गंगाधर जाधव यांचे २३/९/२०२४ रोजी वयाच्या १०२ व्या वर्षी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले.

कै. किसनराव यांच्या पश्चात मुले विठ्ठल, अनिल, अशोक, मुलगी सौ. नंदाबाई सोमनाथ जोर्वेकर, सुना, जावई, उच्चशिक्षित नातवंडे, पतवंडे असा मोठा परिवार आहे.

***

रंगराव शिर्के यांचे निधन



रंगराव पांडुरंग शिर्के वय ७६ यांचे दि. १९/१०/२०२४ रोजी वृद्धापकाळाने दु:खद निधन झाले. एस्.टी. महामंडळामध्ये कोल्हापूर, इचलकरंजी येथे त्यांनी वर्कशॉपमध्ये प्रामाणिकपणे नोकरी केली. शालेय जीवन उत्तम मल्लखांबपटू होते. त्यानंतरच्या काळात अनेक मुलांना मल्लखांब प्रशिक्षण देण्याचे कार्य केले. अजातशत्रू म्हणून त्यांचे व्यक्तीमत्व प्रसिद्ध होते.

त्यांच्या पश्चात पत्नी केराबाई, मुलगी सौ. रोहिणी रविराज कुंभार, जावई रविराज कुंभार (मांगले), भाऊ, भावजयी, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे. त्यांच्या जाण्याने नांदलापूर पंचक्रोशी व शिर्के परिवारावर दु:खाचा डोंगर पसरला आहे. त्यातून सावरण्याची शक्ती परमेश्वरांने कुटूंबाला द्यावी. त्यांच्या दु:खात आपला कुंभश्री परिवार सामिल आहे.

***

लीलाबाई गणपती कुंभार यांचे निधन



रेठरे धरण (ता. वाळवा) येथील लीलाबाई गणपती कुंभार (वय ८३) यांचे दि. १७ ऑगस्ट रोजी अल्पशा आजाराने निधन झाले.

रत्नागिरी येथील निवृत्त विस्तार अधिकारी अधिकारी सर्जेराव कुंभार, निवृत्त बसवाहक भीमराव कुंभार व माजी सैनिक शंकर कुंभार यांच्या आई होत. त्यांच्या पश्चात पती, तिन मुले, मुलगी, सुना, उच्चशिक्षित डॉक्टर, इंजिनिअर नातवंडे, पतवंडे असा परिवार आहे.

***

मयुरेश कुंभार यांचे अपघाती निधन



पुणे : यमुनानगर, निगडी येथील तरुण कार्यकर्ते मयुरेश दिलीप कुंभार यांचे कार अपघाता –मध्ये दि. १३/१०/२०२४ रोजी वयाच्या २८ व्या वर्षी दु:खद निधन झाले. त्यांच्या अचानक निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होते आहे. कै. मयुरेश यांच्या पश्चात वडील दिलीपराव, आई सौ. लक्ष्मी, भाऊ गणेश, वहिनी सौ. प्रीती, चुलते, चुलत्या, चुलत भाऊ भावजया, पुतणे, पुतण्या असा मोठा परिवार आहे.

***

Akhilesh K. Prajapati
9881407087



JAY SHRI RAM INDUSTRIES



JOB WORK : Lathe Work, Center less Grinding & Thread Rolling

Dynamic Co.-op. Society, F9/9, MIDC, Ambad, Nashik - 10.
Tel. : 0253-6603136

आमचे प्रेरणास्थान



कै. माणिकराव वालजी बोरसे



प्रोप्रा. दत्तात्रय माणिकराव बोरसे
9422230979



प्रशांत द. बोरसे
B.E. (Mech)
7798173900

सुधाकर द. बोरसे 9422318644
B.E. (Mech)

ISO 9001:2000 registered Company

दत्ता एंटरप्रायझेस

स्पेशालिस्ट
टुलरुम प्रोडक्ट,
सी.एन.सी. पंच प्रेस, टूलींग,
डाईज अँड मोल्ड, झिंग फिक्चर्स

सर्व्हे नं. ३८, कॉलनी नं. ४, साईबाबा मंदिराजवळ, काळे बोराटे नगर, हडपसर, पुणे - २८